म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
1725

REFBK-001591 4

दुसऱ्या आवृत्तीच्या

प्रकाशकाचे निवेदन

लोकहितवादीकृत निबंधसंग्रह यांचे निबंध हे मराठी गद्य वाङ्मयाचे भूषण तर आहेतच, परंतु त्यांचे सामाजिक दृष्ट्या महत्त्व फार मोठे आहे. 'या विद्वान ग्रंथकाराचे परोपरीच्या विषयावरील शोध पाहून कोणासही नवल वाटल्यावाचून रहाणार नाही.' हे उद्‌गार 'वृत्तवैभवा'च्या मालकांनी पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशकीय सूचनेत काढले ते आजही लागू आहेत. म्हणूनच हा संपूर्ण निबंधसंग्रह आज शंभर वर्षांनी पुन्हा प्रकाशित करण्यास आम्हाला आनंद होत आहे. ह्या ग्रंथाच्यां आज ज्या आवृत्त्या उपलब्ध आहेत त्यात ह्या संग्रहातील सर्वच निबंध घेतलेले नाहीत. हेही एक हा संपूर्ण ग्रंथ छापण्याचे विशेष प्रयोजन.

ह्या ग्रंथाचे संपादकत्व करण्यासाठी आम्हाला प्रा० अ. का. प्रियोळकर यांच्यासारखी अधिकारी व्यक्ती मिळाली हे आम्ही आमचे सद्‌भाग्य समजतो. त्यांनी मूळ ग्रंथ फोटोस्टॅट करून त्याची छपाई निर्दोष व्हावी यासाठी तर कष्ट घेतलेच शिवाय अत्यंत महत्त्वपूर्ण अशी प्रस्तावना लिहिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

ह्या ग्रंथाची किंमत आजच्या प्रथेनुसार किमान चाळीस रुपये ठेवावी लागली असती परंतु महाराष्ट्र राज्याच्या साहित्य संस्कृती मंडळाने तेरा हजार रुपयांचे अनुदान दिल्यानें किंमत बरीच कमी ठेवता आली. याबद्दल आम्ही मंडळाचे ऋणी आहोत.

हे पुस्तक हरी नारायण आपटे संग्रह

हे १५९

अनेकप्रकारच्याविषयां-

वरील उपयुक्त लेखन-

अहमदनगर येथें.

वृत्तवैभव छापरवान्यांत छापिले.

प्रथमांश

सन १८६६

किंमत चार रुपये.

(पहिल्या आवृत्तीचें मुखपृष्ठ)



लोकहितवादीकृत निबंधसंग्रह

प्रथमांश

(शतसांवत्सरिक द्वितीयावृत्ति १९६७)

संपादक

अनंत काकबा प्रियोळकर

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

पहिली आवृत्ति, १८६६
दुसरी आवृत्ति, १९६७

ह्या प्रकाशनाला महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अनुदान दिले आहे

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४
प्रकाशक : ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४ WB

पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशकाची

सूचना

या विद्वान ग्रंथकाराचे परोपरीच्या विषयावरील शोध व विचार पाहून कोणासही नवल वाटल्यावाचून राहाणार नाहीं. आलीकडे नेटिव विद्वान बहुत असतील व यांहूनही अधिक विद्वान असतील, पण त्यांनीं असे अनेक विषयावर स्वीय विचाराचे लेख लिहिलेले कोटें आढळत नाहींत. आणि या परोपकारी व लोकहितवादी गृहस्थानें जाति, धर्म, शास्त्र, आचार, राज्य, लोकव्यवहार इत्यादि विषयांवर निर्भिडपणानें रास्त विचार दर्शवून एक महासागराएवढा लेखाचा साठा करून ठेविला आहे, व तो सर्व प्रसिद्धीस येण्यास हा प्रथमचा शुभशकुन आहे. म्हणून हा ग्रंथ सर्वांचे आदरास अगत्य पात्र होईल, असा भरवसा आहे.

हा ग्रंथ कित्येक अडचणीच्या कारणानें आम्हाकडून व्हावा तसा चांगला झाला नाहीं. एक तर सर्व संग्रह एकेवेळीं मिळाला नाहीं. दुसरें, एका निबंधांतील द्विरुक्ति किंवा सारख्याच अर्थाचे तेच ते विचार लिहिण्यांत आलेले काढून टाकावे तर रूपांतर होऊन लेखास केवळ नवें स्वरूप येतें व तेणेंकरून या शोधकपुरुषाची ग्रंथसरणी गेली असती. ह्मणून तसें करण्याची इच्छा नवती व परमाणगीही नव्हती. याजकरितां मूळ लेखांत सांगण्यासारखा फेरफार कांहीं करितां आला नाहीं; तिसरी गोष्ट, ग्रंथ मोठा असल्याकारणानें वेगवेगळ्या जुन्या व नव्या लिहिणारांच्या हातून तो तयार केला व छापण्यांतही तसेंच झालें व प्रसंगवशेंकरून आमचें दोन वेळां बाहेर प्रांतीं जाणें झालें ह्मणून यावर पैरवी कमी झाली, आणि दोन निबंधही दुबार आले त्यास निरुपाय आहे. तरी ग्रंथाची जी एकंदर उपयुक्तता व वाचनविषयाचा नवीन साठा या दोहों प्रातीच्या आनंदभरांत तें दोषारोपण सहजीं विसरून जाण्याजोगें आहे. असें सांगून आम्ही वाचकांची माफी मागतों.

वृत्तवैभवाचे मालक

REFBK-0015914

पहिल्या आवृत्तीची


प्रस्तावना

"लोकहितवादी" याचे लेख आज वीस वर्षें बहुत प्रसिद्ध झाले आहेत, ते कित्येक स्वतंत्र ग्रंथ आहेत व कित्येक निबंधरूपानें वर्तमानपत्रांत जागोजाग छापले गेले आहेत. त्यांची माहितगाराचे विद्यमानें आम्ही जमवाजमव केली ती संख्या पाहतां इतकी आहे कीं, हल्लींचा हा ग्रंथ त्या एकंदराचा दशमांश म्हटला तरी शोभेल, व हा इतका तयार करण्यास आम्हांस एक वर्षावर मेहेनत करावी लागली, आणि एक तोड्याहून जास्त खर्च झाला. आतां बाकीचे अंश आम्हाजवळ आहेत ते अनुक्रमानें फावेल व अनुकूलता होईल तसे प्रसिद्ध करावे, अशी आमची इच्छा आहे. या संग्रहांतील विषय अनेक प्रकारचे आहेत आणि सांप्रतकाळीं विद्या व विचार वाढत आहेत तेणेंकरून त्यांचें फल कसें होतें तें या ग्रंथावरून चांगलें ध्यानांत येईल. हल्लींचा अंश लोकांस आवडल्यास पुढील अंश काढण्यास उत्तेजन येईल. घेणारास सुलभ पडण्याकरितां याची किंमत थोडी ठेविली आहे.

ग्रंथकर्ता

प्रस्तुत आवृत्तीच्या संपादकाचें

निवेदन



'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह (प्रथमांश)' हा ग्रंथ बरोबर शंभर वर्षांमागें म्हणजे १८६६ सालीं, अहमदनगर येथील 'वृत्तवैभव' प्रेसच्या मालकानीं छापून प्रसिद्ध केला. हा ग्रंथ शिलायंत्रावर छापला असून त्याची पृष्ठसंख्या ४+५+१०९० एवढी आहे. यांतील आरंभींचीं १ ते ५१२ पृष्ठें 'लोकहितवादींचीं शतपत्रें' या नांवाखालीं निरनिराळ्या तीन विद्वानांनीं अलीकडे प्रसिद्ध केलीं आहेत. वास्तविक हीं 'शतपत्रें' एकंदर १०८ म्हणजे 'अष्टोत्तर-शतपत्रें' होत. पहिलें शतक पुरें करून दुसऱ्या नव्या शतकास आरंभ करण्याचा 'लोकहितवादीं'चा उद्देश होता. म्हणून 'शतपत्रांचा इत्यर्थ' या नांवानें शंभराव्या पत्रांत त्यांनीं पहिल्या शतकाचा समारोप केला. त्यांत ते लिहितात, "यापुढें कांहीं दिवसांनीं लोकहितवादी दुसऱ्या शतकास आरंभ करतील;" पण 'प्रभाकर' पत्रांत दुसरें शतक पुरें होण्याची शक्यता न दिसल्यामुळें त्यांनीं पहिल्या शतकांत नव्या आठ पत्रांची भर घालून अष्टोत्तरशत पत्रांची भरती केलेली दिसते.

हा ग्रंथ शताब्दि-ग्रंथ म्हणून १९६६ सालींच प्रसिद्ध व्हावा, अशी माझी फार इच्छा होती. म्हणून 'मराठी संशोधन पत्रिके'च्या जानेवारी १९६५ च्या अंकांत, हा ग्रंथ मूळाबरहुकूम टाइपांत छापण्याच्या आवश्यकतेबद्दल एक संपादकीय स्फुट मीं लिहिलें आणि त्या अंकाची एक प्रत, त्यावेळचे पुणें विद्यापीठाचे कुलगुरु, आमचे स्नेही कै० काकासाहेब गाडगीळ यांना पाठविली. पुणें विद्यापीठानें हें प्रकाशनाचें कार्य हातीं घ्यावें अशी त्या स्फुटांत सूचना होती. कांहीं दिवसांनीं काकासाहेब यांची भेट झाली असतां, हें काम आपण स्वीकारीत आहोंत, असें त्यांनीं मला सांगितलें; तेव्हां एक गोष्ट मागिला लागली म्हणून मी निश्चित झालों. पुढें एका वर्षानें, काकासाहेब दिवंगत झाल्यावर लगेच कांहीं दिवसांनीं, पुणें विद्यापीठाकडून मला एक पत्र आलें. त्याचा आशय असा होता कीं, ज्याअर्थीं दोघांतिघां गृहस्थांनीं हा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला आहे, त्याअर्थी तो पुनः छापण्याची विद्यापीठाला आवश्यकता भासत नाहीं.

वास्तविक पाहतां अलीकडे ज्या तीन प्रती छापून निघाल्या आहेत त्या वर सांगितल्याप्रमाणें फक्त 'शतपत्रां'च्या, संपूर्ण ग्रंथाच्या नव्हेत. ही गोष्ट 'मराठी

संशोधनपत्रिकें'तील स्फुटांत मीं स्पष्ट केली होती; परंतु विद्यापीठाच्या नजरेस ही गोष्ट पुनः आणण्याच्या भरीस पडावेसें मला वाटलें नाहीं.

पुढें कांहीं दिवसांनीं मुंबई येथील प्रसिद्ध पॉप्युलर प्रकाशनचे श्री० भटकळ बंधु यांच्याकडे हा प्रश्न काढला असतां त्यांनीं हें काम पत्करण्याचें आनंदानें मान्य केलें. मात्र या पुस्तकाच्यीं संपादनाची जबाबदारी मला अंगावर घ्यावी लागली. वास्तविक माझ्या प्रकृतीच्या व विशेषतः डोळ्यांच्या त्रासामुळें हें कार्य शिरावर घेण्यास मी मुळींच उत्सुक नव्हतों. पण माझे स्नेही रा० बापुराव नाईक यांनीं उत्साह देऊन मला या कामाला उद्युक्त केलें, हें येथें नमूद करणें अवश्य आहे. मुंबई विद्यापीठाचे रेक्टर प्रा० गोवर्धन पारीख यांनींही विद्यापीठातर्फे हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याची तयारी दाखविली होती; परंतु रा० भटकळांची हा ग्रंथ स्वतःच प्रसिद्ध करण्याची उमेद दिसली आणि त्याप्रमाणें तो आतां त्यांच्यामार्फत प्रसिद्ध होत आहे.

या ग्रंथाची हातानें नक्कल करतांना तिच्यामध्यें चुका राहण्याचा संभव होता. म्हणून त्याची छायाप्रत (photostat), प्रेस कॉपी म्हणून उपयोगांत आणिली आहे. हें पुस्तक शिळाछाप असून त्यांत कांहीं शब्द व क्वचित् ओळी स्पष्ट उठल्या नाहींत. तरीपण अशीं स्थळें, एक संपूर्ण व दोन अपूर्ण प्रती यांच्या साहाय्यानें निश्चित केलीं आहेत.

लोकहितवादींच्या ग्रंथाची मूळ भाषा जशाची तशी ठेवण्याचा या आवृत्तींत प्रयत्न आहे. लोकहितवादींची किंवा त्यांच्या काळची लेखनपद्धति आजच्या काळच्या लोकांना कळावी हें खरें असलें तरी, आजच्या लोकांना त्यांचा ग्रंथ दुर्बोध होणार नाहीं, अशीही काळजी घेणें अवश्य असतें. या दृष्टीनें मूळांत कोणते फेरफार करावे याचा विचार संपादकाला करावा लागतो. जुन्या हस्तलिखित पोथ्यांवरून प्राचीन मराठी ग्रंथ मुद्रित करतांना कोणतें धोरण राखावें, याची चर्चा रघुनाथपंडितविरचित 'दमयंती-स्वयंवरा'च्या (आवृत्ति १ ली, १९३५) आरंभीं जोडलेल्या पाठचिकित्साशास्त्रावरील निबंधांत मीं विस्तारानें केली आहे. जुने मुद्रित ग्रंथ पुनर्मुद्रित करतांना पाठचिकित्सेचे कोणते नियम पाळावे, हें जास्त खोलांत जाऊन सांगणें विस्तारभयास्तव येथें अशक्य आहे. तरीपण त्यांचा अगदीं थोडक्यांत निर्देश करतों—

(१) जुन्या मुद्रित ग्रंथांत शब्द जोडण्याची किंवा तोडण्याची अनवस्था असे. हे शब्द आजच्या पद्धतीप्रमाणें जोडून किंवा तोडून घ्यावेत.

(२) जुने लेखक व मुद्रक अनुस्वारांच्या बाबतींत निष्काळजी असत. अशा स्थितींत त्या काळच्या पद्धतीला अनुसरून जरूर तेथें ते द्यावे.

(३) ऱ्हस्वदीर्घाच्या बाबतींत जुन्या काळीं निश्चितपणा नव्हता. या जुन्या व्यवस्थेंत शक्यतोवर ढवळाढवळ करूं नये.

(४) विरामचिन्हांत सुबोधतेच्या दृष्टीनें जरूर तेथें बदल करण्यास हरकत नाहीं.

(५) संस्कृत श्लोक जेथें उद्धृत केले असतील, त्यांत जे दोष असतील ते मूळ ग्रंथ

पाहून सुधारून घ्यावे. असे मूळ ग्रंथ किंवा संदर्भस्थळें न सांपडल्यास उघड संस्कृत व्याकरणाच्या दृष्टीनें ज्या चुका असतील त्या शक्य तर दुरुस्त कराव्यात.

(६) इंग्रजीचे देवनागरींत जे जुन्या काळचे उच्चार दिले असतील ते जशाचे तसे ठेवावे. आजच्या उच्चारांप्रमाणें बदलून घेऊं नयेत. आधुनिक इंग्रजी उताऱ्यांत स्पेलिंगची किंवा व्याकरणाची चूक असल्यास दुरुस्त करून घ्यावी, पण जुन्या इंग्रजीच्या स्पेलिंगाचें आधुनिकीकरण करूं नये.

(७) 'बुद्धि' अशासारखा शब्द लोकहितवादी किंवा त्यांचे समकालीन लोक 'बुध्धी' असा बहुतेक ठिकाणीं लिहीत. कांहीं ठिकांणीं 'बुद्धि' असेंही शुद्ध संस्कृत रूप आढळतें. अगदीं क्वचित 'बुत्धी' असेंही रूप त्यांच्या लिखाणांत पहावयास मिळतें.

प्राकृतांत मृदु जोड अक्षर, शब्दाच्या आधीं नसलें तर त्यांतील पहिलें व्यंजन कठोर करावें असा वररुचीनें नियम दिलेला आहे (प्राकृतप्रकाश ३–५१). उदाहरणार्थ, 'लक्ष्मी' या संस्कृत शब्दाचें 'लच्छी' असें प्राकृत जुन्या हस्तलिखित पोथ्यांत रूप आढळतें त्याचें 'लच्छी'असें रूप करावें, असें वररुचि म्हणतो. शंकर पांडुरंग पंडितांना हें मत मान्य नाहीं. 'लच्छी' हेंच रूप प्राकृताच्या प्रकृतीला धरून आहे, असें ते मानतात. (*मालविकाग्निमित्र*, आ. २ री, मुंबई १८८९, Critical Note, pp. V-VI). या दृष्टीनें पाहातां 'बुध्धी' हें शुद्ध मराठी रूप असून 'बुद्धि' हें त्याचें संस्कृतीकरण आहे, पण तेंच आज मराठींत रूढ झालें आहे. म्हणून 'बुध्धी' अशांसारखीं मूळांतलीं रूपें बदललीं नाहींत. 'बुत्धी' हें रूप मात्र अशास्त्रीय किंवा गांवढळ असून त्यामुळें वाचक बिचकून जाण्याचा संभव दिसल्यावरून तें बदललें आहे. बाकी त्याकाळीं हेंही रूप लेखनांत असलेलें क्वचित् आढळतें.

(८) 'ब्राह्मण' हा शब्द लोकहितवादी बहुतेक ठिकाणीं 'ब्राम्हण' असा लिहितात. म्हणून तो तसाच ठेवला आहे. 'म्हणजे', 'म्हणून' हे शब्द जुन्या काळीं 'ह्मणजे', 'ह्मणून' असे विशेषेंकरून लिहिले जात. त्यांच्याकडे दुर्लक्ष केलें आहे.

(९) च, ज, या अक्षरांचे तालव्य व दंततालव्य असे दोन प्रकारचे उच्चार मराठींत आहेत, पण ते आज आपण निराळे दाखवीत नाहींत. चाप, जर्जर या तालव्य उच्चारांपासून दंततालव्य उच्चार निराळे दाखविण्याकरितां अक्षरावर रेघेच्या आधीं 'चोर, इ'जा असे बिंदु लिहीत. शिळेवर छापतांना असे बिंदु दाखविणें सोपें असतें; परंतु टाइपावर छापतांना निराळे खिळे पाडावे लागतात. लोकहितवादींनीं 'जाचा' (ज्याच्या), 'गृहस्थाचा मुलानें' (गृहस्थाच्या मुलानें), 'चालू (चालू) सम'जुती (समजुती) असें लिहिलें आहे, तें सध्याच्या लेखनपद्धतीप्रमाणें फिरवून घेतलें आहे.

(१०) इतर जे कांहीं बदल केले आहेत किंवा जास्त अक्षरें घातलीं आहेत, तीं शक्यतोवर काटकोन कंसांत दाखविलीं आहेत.

(११) पहिल्या आवृत्तींत आरंभींच्या १०८ पत्रांना, आणि पुढें मध्येंच कांहीं

निबंधांना 'नंबर' दिले होते. या आवृत्तींत संदर्भाच्या सोयीकरतां १०८ नंतरच्या सर्व निबंधांना क्रमानें १०९ पासून नवे नंबर अखेरपर्यंत दिले आहेत.

(१२) मूळ आवृत्तींत दोन लेख 'दुबार' छापले गेले होते, ते या आवृत्तींत एकवारच घेतले आहेत.

अनवधानानें कांहीं मुद्रणदोष राहिले असणें अशक्य नाहीं. नजरेस आलीं तीं अशुद्धें पुस्तकाच्या शेवटीं शुद्धिपत्रकांत दिलीं आहेत.

ज्या काळांत, म्हणजे १८४८ ते १८६४ च्या दरम्यान हे निबंध लोकहितवादींनीं लिहिले, त्यावेळीं आजच्यासारखें मराठी गद्याला प्रमाण स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. तें पुढें हळूहळू येत गेलें. चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'च्या आधीं दहापंचवीस वर्षें हे निबंध लिहिले गेले आहेत ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. मराठीचीं कांहीं व्याकरणें या पूर्वीं लिहिलीं गेलीं होतीं खरीं; परंतु दादोबा पांडुरंगांसारख्या मराठी भाषेच्या पाणिनीच्या लिखाणांत देखील त्या काळीं एकरूपता (uniformity) नव्हती, तेथें लोकहितवादींच्या लेखनांत ती कशी आढळणार ? प्रमाणिकपणा, आगदीं, आजून, आंधार, अशीं रूपें विकल्पानें त्या काळीं उच्चारानुसारी पद्धतीमुळें रूढ होतीं; त्यांत शक्यतोंवर बदल केलेला नाहीं. हा ग्रंथ लहानसा असता तर कठीण शब्दांचा कोश व अर्थनिर्णायक टीपा दिल्या असत्या; तसेंच लोकहितवादींनीं दिलेल्या माहितींत जे दोष किंवा ज्या उणिवा असतील, त्या अलीकडील अद्ययावत् ग्रंथांच्या आधारानें आणि जरूर तर त्या त्या विषयावरील तज्ज्ञांची मदत घेऊन दाखविल्या असत्या; पण पृष्ठसंख्या वाढेल या भीतीनें तसें करतां आलें नाहीं. विस्तृत सूचीही देतां आली असती, पण तीही वरील कारणामुळें देणें शक्य झालें नाहीं.

अलीकडे अत्यंत दुर्मिळ झालेला लोकहितवादींचा हा निबंधसंग्रह शक्य तितक्या मूळ स्वरूपांत त्याच्या शताब्दीच्या प्रसंगीं वाचकांना उपलब्ध करून द्यावा, एवढाच मूळ हेतु होता. व्यक्ति व वाङ्मय यासंबंधीं ग्रंथकाराची माहिती चारआठ पृष्ठांत सांगावयाची होती, पण लिहितां लिहितां नकळत तिचा विस्तार झाला. आणखीही पुष्कळ सांगावयाचें होतें, पण मोह आवरला. सवड झाल्यास त्याचा पुढें केव्हांतरी स्वतंत्र ग्रंथांत परामर्श घेऊं. हा ग्रंथ तयार करतांना अनेक मित्रांचें मला निरनिराळ्या प्रकारें साहाय्य झालें. त्यांचा वैयक्तिक निर्देश न करतां त्या सर्वांचें या ठिकाणीं मनःपूर्वक आभार मानतों. कांहींना आपला नामोल्लेख केलेला आवडणारही नाहीं. ग्रंथाच्या प्रसिद्धीचें सर्व श्रेय या माझ्या साहाय्यकर्त्यांना आहे, मला नाहीं. मी केवळ दोषांना जबाबदार आहें.

सरस्वती बिल्डिंग,
केनेडी ब्रिज, मुंबई ४
ता. १५–८–१९६७

अ. का. प्रियोळकर

वेा राजेश्री यज्ञेश्वरभट बीन चिंतामण–

भट घैसास मुा श्रीक्षेत्र त्रिंबक (स्त्रामीचे सेवेसीं ?).

विद्यार्थी गोपाळराव हरी–आजे गोविंद नारायण–बंधु

चिंतामणराव व गोविंदराव–पुत्र गणपती–कृष्ण–

रामचंद्र–रघुनाथ–मोरेश्वर–लक्ष्मण. –नातु माधव

व वासुदेव–पुतणे पांडुरंग परशराम–उपनाम सिधयी देशमु–

ख तार्‍ां पावस, ताा रत्नागिरी. हलीं वास्तव्य अमदाबाद. आम्ही

श्रीक्षेत्रीं येऊन मागील लेख पाहून तुम्हांस तीर्थउपाध्ये–

पण दिलें. आमचे वंशींचे येतील ते तुम्हांस पुजितील. मिती फाल्गु–

न शुा १२ इंदुवार शके १७९४ अंगिरा नाम संवत्सरे, ताा १०

मार्च १८७३ इसवी. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

सही **गोपाळराव हरी देशमुख.**

(तीर्थोपाध्याय गजानन ऊर्फ रा० गो० भट घैसास, त्र्यंबकेश्वर यांच्या संग्रहांतील वहीवरून)

गोपाळराव हरि देशमुख

(व्यक्ति, वाङ्मय व विचार)

कुलवृत्तांत

गोपाळराव हरि देशमुख हे त्यांच्या मूळ नांवापेक्षां 'लोकहितवादी' या त्यांच्या टोपणनांवानेंच जास्त प्रसिद्ध आहेत. गोपाळरावांचें घराणें मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील पावसचें. त्यांचें जुनें उपनांव सिद्धये, आणि त्यांचे निपणजे विश्वनाथ. यांच्याकडे बारा गांवांची देशमुखी होती, त्यामुळें देशमुख हें नवें नांव या घराण्याला मिळालें. विश्वनाथाचा मुलगा नारायण. याला वामन, गोविंद, अंताजी व लक्ष्मण असे चार मुलगे होते. हे चवघेही १७५४ सालीं पुण्यास येऊन पेशव्यांचे नोकरीस राहिले. या बंधूंपैकीं दुसरा जो गोविंद, त्याचा मुलगा हरि. हे हरिपंत, पेशव्यांचे सेनापति बापू गोखले यांच्याकडे फडणीस होते. हरिपंतांकडे १०,००० चा सरंजाम व स्वारीखर्चासाठीं १२,००० ची नेमणूक होती. पुढें सेनापति गोखले हे अष्टें येथील लढाईंत पतन पावल्यावर श्रीमंत बाजीराव पेशव्यांच्या आज्ञेवरून, हरिपंत पुण्यास त्यांचे वकील म्हणून राहिले.

कांहीं काळानें पेशवाईचा अस्त होऊन पुणें जेव्हां इंग्रजांच्या सत्तेखालीं गेलें त्यावेळीं, श्रीमंतांच्या पक्षाच्या लोकांनीं दोन महिन्यांच्या आंत एल्फिन्स्टनला मिळावें, असा जाहिरनामा इंग्रजांनीं काढला. त्याप्रमाणें हरिपंत एल्फिन्स्टनकडे गेले नाहींत, म्हणून त्यांची तीन गांवांची जहागीर जप्त करण्यांत आली. पुढें श्रीमंतांनींच स्वतः रदबदली केल्यामुळें १८२४ सालीं सुमारें दहा हजार रुपये उत्पन्नाचे हे गांव हरिपंतांना परत मिळाले.

हरिपंतांना चार मुलगे होते. त्यांपैकीं गोपाळराव हे तिसरे. इतर मुलांचीं नांवें परशुराम, चिंतोपंत व गोविंद अशीं होतीं. हरिपंतांच्या पत्नीचें नांव काशीबाई. वासुदेव अनंत बर्वे कुर्पेकर हे काशीबाईंचे वडील होत.

वेा राजेश्री यज्ञेश्वरभट बीन चिंतामण–

भट घैसास मुा श्रीक्षेत्र त्रिंबक (स्वामीचे सेवेसीं ?).

विद्यार्थी गोपाळराव हरी–आजे गोविंद नारायण–बंधु

चिंतामणराव व गोविंदराव–पुत्र गणपती–कृष्ण–

रामचंद्र–रघुनाथ–मोरेश्वर–लक्ष्मण. –नातु माधव

व वासुदेव–पुतणे पांडुरंग परशराम–उपनाम सिधयी देशमु–

ख तार्‍ा पावस, ता रत्नागिरी. हलीं वास्तव्य अमदाबाद. आम्ही

श्रीक्षेत्रीं येऊन मागील लेख पाहून तुम्हांस तीर्थउपाध्ये–

पण दिलें. आमचे वंशींचे येतील ते तुम्हांस पुजितील. मिती फाल्गु–

न शुा १२ इंदुवार शके १७९४ अंगिरा नाम संवत्सरे, ता १०

मार्च १८७३ इसवी. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

सही **गोपाळराव हरी देशमुख.**

(तीर्थोपाध्याय गजानन ऊर्फ रा० गो० भट घैसास, त्र्यंबकेश्वर यांच्या संग्रहांतील वहीवरून)

गोपाळरावांचा जन्म १८ फेब्रुवारी सन १८२३ (फाल्गुन शुद्ध ८, शके १७४४) या दिवशीं झाला. त्या काळच्या पद्धतीप्रमाणें मराठीचें शिक्षण त्यांना देण्यांत येऊं लागलें. त्यांचा व्रतबंध सहाव्या वर्षीं आणि विवाह लगेच सातव्या वर्षीं म्हणजे १८३० सालीं करण्यांत आला. वधू, इनामदार गोळे यांच्या घराण्यांतील होती. लग्नाच्या वेळीं, 'नवरा सात वर्षांचा आणि नवरी ४ वर्षांची!' असें कृष्णाजी ना. आठल्ये लोकहितवादींच्या चरित्रांत (१९२६) लिहितात; पण गोपाळरावांच्या '*रोजनिशी*'मध्यें[1], "पत्नीचा जन्म ३० मार्च २४ ह्या दिवशीं. उभयतांचा विवाह सन १८३० मध्यें झाला," म्हणजे पत्नीचें वय विवाहाचे वेळीं सहा वर्षांचें होतें, असें स्पष्ट नमूद आहे. हिचें सासरचें नांव गोपिकाबाई असें ठेवण्यांत आलें.

गोपाळरावांचे वडील हरिपंत यांचें निधन १६ मे १८३६ रोजीं झालें. देशमुख कुटुंबावर ही मोठीच आपत्ति होती; कारण त्याना मिळणारा दहा हजारांचा सरंजाम हा वंशपरंपरा नसून तहाहयात होता, या सबबीवर त्याच्यावर जप्ती आणण्यांत आली. शेवटीं पुष्कळ खटपट केल्यावर त्यांची विधवा काशीबाई यांना १८४३ पासून ६०० रुपये वर्षासन मंजूर झालें. पुढें आणखी खटपट केल्यावर तिच्या प्रत्येक मुलाला नोकरी नसेल त्या काळांत दरवर्षीं २०० रुपये पेन्शन देण्याचें सरकारनें ठरविलें.

---

१ ही 'रोजनिशी' किंवा स्मरणवही श्री. वामन बाळकृष्ण रानडे यांच्या हातच्या अक्षरांत होती. नागपूरच्या साप्ताहिक 'तरुण भारतां'त (१४-१०-१९५६पासून) त्यांचे चिरंजीव रा. शरच्चंद्र रानडे यांनीं ती दोन हप्त्यांत प्रसिद्ध केली आहे. "गोपाळरावांची, ग्रंथ लिहिण्याची नेहमीची रीत म्हणजे मनांत विचार आले कीं ते भराभर मोडी लिपींत टांचून ठेवणें. या टांचणाची बालबोध प्रत करून नीटनीटकेपणानें छापण्याकरितां व प्रुफें तपासण्याकरितां त्यांनीं एका गृहस्थास सन १८७७ पासून (रा. शरच्चंद्र रानडे हें साल १८७९ असें देतात) अखेरपर्यंत ठेवलें होतें. त्यांचें नांव वामन बाळकृष्ण रानडे... ठाणें येथील 'हिंदुपंच' हें पत्र हेच गृहस्थ चालवीत. पुढें ते 'ज्ञानचक्षु' वर्तमानपत्राचे एडिटर होते. 'लोकहितवादीं'नीं चालविलेल्या 'लोकहितवादी' नामक मासिकाची व्यवस्थाहि हेच पाहात असत," असें कृष्णाजी नारायण आठल्ये लिहितात ('*लोकहितवादी यांचें चरित्र*' १९२६, पृ० १०१). गोपाळरावांच्या 'रोजनिशी'ची नक्कल जशाची तशी न करतां मूळ लेखकाचा निर्देश 'गोपाळराव' असा तृतीय पुरुषीं केला आहे. कांहीं नोंदी प्रथम पुरुषीं, गोपाळरावांच्या जशाच्या तशा आढळतात. या हस्तलिखिताचा शोध करतां तें बेपत्ता झाल्याचें आढळलें.

शिक्षणाचा प्रारंभ

"पुण्यामध्यें त्या काळीं बुधवारच्या वाड्यांत एक मुलांची मराठी शाळा होती. या सरकारी शाळेमध्यें लोक मुलें पाठवीत नसत. याचें कारण कीं, पंतोजीस सरकार पगार देतें म्हणून ते मुलांच्या शिक्षणाची काळजी कशास करतील, अशी त्यांची समजूत होती," असें नारायण विष्णु जोशी आपल्या *'पुणें शहरचें वर्णन'* (१८६८) या पुस्तकांत लिहितात. तरीपण गोपाळराव यांचें शिक्षण सरकारी मराठी शाळेंत झालें असावें.

गोपाळराव यांनीं थोडेंसें मराठी शिक्षण घेतल्यावर, इंग्रजी शिकल्याशिवाय यापुढें गत्यंतर नाहीं अशी त्यांची खात्री झाली. म्हणून खासगी रीतीनें त्यांनीं इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरू केला. कोर्टांत कांहीं दिवस उमेदवारीही त्यांनीं पत्करली. पुढें ता. ८ फेब्रुवारी १८४१ पासून ते पुण्यांतील सरकारी इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. या शाळेचे हेडमास्तर Mr. D. A Eisdale हे होते. या शाळेंत ते तीन वर्षें राहिले. शाळा सोडतांना ता. ९ मे १८४४ रोजीं हेडमास्तरांनीं त्यांना दाखला दिला तो असा :—

Gopall Raw Deshmook entered the Poona Government English School in February 1841. He had previously acquired a considerable knowledge of English and he has distinguished himself by the progress he has made since he commenced attending the school. He has a very good knowledge of General History, translates remarkably well from English into Marathi, and composes in English in a style superior to what is commonly to be met with among natives who profess to write that language. He knows Arithmetic and little Mathematics and writes a good hand.

I entertain a very favourable opinion of his abilities and general character, and consider him well qualified to fill a situation of respectability.

Poona, 9th May 1844.

D. A. Eisdale, *Headmaster*
Poona G. E. School.

ही इस्डेलची इंग्रजी शाळाही बुधवारच्या वाड्यांतच होती. रा. जोशी लिहितात, "बुधवारच्या वाड्यांतील इंग्रजी शालेंत जे विद्वान झाले त्यांपैकीं रा० गोपाळ हरी देशमुख, रा० सोन्याबापु मांड्ये, रा० सदाशिवराव गौड्ये, रा० दाजी नीळकंठ नगरकर, रा० विष्णु मोरेश्वर भिडे, रा० कुशाबा लिमये इत्यादि गृहस्थ प्रसिद्धीस आले. यांतून कित्येकांनीं पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांत गोपाळराव हरी देशमुख यांचें लिहिणें लोककल्याणाच्या व देशसुधारणुकीच्या संबंधानें विशेष दृष्टीस पडतें. ह्यांच्या लिहिण्यांत स्वदेशास्थितीचें खरेपणानें आणि निष्पक्षपातानें व निर्भिडपणानें वर्णन केलें आहे व ती स्थिति बदलण्याविषयीं जे उपाय सुचविले आहेत ते सुयुक्तिक व वजनदार आहेत. ह्यांचा कित्ता आमचे बहुतेक मराठी लिहिणार घेतील तर फार बरें होईल." (पुणें *शहरचें वर्णन*, पृ० ८०).

पुढें पुणें पाठशाळा व ही इंग्रजी शाळा एकत्र करण्यांत येऊन त्यांचें ता. ७ जून १८५१ पासून पुणें कॉलेजांत (पुढें डेक्कन कॉलेज) रूपांतर झालें. हें कॉलेज प्रथम विश्रामबाग वाड्यांत उघडण्यांत आलें व त्याचे पहिले प्रिन्सिपाल मेजर तोमस कँडी होते.

बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या १८४४ सालच्या रिपोर्टांत पुण्याच्या इंग्रजी शाळेसंबंधीं लिहितांना, "One pupil, Gopall Hurree Deshmook, has distinguished himself, and deserves to have his name handed up to the Board as a good English scholar, and worthy of its patronage," असा एकट्या गोपाळरावांचाच निर्देश आहे.

सरकारी नोकरीची सुरुवात

ह्या शिफारसीकडे पुण्याचे जज्ज John Warden यांचें लक्ष गेलें आणि त्यांच्या सूचनेवरून गोपाळरावांस दक्षिणेंतील सरदारांच्या एजंटच्या ऑफिसांत दरमहा ७७ रुपयांची ट्रान्सलेटरची नोकरी मिळाली. या जागेवर १६ ऑक्टोबर १८४४ रोजीं ते रुजू झाले, असें त्यांच्या 'रोजनिशीं'त नमूद आहे. त्यांनीं १८७९ पर्यंत नोकरी केली. १८७९ सालच्या History of Services of Gazetted Officers या सरकारी पुस्तकांत त्यांच्या एकंदर नोकरीचा तपशील पुढीलप्रमाणें दिलेला सांपडतो :—

१६–१०–१८४४ :–पुणें येथील 'धि एजंट फॉर सरदार्स इन धि डेक्कन'च्या ऑफिसांत कारकून.

१–१०–१८५२ :–वाई (सातारा) येथें फर्स्ट क्लास मुन्सिफ.

१७–२–१८५३ :–ॲक्टिंग प्रिन्सिपल सदर अमीन, आणि सातारा येथील अदालतचे इन्-चार्ज.

२१–५–१८५३ :–वाई (सातारा) येथें फर्स्ट क्लास मुन्सिफ. (जानेवारी १८५४ मध्यें वीस दिवस आजारीपणाच्या रजेवर).

१०–२–१८५५ :–पुणें येथें उत्तर विभागाचे सब-असिस्टंट इनाम कमिशनर.

४–४–१८५७ :–सातारा येथें असिस्टंट कमिशनर. (ता. ११–३–१८६१ ते ३ मे १८६१ :–सातारचे इनाम कमिशनरची जागा कमी केल्यामुळें नोकरीशिवाय).

४–५–१८६१ :–हिंदु व मुसलमान यांच्या कायद्याचें 'डायजेस्ट' तयार करण्याकरितां मुंबई येथील सदर अदालतमध्यें स्पेशल जागेवर नेमणूक.

२२–९–१८६२ :–अमदाबाद येथें ॲक्टिंग असिस्टंट जज्ज आणि सेशन्स जज्ज.

३–१२–१८६२ :–प्रथम सुरत येथें प्रिन्सिपल सदर अमीन आणि पुढें ॲक्टिंग असिस्टंट जज्ज आणि सेशन्स जज्ज.

२३–७–१८६३ :–सुरतेच्या प्रिन्सिपल सदर अमीन या जागेवर आले.

२३–११–१८६३ :–अहमदनगर येथें ॲक्टिंग असिस्टंट जज्ज आणि सेशन्स जज्ज.

९–९–१८६५ :–ॲक्टिंग जज्ज कोर्ट ऑफ स्मॉल कॉजेस, अहमदनगर.

२१–९–१८६५ :–सातारा येथें प्रिन्सिपल सदर अमीन आणि पुढें अहमदनगर येथें ॲक्टिंग जज्ज, स्मॉल कॉजेस कोर्ट.

१–११–१८६५ :–सातारा येथील प्रिन्सिपल सदर अमीन या मूळ जागेवर आले.

३–११–१८६५ :–ॲक्टिंग थर्ड जज्ज, स्मॉल कॉजेस कोर्ट, मुंबई.

२६–१–१८६६ :–ठाण्याला प्रिन्सिपल सदर अमीन आणि पुढें मुंबई स्मॉल कॉजेस कोर्टाचे ॲक्टिंग थर्ड जज्ज.

१–५–१८६६ :—अमदाबादला स्मॉल कॉजेस कोर्टाचे ॲक्टिंग जज्ज.

१४-३-१८६७ :—अमदाबादच्या स्मॉल कॉजेस कोर्टाचे कायम जज्ज म्हणून नेमणूक.

२८-२-१८७७ :—नाशिक येथें जॉइंट जज्ज आणि सेशन्स जज्ज.

१–७–१८७७ :—ठाणें येथील डिस्ट्रिक्ट जज्जाला मागील सांचलेलें काम पुरें करण्यास मदत करण्यासाठीं आठ महिन्यांपुरती नेमणूक.

या माहितीचा त्यांची, 'रोजनिशी' किंवा आठल्ये वगैरे लेखकांनीं दिलेल्या माहितीशीं तंतोतंत मेळ बसतो असें नाहीं. तरीपण नोकरीच्या निमित्तानें त्यांचें कोठें कोठें वास्तव्य झालें आणि त्या त्या ठिकाणीं त्यांनीं काय लोकसेवा केली, याची कल्पना येण्यासाठीं ती वर उद्धृत केली आहे.

१ सप्टेंबर १८७९ मध्यें पेन्शन घेतलें. (*Government Gazette* 1879, p. 787, Notification No. 5471, dated 10th Sept. 1879).

पुण्यांतील पहिलें वास्तव्य

सन १८४४ पासून, १८५२ मध्यें वाईचे फर्स्ट क्लास मुन्सिफ होईपर्यंत, सुमारें नऊ वर्षें गोपाळरावांचा मुक्काम पुण्यास होता. या आरंभींच्या काळांत त्यांनीं वाचन, निरीक्षण आणि लेखन भरपूर केलें.

त्यांच्या अंगच्या हुशारीमुळें १ डिसेंबर १८५० मध्यें हेडक्लार्कची जागा मिळाली. १ मे १८५२ रोजीं ते शिरस्तेदार झाले, असें रोजनिशींत नमूद आहे. केवळ सरकारी सेवेमध्येंच ते रमले नाहींत, तर लोकहिताकडेही त्यांचें लक्ष होतें. त्याकाळीं पुण्यांत मराठी वर्तमानपत्र नव्हतें. म्हणून आपले लोकहितविषयक विचार मुंबईच्या 'प्रभाकर' पत्रांत 'लोकहितवादी' या टोपण नांवानें पत्ररूपानें ते मांडूं लागले. त्यांचें पहिलें पत्र १९ मार्च १८४८ या तारखेचें आहे. लोकहितवादींच्या निबंधसंग्रहांत छापलेल्या सर्वच पत्रांवर त्यांनीं काळ नमूद केलेला आहे असें नाहीं. कालनिर्दिष्ट असें त्यांचें शेवटचें पत्र १० मार्च १८५० चें (क्रमांक ९१) आहे. पुढील ९२ ते १०८ क्रमांकांच्या पत्रांवर काळ नमूद नाहीं. निबंधसंग्रहांत आढळणारीं पहिलीं १०८ पत्रें 'प्रभाकरा'मध्यें प्रसिद्ध झालेलीं दिसतात. आरंभींच्या कांहीं पत्रांवर त्यांनीं 'प्रभाकरा'चा निर्देश

केला आहे. असें स्थलनिर्दिष्ट शेवटचें पत्र, १७ जून १८४९ तारखेचें, क्रमांक ६४ हें आहे. 'प्रभाकर' पत्राच्या जुन्या फाइली उपलब्ध नसल्यामुळें निश्चित कांहीं लिहितां येत नाहीं.

'प्रभाकर' हें साप्ताहिक पत्र २४ अक्टोबर १८४१ पासून सुरू झालें. त्याचे संपादक भाऊ महाजन हे होते. मे १८४० पासून अवतीर्ण झालेल्या 'दिग्दर्शन' नांवाच्या मराठी मासिकाच्या सातव्या अंकांत (पृ० २०१) 'वर्तमानपदवी' या नांवाचें एक मराठी साप्ताहिक प्रसिद्ध होणार असल्याबद्दल "जाहिर खबर" प्रसिद्ध झाली आहे. त्याच नांवांत बदल करून हें 'प्रभाकर' पत्र पुढें उदयास आणलें गेलें असावें. हें साप्ताहिक नक्की केव्हां बंद पडलें तें मात्र कळत नाहीं. याचें वर्ष पहिलें नोव्हेंबर १८४१ ते आक्टोबर १८४२ (पृ० ३३ ते ४२४) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांत, आणि वर्ष चवथें व पांचवें २२ सप्टेंबर १८४४ ते ६ डिसेंबर १८४५, व वर्ष ६ वें, ३ जानेवारी १८४७ ते २६ डिसेंबर १८४७, असे कांहीं अंक पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या संग्रहांत आहेत.

'लोकहितवादीं'चीं पत्रें ज्यावेळीं 'प्रभाकर'मध्यें १८४८ ते १८५० या काळांत प्रसिद्ध झालीं, त्यावेळीं तीं पुण्याच्या ब्राह्मणवर्गाच्या विशेष पाहाण्यांत आलीं नसावीं. पुण्यांतील पुस्तकगृहांत 'प्रभाकर' पत्र १८५८ मध्यें येत असे, असें 'पुणें शहराचें वर्णन' या पुस्तकांत नमूद आहे (पृ० १२६); परंतु या ब्राह्मणमंडळीस ग्रंथालयांत जाण्याचा व वृत्तपत्रें वाचण्याचा त्याकाळीं कितपत नाद होता कळत नाहीं. पुण्यांतील 'ज्ञानप्रकाश' या पत्रांत लोकहितवादीच्या पत्रांस 'यथार्थवादी' या टोपणनांवानें उत्तर दिल्याचा निर्देश लोकहितवादींच्या क्रमांक ७१ व ७२ (आगष्ट १८४९) या पत्रांत आहे; परंतु 'लोकहितवादी' म्हणजे गोपाळराव देशमुख आणि तेही पुण्याचे राहणारे, हें त्यावेळच्या पुण्यांतील ब्राह्मणमंडळींना विशेष माहीत नसावें. १८६६ मध्यें 'लोकहितवादीकृत निबंध-संग्रह' प्रसिद्ध झाल्यावर व त्याहीपेक्षां 'निबंधमालें'त विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं त्यांच्यावर टीकेचा वर्षभर भडिमार केल्यावर या पत्रांकडे ब्राह्मणवर्गाचें लक्ष गेलें असावें. पुण्यांतील ब्राह्मण लोक गोपाळरावांवर इतके संतापले होते कीं, ते निधन पावल्यावर १८९६ च्या प्लेगाच्या दिवसांत पुण्यांतील देशमुखवाड्यांत कोणी नाहींसें पाहून हे लोक आंत शिरले, आणि त्यांनीं 'लोकहितवादीकृत

निबंधसंग्रह' या ग्रंथाच्या प्रतींचा विध्वंस केला आणि त्याबरोबर इतर ग्रंथ-संग्रहाचीही नासधूस केली, असें म्हणतात.

पुण्यास पहिलें वृत्तपत्र 'ज्ञानप्रकाश,' हें ता. १२ फेब्रुवारी १८४९ पासून निघूं लागलें. त्याचे जनक गोपाळराव होते, असें त्यांच्या मृत्युलेखांत नमूद आहे:—

ज्ञानप्रकाश—"पुण्यांतले प्रसिद्ध गृहस्थ व **ज्ञानप्रकाश** पत्राचे जनक सरदारबहादूर गोपाळराव हरी देशमुख यांस काल पहाटेस देवाज्ञा झाली." (१०–१०–१८९२).

केसरी—"ज्ञानप्रकाशाचें जनकत्व रावबहादुर देशमुख यांच्याकडेच येतें." (११–१०–१८९२).

'ज्ञानप्रकाश'च्या पहिल्या अंकावर मालक व प्रकाशक म्हणून कृष्णाजी त्रिंबक रानडे यांचें नांव असे.

"हल्लीं आम्हीं चार सुज्ञ मंडळीचे मदतीनें दर आठवड्याला हें पत्र सोमवारीं छापण्याचा आरंभ केला आहे," असें पहिल्याच अंकांतील संपादकीय मजकुराच्या आरंभीं नमूद आहे.

'पुणें शहराचें वर्णन' (१८६८) या पुस्तकांत 'ज्ञानप्रकाशा'विषयीं ना. वि. जोशी लिहितात, "या पत्रास प्रथम आश्रय रा. रा. मोरो रघुनाथ ढमढेरे व रा. रा. गोपाळराव हरी देशमुख यांचा होता....एकानें द्रव्यबळ व दुसऱ्यानें विद्याबळ खर्चून त्याला उत्तम स्थितीस आणलें." (पृ० १२१). अलीकडच्या काळांत, श्री. केशवराव भवाळकर यांच्या मृत्युलेखांत 'ज्ञान-प्रकाश'चे संपादक लिहितात, "ज्ञानप्रकाशाची स्थापना झाल्यानंतर प्रारंभीं कांहीं वर्षें कै. वा. रा. व. गोपाळराव देशमुख संपादनाचें काम करीत असत. त्यांच्यामागून रा. सा. भवाळकर यांनीं पत्र चालविलें होतें" (**ज्ञानप्रकाश**, ११ डिसें. १९०२).

पुण्यांत 'ज्ञानप्रकाश' चालू असतांना मुंबईच्या 'प्रभाकर' पत्रांत गोपाळरावांचें लेखन चालूच होतें. याचें कारण त्यांना त्यांतील संकल्पित पत्रसंख्या पुरी करावयाची असावी किंवा जास्त कडक सुधारणावादी विचार पुण्यासारख्या ब्राह्मणी वर्चस्व असलेल्या सनातनी शहरांत निधणाऱ्या 'ज्ञानप्रकाशां'त प्रसिद्ध करणें त्यांना शक्य झालें नसावें.

गोपाळराव ज्या ज्या शहरांत गेले तेथें तेथें त्यांनीं प्रागतिक विचारांचें नवें वृत्तपत्र काढण्याचा प्रयत्न केला. जुनें असल्यास त्याला प्रोत्साहन दिलें आणि लेखनद्वारा त्याला मदत केली. ग्रंथालय तेथें नसल्यास तें उघडलें, व्याख्यानमाला अस्तित्वांत आणली, विधवाविवाहमंडळें व जरूर तेथें सूतिकागृह, व बालरक्षकमंडळ स्थापण्याची प्रेरणा दिली.

पुणें येथें १८४८ सालीं ७ फेब्रुवारीपासून पुणें नेटिव्ह जनरल लायब्ररी स्थापन झाली; तिचे एक प्रेरक, संस्थापक व पहिल्या कार्यकारीमंडळाचे कार्यवाह गोपाळराव होते. तिच्या स्थापनेचा इतिहास आपल्या तिसऱ्या पत्रांत त्यांनीं दिला आहे (पृ० ६ पहा). रा. जोशी आपल्या पुणें शहरच्या वर्णनांत लिहितात,

"सर ज्यार्ज्य रसल क्लार्क मुंबईचे गवरनर यांच्या आज्ञेवरून हेनरी ब्रौनसाहेब जज्ज यांनीं पुण्यांत लायब्ररी स्थापण्याचा उद्योग केला. त्या कामास हिंदु लोकांपैकीं रा. रा. गोपाळ हरी देशमुख यांनीं फार मदत केली. कित्येकांनीं भिडेभाडेनें बुकेंही दिलीं, पण या दोघांचे पुरे श्रम या पुस्तकालयाविषयीं झाले. त्यांचे लोकांनीं उपकार मानावे." (पृ० ११८).

मि. ब्रौन हे 'एजंट फॉर सरदार्स' होते आणि त्यांच्या हाताखालीं गोपाळराव काम करीत होते. तेव्हां गोपाळरावांच्या सूचनेवरूनच मि. ब्रौन यांनीं हें कार्य हातीं घेतलें असणें संभवनीय आहे.

सुप्रसिद्ध दक्षिणा प्राइज कमिटी नांवाच्या संस्थेच्या स्थापनेंत गोपाळरावांचा हात होता. यासंबंधीं जोशी आपल्या पुस्तकांत लिहितात :—

"पूर्वीं पुण्यांत पेश्वे सरकार दरवर्षीं सर्व ब्राह्मणांस दक्षिणा वांटीत असे. ती इंग्रज सरकारानें बंद करून माधवराव पेशव्यांच्या चालीप्रमाणें केवळ विद्वान ब्राह्मणास मात्र द्रव्य देण्याचा शिरस्ता ठेविला. नंतर विद्येची वृद्धि व्हावी म्हणून त्या द्रव्यांतून रुपये शिल्लक पाडून पुण्यांतील संस्कृत पाठशाळा चालू केली आणि बाकीच्या रुपायांत दक्षिणा चालविली. पुढें कित्येक सुधारलेल्या विद्वान व वजनदार एतद्देशीय गृहस्थांच्या उद्योगावरून व सूचनेवरून सरकारानें असा ठराव केला कीं, पूर्वीं घेत आलेले विद्वान ब्राह्मणांशिवाय नव्या विद्वानांस दक्षिणा द्यायची नाहीं, तर जुने मेल्यावर त्यांच्या द्रव्याची जी शिल्लक राहील ती ग्रंथ करण्याच्या कामाकडे लावावी.

"असा ठराव होण्यास कारण रावबहादूर गोपाळराव हरी देशमुख यांची खटपट मुख्य होती. त्यांनीं त्यावेळीं मराठी व इंग्लिश वर्तमानपत्रांतून याविषयीं वारंवार लिहून लोकांचे व सरकारचे डोळे उघडले, व कित्येक सुधरलेल्या गृहस्थांच्या सह्या घेऊन सरकारास एक अर्जीही दिली. यामुळें पुण्यांतील ब्राह्मणांनीं त्यावर ग्रामण्य केलें, तथापि त्या गृहस्थांनीं ह्या कामाचा पिच्छा सोडला नाहीं. शेवटीं सरकारतर्फे त्यांच्या व सर्व विचारी लोकांच्या मनाप्रमाणें ठराव झाला.

"ह्या ठरावाबरहुकूम सन १८५१ सालीं दक्षिणा प्रैझ कमिटीची स्थापना झाली. तिनें आजपर्यंत कांहीं पुस्तकें त्यांच्या कर्त्यांस बक्षिसें देऊन स्वतां छापविलीं व कांहींकांस नुस्तें बक्षीस देऊन छापण्याचें उत्तेजन दिलें." (पृ० ८३–८४).

या घटनेचा निर्देश प्रस्तुत ग्रंथांतील १०३ क्रमांकाच्या पत्रांत सांपडेल. (पृ० २५७). दक्षिणाफंडाचा कसा अपात्रीं विनियोग होत होता त्याची कल्पना 'ज्ञानोदया'नें दिलेल्या 'ज्ञानप्रकाशा'तील उताऱ्यावरून होईल :—

"दक्षणेचे ब्राह्मणांचा जो आजपावेतों घोळ पडला होता तो बहुतकरून उलगडून निम्मे ब्राह्मणांस दक्षणा मिळाल्या व ब्राह्मणांपैकीं लबाडी करून जे मृत ब्राह्मणांचे नांवानें इतर ब्राह्मण दक्षणा घेत होते, त्यांची चौकशी होत आहे व त्यांतील कितीएक आपल्या अपराधास कबूल आहेत. याजवरून त्यांस मोठी शिक्षा होईल असें वाटत नाहीं. यावर्षीं सुमारें ११२५ ब्राह्मण होतील असें वाटतें." ('ज्ञानोदय,' १ फेब्रु० १८५३).

त्यावेळचे कांहीं ब्राह्मण केवळ लबाडच होते असें नव्हे, तर आडदांडही होते. 'वैदर्भ' (वऱ्हाड) वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या गोपाळरावांच्या मृत्युलेखांत खालील मजकूर आढळतो—

"यांनीं आपलें आत्मचरित्र लिहून ठेवलें आहे. त्यांतील बहुतेक भाग (प्रस्तुत) लेखकाच्या पाहाण्यांत आला. त्यांत एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, पेशवाईंतील 'दक्षिणा' चालू ठेवावी किंवा नाहीं याविषयीं अव्वल इंग्रजींत विचार चालू असतां यांनीं सरकाराकडे असा अर्ज केला कीं, दक्षिणा मिळत असलेल्या ब्राह्मणांपैकीं बहुतेक ब्राह्मण, नांवाचे वैदिक व

शास्त्री आहेत. फार थोड्यांनीं वास्तविक वेद अथवा शास्त्रपठण केलें आहे. तरी देणें असेलच तर खऱ्या विद्वानांसच दक्षिणा द्यावी." यावर पुण्यास तुळशीबागेंत सुमारें पांच हजार ब्राह्मण जमले व त्यांनीं देशमुख यांस धरून नेऊन, 'पुण्यास सर्व ब्राह्मण विद्वान आहेत' अशा अर्थाच्या दुसऱ्या अर्जावर त्यांची सही करून घेतली!! पांच हजारांपुढें एकटे करणार काय? पण घरीं आल्यावर तिसरा अर्ज यांनीं पाठविला कीं, दुसऱ्या अर्जावर सही ब्राह्मणांनीं बळजबरीनें करून घेतली आहे. माझा पहिलाच अर्ज खरा आहे!" (१५-१०-१८९२).

गोपाळरावांना त्यांच्या बुद्धिमत्तेमुळें आणि लोकसेवेमुळें महत्त्वाचें स्थान त्या काळीं लाभलें होतें. पुणें पाठशाळा व इंग्रजी शाळा एकत्र करून पुणें (डेक्कन) कॉलेजची स्थापना करतांना ता. ७ जून १८५१ रोजीं विश्रामबाग वाड्यांत बोर्ड ऑफ एज्युकेशनचे एक सभासद John Warden यांच्या अध्यक्षतेखालीं जी सभा झाली, त्यावेळीं त्यांनीं गोपाळरावांसंबंधीं विशेष निर्देश करून ते म्हणाले,

"In those days, not one in a hundred of the Sirdars who used to come to me on business, could open his mouth on his own affairs; his Carcoon was his mouthpiece. But times are changed; the sons of the Sirdars are receiving education in the College; you have long had an English school here, where scholars of no mean stamp have been reared. I would instance my able and amiable friend Gopal Row Deshmook a son of one of Bajee Row's most faithful adherents, who followed him into exile This young man is the head of the English department of the Agent's Office, Secretary to the Native Library, a Member and Assistant Secretary to the Duxuna Prize Committee, appointed by Government and Member of the Local Vernacular School Committee, appointed by the Board of Education. He is known as the author of several useful Mahrathi books." (*The Oriental Christian Spectator*, Bombay 1851, pp. 247–8).

वाई येथील कार्य

१८४५ सालीं गोपाळराव मुनसफीच्या परीक्षेकरितां मुंबईस गेले होते पण तींत त्यांना यश मिळालें नाहीं, असें त्यांच्या रोजनिशींत नमूद आहे. १८ मार्च १८४६ रोजीं ते पुनः त्या परीक्षेला बसले आणि यश मिळवून डेक्कन व कोंकण येथें मुनसफीच्या जागेला त्यांना पात्र ठरविण्यांत आलें; परंतु सहा वर्षें त्यांची या जागीं वर्णी लागली नाहीं. पुढें वाई येथें मुनसिफची जागा खालीं झाली, आणि ता. ३१ आगष्ट १८५२ च्या हुकुमानें गोपाळरावांना त्या जागीं दोनशें रुपये पगारावर नेमण्यांत आलें. या जागीं ते सुमारें तीन वर्षें होते. या कालावधींत त्यांनीं तिकडे काय सार्वजनिक कामगिरी केली हें कळण्यास साधनें नाहींत; परंतु वाईला त्यांनीं ग्रंथालय स्थापन केलें होतें, अशी माहिती मिळते. 'वृत्तसार' (वाई) नांवाच्या वृत्तपत्रांत ता. १७-१०-१८९२ च्या अंकांत त्यांचा जो मृत्युलेख प्रसिद्ध झाला आहे त्यांत म्हटलें आहे,

> "नोकरीवर असतांनाच त्यांनीं मुनसफीची परीक्षा दिली. या क्षेत्रींच त्यांना प्रथमतः मुनसफीची जागा मिळाली व या वेळेपासून त्यांच्या उत्कर्षास आरंभ झाला. पाश्चिमात्य पद्धतीवर वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व वाचनालयें हीं अस्तित्वांत आणण्यासाठीं त्यांनीं दीर्घोद्योग करून तीं अस्तित्वांत आणिलीं. वाईस जें म्यु० पाशीं वाचनालय आहे तें त्यांनींच स्थापन केलेलें आहे. ..त्याप्रमाणें गरीब विद्यार्थ्यांस यांची मदत चांगली असे."

'महाराष्ट्र-मित्र'च्या (सातारा) ता. १३-१०-१८९२च्या अंकांत गोपाळरावांसंबंधीं पुढील मजकूर आढळतो:—"रावसाहेबांचा व आमचे चुलते रा० सा० महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर यांचा देशसेवेविषयीं एक निग्रह असलेकारणानें आमचे घरीं त्यांचें येणेंजाणें फार असे. तो निकट संबंध. शिवाय वाईक्षेत्रीं रावसाहेब मुनसफीवर असतां त्यांच्या साह्यानें आम्हीं तेथें लायब्ररीची स्थापना केली...."

२१ जुलै १८५४ रोजीं वाईला कृष्णेस महापूर येऊन पेठ वगैरे भाग वाहून गेला असा निर्देश त्यांच्या रोजनिशींत आहे. यावेळीं गोपाळरावांचें लोकांना फार साहाय्य झालें असें अन्यत्र नमूद आहे.

हाताखालच्या कारकुनाचें काम आजारीपणामुळें तुंबून राहिलें तर ते स्वतः रविवारीं कचेरींत जाऊन तें पुरें करीत, असें म्हणतात. वरिष्ठांनींही त्यांच्या कार्यनिष्ठेची आणि बुद्धिमत्तेची मुक्तकंठानें स्तुति केलेली आढळते.

इनाम कमिशनरवर नेमणूक

गोपाळरावांच्या आंगच्या गुणांमुळें सरकारनें त्यांची १० फेब्रुवारी १८५५ च्या हुकुमानें सबअसिस्टंट इनाम कमिशनर म्हणून नेमणूक केली. हें काम त्यांनीं इतक्या चोखपणें बजावलें कीं, क्र. १९५५ ता. १ नवंबर १८५५ च्या सरकारी ठरावांत गोपाळरावांसंबंधीं गौरवपर उद्गार काढले आहेत. पुढें असिस्टंट कमिशनर असा हुद्दा देऊन त्यांची कचेरी ४-४-१८५७ पासून साताऱ्याला ठेवण्यांत आली. हें काम सुमारें चार वर्षें चाललें व तें संपल्यावर ती जागा ११–३–१८६१ पासून कमी करण्यांत आली आणि गोपाळराव कांहीं महिने नोकरीशिवाय राहिले.

इनाम कमिशनच्या कामाचें स्वरूपच असें होतें कीं, त्यांना पुष्कळ लोकापवाद आणि अप्रियता सहन करावी लागली. याचें कारण असें कीं, पेशव्यांच्या राज्याच्या अखेरीस ज्या इनामाच्या सनदा देत त्या कांहीं वेळां तोंडी हुकुमानें असत, आणि लेख व्हावयाच्या राहून जात. कांहीं इनामदारांना आपल्याकडे त्या नाहींत, याची दादही नसे ! या गोंधळाचा फायदा घेऊन कांहीं लबाड लोकांनीं खोट्या सनदा बनविल्या होत्या, आणि ते इनामें भोगीत ! तेव्हां ज्यांच्याकडे इनामें आहेत त्यांच्या सनदा पाहाव्या आणि ज्यांकडे त्याबद्दल विश्वसनीय पुरावा नसेल तीं इनामें जप्त करावीं म्हणून ह्या इनाम कमिशनचा अवतार होता. कांहीं इनामदारांकडे बनावट खोट्या सनदा आढळल्या, तर कांहीं इनामदारांनीं त्या जपून ठेवल्या नाहींत व पेशव्यांच्या दप्तरांत त्या दिल्याचा पुरावा सांपडला नाहीं. त्यामुळें अशीं इनामें खालसा झालीं आणि त्याबद्दल गोपाळरावांना लोक दोष देऊं लागले. पुण्याच्या सरकारी दप्तरखान्यांत जाऊन ह्या इनामकमिशनचे गोपाळरावांच्या सह्या असलेले कांहीं कागदपत्र मीं पाहिले. त्यांत कांहीं नकलांवर त्या मूळाबरहुकूम असल्याबद्दल, आणि कांहीं ठराविक तक्तयांवर (proforma) माहिती निराळ्या शाईनें लिहिलेली असून त्याखालीं गोपाळरावांच्या सह्या आहेत.

लोकांचें नुकसान करून इंग्रज सरकारला खूष राखण्याचा येथें प्रयत्न नव्हता, तर कर्तव्यकर्म बजावण्याच्या व न्यायनिष्ठुरतेचा तो प्रश्न होता. इनाम नष्ट झाल्यावर कुटुंबावर काय प्रसंग ओढवतो, याचा अनुभव त्यांच्या कुटुंबानें स्वतः चाखला होता. प्रस्तुत निबंधसंग्रहामध्यें "कंपनीसरकारचे कारकीर्दींची अखेर" (नंबर ११८, पृ. ३०१–३०४) या लेखांत त्यांनीं इनाम कमिशनच्या अन्याय्य वर्तणुकीवर कडाडून टीका केली आहे, ती वाचकांनीं अवश्य पाहावी. हा लेख प्रथम इंदुप्रकाशांत (२५–८–१८६२) प्रसिद्ध झाला होता. 'वैदर्भ' या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्यावरील मृत्युलेखांत म्हटलें आहे—

"कोणाच्या जाहागिऱ्या, कोणाचीं इनामें, वंशपरंपरा आहेत, कोणाचीं हयातीपर्यंत आहेत, कोणाच्या सनदा कोणत्या योग्यतेच्या आहेत, हें तपासून कमिटीस समजून देण्याचें काम यांजकडे होतें. हें काम किती नाजूक होतें हें सांगावयाला नकोच. ज्या कित्येकांचीं उत्पन्नें बंद करण्यांत आलीं त्यांनीं सर्व दोषांचें खापर देशमुखांवर लादलें. पण त्यांनीं मुद्दाम खोडसाळपणा करून लोकांचीं उत्पन्नें बुडविलीं असतील असें त्यांच्या एकंदर स्वभावावरून मुळींच दिसत नाहीं." (१५–१०–१८९२).

सरकारनें घालून दिलेल्या नियमांच्या मर्यादेबाहेर जातां येत नसल्यामुळें कांहीं गोष्टी त्यांच्या इच्छेविरुद्ध होत. 'महाराष्ट्र-मित्र' (सातारा) या पत्रांत यासंबंधीं पुढील मजकूर आढळतो :—

"इनाम कमिशनाचे कामांत सरकार खुषी राखण्याकरितां त्यांस त्यांच्या मताबाहेर जेव्हां जाणें भाग पडे, तेव्हां ते त्याबद्दल ईश्वराजवळ जाऊन गाऱ्हाणें सांगत व ह्या गोष्टी आमचे चुलते (रा० सा० महादेव गोविंदशास्त्री कोल्हटकर) मुंबईत क्युरेटरच्या जागीं असतां वेळीं ते त्यांच्या भेटींत बोलत. याचा प्रत्यय इनाम कमिशन नात्यानें कागद जाळण्याचा ठराव सरकारनें बाहेर आणिला त्यावेळीं इंदुप्रकाश पत्रांत जोरदार विषय लिहून सरकारास जागें केलें त्यावरून खात्री होईल." (१३–१०–१८९२).

मुंबईत स्थलांतर

इनाम-कमिशनच्या कामांतून मोकळे झाल्यावर सुमारें दोन महिने ते कामाशिवाय होते. पुढें ता. ४-५-१८६१ रोजीं हिंदु-मुसलमान यांच्या कायद्यांचा सारग्रंथ (Digest) तयार करण्याकरितां सरकारकडून मुंबईच्या सदर अदालतमध्यें त्यांची योजना करण्यांत आली. या कामानिमित्त गोपाळरावांचें वास्तव्य मुंबई शहरांत सुमारें सवा वर्ष झालें. या काळांत १८६२ सालीं त्यांच्या प्रेरणेनें 'इंदुप्रकाश' जन्माला आला. 'इंदुप्रकाश'च्या ता. १०-१०-१८९२ च्या अंकांत जो मृत्युलेख प्रसिद्ध झाला आहे त्यांत "रा. ब. देशमुख हे ह्या पत्राचे जनक असल्यामुळें त्यांच्या मरणानें आम्हांला पितृ-वियोगजन्य दुःख होत आहे," असें म्हटलें आहे. याशिवाय 'सूर्योदय', 'सुबोधपत्रिका' वगैरे पत्रांनींही त्यांचा 'जनक' असा निर्देश केला आहे.

इनाम कमिशनचें काम पाहात असतां त्यांनीं शिंदे, होळकर, गायकवाड, निजाम, पंतप्रतिनिधी वगैरे घराण्यांची व इतर ऐतिहासिक माहिती जमा केली ती त्यांनीं 'इंदुप्रकाशांत' १८६२ ते १८६४ या कालांत प्रसिद्ध केली. प्रस्तुत लेखसंग्रहाच्या नंबर १०९ ते १२३ (पृ. २७१ ते ३१९) या निबंधांत ती समाविष्ट झाली आहे.

मुंबईंतील या वास्तव्यांत त्यांनीं आणखी वरिष्ठ जागेकरितां पात्र ठरण्या-करितां तयारी चालविली होती. त्यांच्या रोजनिशींत,

"४ एप्रिल १८६२ मुनसफीची परीक्षा सुरू" मुंबई.

"१२ एप्रिल १८६२ मुनसफीची परीक्षा समाप्त."

अशी नोंद आढळते. या परीक्षेंत पास झाल्यावर त्यांनीं ता. १६ आगष्ट १८६२ रोजीं अर्जी केली आणि मुंबईच्या स्मॉल कॉजेस कोर्टांत जागा मिळेल अशी फ्रेयरकडून सूचनाही आली; पण पुढें त्यांची अमदाबादेस सनदी नोकरांकरितां राखून ठेवलेल्या असिस्टंट जज्जाच्या जागेवर नेमणूक केल्याचें, "७ सप्टेंबर रोजीं पत्र आलें आणि २२ सप्टेंबर १८६२ सोमवारीं शपथ घेऊन चार्ज घेतला," असें त्यांच्या रोजनिशींत नमूद आहे.

केवळ युरोपियन सनदी नोकरांकरितां राखून ठेवलेल्या जागेवर एका नेटिवाची नेमणूक होते, याबद्दल कांहीं युरोपियन क्षुब्ध झाले. यावेळचे

अमदाबादेचे जज्ज फार चांगले माणूस होते, असें गोपाळरावांनीं रोजनिशींत नमूद करून ठेवलें आहे.

ता. ३० जानेवारी १८६३ रोजीं खंडेरावमहाराज गायकवाड अमदाबादेस आले होते. यावेळीं अमदाबादचे जज्ज मि. सँडविच आणि त्यांचे असिस्टंट गोपाळराव देशमुख यांचा बडोद्याचे रेसिडेंट मि. फिनिक यांनीं अपमान केला, याबद्दल जो विस्तृत रिपोर्ट जज्जसाहेबांनीं चीफ सेक्रेटरीला सादर केला त्यांत ते लिहितात,

> "१२. आमचेबरोबर आमचे असिस्टंट जज्ज गोपाळराव हरी होते. त्यांच्या दर्जाप्रमाणें त्यांचा मानपान राहिला नाहीं. दिवाण येईपर्यंत त्यांस कोणी खुर्ची दिली नाहीं. पानसुपारीही कारकुनाकडून दिली. कोणी सरदार यांजकडून दिली नाहीं."

जज्ज सँडविच व रेसिडेंट फिनिक यांचें पूर्वींचें कांहीं वांकडें होतें. देशी माणसाला युरोपियनाच्या राखीव जागेवर पाहूनही रेसिडेंटच्या क्रोधांत भर पडली असावी.

पुढें फिनिकला रेसिडेंटच्या जागेवरून काढून टाकून शिक्षेदाखल परत पलटणींत पाठविण्यांत आलें.

गोपाळरावांची सुरत येथें ता. ३-१२-१८६२ रोजीं बदली होऊन तेथून त्यांची २३ नवंबर रोजीं अहमदनगर येथें नेमणूक झाली, असें १८७९ सालच्या History of Services या सरकारी पुस्तकांत नमूद असल्याचें मागें सांगितलेंच आहे; पण त्यांत कांहींतरी गफलत असावी; कारण स्वतः गोपाळरावांच्या स्मरणवहींत ३० जानेवारी १८६३ रोजीं खंडेरावमहाराजांचें आगमन झालें असें नमूद असून ता. २ फेब्रुवारी १८६३ रोजीं मुख्य जज्जांनीं चीफ सेक्रेटरीला पाठविलेल्या पत्रांत आपले असिस्टंट गोपाळराव हरी त्याप्रसंगीं हजर असल्याचें कळविलें आहे. गोपाळरावांच्या रोजनिशींत, ३० जानेवारी १८६३ व ३ मार्च १८६५ यामधल्या कालांतील नोंदी नाहींत. गोपाळरावांच्या कागदपत्रांच्या आधारें रा. कृ. ना. आठल्ये यांनीं त्यांचें जें चरित्र लिहिलें आहे, त्यांत (पृ. ५५) ९ जुलै १८६३ रोजीं अहमदनगर येथें बदली झाली, असें लिहिलें आहे, तेंच बरोबर दिसतें. येथें पुनः गोपाळरावांनीं आणखी एक

डिपार्टमेंटल परीक्षा ता. १४ अक्टोबर १८६३ रोजीं दिली. त्यांत ते यशस्वी झाल्याचें ९ नवंबर १८६३ च्या सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

अहमदनगर येथें ॲक्टिंग असिस्टंट जज्ज म्हणून त्यांचें वास्तव्य साधारणपणें जुलै १८६३ ते आगष्ट १८६५ पर्यंत म्हणजे दोन वर्षें होतें. या कालावधींत त्यांनीं तेथें काय कार्य केलें हें समजण्यास साधन नाहीं. 'वृत्तवैभव' या अहमदनगर येथें प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांत त्यांनीं कांहीं लेख लिहिले. ते प्रस्तुत निबंधसंग्रहांत (पृ. ३१९ ते ५८८) प्रसिद्ध झाले आहेत. पुण्यास 'ज्ञानप्रकाश' आणि मुंबईस 'इंदुप्रकाश' हीं पत्रें ज्याप्रमाणें त्यांच्या प्रेरणेनें जन्मास आलीं, त्याप्रमाणें 'वृत्तवैभवा'च्या जन्माच्या मागेंही त्यांचाच हात होता कीं काय कळत नाहीं. 'विविधज्ञानविस्तारा'च्या अकराव्या वर्षांत (१८७९) लोकहितवादींवर लेखमाला प्रसिद्ध झाली आहे (अं. ८, ९, १०) हिचे लेखक वा. दा. ओक होते, असें कळतें. तिच्यामध्यें 'वृत्तवैभवा'चे मालक खंडेराव बाळाजी फडके होते, असें नमूद आहे. गोपाळराव ज्या सालीं वारले त्याच्या आधीं बरींच वर्षें 'वृत्तवैभव' हें पत्र बंद पडलेलें दिसतें. 'जगदादर्श' या नगरच्या पत्रांत गोपाळरावांविषयीं म्हटलें आहे, "येथें जेव्हां ते आसिस्टंट जज्ज होते, तेव्हां त्यांनीं येथील 'वृत्तवैभव' पत्रांत पुष्कळ लेख लिहिले आहेत. लोकहितवादी या मथळ्याखालीं जे लेख येत असत ते यांचेच आहेत....रावबहादूर देशमुख येथें होते त्यावेळीं त्यांनीं ह्या शहरावर महत् उपकार केलेले आहेत. ते मनांत आणले म्हणजे येथील लोकांस त्यांच्या मृत्यूमुळें फार दुःख होत आहे. त्यांचा स्वभाव असा असे कीं, ते दोन्हीही पक्षांस आवडत असत." (ता. १६–१०–१८९२). 'वऱ्हाडसमाचार' हें पत्र लिहितें, "अहमदनगरच्या अस्तंगत 'वृत्तवैभव' पत्रांत यांचेंच धुरिणत्व असे." (१७–१०–१८९२).

'ज्ञानप्रकाश' व 'इंदुप्रकाश' हीं वृत्तपत्रें गोपाळरावांच्या निधनकालीं चालू असल्यामुळें त्यांच्याशीं संबंध असलेल्या संपादकांना त्यांचा वृत्तपत्राशीं असलेला संबंध माहीत होता. पण 'वृत्तवैभव' बंद पडल्यामुळें 'जगदादर्शा'तील लेखकाला जवळ जवळ तीस वर्षांमागची माहिती नसावी. गोपाळराव 'वृत्तवैभवा'चे जनक असणें अशक्य नाहीं, आणि नसले तरी चालू असलेल्या पत्राला त्यांची पुष्कळ मदत होती हें तर उघड आहे. 'वृत्तवैभवा'च्या

मालकांनींच 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह' या ग्रंथाच्या मुद्रणाची जबाबदारी पत्करून १८६६ सालीं ही कामगिरी तडीस नेली.

अहमदनगरांत वाचनालयाची नवीन स्थापना करण्याची जरूरी नव्हती. कारण तेथें सर्वांच्या आधीं म्हणजे १८३७ सालीं कॅप्टन फ्रेंच यांनीं नेटिव जनरल लायब्ररीची स्थापना केली होती. हें ग्रंथालय अद्यापि चालू आहे. त्याला गोपाळरावांची पुष्कळ मदत झाली असली पाहिजे.

जुन्या मराठी वाङ्मयप्रकाशनाकडेही गोपाळरावांचें लक्ष दिसतें. इंदुप्रकाश प्रेसमध्यें पंडितांच्या नेतृत्वाखालीं जी तुकारामाच्या अभंगाची गाथा छापून निघाली (१८६९–७३), तिला मूळ प्रेरणा गोपाळरावांची असावी. ही गाथा छापण्यासंबंधीं जो सरकारी पत्रव्यवहार उपलब्ध आहे, त्यांत १० एप्रिल १८६६ च्या एका पत्रांत शिक्षणखात्याच्या सचिवांना डायरेक्टर ऑफ पब्लिक इंस्ट्रक्शन, आलेक्झांडर ग्रँट, सुचवितात,

> "I am informed that the Manuscript to be edited was copied by Mr. Gopal Hari Deshmookh from Tukaram's own Manuscript. I think it would be very desirable that Mr. Gopal Hari's copy should be collated with the original Manuscript before it is printed off."

गोपाळरावांचा आणि इंदुप्रकाश प्रेसचा संबंध प्रसिद्धच आहे.

अमदाबादेंतील महान कार्य व प्रचंड गौरव

"मुंबईस बदली झाली. पत्र ता. १३ अक्टोबर १८६५" रोजीं आल्याची नोंद त्यांच्या स्मरणवहींत आहे. पुढील सुमारें चार वर्षांच्या नोंदी नाहींत.

सरकारी माहितीप्रमाणें ता. ३ नवंबर १८६५ पासून मुंबई स्मॉल कॉजेस कोर्टाचे बदली जज्ज म्हणून त्यांची नेमणूक झाली. पण फार दिवस त्यांचें मुंबईंत वास्तव्य झालें नाहीं. लवकरच ता. १ मे १८६६ रोजीं अमदाबादेचे ॲक्टिंग जज्ज म्हणून त्यांची बदली झाली. याच जागीं त्यांना ता. १४ मार्च १८६७ पासून कायम करण्यांत आलें. अमदाबादला त्यांचें वास्तव्य दीर्घकाल म्हणजे सुमारें अकरा वर्षें, त्यांची १८७७ सालीं नाशिकला बदली

होईपर्यंत, होतें. श्री. नरसिंहराव भोलानाथ दिवेटिया यांनीं 'स्मरणमुकुर' (१९२६) नांवाच्या आपल्या एका गुजराती पुस्तकांत गोपाळरावांचें जें सुंदर शब्दचित्र रेखाटलें आहे, त्यावरून गुजरातेंत ते किती लोकप्रिय झाले होते त्याची कल्पना करतां येते. ते लिहितात :

> "....गुजरातमध्यें गोपाळरावांनीं चांगली लोकप्रियता संपादन केली होती. ते एक गुजरातीच बनून गेले होते. गुजराती भाषा देखील मातृभाषेप्रमाणें ते सरळपणें बोलत."

असें सांगून पुढें नरसिंहराव लिहितात,

> "गोपाळरावांनीं गुजरातमध्यें दीर्घकाल नोकरी केली ती मूळ अमदाबादमध्येंच. त्या काळीं अमदाबादेंतील नगरजीवन, समाजजीवन, इत्यादि चेतनांमध्यें असाधारण बळ होतें. या बळाचे प्रेरक, वर्धक, अशी जी मंडळी होती त्यांमध्यें गोपाळरावांना अग्रस्थान आहे. स्वदेशीचा पुरस्कार ही एक आधुनिक नवीन प्रवृत्ति आहे असें लोक समजत असतील; परंतु 'देशी कारागिरीला उत्तेजन' या साध्यासुध्या नांवानें गोपाळरावांच्या काळीं जो विचारप्रवाह चालू होता, तोच आजच्या प्रवृत्तीच्या मुळाशीं बीजरूपानें आहे असें मानावें लागेल. या विषयामध्यें ज्यांच्या व्याख्यानांनीं उत्साह भरला, त्यांत दक्षिणी व्याख्यात्याला अग्रस्थान आहे; हें सर्व घडवून आणण्यांत साधनीभूत असे आपले रावसाहेबच होते." (गुजरातीवरून भाषांतरित), (पृ. ५२).

गोपाळराव वारल्यानंतर त्यांचें स्मारक कशाप्रकारें करावें याचा विचार करण्याकरितां पुण्याला नेटिव जनरल लायब्ररीच्या दिवाणखान्यांत न्या० रानडे प्रभृति नेत्यांनीं सभा भरविली, त्यावेळीं गुजरातचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते, रा० ब. लालशंकर उमियाशंकर एका ठरावावर बोलतांना म्हणाले,

> "मी अमदाबादचा राहाणारा असून रा० ब० देशमुखांस अमदाबाद व एकंदर गुजरात या प्रांतांत देवतुल्य समजतात व अशी तिकडे सर्वांची समजूत होण्यास त्यांची तशी वृत्ति व वर्तन हीं कारण झालीं आहेत. देशमुख हे अमदाबादेस आले तेव्हां तेथें कोणत्याही प्रकारच्या सुधारणेचें

नांवही नव्हतें. मग तत्संबंधींच्या संस्थांची गोष्ट कशाला विचारतां? परंतु देशमुखसाहेब आल्यापासून अमदाबादेंत ह्या काळाला उचित त्या सर्व सुधारणामतांच्या संस्था स्थापन होऊन अमदाबाद शहरचें युग बदललें, असें म्हटलें तरी चालेल. तेथें सुधारणामतांचे विचार सुरू होऊन समाजाचें पाऊल पुढें पडत चाललें. अमदाबादेच्या अनेक संस्थांशीं सरदार देशमुख हे प्रत्यक्ष संबद्ध होते. त्यांची अमदाबादेहून नाशकास बढतीवर बदली होऊन तिकडे जाण्यास ते निघाले, तेव्हां अमदाबादच्या एकंदर आबालवृद्धांस अत्यंत दुःख झालें. सर्व शाळांतलीं मुलें एकत्र जमून त्यांनीं रा० ब० वर जयजयकारपूर्वक पुष्पवृष्टि केली. त्यांच्याविषयीं सर्वांना प्रेमादरभाव असल्यामुळें त्यांचा वियोग सर्वांना दुःसह झाला. त्यांच्या यादगिरीचा एक स्वतंत्र फंड उभारून त्या व्याजांतून देशी कारागिरीला उत्तेजनादाखल बक्षिसें वगैरे देण्याकडे व्यय करण्यांत येतो. ह्याप्रमाणें अमदाबादच्या लोकांना त्यावेळीं त्यांचे स्मरणार्थ जें करावेंसें वाटलें तें त्यांनीं प्रेमपूर्वक केलें असून हल्लीं त्यांचें स्मारक व्हावें म्हणून जो प्रश्न निघाला आहे त्यासही मदत करण्यास अमदाबादचे लोक सिद्ध आहेत."

अमदाबादेस गोपाळरावांनीं काय काय कार्यें केलीं तें आतां थोडक्यांत पाहूं :—

१. अमदाबादमध्यें जो गुजराती प्रार्थनासमाज स्थापन झाला त्याच्यामागें त्यांचीच प्रेरणा होती, असें आठल्ये यांनीं नमूद केलें आहे. गोपाळरावांच्या स्मरणवहींत, अमदाबादेस १७ डिसेंबर १८७१ आणि पुण्यास ५ डिसेंबर १८७० रोजीं प्रार्थनासमाज स्थापन झाला, अशी नोंद आहे. या प्रार्थनासमाजाचे अध्यक्ष रा० ब० भोलानाथ साराभाई आणि उपाध्यक्ष स्वतः गोपाळराव होते. प्रार्थनासमाजांतील त्यांच्या उपासनांसंबंधीं पुष्कळांनीं उल्लेख केला आहे.

२. गुजराती पुनर्विवाहमंडळही त्यांनीं स्थापन करविलें होतें. त्याचे अध्वर्यु गोपाळरावजींचे शिरस्तेदार रा. रा. लालशंकर उमियाशंकर हे होते. या मंडळामार्फत त्यांनीं बऱ्यांच ब्राह्मण आणि वाणी जातींतील बालविधवांचे पुनर्विवाह घडवून आणले.

३. "हितेच्छु" नांवाचें गुजराती व इंग्रजी भाषेंत साप्ताहिक त्यांनीं सुरू केलें होतें, असें आठल्ये लिहितात. या वृत्तपत्राचे जुने अंक मिळविण्याचा मीं प्रयत्न केला, पण त्यांत यश आलें नाहीं. त्याचे संपादक पीतांबरदास त्रिभुवनदास मेहता नांवाचे गृहस्थ होते एवढी माहिती मिळाली (*साठीनुं साहित्य*, अमदाबाद, १९२१, पृ० २९०). या पत्रामध्यें गोपाळराव वारंवार लिहीत होते, असें गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीच्या इतिहासांत (१९३२) नमूद आहे. (विभाग १, पृ० २३९). या पत्राचे जुने अंक राजकोटला असल्याचें कळतें.

४. अमदाबादचे असिस्टंट जज्ज मि. एम्. एच्. स्कॉट यांनीं गुजरात व्हर्न्याक्युलर सोसायटीच्या ऑनररी सेक्रेटरी या पदाचा १८७२ सालीं राजिनामा दिल्यावर त्यांच्या जागीं गोपाळरावांची नेमणूक करण्यांत आली. हें काम मोठ्या आस्थेनें त्यांनीं १८७७ पर्यंत केलें. गोपाळरावांसंबंधींची कृतज्ञता या संस्थेच्या इतिहासांत व्यक्त करण्यांत आली आहे (पृ०२३७-२४२). या संस्थेला अलीकडे 'गुजरात विद्यासभा' असें नांव मिळालें आहे. या संस्थेंत गुजराती, मराठी, संस्कृत, इंग्रजी या भाषांतील हस्तलिखित व मुद्रित ग्रंथांचा संग्रह आहे. 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रहा'ची संपूर्ण प्रत मला प्रथम तेथेंच पाहावयास मिळाली; आणि 'गोपाळगुणवर्णन' या गुजराती काव्याची प्रतही मला तेथेंच उपलब्ध झाली.

५. अमदाबाद येथील 'प्रेमाभाई इंस्टिटयूट' या सार्वजनिक लायब्ररीच्या तर्फे ते दरवर्षीं व्याख्यानमाला चालवीत. तेथें स्वतः व्याख्यानें देत आणि इतर विद्वानांचींही करवीत.

६. याशिवाय गुजराती वक्तृत्वसभा त्यांनीं स्थापन केली होती, आणि या ठिकाणीं तरुण विद्वानांचीं गुजरातींत भाषणें घडवून त्यांना बक्षिसें देत, असें आठल्ये लिहितात.

७. गोपाळराव गुजरातींत अस्खलित भाषण करीत याचा निर्देश वर आलाच आहे. 'निगमप्रकाश' आणि 'आगमप्रकाश' असे त्यांनीं लिहिलेले दोन गुजराती ग्रंथ आहेत, त्यांचा निर्देश पुढें येणारच आहे. याशिवाय 'बुद्धिप्रकाश' या गुजराती मासिकांत त्यांनीं कांहीं लेख लिहिले आहेत. त्यापैकीं "ब्राह्मणोना गोत्र तथा प्रवर विषे", "चंडीपाठ" अशासारखे निबंध वगळले

तर बाकीचे लेख त्यांच्या निबंधसंग्रहांतील ऐतिहासिक लेखांची गुजराती भाषांतरें दिसतात.

८. स्वदेशीच्या चळवळीचा गुजरातेंत त्यांनींच प्रथम पुरस्कार केला. म्हणून त्यांनीं देशी कारागिरांना दिलेल्या उत्तेजनादाखल त्यांच्या नांवानें स्मारकादाखल[1] निधनानंतर बक्षिसें देण्याची व्यवस्था करण्यांत आली.

९. 'आर्यज्ञानवर्धकसभा' नांवाच्या एका संस्थेचे ते सरनशीन (अध्यक्ष) होते, असें सुरतेच्या 'गुजराथदर्पण' या वृत्तपत्रानें लिहिलें आहे (१३-१०-१८९२). स्वामी दयानंदाच्या आर्यसमाजाची ही संस्था होती कीं काय कळत नाहीं.

स्वामी दयानंद सरस्वती ज्यावेळीं अमदाबादेस आले त्यावेळीं गोपाळरावांनीं त्यांचीं तेथें व्याख्यानें करविलीं, असें नमूद आहे. पुढें गोपाळराव मुंबईच्या आर्यसमाजाचे अध्यक्ष झाले, हें प्रसिद्ध आहे.

१०. मिस् मेरी कार्पेंटर या इंग्रज बाई हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षणास उत्तेजन देण्याकरितां ज्यावेळीं अमदाबादेस आल्या, त्यावेळीं गोपाळरावांचें त्यांना फार साह्य झालें असें आठल्ये लिहितात. यावेळीं तेथें एकादी स्त्रीशिक्षणसंस्था अस्तित्वांत आली असणें शक्य आहे.

अशाप्रकारें सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक अशा बहुविध कार्यांचें बीजारोपण व वर्धन त्यांनीं गुजरातेंत केलें.

अनेक कवींनीं गुजराती काव्यें लिहून त्यांचें गुणवर्णन केलें आहे.

---

१ 'गोपाळराव हरि मेमोरियल फंड'च्या इनामाची रक्कम तेराशें रुपये जमले होते व ते चार टक्के व्याजानें सरकारी प्रोमिसरी नोटांमध्यें गुंतविले होते, व त्यांच्या व्याजांतून देशी कारागिराला उत्तेजन मिळेल असें काम करणाऱ्याला बक्षीस द्यावयाचें जाहीर केलें. (**बुद्धिप्रकाश**, जून १८८३, पृ. १३४) परंतु तें घेण्यास पुढें कोणीच येईना, म्हणून उद्योगधंद्यांबरोबर गुजरातेंतील शेती यांच्या वर्णनपर निबंध मागविण्यांत येऊं लागले. (**बुद्धिप्रकाश**, नवंबर १८८३). 'गुजरातमध्यें हल्लीं चाल् असलेले आणि बंद पडलेले धंदे' या विषयावर शंभर रुपयांचें इनाम घेऊन निबंध लिहिण्याचें हरगोविंद-दास द्वारकादास यांनीं प-करलें आहे. पण मुदतींत निबंध पुरा न झाल्यानें आणखी सहा महिन्याची त्यांनीं मुदत मागितल्याचें नमूद आहे, (**बुद्धिप्रकाश**, नवंबर १८८८). अलीकडे या फंडाची काय व्यवस्था आहे, त्याची माहिती उपलब्ध 'बुद्धिप्रकाशा'च्या अंकांत मला मिळाली नाहीं.

सुप्रसिद्ध कवि दलपतराम यांनीं आपणास विषय देऊन गोपाळरावांनीं काव्यें करविल्याचा निर्देशही केला आहे. कवि दलपतराम यानें गोपाळरावांवर परिचयात्मक लिहिलेलें एक काव्य 'बुद्धिप्रकाश' (१८७७, पृ० ९१) मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

याशिवाय गोपाळरावांना अमदाबाद सोडतेवेळीं निरोप देतांना श्रीयुत डाह्याभाई देरासरी यांनीं रचलेल्या अशाच एका गुजराती काव्याचीं आरंभींचीं दोन कडवीं, 'गुजरात वर्नाक्युलर सोसायटीनो इतिहास' या ग्रंथांत उद्धृत करण्यांत आलीं आहेत (पृ०२४१). मूळ संबंध काव्य कोठें प्रसिद्ध झालें आहे कीं काय कळत नाहीं.

तिसरें 'गोपाळगुणवर्णन' हें गुजराती काव्य कवि मोहनलाल दलपतराम यांनीं रचलेलें अमदाबाद येथें सूर्योदय प्रेसमध्यें मुद्रित झालें आहे. (पृष्ठें १४ आणि काव्याचीं पद्यें ५६). गुजराथ विद्यासभेंतून आणविलेली या काव्याची प्रत अत्यंत जीर्ण असून त्याला कव्हर नाहीं. त्यामुळें त्याचा प्रसिद्धिकाळ कळला नाहीं. हेंही काव्य १८७७ सालीं रचलें गेलें.

गोपाळरावांना निरोप देतांना जी अमदाबादेला एक मोठी जाहीर सभा भरली, त्यावेळीं रा० ब० रणछोडलाल यांनीं जे उद्गार काढले त्यांत गोपाळरावांच्या कार्याचें सार आलें आहे. रा० ब० रणछोडलाल म्हणाले,

> "त्यांचें येथें बारा वर्षें वास्तव्य झालें. या कालांत त्यांचे डोळे कधींही रागानें लाल झालेले पाहाण्यांत आले नाहींत. क्षमा, दया, धैर्य आणि उदारता यांचे साहेब एक ठळक नमुनाच होते. आपल्या हृद्याचें काम केल्यावर बाकी राहिलेला सारा वेळ ते परोपकार आणि देशकल्याणाच्या कामाला लावीत. हिमाभाई इंस्टिटयूट लायब्ररीचे प्रेसिडेंट, गुजरात वर्नाक्युलर सोसायटीचे सेक्रेटरी, शेठाणी कन्याशाळेचे सेक्रेटरी, बालल्ग्ननिषेधक मंडळाचे प्रमुख, देशोत्कर्षक मंडळीचे प्रेरक, प्रार्थनासमाजाचे उपाध्यक्ष आणि बंगालमधील दुष्काळ आणि रेल्वे वगैरे रिलीफ फंड कमिटीचे सेक्रेटरी, अशासारखें कोणतेंही लोकसेवेचें कार्य उत्साहानें करण्याचें त्यांनीं बाकी ठेवलेलें नाहीं. विद्यावृद्धीच्या बाबतींत, तसेंच भाषणें करणें, सभा भरविणें यांची त्यांनीं मोठी काळजी बाळगिली आणि उत्तेजन दिलें. असा

सद्गुणी, लोकप्रिय आणि उमदा पुरुष अन्य कोणी पाहाण्यांत आला नाहीं."
(*'गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीनो इतिहास'*, पृ. २३९; भाषांतरित.)

गुजरात व्हर्न्याक्युलर सोसायटीचें मुखपत्र जें 'बुद्धिप्रकाश' मासिक त्याच्या आक्टोबर व नवंबर १८९३ अंकांमध्यें दोन हप्त्यांनीं 'रा. बा. गोपाळराव हरिनुं जन्मवृत्तांत' या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध झाला आहे. तो कोणीतरी त्यांच्या अगदीं निकटच्या गुजराती मित्रानें लिहिलेला दिसतो. त्यांत पुढील माहिती आढळते :—

"रा० ब० देशमुख या शहरांत एकंदर बारा वर्षें राहिले. या एक तपाएवढ्या मुदतीच्या दरम्यान ते एवढे अपार प्रिय व पूज्य होऊन गेले कीं, लोक त्यांना देवाप्रमाणें सन्मान देत. त्यांच्या कामाकाजाची शैली, त्यांची न्यायबुद्धि, त्यांचा शांत आणि गंभीर स्वभाव आणि त्यांचें धैर्य आणि औदार्य यांची लोकांना एवढी पक्की जाणीव झाली होती कीं, त्यांच्या नाशिकच्या बदलीची खबर कळतांच सर्वत्र शोकगलानी पसरली. त्यावेळीं त्यांना मान देण्याच्या आणि सत्कार करण्याच्या कामीं मुळींच कसूर करण्यांत आली नाहीं. रा० ब० देशमुखांना निरोप देतेसमयीं "गोपालोत्सव" नांवाचा एक जंगी समारंभ साजरा करण्यांत आला होता. त्यावेळीं गोपाळरावांच्या गुण-गायनांत वृत्तपत्रांची आपसांत जणूं स्पर्धा लागली असावी असें तीं वाचतांना वाटत असे. कवि आणि पत्रकार यांनीं त्यांच्या प्रयाणसमयीं एवढा उत्सव केला कीं, दुसऱ्या कोणाही अधिकाऱ्याला क्वचितच एवढा मान मिळाला असेल. शहरामध्यें त्यांच्या गमनप्रसंगानें त्यांच्या आदरार्थ कितीतरी मेज-वान्या दिल्या गेल्या. त्या प्रसंगीं लोकांनीं जो सन्मान केला तो खरोखरच अपूर्व होय. ता. २४ शनिवार फेब्रुवारी १८७७ हा दिवस गोपालोत्सवा-करितां मुक्रर करण्यांत आला होता. त्याकरितां खर्च झालेल्या पांचशें रुपयांपैकीं अडीचशें रुपयांचीं पुस्तकें व मिठाई शाळांतील विद्यार्थ्यांना वांट-ण्यांत आली. याप्रसंगीं ४००० विद्यार्थी आणि १०००० नागरिक गोपाळ-रावांच्या सन्मानार्थ गोळा झाले होते. यासंबंधींची विस्तृत माहिती या मासिकामध्यें त्यावेळीं प्रसिद्ध करण्यांत आली आहे. अमदाबादेंतील पुष्कळ कवींनीं गोपाळरावांच्या गुणप्रशंसापर कविता रचिल्या. त्यांपैकीं दलपतराम

डाह्याभाई (सी. आय्. ई.), तसेच त्यांचा पुत्र मोहनलाल यानें केलेलें गोपालगुणवर्णन काव्य आणि कवि बुलाखी चकुभाई यांची कविता विशेष प्रसिद्ध आहे. गोपाळरावजींचा सन्मान करण्यांत हिंदु, मुसलमान, पारसी, युरोपियन अशा सर्वांनींच उत्साहानें भाग घेतला होता. या समयीं एक अमेरिकन व्यापारी या शहरामध्यें आलेला उपस्थित होता. तो आपले विचार मांडतांना म्हणाला कीं, या मेळाव्यावरूनच केवढ्या मोठ्या पुरुषाचा हा गौरव होतो आहे त्याची मला सहज कल्पना आली. अशा प्रकारची लोकभक्ति क्वचितच दृष्टीस पडते. या पुरुषाची खरोखरच धन्य होय." ('*बुद्धिप्रकाश*', १८९२, पृ० २३२; भाषांतरित).

पुढें हा लेखक म्हणतो,

"खरोखर गोपाळरावांसंबंधीं लोकांचें प्रेम अलौकिक होतें. सन १८८१ मध्यें ज्यावेळीं रा० ब० देशमुख, बडोद्याला श्री० सयाजीराव गायकवाड यांच्या राज्याभिषेकप्रसंगीं आले, त्यावेळीं आपले प्रसिद्ध कै० रा० बा० भोलानाथ साराभाई यांच्या निमंत्रणावरून त्यांनीं अमदाबादला भेट दिली. यावेळीं गोपाळरावांच्या दर्शनाकरितां जे लोकांचे थवेच्या थवे गोळा झाले, ते पाहून एकाद्या जत्रेकरितां जमलेल्या समुदायाची आठवण होई."

नाशिकास बदली व तेथील कार्य

अमदाबादकरांचा निरोप घेऊन लगेच दुसऱ्या दिवशीं ता. २५ फेब्रु० १८७७ रविवार रोजीं गोपाळराव नाशिक येथें येऊन पोंचले, आणि ता. २८ रोजीं जॉइंट आणि सेशन्स जज्ज या जागेचा त्यांनीं चार्ज घेतला. ही जागा युरोपियन सनदी नोकरांकरितां होती. गोपाळरावांची त्या जागीं नेमणूक केल्याबद्दल त्या लोकांचा क्षोभ झाला होता, याचा निर्देश मागें आलाच आहे. या जागेचा वास्तविक पगार महिना रु. १८०० होता. पण गोपाळरावांच्या हातीं केवळ त्याच्या तीन-चतुर्थांश रक्कम (म्हणजे १३५० रुपये) पडत असे. देशी माणूस या जागीं नेमल्यास त्याला कमी पगार मिळावा अशी व्यवस्था युरोपियन सनदी नोकरांस शांत करण्याकरितां केली गेली असावी.

नाशिक हें गोपाळरावांचें मुख्य ठाणें होतें. मधून मधून कांहीं दिवस

त्यांना ठाण्यास किंवा अलिबागेस तेथील सेशन्स जज्जांच्या मदतीकरितां जावें लागे. त्यांच्या स्मरणवहींत अशा नोंदी आहेत :

"१ जुलाई १८७७ रोजीं देशमुख ठाण्यास मदतीकरितां गेले.

"७ जुलईस सेशनाकरितां देशमुख अलिबागेस गेले. २० जुलईस ठाण्यास परत आले.

"ता. २४ डिसेंबर १८७७–देशमुख पुणें, पंढरपूर वगैरेकडे फिरावयास जाऊन १ जानेवारी १८७८ रोजीं ठाण्यास परत आले. ४ जानेवारी नाशकास सेशनाकरितां आले.

"२७ फेब्रु० १८७८ रोजीं ठाण्याहून नाशकास सेशनाकरितां सर्व आफिसासह आले."

गोपाळरावांच्या येथील सार्वजनिक कामगिरीची तपशीलवार माहिती समकालीन वृत्तपत्रांच्या मागील फाइली उपलब्ध नसल्यामुळें देतां येत नाहीं. तरीपण पुढील गोष्टी केल्याचा उल्लेख सांपडतो :—

१. नाशिक हें क्षेत्र असल्यामुळें या ठिकाणीं विधवांच्या गर्भपाताचे प्रकार घडत. त्याकरितां त्यांनीं स्थानिक वकिलांना हाताशीं धरून लगेच १८७७ सालच्या जुलैमध्यें सूतिकागृह किंवा बालरक्षकगृह स्थापन केलें. या गृहाचे चिटणीस गंगाधर नरसिंह केतकर, वकील हे होते. हे लोकमान्य टिळकांचे व्याही म्हणजे मुलीचे सासरे होत. केतकर हे सिद्धये देशमुख घराण्याचे जांवई होते.

२. वक्तृत्वसभा व व्याख्यानमाला स्थापन केली. या ठिकाणीं स्वतः गोपाळरावांचीं व इतर विद्वान लोकांचीं भाषणें होत.

३. यावेळीं न्या० महादेवराव रानडे यांचेंही नाशिकांत वास्तव्य असे. देशमुख, रानडे वगैरे मंडळींनीं मिळून तेथें प्रार्थनासमाज स्थापन केला होता. श्री० रमाबाई रानडे 'आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी' मध्यें (पुणें १९१०, पृ. ७४–८) पुढील आठवण सांगतात :—

"याच सालीं नाशिक येथें प्रार्थनासमाजाची स्थापना **स्वतः**, देशमुख, केतकर, वाड वगैरे मित्रमंडळीच्या सहायानें केली. रा० ब० गोपाळराव हरी देशमुख हे तेथें जॉइंट जज्ज होते. त्यांच्या सहा सुना व दोन लेकी त्यावेळच्य

मानानें बऱ्याच शिकलेल्या होत्या. त्यांचें कुटुंब जुन्या चालीचें होतें. तरी त्यांना उत्तम लिहितांवाचतां येत होतें. पुराण ऐकण्याचा व स्वतः वाचण्याचा त्यांना नाद असे. ह्या बहुतेक सर्व व्रतेंवैकल्यें व नियमधर्म करीत. या निमित्तानें वारंवार गांवांतील बायकांना हळदीकुंकुवाला बोलावीत. यामुळें माझेंही त्यांच्या घरीं जाणें-येणें होऊं लागलें म्हणून माझा परिचय जास्त झाला. रा० सा० देशमुख व **स्वतः** असे दोघेही स्त्रीशिक्षणाचे अभिमानी असल्यामुळें, आपल्या बायकांनीं हळदीकुंकवाच्या निमित्तानें का होईना, पण गांवांतील बायकांना वारंवार एके ठिकाणीं जमवून सीता-सावित्री यांच्यासारख्या प्राचीन साध्वींचीं चरित्रें त्यांना वाचून दाखवावीं व शिक्षणाकडे त्यांचें मन वळवावें; तसेंच गांवांतील मुलींच्या शाळा पाहाव्यात, त्यांना उत्तेजन येण्याकरितां कांहीं अल्पस्वल्प बक्षिसें द्यावींत, वगैरे गोष्टी त्यांना आवडत असत व याबद्दल आमच्या मागें तगादा असे. ह्या गोष्टीस फार दिवस लोटले नाहींत तोंच तसा एक प्रसंग जुळून आला. मे० कागलन्साहेब ठाण्याचे सेशन जज्ज नाशिकास सेशन चालविण्यासाठीं आले. त्यांच्याबरोबर त्यांची अल्पवयस्क मेहुणी व पत्नी ह्या होत्या....याच सुमारास कोणी गडबोले डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर तेथें शाळेच्या तपासणीस आले होते. सर्व शाळांची तपासणी संपल्यावर मुलींच्या शाळेचा बक्षिससमारंभ, यावेळीं अनायासें मिसेस कागलन् येथें आल्या आहेत त्यांच्याच हातून व्हावा, असा विचार करून ते व रावसाहेब देशमुख हे **स्वतः**चा याबद्दल विचार घेऊन दिवस ठरविण्यास आमच्या घरीं आले. त्यांनीं दिवस वगैरे ठरविला. ...त्याप्रमाणें, समारंभाच्या दिवशीं सुमारें पन्नाससाठ बायका जमल्या, हीच संख्या आम्हांला त्यावेळीं फार मोठी अशी वाटली. कारण बायकापुरुषांनीं नाशकास एकत्र जमण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. गांवांतील इतर पुरुषमंडळींना आमंत्रणें केलीं नव्हतीं; पण त्यांतल्या त्यांत स्त्रीशिक्षणाचे चहाते व पुढारी असे दहाबारा गृहस्थ मात्र होते. कार्यक्रम ठरल्याप्रमाणें, सर्व मंडळी जमल्यावर मुलींनीं ईशस्तवनपर व स्वागतपर पद्यें म्हटलीं. डेप्युटींनीं मागील सालचा रिपोर्ट वाचून दाखविला. मग मिसेस कागलन् यांच्या हातून बक्षिसें वांटून झाल्यावर मिसेस कागलन् यांचे आभार मानण्याचें व जमलेल्या बायकांस उत्तेजनपर आणि उपदेशपर

अशा तऱ्हेचा थोडा मजकूर **स्वतः** लिहून दिला होता तो देशमुखीणबाईंनीं उठून वाचावा, असें ठरलें होतें. पण आयतेवेळीं त्यांनीं तें वाचण्याचें नाकारल्यामुळें **स्वतः** मला वाचावयास सांगितलें. त्याप्रमाणें मीं तो कागद वाचून दाखवून मिसेस कागलन् व जमलेल्या बायकांचे आभार मानून खालीं बसलें, तोंच डेप्युटी यांनीं हारतुऱ्यांचें तबक माझ्यापुढें आणून ठेवलें. मीं त्यांतील एक हार मिसेस कागलन्बाईंना पहिल्यानें घालून मागाहून त्यांच्या आईला व बहिणीला घालून एक हार तसाच तबकांत वगळून तबक डेप्युटीपुढें सारिलें. हा हार साहेबांना घालावयाचा असें डेप्युटी यांनीं मला अगदीं हळूच सुचविलें. मीं लागलेंच साफ नाकारलें व मला त्यांचा राग आला. रावसाहेब देशमुख माझ्याकडेच पाहात होते. ते आपल्याशींच हंसले व एकदम उठून डेप्युटीच्या हातांतील तबकांतून हार उचलून घेऊन कागलन्साहेबांच्या गळ्यांत घातला व तुरा, अत्तर वगैरे दिलें....

रात्रीं निजतेवेळीं मुद्दाम विनोदानें विचारलें कीं, झाली का तुमची सभा नीटपणीं? पण बायकांना इतका पक्षपात कशाला हवा? सभेची सगळी खटपट पुरुषांनींच केली. बायका आयत्या आल्या. त्या तिघींना मात्र तूं हार घातलेस, पण बिचाऱ्या कागलन्साहेबांनाच कां वगळलेंस? मीं म्हटलें, "मी हिंदु नसतें तर मलाही त्याचें कांहीं वाटलें नसतें. डेप्युटी हे हिंदु व पोक्त असून त्यांनीं हार घालण्याचें मला सुचविलें याचाच मला चमत्कार वाटला व रागही आला."

"पण तुझी बाजू देशमुखांनीं सांभाळली ना?" मीं म्हटलें, "त्यांची गोष्ट कशाला? त्यांचा थोरपणा कोणीकडे? ते असे कुत्सित परीक्षक नव्हत."

नाशिकांत त्या वेळीं ग्रंथमंदिर होतें. नवें वाचनालय तेथें स्थापन करण्याची गरज नव्हती. आजही तें चालू आहे. हें वाचनालय १८४० सालीं स्थापन झालें अशी नाशिककरांची समजूत आहे. मुंबईच्या सरकारी दप्तरखान्यांत इतर जिल्ह्याच्या ठिकाणीं नेटिव जनरल लायब्ऱ्या स्थापन झाल्याचे पत्रव्यवहार मला सांपडले; पण नाशिकच्या या ग्रंथालयाचा सांपडला नाहीं. १८५२ च्या पूर्वीं नाशिकांत ग्रंथालयच नव्हतें, असें मानण्यास मात्र आधार आहे. 'ज्ञानो

दया' मध्यें (१५ फेब्रु० १८५३) गोविंद त्र्यंबक धर्माधिकारी, नाशिकांतील ग्रंथशाळेच्या मंडळीचे चिटणीस यांचें ता. २१ जाने० १८५३चें एक निवेदन प्रसिद्ध झालें आहे. त्यांत म्हटलें आहे, "आजपावेतों या शहरांत ग्रंथगृह व वातमी वाचण्याचें स्थळ ब्राह्मण आदिकरून एथील राहाणाऱ्यांस नव्हतें, परंतु ता. २९ जानेवारीपासून चालू झालें आहे. या ग्रंथगृहांत पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचण्यास येण्याबद्दल सरकारी एतद्देशीय कामगारादि उदमी सावकार याजवर मात्र दोन आणे दरमाहा वरगणी देण्याचा नेम ठरविला आहे." वगैरे (पृ० ६४).

ही गोष्ट १९५१ सालीं या ग्रंथालयाच्या वार्षिकोत्सवाच्या प्रसंगीं अध्यक्षीय भाषणांत मीं पुढें मांडिली आहे.

त्याकाळीं नाशिक किंवा ठाणें या ठिकाणीं गोपाळरावांनीं नवें वृत्तपत्र अस्तित्वांत आणलें किंवा जुन्यास मदत केली याची माहिती मिळाली नाहीं. त्या काळीं 'नाशिकवृत्त' हें पत्र नाशिक येथें व 'सर्वोदय' हें पत्र ठाणें येथें प्रसिद्ध होत असे. नाशिक-ठाण्याच्या या दोन वर्षांच्या वास्तव्यांत गोपाळरावांनीं बरेच ग्रंथ लिहिलेले दिसतात. 'स्वाध्याय', 'ऐतिहासिक गोष्टी' (३ भाग), 'गीतातत्त्व' हीं पुस्तकें नाशिकला प्रसिद्ध झालीं. याखेरीज 'नाशिकवर्णन' नांवाचा ग्रंथ ते लिहीत होते, असें त्यांच्या स्मरणवहीवरून दिसतें.—

"२९-५-७७ नाशिकवर्णन लिहिण्यास प्रारंभ केला आहे."

"१६-६-१८७७ शनिवार—रघुजी (लेखक?) घरीं येऊन बरेंच नाशिकवर्णन लिहिलें."

हें पुस्तक पुढें प्रसिद्ध झाल्याचें दिसत नाहीं, किंवा त्याच्या हस्तलिखिताचाही पत्ता नाहीं. ठाण्यालाही त्यांची 'हिंदुस्थानचा इतिहास,' 'पानपतची लढाई' आणखी एकदोन किरकोळ पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांच्या एकंदर ग्रंथांची तपशिलवार यादी पुढें दिली आहे.

गरीब विद्यार्थ्यांना आणि होतकरू तरुणांना गोपाळरावांचा फार आधार असे. सुप्रसिद्ध क्रांतिकारक आणि संस्कृतज्ञ श्यामजी कृष्णवर्मा यांना त्यांची फार मदत होती. श्यामजी हे प्रथम गोपाळरावांचे आचारी होते, असें पुण्याच्या दोघां स्नेह्यांकडून मला कळलें. परंतु श्री. इंदुलाल याज्ञिक यांनीं जें श्यामजींचें इंग्रजींत चरित्र लिहिलें आहे, त्यावरून पाहातां यांत कांहीं तथ्य आहे, असें वाटत

नाहीं. तें कसेंही असो, श्यामजी मार्च १८७७ सालीं नाशिकास गेले आणि तेथें गोपाळरावांनीं स्थानिक आर्यसमाजाचे प्रमुख या नात्यानें कांहीं मित्रांच्या साह्यानें त्यांचीं ता. १ व २ एप्रिल रोजीं 'सामाजिक व धार्मिक सुधारणा' या विषयावर संस्कृत भाषेंत दोन व्याख्यानें घडवून आणिलीं. गोपाळरावांच्या साहाय्यानें ऑक्सफोर्ड येथें शिक्षणाकरितां जाण्याचा मार्ग शोधण्याचा श्यामजीचा हेतु होता. त्याप्रमाणें सुप्रसिद्ध संस्कृत कोशकर्ते ऑक्सफोर्डचे संस्कृत प्रोफेसर मोनियर विल्यम्स यांच्याकडे गोपाळरावांनीं श्यामजीची पत्रद्वारें शिफारस केली ती अशी—

"I know Mr. Shyamaji Krisnavarma very well. I have heard his lectures in Sanskrit. They were very able and correct. He is a very promising youth and has a great faculty for speaking Sanskrit. He has a great taste for Sanskrit, and even neglects English for it. He is a very well-behaved and good-tempered young man. If you take him as your assistant, and if he remains at Oxford, he will prove very useful to you and will improve himself in many ways."

या पत्राला लागलेंच (४-१-७७) प्रो. मोनियर विल्यम्सचें उत्तर आलें,

"As to Mr. Shyamaji Krisnawarma please inform him that in consequence of the good character you gave him, I shall be happy to take him as my assistant."

श्यामजीला कच्छ संस्थानाकडूनही कांहीं मदत मिळवून देण्याचा गोपाळरावांनीं प्रयत्न केला. पण पोलिटिकल एजंट या गोष्टीच्या आड आल्यामुळें या बाबतींत त्यांना यश आलें नाहीं. शेवटीं १८७९ च्या मार्चच्या अखेरीस श्यामजी विलायतेला गेले. तेथून प्रो. मोनियर विल्यम्स यांच्या वशिल्यानें सर रिचर्ड टेंपल यांनीं संस्थानाकडे शिफारस करतांच त्यांना स्कालरशिप मिळाली आणि ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटीच्या बालियाल कॉलेजची त्यांनीं पदवी घेतली आणि ता. १७ नवंबर १८८४ रोजीं बॅरिस्टर होऊन १८८५ जानेवारींत ते हिंदुस्थानांत परत आले.

दरम्यान वयाचीं पंचावन्न वर्षें भरल्यामुळें गोपाळराव १८७९ च्या सप्टेंबर रोजीं सेवानिवृत्त झाले आणि मुंबईंत पांच-सहा महिने मुक्काम करून कायम राहाण्यास पुण्याला गेले. येथें असतांना १८८४ फेब्रुवारीमध्यें रतलामच्या महाराजांच्या आग्रहावरून त्यांनीं त्या संस्थानाचें दिवाणपद स्वीकारलें होतें.

येथें उत्तर हिंदुस्थानांतील संस्थानांना लागू करण्याकरितां पीनल कोडच्या धर्तीवर एक ग्रंथ त्यांनीं लिहिल्याचें कळतें.

श्यामजी हिंदुस्थानांत आल्याबरोबर त्यांनीं लगेच गोपाळरावांची रतलाम येथें जाऊन भेट घेतली.

दुलाल याज्ञिक लिहितात,

"Almost immediately after enrolling himself at the Bombay Bar, Shyamaji hastened to pay a call to Gopal Rao Deshmukh, who was then the Divan of the Rutlam state in Central India. His old patron naturally presented him to the ruling prince who was deeply impressed with Shyamaji's personal charm, cosmopolitan learning and high order of abilities. It was soon found that Divan Deshmukh was about to retire on account of his old age and the Rajah cordially accepted his Divan's suggestion to appoint Shyamaji, though barely twenty years of age, as his successor in office on a salary of about Rs. 700 a month."

गोपाळराव देशमुखांनीं श्यामजीला पाठविलेलीं शंभरावर पत्रें उपलब्ध असल्याचें रा. ग. वि. केतकर (माजी केसरीकर्ते) यांच्याकडून मला कळलें. पण खटपट करूनही तीं मला पाहावयास मिळालीं नाहींत!

मराठी ग्रंथोत्तेजन

गोपाळराव देशमुख व महादेवराव रानडे यांचें वास्तव्य नाशिकमध्यें असतांना त्यांनीं परस्परांत विचारविनिमय करून ज्या देशहितपर अनेक चळवळी सुरू केल्या, त्यांपैकीं 'मराठी उत्तेजक मंडळी' ही एक कल्पना होय.

'ज्ञानप्रकाशा'च्या ता. ७ फेब्रुवारी १८७८च्या अंकांत ही योजना त्यांनीं दोघांच्याही सहीनें लोकांपुढें मांडिली ती अशी—

या देशांत उपयोगी ग्रंथ फार थोडे आहेत व त्यांचे वाचणारेहि फार थोडे आहेत. याजमुळें विद्येचा लाभ फार थोडे मनुष्यांस होतो. विलायतेंत त्राक्ट व बुक सोसायटी या नांवाच्या मंडळ्या बहुत असून त्या ग्रंथकारांस उत्तेजन देऊन ग्रंथ प्रसिद्ध करून स्वल्प दरानें विकतात. यामुळें फार परोपकार होतो व लोकांचें ज्ञान वाढतें. यास्तव या देशांत ग्रंथकारांस उत्तेजन यावें व स्वस्त दरानें ग्रंथ प्रसिद्ध व्हावे हा हेतु आहे. यास्तव अशी योजना केली आहे कीं, दरसाल पांच रुपायांचे ग्रंथ घेण्याची इच्छा असेल त्यांनीं यादीवर सही करावी. आम्ही जे ग्रंथ त्यांजकडे पाठवूं ते नापसंत झाल्यास आम्ही परत घेऊं किंवा पूर्वी लिहून त्यांस विचारूं आणि पसंत होतील ते पाठवूं. परंतु दरसाल पांच रुपयांपर्यंत मराठी ग्रंथ आम्ही घेण्यास कबूल आहों, अशा सह्या हजारपर्यंत मिळाल्यास ग्रंथकारांकडून चांगले ग्रंथ करण्याची योजना करूं. या मंडळीचें नांव मराठी उत्तेजक मंडळी असें ठेवूं. हजार सह्या मिळाल्यावर या मंडळीचें मुख्य आफिस मुंबई किंवा पुणें येथें ठेवण्याची व ग्रंथकार व परीक्षक कमेटी व इतर कामदार यांची योजना करण्याची तजवीज होईल.

वर सांगितलेला हेतु पसंत पडून त्याप्रमाणें दरसाल पांच रुपयांचे ग्रंथ घेण्यास जे कबूल असतील त्यांनीं आपलें नांव व पत्ता हीं सुवाच्य अक्षरांनीं लिहून अगोदर ज्ञानप्रकाश छापखान्याचे म्यानेजर ह्यांजकडे पाठवावीं.

गोपाळराव हरि देशमुख
माधवराव गोविंद रानडे

स्वतः गोपाळराव हे बहुप्रसव मराठी ग्रंथकार असल्यामुळें अशा प्रकारच्या संस्थेची मूळ कल्पना त्यांच्याच डोक्यांतून निघाली असणें शक्य आहे. वरील आवाहनाची भाषाही त्यांचीच दिसते. अशा प्रकारची संस्था मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी या नांवानें याच वर्षीं मेमध्यें निघाली.

या संस्थेसंबंधीं 'मराठी भाषा व ग्रंथोत्तेजन' या मथळ्याखालीं एक लेखक लिहितात,

'सन १८७८ सालीं कै. रा० ब० गोपाळराव हरि देशमुख व कै. माधव गोविंद रानडे या दोघां विद्वान गृहस्थांनीं 'ग्रंथोत्तेजक मंडळी' स्थापन केली. या संस्थेच्या परीक्षक मंडळींत कै० कृष्णशास्त्री चिपळुणकर, कृष्णशास्त्री तळेकर, रावजीशास्त्री गोडबोले व सभेचे उत्पादक देशमुख व रानडे असे पांच नामांकित विद्वान होते.....परंतु या संस्थेच्या चालक-मंडळीच्या विद्वत्तेच्या, कळकळीच्या आणि उद्योगाच्या मानानें त्यांच्या खटपटीपासून अपेक्षित अशी फलसिद्धी झाली नाहीं....देशमुखांचीं पुस्तकें मात्र अजून मराठी वाचकांस भक्तिपूर्वक वाचाविंशी वाटतात." (*विविध-ज्ञानविस्तार*, वर्ष ३५, पृ० १५५).

याच वर्षी ११ मे १८७८ रोजीं पुण्यास मराठी ग्रंथकारांचें जें संमेलन भरलें त्यालाही वरील देशमुख व रानडे यांचें आवाहन कारणीभूत झालें असावें. १८८५ सालीं कृष्णशास्त्री राजवाडे यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें तें चाल्द् मराठी साहित्यसंमेलनांच्या परंपरेंतील पहिलें संमेलन मानतात; परंतु १८७८ सालचें संमेलन पहिलें समजलें पाहिजे, ही प्रा. द. वा. पोतदार यांची सूचना (*महाराष्ट्र साहित्य परिषदेचा इतिहास*, १९४३, पृ० १०) विचारार्ह वाटते.

१८८५ सालच्या संमेलनाला पाठविलेल्या आपल्या संदेशांत गोपाळराव लिहितात,

"कामाच्या नडीमुळें येण्यास व सभेंत हजर राहण्यास मला फावत नाहीं. ..नवीन नवीन ग्रंथ होऊन भाषा सुधारत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु ग्रंथवृद्धीमध्येंच कित्येक बीभत्स ग्रंथ होत असल्याचें दिसतें. अशा ग्रंथप्रसिद्धीस मॅजिस्ट्रेटांकडून कायद्याप्रमाणें प्रतिबंध झाला पाहिजे अशी कांहीं तजवीज घडल्यास फार बरें होईल."

इतर सन्मान

गोपाळराव सेवानिवृत्त झाल्यावर त्यांना वार्षिक ५००० रुपये पेन्शन चालू झालें. याशिवाय नोकरी सुटल्यावर जुनें २०० रुपयांचें वर्षासन त्यांना फिरून मिळूं लागलें. त्यांना आयुष्यांत पुष्कळ बहुमान मिळाले. त्यांतील कांहीं पुढें देतों :—

१८७४ मुंबई युनिव्हार्सिटीचे फेलो नेमण्यांत आलें.
१८७७ जे. पी. करण्यांत आलें.
१८७७ दिल्लीदरबारच्या प्रसंगीं 'रावबहादूर' ही पदवी त्याना देण्यांत आली.
१८८१ त्यांना डेक्कनचे फर्स्ट क्लास सरदार करण्यांत आलें.
१८८० ते १८८२ } ते मुंबईच्या कायदेकौन्सिलचे सभासद होते. यावेळीं त्यांनीं फार महत्त्वाची कामगिरी बजाविली असें नमूद आहे.

लोकहितवादी मासिक–त्रैमासिकांचा नवा उद्योग

१८८२ च्या आगष्टमध्यें कायदेकौन्सिलच्या कामांतून मोकळे झाल्यावर त्यांनीं 'लोकहितवादी' नांवाचें एक मासिक आक्टोबर १८८२ पासून सुरू केलें. हें पुणें येथें श्रीशिवाजी प्रेसमध्यें छापत असे. त्याचा आकार डेमी, आणि पृष्ठें वीस असत. त्याचा उद्देश त्यांनीं पुढें दिल्याप्रमाणें व्यक्त केला आहे:—

> "उपयुक्त ज्ञान चोहोंकडे प्रसिद्ध करण्याकरितां जीं राज्यें आज पुढें आहेत, त्यांच्या तोडीचे ग्रंथ आपल्या लोकांत प्रसिद्ध झाले पाहिजेत, या उद्देशानेंच प्रस्तुतचें मासिक प्रसिद्ध करण्याचा हेतु धारण केला आहे.... पृथक् पृथक् पुस्तकें बांधण्याच्या सोयीसाठीं त्यांचीं पानें निरनिराळीं छापण्याची व्यवस्था ठेविली आहे."

या मासिकाचे अक्टोबर १८८२ ते जून १८८५ पर्यंत अंक उपलब्ध आहेत. पुढील अंक निघाले कीं नाहीं तें कळत नाहीं.

हें मासिक चालू असतांनाच एप्रिल १८८३ पासून त्यांनीं याच नांवाचें एक त्रैमासिक चालू केलें. त्यांत ऐतिहासिक ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा हेतु होता. या त्रैमासिकाचे एकंदर नऊ अंक म्हणजे शेवटचा तिसऱ्या वर्षाचा पहिला अंक (डिसेंबर १८८७) पाहाण्यांत आहे. ही दोनही नियतकालिकें नियमितपणें प्रसिद्ध होत नसत; आणि पुढें तर तीं बंदच पडलीं. याचें कारण गोपाळरावांनीं रतलाम-संस्थानची दिवाणगिरी पत्करल्यावर त्यांना पुणें सोडावें लागलें व मासिकांकडे त्यांना लक्ष देतां आलें नाहीं, हें असावें.

अखेरचे दिवस व मृत्यु

रतलामच्या दिवाणगिरीचा राजीनामा देऊन फेब्रुवारी १८८५ मध्यें परत घरीं आल्यावर गोपाळरावांच्या पत्नी सौ. गोपिकाबाई एकाएकीं अतिसाराच्या विकारानें मे महिन्यामध्यें निधन पावल्या. याचा त्यांच्या मनाला मोठाच धक्का बसला. सेवानिवृत्त झाल्यापासून त्यांच्यावर एकामागून एक कौटुंबिक आपत्ति कोसळल्या. १८८२ मध्यें कृष्णराव, १८८५ मध्यें गणपतराव. १८८९ सालीं रामचंद्रपंत असे त्यांचे तीन पुत्र दिवंगत झाले. १८८९ सालीं येसूबाई आणि १८९२ सालीं द्वारकाबाई अशा त्यांच्या दोनही कन्या निधन पावल्या. या सगळ्याचा त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होऊन ते थकत चालले. इतर सर्व चळवळी हळुहळू बंद पडून रोग्यांना औषधोपचार करण्याचा कार्यक्रम मात्र त्यांचा शेवटपर्यंत अव्याहतपणें चालू होता. त्यांच्या निधनाच्या दुसऱ्याच दिवशीं प्रसिद्ध झालेल्या ता. १०-१०-१८९२ च्या इंदुप्रकाशाच्या अंकांतील मृत्युलेखांत पुढील मजकूर सांपडतो :—

"सरदार रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांस काल (रविवार ता. ९ आक्टोबर १८९२, आश्विन व० ४, शके १८१४ रोजीं) सकाळीं ४ वाजतां पुण्यास देवाज्ञा झाल्याचें वर्तमान कळविण्यास आम्हांला अत्यंत दुःख वाटत आहे. यांस अलीकडे १०–१२ दिवस ज्वर येत होता. तरी तो फारसा नव्हता. गेल्या दसऱ्याचे दिवशीं ते नेहमींप्रमाणें आपल्या घोड्यावर बसून चतुःशृंगीकडे सीमोल्लंघनास गेले होते व गुरुवारीं नित्याप्रमाणें आपल्या देवडीवर बसून रोग्यांची चिकित्सा व त्यांजवर औषधी योजना करीत बसले होते. शुक्रवारीं त्यांची तब्यत विशेष बिघडल्यावरून त्यांचे चिरंजीवांस येयें तार येऊन, तिघेही मुलगे पुण्यास गेले. शनिवारीं सकाळपासून ते जरा विचूक बोलूं लागले. तरी तोंडानें 'हरे राम हरे राम' व 'नारायण नारायण,' असा जप करीत होते. आणि अशा स्थितींत ते थकत थकत जाऊन वर सांगितलेल्या वेळीं त्यांचें देहावसान झालें. त्यांची प्रिय कन्या बडोद्यास दिलेली श्रीमती द्वारकाताई मुजुमदारीण ही वारल्यापासून त्यांचें अन्न सरासरी रहात चाललें होतें. आणि त्यांस गेल्या १२ वर्षांत अपत्यवियोगाचें फारच दुर्धर दुःख सहन करावें लागलें. रा. ब. देशमुख हे ह्या पत्राचे

जनक असल्यामुळें त्यांच्या मरणानें आम्हांला पितृवियोगजन्य दुःख होत आहे"

गोरगरिबांकरितां गोपाळरावांनीं दवाखाना अगदीं १८४८ सालापासून चालविला होता, असें मानण्यास आधार आहे. लोकांच्या बौद्धिक व मानसिक रोगांकरितां जसे ते 'प्रभाकर'मध्यें लेखांच्या द्वारें औषधोपचार करीत, त्याच-प्रमाणें लोकांच्या शारीरिक व्याधींकरितां घरीं औषधें देत. पुढें पुढें बाहेर कोठें जावयाचें झालें तर बरोबर एक गडी असे.

"त्याच्या खांद्यावर डाळचुरमुऱ्याचें एक पोतें व खारकांचें एक गाठोडें, मलमाचा एक मोठा डबा व थोड्याशा मलमपट्ट्या, इतकें सामान असे. कोठेंही रस्त्यांत आंधळा पांगळा दृष्टीस पडला कीं, त्यास थोडेसे चुरमुरे व एखादीदुसरी खारीक द्यावयाची व पाहून पाहून पैसाही त्यापुढें टाकावयाचा. पण सर्वांपेक्षां, दुखणेकरी पाहिला कीं, स्वारी उभी राहिलीच. मग त्याला काय होतें याची चौकशी करून औषध जवळ असल्यास द्यावयाचें नाहींतर बरोबर छापील कार्डस असत त्यांपैकीं एक त्याजपाशीं देऊन त्याला घराकडे ये म्हणून सांगावयाचें. महारोगी पाहिला कीं, रावबहादूर थांबलेच, त्यांना रोग्याची किळस म्हणून कधीं येत नसे. ते त्याच्या पट्ट्या त्याजकडून काढवून जखमा पाहात व त्यावर मलम लावावयास देऊन लगेच पट्ट्या बांधीत व अन्न वगैरे नेण्यासाठीं घरीं ये म्हणून सांगत. हा त्यांचा नित्यक्रम असे."

रा. आठल्ये यांनीं हें त्यांचें केलेलें वर्णन निराधार किंवा अतिशयोक्तीचें नसावें. गोपाळरावांच्या स्मारकसभेंत, स्मारकासाठीं जी कमिटी नेमिली होती, तिचे सेक्रेटरी रा० व० महादेव गोविंद रानडे होते. त्या सभेची हकीकत देऊन पुढें ज्ञानप्रकाशचे संपादक लिहितात,

"देशमुखांचें स्मारक म्हणून दवाखाना जिकडून तिकडून होणें इष्ट आहे असे अनेकांचे उद्गार निघत आहेत, व तसें होणें चांगलें असें आमचें मत आहे. देशमुखांच्या हयातींत त्यांणीं रोगी व अशक्त यांचा फार समाचार घेतला. त्यांचेविषयीं त्यांना अतिशय कळकळ व प्रेम असे. गरीबगुरीब लोक

औषधावांचून, आयुष्य असतांना विनाकारण मरतात असें ते म्हणत व त्यांचेकरितां ते फार कळवळा बाळगीत, हें आम्हांस माहीत आहे. ह्या स्मारकाचा फार मोठा व कीर्तिप्रसार होण्यासारखा सदुपयोग होईल." (*ज्ञानप्रकाश*, ३०-११-१८९२).

जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥

हे तुकारामाचे उद्गार गोपाळरावांच्या बाबतींत यथार्थ वाटतात.

गोपाळरावांचा वंशविस्तार

गोपाळरावांच्या पत्नी सौ. गोपिकाबाई यांचा निर्देश वर आलाच आहे. त्या १८८५ सालीं दिवंगत झाल्या. त्यांना सहा मुलगे व दोन मुली होत्या.

मुलगे—

१. गणपतराव, वडील मुलगा (१८४५–८५)–हे गुजरातेंत फौजदार होते. वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्याशीं पटण्यासारखें नसल्यामुळें त्यांनीं बाणेदारपणें नोकरीचा राजीनामा देऊन मोकळे झाले. कोणी वंशज नाहीं.

२. कृष्णराव (१८४७-१८८२)–हे विलायतेला जाऊन बॅरिस्टर होऊन आले. गुजरातेंत डिस्ट्रिक्ट जज्जाच्या जागेवर होते. यांचे नातू विश्वनाथ माधव, वकील (पुणें) हे विद्यमान असून त्यांना मुलेंबाळें आहेत.

३. रामचंद्र (१८४९-१८८९) बी. ए., एल्एल्. बी. बडोद्याला सरसुभे होते. वंश चालू नाहीं.

४. रघुनाथ (१८५१–१८९९) बी. ए. मुंबई हायकोर्टांत इंटरप्रीटर. वारकरी पंथाचे केशवराव देशमुख हे यांचे चिरंजीव. वंश चालू नाहीं.

५. डॉ. मोरेश्वर (१८५५–१९२६) एम्. डी. हे वैद्यकीय ज्ञानाबद्दल व सार्वजनिक कार्याबद्दल प्रख्यात होते यांचे एक चिरंजीव रा. नरहरपंत विद्यमान आहेत. मुलें आहेत.

६. लक्ष्मणराव, धाकटे, (१८५८–१९४६) हे कलेक्टर आणि अक्कलकोटचे पोलिटिकल एजंट होते. यांनीं 'नीचोच्चजातिविवाह नाटक' (१९११),

'प्रौढ विधवा विवाह नाटक' (१९१०) व 'मयूरवामन काव्य–अन्यदर्शन' भा. १ (१९१४), भा. २ (१९१६) अशीं पुस्तकें लिहिलीं आहेत. यांना तीन मुलगे व एक कन्या. मुलगे—(१) गणेशराव एलएल. बी., ठाण्यास हेडमास्तर; (२) डॉ. गोपाळराव हे आपले चुलते डॉ. मोरेश्वर यांना कांहीं वर्षे मदत करीत होते. आतांही तोच व्यवसाय चालवितात. यांना मुलें आहेत; (३) नारायणराव, इंजीनियर (विद्यमान). लक्ष्मणरावांची कन्या कृष्णाबाई (सांगलीचे वकील रा० गणपतराव अभ्यंकर यांच्या पत्नी) या 'लक्ष्मीतनया' या टोपणनांवाखालीं 'विविधज्ञानविस्तारांत' कविता लिहीत.

मुली—

१. येसूबाई (–१८८९). मंगळवेढ्याचे जहागीरदार पटवर्धन यांना दिल्या होत्या.

२. द्वारकाबाई (–१८९२). बडोद्याचे जहागीरदार चिंतामणराव मुजूमदार हे त्यांचे पति.

गोपाळ हरि देशमुखकृत ग्रंथसंभार

गोपाळरावांचें स्वतःचें मूळ नांव ज्याच्यावर आहे, असा ग्रंथ मीं पाहिलेला नाहीं. त्यांचे बहुतेक सर्व ग्रंथ निरनिराळ्या टोपणनांवाखालीं प्रसिद्ध झाले आहेत. ग्रंथसूचींमध्यें दोनतीन सामान्य पुस्तकें त्यांच्या मूळ नांवाखालीं आढळतात. तें नांव सूचिकारानें सूचींत स्वतः दिलें असावें, किंवा प्रकाशकानें लेखकाच्या गैरहजिरींत पुस्तकावर घातलें असावें.

त्यांच्या ग्रंथांच्या खालील यादींत उपलब्धिस्थानांचे जे संक्षेप दिले आहेत, त्यांचा खुलासा पुढीलप्रमाणें आहे:—

गु० वि० (गुजराथ विद्यासभा, अमदाबाद); **ग्रँ० कॅ०** (ग्रँटचा मराठी ग्रंथाचा कॅटलाग, १८६७); **दाते** (शं. ग. दाते यांची मराठी ग्रंथसूचि १९४३); **पु० प्रा० ग्रं०** (पुणें प्रादेशिक मराठी ग्रंथालय); **पु० वि०** (पुणें विद्यापीठ); **प्रि०** (अ० का० प्रियोळकर, खासगी संग्रह); **ब्रि० म्यु०** (ब्रिटिश म्युझियममधील मुद्रित मराठी ग्रंथाचा कॅटलाग, १८९२, १९१५); **मुं० ग्रं०** (मुंबई मराठी लग्रंथसंग्रहाय); **मुं० वि०मुंबई** (विद्यापीठ); **सा०** श्रीराम वा० मं०, सावंतवाडी.

[१]

१ *महाराष्ट्र देशांतील थोर लोक ह्यांशीं संभाषण* (ले. 'थोर लोकांचें कल्याण चिंतणारा') पाठशाळेकडील छा० (शिळा) पुणें १८४८, पृष्ठें ३१.

["गुणवर्धन करावें विद्या मिळवावी इ. बोध" यांत आहे. हें पुस्तक गोपाळरावांचें असावें, याबद्दल खात्री वाटते.] दाते

२ *महाराष्ट्र दशांतील कामगार लोकांशीं संभाषण* (प्रथमावृत्ति). *कामगार लोकांशीं संभाषण* (द्वितीयावृत्ति), ज्ञानप्रकाश पुणें १८५३.

[प्रथमावृत्ति उपलब्ध नाहीं. ती असती तर तीवर कदाचित् क्रमांक १ पुस्तकाचा कर्ता म्हणून नांव सांपडलें असतें. त्याच्या दुसऱ्या आवृत्तीची नोंद ग्रँटच्या कॅटलागमध्यें आहे. क्र० २ 'लक्ष्मीज्ञान' या पुस्तकावर कर्ता म्हणून या पुस्तकाचें नांव दिलें आहे त्यावरून या पुस्तकाचें अस्तित्व आणि कर्तृत्व सिद्ध होतें.] ग्रँ. कॅ.

लांच खाण्याचे वाइर्ट परिणाम—आ० नवी (ले० लोकहितवादी) नेटिव ओपीनियन, मुंबई १८८०. दाते

['ही कामगार लोकांशीं संभाषण' याची नवी आवृत्ति दिसते.]

३ *लक्ष्मीज्ञान*—(ले. 'महाराष्ट्रदेशांतील कामगार लोकांशीं संभाषण' या ग्रंथाचा कर्ता) ज्ञानप्रकाश (शिळा), पुणें १८४९. सा०, पु. प्रा० ग्रं०

४ *पंदनामा* (सादीच्या ग्रंथावरून)—(ले० 'लक्ष्मीज्ञान' कर्ता) ज्ञानप्रकाश (शिळा), पुणें १८५०. पु० प्रा० ग्रं०

५ *यंत्रज्ञान*—(ले० 'पन्दनाम्या'चें भाषांतर करणारा) ज्ञानप्रकाश (शिळा), पुणें १८५० . सा०, पु० प्रा० ग्रं०

६ *सरकारचे चाकर आणि सुखवस्तु हिंदुस्थानांतील साहेबलोकांशीं संभाषण*—(ले० .....) ज्ञानप्रकाश (शिळा) पुणें १८५०. सा०

[लेखक स्वतः सरकारी नोकर असल्यामुळें नांव घातलें नसावें.]

७ **पुष्पवन** (गुलिस्तानावरून) —(ले० 'यंत्रज्ञान' वगैरे ग्रंथांचा कर्ता) ज्ञानप्रकाश (शिळा), पुणें १८५१. सा०, पु० प्रा० ग्रं०

८ होळीचे दुराचारनिषेधनिबंध—

[पुस्तक उपलब्ध नाहीं. पण क्र. ९ वरून या पुस्तकाचें अस्तित्व कळून येतें. अन्यत्र जाहिरातींतही हें नांव आहे.]

९ *शब्दालंकार* (ले. १ कामगार लोकांशीं संभाषण, २ लक्ष्मीज्ञान ३ फारसी पन्दनाम्याचें महाराष्ट्र भाषेंत भाषांतर, ४ यंत्रज्ञान, ५ फारसी गुलिस्तानाच्या आठव्या अध्यायाचें भाषांतर, ६ होळीचे दुराचार निषेध-निबंध इत्यादि ग्रंथांचा कर्ता) ज्ञानप्रकाश (शिळा), पुणें १८५१. सा०

१० **भरतखंड पर्व**—(ले. 'शब्दालंकार' नामक ग्रंथकर्ता) ज्ञानप्रकाश (शिळा), पुणें १८५१. **प्रि०, सा०**

११ *खोटी शपत वाहूं नये आणि खोटी साक्ष देऊं नये याविषयीं लोकांशीं संभाषण*—(ले. 'भरतखंडपर्वा'चा कर्ता) ज्ञानप्रकाश (शिळा), पुणें १८५१. सा०

[२]

१ *वेदांविषयीं* (ले० एक स्वदेशहितेच्छु) इंदुप्रकाश, मुंबई १८६३ पृ० ४ + ३२.[मार्तिन हौगच्या इंग्रजी निबंधाचें भाषांतर], मुं० वि०, पु०प्रा० ग्रं०

२ *डाक्तर मार्तिन हौग, पुणें विद्यालयांतील संस्कृत विद्येचे मुख्य गुरु, यांच्या 'ब्राह्मणवर्णाचें मूळ' या विषयावरील व्याख्यानाचें आणि वेदांवरील द्वितीय व्याख्यानाचें भाषांतर* (ले० एक स्वदेशहितेच्छु) इंदुप्रकाश, मुंबई १८६४, पृ० २ + ४८. पु० प्रा० ग्रं०

३ *ब्राह्मणकन्याविवाहविचार* (ले० एक स्वदेशहितेच्छु) इंदुप्रकाश, मुंबई, १८६४, पृ० २८. सा०, पु० प्रा० ग्रं०

४ *पुरुषसूक्तव्याख्या* (ले० स्वधर्महितेच्छु) इंदुप्रकाश, मुंबई १८६४. पु० प्रा० ग्रं०

गोपाळराव देशमुख यांनीं 'इंदुप्रकाश'ची स्थापना १८६२ सालीं केली. यावेळीं त्यांचें वास्तव्य मुंबईंत होतें. गोपाळराव हे स्वतःचें नांव त्यांच्या

पुस्तकांवर घालीत नसत. 'प्रभाकरां'तील पत्रांकरितां 'लोकहितवादी' असें टोपण नांव त्यांनीं धारण केलें. ज्ञानप्रकाश प्रेसमध्यें प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांवर, आधीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांचा कर्ता, असें नांव ते घालीत असत हें आपण पाहिलेंच आहे. 'स्वदेशहितेच्छु' हा 'लोकहितवादी' याचाच पर्याय दिसतो. अहमदाबादेस त्यांच्या प्रेरणेनें निघालेल्या गुजराती-इंग्रजी वृत्तपत्राचें नांव 'हितेच्छु' असेंच होतें. या सुमारास आधीं ते मुंबईंत हिंदु कायद्याचा सारग्रंथ (Digest) तयार करीत होते. या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे वरील चारही पुस्तकांचें कर्तृत्व गोपाळराव देशमुखांकडे असावें असें वाटतें. चौथें पुस्तक धर्मपर असें असल्यामुळें 'स्वधर्महितेच्छु' असें नांव घातलें असणें शक्य आहे.

हिंदु व मुसलमान धर्मांचा सारग्रंथ (Digest) करतांना त्यांनीं इतर धर्मांचाही तुलनात्मक अभ्यास केला. पुढें अहमदनगरास त्यांची बदली झाल्यावर तिकडील 'वृत्तवैभव' वृत्तपत्रांत यासंबंधी कांहीं लेख लिहिले. 'ब्राह्मणांची मूळ-पीठिका' या मथळ्याखालीं ता. २९ नोवेंबर १८६४ च्या 'वृत्तवैभवां'त त्यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे (प्रस्तुत ग्रंथ, पृ. ३४४ पहा). हौगच्या ग्रंथाचें तें 'हंशील' असल्याचा त्यांनीं उल्लेख केला आहे, हें वरील क्र. २ पुस्तकाच्या संदर्भांत लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आठल्ये यांनीं 'हिंदुस्थानांतील बालविवाह' नांवाचा त्यांचा ग्रंथ पाहिल्याचा निर्देश केला आहे. (आठल्येकृत *'लोकहितवादी यांचें चरित्र'*, पृ. १६७).

हें 'ब्राह्मण-कन्या-विवाह' पुस्तक विष्णु परशारामशास्त्री पंडित यांचें असल्याचा निर्देश प्रा. सु. आ. गावस्कर यांनीं 'मराठी दोलामुद्रितें' (१९६१ पृ. ११०) या ग्रंथांत केला आहे. विष्णुशास्त्री पंडित यांचा 'इंदुप्रकाश' पत्राशीं संपादकीय संबंध प्रथम नव्हता. त्यांचें चरित्र श्री. स. पंडित यांनीं लिहिलें आहे (पुणें १९३६). १८६३ पर्यंत वि. प. पंडित 'पुणें शाळापत्रक' चालवीत होते. पुण्याहून त्यांची बदली धारवाड येथील इंग्रजी शाळेचे मुख्याध्यापकाच्या जागीं झाली आणि आगष्ट १८६३ सालीं ते मालेगांव (खानदेश) येथें बदलले गेले आणि तिकडून १८६४ च्या सुमारास ते राजीनामा देऊन मुंबईस आलेले दिसतात. यापूर्वीं 'इंदुप्रकाश'चे पुणें येथील मुनीम म्हणून त्यांचा २२ सप्टेंबर १८६२ पासून संबंध होता.

विष्णुशास्त्री पंडितांचीं पुस्तकें त्यांच्या नांवानेंच प्रसिद्ध होत असलेलीं

दिसतात. या पुस्तकांवर 'एक स्वदेशहितेच्छु' किंवा 'स्वधर्महितेच्छु' असें टोपणनांव धारण करण्याची त्यांना मुळींच गरज दिसत नाहीं.

प्रो. गावस्कर यांना विचारतां 'ब्राह्मण-कन्या-विवाह' हें पंडितांचें पुस्तक असल्याबद्दल त्यांना आधार देतां आला नाहीं. 'विष्णु परशुराम पंडित यांचें चरित्र' (ले. श्री. स. पंडित, पुणें १९३६) या पुस्तकांत 'पंडितांची वाङ्मय-सेवा' या यादींत या 'एक स्वतेशहितेच्छू'च्या एकाच पुस्तकाचा समावेश आहे. ही यादी तर्काधिष्ठित दिसते. ती विश्वसनीय नाहीं. पंडितांचा 'विधवा-विवाह' (ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या ग्रंथाचें भाषांतर) या पुस्तकाचा प्रकाशन-काल १८६४ दिला आहे, पण तो वास्तविक १८६५ आहे. या पुस्तकावर व यापूर्वी १८५९ व १८६१ सालीं प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या पुस्तकांवर पंडितांचें स्वतःचें मूळ नांव आहे. टोपणनांव नाहीं. चित्रावशास्त्री यांनींही आपल्या अर्वाचीन चरित्रकोशांत 'ब्राह्मण-कन्या-विवाह' याचें कर्तृत्व पंडितांना दिलें आहे, तें श्री. स. पंडितलिखित उपरिनिर्दिष्ट चरित्राच्या आधारें असावें.

वरील पुस्तकें विष्णुशास्त्री पंडितांचीं आहेत असा सबळ पुरावा जोंपर्यंत पुढें आला नाहीं, तोंपर्यंत तीं गोपाळराव देशमुखांचीं आहेत, असें मानण्यास हरकत दिसत नाहीं.

[३]

१ *लोकहितवादीकृत निबंधसंग्रह* (प्रथमांश), वृत्तवैभव प्रेस (शिळा), अहमदनगर १८६६. गु० वि०, पु० वि०

[४]

१ *निगमप्रकाश* (गुजराती) वैदिक धर्मनो खुलासो. (ले० 'लोकहित-वादी निबंधसंग्रहकर्ता') समशेर बाहादूर छा०, अहमदाबाद १८७४.
मुं० वि०, गु० वि०

२ (१) *आगमप्रकाश* (गुजराती) एटले तांत्रिक धर्मनो खुलासो, (ले० 'निगमप्रकाशकर्ता') समशेरबहादूर छा०, अमदाबाद १८७४. गु० वि०

२ (२) *आगमप्रकाश* (लोकहितवादीकृत) वरील गुजराती पुस्तकाचा मराठी भाषांतरकार—के. रघुनाथजी, फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई १८८४.

[मुखपृष्ठ व प्रस्तावना इंग्रजींत]. मुं० म० ग्रं०

मूळ लेखकानें प्रस्तुत भाषांतर काळजीपूर्वक वाचून सूचना केल्या व त्यांत पुष्कळ भर घातली, असें प्रस्तावनेंत नमूद आहे. मूळ गुजराती पुस्तकांतील लेखकाची १८ पृष्ठांची प्रस्तावना यांत गाळली आहे. मूळ पुस्तकांत संस्कृत श्लोकांचा अर्थ दिला नव्हता; यांत विठ्ठलशास्त्री तारळेकर यांच्या मदतीनें ते श्लोक शुद्ध करून त्यांचा मराठी भावार्थही दिला आहे.

'आगमप्रकाश' हें मराठी पुस्तक पुष्कळांना गूढ होऊन राहिलें होतें; कारण यांतील १–४० पृष्ठांवर 'निगमप्रकाश' असें नांव असून, पुढें शेवटपर्यंत 'आगमप्रकाश' असें नांव पृष्ठांवर सांपडतें. 'भाग १ ला'वर 'निगमप्रकाश' असा मथळा असून 'भाग २ रा' वर 'आगमप्रकाश' असा मथळा आहे, त्यामुळें लेखकाच्या मूळ दोन गुजराती पुस्तकांचें हें एकत्रित मराठी स्वरूप नसेल ना, अशी शंका घेण्यास जागा झाली होती; परंतु हें 'आगमप्रकाशा'चेंच मराठी भाषांतर आहे. अमदाबाद येथील 'आगमप्रकाशा'ची गुजराती प्रत आणि गुजराती 'निगमप्रकाश' व मराठी 'आगमप्रकाश', अशीं तीनही पुस्तकें समोर ठेवून येथें खरा प्रकार मांडला आहे.

[५]

१ *हिंदुस्थानास दरिद्र येण्याचीं कारणें*—(ले. लोकहितवादी) इंदुप्रकाश, मुंबई १८७६. प्रि०

२ *कलियुग*—(ले० लोकहितवादी) एशियाटिक, मुंबई १८७७. [मुंबई आर्यसमाजांतील भाषण]. दाते

३ *भिक्षुक*—(ले० लोकहितवादी) सूर्योदय, ठाणें १८७७. [मुंबई आर्यसमाजांतील भाषण]. प्रि०

४ *पानपतची लढाई*—(ले० लोकहितवादी) सूर्योदय ठाणें १८७७. दाते

५ *प्राचीन आर्यविद्या व रीति या विषयावर भाषण*—(ले० गो. ह. देशमुख) सत्यसदन, अलिबाग १८७७. ब्रि० म्यु०

६ *जातिभेद*—(ले० गो० ह० देशमुख) सूर्योदय, ठाणें १८७७. दाते.

७ *ऐतिहासिक गोष्टी* भा० १ ला—(ले० लोकहितवादी) १८७७. ब्रि० म्यु०

ऐतिहासिक गोष्टी—भा. १, आ० २ री (ले० लोकहितवादी) चित्रशाळा (शिळा), पुणें १८८४.

ऐतिहासिक गोष्टी—भा० २, नाशिकवृत्त, नाशिक १८७८. मुं० ग्रं०

ऐतिहासिक गोष्टी—भा० २, आ० २ री, किताबखाना (शिळा), पुणें १८८५. दाते

ऐतिहासिक गोष्टी (भा. ३ रा) व उपयुक्त माहिती—नाशिकवृत्त, नाशिक १८८०. मुं० ग्रं०

ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती—भा० १, आ० २ री, निर्णय-सागर, मुंबई १८९२. ब्रि०

ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती, भा० १, आ० ३ री, निर्णयसागर, मुंबई १९०८. ब्रि० म्यु०

ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती—भा० २ (द्वितीयावृत्ति) निर्णय-सागर, मुंबई १८९३. मुं० ग्रं०

८ *गीतातत्त्व*—(ले० लोकहितवादी) नाशिकवृत्त, नाशिक १८७८. मुं० ग्रं०

९ *बोधपत्र*—(ले० लोकहितवादी) सूर्योदय, ठाणें १८७८. ब्रि०

१० *सुभाषित अथवा बोधवचनें*—(ले०) सूर्योदय, ठाणें १८७८. मुं० ग्रं०

सुभाषित अथवा सुबोधवचनें—निर्णयसागर, मुंबई १८९१. दाते

११ *हिंदुस्थानचा इतिहास*—पूर्वार्ध (ले० लोकहितवादी) सूर्योदय, ठाणें १८७८. मुं० वि०

[६]

१ सार्थ आश्वलायन गृह्यसूत्र—(ले० लोकहितवादी) नेटिव ओपिनियन, मुंबई १८८०. पु० प्रा० ग्रं०

सार्थ आश्वलायन गृह्यसूत्र—(ले० लोकहितवादी) निर्णयसागर मुंबई १९१५.

[या दुसऱ्या आवृत्तींत, पहिल्या आवृत्तींतील ५६ पृष्ठांची महत्त्वपूर्ण प्रस्तावना गाळिली आहे]. मुं० ग्रं०

२ ग्रामरचना, त्यांतील व्यवस्था आणि त्यांची हल्लींची स्थिति, श्रीशिवाजी, पुणें १८८३.

['लोकहितवादी' मासिकांतून मूळ प्रसिद्धि]. प्रि०

३ दिल्लीचा शेवटचा क्षत्रिय महाराज पृथ्वीराज चव्हाण, श्रीशिवाजी, पुणें १८८३.

['लोकहितवादी' मासिकांतील एकत्र बांधलेलीं वेगळीं पानें]. मुं० ग्रं०

पृथ्वीराज चव्हाण (आ० २ री) निर्णयसागर, मुंबई १८९१.

पृथ्वीराज चव्हाण (आ० ३ री).

पृथ्वीराज चव्हाण (आ० ४ थी) निर्णयसागर, मुंबई १९२१. मुं० वि०

४ राजस्थानचा इतिहास, श्रीशिवाजी, पुणें १८८३.

['लोकहितवादी' त्रैमासिकाच्या पहिल्या अंकांत मूळ प्रसिद्धि].

५ उदेपूरचा इतिहास—श्रीशिवाजी, पुणें १८८३.

['लोकहितवादी' मासिकाच्या दुसऱ्या अंकापासून क्रमशः मूळ प्रसिद्धि].

उदेपुरचा इतिहास, श्रीशिवाजी, पुणें १८९२.

[अनुक्रमणिकेंत प्रथम चार भाग 'राजस्थान'च्या इतिहासाचे व पुढील भाग 'उदेपुर'च्या इतिहासाचे असे वेगळे दाखविले आहेत. प्रत्यक्ष पुस्तक 'उदेपुर'च्या इतिहासानें सुरू होतें. वरील क्र० ३ व क्र० ४ एकत्र बांधण्याचा प्रथम विचार असावा; पण क्र० ३ चे फार्म संपल्यामुळें केवळ क्र० ४ चे फार्म १८९२ सालीं प्रसिद्ध केलेले दिसतात]. मुं० वि०

राजस्थानचा इतिहास – उदेपूर (आ० २ री) निर्णयसागर, मुंबई १८९४.
मुं० वि०

[वरील क्र० ३ व ४ एकत्र].

६ *गुजराथ देशाचा इतिहास*—श्रीशिवाजी, पुणें १८८५.
[लोकहितवादी मासिकांतील एकत्र बांधलेलीं सुटीं पानें]. मुं० ग्रं०

गुजराथ देशाचा इतिहस—(आ० २ री) निर्णयसागर, मुंबई १८९४.
मुं० वि०, प्रि०

७ *लंकेचा इतिहास*—श्रीशिवाजी, पुणें १८८८. मुं० ग्रं०

८ *सुराष्ट्र देशाचा ससाक्ष इतिहास*—श्रीशिवाजी, पुणें १८९१. मुं० ग्रं०

[७]

याशिवाय 'स्वामी दयानंद सरस्वती', 'स्थानिक राज्यव्यवस्था' अशीं पुस्तकें 'लोकहितवादी' मासिकांत प्रसिद्ध झालीं आहेत आणि त्यांच्या वेगळ्या प्रती बांधून विक्रीस ठेवल्या असल्याचा निर्देश, आणि 'ज्ञातीविषयीं संभाषण', 'स्वदेशीय राज्यें—', 'सौभाग्यरत्न', 'समाधान' अशा त्यांच्या पुस्तकांचा उल्लेख, जाहिरातींत सांपडतो; पण पुस्तकें छापलेलीं दिसत नाहींत. याशिवाय "लोकहितवादींनीं **छापून प्रसिद्ध केलेले**" व "आमच्या पाहाण्यांत आलेले" म्हणून रा. आठल्ये ज्या ग्रंथांची यादी देतात तीं पुस्तकें :

(१) 'विद्यालहरी', (२) एका दिवसांत लिहिलेलें पुस्तक, (३) 'हिंदुस्थानांतील बालविवाह' (*'लोकहितवादी यांचें चरित्र'* पृ. १६७).

वरील पुस्तकांचा पुढें जास्त तपशील आठल्ये देतात तो असा :—

(१) "'*विचार* [विद्या ?] *लहरी*'—हेंही एक मोठें प्रकरण असून त्यांत अनेक विषयांवर सामाजिक व राजकीय बाबींवर स्फुट लेख आहेत."

(२) "*एका दिवसांत लिहिलेलें* **पुस्तक**—रविवारच्या एका सुट्टींत ता. १ जून सन १८४९ मध्यें लिहिलेलें हें एक पुस्तक आहे. ह्या प्रतीवर 'ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापलें', असें लिहिलेलें आहे." ही कदाचित् प्रेसकॉपी असावी.

(३) "इंग्रजी भाषेंतील 'The Child Marriage in India' हा एक मोठा थोरला इंग्रजींत लिहिलेला ग्रंथ आहे."

वरील तीनही पुस्तकें हस्तलिखित असावींत असें वाटतें. गोपाळरावांनीं संपूर्ण किंवा अर्धवट लिहिलेल्या अप्रकाशित पुस्तकांपैकीं 'नाशिकवर्णना'चा निर्देश मागें आलाच आहे. याशिवाय आणखीही त्यांचे अप्रकाशित ग्रंथ होते, असें दिसतें. रा. आठल्ये त्यांच्या चरित्राच्या प्रस्तावनेंत (पृ० ५) लिहितात :

"कागदपत्रांचा संग्रह इतका विपुल पाहावयास मिळाला कीं, त्यामुळें किती लिहावें आणि काय लिहावें असें आम्हांस होऊन गेलें. *बरेच लिहिलेले ग्रथं छापावयाचे राहिले होते ते वेगळे काढले. ह्याशिवाय फुटकळ लेख होते त्यांचीही विषयवारी लावली.* अण्णासाहेबांच्या विलायतेहून आलेल्या पत्रांची फाइल, शामजी कृष्णवर्माचीं पत्रें, संस्थानिकांचीं पत्रें, युरोपियन अमलदारांचीं पत्रें हीं सर्व महत्त्वाचीं आहेतच, पण त्यांच्या प्रत्येक मुलाचीं पत्रेंही फार वाचण्यासारखीं आहेत. त्या सर्वांचीं ३१ दप्तरें अनुक्रमणिकेसहवर्तमान तयार करून ठेविलीं."

उपरिनिर्दिष्ट पत्रव्यवहारांत कोणाकोणाचीं पत्रें होतीं याची जशी नामावलि आठल्यांनीं दिली आहे (पृ० १४०–१४१), तशी लोकहितवादींच्या या अप्रकाशित ग्रंथांची व लेखांची यादी दिली असती तर बरें झालें असतें. नाहीं म्हटल्यास 'शिल्लक असलेले हस्तलेख' या सदराखालीं, "ह्यांत 'इंग्लिश कारकीर्दीचा इतिहास' हा ग्रंथ मोठा असून ओतप्रोत व अनुभविक माहितीनें भरलेला आहे. ह्याशिवाय अनेक विषयांवरील टांचणें तर अनेक आहेत. त्यांत संस्कृत शास्त्रार्थ इंग्रजी उतारे वगैरे अनेक नव्यानव्या गोष्टींचा समावेश केला आहे," (पृ० १७९) असें ते लिहितात. गोपाळरावांनीं आत्मचरित्रही लिहून ठेवलें होतें, असा पुष्कळांनीं निर्देश केला आहे. ता. ३० नोवेंबर १८९२ च्या अग्रलेखांत रा० ब० देशमुखांच्या स्मारकसभेसंबंधीं लिहितांना 'ज्ञानप्रकाश'कार लिहितात : "त्यांणीं स्वतः आपलें चरित्र फार सुंदर रीतीनें लिहून ठेविलें आहे. तें त्यांच्या पुत्रत्रयानें प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केल्यास त्यापासून अनेक सुबोधाच्या आणि महत्त्वाच्या गोष्टी नव्या पिढीस कळण्यासारख्या आहेत."

हें आत्मचरित्र रा० आठल्यांना मिळालें नव्हतें. हें आत्मचरित्र म्हणजे गोपाळरावांचे नातू कै० माधवराव देशमुख (पुणें) यांच्या संग्रहीं एकेकाळीं

असलेलें आणि १९४८ च्या पावसाळ्यांत घर कोसळल्यामुळें अखेर मातीला मिळालेलें "माझ्या आयुष्यांतील प्रसंग" असावें हें उघड दिसतें. ('*आलमगीर*' –दिवाळी अंक, १९६५ यांतील प्रा० न० र० फाटक यांचा लेख पहा).

गोपाळराव देशमुख यांच्याएवढा विविध विषयांवर लिहिणारा प्रचंड ग्रंथकार त्या काळीं मराठींत दुसरा झाला नसावा.

धर्मविषयक मतें

गोपाळराव हिंदुधर्माचे अभिमानी होते. कोतवालीच्या कामावर नेमलेल्या कांहीं ब्राह्मणांची वर्तणूक चांगली नाहीं अशी सबब पुढें करून त्या जागेवर यापुढें ब्राह्मण न नेमतां क्रिस्ती माणूस नेमावे, असें इंग्रज अधिकाऱ्यांनीं ठरविल्यामुळें ब्राह्मणांच्या कैवारानें त्यांनीं प्रथम आपली लेखणी उचलली आणि 'प्रभाकर' पत्रांत (१९ मार्च १८४८) पहिलें पत्र लिहिलें. पण पुढें ब्राह्मण जातीवर त्यांनीं एकसारखे जोराचे हल्ले चढविलेले दिसून येतात. याचें कारण "ब्राह्मणांचें दोषविवेचन मीं फार केलेलें आहे. याचें कारण आमचे लोकांत मुख्य ब्राह्मण; ते जें करतील तसे इतर वर्ततात. म्हणून ब्राह्मणांचे सुधारणुकेस्तव मी झटतों, त्यांची सुधारणा झाली म्हणजे हिंदु लोकांची जाहाली," असें त्यांनीं दिलें आहे (पत्र ६५, पृ० १६३). जुन्या काळीं विद्या संपादनाकरितां ब्राह्मण रानांत जाऊन बसत, त्यांचा योगक्षेम चालविणें योग्य होतें (पृ० १८१); पण आतां ब्राह्मण गांवांत येऊन पैशाकरितां इतर वाटेल तो रोजगार करतात, (पृ०४६), "कितीएक रांडांच्या मागें तबले वाजवितात," (पृ. ४५), फुकट पोट भरावें म्हणून अर्थ कळल्याशिवाय चार अक्षरें पाठ करतात (पृ. ३७), असें त्यांनीं वारंवार लिहिलें आहे. "आतां ज्ञान सर्व ज्ञातींत प्रसृत झालें आहे. म्हणून आतां....ब्राह्मण व इतर जात सारखीच होईल. जो विद्वान तोच ब्राह्मण; जो शूद्राचें आचरण करतो तो ब्राह्मण कशाचा?" असा त्यांचा सवाल होता (पृ. ३५). धर्माची भाषा म्हणून संस्कृत अवश्य शिकावी (पृ. १७२); पण आपल्या ज्ञानाची प्रगति दीड–दोन हजार वर्षांत थांबली आहे (पृ. ५४), "जर हे लोक खरी विद्या म्हणजे ज्ञानाचा शोध करावयाचा तो करिते, तर इंग्रज इकडे येण्याचे पूर्वीं आम्हींच त्यांच्या देशांत कां गेलों नसतों?" (पृ. २४७) असें ते विचारतात. यावरून त्यांची तळमळ दिसून येईल. ब्राह्मणांवर जे त्यांनीं

कोरडे ओढले ते त्यांची सुधारणा व्हावी आणि इतर जातींना त्यांनीं सन्मार्गावर आणावें म्हणून ओढले होते. ब्राह्मणांवर टीका करण्यांत त्यांच्या कल्याणाचीच गोपाळरावांची इच्छा कशी होती, हें ज्यांना पाहावयाचें असेल त्यांनीं या पुस्तकांतील विशेषतः नंबर १६८ व १७१ हे निबंध जरूर वाचावे. रामदासांनींदेखील ब्राह्मणांच्या दुःस्थितीबद्दल खेदोद्गार काढले आहेत, त्यांचा हेतु हाच होता. परंतु रामदासांप्रमाणें,

"ब्राह्मणा सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडें किती ॥
जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ॥ १५ ॥"

(—दासबोध, द० ५, स० १).

अशी गोपाळरावांची संकुचित दृष्टि नव्हती. ब्राह्मण–अब्राह्मण या बाबतींत ते समदर्शी होते. शंभरसवाशें वर्षांमागें इतकी भेदातीत मनाची वृत्ति पाहून त्यांचें नवल वाटतें.

स्वतः त्यांचा नित्यक्रम कर्मठ ब्राह्मणासारखा होता. ता. १२ माहे १८९२ च्या अंकांत 'ज्ञानप्रकाश'कारांनीं जो अग्रलेख लिहिला आहे, त्यांत त्यांच्या शेवटच्या आजाराचें वर्णन करतांना "या आजारापणामुळें काय ती दोनच दिवस त्यांची पार्थिव पूजा अंतरली," असें म्हटलें आहे. हिंदुधर्म व समाज यांच्यामध्यें सुधारणा घडवून आणण्याच्या बुद्धीनें त्यांनीं प्रार्थनासमाज, आर्यसमाज, थिऑसफी वगैरे धार्मिक चळवळींमध्यें भाग घेतला. अमदाबाद व नाशिक येथें प्रार्थनासमाज स्थापन करण्यांत त्यांचें अंग होतें याचा निर्देश वर आलाच आहे. 'ज्ञानप्रकाश'कार त्यांच्या मृत्यूची माहिती देतांना लिहितात,

"देशमुखांचें मृत्युवृत्त डा. भांडारकर यांस प्रार्थनासमाजांत समजलें. तेव्हां त्यांनीं तेथें त्याच विषयावर उपदेश करून मनुष्याचें कर्तव्य काय याचें प्रतिपादन केलें. आणि नंतर प्रार्थनासमाजांतली सर्व मंडळी स्मशानांत आली. तेथें डा. भांडारकरांनीं देशमुखांच्या पितृदुःखी पुत्रांचें सांत्वन करितांना म्हटलें, 'आज एका पूज्य व मान्य अशा वृद्ध पुरुषाचा अवतार संपला ! देशमुखसाहेब देशसुधारकांतील अग्रणी होते,' वगैरे. सोमवारीं सायंकाळीं देशमुखांच्या घरीं डा० भांडारकर, रा० ब० रानडे व प्रो० केळकर प्रभृति गृहस्थ जमून त्यांनीं प्रार्थनासमाजाचे रीतीप्रमाणें मृतासाठीं

उपासना केली. देशमुख हे प्रार्थनासमाजाचे एक सभासद होते हें सर्वांस माहीत आहेच." (अग्रलेख, १२ अक्टो. १८९२).

स्वामी दयानंदांनीं आर्यसमाजचळवळीचें ज्यावेळीं शिंग फुंकलें, त्यावेळीं गोपाळराव देशमुख व महादेवराव रानडे दोघेही तिच्याकडे आकर्षित झाले. कारण हे दोनही पंथ मूर्तिपूजेविरुद्ध आणि हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूनें निघाले होते. प्रार्थनासमाज व आर्यसमाज या दोघांचेंही एकीकरण होण्याचा एक वेळ रंग दिसूं लागला होता :

आर्यसमाजाच्या स्थापनेचा विचार करण्याकरितां २७ जानेवारी १८७५ रोजीं अमदाबादला रा. ब. विठ्ठलदास यांच्या घरीं जी सभा भरली तिला गोपाळराव देशमुख, भोलानाथ साराभाई, बेचरदास अंबाईदास, अंबालाल साकरलाल ही प्रार्थनासमाजाची कार्यकर्ती मंडळी उपस्थित होती. या संयुक्त संस्थेचें नांव काय असावें, यासंबंधीं स्वामी दयानंद गोपाळराव देशमुखांना आपल्या २२ फेब्रु. १८७५ च्या पत्रांत लिहितात.

"अब तक आप लोगों ने 'आर्यसमाज का प्रारंभ किया [वा] नहीं। जो न किया होय तो जल्दी करै। और देखिये कि आर्य्यसमाज नाम रखने से उस पर किसी प्रकार का दोष नहीं आता। क्योंकि उसमें ईश्वर की स्तुति प्रार्थना, उपासना और सब उत्तम व्यवहार करने में आवैंगे। सो आर्य्य नाम श्रेष्ठ का जो समाज। और प्रार्थनासमाज नाम रखने से अनेक दोष आते हैं।" वगैरे (*'ऋषि दयानंद सरस्वती के पत्र और विज्ञापन'*, सं० भगवद्दत्त, लाहोर १९४६, पृ. २९).

मुंबईमध्यें आर्यसमाजाची स्थापना संवत् १९३१ चैत्र शुद्ध ५ शनिवार (७ एप्रिल १८७५) या दिवशीं झाली. गोपाळराव देशमुखांचे पुत्र मोरेश्वर आणि रघुनाथ हे दोघेही पहिल्या वर्षींच आर्यसमाजाचे सभासद झाले. (The Rules of the Arya Samaj, 1876). गोपाळरावांचा मुक्काम त्यावेळीं मुंबई शहरांत नव्हता; पण १८८९ च्या नियम–पुस्तकांत रा. ब. गोपाळराव देशमुखांचें नांव आर्यसमाजाचे अध्यक्ष आणि ट्रस्टी म्हणून सांपडतें. पहिल्या वर्षीं आर्यसमाजांत जीं व्याख्यानें झालीं, त्यांच्यामध्यें वामन आबाजी मोडक, विष्णु परशराम पंडित, महिपतराम रूपराम वगैरे प्रार्थनासमाजाच्या सभासदांचीं नांवें आढळतात.

९५८१४

पुण्यामध्येंही स्वामी दयानंद दिग्विजयासाठीं गेले होते, हें प्रसिद्ध आहे. तेथेंही आर्यसमाज स्थापन झाला. स्वामी दयानंद गोपाळरावांना १६ अक्टोबर १८७५ रोजीं काशीहून लिहितात :

"एक नवीन बात यह है कि पुना में आर्य्यसमाज स्थापन होगया है। आगे आर्य्यसमाज स्थापनार्थ दो सभा पूना में हुई थी। सो तो समाचार पत्रों से जाना हो गा। परंतु हम सतारे से आये तब यह निश्चित हुवा कि महादेव गोविंद रानडे प्रधान [अध्यक्ष], केशवराव गोडबोले मंत्री। जितने प्रार्थनासमाज के सभासद थे वे सब और अन्य बाबा गोकुले [गोखले] तथा काशीनाथ गाडगील एवं गंगाराम भाऊ आदि लस्करस्थ ६० वा ७० सब सभासद हुवे हैं। और अन्य भी बहुत होने वाले हैं।" (*'ऋषि दयानंद सरस्वती के पत्र और विज्ञापन'*, पृ० ३५).

प्रार्थनासमाज व आर्यसमाज यांची ही युति फार काळ टिकली नाहीं. याचें मुख्य कारण डॉ. भांडारकर व विष्णु परशराम पंडित यांचे स्वा० दयानंदांशीं झालेले मतभेद होत. प्रार्थनासमाजाचें एक तत्त्व 'कोणताही एक ग्रंथ साक्षात् ईश्वरप्रणीत नाहीं' हें आहे. तर आर्यसमाज वेद अपौरुषेय मानतो. याच्या जोडीला, वेदांमध्यें बहुदेवतावाद आहे, असें भांडारकरांचें मत होतें. ती गोष्ट प्रार्थनासमाजाच्या एकेश्वरी मताच्या विरुद्ध होती. स्वा० दयानंदांना विधवांचा पुनर्विवाह मान्य नव्हता. त्या कारणामुळें विष्णु परशराम पंडितांचें व त्यांचें पटणें अशक्य होतें. गोपाळरावांना लिहिलेल्या एका पत्रांत "यह विष्णुशास्त्री धूर्त विद्याहीन हठी दुराग्रही मिथ्याचारी है," असे उद्‌गार स्वा० दयानंदांनीं काढले आहेत! गोपाळराव क्षुल्लक मतभेदाकरितां तोडून घेणारे नव्हते. त्यामुळें मूर्तिपूजा, प्रार्थनासमाज व आर्यसमाज या विविध मतांचा त्यांना समन्वय करतां आला.

कर्नल अलकॉट व मॅडम ब्लेवटस्की हिंदुस्थानांत आल्यावेळीं गोपाळरावांनीं त्यांची व स्वामी दयानंद यांची गांठ घालून Theosophical Society of the Arya Samaj of India नांवाची एक संस्था स्थापन केली, आणि ते स्वतः या शाखेचे अध्यक्ष होते. यावेळीं कांहीं शंका आल्यामुळें दयानंदांना त्यांनीं जें एक पत्र ३ डिसेंबर १८८० रोजीं लिहिलें तें मुन्शीराम जिज्ञासु

(पुढें स्वामी श्रद्धानंद) यांनीं १९१० सालीं त्यांच्या पत्रसंग्रहांत प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील आरंभींचा भाग पहा—

"छात्रांन्तर्गत गोपाळराव हरि देशमुख के अनेक नमस्कारपूर्वक विनंति. आपणो कागल भाई शेवकलाल उपर आव्यो ते वाचो. थिओसाफिकल सोसायटीवाला आर्य्यसमाजके विरुद्ध नहि है. ये लोक शोधक है. सिद्ध नहीं और सोसायटी में शाखा सब धर्म्मोकी है. वैदिक शाखा में आर्य्यसमाज सब आपहं है, बौद्ध शाखा में सिलोन के लोक है. जेन्द आवस्था के पारसी लोग भी है. धर्म के बाबत में कुच भी हरकत नही. हम वेद माने ते ये लोक वेद न मानो ऐसा कहते नहीं. कोइ क्रिस्तियन होय तो तेने क्रिस्त ने न मानो एम कहते नहीं. सारांश कोइ ने धर्मनी हरकत नही. योगशास्त्र का विच्यार करने का मुख्य मतलब है. ऐसा ये महिने का थिआसोफिष्ट में साफ लिखा है." (पृ० २४८-९).

परंतु कांहीं मतभेद होऊन अखेर स्वामीजींनीं थिऑसोफिकल सोसायटीशीं असलेला आपला संबंध तोडून टाकला !

"सद्धर्माची मुख्य खूण हीच कीं, मनुष्याचे कल्याणाकडे चित्त असावें" (पृ. ९२), असें गोपाळराव म्हणतात. 'धर्मसुधारणा' (पत्र नं. ६४, पृ० १६०) या मथळ्याखालीं लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं आपलीं धर्मविषयक मतें मांडलीं आहेत. या विषयावर एक स्वतंत्र ग्रंथ सोदाहरण लिहावा अशीही मनीषा त्यांनीं व्यक्त केली आहे, पण तो पुढें प्रसिद्ध झालेला दिसत नाहीं. प्रस्तुत निबंधसंग्रहांत नं० १५१ पासून जे चवदा लेख त्यांनीं 'धर्मसंबंधीं माहिती' या मथळ्याखालीं लिहिले आहेत, ते ह्याच इच्छापूर्तीकरितां कीं काय तें सांगवत नाहीं. रा० ब० दादोबा पांडुरंग यांचा मात्र अशा प्रकारचा 'धर्मविवेचन' नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. अलीकडे (१९६६) प्रसिद्ध झालेल्या 'परमहंससभा व तिचे अध्यक्ष रामचंद्र बाळकृष्ण' या माझ्या पुस्तकाच्या शेवटीं तो पुनर्मुद्रित केला आहे.

समाजसुधारणा

सामाजिक सुधारणेचे गोपाळराव एक अध्वर्यु होते. आपल्या हिंदुसमाज-रचनेंतील दोष व अन्याय ज्यांनीं प्रथम जाणले, अशांपैकीं ते एक प्रमुख होते.

आपल्या निबंधसंग्रहांत जोरानें वेळोवेळीं विधवाविवाहाचा पुरस्कार त्यांनीं केलेला आढळेल. ता. १५ जून १८६९ रोजीं मुंबईत विनायकराव करमरकर व वेणूबाई यांचा जो पुनर्विवाह झाला, त्याच्या समर्थनार्थ जें सात लोकांचें एक पत्रक प्रसिद्ध झालें, त्यांत गोपाळराव देशमुख, महादेव गोविंद रानडे विष्णुशास्त्री पंडित यांचीं नांवें होतीं. या विवाहाच्या प्रसंगीं स्वतः गोपाळराव हजर नव्हते; परंतु "यांचे विवाहास साह्य करणारे" म्हणून गोपाळराव हरि देशमुख, विष्णुशास्त्री पंडित, महादेव गोविंद रानडे वगैरे कांहीं लोकांना शंकराचार्यांकडून बहिष्कृत करण्यांत आलें. हें "विधवाविवाहाच्या अशास्त्रतेविषयीं निर्णयपत्र" करवीर व संकेश्वर मठानें १७ एप्रिल १८७० रोजीं प्रसिद्ध केलें आहे. रानडे व विष्णुशास्त्री पंडित यांच्या चरित्रांमध्यें या विषयाचें तपशीलवार वर्णन आढळेल. या बहिष्कारामुळें गोपाळरावांना फार त्रास सोसावा लागला. मुलेंबाळें असलेल्या कुटुंबवत्सल माणसाला असा वहिष्कार फार जाणवतो. या बहिष्काराचेपायीं त्यांचे बडोद्याचे व्याही श्रीमंत मुजूमदार हे गोपाळरावांचे मुलीस माहेरीं पाठवीनात ! (आठल्ये, *'लोकहितवादी यांचें चरित्र,'* पृ. ७७). इतकेंच नव्हे तर "तुम्हीं प्रायश्चित्त घेऊन पावन होणार नसाल तर तुमच्या लेकीचा त्याग करून मी आपल्या लेकाचें दुसरें लग्न केल्याशिवाय रहाणार नाहीं," असा विहिणीनें निरोप पाठविल्यावर आपल्या कन्येचा घात होऊं नये म्हणून गोपाळरावांना प्रायश्चित्त घेणें भाग पडलें ! (न. र. फाटक, *'न्या. रानडे यांचें चरित्र'* १९६६, पृ० ९९). क्रिस्तासारखा ज्यावेळीं माणूस सडा असतो त्यावेळीं तत्त्वाकरितां क्रूसीं जाईल, किंवा विषाचा प्याला प्राशन करील; परंतु कुटुंबवत्सल माणसाला तसें करतां येत नाहीं.

दुसऱ्या एका सामाजिक सुधारणेचा गोपाळरावांनीं सक्रिय पुरस्कार केला आणि तिच्याकरितां त्रास सोसला. ती म्हणजे परदेशगमन ही होय.

गोपाळरावांचे द्वितीय चिरंजीव कृष्णराव यांना बॅरिस्टरीचा अभ्यास करण्याकरितां त्यांनीं २९ एप्रिल १८६९ रोजीं विलायतेला पाठविलें. ते पुढें या परीक्षेंत यश संपादन करून २८ एप्रिल १८७३ रोजीं परत हिंदुस्थानांत आले; परंतु ते आल्यावर त्यांना जातींत प्रवेश मिळेल कीं नाहीं, व आपल्या कुटुंबाला कोणत्या लोकक्षोभाला तोंड द्यावें लागेल याचा घोर गोपाळरावांना लागून राहिला होता. मुलाला विलायतेला पाठविल्यानंतर लगेच गोपाळराव पुढची तजवीज

करूं लागले. महादेव गोविंद रानडे यांनीं त्यांना या विषयावर पाठविलेलें ११ मे १८७० चें एक हृदयस्पर्शी पत्र उपलब्ध आहे, त्यावरून त्यावेळीं नेत्यांची केवढी त्रेधा उडत होती, त्याची कल्पना होईल. हें मूळ पत्र 'केसरी' ऑफिसच्या संग्रहीं आहे. तें पुढें जशाचें तसें उद्धृत करतों—

Dear Sir,

Beware of Satan and his temptations. I fear they are trying you sore and according as you yield or stand up will be the measure of your glory. Do not listen to Vishnu Bhat's overtures, Swami is not inclined, he is decidedly opposed, to admit men in your Krishnarao's position back into the caste. In fact our troubles on that head will be far more numerous than what we experience now. You did well to send the man back with a message that you would think what you should do to satisfy them in the present, after they had satisfied you about the future. Stand to that till you see in black and white, under the Swami's own hand and seal, the letter of license to Krishnarao's admission. Until you see that in black and white, do not trust to empty assurances from whatever quarter they come. They are preparing a pitfall for you, and will be the first to laugh, if you fall in it.

I for my part and the part of many more, undertake on Krishnarao's coming back, to continue to hold with him and with you and your family, intercourse in every way as thorough and intimate as we do now.

I know you have your family troubles. Who has them not ? Here I am with a poor orphan sister, who is kept away from me for months together. My father is sick and I am prevented from going to him by this consideration only, that I might bring troubles on him. This

is the lot of us all. We must however stand together for most time to come. Our standing together is our strength and their defeat, and this lesson will bear its fruit. Let us stand together for some time and do nothing precipitately and without consulting friends, and give no assent till you see the Shankaracharya's license in behalf of your son. Vishnu Bhat has come from private persons; do not be cheated by him.

Yours truly
M. G. Ranade

रानड्यांवर हा जो वरील पत्रांत वर्णन केलेला विलक्षण प्रसंग ओढवला होता, त्याचें कारण, पुनर्विवाहाच्या समर्थनार्थ काढलेल्या पत्रकावर त्यांनीं सही केल्याबद्दल शंकराचार्यांनीं त्यांच्यावर घातलेला बहिष्कार हें होय. कृष्णराव विलायतेहून १८७३ सालीं परत आल्यावर ज्यावेळीं अमदाबादेस आपल्या वडिलांस भेटण्यास गेले, त्यावेळीं बहिष्काराच्या भयानें त्यांची निराळ्या घरांत उतरण्याची व्यवस्था करण्यांत आली होती ! कृष्णरावांनीं बरोबर शंकराचार्यांचें शुद्धिपत्र घेतलें होतें; तरीपण अशी काळजी घ्यावी लागली ! काशीच्या ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र मिळविण्यास पांच हजार रुपयांची मागणी होती. पण तें कसेंतरी पुढें मिळविलें, आणि कृष्णराव एकदाचे परत जातींत आले !

या सुमारास पार्लमेंटरी फायनन्स कमिटीपुढें साक्ष देण्याकरितां विलायतेस जाण्याबद्दल स्वतः गोपाळरावांना सरकारचें निमंत्रण आलें होतें. पण या बहिष्काराच्या धाकानें त्यांना तें नाकारावें लागलें !

"विलायतेस जाण्याकरितां पत्रें आलीं. ता. २१ आगष्ट ७३. म्हणून ता. ८ सप्टेंबर रोजीं बडोद्यास विठ्ठलमंदिरांत सभा झाली, व न जाण्याचें ता. २१ सप्टेंबर रोजीं उत्तर पाठविलें," अशी गोपाळरावांच्या स्मरणवहींत नोंद आहे.

इंग्रजांचें राज्य शाप कीं वरदान ?

"इंग्रजांचे राज्यापासून बहुत लाभ आहेत" (पृ. ९५), इतकेंच नव्हे तर "हिंदू लोकांमध्यें मूर्खपणा वाढला तो दूर होण्याकरितांच हे गुरु दूर देशांतून

इकडे ईश्वरानें पाठविले आहेत," (पृ. ११६) असें गोपाळराव उद्वेगानें म्हणतात. याचा अर्थ परक्यांचें राज्य हिंदुस्थानांत चिरकाल राहावें, अशी त्यांची इच्छा होती हा नव्हे. आपल्या देशी राज्यांत जो स्वार्थ, अज्ञान, लांचलुचपत, ढोंग, मत्सर, द्वेष, लुटारूपणा वगैरे दोष आहेत तो गोंधळ या परकी राज्यामुळें नष्ट होईल, अशी त्यांची अपेक्षा होती. "इंग्रेज सरकारचा या देशांत मोठा धर्म हाच आहे कीं, त्यांनीं विद्या वाढवून या लोकांस शाहाणे करावें, आणि जेव्हां स्वदेशाचें राज्य करण्याचें व्यवहारिक ज्ञान यांस येईल आणि हे पृथ्वीवरची हकीगत सर्व जाणतील आणि दुर्गुण सोडितील, तेव्हां हें राज्य त्यांनीं यांचे हवालीं करावें," (पृ. ११८) असें ते इच्छितात. आपले लोक किती अज्ञानी, भ्रष्ट आणि स्वार्थी आहेत, हें त्यांनीं ठिकठिकाणीं दाखविलें आहे. पाहा—

"इंग्रज पहिल्यानें आले तेव्हां हिंदु लोक साक्षर असते आणि समजते कीं, हे लोक आज थोडे दिसतात, उदमाकरितां आले आहेत. परंतु यांचे पाठीमागें पेडें फार लांब आहे. यांस फार जपलें पाहिजे व यांस फौज वगैरे ठेऊं देऊं नये. कारण कीं, हे उद्यां राज्य बळकावतील. असा जर आमचे वडील, आजे, पणजे यांणीं उद्यांचा विचार पाहिला असता तर आज हे लोक इंग्रजांचे अमलांत दीनवाणे कां फिरते? परंतु उद्यांचा विचार केला नाहीं. त्याचें फळ आम्हीं भोगितों....इंग्रज उद्यांचा विचार आज करितात. जर हिंदु लोकांनीं एक कंपनी केली असती आणि विलायतेस व्यापार करण्यास गेले असते आणि तेथें किल्ले बांधते व शिपाई ठेवते तर त्या घटकेस हांकून देते." (पृ. १३२)

यावरून पारतंत्र्याची गोपाळरावांना कशी चीड होती, तें कळून येईल. कांहीं उद्गार तर त्यांचे इतके प्रक्षोभक आहेत कीं, जर ते सत्तावनसालीं किंवा चालू शतकाच्या आरंभीं राष्ट्रीय चळवळीच्या वेळीं काढले गेले असते, तर इंग्रज सरकारविरुद्ध चिथावणी दिल्याचा त्यांच्यावर आरोप आला असता! उदाहरणार्थ त्यांचीं कांहीं विधानें पहा. सरकारी कामदारांसंबंधीं ते म्हणतात,

"इंग्रज लोक जे विलायतेंतून इकडे येतात ते शुध्द ढोणपे असतात, त्यांस कांहीं कळत नाहीं. मग शिरस्तेदारावर वगैरे भरंवसा ठेवतात."

"साहेब लोक मूर्ख असतात, परंतु दोन हजार तीन हजार रुपये पगार खातात. आणि त्यांचे हाताखालील कामगारास शेंपन्नास रुपये दरमहा देतात आणि सर्व काम तो करितो."

"इंग्रज हल्लीं सरकारांतून नेमणूक होऊन जे इकडे येतात त्यांचे तीन वर्ग आहेत. शंभर सिविलियन असले तर त्यांत पंचाण्णव असे असतात कीं, त्यांचें चित्त पैका मिळवून घरास जावें....शेकडा चार मध्यम प्रतीचे असतात. म्हणजे ते चित्त लाऊन काम करितात. शंभरांत एक उत्तम प्रतीचा असतो. त्याचे मनांत आपण नीट काम करावें; हें तर काय, परंतु आपले जिल्ह्यांतील सर्व लोकांचें कल्याण असावें, अशी त्याची इच्छा असते.... आपले लोक आतांपासून सुधारले आणि जरा अक्कलहुशारींत आले व लांच खाणें वगैरे दोष टाकले म्हणजे खचित साहेबलोकांचे शंभरपट काम चांगलें करतील." (पृ० १६५-१६७).

"सरकाराहून प्रजेचे अधिकार अधीक असावे. म्हणजे जे जे रयतेच्या हिताचे कायदे आहेत, ते सरकारशीं भांडून घ्यावे." (पृ० १६१).

"गवरनरापासून असिस्टंट कलेक्टरपर्यंत व कमांडरचीफपासून एनसाईन व सोजीरपर्यंत दुसरे देशाचे लोक भाड्यानें आणले आहेत. ते कसे म्हणाल तर त्यांणीं लाखो रुपये पगार आम्हांपासून घ्यावा आणि स्वदेशास जावें. त्यांचे हातीं पैसा गेला तो अगदीं इकडे यावयाचा नाहीं."

असें न होतां देशांतला पैसा देशांत राहावा याकरितां तैं एक भाबडी इच्छा करितातः—

"जर विलायत सरकाराशीं व कंपनी सरकाराशीं फूट झाली, किंवा कांहीं तंटा झाला, आणि इकडील गवरनर जनरल वगैरे येथील सर्व राज्य बळकावून राहिले व पुन्हां परत जाण्याचा इरादा ठेवला नाहीं, तर एकदम आमचे लोक शाहाणे होतील, आणि राज्याचे अधिकारांत इंग्रजांचे समागमें शिरतील. व इंग्रजही आतां जसे त्यांना दूर मानतात तसे मानणार नाहींत. एक, दोन, तीन पिढ्या इंग्रजांच्या इकडे झाल्या म्हणजे ते आमच्यांतील होतील....(पृ. १९४)."

हे विचार इंग्रजी राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें अराजक नव्हत काय ?

"हिंदु लोकांमध्यें येकमेकांचा कळवळा अगदी नाहीं. उलटे एकमेकांचा नाश करून त्यांत थोरपणा मानणारे बहुत आहेत. एकावर अन्याय जहाला तर सर्वांनीं त्याचा न्याय होण्याची मदत करावी हें शहाणपण त्यांस नाहीं. यास्तव मुसलमानांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केला, इंग्रेज लोकही आले व पुढेंही कितीएक येणार; परंतु या लोकांस दुःख व अन्याय सोसण्याची चाल व संवय पडली आहे. तिची त्यांस कांहीं लाजच वाटत नाहीं व दया नाहीं. म्हणून हे अन्याय या देशांत आहेत." (पृ. १२१).

हिंदी लोकांच्या व्यंगावर नेमकें कसें त्यांनीं बोट ठेवलें तें यावरून दिसून येईल. ते आणखी पुढें लिहितात,

"इंग्रज लोक, मुसलमान लोक आले ते कांहीं बरोबर घेऊन आले नाहींत. आमच्यापैकीं खावयास आले आणि तेही एकटे खाणारे नव्हत. एक एक असा श्रीमंत कीं, त्याच्यामागें पन्नास रिकामे माणूस....कांहीं काळ असेंच चाललें तर आपले लोकांत एकही श्रीमंत वांचणार नाहीं....या देशांतील कामें व व्यापार इंग्रजांनीं घेतले. जड्ज तेच, माजिस्ट्रेट तेच, वस्त्रें विकणारे तेच, माल आणणारे तेच, टंकसाळ घालणारे तेच....तेव्हां परिणाम असा होईल कीं आपले सगळे लोक शेतभात करणारे होतील, आणि श्रीमंत, सावकार व अंमलदार इंग्रज होतील. जितकें मेहनत करून पिकवावयाचें काम तितकें आपले लोकांकडे राहील, जितकें सुखानें खाऊन राहावयाचें काम तितकें ते लोक बळकावतील." (पृ० ११२–११३).

स्वदेशीचा पुरस्कार गणेश वासुदेव जोशी यांनीं केला आणि देशी व्यापारोत्तेजक मंडळ स्थापन करून ता. १२ जाने० १८७२ रोजीं स्वदेशी वापरण्याच्या शपथा घेतल्या. पण याच्या कित्येक वर्षे आधीं ता. २२ एप्रिल १८४९ रोजीं गोपाळरावांनीं परदेशीच्या बहिष्काराचें शिंग फुंकलें होतें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ते आपल्या क्र० ५७ च्या पत्रांत लिहितात,

"....लोकांनीं एकत्र होऊन जर असा कट केला कीं, आपले देशांत दुसरे मुलखाचा जिन्नस आला तरी घ्यावयाचा नाहीं. आपले देशांत पिकेल तेवढाच माल घ्यावा. आपले लोक कापडें जाडीं वाईट करतात; परंतु

तींच नेसावीं. इकडे छत्र्या करितात त्याच घ्याव्या. म्हणजे या लोकांत व्यापार राहून इकडे सुख होईल; परंतु हे लोक असें करीत नाहींत. आणि थोडी किंमत म्हणून लोकांचा जिन्नस विकत घेतात. वास्तविक पाहिलें तर हल्लीं दाणे मात्र इकडे पिकवून हे लोक खातात. अजून दाणे परदेशांतील येऊं लागले नाहींत. [तेही येऊं लागले! त्यांच्याशिवाय आमचें आतां भागत नाहीं!—संपा०] बाकी सर्व पाहावें तें परदेशचें आहे. आमचे कपडे, आमची छत्री, आमची चाकू–कात्री, आमचें घड्याळ, आमची गाडी, आमचीं बुकें, सर्व परदेशांतील आहेत. यामुळें सर्व व्यापार बुडाला. उदमी, मजूरदार, कसबी, कारागीर घरीं बसले—

'याजकरितां सर्वांहीं असा कट करावा कीं, जें आपल्या देशांत पिकेल तेंच नेसूं, तेंच वापरूं; [तें] कसेंही असो. आणि तितक्यांत चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयाच्या विद्या शिकूं. मग हजारो खंडी कापूस इकडून विलायतेस कशास जाईल? कापूस विकणाऱ्यांनीं असा बेत करावा कीं, इंग्रेजास इकडे तयार केलेलीं कापडें द्यावीं; कापूस देऊं नये. ." (पृ० १४३–४).

हेच विचार त्यांनीं जास्त जोरानें पुढें पृ० १५३ वर मांडले आहेत, ते वाचकांनीं मुळांत पाहावे. अशा या पुरुषास इंग्रजधार्जिणा कोण म्हणेल?

निरनिराळीं कलाकौशल्यें आणि उद्योगधंदे यांच्या विद्या शिकण्यास परदेशगमन करणें अवश्य म्हणून त्यांनीं परदेशगमनाची आवश्यकता प्रतिपादिली आहे. ते म्हणतात, "म्लेंच्छांच्या देशांत जाऊं नये म्हणून अटकाव होता. पण आतां तुमचा देशच म्लेंच्छाचा झाला. तेव्हां तो शास्त्रार्थ राहिला नाहीं." (पृ. १४५).

"विलायतेंत पार्लमेंट आहे. परंतु ते इकडील देशाचा कांहीं विचार करीत नाहींत...तेव्हां आमच्या लोकांनीं एकत्र होऊन पार्लमेंट मागावें.... विलायतेंत पार्लमेंट असावें व येथें नसावें अशी आम्हीं कांहीं चोरी केली नाहीं", असें गोपाळराव म्हणतात.

आपले लोक चोहों देशांत जाऊन व्यापार करूं लागले, विद्वान झाले आणि देशांत कापड वगैरे जिन्नस तयार करूं लागले म्हणजे काय चमत्कार घडेल त्याचें भाकीत त्यांनीं पुढील शब्दांत केलें आहे.—

"लोक शाहाणे झाले म्हणजे हळूच इंग्रजांजवळ म्हणतील कीं,

आम्हांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लमेंट द्या. नंतर आमचे लोक ह्यामध्यें बसूं लागले म्हणजे हळूच म्हणतील कीं, तुम्हांसारखेच आम्ही शाहाणे आहों. मग आम्हांस अधिकार कां नसावे? मग हिंदु लोकांचें बहुमत असें पडलें म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे. इकडील लोक राज्याचे कारभार वगैरे चांगले करूं लागले, लांच खावयाचें सोडून दिलें, म्हणजे बहुतकरून मोठालीं कामें गवरनरीचीं सुद्धां यांचे हातीं येतील, आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून राहातील. म्हणजे जसे हिंदुस्थानांत प्रथम इंग्रज आले त्या स्थितीवर येतील, आणि आपले लोक पार्लमेंट व स्वराज्य भोगतील. राज्यकारभारांत व व्यापारांत त्यांना महत्त्व प्राप्त होईल आणि मग परदेशाशीं देखील व्यापार करतील....ज्याकाळीं इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कानू बसवावयाचा आग्रह करतील, त्याकाळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील, आणि इंग्रजांस सांगतील कीं, तुम्हीं आपले देशांत जावें. आतां आमचे देशाचा कारभार आम्हांस चांगला करतां येतो. तुमचें गुरुत्व नको."
(पृ० १३७).

गोपाळरावांचें हें भविष्य खरें ठरलें आहे. म्हणून त्यांस द्रष्टा म्हणतात.

बडोद्याच्या खंडेराव महाराजांच्या राणी जमनाबाई यांना पुत्रसंतान नसल्यामुळें त्याचा भाऊ मल्हारराव त्याच्यानंतर गादीवर बसला. पण त्यास २३ एप्रिल १८७५ रोजीं पदच्युत केल्यावर श्री. खंडेराव गायकवाडांच्या राणी जमनाबाईसाहेब यांना आपल्या मांडीवर दत्तकपुत्र घेऊन बडोद्याचें राज्य चालविण्याचा सल्ला गोपाळरावांनींच दिला. आणि त्यांनीं दिलेल्या मुद्द्यांप्रमाणें त्यांचे चिरंजीव बॅरिष्टर कृष्णराव देशमुख यांनीं इंग्रजींत अर्ज लिहून तो सरकारकडे पाठविण्यांत आला. त्याप्रमाणें दत्तक घेण्याची परवानगी मिळून श्रीमंत सयाजीराव बडोद्याच्या गादीवर आले. (आठल्ये–*लोकहितवादी यांचें चरित्र*, पृ. ९२) गोपाळरावाची ही कामगिरी आज लोकांना ज्ञात नाहीं. आठल्यांनींही ही गोष्ट त्यांच्या पुढें सर्व कागदपत्रें असतांना सप्रमाण मांडलेली नाहीं. आठल्यांनीं लिहिलेलें हें चरित्र कांहींसें हरदासी थाटाचें आहे. गोपाळराव अमदाबादला जज्ज असतांना सयाजीरावांना २७ मे १८७५ रोंजीं दत्तक घेतलें. आणि

त्यांना १८८१ डिसेंबरांत राज्याधिकार प्राप्त झाला. या राज्याभिषेकसमारंभाला गोपाळराव हजर राहिले होते. याचा निर्देश मागें आलाच आहे.

गोपाळरावांच्या सल्ल्याप्रमाणें जमनाबाईसाहेब दत्तक न घेत्या तर बडोदें संस्थान कदाचित् खालसा झालें असतें.

गोपाळरावांच्या स्वभावांतील विरोध व कांहीं विशेष

गोपाळराव देशमुख यांच्या मतप्रणालीचा विचार करतांना केवळ प्रस्तुत निबंधसंग्रहच नव्हे, तर त्यांचें इतर विविध वाङ्मयही विचारांत घ्यावें लागेल; परंतु विस्तारभयास्तव सध्या जास्त खोलांत जाणें शक्य नाहीं. त्यांच्या निबंध-संग्रहांतच अनेक विषय आले आहेत. गोपाळराव हे स्वजननिंदक आणि इंग्रजांचे स्तुतिपाठक होते, असें मत त्यांच्या विरोधकांनीं प्रसृत केलें आहे, तें कितपत खरें आहे हें वाचकांना कळावें म्हणून ब्राह्मणांसंबंधीं आणि इंग्रजांसंबंधीं त्यांची काय वृत्ति होती, हें वर थोडक्यांत दाखविलें आहे. जास्त माहितीकरितां वाचकांपुढें त्यांचा प्रस्तुत निबंधसंग्रह तर आहेच; शिवाय शक्य असेल त्यांनीं त्यांचे इतर ग्रंथही एकवार नजरेखालीं घालावे. हा ग्रंथ म्हणजे तर एक ज्ञानकोशच होय.

'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि,' अशा त्यांच्या अंतःकरणाची वृत्ति असल्यामुळें अन्योन्यविरुद्ध अशा प्रकारची वागणूक त्यांची क्वचित् प्रसंगीं दिसून येई! नामधारी ब्राह्मणांविरुद्ध कठोर टीका करणारे गोपाळराव, विद्वान अविद्वान असा भेद न करतां कोणताही ब्राह्मण त्यांच्याकडे गेला असतां त्याचा सत्कार करून, ते त्याला विन्मुख परत कधींही पाठवीत नसत. त्यामुळें ज्यावेळीं त्यांच्यावर शंकराचार्यांनीं बहिष्कार घातला, त्यावेळीं ब्राह्मण लोक त्यांचा कैवार घ्यावयाला पुढें धांवून आले होते. ते अमदाबादेच्या प्रार्थनासमाजाचे उपाध्यक्ष होते; पण अमदाबादेच्या नदीकांठच्या सर्व देवांचें दर्शन घेऊन त्यांना गंधफुलें वाहात आणि घरीं आल्यावर "मृत्तिकेचें लिंग करून पार्थिव पूजा ते स्वतः करीत," असें आठल्ये लिहितात. (*लोकहितवादींचें चरित्र*, पृ. ६८–६९). "गोपाळरावने मूर्तिपूजाउपर अथवा कशाउपर पण श्रद्धा हती के केम ओ अगम्य हतुं," असें म्हणून रा. नरसिंहराव भोलानाथ त्यांच्यासंबंधीं एक

गमतीची गोष्ट सांगतात ती अशी:—एकदा गोपाळराव सरकारी कामाकरितां नदियाड येथें गेले होते. तेथें ज्या गृहस्थाच्या घरीं उतरले होते, तेथें स्वतः देवपूजा करीत वसले होते. इतक्यांत तूप विकणारा एक माणूस तेथें आला आणि तूप तोलतांना तपेलीचें वजन करण्याकरितां दगड शोधूं लागला. तो त्यास जवळपास मिळेना! म्हणून गोपाळरावांनीं आपल्या पूजेंतील शालिग्राम त्याच्यापुढें केला! ('*स्मरणमुकूर*' १९२६, पृ० ४७). नरसिंहराव म्हणतात, "गोपाळरावने मन, मूर्ति अने पथरा सरवे सरखां ज हतां." पण एकादा माणूस अडचणींत दिसला असतां त्याच्या मदतीला धांवतांना इतर कशाचेंही भान त्यांना राहात नसे, असेंच बहुधा असेल!

या विरोधांत त्यांचें ढोंग मुळींच नसे. कांहींसा भाबडेपणा होता, असें म्हटल्यास चालेल. बुद्धिवाद व भावना यांचें हें द्वंद्व होतें. 'हितोपदेश व कामगार' हें वृत्तपत्र गोपाळरावांसंबंधीं लिहितें,

> "रा० ब० देशमुख यांना जुन्या व नव्या गोष्टींची माहिती सारखी होती; पण मूळ संस्कार जुन्या गोष्टींचा, यामुळें तिकडेच त्यांचा कल केव्हां केव्हां अधिक वळत असे. ते प्रार्थनासमाजाचे सभासद होते, तरी वेदांचा आधार धरून चालणाऱ्या आर्यसमाजाकडे त्यांचा कल अधिक असण्याचें आम्हांस हें एक कारण वाटतें." (१५–१०–१८९२).

"त्यांची प्रिय कन्या श्रीमती द्वारकाबाई मुजूमदारीण वारल्यापासून त्यांचें अन्न सरासरी राहात चाललें होतें" आणि आपल्या मुलीच्या वियोगाच्या दुःखानें त्यांचें मरण जवळ आलें, असें 'इंदुप्रकाश'कार लिहितात, (१०–१०–१८९२). पण आपल्या मनावर जय मिळविण्याचा ते कसा प्रयत्न करीत हें, पुण्यांतील त्यांच्या मृत्यूच्या शोकसभेंत आर्यसमाजाचे एक कार्यकर्ते पंडित सेवकलाल यांनीं आपल्या आठवणींत सांगितलें आहे. ती गोष्ट अशी—

> "रा. ब. देशमुखसाहेबांचे ब्यारिस्टर चिरंजीव वारले त्या दुसरेच दिवशीं सकाळीं मी त्यांचेकडे आर्यसमाजाच्या कांहीं कामाकरितां बाहेर जावयाचें होतें म्हणून त्यांस बरोबर घेण्यासाठीं गेलों. ते बाहेरच बसले होते. मला पाहिल्याबरोबर त्यांणीं आपला अंगरखापागोटें घरांतून मागविलें व समाजाचे संबंधानें ते मजबरोबर बोलूं लागले. तितक्यांत

घरांतून एक मनुष्य मजकडे येऊन मला एकीकडे नेऊन सांगूं लागला कीं, त्यांचे प्रिय पुत्र ब्यारिस्टर कृष्णराव वारले व त्यांचें प्रेत दहन करून नुक्तीच मंडळी घरीं आली आहे. हें ऐकून मला अतिशय वाईट वाटलें व मी रावसाहेब यांस, "अशा दुःखाचे प्रसंगीं मीं आपल्याला बाहेर जावयाचे श्रम देणें अगदीं अयोग्य आहे," असें म्हटलें. ते म्हणाले, "ह्या प्रसंगा-बद्दल विषाद मानून आर्यसमाजाचे कार्यासाठीं आपल्याला जें करावयाचें तें करण्यांत उदासीनता दाखविणें हें माझ्या मतानें चांगलें नाहीं."

पंडित सेवकलाल यांनीं यावेळीं दुसरी एक जी आठवण कथन केली, ती अशीच मोठी हृदयस्पर्शी व गोपाळरावांच्या साधुत्वाची साक्ष देणारी आहे. ते म्हणाले,

"नाशकास ते जॉईंट जज्जाचे हुद्द्यावर असतांना त्यांचे एका नोकरास अतिशय ज्वर आला. त्याला दवापाणी स्वतः देशमुखसाहेब हे स्वतः बसून देत असत व दुसरा एक नोकर त्या आजाऱ्याचे पाय चुरीत बसल होता. त्याला आजाऱ्यानें जास्तच जास्त पाय चेपण्यास सांगितलें. तितक्यांत त्या दुसऱ्या नोकरास देशमुखांनीं आजाराच्याच दुसऱ्या कांहीं जरूरीच्या कामाकरितां घरांत पाठविलें व आपण त्या आजारी नोकराचे पाय दाबीत बसले, हें त्या आजाऱ्यास मुळींच कळलें नाहीं. आजारी मनुष्य पुनः रागावून शिव्या देऊन आपल्या सोबत्यास म्हणून आणखी जोरानें पाय दाबण्यास सांगूं लागला. तें रा० ब० देशमुखांनीं ऐकून, घरांत पाठविलेला नोकर येईपर्यंत, त्याचे पाय विशेष जोरानें चेपणें चालू ठेवलें होतें." वगैरे.

तिसरी एक आठवण आठल्यांनीं दिली आहे :—गोपाळरावांची एक घोड्याची गाडी होती. त्यावर मारुती नांवाचा एक कोचमन होता. तो नेहमीं घोड्याच्या चंदींतून हरभरे चोरून नेई. एके दिवशीं मुलांनीं त्याला हरभरे चोरतांना मुद्देमाल पकडला व त्याला वडिलांसमोर आणून उभा केला. गोपाळ-राम मारुतीला शिक्षा करतील अशी मुलांची अपेक्षा ! पण गोपाळराव मारुतीला म्हणाले, "तुला हरभरे पाहिजे तर घरांत मागावयाचे होतेस. असे चोरून नेऊं नकोस. मुकें जनावर उपाशीं नाहीं का मरणार?" असें बोलून पायलीभर हरभरे घरांतून आणून गोपाळरावांनीं त्याला द्यावयाला लावले !

गोपाळरावांची आणखी एक आख्यायिका येथें सांगण्यासारखी आहे : दर दिवशीं मुलांसहवर्तमान ते अमदाबादला नदीवर स्नानाला जात आणि नदी-कांठच्या देवालयांतील प्रत्येक देवाला गंधफूल वाहात. रविवार वगैरे सुटीचा दिवस असला म्हणजे कोर्टाला जाण्याची घाई नसे. अशा वेळीं ते नदी-पलीकडील इतर सर्व देवांची पूजा करून दर्शन घेत. एके दिवशीं अशा प्रकारें दर्शनें घेतल्यावर त्यांना एक वृद्ध भाविक गुजराती बाई भेटली. तिला वाटलें कीं, हा कोणीतरी मोठा धर्मशील वैदिक ब्राह्मण असावा. हात जोडून ती गोपाळरावांना म्हणाली,

"तुम्हांला शिधा द्यावा अशी माझी इच्छा आहे, तुम्ही घ्याल काय ?"

"हो, आम्हीं ब्राह्मणच आहों. शिधा घेऊं," जरा विचार करून गोपाळरावांनीं उत्तर दिलें.

"तो मी उद्यां इकडे घेऊन येऊं कीं तुमच्या घरीं आणूं ?" बाईनें आनंदित होऊन प्रश्न केला.

"आमच्या घरींच आणा. आमचें घरही एकवार पाहून घ्या." असें म्हणून गोपाळरावांनीं तिला आपला पत्ता दिला.

दुसऱ्या दिवशीं ठरलेल्या वेळीं ती बाई शिधा घेऊन दिलेल्या पत्त्यावर त्यांच्या घरीं गेली. पाहाते तों दरवाज्यावर हत्यारबंद शिपाई उभा. त्याला तिनें आधल्या दिवशीचीं हकीकत सांगितल्यावर, अशी बाई आल्याची त्यानें आंत वर्दी दिली. गोपाळरावांनीं तिला आंत यावयाला सांगून प्रेमानें तिचें स्वागत केलें. त्या बाईला वस्तुस्थिति कळल्यावर ती भारीच शरमिंधी झाली व हात जोडून गोपाळरावांना म्हणाली,

"आपण एवढे मोठे सरकारी अधिकारी आहां, हें मला माहीत नव्हतें; म्हणून शिधा घेतां का, असें मीं तुम्हांला विचारलें ! क्षमा करा."

तिचें समाधान करीत गोपाळराव बोलले, "त्यांत काय बिघडलें ? ब्राह्मणांनीं शिधा घेण्यास कांहीं हरकत नाहीं."

असें म्हणून त्यांनीं प्रेमानें तो शिधा ठेवून घेतला, आणि तिच्यासंबंधीं जास्त चौकशी सुरू केली. आपलें नांव जमना पिराणी असें असून आपली मोठी शेतीभाती होती पण भाऊबंद व सावकार ती बळकावून बसले आहेत,

असें डोळ्यांत आसवें आणून तिनें गोपाळरावांना सांगितलें. गोपाळरावांनीं तिची सर्व हकीकत ऐकून घेऊन तिचे कागदपत्र पाहून तिची बाजू खरी असल्यास तिच्यातर्फे काम चालवावें असें एका वकिलास सांगितलें. ती बाई खरोखरच नाडलेली आहे असें कळल्यावर कोर्टांत गोपाळरावांच्या खर्चानें फिर्याद चालू झाली आणि तिच्या तर्फे शेवटीं निकाल लागून तिच्या जमिनी तिला परत मिळाल्या. 'हे गोपाळराव नसून गोपाळकृष्णच आपणाला भेटला,' असें ती बाई म्हणत असे, असें आठल्ये लिहितात. (पृ. ९३-४).

जज्ज म्हणून ते जितके न्यायनिष्ठुर, तितकेच स्वभावानें ते प्रेमळ होते. उत्कृष्ट न्याय देणारे म्हणून सरकारनें इंग्रजी सिव्हिलियनांचा रोष पत्करूनही त्यांच्या राखीव जागेवर गोपाळरावांची नेमणूक केली होती. सिव्हिल सर्विस कमिशनसमोर साक्ष देतांना जस्टिस नानाभाई हरिदास यांनीं, देशी सनदी जज्ज किती उत्कृष्ट रीतीनें न्यायदानाचे काम करूं शकतात याचें उदाहरण म्हणून, गोपाळराव देशमुख यांचा निर्देश केला होता. (*'बुद्धिप्रकाश'*, नवंबर १८९३, पृ० २५२).

गोपाळरावांची आर्थिक बाबतींत आरंभीं नेहमीं ओढग्रस्त स्थिति होती. मुलांबाळांचा वाढता संसार, त्यांचें शिक्षण, विद्यार्थ्यांना व गरिबगुरिबांना मदत, ग्रंथखरेदी, रोग्यांना औषधपाणी, दानधर्म वगैरेमुळें ते प्रथम कर्जबाजारी असत.

त्यांच्या स्मरणवहींत १८६५ सालच्या शेवटीं पुढील नोंद सांपडते :

"मुंबईस बदली झाली. पत्र ता. १३ अक्टोबर १८६५.

पगार बंद म्हणून कर्ज काढून जाणें भाग. कधीं कर्ज नाहीं असें होत नाहीं. पुण्याहून साताऱ्यास गेलों, वाईस गेलों, तरी कर्ज होतेंच. तें तेथून फेडलें, तेथूनचें कर्ज नाशकाहून फेडलें. नंतर मुंबईहून फेडलें. मुंबईचें पुण्यास फेडलें, अमदाबादेचें नगराहून आणि नगरचें मुंबईहून फेडलें. याप्रमाणें बरकत आहे (!!)."

पुढें त्यांचा पगार वाढला आणि मुलगेही कर्ते आणि मिळवते झाले. त्यामुळें त्यांची पैशांची चणचण पुढें दूर झालेली दिसते.

गोपाळराव देशमुख जसे स्वतः ग्रंथकार होते, तसे ग्रंथग्राहक आणि

ग्रंथसंग्राहकही होते. जिकडे जिकडे ते जात तिकडे ग्रंथसंग्रहालयें उघडीत, याचा निर्देश मागें आलाच आहे. प्रस्तुत निबंधसंग्रहांत त्यांनीं ग्रंथांचें महत्त्व ठिकठिकाणीं वर्णिलें आहे. ग्रंथ हें एकाद्या राष्ट्राचें शहाणपण जाणण्याचें एक साधन आहे, असें त्यांनीं म्हटलें आहे. (पृ० ३८५). स्वतः त्यांचा खाजगी ग्रंथसंग्रह फार मोटा होता. नवें जुनें एकादें पुस्तकाचें दुकान दिसलें कीं ते आंत शिरून तासचे तास पुस्तकें चाळीत आणि निवडक विकत घेत, असें नमूद आहे. 'केसरी'कार लिहितात, "गोपाळरावजींचा दुसरा गुण म्हटला म्हणजे व्यासंग हा होय. अगदीं मरेपर्यंत यांचा उद्योग सारखा चालू असे. निरनिराळ्या ग्रंथांचें अवलोकन करणें, जुने कागदपत्र अगर नवीं बुकें यांपासून मिळालेली माहिती व्यवस्थेशीर जपून ठेवणें, वगैरे गोष्टींची रा० ब० गोपाळ रावजीइतकी हौस दुसऱ्या कोणांत क्वचित आढळेल." (११-१०-१८९२). त्यांच्या स्मारकासंबंधीं लिहिलेल्या अग्रलेखांत 'ज्ञानप्रकाश'कार लिहितात, "सरदार देशमुख यांस विद्याव्यासंगाचें व ग्रंथसंग्रहाचें किती व्यसन होतें हें आम्हीं त्यांच्या चरित्रांत विस्तारेंकरून वर्णन केलें आहे....देशमुखांच्या प्रचंड पुस्तकसंग्रहाचा सर्व विद्याप्रिय लोकांस उपयोग होईल, अशी त्याची त्यांच्या पुत्रत्रयानें व्यवस्था करावी." (३०-११-१८९२).

या त्यांच्या प्रचंड ग्रंथसंग्रहाचें पुढें काय झालें, अशी त्यांच्या एका वंशजाकडे चौकशी केली असतां कळलें कीं, हा संग्रह त्यांनीं स्थापन केलेल्या पुणें नेटिव जनरल लायब्ररीला देण्याचा त्यांच्या मुलांचा प्रथम हेतु होता; परंतु तें संग्रहालय सरकारी नियंत्रणाखालीं असल्यामुळें, देशमुखांच्या नांवानें हा संग्रह स्वतंत्र ठेवावा व लोकांना उपलब्ध करून द्यावा असा लोकमान्य टिळकांनीं सल्ला दिला. त्याप्रमाणें तो, गाडे भरून देशमुखवाड्यांतून गायकवाडवाड्यांत नेण्यांत आला. पुढें लवकरच टिळकांची मंडालेच्या तुरुंगांत रवानगी झाल्यावर त्यांना या संग्रहाची व्यवस्था लावतां आली नाहीं. आणि तिकडून तो हळूहळू अदृश्य होऊं लागला!

गोपाळरावांच्या ग्रंथसंग्रहापेक्षांही त्यांच्या खासगी पत्रव्यवहाराला मी जास्त महत्त्व देतों. गोपाळरावांचा थोरथोर देशी व विदेशी लोकांशीं पत्रव्यवहार होता. त्यांतील कांहीं पुरुषांची यादी आठल्ये यांनीं त्यांच्या चरित्रांत

दिली आहे (पृ० १४०-१). १९२६ पर्यंत जो पत्रव्यवहार शिल्लक राहिला होता त्याचीं ३१ दप्तरें होतीं, असें आठल्ये लिहितात. हा पत्रव्यवहार आज उपलब्ध असता तर गोपाळरावांच्या चरित्रावरच नव्हे, तर तत्कालीन महाराष्ट्राच्या इतिहासावर नवा प्रकाश पाडण्यास त्याचा फार उपयोग झाला असता.

या पत्रव्यवहाराचा शोध करतां असें कळलें कीं, 'केसरी' पत्राचे एक लेखक रा० लिमये हे लोकहितवादींचें चरित्र लिहिणार होते. म्हणून मुंबईहून कागदपत्रांचीं पोतीं पुण्याचे चित्रशाळेंत पाठविण्यांत आलीं. पुढें लिमये प्लेगनें दिवंगत झाल्यावर कांहीं काळानें तीं गोपाळराव देशमुखांचे नातजावई, गणपतराव अभ्यंकर वकील, यांनीं त्यांचें चरित्र लिहिण्याच्या हेतूनें सांगलीला नेलीं. पण स्वतः त्यांना तें लिहिणें शक्य न झाल्यानें रा० कृष्णाजी नारायण आठल्यांकडून तें लिहून घेतलें. पुढें हें लोकहितवादींच्या चरित्राचें साधनसाहित्य पुण्याला त्यांचे एक नातू माधवराव देशमुख यांच्या घरीं आलें नाहीं ना, अशी प्रा. न० र० फाटक यांनीं शंका व्यक्त केली आहे (*'आलमगीर,'* दिवाळी अंक १९६५). परंतु माधवरावांकडे असलेल्या साधनांचें जें प्रा. फाटकांनीं वर्णन केलें आहे तीं साधनें (जीं पुण्याचें घर पावसांत कोसळल्यामुळें मातीला मिळालीं तीं), आठल्ये यांनीं लोकहितवादींच्या चरित्राकरितां वापरलेल्या साधनांहून अगदीं वेगळीं असावींत, असें त्यांनीं केलेल्या वर्णनावरून वाटतें. गोपाळरावांचें कांहीं लिखाण किंवा पत्रव्यवहार मुंबईच्या चिरंजिवांकडे राहिला आणि त्याचा कांहीं भाग पुण्याचे पुत्र किंवा नातू यांना मिळाला असावा.

सुमारें पंधरा वर्षांमागें, आठल्ये यांनीं वर्णन केलेल्या पत्रव्यवहाराचें काय झालें, अशी गोपाळरावांच्या एका नातवाकडे चौकशी करतां, गांधीवधाच्या वेळीं झालेल्या जाळपोळींत सांगलीस तो नष्ट झाला, असें त्यांनीं मला सांगितलें. तें मला जास्त संभवनीय वाटतें.

गोपाळराव देशमुख हे द्रष्टे होते हें तर खरेंच; परंतु आपल्या ग्रंथसंग्रहाचें आणि पत्रव्यवहाराचें भवितव्य जर त्यांना आधीं कळतें तर त्याच्या रक्षणाची त्यांनीं आपल्या हयातींत कांहींतरी व्यवस्था करून ठेविली असती!

गोपाळरावांचें वाचन विस्तृत होतें आणि प्रत्येक विषयाचा ते खोल विचार करीत. अव्वल इंग्रजींतील आरंभींच्या प्रखर बुद्धिवादी पुरुषांत दादोबा

पांडुरंगांनंतर त्यांची गणना करावी लागेल.

"रावबहादुरांस बोलताचालता इतिहास असें म्हणत असत," असें 'न्यायसिंधू'चा संपादक म्हणतो, (१७–१०--१८९२). "यांना इतिहासाचें भांडार किंवा जिवंत इतिहास म्हणत", असें 'बडोदावत्सल'कर्ता लिहितो (१८–१०–१८९२). "एकाद्या इंग्लिश गृहस्थानें ह्यांना 'एन्सॅक्लोपीडिया ऑफ ऑल इन्फर्मेशन' असें नांव दिलें असतें", असे 'शिवाजी'कार उद्गार काढतो. (१४--१०–१८९२).

गोपाळरावांनीं आपलें सारें लिखाण, नोकरी आणि आपल्या इतर जबाबदाऱ्या संभाळून घाईंत केलें आहे. निबंधसंग्रहांतील लेख तर वृत्तपत्रांतच प्रसिद्ध करण्याकरितां लिहिले होते. त्यामुळें त्यांना आपलें लिखाण घासूनपुसून ठाकठीक करतां आलें नसेल. परंतु लोककल्याणाच्या विलक्षण तळमळीनें प्रत्येक शब्द त्यांच्या लेखणींतून उतरला असल्यामुळें प्रसाद, आवेश, विनोद, उपहास, काव्य, सरसता, ऋजुता वगैरे गुण त्यांच्या वाङ्मयांत स्वाभाविकपणें उतरले आहेत. कृत्रिमतेचा लवलेशही त्यांच्या लिखाणांत कोठेंच सांपडत नाहीं. स्वतः त्यांच्यामध्येंच कृत्रिमता किंवा ढोंग नव्हतें, मग त्यांच्या वाङ्मयांत तें कोठून येईल? विहिरींतच नाहीं तें पोहऱ्यांत कसें आढळेल? तुकाराम, मोरोपंत वगैरेंच्या वाङ्मयांत म्हणी, सुभाषितें, सार्वत्रिक सिद्धांत यांची जशी पखरण असते, तशी गोपाळरावांच्या लिखाणांतही त्यांची रेलचेल दिसून येते. माहितीच्या तपशिलांत आज शंभर वर्षांनीं त्यांच्या लेखांत कोठें कोठें दोषस्थळें आढळलीं, तरी त्यांच्या निस्सीम कळकळीमुळें त्यांचें वाङ्मय वाचकाच्या अंतःकरणाची पकड घेतें आणि त्याला आल्हाद देतें, यांत शंका नाहीं.

डी क्विन्सी यानें Literature of Power आणि Literature of Despair असे वाङ्मयाचे दोन भेद पाडले आहेत. 'समर्थवाङ्मय' आणि 'अनर्थवाङ्मय' असें त्यांचें मराठी नामकरण मागें एकदा एका ग्रंथालय-परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत मीं केलें होतें. लोकहितवादी गोपाळराव यांचें वाङ्मय यापैकीं "*लिटरेचर ऑफ पॉवर*" किंवा "*समर्थवाङ्मय*" या पहिल्या सदरांत खचित घालावें लागेल!

वर्णानुक्रमवार विषयसूचि


विषय	पृष्ठ
अनुमानशास्त्र.	५३७
अभिमान.	२४०
अर्थशून्य ब्राम्हणविद्या.	८४
अर्थावांचून पाठ करणें.	१५८
आचार.	१४६
आर्जवीपणा व डौलीपणा.	३८
इंग्रज सरकार.	२३७,३८८
इंग्रजी राज्यापासून लाभ.	९५
इंग्रजी विद्या.	७८
इंग्लिश राज्याची आवश्यकता.	११६
इंग्लिश राज्यापासून फळ.	१३६
इंग्लिश लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैरसमजुतींविषयीं.	१
इंग्लिश सरकार.	२२३,२३७,३८८
इनसाफ.	५६९
इस्रायल लोकांविषयीं माहिती.	३७८
ईश्वरप्रार्थनेची पध्धत.	४७८
उद्यांचा विचार.	१३१
उद्योगप्रशंसा.	१७०
ऋषी.	४२९
एकत्र राहाण्याची चाल.	२१७
कन्याहत्या.	१०
कंपनीसरकारचे कारकिर्दीची अखेर.	३०१
कमती कशाची ?	१९९
करारविषयीं शास्त्र.	५४४
कर्म आणि नामस्मरण.	४३८
कर्मकांड.	४४५,४४८
कर्म म्हणजे काय ?	४६०
कामन ला.	५७३
कायदे करणारे.	५५४
कायद्याची माहितगारी.	५२६ ते ५८४
कायद्याचे निरनिराळे ग्रंथ.	५३०
कायद्याचें मूलतत्त्व.	५५१
काशीयात्रा.	४८९
काळगणना (हिंदुधर्मांतील).	४६८
काळें पाणी.	४८४
खरा धर्म करण्याची आवश्यकता.	२६४
गवरनरसाहेबांची बदली.	१०
गायकवाडांचे वंशाविषयीं.	२७८
गाई व बैल.	४८६
गांव.	४९७, ५०३
गृहस्थ आणि भिक्षुक यांचा भेद.	४६
ग्रंथ.	३८६
ग्रेटब्रिटनचें राज्य.	५५७
चांगला कोण ?	४९४
चार युगें.	४०६
चार वर्णांची सांप्रतची स्थिति.	५२
छापण्याची कला.	१४
जन्माचें सार्थक.	४२७
जातक.	४८५
जातीविषयीं विचार.	४८
जुन्या समजुती.	१६

विषय	पृष्ठ
डोले करण्याची चाल.	१०५
डौल व नेटिव राजे.	२४५
डौलीपणा व आर्जवीपणा.	३८
दया.	११९,१९७
दानधर्म करणें.	२२९
दीर्घायुष्य.	४७६
देवपूजा.	९३
देवळें व नेमधर्म.	१८२
धर्म करणें.	४८२
धर्मतत्त्व.	४४१
धर्म व व्यवहारसंबंधीं खोट्या समजुती.	१८०
धर्मशास्त्र.	५६४
धर्मसंबंधीं माहिती.	४२७ ते ४७२
धर्मसुधारणा.	१६०
धर्माचे निमित्तानें फायदा करून घेणें.	४१२
नवीन ग्रंथांची आवश्यकता.	२३५
नशिवावर हवाला.	५५
नादविद्या.	१४१
नाना पंथ.	६३
नाना फडणिसाचें शाहाणपण.	१०२
नामस्मरण आणि कर्म.	४३८
निजामाचे वंशाविषयीं.	२८०
निरुद्योगीपणाच्या चाली.	१०८
नीतिप्रशंसा.	१६३, २२०
नेटिव राजे.	२४५
नेटीव अंमलदार.	१८
पंडितांची योग्यता.	२५७
परमार्थ.	४६३
पाठ करण्याची चाल.	१९१
पारशी लोकांविषयीं.	३६९
पुणें–दप्तर.	२९७

विषय	पृष्ठ
पुण्यांत लायब्ररीची स्थापना.	६
पुत्र.	४६७
पुनर्विवाह. २०, १७३, २४८, २५५, २५८, २६१, २६३, २६६	
पुनर्विवाह वगैरे सुधारणा.	२६६
पुराणांतील ज्ञान.	१३८
पुराणादिकांचें सौरस्य.	१४८
पूर्वींची माहिती.	२९५
पेशवाईंतील माहिती.	५०९
पेशवे यांचे पदाचा इतिहास.	३०६
प्रतिनिधींविषयीं माहिती.	२८३
प्राचीन कालाविषयीं.	३११
प्राचीन ग्रंथांचे अर्थ.	२०१
प्राचीन ग्रंथांचें महत्त्व.	२०३
फड.	५०९
बुद्धीनें ईश्वर किती कळतो त्याविषयीं.	७१
बैल व गाई.	४८६
ब्राम्हण लोक व भिक्षा.	४८७
ब्राम्हण लोकांचें अज्ञान.	१०
ब्राम्हणांचें अज्ञान.	३६
ब्राम्हणांचा लोभ.	१८५
ब्राम्हणांची मूळपीठिका.	३४४
ब्राम्हणांची शिक्षणपद्धती.	१५६
ब्राम्हणांचे आचार.	२२
ब्राम्हणांचें ईश्वरज्ञान.	१७८
ब्राम्हणाचे पुढारीपणापासून अनहित व वेदांत.	२४२
ब्राम्हणांचें महत्त्व.	४४
ब्राह्मण लोकांचा स्वभाव.	१२१
भक्ति, कर्म आणि ज्ञान.	२०६
भटांच्या विद्येचा निरुपयोग.	१७५
भटांनीं लावून दिलेलें वेड.	१५४

विषय	पृष्ठ
भिकारी.	२३२
भिक्षा व ब्राम्हण लोक.	४८७
मद्यपान.	१८७
मन हेंच ईश्वरी शास्त्र.	१३३
मनुष्याची मूळपीठिका.	३३०
मराठी राज्यांतील शिक्के.	३०८
महाराष्ट्र भाषा.	३८२
मानास व दानास पात्र.	८९
मुसलमानाविषयीं माहिती.	३५०
मोरोबा दादिने.	५१४
म्हातारपणीं लग्न.	१४
युरोप आणि एशिया.	४१५
युरोपखंडांत प्रवास.	२९९
राजकीय विचार.	४१५
राजाविषयीं निर्बंध.	४२०
राज्यसुधारणा.	२७, ५८
राज्याविषयीं विचार.	१९४
रोमन सिव्हिल ला.	५७९
लग्नाची पूर्वपीठिका.	४०९
लग्नाविषयीं विचार.	३०, २२७, ४५१
लग्नें.	२२७
लहानपणच्या लग्नापासून अडचणी.	३
ला आफ् एविडन्स.	५३३
ला आफ् कंट्रक्टस्.	५४४
ला आफ् प्रेजमशन्स्.	५३७
लांच.	८१
लांचेचा गुन्हा.	१००
लीगल म्याक्झिम्स.	५४१
लोकांची समजूत व पुराणादिकांचें सौरस्य.	१४८
वर्णविचार.	९८
वाईट चालीचे प्रकार.	२७
वारकरी पंथ.	३९०
विद्वान कोणास म्हणावें?	३९२
विधवा पुनर्विवाहाविषयीं.	३३
विधिनिषेधरूप धर्माचें मूळ.	६७
विवाहाविषयीं.	४५१
वेदांत्यापेक्षां धादांती बरा.	४९१
वेळेचा व्यर्थ खर्च.	८६
वराग्य.	६०
शतपत्रांचा इत्यर्थ.	२५०
शाक्तमार्ग.	११
शिंदे-सरकारचा वंश.	२७१
शिमग्याचा दुराचार.	८
शीक लोकांविषयीं माहिती.	३७४
संगीतशास्त्र.	५१९
संपत्ति म्हणजे काय?	४०२
सरकारनें काय करावें?	३९७
सरकारी कामदार.	१६५
सरदार लोक.	१२४
संस्कृत आणि इंग्रजी विद्या.	१७२
संस्कृत व इंग्रजी भाषा.	२४४
संस्कृत विद्या.	२०८, २५३, ३४२
सातारचे छत्रपति यांचे प्रतिनिधी.	२८३
सातारचे छत्रपतीचा वंश.	२८९
सांप्रतचे पंडितांचें ज्ञान.	२१४
सिव्हिल खात्याचे उमेदवार.	५२५
सुतक.	४३३
सुशिक्षा व पंतोजी.	२४४
स्टाटुट ला.	५७६
स्त्रियांची स्थिती.	७५, ४७२
स्नानसंध्या.	९१
स्वदेशप्रीति.	१६७

विषय	पृष्ठ
स्वदेशाची माहिती असणें फार अवश्य आहे.	३४९
स्वराज्यांतील विद्वान.	१२७
हिंदुधर्म.	४३५
हिंदुधर्मांतील कर्मकांड.	४४५, ४४८
हिंदु लोकांचा आळशी स्वभाव.	४१
हिंदु लोकांचा व्यापार.	१४३
हिंदु लोकांची द्रव्योपयोगाविषयींची समजूत.	१२९
हिंदु लोकांची प्राचीन विद्या.	३१९
हिंदु लोकांची प्राचीन स्थिति.	३२३
हिंदु लोकांच्या मोठ्या अडचणी.	३१६
हिंदु लोकांनीं उद्योग करण्याची आवश्यकता.	११०
हिंदु लोकांनीं काय करावें ?	१५१
हिंदुशास्त्राप्रमाणें स्त्रियांची स्थिति.	४७२
हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास कां नाहीं ?	३३७
हिंदुस्थानची जमीन.	४२४
हिंदुस्थानची मनोदेवता.	३४१
हिंदुस्थानचें राज्य.	३०४
हिंदुस्थानाचें स्थित्यंतर.	३४७
हिंदुस्थानाच्या पराधीनतेचीं कारणें.	११३
हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा विचार.	२४
हिंदुस्थानांतील देश.	२३३
हिंदुस्थानांतील प्राचीन विद्या.	३१२
हिंदूंचा जातिभेद.	५२५
होळकर यांचे वंशाविषईं.	२७४
क्षेत्रें व तेथील ब्राम्हण.	४३१
ज्ञान हाच पराक्रम.	२१२



प्रभाकर, तारीख १९ मार्च १८४८

पत्र नंबर १

इंग्लिश लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैरसमजुतींविषयीं

विनंती विशेष. हल्लीं अशी बातमी कळली आहे कीं, पुणें येथें राज्य बुडाल्यापासून फौजदार कोतवालीचे कामावर ठेवीत होते. त्यांपैकीं जे ब्राम्हण फौजदार झाले त्या सर्वांची बहुतकरून वहिवाट दुरुस्त नाहीं असें अनुभवावरून कळलें, व माजी फौजदार बळवंतराव गोविंद याजवर तर दरवड्याचे वगैरे अपराध स्पष्टपणें शाबिद होऊन त्यास मोठी शिक्षा मिळाली. तेव्हां ब्राम्हण लोक अविश्वासू आहेत; याजकरितां येथील अधिकाऱ्यांहीं असें मनांत आणिलें आहे कीं, या कामावर पुनरपी ब्राम्हण न नेमितां खिस्तियन धर्मांतील मनुष्य नेमावा. त्यास याविषयीं मी थोडासा मजकूर आपल्यास लिहून पाठवितों. हा जर कृपा करून आपले पत्रद्वारें प्रसिद्ध होईल तर ब्राह्मणांवरील दोष निवारण होईल असें वाटतें.

ब्राम्हण लोकांनीं वाईट वर्तणूक केली असें अनुभवावरून जें दिसलें, तें खरें आहे. परंतु त्याचा दोष ब्राह्मणांकडे नाहीं. कारण चांगलेवाईट लोक सर्व जातींत असतातच, परंतु त्यांपैकीं पक्का शोध करून चांगले कुलीन, संभावीत, नीतिमान् असे असतील त्यांस अधिकारावर नेमावें. धर्मशास्त्रीं व्यवहारमयूखांत प्रथमतः श्लोक आहे तो असा कीं,

व्यवहारान्नृपः पश्येद्विद्वद्भिर्ब्राह्मणैः सह ॥
धर्मशास्त्रानुसारेण क्रोधलोभविवर्जितः ॥ १ ॥
श्रुताध्ययनसंपन्ना धर्मज्ञाः सत्यवादिनः ॥
राज्ञा सभासदः कार्या रिपौ मित्रे च ये समाः ॥ २ ॥

याप्रमाणें बहुत अध्ययन केलेले, बहुत ऐकलेले, धर्म जाणणारे, सत्य बोलणारे, निष्पक्षपाती सभासद राजानें अधिकारावर नेमावे म्हणून आहे. त्याप्रमाणें जर ब्राम्हण लोक नेमले असते तर असें कां होतें? इंग्रजी राज्यांत हें रयतेचें फार नुकसानास कारण व दुर्दैव आहे कीं, ज्या साहेबलोकांचे हातीं मोठ्या नेमणुका द्यावयाच्या असतात ते त्या देते वेळेस कांहीं विचार पाहात नाहींत. मनास येईल त्यास देतात. त्यांची विद्या, गुण, नीती, अब्रू यांचा शोध घेण्याचे श्रम करीत नाहींत, म्हणून अयोग्य लोक

भाषा वगैरे शिकण्याची मेहेनत करितात. तशी जर मनुष्य निवडून काढण्याची मेहेनत घेतील, तर लोकांचा फार फायदा होईल. बहुतेक ठिकाणीं असें आहे कीं, एकादी जागा खालीं झाली म्हणजे वेळेस जो उभा असेल त्यास ती देऊन आपली मेहेनत चुकवितात. कारण जर बातमी फुटली तर कोणी शिफारशी आणितात व कितीएक अर्ज्या पडतात. तेव्हां त्या वाचावयाची एवढी मेहेनत कोण करितो, म्हणून तात्काळ भलत्या एकाद्या शुंभास ती जागा देतात. तेव्हां चांगले लोक कोठून मिळणार? कांहीं दिवस जागा खालीं राहून किंवा परिक्षा घेऊन जितके उमेदवार जमतात तितके जमूं देऊन त्यांची नीट चौकशी करून जागा द्यावी, तसें करीत नाहींत. आणि जाग्याची सोडत काढितात. येणेंकरून लोकांची अब्रू जाते आणि ठेवणाऱ्याचे बुद्धीची प्रशंसाही होत नाहीं. याचा बंदोबस्त लौकर होईल आणि उगेंच कारणाशिवाय ब्राह्मणांचे अब्रूस दूषण लावणार नाहींत, अशी आशा आहे. इंग्रज लोक फार शोधक आहेत. म्हणून त्यांस हें अवघड नाहीं. कदाचित् येविषयीं सरकार लक्ष देईल तर बरें होईल. याजबद्दल आणखी कांहीं सूचना पुढें लिहून पाठविण्यांत येतील, हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर २

लहानपणच्या लग्नापासून अडचणी

विनंती विशेष. तारीख ५ वी माहे मार्च सन मजकूरचे पत्रांत आपल्यास प्रवासी याणें पत्र लिहिलें तें आपण कृपा करून लोकांत प्रसिध्ध केलें, त्यांतील मजकूर पाहातां फार समर्पक आहे. यास्तव त्याचे अनुमोदनार्थ हें पत्रही प्रसिद्ध कराल असा हेतु आहे.

सांप्रत काळांतील लोक अल्पायुषी व रोगिष्ट असतात, असें महाराष्ट्र देशांतील लोक म्हणतात. व त्याचे प्रतिपादनार्थ वृध्ध पुरुष आंगापिंडानें सदृढ असतात त्यांचें उदाहरण दाखवितात. असें होण्याचें कारण प्रवासी याणें लिहिलें आहे, त्याजवरून साफ दिसत आहे कीं, लोकांच्या चाली आणि नीती भ्रष्ट झाल्यामुळें हा परिणाम निदर्शनास आला आहे. केवळ काळाचे सत्तेनें अशी गोष्ट घडते असें नाहीं हा तर निश्चय दिसतो. परंतु अविचारी लोक मनास येईल तसें बोलतात. आणि कारण लक्षांत आणित नाहींत. याजमुळें त्यांस आपली नीतीही सुधारतां येत नाहीं. जर लोक थोडासा विचार करितील व शास्त्राज्ञा कशी आहे तें पाहतील तर हल्लींचे उत्पत्तींतील लोकही पूर्वीचे लोकांप्रमाणें सदृढ आणि दीर्घायुषी होतील, व असें झालें म्हणजे

मोठमोठ्या कामावर मुकरर होऊन लांचेचे वगैरे मोठे बोभाट उठले आहेत. साहेब लोकांचे हातीं राज्य गेलें, परंतु ते इकडील लोकांप्रमाणें काम करण्यांत माहितगार आहेत असें नाहीं. ते विद्वान, शाहणे व निष्पक्षपाती आहेत हें खरें; पण देशाची व भाषेची माहिती नेटीव लोकांप्रमाणें त्यांस नाहीं. यामुळें नेटिव लोक जे त्यांचे हाताखालीं आहेत, त्यांचे हातीं रयतेचें वाईटबरें करावयाचें पुष्कळ असतें. गरीब लोकांस साहेबांची भेट किंवा त्यांशीं स्वस्थपणाचें भाषण होत नाहीं. तेव्हां त्यांस कामगार हेच साहेब असतात आणि हे कामदार लोक वाईट चालीचे, आशाबद्ध व द्रव्यलोभी असतात. ह्मणून लोकांस फार छळितात. त्यांतून एकाद्याचे अपराध बाहेर दृष्टोत्पत्तीस येऊन त्यांस शासन होतें; परंतु तसें सर्वांस होत नाहीं. नेटिव लोक महान् धूर्त आहेत म्हणून त्यांचे अपराध सांपडणेंही फार कठीण आहे. साहेब लोक मोठें काम ज्यास देतात त्याची हुशारी मात्र पाहातात. परंतु कामगाराचे फक्त हुशारीचा उपयोग काय? तीशिवाय दुसरे बहुत गुण त्यास पाहिजेत. मनुष्य कृत्रिम अंतःकरणी व तोंडापुढें चांगलें बोलणारा व इकडेतिकडे धांवून आर्जवासाठीं काम करणारा. तो समक्ष मेहेनत घेतो त्यामुळें इंग्रज लोकांस वाटतें कीं, हा फार चांगला हुशार आहे; परंतु त्याचें अंतःकरण मलीन व त्यास धर्मशास्त्र कळत नाहीं. त्याचा दुष्टपणा हृदयांत असतो, तो साहेबानें तोंड मागें फिरविलें पुरे कीं लागलाच प्रगट होतो. तेव्हां असे प्रकारचे लोक अधिकारावर नेमल्यावर मग त्यांचे सद्गुण ऐकावयाची आशा कोठून? परंतु येणेंकरून सर्व जातीस बट्टा लागला असें नाहीं. नेमणाऱ्याचें अलक्ष. यामुळें या गोष्टी घडतात. पुण्यांत बहुत संभावित व कुलीन व सरंजामदार व पेनशनवाले गृहस्थ आहेत. परंतु त्यांतील चांगला मनुष्य आणि विद्वान आजपर्यंत कामावर कोठें ठेवला आहे, असें जाहालें नाहीं. शाळेंतून शिकलेले, कुलीन व विद्वान् यांचेविषयीं तर सरकारानें बहुतवेळ हुकूम पाठविले आहेत. परंतु जिल्ह्यांतील साहेब लोक त्या सर्वांस येकीकडे ठेवितात. आणि आपले कुळेंतील एकादा मनुष्य त्याचें कुलशील चांगलें नसलें व अगदी कवडीचा माल असला तरी त्यास ठेऊन "रजाचा गज" करितात व याप्रमाणें कुलहीन लोक इंग्रजांचे दरबारांत फार जमले आहेत. त्यामुळें ब्राम्हण लोकांची अब्रू कमतर दिसते, हें त्यांचें दुर्दैव म्हणावें. याची तजवीज कोणी मनांत आणीत नाहींत. साहेब लोक मनास येईल तसा दोष ठेवितात, हें ठीक नाहीं. राजांनीं खराब लोक सन्निध केले तर कारभार चांगला कसा होईल? मागें कारभार अशा रितीनें चालत नवता व माधवराव पेशव्याचे वेळच्या कितीएक गोष्टी ऐकण्यांत आहेत. त्याजवरून दिसतें कीं, ब्राह्मण लोक सगळे वाईट आहेत असें नाहीं. बाजीरावाचे कारकीर्दीत बहुतेक ब्राम्हणांस नीचत्व येऊन ते दुर्गुणी झाले हें खरें आहे. तत्रापि अद्याप न्यायनिष्ठुर व योग्य असेही पुष्कळ आहेत. परंतु त्यांस परिक्षक मिळून जसें कवी म्हणतो 'काकः काकः पिकः पिकः' असें करणारे भेटतील तेव्हां व्यवस्था नीट होईल. साहेबलोक

भाषा वगैरे शिकण्याची मेहेनत करितात. तशी जर मनुष्य निवडून काढण्याची मेहेनत घेतील, तर लोकांचा फार फायदा होईल. बहुतेक ठिकाणीं असें आहे कीं, एकादी जागा खालीं झाली म्हणजे वेळेस जो उभा असेल त्यास ती देऊन आपली मेहेनत चुकवितात. कारण जर बातमी फुटली तर कोणी शिफारशी आणितात व कितीएक अर्ज्या पडतात. तेव्हां त्या वाचावयाची एवढी मेहेनत कोण करितो, म्हणून तात्काळ भलत्या एकाद्या शुंभास ती जागा देतात. तेव्हां चांगले लोक कोठून मिळणार? कांहीं दिवस जागा खालीं राहून किंवा परिक्षा घेऊन जितके उमेदवार जमतात तितके जमूं देऊन त्यांची नीट चौकशी करून जागा द्यावी, तसें करीत नाहींत. आणि जाग्याची मोडत काढितात. येणेंकरून लोकांची अब्रू जाते आणि ठेवणाऱ्याचे बुद्धीची प्रशंसाही होत नाहीं. याचा बंदोबस्त लौकर होईल आणि उगेंच कारणाशिवाय ब्राह्मणांचे अब्रूस दूषण लावणार नाहींत, अशी आशा आहे. इंग्रज लोक फार शोधक आहेत. म्हणून त्यांस हें अवघड नाहीं. कदाचित् येविषयीं सरकार लक्ष देईल तर बरें होईल. याजबद्दल आणखी कांहीं सूचना पुढें लिहून पाठविण्यांत येतील, हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर २

लहानपणच्या लग्नापासून अडचणी

विनंती विशेष. तारीख ५ वी माहे मार्च सन मजकूरचे पत्रांत आपल्यास प्रवासी याणें पत्र लिहिलें तें आपण कृपा करून लोकांत प्रसिध्ध केलें, त्यांतील मजकूर पाहातां फार समर्पक आहे. यास्तव त्याचे अनुमोदनार्थ हें पत्रही प्रसिद्ध कराल असा हेतु आहे.

सांप्रत काळांतील लोक अल्पायुषी व रोगिष्ट असतात, असें महाराष्ट्र देशांतील लोक म्हणतात. व त्याचे प्रतिपादनार्थ वृध्द पुरुष आंगापिंडानें सदृढ असतात त्यांचें उदाहरण दाखवितात. असें होण्याचें कारण प्रवासी याणें लिहिलें आहे, त्याजवरून साफ दिसत आहे कीं, लोकांच्या चाली आणि नीती भ्रष्ट झाल्यामुळें हा परिणाम निदर्शनास आला आहे. केवळ काळाचे सत्तेनें अशी गोष्ट घडते असें नाहीं हा तर निश्चय दिसतो. परंतु अविचारी लोक मनास येईल तसें बोलतात. आणि कारण लक्षांत आणित नाहींत. याजमुळें त्यांस आपली नीतीही सुधारतां येत नाहीं. जर लोक थोडासा विचार करितील व शास्त्राज्ञा कशी आहे तें पाहतील तर हल्लींचे उत्पत्तींतील लोकही पूर्वीचे लोकांप्रमाणें सदृढ आणि दीर्घायुषी होतील, व असें झालें म्हणजे

पूर्वीचे लोकांप्रमाणें पराक्रमीही होतील; परंतु असें न करितां बहुत लोक, व त्यांत मुख्यत्वेंकरून ब्राह्मण, फार वांकडे आणि अशास्त्र चालतात. हल्लीं लग्नाचे दिवस आहेत. याजमुळें कितीएक ठिकाणीं वारंवार असें पाहाण्यांत येतें कीं, मोठे मोठे संभावित गृहस्थांचा मुलगा पांच वर्षांचा झाला म्हणजे ते काळजींत पडतात. ती त्यांची काळजी दोन प्रकारची असते : एक मुलाचें लग्न लौकर कसें होईल, आणि त्यास हुंडा पुष्कळ कसा मिळेल ? यास्तव मोठा प्रयत्न करून हीं दोन्ही कार्यें साधितात. आणि सातआठ वर्षांचे मुलास बरोबरीची मुलगी मिळाली किंवा ती विद्रुप व हीन कुलोत्पन्न असली तरी द्रव्याचे आशेनें ती करितात, व मग लग्न उभें राहिलें म्हणजे आपल्यास धन्य मानून कर्ज करून पुष्कळ खर्च करितात. याप्रकारेंकरून कर्जबाजारी होऊन तें लग्न कोणीकडून तरी दगडीवर दगड घालून सिद्धीस नेतात. पुढें लवकरच प्रवासी याणें जे परिणाम लिहिले आहेत, ते निदर्शनास येतात. आणि बहुधा बापाचे, आईंचे डोळ्यांदेखत पुत्राचें व सुनेचें वांकडें पडतें. व पहिल्यानें जी जोडी गोजिरवाणी दिसते ती मग शत्रूप्रमाणें दिसूं लागते, जो विद्या करण्याचा काळ व ज्या वयांत शरीर बळकट व्हावयाचें त्या समयीं पुत्र संसारी व मुलाबाळांचा धनी होतो. मग त्याची विद्या तरी कशी संपूर्ण होईल ? आणि शरिरांत जोम कसा येईल ? घोडा किंवा बैल मेहेनतीसाठीं तयार करावयाचा असेल तर त्यास घोडीचें व गाईचें दर्शन होऊं देत नाहींत. याचें कारण हेंच कीं, मग तो वळू होईल आणि मेहेनतीचीं कामें करावयास अयोग्य होईल. तसेंच मनुष्याविषयीं आहे; कारण मनुष्य तरी एक जनावरच आहे. व या जनावरास ईश्वरानें बुद्धिकौशल्य इतरांपेक्षां अधीक दिलें आहे. असें असतां रानचे जनावरांपेक्षांही मूर्खपणानें कोणी कोणी वागतात, तेव्हां त्यांस ईश्वरानें बुध्धी विशेष व विचार दिल्याचा उपयोग काय आहे ? आणि अल्पवयांत मुलास यौवन प्राप्त आहे किंवा नाहीं याचा संशय आहे तों इतक्यांत स्त्रीविषयलुब्ध झाल्यानें त्यास दुर्गुण आणि अपौरुष प्राप्त होतें, आणि त्याचे जन्माचें सार्थक होत नाहीं. फजीती मात्र होते. आणि त्याचा बदलौकीक झाला म्हणजे सर्व कुळाचाही होतो. मग त्याचे बापानें लवकर लग्न करून शिफारस मिळविल्याचें त्यास बक्षीस काय मिळालें बरें ? व्यभिचार मात्र अज्ञानें बहुत वाढला आहे. आणि विप्रस्त्रियांनीं इतर जातींपेक्षां ताळ टाकला आहे. हें बहुधा लोक समजतात. व पूर्वीपासून बाजीराव पेशवे यांचे अमलांत लोकांमध्यें भ्रष्टाकार होऊन जी अधर्मप्रवृत्ती उत्पन्न झाली तीस लोकांचे अज्ञानानें उत्तेजन आलें आहे व येणेंकरून ब्राह्मणधर्मास फार लज्जा आली आहे. ही दूर करण्याकरितां आपलेसारख्यांनीं भगीरथ प्रयत्न केला पाहिजे. वारंवार लोकहितसंबंधी मजकूर आपण प्रगट केल्यास कालेंकरून तरी त्या गोष्टी हृदयांत ठसून नीती आणि धर्म यांचें स्थापन होईल. यास्तव ही माझी विनंती सर्व लोकांस कळवावी कीं, ज्या चाली एक वेळ पडतात त्या जरी वाईट असल्या तरी त्या लोकांस फार लाडक्या वाटतात. याजमुळें

त्यांचा त्याग करण्यास अनमान होतो. व जे लहान किंवा गरीब आहेत ते तर अगदींच धजत नाहींत; ते मोठे लोकांकडे पाहून दबतात, यास्तव कोणी संभावित लोकांनीं आरंभ केल्याशिवाय हें होणार नाहीं. महाराष्ट्र देशांत जे मोठाले गृहस्थ आहेत त्या सर्वांस बहुतकरून मुलेंबाळें आहेत. त्यांणीं ही गोष्ट मनांत वागवून केली तर इतर लोक त्यांचे पाठीमागें चालू लागतील. जसें बाजीराव याचें राज्य बुडालें तेव्हां शूरांचा फार तोटा पडला, तसें आतां इतकें मूर्खपण पसरलें आहे कीं, लोकांस मार्ग दाखविण्याजोगे शाहाणे देशांत नाहींत, असें अवर्षण कां पडलें? लहानपणीं बापांनीं आपलीं मुलें शाहाणीं केलीं तर कितीएक चांगलीं निघतील आणि लग्न हें केव्हांतरीं त्यांचे स्वसामर्थ्यानें घडेल; परंतु मुलास रोजगारधंदा नाहीं, शाहाणपण नाहीं, व पुढें कसा निघतो त्याचा अंकूर दिसत नाहीं, तों त्याचे गळ्यांत मुलगी बांधून जोखिमांत घालावा, व त्याची विद्या, आयुष्य सर्व बुडवावें, यांत काय लाभ होतो? लग्न बापानें केलें म्हणजे त्यांत काय मोक्षसाधन आहे? ज्याचा तो आपले पराक्रमानें करील तर फार चांगलें, आणि मोठेपणीं लग्न झालें म्हणजे लग्नसंबंधी शपथा व वचनें साक्षीनिशीं व ईश्वरास स्मरून घ्यावीं लागतात; तीं पुरुषाचे मनांत सार्थ वागतील, आणि त्याप्रमाणें तो वर्तेल. परंतु लहानपणीं हें सिध्दीस जात नाहीं व खाण्यापिण्याची सोय झाल्यापूर्वी स्त्री व मुलें गळ्यांत पडतात. मग त्याणें पोटास मिळवावें, किंवा स्त्रीचे बरोबर राहावें? थोडके दिवसांत पुण्यांत असा पर्याय झाला कीं, एके संभावित गृहस्थाच्या मुलानें एक गरीब व्यापाऱ्याची मुलगी फसविली म्हणून तोहमा उत्पन्न झाला होता. कोणी लबाड मनुष्य होते त्यांस सरकारांतून शासन होऊन निवारण झालें, परंतु कारण पाहिलें असता त्या स्त्रीचें लग्न झाल्यापासून नवरा बाहेर गांवीं पोट भरावयास गेला होता व त्याचे पश्चात् ती कन्या यौवनदशेस आली, तेव्हां तिणें एक द्रव्यवान् शेजारी गृहस्थ होता त्याचे संबंधानें बहुत कुकर्में केलीं. याजमुळें तो नवरा पुनः पुण्यांत आला, तेव्हां त्याणें तें वर्तमान ऐकून स्त्रीचा त्याग केला, असें ऐकण्यांत आलें आहे. तेव्हां यांत अपराध कोणाचा हें वाचणारांचे लक्षांत येईलच. माझें म्हणणें इतकेंच कीं, असे दुराचार घडतात व फार ठिकाणीं घडले आहेत, त्यांचा विचार करून जे चांगले गृहस्थ आहेत, त्यांणीं कांहीं तजवीज काढावी म्हणजे बरें होईल. नाहींतर पापवृध्दी फार होत आहे तीस कोण आवरील तो आवरूं.

लो० हि०

प्रभाकर, ता० २६ मार्च १८४८

पत्र नंबर ३

पुण्यांत लायब्ररीची स्थापना

पुणें येथील पुस्तकगृहाविषयीं वर्तमान आरंभ्यास लिहितों. पुण्यासारखे शहरांत विद्याशाळा वगैरे बऱ्याच आहेत. परंतु ग्रंथ वाचण्याची जागा अद्याप लोकांस माहित नव्हती व तिचा उपयोग कोणा नेटीव लोकांस माहित नव्हता; परंतु सांप्रतचे गवरनर साहेब सर जार्ज क्लार्क यांणीं लोकांचे सुधारणेकडे लक्ष देऊन जड्जसाहेब हेनरी ब्रौन् यास सुचविलें कीं, पुण्यांत लायब्ररी स्थापण्याचा बेत करावा. त्याजवरून त्यांनीं तारीख २८ जानेवारी सालमजकुरीं सर्व लोकांची सभा जमवून त्यांस हा मजकूर निवेदन केला. तेव्हां बुधवारचे वाड्यांतील इंग्रजी शाळेंतील अभ्यासी लोकही पुष्कळ हजीर होते. त्या सर्वांनीं अनुमोदन दिलें व अदालतीकडील चाकरमंडळी व सरदार लोक यांणींही "बरें आहे" असें म्हटलें. पुण्यांतील किती एक आळशी लोकांस लायब्ररी काय हें माहित नाहीं, याच कारणामुळें सरदार लोकांनीं व कामदार लोकांनीं उदारपणानें पैसा दिला नाहीं. तथापि अजमासें दीड हजार रुपये जमले आहेत. सभेपैकीं दाहा असामी कमेटींत नेमून लायब्ररीचे कायदे ठरविल्यानंतर पुनरपि तारीख ४ थी फेब्रुवारीस दुसरी सभा भरली. त्या वेळेस कमीटीपैकीं एके गृहस्थानें विद्येचे उपयोगाविषयीं महाराष्ट्र भाषेंत एक निबंध केला होता, तो वाचून दाखविला. पुण्यांतील बहुत गृहस्थांस सांप्रतकाळीं विद्या आणि ज्ञान काय आहे याविषयीं समजूत नाहीं. व ते आज बहुत वर्षें स्वस्थ घरीं बसून इंग्रज सरकारची देणगी खात आहेत. याजमुळें अशा कामांत ते झटून पडत नाहींत. व त्यांस कितीही समजून सांगितलें तरी, त्यांच्या ज्या जुन्याच पोकळ समजुती आहेत, त्याच ते खऱ्या धरतात. व त्या बदलण्यास बहुत दिवस पाहिजेत. याच कारणाने दुसरे सभेंत आणखी जास्त पैसा जमला नाहीं. परंतु असें ठरविलें कीं, लायब्ररीचें काम पाहाण्यास एक धाकटी कमीटी असावी. व तिचीं नांवें त्याच वेळेस लिहिलीं आणि लायब्ररीयन एक असामी नेमून बुधवारचे वाड्यांत कलेक्टर साहेब यांणीं कृपा करून जागा दिली आहे, त्या ठिकाणीं तारीख ७ वी फेब्रुवारीपासून लायब्ररी सुरू झाली. अद्याप गृहस्थांपैकीं कोणी ग्रंथ वाचावयास व ज्ञान संपादन करावयास येत नाहींत. शाळेंतील विद्वान् मंडळी, ज्ञानेच्छु व विद्याभ्यासी मात्र येतात. सरदार लोक येत नाहींत. त्याविषयीं मला असें वाटतें कीं, आम्ही थोर, चार शिपाई, घोडे, अबदागीर बरोबर घेतल्याशिवाय बाहेर कधीं पडत नाहीं. तेव्हां या लायब्ररींत मुलासारखें शिकण्यास जावयाची त्यांस लज्जा वाटत असेल; परंतु अज्ञानामुळें आणि अनश्रुतपणामुळें त्यांचीं अशी अवस्था जाहाली. तत्रापि तिचा परिहारोपाय ते ग्रहण

करीत नाहींत हें आश्चर्य आहे. ज्यास अन्नवस्त्र मिळतें ते म्हणतात कीं, आह्मांस विद्येची काय गरज आहे. व ज्यांस मिळत नाहीं ते पोटापाठीमागें लागतात. तात्पर्य, अक्कल वाढविण्याचें काम कोणाच्यानें होत नाहीं. असो. या अडचणी कांहीं दिवसांनीं दूर होतील व ज्ञानाचें संपादन नेटीव लोकांत चालू होईल. सांप्रत काळीं तर आपले शास्त्रांत व देशांत काय आहे व इंग्रज लोक हे कोठून येऊन राज्य करितात, व यांची व्यवस्था काय आहे हें कोणास माहित आहे का, म्हणून विचारलें तर 'नाहीं' ह्मणून बहुतेक शपथ करतील; तेव्हां कोण चे अमलांत आपण आहों हें ज्यांस कळत नाहीं, त्यांचें अज्ञान काय वर्णावें ? परंतु हें दूर होण्याचें साधन गवरनरसाहेबांनीं लायब्ररी चालू केली, याबद्दल त्यांचीं कीर्ति बहुत काळपर्यंत राहील, आणि आज नेटीव लोक तिचा लाभ समजत नाहींत, तरी पुढें कधीं काळीं समजून स्तुति करतील. व पुणें येथें मेहरबान ब्रौन साहेब जड्ज होते, त्यांणीं या कामास फार आश्रय दिला. त्यांचे योगानें हें काम सिद्धीस गेलें असें लोक आठवितील, अशी आशा आहे. गवरनरसाहेब यांणीं हिंदु लोकांचें अज्ञान दूर होण्याचा उपाय पुण्यांतच केला असें नाहीं. परंतु नगरासही केला आहे. व इतर ठिकाणीं जागोजागचे रसिडेंट वगैरे अधिकारी यांस तसेंच करण्याविषयीं हुकूम पाठविले आहेत. गवरनरसाहेबांचे प्राइव्हेट सेक्रटारी कपतान फ्रेंच यांणीं ही प्रवृत्ति चालू करविली, याबद्दल त्यांचेही मोठे उपकार समजले पाहिजेत. परंतु मला फार दुःख वाटतें कीं, आपले लोक ज्ञान संपादन करणें हें लहान मुलांचें काम असें समजतात, आणि शिकत नाहींत. आतां जे असें म्हणणारे आहेत, ते कांहीं जाणतात असें असतें, तर मी क्षमा केली असती; परंतु ते केवळ अडणीवरचे किंवा सांबापुढचे असून विद्येस असें तुच्छ मानितात व थोडें खावयास मिळूं लागलें म्हणजे आपली अप्रतिष्ठा होईल असें समजून वाचणें व अभ्यास करणें सोडून देतात याबद्दल वाईट वाटून त्यांचा फार राग येतो. दुसरें ज्यांजवळ द्रव्य आहे ते मदांध, त्यांस असें वाटतें कीं, आम्हांसारखे कोणीच नाहींत. विद्या काय आहे ? विद्येचें सार जें द्रव्य तें आम्हांजवळ आहे, असें त्यांस वाटतें. व ते आपल्यास सूर्यचंद्राइतके उंच समजतात. ही खोडी नेटीव लोक लवकर टाकतील तर बरें आहे; पूर्वी यांची हीच खोडी होती, परंतु ती बाहेर व्यंगोमीसारखी दिसत नव्हती. कारण पुण्यांत पेशव्यांचें राज्य होतें व त्यामुळें कितीएक प्रतिष्ठेनें पैका मिळवीत होते. म्हणून त्यांचें ज्ञान व अज्ञान आजपर्यंत दिसलें नाहीं. परंतु आतां तो समय नाहीं. आतां बाहेर काय आहे हें समजून आपली नीट अवस्था कशानें होईल हें पाहाण्याची वेळ आहे. म्हणून नेटीव लोक आतां आळस व गर्व न करितील तर फार चांगलें होईल. असो. हल्लीं लायब्ररीत ३०० बुकें आहेत व अखबारा चार आहेत. बरेंच चाललें आहे, व पुढें सुधारेल अशी आशा आहे.

लो० हि०

प्रभाकर ता० १ एप्रील १९४८

पत्र नंबर ४

शिमग्याचा दुराचार

विनंती विशेष. लोकांत वाईट गोष्टींचा परिचार त्वरित पडतो व चांगले गोष्टीचें ग्रहण होण्यास बहुत उशीर लागतो, हा एक साधारण नियम आहे. व दुसरा एक नियम असा आहे कीं, जी एकादी चाल कांहीं कारणावरून एक वेळ पडते तीच पुढें कांहीं काळानें अंधपरंपरा चालूं लागते. तसेंच हें होळीचें महात्म आह्मांस दिसतें. हल्लीं हे पांच दिवस होळीचे आहेत. हे प्रत्येक ठिकाणीं लोक अधर्मानें क्रमीत आहेत, व त्यांत मूर्ख आणि उनाड लोकच आहेत असें नाहीं. बहुत संभावित, शाहाणे व थोर लोक अंशतः त्यांत मिसळून आपला अपमान करिताहेत. तेव्हां त्यांस संभावित हें नांव शोभतें काय? नाहीं, सगळे सारखेच योग्यतेचे असें झटलें पाहिजे. परंतु हा दोष त्यांजकडे आहे असेंच केवळ नाहीं. हा संगतीदोष लहानपणापासून आसमंतात भागीं हीं दुष्कृतें पाहिल्यानें प्राप्त होतो. आणि एकदां निर्लज्जपणाच्या भावना मनांत ठसल्या म्हणजे त्या जात नाहींत. उलट्या इतक्या सुदृढ होतात कीं, आह्मी आतां लिहितों आहों, हें किती थोडयांस आवडेल आणि किती बहुतांस आवडणार नाहीं, हें आमच्यानें सांगवत नाहीं. परंतु जर त्यांणीं विचार केला तर त्यांस आम्हीं म्हणतों हें खरें वाटेल यांत संशय नाहीं. वाचणारानें असें झणूं नये कीं, माझा बाप, माझा आजा, माझे शेजारी, हे सर्व असें कर्म प्राचीन काळापासून करीत आले, व मीही लहानपणापासून त्यांतच वाढलों. तेव्हां त्याचे विरुध्ध जें हें भाषण तें उपयोगी काय? तर आमची त्यांस अशी प्रार्थना आहे कीं, तुम्हांस ईश्वरानें विचारशक्ती दिली आहे. तेणेंकरून सारासार पहा. यद्यपि शास्त्राचा आधार थोडासा असेल तरी शास्त्रांत आणखी बहुत सत्कर्में लिहिलीं आहेत. तीं सर्व तुह्मीं करितां काय? आणि जर करीत नाहीं तर मग भ्रष्टपणास मात्र शास्त्राचा आधार तुह्मीं कशाकरितां धरतां? सार कोणतें व असार कोणतें हें पहाणें तुह्माकडे आहे. ईश्वरानें तुह्मांस जिव्हा दिली आहे, तिचे योगानें कुत्सित, बीभत्स व निंदायुक्त भाषणें करितां आणि लज्जास्पद मूर्खपणाचे स्वर काढितां. हा थोरपणा काय? आम्हीं तर याला मनुष्यपणाही झणणार नाहीं. मग थोरपणा म्हणूं कोठून? रानांत जनावरें फिरतात त्यासारखे हे लोक फिरतात. यांस लज्जा कशी वाटत नाहीं? बापाचे श्राद्ध किंवा कपिलाषष्ठीचा पुण्यकाळ आला तर आनंदानें गरिबांस यांच्यानें दोन पैसे धर्म करवत नाहीं. आणि शिमग्यांत दुष्ट स्त्रियांचे पोषणाकरितां उल्हासानें हे द्रव्य देतात. तेव्हां साजिंदे व भडवे हे यांचे पूर्वजन्मींचे ऋणी असतील असें वाटतें. जितकें देऊळ पवित्र तितकेंच हें व्यभिचारगृह अपवित्र असें असून, त्यांत पापाचा सांठा करितात हें नरकाचें साधन

करितात कीं नाहीं बरें ? आमचें हें पुणें शहर मोडलें आहे, तत्रापि आपल्या लग्नाच्या स्त्रिया व सख्या [ख्या] आया यांस पोटास घालावयाची कितीएकांस भ्रांती असली तरी त्यांनीं कर्ज काढून कसबिणींच्या हातांत दोन रुपये दिले नाहींत तर त्यांस असें वाटतें कीं, आमची मंडळी ज्यांचे सोबतींत फिरतों ती आम्हांस हसेल. ही लज्जा बाळगून हरएकप्रकारेंकरून चार रुपये ते मिळवितात. आणि त्याचा पातकांत व्यय करितात. जे भले मनुष्य असतात, त्यांसही ते पिशाचरूप स्नेही नरकांत ओढितात. आणि आपल्यांस शाबास मानून असें समजतात कीं, यंदांचा शिमगा चांगला केला. आम्ही धन्य आहों. चोराचे मंडळींत जो चोरी शितापीनें करितो त्यास इतर चोर वाहावा म्हणतात. तशीच ही अवस्था आहे. याप्रमाणें पुणें शहरांत आमचे पाहाण्यांत पुष्कळ आहे. पुणें द्रव्यानें हलकें आहे खरें, परंतु दुष्कर्मांत येथील लोक द्रव्यवान् शहरापेक्षां अधिक आहेत. व बहुत लोक आपले सामर्थ्याची पराकाष्ठा करून रांडांचे ताफे बाळगण्याचा खर्च जीवादारभ्य करितात. त्यांत लहान मुलें पाहून त्यांची मला फार करुणा येते. कारण कीं, हे भ्रष्ट झालेले लोक आपले उदाहरण त्यांस देऊन त्यांसही आपले शाळेंत विद्वान् करितात.[1] नंतर ते वाढल्यावर कसे होतील याचें लक्षण सहज ध्यानांत येईल. मला वाटतें कीं, पांच दिवस हे लोक नर्कवास करितात. कारण कीं, त्यांचे कानीं, मुखीं, मनीं व चित्तीं पातकाशिवाय दुसरें कांहीं नसतें. कुरीयर नामें इंग्रजी पत्रांत असें लिहिलें आहे कीं, सरकारनें हा सण बंद करण्याचा बेत करावा. तो असा कीं, दरबारांत या सणाबद्दल सुट्या आहेत त्या बंद कराव्या व पुण्यांत रात्रीच्या तोफा बंद करतात त्या करूं नयेत. व माजिस्त्रेटसाहेब यांणीं कोणी दांडगाई किंवा वाईट भाषण अगर दंगा करील त्यास मोठें शासन करावें, हे सर्व बेत सरकारनें केले तर चांगले आहेत. लोकांस वाईट मार्गातून काढल्यासारखें होईल. परंतु सरकार प्रस्तुत असें करीलसें दिसत नाहीं. कारण सरकार स्वतंत्र नाहीं. त्यास विलायतेहून अधिकाऱ्यांचीं पत्रें वारंवार येतात कीं, हिंदु लोकांचे रिवाजास व चालीस व धर्मास अगदीं अटकाव करूं नये. आमचे लोकांचें महात्म इकडे कांहीं नाहीं तरी विलायतेस मोठें आहे, असें दिसतें. व ही मसलतीची व राज्यकारणी गोष्ट आहे. इंग्रजांस असें वाटतें कीं, जर आपण लोकांचे चालीविरुध्ध कांहीं केलें तर हिंदुस्थानचें राज्य आपलें बुडेल. व लोक आपल्यास हांकून देतील. यास्तव ते जपून चालतात. अशी त्यांची मसलत आहे. परंतु तें कसेंही असो, दुसऱ्यांनीं करूं नको म्हटल्यावर मग करूं नये, हें शाहाणपण नव्हे. चांगली गोष्ट असेल ती स्वयमेव अंगिकारावी. होळी अगदीं बंद झाली तर फार चांगलें आहे. व या दुराचारास शास्त्राची आज्ञा आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. येविषयीं आमचें मन खरें

---

१. सोळा वर्षांपूर्वी शिमग्याची मोठी धामधूम पुण्यांत असे, व इपकी मंडळी नाच, बैठका फार करीत असत त्यांस लक्षून हा लेख आहे.

आहे किंवा नाहीं हें कोणी विद्वान मनुष्य आम्हांस लिहून उत्तरीं कळवितील तर आम्हीं फार खुशी आहों. परंतु तें कसेंही असो. होळीचा मूर्खपणा इतका उघड आहे कीं, त्याविषयीं लिहिणें हे वृथा श्रम आहेत. परंतु लोकांत मूर्खपणा फार याजमुळें त्यांचे ध्यानांत येत नाहीं; व दुसरें असें आहे कीं, मूर्ख लोक यांचे हातीं द्रव्य व अधिकार फार आहेत, याजमुळें त्यांचें उत्तेजन दुष्कर्मास फार आहे. म्हणून ते सुधारणा करण्यास तुच्छ मानतात. परंतु आम्हास धीर पुष्कळ आहे, हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर ५

कन्याहत्या – गवरनरसाहेबांची बदली, व ब्राम्हण लोकांचें अज्ञान

महाराज, हिंदुस्थानांतील वाईट चाली बहुतेक बंद होत चालल्या आहेत. इंग्रजाचे अमलांतील मुलखांत हत्या व खून हिंदु लोक धर्म जाणून हमेष करीत होते. तें त्यांणीं बंद केलें. तथापि अद्याप गुप्तरूपें करून गुजराथेंत कन्याहत्या झाऊज लोक करतात. तेथील बंदोबस्त करण्याकरितां बडोद्याचे रसिडेंट व पूर्वीचे गवरनर डंकिन-साहेब वगैरे यांणीं बहुत मेहेनत केली तेव्हां कांहीं मनाई झाली, तथापि अद्यापि पोरें मारतात. त्याचें कारण असें आहे कीं, रजपूत लोकांचें राज्य एके कन्येचे हातून जाईल असें त्यांस कोणी ब्राम्हणानें भविष्य सांगितलें आहे. जसें कौंसास नारदानें सांगितलें होतें, तसें हें आहे. यास्तव ते मुली ठेवीत नाहींत. हा मूर्खपणाचा परिचार बंद व्हावा म्हणून पेशजीप्रमाणें हल्लींचे सालीं इंग्रजी व गुजराथी भाषेंत २ ग्रंथ करावे व जो चांगले करील त्यास ६०० व ४०० रुपये बक्षीस मिळतील म्हणून सरकारानें जाहिरनामा लाविला आहे.

आनरबल क्लार्कसाहेब गवरनर जाऊन त्यांचे कामावर लार्ड फाकलंड गवरनर येणार म्हणून वर्तमान ऐकिलें आहे. त्या लार्डास हिंदुस्थानप्रकरणीं माहिती नाहीं म्हणून ऐकण्यांत आहे. परंतु तो कुलीन, थोर व विल्यिम फोर्थ माजी राजा याचा जावई आहे, असें म्हणतात. हल्लींच्या गवरनरास गुणावरून नेमिलें होतें. व त्यांणीं थोडके दिवसांत सत्कीर्ति चांगली संपादन केली. आतां हे जातात, येणेंकरून लोकांस जें सुख होतें तितकें पुढें होणार नाहीं, असें दिसतें.

हिंदु लोक हे आजकाळपर्यंत गाढ निद्रेंत आहेत. ती जाण्यास बहुत ग्रंथ व बहुत ज्ञान पसरलें पाहिजे. व असें होण्यास बहुत काळ पाहिजे व त्यास मुख्य अडचण अशी

आहे कीं, सांप्रत काळचे द्रव्यवान् ब्राम्हण लोक हे यास आडवे येतात म्हणून हे लोक जाऊन नवी प्रजा होईल तोंपर्यंत हिंदु लोकांची सुधारणा होईल, असें दिसत नाहीं. इतर जातीच्चे लोक तर सांगितलेलें ज्ञान ग्रहण करावयास सिध्ध आहेत; परंतु ब्राम्हण लोक तसे नाहींत. पूर्वीपासून त्यांची समजूत अशी पडलेली आहे कीं, आम्ही पृथ्वीवर देव आहों व देवही आमचे हातीं आहेत. व आमचे आशीर्वादानें व श्रापानें पाहिजे तसें होईल. व पृथ्वीवर लोक आमच्या इतके शाहाणे कोणी नाहींत. व आमच्या देशाशिवाय पृथ्वीवर कांहीं देश नाहींत, इंग्रज लोक हे समुद्रांतील बेटांतील माकडासारखीं मनुष्यें इकडे आलीं आहेत; व रामासारखा विजयी अवतार होईल तेव्हां त्याचें सैन्य त्यांस बालवील व कंपनी सरकार ही कोणी एक स्त्री आहे, इत्यादि वेडगळपणाच्या समजुती बहुतेक ब्राह्मणांच्या आहेत. व जों जों ब्राह्मण लोक श्रीमंत होतात, तों तों ज्ञान कमी होतें. जे मोठाले सरदार व जाहागीरदार आहेत त्यांस पृथ्वीवर काय होतें याची खबर नाहीं. झोपेंत नि[न]शेंत व स्त्रियांच्या संगतींत ते निमग्न असतात. परंतु येणेंकरून काय उपयोग?

बाजीराव पेशव्यांचे शाळेंतील शिष्य बहुत जाहाले आहेत, त्यांस अतिशय गरीबी आल्याशिवाय भ्रांती जाईल असें दिसत नाहीं. जशीं नवज्वरास बहुत लंघनें पाहिजेत तसें हें आहे. विद्येचा उपयोग पोटास मिळवावयाचा इतकें मात्र लोक समजतात, पण ते मनांत असें आणीत नाहींत कीं, मागून इतके ग्रंथ व व्यासांनीं अठरा पुराणें लिहिलीं हें काय? यांस वेतन कोणी ठरविलें होतें? विद्यावृध्धीची चाल ब्राम्हणांनीं सोडली म्हणून त्यांची अशी अवस्था झाली आहे. पुढले पत्रीं आणखी कांहीं येविषयीं लिहून पाठवूं, हे विनंती.

लो० हि०

प्रभाकर, ता० २३ एप्रील १९४८

पत्र नंबर ६

शाक्तमार्ग

विनंती विशेष. हिंदु धर्मांत बहुत पंथ आहेत. मला वाटतें कीं, सरासरी शंभर एक असावे, असेच दुसरे धर्मांतही आहेत; परंतु या पंथांपैकीं एक दुर्घट पंथ तंत्राचा आहे ह्मणजे रुद्रयामल व योनीनील [योगिनी?] तंत्र वगैरे ग्रंथ आहेत त्यांत शक्ति-उपासना करण्याचा मार्ग लिहिला आहे. तो बंगाल देशांत व गौड व उडीसा प्रांतांत

पूर्वीपासून चालतो. तेथील लोक शक्तिउपासना तंत्राधारानें करितात. ह्मणून या देशांत ते लोक मंत्री व सामर्थ्यवान् आहेत, अशा गप्पा फार आहेत. त्यांचें खरेंपण किंवा खोटेंपण काय असेल तें असो. त्याचा विचार मी सांप्रत करीत नाहीं. परंतु मला बहुत खेद होतो कीं, तो पंथ आलीकडे दक्षिणेंत पुणें इत्यादि ठिकाणीं बहुत चालूं लागला आहे. त्याचें कारण पाहिलें असतां लक्ष्मी प्राप्त व्हावी, पुत्रकामना इत्यादिक वासना तृप्त व्हाव्या, म्हणून उपासना करितात असें शाक्त सांगतात; परंतु मला वाटतें कीं, तें कांहीं नाहीं.

त्यांचीं मद्यमांस खाण्याचीं व्यसनेंच प्रमुख आहेत. तीं पुरतीं होण्याकरितां निमित्त करून कितीएक निर्लज्जपणानें आपले घरीं दारूचे कारखाने करून मद्य तयार करितात. व कितीएक विकत घेतात व ते जरी गुप्तपणानें असें करितात तरी त्यांचे श्रीमुखाची दुर्गंधी जेथें बसतील तेथें प्रगट होऊन हे शाक्त आहेत, असें सर्वांस समजतें. व कितीएक मस्त होऊन घरीं व रस्त्यांत सांपडतात. या गोष्टी प्रसिध्ध आहेत. परंतु त्यांच्या प्रतिबंधाचा उपाय कोणी लोक समजून करित नाहींत. किंबहुना त्याजवर झांकण घालून जो तो म्हणतो कीं, हें अपेश डोकीवर कोणी घ्यावें ? हें कलियुग आहे. मी तुम्हास थोडासा या प्रकरणाचा इतिहास कळवितों, तो मी श्रमेंकरून समजून घेतला आहे. यास्तव हा दुष्ट पंथ सुटण्याकरितां प्रगट व्हावा. या पंथांतील लोक आहेत त्यांस वाममार्गी किंवा वामाचारी असें म्हणतात. आणि शाक्त हेंही नांव त्यांचें प्रसिध्ध आहे. प्रथमतः ज्यास मद्यमांस खावें अशी बुद्धी होते तो जे दुसरे वाममार्गी आहेत त्यांचे भजनास लागतो, नंतर ते एक दिवस बहुधा अमावास्या किंवा आंधारी रात्र अशी योजतात, आणि त्या दिवशीं त्या उमेदवारास आपले धर्मांत घेण्याचा संस्कार करितात. तो असा कीं, त्या दिवशीं मध्यरात्रीस आठ असामी वाममार्गी आणि आठ स्त्रिया एक एक वेगळाले जातीची असावी, म्हणजे विधवा ब्राह्मणी, परिटीण, न्हावीण, कळवांतीण, गौळीण, कोष्टीण, सोनारीण, ब्राम्हणी सुवाशीण; एकूण आठ त्या गुरूच्या घरीं मिळोन येतात; आणि तेथें स्थंडील घालून आठ कलश मद्याचे व मांस असें मांडतात, अग्नि पेटवितात आणि त्याजवळ काली म्हणजे देवीची मूर्ति मांडितात, नंतर प्रत्येक पुरुष प्रत्येक स्त्रीचे शेजारीं बसतो आणि पूजा करितात, नंतर प्रतिज्ञा करवितात कीं, मी आजपासून जातीनिषेध मानणार नाहीं व मद्यमांस भक्षीन व स्त्री स्वकीय किंवा परकीय यांचे ठायीं निषेध किंवा व्यभिचार मानणार नाहीं. मला सर्व सारखें आहे. येणेंकरून मला भगवती मेल्यावर मोक्षास नेवो, आणि या जन्मीं सुखसंपदा देवो, अशी प्रार्थना व प्रतिज्ञा करितात. नंतर पूजा संपूर्ण झाली म्हणजे तंत्र-शास्त्रांतील कांहीं उपदेश करितात. आणि नित्य पूजेचा मार्ग सांगतात. या नंतर तो वामाचारी दीक्षित झाला. मग त्याणें पुनरपी अंधेरे रात्रीस पूजेचा बेत केला म्हणजे तशा स्त्रिया जमवून ते सोबती जमवून बसावें; आणि स्त्रियांस ते भैरवी ह्मणतात व

आपल्यास भैरव म्हणतात व दारूस सिद्ध म्हणतात. अशीं विलक्षण नांवें घेऊन कोणी नग्न होऊन नग्न स्त्रियांची पूजा करितात. आणि तिचे ठायीं देवीचें स्थापन करितात. कितीएक व्यभिचार करितात आणि कितीएक महार किंवा मांग यांचे हातचें जेवतात. शिवरात्रीस व एकादशीस देखील अशीं कर्में करितात. आणि त्यांचे श्राणखी पुष्कळ विधी आहेत. कोणी आपले कपाळीं कुंकूं लाऊन तांत्रिक तिलकाची खूण बाळगतात; कोणाची खूण तोंडाची घाण असत्ये, मग ते आपल्या मंडळींत आपल्यास मोठे सामर्थ्यवान् ह्मणवितात. कोणी म्हणतात, आह्मीं ज्यास शाप देऊं त्यास मारूं; कोणी म्हणतात कीं आम्हांस देवी दिसते; कोणी म्हणतात, कीं आह्मी जें चिंतूं तें कार्य करूं. अशीं अनेक प्रकारचीं कर्में ते आपल्या अंगीं भासवितात, परंतु वागवीत नाहींत, तेणेंकरून लोकांत निंदेस मात्र पात्र होतात. असे भ्रष्टाचार हल्लीं ब्राह्मण लोकांत चालूं लागले आहेत. त्यांनीं वैदिक मार्ग, अग्निहोत्र, ज्ञानप्राप्ति, वेदपारायण, पुराणमार्ग, शालिग्रामपूजा, इत्यादिक धरून स्वस्थपणानें भगवंताचें भजन करावयाचें, तें सोडून या नरकवासरूप पंथांत पडून राहिले आहेत. मला तर वाटतें कीं, याचें साधन नर्क मात्र आहे. असे जे दुष्ट लोक नीती भ्रेष्ट करतात त्यांस ईश्वर शासन केल्याशिवाय राहाणार नाहीं. पेशव्यांचे राज्यांत ब्राह्मण धर्माचा कांहींसा बंद [ध] होता. कारण कीं नियंते [ते] होते; परंतु हल्लीं तर ब्राह्मण अतिशूद्रापेक्षांही वाईट कर्में करितात. त्यांस कोणी शासन करणार नाहींसा झाला आहे. जे चार गरीब आहेत ते भितात कीं, कोणी अब्रूची अर्जी कोडतांत करील, मग हुकूमनामा होईल, हे कष्ट कोणी भोगावे? परंतु मला वाटतें कीं, अद्यापि वाममार्गी ब्राह्मण फार नाहींत, दक्षिणमार्गी जर सगळे जमले तर त्यांस ताव्यावर आणावयास उशीर नाहीं. कितीएक लोकांनीं जेवावयास जाणें सोडलें व कितीएक घरांत बसतात. कोणाच्या घरीं जात नाहींत, असे त्रासले आहेत. परंतु कोणामध्यें असा धीर होत नाहीं कीं, सर्वांस बोलाऊन त्याचा निबंध करून बंदोबस्त करावा आणि मूळचे पवित्र स्थितीवर ब्राह्मणधर्म आणावा, ह्मणजे शुध्ध ज्ञानमार्ग शास्त्रविचार, परमेश्वराचें आराधन करणें, इत्यादिक मार्ग स्थापावे, आणि मंत्रतंत्र व जारणमारण इत्यादिक गोष्टी किमयासारख्या अशक्य, परंतु अडाणी लोकांस भुलवण्याकरितां ब्राह्मण लोक प्रतिष्ठा दाखऊन दुष्ट कर्में करितात, हीं एकदम बंद होतील तर चांगलें आहे. पूर्वी इराण देशांत असा एक मजदाद नामक खोटा पैगंबर होऊन व्यभिचार नाहीं, असें मत चालू करीत होता. परंतु नशरिवान् राजानें त्यास फांशीं दिलें तेव्हां तें मत आटपलें; तसें या दुष्ट वाममार्गी लोकांस मोठें शासन झालें पाहिजे व त्यांचीं घरें व रात्रीच्या बैठका यांचा पत्ता लाऊन नीतीचें रक्षण करावें हें चांगलें.

---

१. या काळीं पुण्यांत शाक्तमार्ग फार लोकांनीं घेतला होता. त्यांस लक्षून हें पत्र आहे. हा मार्ग पुढें कृष्णभट गोखले याणी खटपट करून मोडला.

नाहीं तर काय होईल तें ईश्वर जाणें. मनुष्याची कल्पना चालत नाहीं. आणखी याविषयीं पुढें मजकूर लिहूं.

लो० हि०

पत्र नंबर ७

छापण्याची कला आणि म्हातारपणीं लग्न

छापण्याचे कलेचा उपयोग आतां बहुत लोकांस कळूं लागला आहे, व तेणेंकरून बहुत लोकांचे डोळे उघडूं लागले आहेत. जसें दोन मनुष्य जवळजवळ बसून भाषण करितात, त्याप्रमाणें सांप्रत सर्व देशांतील मनुष्यें स्नेह असो अथवा नसो, परंतु त्यांचे मनोभाव बहुत अंतरावर दृष्टीस पडतात व आपले पत्रद्वारें लोकांचीं संभाषणें उघडपणीं चालतात. आमचे मुखांतील ही लघु जिव्हा व आपलें पत्र हें बृहत्तर जिव्हा असें समजलें पाहिजे. कारण कीं, त्यांचे द्वारें दूरदेशींचें भाषण ऐकावयास येतें, व प्रति-उत्तर देतां येतें. असें हें परस्परें मनांतील अन्वय कळविण्याचें द्वार आहे. याचा उपयोग जसा इंग्रज लोक करितात तसा आपले लोक करून शाहाणपणा वाढवितील तर फार चांगलें होईल. आणि हा समय असा आहे कीं, आतां आपले मनांतील गोष्ट उघडपणीं निर्भयपणानें सांगतां व कळवितां येते. असें पूर्वीं नव्हतें. मागील राजे असे लोकांचे भाषणास मोकळीक देत नव्हते. परंतु राज्याविषयीं व धर्माविषयीं व आणखी कितीएक प्रकरणाविषयीं लोकांस बोलण्याचा प्रतिबंध होता. कितीकांच्या जिव्हा व हात तोडले जात होते. पेशवाई कारकीर्दीत कोकणांत एक मामलेदार होता, त्याचें कर्म असें ऐकण्यांत आहे कीं, एक स्त्री त्याचा जुलूम पाहून 'तुझे अमलाला आग लागो' असें म्हणाली. तेव्हां त्या ब्राह्मण सुभेदारानें त्या स्त्रीचे आंगास लोकर वगैरे जळावयाजोगे पदार्थ बांधून त्याला आग लावली. अशी क्षुल्लक अपराधाकरितां स्त्रीहत्या केली. ही एकच गोष्ट नाहीं. अशा मी कितीएक सांगेन, परंतु सांगण्याचें प्रयोजन नाहीं. आपल्या लोकांस त्या चाली माहित आहेत. तेव्हां या दृष्टांतावरून हल्लीं छापखान्याचा किती फायदा आहे कीं, त्या द्वारानें वाजवी गोष्ट पाहिजे त्याणें लिहून कळवावी. वाईट चालीची निंदा करावी, चांगल्या गोष्टी सुचवाव्या. सरकारा-विषयीं व इतर कारभाऱ्याविषयीं सुलभपणानें व मोकळिकेनें बोलावें. अशी मोकळीक मागें कधीं तरी होती काय? पूर्वीं सर्व गोष्टी चोरीनें व गुप्तपणानें होत होत्या. व सरकारच्या गोष्टीविषयीं कोणी बोलतां कामास नये. बाजीराव पेशव्याचे अमलांत दप्तरांतील कांहीं बातमी फुटली म्हणून तीस कारकून एकदा किल्ल्यावर टाकले, असा प्रतिबंध होता तेव्हां

आतां लोकांचे हिताचा समय आहे. परंतु सर्वांनीं असें मनांत आणिलें पाहिजे कीं, 'तापीतीरवासी' याणें तारीख १९ वी मार्च रविवारचें पत्रांत मजकूर कळविला तो पाहून मला वाटतें कीं, याणें जें लिहिलें आहे तें सर्व यथास्थीत आहे. लग्नासारिखे स्वसत्तेंतील कामांत सरकारचा उपद्रव येणें हें अगदीं ठीक नाहीं. पूर्वीपासून लग्नाविषयीं जो मजकूर आपले पत्रांत छापत आहे, त्याजवरून लोकांची खात्री होईल व पुढेंही खात्री करण्याकरितां उद्योग चालऊन स्वइच्छेनें अशा सुधारणा व्हाव्या हें चांगलें. केवळ जबरदस्तीनें लोकांकडून पूर्वीपासून चालत आलेली चाल मोडऊन नवी रीती काढणें हें योग्य नाहीं. अशा गोष्टी लोकांनीं समजुतीनें मोडाव्या हेंच बरें. परंतु कोणी असें म्हणतील कीं, हिंदु लोक इतके शाहाणे नाहींत, तर काय चिंता आहे? आजचें उद्यां होईल. पण आणखी आणखी सरकारचे हातांत जाणें हें त्या उशिरापेक्षां वाईट व जें जबरीनें चालू झालें त्याचा खचितपणा नाहीं. ज्याकाळीं जबरी येकीकडे होईल, तेव्हां पुनः लोक पूर्वीप्रमाणेंच करूं लागतील. तेव्हां उत्तम मार्ग हाच आहे कीं, ही गोष्ट लोकांचे मनांत अनेक तऱ्हेनें भरऊन द्यावी आणि हें काम समंजस पंडित आहेत त्यांचें आहे. आणि स्वसंतोषानें लोक समजूं लागले म्हणजे पहिली चाल मोडून नवी चालू करतील. आणि कितीएक देशांत असें झालें नाहीं काय? पुष्कळ ठिकाणीं झालें आहे. असें करण्याविषयीं मी एक सूचना अशी करितों कीं, मोठे मोठे शास्त्री अगदीं सुज्ञ नाहींत असें नाहीं. त्यांणीं बरे ही गोष्ट डोकीवर घेऊन सभा जमऊन ठरवावी. लग्नकार्य झालें म्हणजे दोन पैशाचे आशेनें शेकडों ब्राम्हण जमतात व उड्या घालतात. मग असे लोकहिताकरितां द्रव्याशा सोडून वर्षांत एक दिवस कां जमत नाहींत? जर असे चार सभ्य जमतील तर अशी गोष्ट ठरावांत सहज येईल. परंतु मला वाटतें कीं, सांप्रतकाळीं धैर्यवान् लोक थोडे आहेत. सर्व आपले पोटाचा विचार पाहातात. हल्लीं पुण्यांत कितीएक लग्नें होत आहेत. त्यांत असें पाहाण्यांत येतें कीं, पन्नास-साठ वर्षांचे पुरुष मरणोन्मुख व गंतुकाम झाले तरी तरुण स्त्री करावयाची इच्छा करितात. व आर्जवी जोशी त्यांस सांगतात कीं, अमकी मुलगी करा, तिचे जातकांत वैधव्य नाहीं व तुमचें आयुष्य शाहाण्णव वर्षें आहे; असे हे जोशी नादीं लावून मुलींचा घात करतात. असल्या कर्मास काय म्हणावें? त्या लग्न करणाऱ्यास, मुलींचा विक्रय करणाऱ्यास व भटास धिक्कार असो; मागाहून आणखी लिहिण्यांत येईल.

लो० हि०

ता० ७ माहे मे, सन १८६३

पत्र नंबर ८

जुन्या समजुती

आमचे लोकांच्या पुष्कळ मूर्खपणाच्या समजुती आहेत व इतकी ज्ञानाची प्रसृती झाली आहे, तरी लोकांचा वेडेपणा अद्यापि दूर झाला नाहीं. माझे आढळण्यांत ज्या समजुती आल्या आहेत, त्यांची आपले पत्रद्वारें एक यादी प्रसिध्ध करून असें इच्छितों कीं, कोणी समजदार मनुष्य असेल त्याणें त्याविषयीं प्रतिपादन किंवा निषेध करावा. मला वाटतें कीं, या समजुती मूर्खपणाच्या आहेत किंवा शाहाणपणाच्या आहेत, याचा निश्चय झाला म्हणजे संशय जाईल.

१ ब्राम्हणाशिवाय अन्यवर्णानें विद्या करूं नये. संस्कृत विद्या येकीकडेच आहे; परंतु एकादा मराठा किंवा इतर जातीचा कारकून ब्राम्हणांनीं पाहिला म्हणजे त्यांचे अंगाचे तिळपापड होतात हें काय?

२ ज्ञान व विद्या वाढवूं नये. कारण शाहाणे व वेडे एका दरानें विकतील, असें भय बागळतात.

३ जरी कोणी अपराध करूनही ब्राम्हणांचीं घरें भरलीं तरी त्यास पुण्यवान् असें जाणतात. याचें उदाहरण, बाजीराव पेशवे. यांचे अपराध कोणी मनांत आणीत नाहींत, व ब्राम्हण प्रजा त्यास योग्य मानितात.

४ देवब्राम्हणांकरितां कशींही कर्में केलीं तरी चिंता नाहीं. यास उदाहरणें, कबीरानें साधूस जेवण देण्याकरितां चोरी केली, इत्यादि.

५ ज्या यंत्रानें बहुत लोकांचें काम थोडे माणसांचे हातून करितात तें चालू करूं नये. म्हणजे डाक, छापखाना, टंकसाळ हे कारखाने लोकांचें पोटिस्त बुडविणारे म्हणून त्यांचा द्वेष करितात.

६ सरकार करील तें करील. सत्तेपुढें शाहाणपण नाहीं.

७ सर्व गोष्टी नशिबानें घडतात. शाहाणपण व उद्योग यांचा उपयोग नाहीं.

८ सर्व सुख द्रव्यापासून आहे. त्या पलीकडे सुख नाहीं, व सर्व गुणांचेंही अधिष्ठान तेंच आहे.

९ विद्या पोट भरावयाकरितां शिकावी, व ती श्रीमंतांहीं शिकणें जरूर नाहीं.

१० देशाचार, वृद्धाचार, शिष्टाचार, इत्यादिक जुन्या चालीविरुद्ध आचरण करूं नये. मागील चाल चालत आली ती चालवावी. याविषयीं आग्रह धरितात.

११ वाईट गोष्ट असेल आणि ती चार लोकांचें पोट भरण्याचें साधन असेल तर मोडूं नये.

१२ घर सोड्रन बाहेर जात नाहींत व मुलांस वगैरे घरीं वाळगण्याविषयीं फार उत्कंठा धरितात.

१३ मुलें, नातवंडें झालीं म्हणजे जन्माचें सार्थक झालें, असें वडिलांस वाटतें. यास्तव मुलांचीं लवकर लग्नें करितात.

१४ इंग्रजांचें राज्यांत पैशास बरकत नाहीं. पाऊस कमी व जरीमरी फार म्हणतात. व याचें कारण देवताक्षोभ झाला आहे, व इंग्रजांचे कायदे व रीती वाईट आहेत म्हणून समजतात.

१५ ब्राम्हणानें अपराध केला तरी त्यास शासन करूं नये, व त्याचें सर्वस्वी चालविण्यांत माहापुण्य आहे असें मानतात.

१६ धष्टपुष्ट ब्राम्हणास केला तरी तो धर्म, परंतु आंधळ्या कुळंब्यास किंवा लंगड्या माहारास दिलें तर तो धर्म नव्हे.

१७ पहिल्या लढाया व दंगे वगैरे होते तेव्हां शिपायांचें पोट भरत होतें. आतां जिकडे पाहावें तिकडे सामसूम झालें आहे. हें वाईट, असें कित्येकांस वाटतें. कुळंबी माजले व ब्राम्हण त्यांचे बरोबर झाले हें वाईट वाटतें.

१८ उद्योग न करावा हें थोरपणाचें चिन्ह व थोरांनीं वेडे, भोळसर असावें व द्रव्याचा उपयोग इतकाच कीं, चार लोकांचें चालवावें. स्वस्थ खावें व निजण्यांत व स्नानसंध्येंत आयुष्य घालवावें, हाच थोरपणा असें समजतात.

१९ संस्कृत विद्येखेरीज बाकीच्या विद्या व भाषा नर्काचें साधन आहेत.

२० स्नानसंध्येचा डामडौल करील तो धर्मशील आणि पुण्यवान्. मग त्याची वर्तणूक कशीही असो.

२१ स्त्रियांना विद्या शिकवूं नये, कारण व्यभिचार अधीक वाढेल.

२२ थोडा पराक्रम व थोडीसी ब्राम्हणांवर भक्ती केली म्हणजे ईश्वराचा अवतार म्हणोन त्याची लोकांत प्रसिध्धी होते. जसें शिवाजी भवानीचा अवतार, माधवराव पेशवे विष्णूचा अवतार इत्यादि.

२३ मुलगा झाला तर संतोष. मुलीचा संतोष नाहीं अशी रूढी आहे.

२४ स्त्रियांचा पुनर्विवाह करूं नये. कारण कीं जिच्या प्रारब्धीं सुख असेल तिचा नवरा मरणार नाहीं; जी अभागी तिचा मरतो.

२५ नवसानें देव पावतो. व मनुष्याचे सुखदुःखावर नवग्रहांचा अमल चालतो म्हणून त्यांचे नांवानें ब्राम्हणास दानें वगैरे केलीं म्हणजे पीडा दूर होते. तसेंच दुःशकुन मानणें, इत्यादि.

२६ स्वार्थ पाहावा. लोकांची काळजी करूं नये. या अर्थाची म्हण आहे कीं, लष्करच्या भाकऱ्या कोण भाजतो, राजाचीं लेकरें काय खातात, त्याची चौकशी कशास. या समजुतींत हिंदु लोक सांप्रत परदेशांतील व स्वदेशांतील

वर्तमानास गैरमाहीत. पलीकडचे घरीं काय होतें त्याची काळजी शेजारी करीत नाहीं.

२७ आपल्या पाठीमागें कसें होईल याची काळजी करूं नये. 'आपण मेला जग बुडाला' इत्यादि म्हणी आहेत.

२८ पुष्कळ पैसा उधळला म्हणजे लोकांत कीर्ति होते. मग तो पैसा कोठूनही येवो.

२९ यत्किंचित कारणाकरितां खळवाद करितात; आणि भिकारी होतात, पण त्यास सोडीत नाहींत.

३० परक्याजवळ हात जोडून राहातात, पण आपले स्वकीयाशीं लढाई करितात; अशी चाल आपले लोकांची आहे. आपसांत प्राण देऊन भांडतात, पण परक्याच्या लाथा सोसून नम्र राहातात.

एकूण तीस प्रश्न मीं घातले आहेत, हे ज्यास अमान्य असतील त्याणें लिहून कळविल्यास मला फार संतोष होईल. परंतु यासमयीं मूर्खपणाच्या समजुती इतक्या दृढ आहेत कीं, त्यांस असें वाटेल कीं, काय हे प्रश्न ! यांचीं उत्तरें काय द्यावयाचीं आहेत ! पण तसें नव्हे. या गोष्टी मोठ्या आहेत व लोकांच्या गैरसमजुती जाव्या व त्यांणीं सुज्ञ व्हावें, अशी इच्छा ज्यास असेल त्यासच हें पत्र आहे. इतर जे लक्ष्मीचे बंधू आहेत त्यांचा हिशेब व गणना आमचे मतांत मुळींच नाही. ते बोलले सारखे, न बोलले सारखे. ही विनंती

लो० हि०

ता० ७ मे, सन १८६३

पत्र नंबर ९

नेटीव अंमलदार

विनंती विशेष. आपले मागील पत्रीं 'एक हिंदु' या सहीचें पत्र छापलें होतें. त्यांत बहुतकरून बोभाटाचा मजकूर लिहिला होता. तो सर्व तथ्य नसला तरी कांहीं खरा आहे. नेटीव लोकांमध्यें विद्वान मुळीं थोडे, आणि जे वास्तविक विद्वान व गुणी आहेत, त्यांची प्रतिष्ठा इंग्रज सरकारांत होते. एकादे वेळीं विरुध्ध गोष्ट झाली म्हणून तेंच प्रमाण धरूं नये. सामान्यतः वहिवाट असेल ती लिहिली पाहिजे, हें एक. दुसरें असें आहे कीं, इंग्रजी शाळेंत वगैरे जे लोक अभ्यास करितात, त्यांत इंग्रजी लिहिणार असें नांव मिरवणारे पुष्कळ असतात. घरांत खुर्ची, मेज, पिसें व बुकें आलीं म्हणजे आई-बाप

व शेजारीपाजारी सर्व त्यास इंग्रजी लिहिणार व शाहाणा, असें समजतात. परंतु वास्तविक पाहिलें तर त्यास वाचल्याचा अर्थही कळत नाहीं; आणि ग्रंथावलोकन केलेलें नसतें; इतिहास, विद्या, शास्त्रें यांचा अभ्यास नसतो. इंग्रजी विद्या समुद्रासारखी आहे. परंतु दोन बुकें वाचतां आलीं व चार बिरखुड्या ओढतां आल्या, म्हणजे कानावर पागोटें, खिशांत रुमाल आणि हातांत सोटा असे वेश पुष्कळ घेतात; परंतु त्याणें ते विद्वान होत नाहींत. शाळेंत शिकलेले सर्व शाहाणे आहेत असें नाहीं. "सहस्रेषु च पंडितः" असें कवीनें म्हटलें आहे. इंग्रज लोकांतील साधारण मनुष्य जरी असला तरी हिंदु लोकांपेक्षां तो सहस्र गुणांनीं श्रेष्ठ आहे. व तुम्हांस असेंही वाटूं देऊं नका कीं, विद्वान नेटीव पुष्कळ जाहाले तर त्यांस मोठ्या जागा मिळणार नाहींत. कारण कीं, विद्या शिकण्याचें अक्षीस विद्या हेंच आहे. व ज्ञान हीच शक्ती. मोठे धुरंधर विद्वान शेदोनशे होऊं द्या आणि मग मोठ्या चाकऱ्या मिळतील किंवा नाहीं पाहा! जर इंग्रज न देतील तर ते विद्वान हरएक प्रयत्नेंकरून त्या मिळवितील. एकमत हीच शक्ती आहे. शहाणपण असेल तर पैक्यास तोटा नाहीं. एक विद्वान झाला असेल आणि त्यास मोठी प्रतिष्ठा मिळाली नसेल तर आश्चर्य नाहीं. कारण कीं, अशी परीक्षा होत नाही. हें प्रयत्नाचें काम आहे. काळेंकरून याचा फायदा होतो. व इंग्रज लोकांस तरी इतबार आला पाहिजे, तेव्हां ते अधिकार देतील. आज नेटीव लोकांचा इतबार मोठा नाहीं. कारण कीं, शंभर नेटीव कामगारांस जर दिव्य दिलें तर पांच पार पडतील कीं नाहीं, न कळे. व परकी इंग्रज नेहेमी ढेकणासारखे त्यांस चिरडतात. व कितीएकांचा फडशा झाला आहे. असें जरी आहे, तरी जे नेटीव कामगारांशीं संबंध ठेवितात, त्यांस त्यांचीं कर्में विदित आहेत व नेटीव कामगार यांजमध्यें चांगला गुण कोणचा असतो, हें तरी मनांत आणा. ते बहुतकरून अविद्वान्, ढोंगी व लबाड असतात. कोणी मागल्या अवस्था पाहून कांहीं दिवस नीट चालतात; परंतु मग त्यांचे मनांत असें येतें कीं, आतां मला काय भय आहे, मी आतां श्रीमंती भोगावयास शिकतों. खर्च तरी कसा निभेल, असा विचार करून पहिल्यानें भयानें व लज्जेनें खऱ्याकडून पैका घ्यावयास आरंभ करितात. व मग एकदा सवय पडली म्हणजे आंगवळ्यास पडतें. नंतर लिलाव सुरू करितात. म्हणजे जो अधिक बोलेल त्याचा फैसला होतो. अशा तर गोष्टी हमेशा पाहाण्यांत येतात. व डौल करणारे हे लोक असे आहेत कीं, आपली योग्यता व थोरपणा कांहीं जाणत नाहींत. यांनीं कचेरींतून घरीं जातांना रोज १५।२० शिपाई बरोबर नेत असावें आणि त्यांमध्यें आपण झुलत झुलत मोठे डौलानें चालावें म्हणजे घरच्या बायका किंवा रांडा यांणीं आपले यजमानास पाहून धन्य मानावें, अशाकरितां हे प्रयत्नानें शिपाई मिळवितात. व पुढें चालवितात. असे कांहीं चमत्कारीक रिवाज या मूर्ख लोकांचे आहेत. त्यांस असें वाटत नाहीं कीं, सरकारी चाकर हे विनाकारण मी आपल्या जवळ कशास ठेवावे, हे जर आपले आपले कामावर जातील तर कितीएक लोकांचीं कामें

आठ दिवसांनीं व्हावयाचीं तीं उद्यां होतील. व आपण कैदी नाहीं, तर आपणा भोवते इतके शिपाई कशास पाहिजेत? परंतु मला वाटतें कीं, पुढें जें होणार त्याचें ते चिन्ह दर्शवितात. तात्पर्य, सांप्रत नेटीव अंमलदार आहेत हे मूर्ख आहेत. यांस इंग्रज आतां चाकऱ्या देतात, एवढ्याही देण्याची योग्यता यांजमध्यें नाहीं; परंतु इंग्रज मेहेरबानी करितात. मीं एकदा खेड्यांत एका कुळंब्याचे तोंडानें ऐकिलें कीं, साहेबाचें राज्य चांगलें, साहेब न्याय इनसाफ चांगला करितो, पण ब्राम्हण लोक त्यास शिकवून आमचीं घरें बुडवितात. आणि बहुतकरून सर्व रयतेची समजूत अशीच आहे, आणि ती खरी आहे. हे हलकट लोक फार प्रलय करितात, आणि त्यांस आशा फार; म्हणून जोंपर्यंत नेटीव लोक दुर्गणी व लोभी आहेत, तोंपर्यंत त्यांचा पक्षपात कोणी धरावा?

लो० हि०



ता० १४ माहे मे, सन १८४८

पत्र नंबर १०

पुनर्विवाह

सांप्रत आपले लोकांमध्यें हा केवढा अनर्थ आहे कीं, स्त्रियांस पति वारल्यावर पुनरपि लग्नें करूं देत नाहींत. ईश्वरानें स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले. व उभयतांचे अधिकार समसमान आहेत. असें असतां पुरुषास पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई हा केवढा जुल्म आहे. चार शाहाणे लोक मनावर घेऊन हें कार्य करतील तर कितीएक जीव विनाकारण दुःखांत व अपराधांत पडत आहेत त्यांचें संरक्षण होईल. पण हें भाषण साधारण लोकांचें कर्णीं पडलें म्हणजे त्यांस असें वाटेल काय? नाहीं; ते म्हणतील कीं, आम्ही भूदेव, आमचें शास्त्र ईश्वरोक्त आहे. त्याचें उल्लंघन आम्ही करणार नाहीं, व काशीपासून रामेश्वरापर्यंत ब्राम्हणांचा दबदबा आहे, तो जाऊन लोक थट्टा करतील; व जुने चालीस विरुध्ध येईल. आणखी ते म्हणतात कीं, त्यांत काय आहे? ज्या स्त्रीच्या नशीबीं सुख नाहीं तिचाच नवरा मरतो, अशीं मूर्खपणाचीं प्रमाणें दाखवितात. परंतु त्यांस असें समजत नाहीं कीं, आमच्या ज्या कन्या त्यांचें रक्षण करण्याचा आमचा धर्म असून त्यांचा असा घात आम्हीं करूं नये व आमचे लोकांमध्यें पुष्कळ शास्त्रजाणते व ग्रंथ पाहाणारे व विद्वान् म्हणून मिरविणारे आहेत. परंतु त्यांस खरे विद्वान असें कोणी म्हणेल काय? नाहीं. ज्यांस आपण सुखी कोणच्या रीतीनें होऊं हें कळत

नाहीं, व जे आपले कन्यांचा सर्वस्वी घात करितात, ते विद्वान् कशाचे? हा एक चमत्कार आहे कीं, पांच वर्षांपासून पंधरा वर्षेंपर्यंत कन्येचा पुनर्विवाह करावा म्हणून शास्त्राज्ञा आहे; परंतु ती देखील मानीत नाहींत. शास्त्राज्ञा आहे ती झांकून ठेवितात. हा केवढा अनर्थ आहे? अहो लोकांनो! तुम्ही आपले कन्यांचे वध करणारे आहांत. सांप्रतचे ब्राम्हणांस शिकवणें फार अवघड आहे. चालीविरुध्ध गोष्ट त्यांचे कानीं पडली म्हणजे ते नाक मुरडितात, आणि म्हणतात, छेः हें काय? त्यांत काय आहे? पूर्वापार चालत आलेली चाल असून तीस विरुध्ध कसें बोलतां? आमचे वडील तर लक्षावधी रुपये मिळवीत होते, आतां आम्ही हलके अवस्थेप्रत पावलों म्हणून अशी बुध्धी झाली. जसा एकादा पहिलवान् एक पल्ला ओझें उचलणार असतो, आणि त्यास क्षयरोग झाला म्हणजे तो औषध घेत नाहीं. तो म्हणतो कीं, "अरे, माझें पल्लाभर उचलावयाचें बळ होतें तेव्हां मी औषध घेतलें नाहीं आतां मी थकलों आतां मी औषध घेऊं काय? मी कधीं घेणार नाहीं." आणि औषध तुच्छ मानून जरजर होऊन मरण पावतो. तसे ब्राम्हण लोक मूर्ख होऊन विचार करितात आणि म्हणतात कीं, "अहो, आमचे पूर्वज विश्वामित्र त्यांणीं नवी सृष्टि केली; अगस्तीनें समुद्र प्राशन केला, दुर्वासाचे शापानें विष्णूनें दाहा जन्म धारण केले व भृगूनें लक्ष्मीनारायणास लाथ मारली, असें आह्मी देवाचे देव आणि सर्वांहून वरिष्ठ, आम्हांस शहाणपण शिकवावयास कोणी समर्थ नाहीं."

"अरे अरे!" फुकट हे ब्राम्हण लोक गर्वानें जळतात. मागील गोष्टी मनांत कशास आणितात? मी तुम्हांस पुसतों कीं, जेव्हां तुह्मी आपले जावयाचे मरणाची खबर ऐकतां आणि तुमची कन्या तर लहान, तिचें आणि जावयाचें अद्यापि दर्शन झालें नाहीं; असें असतां त्या लहान अर्भक बाळकाविषयीं तुह्मी आपले मनांत निष्ठुरपणा कां आणितां, आणि आपले कन्यांस तुमचे तुह्मीच खाटीक कां होता बरें? अरे, परकी लोक यांणीं जर तुमच्या कन्या रस्त्यांतून जातांना पाहिल्या तर त्यांची अवस्था पाहून अंतःकरण चरचरां भाजतें, आणि दया उत्पन्न होती. परंतु तुम्ही आईबाप, भाऊबंद शाहणे व विचार कारणारे व बरें वाईट जाणणारे असे असून एवढा तुमचे घरांतील अनर्थ तुमच्यानें दूर कसा होत नाहीं? तुह्मी आपल्या स्त्रिया व कन्या मूर्खपणाचे अवस्थेंत जन्मापासून बाळगिल्या आहेत; म्हणूनच हा तुमचा जुलूम त्यांजवर चालतो व त्या सोसतात. जर त्यांस थोडेंसें ज्ञान असतें तर त्यांनीं त्याचा विचार काढून जे पुर्नविवाह करूं नये म्हणतात त्यांचे श्रीमुखांत दिली असती, यांत संशय नाहीं. परंतु अज्ञान आणि भोळसरपणामुळें सर्वत्र ज़ुलूम चालतो, असा नेम आहे. त्याप्रमाणें हे झाले आहेत. जर आपले देशांत दाहा स्त्रिया विद्वान असत्या आणि त्या जर विधवा झाल्या असत्या तर त्यांनीं आपला पुनर्विवाह करण्याचें ठरविलें असतें. आणि दुष्ट ब्राम्हणांचे तंत्रांत त्या कधीं राहिल्या नसत्या, यांत संशय नाहीं. परंतु आजपर्यंत ब्राम्हणांनीं मोठी सावधगिरी केली कीं कन्यांस विद्या शिकविली नाहीं. हे अनर्थ घरोघर आहेत. आईबाप शेकडों आहेत, कितीएक

दुःखानें विव्हळ आहेत; परंतु त्याचा उपाय त्यांस सुचत नाहीं. बरें, असें पाहा कीं, पुनर्विवाह जे इतर लोक करतात, ते काय ब्राम्हणापेक्षां कमी आहेत? कन्येचें दुसरें लग्न केल्यात ब्राम्हणास काय लहानपणा येईल? व त्यांत काय लाज आहे? ब्राम्हणांनीं सर्व धर्म कोठें चालविले आहेत? कितीएक अधर्म करितात, त्यांतच यांची गणना करून हें दुःख त्यांनीं दूर करावें. यांत कांहीं अप्रतिष्ठा नाहीं, आणि यांत कांहीं अधर्म नाहीं. आणि असें केलें तर कांहीं भ्रष्टाकार जाईल. परंतु हें त्यांचें मनांत कधीं येईल नकळे. आज काळीं तर वृध्द वृध्द लोक आहेत; त्यांची समजूत पडणें अवघड आहे. त्यांचें मन त्या दुष्ट बुद्धीशीं बहुत दिवस राहून तन्मय झालें आहे व तसेच आलीकडील जे लोक ते वृध्द लोकांच्या समागमानें बसले आहेत. सांप्रत विद्या म्हणजे कागद लिहितां यावा, व वाचतां यावा, दुसरें त्यांस कांहीं ठाऊक नाहीं. असे जरी अविचारी आहेत, तरी ते नाक मुरडितात. त्यांचे कानीं अशी गोष्ट पडली तर त्यांचे अंतःकरणास शस्त्र लागतें. त्याचें त्यांस कारण पुसलें तर सांगतां येत नाहीं. त्यांस चाल इतका शब्द मात्र ठाऊक. बाकी कांहीं विचार नाहीं. व ते सद्बोधास वाईट मानितात. तेव्हां जे गुजराथेंतील रजपूत कन्या उपजतांक्षणीं मारतात, ते अधिक किंवा दक्षिणी ब्राम्हण जे आपले कन्यांस दुष्टकर्मांत प्रविण करतात, आणि पुनर्विवाह करूं देत नाहींत ते अधिक, याचा न्याय करणें लोकांकडे आहे.

लो० हि०

पत्र नंबर ११

ब्राम्हणांचे आचार

पूर्वी ब्राम्हण लोकांचा काय पवित्रपणा व धर्मनिष्ठपणा असेल तो असो, परंतु हल्लीं तर तो आम्हांस कांहीं दिसत नाहीं. थोडे दिवसांमागें एक दिवस पुण्यांतून रात्रीस जात असतांना पाहिलें तों रामजीचें देऊळ आहे तेथें बहुत लोक जमा झाले होते, आणि बहुत कलावंतिणी येऊन बसल्या होत्या. तेव्हां शोध लाविला तों असें समजलें कीं, त्या देवळांत दरसाल एक मनुष्य ब्राह्मणजातीचा आहे तो प्रयत्नेंकरून नाच, गाणें इत्यादि समारंभ करून देवाचा उत्साह करितो. हें ऐकून मला असा चमत्कार वाटला कीं, देवाचें देऊळ ही पवित्र जागा, त्या ठिकाणीं असा भ्रष्टाकार जे करितात ते स्वधर्मा-प्रमाणें चालतात, असें कसें म्हणावें? हिंदुस्थानप्रांताची खबर ऐकिली आहे कीं, तिकडे देवळांत कसबिणीस येऊं देत नाहींत; व जेथें गरती स्त्रिया बसतात तेथें रांडांस बसूं देत नाहींत. परंतु पुण्यांत हा बंद(ध) कांहींच नाहीं. कुळीण स्त्रिया आणि कसबिणी

एके जागीं मिसळतात. आणि देऊळ म्हणजे भजन, पूजन, चिंतन यांची जागा, तेथें पवित्र अंतःकरणानें देवाचें सांनिध्य व्हावें, आराधन व्हावें, पश्चात्ताप व्हावा व पाप-बुध्धी जावी, म्हणून देऊळ बांधतात आणि यास्तवच सहस्र घरें बांधिलीं आणि एक देऊळ बांधलें याचें पुण्य सारिखें असें शास्त्र म्हणतें. त्याचें कारण हेच कीं, भगवंताचे सेवेकरितां तें स्थान, तेथें लोकांनीं जाऊन परलोकसाधनाचा विचार करावा; म्हणून त्यांचें महात्म अधिक. जर तेथें तमाशे, नाच, लावण्या म्हणावयाच्या असत्या तर देऊळ बांधलें आणि गांवची चावडी बांधिली सारखेंच आहे. परंतु एका चांगल्या उद्देशानें देऊळ बांधितात आणि त्याचा उपयोग असा भलता होतो, हें केवढें लोकांचें निर्लज्जपण आणि अज्ञान आहे ? ब्राम्हण जे आपले वर्तणुकीनें लोकांस नीति लावणारे ते प्रमुखत्वेंकरून अशा कर्मांत पडतात. पुण्यांत कितीएक ठिकाणीं आणखी असें पाहिलें आहे कीं, कसबिणीच्या घरांत देवळें स्थापिलीं आहेत. आणि तेथें ब्राम्हण जाऊन अभिषेक, पूजा वगैरे करितात. ज्या गृहांत पाऊल ठेविलें तर ब्राम्हण पतित व्हावयाचे, त्या ठिकाणीं धर्माची शोभा आणि त्यास उत्तेजन आणणारीं देवालयें तीं बांधलीं जातात. आणि तेथें ब्राम्हण जपानुष्ठानें करितात; तेव्हां हे कर्म कसें ? अद्यापि पुण्यांत कितीएक धर्मनिष्ठ ब्राम्हण आहेत, ते अशा देवळास देऊळ असें मानित नाहींत. आणि तेथें जातही नाहींत. एका गृहस्थानें एका कसबिणीचा पैका वहिवाटीस घेऊन ती मेल्यावर देऊळ बांधलें व त्या ठिकाणीं एक पुराणीक मोठा वक्ता आहे त्यास आणावयाकरितां तो गृहस्थ प्रयत्न करित होता; परंतु त्यानें कबूल केलें नाहीं. मागें श्री शंकराचार्य स्वामी येथें आले होते. तेव्हां एक गृहस्थ बहिष्कृत आहे, त्यानें अशी मसलत केली कीं, स्वामींचे चरण आपले घरांत लागून अन्न, जल, प्राशन झालें म्हणजे, ते ब्राम्हणांचे गुरू, तेणेंकरून आपण सहज ब्राम्हणांत आल्याप्रमाणें होईल. असें मनांत आणून त्यानें स्वामींस कांहीं पैका देण्याचें कबूल करून आपले घरीं आणिलें, परंतु तीच मेजवानी त्यांची शेवटची झाली. म्हणजे, कोणीएक मनुष्यानें त्या जेवणास जाण्याचें निंद्यकर्म स्वामींनीं केलें असें तपशीलवार लिहून त्याचे दरवाजास एक जाहिरनामा लाविला. असा सर्व लोकांचा आवेश जाणून स्वामींनीं त्याच दिवशीं कुच केला. जर कांहीं दिवस अधिक राहिले असते तर स्वामींनीं लोकांची धर्मविचक्षणा करण्याचें एकीकडे राहून त्यांचेच वर्तणुकीची विचक्षणा आमचे शहरांत पूर्वापार धर्मसभेची जागा आहे, तेथें झाली असती. परंतु ही गोष्ट चुकली हें बरें झालें. तात्पर्य, ब्राम्हणांनीं लोभ फार अंगिकारिला. आतां ब्राम्हणांचा संतोष किंमतीनें विकत घ्यावयाचा आहे. दुसरें कांहीं करावयास नको. जें म्हटलें तें कर्म ब्राम्हण करतील, व आळसामध्यें आपलें पोषण व्हावें, अशी तजवीज काढतील. त्यांस जेवावयास व दक्षणा मिळाली म्हणजे झालें. धर्म, अधर्म, अनुशासन, यांचा विचार ते करीत नाहींत. मला वाटतें कीं, आतां कांहीं कुळंबी धर्मात्मे निघतील; परंतु ब्राम्हण निघणार नाहींत. सर्व जातींपेक्षां ते नीचपणास उतरले

आहेत. त्यांच्यामध्यें आतां गर्व मात्र शेष राहिला आहे. ज्ञान, न्यायनीति व गुण कांहीं नाहीं. कितीएक ब्राम्हण हल्लीं तुकाराम व ज्ञानेश्वरपंथी झाले आहेत, व गळ्यांत माळा घालून व वीणा घेऊन रस्त्यावर नाचतात. ज्यांस वैराग्यसाधन करावयाचें ते असें करतील काय? दररोज नवीन संत होतात. व मग पैका जमला म्हणजे त्यांचीं भांडणें लागतात. कितीएक शिष्य त्यांस सोडून जातात, व बाबांना शिव्या देतात. बाबांचीं कर्में पाहिलीं तर उच्चार करवत नाहीं. कोणी व्यभिचारी, कोणी चोर, कोणी लबाड, असे आहेत; सारांश ते साधू नव्हत. परंतु भोंदू आहेत. ते द्रव्याच्या लोभाकरितां जेथें पुष्कळ लोक जमतात तेथें कथा, भजन करितात. व लोक जमत नाहींसे झाले म्हणजे चालते होतात, असें लोकांना ठकवीत फिरतात. आणि आपण कांहीं उद्योग न करितां भीक मागून यथास्थित पोट भरितात. व लोक तरी किती आंधळे आहेत पाहा. असले लबाड ठकांस साधू म्हणून कबूल करितात. साधूनें कसें राहावें येविषयीं तुकारामाचा अभंग असा आहे; "हरिभक्त जे म्हणवीती हीना दीना का मागती ॥ देखुनि सभेचा समुदाय, दावी भक्तीचा हो भाव ॥ कथेमध्यें हालवी ढोंग संत नव्हे तो वेसंग ॥ पाहुनि स्त्रियांचा तो मेळा, काढि सुस्वर तो गळा ॥ तुका म्हणे नव्हे योग, पोटासाठीं केलें ढोंग ॥ १ ॥ जेथें कीर्तन करावें, तेथें अन्न न सेवावें ॥ तट्टू बैलाशीं हो दाणा, तेथें मागूं नये जाणा ॥ वुका लाऊं नये भाळा, गळां घालूं नये माळा ॥ तुका म्हणे तेचि संत, बाकी सगळे ते हो जंत ॥ २ ॥" याप्रमाणें असून वेदशास्त्र सोडून तुकारामपंथ धरितात. मग त्या सारखें तरी कां आचरण करीत नाहींत? त्यांचें चित्त सर्वकाळ लोकांस लुटण्याकडे असतें. त्यांस आणखी उद्योग कांहीं नाहींत. गंध झोरकीदार, मुद्रा चक्रीदार व शेंड्या घेरेदार राखाव्या व ढोंग माजवावें. यांत फळ काय होणार? असे खोटे साधू इतर ढोंगी लोकांपेक्षां शासनास अधिक पात्र आहेत, असें मला वाटतें.

लो० हिं०

ता० २१ माहे मे १८४८

पत्र नंबर १२

हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा विचार

विनंती विशेष. मागील पत्रांत प्रवासी या सहीचें पत्र छापलें, त्याचा अभिप्राय पाहातां इंग्रजाचे राज्यांत प्रजेस सुख नाहीं, असा आहे. सबब याविषयीं आम्हांस कांहीं विचार सुचला आहे, तो लिहितों. म्हणजे त्यावरून लोकांस न्याय करतां येईल. ईश्वर

सर्व गोष्टींचा नियंता आहे, व पृथ्वीवर आणि सर्व ब्रह्मांडांत ज्या गोष्टी घडतात, त्यांजवर त्याची सत्ता आहे. तसेंच ईश्वर सर्वज्ञ आहे. तो असा कीं, जसें जसें योजावयाचें तसें तो योजतो, त्यानें क्षुधा केली आहे तर अन्नही तो उत्पन्न करितो व सूक्ष्म आणि स्थूळ पदार्थांचें नियंतृत्व त्याजकडे आहे, म्हणून एक राज्य जातें व दुसरें होतें. अशा मोठाल्या घालमेली होतात, त्या भगवंताचे प्रेरणेशिवाय घडत नाहींत. तेव्हां हिंदु लोकांचें मूळचें राज्य मुसलमानांनीं घेतलें. व यांजकडे चार पांचशें वर्षें राहून आतां सर्व भरतखंड इंग्रजांचे अमलांत गेलें. या गोष्टी ईश्वरानें चांगलेपणाकरितांच योजिल्या, असें मला वाटतें. कारण ईश्वर स्वतः कोणास शाहाणपणा शिकवीत नाही. एक भिकारी होतो, दुसरा मातबर होतो, तद्वत् एक देशाची सुधारणा तो देश दुसऱ्या देशाचे अमलांत गेल्याशिवाय होत नाहीं. असें तर चराचर चालत आलें आहे. पूर्वी हिंदु लोक शाहाणे होते. त्यांचें शाहाणपण मिश्रदेशांत व यवन देशांत गेलें. व ते देश रूमचे अमलांत गेले. तेव्हां रूमचे लोक शाहाणे झाले. रूम टोपकर लोकांचे अमलांत गेले तेव्हां त्यांचें शाहाणपण टोपकर लोकांस आलें. परंतु या घालमेलींत मूळचें हिंदूंचें शाहाणपण राहिलें नाहीं. तें मुद्दल; परंतु त्याची चक्रवाढ दरएक ठिकाणीं होतां होतां सांप्रत इंग्रज लोक हिंदु लोकांपेक्षां शंभरपट शाहाणे झाले आहेत. व तें शाहाणपण हिंदु लोकांस प्राप्त व्हावें एतदर्थीं ईश्वरानें हा मुलुख त्यांचे ताब्यांत दिला आहे, हें स्पष्ट दिसत आहे. तुम्ही विचार करून पहा कीं, इंग्रज लोकांमध्यें सांप्रत शाहाणपण व शाहाणे मनुष्य आहेत, त्यांचा शंभरावा हिस्सा तरी हिंदु लोकांत आहे काय? पहा कीं, इंग्रज लोक अखबारी वगैरे वाचतात, त्यांस आपले लोक असें म्हणतात कीं, यांत काय आहे? हें व्यर्थ काम आहे. आतांच्या चाली व रीति प्रकरणीं कोणी संभाषण केलें तर ते म्हणतात कीं, छिः, या रिकाम्या कथा कशास काढतात? व कितीएक लोक विद्येचे व ज्ञानाचे परमशत्रू आहेत. बरें असे मूर्ख लोकांमध्यें मला वाटतें कीं, असेंच परकी राज्य चांगलें. कारण कीं, विलायतेंत लोकसत्तात्मक राज्य आहे व इतर दुसरे टोपकर लोकांचे मुलखांत तसेच प्रकारचीं राज्यें आहेत. तसलें राज्य जर हिंदुस्थानांत असलें तर घटकाभर तरी चालेल काय? तसलें राज्य जर येथें झालें व जर त्यांत ब्राम्हण लोकांचा हात शिरला तर लागलीच लक्षभोजनें व कोटिहोम मात्र चालू करतील. परंतु लोकांच्या हिताच्या गोष्टी किंवा ज्ञान व जगांत काय व्यवस्था आहेत यांचा शोध लावण्याचा उद्योग करणार नाहींत. व यांचें एकमत राहणार नाहीं. ब्राम्हण म्हणतील कीं, हाडखाऊ कुळंबी हे कामांत कशास पाहिजेत? व कुळंबी म्हणतील कीं, हे बामण माजलेले पोळ यांचा उपयोग काय? परभु म्हणतील, सोनार कशास पाहिजेत, वाणी म्हणतील कीं, तेली कशास पाहिजेत? असा घोटाळा होईल कीं नाहीं? हिंदु लोक हल्लीं ज्या स्थितींत आहेत तीप्रमाणें त्यांचे नाकांत वेसण घालून चालविणारा एक दांडगा राजा पाहिजे. यांस मोकळीक

देऊन उपयोग नाहीं. जसे इस्पितळांतले रोगी आणि वेडे यांस स्वसत्ता दिली तर काय उपयोग? तद्वत् हे आपले लोक आहेत. यांस कांहींतरी ठाऊक आहे काय? गर्व मात्र यांचेजवळ आतां राहिला आहे. यांची एकत्र ठिकाणीं नांदणूक क्षणभरही होणार नाहीं. पाहा, पेशवे, शिंदे, होळकर, भोंसले यांच्या आपसांत लढाया किती झाल्या? वांकडें किती पडलें? मारामाऱ्या आणि द्वेष किती झाले? नाना फडणिसास कैदेंत बसविलें कीं नाहीं? व शेवटीं राज्य बुडालें कीं नाहीं? जर सर्व एकमत असतें तर असें न होतें. पेशवे यांचें राज्य शंभर वर्षें होतें. त्या शंभर वर्षांत कोणती सुधारणा झाली आहे पाहा! आणि इंग्रजांनीं शंभर वर्षेंच राज्य केलें, पण त्यांत किती सुधारणा झाली? लोकांस किती शाहाणपण आलें? व पुढेंही किती येणार? मागील लोक इंग्रजांचे राज्याचे फायदे जाणत नाहींत. ते म्हणतात कीं, आम्हीं सर्वस्वी भिकारी झालों, पैसा गेला. पेशवाईंत थोडे शाहाणपणानें पैसा मिळत होता; परंतु आतां तो प्रसंग नाहीं. म्हणून शाहाणपण पाहिजे. द्रव्याचें व भोजनाचें एकीकडे ठेवा. आणि फक्त शाहाणपणाचाच विचार करा. शाहाणपणाचे अंगीं सर्व आहे. आठ दिवस खालें, नंतर महिनाभर अजीर्ण झालें, तें बरें, किंवा नित्य थोडें थोडें खावें, आणि अजीर्ण न होऊं द्यावें तें बरें? तद्वत् पेशवाईंतील द्रव्य पुष्कळ अनुभविलें खरें, परंतु त्याचा परिणाम मूर्खपणाचाच झाला. आतां शंभर वर्षें सुख भोगिलें आणि तेव्हां कांहीं ज्ञानसंपादनाचा व आपलें राज्य नीट चालविण्याचा यत्न केला नाहीं. म्हणून आतां ५०० वर्षें इंग्रजांचे अमलांत राहावें लागेल. आणि आता ५०० वर्षांत जें शाहाणपण मिळवूं तें दोन हजार वर्षेंपर्यंत पुरेल. कधीं राज्य दुसऱ्याचे हातीं जाऊं देणार नाहीं. तेव्हां याजवरून इंग्रजांचें राज्य पेशव्यांपेक्षां बरें. कारण गीतेंत सांगितलें आहे कीं, जें परिणामीं चांगलें तेंच चांगलें. आदौ थोडे दिवस चांगले व पुढें फजीती, त्यास चांगलें म्हणूं नये. तेव्हां आपले लोक जेवणाचे व द्रव्याचे आशेनें काय स्तुति करतील ती करोत; परंतु इंग्रजांचा अम्मल हा हंगाम बरा आहे. कोकणस्थ पूर्वी भिकारी होते. व पेशव्यांचे राज्यांत कोणी कांहीं सुख भोगिलें, परंतु विचार केला नाहीं, खालें मात्र, शेवटीं दुसऱ्यानें तोंडांत मारून नेलें, तेव्हां डोळे उघडले. तस्मात् इंग्रजांचे अमलाचा परिणाम चांगला व लोक शाहाणे होण्यास खुशी नाहीं तर ईश्वर जबरीनें करवितो आहे. तुम्ही नको म्हणाल तरी तो ऐकणार नाहीं. ही त्याची दया मानावी. असा प्रसंग कोठून येणार? ईश्वर दयाळू आहे.

लो० वा०

पत्र नंबर १३

वाईट चालींचे प्रकार

आपले लोकांच्या मूर्खपणाच्या समजुती चालतात. त्यांपैकीं ३० प्रसिध्ध झाल्या, त्यांची पुरवणी आणखी खालीं लिहिली आहे ही प्रसिद्ध व्हावी.

३१ स्त्रियांनीं केला तो व्यभिचार, पुरुषाचा व्यभिचार करण्याचा पुरुषधर्म आहे, असें समजतात.

३२ सोदा तोच शाहाणा.

३३ सालसपणानें व खरेपणानें द्रव्य मिळत नाहीं.

३४ ज्याची सद्दी त्याचें राज्य, ज्यास काळ अनुकूल त्यास सर्व भाळतात. मुलीचा व जनावराचा पायगुण चांगला वाईट असतो, असें समजतात.

३५ माहार हिंदु आहेत व आपले देवाची पूजा करितात व धर्म मानतात, तरी ते म्लेंछापेक्षां नीच कसे ?

३६ कार्यापुरती मैत्री व कारणापुरतें आर्जव, तसाच रोगापुरता वैद्य.

३७ संसार सोडल्यावांचून ईश्वरप्राप्ति नाहीं.

३८ स्त्रियांचा पुनर्विवाह केला तर धर्म बुडेल व ब्राम्हणांची अब्रू जाईल.

३९ बयरागी वगैरे लोक घरेंदारें, रोजगारधंदा सोडून फिरतात, त्यांस खाण्यास दिलें तर पुण्य आहे.

४० अब्रू गुणावर नाहीं, परंतु द्रव्यावर व मोठे कामावर आहे. बहुधा कोणाचें द्रव्य किंवा काम अपराधाखेरीज गेलें तर अब्रू गेली म्हणतात. हें कसें ?

याचा विचार करून जे उत्तर देतील त्यांचे आम्ही उपकार मानूं. खरें असेल त्याचा स्वीकार व लबाड असेल त्याचा अनादर करावा इतकीच आशा आहे.

लो० हि०

प्रभाकर, ता. २८ मे, सन १८४८

पत्र नंबर १४

राज्यसुधारणा

विनंती विशेष. सांप्रत युरोपखंडांतील बातमीपत्रें आलीं, त्यांत मुख्य वर्तमान असें आलें कीं, फरासिसांचे मुलखांत राज्यसुधारणा झाली. त्यास फ्रेंच रिवोल्युशन

असें इंग्रजींत म्हणतात, व त्याचा अर्थ राज्यसुधारणा असा होतो. लोकांमध्यें दंगा, बंड, इत्यादि शब्देंकरून तें प्रकरण समजतात ही चूक आहे. कारण कीं, तें कांहीं बंड नव्हे. हिंदुस्थानांतील लोकांस स्वैर राज्याचे ताब्यांत राहाण्याची सवय आहे, व दुसरे रीतीचें राज्य ठाऊक नाहीं. यास्तव राज्यसुधारणा याचा अर्थ त्यांस समजत नाहीं. याजकरितां त्याजविषयीं मी थोडासा मजकूर लिहितों. एशियाखंडांतील देशांत बहुधा एक राजा स्वैर असून अमल करितो. त्याची रयत त्याचे गुलामाप्रमाणें व तिचा नाश नफा करण्याविषयीं संपूर्ण मुखत्यारी स्वइच्छ राजास असती. अशा राज्यांत बंदोबस्त कमी असल्यामुळें चार दुष्ट लोक जमा होतात, आणि गरीब रयतेस लुटण्याकरितां व आपले दुसमान यांचा सूड घेण्याकरितां ते जागोजाग हल्ले करितात. त्याचें नांव बंड. या प्रकारचीं बंडें व तोतये हिंदुस्थानांत पुष्कळ झाले आहेत. मागें पेशवाईंत भाऊ-साहेबांचा व यशोदाबाईचा तोतया आणि चतुरसिंग राजा, उमाजी रामोशी, राघु आंग्र्या, पेंढारी, शिंद्यांच्या बाया व तेलणी यांचे दंगे झाले. तीं बंडें म्हणावीं. कारण कीं, तो चोर व लबाड लोकांचा समुदाय व त्यांचा हेतु रयतेस सुख देण्याचा नव्हता. दरिद्रानें त्रासलेले किंवा कांहींएक कारणामुळें चवताळलेले लोक उगेच जमून लोकांचे नाश करितात. मग अर्थातच लोक त्यांचा द्वेष करून त्यांस मारितात व फांशीं देतात. परंतु राज्यसुधारणा हें या रीतीचें बंड नव्हे. व हिंदुस्थानासारख्या देशांत तें व्हावयाचेंही नाहीं. ज्या देशांत लोक शाहाणे व ज्ञानी व एकमेकांचे सहोदरबंधूप्रमाणें हित पाहाणारे असे आहेत, त्या देशांत मात्र अशी राज्यसुधारणा होते. सांप्रत टोपकर लोक शाहाणे आहेत. व त्यांच्यामध्यें कितीएक हितावह व चांगल्या गोष्टी आहेत. त्या आपले लोकांस अद्याप माहित नाहींत. आपले देशाचें हित करावें हा मुख्य धर्म असें युरोपांत समजतात. आणि जर कांहीं अपाय किंवा वाईट वर्तणूक राजाकडून किंवा त्याचे प्रधानाकडून होईल तर त्यास लोक बरतर्फ करितात. ही गोष्ट आपलेकडील लोकांस फार अशक्य व चमत्कारिक वाटेल. कारण कीं, इकडील लोकांस राजा म्हणजे विष्णूचा अवतार व प्रधान म्हणजे ब्रम्हदेव वाटतो. त्यांणीं अन्याय केला तरी म्हणतात कीं, "राजा हरति सर्वस्वं तत्र का परिदेवना" असें आहे. तेव्हां या लोकांस सुधारणा माहित नाहीं, परंतु ज्यास ज्ञान संपादन करण्याची इच्छा असेल त्याणें इंग्लंड देशाचा वृत्तांत काढून पाहावा. म्हणजे जान राजा म्हणून होता, त्याजकडून अन्याय झाले. याजमुळें सर्व रयतेनें त्याजवर उठून त्याजपासून करार करून घेतला. तो करार हल्लींपर्यंत चालू आहे, हें समजेल. सर्व कायद्याचें मूळ तेंच आहे. पुढें राजा चार्लस याणें पुनरपि अन्याय केले तेव्हां त्यास रयतेनें धरून आणून कैदेंत ठेविलें. आणि त्यास त्याचे वडिलाचा करारनामा दाखविला. आणि मोठी न्यायसभा भरून तेथें त्याचा न्याय केला. तेव्हां राजानें अन्याय व लोकांचें अनहित केलें, असें शाबीद झालें. नंतर त्यास शिरच्छेद करण्याची सजा झाली. तसाच राजा जेम्स याणें जुलूम केल्यावरून त्यास पदच्युत

करून परदेशास हांकून दिला. अशा गोष्टी तिकडे घडतात. त्या इकडे अनश्रुत आहेत. जशी राज्यसुधारणा होते म्हणजे धर्मसुधारणाही होते म्हणजे धर्माची व्यवस्था करून वाईट प्रकरणें बंद करितात. अशा गोष्टी हिंदुस्थानांतही घडल्या आहेत. जेव्हां जैनमत झालें होतें, तेव्हां कुमारीलभटानें तें मोडून हिंदुधर्म स्थापिला. व कितीएक शास्त्रार्थ रद्द करून नवे चालू केले. त्याचें नांव धर्मसुधारणा. परंतु राज्यसुधारणा अद्यापि हिंदुस्थानचे इतिहासांत आढळलेली नाहीं. कोणी कदाचित् शिवाजीराजाच्या प्रकरणास राज्यसुधारणा म्हणतील. व मलाही वाटते कीं, तें राज्य सुधारणाच होय. कारण जरी केवळ राज्य सुधारणेच्या हेतूनें शिवाजीनें मोंगलाशीं युद्ध करण्यास आरंभ केला नाहीं, तरी त्याचें स्वाभाविक कृत्य त्या स्थितीवर गेलें व मराठ्यांचें व सर्व हिंदु लोकांचें राज्यसंबंधी महात्म सरासरी पांचशें वर्षेपर्यंत मुसलमानांनीं बळकावलें होतें. तें पुनरपि हिंदु लोकांचें हिंदु लोकांकडे शिवाजीचे कृत्यामुळें आलें. तस्मात् ती "रिवोल्युशन" म्हणावी. त्यानंतर मग शिवाजीचे पाठीमागें तसा सद्बुध्दीवान् पुरुष न झाल्यामुळें तें कार्य तसेंच राहिलें. व मुलूखही इंग्रजांचे हातीं गेला. तथापि शिवाजी राज्य-सुधारक म्हणावयास योग्य आहे, यांत संशय नाहीं. असो, आतां फराशिसांचे मुलखांत असें झालें कीं, राजा रयतेस पीडा करूं लागला व विनाकारण खर्च करून रयतेकडून नाना प्रकारचे कर वगैरे बसऊन पैका घेऊं लागला. तेव्हां पारीस म्हणून फ्रेंचांची राजधानी आहे. व तेथें मोठमोठाले विद्वान लोक आहेत. त्यांणीं संपूर्ण रयतेस त्रास झाला आहे असें जाणून, तेथें एक युध्दविद्या शिकण्याची शाळा आहे, तेथील विद्यार्थी वगैरे लोक मिळवून राजवाड्यावर गेले व तेथें फौजफाटा होता त्यास सांगितलें कीं, आम्ही राज्याची सुधारणा करावी व आपल्यास स्वइच्छ राजापासून सुख होत नाहीं. यास्तव लोकसत्तात्मक राज्य करावें यासाठीं झटतों. आमचा हेतू इतकाच कीं, सर्व लोकांस सुख व्हावें व ज्याचे त्याचे हक्क कायम राहावे. आम्ही लुटणारे नव्हत. व आम्हांस कांहीं नको. हें ऐकून ती फौज त्यांस वश झाली आणि त्यांचेबरोबर गेली. मग ते सर्व लुईस फिलिप राजास हस्तगत करणार तों तो स्त्रीसहित धाकानें पळून गेला. मग मागें शहरचे लोकांनीं वाडा घेऊन सभा भरली. व असें ठरविलें कीं, आजपासून रयतेचें राज्य रयतेनें करावें. व त्याप्रमाणें नऊशे असामी समेंत बसण्यास मुकरर केले. आणि राजाचे असबाबास कांहीं हात लाविला नाहीं. राजाचे खोलींत जे मोहोर केलेले लाखोटे सांपडले तेही ज्याचे नांवावर होते त्यांजकडे पाठऊन दिले. असे मर्यादेनें ते लोक चालले. हल्लीं फ्रेंचाचे राज्यांत लोक राज्य करितात. हें पाहून दुसरे टोपकराचे मुलुख म्हणजे अमेरिका व सुइजरलंड वगैरे यांणींही आपले देशांत लोकांचें राज्य स्थापन केलें. फ्रेंचांचे देशांत ज्यावेळेस राजास काढून टाकिलें, तेव्हां फौजेमध्यें बोनापार्ट म्हणून एक नामांकित सरदार होता, त्याणें जय पुष्कळ मिळविले. व त्यास राज्याचा लोभ उत्पन्न होऊन त्याणें राज्य बळकावलें.

तव्हां इंग्रजांनीं वेल्सलीसाहेब म्हणजे डयूक ऑफ वेलिंग्टन यास पाठऊन त्यास कैद करून टाकिलें आणि पूर्वीचे राजाचा वंशज बसविला; परंतु हल्लीं फ्रेंचांचे राज्यांत हात घालूं नये असा निश्चय इंग्रजांनीं केला आहे; कारण संपूर्ण लोकांचा एकोपा ठरला कीं राजा नसावा, आणि प्रजा एकत्र होऊन राज्य चालवितात, व इंग्रजांशीं स्पर्धाही करीत नाहींत. त्यापेक्षां आपल्यास बोलण्यास कांहींच जरूर नाहीं, असें इंग्रजांनीं ठरविलें आहे. व इंग्रजांचे कांहीं जिल्ह्यांत दंगे झाले आहेत. परंतु ते मोठे नाहींत. कितीएक मोडले, त्याचेंही कारण हेंच कीं राजाकडून कांहीं जुलूम जास्ती होऊन लोक त्रासले, असें पाहून पुनः त्यांचे शांतवन करितात. व कायदे व कर बंद करितात. म्हणजे बंदोबस्त होतो. असें त्यांणीं अद्याप शाहाणपणानें राज्य चालविलें आहे. पुढें पाहावें.

लो० हि०

पत्र नंबर १५

लग्नाविषयीं विचार

विनंती विशेष. सांप्रतकाळीं ब्राम्हण लोकांत स्त्रियांचे हाल व विपत्ती बहुत होतात व कन्या झाली म्हणजे लोक नाक मुरडितात. याचे कारणाचा विचार केला असतां सहज कळून येईल. बहुधा मोठे गृहस्थांचे कुळांत कन्या जन्मली म्हणजे त्यांस असें वाटतें कीं, माझे घरांत अवदसा शिरली. व जर कन्या मेली तर ते सुखी होतात. याचें कारण लोकांमध्यें कांहीं मूर्खपणाच्या चाली आहेत. कच्छ देशांत झाडीज-रजपूत म्हणून एक जातीचे लोक आहेत. ते आपल्या कन्या मारितात. कारण कीं तसें न केल्यानें खर्चवेच व नवरा पाहाण्याची मेहेनत पडते. दक्षिणी ब्राम्हण लोक आहेत. हे तरी आपले कन्येविषयीं बहुत अडचणी भोगतात त्या अडचणी आपले देशांतून जातील तर लोक बहुत सुखी होतील.

१. कन्यादान ब्राम्हणाहून इतर जातीशीं करावें किंवा न करावें याचा विचार दुसरे वेळेस करूं. परंतु इतकी तरी मोकळीक असावी कीं, देशस्थ किंवा कोकणस्थ वगैरे ब्राम्हण जातीचा वर असावा. अमूक एक जातीचा पाहिजे हें नसावें. म्हणजे मोठी अडचण दूर होईल. व संबंध यथायोग्य होतील. कितीएक लोक नवरा मुलगा श्रीमंताचा मिळत नाहीं म्हणून गरीब मुलास घरजावई करितात. तसें करण्यास नको. व आई-बापास संकट पडणार नाहीं, व मुलीचेंही कल्याण होईल, आणि तिचें जन्माचें दुःख मुटेल, हा एक लाभ.

२. ज्योतिषी यांस लग्नसंबंधीं कांहींएक पुसूं नये. गण, मैत्री, खडाष्टक आणि मुहूर्त हे पाहाण्याची कांहीं गरच नाहीं, येणेंकरून फार अकल्याण होईल. चांगलें सुस्थळ मिळालें व सर्व गोष्टी अनुकूल झाल्या तरी हे जोशी यांचा विध्वंस करितात; पहा बरें, आजपर्यंत ब्राम्हणांनीं जोशांचे अनुमतानें लग्नें केलीं तरी बहुत विधवा झाल्या आहेत. व बहुत विघ्नें आलीं आहेत. तेव्हां परिणाम पाहातां या फुकट अडचणी वेडेपणाच्या आहेत. जोश्याचे नादीं लागून लोकांनीं आपला घात करूं नये.

३. मुलीचे लग्नास पैका खर्च करितात तो आपले योग्यतेप्रमाणें व मिळकतीप्रमाणें करितात असें नाहीं; लोकांचे खुशींप्रमाणें करितात. हा मोठा मूर्खपणा आहे. लोकांचे तोषाकरितां आपलें धन उधळावें यांचें कारण काय? नेमका खर्च वेताप्रमाणें करावा हें उत्तम. फार पैसा खर्चिल्यानें मुलीस कांहीं नफा होतो असें नाहीं. व आईबापासही नाहीं. त्यापासून चार लबाड व आळशी पोसतात, इतकें मात्र होतें.

४. मुलीचे लग्नास अमुक वय असावें हा नियम असूं नये. आठनऊ वर्षें मुलीस झालीं म्हणजे आईबापांस काळजी पडते कीं, आतां या पोरीचें लवकर लग्न केलें पाहिजे, नाहींतर आम्हांस लोक हसतील कीं, पाहा, यांनीं आपली मुलगी केवढी वाढविली? अजून लग्न नाहीं! परंतु ही सर्व वेडेपणाची समजूत आहे. याचा वेत कशास पाहिजे? लहानपण विद्या शिकविण्यांत घालावें व पुढें सरासरी वीस वर्षांचे आंत तिला कळूं लागलें म्हणजे तिचे व आईबापांचे संमतानें लग्न करावें, एणेंकरून बहुत फायदे होतील. आजच्या काळांत आईबाप मुलींचीं लग्नें जबरदस्तीनें करितात. म्हणून त्यांस आपली मुलगी आपले स्वार्थाकरितां विकावयास सांपडते, हा केवढा जुल्म आहे बरें? आतां कितीएक म्हातारे पुरुष मरणास पात्र, ज्यांच्या तोंडांत एकही दांत राहिला नाहीं, डोळ्यानें न्याहाळवत नाहीं, आंगावर सुरकुत्या पडल्या आहेत, असे वयस्कर लोक आपल्यास तरुण स्त्रिया नऊ-दाहा वर्षांच्या करितात. हा केवढा चमत्कार आहे! जर स्त्रियांना स्वसत्तेंत लग्न करूं दिलें तर अशा प्रेतरूप पुरुषांस त्या वरतील कीं काय? तेव्हां त्या चालीनें फार वाईट होतें. व जें विद्या करण्याचें वय तें सासऱ्यास राहाण्यांत व हाल सोसण्यांत जातें. व लवकर लग्नाचा संबंध झाल्यामुळें कोणतेही प्रकारें सुखावह होत नाहीं. आणि जनावराप्रमाणें मुली वाढतात. परंतु जीं भयें धरून लहानपणीं लग्नें करितात तींच पुढें येतात. चुकत नाहींत.

५. स्त्रियांचा पुनर्विवाह होत नाहीं याजमुळें मुलीचे जन्माचें मोठें संकट प्राप्त होतें; कारण तिचा नवरा मेला म्हणजे सर्वस्वी घात होऊन ती आईबापांचे येथें येऊन राहाणार; तेव्हां आईबापांस असें होतें कीं, जन्मापर्यंत हिला आम्हीं खायास घालावें, त्यापेक्षां ही मेली तर बरें; कारण अन्न घालून तरी सुख नाहीं. तिचें विद्रूप आणि हाल इतकेच पहावयाचे. आणखी सासरचे लोक म्हणतात कीं, आमचा मुलगा मेला तेव्हां या रांडेचा पायगुण वाईट; मग ही कशास पाहिजे? असें म्हणून तिला वाईट कामें

सांगतात. आणि अमेरिका खंडांत गुलाम नेऊन त्याचे हाल करीत होते, मारून काम घेत होते, व त्यांत तो मनुष्य मेला तरी फिकिर करीत नवते. तद्वत, किंवा पृथ्वीवर एक लांब प्रदेश आहे त्या स्थळीं अशी चाल होती कीं, मनुष्यास मारून खावें व कितीएक ठिकाणीं अशी चाल होती कीं, कोणास मुलगी झाली तर तिला जिवंत पुरावें. व आणखी एक ठिकाणीं अशी चाल होती कीं, ज्याचे घरांत जुळीं जन्मतील त्याणें आपली बायको गांवकऱ्यांस व पोरें रानांतील जनावरांस खाण्यास टाकावींत. अशा अनेक चाली पृथ्वीवर होत्या. व असे चमत्कारीक दुष्ट लोक पृथ्वीवर होते. मला वाटतें कीं, पूर्वीं दैत्य आणि राक्षस होते ग्हणतात ते असलेच लोक असतील. राक्षस ग्हणजे मानवाचे शत्रू. तेव्हां जे मनुष्यांचें मांस भक्षितात ते राक्षसच होत. असेच पूर्वीं हिंदुस्थानांत असतील. व यावरून अशी कल्पना होते कीं, पूर्वीं हिंदु लोक शिथिया देशांतून हिंदुस्थानांत आले त्या वेळेस त्यांस हे राक्षस इकडे आढळले, तेव्हां त्यांचीं वर्णनें पुराणांत त्यांनीं लिहिलीं आहेत. अस्तु. या दुष्ट लोकांपासून ही पृथ्वी आतां निर्धूत होत चालली आहे. व कितीएक घातकी चाली लोक सोडीत चालले आहेत. परंतु असे हे रानटी लोक व हिंदु लोक जे आपल्यास मोठे थोर सुधारलेले व शाहाणे म्हणवितात, त्यांणीं अशा अनर्थकारक चाली पुढें चालवाव्या हें मोठें आश्चर्य आहे. पूर्वीं परशरामभाऊ पटवर्धन यांची मुलगी विधवा झाली. तेव्हां त्यांणीं मार्तंड वगैरे पुस्तकांवरून असें ठरविलें कीं, पुनरपि विवाह करावा; परंतु राज्यांत नाना फडणीस मोठे शाहाणे होते. त्यांणीं त्यास विघ्न केलें आणि सांगितलें कीं, तुम्हीं असें करूं नका. कारण एकानें केलें म्हणजे सर्व करतील. तेव्हां तें सिद्धीस गेलें नाहीं. ही गोष्ट केवढी झाली, तत्राप त्याचे लोक वर्णन करितात. आणि सांगतात कीं, पानशे हे तोफखान्यावरील सरदार होते. त्यांचे घरीं सत्तावन बोडक्या होत्या. हें मोठें शाहाणपण समजतात. परंतु मला वाटतें कीं, हा मोठा अनर्थ आणि मनुष्ययज्ञ होय. पहिले लोक दांडगे होते व बायकांस घरांत कैदेंत ठेवित व पाहिजे तसे हाल करीत. त्यांची स्तुती काय करावयाची आहे ? वंशवृध्धी व्हावयाची तिचा नाश व कितीक जीवांस दुःख यांचें कारण कोणाचे लक्षांत न येऊन शंकराचार्यांस धर्माचे मोठे अध्यक्ष म्हणवितात, व शास्त्रीपंडीत आहेत ते सर्व अंधळे उंठाचे कतारीसारखे, एकाच्या नाकांत वेसण तीं दुसऱ्याचे, तेव्हां ओढत ओढत चालतात. लोकांचें हित कसें होईल, याचा विचार करीत नाहींत. जर स्त्रियांचा पुनर्विवाह केला तर किती लोक सुखी होतील ? व मला खचित वाटतें कीं, यामुळें एका जिल्ह्यांत सरासरी शंभर बाळवध होत असतील. या मानानें पुण्यांत व आसमंतात प्रांतीं शंभर कोसांत दोन तीन हजार लेंकरें मारिलीं जातात. मग कच्छ आणि काठेवाड येथील कन्याहत्या व हें सारखेंच नव्हे काय ? दक्षणेंतील ब्राम्हणांच्या विधवा, पुत्र व कन्या या दोघांस एकंदरच मारतात. आवडनिवड करीत नाहींत. इतके असूनही लोक डोळे झांकतात आणि म्हणतात कीं, आमची चाल आहे व

हिच्या जर विपरीत केलें तर सर्व बुडेल; परंतु काय बुडेल हें कोणी सांगत नाहीं. कोणी म्हणतात कीं, अरेरे! असें शास्त्र आहे व मनूनें असें स्मृतींत लिहिलें आहे. परंतु त्यांस मी एक प्रश्न करितों; मनूनें असें ठरविलें आहे कीं, ब्राम्हणाच्या स्त्रीनें एक वेळ नवरा मेला तर पुनरपि लग्न करूं नये, तिणें आयुष्य तसेंच घालवावें किंवा आपल्यास जाळून घ्यावें; परंतु मनु हा जर ईश्वरांश होता तर त्यानें अशी ही सत्ता पृथ्वीवर कां प्रगट केली नाहीं कीं, जर आपण असें शास्त्र केलें तर असेंही करूं कीं कोणे एकेही ब्राम्हणाचे स्त्रीचा नवरा मरणार नाहीं. प्रथम स्त्री मरावी आणि नंतर नवरा मरावा, असा क्रम जर पृथ्वीवर घातला असता तर मीं म्हटलें असतें कीं, मनु हा ईश्वर होता. व ब्राम्हण हे ठीक करितात आणि मनु हा ईश्वर-अंश असें मी समजलों असतों. परंतु ज्यापेक्षां तसें नाहीं, मरावयाचें ते मरतात; व जगावयाचे ते जगतात, त्याचा बंदोबस्त मनुष्यानें कांहीं होत नाहीं. शास्त्रें करून त्यास लोकांस सांगावयास मात्र येतें; घात चुकत नाहीं, असें आहे तर मग त्यास फिरविण्यास काय चिंता आहे? अहो, नवरा मरणें हें कोणाचे स्वाधीन नाहीं. तें ईश्वराधीन, आणि स्त्री व नवरा यांचा संबंध संसारापुरता आहे; तेव्हां एखाद्या ब्राम्हणास मीं जर सांगितलें कीं, तुम्ही यज्ञोपवित घेतलें आहे हें तुमचें अखेरीचें आहे. जर हें तुमचे आंगावर तुटलें तर त्या दिवशीं तुम्हीं त्यासह-वर्तमान जाळून घ्यावें, किंवा आम्ही तुमचें पांच पाट काढून तुम्हास विद्रूप करून जन्म-पर्यंत तुमचे हाल करूं व बोडकीप्रमाणें तुम्हांस ठेवूं; तर त्या ब्राम्हणास तें आवडेल काय? तद्वत् स्त्रीचा नवरा तिला थोर व त्याचे आज्ञेंत चालावें हा धर्म खरा, परंतु जर तो मेला तर काय उपाय आहे? दुसरा वरावा हें ठीक आहे. याविषयीं थोडकें लिहिलें आहे. पुढले प्रसंगीं तपशीलवार लिहूं.

लो० हि०

७४०६२ निबंध

प्रभाकर, ता० ४ जून, सन १८४८

पत्र नंबर १६

विधवापुनर्विवाहाविषयीं

विनंती विशेष. आपले लोकांत पुनर्विवाह चालू करण्यास फार अवघड नाहीं; परंतु मूर्ख लोकांची अडचण फार आहे. नाहीं तर मला खास ठाऊक आहे कीं, बहुतांचे मनांत हा धर्म चांगला आहे. व कितीएक लोक या अनर्थकारक चालीस त्रासले आहेत. व आईबाप आपले मुलींचें दुःख पाहून केवळ पोटांत दगड घालतात. ही दुष्ट रीति

हिंदुस्थानांत लोकांचे अज्ञानामुळें कितीएक वर्षें चालली; परंतु राजाचा जुलूम फार झाला म्हणजे प्रजा दंगा करिते, व कायद्याचा जुलूम झाला म्हणजे लोक त्याचा त्याग करितात. तसें सांप्रतकाळीं बहुत लोकांचे मनांत पुनर्विवाह करण्याचें आहे. परंतु शास्त्रीपंडित अनुकूल करण्यास पांचचार लाख रुपयांचें काम आहे. जर इतके कोणी देईल तर आतां ही चाल चालू होईल. ब्राम्हणांस एकएक शालजोडी दिली म्हणजे त्यांजकडून कोणतेही कामास अनुमोदन देण्यास आळस होणार नाहीं. परंतु आजकाळीं इतका मुबलगपणानें कोणी खर्च करील असा सामर्थ्यवान् व शाहाणा आपले लोकांमध्यें नाहीं, कोणी द्रव्यवान् आहेत ते मूर्ख आहेत. त्यांना दिवस उजाडल्याची व मावळल्याची शुध्ध नाहीं. तेव्हां माझें म्हणणें असें आहे कीं, ज्या लोकांचे मनांत ही गोष्ट कर्तव्य आहे, त्यांनीं एक सभा करून अनुमती घ्याव्या. प्रथमतःच पांचचारशें संमती पडतील, यांत संशय नाहीं. व असेंच जागोजाग होईल, मग इतके लोक जमल्यावर त्यांस कोणी प्रतिबंध करणार नाहीं. सरकार तर अशा सुधारणुकीस अनुकूल आहे, किंबहुना आपले लोक जातीबाहेर टाकतील तर काय चिंता आहे? सांप्रत सर्व ब्राम्हण वगैरे हिंदु लोकांनीं इंग्रजांस जातीबाहेर ठेविलें आहे. म्हणून इंग्रजांचें काय कमी झालें? व ब्राम्हणांचें काय अधिक झालें? उभयतांचें सारखें आहे. मूर्ख लोकांचे मनाप्रमाणें चालावें यांत कांहीं हित नाहीं. दोन हजार लोक एकत्र जमले तर ती एक प्रजाच होईल. तीस कोणाची गरज नाहीं. तिनें ब्राम्हणाप्रमाणें धर्म आचरावे आणि पुनर्विवाहाविषयीं मात्र सुधारणा करावी. आतां त्याबद्दल मूर्ख लोक काय दोष देतील तो देवोत, परंतु अशा हितकारक सुधारणेस उशीर किमपि करूं नये. ही पुनर्विवाह करणारी जात उभी राहिली म्हणजे अर्थातच इतर ब्राम्हण त्यांत येऊन मिळतील, व कांहीं दिवसांनीं सर्व एक होतील. पुनर्विवाह हिंदु लोकांचे सुधारणेचें मूळ आहे, व त्यांत निम्मे सुधारणा आहे, व तेणेंकरून फार लाभ आहेत. हें पाहून कोणा गृहस्थाची मुलगी विधवा झाली म्हणजे त्याचे मनांत येईल कीं, आपले मुलीचा घात करावा आणि मूर्ख ब्राम्हणाचे जातींत राहावें, त्यापेक्षां सुधारक हिंदूचे जातींत कां जाऊं नये? तेथें काय कमी आणि येथें काय जास्ती आहे? असे लोक पुष्कळ मिळतील. परंतु प्रथमतः करण्यास कोणी धजत नाहीं. हा वेडेपणा आहे. यांत कांहीं ब्राम्हणांचें बुडत नाहीं व कांहीं थोरपणा कमी होत नाहीं. आणि धर्म बुडत नाहीं. परंतु त्यांनीं वेडेपणानें धर्म, रीती, चाली, शास्त्र हें सर्व एकत्र केलें आहे. पाहा, सांप्रतकाळचे लोक इतके मूर्ख आहेत कीं, त्यांत चाल म्हणजे काय असें कोणी पुसलें तर ते म्हणतात कीं, अरे चाल म्हणजे धर्म; परंतु त्यांस असें कळत नाहीं कीं, धर्म, चाल व शास्त्र हीं सर्व वेगळालीं आहेत. परंतु हे लोक इतके विद्वान् व समजूतदार असते तर मूर्खपणानें स्वतांचे घातास कां प्रवर्तक होते; शास्त्र यद्यपि असेल कीं, स्त्रीचा पुनर्विवाह करूं नये. तर शास्त्र हे कायदे आहेत. व जे अनहितकारक कायदे असतील, ते सोडून दुसरे करण्यास

कांहीं चिंता नाहीं. मला वाटतें कीं, मनुष्यें लवकर संपवावींत व लोक वृध्दिंगत होऊं नयेत म्हणून स्त्रियांनीं पुनर्विवाह करूं नये, असें ठरविलें नसेल ना? ब्राम्हणांचे ताब्यांत त्यांनीं राहावें व आपला नवरा गेला, मेला किंवा रुसला तर मला त्राता कोणी नाहीं; तस्मात् याचींच आर्जवें करावीं असें स्त्रियांस वाटावें, म्हणून ब्राम्हणांनीं त्यांस आपल्या दासी करण्याकरितां आपले जाळ्यांत त्यांस धरलें. सर्व प्रजा व राजे इत्यादि त्यांनीं आपले ताब्यांत घेतले आहेत. मग स्त्रिया तरी कशा सुटतील? ब्राम्हणांनीं शास्त्र केलें कीं, राजानें प्रथम ब्राम्हणाचें प्रतिपालन करावें, नाहींतर त्याचे राज्यास वाईट होईल. परंतु असें लिहिलें नाहीं कीं, राजानें सर्वांचें प्रतिपालन करावें. ब्राम्हणाचेंच विशेष करावें हें कशास पाहिजे? याचप्रमाणें ब्राम्हणांनीं पोटें भरावीं व त्यांचें महात्म राजापासून आपल्या स्त्रियांपर्यंत सारखें या भूमीवर राहावें व ब्राम्हणांचें कोठें न्यून पडूं नये, यास्तव हें शास्त्र आहे. ब्राम्हणांस मडकीं द्यावीं, फळें द्यावीं, धान्याच्या राशी द्याव्या, इतक्या युक्ती याचकरितां केल्या कीं, त्यांस कांहीं न्यून नसावें. परंतु या सर्व युक्ती लोक अज्ञान व ब्राम्हण मात्र शाहाणे होते, तेव्हां चालल्या. आतां ज्ञान सर्व ज्ञातींत प्रसृत झालें आहे. म्हणून आतां या तजविजी सर्व व्यर्थ होतील आणि ब्राम्हण व इतर जात सारखीच होईल. जो विद्वान तोच ब्राम्हण; जो शूद्राचें आचरण करितो तो ब्राम्हण कशाचा? असें होऊन भेद आहे तो अर्थातच निघेल. व जुनें शास्त्र स्त्रियांस दासी करण्याकरितां केलें तें फिरेल. ब्राम्हण पहिले भिकारी व रानांत राहणारे होते. त्यांस खावयास मिळावयाचीही भ्रांत होती व स्त्रियांस सुखप्रद कांहीं नव्हतें. म्हणून त्या नाखुष राहून कदाचित् पळून जातील, किंवा त्यांस कोणी घेऊन जाईल, यास्तव हें अवघड शास्त्र केलें आहे कीं, स्त्रीनें सती जावें; नाहींतर पुनर्विवाह करूं नये. विधवा जन्मपर्यंत असावें व विद्रूप व्हावें. अलंकारशून्य असावें व दोनदां जेऊंही नये. याचें तात्पर्य पाहाल तर एक पुनर्विवाह करूं नये. या आपले हितार्थ ब्राम्हणांनीं शास्त्र केलें; व त्यापासून हें सर्व उत्पन्न झालें. पुनः लग्न करूं नये म्हटलें, तेव्हां अर्थातच स्त्रिया व्यभिचार करतील; पण त्यांस करण्यास कोणा पुरुषाची इच्छा होऊ नये म्हणून केश काढून बोडक्या करण्याचें शास्त्र केलें. म्हणजे त्यास कोणी पुरुष अनुकूल होणार नाहींच, हें तात्पर्य. असो, हे सर्व जुल्म आहेत व स्त्रियांस विद्या शिकऊं नये म्हणतात. याचेंही कारण हेंच आहे कीं, त्यांनीं जर शास्त्राभ्यास केला तर त्या विरुध्ध गोष्टीस प्रतिकार करतील. सारांश, एकादा मनुष्य जसा स्वतंत्र कारभार करण्यास इच्छितो व मध्यें दुसरा कोणी असेल तर त्यास हांकून देऊन आपण एकटें बसावयाचें करतो, तद्वत् पहिले ब्राम्हण होते. त्यांचा असा मतलब कीं, आपली बरोबरी कोणी करूं नये; म्हणून त्यांनीं कायदा केला कीं, शूद्रांनीं व स्त्रियांनीं पोथी उघडूं नये व जर त्यांस कांहीं शास्त्र पाहावयाचें तर त्यांनीं ब्राम्हणाचे मुखांनीं ऐकावें. ज्या वेळेस हे कायदे केले, त्या वेळेस तरी लागेलच लोकांनीं हे ग्रहण केले असतील

असें म्हणवत नाहीं. बहुत काळेंकरून पहिले लोकांची योग्यता मोठी, असें समजूं लागले. मग जसजसा तो जुना होतो तसतसे लोक त्याचें भजन करितात व अगदीं अंधळे होतात. अस्तु. स्त्रियांचे हाल, विपत्ती, जनावरांप्रमाणें अवस्था, ज्ञानशून्यता व पुरुषांची क्रूरता, प्राचीन शास्त्राधारें बहुत दिवस चालली, पण आतां तरी हा ईश्वरी क्षोभ जावो आणि जसे पुरुष तशा स्त्रिया आहेत, असें अंधळ्या हिंदु लोकांस समजो. ही माझी अतिशय इच्छा आहे; तर जे सुधारक हिंदु असतील त्यांहीं या कामास निर्भयपणानें आरंभ करावा, हीच विनंती आहे.

लो० हि०



प्रभाकर ता० ११ जून, सन १८४८

पत्र नंबर १७

ब्राम्हणांचें अज्ञान

विनंती विशेष. या देशचे लोकांचें असें मत आहे कीं, ईश्वरानें सृष्टींत स्त्रिया थोड्या आणि पुरुष फार निर्माण केले आहेत, व याचें उदाहरण ते असें दाखवितात कीं, कितीएक पुरुष लग्न झाल्याखेरीज असतात, आणि स्त्रिया लग्न झाल्याखेरीज असत नाहींत. याजवरून बहुत पुरुषांस स्त्रिया मिळत नाहींत, असें अनुमान ते काढितात. परंतु मला वाटतें कीं, हा मूर्खपणा आहे. कारण, स्त्रियांस एकदा विवाह करण्याचा व पुरुषास दोनतीन वेळ विवाह करण्याचा अधिकार आहे. यास्तव स्त्रिया तिकडे जास्त जातात आणि इकडे कमती येतात. जरकरितां स्त्रियांस पुनरपि लग्नें करण्याचा अधिकार मिळेल तर पुरुषांस कधीं कमती येणार नाहीं. व स्त्रीपुरुष सृष्टींत समसमान आहेत. तेव्हां पुरुष लग्नाशिवाय राहावे आणि स्त्रिया न राहाव्या याचें कांहीं कारण दिसत नाहीं. परंतु मनुष्याच्या रीतींत व नियमांत व वर्तणुकींत याचें कारण आहे; म्हणजे ब्राम्हण लोकांनीं हा मोठा अनर्थ मांडला आहे कीं, स्त्रियांस पुनः लग्न करूं देत नाहींत. ही गोष्ट त्यांस इतकी बरी वाटते कीं, त्याविषयीं जर कोणी भाषण केलें तर त्यांस मनापासून वाईट वाटतें व अतिशय दुःख होतें. ते म्हणतात कीं, येणेंकरून आमचा पूर्वापार धर्म वशिष्ठापासून चालत आला, त्यास अपाय होईल व सर्व लौकीक बुडेल आणि आपण सारे या पापामुळें नरकांत जाऊं. असें मोठमोठे विद्वान् आहेत त्यांचेदेखील मनांत येतें व जे गृहस्थ, भट वगैरे आडाणी लोक आहेत ते तर लौकिकावांचून दुसरी गोष्ट जाणतच नाहींत. परंतु मला वाटतें कीं, ही समजूत अगदीं खोटी

आहे. पुनर्विवाहापासून धर्मास, कर्मास व लौकिकास अपाय नाहीं. सर्व चांगलें आहे. मनांत जें मिथ्या तें खरें वाटतें. ईश्वरास भजावें हा मात्र धर्म आहे. लग्न इत्यादि रितीभातीशीं धर्माचा कांहीं संबंध नाहीं. पूर्वीं देवरोत्पत्ती[1] होती. ऋषी मांस खात होते, व इतर जातीचे लोक ब्राम्हण होत असत, असें वाल्मिक व व्यास यांचे उदाहरणांवरून समजतें. व असें दिसतें कीं, त्या वेळचे ब्राम्हण ज्ञानी होते. आतांचेसारिखे मूढ नव्हते. व आमचे जातीनें आमचे शास्त्राचे बाहेर चालूं नये, असें म्हणत नव्हते. सारासार विचार पाहात होते व जर कांहींएक अनर्थ वाटला तर तो बंद करून दुसरी रीति स्थापित होते. असें अनेक स्मृती आहेत त्या पाहिल्यावरून वाटतें. दर एक स्मृतीरूप ग्रंथांत वेगळालीं मतें आहेत. याजवरून असें दिसतें कीं, प्रत्येक स्मृतिकार एकेक राजाचा आश्रित असेल व त्यानें आपआपले राजास लागू पडतील तसतसे कायदे केले. याजवरून ते शाहाणे होते, असें दिसतें. एका गृहस्थानें एक बाग केला. तेथें झाडें लावीत. तीं मेलीं तर तो पुन्हा दुसरीं झाडें लावी. तेणेंकरून त्याचा बाग चांगला राहात होता. हा दृष्टांत ब्राम्हणांचे शास्त्रास लावूं. यांच्या शास्त्राच्या बागेंत पूर्वीं झाडें लाविलीं तीं वाळून गेलीं, तरी लोक त्या झाडांशीं बांधून घेऊन हितअनहितावर हल्लीं कांहीं लक्ष देत नाहींत. सरासरी लक्ष देण्याचा विचार शंकराचार्यापर्यंत चालला. परंतु आलीकडे सुमारें दोन हजार वर्षांत लोक अंधळे झाले व विचार करीत नाहींत. व ब्राम्हण पूर्वी पोथीपुस्तक पाहाणारे आणि रानांत राहाणारे होते. ते जाऊन आतांचे ब्राम्हण मजूरदार व घरंदाज झाले; व ते, कोण श्रीमंत आहेत? फुकट जेवावयास कोण घालील? आणि दक्षणा कोण वांटील? अशी वाट पाहात असतात. त्यांची योग्यता पाहिली तर दोन ओळी पाठ म्हणतात इतकीच; परंतु अर्थाचे नांवानें शून्य. तेव्हां त्यांस विद्वान म्हणावें किंवा नाहीं, याचा संशय येतो. कारण ज्यास अर्थपरिज्ञान नाहीं, नुस्तीं अक्षरें वाचून पाठ म्हणतात, त्यांचे ते शब्द जशी जनावरांची ध्वनि तद्वत् आहेत. कारण जनावरांची आणि मनुष्यांची ध्वनि सारखीच आहे. मनुष्यामध्यें जाजती इतकेंच आहे कीं, ते जी ध्वनि करितात तिचा अर्थ करून समजतात व दुसऱ्यास कळवितात, हें मनुष्याचें विशेष लक्षण आहे. तें लक्षण आलीकडील ब्राम्हणांचे ठायीं आढळत नाहीं. तेव्हां हे आपल्यास बुद्धी, विचार, ज्ञानशक्ति, मन, चित्त इतकीं असून तीं बंद करून पोट भरण्याकरितां मात्र पाठ करितात, तेव्हां त्यांस विद्वान् कोण म्हणेल व ब्राम्हणांचीं मतें बहुधा नीट असत नाहींत. त्यांचें चित्त जेवणावर व पैक्यावर असतें. मूर्ख लोकांत प्रतिष्ठा मिरवावी व फुकट पोट भरावें म्हणून ते चार अक्षरें पाठ करितात. परंतु त्यांस ज्ञानी आणि विचारी कोण म्हणेल? ते भारवाहक असे आहेत. मग त्यांची वर्तणूक तरी चांगली कोठून असणार? आलीकडे

---

१. दिरापासून संतती करून घेणें.

पुण्यांत एक दशग्रंथी विद्वान् ब्राम्हण सदरीं लिहिले प्रकारचा होता. त्यास माजिस्ट्रेटाकडून चोरीबद्दल एक वर्षाची शिक्षा झाली. याजवरून या सर्व गोष्टी सहज मनांत आल्या त्या कळविल्या आहेत.

मला वाटतें कीं, बहूत वैदीक व शास्त्री हे वांकड्या समजुतीचे लोक आहेत व हिंदुस्थानचे विद्येचा स्वभाव असा दिसतो कीं, त्यांतील विद्वान बहुधा मोठा मूर्ख आणि भलतेच समजुतीचा असतो. मनुष्याहून पृथक बुद्धी त्यास येती, अडाणी मतें वगैरे त्यास फार भासतात. याचें काय कारण असेल तें असो. त्याचा पुढें विचार करूं.

इंग्रज लोकांनीं जगांतील बहुत गोष्टींचा शोध केला आहे व त्यांचे खालोखाल मुसलमान लोक आहेत. कारण फारशी भागवत, भारत व वैदीक ग्रंथ अकबर बादशाहा वगैरे यांचे हुकूमावरून ब्राम्हणांचा धर्म प्रसिध्द होण्याकरितां लिहिले आहेत. तेव्हां इंग्रजीचे खालीं शोधक व उद्योगी हे लोक दिसतात. ब्राम्हण लोक व मराठे लोक यांणीं शंभर दीडशें वर्षें राज्य केलें; परंतु असें कांहीं केलें नाहीं, व त्या काळीं इंग्रज व मुसलमान हे लोक हिंदुस्थानांत होते, परंतु त्यांजविषयीं कोणी शोध किंवा पुस्तक केलें नाहीं. याजवरून हिंदु लोक निद्रिस्थ आहेत, असें दिसतें. यांचें शहाणपण, अक्कल, विद्या व कला बाहेर गेली व बाहेरची आणावयास यांस संकट पडलें, हा केवढा चमत्कार! पेशवाईंत ब्राम्हण लोकांनीं फक्त जेवणाचे पदार्थ नवे काय काय होतील व रेशमी व भरगच्ची पोषाख आंगावर कुत्रीं भोकावयाजोगे काय काय तयार होतील, यांचा विचार करण्यांत मात्र वेळ घालविला. कांहीं विद्येपासून हित, मनाची सुधारणा व राज्याचा बंदोबस्त केला नाहीं, हें उघड आहे. जे हिंदुस्थानांत पहिले प्रतीचे ब्राह्मण, त्यांजवांचून दुसरे कोणी वाचूं नये, असे नेम आहेत. त्या ब्राम्हणांचा मूर्खपणा हा आहे, तेव्हां इतर जातींची व्यवस्था सहजच समजेल. तस्मात् हे लोक मूर्खपणांत आहेत, हाच निश्चय खरा; व यांस जागृत करण्याकरितां इंग्रजांस पाठविण्याची योजना ईश्वरानें केली आहे, हाही निश्चय खरा. आणि त्याप्रमाणें हा बेत सिद्धीस जाऊन हे लोक ज्ञानी, शाहाणे व सावध होऊन सुखी व्हावे, हीच आतां आशा आहे.

लो० हि०

पत्र नंबर १८

आर्जवीपणा व डौलीपणा

विनंती विशेष. सांप्रतकाळीं दोन दुर्गुण हिंदु लोकांत फार उत्पन्न झाले आहेत. एकाचें नांव दिवाळखोरी व दुसऱ्याचें नांव गुलामगिरी, अशीं आह्मी त्यांस नांवें

ठेवितों. याहून दुसरे शब्द आम्हांस सुचत नाहींत व जे या दुर्गुणानुगामी आहेत त्यांनीं कीर्ति किंवा धन संपादन केलें, असें लोकांस वाटून त्यांचा आचार अधिकाधिक वृध्दिंगत होत चालला आहे. आम्हांस मोठा चमत्कार वाटतो कीं, ज्या पुरुषास एक महिन्याचे २० रुपये मिळत आहेत, त्यानें थोराचे नादीं लागून तीस रुपयांचा खर्च करावा, यांत त्यास काय कीर्ति आहे? परंतु असें करणारांचे मनांत येतें कीं, "साखरेचा खाणार त्याला देव देणार." अशी म्हण लोकांत चालत आहे; परंतु मला तिचा खरेपणा कांहीं वाटत नाहीं. गरिबाचे मनांत येतें कीं, मी थोरासारखा वागून त्याचे मंडळींत मिरवेन आणि तेणेंकरून माझी मान्यता वाढेल. परंतु अशा डौलानें योग्यता चढत नाहीं. इतकेंच होतें कीं, तोंडावर कोणी मूर्ख म्हणत नाहींत. निष्पक्षपाती असेल तो तोंडावरही म्हणतो. बाकी सामान्यतः पाठीमागें म्हणतात. आतां बहुत लोक असेही पाहाण्यांत येतात कीं, पांच रुपये महिन्याची मिळकत आणि पंधरा रुपयांचें त्यांचे डोकीस पागोटें. एक म्हण आहे कीं, "मिजाज बादशाहाची आणि अवलाद भडभुंजांची." अशी ते वहिवाट करितात. आणि पैसा नाहींसा झाला म्हणजे कांहीं कामकाज असेल तर लांच वगैरे घेऊन किंवा कोणास फसवून बाता मारून लबाड्या करून चार रुपये उपटतात. त्याजवर पोट भरावें व तें नाहीं तर बाप आई यांजवळ कांहीं संपदा असली तर घरांत उचकाउचक करावी. व तेंही नाहीं तर शेवटीं बाहेर चोऱ्या कराव्या; मग अब्रू जाईल ती जाईल, राहील ती राहील; परंतु त्यांचे लक्षांत असें वागत नाहीं कीं, वस्त्रप्रावर्ण डौल आणि ढोंग यांत थोरपणा कांहीं नाहीं. आपले मिळकतीप्रमाणें आपण खर्च करावा. थोराचे गुण घ्यावे. पण त्यांचा खर्च आपल्यास काय होय? थोरांनीं विहिरींत उडी टाकिली तर आपण कशास टाकावी, हें त्यांस कळत नाहीं. ते थोरांची बरोबरी करण्यास जातात व थोरांनीं एके ठिकाणीं पांच रुपये खर्च केला तर आपणही करितात. आणि असें मनांत आणितात कीं, यांचे बरोबरीनें खर्च केला, आतां आम्हांस यांची योग्यता आली, असें लोक समजतील; परंतु जाणणारे आहेत ते आपल्या मनांत यांस मूर्ख म्हणून समजून उगेच बसतात. इतकें हें दिवाळखोरीचें वर्णन झालें. आतां गुलामगिरी हा तर दुर्गुण सर्व हिंदु लोकांचा आहे असें मला वाटतें. यांतून एकही मुक्त नाहीं. याजवर कितीएक मूर्ख आपल्यास गोष्टी सांगणारे आर्जवी इत्यादि दुर्लौकिकाचे हुद्यावर मुकरर करितात. आणि बहुधा मतलब असा असते कीं, थोरांस दुर्गुण व नाना प्रकारच्या खोडी लावाव्या आणि अखेरीस त्यांस बुडवावें. जोंपर्यंत यांजवळ अर्थ आहे, तोंपर्यंत त्यांस भुलवून पैसा द्यावा व त्यांजकडे कामकाज असलें तर त्यांजवळ लोकांची मध्यस्थी करून लांच देण्याची आणि आपणही कांहीं खावी. आणि नेहेमी स्तुती करावी व ते जें म्हणतील त्यास रुकार द्यावा. नेहेमी बरोबर फिरावें. असे लोक बहुत झाले आहेत व बहुधा द्रव्याचीं ठिकाणें अशा लोकांनींच वेष्टिलीं आहेत. त्यांतच भट भिक्षुक यांस मानलें

पाहिजे. कारण ते फारच आर्जवी लोक आहेत. ते कांहीं धर्मरक्षक नव्हत. परंतु त्यांचा व्यापार इतकाच कीं, यंजमानानें चोरी व लबाड्या इत्यादि गुन्हे करून द्रव्य आणिलें तरी चिंता नाहीं, भटांस खावयास घातलें म्हणजे झालें. इतकाच त्यांचा हेतु आणि द्रव्यवानानें कसेंही कर्म केलें तरी त्यास शास्त्रार्थ काढून द्यावा. असे लबाड लोक बहुत धर्म म्हणून बाळगतात. परंतु ते उभयलोकीं अकल्याणकारक आहेत. कोणताही श्रीमंत पाहा; त्याचे घरीं पंक्तीबारगीर फार असतात. परंतु त्यांची निवड केली तर शेंकडा दोनचार उपयोगी निघतील. बाकी सर्व गुलामगिरी करणारे होत. असें, विचारी आहेत, त्यांचे मनांत येईल. अस्तु. ही चाल या लोकांत बहुत आहे. आणि जे केवळ गरीब आहेत, ज्यांस खावयास नाहीं तेच असें करितात असें नाहीं, ज्यांस स्वार्थ आहे त्यांसही निर्लज्जपणाची गुलामगिरी करावी असें वाटतें आणि आपल्याहून थोर म्हटलेले असतात, त्यांचें ते आर्जव करितात. बहुत स्तुति करितात आणि आपले घरून त्यांचे घरीं जाऊन पायमळणी करितात. तेणेंकरून त्यांस असें वाटतें कीं, आम्ही त्यांच्यासारिखे होऊं आणि आमची प्रतिष्ठा अधिक होईल. परंतु लोक त्यांस मूर्ख मात्र म्हणतात. आणखी कांहीं होत नाहीं. पहिला थोरपणा आणि स्वतंत्रपणा असतो तोही जातो. आम्ही कितीएक लोक असे पाहिले आहेत कीं, जोंपर्यंत शिरस्तेदारी, नाझरी किंवा असा दुसरा कोणता मोठा हुद्दा कोणा माणसाकडे आहे, तोंपर्यंत त्याजकडे हरवक्त लोक येतात. व मेजवान्यांचीं बोलावणीं येतात, जसें कोणी म्हणेल कीं, यांचा व त्यांचा परम स्नेह आणि हरएक प्रकारें "जिवस्य कंठस्य" आहे; परंतु त्याजकडील काम गेलें म्हणजे तो जर मरावयास भूमीवर काढला असेल तर तो जिवंत आहे काय, असा समाचारही घेत नाहींत. व पूर्वी ज्यांचे बंधू असें म्हणवीत होते, त्यांचा मुलगा भीक मागूं लागला तरी त्यास एक दिवसदेखील बोलावीत नाहींत. कामावरून दूर झाला म्हणजे बोलावण्याचे यादींतून त्याचें नांव निघतें. असे ते स्नेही. या प्रकारेंकरून आर्जवी लोक वेष घेऊन लोकांस बुडवितात. त्यांचा सर्वकाळ हाच उद्योग. हे लोक "असतील शितें तर मिळतील भुतें," याप्रमाणें आहेत. आणि इतकेंही करून नफा काय? पोट मात्र भरते आणि मेलें तर पाठीमागें व जिवंत असतांना दुष्कीर्ति लोकांत होते. असें आयुष्य घालविण्यापेक्षां गरीब राहून मेहेनत करावी व स्वतंत्रपणानें भाकर मिळाली तर ती आगंतुकीपेक्षां बरी. परंतु हा स्वतंत्रपणाचा लाभ कोणास कळत नाहीं. मुळापासून हिंदुस्थानांत एकतंत्री राज्य, याजमुळें लोक इतकी गुलामगिरी करावयास शिकले. दुसरें कारण दिसत नाहीं. नाना फडणीस याची गोष्ट सांगतात कीं, मराठे लोकांत नाना फडणीस शाहाणा प्रधान होता. तो बाजीराव आल्यावर बरतर्फ झाला. व त्यास कांहीं कामकाजही नाहींसें झालें. तेव्हां कोणी त्याचे मित्रांनीं सुचविलें कीं, आतां तुमचा वृध्धापकाळ झाला व बाजीरावाचें तुमचें नीट नाहीं. त्यापेक्षां सरकारांत विनंती करून कांहीं पोटापुरती नेमणूक करून घेऊन काशीस जावयाचा बेत करावा. त्याजवर

त्यांनीं उत्तर दिलें कीं, स्वामीची सेवा मरणापर्यंत करावयाची, आपले कामावर मरावें, असें सांगितलें; आणि त्याप्रमाणें केलें. तात्पर्य, मराठी लोकांची चाल याप्रमाणें आहे कीं, जन्मपर्यंत चाकरी करावी, चाकरीसारखें दुसरें सुख मानीत नाहींत. हाही गुलामपणाच आहे. चाकरी हें निंद्य कर्म होय. तें कामापुरतें करावें आणि सामर्थ्यानुसार लवकर सोडावें. परंतु जे लब्राड लोक आहेत ते नेहेमी नीटपणानें चाकरी करीत नाहींत. यास्तव बहुत दिवस ते चाकरी करतात. सरकारी चाकरी हें लोकांचें धर्माप्रमाणेंच काम आहे, व हें नीट करण्याहून दुसरा सद्धर्म कोणता नाहीं, असें मनांत न आणितां ते असें समजतात कीं, सरकारचाकरी चांगली मिळाली म्हणजे आपणास भूमींतील द्रव्य सांपडलें. मग पाहिजे तसें लुटावें, लोकांस बुडवावें, आणि आपलें घर भरावें. द्रव्य मिळविण्याचा हाच हंगाम आंहे, असें जाणून त्याप्रमाणें ते जुलमाची वहिवाट करितात. म्हणूनच अशी लब्राडी करावयाचें ठिकाण सोडून त्याच्यानें जांववत नाहीं. इतकाच नेटीव लोकांचे स्वभावाचा अर्थ दिसतो. आणि जो शोधून पाहील त्यास असेंच वाटेल कीं, हे लोक फार अप्रमाणिक व लोकांस बुडविण्याविषयीं धुरंधर आहेत. यांची म्हण अशी आहे कीं, "सरकारचें खाऊं नये तर कोणाचें खावें?" जर मनुष्यांस स्वस्थतेचें सुख व व्यापार, शेतकी वगैरे धंदे यांतील थोरपणा समजेल तर ते चाकरी तुच्छ मानतील. परंतु तें कळत नाहीं. याजमुळें अशी दुराशा धरून लोक दुष्टपणा करितात. याजमुळें आपले लोक आपले देशचे राज्यास मुकले आहेत. कारण स्वदेशीय राजाच्या जुलूम लोकांस सोसवत नाहीं. इंग्रज व परकी दुसरे बरे वाटतात. अस्तु. नेटीव लोकांनीं आपला लुटारुपणाचा स्वभाव व गुलामगिरी आणि दिवाळखोरी हीं सोडून स्वदेशीय लोकांचे हितांविषयीं विचार केला पाहिजे. गुलामगिरीपासून दिवाळखोरी होते. जर मनुष्य आपला स्वतंत्रपणा राखील तर त्यास दुसऱ्यासारखें करण्याची जरूर नाहीं. गुलामगिरी आणि दिवाळखोरीपासून लुटारूपणा वगैरे अनर्थ होतात.

लो० हि०

प्रभाकर, ता० २ जुलाई १८४८

पत्र नंबर १९

हिंदु लोकांचा आळशी स्वभाव

पूर्वीं इंग्रज लोक रूमचे बादशहाचे अमलांत होते. त्या वेळेस हे फार दरिद्री व हल्लीं हिंदु लोक दिसतात याहूनही मूर्ख होते. यांस राज्यनीति, कायदा, शास्त्र, नेमधर्म

कांहीं चांगलें नव्हतें. व ते रूमचे लोक इंग्रजांचीं वेटें घेऊन जेव्हां तेथें राज्य करीत होते, तेव्हां गुलाम खरेदी करण्याची चाल होती. परंतु रूम शहरांत गुलाम विकावयास आणले म्हणजे लोकांनीं पुसावें कीं, हा मुलगा कोणाचा आहे ? आणि जर विकणारानें सांगितलें कीं, हा इंग्रजाचे बेटांतील, तर घेणार म्हणत, "अरे छीः हा फुकट दिला तरी नको." कारण इंग्रज लोक जसे मूर्ख व कुबुध्ध आहेत, तसे कोणत्याही देशांतील लोक नाहींत, असें ते लोक म्हणत होते. अशा गोष्टी ग्रंथांतरीं वाचितों. परंतु आतां इंग्रज लोकाकडे पाहिलें म्हणजे ईश्वराचा मोठा व चमत्कारिक खेळ आहे, असें वाटतें. दोन हजार वर्षांपूर्वी इतक्या मूर्खपणाचे स्थितींत जे लोक होते ते हल्लीं केवढे शाहाणपणाचे स्थितींत आहेत, व हिंदुस्थानांतील लोक दोन हजार वर्षांपूर्वी मोठे पराक्रमी होते, त्यांची अवस्था काय झाली आहे ? तेव्हां या दोन्ही गोष्टींचा शोध करणें अवश्य आहे; असें असून आपले लोक किती भ्रांतींत आहेत ? दिवसेंदिवस आपले लोकांतील थोरपणा जात चालला आहे. शाहाणपण पूर्वीच गेलें. नंतर द्रव्यही गेलें. म्हण आहे कीं, "आधीं शाहाणपण जातें मग भांडवल जातें." तसेंच या लोकांचें झालें आहे. अद्यापि या लोकांस कोण कोठें आहे, पृथ्वीवर रचना कशी आहे, किती प्रकारचे लोक आहेत व राष्ट्रें किती आहेत ? याविषयीं कांहीं कळत नाहीं. लिहिणें आणि वाचणें झालें म्हणजे मोठी विद्या झाली, असा सांप्रत काळाचा घाट आहे. परंतु लिहिणें व वाचणें हें विद्येचें द्वार मात्र आहे, विद्या नव्हे; विद्या पुढेंच आहे. पण लोकांच्या समजुती इतक्या अखुड झाल्या आहेत कीं, ते अंधेरांत गर्क आहेत. इंग्रेज लोक इकडे येऊन राज्य करितात. व त्यांजकडे आमचे लोक तोंडांत बोटें घालून चमत्कारानें पाहात राहातात. आणि खावयास मिळत नाहीं म्हणून चरफडतात. ऐश्वर्य गेलें असें त्यांस वाटतें. परंतु याचें कारण काय, आपले देशाची अशी अवस्था कशानें झाली, इंग्रज कोठून आले, यांचें राज्य कसें आहे, व आपण चांगले होण्यास काय उपाय करावा ? या गोष्टींचा विचार कोणी करीत नाहींत. केवळ जनावराप्रमाणें मारलें तर लागतें; परंतु पुढें बुध्धी चालत नाहीं. तद्वत हे लोक शुध्ध बैल व विचारशून्य आहेत. गर्वानें आपले ब्राम्हण लोक जळतात व इतर लोकांस तर ज्ञानच नाहीं. व हें असें होणें तरी ब्राम्हणांचेंच कपट आहे. तेव्हां आतां इतकाच उपाय आहे कीं, यांणीं आपले राजे इंग्रज यांचा शोध करावा व त्यांचे देशांत जावयाचें नाहीं वगैरे ज्या समजुती आहेत त्या सोडाव्या. म्हणजे त्यांचें शाहाणपण यांस येईल. एक गोष्ट आठवली आहे, ती अशी– कोणी एक ब्राम्हण आतांचे मूर्ख ब्राम्हणासारिखा होता. त्याचे घरांत एक चोर शिरून दागिने उचलून घेऊन चालला, तों ब्राम्हणाचे बायकोनें त्यास पाहून नवऱ्यास हाक मारून सांगितलें कीं, "चोरास धरा." तेव्हां तो म्हणू लागला कीं, "मी ब्राम्हण आहें व चोराची जात कोण आहे याचा मला ठिकाण नाहीं. तेव्हां मी त्यास शिऊं कसा ? त्याणें कांहीं नेलें तरी चिंता नाहीं." असें म्हणून त्या ब्राम्हणानें आपलें सर्वस्व गमावलें.

व चोरानें तें भाषण ऐकून सावधगिरीनें अधिक लाभ करून घेतला. आतां पाहा, या भटाप्रमाणें आमचे लोकांची अवस्था आहे. परदेशाचे लोक येऊन इकडे राज्य करितात आणि आणि हिंदुलोकांचे सारथी ब्राम्हण लोक ते म्हणतात कीं, "आमचा धर्म आरबांचे व इंग्रजांचे देशांत जावयाचा नाहीं; व त्याविषयीं आम्हीं कांहीं मनांत आणणार नाहीं." सारांश ते अपवित्र, असें म्हणून परकी लोकांस मात्र स्वस्थपणें राज्य करावयास सांपडतें. व आमचा सर्व व्यापार त्यांचे हस्तगत झाला आहे. जर आपले लोक विलायतेंत जाऊन तेथील माहितगारी करून घेते तर आतां जसें इंग्रजांस भितात तसें न भिते. सामान्यतः इंग्रज लोक इकडे आले म्हणजे स्वर्गाहून इंद्र खालीं आल्याप्रमाणें लोकांस वाटून त्यांजविषयीं मोठें भय उत्पन्न होतें. असा हिंदु लोकांचा गरीब स्वभाव, यामुळें हे हतवीर्य झाले आहेत. यांच्यामध्यें सामर्थ्य नाहीं व मूर्खपणा फार वाढला आहे. सगळे लोक आपले ठिकाणीं शाहाणे म्हणवितात. परंतु यांस इंजनीयर इंग्रेज पाहिजेत. प्रोफेसर इंग्रज पाहिजेत. डाक्टर इंग्रजच पाहिजेत. जड्ज व बारीस्टर तेच पाहिजेत. सर्व कारखाने त्यांचेच हातीं. आमचे लोक त्यांचें दास्यत्व करण्यास देखील योग्य नाहींत. हें काय ? पांचशें वर्षें मुसलमान लोकांची गुलामगिरी केली व आतां शंभर दीडशें वर्षें इंग्रजांची गुलामगिरी करितात. परंतु अद्यापि आमचे लोकांस कांहीं ठाऊक झालें नाहीं. तथापि इंग्रजांनीं आपली विद्या इकडे प्रकट केली हा त्यांचा मोठा उपकार आहे. व येणेंकरून लोक शाहाणे होतील. हिंदु लोक इतके मूर्ख आहेत कीं, इराण, तुर्कस्थान व अर्बस्थान येथून मुसलमान लोक हिंदुस्थानांत येऊन घरें बांधून राहिले, परंतु हिंदु लोकांस त्यांचें कांहीं वर्तमान ठाऊक नाहीं व हिंदु दुसरे एखादे मुलखांत गेले आहेत, असें कधीं आढळणार नाहीं. व परमुलखांचे लोक येऊन हिंदु लोकांचे हातचें हिसकाऊन घेऊन खातात. व मानेवर जोखड ठेवून राज्य करितात. पण इतके सर्व सहन करून आहेत. यांच्यामध्यें बळ, शूरत्व किंवा शक्ती कमी आहे असें नाहीं. पहिल्यानें यांणीं सर्व हिंदुस्थान जिंकलें होतें. परंतु यांस राखावयाचें शहाणपण नाहीं. याजमुळें हे गमाऊन बसले. शास्त्रांत अटक, गंड व पापनाशी इतक्या नद्यांविषयीं असें लिहिलें आहे कीं, पापनाशी नदीस स्पर्श करूं नये. गंडकींत चालूं नये. व अटक नदी उतरून पलीकडे जाऊं नये. व याचा हेतु इतकाच दिसतो कीं, त्या नद्या अवघड व जरा भयंकर आहेत. याजमुळें कोणी धीर करून त्यांत जाईल आणि मरेल तर तें न व्हावें. यास्तव त्यांणीं हे शास्त्रार्थ लिहिले, परंतु दुसरे मुलखांत जाऊं नये असा त्याचा अर्थ नसेल असें वाटतें. आणि जर कदाचित असला तर ती शास्त्राज्ञा मानण्याची कांहीं जरूर नाहीं. ज्यावेळेस तें शास्त्र झालें त्यावेळेस इकडे दुसरे लोक नवते. याजमुळें तें शास्त्र योग्य. परंतु आतांचे अवस्थेंत तें मानून मूर्खपणानें उगेंच बसणें, याचें कारण काय ? जेव्हां हीं मतें मोडून हिंदू लोक परदेशांत जाण्यास सिध्ध होऊन मूर्खपणाचे कायद्यांतून खुले होतील तेव्हांच कांहीं यांचे हातून पराक्रम होईल.

युगपरत्वेंकरून शास्त्रही फिरलें असें समजलें पाहिजे. आणि सर्व शास्त्रांचा मतलब हाच कीं धर्म रक्षावा. सिंधुनदीपलीकडे जाऊं नये हें कशाकरितां ? धर्म रक्षावा आणि म्लेंछांचा स्पर्श होऊं नये म्हणून. परंतु म्लेंछच इकडे आले, तेव्हां आपण पलीकडे जाण्याचे कामीं आतां शास्त्र एकीकडे ठेवलें तरी चिंता नाहीं, असें मला वाटतें.

लो० हि०

प्रभाकर, ता० १ जुलाई १८४८

पत्र नंबर २०

ब्राम्हणांचें महत्त्व

विनंती विशेष. मला एक संशय आहे कीं, हल्लींचे काळीं कोणी वास्तविक ब्राम्हण आहेत किंवा नाहींत. माझ्या मनानें म्हणाल तर कोणीही नाहींत, असें मला वाटतें. आतांचे ब्राम्हण जसे इतर रोजगारी व मजूरदार लोक तसेच आहेत. पढावयाचा त्यांचा व्यापार आहे. परंतु त्यांस अर्थज्ञान पाहिजे तें नाहीं. ते आपल्यास असें म्हणवितात कीं,

देवाधीनं जगत्सर्वं मंत्राधीनं च दैवतं।
ते मंत्रा ब्राह्मणाधीना ब्राह्मणो मम दैवतं?

अर्थ—देवाचे स्वाधीन सर्व जग आहे व देव मंत्रांचे स्वाधीन आहेत. पण ते मंत्र ब्राम्हणांचे स्वाधीन. म्हणून ब्राम्हण हें माझें स्वतांचें दैवत आहे, असें खुद्द परमेश्वर म्हणतो. आतां याजवरून ब्राम्हण हे देवापेक्षांही जास्ती आहेत असें झालें; परंतु असलें मत मूर्खाशिवाय कोणी ऐकेल काय? जेव्हां लोक अनाडी होते तेव्हां ब्राम्हणांनीं आपला शक पराकाष्ठेचा चालविला. इतर लोक ज्ञानी होतील आणि त्यांचा नफा व फुकट जेवण बुडेल, याजकरितां त्यांणीं असा नेम केला कीं, दुसरे जातीनें कोणी शिकूं नये. जें काय वाचणें तें ब्राम्हणांचे तोंडून इतर लोकांनीं ऐकावें. एणेंकरून पुराणिकाचे तांदुळ, भटांची दक्षणा, श्राध्धाची क्षीर व लग्नाच्या पोळ्या ब्राम्हणांनीं आपल्याकडे पुष्कळ पिकविल्या. व त्याप्रमाणें हें आजपर्यंत निभावलें. परंतु आतां निभणें मला दिसत नाहीं; कारण आतां चारी जातींचे लोक हुशार झाले आहेत. आणि जें ब्राम्हणांनीं आपले नफ्या-करितां ठरविलें होतें तें आलिकडे मोडलें आहे. विद्येचा सर्वांस सारखा उपयोग होत आहे. व विद्याही चौपट वाढली आणि कृत्रिमाचा थोरपणा बुडत चालला. विद्या झांकलेली

होती, तोंपर्यंत तिचा मोठा बाऊ वाटत होता. पण आतां उघड झाली, तेव्हां सर्व न्यायच होईल. मला वाटतें कीं, ब्राम्हणासारिखा गर्विष्ठ पृथ्वीवर दुसरा कोणी नसेल. कारण त्यांनीं जरी आपला धर्म व कर्म सर्व सोडलें, कितीएक लबाड लुच्चे आहेत, कितीएक मूर्ख आहेत, कितीएक भडवेपणाचे रोजगार करितात, कितीएक रांडांच्या मागें तबले वाजवितात; असे असे निर्लज्ज झाले आहेत. तरी त्यांस असें वाटतें कीं, आम्हीं इतकें केलें तरी उत्तम कुळंब्यापेक्षां आम्ही चांगले व श्रेष्ठ आहों. यास प्रमाण—

दुःशीलोपि द्विजः पूज्यो न च शूद्रो जितेंद्रियः।
दुःशीलापि दुहेद्गावो न खरी शीलवर्तिनी ॥ १ ॥

अर्थ—चांगल्या शीलाचा नसला तरी ब्राम्हण पूज्य आहे. मोठा जितेंद्रिय झाला तरी शूद्र पूज्य नाहीं. यास उदाहरण, गाय लाथाळ असली तरी तीच दुधास योग्य, गाढवी गरीब असली तरी ती योग्य नाहीं.

मला ब्राम्हणाचे व इतर जातींचे लोकांमध्यें भिन्नपणा कांहींच दिसत नाहीं. ब्राम्हण मरतात, जन्मतात, व हातपाय त्यांस इतरांसारखेच असतात. मग इतरांपेक्षां त्यांचेमध्यें काय फरक आहे? व ब्राम्हणाला गर्व कशाकरितां असावा? त्यांचा मुख्य गूण काय ती विद्या, व तिचें तर त्यांचेमध्यें शून्य पडून काळें झालें आहे. तेव्हां आतां कोणी कांहीं पाठ करील तर त्याला तेवढ्यावरून थोर म्हणावें काय? त्याचा उपयोग काय? बैलाचे पाठीवर साखरेच्या गोण्या घातल्या तर त्यांचा त्याला जसा उपयोग नाहीं, तद्वत ब्राम्हणांनीं पुष्कळ पाठ केलें पण अर्थ ठाऊक नाहीं व ज्ञान नाहीं तर कांहीं उपयोग नाहीं. आणि कोणी जेवावयास किंवा वसंतपूजेस बोलाविलें, म्हणजे एका हातांत तंबाकु व दुसरे हातांत चुना आणि तोंडानें वेदपठण हें तरी उत्तम आहे काय? तेव्हां असे भ्रष्ट झाले ते ब्राम्हण म्हणावे किंवा त्यांस दुसरें कांहीं म्हणावें? वास्तविक म्हटलें तर इतर जातीचे मनुष्यास जातीचा गर्व नसतो व आपले हलके जातीचे समजुतीमुळें तो नम्रपणानें वागतो. आणि ब्राम्हण मूळचा भिकारी असला तरी "मी हिच्याचे जातीचा आहे," असें समजून जरी कोळसा असला तरी गर्वी असतो व "मी सर्वांहून थोर," अशी त्याची समजूत असती. तशांत त्यास पैसा मिळाला किंवा कांहीं सोय झाली म्हणजे तर त्याएवढा गर्विष्ठ कोणी नाहीं. मग तो कोणास मोजीत नाहीं. आपला मीपणा मिरवितो. आतां वास्तविक पाहिलें तर कोणत्याही युगांत ब्राम्हणांस राज्यावर किंवा अधिकारावर कोणी बसविलें होतें, असें नाहीं. जे विद्वान ब्राम्हण असतील त्यांचा राजानें सन्मान करून त्यांस संग्रहास बाळगावें असें आहे. परंतु अधिकाराचे उपयोगी ते नाहींत, हें तर स्पष्ट आहे. ब्राम्हणांकडे राज्य असेल तर इतर जातीचा काय परिणाम होईल? व ब्राम्हण किती माजोरीपणा करतील? मला वाटतें कीं, स्वभावेंकरून किंवा विद्येचे जोरानें जे निर्मळ असतील,

ज्यांनीं आपला गर्व टाकला असेल व आपण आणि इतर जातीचे लोक सारखे आहेत, असें ज्यांस वाटेल, त्यांस मात्र अधिकारावर ठेवावें. इतर ब्राम्हणांस ठेऊं नये. कारण इतर जातींपेक्षां महत्त्वाचे गैरसमजुतीमुळें ते वाईट आहेत. पण हल्लीं बहुधा सर्व रोजगार ब्राम्हणांनीं बळकाविले आहेत. म्हणजे येकीकडे भटांनीं धर्म आणि दुसरीकडे गृहस्थांनीं रोजगार अशा दोन्ही बाजू धरून इतर लोकांस आंत येऊं नये, अशी शकल केली होती. परंतु ईश्वरास हें कसें आवडेल? त्याणें जी उत्तम योजना करावयाची ती केली. यास्तव आतां सर्व जातींचे अधिकारी होतात, हें ठीक आहे. कारण ब्राम्हणांचा गर्व व आढ्यता फार. तेव्हां इतर जात त्यांपेक्षां बरी. तसेंच ब्राम्हणांचा स्वार्थ पाहाण्याचा स्वभाव इतका आहे कीं, त्यांस आपला नफा मात्र दिसतो. दुसरें कांहीं दिसत नाहीं. पाहा कीं, शिंदे, होळकर, गायकवाड या सर्वांस पेशव्यांबरोबर राज्यें मिळालीं, त्यांचीं तीं अद्यापि कायम आहेत. व पेशव्यांचेंच बुडालें. याची कारणें काय? तर यांस जीं कारण आहेत तीं अशीं–१ ब्राम्हण कोणाचें ऐकावयाचे नाहींत. २ ब्राम्हणांस गर्व फार. याजमुळें हे सर्वांस तुछ मानतात. व म्हणतात कीं, आमचेपेक्षां शहाणा कोण आहे? ३ देव ब्राम्हण यांचें जवळजवळ नातें आहे. तेव्हां देव आपले रक्षण करील, असें म्हणून ब्राम्हण भलतेंच करितात. ४. ब्राम्हणांकडून इतर वर्णांचा द्वेष होतो. ५ ब्राम्हणांस रयत राजी होत नाहीं. ६ ब्राम्हणांची स्नानसंध्या माजली म्हणजे राजकीय काम व पराक्रम होत नाहीं. ७ ब्राम्हणांस अडचणी फार त्यामुळें प्रवासांत हे निभत नाहींत. ८ ब्राम्हणांस सोंवळें ओंवळें फार. ९ ब्राम्हण आपल्या लोकांशीं द्वेष करितात व परक्याचे गुलाम होतात. १० ब्राम्हण स्वार्थ फार पाहातात आणि लोकांस त्रास आणतात. ११ यांस असें वाटतें कीं, "आम्ही ब्राम्हण आहों. आम्हांस कोणी कांहीं दिलें तरी त्याचा धर्म झाला," म्हणून ते लोकांस नागवितात.

लो० हि०

प्रभाकर ता० १६ जुलाई १८४८

पत्र नंबर २१

गृहस्थ आणि भिक्षुक यांचा भेद

मागील अंकांत एक पत्र आहे त्यांत ब्राम्हणाचे शापापासून नाश होतो व ब्राम्हण स्वधर्माप्रमाणें चालतात, असें वर्णन केलें आहे, त्याचें उत्तर लिहितों तें असें. जर ब्राम्हण लोक आपले धर्माप्रमाणें चालावयाचा उद्योग करीत आहेत, तर मग मुळीं

ब्राम्हण वर्णाच्या दोन जाती, एक गृहस्थ व एक भट अशा बहुत दिवस चालू आहेत. याचें कारण काय? ब्राम्हणांनीं विद्याभ्यास करावा हा धर्म सोडून ते गृहस्थ कसे झाले? याचें कारण मला इतकेंच वाटतें कीं, ब्राम्हणवर्ण पहिला थोडा होता, तेव्हां लोकांस त्यांचें सहज पालन करतां येत होतें. व पुष्कळ वाढले तेव्हां तितक्यांचें पालन कसें होईल? बरें इतके ब्राम्हण अधिक झाले म्हणून कांहीं अंधळे, पांगळे, लंगडे, रोगी, वृध्द, बाळ हे कमी झाले नाहींत व त्यांचें पोषणही केलें पाहिजे. तेव्हां हे वास्तविक गरीब लोक, व शिवाय ब्राम्हण इतक्यांचें पोषण लोकांच्यानें होईना, याजमुळें ब्राम्हणांनीं गृहस्थपणा धरून इतर जातीचें रोजगार म्हणजे क्षत्रियांची शिपाईगिरी, वैश्यांचा व्यापार व शूद्रांची चाकरी हीं सर्व पत्करिलीं व तेणेंकरून ब्राम्हणांचें धर्मापासून पतन आपल्याआपण झालें. हें कांहीं नीच लोकांनीं केलें असें नाहीं. हल्लीं ब्राम्हण लोक धर्माप्रमाणें वागण्याचा तर उद्योग करीत नाहींत, परंतु त्यांचा मोठा उद्योग इतकाच आहे कीं, कोठेंतरी उद्योगावांचून फुकट जेवण मिळावें असें स्थळ पाहून तेथें शिरावें. धर्माविषयीं आपणास काय कळतें याविषयीं जर कोणीही ब्राम्हण आपले अंतःकर्णांत विचार करून पाहील तर त्याचे सहज ध्यानांत येईल. ब्राम्हणांत फारसे विद्वान व नीतीवान आहेत, असें दिसत नाहीं. जसे इतर वर्णाचे लोक आहेत त्याचप्रमाणें हेही आहेत. त्यांचे अंगीं कांहीं ज्ञानाचा थोरपणा नाहीं. व भट तर बहुधा भोजनभाऊ आहेत. आणि गृहस्थ चाकरी व व्यापार करून पोट भरितात. तेव्हां धर्मप्रवर्तक ब्राम्हण आतां कोठें आहेत? कोठेंच नाहींत. म्हणून हल्लींचे ब्राम्हणांस इतर जातींचें लोकांपेक्षां अधीक मान देणें योग्य नाहीं. जर कोणी देईल तर तो अज्ञानी व अंधळा असावा, यांत संशय नाहीं. ब्राम्हणांची बुध्धी अशी आहे कीं, सर्व अधिकार व द्रव्य आपल्यास असावें. व विद्येचा थोरपणा घालवून ते द्रव्याचा थोरपणा पाहूं लागले आहेत. आतां जर कोणी शूद्र जातीचा कारकून झाला तर सर्व ब्राम्हण लोक त्याजकडे डोळे वटारून पहातात. त्यांस असें वाटतें कीं, आमचा धर्म लिहिणें पुसणें करावयाचा असून कुणबी आमचा वृत्तीछेद करितात. सारांश त्यांस धर्मांत थोरपणा आहे. तसाच संसारीक थोरपणा असावा. म्हणजे आपण सर्वांहून मुख्य होऊन बसावें, असें वाटतें. आपण राजाप्रमाणें राहूं, सर्व रयत काम करील. आम्ही मांडीवर मांडी चढवून खात जाऊं. पोटावर हात फिरवूं व यजमानाची स्तुती करूं, असें त्यांचे मनांत येतें. परंतु त्यांस असें वाटत नाहीं कीं, आपण फुकट खावयाची इछा करितों, तशी फुकट खाण्यायोग्य लोकांची चाकरी कोणती करितों? धर्म कोणास शिकवितों? व कोणती विद्या वाढवितों? जसा एकादा अमीर असतो त्यास वाटतें कीं, गुलामांनीं सर्वप्रकारें सेवा करावी. तद्वत ब्राम्हणांस वाटतें कीं, आम्ही मोठे आहों. आमची सेवा सर्व लोकांनीं करावी; आम्हांकरितां शेतें पिकवावीं, आम्हांकरितां घरें बांधावीं, अन्नछत्र घातलें तरी तेथें फक्त आम्हां ब्राम्हण जातीस मात्र जेवावयास घालावें. इतर जातींस घालूं नये, असें

त्यांस वाटतें. ब्राम्हणांनीं अन्नछत्रें घातलीं आहेत. तेथें कोणी ब्राम्हणांखेरीज दुसरा वर्ण जेवील काय ? जरी अत्यंत पीडित रोगी थकलेला व शूद्र येईल तरी ते निर्दयपणानें त्यास नाहीं म्हणतील; आणि श्रीमंत, धट्टाकट्टा व मूर्खांचा राजा असा ब्राम्हण आला तरी त्यास जेवावयास घालतील. तेव्हां हा धर्म कशाचा ? त्यांच्या दुष्ट स्वभावानें एकामेकांत वितुष्टें मात्र पडलीं आहेत. व प्रत्येक जातीचे लोक जसे वेगळाले देशाचे लोक आपसांत भांडतात तसे हे एक देशचे लोक असून आपल्यांत वेगवेगळाले देशचे शत्रूंप्रमाणें भांडतात. येणेंकरून सर्वांचीं चित्तें फुटलीं आहेत. व कोणामध्यें ऐक्य नाहीं. हा इतका या देशाचा फायदा ब्राम्हणांनीं केला आहे. ब्राम्हणांचा धर्म काय हा प्रश्न जर मीं पांच हजार ब्राम्हणांचे सभेंत केला तर त्याचें उत्तर कोणी एकही देणार नाहीं; परंतु दक्षणा सर्व मागतील. तेव्हां हे भट कशाचे ? जसें इतर जातीचे सुतार, माळी, न्हावी, तसेंच हे मूर्ख, राघूसारखे पढणारे, वेदविक्रयेंकरून पोट भरणारे व निर्लज्जपणानें भीक मागून काम न करितां खाणारे आहेत. हे लोकांस सांगत फिरतात कीं, ब्राम्हणांस द्यावें म्हणजे मोठा धर्म आहे. कुळंब्यास कांहीं देऊं नये. कुळंबी जरी म्हातारा व आंधळा असला तरी चिंता नाहीं. त्याणें मेहेनत करावी हाच त्याचा धर्म आहे. अहाहा ! काय हा आपलपोटेपणा ! ब्राम्हणांस ब्रम्हदेवानें फुकट खावें म्हणून सनद करून दिली आहे काय ? बाजीरावानें ब्राम्हणांस पुष्कळ खावयास दिलें. त्याचें ब्राम्हणांच्या आशिर्वादानें काय झालें ? अन्न मात्र व्यर्थ गेलें आणि त्याचा नाश व्हावयाचा तो झालाच. तर ब्राम्हणांनीं याचा विचार करावा. ब्राम्हणांच्या आशिर्वादानें होणार काय ? जें ईश्वर इछील तें घडेल. ब्राम्हणांच्यानें कांहीं होणार नाहीं, हें मला पक्कें ठाऊक आहे. आणि आजपर्यंत ब्राम्हणांनीं अज्ञानी लोकांस फसवून जें खाल्लें, तें आतां सर्व उघडें व्हावयाची वेळ आली आहे.

लो० हि०

पत्र नंबर २२

जातीविषयीं विचार

हिंदु लोकांचें कांहीं वर्णन ल्याहावयाचें असलें तर मुख्यत्वेंकरून ब्राम्हण लोकांचें लिहावें म्हणजे त्यांत सर्व लोकांचे स्थितीचें वर्णन आलें. कारण हिंदु लोकांत विद्येचे महत्त्वाचे मुख्य मालक ब्राम्हण आहेत. व त्यांचीं मतें लोकांमध्यें प्रबल आहेत. यास्तव आम्हीं बहुधा हिंदु लोकांचें वर्णन लिहावयाचें असलें म्हणजे ब्राम्हणांचेंच लिहूं व तेणेंकरून सर्वांचें वर्णन झालें, असें समजावें. प्राचीन हिंदु शास्त्राप्रमाणें लोकांचे चार

वर्ण आहेत. हे अशा प्रकारचे वर्ण इतर देशांत नाहींत. हिंदुस्थानांत मात्र अशी व्यवस्था आहे. ते चार वर्ण असे. एक ब्राम्हण, दुसरा क्षत्रिय, तिसरा वैश्य व चवथा शूद्र. शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, हे चारही वर्ण कुलपरंपरा चालावे. जो ब्राम्हण त्याचा वंशही ब्राम्हणच. तसें जो शूद्र त्याचा वंशही शूद्रच, असा नियम स्मृतीरूप धर्मशास्त्रांत आहे. परंतु तें शास्त्र लिहिण्याचे पूर्वीं व पश्चात असा नियम चालला असेलसें वाटत नाहीं. कारण वाल्मीक ऋषी हा प्रथम कोळी होता व नंतर ऋषी झाला. गाधीराजा क्षत्रिय असतां ब्राम्हण झाला.

पाराशरऋषीनें शूद्र स्त्री केली. हरिश्चंद्र राजानें काशीस जाऊन महाराचें कर्म पतकरिलें व कितीएक राजे क्षत्रिय असतां ब्राम्हण झाले. तसेच दुसरे ब्राम्हण असतां क्षत्रिय झाले, अशीं वर्णनें पुराणांत लिहिलीं आहेत. आणि मोठ्या कुळांत राजे वगैरे जे लिहावया-सारखे झाले त्यांचीं नांवें पुराणांत सांपडतात. तेव्हां त्याकाळीं अशी बहुधा चाल असेल. परंतु सर्वांचीं नांवें पुस्तकांत लिहिलीं गेलीं नाहींत; म्हणून पक्कें समजत नाहीं. तथापि चाल पुष्कळ होती, असें विचार करून सिध्ध होतें. आणि उत्तम मार्ग हाच कीं, कर्में करून जातीचा आणि वर्णांचा निश्चय असावा., ब्राह्मण असून शूद्राहूनही नीच कर्म करील तर तो ब्राम्हण नव्हे. तसेंच क्षत्रियानें ब्राम्हणकर्म केलें तर तोही ब्राम्हण व्हावा. असें केलें नाहीं, तर कितीएक अयोग्य लोक ब्राम्हणाचे नांवानें मिरवतील आणि कितीएक वास्तवीक ब्राम्हण शूद्राचे नांवानें आछादित राहतील. जर कोणी राजानें असा नियम केला कीं, जे हल्लीं कामदार आहेत त्यांजकडे तीं कामें वंशपरंपरा चालवावयाचीं, तर ते जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत तीं कामें बरोबर चालतील. पुढें त्यांचे मुलगे वगैरे अर्थांतच मूर्ख निघतील. कारण बापाप्रमाणें मुलगा निघतो, असा निश्चय नाहीं. वास्तव ज्याचे त्याचे स्वयमेव गुण पाहून त्याची योजना करावी, हा उत्तम पक्ष होय, नाहींतर घालमेल होऊन जे शहाणे ते मागें राहून मूर्खमंडळी परंपरेच्या कायद्याचे जोरानें सर्व मोठमोठे कामांत शिरूं लागेल. व मग त्या राज्यांत काय व्यवस्था होईल बरें ? बाकी चार भेद हिंदुस्थानांतच आहेत व इतर देशांत नाहींत, असें नाहीं. प्रत्येक मुलखांत चारी वर्ण आहेतच : १ पंडीत, २ शिपाई, ३ सावकार आणि ४ चाकर. हे सर्वत्र आहेत. यांशिवाय तर कोठेंही चालावयाचें नाहीं. परंतु अंतर इतकेंच आहे कीं, अन्य देशांत हे धर्मपरंपरा चालत नाहींत. वाणी आहे आणि त्याचा मुलगा बुध्धिमान निघाला तर तो पंडितांमध्यें जातो. आणि पंडिताचा मुलगा मूर्ख निघाला तर तो चाकरांत जातो. अशा रीतीनें हे चारी वर्ण सर्व देशांत आहेत. परंतु हिंदुस्थानांत त्यांचीं वेगळालीं कुलेंच झालीं आहेत., आम्हांस वाटतें कीं, पूर्वीं जातींत फेरफार होण्याची चाल असे. रावण ब्राम्हणाचा मुलगा; परंतु दैत्य झाला, कारण तो महा दुष्ट होता. याजवर कितीएक लोक असें म्हणतील कीं, ते मागले युगांतील लोक त्यांचें उदाहरण आतां द्यावयाचें नाहीं. परंतु हें म्हणणें उपयोगी नाहीं; कारण वर्ण, व्यापार व जात तर मागील युगांतिलच

आहे. व मागील युगांत तरी माणसेंच होतीं. देवाचे अवतार जरी झाले तरी मनुष्यें होतींच. प्रत्येक जीव देव नवता व आतांसारखेच सर्व लोक तेव्हांही होते. म्हणजे दुष्ट होते व सुष्टही होते. फरक इतकाच कीं, आतां विचार कोणी करीत नाहींत. बहुधा चालीवरून चालतात. सांप्रत काळचे ब्राम्हण कोणी विद्वान आहेत काय असें पाहिलें तर सर्वांस दिसेल कीं, हे भट विद्वान नाहींत, शुद्ध टोणपे दिसतात. यांस कांहींच ज्ञान नाहीं. जसें बैरागी अंगारा राख लावून भीक मागतात, तसें कोणत्यातरी वेषानें हे पोट भरितात. हे स्वभावानें आळशी व काम करावयास नको. तेव्हां निर्लज्जपणानें भीक मागून पोट भरितात. एवढाच यांचा रोजगार आहे. मला वाटतें कीं, यांपेक्षां आचारी, पाणके बरे व हे त्यांहून निंद्य. कारण हे हरामाचें खातात. आणि लोकांस यांपासून कांहीं उपयोग नाहीं. ब्राम्हणाचा स्वधर्म असा आहे कीं, आपली सद्वर्तणूक आणि पवित्रपणा बाळगून विचार करीत अरण्यांत स्वस्थ बसावें. म्हणजे तेच मुनी व ऋषी होत. असें त्यांचें कर्म पवित्र व वागणूक निर्दोष म्हणून राजे ब्राम्हणांस थरथर कांपत होते व सर्व लोक त्यांचें भय बाळगीत होते, अशा कथा आहेत. व ते आपले सत्कर्मेंकरून व उपदेशेंकरून सर्वांस सुशिक्षा लावीत होते. व धर्मसुधारणेचा आणि लोकहिताचा विचार करीत होते. तेव्हां लोकही त्यांस मानीत होते. त्याप्रकारचा एक तरी ब्राम्हण काशीपासून रामेश्वरापर्यंत आतां आहे काय? आतांचे ब्राम्हण असे आहेत कीं, जेवायापुरती काळजी करितात. सकाळपासून पोट कोठें भरेल याचा शोध करून जेवायास मिळालें म्हणजे उताणे पडतात. किंवा स्वस्थ गोष्टी सांगत बसतात. कोणी म्हणतो कीं, मीं ५० लाडू खाल्ले. कोणी म्हणतो कीं, मीं शेरभर तूप प्यालों. सारांश जे भटांचे मंडळींत क्षणभर बसतात, ते जाणत असतील कीं, त्यांचें भाषण किती उपयोगाचें व किती शास्त्रपर आहे. त्यांचा मोठा गुण, ज्यावरून ते आतां प्रशंसा पावतात, तो खावयाचा आहे. म्हणजे जो फार खाईल तो उत्तम भट. गृहस्थही मूर्खच असतात. त्यांस असें वाटतें कीं, ब्राम्हण जितकें खातील तितकें आम्हांस विशेष पुण्य लागेल. मी एका गृहस्थाचा खरा वृत्तात जाणतों कीं, त्याचा बाप मेला आणि त्याजवळ पांच हजार रुपयांची जिनगी होती. तेव्हां त्याचे मनांत काय वेड भरलें तें नकळे. त्याणें असा बेत केला कीं, हे सर्व रुपये ब्राम्हणभोजनांत घालावयाचे. मग त्याणें दोन चार वर्षेंपर्यंत शेंकडों ब्राम्हणांस यथेच्छ परोपरीचें भोजन घातलें. आणि आपली सर्व जिनगी गमावली. तेव्हां मला असा चमत्कार वाटतो कीं, हे ब्राम्हण फार दुष्ट आहेत. त्या गृहस्थास कोणी असें म्हटलें नाहीं कीं, "अरे, तुझीं पोरेंबाळें व बायका जेणेंकरून मरतील, असा हा धर्म कोठला? तूं आपले कुटुंबाचें रक्षण कर." असा उपदेश कोणी एकाही ब्राम्हणानें केला नाहीं. सर्वांनीं त्याचें सरेतोंपर्यंत खाल्लें व सरल्यावर घरोघर निघून गेले.

दुसरें उदाहरण, बाजीराव पेशवे यांणीं अनंत ब्राम्हण जेवावयास घातले. त्यांस तर नेहमी हेंच वेड होतें. परंतु त्यांतील एका ब्राम्हणानें तरी असें म्हणावयाचें होतें

★ (दा. क्र. 9408) ★

कीं, "अरे राजा, तुझें कर्म प्रजापालन करावयाचें तें तूं नीट कर. प्रजेपासून जुलमानें पैसा घेऊन रिकामें ब्राम्हणांस जेवूं घालं नको. करू कमी कर, बंदोबस्त नीट ठेव. व्यभिचार करूं नको, राज्य बुडऊ नको, [illegible] बाळग, हेंच तुला स्वर्गास नेईल. लूट करून ब्राम्हणांस घातल्याचा उपयोग नाहीं." असें एकानें तरी सांगितलें काय? नाहीं. तस्मात् हे ब्राम्हण लुटारू आहेत. हे धर्माचें नांव करून लुटतात. पेशव्यांच्या राज्यांत एकच ब्राम्हण होता, आणि जोंपर्यंत तो होता तोंपर्यंप तें राज्य कृतयुगाप्रमाणें चाललें. त्या ब्राम्हणाचे नांव रामशास्त्री होय. एके दिवशीं माधवराव पेशवे स्नानसंध्या करीत असतां शास्त्रीबावा भेटीस गेले. तों वरदी आली कीं, श्रीमंत स्नानसंध्येंत आहेत. तेव्हां त्यांस संताप आला व तसेच आंत गेले आणि त्यांनीं विनंती केली कीं, मला आज्ञा द्यावी. मी काशीस जातों. कारण आमचीं कर्में तुम्हीं करावयास लागलां तेव्हां आतां आम्हीं राहाणार नाहीं. श्रीमंतांनीं पुसलें "हें काय?" त्यांणीं सांगिततलें कीं, "तुम्ही ब्राम्हण जातीचे खरे. परंतु तुम्हीं स्नानसंध्येचा धर्म सोडून क्षत्रियांचा धर्म घेतलांत आणि शिपाईगिरी करून राज्य करितां. आतां स्नानसंध्या केलीत तर घड ब्राम्हणाचें कर्महीं साधावयाचें नाहीं. व वेळ फुकट जाऊन क्षत्रियांचें कर्महीं बुडवाल. आणि कोणतेंच कर्म न केलेंसें होऊन नरकांत जाल. तर तुम्ही जी वेळ स्नानसंध्येंत घालतां तीच वेळ रयतेस दाद देण्यांत घालवा. व येथून दोनशे कोसपर्यंत तुमचे अमलांत कामगार कसें काय करितात, हें पाहा. जप कशाचा करितां? जर तुम्हांस जप करावयाचा असेल तर राज्य सोडा. व दुसरा कोणी गादीवर बसवा आणि वनांत चला, तुम्ही आम्ही बरोबर जाऊं. व असें करावयाचें नसेल तर राज्य चांगले रीतीनें नीट करा. लोकांचे घात करूं नका. अशी स्नानसंध्या ईश्वरास मान्य होणार नाहीं." असें सांगूस त्या दिवसापासून त्यानें श्रीमंतांस प्रातःकाळीं दरबारांत येऊन बसावें असें ठरवून दिलें. याचें नांव ब्राम्हण. व याचें नांव सारासार विचार. ज्यानें आपले अकलेस आलें तें खरें जाणून सुचविलें, भीड धरिली नाहीं, तोच धन्य. तसेंच जेव्हां घाशीराम कोतवालानें कांहीं माणसें मारिलीं, तेव्हां रामशास्त्री यांजकडे नाना फडणीस यांनीं शास्त्रार्थ नेला आणि सांगितलें कीं, मी तुमचा स्नेही आहें, व माझा स्नेही घाशीराम आहे. त्यापक्षीं याचा जीव जाऊं नये, असें करावें. त्यांनीं सांगितलें कीं, मी वास्ताविक असेल तेंच सांगेन. तुमचा प्रपितामह आला तरी सत्याचा अव्हेर तुमचे भिडेमुळें मी करणार नाहीं. आणि त्यांनीं तसेंच श्रीमंतांस सांगितलें व त्याजवरून त्याचा वधही झाला. सारांश जे असे असतील ते ब्राम्हण. नाहीं तर सहस्रभोजनास पुष्कळ असतात तेव्हां विचारावें, तुमचें नांव काय? ब्राम्हण, येतें काय? शंख. जेवतां किती? चार शेर. करतां काय? आगांतुकी. वाः, हे ब्राम्हण कशाचे? आतांचे शास्त्री यांजवळ म्हटंला तो शास्त्रार्थ तयार आहे. "भटजी, असत्य भाषण केलें तर काय करावें?" उत्तर—"ब्राम्हणास पुतळी दक्षणा द्यावी." तर यावरून हल्लींचे ब्राम्हणांत कांहीं

विचार, नीती किंवा पवित्रपणा नाहीं. शास्त्री व भट हे मजुरदार आहेत. जसे हेलकऱ्यास चार पैसे दिले म्हणजे कोसभर जातो व आठ पैसे दिले म्हणजे दोन कोस. तद्वत पांच रुपये दिले म्हणजे प्रायश्चित्त, वें शालजोडी दिली म्हणजे दारू प्याली तरी चिंता नाहीं; ती निर्दोष. असा ब्राम्हणांचा रोजगार आहे. कळावें हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर २३

चार वर्णांची सांप्रतची स्थिती

सांप्रत ब्राम्हण जे आहेत ते नांवाचे आहेत. व ब्राम्हणपणा फक्त कुळांत आल आहे, गुणांत नाहीं. हें मागील पत्रांत बरेंच सिद्ध झालें. आतां दुसरा वर्ण क्षत्रिय यांचें काम म्हटलें तर यांनीं देशाचें रक्षण करावें. या वर्णाची जबाबदारी ब्राम्हणांहून कमी. ब्राम्हणांनीं लोकांस शाहाणें करावें आणि क्षत्रियांनीं शिपाईगिरी करून स्वराष्ट्र रक्षावें व नीतीप्रमाणें राज्य करावें. विद्येकरितां त्यांनीं ब्राम्हणांचा प्रतिपाळ करावा व व्यापार नीट चालून सुबत्ता व्हावी. म्हणून वैश्यांचें रक्षण करावें. तसेंच शूद्रांचे धारे कमी करून ओझें हलकें करावें. असें तीन वर्णांस सुखेंकरून नांदवावें. श्रीकृष्णांनीं अर्जुनास गीतेंत बोध केला तो असा आहे कीं, आपल्या धर्माप्रमाणें वर्तणूक कर. त्यांत तुला मोक्ष आहे. व इतर इहलोकीं कीर्ती आहे. असें सांगून अर्जुन वैराग्य घेत होता, त्यास प्रपंचांत आणिलें. आणि त्याजकडून राज्य करविलें व लढाई करविली. असा क्षत्रियांचा धर्म आहे. हल्लीं असा कोणी नाहीं. शूरत्व या मुलखांतून गेलें व परदेशचे यवन व म्लेंछ इत्यादि राज्य करितात. क्षत्रियधर्माचा लवलेशदेखील राहिला नाहीं. ही गोष्ट कबूल करायास अवघड नाहीं. हिंदुस्थानांत रजपूत आहेत. ते क्षत्रियच आहेत. पण जसे हल्लींचे ब्राम्हण आहेत तसेच ते क्षत्रिय निस्तेज व हतवीर्य आहेत. त्यांस लुटावयाची बुद्धी मात्र राहिली आहे. लोकांचे कल्याणाची बुद्धी नाहीं व दक्षणेंत असें मत आहे कीं, क्षत्रियवर्ण बुडाला ही गोष्ट खरी आहे. जे क्षत्रिय आहेत ते त्या कुळांतील असोत. परंतु ज्यापेक्षां ते आपले धर्मास अनुसरत नाहींत त्यापेक्षां ते क्षत्रिय नव्हत. हल्लीं कोणी क्षत्रिय असते तर राज्य परकी लोकांचे हातीं कां जातें? व धर्महीं बुडता ना. तस्मात ब्राम्हण व क्षत्रिय दोनही वर्ण नाहींत. आतां तिसरा वर्ण वैश्य. या वर्णाचे लोक अद्यापी तैलंगण देशांत कोमटी वगैरे आहेत. परंतु त्यांनीं आपला धर्म सोडून दिला. व्यापार ते करते तर परकी लोक येऊन इकडे व्यापार करते ना. परंतु असें झालें. त्यापेक्षां वैश्य वर्णही बुडाला.

याप्रमाणें तीनही वर्णांचा अभाव झाला आणि चवथा वर्ण शूद्र तेवढा मात्र बाकी राहिला आहे. आतां ब्राम्हण लोक बहुतकरून चाकरी करून पोट भरतात. व भट देवपूजा पत्करितात. तरी ती गुरवकी झाली. तस्मात वास्तविक ब्राम्हण कोणी नाहींत. सांप्रत जितके लोक हिंदुस्थानांत आहेत तितक्यांचा एकवर्ण मला दिसतो कीं, ते शूद्र आहेत. इतर वर्णांचीं नांवें मात्र घेतात. परंतु त्यांचे गुण व कर्म नाहीं. हिंदुस्थानांत तीनही वर्णांचें काम इंग्रज लोक चालवितात. कसें म्हणाल तर इंग्रज लोक शहाणे व विद्वान आहेत. तेव्हां ब्राम्हणांचें कर्म त्यांना आलें. दुसरें शिपाईगिरीचेंही कसब त्यांस आहे. हल्लीं या देशांत इंग्रजांचें लष्कर बलवत्तर आहे. तेव्हां क्षत्रियांचें काम तेच चालवीत असून तिसरा वर्ण वैश्य त्यांचा व्यापारही इंग्रजच करितात. इकडील देशचे लोकांकडे फारसा व्यापार राहिला नाहीं. तेव्हां बाकी चौथा वर्ण शूद्र त्यांनीं शेतकी करावी वा चाकरी करावी. त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील सर्व लोक हल्लीं वागतात. हे सर्व चाकर किंवा शेतकरी आहेत. सर्व विद्येप्रकरणीं थोरपणा व सैन्याधीशत्व व व्यवहारा प्रकरणीं ऐश्वर्य हीं सर्व इंग्रजांकडे आहेत. आतां जे ब्राम्हण म्हणवितात, ते उगेच व्यर्थ अभिमान बाळगितात. एकाचें नांव त्याजवळ बहुत द्रव्य असल्यामुळें नवलाख्या पडले व पुढें त्याचे पणतू व नातू भिकारी झाले तरी त्यांस नवलाखे म्हणत असत. परंतु त्यांस तें शोभेना. लोक थट्टा करूं लागले. तद्वत ब्राम्हण लोक नीच व हीन झाल्यामुळें त्यांचा सर्वस्वी मान गेला. आतां चार सरदार वगैरे आहेत. पण ते असे दिसतात कीं, जसे माहामारीचा उपद्रव होऊन एका गांवांत दाहा मनुष्यें मरतात व चारपांच असामींचा वाखा होऊन ते मरणोन्मुख होऊन पडतात. कां तर क्षणाभरानें ते मरावयाचेच. तद्वत आतांचे सरदार आहेत. यावर कोणी लोक असा वाद करतील कीं, अजून शिंदे, होळकर, रास्ते, पटवर्धन आहेत. परंतु उपयोग काय ? ते आहेत नाहींत सारखे. इंग्रजांनीं आपले शहाणपणानें राज्य काबीज केलें आहे. त्यांचे पराक्रमापुढें हे सर्व लोक अडाणी दिसतात. हे परम अळशी लोक आहेत. व अज्ञानेंकरून मदांध आहेत. याजमुळें मुलखांत काय होतें हें यांस दिसत नाहीं. अद्यापि ज्यांजवळ खाण्या-पुरती सोय आहे ते म्हणतात कीं, आमचे लेकींस व आमचे मुलांस कांहीं चिंता नाहीं. सर्व लोक भिकारी झाले तर झाले, असें म्हणून स्वस्थ बसतात. त्यांच्यामध्यें शाहाणे इंग्रेज अमल करितात. हे जसे एक गुराखी असला म्हणजे पन्नास गुरें हकतो, त्याप्रमाणें आहेत. याचें कारण काय ? गुराख्याला शाहाणपण असतें व गुरांस तें कांहीं नसतें. त्यांना जिकडे फिरविलें तिकडे फिरतात. आणि गुराखी शाहाणा असतो. म्हणून सर्व गुरांची वागणूक त्याच्या ध्यानांत असते. याजमुळें पन्नास गुरांचें वास्तविक बळ पाहिलें तर एक मनुष्यापेक्षां शंभरपट जास्ती आहे. पण उपयोग काय ? तें आंगचें बळ, अकलेचें नव्हे. आंगचें पन्नास मण बळ अकलेच्या पाव रतीस हात जोडून असतें. उदाहरण, हत्ती अंकुशानें आज्ञेंत असतो. जर त्यास शाहाणपण असतें तर तो महातास

फेकून देण्यास उशीर न करिता. सारांश, अक्कल ही सर्वांपेक्षां जास्ती आहे. व ती मनुष्यास ईश्वराची देणगी आहे. कोणी लोक शहाणे व कोणी लोक वेडे असे पर्याय आहेत. हिंदु लोक इतर देशचे लोकांपेक्षां इतका नीचपणा कां पावले आहेत, याचा विचार केला तर कारणें सांपडतील. परंतु कित्येक लोक असें म्हणतात कीं, कारणें कशाचीं ? सर्व सद्दीचा आणि नशीबाचा खेळ आहे. तर त्यांस असें उत्तर आहे कीं, सद्दी आणि नशीब अंशतः खरें आहे. परंतु सर्वांस तें लागू नाहीं. मी म्हणतों, हल्लीं इंग्रज एवढ्या पदवीस आले आहेत कीं, समुद्राचे व पृथ्वीचे मालक ते आहेत. व त्यांचा शाहाणपणा वगैरे अधिक आहे. हा परिणाम कारणांवाचून घडला नाहीं. आतां तीं कारणें कोणतीं याचा विचार करावा. तसेच हिंदु मूर्ख झाले यांचीं तरी कारणें आहेत. जसा शरिरांत रोग होतो त्याचें कारण काय ? हें त्या समईं लक्षांत आलें असतें तर त्याचा उपाय केला असता. परंतु रोगानें वेढल्यानंतर तरी विचार करावा. मग असें म्हणूं नये कीं, हें नशीबानें झालें. तसें म्हणणें हें अगदीं वेडेपणाचें आहे. मला वाटतें कीं, जातीधर्म वेगळाले केले त्याजमुळें एकामेकांचे मनांत द्वेष येऊन विभक्तपणा फार झाला. हें एक कारण असेल, किंवा ब्राम्हणांनीं आपलें कर्म विद्या वाढवावयाचें असून [तें] सोडून दिलें. आणि इतर लोकांसही शिकवावयाचें बंद केलें. येणेंकरून कोठेंच कांहीं नाहींसें झालें. हें एक कारण. आणखीही असें कारण आहे कीं, सांप्रत लोकांची समजूत वेडी झाली आहे. मागें वैद्यशास्त्र व ज्योतिष, कोश वगैरे जे कांहीं ग्रंथ झाले ते करणारे देव व ऋषी होते. त्यांची शक्ती आतां कोणास यावयाची नाहीं. असें म्हणून म्हणून त्यांनीं विद्या सर्व बंद पाडिली. व आलीकडे सरासरी पंधराशें किंवा दोन हजार वर्षांत ग्रंथ कोठें झाले नाहींत व या घालमेलींत संस्कृत भाषा तर अगदींच बुडाली. आलीकडे कोणी कवींनीं वगैरे ग्रंथ केले आहेत. परंतु ते नवीन ग्रंथ नाहींत. ते ग्रंथ संस्कृत ग्रंथाचे तरजुमे आहेत. आणि कोणास असें वाटत नाहीं कीं, आपण कल्पना वाढवून नवीन ग्रंथ करूं किंवा देश फिरून पृथ्वी कशी आहे तिचा शोध करूं. या लोकांची बुध्धी अगदीं गेली आहे. आणि पूर्वीचे ग्रंथांत जितकें शाहाणपण आहे, तितकें पुष्कळ मानून ते राहिले आहेत. येणेंकरून आली कडील दोन हजार वर्षांत नवीन युक्ती निघाल्या नाहींत व कोणी काढल्या तरी ग्रहण करीत नाहींत. पहिली चाल अशी होती कीं, भांड्यास भोंक पाडून त्यानें दिवस, घटिका मोजीत होते. आतां आलीकडे घड्याळें निघालीं आहेत. येणेंकरून भांडें बाळगावयास नको. घड्याळ जवळ ठेविलें म्हणजे सुलभपणानें दिवस वेळ कळतो, परंतु अद्यापि जोशी वगैरे पाण्याचा उपयोग करितातच. कोणी घड्याळावर लक्ष लाविलें असा नाहीं. याजवरून असें दिसतें कीं, एक गरीब ब्राम्हण होता तो पंचा नेसत असे व पुढें त्याचा मुलगा दौलतवान झाला तथापि तो पंचाच नेसे, आणि सांगे कीं, "आमचा बाप पंचा नेसत होता, त्याप्रमाणें आम्हीही नेसतों. आपला कुळाचार आहे तसें करावें हें बरें."

लोकांनीं त्यास पुष्कळ सांगितलें, तेव्हां त्याणें रोज नेसावयाचा टाकून देऊन श्राध्व-पक्षास नेसावयाचा वेत केला. परंतु मरेतोंपर्यंत त्याणें पंचाची खोड टाकिली नाहीं. तसे हे हिंदू लोक दिसतात. यांची जी चाल मूळची आली आहे त्याप्रमाणें करण्याची यांस इच्छा फार असते. त्यांत उपयोग असो, नसो, मूर्खपणा असो, अथवा शहाणपणा असो, परंतु त्यावेळेस काळ कसा होता व आतां कसा आहे, याचा सारासार विचार कोणीच करीत नाहीं. मागील चाल म्हणजे काय तो धर्म, असें समजतात. परंतु वास्तविक पाहिलें तर धर्माशीं आणि चालीशीं फार अंतर आहे. अस्तु. हे लोक जों जों शाहाणे होतील तों तों जुन्या काळच्या श्रेती जातील इतकेंच तात्पर्य दिसतें.

लो० हि०

प्रभाकर ता. ३० जुलै १८४८

पत्र नंबर २४

नशिबावर हवाला

जे सोंगट्या व बुद्धबळें खेळतात त्यांस माहित असेल कीं, सोंगट्याचे खेळांत कांहीं बुद्धी नाहीं. फांशास दान पडेल त्याप्रमाणें जय किंवा अपजय होतो. खेळणार मोठा बुद्धीमान असला तरी त्याचे बुद्धीचा कांहीं उपयोग नाहीं. फांशाचे स्वाधीन तो असतो. तसें बुदबळाचे खेळांत नाहीं. त्यांत बुद्धीचा उपयोग आहे. जो शाहाणा असेल तो जिंकील. असा निश्चय करतां येतो. सोंगट्यांत कोणाचा निश्चय होत नाहीं. तद्वत ज्या देशांत लोक शाहाणे व राज्य शाहाणपणानें चाललें असतें, तेथें शाहाणा वाढेल असा निश्चय आहे. क्वचित न होईल तर ती गोष्ट खेरीज आहे. अस्तु. बहुधा नियम असा आहे कीं, जे लोक शाहणे आहेत, ते उद्योगवादी असतात. व मूर्ख आहेत ते प्रारब्धवादी असतात. कारण उद्योगानें सिद्धी होते हें ते जाणत नाहींत. हिंदु लोक जेव्हां तेव्हां नशीब व प्रारब्ध म्हणतात. आणि हें वास्तवीक पाहिलें तर खरेंच आहे. कारण लोक मूर्ख असले म्हणजे तेथें शाहाण्यानें अशी उमेद धरू नये कीं, माझी अब्रू वाढेल. व वेड्यानें असें म्हणूं नये की, "मी नेहमी वेड्याचें योग्यतेनेच राहीन." एका पुरुषास दोन स्त्रिया असल्या म्हणजे त्या स्त्रिया आपल्या युक्तीनें त्याचें अंतकरण हरण करितात, परंतु तो जर वेडा असेल तर गुणी स्त्री असेल तिजवर प्रीती करीलच याचा नेम नाहीं. तो आपलें अंतःकरण मूर्ख स्त्रीकडूनही वश करून घेईल. सांप्रतकाळीं हैद्राबाद मुसलमानांची राजधानी आहे. व पुणें ही ब्राम्हणांची राजधानी होती.

परंतु दोहों ठिकाणीं असें होतें कीं, कोणाची चाहा होईल आणि कोणाला लोक चांगलें म्हणतील याचा नेम नाहीं. चांगल्यावाईटाची परिक्षा नाहीं. ज्याचें प्रारब्ध उघडेल त्याची अब्रू एकदम वाढेल. तेव्हां कोण कोणास लुटतील व कोण कोणाची अब्रू घेतील, याचा भरंवसा नाहीं. शाहाणपण व वेडेपण याचा कांहीं उपयोग नसे. फक्त नशीबावर हवाला. बाजीराव पुण्यांत होता. त्याकाळीं अशी व्यवस्था होती कीं, जे आज भाकऱ्या भाजीत होते, ते उद्यां पालखींत बसले. आणि आज पालखींत होते ते उद्यां भिकेस लागले. तसेंच ब्राम्हण व भट यांस दानधर्म करण्यास तो कर्णाचा अवतार होता. परंतु सत्पात्राचा विचार नाहीं. म्हणून ज्याचें नशीब उघडे त्यास मिळत होतें. तस्मात अशा अनियमित राज्यांत राहाणें मोठें दुर्भाग्य होय. व यावरून असें दिसतें कीं, मुख्य नशीब म्हणण्यास कारण हेंच आहे. जर व्यवस्था सारखी होईल व योग्यतेनुरूप प्रतिष्ठा वाढेल तर नेम झाला. मग कोणी प्रारब्ध म्हणणार नाहीं. जोंपर्यंत राज्य बेबंद आहे, तोपर्यंत नशीब हा शब्द लोक उच्चारतील. कारण त्यांस त्याचा दाखला प्रत्यक्ष येतो कीं, शाहाण्याचा वेडा आणि वेड्याचा शाहणा घटकेंत होतो. यास्तव असें होऊं नये. म्हणून कायदे व शास्त्र असलें पाहिजे. मनुष्याचा धर्म हाच आहे कीं, जोंपर्यंत आपली अक्कल चालेल तोंपर्यंत त्यानें चांगलें होण्याचा मार्ग स्थापन करावा. उद्योग सोडूं नये. उद्योगानें फळ येत नाहीं असें होण्यास कारण मनुष्यें च आहेत. राजा चांगला असेल तर वाईट कोण, चांगला कोण याची निवड होईल. वर्तमानपत्रें असावीं, याचें कारण हेंच आहे कीं, सरकारानीं किंवा कोणीही अन्याय केला तर तो प्रगट होतो. व येणेंकरून त्याचा कांहीं बंदोबस्त होतो. त्याची चूक त्यास कळली म्हणजे तो दुसऱ्यानें ती करीत नाहीं. याजकरिता लोकांचें मत प्रगट व्हावें हा उत्तम मार्ग आहे. ज्यास थोरपणा मिळतो त्यास असें वाटत नाहीं कीं, मी कमी शाहाणा आहे. त्यास सगळा शाहाणा मी व अर्धे शहाणें बाकीचें सर्व जग आहे, असें वाटतें. याजमुळें तो लोकांची स्तुती पसंत करितो. यास्तव वर्तमानपत्र असलें म्हणजे तसें न होतां मोठी सुधारणा होते. तात्पर्य, नशीबाचें कारण लोकच आहेत. व ही घालमेल त्यांचे मूर्खपणामुळें होते. गहूं आणि जोंधळे सारखे विकूं लागले म्हणजे अर्थातच लोक नशीब म्हणूं लागतात. आणि यापासून आळस उत्पन्न होतो. व उमेद खचते. व कोणी योग्यता मिळविण्याची काळजी ठेवित नाहीं. त्यांस असें वाटते कीं, "मी व्यर्थ इतकी विद्या केली व शाहाणपण शिकलों. येथें सकट घोडे बारा टक्के आहेत. त्यापेक्षां कोणी कांहीं शिकूं नये व विद्या करूं नये असें मनांत येतें. आणि मग यत्नाची अशी प्रवृत्ती पडते कीं, कोणाचें आर्जव कोणाची गुलामगिरी करावी म्हणजे कांहीं पोटाची सोय होईल. वास्तवीक थोरपणा मिळवायचा जो यत्न तो सोडून नीचकर्मास निर्वाहाकरितां लोक लागतात. याप्रमाणें हा सर्व अनर्थ लोकांचे अज्ञानामुळें किंवा राजाचे मूर्खपणानें होतो. याचा निश्चय होत नाहीं; तथापि आमचा अभिप्राय असा आहे कीं, याचें कारण

लोकांचें अज्ञानच आहे. जर लोक शाहाणे असतील तर प्रायशः राज्य वाईट होणार नाहीं, हा नेम आहे. कारण जे लोक शहाणे आहेत तेच राज्यावर बसतात. हा निश्चय आहे. कसेही लोक मूर्ख असोत, परंतु जे राज्यावर बसतात. ते त्या वेड्यांतील शाहाणे असतात. पहिल्यानें जो राज्य मिळवितो तो शाहाणा व मग त्याचे वंशांत मूर्ख निपजतात. आणि राजवंशांतील म्हणून लोक त्यांस मानितात. हा त्यांचा मूर्खपणा आहे. प्रथम राज्य संपादन होणें तें त्या राष्ट्रांतील जे शहाणे असतात त्यांसच होतें. संपादकास कांहीं तरी विशेष शहाणपण असल्याशिवाय राज्य मिळावयाचें नाहीं. लोक शाहाणे असतील तर बहुतेक अनर्थ टळतील. परंतु हिंदुस्थानांतील लोक अगदीं गयाळी आहेत. त्यांस कांहीं कळत नाहीं. अद्याप हे झोपेंत आहेत. वास्तवीक पाहिलें तर या लोकांमध्यें गुणांवरून किंवा विद्येवरून कोणाची योग्यता व मान्यता असते. जो अतलावर आहे किंवा मोठे द्रव्याचे मालकीवर आहे, त्यास लोक शाहाणा समजतात. कवीनें वास्तविकच म्हटलें आहे कीं,

सर्वे गुणाः कांचनमाश्रयंते

हें उदाहरण या लोकांस बरोबर लागू आहे. जर मोठे विद्वान असले आणि गरीब असले तर त्यांस कोणी विद्वान म्हणत नाहीं. पण मध्यम असला तरी चिंत नाहीं. त्या जवळ द्रव्य असलें किंवा अधिकार असला म्हणजे त्याएवढा मोठा कोणी नाहीं. व त्याची प्रशंसा लोक करितात. असा सांप्रदाय आहे. या इतक्या अज्ञानास कारण पाहिलें तर मला एक असें दिसतें कीं, संस्कृत भाषेंत पाहिजे जे ग्रंथ आहेत ते सर्वांस कळत नाहींत. आतां संस्कृत भाषेंत पाहिजे तें सर्व आहे असें नाहींच; पण आहे तितकें कळतें तरी लोक शाहाणे असते. संस्कृत भाषेंत ग्रंथ थोडे, भुगोल आणि इतिहास हे मुळींच नाहींत. पुराणांत कितीएक ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, हिमालयाचे पलीकडेस किती एक देश आहेत, तेथें अमुक अमुक लोक आहेत. याजवरून तेव्हांचे लोक आतांचेसारखे कैदेंत नवते, असें समजतें, जरी या ग्रंथांस बहुत दिवस झाले व त्यांत लिहिलें आहे त्याशीं आतां कितीएक गोष्टी मिळत नाहींत, तत्रापि ही गोष्ट खरी आहे कीं, त्या वेळेस हिंदु लोक सर्वत्र जाऊन विद्या वाढवीत होते. विद्या म्हणजे स्वदेशांत व जें इतर देशांत आहे तें सर्व आपल्यास कळावें, यांचेंच नांव विद्या. आलीकडे कितीएक मूर्खपणाचें समजुतीमुळें लोक कैदेंत आहेत. म्हणजे त्यांच्या पायांत बिड्या आहेत. त्यास इकडचें तिकडे हलवत नाहीं. जागच्या जागीं श्रमी होतात. आणि बिड्या तोडावयाजोग्या असूनही ते स्वस्थ दुःख भोगितात, हें आश्चर्य आहे. तात्पर्य, बहुत दिवस एखादी गोष्ट चालली म्हणजे ती सोडवत नाहीं. विचार असला तरी अंध होतात. आपली सुधारणा कोणते रितीनें होईल, याचा विचार करीत नाहींत. त्यांत एकमेकांचे द्वेष व मत्सर फार. याजमुळें कोणी कोणास

पुसत नाहीं. व अशी स्थिती जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत यांचें कल्याण होणें दिसत नाहीं. जोंपर्यंत उत्तर देशचे लोक इकडे येत नव्हते, तोंपर्यंत हें चाललें. आतां हें चालणार नाहीं.

लो० हि०

पत्र नंबर २५

राज्यसुधारणा

सांप्रत हिंदुस्थानांतील लोकांस अज्ञानदशा आहे, याजमुळें राजा कोण आहे व व्यवस्था कशी आहे, तें कळत नाहीं. ज्यास खावयास आहे त्यास आपल्यासारखे सर्व श्रीमंत आहेत, असें वाटतें. पटवर्धन जाहागीरदार यांचे प्रांतांत जे राहातात त्यास असें वाटतें कीं, पृथ्वीचे चक्रवर्ती राजे पटवर्धनच आहेत. व ते चिरकाल नांदतील. शिंद्याचे राज्यांत आहेत त्यांसही असेंच वाटतें. जे पेशव्यांचे अमलांत पुण्यांत राहात होते, त्यांस असेंच वाटत होतें. आणि एक एक राज्य जात चाललें, ह्याचा कोणास टिकाण नाहीं. सर्व आपले ठिकाणीं धुंद आहेत. इंग्रेज कोठून आले आहेत व ते आपलेवर राज्य कोणत्या रितीनें करतात, व त्यांचे मुलखांल राज्य कसें चालतें हें कोणास ठाऊक नाहीं. लोक मूर्खपणांत राहून भिकारी होत चालले व अज्ञानरोगानें ग्रस्त होऊन मरावयास टेकले. त्यास औषधें कशाचीं? स्वदेशीय राजधानींतील लोकांस आम्ही कांहीं म्हणत नाहीं. कारण त्यांची निद्रा कुंभकरणासारखी आहे. जरी आम्हीं त्यांचे कानाशीं नौबती वाजविल्या तरी ते जागृत होणार नाहींत. घोरत असतील व जेव्हां त्यांस कोणी येऊन लाथ मारील तेव्हां ते जागे होतील. असो; परंतु गतश्री जे लोक झाले आहेत त्यांस सांप्रतकाळचे राज्यामुळें अडचणी किती आहेत याची माहिती असेल. पुण्यासारखीं बुडतीं शहरें व तुछ मानलेली जात ब्राम्हणासारखी, त्यांतील लोकांस माहिती असेल कीं, आपला देश निर्धन होत चालला आहे. याचा विचार करणें सर्वांस उचित आहे. आणि मुलखाचें दरिद्र काढावयाचा उपाय करणें तर आधीं राज्य सुधारलें पाहिजे. उत्तम रितीनें राज्य चालवें अशी कांहींतरी युक्ती निघाली पाहिजे. मी जाणतों कीं, लोक मूर्ख आहेत. याजमुळें त्यांस याचा विचार करण्यास शक्ती नाहीं, तथापि कांहीं उपाय मला सुचला आहे तो मीं लिहून प्रगट करितों. हल्लीं हिंदुस्थानांत बहुतेक राज्य कंपनीसरकारकडे आहे व लोकांस राज्यांत कांहीं अखत्यार नाहीं. इंग्रजांचे स्वदेशीय राज्यांत पाहिलें तर तसें नाहीं. तेथील लोकांस राज्यांत हात घालण्याचा व कायथे करण्याचा अधिकार आहे. विलायतेंतील राजा जडजाचे नाझराप्रमाणें आहे. जेव्हां लोकांची सभा म्हणजे पार्लिमेंट

हे कायदे फर्मांवितात, तेव्हां राजा त्यावरहुकूम वहिवाट करितो. दरवर्षास राजाचे खर्चास पैसा पाहिजे तो लोकांस मागील सालचा हिशेब देऊन पुढें पैसा वसूल करण्याची परवानगी घेतल्यावर त्यांचे हुकमाप्रमाणें कर व धारे बसून वसूल होतो. येणेंकरून जसें लोकांस पाहिजे तसें राज्य चालतें. एक राजा स्वइच्छेनें राज्य करितो त्यापेक्षां ही युक्ती बरी आहे व याप्रमाणें हिंदुस्थानांत राज्य चालेल तर फार चांगलें होईल. जे सूज्ञ लोक असतील त्यांस मोठे जाग्यावर व अधिकारावर नेमतां येईल, असें इकडे राज्य असावें. सन १८३४ सालीं कंपनीची सनद २० वर्षांची बाहाल झाली, त्या समयीं या गोष्टीचा विचार पडला होता. कितीएक विलायतेंतील दयाळू लोक यांनीं सांगितलें कीं, इंग्रज लोकांचें राज्य ज्या रितीनें चालतें, त्याप्रमाणें हिंदु लोकांचें चालावें; तेव्हां कंपनी सरकारानें अशी शाबिती केली कीं, हिंदु लोक मूर्ख आहेत, त्यांस पार्लमेंट म्हणजे काय हें ठाऊक नाहीं. याजमुळें तेथें असें राज्य बसविल्यानें बखेडा मात्र होईल. आणि सर्व बेबंद होईल. पार्लमेंटांत बसणारे लोक मोठे शाहाणे पाहिजेत. त्यांचे मनांत लोकांचें हित नेहमी वागलें पाहिजे, तेव्हांच ती सभा नीट चालेल. त्याप्रमाणें पार्लमेंटांत बसावयास सर्व हिंदुस्थानांत एकही योग्य मनुष्य मिळावयाचा नाहीं, ही मोठी अडचण आहे. याजमुळें विलायतेंतील बादशहानें कंपनीसरकारची सनद कबूल करून वीस वर्षें-पर्यंत कमाविशी कायम केली तीं वीस वर्षें सन १८५४ नांत भरतात. तेव्हां अजून ६ वर्षांचा अवकाश आहे. इतक्यांत कितीएक शाहाणे होतील व हल्लीं कितीएक शाहाणे सांपडतील; याजकरितां आजपासून सर्व गरीबांनीं व श्रीमंतांनीं एकत्र होऊन विलायतेंतील राणीसाहेबांस तपशीलवार एक अर्ज करावा कीं, हल्लीं राज्यपद्धत आहे तीपासून आमचा फायदा नाहीं व आमचे राज्यसंबंधी हक्क चालत नाहींत. व हिंदु लोक जसे तसेच इंग्रज लोक मनुष्यें आहेत. याजकरितां इनसाफ बरोबर होण्याकरितां सर्व इंग्रज व नेटीव लोक यांमध्यें सांप्रत मोठा भेद आहे तो मोडून एकसारखे होण्याकरितां हिंदुस्थानचे देशांत पार्लमेंट ठेवावें. व ही मोठी सभा मुंबईस भरावी, आणि तेथें दरएक शहरांतून व दरएक जिल्ह्यांतून दोन दोन असामी घेऊन त्या सर्वांस कौंसलांत बसवून गवरनरानें त्यांत मुख्य असावें व जे लोक दर जिल्ह्यांतून आणावयाचे ते सर्व जातींतील सारखे असावे. दर जिल्ह्याचे माजिस्त्रेटसाहेबांकडून दवंडी पिटवावी कीं, राज्याचा विचार चांगले रीतीनें होण्याकरितां संपूर्ण लोकांनीं विचार करून दोन शहाणे मुखत्यार नेमावे. व त्याप्रमाणें नेमिलेले सर्व लोकांनीं हजर व्हावें. हे लोक बोलणारे, चतुर, व मुछदगिरी केलेले असावे. कारण हे राज्याचे हिस्सेदार आहेत. केवळ शिरस्तेदार, मुनसफ व मामलेदार नव्हत व या लोकांत भट, गृहस्थ, शास्त्री, परभू, कुळंबी, मुसलमान, इंग्रज इत्यादि जे शाहाणे दिसतील ते नेमावे व त्यांनीं राज्य चालवावें. म्हणजे लोकांचा फार फायदा होईल. याप्रमाणें अर्जी करून विलायतेस दाहापांच असामी प्रयत्न करण्याकरितां नेमून त्यांजबरोबर ती पाठवावी, म्हणजे आपले लोकांचा कांहीं उदयकाळ होईल.

नाहींतर हे असेच कितीएक वर्षेंपर्यंत राहातील. यास्तव जे लोकांचें हित पाहाणारे आहेत त्यांनीं हा वेत केला पाहिजे. म्हणजे दरिद्र वगैरे बोभाट लोक सांगतात हे त्वरित दूर होतील. आणि इंग्रज लोक इकडील लोकांस मूर्ख असें समजतात तेंही मत मोडेल. आणि राज्याची उत्तम प्रकारची सुधारणा होऊन एके राजाचे अमलांत सुख काय, व लोकसत्तात्मक राज्यांत सुख काय, हें सहज दृष्टोत्पत्तीस येईल. असें सरकार झाल्यानें मग शिंद्याचें किंवा हैदराबाद्चें राज्य चांगलें कीं काय, हें त्वरित ध्यानांत येऊन चांगलें राज्य चालविण्याचे रीतीची माहितगारी सर्व लोकांस होऊन बहुधा हें उदाहरण पाहून सर्व दुसरीं राज्येंही याचप्रमाणें होतील व येणेंकरून एका राजाचे ताब्यांत राहून त्याचा जुल्मम सोसावयाची खोड हिंदु लोकांस लागली आहे, ती ते विसरून जातील. राज्य करण्यास गरीब व मातबर, नीच जातीचे व उंच जातींचे लोक समान मानावे, हें सर्वांस कळूं लागेल. अशा सभेंत जातीविषयीं निवड नको हें वर सांगितलेंच आहे. जे फार विद्वान व चांगले चालीचे लोक आहेत तेच नेमले पाहिजेत. मग त्यांची कोणतीही जात असो. परंतु ब्राम्हणांस गर्विष्ठपणा फार आहे. याजकरितां ती जात फार थोडी असली पाहिजे. सदाशिवराव भाऊ पेशवे हे स्वारीस गेले. तेव्हां लढाईचा विचार करण्याकरितां मराठे, मुसलमान व ब्राम्हण सरदार बसत. परंतु ते इतरांस तुच्छ मानीत. शेवटीं त्यांचा गर्विष्ठपणाचा त्रास येऊन होळकर म्हणूं लागला कीं, या बामणाचा गर्व हरण झाला तर बरें होईल. शेवटीं अशानेंच सदाशिवराव भाऊनीं सर्व फौज बुडविली, व आपणही बुडाले. याचप्रमाणें नाना फडणीस यांचा स्वभाव सर्वांस माहित असेलच. त्यांनीं आपले गर्विष्ठपणानेंच इतर लोकांस तुच्छ मानिलें. यांचे पुराणांत वगैरे ब्राम्हण म्हणजे देव असें म्हटलें आहे, त्या समजुतीवर ते जातात. त्यांस अद्याप इतर लोक व आपण सारखेच आहों, हें कळलें नाहीं. ईश्वरेच्छेनें लवकरच कळेल. हे विनंती.

लो० हि०

प्रभाकर, ता० १३ आगस्ट १८४८

पत्र नंबर २६

वैराग्य

मनुष्यमात्रानें आपले परलोकाचा विचार करावा हें सर्व गोष्टींहून उत्तम आहे, असें असतां कितीएक संसारिक जन लौकिक विचार मात्र करितात. एक क्षणभर

देखील ईश्वराचें स्मरण करीत नाहींत. याहून मोठें आश्चर्य काय आहे? मनुष्यास ईश्वरानें बुद्धी दिली आहे, तिचा उपयोग इतकाच कीं, इतर सर्व जनावरांपेक्षां हें जनावर श्रेष्ठत्व पाऊन आपले कर्त्याचे उपकार जाणून त्याची कीर्ती आणि दया वर्णन करील. परंतु हा सन्मार्ग सोडून कितिएक गैररस्त्यानें जात आहेत. आणि क्षणभंगूर देहाचे पोषणाकडे सर्व लक्ष देऊन आपलें जें महत्कल्याण तें करून घेत नाहींत. पहा, कित्येक मेहनतीचे कामांत पडले आहेत. कितिएक चाबुकस्वार, कितिएक कारकून, कित्येक मजूर, कितिएक शास्त्री व कित्येक वैदिक आहेत. कित्येक सूर्योदयादारभ्य नाचतात. आणि संत म्हणवितात; परंतु हे सर्व देवास जाणत नाहींत. केवळ पोटाकरितां उद्योग संपादून असतात. याचा दाखला असा आहे कीं, गोसावीबोवास जर बिदागी कमी पोंचली तर त्यांस राग येतो. पुराणिकास तांदूळ मिळाळे नाहीं तर त्यास संताप येतो. भटास दक्षिणा मिळाली नाहीं तर तो रागावतो. असेच बहुतेक लोक आहेत. तेव्हां कोणी धर्मसंबंधी किंवा प्रपंचसंबंधी द्रव्याचे आशेवांचून काम करीत नाहींत, हें स्पष्ट आहे. यास्तव यांपैकीं कोणी साधूचें अभिधान पावण्यास योग्य नाहींत. मला असें वाटतें कीं, संसार आणि परमार्थ हीं दोन कामें पृथक आहेत. त्यांची मिसळ करूं नये. परंतु कितिएक लोक फक्त संसाराकरितां कांहीं कामें करितात. आणि तीं देवाकरितां केलीं, असें म्हणतात. मला एक साधू असा ठाऊक आहे कीं, त्याची पूजा व भजन किंचित होतें. तत्रापि त्याजकडे लोक फार येऊं लागले, तेव्हां त्याची पूजा वाढली. म्हणजे दांभिकपणानें तो चार घटिका अधिक बसूं लागला. व तेच लोक कमी होतांच पुनः मुळचेप्रमाणें झाला. हा केवढा नीचपणा आहे. देवानें सर्वदां 'माझें भजन करा,' म्हणून मनुष्यांवर ओझें घातलें नाहीं. तो इतकेंच भजन मागतो कीं, जें आपलें आणि आपले कुटुंबाचें व इतर जनाचें काम आहे तें सर्व चांगले रीतीनें करून नंतर जी वेळ सांपडेल ती, क्षणभर असो अगर घटकाभर असो, स्नानसंध्येंत किंवा प्रार्थनेंत आणि नामस्मरणांत घालवा. म्हणजे त्यांतच अनंत वर्षें तपश्चर्या केल्याचें पुण्य आहे. संपूर्ण जग ईश्वरानें निर्माण केलें आहे. व त्याची व्यवस्था होण्याकरितां सूर्य चंद्र, रात्र दिवस, प्रत्येक जिवाचा भक्ष, रोगास औषध, व मनुष्यास विचार आणि थोरपणा इतकीं दिलीं आहेत. त्यांचें कारण असें आहे कीं, ज्या ज्या ठिकाणीं जें जें व्हावयाचें तें यथास्थित होऊन मनुष्यांनीं सर्वदा ईश्वराचे उपकार, शहाणपण, नेम व रचना यांची आश्चर्यकारक स्तुती करून रमत असावें. सूर्य उगवला असतां निद्रा करावी. किंवा रोग झाला असतां औषध घेऊं नये. अगर मनुष्य झाला असतां विचार टाकून देऊन जनावरासारखें फिरावें, असें विचारास योग्य दिसत नाहीं. यास्तव उत्तम हेंच कीं, मनुष्यानें आपलें कर्म करावें. श्रीकृष्णानें गीतेच्या ठाईं हाच अभिप्राय अर्जुनास सांगितला आहे. अर्जुन विषाद पाऊन वैराग्य घेत होता. तेव्हां कृष्णानें त्याची समजूत केली कीं, "अरे षंढा, तूं भितऱ्यासारखा वैराग्य काय घेतोस? जें आपलें कर्तव्य

आहेत तसे नवते. ते परदेशांत जात येत होते. आलीकडे मात्र त्यांचें असें झालें कीं, जसा एकादा धाव घेतांघेतां थकून पुराणप्रसिद्ध मुचकुंदाप्रमाणें निद्रा करितो, तसें या लोकांचें झालें आहे. बहुतकाळपर्यंत सर्व देशांहून हिंदुस्थान प्रमुख आणि पराक्रमी असा मान पावून हल्लीं निद्रिस्त झालें. आतां या दीर्घ निद्रेंतून तें दुसरे कोणतेही उपायें-करून जागृत झालें नाहीं तरी दरिद्रांजनेंकरून तरी जागृत होईल, यांत संशय नाहीं.

१. एक हजार वर्षांच्यापूर्वी क्रिस्तियन धर्म युरोपखंडांत वृद्धिंगत झाला. व बहुत लोक तो धर्म अंगिकारून देशोदेशीं गेले. तेव्हां कितिएक किरिस्तव हिंदुस्थानांतही मलबार देशीं आले. व त्यांनीं आपले धर्मांत कितिएक लोक आणले ते अद्यापि मलबारांत आहेत. त्यांचें नांव सेंट वेमी किरिस्तव. त्यांची चाल व वर्तणूक बहुतकरून हिंदुप्रमाणेंच आहे. म्हणजे त्यामध्यें ब्राम्हण, शूद्र अशा जाती आहेत. व परस्पर लग्नें होत नाहींत. धर्म मात्र हिंदूंचा नाहीं. पुढें पोर्टुगीस लोक इकडे येऊन त्यांनीं गोव्यांत ठाणें बसविलें. त्यानंतर त्यांनीं गरीबगुरीब लोकांस जबरीनें व द्रव्यानें आपले धर्मांत आणिलें व ते बहुतकरून युरोपियन लोकांप्रमाणेंच वागतात. असे किरिस्तवांचे दोन इतिहास आहेत.

२. आर्बस्थानांत महंमदी धर्म चालू होऊन मुसलमान झाले, तेव्हां कितिएक बादशाहही मुसलमान झाले. आणि आपले रयतेस मुसलमान होण्याकरितां इजा देऊं लागले. त्याकाळीं इराण देशांत जरदस्ताचा अग्निपूजेचा धर्म चालत होता. तेथील बादशाह मुसलमान होऊन रयतेस उपद्रव करूं लागला. तेव्हां तेथील जे धर्मतत्पर लोक होते, ते जाहाजांत बसून हिंदुस्थानांत सुरतेस आले. तेथील राजा हा समुदाय पाहून भयाभीत झाला. व पुढें त्यानें त्यांजपासून तरवार धरणार नाहीं म्हणून करार लिहून घेऊन आपले प्रांतांत राहूं दिलें. त्यास सरासरी आठनऊशें वर्षें झालीं. ते पारशी लोक हल्लीं आपली पहिली भाषा सोडून गुजराथी भाषा बोलून इकडील लोकांप्रमाणें राहातात. व त्यांनीं कितिएक इकडील चालीही धरल्या आहेत. त्यांचें धर्मपुस्तक जेंद अवस्था हें मात्र मूळचे भाषेंत आहे.

३. जेव्हां मुसलमानीं धर्म चालू झाला, तेव्हां त्या धर्मांतील पुष्कळ लोक इकडे येऊन धर्म शिकऊं लागले. त्यांत एक मौलवी आर्बस्थानांतून गुजराथेंत आला. आणि आपली जाती व धर्म छपावून एका स्वामीजवळ शिष्यांत राहिला. व तेथें त्यानें हिंदु धर्माचा अभ्यास केला. आणि मग त्या स्वामीस बोध करण्यास आरंभ केला. व आपला धर्म प्रतिपादन केला. तेव्हां स्वामीनें तो धर्म खरा समजून आपले शिष्यांसहित स्वीकारिला. ते लोक बोहारी झाले. वा गोष्टीस पांचशें वर्षें झालीं. गुजराथी भाषेंत बोहारी या शब्दाचा अर्थ व्यापारी, असा आहे. हे मूळचे गुजराथेंतील हिंदुच होते. पुढें बाटून मुसलमान झाले.

४. हिंदुस्थानांत पूर्वी एकही मुसलमान नव्हता. परंतु मुसलमानांनीं स्वारी करून हा मुलूक काबीज केल्यावर ते लोक हा देश चांगला पाहून इकडून गेले नाहींत. येथेंच

आपल्या सैन्यासहित राहिले. ते लोक हल्लीं सर्व हिंदुस्थानांत इकडील लोकांत मिसळले आहेत. रोहिले व पठाण हैदराबादेस राहिले. व लखनौ आणि दिल्ली या ठिकाणीं मोंगल राहिले.

५. कोळी, गोंडवणांतील गोंड व भिल्ल हे लोक बाहेरील देशांतून इकडे आले नाहींत. हे या देशचे मूळचे मिराशी आहेत, असें दिसतें. कारण संस्कृतभाषेचा यांचे भाषेंत लेशही नाहीं. व हिंदुधर्माची गोष्ट त्यांस कांहींच मान्य नाहीं. त्या लोकांस, सांप्रत जे आपणांस हिंदु लोक म्हणवितात त्यांनीं जिंकलें आहे. पूर्वी हिंदु लोक हे पंजाबाकडून आले. व त्यांनीं उत्तरेस अंमल बसविला. आणि देशाचें नांव पुण्यभूमी असें ठेविलें. महाराष्ट्र व कर्नाटक हे देश हिंदुस्थानचे राजाकडे बहुत काळ नवते तेथील लोकांस ते घडशी, राक्षस व रावणाचे सेवक असें म्हणत होते. पुढें हिंदु लोकांनीं जिंकित जिंकित सर्व देश जिंकिला. तेव्हां ते मूळचे लोक डोंगरांत व रानांत जाऊन राहिले. ते अद्यापी तेथेंच राहातात. असें या लोकांचें मूळ आहे.

आतां कितिएक स्वदेशीय लोक असून ते नाना प्रकारचे पंथांस लागले आहेत. त्यांविषयीं थोडासा इतिहास लिहितों. तेणेंकरून हिंदुधर्म प्रमुख असतां त्यापासून दुसरे पंथ कसकसे निघाले आहेत, त्यांची गोष्ट समजेल.

१. हिंदु लोकांचे येण्यापूर्वी हिंदुस्थानांत कोणता धर्म असेल तो असो. हल्लीं जे या देशांत राहाणारे लोक यांचा मुख्य धर्म वेदशास्त्राचे आधारेंकरून आहे. व त्यांशीं विपरीत एक बुद्ध धर्म म्हणून आहे. गयेस एक पंडित झाला. त्यानें हा धर्म स्थापिला आहे. तो पंडितच बौद्ध अवतार. त्याचें ठिकाण अद्यापी गयेस आहे. त्याचा धर्म वेदाशीं विरुद्ध आहे. यास्तव ब्राम्हणांनीं महा प्रयत्न करून तो बुडविला. तत्रापि बंगाल्याचे पलीकडे व ब्रम्हदेशांत तो अद्यापी चालत आहे. लंकेंतही तोच धर्म चालतो. पण त्यांत कांहीं कांहीं फरक आहेत. तथापि मूळ एकच.

२. त्यानंतर दुसरा जैन पंथ. हा सर्व देशांत आहे, व याचे धर्माधिकारी स्वामी जागोजाग आहेत. हें मत कांहीं वर्षांपूर्वी फार चाललें होतें, परंतु कुमारीलभटानें बहुतकरून तें मोडिलें. व त्या मताचे लोकांनीं ग्रंथ केले होते तेही बुडविले. एक अमरकोश मात्र ठेविला आहे. जैनांचें मत असें आहे कीं, ही सृष्टी अविनाश आहे. यज्ञ व श्राद्धादि करणें जरूर नाहीं. अद्यापी त्यांचें मत जागोजाग चालत आहे.

३. नानक व गुरू गोविंद हे पंजाबचे मुलखांत झाले. त्यांनीं आपण स्वतः ग्रंथ लिहून एक नवीन धर्म चालू केला. त्यांत जैन मताचे लोक, मुसलमान, व हिंदु या जातीचे लोक आहेत. त्यांचें नांव 'शिक' म्हणजे शिष्यार्थी शब्द आहे. नानक याचे जन्मास दोनशेंपन्नास वर्षें झालीं. तो पहिल्यानें हिंदु होता. नंतर मुसलमान होऊन मक्केस गेला. व संन्याशी बहिरागी यांचे मेळ्यांत फिरला. नंतर त्यानें आपणांस ईश्वराची अशी आज्ञा झाल्याचें प्रघट केलें कीं, यवन व हिंदु हे मूर्खपणानें उगीच

भांडतात. ईश्वर एकच आहे. त्यास सर्वांनीं भजावें व परस्परकलह मोडून उत्तम धर्म लोकांस शिकवावा. याप्रमाणें त्यानें ग्रंथ लिहून लोकांस आपले धर्मांत आणलें. या धर्मांचें दोहोंही धर्माशीं विरुद्ध नाहीं. पुढें दिल्लीचे बादषाह औरंगजेब वगैरे झाले. त्यांनीं त्या लोकांस उपद्रव दिला. याजमुळें त्या लोकांनीं जमून आपले संरक्षणाकरितां मुलूख बळकाविला. व आलीकडे रणजितसिंग वगैरे यांनीं पुष्कळ मुलूख मिळविला आहे. आणि स्वतंत्र राज्य केलें आहे. असें शिक लोकांचें मूळ आहे. आतां त्या धर्मांत कोणीही जातो. त्यास निषेध नाहीं.

४. हिंदुस्थानांत कबीर म्हणून एक कवी व साधू झाला होता. त्याचे पंथांत वागणारे लोकही पुष्कळ आहेत. त्यांस कबीरपंथी म्हणतात. कबीराचें मतही असेंच होतें कीं, मुसलमान व हिंदु हे आपसांत धर्माचे विरुद्धभावानें व्यर्थ भांडतात. मुख्य धर्म हाच कीं, कोणाचें वाईट करूं नये व परमेश्वराची भक्ती करावी. लोकांस उपद्रव करितात ते धर्म बुडवितात.

५. शंकराचार्यस्वामीपासून संन्याशी व गोसावी मत झालें. शंकराचार्य हे मुख्यत्वेंकरून वेदांतशास्त्राचे प्रतिपादक होते. यास्तव त्यांनीं कलियुगांत शास्त्राप्रमाणें संन्यास निषिद्ध असतांही चालू केला. व त्यांचे फार शिष्य होते. त्यांनीं शूद्रास देखील संन्यास देऊन गोसावी केलें. संसार सोडला पाहिजे हा त्यांचा मुख्य अभिप्राय आहे. परंतु हल्लींचे गोसावी वेदांताप्रमाणें किती चालतात हें लोकांस ठाऊकच आहे.

६. मध्वस्वामीनीं कर्नाटकांत वैष्णवमत स्थापिलें. तसेंच वल्लभाचार्य म्हणून एक गुजराथेंत होता. त्यानें वैष्णवमतच परंतु एक वेगळ्या तऱ्हेचें काढिलें. सांप्रत वैष्णवांचा व शैवांचा बहुत विपर्यास आहे. कर्नाटक प्रांतीं असे वैष्णव आहेत कीं, ते शैवांचे पंक्तीस देखील जेवीत नाहींत. परंतु शैव आपल्यास स्मार्त म्हणवितात. आणि वैष्णवास पाखांडी म्हणतात. वैष्णव अद्वैत वेदांतास मानीत नाहींत.

७. महाराष्ट्र देशांत एक रामदासस्वामीचा पंथ आहे. परंतु त्याचें कोणाशीं विरुद्ध नाहीं. तसेंच तुकाराम, ज्ञानेश्वर हे साधू झाले. त्यांचें मत बहुतकरून शूद्र लोकांत चालू आहे. व कितिएक ब्राम्हणही त्यांत आहेत. परंतु विद्वान ब्राम्हण बहुधा त्यांत नसतात. यांचेंही मत साधूपणाचें आहे. यांचें शत्रुत्व कोणाशीं नाहीं. हें मत हल्लीं दोनशें वर्षांपासून चालू आहे. यांचें मुख्य मत असें आहे कीं, नीतीचें आचरण, सारासार विचार आणि कीर्तन करावें.

८. बंगाल्यांत एक चैतन्य म्हणून मनुष्य होता. त्याचें मत बहिरागी लोक धरतात व चैतन्याचे मताचे लोक सांप्रत पुष्कळ आहेत. ते गोसावी यांसारखेच आहेत.

९. तंत्रशास्त्राचे आधारानें चालणारें एक शाक्त मत आहे. यांतील लोक फार दुष्ट आहेत. हे बंगाल्यांत पुष्कळ आहेत. व हल्लीं महाराष्ट्र देशांतही यांचा पर्वकाळ पुष्कळ झाला आहे. यामल इत्यादि ग्रंथ आहेत, त्यांत 'रुधिराध्याय' म्हणून आहे,

त्यांत शक्तीस भक्ष कसकशाचा द्यावा हें लिहिलें आहे. तें जर कोणी वाचून पाहिलें तर तो फार आश्चर्य करील. व त्याचा लिहिणारा खाटिकाहूनही निर्दय आणि लोकांस मूर्ख करणारा होता असें म्हणेल. वारुणीप्राशनाचा त्यांस किमपी निषेध नाहीं व अंग-पूजा म्हणजे स्त्रीचें आराधन त्यांत श्रेष्ठ धरिलें आहे. याहून ईश्वरास क्रोधकारक दुसरें काय असावें! हें मत कोणी खरें मानणार नाहीं. मनुष्याचे बुद्धीस इतकी काळिमा येऊन ते ईश्वरास सोडून तंत्रांत लिहिल्या मार्गास लागले. आणि इतक्या निर्लज्जपणास व ईश्वरास क्षोभकारक अशा वर्तणुकीस लागले, हें पाहून दुःख वाटतें. अस्तु. असे हे पृथक पृथक धर्म आहेत व याशिवाय आणखीही कितिएक आहेत. परंतु हिंदुस्थानांत जगन्नाथास व गिरीस सर्व जातीचे लोक सर्व धर्मविचार सोडून खातात व पितात. गिरीस देवळांत मात्र असें चालतें, आणि जगन्नाथांत सर्व गांवांत. याप्रमाणें वर्णसंकर करितात. जगन्नाथाचें मूळ असें आहे कीं, श्रीकृष्णांनीं देह ठेविल्यानंतर तो देह जगन्नाथास आणिला. व मूर्ती करून त्यांत त्या देहांतील अस्थी भरल्या आणि त्या मूर्तीस देवळांत ठेविलें. कोणी म्हणतात कीं, प्राचीन हिंदु राजे यांनीं ही मूर्ती बसविली आहे. असो, याचें मूळ काय असेल तें असो. परंतु जातीचा विचार त्या ठिकाणीं नाहीं हें जगप्रसिद्ध आहे.

लो० हि०

प्रभाकर, ता. ३ सप्टंबर १८४८

पत्र नंबर २८

विधिनिषेधरूप धर्माचें मूळ

धर्मशास्त्राचें व नीतिशास्त्राचें मूळ काय आहे याचा विचार करितां दिसतें कीं, प्रथमतः ईश्वरानें पृथ्वी निर्माण केली. व सर्व सृष्टींतील पदार्थ सूर्य, चंद्र इत्यादि केले आणि नंतर मनुष्य उत्पन्न केला. तेव्हां प्रथम जो मनुष्य होता, तो फार सुखी असेल. कारण त्याचें कुटुंब एकटेंच. सर्व सृष्टीचा धनी तोच. नद्या, जमीन, झाडें या सर्वांचा अधिकारी तो एकच. तेव्हां तो पाहिजे तेथें राहात असेल. जेथें पाहिजे तेथें बसत असेल. पाहिजे तेथें पेरीत असेल. त्याकाळीं त्यास कोणी मुजाईम नव्हता. याजमुळें तो अर्थात सुखी असेल. असें कांहीं दिवस चालल्यानंतर त्याचें कुटुंब वाढलें. आणि एका घरांत राहात होते, तेच लोक फार होऊन त्यांचा गांव झाला. तेव्हां एकानें जमीन लागवडीस आणली. ती चांगली पाहून त्याचे भावांस लोभ उत्पन्न झाला. कारण

लोभ, क्रोध, मोह हे मनुष्यांचे मनांत आहेतच; परंतु त्यांस प्रसंग आल्याखेरीज ते दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. सांप्रत हीं मनुष्यें कितिएक चोर व कितिएक लबाड असे गुप्तरूपानें आहेत. जे चोर आहेत ते श्रीमंत असले म्हणजे त्यांस चोरी करावयाचें अगत्य असत नाहीं, हें पुष्कळांचे पाहाण्यांत आहे. एका मनुष्यानें स्त्री केली म्हणजे तिचा स्वभाव भिन्न असल्यामुळें तिचा भ्रतार वारंवार क्रोधाविष्ट होतो. आणि तिचें व त्याचें पडत नाहीं. पुढें ती स्त्री मेली म्हणजे दुसरी करितो. आणि ती सहनशील व नम्र असली म्हणजे तिचा भ्रतार पहिल्यानें भांडत होता. तोच सुखानें तीजवळ राहतो. याचें कारण काय कीं, क्रोध येण्याचें कारण कमी होतें. आणि असेंच जर सर्व मनुष्यांस जसें पाहिजे तसें प्राप्त होईल, तर कोणी कोणास उपद्रव करणार नाहीं. परंतु ईश्वरी संकेत असा आहे कीं, जसजसे पदार्थ मनुष्यास पाहिजेत तसतसे त्यानें ते निर्माण केले पाहिजेत. ते जर फुकट मिळतील तर कोणी दुराचरण करणार नाहीं. परंतु या लोकीं भ्रांती व अज्ञान फार आहे. तेणेंकरून ईश्वरानें मनुष्यास जे पदार्थ उद्योगानें सोधून काढण्यास सांगितलें आहे, त्यांतून कितिएक सांपडावयाचे आहेत. त्यांचा अंत नाहीं. परंतु जर सर्व सांपडतील तर सर्व लोक सुखी होतील. परंतु असा काळ कधीं येईल हें तर्कानेंही समजणें अशक्य आहे. यास्तव मनुष्यमात्राचा धर्म असा असावा कीं, हे पदार्थ शोधण्याचा उद्योग सर्वदा करावा. कवीनें म्हटलें आहे कीं,

अनर्थमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।
अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥

असा सर्वज्ञ मनुष्य कोठें आहे कीं, योग्यायोग्य जाणून विचार करील; आणि असा वैद्य कोठें आहे कीं, ज्यास सर्व वनस्पतींचा निर्णय कळेल; आणि असा शब्दाचा अर्थ जाणणारा कोठें आहे कीं, प्रत्येक शब्दाचा अर्थ कोणत्या भाषेंत कसा होतो हें समजेल? ही गोष्ट घडत नाहीं; तत्रापि मनुष्यानें असा उद्योग करावा कीं, जितकें समजेल तितकें शिकत जावें. असें करतां करतां मरणानंतर तरी ईश्वर सर्व आपला खजिना त्यास दाखवील. व मग त्यास अत्यंत सुख होईल. आणि सर्वज्ञ मनुष्य झाला तर मग त्याचे हातून कांहीं विपरीत घडावयाचें नाहीं. आणि इतकाच भेद स्वर्गास व मृत्युलोकास आहे. येथें भ्रांती आहे म्हणून दुःख आणि तेथें भ्रांती नाहीं व ज्ञान आहे म्हणून सुख. असो; परंतु ईश्वरी संकेतानें झालें आहे तें कोणाच्यानें फिरवत नाहीं. याजकरितां ईश्वरानें अक्कल दिली आहे. त्या अकलेच्या जोरानें मनुष्यानें एकामेकांच्या बुद्धीबळेंकरून ज्ञानाचा पाठलाग करावा. म्हणजे त्याचे पोटीं सुख आहे. ही गोष्ट सिद्ध आहे. परंतु पूर्वीं सांगितलें कीं, मनुष्यास प्रसंग आल्याखेरीज त्याचे गुण दृष्टीस पडत नाहींत. आणि प्रसंग दैववशात कोणास मिळतात व कोणास मिळत नाहींत. तेव्हां जगाचे आरंभीं जेव्हां लोकांची वृद्धी

होत चालली होती तेव्हां हे प्रसंग वाढत चालले. एकाची संपत्ती पाहून दुसऱ्यास लोभ झाला. व त्यानें ती दिली नाहीं, म्हणजे त्यास राग यावा. एकानें एक जमीनीचा तुकडा घेतला व तो नीट केला. त्यावर दुसरा उगाच दावा करूं लागला म्हणजे त्या उभयतांचें भांडण व्हावें. तसेंच एक सुंदर स्त्री झाली तिचें एकानें परिग्रहण केलें व तिच्यावर दुसऱ्यानें नजर ठेविली. तेव्हां एक म्हणूं लागला कीं, "ही माझी स्त्री, हिचें मीं परिपालन केलें, आणि आतां हिला हा कोण नेणार?" तेव्हां अर्थातच कज्या झाला. अशाच स्थितींत कांहीं काळपर्यंत लोक समाईक होते. पाहिजे ती जमीन घ्यावी, पाहिजे त्यानें स्त्री घ्यावी. धर्म मुळीं कांहीं नसेल. आणि असण्याची त्याकाळीं गरज नव्हती. कारण जोंपर्यंत दुसऱ्यास दुःख होत नाहीं, तोंपर्यंत पाप नाहीं. आणि स्वर्गास इच्छित पदार्थ प्राप्त आहेत. तेथें कोणी माझी अप्सरा म्हणत नाहीं, पाहिजे तेथें राहातात. व पाहिजे त्याचा स्वइच्छ उपभोग करितात. परंतु अज्ञान आणि भ्रांती मृत्युलोकांत फार. येथें चालेना व लोकांत कलह फार उत्पन्न होऊं लागले. तेव्हां जे लोक होते त्यांतील जो प्रमुख बळवान होता त्यानें नेम करून दिलें कीं, जी जमीन ज्यानें घेतली तीच त्यानें वहिवाटावी. दुसऱ्याची घेऊं नये. तशीच ज्याणें जी स्त्री वरिली ती त्याची झाली. तिजवर कोणी दावा करील तर त्यास शासन होईल. तसेंच स्त्री ज्याणें वरिली, त्यानें परस्त्रीचा लोभ करूं नये. कारण तेणेंकरून त्याचे स्वस्त्रीस दुःख होतें. आणि असें ठरलें कीं, ज्यानें स्त्री केली त्यानें तिचें पालन करावें. आणि तिला पुत्र होतील ते त्याचे वारीस समजावे, असें परस्परांचें दुःख टाळण्याकरितां अनेक नियम केले. तेव्हां लोकांत पद्धती पडली आणि जो बळकट होता तोच त्यांचा राजा झाला. त्याचे आज्ञेंत इतर लोक राहूं लागले. परंतु पहिल्यानें लोक भाषा बोलूं लागले, त्या वेळेसच ते अक्षरें लिहूं लागले नसतील; कारण भाषेच्या मागील हें प्रकर्ण आहे. पहिल्यानें लोक एकमेकांस निरोप सांगून पाठवीत असतील. व जेव्हां लोक दूरदूर गेले आणि दोन कोश वस्ती होती ती पन्नास कोश झाली, तेव्हां सांगून पाठविणें अवघड पडूं लागलें, तेव्हां मग लोकांनीं लेखनविद्या काढिली असेल. परंतु लेखनविद्या निघण्यापूर्वी बहुतकाळ गेला असेल. आणि लेखनाचे पूर्वी हें शास्त्र व राजानें सांगितलेले नियम साधारण भाषेंत व कविताप्रबंधांत स्मरण राहाण्याकरितां पाठ करून ठेवित असतील. आणि जागोजाग नाना प्रकारचे नियम चालत असतील. असें होतांना कांहीं दिवस गुदरल्यावर मागील नियम रद्द करून दुसरे राजे झाले, त्यांनीं दुसरे त्यांस जे नीट दिसले ते नियम केले असतील. असें होतां होतां बहूत नियम झाल्यानंतर जाती झाल्या असतील. पहिला धंदा शेतकीखेरीज दुसरा नसेल. कारण पिकविणें व खाणें हें मनुष्यास मुख्य कर्म जगविण्याकरितां जरूर पाहिजे. हें जर लोक न करतील तर जीव जगणार नाहींत. व पिकवावयाचा उद्योग हाच ईश्वरानें लोकांस लावून दिला असेल. कारण त्याएवढा धंदा दुसरा कोणताही

नाहीं. परंतु पुढें असें झालें कीं, दोनशें चारशें लोक शेत करणार झाले. तेव्हां चारशें नांगर तयार करणें हें एका मनुष्याचें काम झालें. तेव्हां सुतार काम ज्यांचें त्यांनीं घरोघर करावें, त्यांत सुख नाहीं. याजकरितां एकानें तें पत्करिलें. मग तो लोकांपासून चरितार्थास दाणे घेऊन नांगर पुरवावे, असें काम करूं लागला. तेव्हां तो सुतार झाला. पुढें इतकीं पुष्कळ लाकडें रानांतून तोडून आणावयास व नांगर करावयास त्यास फावेना म्हणून दुसरा एक मनुष्य लक्कडवाला झाला. तसेंच इतके लोक घरें बांधून राहूं लागले. तेव्हां गंवडी झाला. व नेम व शास्त्रार्थ पुष्कळ झाले. तेव्हां ते पढून इतर लोकांस सांगावयास जरूर पडली. तेव्हां ब्राम्हण झाले. त्यांनीं सर्व नेम व धर्म शिकून लोकांचे दाण्यावर उपजीविका करावी असें ठरलें. कोणी कज्या करील तर ब्राम्हणास पुसावें व त्यानें शास्त्रार्थ सांगावा असें झालें. असें होतां होतां लोक देशोदेशीं राहिले. तेव्हां एका देशांत लोक चांगले सुखी आहेत असें पाहून दुसरे देशांतले लोक गरीब होते. ते इकडे येऊन त्यांस लुटावयास त्यांनीं आरंभ केला. तेव्हां या देशांतील लोक कितिएक क्षत्रिय झाले. म्हणजे त्यांनीं सर्व दुसरे उद्योग सोडून शिपाईगिरी पत्करली. आणि कबूल केलें कीं, सर्व लोकांचे आम्ही परराष्ट्रापासून पालन करूं. कोणास उपद्रव लागू देणार नाहीं. आम्हांस घरीं खावयास द्यावें. तें लोकांनीं कबूल केलें. पुढें जो शेतकरी त्यानें दाणे घेऊन बाजारांत जावें ही गैरसोय पडूं लागली. तेव्हां एकानें व्यापार आरंभिला. म्हणजे तो दाणे घेऊन इतरांस देऊं लागला. व अशाच व्यापारावर आपलें पोट भरूं लागला. असे एकामेकांचे सोईकरितां ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण प्राचीनकाळीं उत्पन्न झाले. तेव्हां प्रत्येक लबाडी करूं लागले. म्हणून प्रत्येक वर्णानें कसें वागावें याचा निर्बंध होण्याकरितां कोणी शास्त्र लिहिलें, त्याजवरून त्याचा बंदोबस्त करूं लागले. परंतु शास्त्रासही लोक मानीनात. तेव्हां राजास नेमणें जरूर झालें. आणि राजाच्यानेंही कारभार नीट चालेना म्हणून राजानें कसें चालावें इत्यादि संबंधी राजनीती झाली. व क्रमाक्रमानें राज्याचे अंमलदार, मंत्री, प्रधान आणि सैन्य हें त्याचे ताब्यांत लोकांचे सुखाकरितां आलें. पुढें दाणे घरोघर पोचवावयाची अडचण पडूं लागली. म्हणून सुवर्ण व रुपें या धातु बहुत मेहनतीनें तयार होतात. त्यांचे तुकडे करून तें द्रव्य चालूं लागलें. येणेंकरून अशी सोय झाली कीं, ज्या ठिकाणीं आपल्यास कांहीं खरेदी करावयाचें असेल तेथें ते तुकडे घेऊन गेले म्हणजे त्याचे बदला जो पाहिजे तो जिन्नस मिळावा. घरोघर गाड्यावर घालून दाणें नेणें जरूर नाहीं. पुढें हे सोन्याचे तुकडे लोक खोटे करून आणूं लागले. तेव्हां राजानें वरती शिक्का करावा असें ठरलें. तेव्हां रुपये व मोहरा चालू झाल्या. याप्रमाणें धर्मशास्त्राचें व नीतीशास्त्राचें मूळ आहे. ईश्वरानें विचार दिला आहे. तेणेंकरून जें वाईट दिसलें तें सर्वसंमतानें काढून टाकिलें व जें चांगलें होतें तें ग्रहण केलें. शास्त्र लोकांचे सुखाकरितां केलें आहे. शास्त्राचा मुख्य हेतू हाच आहे कीं, लोकांमध्यें व्यवस्था व्हावी. ज्यांचें त्यास मिळावें.

कोणाची जबरी कोणावर होऊं नये. मालकी कायम राहावी. प्रजेनें नीट वागावें. राजानें प्रजेचे सुखावर नजर देऊन वसूल घ्यावा. जास्ती घेऊं नये. व खर्च बेतानें करावा. कारण लोकांचे मेहनतीचा पैसा घेऊन राजानें आपले सुखाकरितां व हिताकरितां व डामडौलाकरितां निरर्थक शिपाई व अंमलदार बाळगणें यांजकडे खर्च करणें उचीत नाहीं. व अयोग्य मनुष्यास कामावर न ठेवणें हाही राजाचा मुख्य धर्म होय. तर धर्म म्हणजे जे नियम लोकांकरितां केले आहेत ते, व जी आपली योग्यता त्या योग्यतेप्रमाणें व्यापार करणें म्हणजे ब्राम्हण असल्यास विद्या व शूद्र असल्यास कृषीकर्म करणें हाच धर्म आहे. याप्रमाणें बरोबर चालून प्रतारणा न करणें व कोणास दुःख न देणें हाच मुख्यार्थ आहे. आणि धर्माचें मूळ व शास्त्राचें मूळ विचारानें हेंच कळतें.

लो० हि०



प्रभाकर, ता० १० सप्टंबर १८४८

पत्र नंबर २९

बुद्धीनें ईश्वर किती कळतो त्याविषयीं

ईश्वरानें मनुष्यास ज्ञान दिलें आहे. तेणेंकरून मनुष्याची व जनावराची स्थिती वेगळी दिसते. कारण जनावरें व मनुष्यें एकदम उत्पन्न झालीं असतां जनावरें आहेत तशीं आहेत. कोणी जनावर असें नाहीं कीं, तें पहिल्यानें रानांत राहात होतें व आतां त्यानें गांव वशिवला आहे, किंवा कापड विकूं लागलें आहे. परंतु मनुष्य मात्र दररोज अधिक शहाणे होत आहे. आणि मनुष्याचा मोठेपणा सर्व अकलेवर आहे. जर विचार नसता तर पहिल्यानें जो मनुष्य उत्पन्न झाला, त्याचप्रमाणें अजूनपर्यंत लोक असते. परंतु तसें नाहीं. पूर्वी पाण्यानें काळ मोजीत होते. आतां घड्याळें झालीं. प्राचीन काळीं निरोप पाठवीत होते. पुढें लिहूं लागले. नाना प्रकारचीं शास्त्रें लिहिलीं. पत्रें पाठविण्यास पहिली मुजरद माणसें पाठवीत होते. आतां डांक बसविली. आणि डांकेचाही उशीर समजून वाफेची गाडीही सुलभ रीती काढिली. अशीं मनुष्यें दिवसेंदिवस आपले सुखाची वृद्धी करीत आहेत. हा स्वभाव मनुष्याचा आहे. इतर जनावराचा नाहीं. याचें कारण त्यांस वाचा नाहीं, हेंच बहुतकरून असावें. किंवा त्यांचें मन मनुष्याहून वेगळे रितीचें असेल. मनुष्य बरेंवाईट याचा विचार करणारें जनावर आहे. इतकेंच या जनावराचें लक्षण अधिक आहे. बाकी धर्म इतर जनावरांहून यामध्यें अधिक नाहींत. मरण, जन्म, भक्षण सर्व इतर जीवजंतूंप्रमाणें आहे. तेव्हां मनुष्याचे

ठाईं अक्कल एवढी मात्र अधिक दिसते. हें देणें ईश्वराचें आहे. येणेंकरूनच हें जनावर आपल्या उत्पन्नकर्त्यास जाणतें. आणि सृष्टीकडेस पाहून विचार केला तर ईश्वर आहे हें जाणण्यास अवघड नाहीं. कारण मनुष्याचे ज्ञानास साधनें दोन आहेत. एक इंद्रिय आणि दुसरें मन. इंद्रियाचे धर्म शब्द, रस, रूप, गंध, स्पर्श यांहींकरून जड किंवा अजड याचें ज्ञान होतें. जड म्हणजे पृथ्वी इत्यादिक यांचें ज्ञान नेत्रांनीं होतें. परंतु वायू हा दृष्टीस पडत नाहीं, कारण तो फार पातळ आहे. यास्तव त्याचें ज्ञान स्पर्शेंकरून समजतें. तसेंच उजेडाचें ज्ञान पाहून होतें. कारण त्यास धरावयास शरीर नाहीं. परंतु रूप आहे. तसेंच एक विण्याची तार वाजविली तिच्या जोरानें वायूचा भंग होतो. आणि नाद उत्पन्न होतो. तो नेत्रास व शरीरास समजत नाहीं. कारण त्यास रूप नाहीं. व जडत्व नाहीं. तेव्हां त्याचें ज्ञान कर्णेंकरून होतें. अशी पांच ज्ञानेंद्रियें आहेत. मला वाटतें कीं, हीं पांच इंद्रियें आपल्यास आहेत म्हणून पांच विषयांचें ज्ञान होतें. परंतु आणखी कित्येक इंद्रियें जर असतीं तर दुसरे कित्येक विषयांचें ज्ञान झालें असतें. कारण जितकीं इंद्रियें तितकेंच ज्ञान. जो बहिरा किंवा आंधळा आहे त्याला चार विषयांचें ज्ञान मात्र होतें. रूपाचें किंवा नादाचें ज्ञान होत नाहीं. कदाचित एक सहावें इंद्रिय मस्तकास किंवा आणखी कोठें असतें, तर कोणत्या पदार्थाचें किती वजन आहे हें किंवा दुसरें कांहीं पाहिल्यानें व त्याचे चलनानें कळलें असतें, असे कित्येक चमत्कार या सृष्टींत आच्छादित असतील. परंतु पंचेंद्रियमनुष्यास ते ठाऊक नाहींत. असो, तेव्हां हे पांच विषय पांच इंद्रियेंकरून कळतात हें उघड दिसतें. या पांच इंद्रियांचा राजा मन आहे. त्याचा विषय काय याचा विचार केला असतां असें दिसतें कीं, अनुमान करणें हें त्याचा विषय आहे. जसें आपण व्याघ्राची वाणी ऐकिली म्हणजे कानांनीं शब्दाचा मात्र ग्रह झाला. परंतु हा शब्द कोणाचा याची कल्पना मन करतें. आणि मागील गोष्टी ज्या पाहिलेल्या आहेत, त्या एकत्र करून तर्क करितें कीं, हा व्याघ्राचा शब्द आहे. हा तर्क चालविणें मनाचा व्यापार आहे. परंतु हा मनाचा तर्क चालण्यास कांहींतरी दरम्यान पदार्थ पाहिजे. तेणेंकरून तर्क चालतो. जर मध्यें कांहीं पदार्थ नसेल तर मनाचा व्यापार बंद होतो. कारण मन जरी विशाल व अति शीघ्रगती आहे, तत्रापि तें देहामध्यें कैदेंत आहे. मनुष्यानें देह टाकल्यावर त्याचे मनास जसा व्यासंग असेल आणि कर्माचा अभ्यास असेल तशी गती होईल. पिशाच्च इत्यादिक होतात, हे तरी पापकर्में करून आपले मनास दूषित करितात. देह हा मनास आणि जीवास तुरुंग आहे. या स्थूळाचे कारणानें त्याच्या शक्ती आखडल्या आहेत. मनावांचून इंद्रियांचे विषय ग्रहण होत नाहींत. व इंद्रियावांचून मनाचे विषय ग्रहण होत नाहींत. जेव्हां इंद्रियें पदार्थ पाहातात तेव्हां पुढें मनाचा तर्क चालतो. ईश्वर आहे किंवा नाहीं, याचा सिद्धांत करण्यास मन उपयोगी पडतें. या अद्भुत जगताकडे पाहिलें म्हणजे तर्क चालूं लागतो. परंतु तर्केंद्रियाचे (तर्क इंद्रियाचे) पाठीमागून चालतो. इंद्रियें जेथपर्यंत जातात त्याचे

पलीकडे मनाची उडी पडते. जेव्हां मनुष्य सृष्टी पाहातो, तेव्हां त्याचे दृष्टीस एक शेत पडलें अशी कल्पना केली तर रंगरूप इंद्रियांनीं व्यक्त झालीं. आणि मनानें इतकें सुचविलें कीं, इतका क्रम कर्त्याविना झाला नाहीं. तेव्हां शोध केला, तो एक मनुष्य सांपडला. त्यास पुसलें कीं, हें शेत कसें झालें. त्यानें सांगितलें, बीं पेरलें होतें त्याजमुळें झालें. तेव्हां आम्हीं बीं पेरून पाहिलें तों बीं पेरिलें असतां उगवतें. हा नेम सृष्टीचा आहे. हें संयोगाचें फळ आहे, असें कळलें. पण एक कल्पना राहिली कीं, मृत्तिका आणि बीज या जड पदार्थांचा योग झाला असतां उगवण्याचें कारण काय? यांस उगवितो कोण? जर यास कर्ता नाहीं तर बीं, पाणी आणि मृत्तिका एकत्र राहावीं. त्यास अंकूर फुटूं नये, असें आहे. हे तिन्ही पदार्थ स्वस्थ कां राहूं नयेत? जर यास कांहीं चौथें कारण नाहीं तर त्यांणीं स्वस्थ असावें. जर सृष्टीस कर्ता कोणी नसता तर हे पदार्थ न उगवते. जसें एक घड्याळ आहे, त्याचे आंतील सर्व भाग वेगळाले काढून एका भांड्यांत ठेविले तर त्यांचा संयोग करणारा असल्याखेरीज त्याचें घड्याळ व्हावयाचें नाहीं. असें हें जगाचें महान घड्याळ कर्त्यावांचून मृत शरिरासारखें नासलें-कुजलें असतें, परंतु तसें नाहीं. त्याचा क्रम व जीवजंतूच्या आयुष्याच्या मर्यादा इत्यादि कर्त्यास सुचवितात. आणि प्रत्येक पदार्थ पाहिला म्हणजे ईश्वराची मूर्ती दिसते, आणि त्याची युक्ती आणि पराक्रम विदित होतात. आणि हे व्यक्त पदार्थ पाहून त्यांचें कारण तोच ईश्वर आहे, असें दिसतें. परंतु ईश्वर हा निष्कारण आहे; कारण तो अव्यक्त आहे. जर व्यक्त होऊन त्याचें स्वरूप कळलें, तर त्याजविषयीं आम्ही कल्पना करूं; परंतु ईश्वर प्रत्यक्ष दिसत नाहीं. ज्ञानेंकरून मात्र गम्य आहे. तेव्हां त्याचे कारणाचा तर्क होत नाहीं. कारण पदार्थ व्यक्त असल्यावांचून तर्क व बुध्धी चालत नाहीं. जसा एक चितारी आहे. त्याणें कलम हातांत घेतलें आणि तो चित्र काढूं लागणार, तेव्हां त्याचे मनांत आलें कीं, मी आतां चित्र काढीन. परंतु तें कसें येईल आणि त्यानंतर त्याजहून आणखी चांगलें येईल कीं नाहीं. ही जर कोणी कल्पना करूं लागला तर चालणार नाहीं. कारण एक चित्रापर्यंत तर्क त्या कलमावरून आणि चितारी त्याजवरून चालेल कीं, हा संयोग झाला आहे. म्हणजे एथें रंग आहे. शाई आहे. त्यापेक्षां चित्र काढणार हें तर्कास आलें. व रंग चांगले व कलमें चांगलीं याजवरून उत्तम चित्र काढायाचा हेतू आहे असें समजलों. परंतु जर कोणी म्हणेल कीं, पहिल्यानें चित्र काढील त्याच्याहून दुसरें चांगलें येईल कीं नाहीं? तर कोणाचा तर्क चालेल काय? जेव्हां पहिलें चित्र पाहिलें, तेव्हां त्या व्यक्त पदार्थावरून दुसऱ्याचा तर्क होईल. परंतु अव्यक्त पदार्थाविषयीं तर्क करण्यास मनास शक्ती नाहीं. यास्तव ईश्वराचें कारण नाहीं, असें झालें. मनुष्यास तो अनादी आहे. आतां त्याची शक्ती पाहिली तर हा सर्व जगाचा कारखाना त्याचा आहे. तेव्हां सूर्य, चंद्र, पृथ्वी, पाणी, विस्तव इतक्यांचा कर्ता तो आणि जागोजाग त्याची युक्ती पाहातां मनुष्याच्या मनास शक्ती आहे, का त्या

वाहेर ईश्वराची शक्ती आहे. कारण मनुष्याच्यानें मोजवणार नाहीं. जेव्हां ईश्वर आहे, असें कळलें व तो पराक्रमी आहे इतकें ज्ञान अल्पमती मनुष्यास झालें, त्याजवरून त्याचें पूजन आणि भजन इत्यादि निघालें. धर्ममार्ग निघाला. त्याचें भय उत्पन्न झालें. परंतु ईश्वर आहे, आणि तो महान पराक्रमी आहे; त्याचे शक्तीस दुसरें कांहीं तुल्य नाहीं असें मात्र कळतें. यापलीकडे कांहीं कळत नाहीं. जे कोणी भयाकरितां व लोकांस नीतीनें वागण्याकरितां सांगतात कीं, एकवीस नर्क आहेत. ते सर्व भयाकरितां आहेत. तत्रापि खोटें म्हणवत नाहीं. जें जें ईश्वरास म्हणावें तें त्यास योग्य दिसतें. कोणी म्हणेल कीं ईश्वर असें करितो तर तें खरें म्हटलें पाहिजे. कारण कीं तो अत्यंत पराक्रमी व अनादि आहे तेव्हां त्याचें महात्म तसेंच आहे. परंतु जे विचारास येत नाहीं तें मात्र मत मान्य करूं नये. नाहींतर ईश्वरास सर्व शोभतें. मग कोणाची जिव्हा व कोणाची बुध्धी ही कशींही वदो; परंतु चांगलें मात्र असावें. आणि ईश्वराचे अगम्य बुध्धीपासून सर्व धर्म उत्पन्न झाले. याहून जाजती ईश्वराचें कांहींएक कळत नाहीं. वेदांत व शास्त्रांत दोन शब्दांनीं ईश्वराचें वर्णन केलें आहे. म्हणजे 'तत् सत्' या शब्देंकरून सृष्टीहून वेगळा असें दर्शविलें. म्हणून दूरदर्शित सर्वनाम घातलें आणि दुसरा शब्द "सत्" आहे. म्हणजे अस्तिक्यवाक्यभाव हें वर्णन बरोबर, खरें आणि विचारयुक्त आहे. याजवरून हजारो पुराणीक कोणी म्हणतो नारायण क्षीरसागरांत होता, कोणी म्हणतो वैकुंठांत होता. अशीं नाना प्रकारचीं वर्णनें आहेत. तीं खरीं आहेत, आणि खोटीं आहेत. कारण ईश्वर सर्वत्रच आहे, परंतु या सर्वांहून त्या दोन शब्दांनीं जसें ईश्वराचें सत्य स्वरूप वर्णन झालें, तसें कोठेंही नाहीं. बाकीचीं वर्णनें ज्यांचीं मनें अजाणी आहेत, त्यांस उपयोगी; परंतु वास्तविक तें आहे म्हणजे या सृष्टीहून महत्कारण वेगळें आहे, इतकें जाणतो. कसें आहे? काय आहे? याचें वर्णन पुराणांत सांगितलें आहे कीं, ब्रम्हदेव प्रथम पुरुष निर्माण झाला आणि विचार करूं लागला, तों गडप झालें. तेव्हां तें आहे ही श्रुती म्हटली. एणेंकडून तात्पर्यार्थ सांगितला. मला वाटतें कीं, ब्रम्हदेव म्हणजे विचार हा ईश्वराचा शोध करितांकरितां घोटाळ्यांत पडला आणि ईश्वर तर सर्वत्र आहे. एक गोष्ट आहे कीं, नानक शीक लोकांचा गुरू. हा एके दिवशीं पश्चमेस पाय करून निजला होता. तों फकीर लोक तेथें आले. त्यांणीं पुसलें कीं, "अरे, पश्चमेस ईश्वराचें स्थान मक्का आहे. तिकडे तूं पाय कां ठेवितोस? त्याणें उत्तर दिलें कीं, "मी हिंदू नाहीं व मुसलमानही नाहीं. मी विचाराचे धर्मानें चालतों. तुम्हांस जिकडे देव नाहीं असें दिसत असेल तिकडे माझे पाय उचलून ठेवा. तुमचा शास्त्रार्थ मला समजत नाहीं. असें बोलतांच ते फकीर विरस झाले आणि नानकाचा धर्म कबूल करते झाले.

लो० हि०

प्रभाकर, ता० ८ आक्टो० १८४८

पत्र नंबर ३०

स्त्रियांची स्थिती

सांप्रतकाळीं हिंदू लोकांचे स्त्रियांची अव्यवस्था व दुर्दशा फार आहे. स्त्रिया पुरुषांवर अंमल करीत असतात. व त्यांचे स्वभावाप्रमाणें बहुत लोकांस वागावें लागतें. त्यांचे गुण लहान मुलांस प्राप्त होतात. त्याजमुळें स्त्रिया शाहाण्या असणें जरूर आहे. ज्या देशांत स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहींत, त्या देशांत लोकांची स्थिती वाईट असते. हिंदु लोकांत फारच मूर्खपणा आहे. यास्तव स्त्रियांची दुर्दशा फार आहे. प्राचीन-काळीं असें नव्हतें. कारण मागील काळचे कथेवरून पाहिलें असतां असें दिसतें कीं, पूर्वी हिंदु लोकांत स्त्रियांचा मान फार होता. हल्लीं लग्नांत स्त्रिया पुढें चालतात. व मागें पुरुष असतात. व पुण्याहवाचन वगैरे धर्मसंबंधी कांहींएक कर्म स्त्रीबरोबर बसल्यावांचून होत नाहीं. याजवरून स्त्रियांचा प्रमुखपणा मानला आहे, असें दिसतें. राज्याभिषेकामध्येंही राणीस मान फार आहे. आतां ब्राम्हणांच्या समजुती आहेत, तशा पूर्वी असत्या तर शास्त्रांत प्राचीन ब्राम्हण असें न लिहिते. तेव्हां आतां स्त्रियांचा अपमान होण्यास कारण काय, याचा शोध लाविला असतां असें दिसतें कीं, हिंदुस्थानांत इंग्रेज येण्याचे पूर्वी मुसलमान आले, त्यांस सांप्रत ८ शें वर्षें झालीं. तेव्हां त्या लोकांच्या रानटी चाली फार होत्या. त्या सर्व हिंदू लोकांस लागल्या. म्हटलें आहे कीं, "यथा राजा तथा प्रजा." व "राजा कालस्य कारणं" असें भारतांत आहे. हिंदू लोकांच्या सुंदर स्त्रिया पाहून मुसलमान जबरीनें घेऊन जात. याजमुळें स्त्रियांस झांकून ठेवणें जरूर झालें व मुसलमान लोक फार मूर्ख आहेत. त्यांची चाल जनानखाना तुरुंगासारिखा असावा अशी आहे. तीच चाल हिंदु लोकांस लागली आहे. मुसलमान लोक यांचें राज्य पांचशें वर्षें हिंदुस्थानांत चाललें. त्यामध्यें हिंदु लोकांची स्थिती फार बदलली. भाषा बदलली. फारशी शब्द चालू झाले. जमाखर्च, हिशेब, गाणें, रीतीभाती सर्व मुसलमानांच्या चालू झाल्या. पूर्वी संस्कृत सनदा देण्याची चाल होती. ती जाऊन फारसी सनदा देऊं लागले. पेशव्यांचें राज्य होतें तरी त्या वेळेस हिंदु लोकांस मूळचे स्थितींत आणावयाचा प्रयत्न कोणीं केला नाहीं. जाजती जाजती घसरतच गेले. हिंदु लोक ताबुद करूं लागले, फकीर होऊं लागले, धर्मभ्रष्ट झाले. त्याजमुळें हिंदु लोक स्त्रियांचा अपमान करून त्यांस जनावराप्रमाणें मानूं लागले. पूर्वी रामाबरोबर सीता सभेंत बसत होती; पांडव द्रौपदीसहित बसत होते; पण लोकांचीं मनें आतां इतकीं बिघडलीं आहेत कीं, जर त्यांस हें सांगितलें तर ते देव होते, असा जबाब देतात. परंतु असें लक्षांत आणीत नाहींत कीं, तीं माणसेंच होतीं. देवानें अवतार घेतले तरी माणसांचे चालीप्रमाणें ते वागले. तेव्हां त्या वेळच्या मनुष्याच्या

चाली तशाच होत्या. त्याप्रमाणें आतांही चालावयास चिंता नाहीं. आणि हिंदू लोकांच्या मूळच्या चाली त्याच आहेत. परंतु हल्लीं त्यांस ही गोष्ट मोठी वाईट वाटते. व इंग्रेज लोकांत स्त्रियांचा मान ठेवण्याची चाल आहे, हें त्यांस मोठें आश्चर्य वाटतें. व ते म्हणतात कीं, हा फार निर्लज्जपणाच व्यभिचारवृद्धीचें कारण आहे. परंतु हिंदू लोकांस शाहाणपण नाहीं. व त्यांचें मन हल्लीं मूर्खपणानें, दुष्टबुध्धीनें व वाईटपणानें इतकें भरलें आहे कीं, तें शुध्ध होण्यास हिंदुस्थानांत ज्ञानाची फार प्रसृती झाली पाहिजे व लोक सुधारले पाहिजेत. व पूर्वीचे मूर्ख वृध्द लोक आहेत ते सर्व मेले पाहिजेत. जेव्हां नवीन प्रजा शहाणी व पुष्कळ होईल, तेव्हां लोकांच्या रीतीभाती बदलून चांगल्या होतील, यांत संशय नाहीं. परंतु त्यांस कितीएक वर्षें पाहिजेत. ज्ञान म्हणजे काय, हें लोकांस ठाऊक नाहीं. इंग्लंडांतील थोरली सनद, पार्लमेंट, फराशिस यांची राज्यक्रांती, रूमचे राज्याचा नाश, अमेरिकाखंडांत युरोपियन लोकांची वस्ती, लोकसत्तात्मक राज्य, या शब्दांचा अर्थही बहुत हिंदू मनुष्यांस ठाऊक नसेल. हे इतिहास इकडे प्रसिध्ध होण्यास बहुत दिवस पाहिजेत. हल्लीं ज्यांस लिहितांवाचतां येतें ते शाहाणे. र, ट, फ करतां येतें ते बोलणारे. व दंगा लूट झाली म्हणजे ती राज्यक्रांती, इतकें या देशांतील लोकांस ठाऊक आहे. पृथ्वीवर काय आहे व लोक कसे आहेत याविषयीं त्यांस कांहीं कळत नाहीं. पुराणीक एक पोथी सोडून बसला म्हणजे सगळे आनंदानें डोलतात. व रावणास दाहा डोकीं, सहस्रार्जुनास हजार हात, पृथ्वीचा अंत नाहीं, उत्तर समुद्राचा ठिकाण नाहीं, दुधाचा व दह्याचा समुद्र आहे व पृथ्वीवरील कांहीं देशांत घोडमुखी माणसें आहेत, इत्यादि गोष्टी ऐकिल्या म्हणजे सर्व अनंदानें डोलतात. बायका फार खुष होतात. व पुरुष म्हणतात कीं, आम्हीं आज मोठें ज्ञान संपादन केलें. त्यांस असें ठाऊक नाहीं कीं, चमत्कारीक परंतु या खोटसाळ गोष्टी दाहा पांच हजार वर्षांपूर्वी लिहिल्या गेल्या आहेत. तर हल्लीं पृथ्वीची स्थिती कशी आहे, व तिजवरील राजे कसे आहेत व समुद्र कसा आहे व लोक कसे आहेत याचा विचार केला पाहिजे, म्हणजे खरें ज्ञान वाढेल. केवळ लहानपणचा आंगरखा व मोठेपणचा आंगरखा सारखा नाहीं. तेव्हां त्यास व वाल्मीक यांणीं ग्रंथ लिहिले, त्यापुढें अलीकडे कोणी ग्रंथ लिहिले नाहींत. व शोध केला नाहीं. तेव्हांपासून हिंदू लोक स्वस्थ निद्रेंत आहेत. त्यांची बुध्धी पुढें चालण्याची बंद झाली. परंतु इंग्रज वगैरे लोक यांणीं उद्योग चालविला व त्यांणीं नवीन ग्रंथ पुष्कळ केले ते पाहिल्यावांचून हे लोक समजणार नाहींत. मागील पेशवाईतील जे शहाणे आहेत ते म्हणतात कीं, त्यांत आहे काय ? इंग्रजांचा लाभकाळ होता म्हणून हे इकडे आले. त्याजवळ आमच्यापेक्षां जाजती शाहाणपण कांहीं नाहीं. त्यांस जर कोणी वेडें म्हटलें तरी त्यांस फार राग येतो आहे. ते उत्तर करतात कीं, आम्हीं पेशवाईत लाखो रुपये मिळविले व फौजा बाळगल्या त्या आम्हीं मूर्ख म्हणून बाळगल्या नाहींत. आणि आतांचे लोक नवीन ज्यांस कांहीं ठाऊक नाहीं ते आम्हांस वेडे म्हणतात, यास काय म्हणावें ? आमचें नशीब

असतें तर आम्हांस कोणी वेडे म्हणते ना. परंतु आमचें नशीब वाईट म्हणून आमची शहाणपणें अदृश्य झालीं आहेत, असे ते म्हणतात. परंतु वास्तविक पाहिलें तर पहिले जुने लोक आहेत, ते शुध्ध बैल आहेत. त्यांस खाण्याचें व पिण्याचें मात्र ज्ञान आहे. व ते जनावरासारखें कर्म करतात. परंतु माणसासारखें कांहीं करीत नाहींत. व त्यांस कांहीं ठाऊक नाहीं. मोठ्या प्रकरणांत तोंड घालावयाची देखील त्यांस योग्यता नाहीं. व इंग्रज कोठले हें कांहीं त्यांस ठाऊक नाहीं. व इंग्रजांनीं आलीकडे ज्ञान किती वाढविलें आहे, याची त्यांस खबर नाहीं. अन्नवस्त्रें इतक्यापर्यंत त्यांची समजूत आहे. जास्ती कांहीं नाहीं. जेव्हां सगळे मूर्ख होते, तेव्हां त्यांतच ते पराक्रमी झाले. परंतु आता नवीन मंडळींत ते मूर्खासारखे दिसतात. कारण कीं, इंग्रजांचे योगानें हिंदुस्थानांत बहुत प्रकारचें ज्ञान वाढलें आहे. व तें ज्याणें संपादलें त्यासच त्याची गोडी, इतरांस नाहीं. तेव्हां या जुन्या मंडळीचा गर्व व्यर्थ आहे. त्यांणीं असें समजावें कीं, आम्हीं शहाणे असें म्हणून नवीन लोकांची निंदा करूं नये. कारण कीं, त्यांची अक्कल आतां सर्व उजेडास आली. व ते पूर्वीं लंगड्या गाईत वासरूं प्रधान म्हणून शाहाणे होते, परंतु आतां नाहींत. त्यांजमध्यें पराक्रम, विद्या व शौर्य नाहीं. लिहिण्यावाचण्याची भ्रांती. प्रवास ठाऊक नाहीं, परदेश ठाऊक नाहीं व लढाईची कळा ठाऊक नाहीं. मग त्यांणीं गर्व कशास करावा ? हल्लीं पुण्यांत जे गृहस्थ आहेत, त्यांचे अवस्थेचा विचार व त्यांचें शाहाणपण पाहिलें म्हणजे सर्व हिंदू लोकांचा वृत्तांत कळतो. असा कोणी मेला म्हणजे त्याचे नांवें वृषोत्सर्ग सोडतात, तशी मराठ्यांची राजधानी गेली, आणि बाजीरावाचे नांवाचे इंग्रजांनीं पोळ सोडिले. म्हणजे इंग्रजांनीं कोणास जाहागिरी व कोणास पेनशनें दिलीं आहेत. तीं ते खातात आणि पोळासारिखे फिरतात. याचप्रमाणें सर्व हिंदू लोकांची ज्या ज्या ठिकाणीं संस्थानें आहेत व जेथें ब्राम्हणांस खाण्याची सोई आहे, तेथें असेंच आहे. पहा ! लोक किती धुंदींत आहेत ! किती आपले ठिकाणीं गर्वांत आहेत ! राज्यांत काय होतें याचा त्यांस ठिकाण नाहीं. सांप्रत पुण्यांत पुस्तकगृह आहे, परंतु त्यांत कोणी जुन्या लोकांपैकीं किंवा ज्याजवळ खाण्यापुरता पैका आहे तो येत नाहीं. असे आलीकडील ब्राम्हण आहेत. कोणास ज्ञानाची आस्था आहे, असें नाहीं. मग इतर लोकांची अवस्था काय पाहावयाची आहे ! अशा समई स्त्रियांची अवस्था सुधारणें अवघड आहे. बहुतकरून आणखी दोनशें वर्षें, निदान शंभर वर्षें तरी पाहिजेत. तेव्हां हे लोक जागृतींत येतील. आतां जे लोक आहेत, त्यांच्या दोनचार पिढ्या झाल्या पाहिजेत व ज्ञान वाढलें पाहिजे. पुरुष शहाणे झाले म्हणजे अर्थातच स्त्रिया शाहाण्या व ज्ञानी होतील. अल्पवयांत लग्न आणि जन्मपर्यंत विधवा राहाणें या दुष्ट चाली मोडल्याखेरीज कांहींएक सुधारणा व्हावयाची नाहीं.

लो० हि०

ता० १५ वी, आ० १८४८

पत्र नंबर ३१

इंग्रजी विद्या

पुणेंशहरांत प्रथम १८३२ सालीं इंग्रजी शाळा घातली तेव्हां लोकांची अशी समजूत होती कीं, इंग्रजांचा स्पर्श झाला तर स्नान करावें व इंग्रजांची भाषा शिकली तर ब्राम्हणपणा जातो. याजमुळें त्या समई राबर्टसनसाहेब कलेक्टर यांणीं आर्जवानें गृहस्थांचीं मुलें थोडींशीं जमविलीं. नंतर कांहीं दिवसांनीं पुष्कळ लोकांच्या समजुती बदलल्या आणि खुशीनें मुलें पाठऊं लागले. परंतु पहिल्या समजुतीचे ब्राम्हण अद्यापि बहुत आहेत. त्यांच्यानें लोकांस इंग्रजी शिकण्यापासून तर बंद करवत नाहीं. परंतु आपल्या मंडळींत ते असें बोलतात कीं, "जे इंग्रजी शिकले आहेत ते नास्तीक, निर्दय, अधर्मी, अमर्याद आहेत. परंतु त्यांची योग्यता पाहिली तर ते केवळ मूर्खांचे शिरोमणी आहेत. जरी त्यांस लिहितां वाचतां येतें, तरी ते पंडीत नाहींत. त्यांची समजूत इतकी क्षुद्र आहे कीं, लिहिणें आणि वाचणें ही तमाम विद्या. यापुढें त्यांस कांहीं कळत नाहीं. तत्रापि त्यांस वाटतें कीं, आम्ही सर्वज्ञ आहों." आतां असे गर्विष्ठ मूर्ख लोक आहेत, त्यांस उत्तर देणें योग्य नाहीं. कारण कीं, शुद्ध वेड्याशीं वाद करणें निर्फळ आहे. जरी माझें म्हणणें असें नाहीं कीं, केवळ इंग्रजी लिहितात आणि बोलतात ते विद्वान. असें मीं म्हणत नाहीं. कारण कीं, जे कुळकर्णी असतात ते लिहितात. त्यांस पंडीत कोणी म्हणावें? तसें जे केवळ रायटरच आहेत, त्यांस विद्वान म्हणणें अयोग्य आहे. परंतु ज्यांनीं विद्येचें रहस्य जाणलें आहे व बहुश्रुत आहेत त्यांचा मात्र पक्ष आम्ही घेतों. आणि आम्हांस ठाऊक आहे कीं, एक इंग्रजींतील विद्वान आणि शंभर संस्कृतांतील पंडीत आणि एक लक्ष कारकून व दोन लक्ष भट हे सारखे कदाचित होणार नाहींत. भटांचें वर्णन पूर्वी आम्हीं केलें आहे. हल्लीं कारकुनांचें थोडेंसें करितों. ब्राम्हण लोक कारकुनीचा धंदा फार करितात, आणि गृहस्थ म्हणवितात. परंतु वास्तवीक पाहिलें तर, यांस कळतें काय? संध्येचीं अक्षरें साळुंखी-सारखीं किंवा राघूसारखीं पाठ करितात. मोडीचें लिहितात वाचतात. साधारण कामकाज कारकुनीचें करतां येतें; परंतु हे मोठे प्रतीचे मजूरदार. जसे सुतार, नाहावी, धोबी तसेच ब्राम्हण कारकून, यांत त्यांचा विद्वानपणा कांहींच नाहीं. हजारों कारकून आहेत. परंतु एकानें एक ग्रंथ तरी जन्मादारभ्य रचला आहे? शहाणपणाची गोष्ट बोलण्यास एक क्षण घालविला आहे? असे शुंभ जे आहेत त्यांची योग्यता किती? ज्यानें चार शास्त्रें अध्ययन केलीं आहेत, त्याची देखील योग्यता इंग्रजींतील पंडिताशीं बरोबर नाहीं. कारण कीं, मुळीं आर्धी संस्कृत भाषेंत ग्रंथ आहेत किती? ग्रंथांचे संख्येवरून विद्येची तुलना होते, हा नेम आहे. सर्व पुस्तकें जर जमा केलीं, तर फार झालें तर एक

कोठडी भरेल. तेव्हां तितकीं ज्यानें वाचलीं किंवा अवलोकन केलीं, त्यांचें शहाणपण सारखें कसें होईल? जितकें बीज तितकें पीक. ज्यानें पावलीभर दाणे पेरले आणि ज्यानें खंडीभर पेरले त्याचें उत्पन्न सारखें कसें होईल? इंग्रजीमध्यें तर कोट्यावधी ग्रंथ आहेत. त्यांत अनेक विद्या आहेत. तितक्या संस्कृतांत नाहींत. चौदा विद्या आणि चौसष्ट कला इतकी संख्या जेव्हां हिंदू लोक फार शहाणे व पराक्रमी व विद्येवर लक्ष देणारे होते व जेव्हां व्यास वाल्मीक होते, तेव्हां इतकी गणना झाली आहे. परंतु इंग्रजींत एक हजार विद्या आहेत. प्रत्येक विद्येवर हजारोंच ग्रंथ आहेत. संस्कृतांत कांहीं विद्या इतक्या सूक्ष्म आहेत कीं, एक विद्येवर एक ग्रंथ, जसा युद्धविद्येवर धनुर्वेद, दुसरा ग्रंथ नाहीं; व धनुर्वेदही नाहींसा झाला. कोणी वाचीन म्हणेल तर मिळावयाचा नाहीं. आणि इंग्रजींत जसे म्हटले तसे आहेत. याचें कारण संस्कृतांतील विद्येचे चाहाणारे ब्राम्हण होऊन गेल्यास दोन तीन हजार वर्षें झालीं. तेव्हांपासून ब्राम्हण मूर्ख झाले. विद्या म्हणजे काय हेंदेखील विसरले. त्या शब्दाचा अर्थही त्यांस कळत नाहीं. आणि जसे हिंदू लोक व्यासाचे वेळेस विद्याप्रवीण होते तद्वत इंग्रज आतां आहेत. त्यांचें चित्त विद्येवर फार व ते ज्ञानी बहुत झाले. व त्यांचे ग्रंथ फार उपयोगी आहेत. हिंदू लोकांचे ग्रंथ जेवणावळीचे आहेत, तर इंग्रजी पंडित तो संस्कृतांतील पंडिताशीं सारखा कसा होईल? अशी जेव्हां पंडिताची गती तेव्हां कारकून आणि भट हे काय पदार्थ; हे तर कसपटें दिसतात. जो इंग्रजींतील पंडीत आहे, त्यास किती विद्येचें ज्ञान असतें? त्याची समजूत केवढी विस्तीर्ण आणि त्याचा विद्वानपणा केवढा? त्याची योग्यता लोक समजत नाहींत. त्यास दूषण लाविताते. इंग्रजींतील विद्वानाची अशी योग्यता आहे कीं, त्यास कोणताही विषय सांगा, त्याविशीं तो ग्रंथ लिहूं शकेल. कोणत्याही विषयावर बोलूं शकेल. जें जें या पृथ्वींत आणि आकाशांत आहे तें सर्व त्यांस ठाकठीक दिसतें. आणि चंद्र फिरतो याचें आश्चर्य त्यांस वाटत नाहीं. दगड वरती उडविला म्हणजे खालीं पडतो याचें देखील कारण त्यांस माहित आहे. तात्पर्य त्यांस कोणत्याही विषयीं आश्चर्य वाटत नाहीं. कारकून हे भटाचे पंक्तीचे आहेत. मूळ हिंदू लोकांमध्यें विद्येचें मान इतकें कमी आहे कीं, त्यास विद्या म्हणजे काय हें अश्रुत आहे. जर कोणाची विद्या वर्णन करणें झाल्यास म्हणतात कीं, अमका केवढा शहाणा! पत्र लिहितो. मजकूर जुळून लिहितो. अक्षर चांगलें सुंदर. आतां हें कांहीं विद्वानाचें वर्णन झालें नाहीं. विद्वान म्हणजे काय, ज्याची बुद्धी विशाळ, ज्यानें नवीन ग्रंथ ऋषींसारखे लिहावे, ते विद्वान. हल्लीं गृहस्थास यांतील कांहीं ज्ञान नाहीं, त्यास धर्म म्हणजे काय याचा अर्थ पांच हजार कारकून गोळा केले आणि पुसला तर सांगू शकणार नाहींत. व संध्या कशाकरितां करितात, हेंही कोणास ठाऊक नाहीं. असे आंधारांत जे लोक आहेत त्यांस विद्येचें मूळ काय ठाऊक? इंग्रजी विद्वान पूर्वी हिंदुस्थानांत एक असता तर राज्य न जातें. हे भट कारकून असे मूर्ख जमा झाले, म्हणूनच हें राज्य

बुडालें. जर विद्या पहिल्यासारखी असती, तर हिंदु लोकांची अशी अवस्था न होती. परंतु हीं जनावरें पाहिजे तेथें दोरीनें बांधावीं अशीं गरीब, म्हणून असें झालें. पुढें जरी हिंदू लोकाचें कल्याण झालें तर इंग्रजी पंडितांचे हातून होईल यांत संशय नाहीं. कारकून व भट हे क्षीण झाले म्हणजे व इंग्रजी विद्या वृद्धिंगत झाली म्हणजे हिंदू लोक पूर्व स्थितीवर येण्यास उशीर नाहीं. हल्लींचे गृहस्थ व इंग्रजी शिकणारे विद्वान यांचें वैमनस्य असण्याचें कारण असें आहे कीं, त्यांचीं यांचीं मतें मिळत नाहींत. कारकुनास असें वाटतें कीं, आंगरखा घालणें व गंध लावणें व अणीचा जोडा घालणें हाच आमचा धर्म. तसें इंग्रजी विद्वानास वाटत नाहीं. कारण कीं, हे ज्ञानी आहेत. तेव्हां यांचीं मतें वास्तवीक आहेत. ते म्हणतील डावे हातानें गरीबास पैसा दिला तरी सारखाच, उजवे हातानें दिला तरी सारखाच. परंतु कारकुनास वाटतें कीं, ज्या हल्लीं चाली आहेत तोच धर्म. चाली आणि रीती व धर्म यांचा भेद त्यांस कळत नाहीं. चालीस व रीतीस व धर्मास सारखेच मानतात. कारण ते अक्षरशत्रू आहेत. व चालीविरुद्ध कोणी बोलेल तर त्यास नास्तीक म्हणतात. नास्तीक म्हणजे काय हेंही त्यांस कळत नाहीं. परंतु ऐकीव शब्द माहित आहेत. तसेंच निर्दय म्हणण्याचें कारण असें आहे कीं, गरिबास व विद्वानास धर्म करावा तें जाऊन दुसऱ्यास देणें यास धर्म समजतात. शहाणे आहेत ते तसें करीत नाहींत म्हणून त्यांस असें वाटतें कीं, हे निर्दय आहेत. जो विद्वान आहे तो गरीबास धर्म करितो, परंतु ब्राम्हण, कारकून व भट यांच्या अशा समजुती आहेत कीं, दांडग्या व मूर्ख भटास धर्म करावा. अधर्मी म्हणतात कीं, याचें कारण असें आहे कीं, धर्म म्हणजे काय तें यांस कळत नाहीं, म्हणून असें म्हणतात. वास्तवीक पाहिलें तर इंग्रजी विद्वानाप्रमाणें मला धार्मिक कोणीच दिसत नाहीं. तो अनुभवेंकरून व ज्ञानें-करून ईश्वराचें प्रतिपादन करितो. सर्वत्र तो आहे, असें त्यास वाटतें. त्यांस सर्वत्र ईश्वर दिसतो. ते त्याचे भजनांत तत्पर असतात व जें कर्म करितात तें सर्व ईश्वरार्पण करितात व त्याची स्तुती करून कायावाचामनेंकरून ईश्वरास भजतात. कारण कीं, इंग्रजींत ईश्वराविषयीं अनेक ग्रंथ आहेत. व इतर देशांतील जें सर्व ईश्वरी ज्ञान आहे, तें सर्व इंग्रजींत आहे. व त्या ग्रंथांचे तर्जुमे त्या भाषेंत आहेत. याजमुळें शंभरपट जास्ती ज्ञान इंग्रजींत आहे. आणि अमर्याद म्हणण्याचें कारण असें आहे कीं, हिंदू लोकांची त्यांत कारकून व भट यांची मुख्यत्वेंकरून अशी चाल आहे कीं, गुलामगिरी करावी. लबाडी करावी. तोंडदेखलें बोलावें. खुशामत करावी. दुसऱ्यास बुडवावें. उगीच या बसा इत्यादि फसविण्याकरितां मानपान करितात. आणि त्यास मर्यादा असें म्हणतात. परंतु ही मर्यादा नव्हे. वास्तविक ज्ञानी आहेत ते लबाडीचा व्यवहार करणार नाहींत. व गुलामाप्रमाणें कोणाची मर्यादा करणार नाहींत. ते खरेपणानेंच बोलणारे त्यांस हें कपट कशास पाहिजे ? कारकून हे बहुधा भडवेपणांत असतात. जसा वरिष्ठ असेल व तो बोलेल, तसें बोलावें. कोणीकडून तरी आपलें पोट भरावें. लाज राहू न राहू, ईश्वराचें नांव तर

त्यांचे मनांत मुळींच नाहीं. ईश्वर आहे याची खात्री असेल तर त्याचें भय मानतील. बहुधा हिंदु लोकांमध्यें मर्यादा हा गूण नाहींच. कपटाशिवाय कोणाची कोणी मर्यादा करित नाहींत. एकादा मोठे कामावर असला म्हणजे त्यास पुष्कळ लोक चांगले म्हणतात. मेजवान्या करितात; परंतु तें सर्व मायावी, मनापासून नाहीं. परंतु जे विद्वान आहेत, त्यांचा स्नेह, मर्यादा आणि माया ही अशी नसते. ते निष्कपटानें, निर्मळ अंतःकरणानें वागणारे असतात. यामुळें लोकांस अमर्यादा वाटते. त्यांची अशी समजूत आहे कीं, कोणी लबाड लुच्चा असला तर त्याचा मान करावा; त्यास थोर म्हणावें. परंतु विद्वान हें कसें करील ? तसल्या थोरास तर लाथ मारणार. म्हणून अमर्याद म्हणतात. परंतु तसें नाहीं. आपण गर्दभ असलें तरी घोड्यास ओळखावें, हें चांगलें. तात्पर्य पुण्यांतील व बाहेर ठिकाणच्या ब्राम्हणांच्या मूढपणाच्या समजुती लवकर जातील, तर बरें होईल. सारांश, इंग्रजी विद्वान यांचा पक्ष आम्ही सिद्ध केला आहे. आणि तो वास्तवीक आहे, परंतु ब्राम्हणांच्या मूर्ख समजुती, याजमुळें ते भलतेंच समजतात, हे विनंती.

लो० हि०



ता. २२ आक्टोबर १८४८

पत्र नंबर ३२

लांच

इंग्रज लोक हल्लीं हिंदुस्थानांत राज्य करितात, हे सामान्यतः इकडील लोकांपेक्षां शहाणे, विद्वान, ज्ञानी, माहितगार व निष्कपटी आहेत. परंतु शेंकडा पांच या सुमारानें त्यांत वाईटही असतात. तसेंच जे चांगले आहेत ते तरी सर्व कामें करूं शकत नाहींत. कारण एकटा मनुष्य, त्यास दोन हात; तेव्हां त्यानें कितीही काम केलें तरी तो थोडेंच करील, आणि त्याचे पाठीस डोळे नसतात. याजमुळें त्याचे हाताखालचे लोक चांगले सज्जन असल्याखेरीज सर्व कामें चांगलीं चालणार नाहींत. व इकडील लोक लबाड म्हणून जरी प्रसिद्ध आहेत, तरी ते इंग्रजास राजकीय कारणास्तव आणि अडचणीमुळें पुष्कळ ठेवावे लागतात. या लोकांची वर्तणूक फार वाईट म्हणून लोकांचे फार नाश होतात. व दिवसानुदिवस त्यांवर भरवसा कमी राहातो. हिंदू लोक लांच खातात, याचा संशय नाहीं. कंपनीसरकारचे चाकरांत हजारांत लांच न खाणारा व ईश्वरास भिऊन चालणारा क्वचित असतो; बाकी सर्व शिपायापासून प्रिन्सिपाल सदर अमीनपर्यंत शपथेचा व्यभिचार करितात. याचें कारण असें आहे

कीं, या लोकांस ज्ञान आणि धर्म नाहीं हें एक, व दुसरें इंग्रज लोकांस हिंदू लोकांची परिक्षा करितां येत नाहीं; याजमुळें कोणत्याही कामावर यथायोग्य गुणानें योजना होत नाहीं. हिंदू लोक जरी मूर्ख आहेत, तरी त्यांत निवड केली तर चांगले शहाणे व ईश्वरास भिणारे असे कांहीं कांहीं सांपडतील. परंतु सरसकट नेमणुका करितात, याजमुळें वाईट लोक पुष्कळ अधिकारावर येतात. जर असा ठराव केला कीं, इंग्रजी विद्या शिकलेले लोकांस कामावर नेमावें, तर लांचाचा कांहीं बंदोबस्त होईल. मोठे शास्त्री जरी असले तरी त्यांचाही उपयोग नाहीं; कारण मी एका शास्त्र्यास प्रश्न केला कीं, लांच घ्यावा किंवा नाहीं ? त्यानें सांगितलें कीं, लांच खाणें हा न्यायाधिशाचा धर्म आहे. परंतु खरा असेल त्याजपासून घ्यावा असें शास्त्र आहे. तेव्हां हिंदू लोकांचे शास्त्राचा या गोष्टीस कांहीं प्रतिबंध नाहीं. फक्त कायदा मात्र प्रतिबंध करितो; परंतु कायदा चुकविण्याचें सोपें आहे. ज्या पुरुषाचे मनांत ईश्वराज्ञेचा निर्धार नाहीं, त्यास कायदा दिला तरी तो लांच खाल्ल्यावांचून राहाणार नाहीं, तेव्हां हिंदू लोकांचें मनच फिरलें पाहिजे. ही गोष्ट वाईट असें त्यांस पक्कें समजल्यावांचून लांचाचा प्रतिबंध होणार नाहीं. जरी इंग्रजांनीं भगिरथ प्रयत्न केला, तरी हे लोक अडूनउडून लांच खातात, हें जगप्रसिद्ध आहे. आणि वास्तवीक पाहिलें तर जो मनुष्य मुनसफाचें काम करितो, तो वेतनाइतका खर्च ठेवून पांच वर्षांत दाहा हजार रुपये जवळ करितो. तसेंच शिरस्तेदार आपले सर्व वेतनाइतका किंबहुना जास्तीच खर्च करून सालांत पांच हजार रुपये जवळ करितात, तसाच नाझरही सालाचे पांच हजार रुपये मिळवितो. सामान्य कारकूनही दाहा वर्षें काम करितो तर दोन हजार रुपये जवळ करितो. तसेच चपराशी पगाराचे दुप्पट मिळवितात. फौजदार व मामलेदारही याचप्रमाणें. जर बारीक शोध केला तर ही सर्व बातमी लागते. आणि जरी जड्ज किंवा कलेक्टरसाहेब प्रमूख असतात, तरी त्यांचा इलाज चालत नाहीं. पहा ! एक मनुष्यानें हुकूमनामा बजावण्यास नेला तर पहिल्यानें शिरस्तेदाराचें आर्जव करावें लागतें. त्याशिवाय साहेब कांहीं करीत नाहीं. तेव्हां लोक त्यांची पूजा करून नंतर हुकूम घेतात. तो बार करणारा कारकून याजवळ देतात. तेव्हा शिरस्तेदार व कारकून एका मताचेच सिद्धसाधक असतात. ते त्यास तसदी देत नाहींत कीं, अमक्याचें काम जरूर करावें. तेव्हां त्या कारकुनास चार आणे द्यावे, तेव्हां तो बार करून मालकाजवळ देतो. मग मालक नाझराकडे जातो. तेव्हां नाझर म्हणतो कीं, आतां मजजवळ शिपाई नाहीं. जा, पाहिजे तर साहेबास सांगा. तेव्हां सावकार तर एक वेळ खर्च करून साहेबाकडून आला असतां तो पुनः जाईल तर दाद लागणार नाहीं. आणि जर नाझरावर फिर्याद करील तर साहेब म्हणतो कीं, अरे अंमलदारावर हा फिर्याद करितो. याची शपथ घ्या, आणि बसवून ठेवा. अशी त्याची तिकडे शोभा होते. तेव्हां कांहीं खर्च पडेल तो करावा हें ठीक. असें समजून नाझराची मूठ भरतो. नंतर सर्वांची पंचोपचार पूजा करून शेवटीं

शिपाई जतीस मिळतो. तो मिळाला कीं, म्हणतो, "दादा रामराम, आपणाकडे नेमणूक झाली देवानें केलें." असें कूळ मिळालें म्हणजे आपणास काय कमी ? आठ चार आणे त्यास द्यावे तेव्हां तो बरोबर काम करितो, नाहींतर कुळाकडे जाऊन अगोदर बातमी लावून माल पळवितो. पुढें माल जप्त केला, तो लिलाव होईपर्यंत याचप्रमाणें खर्च पडतो. शेवटीं रुपये आले म्हणजे तरी लवकर पदरीं पडत नाहींत. नाझर म्हणतो, जाऊं द्या, द्या पहिल्या तारखेस. तेव्हां उत्तरपूजा करावी लागते. शेवटीं पन्नास रुपयांचा दावा असला तर, चाळीस रुपये खर्च होतो. मग त्या सावकारानें म्हणावें, "अरे रुपये नाहीं आले तर नाहीं. बुडाले तर बुडाले. परंतु कूळ पैसा देत नवतें. त्याची तर खोड मोडली." एवढा मात्र आनंद मानून बसतात. तेव्हां या रीतीनें रयतेची किती खराबी होईल बरें ? या प्रकारें इंग्रजाच्या दरबारांत न्याय चालला आहे. छापी कागद, वकील, मुनसफ, लूट करितात. हुकूमनामा झाला तरी सदरी लिहिल्याप्रमाणें व्यवस्था होते. कित्येक लोक असे आहेत कीं, शंभर रुपयांची फिर्याद करितात. तींत चारशें रुपये खर्च करितात. व शिवाय आर्जवें व नित्य खेपा. आपला रोजगार धंदा सोडून कज्जाचे पाठीस लागतात. याजमुळें बेजार झाले आहेत. असा अनर्थ सरकारी कामदार करितात. ज्या तऱ्हेनें पैसा काढून आपला नफा करितात. रयतेची दया किंवा ईश्वराचें भय किंवा धर्माचा प्रतिबंध किंवा मनाची लज्जा किंवा परलोकांची काळजी किंवा अब्रु हे कांहींएक मनांत आणित नाहींत. तेव्हां व्यापार आणि व्यवहार व देणेंघेणें कसें नीट चालेल ? इंग्रेज तर या गोष्टीस वाकब असे थोडेच आहेत. कांहीं कांहीं पुरते आहेत. परंतु त्याचा तरी उपाय चालत नाहीं. यास एवढाच उपाय आहे कीं, चांगले लोक पाहून अधिकारावर ठेवावे. अधिकारावर ठेवणें याची फार चौकशी करून लोकांची निवड करावी व त्यांचे गुणांचा विचार करावा आणि लांच न खाणारे व इंग्रजी जाणणारे आहेत व जे फार विद्वान आणि विचारशील आहेत त्यांस ठेवावें, तरच त्याचा बंदोबस्त होईल. नाहींतर कदापी होणार नाहीं. मोठा शहाणा साहेब असला तरी तो काय करील ? मराठी अर्जी आली तर ती वाचावयास शिरस्तेदार पाहिजे. हुकूमनामा बजावण्यास नाझर पाहिजे. शिपाई, कारकून पाहिजेत. अव्वल कज्जे फैसल करण्यास मुनसफ पाहिजेत. त्याशिवाय चालणार नाहीं; परंतु त्यांची वाईट वर्तणूक असली तर साहेब काय करतील ? हल्लीं लोकांस असें वाटतें कीं, इंग्रजाचा रोजगार करून पैशास जय नाहीं व बरकत नाहीं; म्हणजे उघड लांच घेतां येत नाहीं. परंतु वास्तवीक पाहिलें तर बरकत असेल कशी ! "हपापाचा माल गपापा जातो," अशी म्हण आहे. हे लोक शपथ खाऊन पैसा मिळवितात. तो पैसा राहील कसा ? त्यांनींच शिक्षा पावून तुरुंगांत शंखळाबंधनांत असावें ही त्यांची योग्यता असते, परंतु कित्येक लोकांची ही अप्रतिष्ठा चुकते. हेंच त्यांचें पुण्य म्हणावें. त्यांचें कल्याण होईल कसें ? जरी कोणी म्हणवितो कीं, मी पन्नास वर्षें व चाळीस वर्षें, व तीस वर्षें, वीस वर्षें चाकरी केली. माझी सरकारानें

प्रतिष्ठा वाढवावी. पण त्यांनीं आपल्या मनांत विचार करून पाहिला तर समजेल कीं, कोणत्या धर्मानिं आम्हीं चाकरी केली ? सरकारास फसविलें. रयतेस लुटलें. लबाड्या केल्या. यांत कोणाचें मीं चांगलें केलें ? ज्यास शिक्षा होते तो तुरुंगांत जातो. जे राहातात ते म्हणतात कीं, आमची योग्यता हीच आहे. परंतु चालेल तितके दिवस करून घ्या. पुढें काय होईल तें पाहूं, असेंही लोक म्हणतात. परंतु त्यांची वास्तवीक योग्यता पाहिली तर, जे लांचाकरितां तुरुंगांत आहेत, त्या कैदींची योग्यता आणि जे कोर्टांत मोठे अब्रूचे लोक म्हणून बसून न्याय करितात व अंमलदारी करितात, त्यांची योग्यता यांत काय अंतर आहे ? ज्या दिवशीं सांपडतील त्या दिवशीं यांची गती तीच होणार. याजमुळें सरकारी अंमलदारांची योग्यताही लोकांत नसते. ते कामावर असतात. याजमुळें चार लोकांस त्यांजवळ जाणें जरूर पडतें. परंतु त्यांची योग्यता प्रसिद्ध असते. जरी हिंदू लोक हुशार आहेत, तरी या दुर्गुणानें त्यांची माती झाली व अब्रू गेली. त्याची कोणी लाज बाळगीत नाहींत, कामावरून गेले म्हणजे त्यांचेकडे कोणी पाहात देखील नाहीं. कारण कीं, त्यांची योग्यता सर्वांस ठाऊक असते. जर पुरुषास खरी प्रतिष्ठा असली, तर ती त्याची चाकरी गेल्यानें कमी होत नाहीं. व द्रव्य आलें गेलें तरी त्यानें त्याची अब्रू कमी होत नाहीं. ती शाश्वत अब्रू; परंतु हे लबाड लोक जी अब्रू मिळवितात ती मुलाम्यासारखी. ही टिकावयाची नाहीं. जे लोक लांच देतात ते तरी मूर्खच असतात. जर सर्वांनीं कट केला कीं सरकारच्या अंमलदारांस लांच द्यावयाचा नाहीं, तर त्यांची खोड जाईल. पण असें चांगले कट करण्यापुरतें शहाणपण जर या लोकांस असतें तर मग राज्य कां जातें बरें ? हे लोक फार मूर्ख आहेत. याजमुळें असे प्रकार यांजमध्यें आहेत. व इंग्रज तर पक्के लोक आहेत. ते म्हणतात कीं, आपआपल्यांत हे लोक लुटून खातील तर आमचें काय गेलें ? आमची तितकी चांगलेपणाची प्रशंसा वाढेल. हेंही खरें कीं, साहेब लोकांस लोक चांगले म्हणतात. व नेटीव कामगारास बहुधा वाईट म्हणतात. परंतु आतां सुधारलेले व सुशिक्षित लोक सरसावत चालले आहेत. ते इंग्रजांची बरोबरी करतील यांत संशय नाहीं. हे विनंती.

लो० हि०

ता. २१ आक्टोबर १८४८

पत्र नंबर ३३

अर्थशून्य ब्राम्हणविद्या

आपले लोकांत ज्ञानशून्यता जाहाली आहे. तिचें प्रबळ कारण असें आहे कीं, लोक अर्थाखेरीज विद्या शिकतात. ब्राम्हण लोक वेद पाठ करितात. परंतु अर्थशास्त्र

असतात. तसेच गृहस्थ सहस्रनामें, स्तोत्रें इत्यादि म्हणणारे पुष्कळ आहेत. परंतु अर्थाविषयीं शून्य. येणेंकरून फक्त तोंडाची मात्र मजूरी करतात. आणि मनाचा कांहीं उपयोग करीत नाहींत. कोठें कीर्तन व पुराण असलें म्हणजे लोक जातात. परंतु कोणी मौज पाहावयास जातो, कोणी उगाच दिवे पाहावयास जातो, कोणी तंबाकू खात बसतो. कोणी अवाच्य भाषणें बोलत बसतो. परंतु देवालय पवित्र जागा हें कोणाचे लक्षांतच नसतें. तसेंच भट वेदपाठास जमले म्हणजे याचप्रमाणें अवस्था होते. व स्वतः म्हणणारे तेही आपलें लक्ष देवाकडे लावीत नाहींत. तंबाकू व भांग ओढीत असतात. तसेंच लोक पूजा व संध्या करितात. परंतु पुष्कळ गृहस्थांचे येथेंही मीं असें पाहिलें आहे कीं, पूजेची खटपट, रुप्याचे देव्हारे शोभेकरितां मांडतात. व ढोंगाकरितां रुद्राक्षमाळा व सोंगाकरितां भस्म लावतात. परंतु मनांत कांहींएक नाहीं; आणि संपूर्ण दरबार कारभार तो रिकामा वेळ समजून करितात. तेव्हां सांप्रतकाळचे लोकांमध्यें वास्तवीक देवाचें भजन नाहीं. अक्षरें मात्र पाठ म्हणतात. परंतु अक्षरांनीं कांहीं उपयोग आहे काय ? नुसतें पाठ म्हणण्यानें पुण्य आहे असें समजतात. हेंच सर्व धर्म बुडावयास व अज्ञानास मूळ झालें आहे. ब्राम्हण मोठा दशग्रंथी म्हणवितो. परंतु त्यास एक शब्दाचा अर्थ समजत नाहीं. ज्योतिष, छंद व व्याकरणाचें सूत्र इत्यादि पाठ म्हणतो. आतां यासारखा मूर्खपणा कोठें आहे ? व्याकरण, अष्टाध्यायी पाठ म्हणून त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. जर समजलें तर मात्र त्याचा उपयोग. तें न होतां फक्त पाठ म्हणतात. आणि आम्ही विद्वान ब्राम्हण म्हणवितात. त्यांची विद्या कोठें आहे ? जर मनुष्य अर्थ समजणार नाहीं आणि शब्दांची ध्वनी मात्र करील तर म्हैस रेकली तद्वत मनुष्यानें आक्रोश केला इतकेंच झालें. मनुष्याच्या भाषणाचा गौरव काय तो अर्थावर आहे. तो अर्थ समजला नाहीं तर पशू, पक्षी ध्वनी करितात तसाच तो मनुष्य ओरडतो. परंतु ज्ञानानें बोलत नाहीं. सांप्रतचे ब्राम्हण विद्येविषयीं केवळ जनावरें आहेत. त्यांस अर्थज्ञान नाहीं. एणेंकरून धर्मावरील भाव व आस्तीकबुद्धी भ्रष्ट झाली. आणि वेद, शास्त्र, पुराणें हीं परवाचा किंवा लमाणाचें गाणें यासारखीं झालीं. देवाचे प्रार्थनेस बसले म्हणजे जी मर्यादा, निष्ठा व मनाची तत्परता असावी ती नाहीं. कारण कीं, हे सर्व गूण ध्वनीपासून येत नाहींत. अर्थज्ञानापासून येतात. व देवाचें महत्त्व हृदयांत वागलें म्हणजे सहजच तशी वर्तणूक होते. ज्या शब्दांनीं ईश्वराचें वर्णन झालें, ते शब्द जर आपल्यास कळले तर मात्र त्यासारखी वर्तणूक उत्पन्न होईल. आणि ते शब्द जर अर्थविरहित ऐकेल, तर तसें होणार नाहीं. ब्राम्हणांची पढणीं आमचे कानीं पडतात, त्यांचा अर्थ म्हणणारास कळत नाहीं व ऐकणारास कळत नाहीं. उभयतां शंख आणि एक मान डोलावितो व 'वाः वाः' म्हणतो, आणि भटांना शाबासकी देतो. जे पाठ म्हणतात आणि अर्थ जाणत नाहींत, त्यांसारखे मूर्ख व व्यर्थ आयुष्य घालविणारे पृथ्वींत थोडेच असतील. मागील युगांत असे वेडे ब्राम्हण नव्हते.

ते सार्थ म्हणत होते. सार्थ म्हणण्याची पद्धती ज्या दिवसापासून बुडाली तोच दुर्भाग्याचा फेरा या लोकांस खचित आला. कारण कीं, याजमुळें ब्राम्हणांचें तेज गेलें. भट मूर्ख झाले. व त्याजपासून गृहस्थ तसेंच करूं लागले. जो उठला तो पाठ म्हणतो. 'अरे मूर्खा, पाठ म्हणून फळ काय?' असें सांगणारा कोणीच नाहींसा झाला. मला वाटतें कीं, पहिले ब्राम्हण ज्ञानी होते. परंतु पुढें कांहीं काळानें त्यांची प्रजाही मूर्ख झाली. पूर्वी सर्व ब्राम्हण पोथीवरून म्हणत असत. आणि पोथीशिवाय म्हणूं नये, असें शास्त्र आहे. पुढें ईर्षेनें म्हणतां म्हणतां पोथीशिवाय किरकोळ अनुष्ठानें करूं लागले. नंतर कोणी त्यांजवर चढ करून सर्व वेद पाठ म्हणूं लागले. मग भट वेगळे व श्रौतकर्म चालविणारे ब्राम्हण वेगळे, असे दोन पर्याय झाले. परंतु दोवेही अर्थशून्य. संस्कृत भाषेंत पाठ म्हणतात. नमस्कार करावा, विष्णुस्मरण करावें, तांब्यांत पाणी ओता. हेदेखील शब्द आतां मंत्रांत मोडतात. ब्राम्हण संस्कार पाठ करितात. हा मूर्खपणा पाहून चमत्कार वाटतो कीं, अर्थ जाऊन हें ज्ञानशून्य म्हणणें आलें कसें? आणि हें लोकांस इतकें प्रिय झालें कसें? अर्थ म्हणजे शब्दामध्यें जसा जीव. तो जर नाहीं तर ते शब्द प्रेतवत् आहेत. छत्तीस अक्षरांवर हजारों भाषा आणि हजारों शास्त्रें झालीं आहेत. म्हणून अक्षरांची मातबरी नाहीं. परंतु भटमंडळी हें मनांत आणित नाहींत. त्यांनीं आतां विरखंडें ठेवावीं. आणि पाठ म्हणावयाचा गर्व सोडून द्यावा. व चौसष्टी उलटण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें खचित जाणावें. पोथी घेणें यांत लज्जा नाहीं; परंतु सार्थ वेद म्हणावा. एणेंकरून फार चांगलें आहे. मनाची सुधारणा होईल तें करावें. स्मृतीची सुधारणा हें पोपटाचें कर्म. तशींच सहस्रनामें व स्तोत्रें व पूजा हीं सार्थ म्हणावीं. उगीच मजूरी करूं नये. म्हणजे त्यांतील अर्थ कळून त्याप्रमाणें वागणूक होईल. बाहेरचें ढोंग दाखवून उपयोग काय? देवपूजा कंठाळभर मांडली आणि मनांत कांहीं नाहीं, तर ती व्यर्थ आहे.

लो० हि०

प्रभाकर, ता. १२ नोवें० १८४८

पत्र नंबर ३४

वेळेचा व्यर्थ खर्च

आपले लोक वेळेची किंमत समजत नाहींत. वास्तविक म्हटलें तर मनुष्यास ईश्वरीदत्त आयुष्य हेंच धन आहे. जे या धनाचा अविचारानें व्यय करितात ते उपाशीं मरतात. आणि जे विचारानें व्यय करितात ते स्वस्थपणानें सुख भोगितात. सांप्रत हिंदु

लोकांस अशी खोड आहे कीं, वेळ व्यर्थ घालवावा. आमचे पाहाण्यांत असे लोक आले आहेत कीं, आपले घरून उठून लोकांचे घरीं जावें आणि त्यांचा व आपला वेळ गोष्टींत घालवावा. त्यांचें रिकामे गोष्टीवर सर्व ध्यान असतें. जेवण देखील ते विसरून गोष्टी सांगत बसतात. बरें गोष्टी सांगतात, त्या तरी उपयोगी, विचाराच्या व ज्ञानवृध्धी व्हावी अशा प्रकारच्या असाव्या. तर तेंही नाहीं. मनुष्य उत्तम प्रकारचें भाषण करील तर त्यास व श्रोत्यास ज्ञान होईल; परंतु हिंदू लोकांमध्यें जे गोष्टी सांगणारे आहेत त्यांचा वेळ शहाणपणाचे गोष्टींत जात नाहीं. व्यर्थ मूर्खपणाच्या गोष्टींत जातो. त्याचा कांहीं उपयोग नाहीं. बहुधा भटलोकांच्या जेवणाच्या गोष्टी. आम्हीं फार खाल्लें, थोडें खाल्लें, यजमानानें असें वाढिलें, इत्यादि मूर्खपणाच्या आणि अधाशीपणाच्या गोष्टी सांगत बसतात. त्यांचा मुख्य विषय बोलण्याचा काय तो जेवण हा असतो. त्याचप्रमाणें कुळंबी लोक व मराठे सरदार वगैरे आपल्या बढायाच्या गोष्टी सांगतात. काम कांहीं करीत नाहींत. याचप्रमाणें गृहस्थ लोकांत कोणी निद्रेनें, कोणी दुर्व्यसनानें काळ काढितात. खाणें, पिणें, लेणें यांहून सुखाचा अनुभव दुसरा कांहीं त्यांस नसतो. माझे पाहाण्यांत लक्षावधी लोक आले आहेत. त्यांस पुसलें तर ते म्हणतात, "आम्ही कांहीं करीत नाहीं. सरकारांतून इनाम आहे, तेवढ्यावर निर्वाह करून घरीं सुखरूप असतों." त्यांचे आयुष्याचा हिशेब जर यास पुसला तर जन्मापासून मरणापर्यंत त्यांचे आयुष्यांत एकही अशी गोष्ट सांपडावयाची नाहीं कीं, ती कागदावर लिहिण्यास योग्य आणि ऐकण्यास योग्य. अशा रीतीनें ते काळ घालवितात. भटही असेच असतात. जर त्यांस म्हटलें कीं, तुम्ही काय करीत असतां? तर ते म्हणतील कीं, स्नानसंध्या करून गंगातिरीं स्वस्थ असतों. मोंगलाकडून इनाम आहे, तितक्यावर चरितार्थ चालतो. तसेंच मराठे लोकांस पुसलें तरी ते म्हणतात कीं, सातारच्या राजाचे पदरीं असतों. काम कांहीं नाहीं. पंक्तीचें ताट, मानकऱ्यांमध्यें असामी व महाराजांबरोबर फिरावें. असे लोक मोठ्या मोठ्या राजधानीस आढळतात. जेथें हिंदू लोकांचें राज्य आहे, तेथें सर्वत्र न्यायाचा अंधःकार असतो. एवढेंच नाहीं, परंतु विद्येचा व विचाराचाही असतो. बाहेर होतें काय व जातें काय याचा कांहींएक विचार नसतो. ज्याचें त्याचें ज्ञान आपलेपुरतेंच, आपले घरापुरतें असतें. त्यांस दुसरें कांहींएक ठाऊक नसतें. कोणी म्हणतील कीं, थोर लोकांच्या पदरीं भिक्षुक, भट, शास्त्री, पंडीत असतात. परंतु ते लोक निरूपयोगी असतात. शास्त्री जे आहेत त्यांस मागील हजारों वर्षांचे ग्रंथ उलटतांनाच पुरें होतें; कारण संस्कृत भाषेचे कुलपांत ते असतात. तेव्हां प्रथम तें कुलूप उघडावयास म्हणजे भाषा शिकण्यास पांचदाहा वर्षें लागतात. मग पुढें कांहीं ज्ञान व्हावें तों शास्त्रीबावा असें लोक म्हणूं लागतात. मग अंगावर शालजोडी घेऊन मिरवतांनाच पुरेंसें होतें; मग विद्या कशाची? आलीकडे पांच हजार वर्षांत झालें काय, याचा पत्ता कोणास नाहींच. शास्त्री, पुराणीक द्वापारयुगापर्यंत गोष्टी सांगूं शकतात; परंतु पुढें आलीकडील

अनेक देशचें वर्तमान व नवीन कळा व विद्या वगैरे उत्पन्न झाल्या आहेत, यांविषयीं त्यांस खबर नसते. जे संस्कृतांत देश लिहिलेच नाहींत, ते आतां आहेत. त्यांचें वर्तमान त्यांस ठाऊक नाहीं. हल्लींचे सरकारची व्यवस्था ठाऊक असल्यास उपयोग अधीक पडेल. परंतु हें ते समजत नाहींत. तस्मात् शास्त्री यांचें ज्ञान अपुतें आहे. जसें घरांत पन्नास असामी वृध्द ज्यांस जाग्यावरून उठवत नाहीं असे आहेत. तर त्या लोकांचा उपयोग काय ? कांहीं तरुण त्यांमध्यें असतील तरच त्यांचा निभाव लागेल. आणि आलीकडील इतिहास व विद्या जाणून मग प्राचीन राजांचे इतिहास ठाऊक असले तर चांगलेंच आहे. परंतु आलीकडील सोडून मागील राजांच्या कथा जन्मपर्यंत वाचल्या तरी उपयोग काय ! मागील युगांत मनुष्यें ताडभर उंच होतीं व दाहा हजार वर्षें जगत होतीं आणि सोन्याची भुमी होती, अशा गोष्टी खऱ्या असोत नसोत; परंतु त्यांचा मुळींच कांहीं उपयोग नाहीं, यांत संशय नाहीं. भागवताचीं हजार पारायणें केलीं व रामायण नित्य वाचलें तरी हिंदुस्थानांत इंग्रज कसे आले, हें समजणार नाहीं. तसें जन्मपर्यंत जुन्या गोष्टी सांगितल्या आणि सांप्रतचे विचार केले नाहींत तर त्यांचा उपयोग काय ? परंतु हे शास्त्री व भट व संपूर्ण हिंदू लोक अजून मागल्या गोष्टींचे भरांत आहेत. त्यांस अजून सांप्रतचें कांहीं सुचत नाहीं. याजमुळें कित्येक लोक पोरासारखे बोलतात कीं, विलायत वेट लहान दोनचार कोसांचें आहे. कोणी म्हणतो, टोपकर हे पाण्यांतले राहाणारे. कोणी म्हणतो, रूमशामचें राज्य मोठें. कोणी म्हणतो, सात लाख घोडे तेथें आहेत. कोणी म्हणतो, पंध्रा लाख पायदळ तेथें आहे. कोणी म्हणतो कंपनीसरकार बायको आहे. अशा नाना प्रकारच्या गैरमाहितीच्या गोष्टी सांगतात. इंग्रजास राज्य करूं लागल्यास दोनशें वर्षें झालीं. आणि या लोकांच्या डोकीवरचे केश देखील त्यांणीं मोजले. परंतु या लोकांस त्यांचे दोन डोळेही ठाऊक नाहींत. हा केवढा चमत्कार ! भट लोक हे तर या पृथ्वीवर जन्मास आले व न आले सारखेच आहेत. यांचा कांहींच उपयोग नाहीं. अन्नास मात्र खर्च, लोकांस उपद्रव, भीक मागणें, व्यर्थ वेळ घालविणें, हीच त्यांची वृत्ती. कोणी कांहीं करील तर यांचा कर त्यांवर आहेच. यांचा कांहींच उपयोग लोकांस नाहीं. परंतु यांचा सन्मान ठेवणारे गृहस्थ पुष्कळ आहेत. येणेंकरून द्रव्याचा व्यर्थ व्यय होऊन विद्याशून्य लोकांचा प्रतिपाल होतो. आणि मूर्खपणा वाढतो. या लोकांस कांहींतरी काम शिकविलें तर बरें. ब्राम्हणलोक, शिंपी वगैरे यांचा रोजगार करतील तर अब्रूनें पोट भरतील. भिक्षुकी करावी आणि निर्लज्जपणानें दुसऱ्याचे दारीं उभें राहावें, त्यापेक्षां धंदा करून वेळ आणि आपली शक्ती उपयोगास लाऊन पोटें भरावीं तें बरें नाहीं काय ? हे लोक जर आपले आयुष्याची किंमत करतील, आणि व्यर्थ दिवस घालविणार नाहींत तर यांचें फार कल्याण होईल.

लो० हि०

प्रभाकर, ता० १९ नोवें० १८४८

पत्र नंबर ३५

मानास व दानास पात्र

एक मनुष्य दुसरे मनुष्याचा मान करितो यास २ कारणें आहेत. एक त्याचें आर्जव म्हणजे लाभदृष्टी व दुसरा कृतोपकार. आतां इंग्रज लोकांस हिंदू लोक मानितात. आणि ज्यांचें त्यांजवळ काम नाहीं, ते देखील त्यांस नरमतात. याचें कारण पाहूं गेलें तर मला वाटतें कीं, अज्ञानी जर दोन इंग्रेज लहान मोठे पदवीचेही एका जागीं मिळाले तरी ते इतके लवणभंजन करीत नाहींत. पण हिंदू म्हटला म्हणजे फारच करितो. एकादा साहेब आला म्हणजे रस्त्यांतील माणसें पैस होतात. मामलेदार व मुनसफ यांचे घशास कोरड पडते. व कितीएक घरीं येऊन डोळे पांढरे करितात. अशाही गोष्टी ऐकण्यांत आहेत. याचें कारण काय ? जर हिंदू लोक विलायतेस जाऊन त्यांचीं सर्व प्रकरणें ध्यानांत आणितील तर मग मला वाटतें कीं, इतकें अज्ञान, मोह, आणि अतिशय मान राहाणार नाहीं. मागें एलफिस्तनसाहेब वगैरे यांनीं आपले ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, जोंपर्यंत हिंदू लोक आमचा मान देवाप्रमाणें अज्ञानानें करितात, तोंपर्यंत आम्ही त्यांचे मुलखांत राहूं. पुढें राहाणें कठीण आहे. जसें एकादें मोठें जनावर एकाद्याचे दृष्टीस पडलें म्हणजे चपापतात, तसें इंग्रज लोकांपुढें हिंदू लोकांचें होतें. त्यांचें स्थान, कर्म, रीत, व्यवहार कांहींएक हे लोक जाणत नाहींत. याजमुळें इंग्रजांचा फार नफा आहे. या अवस्थेंत हिंदू लोक जितके दिवस राहातील तितके दिवस त्यांची येथें वस्ती होईल, हा नेम आहे. जोंपर्यंत जुने लोक आहेत, तोंपर्यंत ही व्यवस्था अशीच चालेल. पुढची उत्पत्ती ज्ञानांत श्रेष्ठ होईल, यांत संशय नाहीं. पाहा, इंग्रजांनीं आपले शहाणपणानें या लोकांस किती घेरलें आहे. व्यवहार व राज्य सर्व त्यांचे हातीं गेलें आहे. याचें कारण अक्कल आहे. अक्कल कशापासून, तर विद्येची प्रसृती व विचार इंग्रजांमध्यें फार आहेत. हिंदू लोकांमध्यें एकही नाहीं. मोठा धर्म आणि दान करावयाचें झालें म्हणजे दोन हजार भटांस जेवण घालतात. कोणी पांच हजार खर्च लावून देऊळ बांधतात. कोणी मनास येईल तसा पैसा टाकतात. त्यास योजना नीट कळत नाहीं. आमचे लक्षांत एक गृहस्थ येतो. त्यानें दोन लक्ष रुपये धर्मादायास काढले. त्यांपैकीं देवळास पन्नास हजार गेले, पंचवीस हजार ब्राम्हणभोजन, दाहा हजार खर्च देऊन लग्नें केलीं, असा व्यय केला. हें पाहून मला वाटतें कीं, मूर्खपणाची हिंदु लोकांपुढें हद्द झाली. हे दोन लाख रुपये जर नीट खर्च केले असते तर किती उपयोगाचीं कामें झालीं असतीं बरें ? किती दरिद्राचा ऱ्हास होता, किती ज्ञान व शहाणपण पढवायास येतें. परंतु मातींत पैसा कितीही घातला तरी त्याचा कांहीं फायदा

आहे काय ? माणसें ही जिवंत माती; त्यांस कांहीं सुखाचा उपयोग व्हावा, तें टाकून मातीच्या शोभेंत द्रव्य खर्च करून काय उपयोग ? जर हिंदू लोकांस वास्तवीक धर्म करावयाचा असेल तर इतकाच करावा कीं, जेणेंकरून लोकांचें अज्ञान दूर होईल. पुस्तकें व विद्या वाढतील व जेव्हां हे लोक आपले मूर्खपणाच्या मार्गांतून सुटतील, तेव्हांच सुखवृद्धी होईल. कितीएक लोकांस हा चमत्कार वाटला आहे कीं, आम्ही शहाणेसुरते लोक आहों आणि आम्हांस लोकहितवादी वेडे व मूर्ख म्हणतात. याचें कारण काय ? आम्ही त्यांस सांगतों कीं, जेव्हां आम्ही तुम्हांस ज्ञानी इंग्रजाशीं मिळवून पाहातों, तेव्हां खरेच वेडे व शहाणे लोकांमध्यें जितका फरक दिसतो, तितका फरक तुम्हामध्यें दिसतो. रोगापासून तुम्ही वेडे नाहींत, परंतु ज्ञानाचे तुळणेंत वेडेच आहांत. आयुष्याचा उपयोग कसा करावा, आपला जन्म लोकांस कोणत्या प्रकारानें उपयोगी करावा, आपण पृथ्वीवर होतों याची मागें स्मृती राहावी, याविषयीं उपाय करावा; सारासार विचार करून ईश्वराचें भय बाळगावें व खरेपणा धरावा, हें कोणी पाहत नाहीं. धर्मात्मे लोक पुष्कळ आहेत व आम्ही धर्म फार केला, असें ते म्हणतात. परंतु आंधळ्यास त्यांनीं जेवावयास घातलें काय ? दीनगरीबास वस्त्रें दिलीं काय ? अज्ञानास ज्ञानी केलें काय ? दुर्जनास सुजन केलें काय ? कोणता परोपकार आपले लोकांमध्यें त्यांनीं केला ? हल्लीं इंग्रज लोक सर्व जिन्नस विलायतेंतून आणतात व इकडील व्यापारी कोष्टी वगैरे उपाशी मरतात. तर त्या विद्या इकडे आणून लक्षावधी जिवांचें हित करण्याचा उद्योग कोणी केला आहे काय ? नाहीं. कोणी म्हणतो मी कार्तीकमासीं निराजनें दिलीं. कोणी म्हणतो, मी वैशाखांत मडकीं दिलीं. आवळे दिले. हा धर्म कशाचा ? हा मूर्खपणा आहे. भटांनीं वेड लावावें आणि गृहस्थांनीं त्याप्रमाणें नाचावें. यजमानास सांगावें कीं, उष्णकाळीं क्षीरभोजन करावें, म्हणजे यजमान पुण्य जाणून तसें करितो. पण वास्तवीक यामध्यें पुण्य कशाचें ? आळशी लोक द्रव्य खाऊन जातात, आणि मालकास पुण्य पुण्य म्हणून ठकवितात, इतकेंच आहे. वास्तवीक पुण्य हेंच कीं, यथायोग्य पात्र पाहून धर्म करावा. तान्हेला आहे त्यास पाणी द्यावें. कुंभ भरून ब्राम्हणास दिला व त्यानें तो जातांना टाकून दिला. कारण त्याचे घरीं हौद आहे व विहीर आहे. मग त्याला यजमानाच्या कुंभांतील पाण्याचें काय करावयाचें आहे ? अर्थातच तो तें मडकें ओतून टाकतो. तेव्हां हा धर्म कसा ? परंतु हाच धर्म आहे असें जे म्हणतात ते मूर्ख नव्हत काय ? हे विनंती.

ता० २६ माहे नोवेंबर १८४८

पत्र नंबर ३६

स्नानसंध्या

विनंती विशेष. वास्तवीक धर्म सोडून व ईश्वराची भक्ती सोडून हिंदू लोक विलक्षण मार्गास लागले आहेत. ते असे कीं, कितीएक लोक स्नानसंध्यादि कर्में करितात, त्यांस वाटतें मोक्षाचें साधन हेंच आहे. प्रातःकाळीं उठून स्नानसंध्या करावयास बसून डोकीस रुद्राक्षांचा माळा घालून भस्मलेपन करून ढोंग करून चार घटका बसावें, म्हणजे त्यांत ईश्वराची भक्ती झाली. मग सर्व दिवस वाईट कर्में व असत्य भाषणें करून लोकांच्या माना मुर्गाळल्या तरी चिंता नाहीं; परंतु आम्हांस असें वाटतें कीं, हे स्नानसंध्या करणारे आपलें आयुष्य व्यर्थ घालवितात. त्यांत कांहीं ईश्वरप्राती नाहीं. ते बकध्यानी मूर्ख व ढोंगी आहेत. असें म्हटलें आहे कीं,—

यमान् सेवेत सततं न नित्यं नियमान्बुधः।
यमान् पतत्यवकुर्वाणो नियमान्केवलान्भजन्॥

—मनु० अध्याय ४, श्लोक २०४

परोपकारः पुण्याय पापाय परपीडनं। —व्यास

या वचनेंकरून असें ठरतें कीं, नीती आणि सदाचरण हें लोकांचें कल्याण करण्यामध्यें आहे. याशिवाय पुण्य नाहीं. केवळ जे कर्मांचें भजन करतात ते ढोंगी आहेत. नीतीपर वर्तणूक असावी हें प्रथम कर्म होय. नंतर कर्मांची खटपट केली सारखी, न केली सारखी. याविषयीं कबीर म्हणतात, "मन चंगा तो काथोटमे गंगा." याप्रमाणेंच कलियुगीं साधू झाले, त्यांचें मत आहे. तस्मात ढोंग करणारास पुण्यवान जाणतात हें खोटें आहे. एका फारशी ग्रंथांत पाहाण्यांत आलें आहे कीं, एका अन्यायी राजानें एका पुण्यपुरुषास विचारलें कीं, मी ईश्वराचें भजन कोणत्या रीतीनें करावें? तेव्हां त्या साधूस त्याची वर्तणूक ठाऊक होती, म्हणून त्यानें उत्तर केलें कीं, ईश्वराचें भजन तुला उत्तम हेंच आहे कीं, तूं सर्व दिवस व रात्रीं निजत जा. तेव्हां राजानें पुसलें असें कां? तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, याचें कारण ईश्वराचें मुख्य भजन करणें म्हणजे त्यानें जे जीव उत्पन्न केले त्यांतील ज्ञानी जीव जो मनुष्य त्याचें कल्याण करावें. आणि ही गोष्ट तुला निद्रा लागल्याखेरीज होणार नाहीं. कारण तुझ्या जागृतीनें कितीएक मेले जातील. व अन्याय होतील. याजकरितां दुष्टास झोंप हीच ईश्वरभक्ती आहे. तेव्हां तो राजा त्या साधूस शरण गेला. व त्यानें जुलूम सोडून दिला. या दृष्टांतावरून असें ठरतें कीं, कर्मांची खटपट करण्यामध्यें ईश्वरभजन नाहीं.

ईश्वराचे भयानें वर्तणूक केली, म्हणजे तीच भक्ती आणि तेंच पूजन. तत्रापि जो अशी खटपट व ढोंग करितो त्यास लोक पुण्यवान म्हणतात, हें आश्चर्य आहे. अमका ग्रहस्थ त्याचें कर्म इतर कसेही असो, परंतु प्रातःकाळीं उठल्यापासून प्रहरभर स्नानसंध्या करण्याचा त्यांचा नेम मोठा सदृढ आहे. असो. त्यानें पूर्वजन्मीं असेंच केलें. त्याचें फळ त्यास या जन्मीं आलें आहे. या जन्मीं स्नानसंध्या करितो त्याचें फळ पुढले जन्मीं त्यास येईल, असें म्हणतात. आणि त्याचे वाईट कामावर पडदा घालितात, हा मूर्खपणा आहे. ज्याचें कर्म वाईट असतें, त्याणें जन्मपर्यंत दगडावर पाणी ओतलें आणि झाडाचीं फुलें तोडून रास केली तरी देव त्याजवर कृपा करील काय? नाहीं. सद्धर्माची मुख्य खूण हीच कीं, मनुष्याचे कल्याणाकडे चित्त असावें, परंतु मनुष्याचें कल्याण करणें म्हणजे लुच्चे, सोदे यांचें रक्षण करणें किंवा फुकट जेवणारे लोक यांची पंगत माजविणें नव्हे. पात्रापात्र पाहून अज्ञान जे आहेत, त्यांस शाहाणे करण्याची योजना करणें; जे रोगी आहेत त्यांस औषधपाणी करणें; जे दरिद्री व पीडीत आहेत त्यांस सुख देणें; आईबापाचा प्रतिपाल व मान करणें, हीच नीती आणि हेंच पुण्य होय. जो देवावर एकही फूल घालीत नाहीं, परंतु वर्तणुकीनें पवित्र व नीतीमान आहे, आणि परक्याचें दुःख जाणतो तो चांगला. जो लाख तुळशी रोज वाहातो आणि आईबापांचा व भावांचा शत्रु, इंद्रियभ्रष्ट व लोकांचे उपयोगी किमपी पडावयाचा नाहीं, तो चांगला नव्हे. नामदेव म्हणतो–"जग चाललें उफराटें, कोण जाणे खरें खोटें॥ जित्या तुळशी बेला तोडा पूजा निर्जिव दगडा॥ मुष्टी धरुनि मेंढा मारा, ब्राम्हण म्हणती यज्ञ करा॥ नामा म्हणे सर्व खोटें, भजन चाललें उफराटें"॥ १॥ याप्रमाणें साधूंचीं भाषणें आहेत. याजवरून उनाड ब्राम्हणांस राग येईल. कारण कीं, येणेंकरून त्यांची फी बुडते. जर कोणी अभिषेक करील किंवा तुळशी वाहील, तर त्यांस पैसा मिळेल. कितीएक लोक आपले भजनाची मजुरी ब्राम्हणास सांगतात; ती अशी कीं, ब्राम्हणांनीं उपास करावा व त्यांस दक्षणा द्यावी. हे नफे ब्राम्हणांचे बुडतील. याजकरितां सदरील मत खरें आहे तरी ब्राम्हणांचा व भटमंडळीचा असा अभिप्राय पडतो कीं, डामडौल केले पाहिजेत; कारण त्याशिवाय त्यांचा निर्वाह नाहीं. परंतु खरी गोष्ट आहे ती त्यांणीं कबूल करावी आणि लोकांचें अज्ञान दूर व्हावें हेंच चांगलें. बहुधा जे ढोंगी स्नानसंध्या करणारे असतात, ते तर फारच लबाड असतात. असें बहुधा पाहाण्यांत आहे. त्यांस असें वाटतें कीं, आम्हीं ईश्वराची भक्ती फार केली. आतां कांहीं केलें तरी चिंता नाहीं, परंतु हें बातल आहे. अशा करण्यानें ईश्वरप्राप्ती नाहीं. सत्कर्मानें मात्र ईश्वर मिळतो. कितीएक लोक असे आहेत कीं, हातांत माळ घेऊन रोज लाख वेळ राम राम म्हणतात. असें करण्यास त्यांस त्यांचे गुरूनीं सांगितलें असतें. परंतु तशी बडबड घशास कोरड पडेतोंपर्यंत जरी केली, तरी त्यापासून फळ कांहीं होणार नाहीं. जर लबाडी सोडली तर मात्र फळ होईल. मग देवाचें नांव घ्या, किंवा नको. जर आपण ईश्वराचे प्राणी आहोंत

तर त्याचें भजन असें केलें पाहिजे कीं, जेणेंकरून त्याची प्रीती आपणावर होईल. ज्या गृहस्थाचें आपणास साधन करावयाचें असतें त्याचें नांव जर घेत बसलों तर कांहीं उपयोग आहे काय? तर त्यास कृपा येईल, असें केलें पाहिजे. त्यास प्रिय आचरणानें त्याची प्रीती संपादन करावी. जर त्याचे घरीं तगाद्यास बसलें आणि म्हटलें कीं, अमकें दे तेव्हां जाईन, तर तो मूर्खपणाचा निर्धार होईल. उत्तमपक्ष हाच कीं, मनुष्यानें मनुष्यांचें कल्याण करावें. देवाचें भय धरून नीतीनें चालावें, म्हणजे ईश्वर प्रसन्न होतो. त्याचे जे प्राणी त्यास उपद्रव केला आणि देवाचें नांव घेतलें व त्यावर खंडीभर पाला घातला तर त्यांत पुण्य कशाचें? यास्तव लोकांनीं जर कोणास चांगलें वाईट म्हणावयाचें आहे तर त्याच्या स्नानसंध्येकडे पाहूं नये, त्याच्या वर्तणुकीकडे पहावें; कारण स्नानसंध्या हें केवळ पोकळ आचरण आहे. यांत कांहीं उपयोग नाहीं. खरें पुण्य तें वेगळें आहे. याजकरितां पुष्कळ अनुष्ठानें केलीं तरी, त्यांत कांहीं जीव नाहीं. ब्राम्हणाकडून मजूरी केली तरी सारखेंच. त्यापेक्षां मजुरांची मजुरी बरी. चार ब्राम्हण लावून अभिषेक करावा, त्यापेक्षां चार मजूरदार लावून रस्ता नीट करावा हें चांगलें; कारण ती लोकहिताची मजूरी आहे. यास्तव स्नानसंध्या करण्यांत कांहीं पुण्य नाहीं. हे विनंती.

लो० हि०

ता० ३ डिसेंबर १८४८

पत्र नंबर ३७

देवपूजा

विनंती विशेष. शास्त्रामध्यें धर्मप्रकरणीं बहुत मार्ग लिहिले आहेत. कोणी म्हणतात जिवास भजावें, जीव तोच शीव आहे. व कोणी म्हणतात शीव अधिक. आणि कोणी म्हणतात विष्णु, इत्यादि अनेक मतें आहेत. तसेंच अग्निसेवा, यज्ञ इत्यादिक श्रौतमार्ग आहेत. कोणी सूर्योपासक, कोणी शाक्त व फार अमंगळ आहेत. त्यांची पूजा सर्वांहून मूर्खपणाची आहे. ती केवळ मूर्ख आणि अविचारी असतील ते मात्र स्वीकारतील, असे हे अनेक मार्ग आहेत. परंतु माझें मतें सर्व मार्गांतील एक मार्ग खरा आहे; तो कोणता म्हणाल तर ऐका. मी त्यास शास्त्रांतून प्रमाणही काढून देईन. तो असा कीं, ईश्वर कांहीं मनुष्यास दृष्ट नाहीं, त्याचें अस्तित्व सृष्टीकडे पाहिल्यानें मात्र समजतें, याप्रमाणें सर्व लोकही कबूल करितात. तेव्हां देवाचें भजन

करणें योग्य व तो सर्वांहून वरिष्ठ आहे. परंतु त्याचें भजन करावें कसें, हें कळलें पाहिजे. ईश्वरास जर आम्हीं फुलें अर्पण केलीं, तर पाहा बरें त्याणें पृथ्वी निर्माण केली. तेव्हां त्यास कांहीं कमी आहे काय ? तसेंच त्यास नैवेद्य दाखवावा तर तो उपाशी आहे काय ? त्यास कोणताही उपचार करावयास मनुष्य योग्य नाहींत. कारण तो परिपूर्ण आहे. याजविषयीं पूर्वींचे ऋषींचें मत असेंच आहे. परंतु लोक सामान्यतः मूर्ख आहेत. त्यांस वास्तविक ईश्वर कळत नाहीं. याजकरितां ते त्यास बळेंच स्वरूप देऊन सगूण करून ठेवतात. त्याचें वर्णन असें करितात कीं, त्याचे हातांत शंख, चक्र, गदा, पद्म, आहे. म्हणजे त्याचा अर्थ इतकाच कीं, तो लोकांस शासन करणारा आहे. चक्रेंकरून त्याचा अनादिपणा व अनंतपणा प्रगट होतो. ईश्वराचीं स्वरूपें अनेक प्रकारचीं वर्णन करितात. मूर्ख लोकांस ईश्वर कळण्याकरितां हीं वर्णनें केलीं. परंतु सार इतकेंच कीं, ईश्वर एकच आहे. त्यास ब्राम्हणही नाकबूल नाहींत. परंतु या एक ईश्वराचें मनुष्यानें मनन करावें याचा विचार केला असतां परमात्मा जो भगवान त्यास मनुष्यांनीं मूर्खपणानें भजावें हेंही अयोग्य आहे. व देवास लहान मानून मूर्ती करितात. याची निंदा गीतेंत दोन ठिकाणीं केली आहे. ते श्लोक–

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः ।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥

—अध्याय ७, श्लोक २४

या प्रकारें करून ईश्वरास मूर्त मानणें हें मूर्खत्व आहे. ईश्वर अमूर्त हें त्याचे कृत्यावरून समजतें. कारण कीं, त्याणें केलेली सृष्टी तीदेखील मापतां येत नाहीं. तेव्हां तिचे कर्त्यास परमीत जाणणें हा केवढा अपमान आहे ! यास्तव ईश्वराचें वर्णन आणि भजन करावें इतकेंच त्यास पुरे. हृदई त्याचें चिंतन करावें, हेंच त्याचे थोरपणास योग्य आहे. आणि इतर उपचार नैवेद्यादिक त्यास करूं नयेत. मनुष्यास करावे. कांहीं देणें असल्यास देवास देऊं नये; कारण देव उणा व उघडा नाहीं. यास्तव मनुष्यास दिलें तर देवास दिल्याहून अधीक आहे. ईश्वराचें दर्शन होत नाहीं. तेव्हां त्याचें ध्यान मनेंकरून करावें. जें कांहीं कृत्य आणि उपचार करावयाचे ते पात्रापात्र पाहून मनुष्याचे ठाईं करावे हें उत्तम. आणि दयाधर्मास पात्र मनुष्य आहे. ईश्वर नाहीं. ईश्वर वर्णनास मात्र योग्य. जें कांहीं अर्पण करावयाचें तें मनुष्यास केलें पाहिजे, देवास नको. तो सर्वत्र पूर्ण आहे. दगडास भजन आणि नैवेद्य कशास पाहिजे ? त्यापेक्षां ब्राह्मणास बरा; कारण तो प्रत्यक्ष खाणारा आहे. ईश्वराचें व्यक्त स्वरूप ही सृष्टी आहे. तेव्हां या व्यक्त स्वरूपाचे ठाईं काय तें अर्पण करावें. दगड हा कहीं ईश्वराचें प्रत्यक्ष स्वरूप नाहीं. दगडापेक्षां जीवंत पदार्थ बरा, त्यास क्षुधा आहे व तृष्णा आहे. त्यास सोडून दगडापुढें अन्न ठेवावें, यांत काय फळ ? एकादा गरीब

अधःकारांत बसला आहे, दरिद्रानें पीडीत आहे, ज्यास पैसा मिळत नाहीं, त्यास पैशाचें तेल आणून देऊन उजेडांत बसविलें तर बरें. किंवा तें सोडून त्यास आंधारांतच ठेऊन देवळांतील मूर्तीजवळ पैशाचा कापुर नेऊन जाळावा तें बरें? कोणत्यानें ईश्वर तृप्त होईल? ईश्वरानें जे पदार्थ सजीव निर्माण केले आहेत, त्यांचें रक्षण करावें तें सोडून देवळांत दिवे लावावे तर काय फळ? मला वाटतें कीं, या गोष्टीचा ईश्वरासही क्षोभ येईल. कारण विचारेंकरून असें कळतें कीं, ईश्वराची इच्छा मनुष्यांनीं मनुष्याला संभाळावें. केवळ देवाची पुजा करावी याचा उपयोग काय? जी गांवची रयत आहे तिणें पाटलाकडे जाऊन त्याचे आर्झेत वागावें, किंवा गवरनर साहेबापुढे जाऊन राहावें? गवरनर त्याविषयीं काय करूं शकेल? तद्वत मनुष्यानें चांगला मार्ग सोडून गरिबास उपयोगीं पडावयाचें सोडून कापुर देवळांत जाळला तर उपयोग काय? या मूर्खपणानें कितिएक पैका व्यर्थ खर्च करितात व त्यास धर्म म्हणतात आणि त्यापासून लोकांचा कांहीं उपयोग घडत नाहीं. असें कितिएक लोक व्यर्थ द्रव्य टाकतात, त्यांस जरसांगावयास गेलें तर त्यांचे डोकींत लहानपणापासून वेड भरलेलें असतें. म्हणून ते ऐकणार नाहींत आणि विचारही करणार नाहींत. असे दृढ मूर्ख ते आहेत. यास्तव त्यांचे अंतःकर्णास बोध व्हावा म्हणून हें पत्र मीं लिहिलें आहे. वास्तवीक धर्म कोणता आहे तें त्यांणीं समजावें हें उत्तम आहे. हे विनंती.

लो० हि०

❧ ❧

प्रभाकर, ता. १० डि. १८४८

पत्र नंबर ३८

इंग्रजी राज्यापासून लाभ

विनंती विशेष. सांप्रत कितिएक लोक असें म्हणतात कीं, इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांतून जाईल तर चांगलें; परंतु आम्हांस वाटतें कीं, इंग्रजांचे राज्यापासून बहुत लाभ आहेत. प्रथम लोकांचें मत असें आहे कीं, या सरकारांत कोणास बहुमानाची जागा मिळत नाहीं, हें तर सामान्यतः खरें आहे. परंतु ही गोष्ट स्वाभाविक उत्पन्न जहाली आहे. परकी लोकांवर भरंवसा कमी, परंतु उभयतांचे तर्फे अधीक माहिती होईल, तेव्हां विश्वास पटेल. व्यापाराचे बाबतींत इंग्रज लोक इकडील लोकांपेक्षां विशेष शहाणे आहेत. तेव्हां पदार्थ करून ते इकडे स्वस्थ[स्त] विकावयास आणतात. तेव्हां याचा शब्द त्यांजकडे नाहीं. परंतु कांहीं दिवसांनीं हेच लोक त्यांच्या विद्या घेऊन त्यांचे

प्रमाणें माल उत्पन्न करतील व कांचा, घड्याळें, सुऱ्या, कातऱ्या, कापडें वगैरे जिन्नस इकडे न होतील असें नाहीं. परंतु प्रस्तुत लोक आळशी. याजमुळें देश भिकारी जहाला हें खरें. दुसरा उपाय असा कीं, जर या लोकांत परदेशास जाण्याचा अटकाव नसता तर आजपर्यंत याणीं कितीएक देश व कितिएक ठिकाणें पाहून तेथील ज्ञान, शहाणपण, रीती, कला, कौशल्य इत्यादी हिकडे आणलें असतें. परंतु लिहिणारे वाचणारे जे ब्राह्मण त्यांची नजर उत्साव, समाराधना, जेवणावळी यांजवर; कारण "ब्राह्मणो भोजनप्रियः" तेव्हां घरांत आळस, बाहेर मनाई. अशा दोहोंकडून यांस आतां अडचणी, तेव्हां याचा दोष कोणावर बरें? बरें, मोठ्या मोठ्या जागा इकडील लोकांस नाहींत, असा अभिप्राय बहुत लोकांचा आहे. त्यास पाहा बरें, इंग्रज लोक इकडे आले. त्याचे देशांचे हजारो लोक इकडे लढाईंत मेले व इतके दुरून ते येथें आले, त्यांत लाभ कोणता असावा? जर त्यांणीं आपले लोकांचें महत्त्व राखूं नये तर मग त्यांस लाभ काय? कोणी कांहीं काम करितो, त्यांत लाभ पाहातो. दुनियेची रीती अशीच आहे. जर हिंदू लोक शहाणे असून धैर्य करून परकी देशांत राज्य संपादन करिते, तर असेंच करिते. किंवा याहून अधिक करिते, याचा विचार करावा. म्हणजे इंग्रजांची वर्तणूक कशी आहे हें ध्यानांत येईल. जेव्हां मराठे लोक शिंदे, होळकर परमुलखांत (म्हणजे त्यांचे समजुतीप्रमाणें परमुलुख, परंतु वास्तविक पाहिलें तर मुलुख एकच) गेले, तेव्हां त्यांची वर्तणूक कशी होती? किती गांव ते जाळीत होते? दरसाल ते खंडणी किती घेत होते? शहरें व सावकार किती लुटीत होते? या गोष्टीचें स्मरण ठेविलें तर इंग्रज बरे आहेत, असें लक्षांत येईल. हे लोक सुधारून मूर्खपणाचे शंखळेपासून मुक्त व्हावे याजकरितां त्यांचा उद्योग बहुत चालला आहे. आपली विद्या ते पसरीत आहेत. शिकणारास उत्तेजन देतात. जे लोक इंग्रजांशीं संबंध ठेवितात, त्यांस बहुधा ठाऊक असेल कीं, इंग्रज साधारणतः इकडील लोकांपेक्षां अधिक काम करणारे, मेहेनती, शाहाणे, हुशार, खरे व प्रमाणिक आहेत. इकडील लोक त्याप्रमाणें नाहींत. शंभर इंग्रजांत पांच लबाड असतात. परंतु १०० हिंदू लोकांत पांच प्रमाणिक असतात. तेव्हां यांजकडे मोठे अधिकार दिले तर लोकांची स्थिती नीट राहाणार नाहीं. जे गूण राज्यकर्त्यांमध्यें असावे ते हिंदू लोकांमध्यें नाहींत. राज्याची पद्धती यांस ठाऊक नाहीं. आजपर्यंत ब्राम्हण लोकांनीं राज्य कधीं केलें नाहीं. हा एवढाच १०० वर्षें पेशवाईंत काय तो दिवा लागला. तद्वत मराठे यांनीं कधीं राज्य केलें नाहीं. पूर्वीं क्षत्रीय लोक राज्य करीत होते. ते तर आतां नाहींत. तेव्हां राज्यकर्त्यांचीं शाहाणपणें या लोकांस आल्याखेरीज कांहीं उपयोग नाहीं. हे लहान पदवीवर आहेत. हेंच बरें! कारण जेव्हां शिंदे व होळकर लक्ष्मीचे अंधःकारांत होते, तेव्हां त्यांनीं ५०००० पेंढारी लुटायाचे कामावर ठेविले होते. त्यांचें निर्मूळ इंग्रजांनीं केलें. जे राज्य करितात तेच लुटारू लोकांस बाळगतात, हें कधीं कोणी ऐकिलें होतें काय? जे राजे चोरांचें

रक्षण करितात, आणि लुटारू लोकांस बाळगतात, त्यांचें वर्णन काय करावें? तद्वत दक्षणेंत रामोशी व भिल्ल वगैरे वाटपाडे लोक होते. त्यांस राजेच सामील होते व लोकांची लूट करण्यास त्यांस परवानगी देत होते, परंतु या राजांनीं त्या लोकांस सुधारावयाचा यत्न कधींच केला नाहीं. ब्राम्हण लोक हे स्वहिततत्पर, गर्विष्ठ व कृत्रिमी आहेत, असें दिसतें. कारण जे लोक नीच आहेत, त्यांचे सुधारणेचा यत्न ते करीत नाहींत. त्यांस असें वाटतें कीं, आम्हांस ईश्वरानें थोर निर्माण केलें आणि दुसऱ्यास ईश्वरानें नीच निर्माण केलें आहे. परंतु हें मत खोटें आहे. कारण ईश्वरानें सर्व मनुष्यें सारखीं निर्माण केलीं आहेत. तेव्हां ईश्वरकृपेनें किंवा काळगतीनें जे थोरपणास चढतील, त्यांणीं आपल्याहून जे नीच त्यांस सन्मार्गास लावण्याचा प्रयत्न करावा, हाच सद्धर्म आहे. परंतु ब्राम्हणांचे समजुतीस हें विरुध्ध आहे जर ब्राम्हणांनीं कैकाडी कामाठी, रामोशी इत्यादि लोक पाहिले तर त्यांचा द्वेश करितात. हलालखोर पाहिला तर त्याची निंदा करितात. परंतु त्यांस असें वाटत नाहीं कीं, प्रत्येक मनुष्य आपला आपणच हलालखोर आहे कीं नाहीं? तेव्हां जें काम जो मनुष्य आपलें आपण करितो, तेंच जो मनुष्य, फार वेळ करतो तर तेवढ्यांतच तो त्यापेक्षां नीच कसा? वास्तविक विचार पाहिला तर हे अभिमान आहेत इतकेंच. वास्तविक पाहिलें तर कैकाडी लोक हे सुधारल्याच्या अंगीं ब्राम्हणासारखे शाहाणे होतील, हें खचित आहे. परंतु त्यांस नीच मानून अगदीं टाकावें, त्यांची दया करूं नये, हें योग्य नाहीं. त्यांस मनुष्य समजून ब्राह्मण आंधळा अथवा नीच जातीचा आंधळा असला तरी, धर्मास सारखाच आहे. ब्राह्मण विद्येनें थोर तर त्याप्रमाणें जे ब्राह्मण वेद अर्थसहित पढतील त्यांचा मान कर्णें योग्य आहे. परंतु हे आतांसारखे पोपट भट कैकाड्यासारखेच ज्ञानशून्य आहेत, यांत कांहीं संशय नाहीं. इंग्रज लोकांनीं हिंदुलोकांस स्थितीवर आणण्याचा बहूत यत्न चालविला आहे व देशांत स्वस्थता केली. चोर, लुटारू नाहींसे केले, हे त्यांचे मोठे उपकार आहेत. कितीकाळ जरी ब्राम्हणी राज्य चालतें तरी सती बंद होती ना; पेंढार मोडतें ना व बालहत्या बुडती ना. पहा बरें, पोरें वेलाशक मारीत होते. कोणी नवसाचीं पोरें टाकीत होते. कोणी मारून टाकीत होते. या प्रकारच्या चाली होत्या. कोणी स्त्रिया जाळून टाकीत; कोणी जिवंत पुरीत. कोणी गळ्यांत दगड बांधून बुडवीत. हें सर्व मूर्खपण कधींतरी हिंदू लोकांच्यानें बंद करवलें असतें काय? नाहीं. अद्यापी पुनर्विवाहाविषयीं कितिएक प्रयत्न करितात. परंतु पहा कोणी त्याचा स्वीकार करित नाहीं. जो तो भितो. ज्यांच्या पोरी बुडतात, त्यांचे जिवास खातें; परंतु धैर्यानें ही चाल बुडवून टाकण्यास कोणी उभे राहात नाहींत. तर पोरें मारल्याप्रमाणेंच हें नव्हे काय? रानांत पोर सोडल्याप्रमाणें पोरी सोडतात. त्यांस कोणी त्राता नाहीं. हें जर सरकार मनावर घेईल तरच सिद्धीस जाईल. नाहींतर कांहीं उपाय दिसत नाहीं किंवा हिंदू लोक

तरी कालेंकरून शहाणे होतील, तेव्हां होईल. आज अशा वगैरे बहुत कामास इंग्रजांचें राज्य हितावह आहे, हे विनंती.

लो० हि०

प्रभाकर, ता. १७ डि० १८४८

पत्र नंबर ३९

वर्णविचार

हल्लीं ब्राम्हणजातीस मोठा अभिमान आहे. त्यांस असें वाटतें कीं, आम्ही श्रेष्ठ. आमच्यासारखा कोणी पृथ्वीवर नाहीं. इतर लोक कसेही असले तरी आमची योग्यता पावणार नाहींत. परंतु जातीविषयीं कोणी गर्व करूं नये. आपलें कर्म तशी आपली जाती आहे. जात म्हणजे कर्मावरून योग्यता. क्षत्रिय म्हणजे त्यांनीं युध्ध करावें. ब्राम्हण म्हणजे त्यांणीं विद्या करावी. सोनारांनीं सुवर्णाचें काम करावें. परीट यांणीं वस्त्रें धुवावीं. हीच कामांचीं नांवें. आणि जातजातीची कांहीं वेगळी खाण नाहीं. सर्वांचें मूळ एक, याविषयीं तुकारामाचा अभंग असा—

तुम्ही नका करूं गर्व । नीच जाती म्हणुनी सर्व ।
शुक्रशोणिताची खाणी । तुम्हा आम्हा एकच योनी ।
रक्त मास चर्म हाडें । सर्वांठाईं सम पाडें ।
अन्न उदक घरोघरीं । निष्ठा नाहीं हो दुसरी ।
तुका म्हणे हेंचि खरें । नाहीं देवाशी दुसरें ॥ १ ॥

याजवरून उघड न्याय होत आहे कीं, जातीचा अभिमान मानणारे मूर्ख आहेत. आणि जाती व्यवहारावरून आणि कर्मावरून झाल्या आहेत यांत संशय नाहीं. येविषयीं मनूचें वचन आहे कीं ब्राह्मणाचा शूद्र होतो आणि शूद्राचा ब्राह्मण होतो—

अध्याय १० [श्लो० ६४-६५]

शूद्रायां ब्राह्मणाज्जातः श्रेयसा चेत् प्रजायते ।
शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम् ।
क्षत्रियाज्जातमेवं तु विद्याद्वैश्यात्तथेव च ॥

अध्याय ७

(श्लो०) कुबेरश्च धनैश्वर्यं ब्राह्मण्यं चैव गाधिजः । ४२

इत्यादि वचनेंकरून असें सुचविलें आहे कीं, धर्माचे फेरफारानें क्षत्रियाचा ब्राह्मण होतो. शूद्रांचा ब्राह्मण होतो, असें आहे. मग आतां जे दुसरे जातीचे लोक ब्राह्मणाचा गर्व हरण करण्याकरितां बळेंच नमस्कार करितात, बळेंच अग्निहोत्र घेतात, इत्यादी खटपट करितात. आणि ब्राह्मणाचा मत्सर करितात यांत त्यांस लाभ म्हटला तर कांहीं नाहीं. ब्राह्मणाचें कर्म कोणी सुखानें करणार नाहीं. वास्तवीक त्यांत सुख नाहींच, फार उपद्रव, त्रास व कष्ट आहेत. परंतु तितकेंही सहन करून नीच जातीचे लोक ब्राह्मणपणा मिळविण्याकरितां जों जों खटपट करितात, तों तों ब्राह्मण चिडतात, आणि दोघांचे वादविवाद सुरू होतात. त्यांत अर्थ पाहिला तर कांहीं नाहीं. माझे मतें हल्लींचे ब्राह्मण आणि नीच जातीचे लोक हे दोघेही एकसारखेच आहेत. कारण कीं, उंच म्हणविणारे यांचीं व नीच म्हणविणारे यांचीं कर्में समान आहेत. येविषयीं प्रमाण—

त्र्यहेण शूद्रीभवति ब्राह्मणः क्षीरविक्रयात्

इत्यादि वचनें धर्मशास्त्रांत आहेत, त्याप्रमाणें म्हटलें तर सर्व ब्राह्मण कांहींतरी दोषानें शूद्राचे योग्यतेस आले आहेत. आतां कुळाचार मात्र राहिला आहे. दोरी जळाली पण पीळ राहिला, तसें हें आहे. ब्राह्मणांस आपलें कर्म कांहीं ठाऊक नाहीं. सर्व प्रकारचा व्यापार, चाकऱ्या, धंदे हे करितात, विद्याशून्य व ज्ञानशून्य आहेत. हे ब्राह्मण कशाचे ? असें असतां अभिमानाकरितां दुसरे लोक झटतात, हेंही अज्ञान आहे. असो; भले लोकांनीं जातीचा अभिमान कधीं करूं नये, त्यांत कांहीं हशील नाहीं. लोकांस असें वाटतें कीं, ब्राह्मणांनीं रामोशाची सोयरगत करावी काय ? तर असें नव्हे. साधारणतः असें कधींही होणार नाहीं. जे ब्राह्मण आहेत ते ब्राह्मणांतच बहुधा सोयरगती करतील. ब्राह्मणांची सोयरीक मिळेल ती टाकून बळेंच परिटाचे घरांत शिरणें जरूर नाहीं. व कोणी तसें करणारही नाहीं. ज्या लोकांमध्यें जाती नाहींत, त्यांजमध्येंही असें करीत नाहींत. मोठा मुसलमान मोठे मुसलमानाशींच संबंध ठेवितो. ही परंपरा चाल आहे. बळेंच कोणी अगदीं शेवटल्याचे घरांत जात नाहीं. यास्तव जाती-अभिमान सोडला तरी जाती कायम राहतील, यांत संशय नाहीं. परंतु तंटे व भांडणें मोडतील. मत्सर करणार नाहींत. इतका फायदा होईल. सर्व लोक एकत्रपणानें वागतील. ब्राह्मण असें म्हणणार नाहींत कीं, अमका तो महार आहे, त्याचें तोंड पाहूं नये, त्याचा विटाळ होतो. हा वेडेपणा मात्र जाईल. मग तो महार अर्थातच ब्राह्मणांचे गर्विष्ठपणाचे शब्द ऐकून नीट इंग्रजांचे घरीं जातो आणि म्हणतो ब्राह्मण आतां फार माजले. मी त्यांस हात दाखवीन. इंग्रज लोकांचे फौजेंत नीच जातीचे लोक फार असतात. कारण त्यांस ब्राह्मण लोक तुछ मानतात. त्यांस उष्टें खावयास घालतात व त्यांस केवळ जनावराप्रमाणें समजतात. याजमुळें त्यांस उपाय सुचतो, तो ते करितात, आणि ब्राह्मणांचें काम काढितात. हा परिणाम जाती-अभिमानाचा आहे. ब्राह्मण आपसांत देखील फुटले आहेत. देशस्था

कोंकणस्थ, पळशे, कुडाळे, जौळखिस्ती, तीरगुंळ, कराडे, किरवंत, शेणवी, इत्यादिक ब्राह्मणांच्या ज्ञाती असून त्यांचे दरम्यान अनेक विपर्यास जाले आहेत. आणि ते परस्पर विवाह करित नाहींत, ही चाल फार वाईट आहे. ब्राह्मणाशीं ब्राह्मणांनीं खुशाल सोयरीक करावी. त्याविषयीं अटकाव असूं नये. जर कोकणस्थाची जात मिळेल तर कोकणस्थानें कोकणस्थाची सोयरीक करावी, परंतु देशस्थाची करण्यास प्रतिबंध नसावा. जसें ज्यास सोईचें वाटेल, तसें त्यानें करावें. बहुधा जो तो आपले जातीची आणि आपले देशची मुलगी करील, हें उघड आहे. जरी प्रतिबंध नसला तरी, दक्षणचा राहाणार गुजराथ्याची मुलगी करणार नाहीं, हें उघड आहे. परंतु याचा प्रतिबंध नसावा. आतां जातीचे फार भेद जहाले. मराठे लोकांतही जातकुळाचा भेद, ब्राम्हणांचा पाहून झाला आहे. सात कुळांतील मराठे विधवेचें लग्न करीत नाहींत, हा सर्व मूर्खपणा आहे. यांत कांहीं शहाणपण नाहीं. परंतु लोकांस जे मोठे वाटतात त्याप्रमाणें ते चालतात, यास्तव हे लोक अभागी आहेत. ईश्वर त्यांस सुबुद्धि देवो, हे विनंती.

– लो० हि०

प्रभाकर, ता. २४ डिसेंबर १८४८

पत्र नंबर ४०

लांचेचा गुन्हा

विनंती विशेष. धर्मशास्त्रांत लांचेचा गुन्हा नाहीं. लोभिष्टपणा नसांवा, असें आहे. परंतु ही गोष्ट लांचाचे गुन्ह्याविषयीं नाहीं. त्या वचनाचें लांचेवर ओढून चंद्रबळ आणलें तर नकळे. पेशवाईंत रामशास्त्री न्यायधीश होते व ते धर्मशास्त्राप्रमाणें चालत होते. त्यांचा आचार असा होता कीं, सरकारचें वेतनदेखील घ्यावयाचें नाहीं. कोणाचा विडा किंवा पाणीदेखील घ्यावयाचें नाहीं. व धन संपादन मुळींच करावयाचें नाहीं. हा शास्त्राचा प्रतिबंध खरा, परंतु सामान्यतः लोभ धरण्याविषयीं मात्र जहालें; तथापि न्यायकर्त्यानें आपलें नेमलें वेतन घ्यावें. त्यांत द्रव्य जमलें तरी जमवावें आणि जे आपलेकडे न्याय करण्यास येतात, त्यांजपासून त्यांचें कार्य झालें या कारणानें सत्पक्षाचें अथवा असत्पक्षाचें धन किंवा कांहीं मोलवान वस्तु घेऊं नये; घेतली असतां त्या कर्माचें नांव अमूक व त्यास शासन अमुक, असा निषेध शास्त्रांत कोठें स्पष्ट नाहीं. केवळ लोभनिषेधावरून ही गोष्ट सिद्ध होत नाहीं. मला तर स्पष्ट वचन कोठें आढळलें नाहीं. इंग्रेजी भाषेंत "ब्रैब," फारसी भाषेंत "रिपवत," त्याच अनुरोधानें लोभार्थी शब्द मुळचा हिंदुस्थानी असून हल्लीं महाराष्ट्र भाषेंत "लांच" हा योजिला आहे. या

९५९१४

दोषाचा अन्वर्थक शब्द संस्कृत भाषेंत नाहीं. मला वाटतें कीं, लांचाचा गुन्हा आणि त्यास शासन हा प्रकार प्रथमच या देशांत इंग्रजांनीं चालू केला. याच्यें पूर्वीं कधीं प्रसिद्ध नव्हता. यास्तव कवीनें म्हटलें आहे कीं,

रिक्तहस्तं न गंतव्यं राजानं देवतां गुरुं ॥

याजवरून लोकांमध्यें काय अभिप्राय आहे, हें समजतें. लोभाचा निषेध बहूत ठिकाणीं सांपडेल, परंतु लांचेचा सांपडणार नाहीं. जर कोणी दुसऱ्याचा न्याय वास्तवीक करील आणि वास्तवीक पक्षकारानें स्वइच्छेनें कांहीं न्यायकर्त्यास दिलें तर तें घ्यावें किंवा नाहीं, याचें उत्तर शास्त्रांत कोठें नाहीं. लोभाच्या वचनावरून इतकेंच होतें कीं, न्यायकर्त्याजवळ कांहीं असूं नये. त्याणें निर्वाहापुरतें घ्यावें. स्वतंत्र असावें. त्याचा संसार फकीराप्रमाणें असावा. असा शास्त्राचा हेतु दिसतो. ब्राह्मणांनीं न्याय करीत जावा, असें शास्त्रमत आहे आणि ब्राह्मणांजवळ द्रव्य कोणतेही प्रकारें राहूं नये, त्यांणीं द्रव्याचा धिक्कार करावा आणि भिक्षा मागून राहावें, हे धर्मशास्त्रांत पुष्कळ सांपडतील. जर ब्राह्मणानें कांहीं दान घेतलें तर त्याणें अमुक प्रायश्चित करावें, असें आहे व श्राद्धास बसला तर अमुक प्रायश्चित करावें, असें आहे. याचें कारण दानानें व श्राद्धाचे दक्षणेनें जें त्यास प्राप्त जहालें तें पंधरा दिवस त्यास घरीं बसऊन किंवा त्यास कांहीं दुसरा खर्च घालून तें सरवावयाचें आणि ब्राह्मणास पुन्हा कफल्लक करून ठेवावयाचें हा हेतू शास्त्राचा आहे. एकास दान केलें असतां पुण्य व दुसऱ्यास दान घेतलें असतां पाप असें शास्त्र सांगतें. याचा हेतु दुसरा कांहीं दिसत नाहीं. धर्मशास्त्रांत न्याय कर्ण्याचे मार्ग पुष्कळ आहेत, आणि त्यांतील नेम कितिएक चांगले आहेत खरे; परंतु त्यांतील कितिएक धर्म आहेत ते पांच हजार दाहा हजार वर्षांमागील लोक जे होते, त्यांसच योग्य. सांप्रतकाळीं ते विलक्षण दिसतात. हिंदु लोकांची समजूत मुसल्मानाचे समजुतीसारखी आहे कीं, धर्मशास्त्रांत जें कांहीं ज्ञान आहे, तें संपूर्ण आहे. मुसलमान लोक म्हणतात कीं, सर्व शास्त्राचें व विद्येचें मूळ किमया सुध्धां कुराणांत आहे. परंतु हें म्हणणें अविचारीचें आहे. मागील प्राचीन काळचे पदार्थाची स्तुती करण्याची चाल पडून गेली आहे, ही चूक आहे. सांप्रतकाळीं राज्याच्या रीती लोकसत्तात्मक इत्यादिक ज्या निघाल्या आहेत, त्या धर्मशास्त्रांत सांपडणार नाहींत. धर्मशास्त्राप्रमाणें राजा स्वछंदी आहे. तो म्हणेल ती पूर्वदिशा व करील तो विधी. परंतु हें सांप्रतकाळीं चालणार नाहीं. व त्याचा कांहीं उपयोग नाहीं. हल्लीं स्वतंत्र राजे असल्यामुळें जागोजाग देशोदेशीं अनर्थ जहाले आहेत, तें मनांत आणावें. आजच्या काळीं यथास्थित उत्तम राज्य अमेरिकेंतील युनाइटेट् स्टेट एथें आहे. त्याचे खालीं विलायतेंतील मिश्र राज्य व त्याचे खालीं इतर राज्यें. एशिया खंडांतील राज्यें तर फारच दुष्ट. तेथें लोकांस पिडा फार. यास्तव राज्यांत

सुख होण्याकरितां लोकसत्तात्मक राज्य जरूर असलें पाहिजे. ज्या देशांत कायदे होतात, त्या देशांतील लोकांची संमती त्यांस असावी, आणि कायद्याप्रमाणें राज्य चालव-ण्यास लांचाचा बंदोबस्त मुख्यत्वेंकरून जहाला पाहिजे. पूर्वीप्रमाणें आतां धर्मशास्त्र चालवूं म्हटलें तर चालणार नाहीं. ही गोष्ट अशक्य आहे. आतां ब्राह्मण राज्यकारभारांत, शिपायीपणांत व व्यापारांत पडून सर्व धंदे करितात. इतक्यांस भिकारी करून कंदमुळें खावयास लाऊन तपश्चर्या करविणें ही गोष्ट कोणी बरी असें म्हणणार नाहीं. तेव्हां आतां लोक आहेत त्यांचा प्रतिबंध सांप्रतकाळीं कसा करावा हा विचार केला पाहिजे. यास्तव पूर्वीचे ब्राह्मण कसेही असोत. तसें आतां होऊं सकत नाहीं. आणि पूर्वीप्रमाणें करण्याविषयीं जे आग्रह धरितील ते मूर्ख आहेत. ते वृद्धांस तरुण करण्यास इच्छितात. ते काळमान पहात नाहींत. जे काळमान पाहातात आणि त्याप्रमाणें वर्तणूक करितात, तेच उत्तम शहाणे. म्हातारे लोक म्हणतात कीं, इंग्रज लोकांच्या विद्या पुष्कळ आहेत; पण आह्मांस त्याचें काय करावयाचें आहे? आमचा आजपर्यंत काळ गेला कीं नाहीं? मागले पुरुष शाहाणे होते कीं नाहीं? परंतु हें ह्मणणें केवळ अज्ञानाचें. मागले कांहीं पुरुष मागले काळींचे अज्ञानी लोकांत शाहाणे होते. ह्मणून ते आतां शहाणे आहेत, असें नाहीं. परशुरामानें पृथ्वी निक्षत्री केली; पण भीष्म असतांना कांहीं ह्मालें नाहीं. तसें जोंपर्यंत इंग्रजांसारखे शहाणे लोक इकडे येत नवते त्याच काळीं हे लोक शाहणे, बुद्धिवान व विद्वान होते. कारण वरिष्ठांचा अभाव होता. परंतु आतां नवीन युद्धा-दिकांच्या युक्ती इंग्रजांनीं आणल्या आहेत. त्यांपुढें कोणताही हिंदु राजा जय पावला नाहीं, कारण शहाण्यापाशीं वेडा टिकत नाहीं. हें केवळ प्रारब्ध नाहीं, पण शहाण-पणच आहे. परंतु अज्ञानानें आपले लोक आपला पूर्वीचा थोरपणा राखण्याकरितां इंग्रज शहाणे व त्यामध्यें विद्या विशेष हें कबूल करित नाहींत. असो, तात्पर्य लांचेचा गुन्हा शास्त्रांत कोठें नाहीं. आणि याविषयीं कोणी जाणता मनुष्य प्रमाण दाखवील तर आम्हीं स्वीकारावयास आळस करणार नाहीं, हे विनंती.

लो० हि०

प्रभाकर, ता० ३१ डिसेंबर १८४८

पत्र नंबर ४१

नाना फडणिसाचें शाहाणपण

विनंती विशेष. सांप्रत मराठे लोकांत अशी ह्मण आहे कीं, नाना फडणिसा-सारखा कोणी शहाणा नाहीं. परंतु मला वाटतें कीं, आतां इंग्रज लोकांमध्यें सहस्रशः

नानापेक्षां शाहाणे आहेत. नाना फडणिसाचें शाहाणपण वर्णन करण्याजोगें सर्वोत्कृष्ट नवतें. त्या लोकांमध्यें त्याची कीर्ती होण्याचें कारण इतकेंच कीं, मूर्खांचे सभेंत थोडासा कोणी शहाणा असला ह्मणजे त्याची ख्याती होत्ये. आणि गांवढा जोशी गांवढ्यांत पंडीत असतो. कारण कीं त्या गांवचे लोक जितके ज्ञानी असतात त्याहून त्यास विद्वानपणा अधिक असतो. वास्तविक पाहिलें तर नाना फडणीस कांहीं विद्वान नव्हता व त्यास दूरदृष्टी नव्हती. जन्मापासून त्याणें कारभार केला, याजमुळें त्याची बुध्धी बरीच होती, व मराठे दरबारचा बंदोबस्त त्याला चांगला करतां येत होता; परंतु मेंढक्यास मेंढ्या वळतां आल्या म्हणून तो कांहीं घोडेस्वार होत नाहीं. इंग्रज लोकांतील कारभारी यांची बुध्धी विशाळ, मसलत खोल, अनेक देशींचे वृत्तांत त्यांस माहित व त्यांचें आपसांत एकमत असे. नाना फडणिसाचें ठाईं हें नवतें. तो जुन्या चालीचा ब्राम्हण. त्याची माहिती कमी व आपसांत दुष्टपणा फार होता. पाहा बरें, नाना फडणिसाचे हातीं सर्व राज्यकारभार होता. परंतु त्याणें कांहीं राज्यांत अधिकाऱ्यांची रचना व पद्व्या हें ठरविलें नाहीं. इंग्रजींत एक मेला म्हणजे दुसरा तयार असतो. हा क्रम मराठी राज्यांत नव्हता. कायदे कांहीं नवते. बरें, त्यांचे समीप इंग्रज होते, त्यांचा शोध तरी त्याणें कांहीं करावा, तेंही कांहीं नाहीं. इंग्रजांनीं मात्र सर्व लोकांच्या डोक्यावरचे केस मोजून ठेवले; परंतु मराठे लोकांस इंग्रजाविषयीं कांहीं माहित नाहीं. त्यांचा देश व नांव गांव कांहींएक ठाऊक नाहीं. नानाचे वेळचे पत्रांत कोटें इंग्रजांस जलचरें, कोठें कलकत्तेकर असें म्हटलें आहे. याजवरून त्याचें ज्ञान समजतें. टिपूशीं लढाई केली, तेव्हां लार्ड कार्नवालीस तेथें गेले होते. व त्यांजबरोबर परशरामभाऊ वगैरे सरदार पेशव्याकडून गेले होते. पण त्यांपैकीं एकजणासही ते कोण होते, हें ठाऊक नाहीं. व कोठून आले हें माहित नवतें. इंग्रजांचा वकील पुण्यांत होता. त्याची मात्र त्यांस ओळख होती. परंतु त्याचा शेंडा बुंधा किंवा हिंदुस्थानांत इंग्रज कोठें कोठें आहेत व फराशीस कोटें आहेत, व फिरंगी कोठें आहेत, याचा कांहीं शोध लागत नाहीं. नाना फडणिसाची बातमी फार होती असें म्हणतात, परंतु ही बातमी फुसक्या गोष्टींची होती. शिकांचें व नेपाळचें वगैरे संस्थान दुरवर होतें. त्याचा त्यास ठिकाण नवता. व राज्यांत टपाल वगैरे नवतें. नानाची बातमी इतकीच होती कीं, आपले ओळखीचे लोकांतील कोण कोठें गेला, कोण काय जेवला, ही मात्र बातमी तो चित्त देऊन काढीत असे. एवढ्यावरून मूर्ख लोकांस असें वाटे कीं, आम्हीं काल अमूक करीत होतों तें नानास ठाऊक कसें झालें ? परंतु या बातमीचा उपयोग काय ? बातमी म्हणजे संपूर्ण जगांत कोणतीं राष्ट्रें आहेत, कोणते मुलुख मोठे आहेत, हें समजावें. तळेगांवास इंग्रज आले होते तेव्हां मराठे लोकांनीं एकावर हजार जाऊन त्यांचा पराभव केला, या गोष्टीचें मराठे लोक मोठें वर्णन करितात. परंतु असली गोष्ट कांहीं मोठी नव्हे व त्यांत कांहीं शाहाणपण नाहीं. घोडें मनुष्यास मारील यांत काय आश्चर्य आहे ? परंतु त्यामुळें घोडा शाहाणा व मनुष्य वेडा, असें म्हणूं नये. ती गोष्ट एखादे

वेळेस झाली म्हणून वारंवार होणार नाहीं. नेहेमी मनुष्य घोड्यावर बसतात; तद्वत इंग्रजांचा पराभव मराठे लोकांनीं केला; पण त्याजमुळें इंग्रज नाहींसे झाले नाहींत आणि इंग्रज लोक शाहाणे ते इकडे आल्यावर त्यांणीं या लोकांच्या सर्व माहितगाऱ्या काढल्या आणि मग त्यांस जिंकण्यास उशीर लागला नाहीं. अशी मराठ्यांनीं इंग्रजांची माहितगारी कां काढिली नाहीं ? नाना फडणिसास ही गोष्ट करण्यास अनुकूल होतें. परंतु त्यास हें कांहीं ठाऊकच नाहीं. त्याच्या समजुती अशा होत्या कीं, पृथ्वी काय ती एवढीच, व सर्व जग तें इतकेंच आहे. याशिवाय कोठें कांहीं नाहीं. इंग्रज हे कोणच्या बेटांतून आले आणि प्रथम दाहावीस जण, नंतर शेंदोनशें असे इतके दूर येऊन येवढें राज्य जमविलें, ही कृती विश्वकर्म्यासारखी नव्हे काय ? परभाषा, परमुलुख, परजात, परधर्म तत्रापि वरिष्ठता पावले, हें केवढें शाहाणपण बरें ? इंग्रज कोण हें वर्तमान ठाऊक नाहीं, हा केवढा मूर्खपणा आहे ! आपले लोक पेशवाईंत मूर्ख होते यांत संशय नाहीं. त्यांस कांहींच कळत नवतें. बरें, आणखी नाना फडणीस यास कांहीं आपले देशाचा अभिमान नवता व शौर्यही नव्हतें. तो स्वभावानें कुत्सित होता. व हलके मनाचा होता. सर्व देशाचें कल्याण करण्याचें त्याचे मनांत क्षणभर देखील येत नवतें. परंतु त्याची आंतून बहुत सरदाराशीं वांकडीं मात्र होतीं. त्याणें सर्वांस एक कायदा लाऊन देऊन सर्वांस एकत्र जमविण्याचा प्रयत्न कधींच केला नाहीं. आपले घरापर्यंत व आपले राज्यापर्यंत मात्र नजर ठेविली. लोकांच्या सुधारणेचा प्रयत्न केला नाहीं. श्रीकाशिक्षेत्रास जाणें तरी बरोबर दोनशें लोक लागत. तेव्हां मनुष्यें माघारीं येत होतीं. नाहीं तर भिल्ल, रामोशी, पेंढारी वगैरे चोरटे लोक लुटीत होते. त्यांचा बंदोबस्त त्याच्यानें झाला नाहीं. काशी ही आपलेकडे इंग्रजाकडून घेवविली नाहीं. व त्यास आपले राज्याबाहेर कोण अम्मल करितो याची खबर बिलकुल नवती. या लोकांचें कोणतेंही कल्याण त्याचे हातून झालें नाहीं. मग त्यास कोणत्या प्रकारानें लोक शाहाणा म्हणतात, हें कांहीं कळत नाहीं. नीती, सुधारणा किंवा विद्येची वृध्धी त्यानें केली नाहीं. व कलाकौशल्येंही वाढविलीं नाहींत. नशिबानें राज्य चाललें, नाहींतर असे लोकांच्या हातांत राज्य क्षणभर देखील असूं नये; परंतु काळाच्या योगानें इंग्रज त्या वेळेस इकडे फारसे आले नव्हते. याजमुळें हें राज्य चाललें; नाहींतर असे लुटारू, अडाणी लोकांचें वेकायदा राज्य निभूं नये, परंतु ईश्वरसत्तेनें तें झालें. तात्पर्य नाना फडणिसाविषयीं जो अभिप्राय लोकांचा आहे, तो खोटा आहे. आतां जर नाना फडणीस असता तर त्याजला लोक वेडा म्हणूं लागते. आणि तो पळूनही जाता, यांत संशय नाहीं.

लो० हि०

ता. ७ वी जानेवारी १८४१

पत्र नंबर ४२

डोले करण्याची चाल

सांप्रत हिंदू लोक धर्माभिमानरहित भ्रष्ट झाले आहेत, हें त्यांचे कृतीवरून समजतें. पाहा, जातीचे हिंदू लोक असून मुसलमानाचा धर्म आचरतात. हल्लीं पुण्यांत मुसलमानाचे डोले दाहा-पांचच होतात. आणि हिंदू लोकांचे शंभर होतात. व हे लोक जसे बापाचे श्राध्धाची किंवा काशीयात्रेची काळजी व तयारी करितात तसा उद्योग करून डोले करितात. हें हिंदूधर्मास मोठें लांछन नाहीं काय? जे हिंदूधर्मास जाणत असतील व खरे पंडीत असतील यांस हा दुराचार पाहून लाज वाटावी. परंतु तेही डोळेझांक करितात. हा केवढा अंधळेपणा आहे? अज्ञान फार झाल्यामुळें मुसलमानापुढें बसून त्यांचा संस्कार आपले देहास करून घेऊन फकीर होतात. यांत व खिस्ती धर्माचा बापतिस्मा घेण्यांत कांहीं अंतर नाहीं. एक मुसलमान होतो, दुसरा इंग्रज होतो. दोघांचा संस्कार सारखा आहे. परंतु याजविषयीं लोकांस अगदीं घरम नाहीं. ते कर्ज काढून ताबूत करितात. व अडाणी लोक त्यास नवस करितात. तसेंच ब्राम्हण लोकही कांहीं कांहीं भ्रष्ट झाले आहेत, असें माझे ऐकण्यांत आहे. ब्राम्हणांच्या बायका ताबूद निघतात त्या दिवशीं नवसाच्या घागरी ताबुदांच्या पुढें ओततात. देवावर अभिषेक करावयाचा सोडून अशीं कर्में करितात. तेव्हां ईश्वराचा क्षोभ या लोकांवर कसा होणार नाहीं? व्हावा हेंच योग्य. हे लोक अज्ञानानें जनावरापेक्षां देखील मूर्ख झाले. हिंदू धर्म बुडोन गेला. आतां धर्म म्हणून कोणी जाणत नाहीं. लग्नें, मुंजी या चाली पडल्या म्हणून करतात. त्यांत धर्म कांहींच समजत नाहींत. मुसलमानांची चाल संपूर्ण हिंदू लोकांनीं घेतली आहे. जर या देशांत कोणी विद्वान असते तर आजपर्यंत यांचा प्रतिबंध करण्यास यत्न करिते. पण पेशवे व त्यांचे पदरचे मोठमोठे शास्त्री असून त्यांणीं देखील हा विचार केला नाहीं. हिंदू लोक मुसलमान होत त्यांस मदत मात्र करीत गेले. परंतु त्याची बंदी करावी हें त्यास योग्य होतें. ज्यांस हिंदुस्थानांत धर्म-स्थापना करावयाची असेल त्यांणीं शंकराचार्यासारिखे सर्व हिंदुस्थानांत धर्म सांगत फिरलें पाहिजे. तेव्हां हें ताबूद करण्याचें काम बंद होईल. नाहीं तर मोठा हा अधर्म आहे. यावरून हिंदू लोकांचीं चित्तें समजतात. चालींस विरुध्ध कांहीं केलें तर मात्र वाईट म्हणतात. अधर्म म्हणजे काय याचें त्यांस ज्ञान नाहीं. व धर्म याचा अर्थही कळत नाहीं. घरांत चाल चालत आली असते, त्याप्रमाणें आंघोळ करितात, भस्म लावतात, फुलें आणून पूजा करितात. पण त्यांचा अर्थ त्यांस कळत नाहीं. डोले करतात ते मुसलमानांचें अन्न एकेजागीं बसून खातात. त्यांस कोणतें प्रायश्चित्त असावें? हिंदुधर्माशीं

विरुध्ध मुसलमान व खिस्तीयन लोक सारखेच आहेत. आणि खिस्तीयन कोणी झाला तर त्याविषयीं सर्व लोक आश्चर्य करतात. परंतु हे हजारो लोक मुसलमान होतात, याविषयीं ते स्तुतीच करितात. त्यापेक्षां जी गोष्ट फार प्रघातांत पडली ती नीट दिसते. आणि जिचा प्रघात पडला नाहीं, ती वाईट दिसते. तात्पर्य खरें-खोटें व वाईट-बरें कोणी पाहात नाहींत. चालीवर जातात. व हिंदू लोकांमध्यें दुसरा एक दुर्गुण असा आहे कीं, त्यांस डौल आणि इतमाम फार आवडतो. जर इंग्रेज लोक ताबुतासारखा कांहीं धर्म काढून पुष्कळ पैसा खर्च करतील तर बहुत हिंदु लोक त्यांचे धर्मांत जातील. परंतु शुष्काशुष्की कार्य होत नाहीं. हिंदु लोक ज्याठिकाणीं डौल असेल त्यास चांगले व थोर म्हणतील व ती गोष्ट करतील. याचें कारण ज्यांचे ठाईं अज्ञान फार, ते डौलानें फसले जातात. जर खरें खरें सांगितलें तर त्यांची आवड वसत नाहीं. पाहा कीं, मुसलमान लोक हिंदुस्थानांत परदेशाहून येऊन येथें त्यांणीं वास्तव्य केलें व धर्म चालू केला व हिंदु लोकांना ती मौज वाटली म्हणून हिंदु लोकही नवस करितात व त्यांस देव मानतात. जर या डोल्यामध्यें तमाशा आणि डौल नसता तर कोणी हिंदु लोक त्यांस न स्वीकारते, यांत संशय नाहीं. हिंदु लोकांचीं मनें फार हलकीं आहेत. त्यांस राजाही तसाच पाहिजे. राजाजवळ डौल असला म्हणजे त्याणें अन्याय केले तरी चिंता नाहीं. पहा, बाजीरावाचें वर्णन भट व भडवे पुष्कळ करितात. कोणी म्हणतात कीं दोन्ही काळ ते वेळेवर संध्या करीत होते. ब्राम्हणभोजन घालीत होते. श्रीमंत असे होते, तसे होते. परंतु वास्तविक त्यांचे गुण कसे होते ते कांहीं कोणी बोलत नाहीं. कारण त्यांच्या संपत्तीनें हे लोक भुलले गेले. आणि या लोकांमध्यें द्रव्य हीच अब्रू आहे. अब्रू आणि द्रव्य हीं निराळीं नाहींत.

सर्वे गुणाः कांचनमाश्रयंते

या श्लोकेंकरून कवीनें लोकांचे मूर्ख समजुतीचें वर्णन केलें आहे. आणि याप्रमाणें प्रत्यक्षच आहे. इंग्रेज लोकांनीं हिंदु लोकांस नांव दिलें आहे कीं, "सेमी बार्बरस" म्हणजे अर्धे-रानटी. तसे हे लोक आहेत खरे. हे पूर्ण रानटी म्हणावें तर नागवे उघडे फिरत नाहींत. एवढेंच कमी आहे. परंतु या लोकांस ज्ञान अगदीं नाहीं आणि भोळसर फार. जो लाथ मारावयास योग्य त्याचे हे पा[यां] पडतील. आणि त्याणें थोडासा डौल घातला तर त्यास महाराज म्हणतील, आणि भुलतील. असे हे लोक विलक्षण आहेत. वरवर भाषण करावयाची यांस फार खोड आहे. कोणतेही गोष्टीचा अभिप्राय त्यांस पुसला तरी त्यांस उत्तर देतां येत नाहीं. व त्यांस कांहींच कळत नाहीं. खाणेंपिणें याचें मात्र त्यांस ज्ञान आहे. परंतु तें ज्ञान जनावरासही स्वभावें-करून असतें. मनुष्यास मुख्य सुशिक्षा व नीती यांचीं मूळ तत्त्वें माहीत पाहिजेत. परंतु ब्राम्हणांस हें कांहींच नसतें. पूर्वी ब्राम्हण अर्थज्ञ होते. धर्माचा विचार करीत होते.

ग्रंथ लिहीत होते. पढवीत होते. व धर्मांत वाईट असेल तें सुधारित होते. असें मागील ग्रंथांचे परंपरेवरून दिसतें. हल्लीं लहान लहान मुलांस ब्राम्हण लोक मुंज झाली म्हणजे भटाचे स्वाधीन करतात. तो त्यांस चार वेदाचीं अक्षरें पाठ करवितो. परंतु त्यांचें ज्ञान गुरूस व शिष्यास कांहींच नसतें. विद्या या शब्देंकरून ज्ञानाचा अर्थ होतो. ज्यामध्यें ज्ञान नाहीं तीं अक्षरें वाळल्या झाडाप्रमाणें आहेत, याजकरितां ज्ञान असलें पाहिजे; परंतु ब्राम्हण लोक अज्ञानी फार आहेत. हें भटांचें काम झालें. नंतर पंतोजी यांचें काम असें आहे कीं, त्याणें लिहावयास वाचावयास शिखवावें. आणि वेताळ-पंचविशी व शुकबहात्तरी ही बखर वाचवावी. या दोनही बखरी मूर्खपणाच्या माहेर आहेत. त्यांपासून नीती येणार नाहीं, अशी शिक्षा असल्यावर कोण मूर्ख होणार नाहीं. यास्तव मला वाटतें कीं, शास्त्री, पंडीत व जे कोणी शहाणे असतील ते असोत. परंतु बहुतकरून पढतमूर्ख फार आहेत. जे लोक हितेच्छु असतील, त्यांनीं शास्त्राधारें एक ग्रंथ करावा कीं, जेणेंकरून सर्व आपले ब्राम्हणांस धर्मांचें ज्ञान सुलभ रीतीनें होईल. आणि हा ग्रंथ चालते भाषेंत असावा, आणि मुंज्य झाली म्हणजे संध्या वगैरे कर्मानुष्ठान करावयाचें त्याचे अर्थही त्यांत असावे. आणि जें जें ब्राम्हण लोक करितात त्याचें तात्पर्य त्यांत असावें. तसला ग्रंथ मुंज होतांक्षणीं मुलास पढवावा म्हणजे त्यांस आपला धर्म काय आहे हें तरी कळेल. व एणेंकरून धर्माचा उद्धार होईल. सार्थ ग्रंथ पढविल्या-वांचून कांहीं उपयोग नाहीं. मुंजींत बहुल्यावर मुलास बसवून उपदेश केला तर त्यास आणि डोल्यांत फकीर व्हावयाचे समयीं मुसलमान कलमा पढतो तो उपदेश करून घेणारास फळ सारखेंच आहे. याचा किंवा त्याचा अर्थ त्यास ठाऊक नाहीं. बापानें मुंज केली व पुढें फकिरानें फकिर केलें, तात्पर्य एकच. एकास वाईट म्हणणें व दुसऱ्यास चांगलें म्हणणें हें ज्ञान झाल्यावांचून होत नाहीं. जेव्हां एकाचा अर्थ कळेल आणि हें चांगलें असें वाटेल, तेव्हां दुसरें वाईट म्हणेल, नाहीं तर म्हणणार नाहीं. सांप्रत हिंदू लोकांत आपला धर्म अमूक व अमूक गोष्ट चांगली आहे, हें समजत नाहीं. जें ओघास येईल ते चांगलें म्हणतात. व जसा प्रसंग येईल तसें करितात. धर्म नाहीं, कर्म नाहीं, चांगलें काय व सत्य काय याची ओळख नाहीं, व ज्ञानही नाहीं. याज-पासून हे सर्व अनर्थ झाले आहेत. हे विनंती.

लो० हि०

ता० १४ जानेवारी, सन १८४१

पत्र नंबर ४३

निरुद्योगीपणाच्या चाली

विनंती विशेष. ज्या काळीं लोकांस कांहीं उद्योग नव्हता, पीक फार येत होतें व खावयास लोक कमी होते, त्याकाळीं वेळ जाण्याच्या कितीएक युक्ती काढल्या आहेत. जसे आतां इंग्रज लोक सक्तमजूरीची शिक्षा देतात. याचें कारण असें आहे कीं, जे आळशी लोक असतात, ते चोऱ्या करून उपजीवन करितात. त्यांस मेहनत करण्याची सवय लागावी म्हणून अशी शिक्षा देतात. तद्वत हिंदू शास्त्रांत कितीएक कलमें आहेत त्यांचा उपयोग पाहिला असतां कांहींएक नाहीं. व. त्यांत नीती किंवा विद्याही नाहीं. फक्त काळ मात्र जावा, अशीं कामें त्यांत कित्येक आहेत, तीं कोणतीं तें ऐका. पुराणांत असें आहे कीं, एक एक तांदूळ निवडावा आणि लक्ष तांदूळ मोजून देवावर घालावे. माजे पहाण्यांत कित्येक धर्मशील अशा स्त्रिया आल्या आहेत कीं, त्यांनीं च्यातुर्मासांस चार महिने आपले डोळ्यांत रक्त उतरून घेऊन पांच लाख तांदूळ आणि गहूं मोजले व त्यांचा पुडया बांधून मोठ्या प्रयत्नानें त्या देवास वाहिल्या. कितीएक स्त्रिया अशा आहेत कीं, पांच वर्षेंपर्यंत वाती करितात, रुद्रवाती, दगडवाती, धोंडें-वाती, अशा प्रकारच्या कापसाच्या वाती सगळा दिवस त्यांत घालून तयार करितात. आणि एका दिवशीं त्याजवर दाहा रुपयांचें तूप घालून देवळांत जाऊन त्या जाळितात. या पलीकडे कांहीं मूर्खपणा राहिला नाहीं. त्यांस पुसलें तर म्हणतात कीं, उपाध्ये-बावांनीं असें करावयास सांगितलें आहे व यामध्यें फार पुण्य आहे. अहाहा, काय हें पुण्य! इतकीं वर्षें जर उपयोगी विद्या शिकण्यांत वगैरे खर्च केलीं तर केवढा लाभ होईल? व केवढी योग्यता येईल? परंतु पुराणीक देवळांत बसून ऐकणाऱ्यास फार वेड लावितात कीं, मीं एक स्त्री पाहिली. तिचा नेम तर फारच विलक्षण होता. तिनें गाईस दाणे घालावे आणि तिचे शेणांत जे दाणे पडतील तें शेण घेऊन गोमुत्रांत धुवावे, आणि ते दाणे निवडून दळून त्याची भाकरी करून खावी. याप्रमाणें चार महिने त्या शेणांतील दाण्यांवर तिनें उपजीविका केली. कधीं पसाभर व कधीं चार पैसे भार सांपडत. तितकेच खाऊन ती राही. आणि भटजीबावा तिचें व्रत मोठें व ती मोठी पुण्यवान बायको म्हणून स्तुती करीत. आणखी अशींच कित्येक व्रतें आहेत. त्यांचा अर्थ पाहिला तर दुसरा कांहीं नाहीं, परंतु बायकांचा वेळ जात नाहीं, तो सुलभपणानें जावा आणि त्यांस कांहीं उद्योग, सुख, सांपडावें म्हणून या युक्ती केल्या आहेत. परंतु भोळसर लोक हेतू जाणत नाहींत. दुसरें असें आहे कीं, कार्तिकमासीं लोक दीपदान करितात व करंडाफण्याची वायनें देतात. हा धर्म अगदीं

उलटा आहे. कारण दोन पैशांचें टिवळें त्यांत दमडीचें तूप घालून ब्राम्हणास देतात. त्यापासून जो दान घेतो त्याचा कांहीं उपयोग नाहीं आणि निरुपयोगी पदार्थ करण्यांत कारीगराचा वेळ मात्र जातो. तसेंच भटाचे करंडे, फण्या करतात यांत काय अर्थ आहे ? ते जिन्नस कोणाचेही उपयोगीं नाहींत. व्यर्थ पैसा जातो. दान घेणारास त्याचा उपयोग नाहीं व लोकांसही नाहीं आणि देणाराचें मात्र नुकसान. तेव्हां असलीं मूर्खपणाचीं दानें हे लोक कशा[करितां] करितात ? दान करण्याचा हेतू न जाणून, शास्त्रांत लिहिलें आहे कीं दीपदान करावें म्हणून करितात. परंतु शास्त्रकाराचा हेतू जाणून दान करीत नाहींत. मला वाटतें, एक समयी गरीबास दिली आणि टिवळीं पन्नास वर्षें दिलीं तरी फळ सारखेंच आहे. परंतु लोक मूर्खपणानें जांवयाचे गोष्टीसारखे शास्त्र चालवितात. एक जांवई घरून निघून सासऱ्याचे घरीं जाऊं लागला. तेव्हां त्याचे बापानें त्यास सांगितलें कीं, सासरा कांहीं गोष्टी पुसेल तर कांहींस 'होय' म्हणावें व कांहींस 'नाहीं' म्हणावें. जांवयानें तेवढीच गोष्ट ध्यानांत ठेवली आणि हेतू सोडून व आपली बुद्धी चालविण्याची सोडून दिली. पुढें सासऱ्याची गांठ पडली तेव्हां प्रथम प्रश्न त्यानें केला कीं, "केंव्हां आतांच आला ?" त्यानें 'होय' म्हटलें. दुसरा प्रश्न "व्याह्यांची प्रकृती बरी आहे ?" त्यानें "नाहीं" म्हणून उत्तर केलें. सासऱ्यानें पुसलें, "अहो फार प्रकृती बिघडली आहे काय ?" जांवयानें उत्तर दिलें कीं, "होय." आम्हीं भेटीस गेलों तर भेट होईल कीं नाहीं ? त्यानें "नाहीं" म्हणून जबाब दिला. तेव्हां व्याही घाबरा झाला आणि जांवयास घेऊन व्याह्याचे घरीं आला. तों तो यथास्थित आहे. मग चौकशी केली तों जांवयानें असें सांगण्याचें कारण समजलें. जसा हा मूर्ख जांवई सांगितले शब्दाप्रमाणें वागला आणि बुद्धी चालविली नाहीं, विचार केला नाहीं. तसे हिंदू लोक सांगितल्या शब्दाचे आहेत. त्यांस हेतू समजणें हें ठाऊक नाहीं. याप्रमाणेंच पाठ करणारे लोक आहेत. कोणी गीता पाठ करितो, कोणी विष्णुसहस्रनामाचा पाठ करितो. कोणी सप्तशती वाचतो, कोणी वेद पाठ करितो, परंतु त्याचा अर्थ त्यांस समजत नाहीं. पाठ करणारे लोक भारवाहक व वेडे आहेत; परंतु लोक तें अगदीं विसरले आणि पाठ करणारे लोकांचें फार दंभ वाढलें. मला वाटतें कीं, एक अष्टकच संहिता सार्थ म्हणेल व शास्त्र जाणेल तर तो घनपाठ्यापेक्षां श्रेष्ठ; परंतु पाठ करणारे हे अगदीं मूर्ख आणि मुख्य हिंदू लोक या स्थितीवर येण्याचें कारण व विद्या बुडण्याचें कारण मला हेंच दिसतें कीं, लोक नुसतें पाठ करण्यावर फार प्रीती करूं लागले. तेणेंकरून अर्थ सुटतांच अनर्थ झाला. पाठ करावें म्हणून कोठें कोठें वचनें सांपडतील; परंतु तीं वचनें जांवयाचे बापानें सांगितलेले बोधाप्रमाणें आहेत. तो हेतू सोडला असतां कांहीं उपयोग नाहीं. यास्तव या चाली लोकांनीं सोडून द्याव्या आणि शास्त्राचे हेतू जाणावे हेंच उत्तम. नाहीं तर आणखी विद्येचा संहार होऊन लोक अति नीच अवस्था पावतील. यास्तव जे जे लोक विद्येचे मित्र असतील त्यांनीं सार्थ शिकण्याची पद्धती सुरू करावी

म्हणजे विद्येचा व ज्ञानाचा उद्धार होईल. आणि ज्या पुष्कळ मूर्खपणाच्या चाली आहेत. त्या पोकळ असें समजून लोक टाकतील. अशा चालींतून लोकांस मुक्त करावें हाच ब्राम्हणाचा मुख्य धर्म. परंतु ब्राम्हण पोटार्थी व परस्वाधीन झाले, याजमुळें धर्मसुधारणेस त्यांस तोंड राहिलें नाहीं. व ते ताटाखालचीं मांजरें झाले. विद्या पुढें व्हावी अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं यास झटावें. कारण दोन हजार वर्षांत हिंदुस्थानांत विद्येचें शून्य झालें आहे. आणि फार वाईट चाली लोकांत पडल्या, त्यांचा उपमर्द झाला पाहिजे. आणि विद्येचा विचार करणें हिंदू लोकांमध्यें नाहींसें झालें. याजमुळें त्यांस क्षीणता फार आली, रांडपणा फार आला, शूरत्वहीन झाले, अभिमानरहित झाले, व विचारशून्य व मूर्ख झाले. मागें काय होतें, पुढें काय होईल, येविषयींचा तर्क बुडाला. आज आठशें वर्षांपासून हिंदू लोकांच्यानें स्वराज्य रक्षवलें नाहीं. आठशें वर्षांत मुसलमान, इंग्रज, वगैरे पाळीपाळीनें येऊन येथें राज्य करितात, व आपलेच लोकांचें सैन्य ठेवून आपलेच लोकांस मारतात. याचें कारण "ज्ञानशून्यता." आपले लोकांस राज्यकुशलता असती तर मुसलमान हिंदुस्थानांत शिरून हस्तनापूर, व अयोध्या येथें नबाब बादशहा कशास स्थापन झाले असते? तसेंच कित्येक अनर्थपात मुसलमान लोकांनीं केले ते झाले नसते. परंतु हिंदू लोक अज्ञानांत बुडाले. याजमुळें त्यांचें घरचें त्यांस पाहावयाची शक्ती नाहींशी झाली. हे राजेरजवाडे आहेत, त्यांचेकडे पाहिलें म्हणजे समजतें. त्यांस मुख्यतः ब्राम्हण हे पढतमूर्ख झाले आहेत. त्यांनीं सर्व लोकांच्या विद्या बुडविल्या आणि आपलीही हानी केली. कळावें हे विनंती.

लो० हि०

तारीख २१ जानेवारी १८४१

पत्र नंबर ४४

हिंदु लोकांनीं उद्योग करण्याची आवश्यकता

प्राचीन काळचे हिंदु लोक हे आपले देशांत स्वस्थ होते, परकी लोक या देशांत फार येत नव्हते, व प्रजा थोडी होती, हें प्राचीन काळचे इतिहासावरून कळतें; कारण दक्षणभागीं हिंदुस्थानांत पहिली वस्ती थोडी व अरण्यें फार होतीं. हिंदुस्थानांत उत्तरभागीं मात्र लोक रहात होते व तेही फार थोडे असतील. हें याजवरून दिसतें कीं, त्या वेळचे राजांच्या राजधान्या फार जवळजवळ होत्या. ह्मणजे अयोध्या, मथुरा, कानपूर, हस्तनापूर इत्यादि. याजवरून त्या राजांचें राज्य संक्षेपित होतें यांत संशय

नाहीं. व लोकही विरळा असतील आणि पीकपाणी फार, यामुळें शिल्लक राहत असेल. कारण जितके लोक खाणारे होते, तितक्यांचे उद्योगानें जें पिकत होतें, तें फाजील राहत होतें. याचमुळें आळसाच्या प्रवृत्ती निघाल्या. आतां तसें नाहीं. आतां लोक फार वृद्धिंगत जहाले व त्यांस खावयास मिळत नाहीं; कारण सर्व उद्योग करित नाहींत. जितके लोक उद्योग करितात तितक्याचे उद्योगाचे उत्पन्नावर आळशी लोक फार जाले, त्यांचा निर्वाह होत नाहीं. तथापि उद्योग करण्याचें या लोकांस अजून समजत नाहीं. मुख्यत्वेंकरून ब्राह्मण लोक उद्योगाचे शत्रुच आहेत. ते पहिल्याप्रमाणें पाहातात, परंतु त्यांचे शापाचें ढोंग होतें ते अगदीं गेलें. त्यांस जेवावयास दिल्हें म्हणजे ईश्वर तृप्त जाहाला. त्यांचें मुख तेंच देवाचें मुख. त्यांचा हात तोच देवाचा हात. हें ढोंग लोकांस कळून आलें. हे फुकट खाणारे असे लोक समजतात. परदेशचे लोक या देशांत आले, त्यांणीं तर या ढोंगाची परिस्फुटता फारच केली. सर्व आळशी लोकांस पुरेल अशी सामोग्रीही या देशांत नाहीं. जसें एका घरांत दाहा मनुष्यांचें अन्न असतें, तेथें पंचवीस पाहुणे आले म्हणजे घरच्या माणसांनीं उपाशी राहावें तरच पाहुण्यांचा कांहीं निर्वाह होईल. तशी या देशाची हल्लीं स्थिती आहे. पहिल्यानें मुसलमान या देशांत आले. बाहेरचे लोक जे येतात ते कांहीं मेहेनत करण्यास येत नाहींत. ते आयते खावयास येतात. तेव्हां हजारों मोंगल लोक, नबाब, अमीर, सरदार हे या लोकांचे उद्योगावर खाऊं लागले. मग अर्थांतच या लोकांस कमती पडूं लागली. नंतर आलीकडे इंग्रज इकडे आले. तेही कांहीं इकडे शेतभात मळादळा करण्यास आले नाहींत. ते इकडे श्रीमंत होऊन चार पैसे इकडून घेऊन घरीं जावें, यास्तव येतात. व ते शहाणे आहेत. तेव्हां ते गरीब लोकांप्रमाणें कां खपतील बरें ? त्यांनीं सुखाच्या जागा, मोठालीं कामेंकाजें, उपटलीं. हजारों इंग्रज लोक अमीरांप्रमाणें इकडे येऊन राहातात. व हजारों इंग्रज शिपायी इकडे येतात. इतक्या या लोकांचें पोषण हिंदू लोकांचे मेहनतीनें जें उत्पन्न व्हावयाचें, त्यांतच होतें. वास्तवीक म्हटलें तर फार पाहुणे आले म्हणजे त्यांनीं उपाशीं राहावें; परंतु हे साधारण पाहुणे नव्हत, तर ते शूर, विद्वान, गुणी, व जबरदस्त आहेत. तेव्हां आपले लोकांपुढें ठेविलेल्या पत्रावळी त्यांनीं ओढल्या आणि हे लोक त्यांचें तोंडाकडे पाहात बसले. याजमुळें या लोकांस पाऊस पडूनही दुर्मिक्ष आहे. कोणत्याही देशांत तेथील लोकांचा सुखेंकरून निर्वाह व्हावा इतकें पीक होतें. परंतु जर बाहेरचे लोक त्यांत पुष्कळ आले तर जमिनीनें अन्न सर्वांत कोठून पिकवावें ! याजमुळें हे लोक भिकारी झाले आहेत. अमीरपणा, शिपाईगिरी, राज्यकारभार या लोकांकडे होता. तेव्हां कोणतेही प्रकारचें दुर्मिक्ष नव्हतें. कारण देशांत जें उत्पन्न होत होतें, तें खाऊन ते स्वस्थ होते. ही गोष्ट स्पष्ट रीतीनें कळण्याकरितां मी थोडा अजमास करून हिशेब लिहितों. सरासरी हिंदुस्थानांत एकंदर पांच लक्ष कोस औरसचौरस आहेत. त्यांपैकीं अडीच लक्ष कोस रानें, डोंगर, नद्या, झाडें, घरें, शहरें इत्यादिकांमुळें नापीक आहेत.

ते वजा देऊन बाकी अडीच लक्ष कोस चांगले पिकाचे आहेत, आणि एकंदर या देशांत माणसें दाहा कोट आहेत. तितक्यांना अन्न पाहिजे. तेव्हां याची वाटणी बसविली तर दरएक कोसास चारशें माणसें पडलीं. त्यांत चारशें माणसांपैकीं निंमे स्त्रिया, बाकी दोनशांपैकीं शंभर माणसें उद्योगावांचून म्हणजे आजारी, वृद्ध, बाळें, आंधळे वगैरे व्यंग व व्यापारी, अंमलदार, तमासगीर, श्रीमंत हे सरासरी शंभर. बाकी शंभर राहिले ते: काम करणारे. इतक्यांनीं मेहनत करून चारशें लोकांचा निर्वाह करावा. तेव्हां शंभर माणसें एक कोस जमिनींत खपलीं तर चारशांचें पोट भरण्या-इतकें उत्पन्न करतील, किंबहुना जास्ती करतील. परंतु काळेंकरून लोकांमध्यें श्रीमंती वाढत चालली तों आळशी लोक वाढत चालले. म्हणजे जो एकटा श्रीमंत आहे तो आपणच काम केल्याशिवाय खातो असें नाहीं. त्यास चाकर पाहिजेत, घोडे पाहिजेत, परीट धुवावयास पाहिजेत, शिंपी शिवावयास पाहिजेत, ऊन लागेल म्हणून अब्दागिरी पाहिजे. रस्ता दिसत नाहीं म्हणून मशालजी, चोपदार इत्यादि मिळून तो एकटा पंचवीस माणसें घेऊन बसला. आणखी जों जों श्रीमंती वाढली तों तों गाणारे पाहिजेत, वाद्यें वाजविणारे पाहिजेत. देवपूजा करावयास भट पाहिजे, व पंक्तीस दाहा पानें पाहिजेत हे अनर्थ झाले. तत्रापि सर्वांचा भार शंभर माणसांनीं सोसला आणि सुखेंकरून राहिले, परंतु आतां काय झालें कीं, या लोकांच्या ताटांत इंग्रज लोक, मुसलमान लोक आले ते कांहीं बरोबर घेऊन आले नाहींत. आमच्यापैकीं खावयास आले आणि तेही एकटे खाणारे नव्हत. एक एक असा श्रीमंत कीं, त्याचे मागें पन्नास रिकामे माणूस, कोणी घोडा खाजविणारा, कोणी रथ हांकणारा, कोणी हिशेब लिहिणारा, कोणी कारकून, कोणी कपडे नेसविणारा, कोणी शिजविणारा, कोणी पोराला दूध पाजणारा, असे होते. कारण ते स्वतां कांहीं काम करावयाचे नाहींत. याजमुळें हा समुदाय चारशांमध्यें येऊन पोंचला. व आपले लोक जे श्रीमंत होते ते कांहीं आपली खोड टाकीतना. ते श्रीमंती असावी अशी इच्छा करणार व इंग्रज तशीच इच्छा करणार. तेव्हां दोघांचा निर्वाह चालेना आणि आपले लोक भिकारी होत चालले. ब्राम्हण म्हणतात कीं, आजपर्यंत आम्ही काम कधीं केलें नाहीं व पुढें करणार नाहीं. स्त्रिया काम करावयाच्या नाहींत. तेव्हां इतक्या सर्वांचा निर्वाह कसा होईल? याजमुळें जरूरी येऊन पडली कीं, आपले लोकांनीं श्रीमंती सोडावी. आणि ती सर्व इंग्रजांकडे द्यावी, तरच निर्वाह होईल. व कांहीं काळ असेंच चाललें तर आपले लोकांत एकही श्रीमंत वांचणार नाहीं; कारण श्रीमंती राहाणें अवघड पडेल. इतक्यांचा निर्वाह होत नाहीं. याजमुळें हे लोक अर्थातच भिकारी झाले. त्यांत आणखी या देशांतील कामें व व्यापार इंग्रजांनीं घेतले. जड्ज तेच, माजिस्त्रेट तेच, वस्त्रें विकणारे तेच, माल आणणारे तेच, टंकसाळ घालणारे तेच, व शिपाई तेच. इतक्या लोकांचीं कामें पूर्वी आमचे लोकांमध्यें होतीं, तेव्हां ठीक होतें. परंतु तीं सर्व त्यांचे हातीं गेलीं, तेव्हां ज्या

ज्या लोकांचीं कामें त्यांनीं घेतलीं ते ते लोक रिकामे झाले. आणि उपाशीं मरूं लागले. यांत त्यांनीं इतक्य सर्वांस अन्न कोठून पुरवावें ? तेव्हां परिणाम असा होईल कीं, आपले लोक सगळे शेतभात करणारे होतील. आणि श्रीमंत, सावकार, व अंमलदार इंग्रज होतील. जितकी मेहनत करून पिकवावयाचें काम तितकें आपले लोकांकडे राहील. जितकें सुखानें खाऊन राहावयाचें काम तितकें ते लोक बळकावतील. तेव्हां अर्थांतच हे लोक भिकारी झाले. परंतु इतकी मजल येऊन पोंचली नाहीं. कारण अद्याप कोठें कांहीं संस्थानें आहेत व तीं जरी धुंदींत आहेत तरी द्रव्यवान आहेत. याजमुळें चार माणसांचा निभाव होतो व हिंदू लोक चार सुखी आहेत, असें नजरेस पडतात. परंतु हें फार दिवस चालणार नाहीं. कारण जीं संस्थानें आहेत तीं मृतप्राय होऊन राहिलीं आहेत. कोणामध्यें शहाणपण नाहीं. तीं एका पाठीमागून एक जाणार. अस्तु. असा प्रसंग आला तेव्हां आपले लोकांस सुखी होण्याची युक्ती कोणती म्हणाल तर अशी आहे कीं, जितके इंग्रज लोकांचे व्यापार व रोजगार इकडे कमी होतील तितकें त्या लोकांस जास्ती सुख आहे. याजकरितां या लोकांनीं विद्या व ज्ञान यांचे प्राप्तीस झटावें व इंग्रजांप्रमाणें शहाणें व्हावें, आणि जे व्यापार ते करतात ते आपण करावे. कोणी म्हणतील कीं, त्यांस द्रव्य अनुकूल आहे. आणि या लोकांजवळ द्रव्याची अनुकूलता नाहीं, तर ही गोष्ट खरी; परंतु त्याचा निर्णय आज लिहिणें जरूर नाहीं. जेव्हां सर्व लोक पुढें सरावे अशी इच्छा करतील व रानटीपणाच्या समजुती सोडून देतील तेव्हां अनुकूलता सहज होईल. ही विनंती.

लो० हि०

प्रभाकर ता० २८ जानेवारी १८४८

पत्र नंबर ४५

हिंदुस्थानाच्या पराधीनतेचीं कारणें

विनंती विशेष. इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानचें राज्य घेतलें या गोष्टीविषयीं लोकांस भृगूळ वाटतें आणि ब्राह्मण लोक म्हणतात कीं, त्यांची सद्दी आहे. ब्राह्मणांहून कुळंबी वगैरे लोक यांस तर राज्य कोण करितो याची खबरच नाहीं. याविषयीं लोकांस कांहीं वर्तमान कळलें असतां फार उपयोग जाणून मी संक्षेपेंकरून लिहितों. प्रथम मला हिंदुस्थानचे लोकांचे स्थितीचें वर्णन केलें पाहिजे. म्हणजे त्याजवरून इंग्रज लोकांचे इकडे पाय रोंवले कसे यांचीं कारणें स्पष्ट होतील. मला वाटतें कीं, हिंदू लोकांचें महात्म

सृष्टी उत्पन्न जाहाल्यापासून काय असेल तें असो. परंतु पांडवांचे वेळेस हिंदु लोक मोठे ऐश्वर्यास आले आणि विद्या वगैरे त्यांणीं फार चित्त लाऊन शोधून काढिल्या. मोठे मोठे विद्वान व बुद्धिमान म्हणजे व्यास, वाल्मिक हे कवी, नारदासारिखे गायन-शास्त्री, कपिलासारखे शास्त्रज्ञ, अर्जुनासारिखे युध्धकर्ते, धर्मासारिखे सत्यवक्ते इत्यादि प्रकारचे उत्तम लोक त्या काळीं होऊन गेले, आणि असे विद्वान, विचारशील लोक ज्या देशांत असतील त्या देशांत कांहीं न्यून पडेल हेंही अशक्य आहे. परंतु त्या समयीं संपूर्ण जगांत ऐश्वर्यवान प्रदेश एवढाच होता. याजमुळें हिंदुलोकांनीं आपले देशचें आपले भाषेचें व आपले विद्येचें पराकाष्ठेचें वर्णन केलें आणि हें कांहीं आश्चर्य नाहीं. सांप्रत इंग्रज लोक तसें करितात; परंतु हिंदु लोकांनीं पृथ्वीचें स्वरूप त्याकाळीं कसें आहे, व देश कोणते कोठें आहेत, येविषयीं विशेष शोध केला नाहीं. आणि करण्याचें कारणही नव्हतें. कारण हे लोक स्वस्थ बसून आपले देशांत जें निष्पन्न होईल तें खाऊन स्वराज्य यथास्थित करीत होते. लोकही चांगले व राजेही चांगले होते. प्रजेस पीडा वगैरे कांहीं होत नवती. तेव्हां परदेशांत जाणें किंवा व्यापार करणें समुद्रांतून नौकारूढ होणें हे विषय पाहाण्याचा प्रसंग त्यांस नवता. येणेंकरून हे लोक जसें आईबापाचें द्रव्य पुष्कळ असतें आणि घरांत मुलगा तें खाऊन वाढतो, त्यास दरवाज्याबाहेर काय आहे, हें ठाऊक नसतें, तसे हे लोक अभोवाळ वाढले. नंतर काळेंकरून त्यांणीं विद्या जास्त वाढविण्याची सोडून दिल्ही. कारण कीं, त्यांस आपले महत्त्वाचा आणि सुखाचा अनुभव फार आला. तेव्हां पांडवांपासून आलीकडे दोन हजार वर्षें सुमारें तरी त्यांणीं विद्येवर चित्त बरेंच ठेविलें होतें, असें त्यावेळेस ज्योतिःशास्त्रावर व लीलावती वगैरे ग्रंथ जाहाले त्याजवरून दिसतें व कांहीं पुराणें व महात्मेंही पुढें लिहिलीं गेलीं आहेत. पुढें काळेंकरून संस्कृत भाषा सुटोन प्राकृत भाषा जाहाल्या. तेव्हां असा भ्रम पडला कीं, प्राकृत भाषण बोलावें आणि ज्यास विद्या पाहिजे त्याणें संस्कृत पढून विद्या शिकाव्या. कारण कीं, प्राकृत भाषेंत ग्रंथ नाहींत हें एक कारण. दुसरें असें कीं, जों जों प्राकृत भाषा वाढत गेली तों तों संस्कृताचा आंधार जाहाला; विद्या जास्ती वाढविणें राहिलें आणि लोकांची अशी समजूत पडली कीं, ज्याणीं संस्कृतांत ग्रंथ लिहिले ते देव होते; आणि तसे ग्रंथ लिहिणें हें कांहीं मनुष्याचें काम नव्हे, हें दुसरें कारण. तिसरें कारण असें आहे कीं, ब्राह्मणाचीं कुळें कायम जाहालीं. येणेंकरून जो ब्राह्मण मूर्ख, विद्या शिकत नाहीं, त्यास असें भय राहिलें नाहींच कीं, मूर्खपणामुळें नीचत्व येईल. त्यास असें वाटूं लागलें कीं, माझा जन्म ब्राह्मण कुळांत आहे. मग मी विद्या शिकलों काय, नाहीं काय, एकच आहे. माझा ब्राह्मणपणा कोणी नेत नाहीं. मला इतर लोक कुळामुळें पूज्य म्हणतील आणि माझे पायाचें तीर्थ घेतील, यांत संशय नाहीं. चवथें कारण असें दिसतें कीं, देशांत राहाणें वगैरे जे प्रतिबंध पूर्वीचे शास्त्रकारांनीं केले त्यांचे हेतु न जाणून त्यांस धर्म म्हणूं लागले. पांचवें कारण असें दिसतें कीं,

कलियुग निघालें आहे याजमुळें लोकांचा नाश व दुर्गुणप्रवृत्ती व्हावी, हा ईश्वरसंकेत आहे, असें भय शास्त्रकारानें लिहिलें आहे. तरी त्याचा हेतू न जाणून लोक ते यथातथ्य मानूं लागले. साहावें; प्रारब्धवाद म्हणून जें घडतें तें पूर्वींच ईश्वर लिहितो तें कोणत्याही उद्योगानें फिरावयाचें नाहीं. सातवें; पूर्वींचे लोक ऋषि व देव होते. मनुष्य नवते, यास्तव जें वडील करीत आले तेंच करावयाचें, नवीन मार्ग काढावयाचा नाहीं. आठवें कारण ज्या ज्या गोष्टी, चाली, रीती, लोकांमध्यें आहेत, त्या सर्व धर्म; चालू व्यवहार धर्म; ईश्वरभक्तीही धर्म; पागोटें, धोतर, आंगरखा घालावा हें सर्व धर्मामध्यें मोडूं लागलें. ही समजुत विलक्षण लोकांची पडली. या आठ कारणांचें नांव मीं "हिंदुनाशाष्टक" ठेविलें आहे. या कारणांनीं लोकांनीं विद्या वगैरे सर्व सोडून देऊन स्वस्थ घरांत बसले व परकी लोक त्या काळीं अगदीं मूर्ख अवस्थेंत होते. याजमुळें त्यांचा शोध किंवा वार्ता याणीं कांहीं काढिली नाहीं. आणि म्हणून या सर्वांस म्लेंच्छ नांव देऊन टाकलें. याप्रमाणें या देशांत वर्तणूक जाहाली. हिंदु लोकांस कांहीं किंचित ज्यागृती व्यासापर्यंत होती. त्यापुढें जी दृढ झोंप लागली ती आजपर्यंत तसी आहे. ती असी कीं, या लोकांमध्यें येकचित्त नाहीं. आपले देशांत कोण राज्य करतो याची खबर नाहीं. जो कोणी राज्य करील तो विष्णूचा अवतार ही एक मूर्खपणाची समजुत पडली. पिठोरा राजा हस्तनापुरीं क्षत्रीयवंशीं शेवटचा जाला, त्यास मुसलमानांनीं मारून राज्य घेतलें त्यास आठशें वर्षें जाहालीं. परंतु त्या गोष्टीचें वाईट कोणांस वाटलें नाहीं. शास्त्री, पंडित, भट हे मुसलमानाचेच आर्जवेंकरून पोट भरूं लागले. ब्राह्मण कारकुनपणा, शिलेदारी, सरदारी स्वीकारून चाकऱ्या करूं लागले. तेव्हां विद्येचा अंधःकार फार माजला. कारण कीं, ब्राह्मणांनीं युक्तीनें आपले स्वाधीन विद्या ठेविली व इतरांस शिकवूं नये, असा धर्म लाऊन दिल्हा; आणि आपण शूद्राचें कर्म अंगिकारिलें. तेव्हां मग विद्या कशानें राहील? विद्येबरोबर सर्व ऐश्वर्य गेलें व शूरत्व गेलें. देशाभिमान नाहींसा जाहाला. जसीं पुष्ट बकरीं व्याघ्रास सांपडतात, तसे हे लोक मुसलमानांस सांपडले. पूर्वकाळीं यवनादिक मुसलमान म्हणजे यवन इकडे आले असें ग्रंथांतरीं आहे, परंतु ते इकडे राहिले नाहींत, हा त्यांचा मूर्खपणा होय. आलीकडे यवन लोक पहिल्या मूर्खपणांतून निघाले आणि हुशार जाहले. त्याणीं आतां केवळ स्वारी करून परत जावें तसें केलें नाहीं व हस्तनापुरचे सिंहासनारूढ होऊन बसले. परंतु ब्राह्मण लोक हे आपले घरीं आले ह्मणजे सोंवळें करितात, व यवनाचा विटाळ जाहाला म्हणून म्हणतात. तथापि त्यांस राज्य करावयास त्यांनीं हरकत केली नाहीं व कितीएक लोक मुसलमानांवर इतके फिदा जाहाले कीं, राज्य करणें व शूरत्व करणें हें काम मुसलमानांचें होय, इतरांस यावयाचें नाहीं, असें म्हणूं लागले. परंतु त्या मूर्खांस असें समजत नाहीं कीं, आठशें वर्षांपूर्वी हिंदु राजे जाहालेले पांडव, राम, परशुराम, हे मुसलमान होते कीं काय? आणि त्या मूर्खपणाचें बीज मनांत ठेऊन त्याच स्थितींत हिंदु लोक राहिले. त्यांस

परदेशाची किंवा स्वदेशाची लांबीरुंदी देखील ठाऊक नाहीं. हिंदुस्थानचे लोकांस दक्षण ठाऊक नाहीं. दक्षणेंत नेपाळ ठाऊक नाहीं. कोणी म्हणतात ती पूण्यभूमी; कोणी म्हणतात ही राक्षसभूमी व त्या गोष्टींना शास्त्री मान डोलवितात, यांचा मूर्खपणा किती आहे. त्यांस असें कांहीं वाटत नाहीं कीं, आपले देशांत हे यवन लोक आले हे कोठले; यांस इकडे वस्ती करूं द्यावी कशाकरितां, व यांस हाकून देण्यास आम्हांस कांहीं शक्ती नाहीं कीं काय? सर्व हिंदूलोक निर्बळ व अपौरुष आहेत कीं काय? परंतु ही गोष्ट विसरले आणि सोंवळें घरांत आलें. देश सोंवळा राखावयाचा विसरले आणि जो तो आपला स्वार्थ पाहूं लागला. अशा अवस्थेंत असतां मुसलमानांनीं राज्य घेतलें. तें राज्य मुसलमान लोकांचे मूर्खपणानें बुडावयाची संधी आली, तों इंग्रेजांचा प्रवेश जाहाला. त्यांणीं तर हेच लोक चाकरीस ठेऊन याच लोकांच्या तोंडांत मारिल्या; परंतु हिंदु लोकांचा असा मूर्खपणा आहे कीं, इंग्रज आले कधीं, कोठले, कोण हें त्यांस अद्याप माहीत नाहीं. पेशव्यांचे वेळेस कोणते राजानें याचा विचार केला नाहीं. आतां मात्र दक्षिणेंत इंग्रज ठाऊक जाहाले. तसेंच आतां कोणत्याही हिंदु लोकांच्या संस्थानांत जाऊन पाहावें तरी हीच वृत्ती लोकांची आढळते. भट जेवणापुरती काळजी करितात. सरदार, ग्रहस्थ पैका मिळवण्यापुरती काळजी करितात; आणि स्वस्थ बसतात. मग असें होईल हें काय आश्चर्य आहे? हे विनंती.

लो० हि०



ता० ४ फेब्रुआरी १८४१

पत्र नंबर ४६

इंग्लिश राज्याची आवश्यकता

विनंती विशेष. मागील पत्राचा विषय आणखी लिहिण्याचा आहे तो असा कीं, इंग्रज लोक यांनीं इकडे राज्य संपादन केलें, याचें कारण काय? याचा विचार करितां दिसतें कीं, हिंदू लोकांमध्यें मूर्खपणा वाढला तो दूर होण्याकरितांच हे गुरू दूर देशांतून इकडे ईश्वरानें पाठविले आहेत. पाहा, हिंदु लोकांस हा मोठा लाभ आहे कीं, इंग्रज लोकांचे राज्यामुळें हिंदुलोकांस जागृती जाहाली. व पृथ्वीवर काय काय आहे हें कळूं लागलें. ज्यास कोकणापासून पुण्यापर्यंत प्रदेश ठाऊक त्यास पूर्वींचे लोक मोठा माहीतगार असें म्हणत. परंतु आतां बहुतांस इंग्रेजांचा देश इंग्लंड व अमेरिका माहीत झाली. हें सर्व इंग्रेजांमुळें झालें. ईश्वरानें ही शाहणपणानेंच योजना केली आहे.

लोकांची झोंप जाण्यास दुसरा इलाज नवता. सती जाणें, जळसमाध घेणें, पोरें मारणें, प्रयागास करवत घेणें, जगन्नाथास रथ उरावर घेणें, व हिमालयांत स्वर्गास जाणें इत्यादि आघोरी आणि लज्जाप्रद चालींमुळें ईश्वराचा क्षोभ अत्यंत जाहाला. तेव्हां दुष्ट लोकांस ताब्यावर आणण्यास ईश्वरानें इंग्रज सरकारची योजना केली; परंतु त्यांनीं न्यायानें राज्य मिळविलें किंवा कसें याविषयीं कोणास अंदेशा वाटेल म्हणून त्यांचें इकडे राज्य स्थापन जाहालें त्याचा इतिहास पाहिला त्याजवरून माझें मत असें झालें आहे कीं, इंग्रेजांनीं यथान्याय वर्तणुकेनें राज्य घेतलें, आणि ईश्वरानें त्यांस हें राज्य असे प्रकारानें दिले कीं, त्यास कोणी दोष ठेवणार नाहीं. पाहा, प्रथम हिंदुस्थानांत मुसलमान लोकांचा अम्मल होता व त्यांनीं संपूर्ण देश व्याप्त केला होता. त्यांचें राज्य मोडावयाचे संधीस इंग्रज येथें आले; तेव्हां जागोजागचे नबाब व निजाम वगैरे हे आपले यजमानास सोडून आपले ठिकाणीं अम्मल हातीं लागेल तितका बळकाऊन बसले होते; तेव्हां इंग्रजांस ठीक संधी सांपडली. आणि ते प्रथम इकडे आले तेव्हां त्यांनीं दुकानास जागा घेतली ती मुसलमानाचे परमानगीवरून, सुरतेस व कलकत्त्यास घेतली. पुढें तेथें ते व्यापार करून स्वस्थ होते; परंतु त्यांस हे लोक चैन पडूं देईनात. इंग्रज लोकांचा मुळचा असा संकेत होता कीं इकडे राज्य घेऊं नये; फक्त व्यापार मात्र करावा. परंतु हे लोक त्यांस राहूं देईनात. कधीं त्यांचीं दुकानें लुटीत, कधीं खंडणी मागत, तेव्हां ते तह करूं लागले, तरी ते तह सोडून वर्तणूक करूं लागले. इकडील देशचे लोकांत वचनाचा प्रमाणिकपणा, खरेपणा, व शूरत्व कमी, आणि द्रव्याचा लोभ फार. याजमुळें दौलत वाढवावी हा हेतु फार; परंतु कशी वाढवावी तें न्याय मानसुबीचा बंदोबस्त ठेऊन धारा कमी करून प्रजा सुखी ठेवण्याचें ज्ञान नाहीं. सन १७५७ सालीं १३० गोरे लोकांस कलकत्त्याचे नबाबानें खोलींत कोंडल्यामुळें ते ठार झाले. तेव्हां इंग्रेज लोकांस लढाई करणें प्राप्त जाहाली; आणि त्यांस जयहि मिळाला. तेव्हां आपले ठिकाणाचें रक्षण करण्याकरितां सभोंवताला मुलूख आपलेकडे घ्यावा लागला. एक वेळ मनुष्याचें तोंड दुधानें भाजलें ह्मणजे ताक फुंकतात. तद्वत् इंग्रेज लोकांनीं इकडील लोकांचा भरवसा सोडून दिला. कारण त्यांचें त्यांस कांहींच प्रमाण वाटेना. आणि दाहावीस कोसपर्यंत त्यांस हद्द करून दिली कीं, इतक्याचे आंत तुम्ही येऊं नका. तत्रापि तोही करार मोडला. तेव्हां मुलूख हस्तगत करून राज्य घ्यावें लागलें. याप्रमाणेंच दक्षिणेची अवस्था झाली. बाजीराव सन १८०२ त पळून जाऊन आपले बापाचे खेही इंग्रेज यांचे पाठीस पडला. आणि त्यानें त्यांची प्रार्थना केली कीं, होळकरानें माझें शहर लुटिलें व शिंदे, होळकर, भोसले माझ्याशीं वितुष्ट करितात. तेव्हां पुनः गादीवर माझें स्थापन करणार समर्थ तुम्ही आहां. तेव्हां तह जाहाला व मुलुख देण्याचा वगैरे करार जाहाला. नंतर इंग्रेजांनीं मदत करून त्यास गादीवर बसविलें, परंतु त्यांस करारा-प्रमाणें मुलूख देईना तरी त्यांणीं युद्धास आरंभ केला नाहीं. पुढें १८१७ त विश्वासघात

करून बाजीरावानें लढाई आरंभिली. तेव्हां तो शासना पात्र जाहाला, आणि पेशवे यांचा अमंलही वाजवी नवता. त्यांणीं सातारचे राजापासून बळकावलेला अधिकार होता. व बाजीरावाचें कर्म चांगलें नवतें. भट व भडवे मात्र त्याची स्तुती करित. दुसरे सर्व त्यास कंटाळून राहिले होते. व इंग्रेजांस सर्व वश होते. तेव्हां इंग्रेजांनीं मुलुख घेतला. असे रीतीनें त्यांस मुलूख प्राप्त जाहाला तो त्यांनीं घ्यावा किंवा न घ्यावा असें कोणी विचारील तर त्याचें उत्तर असें आहे कीं, अलपिष्टन साहेब यांस जें मानपत्र राजे वगैरेंनीं दिलें, त्यांत स्पष्ट लिहिलें आहे कीं, तुम्ही राज्य घेतलें हें बरे जाहालें. राज्यांतील लोक मूर्ख त्यांस शाहणें करणें जरूर आहे. अशा लोकांस सोडून देणें व पुनः बाजीरावासारख्या मूर्खाचे हातीं देणें हें काम वाईट व अधर्म आहे. जसें आंधळ्याला रस्त्यांत पावसांत सोडावें तद्वत् होतें. यास्तव इंग्रेजांनीं दक्षण घेतली हें वाजवी व न्यायाप्रमाणें आहे. जर त्यांणीं हा मुलूख लोक शाहाणे होत तोंपर्यंत सोडिला, तर ते गुन्हेगार होतील. परंतु त्यांनीं इकडील लोकांस त्वरित शाहाणे करून जसें मुलास वाढवावें व वाढलें म्हणजे सोडावें, तद्वत् करणें योग्य आहे. इंग्रेज सरकाराचा या देशांत मोठा धर्म हाच आहे कीं, त्यांनीं विद्या वाढऊन या लोकांस शाहाणें करावे आणि जेव्हां स्वदेशाचें राज्य करण्याचें व्यवहारिक ज्ञान यांस येईल आणि हे पृथ्वीवरची हकीगत सर्व जाणतील आणि दुर्गुण सोडितील, तेव्हां हें राज्य त्यांनीं यांचे हवाली करावें. परंतु जर हल्लीं या लोकांचें आधीन राज्य होईल तर पहिल्यापेक्षां अनर्थ फार होतील. कारण कीं, आपले लोक फार भ्रष्ट आहेत. व त्यांचीं अंतःकरणें फार मळीन. ते द्रव्याकरितां दुराच्यार करितात. पाहा की, कोणी अंमलदार या देशाचा असला म्हणजे तो फार जळजळाट करितो, व आपला अधिकार प्रघट करण्याकरितां व लांच खाण्याकरितां छळितो. म्हणून रयत त्यास राजी नसत्ये. इंग्रेज लोकांवर रयत राजी असत्ये, याचें हेंच कारण आहे. आपले लोक कधींही नीट वागत नाहींत व आपले लोकांचा आपसांत मत्सर, द्वेष इत्यादि फार असतो. तेव्हां असे मूर्ख लोकांचे हातीं राज्य असणें हें दुर्भाग्य आहे. स्वदेशीय राज्यें हल्लीं आहेत त्यांत काय गर्दी आहे ती पाहावी. म्हणजे बाजिरावाचें मूर्तिमंत राज्य डोळ्यांपुढें उभें राहतें. मक्ते मामलेदार चढकरून रयत लुटतात, जमा येते ती रांडा, गोंधळी, भट, आर्जवी, ढोंगी वगैरे खाऊन जातात. हेंच बाजीरावानें केलें व अद्याप मराठी राज्यांत हेंच आहे. पाहा म्हणजे खातरी होईल. उजाडलें किंवा मावळलें याची त्यांस खबर नसत्ये. फक्त जनावराप्रमाणें खाणें निजणें एवढ्यापुरती त्यांस काळजी. तिसरी गोष्ट ते पाहात नाहींत व सामान्यतः ब्राह्मण वगैरे हिंदू लोक यांची समजूत असी आहे कीं, सर्व उद्योग व विद्या पोटाकरितां. दुसरा अर्थ कांहीं नाहीं. याजमुळें लोक हिताचे उद्योग, विद्या, ज्ञान, हीं वाढविण्याची मेहनत त्यांस होत नाहीं. हे विनंती.

लो० हि०

ता० ११ फेब्रु० १८४१

पत्र नंबर ४७

दया

विनंती विशेष. हिंदु लोकांचीं अंतःकरणें पराकाष्ठेचीं थंड आहेत. हीं उष्ण करण्यास महान उपाय पाहिजेत. त्यांत मुख्यतेंकरून ब्राह्मण लोक फार निर्दय व शैत्यांतःकर्णी आहेत. असे कीं, जर कोणी मरत असला तर किंवा दुखणेकरी असेल तर ते त्याजकडे पाहिल्याशिवाय वाटेनें स्वस्थ जातील. या दुर्गुणाची निंदा पुराणांत कोठें कोठें केली आहे. त्याजवरून असें सिद्ध होतें कीं, हा दुर्गुण प्राचीन काळापासून या लोकांत आहे. एके ठिकाणीं व्यासांनीं अलंकारपूर्वक असा हा दुर्गुण वर्णन केला आहे कीं, एके समई श्रीशंकर व पार्वती हे संवादांत म्हणाले कीं, शिवांनीं काशीक्षेत्र निर्माण केलें त्याठिकाणीं जे लोक जातात, ते सर्व मोक्षास जातील कीं काय? असें पार्वतीनें पुसलें. तेव्हां शंकर म्हणाले कीं, काशीस जाण्यानें सर्वांस मोक्ष होतो असें नाहीं. जे सदयअंतःकरण आहेत ते जरी गेले न गेले तरी मोक्षास पात्र आहेत. तेव्हां याची प्रचीती दाखवावी म्हणून उभयतां कैलासाहून निघालीं. एकानें व्याघ्र स्वरूप व एकीनें गायत्री स्वरूप धारण केलें. आणि काशीचे वाटेवर यात्रेमध्यें चिखल होतो त्यांत गाय बुडाली आहे; आणि पलीकडे कोरडी जागा आहे तेथें व्याघ्र उभा आहे व तो गाईवर टपून बसला आहे, असें दाखविलें. त्या वाटेनें हजारों लोक जात होते, पण ते सर्व यात्रेवर नजर देऊन गाईची मोकळीक न करतां पुढें गेले. एक ब्राह्मण मात्र दयावान् होता. त्याच्यानें पुढें जाववेना, तेव्हां त्यानें वाघावर शस्त्र धरून त्यास पळऊन लाविलें, आणि गाईस बाहेर काढिलें. त्यासमयीं शिवास पार्वतीनें सांगीतलें कीं, इतक्या यात्रेमध्यें एवढा मात्र प्राणी मोक्षास पात्र आणि यास मात्र यात्रेचें फळ आहे. कारण त्याची वासना सत्कर्मावर आहे. बाकीचे लोक सत्कर्मास न जाणून यात्रा मात्र जाणतात, ती निर्फळ होय. याजवरून तात्पर्य असें कीं, दया हें मोठें स्वर्गाचें द्वार आहे; परंतु सांप्रतकाळचे लोक आमचे पाहाण्यांत असे आले आहेत कीं, त्यांचीं अंतःकरणें पाषाणाप्रमाणें कठिण आहेत. ते आपले आंगावर दहा हजारांचें जवाहीर व शंभर रुपयांचा पोषाक वापरतील; परंतु जवळ एक भिकारी चिंध्या पांघरलेला आणि उपाशी दीनवाणीनें मागावयास आला, तर त्यास कांहीं देणार नाहींत. अशा गोष्टीची त्यांस लज्जा वाटत नाहीं व दुसऱ्याचें दुःख पाहून मनास कोमळता येत नाहीं. वास्तवीक पाहिलें असतां, जे श्रीमंत आहेत त्यांणीं गरिबास पाहिलें म्हणजे त्यांस लज्जा यावी. आणि अंतःकरण विरघळावें. कारण कीं, भिकारी आणि श्रीमंत यांचे शरिरामध्यें किंवा बुद्धीमध्यें कांहीं फरक नसतो. इतकेंच कीं, काळेंकरून एकानें दुसऱ्याचें हरण

करून फार माल जमविला असतो व दुसऱ्याचा तो हरण जहाला म्हणून तो भिकारी असतो. ईश्वरानें पृथ्वीवर पदार्थ निमार्ण केले, हे सर्वांस सारखे पोंचावे हा त्याचा हेतु होय. परंतु मनुष्यामध्यें जितकें शहाणपण तितकाच मूर्खपणा आणि अज्ञान आहे. याजमुळें पन्नास लोकांस लुटून येक श्रीमंत होतो. पन्नास कुळंबी गांवांतील नांगर धरून मेहनत करतात आणि एक जहागिरदार किंवा इनामदार त्यांस कोंडा ठेऊन त्यांचे दाणे घेतो आणि आपण रेशीमकांठी धोतरें नेसतो व कामकाज कांहींएक करित नाहीं हें महात्म एकाचें; आणि दुसरे गरीब विचारे इनामदारापेक्षां शहाणे असले तरी आपले मेहनतीचा हिसा त्यास देतात हें आश्चर्य आहे. आणखी जर एक गोष्ट सांगीतली तर ये विषयीं पक्की खातरी होईल. प्राचीन काळीं एक विचारशील मनुष्य शेतांत वसत असे. आणि भिक्षा मागून खाई. त्याणें एक दिवस पाहिलें कीं, एक विलक्षण जनावरांची टोळी, जिचें नांव जाणते पक्षी, ते सरासरी दोनरों त्या शेतांत आले, तेव्हां दाणे पुष्कळ पडले होते ते सर्वांनीं सारखे खावे तें सोडून त्यांनीं काय केलें? त्या पक्ष्यांपैकीं एक रोगिष्ट व निर्बळ होता. त्यास त्यांनीं एका पारावर बसविलें आणि बाकीचे सर्व शेतांत जाऊन त्यांनीं आपले आपले शक्तीप्रमाणें दाणे जमा करून त्या रोगिष्ट पक्ष्याजवळ आणून रास घातली. आणि आपण कांहीं न खातां त्या पक्षिराजाच्या सभोंवते बसले आणि तो पक्षिराज त्या दाण्याचे राशीवर नाचे आणि उडवी. परंतु कोणास कांहीं देत नसे आणि या कर्मास त्या पक्षांपैकीं बलिष्ट पक्षी होते ते सहाय्य होऊन इतर पक्षी जरी क्षुधेनें व्याप्त होते, तत्रापी त्यांस कांहीं खाऊ देत ना. जरी त्यांनीं आणून ती रास घातली होती, तरी त्या राशीपैकीं कोणी खावयास लागला, तर सर्व पक्षी एकत्र जमून त्या अपराधी पक्ष्यास मारून टाकीत. असे दोनचार पक्षी मारले. हें त्या पाहाणाऱ्या मनुष्यास आश्चर्य वाटून तो आपले मित्राकडे गेला आणि त्यास त्यानें हें वर्तमान विदीत केलें. आणि म्हणाला कीं, पक्ष्यांची जात काय मूर्ख आहे? आपण उपाशीं मरतात आणि रोगिष्टाकडून आपण संचय केलेलें धान्य नाशिवतास. तेव्हां तो म्हणूं लागला कीं, अरे बाबा, याचें तुला आश्चर्य कां वाटलें? या गोष्टी तर प्रत्येक दिवशीं मनुष्यांमध्यें पाहाण्यांत येतात. एक राजाचें क्षयरोगी पोर असतें; परंतु त्याचे सर्व लोक आर्जव करितात आणि त्यास सर्व दौलत देतात व आपण उपाशीं मरतात. बरें त्याणें स्वतां कांहीं तरी काम केलें आहे काय? नाहीं. तत्रापी लोक आंधळ्यासारखे त्यास बळिष्ट मानितात आणि त्यास किनखापाच्या, मखमलीच्या कापडावर बसवितात व त्याच्याहून हजार पट शहाणे असतात, ते भीक मागतात. चिंध्यादेखील त्यांस मिळत नाहींत. आणि राजाचे घरीं कोणी एक पैसा चोरला तर त्यास फांशीं देतात व त्यास सर्व वाहावा म्हणतात आणि न्याय चांगला झाला म्हणतात, याणें चोरी कां करावी? अशीं आश्चर्यें लोकांमध्यें आहेत. याजवरून जितके श्रीमंत व जितके थोर पदवीस आलेले आहेत, त्यांस असें वाटतें कीं, आम्ही नालायक असून हें आम्हांस प्राप्त जहालें आहे. याजवर आमचे

हक्क, परंतु ही समजुत मूर्खपणाची आहे. आपणाहून लहान लोकांचे सुखाकडे याचा उपयोग करावा, म्हणजे याचें सार्थक जहालें. मला वाटतें कीं, प्राचीन काळचे शास्त्रकारांनीं ब्राम्हणास भिक्षा मागावयाचा धर्म लाऊन दिला आहे त्याचें कारण हेंच दिसतें कीं, भिक्षान्नासारखें दुसरें अन्न पवित्र नाहीं, ही गोष्ट खरी आहे. परंतु जे श्रीमंत आहेत, त्यांस क्षणभरही पश्चात्ताप होत नाहीं. ज्यांणीं धर्मानें द्रव्य संपादन केलें आहे, असा हजारांत एक सांपडेल. बाकी तर लबाडीनें द्रव्य मिळविलेले आहेत. त्यांत हिंदु लोकांमध्यें तर क्वचित् धर्मवान् श्रीमंत आहेत. श्रीमंतांस असें वाटतें कीं, आम्ही या मालाचे मालक आहों. आम्हांस हे भिकारी त्रास कां देतात ? परंतु वास्तवीक पाहिलें तर त्यांस लाज वाटावी हेंच योग्य. कारण कीं, ते जें सुख भोगितात तें लोकांचे मूर्खपणामुळें भोगितात. तेव्हां त्या मूर्खांवर कांहीं तरी दया करणें योग्य आहे. यास्तव सर्व धर्मांत दान देणें हा मोठा धर्म सांगितला आहे. सर्व धर्म याविषयीं मिळतात. मोक्षाचा मार्ग दानधर्म आहे. परंतु हिंदू लोकांस दानधर्म कर्ण्याची सवई आहे, तो दानधर्म नव्हे. वास्तवीक धर्म असा कीं, दुसऱ्याचें जें न्यून आहे तें परिपूर्ण करावें, आणि लोकांस ज्ञानवृद्धी करून शहाणें करावें; परंतु हा धर्म या लोकांस कळत नाहीं. हिंदु लोकांमध्यें येकमेकाचा कळवळा अगदीं नाहीं. उलटे एकमेकांचा नाश करून त्यांत थोरपणा मानणारे बहुत आहेत. जर अन्यायानें एकाचा नाश जाहाला तर इतर स्वस्थ जाग्यावर बसून त्याचे हाल पाहातील. एकावर अन्याय जहाला तर सर्वांनीं त्याचा न्याय होण्याकरितां मदत करावी, हें शहाणपण त्यांस नाहीं. यास्तव मुसलमानांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केला, इंग्रेज लोकही आले व पुढेंही कितिएक येणार. परंतु या लोकांस दुःख व अन्याय सोसण्याची चाल व संवय पडली आहे. तिची त्यांस कांहीं लाजच वाटत नाहीं व दया नाहीं. म्हणून हे अनर्थ या देशांत आहेत. आणि लोक एकामेकाचें अंतःकरण जाणण्याजोगे शहाणे होतील तोंपर्यंत हे अनर्थ दूर होणार नाहींत, असें मला खचीत वाटतें, हे विनंती.

लो० हि०

ता० १८ फेब्रुआरी १८४१

पत्र नंबर ४८

ब्राह्मण लोकांचा स्वभाव

विनंती विशेष. हिंदु लोकांमध्यें निर्लज्जपणा हें एक त्यांचे दुःखास मोठें कारण आहे. पहा, एकजण लांच खातो व त्यास सरकारांतून शासन होऊन त्याची धिंड

काढितात, हें पाहून लोकांस दहशत पडावी, परंतु तें कांहीं नाहीं. जे त्याचे कामावर बसतात ते लागलेच लांच खाऊं लागतात, तसेंच इतर सर्व गोष्टींमध्यें. दुर्गुणास लोक भीत नाहींत. याचें कारण असें कीं, या लोकांमध्यें छापखाने व वर्तमानपत्रें वगैरे फार नाहींत, याजमुळें त्यांस निर्लज्जपणाचें भय वाटत नाहीं. छापखान्यामध्यें जितके अधीक ग्रंथ छापतात, तितकी लोकांची सुधारणा होती. कारण कोणी कांहीं अपराध केला तर तो छापला जातो. आणि प्रसिद्धीस येतो. याजमुळें त्यास असें भय प्राप्त होतें कीं, माझी अपकीर्ती सर्व जगांत होईल. आणि माझे स्नेही, मित्र परदेशांत आहेत, त्यांसही कळेल. आणि माझे मागेंही लिहिलेली गोष्ट राहून अपकीर्ती मागें राहील. या भयानें लोक अपराध किंवा वाईट कामें करीत नाहींत. आणि जरी यद्यपी ज्याची अपकीर्ती छापणारांनीं लिहिली त्याणें स्वतः मूर्खपणानें वाईट कामें सोडलीं नाहींत, तत्रापी त्याची फजीती होऊन त्याचे वंशातील पुढचे लोक आणि इतर लोक हे सावध होतात कीं, अमक्यानें वाईट काम केलें. त्याची अपकीर्ती जहाली. तेव्हां आपण केलें तर तसेंच होईल. याजमुळें ते करीत नाहींत. एणेंकरून छापखाना हें लोकांस मोठें बंधारण आहे. तसेंच लोकही शहाणे होतात व त्यांस कोठें काय होतें हें कळतें, आणि सावध राहातात. जर छापखाना व डाक हिंदुस्थानांत असती तर परकी लोक या देशांत सुलभपणानें आले तसे आले नसते. परंतु या लोकांचें दुर्भाग्य तेणेंकरून छापखान्याचा फायदा त्यांस कळत नाहीं. व जे ब्राह्मण प्राचीन समजुतीचे अद्यापी पुष्कळ आहेत, त्यांस असें वाटतें कीं, छापखान्याचा काय उपयोग आहे? बुकांत पैका घालून काय फळ? पृथ्वीवरच्या बातम्या ठेऊन आम्हांस काय करावयाचे आहे? आपले घरांतलें आपण पाहावें. आपल्यास मोठ्या गोष्टी कशास पाहिजेत? अशा ते रांड गोष्टी सांगतात. असे हे हिंदु लोक शिथिल आणि मूर्ख म्हणून या दशेस आले. जर पेशव्यांचे अमलांत इंग्रज मोठे आहेत व त्यांची काय अवस्था आहे, हें लोकांस कळलें असतें, तर राज्य न घालवते. परंतु पोटार्थी भट त्यांनीं गोड खाण्याशिवाय दुसरें कांहीं मनास आणलेंच नाहीं. गोड खाण्यास मिळालें म्हणजे सर्व ब्राह्मण एकत्र डोंगळ्यांप्रमाणें जमतात व मग त्यांचें अवधान फार लागतें. कोठें मुक्तद्वार किंवा ब्राह्मणसंतर्पण किंवा उत्साह आहे, अशी वार्ता आली कीं, ब्राह्मण मोठ्या हौसेनें तेथें जमतात. दुसरी कांहीं राज्यकारभाराची किंवा ज्ञानवृद्धीकरतां सभा असेल तर हालणार नाहींत. तात्पर्य या जातीची नजर जेवण आणी दक्षणा याहून पलीकडे जात नाहीं व याहून दुसरा मोठा कारभार पृथ्वीवर आहे, असें या जातीस वाटत नाहीं. एकास लाथ मारली तर दुसरा कां म्हणावयाचा नाहीं. इतके तर हे भिंत्रे, रांडये व निर्बळ आहेत. यांचेमध्यें साहस, धैर्य आणि खरेपणा हीं प्रायशः नाहींत. साहस म्हणजे मोठें कार्य डोकीवर घेणें. धैर्य म्हणजे आपल्यावर किंवा दुसऱ्यावर जुलूम कोणी करील तर न सोसणें. आणि खरेपणा म्हणजे लबाडीचे व्यापारांत न

शिरणें. यांपैकीं एकही गूण यांजमध्यें नाहीं. जनावरासारखे हे मूर्ख आहेत. जश्न शेतांत पुष्कळ चिमण्या खावयास जमतात व त्यांस एक काठी उगारली म्हणजे त्या भरकन उड्डन जातात, तसे हे ब्राह्मण लोक आहेत. यांची पंगत करावयास मात्र चांगली, परंतु दुसरा कांहीं उपयोग नाहीं. आणि सांप्रत पहा कीं, पेशव्यांचें राज्य गेलें हें वाईट जहालें असें जें हे ब्राह्मण लोक म्हणतात, तें एवढ्याच कारणानें म्हणतात कीं, त्यांस खावयास मिळत नाहीं. ब्राह्मण लोक इतके दुर्बुद्धी आहेत कीं, त्यांस खावयास द्या व मग कांहीं करा, चिंता नाहीं. पोटास घालावें आणि पायपोस मारावे, त्यांस लज्जा वाटणार नाहीं. आणि त्यांची म्हण अशी आहे कीं, पोटावर मारूं नका, पाठीवर मारा. म्हणजे जेवावयास घाला व मग कांहीं करा. याप्रमाणें फक्त जेवणाची मात्र काळजी. पोटाचा विचार ब्राह्मण लोकांस पहिल्यानें आहे व पाठीमागून सर्व; परंतु बहुधा तेवढा बंदोबस्त असला म्हणजे ते उजवे किंवा डावे बाजूस पहावयाचे नाहींत, हें आम्ही लिहिलेंच आहे. याविषयीं कोणास खोटें वाटेल तर त्याणें स्वदेशीय राजधानींतील लोकांकडे पाहावें. आणि त्यांस पुसावें कीं, इंग्रज हिंदुस्थानांत कोठें कोठें राज्य करितात ? ते म्हणतील कीं, छीः इंग्रज कोठें आहेत ? आमचे संस्थानांत तो एक ताम्रमुखी मात्र असतो. याचप्रमाणें पेशवाईंत अवस्था होती. पुण्यांत वकील होता, तेवढी गोष्ट मात्र दरबारांतील वागणारे यांस माहीत. इतर लोकांस तेंही माहीत नवतें. कोणी सुखी असले तर त्यांनीं प्रवास करावा असें नाहीं. परंतु ग्रंथद्वारें किंवा वर्तमान-पत्रद्वारें त्यांस वर्तमान तर माहीत असावें ? एकादे गांवढे कुळकर्ण्यास पुसा कीं, कलेक्टरसाहेब यांची नेमणूक कोण करितो, त्यांस पगार काय, आणि गवरनरसाहेब कोण आहेत व कोठून आले ? तर त्यांच्यानें कांहीं सांगवणार नाहीं. ज्या शहरामध्यें कांहीं गोष्ट आहे, तीच गोष्ट त्या शहरांत ठाऊक नसत्ये. पुण्यामध्यें शाळा आहे, लायब्ररी आहे व छापखाना आहे. हीच गोष्ट पांचशे रुपये महिना पगार किंवा पेनशन खाणारास पुसा, म्हणजे "ठाऊक नाहीं," असें तो म्हणेल. कारण कीं, हिंदू लोक शोध करण्यांत फार आळशी आहेत. कोणी कोणी शोध करणारे आहेत; परंतु लोकांच्या घरच्या गोष्टी व चाहाड्या एवढें मात्र ते मनास आणितात. दुसऱ्या उपयोगी गोष्टी कांहीं मनास आणित नाहींत. व थोर आहेत ते जेवतात आणि निजतात. अशी त्यांची अवस्था आहे. मागें सांगतात कीं, दिल्लीचे बादशाहानें मिरची तिखट आहे किंवा कसें हें पुसलें होतें. व सूर्य हा पदार्थ काय आहे, हा प्रश्न केला होता. तद्वत हल्लींही ऐकण्यांत आहे कीं, कर्नाटकांतील सरदारांपैकीं एकानें पोलिटिकल एजंटास विचारिलें कीं, तुम्हीं समुद्र पाहिला आहे कीं नाहीं ? व आणखी एक वेळ असा प्रश्न केला कीं, कृष्णातिरीं घाट आहे तो पाण्यानें वाहात कां नाहीं ? तेव्हां एक हुशार जवळ होता त्याणें सांगीतलें कीं, महाराज, पाण्यानें घाट वाहून जातो; परंतु आमचेजवळ हत्ती आहेत, त्यांजकडून पुनः ओढून आणून जाग्यावर ठेवितों. तेव्हां त्या मूर्खांची समजूत

पडली. अशा कितिएक अज्ञानपणाच्या गोष्टी ऐकण्यांत आहेत, त्यांचें वर्णन करून उपयोग काय? परंतु असें आहे तरी ज्यास खावयास मिळतें, त्यास जरी फांशीं द्यावयास काढिलें, तरी वाचणें किंवा ज्ञान शिकणें ही गोष्ट त्यांच्यानें व्हावयाची नाहीं. या लोकांच्या इतक्या समजुती अकुंचित जहाल्या आहेत कीं, ते वर्तमानकाळचा विचार करितात. उद्यांची काळजी करीत नाहींत. लांच खाल्ला म्हणून एकाची धिंड निघाली. काय चिंता आहे? आपण मिळेल तोंपर्यंत पैसा खाऊं. ज्या दिवशीं काळ फिरेल, त्य दिवशीं पाहातच आहोंत. याप्रमाणें काळास दूषण देतात; पण आपण कर्में कोणतीं करितों याचा विचार करीत नाहींत. आणि इतके निर्लज्जपणास दुसरें कारण असें आहे कीं, लोक शहाणे नाहींत. कुळंबी ते अडाणी कुळंबी. व ब्राह्मण तर शतपट मूर्ख आहेत. तेव्हां जो वाईट काम करितो, त्यास असें वाटत नाहीं कीं, मला हे लोक वाईट म्हणतील. आणि वास्तवीक पाहिलें तर जे वाईट काम करितात, त्यांची निंदा पाठीमागें लोक पुष्कळ करितात, परंतु मित्रे आहेत त्याजमुळें त्यांचे तोंडावर होत नाहीं व त्याचा त्याग करून सर्वांनीं हलका मानणें व त्याचा लोकांत हरतऱ्हेनें पाणउतारा करणें, हें धैर्य लोकांस नाहीं. जी गोष्ट घडत्ये ती सहज घडत्ये, परंतु प्रयत्नपूर्वक कांहीं घडत नाहीं. वाइटास वाईट म्हणावें, आणि शाहाण्यास शाहाणे म्हणावें हें शहाणपण लोकांस नसल्यामुळें लोकही पाहिजे तशी वर्तणूक करितात. खोटें बोलणें व लबाडी करणें हें तर त्यांचे आंगीं पडलें आहे. त्याचा विधिनिषेध ते जाणतच नाहींत. लबाडी ही लज्जेची गोष्ट, ही लोकांमध्यें समजूत नाहीं. असे हे लोक मूर्ख आहेत. जर त्यांस कांहीं गोष्ट सांगितली तर तिचा अर्थ कळत नाहीं, व न्याय करतां येत नाहीं. असे लोक अज्ञानांत आहेत. हे विनंती.

लो० हि०

तारीख २५ फेब्रुआरी १८४१

पत्र नंबर ४९

सरदार लोक

विनंती विशेष. दक्षिणेंतील सरदार लोक याविषयीं कोणास कांहीं मजकूर ठाऊक नसेल म्हणून मी त्यांचे अवस्थेचें व समजुतीचें थोडें वर्णन करितों. पेशवाईंत हे सर्वजण बाजिरावास कंटाळून इंग्रजांकडे मिळाले. यांस अशी आशा होती कीं, पेशव्यांचे पदरीं राहून आम्हांस खावयास मिळतें, परंतु चाकरी करावी लागत्ये; तेव्हां आतां इंग्रजांचे

पक्षास मिळालें म्हणजे खावयास फुकट मिळेल व आमची जहागिर वगैरे सरंजाम सर्व आम्हांकडे चालतील; आणि घरीं बसून राहूं. हे ब्राह्मण लोक भटबुद्धी. यांस हा मोठा फायदा वाटला कीं, चाकरी केल्याशिवाय आम्हांस इंग्रज खावयास देतात. मग पेशव्यांची तावेदारी कशास पाहिजे ? हा विचार करून त्यांनीं इंग्रजांचें बंदोबस्त कबूल केले व पुढें आतां ते कायद्याप्रमाणें जप्त होऊं लागले; तेव्हां त्यांस असें वाटतें कीं, अरे हें काय ? आम्ही केलें काय ? आणि झालें काय ? त्यांचे मुखांत आतां दुसरी गोष्ट नाहीं. सरदार लोकांजवळ बसलें म्हणजे प्रथम पेनशनाची गोष्ट. आतां जसी जहाली. कसें करावें ? इंग्रजांचें राज्य फार वाईट, कारण आमचा सरंजाम गेला. कोणी म्हणतो, माझें पेनशान गेलें ! आम्हांस पहिलें वाटत होतें कीं, पुस्तदरपुस्त चालवितील, परंतु आतां कायदे फार वाईट निघाले. आतां सरदार लोकांस दुसरी काळजी नाहीं. फक्त तेवढ्या गोष्टी बोलत असतात. कोणी आहेत त्यांस मुलें नाहींत. कोणी परघरांतील मुलें आणून दत्तक बसविलीं आहेत. कितिएक बाजीरावाचे समयांतील आहेत. कितिएक जुने आहेत. पण आतां त्यांचे वारस आहेत, ते कांहीं शहाणे नाहींत; व नेहमी अर्ज्या करतात कीं, दत्तकास आमचा सरंजाम चालवावा. आम्हांस दत्तक घेण्याची परवानगी असावी, आणि आमचे गांवचा फौजदारी व दिवाणी अमल आम्हांकडे असावा; आणि वसुलास आम्हांस मदत द्यावी; म्हणजे रयतेस बुडऊन पैसा घेऊन खर्च पाहिजे तसा करूं. परंतु इतके सरदार आहेत, यांपैकीं एकजणास आणून पाहिलें कीं, हा ग्रहस्थ कोणत्या उपयोगीं पडेल ? तर मला वाटतें कीं, या पृथ्वीवर कोणतेंही काम त्याचे लायक सांपडावयाचें नाहीं. कारण कीं, पंचवीस वर्षांपासून त्याचे वृद्धापकाळास आरंभ होतो; आणि क्षयरोगानें व्याप्त होऊन तो जिवंत मात्र राहिलेला असतो. कितिएक इतके अशक्त आहेत कीं, त्यांस घोड्यावर बसून दाहा पावलें जाववत नाहीं. कितिएकांस चाळिसावे वर्षीं दुसरे लोक धरावयास लागतात. स्वतां लिहिणें पुसणें तर कोणासही येत नाहीं. सर्वांस वकील व कारभारी पाहिजेत. ज्यांत वकील कारभारी नाहींत, त्यांणीं दरबारांत जाण्याचे दिवशीं एकादा मजूरदार करून तरी बरोबर नेला पाहिजे. यजमानास बोलावयाचें माहीत नाहीं. मग कारकून याणें यजमानास बरोबर नेऊन एथें बसा, म्हणून सांगावें. यजमानास स्वतां कांहीं ज्ञान नाहीं. मग कारकुनांनीं त्या मूर्ख यजमानास जसा पिसें लाऊन कावळा करितात, तसा करून एजंटास भेटवावा. हे अमके म्हणून सांगावें, परंतु खासे पाहिले तर नंदी किंवा शुद्ध नर्मदेंतले बाण. लिहितां येत नाहीं, बोलतां येत नाहीं. वेड्यासारखे दिसतात. त्यांस दिवाणजीनीं आपले पोटाकरितां सजऊन दरबारांत आणावे. महाराजास उठा म्हणून देखील सांगीतलें पाहिजे. तेव्हांच ते उठावयाचे, नाहीं तर उठावें केव्हां, हेंही ठाऊक नाहीं. मग घरीं येऊन म्हणावें, वाहवा आज दरबारांत गेलों होतों. फार श्रम झाले. कारकुनानें पोटार्थाकरितां पुढें यावें आणि म्हणावें कीं, महाराज, आज साहेब फार खुष होता,

आपल्यापाशीं फार बोलला. इतकें कोणापाशीं बोलत नाहीं. मग यजमानांनीं म्हणावें, वाः, आमचा दिवाणजी हुशार आहे. याप्रमाणें यांची अवस्था आहे. सरकारास या लोकांशीं राज्यकारणार्थ सलूखा राखण्याची जरूर आहे, म्हणून मात्र या लोकांचा मानपान ते करितात. नाहीं तर या लोकांसारखे अप्रयोजक कोणी नाहींत. यांचे हातून कोणतेंही काम व्हावयाचें नाहीं. घरांत व्यवस्था पाहिली तर दरबारापेक्षां अधीक. वाण्याची उचापत आणि सराफाचें कर्ज, त्यास व्याज शेंकडा २५ रुपये. जें खत कारकून लिहून आणील, त्याजवर सही करतात. एखादे दिवशीं मेले म्हणजे सर्व सरकारांत जप्त होतें व सावकार बुडतात. याप्रमाणें हे कारकून लोक व दिवाणजी यजमानास फसवितात. त्यांचे वडिलांनीं मिळविलें असतें, तें सर्व चोरांचे हातीं जातें. एके दिवशीं मेजवानी करावी. सरकारचे कामगारांस जेवावयास बोलवावें, आणि यजमानास सांगावें कीं, महाराज, आपलें सर्व काम दरबारांत असतें तेथें साहेब लोकांस काय समजतें ? सर्व काम कामगारांच्या हातीं. याजकरितां त्यांचे आर्जव संपादन केले पाहिजेत. मग यजमानानें पुसावें कीं, आपल्या रीं ते येतील काय ? होय, महाराज मी प्रयत्न करितों. मी दरबारची मंडळी अशी वश ठेवली आहे कीं, आपले कृपेनें आपले सेवकावर ते सर्व लोभ करितात. याप्रमाणें गोष्टी सांगून छमछमाट करावे. महाराज, कामगार असें म्हणातात कीं, दोन हजार रुपये पाहिजेत ! त्यांपैकीं एक हजार आपले घरीं व एक हजार कामगाराचे घरीं टाकून सरासरी यजमानास लुटून खातात. कितिएक कामगार सरदारांचे एथें देव्हाऱ्यांतील देवाप्रमाणें पूजन करण्यास योग्य असतात. यजमानास कारकुनानें सांगितलें कीं, महाराज, आपण यांस साष्टांग नमस्कार घातला पाहिजे, म्हणजे यजमान उठले. याप्रमाणें कामगार व कारकून हे लोक सरदारांस बुडवितात. त्यांचे घरचे वाद वाढवितात. स्त्रियांचें व पुरुषांचेंही वितुष्ट पाडितात. म्हणजे आपलें पोट भरतें व पैका उधळावयास सांपडतो. यजमान मूर्ख, त्यास आईपासून फिरवितात, बापाशीं वितुष्ट करवितात, व स्त्रियांसही बिघडवितात. याप्रमाणें दुर्गुणी करतात. आणि त्यांस वीस वर्षें झालीं नाहींत, तों रोगिष्ट व दुर्गुणी करून त्यांचे घरावर पन्नास जत्या एकामागें एक बसऊन ठेवितात. मग यजमान भीतींत पडतो. त्यास असें वाटतें कीं, माझा कारभारी माहितगार आहे, यास सोडावें तर वाईट. अशा अडचणींत तो सांपडला म्हणजे त्याची मालमिळकत खातात मग जें काय नेमून देतील तें खावें आणि बसावें. याप्रमाणें सरदार लोकांची अव्यवस्था आहे. त्यांस उजाडल्यामावळल्याची खबर नाहीं व योग्यता कांहीं नाहीं. व्यापाराच्या कामांत उपयोग नाहीं. विद्वान नाहींत. चाकरी करण्यास बळकट नाहींत. सरासरी जिवंत मात्र असतात. परंतु असे हे लोक जे जिवंत राहातात त्यांचें जिणें फार वाईट आणि लज्जेचें आहे. मला वाटतें कीं, यांणीं आतां सरंजामाची व पेनशनाची आशा सोडावी. आपले सुधारणुकीकडे लागावें. शहाणपण शिकावें. मुलांस तयार करावें त्यांचीं लवकर

लग्नें करूं नयेत. त्यांस चांगले हुशार करावे. दत्तक घेऊं नये. दत्तक घेण्याचें कारण तो आपले श्राद्धपक्ष करील, हें लोकांस मुख्य वाटतें. पण हा मूर्खपणा आहे. जर अजून सरदार लोकांनीं सावधगिरी केली तर ते माणसांत येतील. मराठी ग्रंथ वाचून शोध करावे. आजपर्यंत जहालें तें जहालें. आपला मूर्खपणा पदरीं घ्यावा. अजून तरी बंदोबस्त करून कारकुनास घालवावें. तंटे करूं नयेत. वाद सांगू नये. म्हणजे कामगारांचे आर्जव नकोत आणि अब्रूनें राहावें यांत शोभा आहे. नाहीं तर आणखी फजीतीस कारण होईल. हे विनंती.

लो० हि०

ता. ४ मार्च १८४१

पत्र नंबर ५०

स्वराज्यांतील विद्वान

विनंती विशेष. हिंदुलोकांचे राजधानींत कांहीं विद्या वाढविण्याचा प्रयत्न होत नाहीं. पेशव्यांचें राज्य दक्षिणेंत होतें, परंतु कांहीं विद्यावृद्धी झाली नाहीं, व विद्यावृद्धी करणें हा सरकारचा धर्म आहे, असें इकडील लोक मानीत नाहींत. जेंयें जेथें हिंदु लोकांच्या व मुसलमान लोकांच्या राजधान्या आहेत. तेथें शास्त्री, पंडीत, वैदीक, गवई इत्यादि विद्वानांचा समुच्चय असतो. परंतु त्यांचे विद्येचा लोकांमध्यें कांहीं उपयोग होण्यासारखी तजवीज होत नाहीं. कशी म्हणाल तर शास्त्री चार शास्त्रपारंगत विद्वान असला म्हणजे राजानें त्यास गांव व वर्षासनें द्यावीं, आणि मग शास्त्रीबाबाची गांठदेखील पडावयाची मुष्कील. सर्व दिवस घरांत बसून असावयाचे आणि सरकारचें वेतन खाऊन स्नानसंध्या, देवपूजा करावयाची. तींत सकाळपासून दोनप्रहरपावेतों सोवळे व दुपारून निद्रा आणि संध्याकाळीं क्षणभर बाहेर पडले तर पडले. वर्षासहामासीं जेव्हां कचेरीचें बोलावणें येईल, तेव्हां मात्र त्यांची विद्या बाहेर पडावयाची; पण तीही नेमलेले लोकांतच. तेथें भलत्यांचा प्रवेश व्हावयाचा नाहीं. असें करून त्यांनीं आपलें आयुष्य घालविलें. तसेंच वैद्यबाबा मोठे कीर्तिमान पण गरिबाचे घरीं औषध द्यावयास जावयाचे नाहींत व त्यांची गांठ पडावयाची नाहीं. त्यांत द्यूतचिन्हें वगैरे पाहून वार, तिथी इत्यादि सुलक्षणें मिळतील, तेव्हां वैद्याची पुडी सुटावयाची. तोंपर्यंत रोगी मरून जाईल. परंतु वैद्य बाहेर पडणार नाहींत. त्यांस असें वाटतें कीं, मला सरकारांतून पैसा मिळतो, तितक्यापुतें मी राजास मात्र औषध देईन.

इतरांस काय म्हणून देऊं? इत्यादि गर्वाच्या समजुती व निर्दयपणा त्यांचे आंगीं आहे. तसाच गवई मोठा प्रख्यात जो आहे तो राजाचे एथें पांचसें रुपये दरमहा खात असतो, परंतु कधीं प्राण गेला तर तो लोकांस शिकवावयाचा नाहीं. दोन शेर भांग ओढून घरीं बसलेला असेल. आणि राजाचें बलावणें येईल तेव्हां मात्र त्याकडे जाईल, नाहीं तर तो कोणाजवळ कधीं आपला गूण दाखवील, असें होत नाहीं. व त्यास असें वाटतें कीं, गरीब लोकांपुढें मी काय गाऊं? माझी योग्यता केवढी? मी महान थोर व हे भिकारी. यांचा हिशेब काय? असें त्यांस वाटतें. परंतु विद्वानांचे आंगीं इतके दुर्गुण लागण्याचें कारण जे त्यांस खावयास देतात ते होत. जर करितां राजांनीं त्यांस मार्गास लाविलें तर ते लागतील, परंतु राजे त्यांस बळेंच मूर्ख व गर्विष्ठ करितात. जो कोणी विद्वान आहे त्यास राजांनीं सागावें कीं, तुम्हास दोनशें रुपये (किंवा किती त्याची योग्यता असेल तो) दरमहा पावत जाईल. परंतु घरीं आळसांत बसून पावावयाचा नाहीं. कांहीं शिष्य मिळवा, त्यांस तयार करा, नवीन ग्रंथ ल्याहा, व ज्यांस संस्कृत भाषा येत नाहीं, त्यांस ही शास्त्राचें मर्म समजावें यास्तव संस्कृत ग्रंथांचीं प्राकृत भाषांतरें करून लोकांस ज्ञानी करा; तरच तुम्हांस पगार मिळेल. असें जर सांगतील तर विद्यावृद्धी होईल, तेवढ्याच खर्चांत लोकांचा फायदा होईल, ज्ञान वाढेल, जे विद्वान आहेत त्यांचे गूण सर्वांचे दृष्टीस पडतील व त्यांचे हातून शिष्य तयार होतील व येणेंकरून विद्वानांस गर्व राहाणार नाहीं व हल्लीं जसे विद्वान आहेत, तितक्यास कांहीं तरी लांछन असतें तसें असणार नाहीं. परंतु ही गोष्ट राजे वगैरे अमीर लोक आहेत, त्यांस कळत नाहीं. विद्वानांचें पोषण करावयाचे इच्छेनें लाखो रुपये ते खर्च करितात, परंतु ते मातींत टाकतात. जो विद्वान व थोर असेल, त्यास पुष्कळ पैसा देऊन राजांनीं आश्रित करावें, परंतु यास ताकीद असावी कीं, जे कोणी येतील त्यांस फुकट शिकवीत जावें, औषध देत जावें, त्यास खर्च लागेल तो आम्ही देऊं. आणखी त्यांजकडे कांहीं कारखाना सांगावा कीं, जेणेंकरून गरिबांचें हित होईल, आणि विद्वानांचा सर्वांस उपयोग होईल. परंतु हिंदुस्थानांतील राजे बहुधा मूर्ख आहेत. व राजा हा शब्द नेहेमी म्हणींत मूर्ख या अर्थावर योजिलेला आहे. याचें कारण असें कीं, राजे बहुधा मूर्ख असतात. रयतेपासून वसूल करून पैसा घेतात, त्याचा त्यांस बरोबर व्यय करतां येत नाहीं. त्यांस असें वाटतें कीं, उत्तम माणसें आमच्या मात्र उपयोगीं पडावीं. इतर लोकांस त्यांचा कांहीं फायदा नसावा; परंतु राजानें किंवा त्याचे पिता अगर प्रपितामहानें द्रव्य आणिलें नसतें. जें राजाजवळ द्रव्य तें रयतेपासून सर्व घेतलेलें असतें. याजकरितां त्या द्रव्याचा उपयोग असे दांडगाईनें न करावा; परंतु हें मर्म राजे विसरतात, आणि विद्वानही विसरतात. राजाचे आश्रयानें विद्वान जे असतात ते शतमूर्ख होतात. आणि विद्या बळेंच लपवितात. त्यांस ती बाहेर काढावयाची लाज वाटते. मग इतिहासांत कथा आहे कीं, शिकंदर बादशाहास जो गुरू होता, त्यास

त्याची अशी प्रार्थना होती कीं, जी विद्या त्यास सांगीतली ती त्यानें लोकांत प्रघट करूं नये. कारण कीं, तेणेंकरून राजाचा अपमान होईल. म्हणून त्याचे गुरूनें आपलीं पुस्तकें चोरून ठेविलीं, आणि प्रघट केलीं नाहींत. याच समजुती इकडील लोकांच्या आहेत. आतां प्रत्यक्ष पहा कीं, जे विद्वान आहेत त्यांणीं विद्या उघड जहाली असें पाहिलें म्हणजे त्यांचे आंगाची लाही होत्ये. कोणी शास्त्र्यास दाखवा कीं, हा धर्मशास्त्राचा मराठींत तर्जुमा केला आहे. म्हणजे लागलाच तो तो म्हणेल कीं, अरेरे ! विद्वानांचा थोरपणा गेला ! इंग्रजांनीं हे ग्रंथ प्रघट केले ! आतां शास्त्री व उपाध्ये कशास पाहिजेत ? असें त्यांस वाटतें. याचप्रमाणें गवई लोक यांस म्हणावें कीं, आपली थोडी विद्या अमक्यास शिखवा म्हणजे त्यांचें घर बुडालें. कोणी म्हणतो, "अरे गुरूचे आर्जव करावे. तेव्हां विद्या प्राप्त होत्ये ! विद्या फुकटची नाहीं !" इतका विद्वानांस गर्व आणण्यास व विद्या बुडविण्यास कारण राजे आहेत. त्यांस विद्वानांस कोणत्या रीतीनें आश्रित करावें, हें समजत नाहीं. सर्व मूर्खपणा करितात. त्याचा परिणाम असा जहाला आहे कीं, जे प्राचीन ग्रंथ आहेत त्यांजवर लोक भरवसा ठेवितात, नवीन कल्पना सर्व राहिल्या, जीं औषधें पांच हजार वर्षांचे पाठीमागें लिहून ठेविलीं आहेत, तींच आज घ्यावयाचीं; याचें कारण कोणी पुसलें तर शास्त्रांत आहे म्हणून सांगतात. तशी गायनकळाही बुडाली. राग म्हणजे काय हेंही कोणास समजत नाहीं. आणि नवीन राग कोणी करित नाहींत. जे एकदां ग्रंथांत मागील काळीं ऋषींनीं शोध करून ठरविले आहेत तितकेच. त्यांजवर कांहींएक नाहीं. सर्व विद्येचा ओघ अटकावला आहे. कोणी विचार करित नाहींत. कांहीं झालें म्हणजे ही गोष्ट वाजवी किंवा अयोग्य असें कोणी म्हणत नाहीं. परंतु शास्त्रांत आहे इतकेंच म्हणतात, आणि विचार वाढवीत नाहींत. अस्तु. हा काळ लवकरच क्षीण होत चालला आहे. लोक शुद्धीवर येतील तेव्हां याचा विचार बरोबर करतील. सांप्रतकाळीं ते मूर्ख आहेत. यास्तव त्यांस एकादी गोष्ट सांगीतली तर तिचा अर्थही करतां येत नाहीं. मग वर्तणूक दूरच आहे. हे विनंती.

लो० हि०

ता ११ मार्च सन १८४९

पत्र नंबर ५१

हिंदु लोकांची द्रव्योपयोगाविषयींची समजूत

मागील पत्रांत विद्येचा उपयोग विद्वान लोक या देशांत करीत नाहींत म्हणून लिहिलें आहे व आतां एक गोष्ट आम्हांस सुचली आहे कीं, द्रव्यवान लोक द्रव्याचाही

उपयोग करीस नाहींत. द्रव्य कोणत्या रीतीनें वृद्धिंगत करावें हें त्यांस अश्रुत आहे व द्रव्य वृद्धिंगत केलें असतां फार उपयोग होईल, हें त्यांस कळत नाहीं. यास प्रमाण, प्रथम लग्नमुंज वगैरेमध्यें समारंभांत हिंदु लोक पुष्कळ द्रव्य खर्च करितात. व भटांत खावयास घालून उधळितात. दुसरें प्रमाण, हे लोक द्रव्य असलें म्हणजे लागलेच दागिने करतात आणि घरांत सांठवितात. त्यांस असें तर वाटत नसेल ना? कीं जसें द्रव्य अन्यायानें आपण मिळविलें तसें अन्यायानें खर्च करावें! कितिएक लोक म्हणतात कीं, जितका खर्च केला तितकी अधीक जमा होत्ये. कितिक म्हणतात कीं, साखरेचा खाणार त्यास देव देणार! कितिएक म्हणतात कीं, नशीबीं असेल त्यास द्रव्य मिळेल. या प्रकारचीं कितिएक मूर्ख मतें चालू आहेत व त्यांस भट वगैरे लोक साहकारी आहेत. ते म्हणतात कीं, द्रव्यवान आहे तो पुण्यवान आहे. द्रव्यानें मोक्षास जातो. म्हणजे त्यांस सध्या खावयास मिळतें. बहुधा अन्यायानेंच हिंदु लोकांमध्यें द्रव्य संपादन केलेलें असतें. कोणी स्वकष्टार्जित मेहेनतीनें मिळवीत नाहींत. म्हणून असा मूर्खपणानें व्यय करितात. जो मेहेनतीनें मिळवितो तो असें कधीं करणार नाहीं. जे द्रव्यवान आहेत त्यांस व्यापार करण्याचें वगैरे ज्ञान नसतें व ते बहुधा मूर्ख असतात म्हणून त्याचें प्रथम कर्तव्य हें असतें कीं, दहा हजारांचा जडावाचा कंठा, पन्नास हजारांची पोची, छपन्न हजारांची आंगठी इत्यादि पदार्थ घेऊन घरांत ठेवावे. साधारण श्रीमंताकडे पहा कीं, त्याचे घरीं दागिने जितक्या किंमतीचे असतात, तितका पैका त्याच्या व्यापारांत किंवा कोणत्याही उद्योगाचे कामांत नसतो. जशा मुंग्या बिळांत धान्य सांचऊन ठेवितात. त्यांस पेरावयास समजत नाहीं. आणि तें धान्य सरलें म्हणजे पुनः शोधावयास जावें व कोणाचें सांपडेल तें आणून पुनः सांठवावें, पुनः खावें असें त्या करितात, तद्वत हिंदू लोक आहेत. माझें म्हणणें या लोकांनीं अलंकार अगदीं टाकावेत, असें नाहीं. परंतु ज्याजवळ लाख रुपये आहेत त्याणें फार झालें तर दाहापांच हजारपर्यंत भूषणें वगैरे जिन्नस बाळगावे व बाकीचा पैसा उपयोगास लावावा. परंतु श्रीमंत लोक ज्याजवळ द्रव्य आहे ते पैसा रोख कांहीं बाळगीत नाहींत. आणि उपयोग करीत नाहींत. ह्मणतात कीं, रोख पैसा कशास पाहिजे? सोनें घेऊन टाकलें ह्मणजे घरांत राहील आणि द्रव्याच्या पायांत बिड्या पडतील, मग कोठें जाणार नाहीं. कालदेशवर्तमान आहे. आपलीं मुलें माणसें मोडून खातील असें ह्मणतात. परंतु हे लोक किती मूर्ख आहेत हें याजवरून पाहावें; यांस असें कळत नाहीं कीं, द्रव्य ही चालती वस्तु जितकी अधिक फिरेल तितकी चांगली. यास्तव व्यापार इत्यादि मोठीं कामें अंगिकारावीं व धर्म तरी यथायुक्त करावा; परंतु तें कांहीं न करून द्रव्य घरांत बाळगतात, उराशीं धरून निजतात, आणि मरतेवेळेस काळजी करतात कीं, माझें इतकें धन आहे याची व्यवस्था कोण करील? रात्र आली ह्मणजे ह्मणतात कीं, माझे घरावर दरोडा तर आज यावयाचा नाहींना? अशी काळजी करितात. सोनें रुपें घरांत ठेवितात तें पाहून घरांतील चाकरमाणसें यांस लोभ सुटतो व लोक द्वेष

करितात. चोऱ्या होतात. एकदां चोरी झाली ह्मणजे सर्व द्रव्य घेऊन जातात. कितिएकांचीं मुलें वाईट निघतात. तीं द्रव्य उधळून टाकितात. कितिएकांच्या बायका लबाड निघून द्रव्याचा नाश करितात. जीं द्रव्याचीं गाठोडीं बांधून ठेवितात तीं थोडेच दिवसांत नाहींशीं होतात व अशा द्रव्यसंग्रहानें मुलें अवश्य वाईट निघतात. कारण कीं, त्यांस प्रथम शिक्षा ही लागत्ये कीं, घरांतून बाहेर जाऊं नये; कारण गेलें तर द्रव्य कोठें ठेवावें ? यास्तव रात्रंदिवस घरांत बसतात आणि त्यांतलें मोडून खातात. वास्तविक पाहिलें तर मुलास बापानें पंचवीस वर्षांपर्यंत खावयाची बेगमी ठेविली आणि त्यास शहाणें केलें म्हणजे पुष्कळ जहालें. जो बाप मुलास जन्मपर्यंत पुरेसें सांचऊन ठेवितो आणि त्यास विद्या वगैरे शिखवीत नाहीं, परंतु आळशी व निरुपयोगी मूर्ख करितो तो त्याचें अनहितकर्ता आहे. व देशाचा लुटणारा आहे. कारण कीं, सर्वांचा पैसा हरण करून त्याणें आपले घरीं मूर्खांचें जीवन होण्याकरितां व लबाडी वृद्धिंगत होण्याकरितां ठेविला असें होतें. यास्तव जे बाप मुलास पुष्कळ द्रव्य ठेवितात त्यांणीं त्या द्रव्याचा उपयोग करतां यावा, अशीं मुलें चांगलीं करावीं. परंतु त्यांचे कपाळीं बहुधा मूर्ख पुत्र असावे, असें असतें व असें करण्यास तेही कारण होतात. पैसा अशा रीतीनें सांचऊन ठेवण्याची खोड या लोकांस लागली आहे. याजकरितां बहुत लोकांस दुःख होतें. कारण ज्या रीतीनें सुखवृद्धि व्हावयाची ते मार्ग ज्यांचे हातांत असतात, तेच त्या मार्गांस बंद करितात. आणि आपण मूर्ख होऊन द्रव्याचा व्यय मूर्खपणानें करितात. हा सांप्रदाय फार वाईट आहे. यास्तव ज्याज्याजवळ द्रव्य आहे, त्यांणीं त्यांणीं चांगला विचार करावा कीं, याचा उपयोग कोणता करावा ? आणि जेणेंकरून लोकांचें हित होईल व आपले द्रव्याची वृद्धी होईल, असे उपाय करावे. हिंदु लोकांत अनंत गोष्टी कमी आहेत व त्यांस अजून पुष्कळ शहाणे करावयाचे आहेत. अशा कामांत द्रव्य घालतील तर मोत्यांच्या कंठ्या, पोच्या, शिरपेंच घातल्यापेक्षां शोभा अधीक पडेल, यांत संशय नाहीं. हे विनंती.

लो० हि०

तारीख १८ मार्च १८४९

पत्र नंबर ५२

उद्यांचा विचार

विनंती विशेष. माझ्या पाहाण्यांत हिंदु लोकांचा स्वभाव एक विलक्षण आला आहे. तो असा कीं, हे लोक उद्यांचा विचार करीत नाहींत. कितीएक लोक असें म्हणतात कीं,

ही गोष्ट बोलून काय उपयोग? आमचे डोकीस हें कार्य घडत नाहीं; मग कशास प्रयत्न करावा? ही समजूत लहानापासून थोरापर्यंत आहे. राजा म्हणतो, "आपण मेल्यावर कसें कां होईना." याजमुळें तो कांहीं कायदाकानू किंवा नेम आपले मागें राज्य कसें चालावें याविषयीं करीत नाहीं. आणि आपले मरणपर्यंत मात्र आशा बाळगतो. आपण आहों तेथपर्यंत चाललेंच आहे. पाठीमागें कसेंही होऊं. यामुळें हे लोक अगदीं बुडाले. जी कांहीं गोष्ट पन्नास वर्षांनीं फळास यावयाची असते ती जर या लोकांमध्यें काढली तर ते मनापासून हसतात आणि म्हणतात, 'पन्नास वर्षें कोणी पाहिलीं!' उद्याचा भरवसा नाहीं. ईश्वर काय करील तें कोणास ठाऊक? पन्नास वर्षें कोणीकडे. आपला आतांचा आतां पुरता विचार पाहावा! इतक्या दुरच्या खबरा पाहिजेत कशास? या प्रकारचीं भाषणें करितात. परंतु या मूर्खांस असें कळत नाहीं कीं, (थोडेसें स्पष्ट उदाहरण देतों) जर पेशवे सरकारानें व बाजीरावानें उद्यांचा विचार पाहिला असता तर राज्य बुडतें? जर इंग्रेज पहिल्यानें आले तेव्हां हिंदु लोक सावध असते. आणि समजते कीं, हे लोक आज थोडे दिसतात. उद्‌माकरितां आले आहेत. परंतु यांचे पाठीमागें पेडें फार लांब आहे. यांस फार जपलें पाहिजे. व यांस फौज वगैरे ठेऊं देऊं नये. कारण कीं, हे उद्यां राज्य बळकावतील. असा जर आमचे वडील, आजे, पणजे यांणीं उद्यांचा विचार पाहिला असता, तर आज हे लोक इंग्रजांचे अमलांत दीनवाणे कां फिरते? परंतु उद्यांचा विचार केला नाहीं. त्याचें फळ आम्ही भोगितों. असाच जर आम्हीं उद्यांचा विचार केला नाहीं. तर आमचे नातू, पणतु दुःखाविष्ट होतील. हें लक्षांत कसें येईल? इंग्रज लोक हे या देशांत ईश्वरानें गुरु पाठविले आहेत. त्यांजकडे पाहिलें म्हणजे उद्यांचा विचार ते किती करतात हें समजतें. जर नाना फडणिसासारखा आपल्यापुरता विचार ते करते तर त्यांजमध्यें पराक्रम नसता. परंतु ते सर्व एकमतानें पांचशें वर्षांपुढें होणार तें आज पाहातात, कल्पना वाढिवतात, आणि बंदोबस्त करितात. आपल्याच्यानें एकही गोष्ट घडत नाहीं. तितकाच ठेवितात. पुढें येतो तो तेंच करितो. याप्रमाणें ५० जणांचे हात लागतात, तेव्हां १०० वर्षांनीं ती गोष्ट सिध्धीस जाते. जर इंग्रज लोक मुळीं व्यापाराचे उद्देशानें या देशांत यावयास धजतेना, तर आज त्यांचें इकडे एकछत्री राज्य झालें असतें? लाखो इंग्रज अमीरासारखे इकडे येऊन रोजगार करितात आणि हिंदु लोक दीनवाणी मूर्खासारखे तोंडाकडे पाहातात व त्यांणीं केलेल्या रस्त्यावर चालतात व त्यांणीं केलेलीं वस्त्रें नेसतात. असें होतें काय? हें सर्व उद्यांचा विचार केला म्हणून झालें कीं नाहीं? यास्तव ही समजूत लोकांनीं सोडावी. इंग्रज उद्यांचा विचार आज करितात. जर हिंदु लोकांनीं एक कंपनी केली असती, आणि विलायतेंत व्यापार करण्यास गेले असते आणि तेथें किल्ले बांधते व शिपाई ठेविते तर त्या घटकेस हाकून देते. हे लोक इकडे दंगा करण्यास आले आहेत असें म्हणते. असे ते सावधपणानें आपल्या देशांत वागतात. व एक दिशेच्या कोपऱ्यावर काय होतें तें सर्व मुलुखांतील लोकांत समजतें.

आणि पत्ता लावतात, हे कोण ? कोठचे ? येथें यांचें येण्याचें प्रयोजन काय ? याचा तपास करतील. सुस्ती करणार नाहींत. परंतु तुम्ही मनांत आणा कीं, जेव्हां इकडे इंग्रज, फराशीस, पोर्तुगीस, मुसलमान इत्यादि लोक आले, तेव्हां हिंदु लोक किती आंधारांत आंधारांत होते ! मुसलमान लोक सातशें वर्षें राज्य हिंदुस्थानांत करीत होते, तरी कोणास ठाऊक नाहीं. दक्षिणेंत लोक निद्रिस्त होते. तसेंच पोर्टुगीस लोकांनीं गांव घेतले, परंतु हिंदुस्थानचे लोकांस कांहीं खबर नाहीं. व आजपर्यंतदेखील कितीएकास ठाऊक नसेल. याप्रमाणें हे लोक झोपेंत आहेत. ज्यांस स्वदेशाचें ज्ञान नाहीं ते परदेशास जाऊन काय पराक्रम करतील बरें ? हें तर अर्थांतच आहे. परंतु जर कोणास पुसलें तर, 'आम्हीं अज्ञान आहों,' असें म्हणणार नाहींत व ब्राम्हण तर कधींच कबूल करणार नाहींत. ते म्हणतील कीं, 'प्रारब्ध, देवाची मर्जी. ईश्वरी संकेत. त्यास काय उपाय ?' परंतु यांणीं जर उपाय केले असते, तर आम्हीं ईश्वरी संकेत म्हटला असता. परंतु ज्यांणीं उद्योग केला नाहीं ते मूर्ख समजावे. तात्पर्य या लोकांची स्थिती जसें एकादें जनावराचें प्रेत पडतें आणि तें कुजलें म्हणजे त्याचा एकएक केस वेगळा होतो, तद्वत् हिंदु लोक मूर्ख होऊन कुजून गेले आहेत. याजमुळें त्यांचीं प्रत्येकांचीं चित्तें पृथक आहेत. पेशवे म्हणतात, टिपु बुडवावा, होळकर म्हणतात शिंद्यांस मारावें व गायकवाड म्हणतात पवारास मारावें, असे आपलेमध्यें कज्जे करतां करतां परकी लोकांचें काम झालें आणि हे उमाऊन बसले. याचें कारण या लोकांत विद्या नाहीं. मोठे लोक आहेत, त्यांस तर विद्येविषयीं त्यांच्या बापाची शपथ आहे. त्यांचे हातास कधीं ग्रंथाचा स्पर्श झाला नाहीं. व वडिलांपासून तो संस्कारच नाहीं. कोणी भीष्माचार्य वृध्ध असतील ते गीताबीता वाचतात. परंतु फळ काय ? त्याचा अर्थ समजेल तर शपथ. हे विद्येचे व ज्ञानाचे वैरी लोक आहेत. म्हणून यांची अशी दशा आहे.

लो० हि०

प्रभाकर, ता. २५ मार्च १८४१

पत्र नंबर ५३

मन हेंच ईश्वरी शास्त्र

विनंती विशेष. ईश्वरानें जे प्राणी निर्माण केले, त्यांमध्यें उत्तम प्राणी मनुष्यें आहेत. कारण कीं, त्यांस ज्ञानबुध्धी दिली आहे. तेव्हां मनुष्यानें या जन्मामध्यें वर्तणूक कशी करावी याचा नेम कांहीं ईश्वरानें त्यांचे स्वभावांतच दिला आहे किंवा

नाहीं, याचा विचार करितां असें दिसतें कीं, मनुष्यांचें मन हेंच त्यांचा नियम आहे. यास प्रमाण भागवतांतही असें आहे कीं, "मनःपूतं समाचरेत्". जें मनास पवित्र वाटेल त्याप्रमाणें आचरण करावें, हेंच ठीक. मला वाटतें कीं, जसे सरकारांतून एकादे कामगारास नेमितात आणि सरकारचे हुकूम कसे चालावे याविषयीं लेख पाठवितात; त्याप्रमाणें तो ताकीद देतो. तद्वत मनुष्यास मन हें ईश्वरानें दिलें आहे. हा सर्वांचे चित्तांस अनुभव आहे. आणि जी वाईट गोष्ट ती मनास वाईट वाटते. व चांगली ती मनास चांगली वाटते. गैरमाहितही असला तरी चांगल्यास चांगला म्हणतो. व वाईटास वाईट म्हणतो. याचा अनुभव मूर्ख मनुष्यासही आहे. तेव्हां मन हाच मनुष्याचे वर्तणुकीचा ईश्वरी नेम आहे. जशीं भारतीं गदापर्वांत कथा आहे कीं, दुर्योधनानें पांडवांचीं बालकें मारिलीं. परंतु हें ऐकून ऐकणारे म्हणतात कीं, 'अरेरे! तो काय दुष्ट होता! चांडाल होता!' याप्रमाणें मनाची ध्वनी निघते. वास्तविक पाहिलें तर त्या गोष्टीस व ऐकणारास कांहीं संबंध नसतो. परंतु वाईटाचा निषेध व चांगल्याचा अंगीकार हे मनाचे धर्म आहेत व ही ईश्वराचीच प्रेरणा आहे. बरें, असें आहे तर मग मनुष्य या विरुध्ध कां चालतात? कोणी म्हणतो कीं, आमचे बापांनीं व वडिलांनीं केलें आहे, तसेंच आम्हीं करूं. कोणी म्हणतो कीं, आमचे देशाची चाल आहे. कोणी म्हणतात कीं, आमचे गांवांतील चाल अशीच आहे. याप्रमाणें मनुष्यें मूर्ख होऊन वास्तविक मार्ग सोडून वाकडीं चालूं लागलीं. तसेंच मन इतकें भ्रष्ट झालें कीं, दुसऱ्याचा प्राण घेणें हेंही त्यास बरें वाटतें. कितीएक लोक असे निष्ठूर आहेत कीं, सती जाणें चांगलें म्हणतात! परंतु वाईट गोष्टीस चांगलें जे म्हणतात त्यांचें मन साक्षी असतें. ते मनापासून म्हणत नाहींत. दुसरे कांहीं कारणानें म्हणतात. कोणी शास्त्राचे ओढीवर जातात. कोणी रुढीवर जातात आणि त्यांस ही गोष्ट वाईट असें मनांत येतें. तरी मनाची ध्वनी दाबून दुष्टबुध्धीप्रेरित भाषण करितात, हें मोठें आश्चर्य आहे. मला वाटतें कीं, जे साधू झाले व शास्त्रकार झाले त्यांणीं मन शुध्ध करण्याकरितां पुष्कळ ग्रंथ लिहिले व पुष्कळ शिकविले आणि नेमही पुष्कळ केले; परंतु ती गोष्ट साधली नाहीं. लोकांचें मन वांकडें तिकडे जातें. जर लोकांनीं वास्तवीक सत्य स्मरून मनांत विचार केला तर त्यांस कितीएक गोष्टी ज्या लोकांमध्यें चांगल्या म्हणून चालतात त्या वाईट असें समजेल. परंतु हिंदू लोक अजून आपल्या ठिकाणीं विचार करूं लागले नाहींत. व मन हेंच मोठें शास्त्र आहे. व लिहिलेलीं शास्त्रें सर्व याचेखालीं आहेत, असें त्यास वाटत नाहीं. हल्लीं वाईट चाली चालतात. व त्यांतील एकदोन मी वर्णन करितों. प्रथम मला दुसरी कोणतीही चाल इतकी वाईट वाटत नाहीं कीं, जितकी हल्लींची लग्नाची चाल वाईट आहे. हिंदु लोकांमध्यें पाहावें तर कोणी ८० वर्षांचा पुरुष रस्त्यानें चालला आहे किंवा कामावर आहे, असें कोठें आढळत नाहीं. याचें कारण काय? बहुत लोक असे पाहाण्यांत येतात कीं, स्वतां क्षयरोगी व २५ वर्षें झालीं नाहींत तों पांचचार

रोगीष्ट पोरें उत्पन्न झालीं आहेत. स्त्रीस वार्धवयदशा प्राप्त होऊन पुरुषाचे केंस पिकलेले, अंगांत शक्ती नाहीं, कोठें बाहेर जाण्यास सामर्थ्य नाहीं, असे आढळतात. मग परमुलखांत कशानें जाणें होणार ? शिपाईगिरी वगैरे राहिलें. परंतु पोटास मिळऊन खाण्याची देखील पंचाइत. असे पुरुष दरिद्री बहुत आढळतात. मुख्यत्वेंकरून श्रीमंत लोक तर अगदींच नालायक होत चालले आहेत. याचें मुख्य कारण, मला लहाणपणचे लग्नासारखें दुसरें कोणतेंही दिसत नाहीं. लग्नानें मनुष्य स्वर्गास जातो, म्हणून शास्त्र आहे. परंतु त्याचा हेतू जाणत नाहींत. आणि मला पुष्कळ असे आढळले कीं, स्वतां भिकारी, अन्नाची पंचाइत, रोगी, अशक्त, परंतु वीस वर्षें झाली नाहींत तों स्वतां किंवा त्याचे आईबाप लग्नाचे मोठे काळजींत पडतात. आणि लोकां-जवळ भीक मागतात व लोकही त्यांस "त्यांचें लग्न पाहिजे कशास? त्यांची प्रकृती नीट झाली. आणि रोजगारधंदा करूं लागले, व संसार करण्याचें ज्ञान आणि स्त्रीस खावयास घालावयाचें सामर्थ्य आलें, म्हणजे लग्न करा," असें म्हणत नाहींत. परंतु उलटें असें म्हणतात कीं, ब्राम्हणाचें लग्न होत आहे त्यास साहित्य केलें तर पुण्य आहे. असें म्हणून पैका देतात. आणि अशा मुलग्यास मुलगी कोण देतो म्हणून मुलीच्या बापास लांच देऊन त्याची पोरगी याचे गळ्यांत बांधतात. मग लग्न झालें कीं, दोघांनीं झोळ्या घ्याव्या आणि दारोदार भीक मागत फिरावें. आणि विद्या वगैरे सर्व बुडऊन त्याणें स्त्रीच्या काळजींत पडावें, अशी अवस्था होऊन तो लवकर मरतो. मग विधवा स्त्री झाली म्हणजे तिचे हाल या लोकांमध्यें कसे आहेत हें सर्वांस माहितच आहे. लोक डोळेझांक करून आपले पोरांचीं व पोरींचीं लग्नें त्वरित करतात. येणेंकरून दोघांचें दुःख वाढतें. व बापास लहानपणीं पोरें व सुना चांगल्या दिसतात, परंतु त्यांचे पाठीमागें त्यांचे हाल कुत्रा खात नाहीं. याचा विचार हे लोक करीत नाहींत व लग्नाची घाई करतात. येणेंकरून अल्पजीवी, अशक्त, पराक्रमहीन व मूर्ख झाले आहेत. पंधरावीस वर्षांचा मुलगा झाला नाहीं तों लोक म्हणतात कीं, लग्न कां झालें नाहीं ? आणि त्यास आईबाप असले तर त्यांचा प्राण जाऊं लागतो. त्या वेळेस सांगतात कीं, कसेंही करा, पण याचें लग्न करा. या मूर्खपणास काय म्हणावें ? याविषयीं व स्त्रियांस विद्या शिकवण्याविषयीं लोकांनीं जरूर विचार करावा. स्त्रिया वाईट म्हणून पुष्कळ लोका म्हणतात. कोणी म्हणतात कीं, "स्त्रीबुद्धिः प्रलयं गता." परंतु यासारखे शतमूर्ख पृथ्वींत नाहींत. जसे पुरुष तशाच बायका स्वभावानें व बुध्धीनें आहेत. परंतु ईश्वरानें त्या घरचे कामास योजिल्या आहेत. व पुरुषास बाहेरचे कामास, रोजगारास वगैरे निर्माण केलें आहे. परंतु शाहाणपण सारखेंच आहे. जे लोक स्त्रियांस वाईट म्हणतात त्यांणीं पक्कें समजावें कीं, ही मूर्खपणाची समजूत आहे. आणखी प्रायशः असें आहे कीं, जी बायको वाईट तिचा नवरा वाईट असतो आणि नवरा चांगला असला तर त्याची स्त्री कदापि वाईट असावयाची नाहीं. स्त्रियांस शाहाण्या करणें जरूर आहे व

लग्नाकरितां जे धर्म करितात, त्यांणीं विचार करावा. धर्म मागणारे भटांत फार थोडे योग्य व गरीब असतात. कोणी म्हणतो कीं, मी गणपतीचे देउळांत चातुर्मास्य अनुष्ठान करितों. त्याची समाप्ती करण्याकरितां मला पैका द्या. तेव्हां असे लोकांस धर्म करणें हा मूर्खपणा वाढविणें आहे.

लो० हि०

ता. १ एप्रील सन १८४१

पत्र नंबर ५४


इंग्लिश राज्यापासून फळ

सांप्रत हिंदु लोक एकत्र बसले म्हणजे सहज गोष्टी निघतात कीं, हिंदुस्थानची पुढें गत कशी होईल? लोक अगदीं भिकारी होत चालले. व्यापार, धंदा, रोजगार हीं कामें नाहींशीं झालीं. ब्राम्हणांस अन्न नाहीं. घरें ओसाड पडत चाललीं. माणसें स्वस्थ झालीं. पदार्थाच्या किमती उतरल्या. पैसा नाहींसा झाला. इंग्रज लोक एका पाठीमागें एक आपलीं राज्यसंस्थानें, जाहागिरी, पेनशनें घेत चालले. कोणी शिपाई राहिला नाहीं. व लोक दरिद्री झाले. तेव्हां पुढें या प्रजेची गत कशी होईल? याप्रमाणें ब्राम्हणांचा हाहःकार ईश्वराचे कानावर कधीं जाईल? अशा तऱ्हेचे विस्मय-युक्त प्रश्न करीतात. त्यांत मग कोणी बहुत शाहाणा, जुने काळचा असला म्हणजे तो म्हणतो, "आहो बाबा, मागें यादव कसे मेले? रावणानें प्रळय थोडा केला होता का? सर्व देव बंदीस घातले होते. नंतर रामानें वानरांकडून लंका घेतली कीं नाहीं? पाण्यावर दगड तरले कीं नाहीं? तसेंच इंग्रज कधीं तरी बुडतील. धर्मसंस्थापना होईल. ब्राम्हण लोक सुखी होतील. व इतर लोकही आपले वर्णाश्रमधर्मेंकरून वागूं लागतील." अशाप्रकारचीं संभाषणें चार ब्राम्हण एकत्र बसले म्हणजे होतात. आमचे ऐकण्यांत हे पुष्कळ आलें आहे. याविषयीं आम्हांस काय वाटतें तें लोकांस कळवावें म्हणून आम्ही आपलें मत लिहितों. मुख्य आमचे बोलण्याचा येथून आरंभ आहे कीं, ज्या गोष्टी ईश्वर घडून आणतो त्या वाईटाकरितां नसतात. जरी त्या वाईट असा प्रथम मनुष्याचें ज्ञान थोडें म्हणून भास होतो, तरि शेवटीं त्याजपासून मोठा उपयोग असतो. ही गोष्ट खचीत आहे. तेव्हां हिंदुस्थानचे लोक हे फार मूर्ख व धर्मकर्म सोडून अनाचारास प्रवर्तले. ते असे कीं, सती जाण्याची चाल, मुलें मारावयाची चाल, तीन वर्णांची नीच स्थिती, ब्राम्हणांचें महात्म, विद्या क्षणीक, अतिशय गर्व, संपूर्ण देशचे लोक आम्हांपुढें तुच्छ व आम्ही श्रेष्ठ. तेव्हां हा भाव हिंदु लोकांचा मोडण्यास

व त्यांस ताळ्यावर आणण्यास परदेशांतील सुधारलेले लोक यांची व त्यांची गांठ घालून देण्यापेक्षां उत्तम उपाय दुसरा कांहीं आहे, असें वाटत नाहीं. यास्तव ईश्वरानें या देशांत इंग्रजांची प्रेरणा केली आहे. आतां हिंदू लोकांनीं उघड पाहावें कीं, आम्ही श्रेष्ठ कीं दुसरे देशचे लोक श्रेष्ठ. ग्रंथावरून पाहावें आणि लोकांचें तोंडून ऐकावें, त्यापेक्षां समक्ष अशी भेट झाली तर चांगलें कीं नाहीं! याचा विचार पाहावा. तेव्हां या साक्षात् शाहाणे लोकांची गांठ पडून हिंदु लोकांच्या वाईट चाली बहूत सुटल्या व आणखीही कितीएक सुटतील. आणि यांचीं मनें शुध्ध होऊन यांस राज्यकारभार, व्यापार, धंदा कसा कसा करावा, हें ज्ञान येईल. देशसुधारणा क्षणांत होत नाहीं. तीस पुष्कळ विलंब लागतो. लाहान मुलास हुशार होण्यास दाहावीस वर्षें लागतात. मग देश चांगला होण्यास अर्थातच दोनशेंचारशें वर्षें लागतील. तोंपर्यंत या लोकांस दुःख आहे. परंतु त्यास उपाय नाहीं. जशी शाळेमध्यें मुलांनीं शिक्षा घेतली पाहिजे, तद्वत् हें आहे. यापासून उत्तम फळ पुढें होईल. या देशचे लोकांनीं वर्णसंकर होईल व धर्म बुडेल, हें कांहीं भय बाळगूं नये. वर्णसंकर होत नाहीं व धर्म बुडत नाहीं. परंतु मूर्खपणा मात्र बुडेल. आणि धर्मामध्यें अधर्म भिसळ झाला आहे, त्यास लोक धर्म म्हणतात, तें मात्र ज्ञानचक्षू आल्यावर जाईल. व वर्ण जे आहेत ते स्वाभावीक सृष्टींत आहेत. म्हणजे कोणतेही देशांत वर्ण नाहींत असें नाहीं. वर्ण म्हणजे इतकेंच कीं, चार प्रकारचे व्यापार. जसे ब्राम्हण हे धर्म रक्षणारे व विद्या वाढविणारे, क्षत्रिय शिपाईगिरी करणारे, वैश्य व्यापार करणारे आणि शूद्र शेत करणारे. हे धर्म सर्वत्र आहेत. व ते जलप्रलय होईपर्यंत पृथ्वीवर राहातील. परंतु लोकांच्या अडाणी समजुती म्हणजे ब्राम्हण विद्वान चांगला असला तरी सिंधू नदी उतरून पलीकडे गेला म्हणजे किंवा त्यानें कांदा खाल्ला म्हणजे त्याचें ब्राम्हण्य गेलें. हें कसें गेलें? म्हणून म्हणाल तर त्याचें उत्तर कोणास देतां येणार नाहीं. त्यास जी विद्या येते ती तो विसरत नाहीं. त्याचा धर्म आहे तो त्यानें सोडला नाहीं. त्याचें कांहीं नुकसान झालें नाहीं. मग कांदा खातांच ब्राम्हणपणा गेला कसा? केवळ मनाची ही कल्पना आहे. वास्तविक कांहीं नाहीं. या मूर्ख समजुती जातील, आणि हल्लीं जो वर्णसंकर आहे म्हणजे वास्तविक ब्राम्हण नसतां ब्राम्हण म्हणवितात. व शूद्र असतां ब्राम्हण म्हणवितात व ब्राम्हण असतां ब्राम्हण म्हणत नाहींत. हा वर्णसंकर मात्र जाईल आणि व्यवस्थित होतील. या लोकांच्या पायांतील शंखळा सुटतील. हे चहों देशांत जाऊन व्यापार करूं लागतील, विद्वान होतील, व आपले देशांत कापड वगैरे जिन्नस तयार करावयास शिकतील, तेव्हां सुखी होतील. लोक शाहाणे झाले म्हणजे हळूच इंग्रजाजवळ म्हणतील कीं, आम्हांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लिमेंट द्या. नंतर आपले लोक ह्यामध्यें बसूं लागले म्हणजे हळूच म्हणतील कीं, तुम्हांसारखेच आम्ही शाहाणे आहों. मग आम्हांस अधिकार कां नसावे? मग हिंदु लोकांचें बहुमत असें पडलें म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे.

इकडील लोक राज्याचे कारभार वगैरे चांगले करूं लागले. लांच खावयाचें सोडून दिलें; म्हणजे बहुतकरून मोठालीं कामें गवरनरीचीं सुध्धां यांचे हातीं येतील. आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून राहातील. म्हणजे जसे हिंदुस्थानांत प्रथम इंग्रज आले त्या स्थितीवर येतील, आणि आपले लोक पार्लिमेंट व स्वराज्य भोगतील. राज्यकारभारांत व व्यापारांत त्यांस महत्व प्राप्त होईल आणि मग परदेशांशी देखील व्यापार करतील. असे हे लोक प्रबल झाले म्हणजे इंग्रजांस कांहीं दिवसपर्यंत आभारी मानतील. कारण कीं त्यांचे योगानें हे ज्ञानी झाले. परंतु ज्याकाळीं इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कानू बसवावयाचा आग्रह करतील, त्या काळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील. आणि इंग्रजांस सांगतील कीं, तुम्ही आपले देशांस जावें, आतां आमचे देशाचा कामकारभार आम्हांस चांगला करतां येतो. तुमचें गुरुत्व नको. तुम्ही पाहिजे तर व्यापारापुरते इकडे येत जा. आमचे प्रजेचें जसें आम्हीं रक्षण करितों, तद्वत तुमचेंही करूं, परंतु तुमचें वर्चस्व नको. याप्रमाणें या देशाची गती होईल. आणि नवीन राज्यस्थिती चांगले रितीची होईल. पहिलें अज्ञान अगदीं नाहिसें होईल. यास दोनशें वर्षें तरी पाहिजेत. परंतु असें होईल यांत संशय नाहीं. अशी मागले इतिहासावरून कल्पना होते. आणि हें तथ्य आहे. अशी खातरजामा आहे.

लो० हि०



ता. ८ माहे एप्रिल सन १८४१

पत्र नंबर ५५

पुराणांतील ज्ञान

विनंती विशेष. हरएक कोणतेही गोष्टीचे गुणदोष पाहावे लागतात. छापखान्याचे हुंनरापासून कितीएक गोष्टी चांगल्या व कितीएक वाईट झाल्या आहेत. तसेंच दारूपासूनही झालें आहे. तसेंच हर कोणतें पुस्तक लिहिलें गेलें म्हणजे त्यापासून कांहीं गोष्टी चांगल्या व कांहीं वाईट होत असतात. याचा विचार करून चांगली मात्र घ्यावी. हें वाचणाराकडे आहे. यावरून मी विचार करतों कीं, व्यासांनीं पुराणें लिहिलीं त्यांचे गुणदोष काय आहेत? व त्यांपासून लोकांचा फायदा काय झाला? ज्या काळीं हे ग्रंथ लिहिले, त्या काळीं त्या लिहिणारास असें वाटलें नसेल कीं, जसें आतां लोक त्यास समजतात तसें समजतील व लोक त्यांची पूजा करतील. व घरोघर ते ग्रंथ होतील. त्या

वेळेस छापखानाही नवता. याजमुळें हे ग्रंथ प्रसिध्ध व्हावयास बराच काळ लागला. आज पांच हजार वर्षें झालीं तरी कितीएक पुराणें मिळत नाहींत. कारण त्यांच्या प्रती झाल्या नाहींत. एक प्रत करावयास एक वर्ष पाहिजे. त्याची प्रत दुसरी व्हावयास तसाच पुष्कळ काळ लागतो. असतु. पुराणें हीं माझे मतें काव्यें आहेत. त्यांचा आधार बहुतकरून वास्तविक गोष्टींवरून धरला आहे. परंतु त्यांत कर्में आणि बहूक्ती फार केली आहे. कोठें १० श्लोक देवाच्या स्तुतीचे लिहिले, म्हणजे लागलीच त्यांची फलश्रुती व त्यांचा न्यास, ध्यान, कवच, छंद, दगडधोंडे असें पुष्कळ आणून जोडलें आहे. मुख्य पुराण करणारांची इतकीच बुद्धी होती कीं, रमणीय कथा आश्चर्य वाटावयाजोग्या लिहून त्यांत भक्ती ज्ञान जागोजाग मिळऊन ग्रंथ सुलभ व मौजेचे करावे. परंतु त्या काळीं भूगोल, खगोल या विद्या पुरतेपणीं वृद्धिंगत झाल्या नवत्या. म्हणून भूगोलाविषयीं त्यांत पुष्कळ चुका आहेत व पृथ्वीचीं वर्णनें मनास येतील तशीं कवींनीं केलीं आहेत. भारत भागवत यांतील दृष्टांत लोक फार घेतात. परंतु संपूर्ण ठिकाणीं ते यस्थास्थित लागत नाहींत. कारण कीं, वास्तविक इतिहास जर असेल तर त्याजपासून तर्क काढतां येतो. जसें रूमचें राज्य होतें त्याचा इतिहास आहे. त्याजपासून तें राज्य कशानें गेलें व लोक शाहाण्याचे वेडे कसे झाले व वेड्याचे शाहाणे कसे झाले हें कळतें. व ते दृष्टांत आपल्याला लागू करतां येतात. परंतु पुराणांतील तसे लागू करतां येत नाहींत. कारण कीं, पुराणांतील सर्व गोष्टी प्रारब्धावर आणि देवाचे सामर्थ्यावर रचिल्या आहेत. जसा गजेंद्रास शाप होता म्हणून नक्र झाला. अहिल्येस वर होता म्हणून उध्धरली. रावणास वानरांनीं मारला. दुर्योधनास मारून भूभार कमी करावा म्हणून युद्ध केलें. हिरण्यकश्यपूस मारावयास खांबांतून देव निघाला. वामनानें पायानें बळीस पाताळीं घातला. या गोष्टी व अस्त्रयुध्ध, रथवाहन, धर्मयुध्ध, प्रतिज्ञा, शाप, वरदान, तात्काळ ईश्वराची प्राप्ती, या गोष्टींस आतां लागू करणें यासारखा मूर्खपणा कोठें आहे ? कोणी म्हणतो, 'पेशव्याचें राज्य कसें बुडालें हो ?' दुसरा उत्तर देतो, 'अहो ते अवतारी पुरुष होऊन गेले. जें होणार तें झालें. त्यास उपाय काय ? सद्दी फिरली म्हणजे क्षण लागत नाहीं. देव देणार त्याला देतो. त्याचे मनांत आलें म्हणजे पाहिजे तसें घडतें.' या प्रकारच्या समजुती लोकांच्या आहेत. वास्तविक इतिहास पाहात नाहींत. व कारण लक्षांत आणीत नाहींत. कोणी म्हणतात प्रारब्ध. कोणी म्हणतात सद्दी. दुसरे म्हणतात ईश्वर करील तसें होईल; म्हणून उद्योग करण्याची गरज नाहीं. अशा समजुती या सर्व पुराणांतील आहेत. पुराणें यांस मूळ आहेत. तसेंच व्रतमहात्म्यें, व क्षेत्रमहात्म्यें, येणेंकरून पुष्कळ वाईट समजुती झाल्या आहेत. पुराणीक व्रत सांगत बसला म्हणजे, अडाणी बायका व चार मूर्ख पुरुष बसले असतात. त्यांस व जनावरांस कांहीं फरक नाहीं. याजमुळें जें पुराणीक सांगतो, तें त्यांस खरें वाटतें. आणि पुराणीक म्हणतो,

दोन हजार वाती करून देवापुढें जाळल्या असतां महापुण्य आहे. म्हणजे लागल्याच बायका घरीं येऊन नवऱ्यास तगादा करितात कीं, आमची तुपाची व कापसाची तयारी करावी. आम्हांस पुराणीकबाबांनीं सांगितलें कीं, कापूर व वाती व तूप जाळलें असतां फार पुण्य आहे. मग दोनचार रुपयांचा जिन्नस व दोन महिन्यांची मेहनत खरी खुरीच जाळतात. पुराणीक व भट यांचे सांगितल्यावरून बायका आपल्या नवऱ्याचे प्रेताशीं जिवंत जाळून घेत. त्या दोन चार रुपयांचा जिन्नस जाळावयास कमी करतील काय ? याचें कारण काय म्हणाल तर अज्ञान फार. आम्हीं जर आतां कोणास सांगितलें कीं, तुमची बायको मेली तिच्याशीं तुम्ही जाळून घ्यावें, तर कोणी ऐकेल काय ? पुरुष कोणी ऐकणार नाहींत. कारण कीं, त्यास बायकांपेक्षां कांहींतरी थोडेसें अधिक कळतें. परंतु बायका अंधःकारांत, त्यांस जसें सांगितलें तसें वर्ततात. याजमुळें सती जाण्याचा पाट पडला. जर बायका शाहाण्या व त्यांस विद्या वगैरे शिकवावयाची चाल असती, तर ज्यांणीं त्यांस प्रथम सती जाण्यास सांगितलें, त्यांच्या त्यांनीं शेंड्या उपटून टाकल्या असत्या. अजून ही जर स्त्रियांस विद्यावगैरे शिकविल्या तर त्या आपला पुनर्विवाह करतील आणि शास्त्री वगैरे जे त्यांस आडवे येतील त्यांस पुसतील कीं, पुरुषांनीं पाहिजे तितकीं लग्नें करावीं. मग स्त्रीनें नवरा मेल्यावरही दुसरा नवरा कां करूं नये ? आणि आपणच शास्त्रार्थ देऊन चालू करतील. परंतु असें होत नाहीं. कारण कीं, स्त्रियांस फार अज्ञानांत ठेविल्या आहेत. यास्तव जें पुराणीक सांगतो तें त्यांस खरें वाटतें. परंतु पुराणांत चुका काय आहेत, याचा विचार करतां येत नाहीं. व लाक्षणीक अर्थ काय आहे व बहूक्ती कोठें काय आहे हें कांहींच समजत नाहीं. परंतु हल्लीं म्हणतात कीं, ज्यांणीं पुराणें केलीं ते देव होते. वास्तविक पाहिलें तर ते मनुष्यच होते. व त्यांसही वाटलें नसेल कीं, आणखी पांच हजार वर्षांनीं आमची योग्यता देवासारखी होईल व आम्ही जें जें लिहिलें तें त्यांतून अर्थ मनांत न आणितां सर्वच खरें म्हणतील, हें त्यांसही ठाऊक नाहीं. हिंदु लोक खराखुरा इतिहास एखादे देशाचा वाचून व्यवस्था मनांत आणतील तर बरें होईल. म्हणजे त्यांस हें सर्व कळेल. पुराणें हीं केवळ कवींचीं काव्यें आहेत. जों जों संस्कृत भाषा बुडाली तों तों त्यांचें स्तोम वाढत चाललें. नाहींतर जसे तुकारामाचे अभंग, दोहोरे वगैरे आहेत तद्वतच पुराणांची योग्यता असती. यास्तव पुराणांतील मतांमुळें लोक फार मूर्ख व सुस्त झाले आहेत, हें त्यांस अद्याप कळत नाहीं.

लो० हि०

ता. १५ एप्रील सन १८४१

पत्र नंबर ५६

नादविद्या

विनंती विशेष. हिंदु लोकांमध्यें नादविद्या व तिच्या शाखा गायन, वाद्य, नृत्य इत्यादिक यांस वाईट म्हणतात. याचें कारण मला दुसरें कांहीं दिसत नाहीं. परंतु या लोकांमध्यें शाहाणपण नाहींसें झालें आहे व विद्या अगदीं बुडाली आहे. नाहींतर नादविद्येस असें सदोष न मानते. वास्तविक पाहिलें तर नादविद्या बहुत निर्दोष आहे, व या विद्येपासून जें सुख म्हणजे इंद्रियसुख होतें, तें ज्ञानसुखाचे जवळजवळ आहे. विद्वान यांणीं असें म्हटलें आहे कीं, ज्ञानसुखापुढें सर्व इंद्रियसुखें तुच्छ आहेत. तें खरें, परंतु नादविद्येचें सुख ज्ञानसुखासारखें आहे. कारण हें विकाररहित आहे. यांत दोष नाहीं. व येणेंकरून चित्ताचें समाधान, मनाचा संतोष, इंद्रियास उल्हास आणि जिवास विश्रांती होऊन कंटाळा जातो. व पूर्वीं याचा अंगिकार नारदासारखे देवऋषी, शंकरासारखे अवतारी यांणीं केला होता. तस्मात् या विद्येचें वर्णन काय करावयाचें आहे; या विद्येनें दया, प्रीती, भक्ती इत्यादिकांचा उत्कर्ष करितां येतो व "गायनः पंचमो वेदः" असें व्यासांनीं म्हटलें आहे; कोणी स्वर्गसुखाची प्रतिमा म्हटलें आहे. व मुसलमान लोक तर गायनवाद्येंकरून मृत प्राणी जीवंत झाले आहेत, असें म्हणतात. व हिंदु लोक गायनाचें वर्णन करण्यांत कमी नाहींत; भागवतांत गोष्ट आहे कीं, नारदास गर्व झाला होता. तेव्हां तो गर्व श्रीकृष्णांनीं हरण करण्याकरितां सांगितलें कीं, तुम्ही जाऊन एक जांबुवंत नामें अस्वल श्रीरामाचा सेवक आहे, त्यास भेटावें. याजवरून नारद तेथें गेले. तों जांबुवंत गात बसला आहे. आणि दगड पाषाण आसमंतात भागीं विरघळून रस झाले आहेत. नारदांनीं आपला विणा ठेविला तो त्या रसांत पडला. आणि गायन बंद होतांच पूर्ववत् पाषाण झाले आणि विणा आंत अडकला. तेव्हां जांबुवंतानें नारदास सांगितलें कीं, तुम्ही गावयास बसावें. आणि दगडाचें पाणी करून विणा काढावा. तें नारदाच्यानें होईना. तेव्हां तो जांबुवंतास शरण गेला. अशी पुराणांत कथा आहे. अस्तु, गायनेंकरून निर्जीव पदार्थ द्रवतील हें खरें म्हणवत नाहीं. परंतु सजीव प्राणी द्रवतात खरे. जे क्रोधी असतात त्यांचा क्रोध जातो. निर्दय दयाळू होतात व भांडखोर शांत होतात, हें खरें आहे. व याचा अनुभव मनुष्यांस आहे असेंच नाहीं, परंतु इतर जनावरांसही आहे. मोर, हरणें, सर्प इत्यादि गायन ऐकतात. येविषयीं गोष्टी या देशांत पुष्कळ आहेत. व तानसेन गवई गाऊन दिवे लावीत, असें म्हणतात. अशा गोष्टी चमत्कारीक या विद्येच्या आहेत. व प्राचीन काळीं रावणादीक राक्षसांनीं गायनेंकरून शिवाची प्रसन्नता केली, असेंही आहे. व संस्कृत भाषेंत पुष्कळ पुस्तकें याजवर आहेत.

परंतु तीं सर्व आतां लोकांनीं बांधून ठेविलीं आहेत. व जयदेवासारखे पंडित यांहीं ग्रंथ केले आहेत. व कवनें केलीं आहेत. परंतु सांप्रतकाळीं हिंदु लोक म्हणतात कीं, गायनाची विद्या मुसलमान लोकांची. परंतु त्यांचे लक्षांत असें येत नाहीं कीं, हिंदु लोकांच्या विद्या मुसलमान शिकले आणि हिंदु लोक विसरले म्हणून ती विद्या त्यांची झाली, असें नाहीं. परंतु सांप्रतकाळीं दोन लांछनें या विद्येस प्राप्त झालीं आहेत. एक जे गाणार व नादविद्येंत प्रविण असतात, ते मूर्ख, व्यसनी व भांगे असतात. लोकांस शिकवीत नाहींत, ग्रंथ पाहात नाहींत व मदोन्मत्त होऊन थोडकेंसें आलें म्हणजे स्वच्छंद होतात. आणि दुसरे दुर्जनांनीं या विद्येचा अंगीकार केला आहे व व्यभिचारिणी बहुधा या विद्येस लोकांस लुब्ध करून नादीं लावण्याकरितां अंगीकारितात. याजमुळें या विद्येचा हलकेपणा लोकांत झाला आहे. आणि गाणें वाजविणें म्हटलें कीं, लागलेंच म्हणतात, "अरेरे! हा छंद वाईट व हलका आहे." सारंगी हातांत घेतली किंवा मृदंग हातांत घेतला म्हणजे साजिंदेपणा ठरतो व विणा घेतला म्हणजे गोसावीपणा ठरतो. याप्रमाणें लोकांच्या मूर्ख समजुती पडल्या आहेत. परंतु जर गणितविद्या चोरटे लोक शिकले किंवा बंडवाले युद्ध विद्या शिकले तर त्या विद्या वाईट झाल्या कीं काय? व त्या त्याग करण्यास योग्य आहेत कीं काय? स्वर्गसुखाची प्रतिमा नादविद्या आहे, असें असतां भांगट लोक व दुष्ट स्त्रिया यांणीं तिचा अंगीकार करून व चांगल्या लोकांनीं त्याग करून विद्या वाईट असें ठरविलें आहे, परंतु हा मूर्खपणा आहे. जर्मन देशांत नादविद्या सरकारी शाळेंत शिकवितात. फ्रेंच व इंग्रज म्हणतात कीं, संभावित गृहस्थ यांणीं ही विद्या शिकल्याशिवाय त्यांची विद्या परिपूर्ण होत नाहीं. जसें देशाटण हें विद्याभ्यासाचा भाग आहे, तद्वत ही विद्या आहे. व बायकांस अवश्य शिकवितात. संभावित गृहस्थांच्या स्त्रिया नादविद्येंत प्रविणता नाहीं, असें आढळत नाहीं. अशा शाहाणे लोकांच्या चाली आहेत. व याप्रमाणें हिंदु लोकांच्या युगांतरीं होत्या. कारण कीं, विराट राजाचे कन्येस गायन व नृत्य शिकविण्यास अर्जुन बृहन्नटा या वेशानें राहिला, ही कथा भारतीं प्रसिध्द आहे. तेव्हां याविषयीं संशय नाहीं. परंतु आतांचे हिंदू लोक फार रानटी झाले आहेत. त्यांस निर्मळ ज्ञानसुख याचा अनुभव नाहीं. व त्यांच्या स्त्रियांस तर ते कुत्र्याप्रमाणेंही मान देत नाहींत. मग त्यांस या रमणीय विद्या कोठून शिकविणार? नवरा म्हणतो, माझी बायको कुळंबिणीपेक्षां अधीक. मी मेलों तर इणें जाळून घ्यावें व माझें पायाचें तीर्थ घ्यावें व माझी पूजा करावी. इला दुसरा देव नाहीं. याप्रमाणें जनावराप्रमाणें वर्तणूक करितात. यांस सुधारावयास बहुत दिवस पाहिजेत. घरून उठून गाणें ऐकावयास कसबिणीच्या येथें बहुत लोक सांप्रत जातात. व गाण्याचे, वाद्याचे बहुत लोक इषकी म्हणवितात. यांणीं जर आपल्या स्त्रियांस विद्वान केल्या तर असे अनाचार करण्याची जरूर नाहीं; परंतु हें त्यांस मोठें विरुध्द वाटतें. कारण हे लोक अगदीं वेडे झाले आहेत. व त्यांस नीट गोष्ट सांगणारा देशांत एकही राहिला नाहीं.

सर्व एका राशीचे झाले आहेत. सर्व देशांत जितके लोक आहेत तितके विद्वान नसतात. परंतु कांहीं कांहीं असतात. व त्यांचे आधारानें इतर लोक चालतात. परंतु देशांत दोनशें चारशें तरी शाहाणे व लोकांचे हितकर्ते पाहिजेत. मग बाकीचे अडाणी लोक असले तरी चिंता नाहीं. परंतु जे विद्वान आहेत, त्यांस विद्वान समजून त्यांचे मार्गानें वागण्याची इतरांस बुध्धी पाहिजे. सांप्रत हिंदु लोकांमध्यें वास्तविक विद्वान कितीएक होत चालले आहेत. परंतु पुष्कळ लोक यांचें सांगितलें ऐकावें, असें मानीत नाहींत. यास्तव त्या विद्वानांच्या बुध्धीचा उपयोग होत नाहीं. परंतु [मोत्यांची हेळणा कावळे करितात,] त्या दृष्टांताप्रमाणें हें आहे. हल्लीं जे विद्या शिकून विद्वान झाले आहेत, त्यांचे सांगितल्याप्रमाणें लोकांनीं चालावें, अशी लोकांस बुध्धी येण्यास अवकाश आहे. ही गोष्ट ज्या दिवशीं होईल, त्या दिवसापासून पंचवीस वर्षांत हिंदुस्थानचा रंग फिरेल. सर्व लोकांस अशी उत्कंठा झाली पाहिजे कीं, आम्हांमध्यें विद्वान कोण आहे. चला, त्याचीं बोलणीं ऐकूं; त्याचा बुध्धीवाद घेऊं. हें लोकांच्या दुर्भाग्यामुळें झालें नाहीं. परंतु होईल यांत संशय नाहीं. परंतु हें होण्यास ब्राम्हणांचा गर्व अगदीं निस्तोष गेला पाहिजे. ते अद्याप आपले धुंदींत आहेत. आणि मूर्खपणा आपलेजवळ असून वास्तविक विद्वानांचीं बोलणीं ऐकत नाहींत प्राचीन काळीं आम्हास, देव असें लोक मानीत होते. तसेंच आतां मानावें. असें ते इच्छितात. परंतु आतां ते लौकरच माणसासारखे होण्याचा समय आला आहे. आतां लोक अज्ञानांत नाहींत हें त्यांणीं पुर्तें समजावें. हे विनंती.

लो० हि०

♣ ♣

ता. २२ एप्रील १८४१

पत्र नंबर ५७

हिंदु लोकांचा व्यापार

सांप्रत हिंदु लोक भिकारी होत चालले आहेत. व त्यांस रोजगार धंदा नाहीं. याचें कारण मला असें दिसतें कीं, या लोकांचा व्यापार अगदीं बुडाला. इंग्रज व दुसरे देशचे लोक फार शाहाणे होऊन या लोकांस सर्व जिनसा पुरवितात. आणि हे मुकाट्यांनीं स्वस्ताईमुळें खरीदी करितात. यास्तव या लोकांनीं एकत्र होऊन जर असा कट केला कीं, आपले देशांत दुसरे मुलखाचा जिन्नस आला तरीं घ्यावयाचा नाहीं. आपले देशांत पिकेल तेवढाच माल घ्यावा. आपले लोक कापडें जाडीं वाईट करतात. परंतु तींच नेसावीं. इकडे छन्या करितात. त्याच घ्याव्या म्हणजे या लोकांत व्यापार

राहून इकडे सुख होईल; परंतु हे लोक असें करीत नाहींत. आणि थोडी किंमत म्हणून लोकांचा जिन्नस विकत घेतात. वास्तविक पाहिलें तर हल्लीं दाणे मात्र इकडे पिकवून हे लोक खातात. अजून दाणे परदेशांतील येऊं लागले नाहींत. बाकी सर्व पाहावें तें परदेशचें आहे. आमचे कपडे, आमची छत्री, आमची चाकू-कात्री, आमचें घड्याळ, आमची गाडी, आमचीं बुकें, सर्व परदेशांतील आहेत. आम्ही दाणे मात्र आपले खातों. यामुळें सर्व व्यापार बुडाला. उदमी, मजूरदार, कसबी, कारागीर घरीं बसले. आणखी तर काय सांगावें; परंतु आमचे रुपये, आमचे घरांत सनकाड्या देखील युरोपच्या. इकडे लोक पैशाच्या शंभर सनकाड्या देतात. त्या पेटवावयास विस्तव पाहिजे, ठेवावयास मोठी जागा पाहिजे; परंतु विलायतेचा सनकाड्या सुंदर पेटीमध्यें तयार करून भरलेल्या पैशाच्या शंभर मिळतात. विस्तव पेटवावयास नको. अशी सोय पाहून आम्ही आपले देशच्या लोकांच्या सनकाड्या घेत नाहीं. परंतु याजमुळें आमचे लोक किती भिकारी झाले आहेत. याजकरितां सर्वांहीं असा कट करावा कीं, जें आपल्या देशांत पिकेल तेंच नेसूं. तेंच वापरूं. कसेंही असो. आणि तितक्यांत चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयाच्या विद्या शिकूं. आम्हांस मिळेल तसेंच घेऊन आम्ही काळ काढूं. मग हजारों खंडी कापूस इकडून विलायतेस कशास जाईल? कापूस विकणाऱ्यांनीं असा वेत करावा कीं, इंग्रेजास इकडे तयार केलेलीं कापडें द्यावीं, परंतु कापूस देऊं नये. येणेंकरून हे लोक सुखी होतील. सांप्रत आपलेच लोक आपल्या लोकांस मारीत आहेत. जशी बाहेरची चांगली स्त्री पाहून घरची लग्नाची स्त्री टाकून तिचे पाठिस लागतात, आणि भूलतात. तसें या लोकांचें झालें. येणेंकरून हाहःकार झाला आहे. आणि जो तो शेत करूं लागला; दुसरा व्यापार कांहीं नाहीं. परंतु शेत करण्यांत तरी काय नफा? वर्षभर मजूरी मरेमरेतों करावी, तरी लंगोटी आणि शिळी कोंड्याची भाकर देखील मिळावयाची भ्रांती. बहुत दाणे पिकवितात. परंतु घेतो कोण? पैसा दुसऱ्या देशांत चालला. श्रीमंत लोक ज्यांजवळ लाखो रुपये आहेत ते विलायती जिनसा घेतात आणि पैसा उडवितात. त्यांचे पोटास पावशेर दाणे पाहिजेत. त्याची मात्र किंमत रयतेकडे जाते. बाकी हजारो रुपये विलायतेस थेट जातात. याप्रमाणें हमेष चाललें आहे. असा कट करणें वगैरे उपयोगी गोष्टी आहेत. त्या पुराणीक, हरदास यांणीं लोकांस सांगाव्या त्या टाकून दुसऱ्या गोष्टी सांगतात. आणि याजकडे लक्ष देत नाहींत. लोक भिकारी झाले, याचें कारण कोणी मनास आणीत नाहीं. जर हरदास व कथेकरी यांनीं अशीं मतें घेतलीं आणि लोकांस जर भरविलीं तर बहुत लोक एकत्र होतील. कारण कीं, ही गोष्ट उघडी आहे. परंतु देव आधीं बुद्धी नेतो. मग भांडवल नेतो. तशी या लोकांची बुद्धी पापाचरणाकडे गेली. नंतर या संकटांत ते आले. परंतु सर्व मागील पुराणांतील कथा एकीकडे ठेवून हल्लींचे लोकांची स्थिती सुधारण्याबद्दल लोकांस उपदेश केला तर महान पुण्य आहे. तसें हे हरदास करीत नाहींत. चांगल्या

गोष्टी छापखान्यांतून निघाव्या असेंच नाहीं. हरदासांनींही काढाव्या व त्यांस लोक एकत्र करण्याची फार शक्ती आहे. कारण कीं, ते चौघांत उभे राहून उपदेश करण्याचा आरंभ करितात. त्यांनीं असे उपयोगी विषय लोकांस शिकविले, तर सर्व आख्यानांहून हीं आख्यानें चांगलीं होतील. आणखी लोकांस समजवावें कीं, तुम्ही मूर्ख आहां. विचार करीत नाहीं. यास्तव विचार करा, व विद्या करा. व विलायतेंतील लोकांप्रमाणें अक्कलवान व्हा. म्हणजे तुम्हास लक्ष्मी अनुकूल होईल. छापखाने पुष्कळ ठेवा. पुष्कळ ग्रंथ वाचा, म्हणजे तुम्हांस सर्व बातम्या लागतील. लष्करच्या भाकऱ्या कोण भाजतो, असें म्हणूं नका. परदेशांत गेलें तर विटाळ होतो, ही कल्पना सोडा. म्लेंछाच्या देशांत जाऊं नये म्हणून अटकाव होता. पण आतां तुमचा देश म्लेंछाचा झाला. तेव्हां तो शास्त्रार्थ राहिला नाहीं. तात्पर्य, विद्या करा, विद्वानांचें ऐका, मदोन्मत्त होऊं नका. अशा प्रकारच्या कथा सांगितल्या तर फार फायदा होईल. हे गोसावी कथा करितात, हे व्यर्थ लोकांस आणखी मूर्ख करितात. कारण कीं, अमानुष गोष्टी त्यांस सांगतात. काळयवन आला आणि कृष्णानें त्यास मुचकुंदाचे हातून जाळिला. रामास संकट पडलें तेव्हां मारुतीनें एक पाय लंकेंत आणि दुसरा अयोध्येंत ठेविला. भीष्म ऐकेना, तेव्हां अर्जुनानें पाशुपतास्त्र व नारायणास्त्र सोडिलें. या गोष्टी सांगून कांहींतरी उपयोग आहे काय ? आतां लोक भिकारी आहेत यांजवर सोन्याची वृष्टी होत नाहीं. व मागील गोष्टी झाल्या तशा आतां होत नाहींत, यांत संशय नाहीं. तस्मात अमानुष कथा लोकांस सांगितल्या तर लोकांस कांहीं उपयोग नाहीं. त्यांस आळशी अधिक करण्याचा मात्र उपयोग आहे. परंतु त्यांस कांहीं माणसासारख्या कथा सांगाव्या कीं, अमुक राज्य हें कशानें गेलें ? दिल्लीचें राज्य, बाजीरावाचें राज्य कां गेलें ? काय व्यंग त्यांत होतें. हें काढावें. तसेंच विलायतेंत राज्य कसें आहे ? परंतु या गोष्टी आपले लोक मूर्ख आहेत, त्यांस सांगितल्यावर ते म्हणतील कीं, राज्य कशानें गेलें, तर सद्दी फिरली म्हणजे राज्य जातें. हें काळाचें माहात्म. इंग्रजाची सद्दी फिरेल तेव्हां त्यांचेंही राज्य जाईल. परंतु हें कांहीं उत्तर नाहीं. लोक अगदीं मूर्ख झाले आहेत. त्यांचीं चित्तें मागील अमानुष गोष्टींवर फार आहेत. याजमुळें त्यांस असें वाटतें कीं, अवतारी पुरुष होईल तेव्हां आमचें कल्याण करील. हें मनुष्यांचें कृत्य नव्हे. अशा मूर्खपणाच्या समजुती आहेत. परंतु जरी ईश्वर सर्व गोष्टी घडवितो तरी मनुष्यांनीं मूर्खासारखा नशीबावर भरवसा ठेवून आळशीपणांत राहूं नये. जो उद्योग करितो, त्यास ईश्वर सहाय होतो म्हणून लोकांनीं उद्योग करावा. व प्रयत्न करावा हेंच उत्तम. सद्दी या शब्दाचा अर्थ पाहिला तर कांहीं नाहीं; लोकांचा मूर्खपणा आहे. हे विनंती.

लो० हि०

ता० २१ माहे एप्रील १८४१

पत्र नंबर ५८

आचार

विनंती विशेष. हिंदु लोकांमध्यें सांप्रत आचार फार माजला आहे. म्हणजे किर्कोळ निरर्थक कर्में, आणि ढोंगें फार होऊन त्यांतील बीजरूप जी नीती ती भ्रष्ट झाली आहे. ब्राम्हणांच्या घरांत जाऊन पाहिलें म्हणजे आचार किती असतात, ते लक्षांत येतात. म्हणजे सोवळें ओवळें हें एकच प्रथम, नंतर पुरुषांचें सोंवळें, बायकांचें सोंवळें. कित्येक ठिकाणीं देशस्थ ब्राम्हणांचे हातचें म्हणून कोकणस्थांच्या बायका जेवीत नाहींत. पिठास पाणी लावलें म्हणजे ओंवळें झालें. खरकटें, शिळें व उष्टें यांविषयीं हजारों नेम आहेत; जेवतांना वाढणाराचा स्पर्श झाला तर पुनः आंघोळ केली पाहिजे. उष्टें-विटाळ म्हणजे आंचवण्याचे पूर्वीं कशास स्पर्श न करणें. दाणे भाजले म्हणजे ओंवळ्यानीं खावयास चिंता नाहीं. परंतु हिरवे दाणे खाऊं नये, आणि त्यांस पाणी लागलें म्हणजे विटाळ झाला. जेऊन उठला म्हणजे पुनः अन्न खाऊं नये, व प्रोक्षण केल्याच्या पूर्वीं खाऊं नये. व जेथें जेवलें तेथें शेणपाणी लावल्याखेरीज दुसरा जेवावयास बसत नाहीं. अन्नास जो हात लागला तो तसाच आंगास लागला तर आंग धुतलें पाहिजे. मुगटा, धाबळ, रेशमी कापडें, सोंवळीं; कापूस ओंवळा, म्हणजे धुतल्याशिवाय तो घेऊन जेवीत नाहींत. परंतु वास्तविक विचार केला तर रेशीम करण्यांत बहुत हिंसा होते. असें असून तें पवित्र आणि कापूस झाडाचें फूल तें ओवळें, हें कसें असेल? याचा ठराव किमतीमुळें पूर्वी शास्त्रकर्त्यांनीं केला किंवा कसें, त्याचा ठिकाण लागत नाहीं. पीतांबर पन्नास वर्षें धूत नाहींत. परंतु धोत्रें रोज धुतात. आणि धोब्याजवळ दिलीं तर तीं सर्वदां ओवळीं होतात. तेव्हां हे सर्व चमत्कारिक नियम ज्यांमध्यें ब्राम्हणांच्या तीस घटका जातात, त्यांचा उपयोग पाहिला तर कांहीं नाहीं. परंतु लोक म्हणतात कीं, जितकें ज्यास होईल तितकें त्यानें करावें. म्हणून जे भटभिक्षुक आहेत, ते ढोंग दाखविण्याकरितां फारच करितात. व शंकराचार्यांचे वंशांतील शिष्य जे आतां संस्थानी आहेत, त्यांचे येथें पाहिलें तर आचार इतका आहे कीं, तो पाहाण्यानें देखील कंटाळा येतो. मग त्याचा त्रास कोण सोशील? पन्नास ठिकाणीं पाणी शिंपतात. दोनशें ठिकाणीं हात धुतात. तीनशें ठिकाणीं पाय व जागोजाग नेत्रस्पर्श, आणि जागोजाग मार्जन आणि देवपूजा व सोवळें मनस्वी करतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत असें ढोंग करितात, आणि कोणी जेवावयास वगैरे बलाविलें तर मग फारच लांबलचक करितात. म्हणजे लोकांस वाटावें कीं, पुण्यवान प्राणी आहे. मनाची स्थिती पाहिली तर ज्ञानशून्य. येवढा आचार

ब्राम्हणांनीं खटपटीचा अंगिकारला आहे. परंतु हा चौघांत चालवयाचा नव्हे. याची खात्री ज्या ठिकाणीं मोठा समुदाय होतो तेथें पाहावें. चिंचवडचें ब्राम्हणभोजन, निगडीचा उत्साह, तसेंच मोठमोठे ठिकाणीं जेथें पुष्कळ लोक जमतात किंवा प्रवासास निघतात, तेव्हां आचार निभत नाहीं. कारण कीं, उष्ट्यावर, खरकट्यावर पाय देत चालतात. एकामेकांस विटाळ होतो. शेण लावल्याचा झास्त्रार्थ करितात. परंतु उष्ट्या अन्नावर दुसरीं पानें मांडतात. आणि लोक त्यावर जेवितात. आणि त्यास म्हणतात, हा देवाचा प्रसाद. येथें कांहीं चिंता नाहीं. घरीं मात्र अनाचार करूं नये. याजमुळें ब्राम्हण लोक हे फार नालायक आहेत. यांस गांवास जाणें, लढाईस जाणें, समुद्रांत प्रवास करणें इत्यादिकांचा त्रास. कारण कीं, त्यांस प्रथम भय, दुसरें कांहीं नसतें. पण मी जेऊं कसा ? माझें सोंवळें ओंवळें कसें चालेल ? मला भांडीं कोण देईल ? माझें शिजवील कोण ? इत्यादि काळज्या त्यांस पडतात. याजकरितां ब्राम्हण लोक बहुधा घरीं राहाणारे लोक व चोरट्यासारखे आपले घरीं दडून राहाणारे. त्यांस कधीं फारकरून बाहेर पडावयाची वेळ आली म्हणजे त्यांचा प्राणांत होतो. परंतु अशा घातकारक चाली सोडून द्यावयास काय अवघड ? ब्राम्हण लोकांनीं सर्व जातींस मूर्ख ठरविलें आणि आपण शाहाणे झाले. परंतु आपण तरी पराक्रम केला असें नाहीं. आपल्याभोंवती रिकामे घोळ पुष्कळ उत्पन्न करून ठेविले आहेत. येणेंकरून ते सर्व लोकांस घेऊन आपण बुडाले असें झालें आहे. जर इतर लोकांस लिहिण्याची व शास्त्र वाचण्याची परवानगी असून ते विद्वान असते तर त्यांनीं स्वतांच पराक्रम केला असता. कारण कीं, इतर जातीस आचाराच्या अडचणी नाहींत. परंतु ब्राम्हणांनीं सर्वांचा नाश करून आपण बुडाले. आतां इतर जातीचे लोक शहाणे होऊन पराक्रम करीत तों फार दिवस पाहिजेत. नाहींतर आजपर्यंत इतर जातींचे हिंदु लोकांनीं विलायतेंत जाऊन पृथ्वी कशी आहे, याचें वगैरे ज्ञान मिळविलें असतें. मग ब्राम्हण याच देशांत आपले घरोघर राहाते, तरी त्याची कांहीं फिकीर नव्हती. असतु. सांप्रत ब्राम्हण लोकांनीं याचा विचार करावा. आपण पराक्रमी व प्रवास करण्यास व लढाईस वगैरे योग्य होण्यास आपल्यास कोणत्या चाली सोडल्या पाहिजेत, आणि त्या सोडाव्या हें उत्तम, हें एक आणि दुसरें ब्राम्हण लोकांमध्यें नित्याचा आचार तसाच नैमित्तिक आहे. तोही रद्द करण्याजोगा आहे. म्हणजे पोर जन्मास आलें त्या घटकेपासून भटांचें अनुष्ठान आणि पूजा व सोंवळेंओवळें सुरू होतें. कोणी म्हणतो, अन्नप्राशनसंस्कार; कोणी म्हणतो, दगडसंस्कार. कोणी म्हणतो, षष्ठीसंस्कार. त्यांच्या पूजा आणि व्यवधानें फार आहेत. तसेंच लग्न हेंही हिंदु लोकांमध्यें मूर्खपणानें होतें. लग्नाचे संकल्प प्रतिज्ञा वगैरे सर्व भट संस्कृत भाषेंत आपण पाठ करितो. आणि बडबड करितो. त्यांतील शब्द कोणास समजत नाहीं. त्याचा उपयोग काय ? हे सर्व संस्कार लग्नेंसुद्धां मराठी भाषेंत वगैरे उतरून त्याप्रमाणें करावें. हें गुह्य कशाकरितां पाहिजे ? परंतु हें लोकांस कळत नाहीं. घरांत लहान मुलगा किंवा मुलगी असली म्हणजे तिला

आचार शिकविण्यास प्रारंभ होतो. नीती वगैरे वास्तविक सदाचार शिकवीत नाहींत. पोरीस वाती लावाव्या. निरांजनें लावून तूप जाळावें. तिळ तांदूळ वाहावे. नाना प्रकारच्या मूर्खपणाचीं व्रतें करावीं आणि त्या बाबदच्या काहाण्या वगैरे तिजला शिकवितात. आणि तो दृढ भाव करितात. तसेंच पुरुषाला सोवळें ओवळें हें ब्राम्हणाचे घरीं श्रम करून मुलास शिकवितात. परंतु मोठी गोष्ट म्हणजे नीती शिकवावयाची ती राहाते. याजमुळें परिणाम असा झाला आहे कीं, नीती म्हणजे काय ? हें कोणास ठाऊक नाहीं. तें अगदीं विसरलें. आतां आचारावरून चांगला वाईट मनुष्य जाणतात. व असें बहुत ठिकाणीं आढळत आहे कीं, जी स्त्री शिनळ, लबाड असते ती तुळशीस प्रदक्षणा घालण्यांत, वाती जाळण्यांत प्रमुख असते. नदींतलें पाणी दाहावीस घागरी देवावर ओतितात. इत्यादि नेम शिंदळ स्त्रिया भक्तीनें करतात. आणि शिंदळकी वाईट हें त्यांस स्वप्नांतही माहित नसतें. तसेंच पुरुषांत जे चोर, लांचखाऊ, लोकांच्या माना मोडून पोट भरतात, [ते] इंद्रियभ्रष्ट, पण त्यांचें सोंवळें ओवळें सर्वांहून अधिक. जेवतांना बोलत नाहीं. पूजा करितांना बोलत नाहीं हे असे नेम ते निष्ठेनें करितात. पुष्कळ पैसा खर्च करून तुळशीफुलांचा संहार करितात. परंतु आमची वर्तणूक वाईट हें त्यांच्या स्वप्नीं नसतें, व लोकही म्हणत नाहींत कीं, तो आचार कसला करितो ? वर्तणुकेनें फार वाईट आहे. याविषयीं लोकही आंधळे झाले आहेत. तेही सोंवळ्यावर व देवपूजेवरच न्याय करितात. नीती, आणि सदाचरण यांविषयीं लोक अगदीं आंधळे झाले आहेत. हे विनंती.

लो० हि०

ता० ६ वी, माहे मे १८४१

पत्र नंबर ५९

लोकांची समजूत व पुराणादिकांचें सौरस्य

विनंती विशेष. हिंदु लोकांमध्यें स्वधर्माचा विचार कोणी करित नाहींत. देवळांत अमर्यादा करितात. पुणें येथें व इतर ठिकाणीं देवाचीं नांवें लोकांनीं भांग्या मारुती, छिनाल बालाजी, खुन्या मुरलीधर, चिमण्या गणपती इत्यादि ठेविलीं आहेत. याजवरून असें वाटतें कीं, देवाचा मान करावा आणि देवास भीत जावें, हा भाव अगदीं नाहींसा झाला. देवळें ही पवित्र जागा, त्यांत अनाचार असूं नये, हें लोक अगदीं जाणत नाहींत. मला वाटतें कीं, इंग्रेजाचा धर्म कसाही असो. परंतु त्यांस देव आणि त्याचा मान करणें हें

समजतें. पाहा कीं, आठ दिवसांनीं देवळांत ते जातात. परंतु भक्तीनें व मर्यादेनें भजन करून माघारे येतात. आणि हिंदु लोकांचे देवळांत पहा, कसबिणी बिराडास असतात, सोदे, लुच्चे संध्याकाळीं तमाशे पाहावयास वगैरे येऊन बसतात. त्यांचे मनांत देवळाचा मान अगदीं नसतो. आणि जसे चावडीवर तमाशास लोक जमतात किंवा चौथ्यांवर पान-सुपारी खात बसतात. घरच्या कारभाराच्या गोष्टी सांगत बसतात. तद्वत व्यवस्था आहे. पुण्यांत तुळशीबागेंत गेलें किंवा हिंदु लोकांचे कोणत्याही जत्रेस गेलें, म्हणजे हेंच सर्व दृष्टीस पडतें. देवाकरितां भक्तीनें येऊन मर्यादेनें व पवित्रपणानें वागतात, असा शंभरांत एक मनुष्य असतो. स्वधर्म म्हणजे काय तो या लोकांस अवश्य सांगितला पाहिजे. कित्येक मूर्खांस असें वाटतें कीं, पुराणांत जितक्या गोष्टी लिहिल्या आहेत तितक्या खऱ्या आहेत. परंतु व्यासांनीं असेंच लिहिलें आहे कीं, स्त्री, शूद्र, वैश्य इत्यादि मूर्ख जनांकरितां पुराणें लिहिलीं आहेत. ज्ञानीयांस कर्में व पुराणें याची गरज नाहीं ही गोष्ट खरी आहे. कारण पुराणांत कित्येक गोष्टी केवळ मूर्खांचे शासनार्थच सांगितल्या आहेत. जसें वाती करून लावाव्या. याचा वास्तवीक अर्थ इतकाच कीं, आंधेरांत उजेड करावा. परंतु ही सोपी गोष्ट सांगण्याकरितां पुराण लिहिणारानें नाना प्रकारच्या गोष्टी लिहिल्या आहेत. कीं जसा एक उंदीर होता, त्याचें शेंपूट एक बाई वाती करीत असतां चातीस लागून त्यानें चाती फिरून एक वात झाली. ती जेव्हां देवळांत जळाली, तेव्हां त्या उंदिरास न्यावयास विमान आलें. त्यानें पुसलें कां? तेव्हां देवदूत म्हणाले कीं, तुझ्या पुछाचे धाग्यानें एक वात झाली. ती आज देवळांत जळाली. त्याचें श्रेय तुला आलें, म्हणून हें विमान तुला आणलें आहे. याजकरितां वाती लावतील त्यांस मोक्ष होतो. तसेंच वांग्याचे धुरानें विमान पडल्याची कथा आहे. इत्यादि लक्षावधि कथा आहेत. परंतु त्यांचा खरा अर्थ सोडून लोकांनीं त्या गोष्टीच खऱ्या मानिल्या आहेत आणि बायका ऐशीं वर्षेपर्यंत वाती करितात, आणि जाळितात. दुसरा कांहीं उद्योगच नाहीं. हा मूर्खपणा पुराणांचे गोष्टींनीं शिरला. जर पुराणें करणारांनीं खूळ लावावयाच्या गोष्टी न लिहितां साधेपणानें सांगितलें असतें कीं, गरीबास धर्म करावा. अंधेर असेल तेथें दिवा लावावा. परंतु असें न सांगतां, त्यांनीं दरएक कलमास मोक्ष आणि स्वर्ग सांगितला आहे. त्यास असें दिसतें कीं, या गोष्टी लिहिणारास पुढें लोक मूर्ख होतील. व या गोष्टी सर्व खऱ्या म्हणतील असें वाटलें नवतें. परंतु तशी गोष्ट झाली. आतां पुराणीकबावांच्या गोष्टी ऐकणार ज्ञानी पुरुष नाहींत. परंतु बायका व पुरुष खुळे, वेडे, अज्ञान, मूर्ख ज्यांस कांहींच समजत नाहीं, असे बसतात आणि सर्व गोष्टी खऱ्या म्हणतात. येणेंकरून लोक मूर्ख झाले आहेत. याजकरितां या सर्व पुराणांतील कोणी रहस्य काढून नवीन ग्रंथ लिहील तर फार हित होईल. उनाड गोष्टींनीं लोकांस भ्रांतींत घालणें हें योग्य नाहीं. आणि वास्तवीक पाहिलें तर धर्मशास्त्र, वैद्यशास्त्र व ज्योतिषशास्त्र हीं सर्व प्राचीनकाळीं लिहिलीं गेलीं आणि सांप्रत काळास फरक पडला

आहे. त्याजमुळें धर्मशास्त्रांत जे फेरफार करावयाचे ते केले पाहिजेत. जसें ज्योतिष काळेंकरून चाळावें लागतें. तेव्हां त्यास मेळ पडतो. आणि वैद्यकही शास्त्रांत एक आहे, आणि कृतींत वेगळेंच असतें. वैद्य चार रोगांचीं औषधें जाणतो. परंतु जर एका मनुष्यास चार रोग झाले तर त्यानें कल्पना बसवून योजना केली पाहिजे आणि हजार औषधें एका रोगास लिहितात. परंतु वैद्यानें प्रसंग पाहून दिलें पाहिजे. तसेंच धर्मशास्त्रांत अनेक मतें आहेत. व पुराणांत अनेक गोष्टी आहेत. परंतु लोकांची स्थिती पाहून व तारतम्य पाहून त्याचें रहस्य जाणावें. केवळ अर्थाचा अनर्थ करूं नये. परंतु हे लोक शुद्धीवर नाहींत. अगदीं भकले आहेत. त्यांस शिकवणार, शंकराचार्य कोण ? ईश्वर करील तें करो. परंतु लोक फारच अज्ञान झाले. धर्म म्हणजे काय, विद्या म्हणजे काय, हें अगदीं जाणत नाहींत. मोडक्या घराचे कुजके वांसे राहातात, तसें हिंदु धर्मशास्त्र व विद्या हे प्राचीन काळचे शब्द लोकांचे तोंडांत मात्र आहेत. परंतु अर्थ ठाऊक नाहीं. आणि लोकांनीं कांहीं कांहीं विद्या फारच मूर्खपणास नेऊन पोंचविल्या आहेत. त्या कोणत्या म्हणाल तर ऐका. एक वैद्यकी रसायनशास्त्र. हें चांगलें शास्त्र आहे. परंतु त्यामध्यें या लोकांनीं किमया काढली आहे. तसेंच ज्योतिषशास्त्र चांगलें, परंतु त्याजवरून भविष्यें पाहाण्याची रीती व नियम काढले आहेत, ते अगदीं खोटें. आकाशांतील जे तारे त्यांच्यानें पृथ्वीवरचे मनुष्याचे नशीबाचा फेरफार कसा होईल ? शनी पाहिजे तिकडे गेला व गुरू कोणत्याही राशींत आला तरी मी पृथ्वीवर राहाणार, माझें तो काय करील ? व माझ्याशीं व त्याशीं संबंध काय ? परंतु प्राचीन काळचे भटांनीं अडाणी लोकांवर कर बसविण्याकरितां ही युक्ती केली आहे. तसेंच नीतीशास्त्र याचें पर्यवसान तप आणि योगशास्त्राकडे गेलें आहे. परंतु त्यांतही कांहीं अर्थ नाहीं. शास्त्रकारांनीं नीती सांगण्याकरितां ही युक्ती केली आहे. म्हणजे पुरुषास तीन वेळां स्नान वगैरे सांगितलें. येणेंकरून शास्त्रकाराचा हा हेतू कीं, त्या पुरुषाचा काळ या खटपटींत जाऊन त्याकडून कांहीं दुराचार घडूं नये. ब्राम्हण चोरी करतील म्हणून मुळींच द्रव्य बाळगूं नये, असें सांगितलें. संन्याशी स्त्रीशीं जातील, म्हणून त्यांस सांगितलें कीं, तुम्हीं घरीं राहूं नये. व दूध वगैरे खाऊं नये. तात्पर्य, त्यांची नीतीरक्षण होण्याकरितां इतक्या युक्ती सांगितल्या. तसेंच विधवा स्त्रियांचे हाल त्यानिमित्तच आहेत. परंतु नीती स्पष्ट करून सांगते तर बरें होतें. ही इतकी बहूक्ती केली यानें लोक मूर्ख झाले. गायनविद्या आहेत. त्यांचा राग अमका चांगला आहे, असें म्हणावयाचें सोडून या रागानें पाऊस पडतो, त्या रागानें दिवे लागतात, इत्यादि अतिशयोक्ती केली आहे. ती न समजतां लोक आतां खरेंच म्हणतात; आणि म्हणतात कीं, तशी विद्याच कोठें नाहीं, आणि मंत्राचें सामर्थ्य गेलें. परंतु होतें कधीं ? कधीं नव्हतें. ही बहूक्ती आहे. याजवर भरवसा ठेवूं नये. तसेंच योगशास्त्राची अव्यवस्था आहे. मला असें वाटत नाहीं कीं, मनुष्य योगानें हजार वर्षें वांचेल. किंवा प्राण ब्रम्हांडीं

नेईल. आणि सुखदुःखाचा त्याग करील. मग त्यास तोडला तरी सारखा, मारला तरी सारखा, अशा स्थितीचें वर्णन पुराणांत बहुत आहे. परंतु ही स्थिती पुराणांतील इतर गोष्टींसारखीच मला अमानुष व अशक्य दिसते. किंबहुना अतिशयोक्ती असेल. म्हणजे मनुष्यानें सुखदुःखाविषयीं शांती धरावी. म्हणजे चित्त स्थीर राहातें, हें स्पष्ट लिहिल्यावांचून बळेंच अवघड रीतीनें लिहिलें असेल हें अनुमान दिसतें. जर योगशास्त्र खरें असतें तर नाहींसें कां होतें? लोक अवश्य योग करते. कारण तें मोठें सुख आहे. परंतु ही गोष्ट किमयाप्रमाणें व्यर्थ आहे. म्हणून या अशा वक्तयांवर भरवसा ठेवूं नये. नीट अर्थ करीत जावा. आणि विद्येचे खरे भाग मात्र घ्यावे आणि भविष्य ज्योतिष टाकून द्यावें. हिशेबाचें मात्र ज्योतिष घ्यावें, हें बरें. यथानीती वर्तणूक केली म्हणजे त्यांत मोक्ष आहे. हजार आचारांच्या खटपटी केल्या तरी त्यांत कांहीं नाहीं. आणि शास्त्राचा अर्थ युक्तीनें घेतला पाहिजे, याविषयीं वाक्य—

"श्रुतिस्मृतिविरोधे तु युक्तिरेव बलीयसी."

या वाक्यानें त्याचानें निर्णय होतो. परंतु ज्या दिवशीं हिंदु लोक आपले बुद्धीचा उपयोग करूं लागतील, त्या दिवशीं त्यांस हा भेद समजेल.

लो० हि०

ता० १३ वी, माहे मे १८४१

पत्र नंबर ६०

हिंदू लोकांनीं काय करावें?

विनंती विशेष. पुण्यांत मागें एक साहेब आला होता व त्यास कारकून ठेवावयाचे होते. हें वर्तमान बाहेर फुटतांच दोन हजार उमेद्वार त्याचे येथें आले. मग त्यानें निवडून निवडून त्यांतून थोडेसे ठेविले आणि म्हणूं लागला कीं, हें फार आश्चर्य आहे. जर एक न्हावी किंवा शिंपी ठेवूं लागलों तर मिळत नाहीं, आणि चांगले कारकून बोलावल्या-खेरीज हजारों येतात. कारकुनीचा धंदा हिंदु लोकांमध्यें इतका स्वस्थ[स्त] आणि इतर धंदे स्वस्थ[स्त] नाहीत, याजवरून विचार करितां मला वाटतें कीं, ही गोष्ट खरी आहे. पुण्यांत आज पाहिलें तर दोन हजार ब्राम्हण उमेद्वार चांगले लिहिणारे आहेत. परंतु त्यांस रोजगार नाहीं. कित्येक दाहादाहा वर्षें कचेरींत जाऊन मेहनतीनें लिहितात.

फुकट चाकरी करितात. परंतु पांच रुपये देखील कोणास मिळत नाहींत. तसेंच भट हजार आहेत. कित्येक जन्मपर्यंत वेद पाठ करण्याची मेहनत करितात, परंतु आगांतुकी करावयास लागतील. याजकरितां मी या भटांस व उमेद्वार कारकुनांस फार उत्कंठेनें बोध करतों कीं, तुम्हीं दुसरा कांहीं व्यापार करीत जा. यावर ते म्हणतात कीं, पेशवाईंत आमचें यथास्थित चालत होतें. आतां चालत नाहीं. हें इंग्रजांचे पायगुणानें झालें. असो. या गोष्टीचें उत्तर देणें जरूर नाहीं. तें कशानेंही असो. पेशवे चांगले असोत अगर इंग्रेज वाईट असोत. जें प्राप्त झालें आहे तें खरें. सांप्रत ब्राम्हणलोकांची हलाखी आहे, हें सर्व कबूल करतील. बरें जे इंग्रेजी राज्यास नांवें ठेवितात व मनांत चुरमुरतात त्यांनीं व्यर्थ काळजी करूं नये. कारण पेशव्यांचें किंवा दुसरे कोणाचें चांगलें त्यांस पाहिजे तसें राज्य त्यांच्यानें स्थापवत नाहीं. व इंग्रजांसही सध्या जा, किंवा अमुक रीतीनें चाला हें म्हणण्याचीही या भटांची व कारकुनांची प्राप्ती नाहीं. यास्तव जें आपल्यास कर्तव्य त्यावर विचार मात्र आपण करावा. तो कोणता म्हणाल तर, ऐका :—सांप्रत काळीं जें दरिद्र प्राप्त झालें आहे हें मोडावें कसें, याचा विचार पडला आहे. वास्तवीक पाहिलें तर ब्राम्हण लोकांचें अज्ञान व मूर्खपणा पराकाष्ठेचा आहे. त्यांस दरिद्र फार आलें आहे. कारण इंग्रजांचे राज्यांत न्हावी, परीट, मोची इत्यादिक जे मजूरीनें पोट भरणारे त्यांचा रोजगार कायम आहे. आणि ब्राम्हण लोक व मोठे सरदार, मराठे, कुलीन हे तेव्हां मजूरीनें पोट भरीत नव्हते. ते आतां विलायतेस जसे लार्ड आहेत तसे होते. व मोठालीं कामें आणि सरदाऱ्या करीत होते. हे लोक आतां इंग्रजांच्या उपयोगीं नाहींत. कारण या देशांत जे लाभ म्हणजे मोठ्या जागा व अधिकार ते ते सर्व आपल्या लोकांस देतात व फक्त मजूरीचे रोजगार इकडील लोकांस शिलक राहिले आहेत. याजमुळें फार दरिद्र व मोठ्या लोकांस लज्जा प्राप्त झाली आहे. ही दूर होण्यास हे लोक थोडेसे शाहाणे झाले म्हणजे उपाय सुचतील. ते असे कीं, विलायतेंत पार्लमेंट आहे. परंतु तें इकडील देशाचा कांहीं विचार करित नाहीं. कारण त्यास स्वदेशाचा कारभार फार आहे. पहा सातारचा राजानें किती प्रयत्न केला. परंतु पार्लमेंटाच्यानें कांहीं झालें नाहीं. सर्व मेहनत व्यर्थ गेली. व शेवटीं कंपनीसरकारनें केलें तें बहाल झालें. तात्पर्य, विलायतेंतील पार्लमेंट यांस हा देश कसा वाटतो कीं, जसा आपले घरीं गडी आहे त्यानें एकादा व्यापार केला व त्यांत त्यानें अन्याय केला, तरी आपण तें मनास आणित नाहीं. कारण आपले घरचें काम टाकून गड्याच्या घरचा कारभार कशाला पाहूं ? तद्वत पार्लमेंट म्हणतें कीं, आमचे देशांतील सावकार लोक यांनीं परदेशांत मुलुख घेतला. तेथील न्याय मनसुबी आम्ही पाहाण्यास काय गरज ? आमचे देशांतील आम्हांस काय थोडें आहे ? याप्रमाणें आहे. सवतीचे मुलाची काळजी कोण करितो ? तेव्हां आमचे लोकांनीं एकत्र होऊन पार्लमेंट मागावें आणि मुंबई कलकत्ता अशा ठिकाणीं तें नेमून तेथें कांहीं इंग्रज व आपले सर्व जातीचे शहाणे शहाणे लोक त्यांत ठेवावे,

आणि त्यांचे हुकुमानें कारभार करावा. म्हणजे विलायतेचे बादशाहज्यादीसही नाहीं, म्हणवणार नाहीं. कारण कीं, विलायतेंत पार्लमेंट असावें व येथें नसावें अशी आम्हीं कांहीं चोरी केली नाहीं. हा एक मोठा उपाय साध्य व्हावयाजोगा आहे. व दुसरा तूर्त दरिद्र मोडण्यास उपाय असा आहे कीं, ब्राम्हण लोकांनीं आपल्या मूर्खपणाच्या समजुती सोडाव्या आणि केवळ कारकून आणि भट हे दोनच रोजगार आम्ही करूं, असें म्हणूं नये. या देशांत आणखी पुष्कळ रोजगार आहेत. व तेही आतां दिवसें-दिवस इंग्रज घेत चालले. सावकारी, शेतकी वगैरे इंग्रज करूं लागले. हेच रोजगार आपले लोकांनीं करावे. कोणते म्हणाल तर कांच, कापड, सुरी, कात्री, लांकडी सामान, घड्याळें, चाबूक, यंत्रें इत्यादि पुष्कळ इकडे इंग्रज खपवितात. हीं सर्व आपले लोकांनीं करावयास शिकावें व येथें जो माल खपणार नाहीं, तो दुसऱ्या देशास घेऊन जावा. आणि तेथें विकावा. पुष्कळ देश आहेत. या गोष्टीचा शोध करावा व इंग्रजांचे देशाचें सामान बंद करावें, किंबहुना आपलें सामान त्यांस द्यावे. परंतु त्यांचें आपण घेऊं नये. जो इकडे उत्पन्न होईल तितका माल द्यावा. विलायती कापड घेऊं नये. यास्तव आपल्यास जाडीं मोठीं कापडें नेसावयास लागलीं तर काय चिंता आहे ? परंतु आपले देशाचें रक्षण करावें. असें झालें म्हणजे बहुत रोजगार राहातील. परंतु हें या लोकांस सुचत नाहीं. यांस असें वाटतें कीं, आम्ही आजपर्यंत केलें नाहीं तें करणार नाहीं. व भलताच रोजगार करणार नाहीं. दहांबरोबर मरण लग्नासमान आहे असें ते मानितात. आणि उपाशीं मरतात. भट पन्नास हजार खेपा घालतात. तेव्हां एक श्राद्धाचें आमंत्रण येतें. तसेंच शंभर धक्के कोंडींत खातात तेव्हां दोन पैसे दक्षणा मिळवितात. चोरालग्नाडांची स्तुती करतात, तेव्हां चार पैसे काढतात. दारू पिणारानें शुद्ध व्हावयास पैसा दिला म्हणजे त्यास शुद्ध करतात. तात्पर्य सांप्रत ब्राम्हण पैशाकरितां कसलेंही दुष्कर्म करावयास सोडित नाहींत. तसेंच उमेद्वार कारकून दोनशें खेपा घालतील, तेव्हां दप्तरदाराची भेट, पांचशें खेपा घालतील तेव्हां तो, 'या' म्हणतो. मग पंचवीस वर्षें गांवांत भीक मागून त्याचे घरांत काम करावें. चाकरी क्वचित कोठें येणार व ती तो आपल्या सोयऱ्याधायऱ्यास प्रथम देणार. म्हणजे सर्व उमेद्वारांनीं हात आपटीत असावें. असे त्यांचे हाल होतात व माणसें अशीं जिकीरीस येतात तीं पाहावत नाहींत. यास्तव त्यांनीं स्वस्थपणानें दुसरे रोजगार करावे. म्हणजे इंग्रज लोकांच्या शिरस्तेदारांच्या शिव्या, भटांचा अपमान हें कांहीं सोसावयास नको. याचप्रमाणें आलीकडे इंग्रजी लिहिण्याची अवस्था आहे. जो तो इंग्रेजी शिकतो. परंतु इतक्यांची गरज नाहीं. याजमुळें दीनवाणी फिरतात. या गोष्टीचा विचार केला असतां बरें पडेल हे विनंती.

लो० हि०

ता० २० माहे मे १८४१

पत्र नंबर ६१

भटांनीं लावून दिलेलें वेड

विनंती विशेष. हिंदू लोक हल्लीं आहेत त्यांपेक्षां चांगले होण्यास त्यांनीं बहुतेक आपलीं मूर्ख मतें सोडलीं पाहिजेत. प्रथम हीं मूर्ख मतें उत्पन्न कशीं झालीं म्हणाल तर त्याचें कारण लिहितों. प्राचीन काळीं हिंदू लोकांनीं विद्या बहुत केल्या. पुढें असें झालें कीं, ब्राम्हण लोकांनीं नवीन विद्या अधिक अधिक शोधावयाच्या सोडून ते काव्यें करूं लागले. आणि वेद पाठ करूं लागले. अर्थ सोडून दिला. आणि धर्मशास्त्रांत असें आहे कीं, आपला कुलाचार रक्षावा. त्याप्रमाणें जें मागें बापानें केलें तेंच मुलानें करावें, अशी समजूत पडली, आणि जों जों हे मूर्ख होत चालले तों तों मागले लोक त्यांस देवासारखे दिसूं लागले. निरक्षर भट म्हणूं लागले कीं, व्यास अवतारी होता. व ज्यांनीं गणिताचे ग्रंथ केले ते देव होते. असें म्हणून मागले ग्रंथ मात्र वाचावे. पुढें कांहीं करूं नये, असें झालें. तेव्हां अज्ञान फार वाढलें. व त्यास साधन मुख्य पुराणें आणि महात्में लिहावयाचीं, हाच कांहीं दिवसपर्यंत पंडितांचा रोजगार होता. तेव्हां त्यांनीं मनास येईल तें लिहिलें. कोणी कावेरीमहात्म, कोणी करवीरमहात्म, कोणी शालिवाहनचरित्र, कोणी नाशिकमहात्म, कोणी अग्निपुराण, कोणी गणपतिपुराण अशीं लिहिलीं. प्रत्येकांत त्यांचा हेतु इतकाच होता कीं, एकाद्या देवाचें किंवा एकाद्या नदीचें वर्णन करून ईश्वर त्यांत आणून ठेवून ब्राम्हणांस पैसा मिळण्याची तजवीज पाहावी. तशींच व्रतमहात्में. कोणी म्हणाला, सोमवारीं उपास करावा. कोणी म्हणाला, मंगळवारीं. कोणी शनिवारीं. दरएकाची कथा व त्याची देवता आणि त्याचप्रमाणें अमक्याचें केलें, आणि त्याचें अमुक कार्य झालें. व तसें जो करील त्याचें तसेंच होईल, म्हणून लिहिलें. पण हें सर्व कवीचें लाघव, आणि ब्राम्हणांचें कार्य करावयाची तजवीज आहे, असें उघड दिसतें व याचा खोटेपणा उघड दिसतो. वर्षांत तीनशें साठ दिवस व त्यांहून अधिक व्रतें आहेत. तसेंच दरएक पुराणांत दरएक देवाचें वर्णन. त्याचें नांव. अमके दैत्य त्यानें मारले. तो ईश्वर. त्यास भजावें, इतरांस भजलें तर नरकाचें साधन, याप्रमाणें लागलाच शेरा, असें दरएकांत आहे. दरएकांत सृष्टीची उत्पत्ती, देवाचें चरित्र व भविष्यें याप्रमाणें सर्व तयारी केली आहे. तेव्हां कोणते देवास भजावें, कोणतीं व्रतें करावीं. किंवा तीनशेंसाठ ही दिवस व्रतें करावीं? धर्मशास्त्र पाहिलें तर तो पर्याय कांहीं वेगळाच आहे. वेद पाहिला तर त्यांत कांहीं वेगळेंच आहे. वेदांत अवतार आणि नाना प्रकारच्या देवता, आणि व्रतें, हें कांहीं नाहीं. फक्त होमाशीं कारण आहे. याचा मेध, त्याचा मेध हें सर्व त्यांत आहे. तेव्हां वेदशास्त्र व पुराणें यांचा धर्म पाहिला तर अगदीं

वेगवेगळा दिसतो. पुराणांत नित्यकर्म पाहिलें तर सगळा एक दिवस करावयास पुरणार नाहीं, इतके धर्म त्यांत आहेत. पण त्यांत कांहीं नीती आहे असेंही नाहीं. कांसोटा असा घालावा, गंध असें लावावें. शौचास अमुक कोस जावें, तोंड असें धुवावें, हेंच फार आहे. याप्रमाणें नेम करणारांस काय वाटलें असेल, तें त्यांचे त्यांसच ठाऊक. बरें असो. याचा आजपर्यंत कोणीच विचार केला नाहीं. आलीकडे भट वगैरे झाले, यांनीं कांहीं ग्रंथ केले आहेत, पण ते त्यांहून अधिक. गोपिनाथ भटजींनीं अमुक भट्टी केली, गणेश भटांनीं अमुक भट्टी केली, अशा शेंकडों भट्ट्या केल्या आहेत. परंतु त्यांत आहे काय ? संस्कृताचा अर्थ फार लोकांस कळत नाहीं. परंतु जर त्यांचा अर्थ कळावयाजोगा असता तर मला वाटतें कीं, लोक मागेंच ते ग्रंथ समुद्रांत नेऊन टाकते. परंतु ते भ्रमांत आहेत. बरें, भरली मूठ सवा लक्षाची आहे. तेंच बरें. श्राद्ध करावयाची कल्पना लिहावयास पन्नास पत्रें लागलीं आहेत. तसेंच हरएक संस्काराच्या रीती फार मूर्खपणाच्या आहेत. लग्नाच्या, उष्टावणाच्या देवपूजेच्या पद्धती आणि कोणतें कर्म असें नाहीं कीं, त्याविषयीं ग्रंथ नाहीं. शौच्य-विधीवरदेखील एक ग्रंथ आहे. त्यांत मनुष्यानें शौच्य कसा करावा, हेंच लिहिलें आहे. वास्तवीक पहा बरें, याचा कांहींतरी उपयोग आहे काय ? कशाला भट या संस्कारांच्या कंठाळभर पोथ्या वाळगतात ? यांत काय आहे ? यांचा काय उपयोग ? लोकांचें सुख व ज्ञान वाढवावयाची त्यांत एकदेखील गोष्ट नाहीं. मूर्खपणा वाढावयाच्या गोष्टी आहेत. त्या ग्रंथांनीं वेड लावलें एवढें मात्र झालें. अज्ञान्यास अजरामर करण्याकरितां या पोथ्या लिहिल्या आहेत, असें मला वाटतें. व त्यांची फजिती होऊं नये म्हणून त्या गुप्त ठेवितात. कोणी सोडूं नये. व कोणी भलत्यानेंच वाचूं नये म्हणतात, याचें कारण हेंच. जर त्यांत खरें ज्ञान असतें, तर कोणीही वाचलें तर चिंता काय ? परंतु ग्रंथ लिहिणारांची खात्री होती कीं, हे गुप्त ठेविलें तर यांचें महात्म राहील. हे भुसाचे लाडू आहेत, हें त्यांस माहित होतें. याप्रमाणें हे भट वेडे झाले आहेत. मनुष्य कांहीं उद्योग करील किंवा विचार करील तर त्यास या भटांचे संगतीनें वेळ सांपडावयाचा नाहीं. हल्लीं कर्नाटकांतील एक सरदार याजकडे पाहिलें म्हणजे समजतें कीं, त्याचा वेळ हातपाय धुण्यांत जातो. दिवसांतून दोनशें वेळ पाय धुतो. पांचशें वेळ चूळ भरतो. यास हें काय वेड किंवा शहाणपण आहे. तसेंच बाजीरावाकडे पाहा; हा पुरुष मराठ्यांचे राज्यास बुडविण्यास कारण झाला. असें कां झालें, याविषयीं विचार केला तर इतकेंच दिसतें कीं, यास जन्मापासून नाना फडणिसानें कोपरगांवीं भटाचे शाळेंत ठेविला होता. म्हणून मोठेपणीं केवळ भटच निपजला. या[चे] राजकीय गुणाचे अंकूर जळून गेले. याप्रमाणें पूर्वीचे पेशवे भटांचे शाळेंत नवते. कोणी असें म्हणतात कीं, राज्यास अयोग्य व्हावा म्हणून नाना फडणिसानें त्यास बुध्या भट केला. परंतु तोच राज्यावर आला, हें देशाचें प्रारब्ध. अस्तु. त्यास वेड लागलें. त्यानें राज्य केव्हां करावें, कारभार केव्हां करावा, आणि हें

नित्यकर्म केव्हां करावें हें जाणलें नाहीं. आणि याकर्मांचा फायदा काय? जोंपर्यंत निर्मळ वाटे[ल] तोंपर्यंत कोणीही हात धुतोच आहे. त्यास अमुक वेळहात धू म्हणून सांगावयास कशास पाहिजे? परंतु इतक्या मूर्खपणाच्या गोष्टीस ब्राम्हण मात्र मान देतात. आणि कोणी उपास, कोणी व्रतें, कोणी जप, कोणी अनुष्ठान असें सगळा दिवसभर करतात. ज्याजवळ पैसा आहे त्यास भट घेरतात. आणि हा उपदेश करतात. आणि पुराणिकब्रावास घेरतात, व वेड लावतात. कोणी सांगतो, आवळीचे झाडाखालीं जावें, पूजा करावी, कापुसाच्या वाती जाळाव्या, त्याप्रमाणें अज्ञान बायका करितात. हें बंड त्यांस भट लावतात. हें सर्व यांनीं सोडून दिल्याखेरीज यांची बरी गत मला दिसत नाहीं. मग ईश्वराची इच्छा हे विनंती.

लो० हि०

ता० ३ माहे जून १८४९

पत्र नंबर ६२

ब्राम्हणांची शिक्षणपद्धती

सांप्रत ब्राम्हण लोक हे कांहीं उपयोगी नाहींतसे झाले आहेत. याचें कारण यांस सरकारी काम सांगितलें तर लांच खातात, लोकांस उपद्रव करितात. व आपले जातीचा अभिमान धरतात. येणेंकरून महार चांभार इत्यादि जातीस त्यांचे पुढें येण्यास देखील योग्यता नाहीं, असें म्हणतात. तस्मात् यांनीं भिक्षा मागून वनांत राहावें हेंच काम यांस चांगलें योजिलें होतें. परंतु तें सोडून या गृहस्थपणांत, सरदारींत व कारकूनपणांत यांस कोणी बोलावलें बरें? यांचेवांचून अडलें होतें काय? ते आपले संतोषानें दुसरे व्यापार करूं लागले. तेव्हां आतां त्यांस हें योग्य आहे कीं, त्यांनीं आपल्यास व दुसऱ्यास सारखें मानावें, हें बरें. ब्राम्हण लोक अनिवार झाले आहेत. व मूर्ख आहेत. याचें कारण त्यांस सुशिक्षा नाहीं. ब्राम्हणाचा मुलगा सात-आठ वर्षांचा झाला, म्हणजे त्याची मुंज करतात. नंतर भट व पंतोजी यांचे स्वाधीन होतो. आणि त्यांस ज्ञान-उपदेश किंवा कलाकौशल्य विद्या हें कांहींएक शिकवीत नाहींत. ईश्वराचें भय व आपला वास्तवीक धर्म त्यांचे मनांत कशानें येईल? श्रीमंताचें पोर असलें तर त्यास भट वेद शिकवितात व तो फक्त पाठ करवितात. मग तो मुलगा जसा त्याचा गुरू टोणपा तसाच त्याचा शिष्य टोणपा होतो. बरें ब्राम्हणास ज्या रीतीनें वेद शिकवितात त्याचा कांहीतरी उपयोग आहे? फक्त अक्षरें तोंडानें उरांत रक्त पडेतोंपर्यंत घोकून

पाठ करितात. त्यापेक्षां दगड फोडावयाची मजूरी कां सांगत नाहींत? अक्षर मराठी झालें म्हणजे मुलगा शाहाणा झाला. बाप म्हणतो माझा मुलगा रुद्र पाठ म्हणतो. पवमान पाठ म्हणतो. आणि भटाच्या तोंडच्या मूर्खपणाच्या गोष्टी ऐकतो. तो असा दृढ मूर्ख होतो कीं, त्याचे मनांत जें येतें तें मोठें दृढ होतें. कदापि निघत नाहीं. त्यास वाटतें पृथ्वी शेषावर आहे. ग्रहणांत राहू चंद्रास खातो. हिंदुस्थानाएवढीच पृथ्वी-पलीकडे गतीच नाहीं. ब्राम्हण सर्व जगांत श्रेष्ठ, भूदेव. जितक्या विद्या आहेत त्या सर्व शास्त्रांत व पुराणांत आहेत. त्यांखेरीज कांहीं नाहीं. वेदांचा अर्थ करूं नये. पुराण, शास्त्र ब्राम्हणांखेरीज कोणी वाचूं नये. परदेशास गेलें तर भ्रष्ट होतो. अशा नाना प्रकारच्या समजुती त्यांच्या पडून ते शतमूर्ख होतात. अशीं थोर श्रीमंतांचीं मुलें पुण्यांत मला शेकडों आढळतात व मोठाले वयोवृद्ध कित्येक आहेत त्यांची तर संख्याच नाहीं. वर्तमानापत्रें व बुकें याद्वारानें ज्ञान मिळविणें हें तर त्यांचे कुळाचे शत्रू व वाचणें व लिहिणें त्यांचे बापाचे वैरी, असे लोक आहेत. यांस ईश्वर कोणत्या रीतीनें ताळ्यावर आणील तें आणो. ईश्वरानें ब्राम्हणांचा गर्व हरण करायास दरिद्रांजन योजिलें आहे. तरी त्यांचे डोळे अजून उघडत नाहींत. शास्त्रेंपुराणें घेऊन बसतात. पुराणांत मूर्खपणा भरला आहे. व तीं फक्त ब्राम्हणांस लाभ होण्याकरितां केलीं आहेत. यास्तव मला वाटतें कीं, ब्राम्हणांची मुंज झाली म्हणजे त्यांस विद्या पढवावी. कांहीं चांगले ग्रंथ नवीन पद्धतीचे करून त्यांत नीती व ईश्वराच्या भजनाच्या गोष्टी घालूनच इतर भूगोल खगोल इत्यादिक वास्तविक आहेत, तशा गोष्टी लिहून ते ग्रंथ पढवीत जावें. म्हणजे मूर्खपणा जाऊन तो मुलगा चांगला तयार होईल. असे ग्रंथ कोणीतरी केले पाहिजेत. नाहींतर हे लोक सांप्रतकाळच्या शिक्षेचे रीतीनें फारच मूर्ख होतील. शास्त्री, पंडीत आणि त्यांस 'होय, होय,' म्हणणारे गृहस्थ हे काय बोलतात तेंदेखील त्यांस कळत नाहीं. कोणी गोष्ट सागतो कीं, सप्त समुद्र आहेत. कोणी म्हणतो, मेरू मध्यें आहे. कोणी म्हणतो, हे सात समुद्र रथाच्या चाकांनीं पाडले. कोणी म्हणतो, अगस्ती मुतला. यांचे तोंडास कोणी हात लावावा? असें बोलणें ऐकून मला वाटतें कीं, हे इस्पितळांतले वेडे आहेत काय? कोणी म्हणतो, हे इंग्रज जलचर (पाण्यांतले राहाणारे) आहेत. कोणी म्हणतो, ते वानर आहेत. कोणी म्हणतो, त्यांस रामाचा वर आहे. तेव्हां माझे मनांत येतें कीं, तुम्ही बोलतां हे डुकर आहां! शेंकडो लोक संभावित, सरकारचे चाकर मोठे कामावर आहेत. पण त्यांस शपथ जर घातली कीं, तुम्ही आपल्या कामाशिवाय कधीं कांहीं ग्रंथ किंवा कांहीं वाचलें होतें काय? तर ते गंगाजल हातांत घेऊन सांगतील कीं, 'नाहीं.' असे अक्षरशत्रू आहेत. या लोकांस वाचणें ठाऊक नाहीं. पाठ करणें ठाऊक आहे. 'प्रातःस्मरामि' पाठ करितात. देवपूजा पाठ करतात. भट तर दशग्रंथ पाठ करितात व कित्येक मूर्ख जटापाठी आहेत. म्हणजे मागेंपुढें, उलटींसुलटीं अक्षरें पाठ करितात. याचा उपयोग काय? पण या ब्राम्हणांचा केवढा मान लोक

करितात ! घनपाठी बुवांस शालजोडी द्या, रुपये द्या, आणि मूर्खपणा वाढवा. कित्येक जुन्या ठशांचे लोक शंख करतात कीं, वेदविद्या बुडाली. पण महाराज, ही विद्या हवी कोणाला ? पाठ करावयाची मजूरी कशास ? अर्थसहित दोन अध्याय कां म्हणाना ? त्यांतील ज्ञान समजून घ्या. म्हणजे दोन अध्याय अध्ययन घनपाठी टोणप्यापेक्षां बरें. पाठ करावयाची ही विद्या कोणत्याही देशांत नाहीं. एकएक अक्षर मागेंपुढें. उलटेंसुलटें पाठ केलें, म्हणजे कांहीं दूध निघतें कीं काय ? सार्थ वेद म्हणावा. मग तो किती कां होईना ? दशग्रंथी म्हणून मिरवतात कशाला ? हे तर मला बैल असे वाटतात. याजकरितां मी प्रार्थना करतों कीं, हा मूर्खपणा सोडून वाटेवर यावें. हे विनंती.

लो० हि०

ता० १० वी, माहे जून १८४१

पत्र नंबर ६३

अर्थावाचून पाठ करणें

विनंती विशेष. मला वाटतें कीं, ब्राम्हण लोकांनीं आतां अर्थावर चित्त द्यावें. केवळ पाठ म्हणणें यांत कांहीं फळ नाहीं. पाठ म्हणावें, अशी आज्ञा शास्त्रांत आहे. तिचा अर्थ तसा घेऊं नये. तें उगीच लोकांची भक्ती बसण्याकरितां लिहिलें आहे. त्यांत कांहीं उपयोग किंवा वास्तवीकपणा नाहीं. हें त्यांनीं मनांत आणावें. ब्राम्हण लोक मूर्ख म्हणून अर्थांचा अनर्थ करतात. खरा अर्थ समजत नाहींत. जें लिहिलें आहे तसेंच तर्क केल्यावांचून भलतेंच समजतात. याजमुळें शेंकडो गृहस्थ रोज गीता, विष्णुसहस्रनाम वाचतात. हा मूर्खपणा आहे कीं, नाहीं बरें ? मला वाटतें कीं, असे फक्त पाठ करणारे यांस कांहीं कळत नाहीं. आणि ब्राम्हण लोक सरासरी कामावर नेमिले तर मग त्यांचे ऐश्वर्यानुरूप स्नानसंध्या वाढते. ती कोणती म्हणाल तर एकादशी म्हणजे पाणी देवावर ओतावें, तुळशीचीं झाडें लावावीं, तुळशीसहस्रनामें इत्यादिक पूजा वाढवून वेळ खर्च करावा, व अज्ञान वाढवावें. कोणाचे मनांत ईश्वराविषयीं कांहीं नसतें. जितके ब्राम्हण हल्लीं आहेत इतक्यांस जर देव कसा आहे वगैरे ईश्वराविषयीं कोणीएक प्रश्न विचारला तर त्यांच्यानें उत्तर देववणार नाहीं. व मनुष्याचा धर्म काय हेंही त्यांस कळत नाहीं. वास्तविक पाहिलें तर गृहस्थ व भट हे उभयतां जितका वेळ ज्ञान मिळावयास पाहिजे त्याचे चौपट खर्च करितात. पण उपड्या घागरीवर पाणी होतें. त्यांचें आयुष्य व्यर्थ होऊन त्यांस स्वतां व इतरांस उपयोग होत नाहीं. अर्थांचे अनर्थ बोलत बसतात.

ब्राम्हण लोक पूर्वीं सर्व जातींमध्यें प्रमुख होते खरे; परंतु आतां तर मला नीच वाटतात. कारण कीं, हलके जातीचे लोक कांहीं सांगितलें तर ऐकतात. व त्यांचीं अंतःकरणें चांगली गोष्ट ग्रहण करण्यास पात्र असतात. परंतु ब्राम्हणांस गर्व फार. त्यांतील प्रत्येकास असें वाटतें कीं, थोर सर्व काय ते आपण. सर्वांनीं आपली पूजा करावी. याजमुळें त्यांस कांहीं सांगितलें तर ते ऐकत नाहींत. पिसाळलेले आहेत. एका आंगानें दरिद्र व दुसऱ्या आंगानें त्यांचा गर्व, अभिमान व अज्ञान येणेंकडून ते पूर्ण झाले. त्यांस असें वाटतें कीं, ब्राम्हणांच्या महत्त्वाच्या गोष्टी पुराणांत लिहिल्या आहेत. त्या अक्षरशः खऱ्या आहेत. आणखी असें समजतात कीं, शेवटीं ब्राम्हणाचा जन्म होतो. नंतर तेथें संन्यास घेऊन मोक्षास जातो. परंतु हें लिहिणें आम्हीं किमपी ऐकत नाहीं. हें फक्त ब्राम्हणांचे महत्त्वाकरितां लिहिलें आहे. ब्राम्हण हे मोक्षास पात्र व इतर लोक नाहींत, असें म्हणण्यास ब्राम्हणांमध्यें आतां कोणता गुण आहे? संन्याशी चोऱ्या करितात, ब्राम्हण भडवेपणा, दरोडे इत्यादिक अपराधांस अनुसरले आहेत. त्यांस मोक्ष कसा होईल? हें मत केवळ खोटें आहे. अन्य जातीचे अनेक साधू झाले, ते दुर्गतीस गेले असें कोण म्हणेल? जुने काळचे लोकांस दुसरे देशचे लोकांचें वर्तमान कांहीं ठाऊक नवतें. म्हणून इतकें ब्राम्हणांचें महत्व लिहिलें आहे. इंग्रेज लोक हेही असेंच मत चाळगतात. ते म्हणतात कीं, खिस्तीयनांखेरीज कोणी मुक्तीस जात नाहीं. म्हणजे सर्व हिंदू नर्कास पात्र आहेत. असेंच मुसलमान म्हणतात. तस्मात् हा सर्व घोटाळा आहे. यांत कांहीं हशील नाहीं. ज्याचें तो आपलें वर्णन करितो. याप्रमाणें ब्राम्हणांचें थोरपण आहे. परंतु तें खेरीजकरून ब्राम्हण लोक असे मूर्ख आहेत कीं, त्यांस अर्थ देखील कर्ता येत नाहीं. पुराणें म्हणजे केवळ काव्यें आहेत. त्यांत कोठें लिहिलें आहे कीं, गंगा यमुनेप्रत बोलते. समुद्र यमुनेस म्हणाला. चंद्र रात्रीस म्हणाला. सूर्य अग्नीस म्हणाला. अशीं पुष्कळ वाक्यें आहेत. त्यांचा अर्थ हल्लींचे पुराणीक प्रत्यक्ष गंगा व यमुना देवता आहे, तीच बोलली, असा करतात. आणि त्यांस आतांचे लोक खरें मानितात. लोकही असें समजत नाहींत कीं नद्या प्रत्यक्ष जडपदार्थ त्यांस कवीनें सजीव मानून लाघव केलें आहे. तसाच चंद्र रात्रीशीं कसा बोलेल? त्यास कांहीं तोंड किंवा जीव आहे काय? परंतु खरें मानितात. जड पदार्थांचें कवीनें सजीव वर्णन केलें असलें म्हणजे झालें. त्यांस वाटतें कीं, या देवताच आहेत. तसाच सूर्याचा रथ लक्ष योजनें चालतो, असें म्हणतात. तेंही कवीचें लाघव आहे. त्याचा अर्थ पुराणीक सांगतात तसा घ्यावयाचा नाहीं. परंतु पुराणीक लोकांस फार वेड लावतात. व लोकही मूर्ख होऊन सर्व निर्जिव पदार्थांस जिवंत मानून कोणी उमऱ्याची पूजा, कोणी ताकमेढीची पूजा, कोणी दरवाजाची, कोणी मुसळाची, कोणी जात्याची, कोणी दिव्याची, अशा पूजा करितात. यांत किती मूर्खपणा आहे? मुलांचे वाढदिवसाचे दिवशीं ताकमेढीची पूजा, दसऱ्याचे दिवशीं न्हावी धोकटीची पूजा करतात, त्यांस नैवेद्य दाखवितात. बरें,

न्हाव्याची धोकटी किंवा ताकमेढ नैवेद्य खाईल काय? धोकटींत कसली देवता आहे? व ताकमेढ एक वाळलेले लाकडाचा तुकडा. त्यांत देवता कोणती आहे? लग्नामध्यें हे चमत्कार दृष्टीस पडतात. उपाध्या मूर्ख. तो हजार ठिकाणीं पूजा मांडतो. मडक्याची पूजा, घागरीची पूजा आणि तशांत हें सर्व संस्कृत भाषेनें करितात. म्हणून त्याचा अर्थ कोणास कळत नाहीं. परंतु आंत पाहिलें तर शुध्ध वेड आहे. मी गर्भाधानाचा विचार थोडासा वाचून पाहिला आहे. त्याजवरून मला वाटतें कीं, त्यांतील प्रकरणीं भटासमोर निर्लज्जपणानें जीं कर्में करावयास सांगितलीं आहेत तीं जर मराठी भाषेंत बोलतील, तर यजमान उपाध्यास जोडे मारून हाकून देईल. व म्हणेल कीं, माझ्या बायकोची इतकी फजीती चौघांमध्यें करावयास मी काय तुमचें केलें आहे? असें त्यांत आहे. नानाप्रकारचीं वचनें, आणि 'येथें हात लावा', 'तेथें हात लावा', इत्यादि ते मला बोलण्यास लाज वाटती. या प्रकारचे संस्कार करणारे वेडे होते यांत संशय नाहीं. आणि लोकांनीं कसें ग्रहण केलें असेल तें असो. जर या गोष्टी उघड होतील तर खचीत रद्द होतील. भटांनीं अर्थ करावयाचें सोडिलें. त्याजमुळें इतकें अज्ञान वाढलें आहे. नीती, ज्ञान, ते कांहीं पाहात नाहींत. फक्त पोथ्या सोडून पाठ करीत बसतात. आणि त्यांत सर्व धर्म आहे, असें समजतात. याजमुळें नीती बुडाली, धर्म बुडाला व अज्ञान मात्र शिल्लक राहिलें आहे. आणि तें, ब्राम्हणांचे हाडास भिनलें आहे.

लो० हि०

प्रभाकर, ता० १७ जून १८४१

पत्र नंबर ६४

धर्मसुधारणा

विनंती विशेष. कालमहात्मेंकरून हिंदु धर्माची सुधारणा करणें जरूर आहे. त्याशिवाय या लोकांचा परिणाम लागणार नाहीं. चार लोक ज्यांचे मनांत स्वदेशाचें कल्याण आहे, त्यांणीं एकत्र होऊन धर्मसुधारणा करावयास आरंभ करावा हें मला व वाटतें. व असें करण्यांत एक मोठा लाभ आहे. तो हा कीं, सरकार अनुकूल आहे. तेव्हां चार टोणपे, शास्त्री, पंडीत यांस कशास आपण भ्यावें? यांचें हातून फार झालें तर त्यांचे विपरीत जे करतील त्यांस जातीबाहेर ठेवण्याचें होणार, तर जात म्हणजे काय? ज्या समुदायामध्यें लोक पुष्कळ जमतात ती जात होते. व एकटा असला म्हणजे तो बहिष्कृत होतो पहिल्यानें शीक लोक झाले, तेव्हां ते बहिष्कृत

होते; व पुढें पुष्कळ झाले तसी तीच स्वतंत्र एक जात झाली. त्याचप्रमाणें पहिल्यानें किरस्तांव धर्म सुरू झाला. जेव्हां पूर्वींचे धर्माचे जे पंडित होते, त्यांणीं कांहीं दिवस त्यांस भ्रष्ट म्हणून ठरविलें व पुढें ते पुष्कळ जमले तेव्हां जे भ्रष्ट म्हणत होते, तेच उलटे भ्रष्ट झाले. इंग्रजांनीं किरस्तांव धर्म घेतला तेव्हांपासून पुढें तो धर्म पुष्कळ भ्रष्ट झाला. याजकरितां ह्यांतील कोणीएका पंडितानें धर्मसुधारणा केली, तेव्हां त्यांस लोकांनीं पुष्कळ वाईट म्हटलें. परंतु चार लोक एकजागीं जमले व लग्नसोयरीक आपसांत होई इतका समुदाय असला म्हणजे कोणी या शास्त्रीलोकांस पुसत नाहीं व असें करण्यास आधार आहे. शंकराचार्यांनीं कितीएक शास्त्रमतें रद्द केलीं. कितीएक चालू केलीं. असें कालेंकरून शास्त्रास चालन पाहिजे. ईश्वरसंबंधी धर्म आहे तो मात्र आचळ आहे. परंतु शास्त्रांतील कायदे जरूर वरचेवर फिरले पाहिजेत. यास्तव स्वदेशाचे हितकर्ते यांणीं इतका विचार करावा कीं, आपले पक्षांत पुष्कळ लोक येतील कीं नाहीं ? मला वाटतें कीं, या गोष्टीची काळजी नको. धर्मसुधारणा प्रसिध्धपणें चालू केल्यास बहुत लोक आपल्यास येऊन मिळतील. पुष्कळ लोकांच्या मनांत आहे. परंतु संधी नाहीं त्यास उपाय नाहीं. मुख्य धर्म सुधारण्याचीं कलमें अशीं आहेत. प्रथम, सर्वांनीं ईश्वराचें भजन अंतःकरणापासून करीत जावें. व दुसरें, जसा आपला जीव तसा दुसऱ्याचा जीव मानावा. तिसरें, मुंज, लग्न, प्रेतक्रिया हे तीन संस्कार ठेऊन बाकीचे सर्व रद्द करावे. चवथें, जें कर्म करणें तें स्वभाषेंत अर्थ समजे असें करावें. भजनपूजन, संस्कार सर्व ज्यांचे त्यांचे भाषेंत करावे. संस्कृत भाषा पाहिजे ते शिकतील. परंतु ज्यांस येत नाहीं, त्यांणीं संस्कृत भाषेंत कोणतें कर्म करणें जरूर नाहीं. चौथें, प्रत्येकास आपले विचाराप्रमाणें आचार करण्याची व बोलण्यालिहिण्याची मोकळीक असावी. त्यास प्रतिबंध असूं नये. पांचवें, स्त्रीपुरुषांचे अधिकार धर्मसंबंधीं कामांत व संसारांत एकसारखे असावे. येणेंकरून पुनर्विवाह व मोठेपणीं लग्न झालें. साहावें, आचारापेक्षां नीती प्रमुख असावी. आचाराचें महत्त्व हल्लीं आहे तसें असूं नये. आतां कितीएक नायका लग्नाड असतात. परंतु पिंपळाच्या प्रदक्षिणा अंतरीत नाहींत. हें कांहीं उपयोगी नाहीं. सातवें, अर्थाशिवाय कांहींएक म्हणूं नये. आठवें, मनुष्यमात्रास तुच्छ मानूं नये. जाति-अभिमान नसावा. सर्वांशीं सारखें दयापूर्वक वर्तावें. सर्वांचें कल्याण करावें. नववें, स्वदेशाची प्रीती व त्याचें कल्याण विशेषेंकरून मनांत बागवावें. दाहावें ज्यास जो पाहिजे तो त्याणें रोजगार करावा. अकरावें, गुणेंकरून व योग्यतेकरून जाति–भेद मानावा. कुळेंकरून मानूं नये. बारावें, सरकाराहून प्रजेचे अधिकार अधीक असावे. म्हणजे जे जे रयतेच्या हिताचे कायदे आहेत, ते सरकाराशीं भांडून घेत जावे. तेरावें, राजानें जे नियम केले असतील ते व जे ईश्वरी बुध्धिसूचित नेम आहेत, ते मानावे. चवदावें, विद्यावृध्धीकरितां सर्वांनीं मेहेनत करावी. दुःखितास सुख, रोग्यास औषध, मूर्खास ज्ञान व दरिद्र्यास द्रव्य शक्त्यनुसार देण्यास अंतर करूं

नये; पंधरावें, शेवटचें कलम असें आहे कीं, सत्यानें सर्वांनीं चालावें. सत्याचे विरुध्ध वर्तणूक करूं नये. विद्येमध्यें ज्या ज्या गोष्टी आहेत त्यांचा शोध करण्यास आळस करूं नये. आणि सांपडतील त्या सर्व प्रसिध्ध कराव्या. व विद्या व ज्ञान संपादन करण्यास सर्व सारखे अशी मोकळीक असावी. या दरएक कलमाविषयीं एक ग्रंथ उदाहरणेंसहित करावा. असें माझे मनांत फार आहे. व इतक्या गोष्टी मी लिहिल्या आहेत, त्यांस कांहीं शास्त्र व हिंदुधर्म प्रतिकूळ नाहीं. सर्व हिंदूधर्मांतीलच आहे. परंतु त्याचा शोध मात्र केला पाहिजे. एके ठिकाणीं सांपडणार नाहीं. परंतु चहोंकडून मिळवलें म्हणजे सांपडेल. जसा गीतेंत एक ईश्वर आहे, इतर देवता भजूं नयेत अशीं स्पष्ट वाक्यें पुष्कळ आहेत, तीं घ्यावीं. जरी तीं पुराणांस विरुध्ध असतील तरी पुराणें सोडावीं. जें चांगलें तें घ्यावें. जातीविषयीं देवाचें मत घ्यावें. कारण कीं, संस्कृत भाषेंत अनंत ग्रंथ आहेत. ज्या ज्या ऋषींच्या जसें जसें मनांत आलें तसें त्यांणीं लिहिलें आहे. तेव्हां त्यांत एकच पुस्तक आपल्या उपयोगी सांपडणार नाहीं. परंतु सर्वांचें ऐक्य केलें तर करतां येईल. याप्रमाणें एक ग्रंथ करून त्यांत शुध्ध नीती प्रतिपादन करावी. आणि या हिंदू लोकांचें विशेष नांव ठेवावें. आणि त्यांणीं कसें वागावें त्याचे नियम त्यांत ल्याहावे. आणि तेंच पुस्तक आपलें शास्त्र समजून त्याप्रमाणें चालावें. खचित एकट्या ऋषीनें आपले अकलेनें लिहिलेले शास्त्रापेक्षां चार मतें पाहून जें शास्त्र आपण तयार करूं, तें सर्वांपेक्षां उत्तम होईल, यांत संशय नाहीं. शेंदोनशें लोकांनीं याप्रमाणें नांव धारण करून वेगळी फळी पाडावी. मग आपलेमध्यें हा धर्म चांगला असें पाहून पुष्कळ लोक येतील. ज्या मुलीचा नवरा मरेल ती एकाद्या सोद्याबरोबर जाते, त्यापेक्षां आपले धर्मांत येऊन एकाद्याशीं लग्न करणार नाहीं काय ? हजारो करतील. हिंदू धर्मांत सांप्रत ज्याज्यांस अडचणी पडतील, ते सर्व तोटा करून या शुध्ध धर्मांत मिळतील. मग आपली मंडळी प्रबल झाली म्हणजे जें पाहिजे तें कार्य करतां येईल. सांप्रत एकमेकाचे विरोध व विभक्तपणें फार आहेत. कोकणस्थ देशस्थाशीं सोयरीक करीत नाहींत. ह्या अडचणी मोडून लोक गंगाजळनिर्मळ होतील. आणि यांचें एकमत्त व एकधर्म होईल. आणि जें पाहिजे तें कर्तां येईल. असें केल्यावांचून सांप्रतकाळीं हिंदूधर्म भ्रष्ट झाला त्याचे हातून आम्ही सुटणार नाहीं. हा धर्म सुधारला पाहिजे. माझें सुधरण्याचें तात्पर्य असें नाहीं कीं, सर्वांनीं एकजात व्हावें, कारण कीं, हल्लीं नीच जातीचे लोक मोठेपणांत आले नाहींत. याजकरितां त्यांची सोयरीक कोणी अर्थातच करणार नाहीं. ज्यास ५ रुपये महिना आहे, तो आपले योग्यतेचा गृहस्थ पाहील. केवळ गांवाबाहेरच्या माहाराशीं अथवा भिकाऱ्याशीं लग्न करणार नाहीं, हें उघड आहे. परंतु माझा हेतू इतकाच कीं, विरोध मोडावे आणि लोकांशीं परस्पर नम्रतेनें वागावें व जसेजसे कालेंकरून हे अज्ञानपाश सुटतील, तसेतसे सोडवावे. परंतु या कार्यास आरंभ करावा, म्हणजे बरें पडेल. बहुत लोक वाट पाहातात. ब्राम्हण महारांची निंदा करितात. त्यांस शिवत नाहींत. व इंग्रजांजवळ प्रीतीनें बसतात, हें पाहून मला आश्चर्य

वाटतें. शास्त्राप्रमाणें पाहिलें असतां महार बरे. परंतु इंग्रजांचे मंडळी[त] ब्राम्हण असूं नयेत. तथापि हे ब्राम्हण मूर्ख त्यांस समजत नाहीं, म्हणून मी हा पाया योजिला आहे. हे विनंती.

लो० हि०



२४ जून, सन १८४१

पत्र नंबर ६५

नीतिप्रशंसा

विनंती विशेष. मी आपले पत्रांत ब्राम्हण जातीवर पुष्कळ हल्ला केला आहे. याजकरितां कितीएक ब्राम्हणांस वाईट वाटत असेल. त्यास मी त्यांची क्षमा मागून विनंती करितों कीं, ब्राम्हणांचें दोषविवेचन मीं फार केलें आहे. याचें कारण, आमचे लोकांत मुख्य ब्राम्हण ते जें करतील तसें इतर वर्ततात. गांव-खेड्यांत देखील जो कुळकरणी त्याचे पायां पडतात. म्हणून ब्राम्हणांचे सुधारणुकेस्तव मी झटतों. त्यांची सुधारणा झाली म्हणजे सर्व हिंदू लोकांची जाहाली. त्यांचें अज्ञान पाहून मला दया येते. राग येत नाहीं. जें मीं लिहिलें आहे, तें सर्व त्यांचे हिताकरितां आहे. मला खात्री वाटते कीं, सांप्रतकाळीं माझे पत्राचा अक्षरशहा अर्थ करून त्यांतील आशय जाणतील असे ब्राम्हण कोणी नाहींत. कदाचित हजारांत एक असेल. कारण कीं, त्यांचें अज्ञान अतिशय आहे. बाळपणापासून जी सवय झाली ती सवय मोठेपणीं कितीही सांगितलें तरी जात नाहीं. परंतु मी आशा करितों कीं, पुढें जे होतकरू मुलगे आहेत ते हीं पत्रें पाहून अज्ञानांतून सुटतील आणि माझे अभिप्रायाचा विचार करतील. मग त्यांस जें पसंत वाटेल तें तीं करोत. आजचे ब्राम्हण असे आहेत कीं, हें पत्र हातीं धरतांच टाकून देतील. व म्हणतील हें काय ? भलतेंच लिहिलें आहे. असो, त्यांचें अज्ञान त्यांचे कामास दिवसेंदिवस येत आहे. परंतु मला वाटतें कीं, जुने म्हातारे ब्राम्हण आहेत ते असोत, परंतु नवीन उमेदवार लोक यांनीं आपलें अंतःकर्ण ज्ञानेंकरून व विचारेंकरून पवित्र करावें. म्हणजे पुष्कळ फायदा होईल. मागील पत्रांत धर्मसुधारणा लिहिली आहे. ही बहुतांस भयंकर व कितीएकांस दुर्घट वाटून कितीएक पंडित व शास्त्री पुराणांतील वाक्यें वर्णसंकर, कली इत्यादि म्हणतील हें मला कळत आहे. परंतु महाराज, तुम्ही विचार कराल तर हा वर्णसंकर नव्हे. आतां जो आहे हा वर्णसंकर खरा, जे ब्राम्हण भडवेपणा करितात, त्यांस तुम्ही पंक्तीस घेतां व नीतिमान शूद्रास नीच मानतां, हा वर्णसंकर खरा. शास्त्राचा आधार माझे मतास पुष्कळ

आहे. व तुम्ही विचार केला असतां सांपडेल. वेडांत शिरूं नका. ही धर्मसुधारणा झाल्याशिवाय तुमचा बंद खुला होणार नाहीं. आतां जो धर्म चालला आहे, हा धर्म नव्हे. हा वेबंद, गोंधळ आहे. यांत कांहीं नाहीं. नीती नाहींशी झाली. व धर्म बुडाला. मला तर धर्म कोठें दिसत नाहीं. म्हणून धर्माची स्थापना करण्याचा माझा यत्न आहे. व असें झालें असतां, पुष्कळ नीतिवान पुरुष होतील. व जे गैरनीतीनें चालतील, तेच भ्रष्ट म्हणावे. केवळ आचारांत जपून वागेल तर उपयोग नाहीं. आचार हें केवळ सोंग आहे. नीतीचें ज्ञान व्हावें म्हणून आचार सांगितला आहे. हें तुम्हास क्षणभर विचार केला तर कळेल. पाहा कीं शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, ग्रहणांत श्राध्ध करावें. म्हणजे बाप मोक्षास जातो. बरें ग्रहणांत जो ब्राम्हण जेवतो त्यास जर पाप लागतें असें आहे तर दुसऱ्यास पापांत घालून बापास मोक्ष कसा होईल, हें सांगा? एकाचें डोकें मारल्यानें दुसरा जिवंत होतो काय? तात्पर्य, शास्त्र करणाराचें मत असें दिसतें कीं, ग्रहणांत जेवलें तर पाप मुळींच नाहीं. हें त्यास ठाऊक होतें. कारण कीं ग्रहण छाया पडल्यामुळें होतें. त्यांत जेवलें म्हणून पाप कशाचें? नित्य शुक्लपक्षांत चंद्रावर सावली असते. त्याजमुळें अंगुलमात्र चंद्र कमीअधिक होतो. हेंही ग्रहणच आहे. कारण कीं, ज्या कारणानें ग्रहण त्याच कारणानें शुक्ल व कृष्णपक्षींचा अधिकउणा चंद्र होतो. याजमुळें चांदण्यांत कोणी जेवीत नाहीं कीं काय? तो शास्त्रकर्ता इतकें समजत होता. परंतु ग्रहणांत ब्राम्हणांस जेवावयाचे निमित्तानें त्यांस रुपये मिळऊन द्यावयाचे होते. याजकरितां हा धर्म लाऊन दिला. वस्तुतः पाप नाहीं हेंच खरें. आणि पुराणकर्त्यांनीं लिहिलें आहे कीं, हीं पुराणें आम्हीं स्त्रिया व शूद्र इत्यादि जातींस वाचण्याकरितां केलीं आहेत. याजवरून असें दिसतें कीं, इतर जातींस अज्ञानांत ठेऊन ब्राम्हणजातीजवळ मात्र वास्तविक ज्ञान ठेवावें. असा त्यांचा हेतू होता. म्हणून त्यांणीं पुराणांत पाहिजे तसें ब्राम्हणांचें महात्म व नानाप्रकारच्या वेड लावावयाच्या गोष्टी लिहिल्या आहेत. त्यांचा अर्थ लाक्षणीक समजला पाहिजे. जसा चंद्र कमी होतो म्हणून त्यास क्षयरोग आहे, असें कवींनीं वर्णन केलें आहे. व अधीक होतो म्हणून त्याजवळ अमृत आहे, असेंही लिहिलें आहे. परंतु हें खरें नाहीं. केवळ कवीची कल्पना आहे. इत्यादि गोष्टी अशा असतां मला चमत्कार वाटतो कीं, हल्लीं हे मुंबईतील व इतर ठिकाणचे परभु व सोनार ब्राम्हणांत शिरण्याचा हेवा, मत्सर व उद्योग कशाला करितात? त्यापेक्षां आपण सर्व मिळोन एक होण्याचा यत्न केला तर बरें होईल. कितीएक परभू, ब्राम्हण व्हावें अशी इच्छा करतात. ते ब्राम्हणांसारखें गंध लावतात. देवपूजा वाढवतात. पण मला तर हे मूर्ख वाटतात. इतका प्रयत्न करून ब्राम्हणांत येऊन फायदा काय? कितीएक नमस्कारासाठीं भांडतात. मला वाटतें कीं, माहारासदेखील नमस्कार करावा. त्यांत आहे काय? या किंचित गोष्टीचा वाद कशास पाहिजे? परंतु ब्राम्हणांस परभांपासून पैसा काढण्याचें साधन या युक्तीनें होतें. परभू ब्राम्हणांची संध्या वगैरे मुलांस शिकवितात त्यापेक्षां

एखादें सार्थ नीतीचें अगर धर्माचें पुस्तक कां शिकवीत नाहींत ? ही भटांची मजूरी कशास शिकवितात ? यांत काय आहे ? मला तर कांहीं वाटत नाहीं. परंतु हे दोन्ही जातीचे लोक मूर्ख आहेत. ते ब्राम्हण व्हावयास पाहातात. अशी ही तऱ्हा चालली आहे. तेव्हां आतां धर्मसुधारणा निघेल तर हे सर्व तंटे मिटतील. व आपला धर्म शुध्ध आणि सुंदर म्हणून पुष्कळ लोक यास साह्य करतील यांत संशय नाहीं. हें कोणी तरी मनावर घेणें जरूर आहे. हे विनंती.

लो० हि०

ता. १ माहे जुलाई १८४१

पत्र नंबर ६६

सरकारी कामदार

विनंती विशेष. आपले लोकांमध्यें अशी चाल पडून गेली आहे कीं, त्यांणीं उडवें असावें. म्हणजे त्याणीं मनास येईल तितकें कर्ज करावें, सावधगिरी करूं नये. हें लक्षण सरदारांचें असें लोक समजतात. दुसरें सराफ लोक हे सावध असतात. म्हणजे त्यांणीं कवडीपासून मिळवावें. कधीं गैरशिस्तपणें पैका जाऊं देऊं नये. कारकून यांणीं ठकपणानें संसार करावा, हा शिरस्ता आहे. आणि सरकार हें लुटारू असावें व सरकारनें पाहिजे तसें वागावें, खंडण्या घ्याव्या, लूट करावी, हा धर्म सरकारचा असें लोक समजतात. आणि तसेंच आचरण करितात. याजमुळें पुष्कळ अनर्थ होतात. गृहस्थ आहेत ते म्हणतात कीं, आमचा द्रव्य मिळविण्याचा धर्म. भट म्हणतात, आमचा भीक मागण्याचा धर्म. भटाजवळ पन्नास हजार रुपये असले तरी आणखी भीक मागतोच. व गृहस्थास दोनशें रुपये महिना असला तरी लांच खातोच. चोऱ्या करितो आणि पैका मिळवितो. आपले लोकांपैकीं कामगार सरकारचाकरीस आहेत, त्यांपैकीं शेंकडों या लांच खाण्याबद्दल वगैरे तुरुंगांत गेले. परंतु अद्याप ते खोड टाकीत नाहींत. याचें कारण असें आहे कीं, त्यांस ती सवई पडून गेली आहे हें एक; दुसरें, त्यांस ईश्वराचें भय नाहीं. विद्या नाहीं व शाहाणपण नाहीं. याजमुळें नीती समजत नाहीं; तिसरें कारण, इंग्रज लोक जे विलायतेंतून इकडे येतात ते शुध्ध टोणपे असतात, त्यांस कांहीं कळत नाहीं. मग शिरस्तेदारावर वगैरे भरवसा ठेवितात. व शिरस्तेदार जें सांगेल त्याप्रमाणें करतात. याजमुळें शिरस्तेदार जड्जाचें काम स्वतः करीत असतो. म्हणून तो लांच खातो. चौथें पगार फार कमी. साहेब लोक मूर्ख असतात, परंतु दोन हजार, तीन हजार रुपये पगार

खातात. आणि त्यांचे हाताखालील कामगारास शेंपन्नास रुपये दरमहा देतात. आणि सर्व काम तो करितो, हेंही कारण आहे. पांचवें कारण असें आहे कीं, इंग्रज लोकांस या देशांतील लोक निवडतां येत नाहींत. लुच्चे, सोदे आणि भले हे एकसारखे या राज्यांत झाले आहेत. ज्या लोकांची योग्यता पांच रुपये मिळविण्याची असत्ये त्यांस १०० रुपये देतात. आणि ज्यांची पांचशें रुपयांची योग्यता त्यांस पांच देखील देत नाहींत. सरासरी अंघळें दळतें आणि कुत्रें पीठ खातें, अशी वर्तणूक आहे. याजमुळें इकडचे लोक म्हणतात कीं, कसेंही केलें तरी इंग्रजांस निवाडा समजत नाहीं. निभेल तितके दिवस निभेल. मग खावयास तरी कशास कमी करावें? जितके दिवस जातील तितके जातील. पुढें पाहातच आहोंत, अशी समजूत आहे. ब्राह्मण लोक राज्याचे व अधिकाराचे उपयोगीं नाहींत. हें स्पष्टपणें आज दिसत आहे. जेव्हां ब्राम्हणाच्यानें शेंपन्नास रुपयांच्या जागा व लहान लहान अधिकार नीट चालवत नाहींत, तेव्हां ते पुढें करणार काय? यांचे हातीं राज्य दिलें तर हे दिवसास लुटतील, हें उघड आहे. कोणी म्हणतात, इंग्रज जे कामगार ठेवितात ते अगदीं लबाडाचे अर्क असें जाणून ठेवीत नाहींत, परंतु अज्ञानानें तसें घडतें. तथापि फळ एकच आहे. हे जर कुळीन लोकांस ठेवतील तर असें कधीं होणार नाहीं. याजकरितां विद्वान, चांगले, कुलीन, मोठ्या योग्यतेचे लोक ठेवावे. छचोर, लबाड व हलके लोक जे आतां भरले आहेत, यांचे हातून वर्तणूक कशी चांगली होईल? परंतु असें साहेबलोकांच्या हातून घडणें कठीण; कारण त्यांचें अज्ञान या देशाविषयीं पुष्कळ आहे. अब्रुदार कोण, कसा, हें त्यांस कळत नाहीं. सकट घोडे आणि बाराटक्के मानितात. मला वाटतें कीं, हे इंग्रज हल्लीं सरकारांतून नेमणूक होऊन जे इकडे येतात, त्यांचे तीन वर्ग आहेत. शंभर सिविलियन असले तर त्यांत पंचाण्णव असे असतात कीं, त्यांचें चित्त पैका मिळऊन घरास जावें. ते दुसरें कांही पाहात नाहींत. फक्त पिशवीवर नजर ठेवितात. व शिरस्तेदारानें कागद पुढें मांडले म्हणजे सह्या करितात. अर्जी कोणीकडे पडो तरी फैसल करितात. व इकडे तिकडे न पाहातां घरीं जातात. दुसरे दिवशीं पुन्हां तोच क्रम, ते आपले दिवस मोजितात. याप्रमाणें उदास असतात. आणखीं शेकडा चार मध्यम प्रतीचे असतात. म्हणजे ते चित्त लाऊन काम करितात. हाताखालचे माणसांचें काम, त्यांची वर्तणूक व वहिवाट पाहातात. विदुरनीतींत राजास विदुर सांगतो, राजाचा धर्म असा आहे कीं, आतमीदार ठेऊन वर्तमान पाहात जावें. तो नेम इकडील लोकांस फार लागू आहे. ज्यास अधिकार करणें त्याणें आपले लोकांची वर्तणूक पाहावी. म्हणजे त्यांस भय वाटतें. परंतु असें करणारे साहेबलोक शेंकडा चार असतात. व शंभरांत एक उत्तम प्रतीचा असतो. त्याचे मनांत आपण नीट काम करावें; हें तर काय, परंतु आपले जिल्ह्यांतील सर्व लोकांचें कल्याण असावें, अशी त्याची इच्छा असते. त्यास वाटतें कीं, आम्ही या लोकांचा दरमाहा खातों हा त्याचा माल घेतों. व हे लोक अज्ञानांत फार आहेत, याजकरितां यांस सुधरावें व विद्यावृध्धी करावी. अशी प्रजेची काळजी करणार क्वचित. याप्रमाणें आहे.

तेव्हां अशा उदासीन राजाचे हातून राज्य कसें चांगलें होईल ? ते आपले हिताकडे पाहातात. लोक मेले तर मरेनात. यांस काय त्यांचें सुतक यावयाचें आहे ? आपले लोक आतांपासून सुधारले आणि जरा अक्कलहुषारींत आले व लांच खाणें वगैरे दोष टाकले म्हणजे खचित साहेबलोकांचे शंभरपट काम चांगलें करतील. यांस प्रथम भाषा चांगली कळेल. साहेबलोकांचें मुळीं तेंच व्यंग असतें. व स्वदेशांतील लोक राज्य करण्यास योग्य होण्यास अवकाश आहे, तत्रापि जर विद्वान लोकांस मोठाल्या जागा इंग्रज सरकार देऊं लागलें तर त्याच्या योगानें लौकर सुधारणा होईल. हल्लीं जे कामगार आहेत, ते इंग्रजापेक्षां स्वदेशाचें हित करण्यास उदास आहेत. यांजपासून देशाचें कल्याण काय होणार ? आज जे लोक आहेत, त्यांस कांहीं कळत नाहीं. ज्ञान व विद्या हे विषय त्यांचे स्वप्नांत देखील नाहींत. गर्विष्ठ, ब्राम्हणांच्या समजुती त्यांचे मनांत आहेत. फक्त पैसा मिळविण्याकरितां साहेबलोकांचे आर्जव करून पोट भरितात, या लोकांच्यानें काम कधीं चांगलें होणार नाहीं. याजकरितां चांगले लोकांची योजना सरकारांतून करावी. आतां सरकारचाकरीस लोक आहेत हे फार हलके प्रतीचे; यांस कांहीं ज्ञान नाहीं. फक्त आर्जव करावे इतकें त्यांस समजतें. व साहेबलोक कितीएक स्तुतिप्रिय असतात. त्यांची आर्जवानें मर्जी खुष होते, आणि ते त्यास मोठी जागा देतात. याप्रमाणें अवस्था आहे. तात्पर्य कोणत्याही प्रकारें या लोकांची बरी गत नाहीं. सरकार या प्रकारचें व लोक या प्रकारचे. मग दरिद्र असलें तर नवल काय ? यास्तव या लोकांस माझी विनंती आहे कीं, तुम्ही जरी हलक्या कुळांतले असाल तरी तेंच तुम्ही बिरिद बाळगावें असें नाहीं. थोरपणा धरावा. तुमचे नशिबानें हे इंग्रज इकडे आले म्हणून तुमच्या सारख्यांस जागा मिळतात. तर तुम्ही देशांतील लोकांची अब्रू राखा.

लो० हिं०

तारीख ८ जुलई १८४१

पत्र नंबर ६७

स्वदेशप्रीती

या देशांतील शास्त्री, पंडित यांस व ज्यांस आपले धर्मांचा अभिमान आहे व जे धर्म जाणतात त्या सर्वांस माझे कांहीं प्रश्न आहेत, त्यांचीं उत्तरें कोणी देतील तर मी त्यांचा आभार मानीन. आणि न देतील तर मी आपल्यास विजई म्हणेन.

१ पुराणें हीं काव्यें समजावीं किंवा वेदशास्त्राप्रमाणें त्यांस मानावें ? २ वेदांतील

धर्म व पुराणांतील धर्म (देवता, आचार, कर्मे इत्यादि) वेगळा आहे कीं नाहीं ? ३ सांप्रत हिंदू धर्म बिघडला आहे कीं नाहीं; व त्यास सुधारणें जरूर आहे कीं नाहीं ? ४ आचार प्रमुख मानावा किंवा नीती प्रमुख मानावी ? ५ हल्लीं हिंदू लोकांवर जे प्रसंग आले आहेत ते सर्वांस विदित आहेत. त्यांतून तरणोपाय होण्याकरितां उपाय करणें अवश्य आहे. परंतु त्या उपायास सांप्रतचे काळीं धर्म अगदीं बुडोन अज्ञान पसरलें आहे हें विघ्न आहे किंवा नाहीं ? ६ वेद, शास्त्रें, पुराणें यांचा सारांश ग्रंथ करून सर्व लोकांस तो धर्मपुस्तकाप्रमाणें देणें बरोबर आहे किंवा नाहीं ? किंवा प्रत्येकानें दाहा उंट पोथ्या वाचाव्या तेव्हां त्यांतील कांहीं धोरण कळणार, असेंच गूढ राहूं द्यावें ? अर्थ करणें बरें किंवा पाठ करणें बरें ? ७ जातिधर्मास कुळ मुख्य किंवा वर्तणूक मुख्य ? ८ पुराणांतील व तंत्रांतील धर्म कांहीं कांहीं नीतीस विपरीत आहेत. जसें शाक्त दारू पितात, जारकर्म करितात इत्यादि. आणि कांहीं युक्तीस प्रतिकूल आहेत. म्हणजे ग्रहण भलतेच रीतीनें वर्णन केलें आहे. व पृथ्वीचें स्वरूप मनास येईल तसें कल्पनेनें लिहिलें आहे. याजवर भरंवसा ठेवावा व अंधळ्यासारखें होऊन जें उघड खरें दिसतें तें खोटें म्हणावें, यांत परिणाम आहे कीं काय ? ९ सांप्रत लोकांमध्यें कितीएक चाली मुळींच आधार नसतां पडल्या आहेत. म्हणजे लौकर लग्न करावयाचें इत्यादि. या मोडणें जरूर आहे कीं नाहीं ? १० वास्तविक धर्माचें तात्पर्य हल्लीं कोणास कळत नाहीं. शास्त्री, पंडीत हे लोभावर दृष्टि देऊन लोकांस बरा वाटेल तो शास्त्रार्थ सांगतात. याजमुळें धर्म अगदीं ग्लानीस आला आहे. याचा अभ्युदय करणें जरूर आहे कीं नाहीं. ११ अशा मोठाल्या गोष्टी ईश्वरानें कराव्या असें म्हणून उगेंच बसणें बरें, किंवा उद्योग करावा त्यांत ईश्वर साहाय्य होतो, हें मानणें बरें ? १२ संस्कृत ग्रंथ आहेत त्यांचे मराठी करून ज्ञान वाढविणें हें बरें किंवा ब्राम्हणांचें हक्क त्यांत कांहीं बुडत आहेत ? १३ इतके त्रयोदशविध माझे प्रश्न आहेत. यांतील तार्तम्य जाणून कोणी उत्तर द्यावें व उत्तर देतेसमयीं जे कोणी शाहाणे आहेत त्यांस पुसावें. कितीएक लोक ज्यांचें अज्ञान दृढ आहे, ते या सर्व प्रश्नांचीं उत्तरें बाळकासारखीं तत्काळ देतील. कारण कीं, ब्राम्हणांचा असा स्वभाव आहे कीं, जर त्यांचें समजुतीविरुध्ध कांहीं बोललें तर ते अगदीं वाईट आहेत, असें समजतात; कारण कीं ते मुळीं आपल्याला देव समजतात. याजमुळें गर्व होऊन आम्ही थोर, आम्ही करितों तें चांगलें, आम्हांस कोण नांवें ठेवणार आहे, अशा समजुतीनें त्यांचे वादविवाद नाहींसे होऊन लोक थंड झाले आहेत. एखादी गोष्ट चांगली किंवा वाईट हें ठरविणें, त्यांस कळत नाहीं. एक गोष्ट सांगतो व बाकीचे माना डोलवितात, विचार करीत नाहींत, हें अत्यंत गर्वाचें व मूर्खपणाचें लक्षण आहे. याजकरितां माझे प्रश्न साधारण नाहींत, अपूर्व आहेत, व असे आजपर्यंत कोणी केलेही नसतील. म्हणून यांचीं उत्तरें देण्यास शास्त्री, पंडीत, धर्मवेत्ते व इतर लोकहितेच्छू असतील त्यांणीं सर्व गोष्टींचा दूरवर विचार करून व सर्व कल्पना आणि तर्क ध्यानांत आणून उत्तरें

दिलीं पाहिजेत. मी रागाचें किंवा घाईचें उत्तर मागत नाहीं. विचाराचें व सत्याचें उत्तर मागतों. याजकरितां जे कोणी अज्ञानाचे दास नसतील, त्यांणीं मन मोकळें करून भागवताचे वाक्याप्रमाणें "मनःपूतं समाचरेत्" खरें दिसेल तें बोलावें. खऱ्याची लाज धरूं नये. ज्यांणीं स्वदेशाचेच हिताचे विचार केले आहेत, व जे सर्व शास्त्रें जाणतात व जे बहुश्रुत व देशोदेशींचे इतिहास जाणतात, त्यांसच हे प्रश्न सुलभ जातील, असें मला वाटतें; कारण जे लोक विचारी आहेत, त्यांचें मन अज्ञानाचें दास्यत्व किंवा कोणत्याही मताचा पक्षपात करीत नाहीं; वास्तविकपणानें व विचाराचे धोरणानें सुबुध्धीकरून ते चालतात. यास्तव माझे देशाचे लोक विविध जातींचे आणि मुख्यत्वेंकरून ब्राम्हण जातीचे (कारण कीं ब्राम्हण हिंदु लोकाचें धर्माध्यक्ष आहेत) याजकरितां यांस माझी अशी प्रार्थना आहे कीं, माझे प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं व मी त्या गोष्टीचें होय म्हणून प्रतिपादन करणार आहे, तेव्हां कोणाचा पक्ष सिद्ध होतो हें पाहूं. आणि सिध्ध झाल्याअंतीं सर्वांनीं तसेंच आचरण करावें. आणि स्वदेशाचे हितास झटावें, ही मुख्य धर्मसुधारणा आहे. स्वदेशास जें हितावह तें करावें. जसें आपण मातोश्रीस वंद्य मानतों व तिच्या पोटीं जे आले ते सर्व बंधू प्रीतीनें वागतात. तद्वत या जमीनीवर जे आपण आहोंत ते सर्व एकमेकांचे बंधू आहोंत. व हा देश आपणा सर्वांची मातोश्री आहे. याजकरितां कोणी सुखी व द्रव्यवान् असतील त्यांणीं बहुत लोक उपाशीं मरतात व दरिद्री आहेत त्यांचें रक्षण होण्याचा प्रयत्न करावा. आपण सर्वांनीं आज दोन हजार वर्षेंपर्यंत यथेच्छ झोप घेतली व कांहीं उद्योग केला नाहीं म्हणून आतां तरी जागृत होऊन काय आहे तें पाहूं, व बुध्धीचा उपयोग करूं. मेल्यावर आपण एकामेकांस उपयोगी पडणार नाहीं, तेव्हां या जन्मांत ही संधी लोकांवर उपकार करण्याची आहे. ही सोडूं नये व आयुष्याचा व्यय दुसऱ्याचे हिताकरितां करावा. तो व्यय सुखकारक आहे. आणि दुसऱ्यास सुखप्राप्ती करणें, हें स्वतां आपणास लहान सौख्य नाहीं. तुम्ही जेव्हां निर्वेध बसाल तेव्हां तुम्ही चांगलें काम केलें असेल त्यास आठऊन केवढें सुख पावाल, परंतु वाईट काम केलें तर कुऱ्याचे मरणानें मराल, याजकरितां मी इतका तुम्हांस विनवीत आहें.

लो० हि०

लोकहितवादी कृत

तारीख २२ माहे जुलाई १८४१

पत्र नंबर ६८

उद्योगप्रशंसा

हिंदू लोकांची बुध्धी फारच क्षीण झाली आहे. याजमुळें ते कितीएक गोष्टी विनाकारण तुच्छ मानतात. जर कोणी येखादे गृहस्थास सांगितलें कीं, इंग्रजलोकांमध्यें विद्या फार आहे व ते लढाईंत जय मिळवितात याचें कारण विद्या आहे, तर तो उत्तर देईल कीं, कशाची विद्या ! सद्दी फिरली म्हणजे असेंच होतें. प्रारब्ध अनुकूल झालें म्हणजे विद्या वगैरे सर्व येतें. व ज्या मनुष्यास दैव अनकूल नाहीं त्याचे ठाईं सर्व गूण असले तरी ते व्यर्थ दिसतात. भर्तृहरी वगैरे कवी यांणीं फक्त प्रारब्ध वर्णिलें व उद्योगाची प्रशंसा सोडून दिली. येणेंकरून लोकांमध्यें हें मत आतां असें प्रबल झालें आहे कीं, फक्त दैवावर भरवसा ठेऊन लोक बसतात. क्षणभरदेखील विद्या काय आहे याचा विचार करीत नाहींत. रामानें रावण जिंकला तेव्हां वानरांनीं राक्षसांस मारिलें इत्यादि दृष्टांत देतात. आणि जी जी सुधारणुकीची गोष्ट तिजवर भरवसा ठेवीत नाहींत. जर कोणी ग्रंथ किंवा वर्तमानपत्र हातीं दिलें तर म्हणतात कीं, यांत काय आहे ? त्याणें काय ज्ञान वाढणार आहे ? आजपर्यंत हेंच कोठें होतें ? इत्यादि भाषणानें उद्योग व्यर्थ मानितात. हें मोठें दुर्दैव आहे. ईश्वरइच्छेनें हे लोक असेच नाहींसे होणार असले तर कोणाचा काय उपाय आहे ? परंतु मला कठीण दिसतें व या लोकांचा परिणाम भयंकर आहे, असें भासतें. काळेंकरून हे सर्व खिस्तियन धर्मांत जातील; किंवा स्वधर्मास जाणून यासच सुधारून त्याची स्थापना करतील, हें समजत नाहीं. इंग्रज इकडे राज्य करतात ते आतांच आम्हांस गुलामाप्रमाणें मानतात व आफ्रिकेंत लोक आहेत ते इतके मूर्ख आहेत कीं, त्यांच्यानें राज्य किंवा येकत्रपणा कांहीं होत नाहीं. याजमुळें जो पाहिजे तो त्यांस धरून विकावयास रानच्या जनावराप्रमाणें देशांतरीं नेतो; तद्वत या हिंदुलोकांची स्थिती होईल. कांहीं दिवसांनीं इंग्रज येथें येऊन घरेंदारें करून राहूं लागतील; म्हणजे बहुतकरून आमचे रोजगार गेलेच आहेत, व जे राहिले आहेत ते समूळ जातील; कारण कीं, ते लोक शाहाणे आहेत. मग आम्हांस दरएक इंग्रजांचे घरीं गुलामगिरीचीं कामें करावीं लागतील, आणि सर्व मोठेपणा व धनीपणा इंग्रजांकडे जाईल, असें होतां होतां उत्तर अमेरिकेंत इंग्रज लोक राहिले, आणि चार-पांचशें वर्षांत तेथील लोक सर्व मरून नाहींसे झाले व सर्व इंग्रजांचीच वस्ती झाली, तसा हा देश केवळ इंग्रजांचे वस्तीचा होईल कीं काय ? अशा अशा प्रकारचे प्रश्न माझे अंतःकरणांत येतात, व यांची विवंचना करितां करितां ईश्वरेच्छा काय आहे ती समजत नाहीं. म्हणून या देशांत राहिलेले जे सुधारलेले लोक आहेत, त्यांस मात्र मी पुसतों कीं, तुम्हांसही जर सर्व गोष्टी पुढें भयंकर

दिसतात, तर तुम्ही स्वस्थ कसे बसलेत? लौकिकरीतींत, चालींत, धर्मांत सुधारणा करावयास झटावें तर सर्व लोक आपल्यास वाईट म्हणतील. म्हणून तुम्हांस भय वाटतें काय? परंतु मला वाटतें कीं, शंभर मूर्खांनीं वाईट म्हटलें आणि एका शाहाण्यानें चांगलें म्हटलें, तर तें चांगलें म्हणणें अधीक; याजकरितां लोकापवाद मूर्खांचा आपण मानूं नये. हे लोक अतिशय वेडे आहेत, आणि यांजवर भ्रांती पडली आहे. येणेंकरून जसा मद्यपी मनुष्य मस्त असतो व त्यास कांहीं सुचत नाहीं, तसे हे लोक भुलले आहेत, व यांस काळानें घेरलें आहे, म्हणून असा आळस करितात. मीं पुष्कळ सामर्थ्यवान् लोकांस पुसलें कीं, याविषयीं तुम्ही कांहीं उद्योग करितां काय? तर ते म्हणतात कीं, ईश्वरेच्छा असेल तसें घडेल; आपल्याच्यानें काय होणार आहे? र[री?]ती फिरली म्हणजे कांहीं उपाय चालत नाहीं. जसें होणार तसें होऊं; आपला आपण विचार पाहावा. इत्यादि पोरांसारखीं मूर्खपणाचीं भाषणें करितात. आणखी जर त्यांस म्हटलें कीं, शिकांचा पराभव इंग्रजांनीं विद्येनें केला; तर म्हणतात, "कांहीं नाहीं. सर्व नशिबानें केलें." याप्रमाणें नशिबावर त्यांची श्रद्धा आहे. त्यांस येखादें कारण दाखविलें तर त्यांचा विचार करीत नाहींत. आणि यांत काय आहे, असें म्हणतात. असा या लोकांचा चमत्कार आहे. विद्या म्हणजे काय हें कांहींएक यांस ठाऊक नाहीं; व लष्कराचे कवाइतींचें फळ काय हें माहीत नाहीं. ज्यांणीं याचा विचार मुळींच केला नाहीं तेदेखील धिःकारानें म्हणतात कीं, यांत काय आहे? कशाची कवाईत? व कशाचें शाहाणपण? विदुराचें शाहाणपण थोडें होतें काय? पण काय झालें? अशीं उत्तरें हरएकाविषयीं अर्थ न जाणतां धीटपणानें देतात. कारण त्यांची श्रद्धा दैवावर आहे. त्यांस असें वाटतें कीं, आमच्या ज्या पूर्वापार समजुती आल्या आहेत, त्या खऱ्या. याजमुळें हे लोक उद्योग करीत नाहींत. यास्तव कोणीतरी या लोकांची समजूत व्हावयाजोगा ग्रंथ लिहून प्रगट करावा कीं, दैव म्हणजे काय? मुळीं तो पदार्थ नाहीं; नांव मात्र आहे, व आळशी लोकांस हा फार प्रिय आहे. परंतु वास्तविक पाहिलें तर ईश्वर-इच्छा अशी आहे कीं, सर्वांनीं उद्योग करावा. रामानें लंकेंत जाण्याचा उद्योग केला कीं नाहीं? मग वानरांच्या हातून सिध्धी होऊं द्या; परंतु उद्योग करणें अवश्य आहे. मुळींच उद्योग सोडून राम अयोध्येंत बसला असता तर रावणास मारूं शकता काय? ईश्वर-इच्छा खरी, परंतु जसें तुम्ही त्यास प्रार्थाल तशी सिध्धी होईल. तुम्ही संसारांत आहां; परंतु उद्योग केला तर मोक्षास जाल कीं नाहीं? ईश्वर-इच्छा तुमचे भावनेप्रमाणें व प्रार्थनेप्रमाणें आहे. ईश्वराची प्रार्थना करणें याचाच भाग उद्योग करणें आहे. उद्योग न करितां कोणी प्रार्थील तर ईश्वराचे क्षोभास मात्र तो पात्र होईल. याजकरितां तुम्ही दैवावर भार देऊं नका. दैव पांगळें आहे.

लो० हि०

ता० २१ माहे जुलाई १८४१

पत्र नंबर ६९

संस्कृत आणि इंग्रजी विद्या

लोकांमध्यें अशी समजूत आहे कीं, शाहाणपण हें अंगस्वभावानें येतें; परंतु ही जरी थोडीशी खरी गोष्ट आहे, तत्रापि सर्व शाहाणपण अंगस्वभावांत असतें असें नाहीं. शाहाणपण पुष्कळ मिळवावें लागतें. लोकांमध्यें समजूत अशी आहे, व ज्ञान मिळणें हें संसारकृत्य आहे. याजकरितां कितीएक जण इंग्रजी शिकतात. त्यास लोक पुसतात कीं, तुम्हांस रोजगार लागला ? आतां विद्या शिकतां कशाला ? शाहाणपण व ज्ञान म्हणजे काय, याचा अर्थच त्यांस कळत नाहीं. मनुष्यानें ग्रंथ वाचले पाहिजेत, पुष्कळ विद्या व भाषा शिकवल्या पाहिजेत, म्हणजे बहुत गोष्टी कानांवर पडून माहितगारी होते. केवळ संस्कृत वाचूनच होणार नाहीं. मला निश्चयेंकरून वाटतें कीं ज्यास शाहाणपण व ज्ञान मिळवावयाचें असेल, त्याणें इंग्रजी भाषा किंवा त्या भाषेंतील ग्रंथांचे तर्जुमे तरी वाचावे. म्हणजे त्यास पुष्कळ गोष्टी कळतील. आतां इंग्रजी विद्या फार सुधारली आहे; याजमुळें त्यांतील भूगोलावर येक ग्रंथ पढलेला, आणि जितके संस्कृत किंवा इतर भाषांत ग्रंथ आहेत ते जाणणारे जमा केले तर ह्या एकाची बरोबरी व्हावयाची नाहीं, असें आहे; कारण इंग्रज लोकांनीं विद्या फार सुधारल्या, याजमुळें त्या शुध्ध आहेत. आणि पूर्वीच्या काळीं शोध कमी होते; याजमुळें विद्या अर्धवट झाल्या, तितक्याच राहिल्या आहेत. केवळ संस्कृतानेंच मनुष्य शाहाणा व ज्ञानी होईल असें नाहीं. शास्त्रें इत्यादिक पढले आहेत, त्यांच्या बहुत वांकड्या समजुती आहेत. व हें एक संस्कृताचें धोरण आहे. आणखी बहुधा पाहाण्यांत आहे कीं, संस्कृत पढलेले भ्रमिष्ट, मताभिमानी, अर्थांचे अनर्थ करणारे, आणि वांकड्या रितीनें भलतेच दृष्टांत देऊन विचार करणारे, असे असतात. जुन्या काळच्या विचारांच्या रीति आलीकडे अगदीं काढून टाकल्या आहेत. व सुमार्गानें विचार करण्याच्या पध्धती व नेम लाऊन शास्त्रें केलीं आहेत. तीं इंग्रजींत आहेत; पण तीं संस्कृतापेक्षां हजार पट चांगलीं आहेत. हें मी निष्पक्षपातानें सांगतों. आतां आमचा स्वधर्म संस्कृतांत आहे. याजकरितां त्यांचें ज्ञान असणें जरूर आहे. परंतु तितक्यापुरतेंच संस्कृत शिकावें. त्यांतील शास्त्रें पाहाणें किंवा त्यांजवर फार विश्वास ठेवणें उपयोगी नाहीं. बुध्धीस विपर्यास येतो. त्यापेक्षां एकादा इंग्रजी ग्रंथाचा तर्जुमा पाहून विचार केला तर कार्य होईल. व तें संस्कृतद्वारा पांचपट आयुष्य खर्च करून होणार नाहीं. शाहाणपण हे फार दुर्लभ वस्तु आहे. बहुत वाचलें पाहिजे, बहुत गोष्टींचा विचार केला पाहिजे. व बहुत ऐकिलें पाहिजे. आलीकडेस माझे पाहाण्यात कांहीं पोरें आलीं आहेत. त्यांतील कितीएकांस इंग्रजी जरा वाचतां लिहितां येऊन पोट

भरूं लागलें म्हणजे त्यांस वाटतें कीं, आम्ही परिपूर्ण झालों. तसेंच संस्कृत पढलेले पुष्कळ आहेत. त्यांच्या तर विलक्षण समजुती असतात. मुख्य त्यांचे मनाची अशी स्थिती असते कीं, ज्या ज्या मूर्खपणाच्या समजुती म्हणजे प्रारब्धावर विश्वास व ज्योतिषावरून दैव पाहाणें व मंत्राचें सामर्थ्य वगैरे त्यांस खरें वाटतें. हा सर्व मूर्खपणा संस्कृत विद्येंत भरला आहे. जो पढतो त्यास त्या पिशाच्याप्रमाणें लागतात. याजकरितां ही मोठी सावधगिरी ठेविली पाहिजे. आजचे काळीं इंग्रजांसारखे शाहाणे, पराक्रमी, ऐश्वर्यमान व विद्वान कोठें नाहींत. व त्यांच्या विद्या हिंदूस अश्रुत आहेत. याजकरितां सर्वांनीं त्यांतील ज्ञान घ्यावें व त्याचा धिःकार करूं नये. आम्हीं ब्राम्हण सर्वांहून श्रेष्ठ, आम्हीं भूदेव, या म्लेच्छांनीं आम्हांपुढें काय शेखी मिरवावयाची आहे? व यांचा पदार्थ काय? आमचें नशीब अनुकूल होईल तेव्हां आम्हांस विद्या लागणार नाहीं, जें चिंतू तें मिळेल ही समजूत विसरावी. असें मागें कधीं झालें नाहीं व पुढेंही होणार नाहीं. पुराणांतल्या गोष्टी पुराणांत ठेवाव्या. भलतसेच अर्थ मूर्ख पुराणिक असतात ते करितात व भलतीच समजूत पाडितात. याजकरितां सांप्रत इंग्रजींत ज्या ज्या विद्या भुगोल, खगोल, राज्यनीती इत्यादिक आहेत, त्यांचा विचार करावा व त्यांतील समजुती करून घ्याव्या. म्हणजे तुम्हास फार संतोष होईल. असें केल्याशिवाय लोकांस कोणतेंही कार्य नीट करतां येणार नाहीं. सरकारनें लोकांस मोठीं कामें दिलीं तर ते अनर्थ व जुलूम करतील, लांच खातील, डौल करतील व लोकांचे कल्याणार्थ झटावयाचे नाहींत. यांचें प्रत्यंतर सांप्रत जे लोक रोजगारावर आहेत, त्यांजकडे पाहिलें म्हणजे मिळेल. तात्पर्य ज्यांस ईश्वराचें भय नाहीं व विद्या काय हें त्यांणीं ऐकलेंही नाहीं, त्यांस नीती असेल कोठून? व शाहाणपण कसें येईल? बहुत लोक संध्या झाल्यावर स्तोत्र पाठ करितात; परंतु केवळ सडकेवर माती वाहाण्याची मजूरी आणि स्तोत्रपाठ सारखाच आहे. कारण कीं त्यांत अर्थ नाहीं. पाठ करण्याचें पुण्य होतें असें समजून व्यर्थ आयुष्य कशास घालवितात?

लो० हि०

ता. ६ ऑगस्ट १८४१

पत्र नंबर ७०


पुनर्विवाह

ब्राम्हण लोकांच्या विधवा पाहून फार हळहळ वाटते. त्यास कोणता उपाय करावा? हे ब्राम्हण तर स्वहितास अंधळे म्हणून पुनर्विवाह करूं देत नाहींत. प्रत्येकाचे

घरीं विधवा नाहीं असें नाहीं. आणि कितीएकांच्या कन्या अशा लहानपणीं विधवा झाल्या आहेत कीं, त्यांस नवरा म्हणजे काय तें ठाऊक देखील नाहीं. आणि त्यांचें पुन्हां लग्न नाहीं हा केवढा जुलूम आहे ! हे सर्व शास्त्री, जुने लोक मेले म्हणजे हें लौकर होईल. सांप्रत अडचण आहे. कितीएक पोरी व्यभिचारी निघतात; पोरें मारतात. पण त्यांस लग्न करून नांदिवल्या तर फार चांगलें होईल. हजारों जीव मरतात. आणि दुःखी होतात. आणि बोडकी झाली म्हणजे तिचे हाल करितात. तिला जेवावयास कमी घालितात; सर्व प्रकारें तिचे हाल. तिला हजामत करण्याची लज्जा. तात्पर्य सर्व गोष्टी तिला प्रतिकूल होतात. जी आज सुंदर, सौभाग्यवती दिसते, तीच उद्यां केशरहित अलंकाररहित होते. आणि तिचें तोंड पाहिलें तर देखील वाईट म्हणतात. तेव्हां विधवांचा अपमान केवढा होतो ! त्यांजला असें वाटतें कीं, आमचा जीव व्यर्थ, जन्मास येऊन सुख नाहीं. आमचें तोंड पाहात नाहींत. लग्नकार्यास आम्ही कामास नये बरें आम्हाला दुखणें लागलें तर सर्व इच्छितात कीं, मरतील तर बऱ्या; आम्हांला लुगडीं द्यावयास कोणीं नाहीं. स्त्रियांस नवरा म्हणजे त्यांचा भर्ता व सोबती. ईश्वरानें त्यांस निर्बळ केल्या आहेत. त्यांस पुरुषांचा आश्रय असला म्हणजे त्यांस मोठे बल असतें. परंतु तें बल त्यांचे दैवानें गेलें तर त्यांनीं काय करावें ? तथापि त्यांस पुन्हा नवरा करण्याची परवानगी नाहीं. हा शास्त्राचा अतिशय जुलूम आहे. मला वाटतें कीं, असे निर्दय, मूर्ख आणि अंधळे लोक या चारी खंड पृथ्वींत नसतील. आणि कोणत्या तरी शास्त्रावरून असा जुलूम दुनियेंत झाला नसेल ! बायका अगदीं गरीब; त्यांस अबला असें म्हणतात. आणि त्यांची अवस्था अशी करतात हें कोटें फेडतील. आजपर्यंत बायका किती जाळिल्या आहेत आणि अजून जिवंत किती जाळितात, याविषयीं कोणी दुष्टाभिमान धरून एकदम सर्वजण एकत्र होऊन हें कार्य करावें. तुम्ही न कराल तर सर्व लोक कधीतरी करतीलच, यांत संशय नाहीं. परंतु यश घ्याल तर बरें आहे. इतके दिवस तुम्ही स्त्रियांस या देशांत दुःखांत घातल्या. अजून तरी त्यांस या तुमच्या ब्राम्हणी पाशापासून सोडवावें. मनूचें वचन असो, याज्ञवल्क्याचें असो, कोणाचेंही असो; ब्रम्हदेवाचें कां असेना. "बुद्धिरेव बलीयसी," असें आहे. त्यापेक्षां तुम्ही जें उघड पाहातां त्याचा बंदोबस्त शास्त्रांत नाहीं म्हणून करीत नाहीं, हें योग्य नाहीं. शास्त्रास येकीकडे ठेवा. आपली बुध्धी चालवा, विचार करून पाहा. घातक वचनावर हरताळ लावा. हा प्रसंग तुम्ही कसा जाणत नाहीं ? मी तुम्हां सर्वांस असें म्हणतों कीं, तुम्ही आपल्या मुली व बहिणी विधवा पाहातां, तेव्हां तुम्हांस लाज वाटत नाहीं काय ? त्यांस सुखी करण्यास तुम्हांस सामर्थ्य आहे; परंतु तुम्ही करीत नाहीं. हा मूर्खपणा आहे. तुम्ही आजपर्यंत बायकांचे शाप घेतलेत. व पुढें घेतां, याचे झाडे कोठें द्याल ? अहो जिचा नवरा मरतो तिचा घात होतो; ती दुःखी होते; आणि तुम्ही तशा अवस्थेंत निर्दयपणानें तिचे केश काढितां, आणि तिचे आंगावरचे दागिने काढून घेतां, हा काय धर्म आहे ? आणि

तुम्ही असें म्हणतां कीं, तिचें दैव वाईट म्हणून तिचा नवरा मेला; परंतु तुम्ही दुष्ट म्हणून तिला दुसरा नवरा करून देत नाहीं. दुर्दैवी मनुष्याशीं दुष्टपणा करणें हें फार नीचपणाचें काम आहे. बायकांचे नवरे प्रारब्धानें मरतात. त्यांस दुसरा करण्यास मना करतां. आणि हा धर्म आहे, असें समजतां! हा धर्म कशाचा बरें? धर्मशास्त्र हा केवळ कायदा आहे. व्यवहारीक गोष्टीकरितां त्यांतील एका वाक्यास हरताळ लावली म्हणून काय झालें! आणि लोक तरी आतां कोठें धर्मशास्त्राप्रमाणें चालतात? कितीएक चालत नाहींत. अधर्म करतात, असें तुमच्या डोळ्यांपुढें असून तुम्ही आपल्या बहिणींचीं व पोरींचीं बुध्या घरें बुडवितां. हें तुम्हांस कसें बरें वाटतें? नाहीं. तुमच्या पोरांची दया तुम्हांस येत नाहीं. तुम्ही आपल्या पोटांत दगड कसे घालतां? याजकरितां माझें ऐका आणि स्त्रियांस पुरुषासारखे अधिकार आहेत असें ठरवा. आणि हा धर्म चालू करा. स्त्रियांनीं विद्या करावी, जाणतेपणीं पुरुषाचें व स्त्रीचें लग्न व्हावें हें चांगलें; व जिचा नवरा मरेल तिणें खुशी असल्यास दुसरा नवरा करावा. म्हणजे तुम्ही फार सुखी व्हाल. लग्न लौकर करून पोरांचें आयुष्य सोंपवितां व प्रजा निर्बळ व भिकारी करितां. आणि विधवांस दुःख देऊन हाल करितां. याचीं पारणीं कोठें फेडाल? आतां पुरें करा. आजपर्यंत विधवा जाळिल्या तितक्या पुरे करा. तुम्ही म्हणाल कीं, इंग्रज लोकांनीं जशी सती बंद केली, तसेंच हेंही करावें. परंतु विधवांचीं लग्नें करावयास इंग्रज इकडे आले नाहींत. तुमची तुम्हांस खबर नाहीं. मग त्यांस कशास असावी? ते दुरचे लोक. तुम्ही मेलेत तर त्यांस सुतक येणार नाहीं, हें ध्यानांत धरा.

लो० हि०



ता. १२ ऑगस्ट १८४१

पत्र नंबर ७१

भटांच्या विद्येचा निरुपयोग

पूर्वीं एका पत्रांत सांप्रतकाळचे ब्राम्हणांचे स्थितीविषयीं लिहिलें होतें. त्याचा जबाब पुण्यांतील ज्ञानप्रकाश पत्रांत नंबर २२ यांत एका यथार्थवादीनें दिला आहे. त्यांत त्याणें आमचे ६ निश्चय कबूल केले आहेत. एक, ब्राम्हण अज्ञान; दुसरा, अर्थ समजल्यावाचून ते जप वगैरे करितात, हें ठीक नाहीं; तिसरें, देवाविषयीं त्यांस कांहीं कळत नाहीं; चौथें, मनुष्यांनीं कसें वागावें हें समजत नाहीं; पांचवें, हल्लींचे ब्राम्हण हे कनिष्ठ जातीपेक्षां चांगले नाहींत. व ६ वें. ते गर्विष्ठ फार. ग्र साहा निश्चयांचें त्याणें

उत्तर दिलें आहे. परंतु त्याचे उत्तरांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. याणें केवळ भटासारखें लिहिलें आहे. शेवटीं आपणच म्हणतो कीं, हल्लींचा मूर्खपणा ब्राम्हण सोडतील तर बरें होईल? अस्तु. याचा भाव पहिले उत्तरांत असा आहे कीं, मला सर्व ब्राम्हणांची हकीकत कशी समजली? याचें प्रतिउत्तर असें आहे कीं, सर्व ब्राम्हणांची हकिकत समजावयास काय अवघड आहे? ब्राम्हण अज्ञानी किती आहेत याचें वर्णन मीं किती करावें? भटांत व अतिशूद्रांत मला इतकेंच अंतर दिसतें कीं, एक बोलता राघू व एक न बोलता राघू; परंतु ज्ञान एकच. ब्राम्हण वेद वगैरे पाठ म्हणतात. परंतु अर्थज्ञतेविषयीं उभयतांची योग्यता समान आहे. अतिशुद्र गरीब, ते आपला लहानपणा जाणतात. परंतु भट मूर्ख असून ज्ञानी समजतात. व गर्व करितात हा एक त्यांमध्यें दुर्गुण अधिक आहे, हें ज्यांचे मनास ठसावयास हवें असेल त्याणें वेदाच्या शाळेकडे पाहावें. तेथें मुलें शिकतात काय? व देवाविषयीं व आपले धर्माविषयीं विचार करितात; किंवा फक्त राघूसारखे पाठ करीत बसतात? व भटांनीं लोकांस किती वेडें लाविलीं आहेत, व किती गैरसमजुती पाडल्या आहेत, त्याचा अंत नाहीं. ब्राम्हण भोजनादीक हा धर्म समजतात; परंतु निरुद्योगी माणूस भीक मागावयाचा व्यापार करतात. आणि भिक्षेचा उपयोग कांहीं करीत नाहींत. विद्या वाढवीत नाहींत; अर्थैकरून अंतःकरण पवित्र करीत नाहींत; जिव्हेचा उपयोग मनास एकीकडे ठेवून करतात. त्यांस धर्म केला असतां पुण्य कशाचें आहे? जसें पात्रावर मिठापासून भातापर्यंत वाढलेलें असतें त्याचप्रमाणें मनुष्यास मनापासून इंद्रियापर्यंत ईश्वरानें वाढून दिलें आहे. त्यांत मन हें उत्तम भाताप्रमाणें, त्याचा धिःकार करून लवणच जे भक्षितात त्यांस किती मूर्ख म्हणावें? व देशाचे हिताचे विचारांत ब्राम्हण आजपर्यंत कधींतरी पडले आहेत काय? पडावयाचें त्यांस सामर्थ्य तरी आहे? व योग्यता आहे? जर या देशांत पार्लिमेंट झालें, आणि त्यांत सर्व जातीचे लोक पाठविले तर त्यांमध्यें माहारापेक्षां भट अधिक शाहाणपणानें आपले देशाचे हिताविषयीं बोलतील काय? व कोणत्याही गांवांत पाहा कीं, गांवचा कुळकरणी, ज़ोशी हे ब्राम्हण असतात. याजमुळें त्यांजवर कपटाच्या व खोटे कागद-पत्रांच्या वगैरे फिर्यादी होतात व वास्तविकच हे लोक रयतेस बुडवितात. व साक्षीही खरी देत नाहींत. याजमुळें ब्राम्हण कुळकरणी यांस शिक्षा होऊन ते तुरुंगांत बहुत पडतात. व गांवचे माहाराची साक्ष खरी समजतात व ते आडाणी असून गांवची चाकरीही नीट करितात. कुळकरण्यापेक्षां गांवकऱ्यास कमी ठकवितात; व दगाबाजीही कमी करतात. व हक्काची चाकरी करून हालाल खातात. तसें कुळकरणी करीत नाहींत. याजवरून ब्राम्हणाची योग्यता, समजुती. मोठे शहरांत पहाल तर तुम्हांस असें वाटेल कीं, इतके भट येथें आहेत यांस खावयास मिळतें. त्याबद्दल हे कोणती चाकरी करितात? असें जर मनांत आणलें तर तुम्ही काय म्हणाल? मला एक मनुष्य दाखवा कीं भटांनीं शाळा घालून कोणी लोक तयार केले, किंवा कोणास विद्वान केलें, किंवा ग्रंथ

केले, किंवा ज्ञान सांगितलें, किंवा लोक सुधारले, किंवा मजुरी केली; असें कांहींतरी मला या भटांचे व भिक्षुकांचे खाण्याचे मोबदला त्यांचा उपयोग दाखवा ! चांभाराचा उपयोग मी तुम्हांस सांगतों व दरएक मनुष्याचे पायांत जोडे दाखवितों. तुम्ही आम्हांस भटांची निशाणी दाखवा. बाजीरावाकडून भटांनीं व शास्त्री यांणीं भलभलतेंच सांगून अनुचित कर्में करविलीं व मुलखास लुटून आपण केशरीभात जेवले. राजास नीती कांहींच सांगितली नाहीं. फक्त ब्राम्हणभोजनें घाल म्हणून सांगितलें आणि कलियुगचा कर्ण म्हणून त्याचें वर्णन केलें आणि बिघडऊन राज्याचा व त्याच्या कुळाचा सत्यानास केला. याचें कारण हे भटच आहेत. असे जे हे ब्राम्हण लोक यांचें शाहाणपणाचें प्रतिपादन यथार्थवादी करितो. त्याणें कांहींतरीं नांवासारखी करणी करावी. त्याचे बोलण्यांत जर कांहीं वास्तविक भाग असला तर मी कबूल करीन. माझे द्वेषी कोणी आहेत असे नाहीं. परंतु मी ज्याचें अज्ञान त्यास कळविण्याकरितां झटत आहें, परंतु तें ग्रहण करण्यास ब्राम्हणास इतकें अवघड पडलें आहे कीं, त्यांस बोध न होतां निंदा वाटते. भट व शास्त्री हे अमूक कामास लावावयाचे उपयोगी आहेत हें कोणीतरी सांगावें. यांस मरणाचे समईं बोलावले तर ईश्वराविषयीं कांहीं न सांगतां द्रव्यहरण करतील व ते असें म्हणतील कीं, कांहीं पैसा असला तर सर्व प्रायश्चित्त करा. आणि आमचे हातावर उदक सोडून आम्हांस द्या, म्हणजे तुम्ही देवाजवळ जाल. अशी पैसा काढावयाची तजवीज सांगतील. श्रीमंताचे घरीं भट गेला तर हें सर्व सांगेल आणि गरिबाचे घरीं गेला तर त्याजवळ पैसा नाहीं असें पाहून त्याचे मनांत येईल कीं, हा भिकारी यास मोक्षास नेण्यास पैशाशिवाय मी काय सांगूं ? पैसा असता तर मग कांहींतरी सांगितलें असतें. पैशाशिवाय ईश्वरप्राप्ती होत नाहीं. जे द्रव्यवान् तेच धर्म करून देवाजवळ जातात. हें मत ब्राम्हण लोकांमध्यें चालू आहे. त्याप्रमाणें भट गरिबाजवळ मुळींच जाणार नाहीं. श्रीमंताजवळ पैसा काढावयाकरितां जमतात. अशी या भटांची वर्तणूक आहे. भट एखाद्याचे घरीं त्याचा नातलग असला म्हणजे यजमानाचे मनांत त्यास कांहींतरीं पोंचवावें असें असतें. मग भट सांगूं लागतो कीं, चार महिने नित्य दान करावें. रोज देवापुढें पैसा ठेवावा. नैवेद्यास रोज साकर असली पाहिजे. असें सांगून तें सर्व आपण घेतो. याप्रमाणें यजमानापासून शेंपन्नास रुपये मिळऊन निर्वाह करितो. बरें यांत कांहीं उपयोग किंवा धर्म झाला काय ? प्रत्येक ग्रहस्थाचे घरीं भट म्हटला म्हणजे बहुधा बायकोचा भाऊ असतो. याप्रमाणें नातीं असतात. मग बायकोही आपले भावास पैसा पोंचविण्याकरितां नवऱ्यास सांगते कीं, पुढें चातुर्मास आला आहे. दर व्यतिपातास गोप्रदानाबद्दल दोन रुपये देत जा. मग ते आपले भावास देवविते. याप्रमाणें कितीएक लोक ठकले जातात. मग हा व्यय कांहीं चांगला झाला कीं काय ? याप्रमाणें माझें उत्तर पहिल्या कलमाचें आहे. आतां दुसरे कलमाचा जबाब लिहिला आहे त्याचें उत्तर. परमेश्वराचें स्मरण करितात असें यथार्थहितवादी म्हणतो; परंतु कोणता

ब्राम्हण देवाचें स्मरण करितो. जर कोणी मरण पावत असला किंवा श्राध्ध होत असलें तर ब्राम्हणाचें स्मरण करण्याची रीती अशी आहे कीं, वेदाचे दोन चार वर्ग मोठ्यानें म्हणतात. परंतु मरत असतो त्यास किंवा जो म्हणतो त्यास त्यांतील अर्थ कांहीं समजत नाहीं. ईश्वराचें स्मरण करण्यांत कांहींतरी ईश्वराचा विचार झाला पाहिजे. जे २४ पाठ गीतेचे किंवा विष्णुसहस्रनामाचे ३०० पाठ करितात किंवा कोटि लिंगें सकाळपासून सारा दिवस करितात, त्यांजकडून वास्तविक कांहीं भजन झालें कीं काय ? व त्यांस ईश्वराजवळ गती मिळेल कीं काय ? व त्यांस आपण लहान, मनुष्याची शक्ती लहान, असें वाटेल कीं काय ? आपण पापें बहुत करितों हें आठवून ईश्वराची दया व क्षमा त्यांस मागतां आली कीं काय ? जे नित्य पाठ करितात आणि अर्थ समजत नाहींत ते ईश्वराविषयीं काय समजले व त्यांचें अंतःकरण व मन शुध्ध कसें झालें ? कपाळाशीं भट कटकट करितो, तेणेंकरून त्यांचें अंतःकरण बरें झालें काय ? व जे अर्थ समजत नाहींत, ते परमेश्वराचे वचनावर भरंवसा ठेऊन कसे चालतील ? जर मुनसफास कानडी गोष्ट येत आहे तर त्याजपुढें मराठी कायदा ठेविला आणि त्याजवर जुलूम करून त्याजकडून पाठ करविला आणि त्यास कांहीं अर्थ त्यांतील समजला नाहीं, तर तो मुनसफ त्या कायद्याप्रमाणें फैसल्ले करील काय ? असे हे जप करणारे भट वगैरे लोक ईश्वरास आपले बडबडीनें प्रसन्न करतील काय ? निंदा खरी असेल तर तो बोध म्हणावा. निंदा म्हणूं नये हें यथार्थहितवादीचें मनांत कां येत नाहीं ?

लो० हि०

ता २६ ऑगस्ट १८४१

पत्र नंबर ७२

ब्राम्हणांचें ईश्वरी ज्ञान

मागील पत्रांतील अवशेष मजकूर राहिला आहे, तो संक्षेपेंकरून लिहितों. ब्राम्हणांस ईश्वराविषयीं बहुत कळतें, असें यथार्थवादी म्हणतो. त्याचें उत्तर असें आहे कीं, अमुक बरें आणि अमुक वाईट हें प्रथम ब्राम्हणांस कळत नाहीं. लक्ष ब्राम्हणांची सभा असली व त्यांस एक प्रश्न केला तर उत्तर देतां येणार नाहीं. फार कशास, कोणासही इतकाच प्रश्न करावा कीं, जर कांदा खाल्ला तर नीतीस वाईट आहे काय ? त्याचें उत्तर ब्राम्हण काय करतील तें पाहा ! ईश्वराविषयीं ब्राम्हणांचें एक मत नाहीं. कोणी तीन ईश्वर म्हणतात, कोणी बहुत ईश्वर म्हणतात, कोणी वेदास ईश्वर म्हणतात, कोणी २४

पदार्थांस ईश्वर म्हणतात, पुराणें तर सर्वांस ईश्वर म्हणतात. व व्याकरणी अक्षरास ईश्वर म्हणतात; याप्रमाणें अनेक भेद आहेत. ब्राम्हणांस ईश्वराविषयीं खरें ज्ञान जर असतें तर जीं हल्लीं त्यांमधें वेडें आहेत, तीं नसतीं. कोणी म्हणतात, द्यावें तसें घ्यावें; कितीएक म्हणतात कीं, कष्टीं फळ आणि तपीं राज्य, म्हणजे तप केल्याविना ईश्वर फळ देत नाहीं. कोणी म्हणतात कीं, ईश्वरानें देखील कृष्ण-अवतारीं लबाड्या वगैरे केल्या. अशीं उदाहरणें दाखवितात. कितीएक गोष्टी मी ब्राम्हणांचे तोंडून ऐकिल्या आहेत. व त्या अगदीं वास्तविक विचारेंकरून ईश्वराचे जे गुण दिसतात, त्यांस विरुध्ध आहेत. कितीएक म्हणतात कीं, ब्राम्हणांचे मुखीं पडलें म्हणजे देवाचे मुखीं पडलें. कितीएक म्हणतात, "ते मंत्रा ब्राह्मणाः सर्वे" तस्मात् "ब्राह्मणो मम दैवतं". कितीएक म्हणतात कीं, ईश्वराचें भजन ब्राम्हणाचें भजन केल्यापोटीं आहे. कितीएक ईश्वराची सेवा म्हणजे उपास वगैरे ब्राम्हणांकडून करवितात. कितीएक म्हणतात कीं, ज्याच्या पुण्याचा प्रताप आहे, त्याजपुढें देवाचा उपाय नाहीं. कोणी म्हणतात कीं, जग हाच ईश्वर आहे; दुसरे म्हणतात कीं, आपला जीव हाच ईश्वर आहे. तिसरे म्हणतात कीं, विष्णु ईश्वर आहे. चौथे म्हणतात, विष्णूस आयुष्य आहे. व शिव ईश्वर आहे. आणखी म्हणतात कीं, संन्यास घेतल्यावांचून ईश्वर मुक्ती देत नाहीं, इत्यादि ईश्वराविषयीं वाद आहेत. याजवरून ब्राम्हणांस किती कळतें हें उघड दिसतें. भट तर अगदींच मूर्ख, परंतु शास्त्री, पंडीत, पुराणीक, नीती, ज्ञान व धर्म जाणत नाहींत. मोठें नीतीविरुध्ध कर्म असलें तरी तें क्षुल्लक मानितात. आणि मोठें वाईट कर्म आहे तें चांगलें म्हणतात. त्यांत कांहीं पाप नाहीं, असें मानितात. पांचवे प्रश्नाचें उत्तर देण्याची जरूर नाहीं. कारण यथार्थवादीच्यानें उत्तर देववलें नाहीं. केवळ कांहीं ल्याहावें म्हणून लिहिलें आहे. साहावें, कितीएक ब्राम्हण अतिशय गर्विष्ठ आहेत. मला खचीत दिसतें कीं, इतर लोक सुधारतील आणि ब्राम्हण-लोक मागें राहातील; कारण त्यांस उपदेश ठीक वाटत नाहीं. सर्वांस तुच्छ मानून ब्राम्हण आपणास सर्वांहून श्रेष्ठ असे समजतात. जरी त्यांजमध्यें कांहीं श्रेष्ठत्व नसलें तरी श्रेष्ठत्व भोगावें असें वाटतें. पैसा प्राप्त झाला म्हणजे बाजीरावानें गंगाधरशास्त्री याजला मारलें, त्याचा दोष मानणार नाहींत. ब्राम्हण म्हणतात कीं, द्रव्य खर्च केल्यास सर्व दोष दूर करून देऊं. याजमुळें ब्राम्हणासारिखे नीच लोक कोणीच नाहींत. ते सर्व गुन्हेगारांस द्रव्यानें पावन करितात. प्रायश्चित्त भाडेकऱ्याप्रमाणें होतें. असे जर दोष जातील तर मग ईश्वराचा न्याय कोठें राहिला? परंतु साधारण ब्राम्हण ईश्वराचा न्याय जाणत नाहींत. व दुष्ट कर्माची भीती त्यास वाटत नाहीं. ते म्हणतात कीं, काय चिंता? कामदारानें पैसा खाल्ला तरी तो ब्राम्हणाच्या घरीं पडला, असें म्हणून लुटतात. आणि त्यांचीं कर्में पाहिलीं तर अन्नछत्रें घालतात. परंतु तेथें एकटे ब्राम्हणास मात्र सोय असते. दुसरा कोणी येऊं देत नाहींत. इतका पक्षपात करितात. तात्पर्य ब्राम्हणलोक हल्लीं दुसरा कांहीं व्यापार करीत नाहींत. तरीच अज्ञानी लोकांस लुटून आपला निर्वाह करितात. तेली असला

म्हणजे त्यास सांगतात तूं आपल्या घाण्याची पूजा केलीस म्हणजे तेल फार निघेल. असें म्हणून याजपासून ४ रुपये काढतात. कुंभारास म्हणतात, आंव्याची पूजा करावी म्हणजे विटा चांगल्या निघतात. आणि शेतकरी कुणब्यास म्हणतात कीं, तुझ्या दाण्याची रास करून तिची पूजा करावी. म्हणजे तुला बरकत येईल. याप्रमाणें लूट आणि कपट करितात. वास्तवीक पाहिलें तर कुळंबी, माळी वगैरे आडाणी व नीच जातीचे लोकांस खरा धर्म व खरी नीती सांगावी आणि ढोंग व अज्ञान काढून टाकावें. परंतु ते बळेंच त्यांस अज्ञानांत ठेवतात. आपला चरितार्थ नीट चालावा, व लोकांनीं आळशास खावयास द्यावें, इतकाच त्यांचा हेतु आहे. ब्राम्हणांचा पक्ष घेतला, परंतु त्या पक्षास बळ नाहीं. कर्नाट-कांतील स्वामी व आचार्य हे दिवसास लूट करितात व लोकांस ठकवितात. मुद्रा देत जातात. आणि अज्ञानी लोक त्यांस मान्य करतात आणि आचार्यांचें व स्वामीचें ज्ञान पाहिलें तर मुद्रेनें मोक्षास नेणार व पैशानें स्वर्ग दाखविणार, हीं त्यांचीं मतें किती खोटीं आहेत हें सहज समजतें.

लो० हि०

ता० २ री माहे सप्टेंबर १८४१

पत्र नंबर ७३

धर्म व व्यवहारसंबंधीं खोट्या समजुती

सांप्रत हिंदु लोकांमध्यें ज्या वेड्या समजुती आहेत त्यांचें मूळ बहुतकरून हेंच आहे कीं, पुराणें वगैरे जे ग्रंथ आहेत त्यांत जें लिहिलें आहे, त्याचा अर्थ यथास्थित व वास्तविक रीतीनें कोणी समजत नाहींत व कवीचा भाव जाणत नाहींत. अर्थाचा अनर्थ करितात. यांचीं उदाहरणें—लंका सोन्याची म्हणून वर्णन केलें आहे. परंतु त्याचा अर्थ इतकाच कीं, तेथील लोक द्रव्यवान होते. केवळ तेथील भूमी व घरेंदारें सोन्याचीं होतीं, हा अर्थ नव्हे. परंतु लोक अज्ञानी असल्यामुळें सोन्याचीच लंका होती, असें समजतात. व त्यास सहायभूत आलीकडील कांहीं किरकोळ कवी जे झाले त्यांणींही खरा अर्थ काढा-वयाचा सोडून ते लोकांचे मतांचें पोषण करीत गेले. त्याजमुळें अडाणी लोकांच्या समजुती दृढ झाल्या. अमृतराव, मोरोपंत हेही आपले कवितेमध्यें लंका सोन्याची होती, असें वर्णन करितात. त्यापेक्षां हेंच खरें असें लोक म्हणतात. कोठें पुराणांत असें लिहिलें आहे कीं, कलियुगांत भूमी मृत्तिकारूप आहे, तशी पूर्वी नव्हती. मागें कृतयुगीं सुवर्णाची भूमी व त्रेतायुगीं रुप्याची भूमी, द्वापारांत ताम्रभूमी होती; परंतु याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा

कीं, त्या त्या काळीं कवीच्या मतें लोक त्या मानानें सुखी व धनवान होते. केवळ सोन्याचीच भूमी होती, असें नव्हे. सारासार विचार पाहावा तो पाहात नाहींत आणि पुराणीकही वेड लावण्याजोगे अर्थ करून सांगतात, त्याजमुळें खरेखुरेच लोक वेडे झाले आहेत. शास्त्रांत पाहिलें तर ठीक आहे व त्याचे हेतू व त्या वेळची व्यवस्था व काळ पाहून निर्णय केला पाहिजे. तेव्हां ब्राम्हण हे रानांत राहात होते. त्या समईं त्यांस जोडे द्यावे, असें लिहिलें आहे तें ठीक आहे. कारण कीं, सर्व कामें सोडून विद्या करण्याकरितां रानांत जे जाऊन बसतात त्यांचें चालविणें अवश्य आहे. आणि असे ब्राम्हण होते त्या काळीं इच्छाभोजन, गृहदान, वर्षभर दाणापाणी व अर्घ्यपादप्रक्षालन हें सर्व ठीक होतें. कारण कीं, ब्राम्हणांमध्यें कोणास अन्न मिळत नव्हतें. तेव्हां शहरचे व्यापारी उद्‌मी व राज्यकर्ते यांणीं जर त्यांस न द्यावें तर त्यांचें कसें चालेल ? परंतु ते ब्राम्हण कसे होतें कीं, व्यासासारिखे ज्यांणीं अठरा अठरा पुराणें लिहिलीं. केवढा त्यांचा उद्योग म्हणावा. कितीएक ग्रंथ केले. वेदाचा शोध लाऊन ते एकत्र जमविले! शाळा घातल्या! व ज्ञानवृध्धी केली ! असो, ती ज्ञानवृध्धी बरी कीं वाईट, परंतु त्याकाळीं बरी होती. कारण त्याकाळीं लोक अगदीं मूर्ख होते. म्हणून नाना प्रकारचे धर्म कोणीकडून ब्राम्हणांचें चालावें आणि विद्यावृध्धी सदोदित व्हावी ही तजवीज त्यांणीं केली, परंतु जेव्हां ब्राम्हणांस समजले कीं, आम्हांस द्यावें. हा धर्म सर्व लोकांस कळला. आणि त्याचा हेतू सर्व लोक विसरले हें पाहून ते रानांतून उठोन गांवांत आले. व पोथ्या बांधून ठेऊं लागले. व वेदपाठ करूं लागले. अर्थ टाकला व पशूसारखे झाले. परंतु आतां लोकांनीं पाहावें कीं, अशा ब्राम्हणलोकांस पैसा देण्यास योग्य नाहीं. हे आळसाचे सागर व अज्ञानाचे रक्षक झाले. कारण अज्ञान टाकून त्यांचा परिणाम नाहीं. जर अज्ञान मोडावें तर त्यांचा पैका बुडतो. व ते उपाशी मरतात. व त्यास सरकारची उपजीविका कांहीं नाहीं. याजमुळें त्यांस हें मूर्खपण रक्षण करणें जरूर झालें. परंतु लोकांचे डोळे उघडून वास्तविक दान कोणतें तें समजतील, तेव्हां भटांचा थोरपणा सहज मोडेल. परंतु बहुत लोक अद्यापि भटांचे नादीं लागले आहेत. व पाठ म्हणण्याकडे द्रव्य जातें तें व्यर्थ जातें. त्याचा उपयोग होत नाहीं. याकरितां विचार करून पाहावा. व शास्त्रांत जरी कांहीं कर्म लिहिलें असलें, तरी त्याचा हेतू व शास्त्र करणाराचा मानस जाणावा. म्हणजे ठीक होतें. केवळ शब्द घेऊं नये. म्हणजे उघड सर्व दिसूं लागेल, व लोक ताळ्यावर येतील. कोणती मूर्खपणाची गोष्ट असो; परंतु त्यांत दोन पैसे जर भटास मिळण्याचे असतील, तर त्यास अनकूळ होण्यास भट आळस करीत नाहींत. व ग्रहस्थ बोलूनचालून मूर्ख म्हणवितात. वास्तविकच आहे कीं, त्यांस कांहीं समजत नाहीं. व वाचतांदेखील येत नाहीं. मग विचार करावयाचें दूरच आहे. याजकरितां भट हे अगदीं नाहींसे झाले पाहिजेत. व ग्रहस्थांनीं व इतर जातीचे लोकांनीं भटांचा नाद सोडून द्यावा. परंतु त्यांस ज्ञान आल्याखेरीज हें होणार नाहीं. त्यास कांहीं काळ पाहिजे. मोठी अविचारी म्हटली म्हणजे सांप्रत

भटमंडळी आहे. त्यांस कांहींजरी ठाऊक नसलें, तरी ते होय म्हणतात, व इंग्रज लोकांचें राज्य लंकेंत आहे, असें म्हटलें तर खोटें म्हणतात. व पुराणांतील उदाहरणें दाखवून समाधान करितात. आपला गर्व सोडीत नाहींत. आपल्यास पूर्वीच्या विश्वामित्र-जमदग्नीच्या तुळणा देतात. याजमुळें अनाडी लोक फारच भितात. व भटांचा आशिर्वाद हें मोठें उत्तम नाणें समजतात. व त्यास मोल देऊन तें खरेदी करतात. जर कोणी मेला तर जसे गयावळ यांणीं "सरकभयो" म्हटल्याखेरीज मुक्ती होत नाहीं अशी समजूत आहे, तद्वत भटांचेंही माहात्म आहे. भट जेवल्याखेरीज कोणतीही गोष्ट पुरती होत नाहीं. जन्म, मरण, लग्न इत्यादि सर्वांस भट पाहिजेत. व ते नसतील तर अडाणी म्हणतात कीं, अमका मेला पण भटांच्या तोंडांत घास पडला नाहीं. असें समजून प्रयत्न करून खर्च करितात. म्हणून हीं मोठालीं श्राध्धें व गयावर्जनें होतात. परंतु लोकांस असें वाटत नाहीं कीं, जो मेला त्याणें जें कर्म बरेंवाईट केलें असेल, त्याप्रमाणें त्यास ईश्वर फळ देईल. मग त्यास गयेचें महात्म काय? गयेस मोक्ष होतो, तर तेथें गेल्यानें तरी सुटका नाहीं. तेथील गयावळ यांणीं मोक्षाची परवानगी दिली पाहिजे. आणि मनुष्यास तें खरेंच वाटतें. म्हणून गयावळाचा संतोष करावयाकरितां हजारों रुपये देतात व तेही लुटून घेण्यास कमी करीत नाहींत. परंतु कोणी असें समजत नाहीं कीं, एक माणसाचे म्हटल्यानें दुसरे माणसास मुक्ती कशी होईल? व हे कोण? यांची आमची गती एक! मग यांचे तोंडचें म्हटल्यानें काय होतें! परंतु हा सर्व मूर्खपणा आहे. भटांनीं सर्वांस मोह घातला आहे. व अज्ञानपाशानें बांधलें आहे. ते ज्ञान आल्यावांचून सुटणार नाहींत.

लो० हि०

ता. १ माहे सप्टेंबर १८४१

पत्र नंबर ७४

देवळें व नेमधर्म

हिंदुलोकांमध्यें द्रव्याची व्यवस्था चांगली होत नाहीं. लोक मूर्ख आहेत. याजमुळें कितीएकप्रकारें ते खर्च करतात. त्यांत कांहीं फायदा होत नाहीं. द्रव्य व्यापारांत असावें, किंवा धर्माकडे तरी लागावें. या लोकांस द्रव्याचा व्यय करतां येत नाहीं. लक्षावधी रुपये खर्च करून देवळें बांधितात आणि त्यांत मोठें धर्मकृत्य केलें, असें समजतात; परंतु बहुधा हें धर्मकृत्य केलें असें होत नाहीं. आज पुण्यांत शेंकडों देवळें, व हजारो

मारुतीच्या जन्माचे दिवशीं कोणतेही रस्त्यास मारुतीचा उत्सव नाहीं असें बहुधा होत नाहीं. व कितीएक देवळें पडून गेलीं आहेत. कित्येक अनावस्थेंत आहेत, कितीएक देवळें कसब्याणीकडे भाड्यानें आहेत. व कित्येक देवळांचा दुर्लौकिक होऊन वाईट नांवें पडलीं आहेत. भांग्या मारुती, खुन्या मुरलीधर, छिनाल बालाजी, मोदीचा गणपती इत्यादि नांवें पडलीं आहेत. येणेंकरून असें समजतें कीं हिंदुलोकांत देवांची, देवळांची मर्यादा नाहीं. बरें, इतकीं देवळें असतां आणखी देवळें बांधावयाची काय गरज? परंतु मूढ लोक अद्यापि आणखी आणखी बांधितात. कोणी आपल्या घरीं बांधितो व कोणी वेगळी जागा घेऊन बांधितो आणि म्हणतो कीं, हें मोठें धर्मकृत्य आहे. पुण्यांत आणखीं देवळें बांधणारासारखे आणखी कोणी या जगांत मूर्ख दिसत नाहींत. लाखो रुपये जे अशा मूर्खपणानें खर्च करितात ते अगदीं ज्ञानशून्य व अविचारी म्हणावे. परंतु या लोकांचा वेडेपणा घालविण्याचा प्रयत्न भट व शास्त्री आणि पंडीत करीत नाहींत. ते उलटें असें करणारांस सांगतात कीं, अमके पुराणांत असें लिहिलें आहे कीं, देऊळ बांधल्याखेरीज जन्माचें सार्थक होत नाहीं. व मागें अहिल्याबाईनें नर्मदातिरीं अडीचशें देवळें रांगेनें बांधलीं. केवढी ती बाई धन्य होय, असें सांगून त्या मूर्खास फारच चढी देतात. ज्यांचें कर्म लोकांचा मूर्खपणा दूर करावयाचें तेच त्यास वृध्धीकर्ते होतात. याचें कारण असें आहे कीं, ब्राम्हण लोकांची उपजीविका या कामावर आहे. म्हणून ते असा मूर्खपणा वाढऊन दोन पैसे आपल्यास मिळावे असा बेत अल्पमती करितात. त्यांस केवळ नफ्याची बुध्धी आहे म्हणून ते या अज्ञानाचे सांप्रत पोसिंदे आहेत. आणि ते प्रयत्नपूर्वक अज्ञान वाढवितात. व संपूर्ण देशांतील लोक विचारहीन आहेत, याजकरितां त्यांस कळत नाहीं. हें जें सांगतात, त्यांजवर भरंवसा ठेवितात. आणि अडाणी जातीचे लोक वगैरे यांस ब्राम्हण व भट फार फशिवतात. वास्तविक धर्म त्यांस कळत नाहीं. वास्तविक धर्मांत कांहींतरी दया आणि शांती या गुणांचें निदर्शन झालें पाहिजे व ती दयाही भलभलत्यावर उपयोगी नाहीं. जे सुशील, उपयोगी व लोकांची सेवा करतात, त्यांजवरच असावी. याखेरीज व्यय करणें मूर्खपणा आहे. अहिल्याबाईनें धर्म केला, तो पैसा यथाव्यय उत्तम प्रकारें झाला असता, तर फायदा होता; परंतु तिचा धर्म असा होता कीं, काशीहून पाणी आणून दक्षिणेंत स्नान नित्य करावें. एक ब्राम्हणाकडून नित्य काशीस जातों असें म्हणवावें, आणि दुसऱ्याकरवीं जाऊं नये असें म्हणवावें व त्यांत महान् पुण्य मानून पैका द्यावा. आतां असा धर्म जेथें होतो तेथें लोक किती आळशी होतील व किती मूर्ख असतील? मेहेनती कुळंबी वगैरे लोकांपासून त्यांचें शरीर पिळून द्रव्य घेऊन तें आपले आळशी भटांस दिलें, म्हणजे केवढा राज्यांत जुल्म होईल. परंतु असें झालें आहे; आणि कोट्यावधी रुपये याप्रमाणें खर्च झाले आहेत. हेंच सांप्रतच्या मूर्खपणाचें कारण होय. निकामी भटांस पोषणार्थ पैका देतात आणि त्यांत लोकांस पुण्य वाटतें. याजमुळें ब्राम्हण भ्रष्ट होतात. दुसरें कांहीं करीत

नाहींत. पण ज्या गृहस्थाचे घरीं भट असतो त्याचा प्रयत्न एवढाच असतो कीं, भटांस पैका द्यावयाच्या वाटा नाना प्रकारानें यजमानास सुचवाव्या. संक्रांत आली म्हणजे त्यास सांगावें कीं, तिळपात्रें द्यावीं, म्हणजे पुढें फार फाळ आहे. दशाहार आला म्हणजे वायनें देववावीं. आणि त्यांत पाहिलें, एकही पदार्थ उपयोगाचा नसतो. वीतभर सूप, बोटांत जावयाच्या नाहींत, अशा दोन बांगड्या, कोणत्याही कामाच्या उपयोगी पडावयाचा नाहीं, असा एक करंडा आणि चार पैसे त्या मूर्ख गृहस्थास नाना प्रकारें गोष्टी त्याकडून सांगून देववितात; आणि चार पैसे मिळाले एवढाच लाभ मानून इतर जिनसा टाकून देतात. याप्रमाणें वर्षांत किती वेळ करतात, याचा ठिकाण नाहीं. व ब्राम्हणांस पुण्यकाळ किंवा व्रताचा दिवस सांपडणार नाहीं, असा कोणताही दिवस वर्षांत नाहीं. त्याविषयीं पुराणांत तयारी आहेच. असा व्यर्थ खर्च गृहस्थाकडून करवितात आणि मग त्यास जी जी प्राप्ती होते जंवर हा खर्च व त्याचा जरूरीचा खर्च जातो. मग चांगले कामास खर्च करावयास त्यांस सामर्थ्य कोठून राहाणार? भट सर्व गिळून जातो. आणि मूर्ख यजमान असला म्हणजे भटाचें व त्याचें फारच जमतें. यजमान वारंवार भटास पुसतो, "हें कर्म चांगलें सांग झालें ना?" भट म्हणतो, "सांग सामर्थ्याप्रमाणें झालें. परंतु आणखी चार आणे जास्ती खर्च करितां तर बरें होतें. उदकुंभावर दक्षणा फारच थोडी पडली." मग भोळसर यजमान असला म्हणजे त्याजला तेंच खरें वाटतें. आणि भटाचे सांगितल्याप्रमाणें चालतो. मुख्यत्वेंकरून बायका फारच मूर्ख व अज्ञान असतात. याजमुळें या देशांतील स्त्रियांस भट फार फसवितात. काय काय चमत्कार आहेत ते लिहितांना पुरणार नाहींत. एकादी विधवा स्त्री झाली म्हणजे तिच्याजवळ दोन पैसे असले तर ते हरण करण्यास भट कारण होतात. तिला सांगतात कीं बाई, तुमचा नवरा मेला. आतां मुलें कोणाचीं आणि बाळें कोणाचीं? तुम्ही आपलें जन्माचें सार्थक करून घ्या. या जन्मीं वैधव्य प्राप्त झालें, असें पुढें तरी होऊं नये म्हणून कांहीं यत्न करा. पवित्र वैशाख आहे. किंवा कार्तिक आहे अगर चातुर्मास्य आहे. पुष्कळ नेमधर्म आणि देवब्राम्हण यांजकडे व्यय करीत जा; म्हणजे ईश्वर संतुष्ट होईल. देवाचें तोंड ब्राम्हण आहेत. त्यांस मिळालें म्हणजे देवास पोंचलें. आणि पाहा, देवळांत इतके लोक पैसा देतात, परंतु देव घेत नाहीं. ब्राम्हण घेतात, कां कीं देवांचें तोंड ब्राम्हणच. अशा गोष्टी सांगून त्यांकडून दोन पैसे असतील ते बाहेर काढवितात. व यांस मूर्खपणामुळें कित्येक गोष्टी ज्या उपहासास कारण त्या खऱ्या वाटतात. मग बाई नेम धरत्ये कीं, रोज नित्यदान किंवा नित्य गोप्रदान करावयाचें आणि भटजीबावास द्यावयाचें. असे भटजीबावा स्वस्थ बसून कांहीं उद्योग न करितां खातात. याप्रमाणें धर्माची व्यवस्था होती. याजमुळें कितीएक हजार गरीब लोक उपाशीं मरतात. पण त्यांची दया कोणास येत नाहीं. आणि हे निरुद्योगी भट आळस व अज्ञान यांचे चौकीदार! सर्व धन खातात. याप्रमाणें देऊळ बांधण्याचा मूर्खपणा आहे. याजकरितां हल्लीं

जे ग्रहस्थ असें म्हणतात कीं, घरीं भट नित्य पंक्तीस असल्याखेरीज अन्न घेऊं नये. त्यांणीं विचार करावा आणि भटासारखें पशु होऊं नये.

लो० हि०

ता० १६ वी, सप्टेंबर १८४१

पत्र नंबर ७५

ब्राम्हणांचा लोभ

विनंती विशेष. ब्राम्हण लोक यांची आलीकडची बुद्धी कशी आहे याचे उदाहरणार्थ मी तुम्हांस एक प्रमाण लिहून कळवितों. पूर्वी होळकरांनीं व बाजीरावाचे बंधू अमृतराव यांनीं पुणें शहर लुटून लोकांस मारिलें व पीडिलें. त्यांत कितीएक मुलें व बायादेखील ठार मेल्या. व कितीएक बायांनीं जीव दिले. याप्रमाणें द्रव्यहरण केलें. लोकांस राखेचे तोबरे दिले व कानांत आणि बेंबींत बंदुकीची दारू घालून उडविली. धुऱ्या दिल्या, तत्तयांत माणसें पिळलीं, तवे तापवून त्यांजवर उभीं केलीं. व तेल कढवून पोरांच्यादेखील आंगावर शिंपलें. इतकें करण्याचा हेतू कीं, लोकांनीं लौकर पैसा द्यावा. तेव्हां कितीएक निर्धन होते त्यांस असें केल्यानें ते मरण पावले. असे नाना तऱ्हेचे अन्याय व निर्दयपणाची व्यवस्था जो राजा म्हणवीत होता, त्यानेंच केली. आणि असें अन्यायाचें द्रव्य चार कोटि रुपये घेऊन अमृतराव काशीस पळून गेले. तेव्हां तेथील ब्राम्हणांनीं हा पुष्कळ द्रव्य घेऊन आला आहे त्याचें हरण कसें होईल, याविषयीं तजवीज योजिली. आणि त्यास जातींत न घेण्याचा मनोरथ दर्शविला. आणि त्यास कळविलें कीं, तुम्हीं अन्यायानें द्रव्य आणिलें आहे. याजकरितां तुमचे पंक्तीस भोजन कोणी करणार नाहीं. तेव्हां अमृतराव हा मूर्खांचा शिरोमणी होता. त्यानें त्यांचें भय मानिलें. मग ब्राम्हणांनीं सांगितलें कीं, हें तुम्हीं जें द्रव्य आणिलें आहे, त्यापैकीं निमें ब्राम्हणद्वारा धर्मादाय करावें. म्हणजे तुम्ही जातींत याल. तेव्हां त्यांचें बोलणें कबूल करून त्यानें मोठा धर्मादाय, ब्राम्हणभोजनें, अन्नछत्रें, यज्ञ व नानाप्रकारचीं दानें काशीस केलीं. मग ब्राम्हणांनीं त्यास जातींत घेतलें. व त्याची स्तुती करूं लागले. आणि तो दुष्ट अमृतराव सर्व प्रकारानें शुद्ध केला. आतां याविषयीं विचार केला तर ब्राम्हण हे किती नीच व दुष्टांचा प्रतिपाळ करणारे आहेत हें सहज लक्षांत येतें. कारण कीं, ज्या दुष्टानें द्रव्य अन्यायानें मिळविलें तो ब्राम्हणांस द्रव्य दिल्यानें शुद्ध झाला कसा ? जर त्या ब्राम्हणांनीं असें सांगितलें असतें कीं, हें द्रव्य ज्यांचे ज्यांचे आणलें आहे त्यांस व्याजसुद्धां परत

पाठवावें आणि आम्हांस यांतील कांहींएक नको, तर कांहीं प्रायश्चित्त मात्र होतें; परंतु हे लोभिष्ट ब्राम्हण यांस न्याय व दया नाहीं. आणि धर्म नाहीं. केवळ आपल्या नफ्यावर दृष्टी देऊन कितीही अन्यायानें कोणी द्रव्य मिळविलें असलें तरी त्याची स्तुति करतात. आणि जर कोणी न्यायानें द्रव्य मिळवून त्यांस दिलें नाहीं तर त्याची खचित निंदा करण्यास चुकत नाहींत. म्हणतात कीं, अहो, या गृहस्थाकडे केवढा रोजगार? या कामावर दुसरा होता तो केवढा खर्च करीत होता, धर्म किती? ब्राम्हणांचा सन्मान किती? किती वेळ इच्छाभोजनें? किती दक्षणा देत असे? तो पुरुष दैवशाली होता. त्याचे हातून ब्राम्हणांस पोंचलें. परंतु हा हल्लीं जो मनुष्य आहे, यास कांहीं द्रव्य मिळवितां येत नाहीं. हा केवळ हाडकपाळी आहे. लग्न केलें, मुंज केली, परंतु कधीं सभा किंवा दोन हजार ब्राम्हण घरीं जेवले, असें झालें नाहीं. व्यर्थ याचा जन्म आहे. मोठा अधार्मिक! असा त्याचा डांगोरा पिटीत फिरतात. याजमुळें सांप्रतचे गृहस्थ व कामदार यांस त्यांनीं भ्रमांत घातलें आहे. कामदारांस असें होतें कीं, तो अन्यायानें द्रव्य मिळवीन, परंतु यांचीं तोंडें बंद करीन तर बरें. नाहीं तर मी चौघांत चांगला दिसणार नाहीं. इतके दिवस दक्षिणेंत इंग्रजांचें राज्य आहे. त्यापैकीं जे कामदार झाले, त्यांत बाबा भिडा ठाण्याचा प्रिनसिपल सदर अमीन हा लांच खात नसे. ही गोष्ट प्रसिद्ध आहे. परंतु सर्व ब्राह्मण त्याची निंदा करतात. त्याचे गूण पहात नाहींत. आणि तो जेवावयास घालीत नव्हता, हा द्वेष करून त्याविषयीं वाईट बोलतात. तस्मात भट लोक जे आहेत हे केवळ भाडेकरी; परंतु मजूरदारासारखे नव्हत. मजूरदार मजूरी करून उगेंच राहातात. परंतु हे मजूरी करण्यांत लोकांच्या नीती बिघड[वि]तात. आणि त्यांमध्यें अज्ञान वाढवून दुर्गुणवृद्धी मनापासून करितात. त्यांतील मुख्य समजुती अशा आहेत कीं, सर्व दानधर्म ब्राम्हणद्वारा. ब्राम्हणाखेरीज पैसा दिला तर तो धर्म नव्हे. आणि भटांच्या युक्ती तरी किती आहेत? त्या अशा कीं पिंपळाचा पार बांधावा अशी आज्ञा शास्त्रांत आहे; परंतु पार कोणी बांधला तर ब्राम्हणांकडून मुंज्य करवावी लागते. म्हणजे पाराइतकें द्रव्य त्यांस मिळतें. याप्रमाणें सर्व ठिकाणीं ब्राम्हण द्रव्यहरण करण्यांत हुशार. घर बांधिलें तर ब्राम्हण पाहिजे. मंडप घातला तरीदेखील तो पाहिजे. लिहावयास आरंभ केला तर भट पाहिजे. सर्व प्रकरणांत लहानथोरास भटाशिवाय होत नाहीं, अशी समजूत लोकांची पाडून त्यांस असे दृढ केले आहेत कीं, जर इतर जातीचा मनुष्य मरत असला तर कोणा गृहस्थास दया येत नाहीं. पण भटांचीं सहस्रभोजनें करतात. कारण त्या गृहस्थास असें वाटतें कीं, यांत लोकांस व इतर कामास भटांखेरीज जो पैसा जाईल तो व्यर्थ. त्याचें फळ ईश्वर देणार नाहीं. याजकरितां सांप्रतचे गृहस्थांची व्यवस्था अशी आहे कीं, ते पाहिजेत तशीं कर्में करून द्रव्य मिळवितात. त्याचे बहुधा दोन हिसे करतात. एक घरांत राहातो व दुसरा भटांकडे जातो. याजमुळें आळस फार वाढला आहे आणि उपयोगीं कामें व व्यापार सर्व बंद झाला. गृहस्थ पन्नास हजार रुपये

मरतेवेळेस किंवा लग्नांत खर्च करील. परंतु एक पैसाही ज्ञानवृद्धीस, व्यापारास किंवा लोकसुखाकडेस उपयोग व्हावा म्हणून खर्चणार नाहीं. तेव्हां अशी ज्या ठिकाणीं व्यवस्था आहे, तेथें लोक कसे सुधारतील ? ब्राम्हणांचा दुसरा एक चमत्कार आहे तो असा कीं, उपास, पूजा, सर्व धर्मकृत्यें मजूरीनें ते करतात. व पुण्य विकत देतात. हा एक मोठा विलक्षण चमत्कार आहे. दुसऱ्याबद्दल उपास करावा आणि त्यास पुण्य विकावें, याचा अर्थ काय ? जर कोणास ताप येत असला तर तो भटास उपास करावयास सांगतो. आणि भटापासून पुण्य विकत घेतो. म्हणजे आठ चार आणे भट घेऊन यजमानास सांगतो कीं, तुमचें व्रत मोडलें नाहीं. तुम्ही उपास केल्याप्रमाणेंच फळ आहे. अशी युक्ती करतात. याशिवाय हजारो तऱ्हेनें लोकांपासून पैसा काढतात. हिंदु लोकांची सुधारणा होण्यापूर्वी भटांनीं विद्या जरूर शिकली पाहिजे. उद्योग केला पाहिजे. किंवा इतर लोकांनीं भट हे वेवकुब आहेत असें समजून त्यांचा कुजलेले फळासारखा त्याग करावा आणि आपल्यास दान करणें तर चांगलें रीतीनें विद्यावृद्धीकडे करीत जावें. असें केल्यानंतर भट अर्थातच मोडतील. आणि वास्तविक विद्वान पुढें सरतील. आजच्याकाळीं लोकांपाशीं भटांमुळें पैसा उरत नाहीं. याजमुळें ते बहुधा विद्यावृद्धीस प्रतिकूळ आहेत. सांप्रत दोन्ही पक्ष भट व गृहस्थ व इतर जातीचे लोक हे सारखे मूर्ख आहेत. यांपैकीं कोणी तरी शहाणा पाहिजे. व कोणास तरी दुसऱ्याशीं कसें वागावें हें समजलें पाहिजे. सांप्रत भट व इतर लोक अज्ञानांधःकारानें भ्रमिष्ट होऊन चालले आहेत. यास्तव लोकांनीं विचार करावा आणि याचा उपाय योजावा. भट विद्वान होतील आणि पाठ करणें सोडतील तर चांगलें होईल. हे विनंती.

लो० हि०

ता. २३ वी सप्टेंबर १८४९

पत्र नंबर ७६

मद्यपान

विनंती विशेष. आलीकडे इंग्रजी राज्य झाल्यापासून लोकांस सद्गुण लागावयाचे तें एकीकडे राहून महान भयंकर व त्वरित वृद्धी पावणारा असा एक दुर्गुण लोकांमध्यें प्रघट झाला आहे. तो कोणता म्हणाल तर दारू पिणें. पहा कीं, पूर्वीचे राज्यांत दारू कोणी पीत नवते. व उत्पन्नही करीत नव्हते. ब्राम्हण व मराठे राज्य करणारे तेव्हां ते दारू उत्पन्न करणारास नीच मानीत. आणि कोणी आपलीं झाडें त्यांजला


दारू करण्यास दिलीं, तर त्यांस बहिष्कृत करीत. आणि कोंकणांत अशी चाल होती कीं, दारू काढणारा हातांत दारू घेऊन जर आंगावरून गेला तर दर्शनदोषास्तव स्नान करीत. आणि प्यालेला ब्राम्हण कधीं आढळत नव्हता. जर कदाचित कधीं कोणी पाहिला तर त्यास सर्व लोक निंद्य मानून कधींही जातींत घेत नवते. ज्या गांवांत तो राहात असे तेथें त्याचे हाल फार होत असत. त्याचें लग्नकार्य व्हावयाचें नाहीं व कोणी त्याजकडे जेवावयास जात नव्हते. असा त्याचा धिःकार करीत असत. व जर कोणी अतिशूद्रादिकांकरितां दुकान घातलें तर एकीकडे छपवून, चोरून घाली. परंतु तेथें कोणी बहुतकरून जात नव्हता व भाविक लोक त्या रस्त्यानें जात येत नव्हते. व सरका[र अ]शा व्यापाऱ्यांपासून उत्पन्नाची आशा कधीं करीत नव्हतें. म्हणून लोकांस मना करतां येत होतें. परंतु हल्लींचे सरकारची फार विपरीत वर्तणूक आहे. सप्टेंबरचे १० वे तारखेचे पुण्याचे ज्ञानप्रकाशांत सरकाराविषयीं एक कलम लिहिलें आहे, व त्यास दृष्टांत तेल्याचा दिला आहे तो खरा दिसतो. पहा कीं, सरकार लोकांचे स्थितीकडे किमपी पहात नाहींत. द्रव्याची आशा धरून दुर्गुणांवर उत्पन्न करतात. आणि प्रसिद्धपणें दुर्गूण वाढूं देतात. जर त्यांनीं उत्पन्न सोडलें तर त्यांस मनाई करण्यास तोंड होईल. व जर उत्पन्न करतील तर त्यांस दुर्गूण बंद करण्यास तोंड नाहीं. कारण कीं, एका हातानें दारूची विक्री–चिठी देतील, आणि दुसरे हातानें लोकांस पिऊं देऊं नका म्हणून सांगतील, हें नांदणार नाहीं. यास्तव त्यांनीं उत्पन्न सोडून दिलें पाहिजे. म्हणजे त्यांचा दाब बसेल. आणि मनाईकरितां कायदे करतां येतील. याप्रमाणें विलायतेंतही कायदे झाले आहेत. मग या देशांत सरकारानें असें करण्याचा हेतू कोणता ? अद्याप हा दुर्गूण लोकांमध्यें विस्तीर्ण व दृढ झाला नाहीं, तोंपर्येत सहज मोडतां येईल. नाहीं तर जर सरकारानें अशीच वर्तणूक आणखी कित्येक वर्षेंपर्यंत चालविली तर अवघड पडेल; यास्तव हें त्वरित झालें पाहिजे. मद्यपान करणें हें फार वाईट कर्म आहे. येणेंकरून द्रव्य, शक्ती, बुद्धी, हीं नाशाप्रत पावतात. ज्या गांवीं दारूचीं दुकानें आहेत, तेथील लोक किती खराब झाले असतात व विलायतेंतही असेंच आहे. ज्या ठिकाणीं दारूचीं दुकानें आहेत, त्याचे शेजारीं राहाणारे लोकांस दुर्गूण लागून ते सर्वस्व घालवून बसतात. आणि भिकारपण येतें. त्यांचीं पोरेंबाळें उपाशीं मरतात. व जें मेहनत करून मिळवितात तें पुरेनासें होतें. कारण या दुर्गुणास व्यर्थ पैसा बहुत बहुत खर्च करावा लागतो. यास्तव सर्व पैसा इकडे जातो. आणि कर्मत नाहींसें होतें. अखेरीस दारू पिणाराची बुद्धी मंद होती, आळस वाढतो, काम होत नाहीं, आणि सर्व प्रकारें त्याची हानी होते. याप्रमाणें कितिएक लोक हल्लीं होत चालले आहेत. सामान्यतः लक्षांत आणा कीं, इंग्रज लोक उद्योगी मोठे आहेत. परंतु त्यांची बुद्धी हिंदू लोकांइतकी नाहीं. त्यांस बारीक गोष्टी व अवघड गोष्टी यांची समजूत होत नाहीं. हें जे इकडे इंग्रज लोक कामावर येतात, त्यांचे वर्तणुकीवरून समजतें. आणि हिंदू लोक ब्राम्हण वगैरे यांची बुद्धी बहुत जलद

व समज चांगला, परंतु आळसानें व्यर्थ गेला. व सुशिक्षा नाहीं. येणेंकरून चांगली बुद्धी वाईट कामाकडे लावतात. परंतु तसे इंग्रज लोक नाहींत. त्यांस लहानपणापासून शिक्षा चांगली असते. याजकरितां ते विद्येमध्यें निपुण असतात; व उद्योगानें परिपूर्ण असतात. तत्रापि ही गोष्ट खचीत आहे कीं, इंग्रज लोकांचे बुद्धीस मंदपणा असतो, याचें कारण दुसरें कांहीं नाहीं. दारू वगैरे मादक पदार्थ भक्षण करतात, येणेंकरून त्यांचे बुद्धीस जरा येते, आणि जेव्हां येखादा मुकद्दमा सोपा असतो व त्यांत कांहीं तक्रार नाहीं असते, तेव्हां तो त्यांस समजतो. परंतु जो मुकद्दमा तक्रारीचा असतो व ज्यांत बहुत घोटाळा असतो, तो किती जरी समजाविला तरी समजत नाहींत. मग न समजतांच हुकूम देतात, हें आम्ही नित्य पहातों. व असेंच सर्व ठिकाणीं आहे. इंग्रज लोक बारीक कज्जे व तक्रारी सर्व बरोबर समजणारे क्वचित आहेत. आणि असले तरी त्यांस बुद्धी नीट ठेवावी लागते. फार श्रम होत नाहींत. दरम्यान हवा बदलून आराम विश्रांती घेतात. तेव्हां पुनः बुद्धी ताळ्यावर येते आणि त्यांस कामकाज़ सुचतें. परंतु हें आमचे लोकांस नको. हे पन्नास वर्षें सारखें काम करीत असले, तरी त्यांस बुद्धी ताळ्यावर आणावी लागत नाहीं. व नाना फडणीस वगैरे मेहनती लोक होते ते एक दिवसही कामाखेरीज बसले नाहींत. याचें कारण हेंच कीं, आमचें अन्न निर्मळ आणि इंग्रज लोकांचे अन्न बुद्धी मंद करणारें जड आहे. परंतु त्यांचे देशची हवा शितळ आहे. याजमुळें ते उद्योगी असतात. आमचे देशांत हवा उष्ण येणेकरून लोक आळशी आहेत. ते जर मद्यमांस खाऊं लागले तर फारच आळशी होतील. दारूसारखा दुष्ट पदार्थ दुसरा नाहीं. व या पदार्थांचें व्यसन मोटें बलाढ्य आहे. एकदां लागलें तर सुटत नाहीं व सर्वस्वीं (स्व) गेलें आणि सर्वांचा नाश झाला तरी कांहीं सुचत नाहीं. हें व्यसन मोठें घातकी आहे. यास्तव शासन नेमून याजपासून लोक परावृत्त केले पाहिजेत. परंतु हें दारू पिणारांचेंच राज्यांत होईल काय ? अस्तु. व्हावें हें चांगलें. ते आपण स्वतां दारू पितात. परंतु टाकतील तर त्यांसही चांगलें आहे. आमचे लोकांस हें व्यसन न लागावें इतकें तरी त्यांनीं केलें पाहिजे. जरी आज ते उत्पन्नावर व लोभावर दृष्टी देत असतील, तरी हें करणें सरकारास योग्य नाहीं. कारण आज थोडें उत्पन्न होईल. परंतु लोक जर भिकारी झाले आणि दरिद्री होऊन कांहीं उपयोगी नाहींत असे झाले, तर मग सरकार त्यांजपासून काय घेईल ? सरकारची मातोश्री लोक आहेत. त्यास त्याजला रोगी, आळशी, अशक्त करून मग त्यांचे पोरांचें पोषण कसें होईल ? याजकरितां या बाबतचें उत्पन्न सरकारानें अगदीं सोडून मनाई करावी. म्हणजे लोक जगतील. नाहींतर या सरकाराखालीं जी रयत आहे तीस हें व्यसन कधीं सुटावयाचें नाहीं व इंग्रज लोक या देशांतून गेले तरी इकडे या लोकांत हें व्यसन राहून त्यांचे पाय इकडे लागले होते हें स्मरण इतिहासांतच राहील, असें नाहीं. परंतु प्रत्यक्ष लोकांचे स्थितींत राहील. याजकरितां हा बदलौकिक करणारे उत्पन्नाची बाब सोडून देतील तर चांगलें होईल. ही गोष्ट आमचे मूर्ख लोक आहेत, त्यास टाऊक

नाहीं. व त्यांनीं दारू पिण्यापासून अनर्थ काय आहेत हें पाहिलें नाहीं. परंतु हें जर कांहीं दिवस चाललें तर लवकरच पहातील. सांप्रत लोक हौसेनें दारू पितात व तिचे गुण वर्णितात; ते असे कीं, ही बळ आणणारी आहे. कोणी म्हणतात कीं, ही रोगनाशक आहे. कोणी म्हणतात कीं, यज्ञांतदेखील सुरापान आहे. कोणी म्हणतात, तंत्रशास्त्राप्रमाणें ही शुद्ध आहे. याप्रमाणें म्हणून हल्लींचे पंडीत, शास्त्री व गृहस्थ पुण्यांत व इतर ठिकाणीं निर्लज्जपणानें दारू पितात. शूद्रादिक पितात हें सोडून द्या, परंतु प्रत्यक्ष ब्राम्हण व शास्त्रीदेखील शाक्त होऊन कुकर्म करतात. दारू, मांस खावयास मिळावें म्हणून शाक्त होतात. आणि पूजेचें निमित्य करून मनास वाटेल तितकी दारू पितात. ब्राम्हण लोकांचें मुख्य शहर पुणें आहे. तेथें आम्हांस पक्केपणीं समजलें आहे कीं, शास्त्री, पंडित व ग्रहस्थ मिळून पांचशें असामी दारू पिणारे आहेत. त्यांतील कितीएक मस्त होऊन रस्त्यांवर पडतात. कितीएक चोरून आपले घरीं यंत्रें ठेवून दारू काढतात. व गूळ किंवा तांदूळ कुजवून भट्ट्या घरीं लावतात. आणि लाल तांबडे डोळे करून कपाळीं तांबडा शेंदूर किंवा कुंकवाचे टिपके लावून प्रसिद्धपणानें फिरतात. व तोंडास घाण येतच असते. तसेंच तोंड धरून लोकांत येतात; परंतु कोणी त्यांस बहिष्कृत करीत नाहींत. याजवरून ब्राम्हण लोक अतिशूद्राचे योग्यतेबरोबर आले आहेत किंवा नाहींत तें पाहावें. जे ब्राम्हण अशीं कर्में करतात, ते ब्राम्हण म्हणावें कीं काय? ब्राम्हण लोकांची नीती बुडाली. व त्यांस चांगलें कोणतें, वाईट कोणतें हें कळत नाहीं व चांगल्याचा प्रयत्न करून त्याची स्थापना करावयाची हें त्यांस ज्ञान नाहीं. यास उदाहरण. बाजीराव राज्यावर होता तेव्हां जे त्याचे अंकित होते त्यांच्या स्त्रिया त्यानें भ्रष्ट करून नाना प्रकारची कुनीती केली. परंतु त्यास प्रतिकार कोणाच्यानें करवला नाहीं. पुण्यांत शास्त्री व पंडीत त्या वेळेस बहुत होते. परंतु साखरभात खाऊन वाहावा म्हणत गेले. याप्रमाणें त्या मूर्ख, चांडाळ, दुष्ट आणि अतिशूद्राहूनही नीच प्रभूस राज्यावर भटांनीं व गृहस्थांनीं रक्षण केला. त्याचे परिणाम आज सर्वांस त्यांतून बहुधा ब्राम्हणांस प्राप्त झाले आहेत. त्या वेळेस तो अधिकारी होता. म्हणून कोणाचा उपाय चालला नाहीं, असें जर म्हणतील तर हल्लीं जे शाक्त पुण्यांत आहेत हे कांहीं अधिकारी नाहींत. कोणी द्रव्यवान आहेत खरें, परंतु त्यांचें पारिपत्य बाकीचे सर्व ब्राम्हण मिळून कां करीत नाहींत? हा माझा प्रश्न सर्वांस आहे. जे दारू पीत नाहींत, त्यांनीं हा विचार करावा. दारू पिणारे प्रसिद्ध आहेत व सर्वांस ठाऊक आहेत. व पिणारे आहेत त्यांचे तोंडच साक्ष देईल. ते फार नाहींत. त्यांचे पंक्तीस जेवणें, त्यांचे घरीं जाणें, सोयरगत करणें हें कां चालूं देतात? एकदम त्यांस बहिष्कार घालीत नाहींत. परंतु हतवीर्य हे ब्राम्हण; यांस ज्ञान नाहीं, शक्ती नाहीं, नीती कोणती, अनीती कोणती हें जाणत नाहींत. आणि निर्लज्जपणानें दारू पिणारांचा सहवास करतात. कोणी भिक्षुक म्हणून करतात, कोणी चाकर म्हणून, कोणी स्नेही म्हणून, कोणी मित्र म्हणून, कोणी मूर्ख म्हणून करतात.

जर त्यांस जातीचें भय किंवा बहुत लोक नीतीमान आहेत, त्यांजपासून भय प्राप्त होईल तर या सर्वांमध्यें आम्ही निंद्य आहों, असें वाटेल. स्वस्थपणानें दारू पिऊन त्यांचे तोंडाची घाण सर्व लोक घेत फिरतात, हें धर्मशास्त्रास केवढें विपरीत आहे ? तंत्रशास्त्र व शाक्तमत हें नर्कांचें द्वार आहे. व या मताचे लोक नर्कांत जातील, यांत संशय नाहीं. व या मताच्या पोथ्या कोणी केल्या असतील त्या असोत; परंतु ते उत्तम पुरुष नव्हते. व त्या सर्व पोथ्या उकिरड्यावर टाकण्याच्या लायक आहेत; यास्तव येविषयीं लोकांनीं सावध व्हावें, ही विनंती.

लो० हि०



ता० ३० वी, सप्टेंबर १८४९

पत्र नंबर ७७

पाठ करण्याची चाल

विनंती विशेष. श्रीमंत आणि विद्वान या दोन लोकांच्या हातून लोकांचे व देशाचे सुधारणेकरितां प्रयत्न व्हावयाचे. या दोघांशिवाय कोणी करणार नाहीं. एक श्रीकडून बळवान आणि दुसरे ज्ञानेंकरून बळवान. परंतु आमचे देशांत या दोघांची अवस्था पाहून मला फार शोक होतो. पूर्वींचे श्रीमंत आणि विद्वान असे नव्हते, असें मागील पुस्तकीं पाहातां समजतें. त्याकाळीं त्यांनीं चांगलीं व उत्तम प्रकारचीं पुस्तकें लिहिलीं असें नाहीं. परंतु त्या लोकांचा जिकडे बुद्धी-प्रवाह होता तिकडे त्यांनीं लिहिण्यास कमी केलें नाहीं. पूर्वी ग्रंथ मोठाले झाले आहेत. याजवरून विद्येस उत्तेजन आणि बक्षिशी मोठी मिळत असेलसें ठरत आहे. संस्कृतांत ग्रंथ बहुत आहेत. पहा कीं, एकट्या व्यास कवीनें अठरा पुराणें व अठरा उपपुराणें, शिवाय सूत्रें लिहिलीं. तेव्हां हजारों व लक्षावधी श्लोकांचें एक पुराण अशीं कितीएक लिहिलीं. तेव्हां एवढें काव्य करण्यास त्यानें केवढी मेहनत केली असेल ? आणि कितीएक वर्षें घालविलीं असतील ? तसेंच आलीकडे व्याकरणावर व धर्मशास्त्रावर निर्णयसिंधु, मनोरमा, कौमुदी इत्यादिक मोठाले ग्रंथ ज्या पंडितांनीं लिहिले ते पंडित आतांच्यासारखे असते तर न लिहिते, हें उघड आहे. व आतां विद्येची माती होत आहे, हेंच अनुमान खरें कीं प्राचीन राजे हे विद्वानांस मोठा आश्रय देत होते म्हणून ते आपला जन्म त्यांत घालवून योग्यता मिळविण्याकरितां श्रम करीत होते. अस्तु. तो काळ आज पाहिजे होता व इंग्रज लोकांची विद्या तशांत यावयाची होती. म्हणजे फारच चमत्कार होऊन त्या विद्येची कदर सर्व लोकांनीं केली असती.

परंतु जें गेलें तें येत नाहीं. यास्तव सांप्रत आहे. त्याजविषयींच आपण नजर पुरवावी हें बरें. हल्लीं श्रीमंत लोक व विद्वान लोक विद्येचे शत्रू झाले आहेत. व विद्येशीं अपरिचित होऊन भलत्याच कर्मास विद्या म्हणतात, आणि वेद पाठ करणारे मूर्ख भट यांस विद्वान असें समजतात. इतका आंधार या देशांत झाला आहे. सांप्रतकाळीं फक्त वेद पाठ करतात. आणि तो उलटासुलटा म्हणतात. क्रमपाठी तीन तीन वेळ तींच अक्षरें म्हणतात. परंतु या कर्मास विद्या कोण म्हणेल? यापेक्षां रस्त्यावर मजुरी करतात ते लोक बरे. पण भट फार अमंगळ व अनर्थास विद्या म्हणतात. अहो, विद्या या शब्दाचा अर्थ तरी काय होतो तो पाहा! पाठ म्हणणें ही विद्या केली कोणी? यांत फळ काय? हा मूर्खपणा उत्पन्न कसा झाला असेल, तो असो, परंतु एवढा मूर्खपणा कधीं कोणत्याही देशांत झाला नसेल. लोक असे समजतात कीं, श्राध्ध, पक्ष, हव्य, कव्य, श्रावणी, लग्न, मुंज, संस्कार इत्यादि कर्मांत भट पाहिजेत; परंतु भट जर विद्वान होतील, आणि हें पाठ म्हणणें सोडून देतील तर त्यांच्यानें श्राध्धें होणार नाहींत काय? पाठ म्हणणारे मूर्ख यांस धर्मादाव करावा. ते वेद म्हणतात, आणि जाग्रणें करतात. परंतु जसे गुजराथी लोकांत मजूरदारी करवून शोक करवितात, तद्वत हे भट मजूरदार अक्षरें मात्र म्हणतात. यांचे अंतःकर्णास कांहीं भेद होत नाहीं. परकीं ढोंग करून रडतात तें रडणें कोणी मायेचें म्हणेल काय? तद्वत पाठ म्हणतात. यांस कोणी देवाची स्तुती करतात असें म्हणावें कीं काय? परंतु कितीएक लोक मूर्ख असे आहेत कीं, फक्त वेदपाठास पैसा देतात. व म्हणणारास आणि ऐकणारास कांहीं समजलें नाहीं, तरी धन्य मानून धर्म झाला असें समजतात. असो. याप्रमाणें भट आहेत. आणि शास्त्री पंडीत पाहिले तर हे भटांपेक्षां मूर्ख व गर्विष्ठ असतात. परंतु यांस कांहीं समजतें खरें; समजत नाहीं असें नाहीं. तथापि यांच्या वांकड्या समजुती व अज्ञान जें प्राचीन काळचे संस्कृत ग्रंथांत भरलें आहे तें त्यांचे मनांत येऊन त्यांचा दृढ निश्चय असा झाला असतो कीं, या पलीकडे विद्या नाहीं. सर्व जातीचे लोक ब्राम्हणांहून कमी व त्यांच्या भुगोलाविषयीं अनर्थकारक समजुती असतात. व त्यांचा इतका दृढ निश्चय असतो कीं, ते बरी गोष्ट ऐकतदेखील नाहींत व त्यांस आणखी विद्या पुष्कळ आहे. म्हटलें तर खोटें वाटतें. मागील सर्व ग्रंथकर्ते देव होते. म्हणून आतां ग्रंथ करणें प्रशस्त नाहीं, असें त्यांस वाटतें. नवीन रीती व नवीन विद्या पढणें यांचे ते शत्रू असतात. पाहा कीं, पांच हजार वर्षां पाठीमागें जी रीती, आणि जे ग्रंथ संस्कृत पढावयाचे असतील, तेच आतां आहेत. त्यांची सुधारणा त्यांजला नको. व अक्कल, तर्क आणि शाहाणपण हीं त्यांस कमी असतात. व प्राकृत भाषा त्यांस तुच्छ वाटून प्राकृतांत हे कांहीं कधीं लेखणी उचलीत नाहींत. पोथ्यांचीं वेष्टणें प्राचीन काळाप्रमाणेंच आहेत तीं आवडतात. प्राकृत भाषा सर्व लोकांची आहे. याजकरितां प्राकृत ग्रंथ असल्याखेरीज उपयोग नाहीं. हें मनांत आणीत नाहींत. व शूद्र व इंग्रज वाचतील हें त्यांस भय असतें. व्याकरण हें कोणीं वाचूं नये, वेद कोणी नीच जातीनें वाचूं नयेत;

असें वचन आहे, त्यांजवर सर्व आणतात. भारतही वाचूं नये, म्हणतात. कारण कीं, "भारतं पंचमो वेदः" अशी नानाप्रकारचीं कुश्चित वाक्यें बोलून विद्येची दुर्दशा करितात. आणखी एक शास्त्रीलोकांस सांगा कीं, कैकाडी वगैरे नीच जातीचे लोक आहेत त्यांस चांगले लोक करण्याकरितां अमूक एक तजवीज चालवावी म्हणजे त्यांचा प्राण जाईल. आणि ते म्हणतील कीं, जें तुम्हांस द्यावयाचें असेल तें ब्राम्हणांस द्या, यांत मोक्ष आहे. नीचास धर्म करणें अशास्त्र आहे. त्यास ईश्वरानें नीच जातींत जन्म दिला. त्यांनीं त्यांतच राहावें, असें सांगून कधीं चांगले कामास मदत करावयाचे नाहींत. व ब्राम्हणांचा मान वाढवितील. इंग्रजी राज्य झालें हें एक ब्राम्हणाचें महत्त्व नाहींसें होण्यास मूळ झालें आहे, यांत संशय नाहीं. ब्राम्हणांनीं बहुत वर्षेंपर्यंत थोरपणा व अधिकार भोगिला. ब्राम्हणांच्या मंत्रानें मुक्ती व वचनानें शुद्धी होत होती. तेंच लोक खरे मानीत होते; परंतु तो काळ आतां गेला. बरें झालें कीं, आतां लोक पाहूं लागले. ब्राम्हण व आपण कोण, यांत अंतर काय? ब्राम्हणांस वीस हात आहेत कीं काय? किंवा आपल्यास कांहीं कमी आहेत काय? अशासमयीं ब्राम्हणांनीं आपल्या मूर्खपणाच्या समजुती सोडून द्याव्या आणि सर्व लोकांस सारखे मानून विद्या शिकण्याचा सर्वांचा हक्क आहे, हें कबूल करावें. उगेंच भांडूं नये. अस्तु. याप्रमाणें विद्वानांची अवस्था झाली. दुसरे श्रीमंत जर पाहिले तर शुद्ध पशूप्रमाणें आहेत. पहा मोठमोठाले लोक किती मूर्ख आहेत व त्यांस द्रव्य मिळालें म्हणजे असा अभिमान होतो कीं, मी आपले बापाचें श्राध्ध मोठें करीन, हजारों रुपये उडवीन व मुलाचें लग्न मोठें करीन. याप्रमाणें पैसा श्रीमंत लोक उधळतात. मग त्यांचें पाऊल कसें पुढें पडेल? वर्षश्राद्धास लाखों रुपये खर्च केलेले लोक आहेत. तशींच कार्येंही करतात. व अहिल्याबाईनें १६ कोट रुपये धर्मादाव केला तो कोठें आहे? तो जर इतका पैसा शहाणपणानें साथकीं लावला असता तर लोक किती शहाणे झाले असते, व किती आबादानी झाली असती? या धर्मकृत्यानें मूर्खपणा वृद्धिंगत झाला, आळस वाढला. मृत्यू चार दिवसांनीं यावयाचा असतो, परंतु कुपथ्य केलें तर दुसरेच दिवशीं येतो. तस्मात या धर्मकृत्यानें सर्वांस वेड लावून मूर्ख केलें. व श्रीमंत दीनवाणी होऊन रोगी व अविद्वान झाले. आणि उद्यां बुडाले असते ते आजच बुडून गेले. अद्यापी लोकांस काय तजवीज करावी, हें समजत नाहीं. पहिल्याच मार्गानें ते चालत आहेत. ईश्वर जरी प्रतिकूल झाला तरी अजून हट्ट करतात. परंतु ईश्वरेच्छा प्रमाण. हे विनंती.

लो० हि०

ता० १४ ऑक्टोबर १८४१

पत्र नंबर ७८

राज्याविषयीं विचार

सांप्रतकाळीं हिंदु लोक मूर्ख. त्यांस राज्यकारभार करतां येत नाहीं व आपलें राज्य सांभाळण्याची ताकद नाहीं. यांजकरितां पाहा, त्यांस किती संकटें प्राप्त झालीं आहेत कीं, गवरनरापासून असिस्टंट कलेक्टरपर्यंत व कमांडरचीफपासून एनसाईन व सोजीरपर्यंत दुसरे देशाचे लोक भाड्यानें आणले आहेत. ते कसे म्हणाल तर त्यांणीं लाखो रुपये पगार आम्हांपासून घ्यावा आणि स्वदेशास जावें. त्यांचीं घरेंदारें इकडेस कांहीं नाहींत. त्यांचे हातीं पैसा गेला तो इकडे अगदीं यावयाचा नाहीं. अशा प्रकारचे लोक आम्हांस भाडेकरी आणून राज्यकारभार करावा लागतो. हेच भाडेकरी जर इकडे राहातील, आणि आम्हां लोकांमध्यें घरेंदारें बांधतील, तर एवढें दरिद्राचें कारण राहाणार नाहीं. पूर्वीं मुसलमानांचें राज्य होतें, तरी मुसलमान जे आले ते इकडे राहिले. याजमुळें ते आमचेच देशचे झाले. आणि जसे स्वदेशांत सर्व श्रीमंत नसतात, परंतु कांहीं लोक श्रीमंत असतात, तसे मुसलमान श्रीमंत लोक होऊन त्यांचा परकी भाव गेला तद्वत इंग्रज लोक इकडे राहातील तर ते आमचे देशचे होऊन त्यांस व आम्हांस कांहीं विशेष अंतर राहाणार नाहीं; परंतु सांप्रतकालीं फारच विपरीत झालें आहे. आतां या देशचे लोक इंग्रजांइतके काबील होऊन त्यांजबरोबर शाहाणपणास येण्यास युगें पाहिजेत. परंतु त्यांस एक युक्ती आहे कीं, जर विलायत सरकाराशीं व कंपनी सरकाराशीं फूट झाली, किंवा कांहीं तंटा झाला, आणि इकडील गवरनर जनरल वगैरे येथील सर्व राज्य बळकाऊन राहिले व पुन्हां परत जाण्याचा इरादा ठेविला नाहीं तर एकदम आमचे लोक शाहाणे होतील. आणि राज्याचे अधिकारांत इंग्रजाचे समागमें शिरतील. व इंग्रजही आतां जसे त्यांस दूर मानतात तसे मानणार नाहींत. एक, दोन, तीन पिढ्या इंग्रजांच्या इकडे झाल्या म्हणजे ते आमच्यांतील होतील, किंवा फराशीस वगैरे दुसरे राज्यांतील लोक यांणीं हिंदुस्थानच्या व विलायतच्या दरम्यान समुद्राची वाट बंद केली तर इकडचे इंग्रज इकडेच राहातील. व मग त्यांस इकडची काळजी लागेल. सांप्रत त्यांस इकडची काळजी नाहीं. व इंग्रज लोक राज्य करतात. परंतु याजमुळें कितीएक जास्ती खर्च वगैरे अडचणी अशा आहेत कीं, इंग्रजाकरितां इंग्रजी व मराठी दप्तर बाळगावें लागतें. परंतु आणखी इंग्रजांस इकडील कितीएक गोष्टी समजत नाहींत. तथापि ते लोक यांजपेक्षां हजारो पट शाहाणे आहेत. याजमुळें अडचणी असूनही लोक त्याजला राजी आहेत. व मराठे वगैरे लोक पुरते माहितगार असूनही लोक कबूल करीत नाहींत. कारण कीं, यांचें शाहाणपण सर्व लोकांस बुडविण्याकरितां उपयोगास येतें. आमचे राजे

असतात ते किती मूर्ख असतात, याचें उदाहरणास बाजीराव पेशवा व सातारचा राजा व दौलतराव शिंदे हीं उदाहरणें घ्या, म्हणजे समजेल. सातारचा राजा जसें एकादें चित्र सजऊन न्यावें तसा रसिडेंटाकडे जातो. आणि घरांत पाहिजे तितकी दारू पिऊन मस्त होऊन राहातो. कांहीं न्यायकारभार करीत नाहीं. बसला असतां तेथून लोकांनीं हात धरून उचललें पाहिजे. ही त्याची शक्ती. एक पत्र सरकारांतून आलें तर त्याचा जाब लिहिणें तो माहित नाहीं. राज्यांत खबर काय आहे हें त्यास ठाऊक नाहीं. रयतेकरवीं विद्या करविणें हें त्यास ठाऊक नाहीं. फार कशाला? राजे तर केवळ पशु असतात; परंतु थोर लोकांकडे पाहा कीं, यांस किती ज्ञान असतें? दरएक थोर माणसास वकील पाहिजे. वकिलाशिवाय बोलतां येत नाहीं. व एखादें पत्र आलें तर त्याचा जाब लिहून कामदारास दाखवीत फिरतात. आणि मनास येईल तसें यजमानास सांगतात. बहुधा असें होतें कीं, वकीलच मालक होतो. आणि मोठे लोक स्वतः मूर्ख असून त्यांजला कांहीं समजत नाहीं. भलतेंच करितात. वकील हे बहुधा तंटे उत्पन्न करणारे असतात. आणि यजमानास त्यांत गुंतऊन मग आपलेशिवाय कांहीं होऊं नये असें करतात. जें काम व्हावयाचें नाहीं तें यजमानास सांगतात कीं, आम्हीं करतों. आणि सरकारचा अमलदार यांस लांच वगैरे देऊन त्याजकडून होईल असें म्हणतात. व मग यजमानास असें भासवितात कीं, त्या वकिलाचा प्रवेश फार; आमच्यानें न होईल तें काम हा करील. सर्व कामदार यांस अनुकूल आहेत. असें करून मग वकिलास जरूर पडतें कीं, कामदारावर त्यांचें पोटिस्त व यजमानास वेड लावण्यास कामदार अनकूळ आहेत. याजकरितां कामदारास कधीं मेजवानी, कधीं यजमानाशीं भेट करून देऊन सर्व काळ कामदाराचें आर्जव करून त्यांस लांच देतात. आणि यजमानास बुडवितात. त्यांचे घरांतून हजारों रुपये काढले तरी त्यांपैकीं निम्मे आपण खातात आणि निम्मे कामदारास देतात. याप्रमाणें सर्व जहागीरदार व मोठाले लोक यांची हकिकत आहे. कर्नाटक प्रांतांत जहागीरदार वगैरे आहेत. त्यांचीं तोंडें माणसासारखीं आहेत म्हणून मात्र त्यांस माणसें म्हणावें. नाहीं तर ते केवळ जनावरेंच आहेत. त्यांचे मनास व जनावरांचे मनास कांहीं अंतर नाहीं. हें सर्व इंग्रज लोकांस कळतें. व पोलिटिकल एजंट व रसिडेंट हें सर्व जाणून आहेत, परंतु ते सावध आहेत. याजकरितां त्यांस राखून ठेवितात. एकदम अन्यायानें बुडवीत नाहींत. परंतु त्यांची किंमत व योग्यता समजती. कितीएक सरदार असें समजतात कीं, कायद्यांत व कानूंत कांहीं नाहीं. एजंट करील तें होईल. यास्तव दरबारांत कधीं बोलाविलें तर मनास येईल तसें बोलतात. व मनास येईल तें मागतात. कितीएक सरदार इतके मूर्ख आहेत कीं, ते साहेब लोकांस म्हणतात, "तुम्ही देवाप्रमाणें आम्हांस आहां. तुम्ही जें कराल तें होईल." अशीं भाषणें ऐकून शाहाणे लोक या बोलणारांची आपले मनांत किंमत करीत असतील, तें मनांत समजावें. असो. याप्रकारचे आमचे लोक लहान व वेडे आहेत. त्यांस न्याय, नीती व वाकबगिरी नाहीं. असें असून जो

बेकूब असतो त्यास चांगला माणूस असें म्हणतात. ज्यांस कांहीं कळत नाहीं त्यास थोर संभावित म्हणतात. व जो अन्याय करितो त्यास दयाळू म्हणतात. अशा नानाप्रकारच्या वांकड्या समजुती आहेत. लोकांस अन्याय करून देतो त्यास म्हणतात, "हा थोर व मिडस्त आहे." जो सरकारचा पैसा लुटूं देतो किंवा रयतेकडून लांच घ्यावयास फुरसद देतो, त्यास उदार म्हणतात. दुसऱ्याची लबाडी धरून देतो त्यास लबाड म्हणतात व सरकार म्हणजे त्यांस असें वाटतें कीं, जसा समुद्र, त्यांतील किती पाणी खर्च केलें तरी तें सरावयाचें नाहीं, तद्वत सरकारचा पैसा सहज खर्चावा. कोणी विरुद्ध म्हणाला तर म्हणतात कीं, अरे, तुझ्या पदरचें काय गेलें? सरकारच्या पदरचें जातें. सरकारास काय कमी? सरकारचें खाऊं नये, तर खावें कोणाचें? सरकारास लुटूं नये तर काय गरीबांस लुटावें? या प्रकारच्या पहिल्या काळच्या समजुती आहेत. ज्याकाळीं लोक बेकूब, श्रीमंत व राजे होते, तेव्हां ते आपल्या चाकरास पाहिजे तशी वर्तणूक करूं देत होते. त्यासमयींची समजूत अद्याप राहिली आहे. परंतु आतां पहिलेप्रमाणें उदारत्व, न्याय व थोरपणा नाहीं. आतांचा थोरपणा व उदारत्व फार शुद्ध आहे. चंदुलाल लोकांचीं घरें बुडवून धर्म करीत होता. असें असतां त्यास चांगला म्हणत होते. हे प्रकार लोकांनीं सोडले पाहिजेत. व सरकारविषयींच्या वांकड्या समजुती सोडल्याशिवाय या लोकांस लायकी येणार नाहीं. सरकार यांचे हातीं आलें तर मनास येईल तसा खर्च करतील. पैसा नाहींसा झाला म्हणजे लोकांचीं घरें लुटतील. असे गैरशिस्त हे लोक आहेत. यांस कायदाकानू व शहाणपण नाहीं. याकरितां राज्य करण्यास इंग्रज लोक जरूर झाले. आतांप्रमाणें कधीं कोणी पूर्वी राज्य केलें नव्हतें. रामाचें राज्य चांगलें म्हणून कीर्ती आहे. परंतु हल्लींचे राज्यांत एक कमी आहे कीं, लोकांस रोजगार व श्रीमंती नाहीं; परंतु शहाणपण नाहीं म्हणून या गोष्टी नाहींत. शहाणपण असेल, व लोकांचे हातीं राज्य असेल, स्वदेशीय अंमलदार असतील आणि त्यांजकडून जशी इंग्रजांकडून इकडे निष्पक्षपातानें वर्तणूक होते अशी होईल तर इंग्रजांचे राज्याहून शंभरपट सुख होईल; आणि मग रामराज्यही मागें सरेल, यांत संशय नाहीं; परंतु असें होण्यास लोकांस समजूं लागलें पाहिजे. व कायदाकानू ठाऊक नाहींत म्हणून वकील लोक वगैरे फसवितात. तसे लोक नसून ज्याचा त्यास आपला प्रपंच सावधगिरीनें करतां येतो. इतकें झाल्याअंतीं याच कायद्यानें व याच नियमानें हे लोक राज्य बहुत उत्तम करतील. इंग्रज करतात, पण त्यास परकीपणा आहे. व स्वदेशीय लोक रोजगार नाहीं याजमुळें एकंदर भिकारी झाले. परंतु हे जर उत्तम झाले, जाति अभिमान सोडून सर्व लोकांचे हितास झटणारे झाले; सर्वांस विद्या करविण्याचा यत्न करूं लागले; ब्राम्हण श्रेष्ठ इत्यादि मूर्ख समजुती सोडून राज्य करूं लागले; महार, रामोशी, कैकाडी कोमटीदेखील यांनीं सुधारले; आणि मोठे कामाच्या लायक झाले, तर ईश्वर कृपा करणार नाहीं असें नाहीं.

लो० हि०

ता० २१ वी ऑक्टोबर १८४९

पत्र नंबर ७९

दया

विनंती विशेष. श्रीमंताचा व गरीबाचा या जगांत दूरचा संबंध आहे. तरी परलोकामध्यें फार जवळचा संबंध आहे. याकरितां दया हा आपला एकामेकांचा प्रथम धर्म आहे. सर्व धर्माचें सार दया आहे. गरीब हा श्रीमंताचे जुलमानें होतो. कांहीं जन्मतः कोणी गरीब नसतो. याकरितां सर्वांवर दया करावी. हा उत्तम मार्ग. सर्वदा न्याय दयेच्या अनुसंगानें करावा. आणि असें मनांत वागवावें कीं, आम्हीं मरणानंतर ईश्वरापाशीं दया मागूं. त्याचे दयेवांचून आमचा परिणाम लागणार नाहीं. म्हणून जर आपण दुसऱ्यापाशीं दया मागण्यास सिद्ध आहों तर तसेंच आपण करून दाखविलें पाहिजे. तरच आपलें मागणें पसंत होईल. सर्व जीवजंतु ज्ञात अज्ञात हे दयेस पात्र आहेत. परंतु हिंदू धर्मांत यज्ञादिक निर्दय कर्में आहेत, तीं ईश्वरापासून झालीं असतील, असें मला वाटत नाहीं. दुसऱ्या जनावरांवर आपलें पाप ठेवून त्याजला मारावें. म्हणजे त्याचे दुःखानें आपलें पाप जाईल ही गोष्ट विचारास विरुद्ध आहे. परंतु याप्रमाणें चाल बहुत दिवसांपासून आहे. ज्या काळीं ईश्वरानें माणसें निर्माण केलीं, त्या काळीं तीं अमक्याच कारणाकरितां केलीं, असें पक्कें समजत नाहीं. परंतु अमुक रीतीनें चालावें व अमुक रीतीनें न चालावें हें ईश्वरानें प्रत्येक माणसाचे बुद्धींत पेरिलें आहे, हें खचित आहे. ईश्वरानें आपली बढाई वाढवावी म्हणून माणसें केलीं, असें नाहीं. ईश्वरास माणसाच्या कीर्तनानें अधिक थोरपणा येतो, हें मिथ्या आहे. तथापि मनुष्यांनीं जो आपला निर्माणकर्ता असेल त्याची सेवा करावी हाच धर्म योग्य आहे. व नीतीनें वागावें म्हणजे सुख होतें. परंतु यज्ञ करण्यास सांगितलें असेल, असें वाटत नाहीं. यज्ञ करणें हें अनुचित व अविचारी कर्म आहे. हें बहुधा मनुष्यांनीं योजिलें असावें. प्रथम मला वाटतें ईश्वरानें इतकाच धर्म लावून दिला असेल कीं, त्यांनीं चांगली वर्तणूक करावी, आणि ईश्वरावर भार ठेवून वागावें. एवढाच धर्म होता. हें अशावरून वाटतें कीं, इतर धर्म सर्व माणसांस लागू पडत नाहींत. जर इंग्रजांचा धर्म खरा म्हणावा तर आलीकडे उत्पन्न झाला. तेव्हां त्याचें मागें ते ज्या देशांत तो धर्म माहित पडला नाहीं, त्या देशांतील माणसें नर्कांत गेलीं कीं काय? हें बरोबर नाहीं. तशीच मुसलमानाचे धर्माची अवस्था आहे. ईश्वरप्रेरित धर्म सर्वांस सारखा कळावा. जशी त्याणें लोकांस खाण्यापिण्याची सोय करून दिली, तद्वत धर्माचीही तयारी केली असेल, व जर जनावरांचे यज्ञ हा धर्म म्हणावा, तर त्याविषयींही ऐक्यता होणार नाहीं. व जनावरें वेगळालीं प्रत्येक देशांत आहेत. तेव्हां त्यांपैकीं कोणत्या जनावराच्या रक्तानें ईश्वर संतुष्ट होतो तेंही बरोबर कळत नाहीं. व यज्ञ करतां करतां माणसें माणसांचा यज्ञ करूं

लागलीं. व जर इतर जनावरांचा यज्ञ देवास पाहिजे, तर मग माणूस सुंदर जनावर, याचा यज्ञ कां नको? तस्मात यज्ञाचा धर्म अगदीं खोटा आहे. आतां हा धर्म खोटा आहे असें दिसतें, याजवर कोणी अशी तक्रार करतील कीं, शरण गेल्यानें देव पापें सोडतो असें जर आहे तर एक दिवस ईश्वरास शरण गेलें म्हणजे पापमुक्त होऊं. तर त्याचें उत्तर असें आहे कीं, ईश्वर न्यायी आहे व दयाळू आहे. हे दोन्ही गूण ईश्वरास आहेत म्हणून तो पापाचें शासन करील हेंही खचीत आहे. परंतु शासन करण्यास तो स्वतः अधिकारी आहे, असें म्हणावें. तर न्यायास सुविपरीत होतें; परंतु तसें नाहीं. न्याय व दया होते याचा पर्याय असा आहे कीं, ईश्वरानें आपल्यास प्रतिबंधकारक कांहीं नेम केला नाहीं तेव्हां पापास दंड हें खचीत, परंतु जे पापी शरण येतील, देवाचें भय ठेवितील, व शरण आल्यापासून पुनरपी पाप करणार नाहींत, ते पापी मुक्त होतात. एकीकडे शरण जावें आणि दुसरीकडे पाप करावें हा अर्थ त्याचा नाहीं. यास आधार गीतेंत असा आहे : "मामेकं शरणं व्रज." मला शरण ये, म्हणजे पापमुक्त होशील आणि तरशील. दुसरे ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, "ददामि बुद्धियोगं तं" म्हणजे शरण येतो तो भावबळानें चांगला होतो. पुनरपि पाप करीत नाहीं. तेव्हां ईश्वरास जो प्राणी शरण गेला त्यास अशी बुध्धी झाली म्हणजे तो प्रसाद असें समजावें. व त्या प्रसादाचा दाखला असा आहे कीं, त्याणें पाप सोडून द्यावें म्हणजे तो शरण गेला हें खचीत, व त्याचा भाव बसला हें खचीत, आणि ईश्वराची कृपा त्याचे ठिकाणीं राहिली हें खचीत, नाहीं तर हातांत माळा घेऊन लबाड लोक भजन करतात, आणि खोटें बोलतात व पापकर्म सोडीत नाहींत. म्हणून ते शरण झाले असें आम्हीं मानीत नाहीं. अंगांत नाना प्रकारच्या युक्ती काढल्या आहेत, परंतु मी वरती धर्माचें मूळ लिहिलें आहे. याप्रमाणें एक साधूच्या मुखांतून मीं ऐकिलें आहे; परंतु गीतेचीं वाक्यें त्याणें अशीं जुळलीं, तीं ऐकून मी समजलों, धर्माचें तात्पर्य एकच आहे. खिस्तियन म्हणतात कीं, मनुष्यामध्यें व ईश्वरामध्यें एक जामीन रदबदलीस पाहिजे. असेंच मुसलमानाचे धर्मांत आहे, व तो सर्व पापें आपले शिरावर घेतो, असें मत आहे. पण मला वाटतें कीं, मध्यस्थाची योजना धर्म लाऊन देणाऱ्यांनीं ईश्वरावर भाव बसण्याकरितां जशा मूर्ती हिंदु लोकांनीं केल्या तशी त्यांणीं जामिनाची व मध्यस्थाची युक्ती काढली आहे. परंतु मुख्य तात्पर्य हेंच आहे कीं, ईश्वर न्यायी आहे, तथापि दयाळू आहे. व शरणागतास रक्षितो. जर एखाद्यानें असा नेम केला कीं, मी जितके चोर आढळतील तितक्यांस मारीन; परंतु जर कोणी चोर मला शरण येऊन वचन देईल कीं, पुनः चोरी करणार नाहीं, आजपर्यंत अज्ञानानें झालें तें क्षमा करा, मी पुन्हा करणार नाहीं; तर त्यास माफी देऊन जे चोर दांडगे असतील त्यांस मात्र मारीन, तर तो पुरुष न्यायी आणि दयाळू म्हणावा किंवा नाहीं? त्याणें चोरास सुटण्याकरितां एक मध्यें संधी ठेविली म्हणून त्याचे न्यायास विरुध्धता येत नाहीं. ईश्वर तर दयाळू आहे, त्याणें प्रत्येक

जन्मांत वारंवार संधी ठेविली आहे. जो जो मनुष्य जन्मास येईल त्यास ती संधी आहेच. तरणोपायास मनुष्यजन्म आहे. या जन्मीं न केला तर पुन्हा ईश्वर जन्मास घालील तेव्हां तरी करावा. अशा त्याणें दयाळूपणानें वाटा ठेविल्या आहेत. म्हणून त्याचे न्यायास विरुध्धता येत नाहीं. इंग्रजांचे मताप्रमाणें एकच संधी आहे. पण हें बरोबर नाहीं. असो. जीवावर दया करणें हा मुख्य ईश्वरभजनाचा मार्ग आहे. दयेविना धर्माचें व कर्माचें सार्थक नाहीं. परंतु कितीएक लोकांस, आम्हीं या जगांत मरणार, याचें विस्मरण होतें व मग ते आपणास आणि दुसऱ्यास एक नजरेनें पाहात नाहींत. जो घोड्यावरून जातो त्यास पायांनीं कोण चालतो हें दिसत नाहीं. आणि आमचे लोकांस दया फार कमी आहे. मूर्खपणास दया समजतात, म्हणजे अपराध्यास सोडणें ही दया नाहीं. न्यायास विरुध्ध न येतां सोडणें ती मात्र दया. असेंच दया म्हणजे अज्ञानास ज्ञान द्यावें; गरिबास द्रव्य, रोग्यास औषध, निराधारास व भुकेल्यास अन्न, इत्यादि स्वभावानें द्यावें व ह्यांत संतोष मानावा. गरीबास पाहातांच कळवळा यावा असे सत्पुरुष थोडे आहेत. परंतु जन्माचा हाच उपयोग आहे.

लो० हि०

ता० ४ माहे नोव्हेंबर १८४१

पत्र नंबर ८०

कमती कशाची ?

आमचे लोकांची अद्यापि अशी खात्री झाली नाहीं कीं, आम्हीं मूर्ख आहों. आम्हांस विद्या नाहीं, आम्हांस ज्ञान नाहीं, आम्हांस कांहीं कळत नाहीं, आम्ही गुणानें रिकामे झालों, आपल्या समजुती फार वांकड्या आहेत; आम्हांस स्वदेशाची, पृथ्वीची, व्यापाराची व कलाकौशल्यांची माहितगारी नाहीं, आम्हांस सावधपणा नाहीं, आमच्या समजुती प्राचीन काळचे ग्रंथाचे आधारानें त्या पडल्या आहेत, त्या उपयोगी नाहींत. पुराणें वगैरे पोथ्यांत वेड लागावयाच्या गोष्टी पुष्कळ आहेत, त्यांपासून भलतींच मतें उत्पन्न झालीं. आमच्या रीती व चाली वाईट आहेत, आमच्या स्त्रिया अज्ञान आहेत. जोंपर्यंत आम्हीं आपल्या देशांत बायकांस शाहाण्या करणार नाहीं, तोंपर्यंत आम्हीं मूर्ख राहूं. कारण कीं, बायकांचे हातांत प्रथम मुलास रीतभात लावणें आहे, तेथेंच जर बिबा पडला तर पुढें सुधारत नाहीं. लहानपणीं जी बुध्धी ती शेवटपर्यंत राहाते. याजकरितां बायका शाहाण्या पाहिजेत म्हणचे मुलेंही नीट होतात. आणि नवऱ्यास वगैरे स्वकीयांस सुख होतें. आणि आळशी खोड्या सोडल्या पाहिजेत. भट वगैरे मूर्ख लोकांस फारसा आधार

देऊं नये, भट हे जरी अज्ञान आणि मूर्ख आहेत तरी त्यांस एकदम अन्न घालूं नये, असें मी इच्छित नाहीं. परंतु त्यांस त्यांचें अज्ञान माहित करावें. भटांची उत्पत्ती मोडावी, वाचण्याकडे लक्ष द्यावें, विद्येचें मूळ वाचणें आहे, याचा विचार करावा. गर्विष्ठपणानें ब्राम्हण लोक बहुधा फुगलेले असतात, तसे असूं नयेत. या सर्व गोष्टी जरी खऱ्या आहेत, तरी अद्याप हिंदु लोकांत या गोष्टी खऱ्या म्हणणारे व मानणारे थोडेच आहेत. व मागील म्हाताऱ्यांमध्यें तर अगदींच मिळणार नाहींत. ते सर्व अगदींच मूर्ख व त्यांस सुधारणें हें अगदींच उपयोगी नाहीं. ते मेल्याशिवाय त्यांची हरकत दूर व्हावयाची नाहीं. परंतु जे पुढें होतकरू लोक आहेत त्यांणीं मनांत आणावें कीं, वृध्ध व म्हातारे यांच्या समजुती आपण घेऊं नयेत. आपण विद्येचे शोधास लागून खरें कोणतें, खोटें कोणतें तें काढावें, पृथ्वीचा शोध करावा. राज्याचा शोध करावा; तें सोडून ब्राम्हण लोक वगैरे असे आळशी आहेत कीं, तें विपरीत व विलक्षण गोष्टी सांगत बसतात. कोणी रूमच्या, कोणी स्त्रीराज्याच्या, कोणी रावणाचे तपश्चर्येच्या, कोणी कृष्णाच्या, कोणी शुंभनिशुंभ दैत्यांच्या गोष्टी सांगतात, पण अशा गोष्टींपासून काय फायदा होणार आहे ? ज्या कल्याणाच्या गोष्टी आहेत त्या पाहून नंतर हीं पुराणें वाचून टाकिलीं तर चिंता नाहीं; परंतु सर्व काळ त्यांत काय आहे ? खोट्या गोष्टी म्हणजे चवदा रत्नें व सात समुद्र असें मानणें हा केवळ मूर्खपणा आहे. मूर्खपणांत दिवस घालवून परिणाम काय ? या गोष्टी इसापनीतींतील गोष्टींप्रमाणें समजून वाचल्या तर वाचल्या, नाहीं तर नाहीं. मुख्य व वास्तवीक जें ज्ञान त्याचा शोध करून तें शिकलें पाहिजे. पंचम स्कंधांतील भूगोल काढून काय उपयोग ? पुराणिकास तांदूळ मिळतात, म्हणून तो काढतो, परंतु आतां या चुका पुरे झाल्या. या चुकांनीं लोकांस भ्रांती पडून लोक पृथ्वीचें खरें वर्णन ऐकत नाहींत, इतकी दृढ भ्रांती पडली आहे. याजकरितां या भ्रांतींतून काढण्यास प्रयत्न करावा. व खरी पृथ्वी कशी आहे हें पाहावें, व देशांतर करावें, बखरी लिहून आणून त्या छापून लोकांत प्रसिध्ध कराव्या. म्हणजे पाहून आलेल्यांचें वर्तमान लोक खरें मानून पुराणांत खोटें लिहिलें आहे, असें समजतील. या प्रकारचा यत्न श्रीमंत लोकांनीं करून या लोकांस अज्ञानांधःकारांतून काढलें पाहिजे. आपले लोक केवळ मूर्ख झाले आहेत. राज्यरीती, धर्मनीती व कर्मनीती हीं कांहींच समजत नाहींत. भट, पंडित व ब्राम्हण हे त्यांचे पदरीं मूर्खशिरोमणी असतात. ते नानाप्रकारचे वेडेचार समजावितात. फक्त पुराणावर भरवसा ठेऊन खरें मानतात, याजकरितां प्रत्यक्ष शोध पाहावा; या लोकांनीं असें केल्याशिवाय व ब्राम्हणांचा नाद सोडल्याशिवाय यांस धडगती लागणार नाहीं. श्राध्ध केलें म्हणजे बाप तृप्त होतो म्हणून मनापासून खपतात. व बायकांस तर असें वाटतें कीं, ब्राम्हण जेवतात हे प्रत्यक्ष पितरच आहेत. वृषोत्सर्ग केला म्हणजे मोक्ष होतो. उसाची नाव केली म्हणजे जो मरतो, त्याचे ती उपयोगी पडते. या प्रकारचीं ब्राम्हणांचीं फायद्याचीं कर्में आहेत. ब्राम्हणांनीं जें लिहून ठेवलें आहे त्यांत एकही खरें नाहीं. हा सर्व लबाड

नाद आहे. यज्ञयागदेखील ब्राम्हणांनींच निर्माण केले आहेत. अडाणी मनुष्य असला व त्याचे पिंडास कावळा शिवला नाहीं तर त्याचे मनास केवढी खवखव वाटते, आणि किती दुःखी होतो ! याप्रकारचें मूर्खपण भरलें आहे. पाहा, जर ब्राम्हणांनीं असा नेम केला कीं, जितकें, पोथींत लिहिलें आहे तितकें तसेंच आचरण करावयाचें तर त्या ब्राम्हणांची वर्तणूक कशी होईल कीं, सर्व दिवस त्यांस उद्योग व खटपट पुरवेल. दर्भ व समिधा तोडून आणाव्या आणि होम करावे. तर्पण, दगड, धोंडे, नानाप्रकारच्या खटपटी संध्याकाळपर्यंत करतां करतां त्याचा जीव थकून तो शेवटीं निजतो. याप्रमाणें जन्म घालविणारे ब्राम्हणांत अद्यापी आहेत. ते ओवळे होत नाहींत, आणि असले ब्राम्हण चांगले म्हणून त्यांस लोक समजतात. परंतु मी तर त्यांस मूर्ख समजतों. त्यांचे जन्माचा उपयोग काय झाला ? आणि त्यांणीं सार्थक काय केलें ? या खटपटीपासून फायदा ईश्वरही देईल, असें वाटत नाहीं. दया, धर्म, लोकहित, व क्षमा केली, तर मात्र सार्थक होईल. नाहीं तर तांदूळ शिजविले आणि भात करून तो जाळला, व दोन घटका मेहनत करून दर्भाची दोरी केली व ती जाळून होम केला, आणि समिधा जाळून यज्ञ केला, तर फायदा कोणत्याही लोकीं होणार नाहीं. मला वाटतें कीं, ही खटपट सर्व ब्राम्हणांनीं आपले महत्त्वाकरितां व लोकांस सोंगढोंग दिसण्याकरितां लिहिली आहे, किंवा मूर्खपणानें एकानें केली त्याजवर आणखी दोन गोष्टी चढऊन दुसऱ्यानें लिहिल्या, असें वाढत वाढत आजपर्यंत आलें, व त्यास मोडणारा कोणी मिळाला नाहीं. क्षत्री वगैरे राजे होते, ते ब्राम्हणांस थोर मानीत म्हणून ब्राम्हण पाहिजे तसें लिहीत गेले, परंतु त्याजमुळें त्यांचा व लोकांचाही नाश झाला, आणि मूर्खपणा वाढला, व विद्या वाढवावयाची राहिली; या लोकांनीं जास्ती वाद करूं नये, याजकरितां प्रयत्न करून ग्रंथ लिहिले, खोटे असले तरी विचार केल्याशिवाय भाव ठेवावा म्हणजे धर्म. असा मूर्खपणा सांगतात; पण यांतून ल्वकर सुटतील तर बरें होईल.

लो० हि०

ता० ११ नवंबर सन १८४१

पत्र नंबर ८१

प्राचीन ग्रंथांचे अर्थ

पुण्यांतील ता. २३ अक्टोबरचे ज्ञानप्रकाशपत्रांत यथार्थवादी यांणीं एक पत्र प्रसिद्ध केलें आहे; त्यांत त्यांणीं इकडील पत्राचें उत्तर देण्याचा अनुक्रम चालविला आहे, त्यांत ज्या ज्या गोष्टी उत्तर लिहिण्यासारख्या आहेत, त्या खालीं कलमवार लिहितों.

१. प्रथम यथार्थवादी आपले पत्राचे प्रस्तावनेंत लिहितात कीं, ब्राम्हणजातीचे सर्व लोक मूर्ख नाहींत, कितीएक सूज्ञ आहेत. या मतास आम्ही कबूल आहों व आम्हीं कधीं असें लिहिलें नाहीं कीं, सर्व मूर्ख आहेत. परंतु कोठें सर्व असा शब्द योजला असेल तर त्याचा अर्थ हाच कीं, बहुतकरून शंभरांत किंवा हजारांत एकदोन क्वचीत् शहाणे असले, तत्रापी इतरांस बोध करूं नये असें होत नाहीं. ज्यांस बोध करावयाचा असतो त्याणें बहुतजण मूर्ख पाहिले म्हणजे त्यांस सर्व असें म्हणावें लागतें, हा एक भाषणाचा अलंकार आहे. तत्रापी एक सूज्ञ असला म्हणजे बहुत लोकांचे दुर्गुण असतील ते एक सुज्ञ त्यामध्यें आहे म्हणून झांकावे, असा अर्थ यथार्थवादीचा नसेल असें वाटतें.

२. यथार्थवादी एक वाक्याचा आम्हीं संग्रह केला म्हणून त्याविषयीं तक्रार करितात, परंतु आम्ही पंडितासारखे चुकवाचुकव करणारे नव्हों, हें त्यांणीं समजावें. एक वाक्याचे दोन अर्थ तर काय, परंतु जितके पंडित असतील तितके विलक्षणपणें अर्थाचे अनर्थ करून दाखवितील व त्यांत सद्विचार लक्षांत न ठेवितां मनास येईल तशीं पदें पाडून सरासरी मिळऊन देतील, परंतु ही रीती योग्य नाहीं. कारण जो वाक्य लिहितो त्याचा हेतू असा नसतो, एकच अर्थाविषयीं तो बोध करितो. पंडिताचे विलक्षण अर्थ उपयोगी नाहींत आणि ते आम्हीं मानीत नाहीं. कारण कीं, आम्हीं लोकांशीं बोलतों, तेव्हां सरळ अर्थ असेल तोच दाखवावा. जेव्हां आम्हांस पंडितांशीं व्याकरण, काव्य, अलंकार यांसंबंधीं बोलावयाचें असेल, तेव्हां त्यांचे अर्थ अमूक होतात याविषयीं वाद करूं. तूर्त आमचा हा प्रसंग नाहीं. जसें एकानें एकास मूर्ख असें दुरुत्तर केलें आणि तो मनुष्य फौजदारा कडे फिर्याद घेऊन गेला तर फौजदारानें मूर्ख या शब्दाचा कपटी अर्थ किंवा पदें फिरवून किती अर्थ निघतात तें पाहणें योग्य नाहीं. ज्या अर्थानें तो शब्द लोकांत प्रसिद्ध आहे, आणि ज्या अर्थानें तो शब्द उच्चारला तोच अर्थ मनांत आणून शिक्षा करावी. यास्तव लोकहितवादी याणें संस्कृत वाक्याचा सरळ व प्रसिद्ध आहे तोच अर्थ केला. ब्राम्हण लोकांमध्यें क्वचित सुज्ञ आहेत, असें आम्ही समजतों; व यथार्थवादी त्यांतीलच एक सुज्ञ आहेत, असें आम्ही समजतों; परंतु रीतीचा वाद सोडून त्यांणीं पंडितांच्या कोट्या घेऊन वांकडे रस्त्यांत शिरूं नये.

३ रे कलमांत ते लिहितात कीं, ब्राम्हणजन्मांत मात्र मोक्ष आहे व ब्राम्हण या शब्दाचा अर्थ फिरवून लिहितात; त्यासही सदरहू कलम लागूं आहे. यथार्थवादीनें हें पाहावें कीं, सांप्रत गुण, कर्म, स्वभाव येणेंकडून युक्त असे ब्राम्हण किती आहेत आणि जर बहुतांमध्यें हें नाहीं तर त्यांस पूर्वापार जें महत्व दिलें आहे, तें भोगण्यास ते योग्य आहेत कीं काय ?

४. यथार्थवादी यांचें म्हणणें कीं, पुराणांतील बाष्कल कथा कल्पभेदानें समजाव्या, व विषयपर वचनें ज्ञानपर आहेत; परंतु हें ओढूनताणून जबरदस्तीनें सरळ अर्थ सोडून उलटा अर्थ करणें प्रशस्त नाहीं. एकादीं असंभाव्य कथा कल्पांतरींची म्हणून मानिली

तर त्याच अध्यायांत विधी-निषेध येतात, तेही कल्पांतरींचे असें मानिलें पाहिजे. आणि याप्रमाणें सर्व उडविलें म्हणजे या कल्पांतील कोणते विधी याचा मुळींच ठिकाण नाहींसा होईल. त्याचप्रमाणें भागवतांतील विषयपर कथा असतां ज्ञानपर लाविल्या तर कथेचा ओघ फिरेल आणि संजोग विघडेल, यास्तव या कोट्या व्यर्थ आहेत. जे उघड अर्थ दिसतात ते खरे असे सर्व प्रामाणिक व सुज्ञ कबूल करतील.

५. पुराणांत पुष्कळ म्हणी चांगल्या आहेत, हें आम्ही जाणतों. परंतु सर्व निर्बाध आहेत असें प्रतिपादन करणें यथार्थवादीस योग्य नाहीं, असें वाटतें. यास्तव त्यांणीं विचार करून या विषयींचा जबाब वास्तवीकपणानें द्यावा.

लो० हि०

ता० १८ नोवेंबर १८४१

पत्र नंबर ८२

प्राचीन ग्रंथांचें महत्त्व

सांप्रत हिंदुस्थानांतील लोकांचे जे नियम, शास्त्र व समजुती आहेत त्यांचा गुण असा आहे कीं, या लोकांचें पाऊल पुढें पडूं नये, विद्या होऊं नये, व कळा-कसबें वाढूं नयेत. याप्रकारचें सर्वांचें तात्पर्य आहे. आणि यामुळें आजपर्यंत तीन हजार वर्षांत तसेंच झालें आहे. जे सुज्ञ असतील त्यांणीं विचार करून पाहावा कीं, प्राचीन काळीं म्हणजे तीन हजार वर्षांचे पूर्वीं मोठे मोठे ऋषिवर्य विचारशील होते, त्यांनीं रानांत वसून ग्रंथ लिहिले. आकाशांत नक्षत्रें पाहून त्यांचे नियम लक्षांत आणिले; रानांतील औषधी शोधून त्यांचे गुण लक्षांत आणिले, आणि त्याविषयीं शेंकडो ग्रंथ लिहिले; तसेंच त्यांणीं भाषेसंबंधीं विचार करून व्याकरण लिहिलें; स्वयंपाक कसा करितात तेंदेखील लक्षांत आणून नळपाक व भीमपाक लिहिला. याप्रकारें नाना प्रकारचे ग्रंथ पूर्वीं नवीन बुद्धीबळानें उत्पन्न झाले, तत्रापी भूगोलविद्या वगैरे यांत त्यांणीं बहुत चुका केल्या. अस्तु. शोध जे करतात ते चुकले म्हणून त्यांत त्यांचा अपराध नाहीं. याप्रमाणें शास्त्र लिहिणारे यांणीं पाहिजे तशीं न्याय, मीमांसा इत्यादिक मतें वेगळालीं लिहिलीं. त्यानंतर या लोकांस पुढें अवदशेचा पाया येणार म्हणून अशी समजूत पडली कीं, पहिले ऋषी ज्यांणीं हे ग्रंथ लिहिले, ते सर्व देव-अवतारच होते व त्यांणीं केलें तसें मनुष्यजातीच्यांनीं होणार नाहीं व आपला धर्म इतकाच कीं, पूर्वींच्यांनीं जें करून ठेविलें तितकें मात्र शिकावें. त्याजवर नवीन कल्पना काढूं नये, काढली तर देवाचा अपमान होतो, व जें

काय पाहिजे तें त्यांत सर्व आहे. अशी समजूत पडून लोक अगदीं मूर्ख झाले. अशी समजूत कां पडावी याचें कारण शोधिलें असतां असें सांपडतें कीं, पहिलें, पांडवाचे अखेरीपर्यंत ब्राम्हण आपले धर्माचे ठाईं रत होते, विद्येविषयीं मेहनत करीत होते, व उद्योगी होते, आणि दुसरे जातीचे लोक जो विद्वान असेल त्यास मात्र द्रव्य देत होते. पुढें ब्राम्हणांची विद्या वाढली, ते ग्रहणें सांगूं लागले. हिशेब करूं लागले, ज्योतीष, भविष्यें सांगूं लागले, यामुळें लोक त्यांस देवासारखे मानूं लागले. आणि त्या वेळेस राज्य चांगलें होतें व खावयास पुष्कळ होतें. यामुळें ब्राम्हण लोकांस पुष्कळ मिळत होतें. पुढें कांहीं राजे बाजीरावासारखे झाले. ते मनास येईल तसें ब्राम्हणांस द्रव्य देऊं लागले. योग्यता पाहावयाची सोडली व ब्राम्हणांचे पायाचें तीर्थ देऊन त्यांस अगदीं ईश्वर मानूं लागले; तेव्हां ब्राम्हणांनीं अशी तजवीत केली, हीच समजूत लोकांची राहावी व ब्राम्हणांचा अधिकार कधींही मोडूं नये, अशीं पुराणें व महात्में लिहिलीं. त्यांत येऊन-जाऊन गोष्टी अमूक राजानें अमूक क्षेत्रीं ब्राम्हणांस अशीं तशीं दानें केलीं आणि तो स्वर्गास गेला. म्हणून ब्राम्हणांस अमूक द्यावें, सहस्त्रभोजन घालावें. त्यांच्या मुखांत पडलें म्हणजे देवास पोंचतें. ब्राम्हण काय ते मुख्य. सर्वांनीं त्यांस मानावें, हींच मतें पुढें प्रबळ झालीं, आणि ब्राम्हण वंशपरंपरेचे झाले. लोक म्हणूं लागले कीं, मूर्ख जरी असला तरी ब्राम्हण जातीचा, व ब्राम्हणाचे पोटचा, तस्मात त्यास धर्म करावा; परंतु पहिलें असें होतें कीं, मूर्ख ब्राम्हणांची गणना शूद्रांत होती व उत्तम शूद्र ब्राम्हणांत येत होता. तें जाऊन सर्व ब्राम्हणवंशाचा मान वाढला. तेव्हां अर्थातच ब्राम्हणांनीं पाहिलें कीं, आम्हांस मृत्युलोकचें देवत्व आलें. आतां विद्या कशास करावी? नवीन कल्पना कशास काढाव्या? प्राचीन काळचे देव होते त्यांचे वंशीक आम्ही इतकेच म्हणवावें म्हणजे पुरे. याप्रमाणें ते वेत करून गांवांत येऊन राहूं लागले, सुख भोगूं लागले, व फक्त ग्रंथ पाठ करूं लागले; तत्रापी लोक ही गोष्ट मनांत न आणतां त्यांस विद्वान मानूं लागले. शास्त्री, पंडित, भट हे याप्रमाणें विद्या पाठ करण्यांत वेळ घालऊं लागले. कोणी व्याकरणी जो होता तो इतकेंच करूं लागला कीं, अष्टाध्यायी सूत्र पाठ म्हणावें व त्याची टीकाही पाठ करावी. हीच रीती चांगली असें वाटूं लागलें. जे नवीन ग्रंथ क्वचित् कांहीं करणारे झाले त्यांस तरी असें वाटतें कीं, प्राचीन काळच्या ग्रंथांच्या आधारानें ग्रंथ केले तर चांगलें. प्राचीन काळच्या ग्रंथांतीलच गोष्टी कायम ठेवाव्या. नवीन सर्व गोष्टी अपवित्र व पहिल्या सर्व गोष्टी पवित्र व ग्रंथही पवित्र. याप्रमाणें समजूत पडून कोणी विचार करीनातसे झाले. यामुळें लोक होते तसे राहिले. व नुसते पंडितच राहिले असें नाहीं; सर्व कसबी लोक लोहार, सुतार तांबट, वगैरे सुद्धां आपले बापाचे कसबांत मात्र हात घालतात, आणि त्यांचे इतकीच विद्या शिकतात, यामुळें नवीन कल्पना वगैरे कांहीं होत नाहींत. जी रीती पूर्वी तीन हजार वर्षांमागें होती तीच आहे. जसा तांब्या पूर्वी करीत होते, तसाच आतां करितात. पोथी जशी पूर्वी लिहीत होते तशीच आतां लिहितात. नवीन युक्ती वगैरे कांहीं नाहीं,

यामुळें छापणें, यंत्रें करणें, तारवें बांधणें वगैरे अनेक विद्या आहेत त्यांचें ज्ञान या लोकांस नाहीं. त्यांणीं कांहीं अधिक कल्पना चालविली नाहीं. जी पूर्वी बुद्धी चालली तितकीच चालून स्थीर झाली. पूर्वीच्या इतकेंच वैद्यशास्त्र, तितकेंच गणित, तितकाच भूगोल, तितकाच खगोल, याप्रमाणें सर्व तितकेंच राहिलें. पुढें चाललें नाहीं. मला वाटतें कीं, फार तर काय ज्या वस्तऱ्यानें हल्लीं हजामत करितात तोच वस्तरा पूर्वी च्यार-पांच हजार वर्षांमागें होता. जसें आज धोतर नेसतों तेंच धोतर पांच हजार वर्षांमागें नेसत होते. नवीन कायदा किंवा राज्यरीती व बंदोबस्त कांहींएक नाहीं. सांप्रत फार तर काय, परंतु प्राचीन काळाविरुद्ध कांहीं गोष्ट बोलले तर त्यास अधर्म म्हणतात. ज्या रस्त्यानें मागें लोक गेले त्याच रस्त्यानें पुढें जावें अशी रीती पडून तीस धर्म असें म्हणतात, त्यांत कांहीं नवीन कल्पना नको. यास्तव ही समजूत मोडून सर्व लोकांस अशी इच्छा उत्पन्न झाली पाहिजे कीं, आम्ही आणखी शोध करूं. पूर्वीचे लोकांनीं शोध केला तो पक्का नाहीं, त्यांतील चुका सर्व काढून आपलीं शास्त्रें शुद्ध करावीं हें चांगलें. मूर्खपणानें त्यासच चांगलें म्हणून त्याचेंच प्रतिपादन करावें हें नीट नाहीं. परंतु हें सांप्रतचे लोकांचे मनांत येत नाहीं, आणि प्राचीन काळचे लोकांचे शोधापेक्षां आपल्यास आणखी पुष्कळ शोध लागावयाचा आहे तो लावूं, अशी इच्छा उत्पन्न झाली. म्हणजे शास्त्री, पंडित, भट, जे आतां निरुपयोगी आहेत तेच पुढें उपयोगी होतील. परंतु ही मूर्खपणाची दृढ समजूत लोकांची सोडविण्याची युक्ती व प्रयत्न काय करावा याचा विचार मोठा अवघड आहे, तथापी तो सर्वांनीं केला पाहिजे. सांप्रत ब्राह्मण लोक भ्रमांत आहेत, याकरितां त्यांची समजूत पाडणें फार अवघड आहे. परंतु काळेंकरून पुढची प्रजा जी आहे तिजमध्यें ज्ञानवृद्धी अधीक होत आहे. त्या योगानें कांहीं समजूत सुटून मोकळें मन करून विचार करतील, आणि विचारास प्रतिबंध आहेत ते मानणार नाहींत. याप्रमाणें हे लोक सुधारल्यावांचून सुखी होण्याचा रस्ता मला दिसत नाहीं. तेथपर्यंत हे अधिक अधिक भिकारी होतील, आणि द्रव्यहीन होतील. हे पुष्कळ मुर्खपणाचे कामांत द्रव्य लावतात. आमचे श्रीमंत लोक वगैरे अद्याप पुष्ळक आहेत. परंतु त्यांचें या कामांत चित्त नाहीं. ते एथून उठून काशीस जातात, आणि शेंकडों रुपये धर्मास बरोबर नेतात व देवळें बांधतात. परंतु त्या रुपयांनीं जर एकादा कापड किंवा कापूस किंवा कांच करण्याचीं यंत्रें आणून कारखाना घातला, तर हजारों माणसांचा रोजगार उत्पन्न होऊन खावयास मिळेल आणि सुख होईल. नंतर काशीयात्रेपेक्षां ते रुपये सार्थकीं गेले असें म्हणावें कीं नाहीं? परंतु हें लोकांस कळत नाहीं, मनास येईल तसें खर्च करितात. यात्रा वगैरे कराव्या, परंतु जिवंत लोकांस सुखी करण्याचें टाकून यात्रा कराव्या हें उचीत नाहीं, व याणें कांहीं हित होत नाहीं. फक्त मूर्खपणा, आळस व अनुद्योगीपणा मात्र वाढतो. यास्तव ही गोष्ट सर्वांनीं मनांत आणून लोकांचे हिताचे धोरणास लागावें हें चांगलें. आजपर्यंत मागील वहिवाट होती म्हणून जरी खचीत आहे, तरी या काळास हें लागू नाहीं. आजपर्यंत

काय पाहिजे तें त्यांत सर्व आहे. अशी समजूत पडून लोक अगदीं मूर्ख झाले. अशी समजूत कां पडावी याचें कारण शोधिलें असतां असें सांपडतें कीं, पहिलें, पांडवाचे अखेरीपर्यंत ब्राम्हण आपले धर्माचे ठाईं रत होते, विद्येविषयीं मेहनत करीत होते, व उद्योगी होते, आणि दुसरे जातीचे लोक जो विद्वान असेल त्यास मात्र द्रव्य देत होते. पुढें ब्राम्हणांची विद्या वाढली, ते ग्रहणें सांगूं लागले. हिशेब करूं लागले, ज्योतीष, भविष्यें सांगूं लागले, यामुळें लोक त्यांस देवासारखे मानूं लागले. आणि त्या वेळेस राज्य चांगलें होतें व खावयास पुष्कळ होतें. यामुळें ब्राम्हण लोकांस पुष्कळ मिळत होतें. पुढें कांहीं राजे बाजीरावासारखे झाले. ते मनास येईल तसें ब्राम्हणांस द्रव्य देऊं लागले. योग्यता पाहावयाची सोडली व ब्राम्हणांचे पायाचें तीर्थ देऊन त्यांस अगदीं ईश्वर मानूं लागले; तेव्हां ब्राम्हणांनीं अशी तजवीत केली, हीच समजूत लोकांची राहावी व ब्राम्हणांचा अधिकार कधींही मोडूं नये, अशीं पुराणें व महात्में लिहिलीं. त्यांत येऊन-जाऊन गोष्टी अमूक राजानें अमूक क्षेत्रीं ब्राम्हणांस अशीं तशीं दानें केलीं आणि तो स्वर्गास गेला. म्हणून ब्राम्हणांस अमूक द्यावें, सहस्रभोजन घालावें. त्यांच्या मुखांत पडलें म्हणजे देवास पोंचतें. ब्राम्हण काय ते मुख्य. सर्वांनीं त्यांस मानावें, हींच मतें पुढें प्रबळ झालीं, आणि ब्राम्हण वंशपरंपरेचे झाले. लोक म्हणूं लागले कीं, मूर्ख जरी असला तरी ब्राम्हण जातीचा, व ब्राम्हणाचे पोटचा, तस्मात त्यास धर्म करावा; परंतु पहिलें असें होतें कीं, मूर्ख ब्राम्हणांची गणना शूद्रांत होती व उत्तम शूद्र ब्राम्हणांत येत होता. तें जाऊन सर्व ब्राम्हणवंशाचा मान वाढला. तेव्हां अर्थातच ब्राम्हणांनीं पाहिलें कीं, आम्हांस मृत्युलोकचें देवत्व आलें. आतां विद्या कशास करावी? नवीन कल्पना कशास काढाव्या? प्राचीन काळचे देव होते त्यांचे वंशीक आम्ही इतकेच म्हणवावें म्हणजे पुरे. याप्रमाणें ते वेत करून गांवांत येऊन राहूं लागले, सुख भोगूं लागले, व फक्त ग्रंथ पाठ करूं लागले; तत्रापी लोक ही गोष्ट मनांत न आणतां त्यांस विद्वान मानूं लागले. शास्त्री, पंडित, भट हे याप्रमाणें विद्या पाठ करण्यांत वेळ घालऊं लागले. कोणी व्याकरणी जो होता तो इतकेंच करूं लागला कीं, अष्टाध्यायी सूत्र पाठ म्हणावें व त्याची टीकाही पाठ करावी. हीच रीती चांगली असें वाटूं लागलें. जे नवीन ग्रंथ क्वचित् कांहीं करणारे झाले त्यांस तरी असें वाटतें कीं, प्राचीन काळच्या ग्रंथांच्या आधारानें ग्रंथ केले तर चांगलें. प्राचीन काळच्या ग्रंथांतीलच गोष्टी कायम ठेवाव्या. नवीन सर्व गोष्टी अपवित्र व पहिल्या सर्व गोष्टी पवित्र व ग्रंथही पवित्र. याप्रमाणें समजूत पडून कोणी विचार करीनातसे झाले. यामुळें लोक होते तसे राहिले. व नुसते पंडितच राहिले असें नाहीं; सर्व कसबी लोक लोहार, सुतार तांबट, वगैरे सुद्धां आपले बापाचे कसबांत मात्र हात घालतात, आणि त्यांचे इतकीच विद्या शिकतात, यामुळें नवीन कल्पना वगैरे कांहीं होत नाहींत. जी रीती पूर्वी तीन हजार वर्षांमागें होती तीच आहे. जसा तांब्या पूर्वी करीत होते, तसाच आतां करितात. पोथी जशी पूर्वी लिहीत होते तशीच आतां लिहितात. नवीन युक्ती वगैरे कांहीं नाहीं,

जरी कसेंही झालें, तरी त्याचा उपयोग नाहीं. काळ पाहून काळमानानें व्यवहार चालवावा हें उत्तम आहे. परंतु या विचारावर लोक येतील तों कितीएक काळ पाहिजे व भट भिक्षुक वगैरे यांस विचार व विद्या काय आहे याचा अर्थ कळणें हें अवघड काम आहे. व प्राकृत भाषा सुधारून त्या भाषेंत ग्रंथ बहुत होऊन सर्व लोकांस कळले पाहिजेत. यास्तव जे लोक या देशाचें कल्याण इच्छिणारे असतील, त्यांणीं लोकांची सदरील समजूत दूर करण्याची मेहनत केली पाहिजे व स्त्रियांस शहाण्या केल्या पाहिजेत, म्हणजे लोक ज्ञानचक्षूनें पाहूं लागतील.

लो० हि०



ता० २५ नोवेंबर १८४९

पत्र नंबर ८३

भक्ती, कर्म आणि ज्ञान

हिंदुलोकांचा धर्म वास्तविक विचारानें पाहिला तर फक्त इतकाच आहे कीं, परमेश्वर जो एक त्याचें भजन करावें. आणि त्यावर भाव बसण्याकरितां कांहींतरी मध्यस्थासारखे दगडाची मूर्ती, गुरू, किंवा नदी कांहींतरी घेऊन त्याचे आश्रयानें भक्ती दृढ करावी. आणि भाव पक्का ठरला म्हणजे त्या मध्यस्थाचीही गरज नाहीं व कोणत्याही कर्माची गरज नाहीं. आणि वेदशास्त्र यांच्याही आज्ञा त्यांस मानावयास नकोत. जे पुरुष संसारांत आहेत त्यांस मात्र वेदशास्त्र शासन करितें, परंतु परमार्थावर लक्ष देऊन जे संसार सोडितात त्यांस त्यांचें शासन नको, ही गोष्ट सर्व कबूल करितात. जरी ते म्हणतात कीं, शास्त्र ईश्वरापासून निर्माण झालें तत्रापी ते असें म्हणतात कीं, व्यवहार नीट चालण्याकरितां मात्र तें केलें. मोक्षाचें साधन शास्त्र नाहीं. तसेंच ज्ञान म्हणजे मनुष्यानें सारासार विचार पाहून परमेश्वराशीं ऐक्यता पावून राहावें म्हणजे त्यास शास्त्राची गरज नाहीं. यावरून ज्ञान हें सर्व कर्ममार्गाहून व शास्त्राहून अधिक आहे. व ज्ञान हें फक्त मनुष्याचे अकलेपासून फळ आहे, तेव्हां अक्कल हीच मोक्षाचें साधन आहे. आणि अकलेपासून जो ज्ञानधर्म उत्पन्न झाला, त्याणें मोक्षाचें साधन होतें. व्यवहार व संसार यथास्थित होण्याकरितां पूर्वापार अनुभवावरून किंवा मनुष्यांनीं व्यवस्था लक्षांत आणून जे नियम ठरविले ते शास्त्र व यज्ञ, पूजा इत्यादी जे धर्म आहेत, तेही त्याप्रमाणें होत. तें कांहीं ज्ञान नाहीं. मग मनुष्यांनीं केले असतां अथवा शुद्ध समुदायमतानें झाले असतां सर्वांनीं मानावें म्हणून ईश्वरप्रणित असें ठरऊन ग्रंथाची योग्यता वाढविली. ज्ञानावांचून मोक्ष नाहीं, व सर्व

प्राण्यांमध्यें धन्य वशिष्ठ व ब्रह्मदेव हेदेखील ज्ञानी होऊनच मुक्ति पावतात. परंतु प्रजेस व्यवहार समजण्याकरितां नियम बांधिले कीं, दारू पिऊं नये, सोनें चोरूं नये, या गोष्टी सर्वांस अनुभवावरून वाईट वाटून हे नियम ठरविले असतील हें उघड आहे. किंवा ईश्वरानें सांगितलें किंवा प्रेरणा केली असें म्हटलें तरी शोभेल. धर्म म्हणजे व्यवहार, व ज्ञान म्हणजे मोक्षाचें साधन. एका राजाची गोष्ट आहे कीं, त्याणें आपली स्त्री एकास अर्पण केली. त्याविषयीं दुसऱ्यानें पुसलें कीं, तुझ्या मनांत कांहीं राग आला होता कीं नाहीं ? त्याणें सांगितलें कीं, 'नाहीं.' तेव्हां त्यास पाप लागलें नाहीं. याप्रमाणें ज्या व्यवहारामध्यें महान पातकाच्या गोष्टी त्याही ज्ञानी यांचें ठायीं निर्दोष होतात. कारण कीं, त्यांचे ठायीं मनास विकृति नाहीं, मन शुध्ध असलें म्हणजे त्यास धर्माचा प्रतिबंध नाहीं. मनास विकृति असल्यास त्याणें धर्माप्रमाणें वागलें पाहिजे, असें आहे. तात्पर्य इतकेंच कीं, हिंदु धर्मांत कोणतेंही मत नाहीं असें नाहीं. भजन करण्याचे मार्ग दुष्ट तंत्रापासून तों संन्यासापर्यंत आहेत. नानाप्रकारचें देवाचें भजन करणें हें सर्व आहे. संस्कृत भाषेंत कोणताही शब्द असला तरी अर्थ करितात व कोणतेही भाषेंतील शब्द असो, अक्षरें असलीं म्हणजे अर्थ करितात तद्वत हिंदुशास्त्र आहे. त्यांत कांहीं व्यंग नाहीं. जें मत म्हटलें तें आणि जो शास्त्रार्थ पाहिजे तो आहे. परंतु सर्वांचें तात्पर्य काढलें तर इतकें निघतें कीं, या धर्मामध्यें मुख्य तीन मार्ग आहेत. ते असे : एक ज्ञानमार्ग, दुसरा भक्तिमार्ग, तिसरा कर्ममार्ग. यांचा इतिहास खालीं संक्षेपानें लिहितों.

१. ज्ञानमार्ग. यास आधार उपनिषदें, कांहीं पुराणें व प्राकृत ज्ञानेश्वरी, दासबोध यांसारिखे ग्रंथ आहेत व त्यांचे आचरणारे तूर्त बैरागी किंवा विरागी किंवा संन्यासी व परमहंस गोसावी इत्यादि लोक आहेत. ज्ञानमार्ग्यांनीं संसार बाह्यात्कारी नव्हे, परंतु अंतर्यामापासून सोडला पाहिजे, कदाचित संसारांत असलें तर अलिप्त असलें पाहिजे. वांछना, इच्छा, व आशा नसाव्या. व ईश्वर व मी एकच आहे असें म्हणून ईश्वराचे एकत्वपणाचे चिंतनांत असावें. भोग नसावा, कर्म नसावें, शरीराची, मिळकतीची काळजी, खबरदारी नसावी. अद्वैत मत सोडावें, पूजन व पूज्यभाव सोडावा, परंतु मायागुणानें व्याकुळ होऊन आपल्यास देही मानलें होतें; परंतु ही माझी भ्रांती गेली असें कल्पून त्यांत राहावें, म्हणजे मरणांतीं सायुज्यपद प्राप्त होतें. म्हणजे जशी कल्पना तशीच सिद्धि होते. या मतास अनुसरणारे श्रीशंकराचार्य व ज्ञानेश्वर हे कलियुगीं व पूर्वीं श्रीकृष्ण, जनकराजा, शुकस्वामी, इत्यादि झाले आहेत.

२ दुसरा भक्तिमार्ग. यास आधारी शांडिल्याची स्मृति आहे व यास भक्तिशास्त्र असें नांव आहे, तसे भागवत व गीता इत्यादिक आधार आहेत व त्या मार्गाचे प्राचीन काळीं आचरणारे प्रल्हाद, उद्धव, हनुमान् इत्यादिक यांणीं भक्ति केली व अलीकडे तुकाराम, नामदेव हे सर्व साधु याच मार्गांतील होते. या मार्गांत असें आहे कीं, द्वैतमत धरावें. मी वेगळा, ईश्वर वेगळा असें मानावें. मी सेवक तो यजमान असें जाणावें.

आणि भक्ति करावी, क्षमा मागावी, समीपता मरणानंतर इच्छावी. प्राणी वेगळा, ईश्वर वेगळा, असें समजावें. किरकोळ शास्त्रांतील कर्में कांहीं करूं नयेत. फक्त सगुण देवावर भक्ति ठेऊन असावें. जेथें कर्म करावयाचें तेथें त्याचीच उपासना करावी व ही भक्ति एका परमेश्वराची असावी किंवा त्यांचा अवतार किंवा तत्प्रतिमा मूर्ति असून त्यामार्गानें भगवंताचें सेवन करावें, हा मार्ग बहुत लोकांस आवडतो. व वैष्णव यांचें मत हेंच आहे. विशिष्टाद्वैत, रामानुज, राघवाच्यार्य वगैरे यांचें हेंच मत आहे. ते म्हणतात कीं, माया ईश्वरकृपेवांचून दूर व्हावयाची नाहीं; याजकरितां सेवकभावानें भजावें हेंच उत्तम. परंतु वेदांती म्हणजे ज्ञानमार्गी यांचे हिशेबानें भक्तिमार्ग खालची पायरी आहे.

३ तिसरा कर्ममार्ग. त्यास आधार श्रुती, स्मृती व पुराणें आहेत. पूर्वी वशिष्ठ वगैरे ऋषी ज्याणीं यज्ञ, याग, तप, अग्निहोत्रें वगैरे केलीं, ते सर्व कर्ममार्गी होते. व जे व्यवहारांत गृहस्थ आहेत, लग्नें करितात व घरांत राहतात ते सर्व कर्ममार्गी होते. कर्ममार्गांत एका देवाची भक्ती नाहीं. व ज्ञानही नाहीं. याजकरितां ही कनिष्ठ पायरी; पण प्रथमची आहे. यामध्यें पंचतत्त्वांचें भजन आहे. व स्नानसंध्यादिक कर्में व्यवहार इत्यादिक आहेत. त्यांमध्यें ईश्वराचें विशेष ज्ञान नाहीं. अनेक देवता आहेत. त्यांस संतुष्ट करून स्वर्गइच्छा करावी, इतकेंच यांत आहे व इंद्रियदमन वगैरे करावें. यांत कांहीं कर्ममार्गी ऋषीदेखील मोठे रागीट असत. व शाप देत. हें प्रकरण मांत्रिक आहे.

एकूण हे तीन मार्ग प्रसिध्ध आहेत. सर्व हिंदुलोक या तिहींतील एका मार्गांत बहुधा असतात. आमचें मत असें आहे कीं, तिहीं मार्गांमध्यें चांगल्या गोष्टी आहेत. त्या घेऊन जे शहाणे असतील त्यांणीं परमेश्वराची भक्ती करावी. जगांत दया करावी, यांत सर्व आहे. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यांत घोटाळा दिसतो.

लो० हि०

ता० १ दिसेंबर १८४१

पत्र नंबर ८४

संस्कृत विद्या

संस्कृत विद्या मोठी गहन आहे व तिचा उपयोग मोठा आहे असें लोकांस वाटतें. याजमुळें शास्त्री, पंडीत वगैरे संस्कृताचे विद्वान यांस लोक मानतात. व वैदिक हे जरी ग्रंथ नुस्ते पाठ करितात, तरी निदान पक्षांत ग्रंथांचें रक्षण तरी करितात. म्हणून त्यांस लोक मानतात. परंतु या संस्कृत विद्येचें तात्पर्य पाहिलें तर, त्यांत व्यावहारीक

उपयोग कांहींच नाहीं. संस्कृत भाषा फार प्राचीन आहे. आणि देव म्हणजे जुने हिंदु त्यांची ती भाषा आहे. व तिजला बहुतांनीं शोधून संस्कार देऊन सुधारली आहे. म्हणून तीस संस्कृत म्हणतात हें खरें, परंतु तिजमध्यें जें ज्ञान वाढलें तें कोणांचेही उपयोगीं नसोन, तिचा विद्यार्थी केवळ भ्रष्ट होईल किंवा विलक्षण तऱ्हेचा मनुष्य होईल. याचें कारण त्यांतील ग्रंथांत फारसें ज्ञान मुळींच नाहीं. जें आहे तें केवळ जुन्या काळचें. त्याचा आतां कांहीं उपयोग नाहीं. प्रथम या भाषेंतील ग्रंथांचे अनुक्रमानें निवेदन करूं. प्रथम या वेदांतील मंत्रसंग्हिता आहेत. यांत पाहिलें तर अग्नि, मित्र, वरुण यांच्या प्रार्थनेचीं सूक्तें म्हणजे प्रबंध आहेत. ते नाना प्रकारचे छंदांनीं रचले आहेत. पुढें ब्राम्हणें म्हणून बखरीसारखे ग्रंथ आहेत. त्यांत या मंत्रांचा उपयोग कसा करावा, या मंत्रानें जनावरें मारून यज्ञ कसे करावे, कोणता मंत्र म्हटला तर काय फळ होतें हें सांगितलें आहे. या ग्रंथांचे आधारानें ब्राम्हण हे मोठे योग्यतेस पावले. किंतीएक काळपर्यंत त्यांचे आशीर्वाद, त्यांचे शाप, त्यांचीं अनुष्ठानें हीं मोठीं सामर्थ्यवान आहेत, असें लोकांत प्रसिध्ध झालें होतें. याजमुळें ब्राम्हण हे जसे हल्लीं पंचाक्षरी, औसर, अंगास आणणारे, देवाचे साक्षात्कारी, मंत्री, जादूगर, करामती करणारे, अवलिया वगैरे ढोंगी लोक यांस लोक मानतात, व भितात, त्याप्रमाणें सर्व लोक ब्राम्हणांस भीत आहेत. राजे राज्य घेण्याकरितां, निपुत्रिक पुत्र होण्याकरितां, गरीब धनप्राप्तीकरितां, रोगनाशनार्थ, शत्रुनाशनार्थ, ब्राम्हणांस बोलाऊन त्यांस अनुष्ठानें, जप, तप, मंत्र, साधनें करावयास सांगत. लोकांस असें वाटत होतें कीं, ब्राम्हणांचे हातीं सर्व आहे. व वेदाचे मंत्रांत सामर्थ्य आहे. देवापेक्षां ब्राम्हणांचे मंत्र जबरदस्त. ब्राम्हण हाक मारतील तेव्हां देव हात जोडून येतात. राक्षस मंत्रांनीं पळतात, पर्जन्य पडतो, रोग जातात. मोठीं मोठीं अरिष्टें शमन पावतात; ही समजूत अद्यापि लोकांमध्यें आहे. परंतु ब्राम्हणांनीं पूर्वीचे तापस स्वरूप व जटा, व्याघ्रांबरें, दाढ्या, भस्म, दर्भ, वनवास इत्यादि भयंकर प्रकरणें सोडल्यामुळें त्यांचें तेज कमी झालें. लोकांस असें वाटूं लागलें कीं, हे आपल्यासारखेच आहेत. परंतु पहिले हे मोठे उग्र होते. आतांही असे उग्र कोपी आहेत. त्यांस अडाणी लोक भितात. याप्रमाणें हें जादू–प्रकरण माजलें. पुढें तो काळ जाऊन शास्त्रें उत्पन्न झालीं. त्यांत वेदांतमत निघालें. त्याणें हें पूर्वीचें ढोंग सर्व खोटें असें ठरविलें. अनेक देवांचीं अनुष्ठानें खोटीं असें प्रसिध्ध केलें. एकच परमेश्वर व त्याचें मनन करणें हेंच श्रेयस्कर असें सांगितलें. त्याजवर बौध्ध मत झालें. त्यांणीं तर वेदाचा अगदींच उपहास केला. व त्यांतील उग्र म्हणजे हिंसा, वपायाग इत्यादि कर्मांची निर्भर्त्सना करून दयाधर्माची प्रसिध्धी केली. त्यानंतर तें मत रद्द होऊन पुन्हा ब्राम्हणमत उभारलें, तें पूर्वीप्रमाणें तर कोठून होईल. त्यास जखमा फार लागल्या म्हणून थोडेसें उभें राहिलें. त्याची भरजवानी गेली. नंतर पुराणें म्हणून ग्रंथ झाले. त्यांत कांहीं वेदांत, कांहीं भक्ति, कांहीं वैदिक कर्में, कांहीं नवीन देवता, नवीन व्रतें, दानें वगैरे लिहिलीं. या पुराणकर्त्यांचा हेतू

असा होता कीं, सर्व वाद तोडून कोणी कोणत्याही मतानें वागला तरी चिंता नाहीं. यास्तव सर्व मतांचा संग्रह त्यांणीं केला. त्यानंतर कांहीं काळ गेल्यावर निबंध, ग्रंथ झाले त्यांणीं पूर्वीचे सर्वच ग्रंथ ईश्वरी असें मानून सर्व ओझें डोकीवर घेतलें. तेव्हां आतां संस्कृत शिकणाऱ्यांचे हातीं कोणतें ज्ञान येतें हें पाहिलें पाहिजे. तर हा विचार या ज्ञानानें तीनचार हजार वर्षांचा जुना होता, त्याचा हल्लींचे काळांत जन्मलेलेपणा जातो. कसा म्हणाल तर त्यास म्हटलें कीं, लंकेंत कोलंबो शहर आहे तर हा म्हणतो कीं, लंका कोणास सांपडावयाची नाहीं. तिच्या सभोवतें सुदर्शन फिरत आहे. त्यास विचारलें कीं तापी नदीचा उगम कोठें आहे तर तो म्हणतो कीं, ती यमाची बहिण असें पुराणांत लिहिलेंच आहे. याप्रमाणें पुराणें वाचून त्याच्या मनांत अनेक कल्पित कादंबऱ्या भरून त्यास हल्लीं सृष्टी आहे, त्याहून वेगळी दिसते. संक्रांत हें सूर्याचें राशीक्रमण हें, तो जाणतच नाहीं. एक म्हणतो ती रेड्यावर बसून दक्षिणेस जात आहे. आणि ती दीडशें कोस लांब आहे. आणि तिच्या पाठीमागें एक दुसरी बाई किंकरांत आहे. तेव्हां या मनुष्यास असें वाटतें कीं अलौकिक ज्ञान जें कोणास ठाऊक नाहीं, तें मला या पुराणांमुळें ठाऊक झालें. या अभिमानांत तो असतो. वास्तविक पाहिलें तर त्याचें ज्ञान एक कपर्दिकेच्या किमतीचें नसोन त्याचे व इतर लोकांचे नाशास कारण झालें. त्यानंतर दुसरा भाग म्हणजे मंत्र-शास्त्र. हें जर त्याणें पाहिलें, तर नाना प्रकारचीं अनुष्ठानें, नरसिंह, शरभ, वेताळ, योगेश्वरी इत्यादि देवता, व त्यांस बोलावण्याची रीत, व त्यांस प्रसन्न करण्याचे जप त्यांस माहित होतात. आणि तो आपले अंगीं असा ताठा आणितो कीं, मी काय तो मोठा, मजमध्यें मोठें सामर्थ्य आहे. मी पाहिजे त्यास पुत्र देईन, दौलत देईन, शत्रु मारीन, पण त्याचे हातीं कांहीं नसतें. हा स्वप्नासारिखा भ्रमांत असतो. ते ग्रंथ वाचून त्यास भ्रम पडतो. करावयास जातो तों त्यांत कांहीं नाहीं. बरें, आणखी संस्कृत विद्येच्या दुसऱ्या भागांत जाऊं. जर तिचा अभ्यासी याज्ञिक झाला तर त्यास असें वाटतें कीं, मला अमुक शास्त्र म्हणतां येतें, तमुक शास्त्र म्हणतां येतें. पशु मारावे कसे, त्यांची अंगें कशीं काढावीं हा खाटिकपणा घेतो. यज्ञाचे मंडप कसे घालावे, त्यांचे मागेंपुढें मंत्र कसे ओरडून म्हणावे, हें ठाऊक आहे. त्याचे प्रमाणास हा ग्रंथ, तो ग्रंथ, प्रत्यक्ष श्रुति व स्मृति, अशा तो काढून दाखवितो व यज्ञ करणारास थेट स्वर्गास नेऊन पोचविणारा तो मीच असें मानतो. बरें, आतां संस्कृताचे चौथे भागांत जाऊं. कोणी धर्मशास्त्र पढला तर त्यास शंभर ग्रंथ श्राध्दाबद्दल, पन्नास ग्रंथ शौचनिर्णयाबद्दल, २५ ग्रंथ संस्काराबद्दल असे अनेक निरुपयोगी विषयांविषयीं वादविवाद पाहून त्यांत तो आपल्यास मोठा धन्य मानितो. श्राध्दास पदार्थ किती असावे, नसावे कोणते, भट किती असावे, दक्षिणा किती असावी, तीथ कोणती, काळ कोणता, तीळ किंवा तांदूळ असावे, दर्भ किंवा दूर्वा, द्रोण पालथा ठेवावा किंवा उताणा, कोणत्या दिशेस बसावें, आधीं देवांस कीं आधीं पितरांस गंध लावावें, ही सर्व कवाईत त्यास पाठ होते, आणि त्यांतील वाद त्यास ठाऊक होतात.

त्याविषयीं बोलण्यास तो मोठा उत्सुक होतो. त्याची त्यास मोठी हौस येते, कोठें श्राध्ध असलें तर तेथें आपली शेखी तो मिरवतो. आणि दोनचार आणे मिळवून घरास आणितो. बरें, संस्कृत विद्येचे पांचवे भागांत आपण शिरूं. विद्यार्थी न्याय, व्याकरण-मीमांस[ा] पढला तर मग हें जग दिसतें हें खरें किंवा खोटें याचीच भ्रांती त्यास पडून त्याविषयीं तो वाद घालीत बसतो. कोणी म्हणतो १० पदार्थांनीं सृष्टी घडली; कोणी म्हणतो चोवीस; कोणी म्हणतो सात; कोणी म्हणतो, मी आणि ईश्वर एकच जातीचे, मध्यें माया मात्र आहे. कोणी म्हणतो सुखदुःख हें मनांत आणूं नये, आळसांत बसावें. प्रारब्धीं आहे तें घडतच आहे. या मानसिक कल्पनेच्या जाळींत तो सांपडून वेडा होतो. बरें, साहावे भागांत पाहूं. जर तो ज्योतिष शिकला तर म्हणूं लागतो अमूक ग्रह आला तो पीडा करील. मंगळास अमूक दान पाहिजे. शनी सूर्याचा मुलगा, परंतु मोठा द्वाड ग्रह. त्याचा जप केला असतां शांती होते. त्याचे डोकीवर तेल ओतावें किंवा ब्राम्हणास लोखंड द्यावें. परंतु हें मोठें उग्र दान आहे. कोणी घेणार नाहीं. प्रश्न सांगतो, पुढलें भविष्य, आयुष्य, रोग, शत्रु, संपदा यांविषयीं नाना प्रकारचे भ्रम लावितो. याप्रमाणें कोणतेही भागांत जरी पाहिलें तरी संस्कृत विद्या निरुपयोगी, व नाना प्रकारचे कुतर्क उत्पन्न करणारी व संसारावरील चित्त उडवून आळशी करणारी, व निरुपयोगी कर्में करविणारी आहे. सांप्रत काळीं जें ज्ञान पाहिजे तें त्यांत मुळींच नाहीं. सांप्रत काळचे देश, तेथील राज्यें व फौजा व व्यापार इत्यादिकांची माहिती, यंत्राची उत्पत्ती, कायदेकानू कसे असावे, गैर चाली कोणत्या आहेत, टाकाव्या कोणत्या, ठेवाव्या कोणत्या, हें त्यांस माहित नसतें. दोनचार हजार वर्षांपाठीमागें पिकलेलें वेड वगैरे समजुती व वांकडे तर्क हेच आतां काढून त्यांची वाटाघाट करीत, आयुष्य घालवितात. जोंपर्यंत बाहेरचे देशांतील वर्तमान लोकांस ठाऊक नवतें तोंपर्यंत याच ज्ञानाचा थोरपणा होता. व हें ज्ञान ज्यापाशीं होतें त्यास थोर मानून त्याचे पायाचें तीर्थ घ्यावें येथपर्यंत मजल आली. परंतु आतां बाहेरचें ज्ञान या देशांत शिरलें, त्याचे पुरानें हें जुनें ज्ञान वाहून गेलें. त्याची तुच्छता अगदीं स्पष्ट झाली. पाठीमागून हें पोकळ ढोंग चालत आलें. त्याचा पोकळपणा उघडकीस येऊन त्या ढोंगावर पोट भरणारे यांचें महात्म कमी झालें. तर आतां ज्यास थोरपणा पाहिजे असेल, त्यांणीं सांप्रतकाळचे ज्ञानाची संपदा मिळविण्याचा प्रयत्न करावा. ज्या ज्ञानानें आपल्यावर इतर लोकांनीं सरसी केली तें ज्ञान आपण धिःकारूं नये. कारण कीं त्याचा आपणास अनुभवच आला आहे. याजकरितां सावधगिरीचें लक्षण हेंच कीं काळास ओळखून त्याप्रमाणें चालावें. असें न केलें तर फार फजीत होऊन, दुर्दशा झाली आहे त्यापेक्षां अधिक होण्याचा संभव आहे. पूर्वी जुन्या काळचे ब्राम्हण म्हणजे ऋषीवगैरे यांणीं अपुर्तीं कामें ठेविलीं तीं आपण पुर्तीं करावीं. त्यांणीं वैद्यकत्व पूर्णत्वास आणिलें नाहीं. तर आतां आपण अनेक देशच्या कल्पना एके ठाईं करून नवे शोध करून तें सुधारावें म्हणजे खरा थोरपणा मिळेल व लोकांचें हित होईल. असें न होईल तर लोक वैद्यास

४४८ ४४०६२ निबंध. ३५।११

सोडून नवे डाक्टर व नवीं इस्पितळें यांचा आश्रय करितील, आणि पुराणे वैद्य बिचारे उपाशीं मरतील. त्याचप्रमाणें सर्व विद्येचें आहे.

लो० हि०

तारीख १ डिसेंबर १८४१

पत्र नंबर ८५

ज्ञान हाच पराक्रम

सांप्रत काळीं हिंदु लोक गरीब आहेत व अज्ञानी आहेत, एतद्विषयीं मी सिद्धांत लिहितों कीं, संपदा आणि ज्ञान हीं दोन्ही जोंपर्यंत यांस आपली स्थिति कळली नाहीं तोंपर्यंत प्राप्त होणार नाहींत. जरी हा देश उत्तम प्रकारचें उत्पन्न करणारा, व धनधान्य समृद्धिकर्ता आहे, तरी या लोकांस त्याचें फळ नाहीं. आतां पृथ्वीवर दुसरे अनेक देश आहेत. त्यांची अवस्थाही फार वाईट आहे. रयत लोक इकडल्यापेक्षां तेथें दरिद्री आहेत, परंतु हें उदाहरण या देशास उपयोगी नाहीं. कारण कीं, हा देश पूर्वी कसा होता व हल्लीं कसा आहे हें पाहून विचार केला पाहिजे, कितीएक लोक असे आहेत कीं, मुसलमानांचे राज्यास नांव ठेवित नाहींत, परंतु इंग्रजांचें राज्य विशेषेंकरून दरिद्रास कारण समजतात. व त्यांस कांहीं नवीन शाहणपणाची युक्ती सांगितली तर ऐकत नाहींत; आणि म्हणतात कीं, आम्हांस आजपर्यंत या युक्ती कोठें होत्या? आजपर्यंत आम्ही दुःखी नव्हतों. आतां मात्र झालों ते इंग्रजांमुळें झालों. यास्तव या युक्तीनें आमचें दरिद्र जाणार नाहीं; इंग्रज जातील तर मात्र जाईल. असें समजून युक्तीस बहुत लोक अगदीं मानीत नाहींत. फक्त हें राज्य वाईट असें म्हणत संध्याकाळपासून उजाडेपर्यंत आणि उजाडल्यापासून सारा दिवसभर जप करितात. या प्रकारचे लोक आम्ही नित्य पाहातों, तेव्हां अशा लोकांची समजूत पाडणें हें सर्वांहून अवघड आहे. परंतु पाहा कीं, असा विचार करीत बसणें, हा मूर्खपणा आहे. उद्योगास झटणें हा शाहाणपणा आहे. दरिद्र आहे खरें, व तें पदोपदीं वृद्धिंगत होत चाललें आहे; द्रव्याचें साधन कमी होत चाललें आहे. परंतु अशा जपानें उपाय होणार नाहीं. जर विद्या व ज्ञान येणें-करून आपलें दरिद्र कमी केलें तरच होईल. ज्ञान जेथें आहे तेथें सर्व पराक्रम आहे; परंतु हिंदु लोकांमध्यें एकमत असेल तर या गोष्टी घडतील. आपलेपासून आपली कंठाळ एकादा घेऊन गेला तर जाग्यावर बसून शिव्या दिल्या तर कंठाळ येईल कीं काय? यास्तव जे नेणारे आहेत ते परत देण्यास अनकुळ करण्याचे जे यत्न असतील ते

करावे. ते तरी शहाणपणाखेरीज कसे सांपडतील ? यास्तव शाहणपण मुख्य पाहिजे. त्याचे योगानें दरिद्र कमी होईल. या देशांतील लोकांनीं विलायतेस जावें, तेथें वस्ती करावी; विद्या शिकावी; जे श्रीमान आहेत त्यांणीं या कामांत द्रव्य खर्चावें; तिकडील ज्ञानाची वृद्धि करावी; तिकडील कला, कौशल्य, इकडे आणावें; आपल्या दुष्ट चाली सोडाव्या, हेंच शाहाणपण आहे. या शाहाणपणानें या लोकांस समर्थता येईल. आणि समर्थतेनंतर द्ररिद्र जाईल. मुख्य ज्ञानापासून सर्व पराक्रम आहेत. कधींकधीं ज्ञानाबरोबर लागलेच पराक्रम दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. कारण कीं, कितीएक मूर्ख असून अधिकार पावतात, तेव्हां त्यांस अधिकार कसा मिळाला ? हा प्रश्न बहुतेक हिंदुलोक करितात. परंतु हा केवळ पोरकट प्रश्न आहे, पराक्रमाची रीती अशी आहे कीं, जो कोणी घरांत प्रमुख शाहणा असतो, तो बहुत द्रव्य संपादन करितो. नंतर त्याचे विभाग पश्चात किंवा केव्हांतरी होतात. तेव्हां त्यांतील एक विभाग अयोग्य पुरुषाचे हातीं लागतो. म्हणून कोणी जर असें म्हटलें कीं, हें सर्व मूर्खपणानें संपादन केलें आहे, तर ही गोष्ट सत्य नाहीं. कारण कीं, वाटणींत ही चूक आहे; परंतु संपादनांत मूर्खपणा नाहीं. मिळविणारानें शाहाणपणानेंच मिळविलें आहे. तसें इंग्रज लोकांनीं सर्वांनींच पराक्रम केला असें नाहीं व सर्व शाहणे आहेत, असेंही नाहीं, परंतु त्यांच्यांतून जे शाहाणे निघाले, त्यांणीं पुढारी होऊन कवाईत व युध्धविद्या काढिली आणि पुढें हिंदुस्थानांत आले त्यांत जे शाहाणे पुरुष एलफिन्स्टनसाहेबाप्रमाणें किंवा हेस्टिंगसाहेबाप्रमाणें झाले, त्यांणीं पराक्रम केला, आणि जातेसमयीं आपले लोकांचे हातांत अधिकार दिला. आणि सांगितलें कीं, तुम्ही आतां याची वहिवाट करा. त्या वहिवाटीवर कोर्ट डैरेक्टर व गवरनरादिक आहेत, ते त्या पराक्रमाचे फलाचे लोकांस हिसे देत आहेत. कोणास जडज, कोणास कलेक्टर नेमतात. त्यांणीं एखादा हिसा भिडेनें मूर्खास दिला म्हणून मूर्खपणानें हा पराक्रम मिळविला असें सिद्ध होत नाहीं. याजकरितां ही समजूत आमचे लोकांची मुख्य पडली पाहिजे. शाहाणपणाशिवाय कांहीं पराक्रम नाहीं. यास्तव हिंदुस्थानांत असे कोणी लोक प्रमुख होऊन त्यांणीं सर्व आपले लोकांस बळवान व शाहाणे करून ठेविले पाहिजेत. त्यांस नवीन द्रव्योत्पत्तीचे मार्ग दाखविले पाहिजेत. इंग्रजांनीं राज्य बलात्कारानें घेतलें असें असलें तर असो; परंतु व्यापार तर बलात्कारानें घेतला नाहीं ? त्यांतच हे लोक कां शाहाणे होत नाहींत ? इकडे कांच करितां येईल, व तारवें करतां येतील. लोखंडाचा रस करितां येईल. भूमींतला कोळसा सांपडेल. कापड करितां येईल. इतक्या गोष्टी समजून आल्या म्हणजे किती कार्य झालें ? व हे लोक किती बळवान होतील ? याप्रमाणें प्रथम असेंच होऊं द्या कीं, सर्व व्यापाराचा माल इकडेच व्हावा; विलायती नको. इंग्रजांस इकडील कच्चा माल खरेदी केल्याशिवाय निर्वाह नाहीं. यास्तव अशी गोष्ट केल्यानंतर राज्य मात्र त्यांच्या हातीं राहील. राहिलें तर काय चिंता आहे ? जो पैसा तिकडे ते नेतील तो आपण जिन्नस देऊन खरेदी करून परत आणूं. परंतु या गोष्टीस

शाहाणपणा असून सर्व लोकांचें काम डोकीवर घेणारे पाहिजेत. असे लोकांचा फार तोटा आहे.

लो० हि०

पत्र नंबर ८६

सांप्रतचे पंडितांचें ज्ञान

सांप्रत काळचे पंडितांचें ज्ञान असें असतें कीं त्यांच्या जिवास, शरिरास, प्रपंचास कांहींच उपयोग पडत नाहीं. केवळ वादविवादच करण्यास व लोकांस तमाशा दाखविण्यास मात्र उपयोगी आहे. यास्तव मला हे पंडित बहुरूपी, सोंगाडी व चित्रकथी याहून बरे दिसत नाहींत. बारा पंधरा वर्षेंपर्यंत व्याकरण किंवा न्याय यांचें अध्ययन करितात. म्हणजे त्यांस पंडितपणा प्राप्त होतो. परंतु त्यांची विद्या अशी असते कीं, एकानें म्हणावें, या शब्दाचे अंतीं "च" असावा, दुसऱ्यानें म्हणावें "चा" असावा. याजविषयीं वाद शेंकडों प्रमाणें दाखऊन सर्व दिवसभर करतात. शेवटीं निश्चय एकाचाही होत नाहीं. तसेच नय्यायिक हेही भांडतात. एक म्हणतो ईश्वर आणि जीव एक आहे. दुसरा म्हणतो दोन्ही विभक्त आहेत. तिसरा म्हणतो, ईश्वर गुणी आहे. चवथा म्हणतो निराकार आहे. याप्रमाणें रिकामा वाद चालविण्यांत जन्म घालवितात आणि त्यांस त्या वादांतील सत्य काय आहे हें समजण्याची इच्छा नसते. परंतु परस्परापेक्षां श्रेष्ठ कोण होतो, हें पाहाण्याकरितां भांडतात. आणि मग त्या वादांत सत्यानेंच भाषण करतात असें नाहीं; मनास येईल तशी कल्पना, कपट, युक्ति, मूर्खपणा, इत्यादि योजून सरासरी फार बोललेंसें करतात. त्यांस कोणी म्हणतात, असे निर्फळ वाद घालण्याच्या ज्या ज्या विद्या हे शास्त्री शिकतात त्यापासून इहलोकीं व परलोकीं हित नाहीं. आपले जिवाचेंही कल्याण नाहीं. व दुसऱ्याचें जिवाचेंही नाहीं; एक व्याकरण म्हणावयास बाराचवदा वर्षें लागतात. त्याचें कारण हेंच आहे कीं, त्या प्रकरणीं वाद करण्यास शिकतात; ग्रंथ पाठ करितात; व प्रतिष्ठेकरितां वाद करितात. हे सर्व शास्त्री, पंडित, या प्रकारचे आहेत. त्यांस व्यवहारिक ज्ञान नाहीं. यांस मोडीचें लिहितां देखील येत नाहीं. व कोणतेंही काम करावयाचे हे उपयोगीं नाहींत. बरें इतकें असून यांची वर्तणूक पाहिली तर फारच वाईट. सामान्यतः हे गोंधळी, भाट, याप्रमाणें व्याजस्तुति करून गृहस्थास भुलऊन पैका काढणारे लोक आहेत. प्रातःकाळीं उठले म्हणजे यांचा प्रथम उद्योग हाच आहे कीं, गृहस्थांचे घरीं जाऊन त्यांची स्तुति करावी. त्यामध्यें त्यांचें जसें वर्णन पाहिजे तसें करून दोन पैसे निघाले म्हणजे त्यांचें कार्य झालें. पैशाकरितां महापातकी असला तरी त्यास शुध्ध म्हणतील. महान नीच असला

तरी त्यास सन्मान देतील. पापानें द्रव्य मिळविलें तरी त्यांस दिलें म्हणजे तो सद्व्यय झाला, अशी समजूत करून आणखी तसेंच मिळीव म्हणून सांगतील. याचे उदाहरणास फार लांब जावयास नको. बाजीराव पेशव्यानें पुण्यांत ब्राह्मणांचे मनोरथाप्रमाणें दानें केलीं. व बहुत शास्त्री, पंडित जवळ बाळगिले. परंतु त्यांणीं त्यास सत्कर्मास किंवा आपले राज्यरक्षणास किंवा नीतीनें चालण्यास समजून दिली नाहीं. जें त्याणें केलें त्याजविषयीं त्याची स्तुतीच करीत गेले व महाराज सर्वत्र विजयी होतील, असें आशिर्वाद देत गेले. आपण ब्राम्हण परभु, आपलें तेज सर्वांहून अधिक, आपलेकडून एक शिपाई गेला तर सर्वांचा पराजय होईल, याप्रमाणें बोलून त्यांजकडून राज्यकारभार सोडून देवऊन त्यास पंडितांचे अर्जव करणारा असा मूर्ख केला. व शेवटीं आपण आणि तो असे दोघेही भीक मागत गेले. यास्तव हे पंडित जरी पुष्कळ पढलेले असले, तरी ते मूर्ख समजावे. कारण कीं, लोकहितकारक ज्ञान त्यांस नाहीं. त्यांचें ज्ञान भाटांचे व तमासगिरांचे बोलण्याप्रमाणें आहे. त्यापासून मोक्ष व्हावयाचा नाहीं व इहलोकीं सुखोत्पत्तीही व्हावयाची नाहीं. सारांश, हल्लींचे पंडित हे महामूर्ख असें मी म्हणतों. हे नाना प्रकारचे अर्थ फिरवितात. नाना प्रकारचे असत्य सिद्धांत करितात. आणि क्षणांत मुक्तीचा मार्ग, क्षणांत नर्कांत जाण्याचा मार्ग दाखवितात. यांस मुख्य ज्या गोष्टी त्यांचें ज्ञान नसतें. मनुष्य जन्मला कशाकरितां? त्यांचे सार्थक काय? व आपलें कर्तव्य काय? याचा विचार त्यांचे मनांत क्षणभरही वसत नाहीं. द्रव्याचा व मानाचा लोभ धरून हे असतात. यांचा आश्रय जो कोणी करील, त्यास वेड लागेल यात संशय नाहीं. व त्यांची बुद्धि स्थीर नाहीं. अमूक सत्य, व अमूक असत्य हेंही यांस भासत नाहीं. सत्याचा व असत्याचा भाव यांस समजत नाहीं. धर्माचा अधर्माचा भेद यांस ठाऊक नाहीं. जो पाहिजे तो शास्त्रार्थ काढून देतील, जें पाहिजे तें प्रायश्चित्त देतील. फक्त पैसा मिळाला म्हणजे झालें. अशा पंडितांचा संग्रह करून कोणास काय फायदा होणार आहे? राजास होणार नाहीं व प्रजेसही होणार नाहीं; व ज्या प्रजेचे पुढारी असले लोक विनाकारण आपल्यास विद्वान म्हणवितात, त्या प्रजेचा सर्वस्वी नाशच होईल. याप्रमाणें हिंदु लोकांची व्यवस्था झाली आहे. या लोकांस शास्त्रीपंडितांखेरीज जेव्हां दुसरे कोणी पुढारी मिळतील, तेव्हां या लोकांमध्यें व्यवस्था चांगली होईल. व शास्त्रीपंडित पुष्कळ असावे अशी जे इच्छा धरितात, ते महामूर्ख समजावे. या लोकांपासून या देशाचें किंमपी हित होणार नाहीं. अधिक मूर्खपणा मात्र वाढेल. व भ्रांती वृद्धिंगत होईल. आणि ती ज्याचे मनांत शिरेल त्याचा प्राण गेल्यावांचून निघणार नाहीं. यास्तव हे शास्त्री, पंडित अगदीं निरुपयोगी आहेत, हा सिध्धांत होतो. ही विद्या कांहीं उपयोगी नाहीं. जर असें असेल तर, मला कोणी उत्तर द्यावें कीं, व्याकरणाचें पंधरा वर्षें अध्ययन केलें, त्यापासून अमुक उपयोग होतो, असें मला दाखऊन द्यावें. म्हणजे मी वास्तविक म्हणेन. परंतु मीं शोध केला आहे, त्याजवरून मला तर वाटतें कीं, मनुष्यास

लांकडें तोडावयाचें कसब शिकविलें तर बरें. परंतु हें व्याकरण नको. यांत कांहींच अर्थ नाहीं. केवळ मूर्ख होण्याची विद्या आहे. आणि इतकेंही असून ज्याचा त्यास असा गर्व असतो कीं, मी केवढा विद्वान, माझ्यासारखा विद्वान त्रैलोक्यांत नाहीं. पाहिला तर तो सर्वांहून मूर्ख असतो. याप्रमाणेंच न्याय, मीमांस[ा], अलंकार या शास्त्रांची व्यवस्था आहे, केवळ असत्य सिध्दांताचें प्रतिपादन करून विलक्षण कुतर्क करून भलतेच अविचार लोकांत स्थापन करितात; आणि वास्तविक पाहिलें तर ब्राम्हणांमध्यें चार रोजगार आहेत. सराफ, भट, पंडित, हरदास, या सर्वांपेक्षां पंडित हे महामूर्ख होत. सराफ, भट, हरदास हे बरे; हे यत्किंचित पढलेले असतात. याजमुळें हे दुराग्रही नसतात व यांस अभिमान नसतो. सांगितली गोष्ट ऐकतात, व यांचें लक्ष व्यवहारिक मार्गावर फार असतें. याजकरितां कांहीं सुधारण्याचा रस्ता यांत आहे; परंतु हे विनिज (?) आहेत म्हणून पंडित यांची समजूत फार दृढ होती कीं, आमचें मत खरें आहे; व इतर सर्व मूर्ख आहेत. याजकरितां यांचा दुराग्रह फार होतो. तो हे सोडीत नाहींत, अतिशय आग्रह धरितात. याजमुळें हे लोक अगदींच उपयोगी नाहींत. हिंदुलोक यांचें महान दुर्भाग्य म्हणून हे पंडित व शास्त्री, या लोकांचे पुढारी झाले, व यांस लोक समजतात कीं, हे धर्मरक्षक आहेत; परंतु हे अधर्मवृध्धी करणारे होत. व हे सोनार, परभु, ब्राम्हण वगैरे यांचा यत्किंचित निमित्तानें वाद लाऊन दोहोंकडून पैसा खाणार व खोटीं मतें आणि नाना प्रकारचीं खोटीं कर्में प्रसिध्ध करून भोळ्या लोकांस ठकविणार. यास्तव त्यांस आवडतही नाहीं कीं, आपलीं शास्त्रें बहुत लोकांस ठाऊक व्हावीं; कारण तेणेंकरून आपली उघडीक होते, व दगाबाजी व लबाड्या बाहेर पडतात हें त्यांस फार भय आहे. जोंपर्यंत आच्छादित आहे तोंपर्यंत यांच्या प्रतिष्ठेचें :आयुष्य आहे, मग किरकोळ लोक यांस पुसतील कीं, तुम्ही आम्हांस सांगतां परंतु ही सर्व लबाडी आहे. तुम्ही लबाडीवरच पोट भरतां तस्मात् आम्ही तुमचा त्याग करितों. अशी अवस्था होईल यांत संशय नाहीं. हा मूर्खपणा बहुतकाळपर्यंत निभला, कारण कीं, गौप्य होतें. आजपर्यंत महाप्रयत्नानें झांकून झांकून चालविलें, परंतु आतां चालणार नाहीं. अडाणी लोकांकडे एखादी पंचाइत न्या, तर ते लागलाच न्याय सांगतील. बरें तीच पंचाईत चार पंडितांकडे न्या, म्हणजे ते अतोनात वाद करतील, आणि नाना प्रकारच्या मसलती काढून असत्य पतिपादन करतील, अशी त्यांची अवस्था आहे. त्यांचीं मनें बिघडून जातात आणि भ्रांति उत्पन्न होऊन त्यांस विवेचन करतां येत नाहीं. खोट्यास स्थापन करण्याकरितां प्रमाणें दाखवितील, आणि त्याचा पक्ष धरून भांडत बसतील, याचा अनुभव कोणीही विचार करून त्यांची वर्तणूक पाहिली तर लक्षांत येईल. जेथें बहुत पंडित तेथें मूर्खपणा वाढून भ्रष्टाकार होतो; अधर्मप्रवृत्ती होते, व इतर लोकांवर दया करणें हें त्याजपासून घडत नाहीं. त्यांची समजूत अशी आहे कीं, सर्वांनीं दुःख भोगिलें तर चिंता नाहीं, परंतु आम्ही मात्र सुखी असावें. तदनुसार उदाहरण पाहा. शास्त्री यांचे मतानें ज्या ज्या गृहस्थांनीं

अन्नछत्रें घातलीं तेथें शूद्र गेला तर त्यास अन्न मिळत नाहीं आणि ब्राम्हण श्रीमंत झाला तरी जेवावयास बोलावितात. असा चमत्कार आहे. अस्तु, सर्व लोकांस ज्ञानप्राप्ती होईल, तेव्हां हे सर्व पंडितांचे गुण बाहेर पडतील.

लो० हि०



ता० ६ जानेवारी स० १८५०

पत्र नंबर ८७

एकत्र राहाण्याची चाल

आमचे लोकांमध्यें अशी चाल आहे कीं, कुटुंबाचे माणसांतील सर्वांनीं एकत्र राहावें. यापासून लाभ किंवा विभक्त राहिल्यापासून लाभ याचा विचार केला तर असें नजरेस येतें कीं, एकत्र राहाण्याची चाल बहुतकाळापासून चालत आली आहे, व लोकांमध्यें तिची प्रतिष्ठा अधिक मानितात. दोघे बंधु पाहिले तर त्यास प्रथम हा प्रश्न करितात कीं, विभक्त किंवा एकत्र अहां ? एकत्र म्हटलें म्हणजे ते भले माणूस आहेत असें समजतात. परंतु उद्योगवृध्धी होण्यास विभक्त राहण्याची चाल चांगली आहे. ती कशी म्हणाल तर ऐका. एक बंधु रोजगारावर असला म्हणजे त्यास इतर बंधु, पुतणे, चुलते, मामा उभय पक्षांचे लोक त्याचे आसमंतांत येऊन राहतात, व जरी त्यास सामर्थ्य असलें तरी याचे घरीं जेवतात, काळ व्यर्थ घालवितात व उद्योग कांहीं करीत नाहींत. बळें मूर्ख होतात व निर्लज्जपणानें अन्न खातात. यास्तव इतके लोक रिकामे बसून खाणारे निरुपयोगी असतात. सामान्यतः श्रीमंताचे घरीं पाहिलें तर पन्नास पानें पंक्तीस असतात; त्यांत बहुतकरून चाकर एक दोन, व बाकी सर्व आतसंबंधी असतात. ते कांहीं उद्योग करीत नाहींत. घरचा एकटा जो मिळविता असतो त्यासही त्यामध्यें थोरपणा वाटतो कीं, मी सर्व कुटुंबाचा स्वामी आहें; माझे घरीं सर्व माझे कुळांतील जेवतात; मी कुटुंबवत्सल आहें; आणि लोकही त्याचें वर्णन अधिक करितात. त्यास म्हणतात कीं, अहो, अमका गृहस्थ केवढा कुटुंबी आहे; त्यास कुळदीपक म्हणावें. पाहा कीं, ज्याचे पंक्तीस पन्नास पानें होतात व सरकारांत अर्जी करणें झाल्यास ही मोठी सबब लिहितात कीं, आम्ही कुटुंबवत्सल आहों, आमचें सरकारानें चालवावें, व प्राचीनकाळच्या सनदा पाहिल्या तर त्यांत हेच शब्द असतात कीं, "अमके भटजी यांचें कुटुंब मोठें व यांचे कुटुंबाचें चालविल्यास श्रेयस्कर आहे, असें जाणून कुटुंबाचे योगक्षेमार्थ अमुक गांव दिला आहे." याजवरून कुटुंबाचें एकानें चालवावें व

सर्वांनीं उगीच बसावें हा धर्म परंपरागत चालत आला आहे. परंतु त्यापासून फार अनर्थ होतात; व आळसाची प्रवृत्ती फार होते. मागले काळीं कसें निभलें असेल तें असो, परंतु आम्हांस हें तर विलग व अवघड दिसतें. एकट्यानें मिळवावें आणि सर्वांनीं खावें, आणि तो मरेल त्या दिवशीं सर्वांनीं वर हात करून जावें किंवा भीक मागावी, हें अगदीं वाईट आहे, आणि असे बहुत लोक भट वगैरे आढळतात. त्यांस जर प्रश्न केला कीं, तुम्हीं इतके दिवस काय केलें तर ते उत्तर देतात कीं, काय करावें? अमका गृहस्थ दैवशाली होता, सर्व कुटुंबाचा योगक्षेम तो करीत असे, त्याचे घरीं आज पन्नास वर्षें सुखेंकरून भोजन केलें, आतां तो मेला. तेव्हांपासून कोठें उभें राहावयास थारा नाहीं. शंभर मनुष्यांचें अन्न गेलें, त्याचे पदरीं बहुत लोक असत, व बहुतांचें तो चालवी, आतां आम्हांस कांहीं आधार नाहीं; अशी चाल या लोकांची पडली आहे. प्रत्येक श्रीमंताचे पाठीमागें निरुपयोगी लोक शेंकडों असतात, व त्यांत जाहागिरदार वगैरे असले तर त्यांजवर जशा मोहोळांवर माशा बसतात, त्याप्रमाणें आळशी लोक बसतात, कितिएक आप्त म्हणून असतात; कितिएक बायकोचे भाऊ म्हणून असतात; कितिएक भट, पंडित, शास्त्री, यांस पंक्तीस घेऊन जेवलें म्हणजे पुण्य आहे म्हणून हे बाळगलेले असतात; कितिएक आर्जवी असतात, त्यांणीं स्तुति करावी. म्हणजे महाराजांनीं म्हटलें कीं, आज सूर्य पश्चिमेला उगवला, तर त्यांणीं होय म्हणावें, आणि काय सुप्रयुक्त भाषण केलें तरी, महान् बुध्दीवान् बरें, अशी स्तुति करावी. याप्रमाणें हे लोक दुसऱ्यास वेडे करितात; असे कितिएक निरुपयोगी लोक असतात. याप्रमाणें प्रत्येक श्रीमंताचे घरीं वहिवाट असतो. यांचे विरुध्ध कोणी बोलले तर त्यास ते म्हणतात कीं, तो त्यांच्या अन्नावर उठला; परंतु या वांकड्या समजुती टाकून ज्याणें त्याणें उद्योग करावा, हें बरें. स्वउद्योगानें घोंगडी मिळवली तर ती लोकांचे शालजोडीस मागें सारते, यास्तव श्रीमंतांनींही आपले पदरचे व कुटुंबाचे लोकांस शाहाणे व उद्योगी करावें, हें चांगलें. केवळ आपण मेलों तर बाकीच्यांनीं भिक्षा मागावी अशी तजवीज आपले थोरपणाकरितां करून ठेवावी, हा थोरपणा नव्हे. हा मूर्खपणा आहे, व पदरच्या लोकांनींही मनांत आणावें कीं, हें चांगलें नाहीं. असतु. एकत्र कुटुंबाचा असा परिणाम होतो. आतां यापासून कांहीं लाभही आहेत. एक भाऊ अशक्त किंवा विपत्तींत असला तर त्याची उघडीक पडत नाहीं. कार्यप्रयोजन जसें एकाचें तसेंच दुसऱ्याचें होतें, व सांभाळ होतो, परंतु हें केवळ एकत्र राहिल्यानें होतें असें नाहीं, विभक्त असल्यानेंही हें होईल. उभयतां भावांचें सौजन्य असलें म्हणजे एकमेकांस विपत्ति-अनुपपत्तिकाळीं साह्य करतील. एकत्र असले म्हणजे करितात असें नाहीं. यास्तव विभक्त असले म्हणजे बरें. परंतु विभक्त असून बंधुधर्म सोडूं नये. आमचे लोकात बहुधा विभक्त असले म्हणजे अत्यंत वैर असतें, आणि वैर पडल्याशिवाय विभक्तपणा येत नाहीं, हें चांगलें नाहीं. तर विभक्त राहून एकमेकांनीं सुहृत्भावानें राहावें व उद्योग केल्यावांचून राहूं नये, इतकेंच तात्पर्य आहे. सांप्रतकाळीं जो श्रीमंताचे घरीं परिवार असतो, तो

केवळ मूर्खपणास कारण आहे. आम्हीं स्वतः एका श्रीमंताचे घरीं पाहिलें कीं, त्याचें वय सरासरी पंचवीस वर्षांचें होतें, त्थास जाहगिर मोठी आहे. त्याचे पदरीं रोज पन्नास पानें होत होतीं. त्यांत बहुतकरून आतमंडळी व कितीएक भट, पंडित, कथेकरी, व पुराणिक होते व वैद्यही होते, त्यांत वैद्य हे उपयोगी आहेत. त्यांची गोष्ट खेरीज, परंतु बाकीचे लोक केवळ आर्जवी आणि यजमान जरी अक्षरशत्रु आणि मूर्खशिरोमणी होता, तरी प्रत्येकजण त्याची अतोनात स्तुति करीत होते. कोणी पंडित म्हणे, "या पुरुषाची बुध्धी केवढी विशाळ आहे; कोणताही विषय काढिला तरी त्यांत समजूत आहेच." कोणी आप्त होते ते म्हणत कीं, हा मोठा या कुळांत दैवशाली आहे. आमचे सर्वांचें आयुष्य यास होऊ. आज पन्नास शंभर मनुष्यें याचे पदरीं आहेत. शेंकडो मनुष्यें मरोत, परंतु त्यांचा पाळणवाला न मरो. अशा अनेक गोष्टींनीं त्यास मूर्ख करून ठेवितात. या गृहस्थाची अवस्था पाहून मला फार आश्चर्य वाटलें, आणि त्यांत आणिखी एक चमत्कार पाहिला कीं, इतक्यांत कितीएक जण त्यास पुनर्विवाह करण्याची मसलत देत. आणि सांगत कीं, दुसरी बायको करावी; कारण पुत्र नाहीं, म्हणजे सरासरी त्यास पुरतीं पंचवीस वर्षें नव्हतीं, तों पुत्राची काळजी व पुत्राकरितां अनुष्ठानें करीत दहा ब्राम्हण बसले होते, आणि लग्न पुनः करावयाची तयारी करणें हा केवढा मूर्खपणा आहे. अस्तु, याप्रमाणें आमचे लोकांमध्यें प्रत्येक श्रीमंताचे घरीं हीच अवस्था आहे, व राजे वगैरे यांचे घरीं तर याहून अधिक असते. सर्वत्र पाहा कीं, कोठें कोणी राजा शाहाणा आहे असें नाहीं. व त्यांचे पदरीं प्रधान इत्यादि असतात तेही मूर्ख, ते त्यांस विद्या शिकवीत नाहींत. व जुन्या काळच्या पुराणांतील मतें बाळगणारे व आपले ठिकाणीं विद्वान म्हणविणारे पंडित यांस पुसलें तर त्यांस विद्या माहित नसते. जसे विक्षिप्त असतात, त्याप्रमाणें त्यांचें बोलणें. कोणी म्हणतो, पृथ्वी कमलपत्रासारखी आहे, कोणी म्हणतो. यवन हे पूर्वीपासून आहेत. परंतु त्यांस कांहीं देश नाहीं. समुद्रांत कोठें लहान जागा आहे तेथें त्यांचा वास आहे, पृथ्वीचा अंत हिमालयाजवळ आहे, व पृथ्वीभोंवती सात वेटें आहेत. समुद्र दह्याचे व दुधाचे आहेत. इत्यादिक मूर्ख मतें शिकवून श्रीमंतास निरुपयोगी करतात. व त्यांचे हातून लोकांस कांहींएक उपयोग होत नाहीं व हीं पुराणांतील मतें खोटीं आहेत. अशी खात्री लोकांची झाल्यावांचून त्यांची बुद्धि शाश्वत स्थिति पावणार नाहीं. ज्याकाळीं हीं पुराणांतील मतें व शास्त्री पंडितांचीं मतें कल्पित कादंबरीच्या खोट्या व पोरकट गोष्टीसारखीं आहेत अशी खात्री होईल त्याकाळीं या लोकांची भ्रांति जाईल, आणि हे ताळ्यावर येतील.

लो० हि०

तारीख १३ जानेवारी १८५०

पत्र नंबर ८८

नीतिप्रशंसा

आमचे लोकांची सुधारणा व्हावयास मुख्य काय पाहिजे, याचा विचार केला असतां असें दिसतें कीं, मुख्य त्यांस विद्या पाहिजेत. विद्या कोणत्या म्हणाल तर हल्लीं ज्या विद्या सत्यप्रतिपादक व वास्तविक जे व्यवहार आणि राज्यनीती यांच्या दर्शक आहेत त्या विद्या प्रगट झाल्या पाहिजेत. पूर्वीच्या विद्या ज्या संस्कृतद्वारा येतात त्या उपयोगी नाहींत. कारण त्यामध्यें असत्य गोष्टी फार आहेत; व मूर्खपणाच्या समजुती फार आहेत. त्या विद्या प्राचीनकाळाच्या लोकांच्याइतकेंच जाणून त्या आतां एकीकडे ठेऊन दिल्या पाहिजेत. व नूतन ज्या कला, शिल्प इत्यादि निघाल्या आहेत, त्या गृहण केल्या पाहिजेत. पूर्वीच्या चुकांनीं भरलेल्या विद्या आहेत, त्या कांहीं उपयोगी नाहींत. लहान मुलांस अठराही पुराणें पढविलीं तरी त्यांस काय ज्ञान येईल बरें ? याचा विचार पाहा; त्यांतील असत्सिध्धांत तेही आतां दाखवितों.

क्षारइक्षुसुरासर्पिर्दधिक्षीरजलार्णवाः ॥

हें सागराचें ज्ञान होईल. स्त्रियांचे गूण कसे आहेत हें वृध्धचाणाख्यांत दुसरे अध्यायांत एका श्लोकांत दाखविलें आहे कीं,

अनृतं साहसं माया, मूर्खत्वमतिलोभता ।
अशौचत्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥

तो समजेल. आणखी,

विप्रपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम् ।

हें समजेल. आणि

यथा नयन्ति रागास्ते न गंगा न सरस्वती ।

म्हणजे गाईल तो मोक्षास जाईल, हें समजेल. इत्यादिक अज्ञानभरित वाक्यांचा संग्रह होऊन तेणेंकरून मूढमति मात्र होईल. यास्तव या प्राचीन काळच्या विद्या कांहीं उपयोगी नाहींत. या विद्या जितक्या वाढतील तितकें अज्ञान दृढ होईल. आणि हा देश कधीं सुधारणार नाहीं. याप्रमाणेंच शास्त्रें आहेत. व्याकरणशास्त्रांत शब्द हाच ईश्वर असें प्रतिपादन आहे. मीमांसां[सें]त वेद हाच ईश्वर असें प्रतिपादन आहे. धर्मशास्त्रांत यज्ञादिक खटपट केली म्हणजे मोक्ष होतो. बापास पिंड दिला म्हणजे मोक्ष होतो. पुत्र

असला म्हणजे २१ पिढ्या स्वर्गास जातात. इत्यादि प्रतिपादन केलें आहे. तसेंच दरएक पुराणांत देवता, विशेष उपासना लिहिल्या आहेत. त्यांत तंत्रें वगैरे आहेत. त्यांत तर अतिशय मूर्ख मतें प्रतिपादन केलीं आहेत. तशांत हीं शास्त्रें व पुराणें प्राचीन काळचीं ज्ञानें आहेत इतक्याकरितां पढावीं, परंतु त्याप्रमाणें व्यवहारांत वर्तणूक केली तर अशुध्द होईल, यांत संशय नाहीं. यास्तव या पढण्याचा संक्षेप होऊन वास्तवीक विद्या वृध्दिंगत झाल्या पाहिजेत, असें लिहिलें म्हणून धर्माविरुध्द होत नाहीं. हिंदु लोकांचा धर्म केवळ समुद्राचे वर्णनांत नाहीं, व स्त्रियांचे वर्णनांतही नाहीं. धर्म हा ईश्वराचें वर्णन आहे. त्यांत दुसरे अधर्म मिश्र झाले आहेत, ते मात्र जातील. व केवळ भक्ती, ज्ञान हे धर्म राहातील. कर्ममार्ग कमी होईल, व मूर्ख समजुती कमी होतील, व वास्तविक धर्म लोकांत प्रघट होईल. ईश्वरभक्तीचा भाग राहून बाकीचा भाग सुधारेल. या सर्व समजुतींसच धर्म म्हणणारे आहेत, ते मूर्ख व या पृथ्वीचे वगैरे ज्ञानाविषयीं शास्त्राविरुध्द लिहिलें तर धर्माविरुध्द होत नाहीं, परंतु बहुत लोकांस असें वाटत नाहीं, याचें कारण अज्ञात आहे. व या प्राचीन ग्रंथकारांनीं व्यवहाराचीं व धर्माचीं पुस्तकें वेगळालीं लिहिलीं नाहींत म्हणून व्यवहाराचा व धर्माचा भेद राहिला नाहीं. अस्तु. हा भेद आतां लोकांस समजेल. शास्त्राचें प्रमेय लोक समजत नाहींत. शास्त्रीपंडीत अर्थाचा अनर्थ करितात. व कांहीं कांहीं गोष्टी ज्या आहेत त्यांचा यथार्थ अर्थ समजत नाहींत. आतां पाहा कीं, एका ठिकाणीं पुराणांत असें लिहिलें आहे कीं,

विप्रौघदर्शनात् क्षिप्रं क्षीयन्ते पापराशयः ॥
वंदनात् मंगलावाप्तिर्र्चनादच्युतं पदम् ॥१॥
आधिव्याधिहरं नृणां मृत्युदारिद्र्यनाशनं ॥
श्रीपुष्टिकीर्तिदं वंदे विप्रश्रीपादपंकजम् ॥२॥
सागरे सर्वतीर्थानि पदे विप्रस्य दक्षिणे ॥३॥

याप्रमाणें ब्राम्हणांचें वर्णन केलें आहे तें खरें समजून लोक ब्राह्मणांच्या पायाचें तीर्थ पितात. सदावर्तें ब्राम्हणाकरितांच घालतात, ब्राह्मणांची पूजा केली तर मोक्ष होतो असें समजतात, व यास प्रमाण पुराणाचें दाखवितात कीं, प्राचीन राजे व श्रीकृष्णदेखील ब्राम्हणांचीं उष्टीं काढीत होते. याप्रमाणें ब्राम्हणांस चढऊन दिले आहेत. तेव्हां अशा गोष्टींवर किती विश्वास ठेवावा, याचें प्रमाण लोकांस समजत नाहीं. व पुराणीक आणि हरदास हेही असाच उपदेश करून लोकांस वेड लावितात. याचा विचार लोकांनीं करावा. ब्राम्हण हे मनुष्य. यांचे पायाचें पूजन केलें म्हणजे मोक्ष कसा होईल ? हें विलक्षण मत आहे. याप्रमाणें लक्षावधी गोष्टी आहेत. याचप्रमाणें लोक क्षुल्लक धर्म व महान् धर्म यांचा भेद जाणत नाहींत. महान् व परमधर्म म्हणजे असे कीं, सत्य बोलणें, दया करणें, क्रोध न करणें, शांती धरणें, चोरी अभिलाष न करणें, व्यभिचार न करणें, इत्यादि

नीतीचे धर्म. याविषयीं अभिमान सोडून क्षुल्लक धर्म सांगतात. ते असे कीं, तुम्ही तुळशी वाहाव्या, वेल वाहावा, चंदनाचीं खोडें झिजवावीं, वाती जाळाव्या, काळे वस्त्रानें विटाळ होतो, काडी मोडली म्हणजे ब्राम्हणहत्या होते, शंखोदक घेतलें म्हणजे पाप जातें, शांती तुपांत घालाव्या, डबींत मंगळसूत्र द्यावें, सारांश इत्यादि मूर्खपणाच्या गोष्टींस धर्म असें माझ्यानें म्हणवत नाहीं. याविषयीं लोकांस वेड लाऊन हें करवितात; परंतु परमधर्म कोणास सांगत नाहींत. पाहा कीं, कामदार मोठाले असतात त्यांस कोणी असें सांगत नाहीं कीं, तुम्ही लांच खाऊं नका, खरें काम करा, लबाड बोलूं नका. हें सांगावयाचें सोडून त्यांचें पूजा करावयाचें ढोंग देवपुजेचीं भांडीं, डौल व देव्हारे वाढवितात. आणि त्यांस दुर्नीतीचे मार्ग शिखवितात. ब्राम्हणांचीं मतें अशीं आहेत कीं, चोऱ्या केल्या तरी चिंता नाहीं. ब्राम्हणांस भोजनें घातलीं म्हणजे मग त्यांचें पाप नाहीं. कितीएक लोक गळ्यांत शालिग्राम बांधितात. व खांद्यावर तुळशीचीं झाडें घेतात. आणि पंढरपूरच्या यात्रा करितात, परंतु हे लोक अशा कर्मानें तरतील काय? जो मनुष्य जन्मांत लोकांचे कल्याणाची गोष्ट मनांत आणीत नाहीं, दया करीत नाहीं, व ईश्वराचें भजनपुजन ज्ञानानें करीत नाहीं, तो शालग्राम दगड गळ्यांत बांधून ईश्वरापाशीं कसा जाईल? तसेंच ज्या स्त्रीनें व्यभिचारकर्म केलें, तिणें तांदुळ निवडून लाखोल्या वाहिल्या व पुष्कळ वायनें दिलीं तर ईश्वरास ती प्रिय होईल काय? परंतु ब्राह्मण आळशी, यांस पैसा मिळाला पाहिजे, म्हणून ते नानाप्रकारचीं वेडें लोकांस लाऊन पैसा काढितात. तसेंच शास्त्रीपुराणीक हे लोकांस अनर्थ सांगून भ्रष्ट करितात, हें सर्व पोटाकरितां आहे. व हें माझेंच मत आहे असें नाहीं. पूर्वी तुकाराम इत्यादि साधू होते त्यांणींही ब्राम्हणांची लबाडी जाणून अभंग केले आहेत कीं,

पोटासाठीं केलें ढोंग, तेथें कैंचा पांडुरंग,
द्रव्यलोभाचें कीर्तन, तेथें कैंचा नारायण।

इत्यादिक बहुत साधूंनीं ब्राम्हणांच्या लबाडीविषयीं वर्णन केलें. ज्ञानेश्वर म्हणतात कीं,

जपतपक्रियाधर्म बा उगाची व्यर्थ नेम।

तसेंच रामदास म्हणतात कीं,

नको कंठ शोषूं बहू वेदपाठीं,
नको तूं पडूं साधनांचे कपाटीं।

तेव्हां याजवरून असें सिध्ध होतें कीं, हे किरकोळ नेमधर्म जे आहेत त्यांत कांहीं नाहीं; हे सर्व व्यर्थ आहेत, ईश्वराचें मनानें भजनपुजन करावें, व मन शुध्ध ठेवावें हाच धर्म. स्नान केलें नाहीं तर दुःख वाटूं नये, आणि लबाड बोललें तर दुःख वाटावें, परंतु ही

भावना आमचे लोकांची नाहीं. हे लोक आचाराकरितां प्राण देतात. आणि विचार मुळींच करीत नाहींत. भस्म लावलें म्हणजे शुध्धी होते, असें समजतात, परंतु पन्नास वेळ भस्म लावलें आणि दोनशें वेळ अंग धुतलें, तर मनाचे मळ जातील काय ? ईश्वर शरिरास पाहात नाहीं, मनास पाहातो. मुख्य मन शुध्ध पाहिजे; परंतु हल्लींचे ब्राम्हण पैसा काढण्याकरितां हें सांगत नाहींत. फक्त आचार, जेणेंकरून पैसा मिळावयाचा, तेंच सांगतात. सर्व धर्म आतां लोकांच्या पैशावर आला आहे. पैसा दिला म्हणजे पाप जातें, प्रायश्चित्त होतें, ईश्वर प्रसन्न होतो, असें ब्राम्हण सांगतात. याजकरितां हे सर्व असें सांगणारे मूर्ख आहेत. यांजवर भरवसा ठेऊं नये. धर्म कोणता याचा विचार करावा. केवळ क्षुल्लक धर्मावर भरवसा ठेऊं नये. यांत कांहीं नाहीं; परंतु जर कोणी शास्त्राचें प्रमेय न पाहातील व मूर्खपणानें भलतेच अर्थ काढतील आणि ब्राम्हण लोकांच्या बुध्धी ऐकतील तर त्यांचा परिणाम लागणार नाहीं. आजपर्यंत ही दशा ब्राम्हणांच्या बुध्धीनें झाली आहे. पंडित व शास्त्री हे मूर्ख आहेत. त्यांस अर्थ नीट करतां येत नाहीं. ते फक्त मूर्खपणा वाढवितात व लोकांस वेडे करितात. यास्तव यांत कांहीं खऱ्या गोष्टी नाहींत. केवळ निफळ आहेत.

लो० हि०

ता० २० माहे जानेवारी १८५०

पत्र नंबर ८९

इंग्लिश सरकार

आमचे लोकांच्या रीती अगदीं बदलल्याशिवाय या देशाचें हित होणार नाहीं. व या लोकांस स्वतां राज्य चालविण्याचें सामर्थ्य असल्याखेरीज इंग्रज लोक या देशांतून गेले तरी उपयोग होणार नाहीं. पुन्हां गर्दी होईल; व वेबंदी, अंदाधुंदी, भालेराई, होळकरीगर्दी व पेंढारी अशा गोष्टी पुनरपि होतील, आणि कोणाचा जीव व वरदारही निर्भय राहाणार नाहीं. जो जबरदस्त त्याचे हातीं सर्व जाईल. व जो निर्बल असेल तो उपाशीं मरेल. सर्व त्याचें हरण होईल. यास्तव सुज्ञांनीं इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करूं नये. याप्रमाणें सरकार व याप्रमाणें चांगले सुधारलेले लोक हिंदु लोकांस सोबतीस कदापी मिळणार नाहींत. इंग्रजांचे गूण पाहून हे लोक कांहींतरी शिकतील. परंतु याचे दरम्यान इंग्रजलोक हिंदु लोकांस अगदीं भिकारी करूं लागले तरी इंग्रज सरकाराशीं भांडून ज्या ज्या कायदेशीर तजविजी आहेत त्या करीत जाव्या. जसें मोठया चाकऱ्या हिंदु

लोकांस देत नाहींत व हिंदुलोकांशीं बहूत भेद ठेवितात, हें मोडण्याचा यत्न केला असतां प्राप्त होईल. आणि भेद मोडतील, हे साध्य आहे. परंतु अगदीं इंग्रजांचें राज्य जाऊन हिंदूंचें होणें म्हटलें म्हणजे पुनरपि हिंदु लोकांस मूर्ख करणें आहे. अस्तु. हें ईश्वरही करणार नाहींच. कारण कीं, अशा अघटित योजना ज्या होणें त्या माणसांच्या कृतीनें होत नाहींत. ईश्वरसत्तेनें होतात. जेव्हां हिंदु लोकांचा मूर्खपणा जाईल, तेव्हां ईश्वर इंग्रजांस या देशांतून जाण्याची आज्ञा करील. जेव्हां ज्वर जातो तेव्हांच मुखास रुचि येते. असा प्रकृतीचा स्वभाव आहे. ही गोष्ट त्वरीत सिद्धीस जाणार नाहीं. हिंदु लोक आज आंधळे आहेत. ते डोळस व्हावयास काय उपाय करावे? हें कळविणें योग्य आहे. असें जाणून हिंदु लोक जे आपले स्वदेशीय परम प्रिय होत. त्यांस मी उपदेश करितों, हा त्यांणीं लक्षांत आणावा. माझी निश्चयरूप खात्री आहे कीं, असे लोक झाल्याशिवाय हे लोक कदापि सुधारणार नाहींत. हें कोणतें, म्हणाल तर, प्रथम ज्ञान मिळविणें, तें ज्ञान कोणतें, वेदाचें ज्ञान नव्हे. स्वधर्मसंबंधीं जीं पुस्तकें आहेत त्यांतील सारांश व जो बोध साधुसंत इत्यादिकांनीं सारासार विचार करून सांगितला आहे, त्यावरून ईश्वराची दृढभक्ती व पवित्र अंतःकरणानें ध्यान करावें. हें ज्ञान प्रथम पाहिजे. हें या लोकांस नाहीं. कोणी ढोंगानें देवपुजेचीं भांडीं मांडून सकाळीं प्रहरभर पूजा करीत बसतो. परंतु देवाविषयीं त्यास लेशभर ज्ञान असेल तर शपथ. अंतःकरण पवित्र नाहीं, नीति नाहीं, केवळ ढोंगी गारूड्याचे जसे पेटारे असतात तद्वत ते संबळ्या मांडून बसतात. तर असा प्रहर दोन प्रहर बसून वेळ घालविला तर उपयोग काय? त्यांत ईश्वराची पूजाही झाली नाहीं व उद्योगही झाला नाहीं. केवळ तो आयुष्याचा वेळ व्यर्थ गेला, असें जाणावें. हिंदु लोक हे धर्म म्हणून किती उपद्व्याप करितात, याचा ठिकाण नाहीं. कोणी जन्मापासून लुच्चा, लबाड, नित्य घरें बुडविणारा, व खोटी शपथ करणारा असतो; परंतु तो सकाळीं उठून बागेंत जाऊन स्वहस्तानें तुळशी तोडून नेमानें आणतो, हा नेम कधीं टळत नाहीं. तसें अग्निहोत्री हे नाना प्रकारच्या खटपटी करितात. विस्तव पेटऊन त्याचे आराधनेंत वेळ घालवितात. परंतु त्यांचे अंतःकरणाची शुद्धता नसते व त्यांस नीति नसते. व त्यांचें आयुष्य केवळ कर्मठपणांत जातें. यास्तव त्यांच्यानें दुसरा कांहीं उपयोग घडत नाहीं. त्यांस एक आणि दोन किती म्हणून पुसलें तर तीन समजत नाहीं. व्यवहारांतील त्यांस गम्य नसतें. लोक त्यांस पवित्र समजतात आणि पैसा देतात, म्हणून त्यांचें रक्षण होतें. नाहींतर ते कशाचे उपयोगी नाहींत. लोकांस उपयोगी त्यांच्यानें कांहीं व्हावयाचें नाहीं. असेच भट व शास्त्री हे तर महामूर्ख होत. गोंधळी बरे, पण शास्त्री अधिक मूर्ख. त्यांस लिहितां येत नाहीं, वाचतां येत नाहीं, व्यवहार कळत नाहीं, वा हिशेब समजत नाहीं; कोणी पुसलें कीं, तुम्हीं जन्मापासून केलें काय तर ते म्हणतात कीं, कृष्णातीरीं अमक्याचे घरीं जेवणाची सोय होती; तेथें जेवीत होतों; व आतां बारा वर्षें अध्ययन करून तयार झालें आहें; कोणाशीही वाद करूं; पोथ्या सर्व पाठ आहेत; साठ हजार कौमुदी अवगत आहे; उपस्थिति

चांगली आहे. याप्रमाणें हे एवढाले मोठे पंडित असतात, पण त्यांस यत्किंचित ज्ञान नसतें. त्यांजकडे कांहीं कारभार सांगा आणि मग त्यांचा चमत्कार पहा कीं, ते किती भीतील; किती गोष्टी लोकांस पुसतील; त्यांस लिहिणारा दुसरा पाहिजे; हिशेब करतां येत नाहीं, स्वतां बुद्धी नाहीं, शाहाणपण नाहीं, कोणत्याही कामाच्या उपयोगी ते पडत नाहींत. जसे जन्मास आले म्हणजे अज्ञान, तसेच ज्ञान असून स्वतः उपजीविका मिळविण्याचें सामर्थ्य नाहीं, त्यांस कोणी असा श्रीमंत पाहिजे कीं, नेहमीं पांचशें रुपये घरीं पोंचवील, आणि शालजोड्या देईल. असो. असा मान करून कोणी त्यांस जवळ ठेविलें म्हणजे मग शास्त्रीबाबा बहुत शोभतात. परंतु श्रीमंताचा आश्रा नसूं द्या; मग यांची काय अवस्था होईल ती पहा. हे काय करतील ? यांस कांहीं व्यवहारीक विद्या येतच नाहीं. व्यापार धंदा कांहीं कळत नाहीं, व कायदाकानू कांहीं माहित नाहीं. असे गोळे असतात, अशा लोकांचें तुम्ही काय कराल; बरें, लोकांस उपदेश करण्यास योग्य म्हणावे तर तेंही नाहीं, त्यांचे हातून चांगला उपदेश व्हावयाचा नाहीं. व धर्माची सुधारणा व्हावयाची नाहीं; केवळ उकिरड्याचा ढीग आणि त्यांचें पढणें सारखें आहे. मला कोणीतरी दाखवावें कीं, शास्त्रांचा अमूक उपयोग आहे. कांहीं दिसत नाहीं. ज्या देशांत असे लोक मूर्खशिरोमणि आहेत, तेथें दरिद्र, कुनीति, अज्ञान, मूर्खपणा हेच वृद्धिंगत होत जातील. व हल्लींचे गृहस्थ जे आहेत, हे बदलून दुसरे प्रकारचे झाले पाहिजेत. यांच्या आधारावर हे सर्व मूर्खपणा वाढवितात. सरकारचा आश्रा आतां नाहीं, परंतु रयतेचा खुशीचा आश्रा अजून फार आहे. तो देऊं नये असें या गृहस्थांस कळलें पाहिजे. कोणी गृहस्थ एका भटापासून एक खंडी म्हणवितो, आणी त्यास रुपया देतो. कोणी गृहस्थ शास्त्र्यांचें बोलणें करवितो. व त्यांस शालजोडी देतो; व कोणी अग्निहोत्र्यास इनाम देतो. याप्रमाणें देऊन निरुपयोगी माणसें वृद्धिंगत करितात. हेंच देणें उपयोगास लागलें तर किती फायदा होईल? द्रव्यवान असेल त्याणें आपलें द्रव्य नदींत टाकलें तरी तो व्ययच झाला व व्यापारांत ठेविलें, किंवा धर्म केला तरीही व्ययच झाला; परंतु चांगलें कोणतें? याचा विचार करावा. एक लबाड ढवळे बाबा म्हणून उत्पन्न झाला, त्याणें चार लुच्चे जमा करून ढोंग उभें केलें. तें मुळीं पुण्यांत उभें केलें, त्याचें मूळ प्रसिद्ध आहे व त्या बावाचें दुराचरणही प्रसिद्ध आहे. तोच मजूरदार उभे करून ढोलकीं, झांज, वीणा वाजवीत लोकांचें कानटाळें बसवीत तो पुण्यांत ओरडत फिरे. याप्रमाणें तो लबाड ढोंगी सर्वांस ठाऊक असून त्यास पैका मिळाला. व लोक त्याचें आचरण न पाहतां, व त्याणें आपली स्त्री त्यागिली व आणखी कितीएक लबाड्या केल्या, त्या मनांत न आणितां त्याचे पायावर डोकीं ठेवितात, त्यास पैसा देतात, व फुलें घालितात. हे तमाशे पुण्यांतील सर्व लोकांस माहित आहेत. जसे तमाशाचे फडावर लोक मिळतात, तसें त्या बावाचे भोवते तुळशीबागेंत लोक जमत, आणि त्याची कोणी थट्टा करीत; परंतु भजन करणारे शेकडों होते म्हणून त्यास द्रव्य मिळालें. तो बावा

बडोद्यास गेला व मुंबईस गेला, परंतु त्याणें द्रव्यच मिळविलें. कोठें भिकारी झाला नाहीं. तस्मात सर्व ठिकाणीं हिंदु लोक सारखे मूर्ख आहेत. धर्म म्हणून कोणास कळत नाहीं. ईश्वराचें भय कोणाचे मनांत नाहीं, परधर्म त्यांस वाईट वाटतो, परंतु एक चमत्कार पहा कीं, जो प्रथम स्वधर्म टाकून दुसरा धर्म घेतो, त्याची हेळणा फार होते. जो मुळचा परधर्मी किंवा दोनचार पिढ्यांचा आहे, त्याचा द्वेष लोक करीत नाहींत. याचें कारण कीं, लोकांस धर्माचा द्वेष येत नाहीं, परंतु चाल व जात तोडण्याचा येतो. धर्म कसा काय, हें ते जाणत नाहींत. रूढी जाणतात व त्या रूढीविरुद्ध जो चालतो, त्याच द्वेष करितात. अस्तु. याप्रमाणें धर्माविषयीं लोकांच्या समजुती आहेत. त्या जाऊन सर्वांस शाहणपण येऊन ते धर्मात्मे झाले पाहिजेत. नीति, ज्ञान विस्तीर्णतेनें लोकांमध्यें प्रसिद्ध झालें पाहिजे व ढोंगी लोक नाहींसे झाले पाहिजेत. वरती उदाहरण एकच लिहिलें आहे; परंतु असे कितीएक ढोंगी लोक या हिंदुस्थानांत फिरून गृहस्थांचा पैसा खात आहेत. त्यांचा उपयोग कांहीं नाहीं. हे लोक कमी होऊन वास्तवीक विद्वान वाढून ते आपल्या ज्ञानाचा लोकांस उपयोग करतील व जे लोकांची नीति, धर्म व सदाचरण वृद्धी करण्याचा प्रयत्न करतील त्यांस मात्र लोकांनीं द्रव्य देऊन त्यांचें चालवावें. असें न करतील तर मग त्यांपेक्षां मजूरी करणारे बरे. ते आपल्या पोटास मिळऊन खातात, परंतु असे लोक फुकट खावयास योग्य नाहींत. जे उगेच ढोंग माजऊन बसतील आणि लोकांस सांगतील कीं, आम्हीं देवाजवळ पारायण केलें, आम्हीं उपास केले, आम्हीं प्रदक्षिणा घातल्या, आम्हीं नवस केला, आम्हीं तपश्चर्या केली. आम्ही पंढरपुरीं राहतों, आम्हीं आळंदीस राहतों, व आम्हीं यात्रा करितों, तर या लोकांस देण्याचा संबंध काय? एकानें पंचविसाचे वर्षीं संन्यास घेतला आणि मग यात्रा करण्याकरितां पैसा मिळविला. मला वाटतें कीं, हा मूर्ख संन्यासी आहे. याला रोजगारानें पैसा मिळविण्याचा टाकून संन्यासि व्हावयास कोणी सांगितलें? बरें, संन्यासि झाला तर मग भीक मागत कां फिरावें? तसेच यात्रेकरू, तसेच लग्नें करण्याकरितां पैसा मागणारे हे सर्व लोक वेकूब आहेत. हे सर्व उद्योग करून पोट भरतील तर चांगलें. व गृहस्थांनीं असा विचार द्रव्येंकरून कदापि वृद्धिंगत करूं नये. मला मोठा चमत्कार वाटतों कीं, एक मनुष्य येतो आणि म्हणतो माझें लग्न व्हावयाचें आहे. मला दोनशें रुपयांचें साहित्य पाहिजे. ज्या मनुष्यास साहित्य नाहीं, तो लग्न करितो कशास? तसेंच बैरागी शंभर असामींचा मेळा घेऊन फिरतात. ते सगळे जर चाकरी [स] ठेविले तर एक रिजमींट चांगलें भरेल, असे ज्ञान वळकट असतात. आणि म्हणतात कीं, आम्हीं यात्रा करित फिरतों व त्यांस लोक पैसा देतात. पण हीं ढोंगें मोडून सर्व लोकांस शुद्धीवर आणलें पाहिजे. तसेंच विद्वान लोक जे आहेत त्यांणीं स्वदेशाचे व्यवहार, रोजगार व द्रव्य यांची वृद्धी कशानें होईल? जगांत वर्तमान काय चाललें आहे? लोकांची दशा काय झाली आहे? याचा विचार केला पाहिजे. केवळ व्याकरण पढून

जन्म घालऊन उपयोग नाहीं. ही रीत मोडेल तेव्हां या देशाची सुधारणा होईल हें सत्य आहे.

लो० हि०

पत्र नंबर ९०

लग्नें

हिंदु लोकांमध्यें लग्नसंबंधाविषयीं विचार केला तर पृथ्वीवर असे कोणतेही लोक नसतील. प्रथम मुलीस तर मुदतीचा कायदा लाउन दिला आहे. पूर्वीचे कायदे करणारे ऋषी यांस लग्नाची फार घाई असे आणि त्यांचे मनांत मुली त्वरित देऊन टाकाव्या व कोणीकडून तरी लग्नें होऊन प्रजावृद्धी व्हावी, अशा धोरणानें त्यांणीं ठरविलें कीं, आठ वर्षांचे आंत मुलगी दिली तर उत्तम. निदान दहा वर्षांचे आंत तर मुलगी दिलीच पाहिजे, यामुळें वर पाहणें प्रशस्तपणीं होत नाहीं. जशी खताची मुदत जाऊं लागली म्हणजे कोणी तरी वकील पाहून फिर्याद लाऊन टाकावी, मग कांहीं होऊं. तसें आठ वर्षांची मुलगी झाली म्हणजे बापास तातड लागते. दुसरें, अशीं त्वरीत लग्नें केल्यामुळें मुलीस विद्याभ्यास होत नाहीं. तिसरें, लग्नास मुहूर्त पाहतात. व जातक पाहातात. त्यांत गुणाकार, भागाकार कमी जास्ती सम-विषम आला म्हणजे एकनाड, खडाष्टक वगैरे येऊन, पडत नाहीं, असें म्हणतात. यामुळेंही चांगले वर टाकावे लागतात. चौथें, गोत्र प्रवर एक असूं नये म्हणून ठराव आहे. त्यानंतर पांचवी हरकत अशी आहे कीं, देशस्थ, कोकणस्थ, यजुर्वेदी, ऋग्वेदी, कण्व, माध्यंदिन, गुजराथी व दक्षिणी ब्राम्हण इत्यादि हजारो भेद आहेत. त्यांमध्यें विवाहव्यवहार होत नाहीं. अशा अनेक अडचणी घालून त्यांपासून फळ कोणतें झालें म्हणाल तर सुंदर रत्नासारख्या मुलींची धुळधाणी आणि दुर्दशा झाली. बरें, इतक्या अडचणींतून त्यांस बरा-वाईट नवरा मिळाला आणि तो देवी, गोंवर, जरीमरी इत्यादि रोगांनीं मारला तर ती बिचारी जन्मपर्यंत विधवा; तिकडून सासरा, दीर, सासू, जावा, यांणीं म्हणावें कीं, करंटी अवदसा नवरा मारून तोंड कशाला दाखविते, बाप आपले घरीं कां ठेवीना? बरें, इकडे माहेरीं यावें तों भाऊबहिणी म्हणतात, आमचें घरीं तुझें काय आहे? एथें कशास येतेस? बरें रस्त्यांत फिरलें तर लोक म्हणतात कीं, बोडकी पुढें आली, आतां पुढें पाऊल कसें टाकावें? त्याप्रमाणें त्या पोरीनें आपली तिन्ही वयें काढावीं लागतात. बरें कोणाचा आश्रय करावा तर तेथें तरी टीका होते कीं, रंडकीमुंडकींस तूपदहीं कशास हवें! गादी निजावयास कशास हवी? तेव्हां तिणें वैराग्यासारखें संसारांत राहून दिवस काढावे लागतात. याप्रमाणें खाटिकाचे घरीं मेंढरांची देखील दुर्दशा नाहीं. तो त्यांस एक

वेळ सुरी लावितो, त्यावेळेस मात्र काय दुःख होतें, तेवढेंच; परंतु तेथपर्यंत तो हाल करीत नाहीं. आणि हे हिंदुलोक किती दुष्ट आहेत कीं, जे आपल्या स्त्रियांची अशी दुर्दशा करितात, यांस जगांत तरी कोठें दुसरी तुळणा मिळेल कीं काय ? यास्तव या सर्व अडचणी मोडून स्वयंवर व्हावें हेंच फार प्रशस्त आहे. स्वयंवर होऊं लागलें म्हणजे बाकीच्या अडचणी सर्व आपल्या आपण जातील, आणि लग्न हें ज्याचें त्याचें काम आहे. त्यांत इतरांनीं पडणें अयोग्य आहे. बाप जरी झाला तरी-त्याचें लग्नाचें काम मुलीचे इच्छेवर व मुलाचे इच्छेवर ठेवावें हें योग्य; परंतु अज्ञानी लोकांस दया नाहीं. व स्वजातीचा कळवळा नाहीं. अज्ञानानें आपले मुलीविषयीं व बहिणीविषयीं ते खाटकाहून खाटिक होऊन गेले आहेत. आतां ते बुद्धिपुरस्सर असे झाले नाहींत व त्यांस इतर कामांत माणसांची तर काय पण जनावरांची देखील दया आहे. परंतु अज्ञानाचा जोर मोठा, म्हणून स्त्रियांविषयीं असा दुष्टपणा होतो. आतां हा जरी त्यांणीं बळेच किंवा बुध्या केला नाहीं तरी स्त्रियांस फळ सारखेंच आहे. दुसरें, लग्नास विनाकारण खर्च करितात. आणि लौकिक संपादन करितात व भटाभिक्षुकांस गावयास गोष्टी पुष्कळ होतात. परंतु लग्नाचे खर्चाचे जुलमामुळें हजारो लोकांस कर्ज होऊन ते दरिद्री झाले आहेत. शास्त्राप्रमाणें लग्न ५ रुपयांत होईल, परंतु त्याचा लौकिक इतका वाढला कीं, दहा रुपये महिन्याची ज्यास प्राप्ती आहे, त्यास दोनशें रुपये खर्चास पाहिजेत. उभय पक्षांची समजूत पडत नाहीं. दोघेही खराबीस येतात. मनुष्यास पोटाचें कर्ज इतकें होत नाहीं. कारण नित्यापुरतें मनुष्य मिळवितोच, परंतु एकदम दोनशें रुपये कर्ज केलें म्हणजे, त्याचें व्याज देखील सावकाराचें फिटत नाहीं. असे किती कर्जभरी झाले आणि किती कुळंबी कर्जाचे पेंचांत आले याचा दिर्घ विचार केला तर हा मोठा अनर्थ आहे, असें दिसतें. परंतु याजविषयीं लोक कांहीं विचार करित नाहींत. पांच रुपयांत सर्व लोक लग्नें करितील तर कर्ज होण्याचें मूळच उपटून जाईल. पूर्वीचे ऋषी वगैरे शास्त्र करणारे होते, त्यांणीं ही मोठी चूक केली कीं, मुलींचा विवाह स्वछंदानें व्हावा तो न होऊं देतां जबरदस्तीनें करण्याची चाल घातली. तिजपासून होणारे अनर्थ आतां अगदीं स्पष्ट दिसूं लागले आहेत. तरी नियम लोक फिरवीत नाहींत. मागाहून शास्त्राचा ओघ पाहिला तर, जुनें नवें होत आलेंच आहे. हजारो शास्त्रांचे नियम ऋषींनीं फिरविले आहेत. परंतु लोक असें म्हणतात कीं, हें ऋषींनीं केलें. आतां ऋषी कोठें आहेत ? परंतु मी त्यांस पुसतों कीं, ऋषी म्हणजे काय ? जे ग्रंथकर्ते त्यांसच ऋषी म्हणतात. आपण नवे ग्रंथ केले तर आपण ऋषी होऊं. कायदे करणें हें तर राष्ट्राचें काम आहे. प्रत्येक काळीं जे जे शाहणे लोक असतील त्यांणीं शास्त्र करावें, हें उचित आहे. कोणी जर असें म्हणेल कीं, लहानपणीं माझी आई मला बाळकडू पाजीत होती आणि आतां मी म्हातारा झालों आहे व मला अर्धांगवायू झाला आहे, तर मी औषध कसें घेऊं? माझी आई कोठें आहे? तर त्या वेड्यास लोक हसतील कीं नाहीं? आई मरून बहूत वर्षें झालीं. पण आतां

रोग झाला तर वैद्याकडून जें औषध मिळेल तें घ्यावें. तद्वत आतां मरून गेले ते ऋषी कोठून आणावेत? आपणच ऋषी होऊन शास्त्र यथायुक्त असेल तें ठरवावें, हेंच योग्य. सांप्रत इंग्रज सरकार दरदिवशीं नवे कायदे करितात. त्यावरून सर्व व्यवहार, राज्यकारण व फौजेचा बंदोबस्त होतो. आणि लग्नाकार्यासंबंधीं क्षुल्लक ठराव आपण केले तर चालणार नाहींत कीं काय? परंतु या लोकांत कोणी चांगला पुढारी सुधारणा करणार नाहीं व जरी कोठें क्वचित असला तरी लोक इतके हलके स्थितीस आले आहेत कीं, त्याचें ते ऐकणार नाहींत. पूर्वीं शंकराचार्य, भास्कराचार्य, इत्यादि झाले, त्यांचे ग्रंथ लोकांनीं मान्य केले. परंतु आलीकडे अज्ञान फार दृढ झालें आहे. सांप्रत हे लोक शिकविण्याचे स्थितींत नाहींत. यास्तव यांचा पुढारीपणाही कोणी घेत नाहींत. जसें लहान अर्भकास पंतोजी शिकवील, परंतु अगदीं इस्पतळांत वेडे आहेत, त्यांस कोणी उजळणी शिकऊं शकेल किं काय?

लो० हि०

ता० १० मार्च सन १८५०

पत्र नंबर ९१

दानधर्म करणें

सांप्रतकाळींच आमचे लोक मतिभ्रष्ट फार झाले आहेत असें नाहीं. हे मुळापासून असेच आहेत. परंतु आतां त्यांचा मूर्खपणा व मतिभ्रष्टपणा विशेष प्रगट मात्र झाला आहे. पूर्वीं हे लोक स्वसत्तेंत होते आणि आतां परसत्तेंत गेले आहेत. पूर्वीं त्यांस परदेशचे लोक भेटले नव्हते. व विशेष विद्वान व विशेष युक्तिवान अशा लोकांशीं यांची गांठ पडली नव्हती म्हणून या देशचा मूर्खपणा विशेष उघड झाला नव्हता. जरी हे मूर्ख होते, तरी यांस हसावयास कोणी दुसरा नव्हता. एकानें ग्रहणांत चंद्रास राहू खातो असें म्हटलें तर दुसरा म्हणत असे कीं, त्याचे भोवतें लोकालोक पर्वत आहेत. यास्तव मूर्खपणा अपसांत झांकून जात होता. पहिले काळचे राजे देखील असे मूर्ख होते कीं, त्यांणीं सनदा देऊन इनाम गांव करून दिले आहेत, परंतु त्याविषयीं असें त्यांचे मनांत येत नव्हतें कीं, या ब्राम्हणाचें चालवावें कशाकरितां? हा करितो काय? आळसांत वय घालविण्यानें राजास अभीष्ट व कल्याण कसें होईल? हें किमपि मनांत आणित नव्हते. याप्रमाणें अन्नछत्रें, दक्षिणा व खिचडी वगैरे नाना प्रकारचीं धर्मकृत्यें करित. परंतु त्यांचा हेतू इतकाच कीं ब्राम्हणांचें चालवावें. यामुळें ब्राम्हणांनीं विद्या करणें सोडून दिलें. फुकट

मिळाल्यावर श्रम कोण करितो? जुने ग्रंथ पाहून निर्वाह करूं लागले. जुनें ज्योतिष, जुनें वैद्यक, जुनें धर्मशास्त्र, हेंच संपूर्ण आहे असें त्यांस वाटूं लागलें. राजांनीं तीच प्रवृत्ती घातली, आणि ब्राम्हणांस आळशी केलें. जेवणापलीकडे त्यांस कर्तव्य राहिलेंच नाहीं. ब्राम्हणांचे हातून विद्यावृद्धी व्हावी व लोकांची सुधारणा व्हावी व जो वतन खातो, त्याचे हातून काम व्हावें हें कोणाचे लक्षांतच नाहींसें झालें. त्यांस सुखी ठेवावें आणि त्यांणीं आशीर्वाद द्यावा म्हणजे त्यांत सर्व आहे असें समजूं लागले व अद्यापी बहुतकरून अडाणी लोक हेंच समजतात; आणि या प्रकारचा धर्म करितात. उद्योगवृद्धी होण्याचा धर्म करीत नाहींत. कोणी असा नाहीं कीं, शाळेकरितां किंवा तारवांत बसून किंवा देशांतरास जाऊन नाना प्रकारचे पदार्थांचा व लोकांचा शोध करण्याकरितां किंवा ग्रंथ करण्याकरितां किंवा अमूक एक वस्त्र करण्याची वगैरे रीत आहे ही सुधारण्याकरितां रुपये खर्च केले आहेत, असा एकही पुरुष आढळत नाहीं. परंतु ब्राम्हणांचीं लक्षभोजनें व सहस्रभोजनें, तशीच दक्षिणा, तशीच यात्रा इत्यादिकांत पैसा उधळलेले लोक गांवो-गांव आहेत. वास्तवीक पाहिलें तर जन्मापासून भट हे धर्माचे खातात, पण करितात काय? याचा हिशेब जर कोणी पुसला तर उत्तर नाहीं. पूर्वी अहिल्याबाईसारखी धर्मकृत्यें करणारी झाली, तरी तिणें धर्म केला तो व्यर्थ गेला. तिणें आपले ज्ञानाप्रमाणें उत्तम केलें आणि तिला जें चांगलें वाटत होतें व तिच्या देशांत जे मोठे शाहणे होते त्यांचे अनुमत्त पडावयाजोगें तिणें सर्व केलें. जें तिला ठाऊक नाहीं तें होईल कोठून? असो, आम्ही तिला शब्द लावीत नाहीं. परंतु आजपासून पुढें जो धर्म करावयाचा तो तसाच करावा कीं काय? एवढें आम्हांस तात्पर्य कळलें पाहिजे. हें लोक समजावयास लागतील तर बरें, व जितकें लवकर समजतील तितकें चांगलें. जो तो धर्म करण्याची इच्छा बाळगितो व हिंदु लोकांप्रमाणें धर्मावर दुसरे लोकांचें चित्त नाहीं. यास्तव विशेषें-करून आम्हांस त्यांचे लक्षांत ही गोष्ट आणून दिली पाहिजे कीं, ते ज्या गोष्टीस धर्म म्हणतात तो खरा धर्म आहे कीं नाहीं? अशा प्रकारचा दानधर्म केल्यास ईश्वराजवळ पसंत पडेल कीं काय? आम्हांस वाटतें कीं, मूर्खपणाचा धर्म कदापि भगवंतास मान्य होणार नाहीं. धर्माच्या रीति दोन आहेत. एक गरीबास त्यांचे शरीराचे रक्षणार्थ व सुखाकरितां धर्म द्यावा. दुसरा ज्ञानवृद्धी होण्याकरितां व लोकांस बोध होऊन मन सुधारण्याकरितां धर्म द्यावा. या दोन प्रकारांतून कोणत्या प्रकारांत हिंदूचा धर्म आहे बरें? कोणी म्हणतील कीं, भटास आम्हीं जेवायास घातलें तर त्यांचे शरीरास सुख होतें. म्हणून हा पहिल्या प्रकारचा धर्म झाला. परंतु तसें नाहीं. पहिल्या प्रकारचा धर्मास पात्र कोण याचा विचार केला पाहिजे. शरीराचे पोषणाकरितां धर्म करणें याज-वर गरीब व व्यंग यांवाचून कोणाचा दावा नाहीं. व त्यामध्यें जातीनियम वगैरे कांहीं-एक अडचण असूं नये. व दुसरे प्रकारचा धर्म जो आहे, तो विद्वानांस मात्र करावा. व त्यांस कोणतेही प्रकारची काळजी न ठेवितां त्यांणीं लोकांस ज्ञान सांगावें व लोकांस

शहाणे करावें. या प्रकारचे पंतोजी वगैरे धर्माध्यक्ष व उपदेशक वगैरे सर्व यास पात्र आहेत. तेव्हां असा धर्म करण्यास भट व पंडित हे पात्र आहेत कीं काय ? यांस पहिल्या प्रकारचा धर्म करावा तर हे आंधळे, लंगडे, पांगळे नाहींत. व दुसऱ्या प्रकारचा धर्म करावा तर यांची योग्यता दुसऱ्यास शाहणें करण्याची नाहीं. व यांस कांहीं स्वतः समजत नाहीं. हे दुसऱ्यास कसे शिकवितील ? यांस धर्म कळतच नाहीं. सोदे, लबाड, भडवे, आर्जवी, कुटाळ असतात, त्यांच्याहूनही यांची वर्तणूक बरी नसते. हें सर्वांस प्रसिद्ध आहे. भट हे गृहस्थांच्या घरीं सर्व वाईट कामें करितातच. तसेंच शास्त्री, पंडित आहेत. यांच्या वर्तणुकी बाजिरावानें वाईट कर्म करून उघड केल्या. तेव्हां यांस धर्म केल्यानें हा धर्म कोणत्या प्रकारचा होईल ? आलीकडे एकानें काशीयात्रेस जातांना लाख रुपयांचे जिन्नस, पवित्रकें, नथा वगैरे सुवासिनींस व भटांस वांटावयाकरितां खरेदी करून बरोबर नेले व याप्रमाणें सर्व धनवान् करतात. व लाखो रुपये विष्णुपदावर घालतात. व गयावळांस देतात. परंतु हा धर्म होतो कीं काय ? आळसाची मात्र वृद्धी होत्ये. यापासून फळ काय होतें तें मला समजत नाहीं. जन्मापासून असे मूर्ख, व अज्ञानानें अंधळे लोकांपासून पैसा काढून त्याजवर निर्वाह कांहींएक काम न करितां करणारे हे भट व शास्त्री यांस आणखी पैका दिला तरी त्यांच्या पूर्वींच्या खोडी जातील काय ? त्यांनीं काम करावें, उद्योग, प्रयत्न, व लोकांची सुधारणा करावी, हें जरूर आहे. हें कदापि समजणार नाहींत. इंग्रजी राज्यांत असा धर्म बहुत श्रीमंत लोक कमी जहाल्यामुळें बंद जहाला, यास्तव इंग्रज लोकांस ब्राम्हणलोक वाईट म्हणतात, त्यांस दुसरें कांहीं समजत नाहीं. स्वसत्ता गेली व स्वराज्य गेलें. हें आपले देशांतील सर्व लोकांस अनिष्ट आहे. इत्यादी स्वदेशाभिमानाच्या गोष्टी त्यांस ठाऊक नाहींत. त्यांस जेवायास मिळालें म्हणजे कोणीही राज्य करीत असलें तरी चिंता नाहीं; त्याची स्तुती करतील. असे हे ब्राम्हण स्वार्थतत्पर आहेत. स्वदेशाचे इतर जातीचे लोकांविषयीं त्यांचे मनांत कांहीं येत नाहीं. फक्त आपलें जेवण व मान कमी जहाला एवढ्याचेंच त्यांस दुःख आहे. व बाजीरावानें इतकें वाईट केलें तरी त्यास ते अद्याप चांगला म्हणतात. त्याची स्तुती करतात. व त्यास धर्मप्रभू म्हणतात. तस्मात या ब्राम्हणांच्या समजुती किती बदलल्या पाहिजेत ? अस्तु. आमची सर्व लोकांस विनंती आहे कीं, आपली प्रतिष्ठा या श्वानरूपी भटांमध्यें मिरविण्याकरितां त्यांस कदापि धर्म करूं नये. जो धर्म करील त्यास सत्पात्र आहे असें पूर्वी लक्षांत आणा. एक अगदीं भिकारी दरिद्री लंगडा पांगळा रोगादिक प्रारब्धाचे योगानें भिकारी जाहलेला आणि जर त्याचा कांहीं उपाय चालत नाहीं, तर त्यास आश्रा द्या. आणि दुसरे, जे पुस्तकें लिहितील व लोकांस शहाणे करण्यास मेहनत करतील व जे वर्तमानपत्रें व ग्रंथ इत्यादी उपयोगी वस्तू छापून प्रगट करतील, त्यांस तुम्हीं मोठे विद्वान व लोकांचे हितकर्ते समजून त्यांस सत्पात्र जाणून धर्म करा व त्यांचे ग्रंथ घेऊन लोकांमध्यें वाटा व हींच वायनें समजा. तींच संक्रातीचीं तिळपात्रें, श्रावणीचीं दीपदानें, माघस्नानाचीं संपूर्णें, चातुर्मासाचीं संपूर्णें, व तुळशी आणि

लाखोल्या त्याच समजा. ज्ञानवृद्धींत पुण्य आहे असें माना. लाखो लोक अज्ञानी स्थितींत आहेत. त्यांस कांहीं एक कळत नाहीं. त्यांस ज्ञानी करण्यापेक्षां दुसरा योग्य धर्म कोणता? यास्तव मरतेसमईं देऊळ बांधावयास सांगूं नका, पण नवे छापखाने व नवीं पुस्तकें करण्यास सांगा. देवळें पुष्कळ आहेत तितकीं पुरेत हें समजा. हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर ९२

भिकारी

आमचे लोकांत सोवळ्याओवळ्यामुळें अनेक अडचणी पडल्या आहेत. जर ब्राम्हणास एका गांवाहून दुसऱ्या गांवास जावयाचें आहे, तर किती खटपट केली पाहिजे कीं, बरोबर भांडीं व वस्त्रें घेतलीं पाहिजेत. कारण कीं, दुसऱ्या जातीचे एथें जाऊन त्यांचे भांड्यांत खातां येत नाहीं. बरें आणखी कोठें कोठें धर्मशाळा वगैरे नाहींत म्हणून कोठें जाऊन उतरावें तर आपला जिन्नस चोरीस जाईल कीं काय, याचें भय पडतें. सर्व गांवांत फिरून एका ठिकाणाहून लांकडे, दुसरे ठिकाणाहून पीठ असें जमऊन आणावें लागतें. जर कोणाचे घरीं उतरलें आणि त्याची जात भिन्न असली, तर त्याचें पाणी उपयोगी नाहीं. व त्याची मदत उपयोगी नाहीं. व त्याचा स्पर्श उपयोगी नाहीं. तेव्हां स्वतः पाणी नदीवरून आणावें व पुनः लागलें तर आणखी हेलपाटा घ्यावा असे तापत्रय घडतात. यास्तव ब्राम्हणाकरितां अन्नछत्रें घालतात. तेणेंकरून हे ब्राम्हणाचे श्रम जावे इतकाच त्यांचा हेतु आहे. या देशांत ब्राम्हणास बाहेर प्रवास करणें म्हणजे अतिशय दुःखकारक आहे. याजकरितां जर दर एक गांवीं एक घर बांधून त्यांत सर्व सोयी केल्या तर फार चांगलें होईल. परंतु जातीमुळें अडचणी फार आहेत. तत्रापी प्रवासी लोक जातीचा विधिनिषेध फारसा बाळगीत नाहींत. बरोबर शिजलेलें अन्न घेतात. त्यांस कोणी शिवलें तरी तेंच खातात. त्यांचे रीतीप्रमाणें एक घर सर्व जातींस बांधलें तरी त्यांत सर्व प्रवासी लोक राहतील, यांत संशय नाहीं. आणि सुख फार होईल. पाहा आतां पुण्यांत असें नाहीं म्हणून प्रवासी कोणी आला तर त्यास उतरावयास जागा बहुधा मिळत नाहीं. कदाचित मिळाली तर ती देवळांत किंवा धर्मशाळेंत. व त्यास कोणी सामान देणारा नाहीं. हात धुवावयास नदीवर गेलें पाहिजे. लाकडें सोधून आणलीं पाहिजेत, याजकरितां जरूर आहे कीं, एका माणसानें अशा धर्मशाळेचे मुकत्यार होऊन त्याणें पैसा घेऊन सर्व पुरवावें व जातीप्रमाणें प्रत्येकाचा धर्म राखावा. इतकी तजवीज झाली तर बरें पडेल. मुंबईचे वाटेनें असे ब्राम्हण लोक आहेत. परंतु जेथें ब्राम्हणलोक आहेत, तेथें कुळंबी

जावयाचा नाहीं. जेथें कुळंबी जातो, तेथें महार जाणार नाहीं. या अडचणी अतिशय आहेत. त्या युक्तीनेंच दूर केल्या तर होतील. नंतर ब्राम्हण लोक प्रवास करूं लागतील. सांप्रत ब्राम्हणांस जर चौपट नफा जहाला तर घरांबाहेर जाणार नाहींत. ते म्हणतात, पुण्यांत दाहा रुपये नफा बरा, परंतु मुंबईस पन्नास रुपये नको. ते म्हणतात कीं, त्या विटाळांत कोण जातो; येथून जाण्याचें तापत्रय, आपला ब्राम्हणी विचार व आचार कसा चालेल? कोठें प्रवासास जावें? इत्यादि विचार करून ब्राम्हण लोक बहुतकरून घराबाहेर पडत नाहींत. जर कदाचित उपाय नाहींसा झाला तर मात्र पडतील. तरी त्यांस फार अमंगळ वाटेल. त्यांस असें वाटेल कीं, आज पंधरा दिवस मुंबईत मी राहिलों खरा, परंतु जरी दोन पैसे नफा झाला तरी, धर्म बुडाला, पाणी विटाळाचें पियालों, शिवाशिव जहाली, निर्मळपणा कांहीं राहिला नाहीं, सोनार, परभू यांचा संपर्क जहाला; आणि याप्रमाणें हजारो ब्राम्हण म्हणतात. ब्राम्हणांची रीत अशी आहे कीं, घरांत सोवळेंओवळें माजवावें आणि पुढें पाणी शिंपून मागे चालावें. ग्रहण पडलें म्हणजे सर्व घरांतील टाकून द्यावें. आंघोळी कराव्या. कुळंब्याचा शब्द कानीं पडूं देऊं नये. हें त्यांस गोड वाटतें. म्हणून बाहेर पडावयाचा कंटाळा आणि त्रास करतात. दुसरे आणखी बहूत प्रकार गैरशिस्त या देशांत आहेत. त्यांपैकीं कांहीं खालीं लिहितों. भिकारी लोक जे आहेत त्यांचा कर सर्वांवर आहे. धर्माप्रमाणें त्यांस देणें योग्य आहे. परंतु पाहा कीं, भिकारी लोकांच्या अव्यवस्था आमचे लोकांमध्यें किती आहेत? भिकारी लोकामध्यें दोन पक्ष समजले पाहिजेत. एक पक्ष धर्माध्यक्ष भिकारी आणि दुसरा पक्ष अशक्त भिकारी. आतां पहिले पक्षांत शास्त्री, पंडित, हरदास, पुराणीक, वैदीक, जोशी, भट, तपस्वी, हे सर्व जाणावे. दुसरे पक्षांत हरएक जातीचे अंधळे, पांगळे, लंगडे, व्याधिष्ट, दरिद्री, वयानें लहान, अज्ञान इत्यादि सर्व जाणावे. आतां पाहा कीं, दुसरे पक्षाचे भिकारी लोकांकरितां कोणी कांहींच धर्म करित नाहीं. हिंदू लोक अज्ञान दूर करण्याकरितां आणि रोग जाण्याकरितां आणि विद्या होण्याकरितां कांहीं धर्म करतील, हें तर होणार नाहीं. कोणी मेला व त्याचे पोराचें रक्षण करण्याकरितां कोणी नाहीं, तर त्याजकरितां कोणी धर्म करणार नाहीं. जात पाहून धर्म करतात. तैलंग ब्राम्हण भिक्षेकरी असला तर त्यास तांदूळ घालतात, तोच गुजराथी असला तर जोंधळे घालतात, बहिरागी असला तर कदाचित् पीठ घालतात, माधुकरी मागणारा जर ब्राम्हण असला तर आंत येऊ देतील. नाहीं तर माधुकरी कदापी घालणार नाहींत. जेवतांना दुसरे जातीचा शब्द कानांत पडला असतां विटाळ जहाला म्हणतील, जर रक्तपिती होऊन वृद्धापकाळानें व रोगानें उद्या मरणार असा मनुष्य पर-जातीचा रस्त्यावर पडला असेल, आणि त्यास अन्न चार दिवस खावयास मिळालें नसेल, तर त्याजकडेस कोणी पाहणार नाहींत. शेंकडो ब्राम्हण लोक घोड्यावर जातील, परंतु त्या गरीबाकडे डोळा देखील करावयाचे नाहींत. आणि तो जर महाराचे जातीचा असला तर त्यास शिवणार नाहींत. व पाणी देणार नाहींत. तो तेथें अन्नावांचून मरेल, असे

कितीएक नित्य मरत आहेत त्यांत गांव खेडें असलें तर कांहीं तरी संभाळ होईल. परंतु शहरांत लोक अगदींच पुसणार नाहींत. जर गाय बैल मरत असेल तर त्यास कोणी तरी ब्राम्हण जपतील, परंतु अन्य जातीच्यास अगदींच पाहाणार नाहींत. याप्रमाणें गरीबांच्या धर्माची व्यवस्था आहे. शिवाय आणखी चाल अशी आहे कीं, पुण्यासारख्या शहरांत आगांतुक ब्राह्मण आहेत. ते लोकांस उपद्रव करून पोट भरतात. व असेच जेथें जेथें ब्राह्मणांची वस्ती आहे, तेथें आगांतुक आहेत. तैलंग देशांतून ब्राह्मण पोट भरावयास इकडे देशांतरास येतात; परंतु ते रोजगार धंदा किंवा शेतकी कांहीं करीत नाहीं. फक्त आगांतुकी करितात. याप्रमाणें आळशी ब्राह्मण शेंकडो आहेत. त्यांस कामकाज, विद्या व उद्योग न करितां लोक संरक्षण करतात. आणि गरीब धर्मास पात्र जे आहेत त्यांस कोणी पुसत नाहीं. आणि लग्नकार्य जहालें म्हणजे कोणी पांचशें रुपये दक्षणा, कोणी हजार रुपये दक्षणा वाटतात. ती वाटण्याची रीति अशी आहे कीं, जो बळकट व दांडगा असेल त्यास मात्र ती दक्षणा पोंचेल. रोगी अशक्त, लहान असला तर त्यास कदापी पैसा मिळावयाचा नाहीं. या प्रकारें दक्षणा वाटतात व जेवायासही याप्रमाणेंच घालतात. आतां पहिल्या पक्षाचे म्हणजे धर्माध्यक्ष भिकारी यांस पैका देण्याची रीति तरी चांगली नाहीं. त्यांस पैसा देणें तो त्यांजपासून लोकांचा कांहीं फायदा व्हावा ही त्यांची बुद्धी नाहीं. फक्त त्यांस दिलें, म्हणजे पुण्य होतें ही समजूत आहे. याजकरितां उपयोग कोणीच पाहात नाहीं. कोणी अनुष्ठानें करतो, म्हणजे शिवरात्रीचा अतिरुद्र म्हणून एक अनुष्ठान आहे. म्हणजे एक दोनतिनशें ब्राह्मण जमा करावे. एकेकास दोन रुपये द्यावे आणि त्यांस आणून स्वस्थ बसवावें. एक तिळाचा होम करितो. बाकीचे सर्व त्याजकडे पाहतात. असे अकरा हजार होम झाले म्हणजे अतिरुद्र झाला. याजबद्दल खर्च दोनतीन हजार होतो. तो ब्राम्हणास पोंचतो. आतां त्याचा उपयोग पाहिला तर पांच हजार ब्राम्हणांचा वेळ व्यर्थ गेला. दोन-तीन हजार रुपये खर्च जहाले, त्यापासून विद्या वाढली नाहीं. शहाणपण वाढलें नाहीं, उद्योग झाला नाहीं, विचार झाला नाहीं, कांहींएक नाहीं, एक मूर्खाचे समजुती-प्रमाणें खर्च जहाला. इतकेंच फळ. याप्रमाणें हजारों अनुष्ठानें आहेत. कोणी म्हणतो शतचंडी, कोणी म्हणतो अभिषेक, याप्रमाणें आळशी लोक स्वस्थ जेवण, दक्षणा घेतात आणि बसतात. धर्माचें रक्षण करीत नाहींत; गरीबाची तजवीज करीत नाहींत; लोकांस धर्मार्थी व धर्मतत्पर करावें तें नाहीं. फक्त आपलें पोट आणि यजमानाची स्तुती अशीं मात्र ते आळशी लोक कामें करतात. व त्यांस जो पैका देतात तो कांहीं उपयोगाकरितां देत नाहींत. असा धर्म करणें हें फक्त आळशीपणाची वृद्धी करणें आहे. याप्रमाणें अनुष्ठानें, जप वगैरे जितक्या ब्राह्मणांच्या मिळकती आहेत त्या सर्व अशाच आहेत. व प्राचीन काळापासून चालत आलेल्या दक्षणा, खिचडी, सभा, देवस्थानें, या प्रकारचीं आहेत. यांची सुधारणा लोकांशिवाय होणार नाहीं. लोक सुधरले म्हणजे अर्थातच सर्व त्यांचे पुढारी सुधरतील, किंवा जेव्हां त्यांचे पुढारी सुधरतील तेव्हां

लोक सुधरतील. परंतु सांप्रतचे धर्मांत सर्वांचें कल्याण होणें हें अगदीं होत नाहीं. हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर ९३

नवीन ग्रंथांची आवश्यकता

आमचे लोकांस विचार अगदीं नाहीं. विद्या वाढविणें व बुद्धी वाढविणें हें तर त्यांस माहीत नाहीं. सांप्रत सुधारलेले लोक विद्यावृद्धी करण्याकरितां पुष्कळ झटत आहेत. परंतु हें इतर कोणाचे मनांतदेखील येत नाहीं. मराठी भाषेंत ग्रंथ अनेक छापिले आहेत. व आणखीही वरचेवर छापत आहेत. वर्तमानपत्रांत अनेक तऱ्हेचे मजकूर व माहितगारी लिहून छापतात. परंतु त्यांचा कोणी वाचणारा नाहीं, जे आहेत ते गरीब आहेत. श्रीमंत व थोर जुन्या काळचे यांस असें वाटतें कीं, हा व्यर्थ कागदाचा खर्च कशाकरितां करतात ? व यांत उपयोग काय ? परंतु त्यांचे लक्षांत असें येत नाहीं कीं, आम्ही केवळ मूर्ख आहों व आम्हांस कांहीं समजत नाहीं. पाहा कीं, या लोकांस आमचा देश कोठें आहे. व आणखी देश कोठें आहेत. व तेथें कोण आहेत. व या देशांत सुधारणा काय पाहिजेत. व जर कोणी करूं लागला तर त्यास अनुकूल व्हावें हें समजत नाहीं. नाना प्रकारच्या विद्या आहेत त्यांपासून लाभ बहूत आहेत. समुद्रांत नावा चालविण्याची विद्या आमचे लोकांत कोठें आहे ? रसायणशास्त्र व त्यापासून लाभ होतात तें कोठें माहीत आहेत ? यंत्रज्ञान कोठें समजतें ? निदान चांगलें कोणतें व वाईट कोणतें याचादेखील भेद समजत नाहीं. जर कोणी चांगले कामास आरंभ केला तर त्यास वाईट म्हणतात. कोणी वाईटास केला तर त्यास चांगलें म्हणतात. असे विलक्षण लोक आहेत. कोणी उपयोगी ग्रंथ केला, तर तो कोणी घेत नाहींत व त्यांत काय आहे हेंदेखील पाहात नाहींत. त्यांस असें कळत नाहीं कीं, ज्या मनुष्यानें ग्रंथ लिहिला त्याचा कांहींतरी हेतू असेल व त्यास असें वाटत असेल कीं, लोकांस ज्ञान नाहीं तेव्हां या ग्रंथाचे द्वारें त्यांस तें मिळावें. परंतु लोक ही गोष्ट समजत नाहींत. ग्रंथांत कांहीं असो. कोणी कांहीं म्हणो, ते जुन्या रितीनें सर्व गोष्टी घडाव्या, असें पाहातात. त्यांस अद्यापी इतकें देखील समजत नाहीं कीं, आमचे लोकांस कांहीं कळत नाहीं. त्यांस बहूत ग्रंथ झाले असतां उपयोग होईल. व देशांतील लोक शाहाणे होतील. त्यांची समजूत अशी आहे कीं, संक्रांत आली तर चार आणे खर्चून एक तांब्याची तबकडी घेऊन आंत तीळ घालून दक्षिणेसहित एखाद्या मूर्ख ब्राम्हणाचे हातीं देतील, आणि आम्ही धर्म केला, धन्य झालों असें म्हणतील; परंतु हेच चार आणे

देऊन एक अमूक नवीन ग्रंथ झाला आहे तो घेणार नाहींत. बरें तिळपात्र दिलें त्यांत दोन आणे ब्राम्हणाच्या पदरीं पडतात व दोन आणे तांबटास मिळतात, तद्वत चार आण्यांचे एक पुस्तक घेतलें तर दोन आणे कागदावद्दल जातील. दोन आणे मजुरीबद्दल ब्राम्हणास मिळतील. तेव्हां हाही त्यांचे रीतीप्रमाणें धर्मच झाला. वामनद्वादशीचें व्रत करतात, त्यास बारा लहान पोरें मुंज जहालेलीं आणून त्यांस दोन तीन रुपयांचा विषय देतात, परंतु तो विषय असा असतो कीं, त्याचा उपयोग कांहीं पडत नाहीं. परंतु लोकांस असें वाटतें कीं, हें पुराणांत सांगितलें आहे त्याप्रमाणें आहे, म्हणून हेंच पुण्य. परंतु त्या रुपयांचीं पुस्तकें आणून मुलांस दिलीं किंवा त्या रुपयांत ब्राम्हणाचे मुलास एकादी विद्या करविली, शाळेंत आठचार आणे देऊन त्यास पाठविलें, तर त्यास फायदा होईल. सोन्याच्या प्रतिमा करून ऊस मडकें यांत पूजा करून द्याव्या, त्यापेक्षां ग्रंथ दिले तर मुलें जन्मपर्यंत वाचतील, शहाणीं होतील, आंणि उपयोग फार पडेल. तसेंच लोक मरतेसमईं तुला करितात. त्यांत पांचचार हजार रुपये भरतात. मग ते मनास येईल तसे उडवितात. त्यास कांहीं अनुक्रम नसतो. त्या पांच हजारांचें कांहींतरी चिरकाल राहण्याजोगें काम केलें तर किती लोक शहाणे होतील. लोक असें म्हणतात कीं, पुष्कळ ग्रंथ लिहितात, परंतु पैसा कोणापाशीं आहे? विकत घ्यावे कोणी? आणि इकडे तर असा अनिर्वाच्य खर्च करितात. आणि जें उपयोगी तें करीत नाहींत. आतां वृद्ध लोक जे आहेत ते सुधरतील हें तर घडतच नाहीं. कारण कीं, जो मनुष्य पंचवीस वर्षांवर जहाला त्याची समजूत लहानपणीं जी पडते तीच त्याची कायम होते. व त्यास असें वाटतें कीं, मी शहाणा, मला शिकवितात काय? याच शहाणपणावर मी पैसा मिळविला, संसार केला; आतां जरी दरिद्र आलें तरी, मी वेडा आहे हें त्यांस कदापि वाटत नाहीं. यास्तव त्याची सुधारणा व्हावयाची नाहीं. म्हणून या देशांत जितके पंचवीस वर्षांवरचे जुने काळच्या समजुतीचे माणूस आहेत, त्यांची आशा अगदीं नको. ते जातील तेव्हां पक्की सुधारणा होईल. परंतु जे लहान आहेत व ज्यांस शहाणपण मिळविण्याचें आहे, त्यांजवर आमची आशा आहे. आणि त्यांचे हातून कांहीं सुधारणा झाली तर होईल. याजकरितां विद्याभ्यास जो करविणें तो चांगली समजूत पडेल, लोक विचार करणारे होतील, अशा प्रकारचे त्यांस पंतोजी व शाळा पाहिजेत. व जी भाषा व जे ग्रंथ प्रथम मुलांचे हातीं पडतात व ज्या मनुष्याची संगत त्यांस असत्ये तशी त्यांची समजूत होत्ये. जर संस्कृत भाषा प्रथम मुलांस समजाविली तर त्यांच्या समजुती तशाच होतील. जर इंग्रजी शिकविलें तर तशाच होतील. जर मराठी शिकविलें तर तशाच होतील. यास्तव मुलास ग्रंथ वाचावयास द्यावयाचे ते प्रथम चांगले पाहिजेत. त्यांस सुबुद्धी होऊन त्यांची समजूत चांगली पडावी व त्यांणीं बहूत वाचण्यावर लक्ष द्यावें. व त्यांच्या मनांतून जुन्या काळच्या भटांकडून वगैरे ज्या समजुती येतात, त्या सर्व लबाड असें त्यांस भासलें पाहिजे. व त्यांस ग्रंथाची गोडी लागून ग्रंथ वाचावे असें वाटलें पाहिजे. आमचे लोक सांप्रतकाळीं

अगदीं अज्ञानी आहेत. त्यांस ग्रंथ म्हणजे काय हें समजत नाहीं. व कोणी वाचित नाहींत. व विकतही घेत नाहींत. जर कोणी म्हटलें कीं, मी ग्रंथ करण्यावर पोट भरीन तर त्यास कांहीं मिळावयाचें नाहीं. व कोणी शास्त्री, पंडित, भटें जरी मूर्खशिरोमणी असलीं तरी त्यांस लोक चार रुपये देतील. परंतु ग्रंथकर्ता व वर्तमानपत्र छापणारा व छापखाना घालणारा विचारशीलही असला तरी त्यास कोणी पैसा देणार नाहींत. व त्याचा माल अगदीं घेणार नाहींत. शिवाय त्यास मूर्ख म्हणतील. हाच काय शहाणा ? जनावरांचीं वर्णनें व इतर देशांचीं वर्णनें यांत काय आहे ? असे उपहास करतील. केवढें आश्चर्य आहे कीं, या लोकांस इतकी भ्रांत अजून आहे. ग्रंथ करणाऱ्यास खप नाहीं. ग्रंथ करून यास विकत घेणारे मिळविणें म्हणजे मोठा प्रयत्न पडतो. जुलमानें व भिडेनें ते लोकांचे गळीं बांधावे लागतात. त्यांजबद्दल किंमत देणें म्हणजे लोकांस असें वाटतें कीं, हा पैसा व्यर्थ आहे. यांत पुण्य नाहीं. व धर्मही नाहीं. वैदिक ब्राम्हणाचे घरीं जात नाहीं. हा धर्म कशाचा ? हें व्रत नाहीं, दान नाहीं. तेव्हां ग्रंथ घेण्यास पैसा कशाचा द्यावा ? या-प्रमाणें हे लोक दुर्भाग्य आहेत. यांचा काळ विपरीत म्हणून यांस अशी बुद्धी झाली आहे, हें तर उघड आहे; परंतु लोक असें समजतील तर बरें, ग्रंथ छापणारे यांस पैसा द्यावा हें सर्वांपेक्षां उत्तम आहे. व या देशांत तर अति उत्कृष्ट हाच धर्म आहे. हें मूर्खांस शहाणें करण्याचें काम आहे. म्हणून हाच धर्म सर्वांहून श्रेष्ठ आहे, अशी समजूत यांची पडेल तर त्वरित लोक सुधारतील, यांत संशय नाहीं व असें झाल्यावांचून ग्रंथही पुष्कळ होणार नाहींत, परंतु ईश्वरइच्छा प्रमाण. हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर ९४

इंग्रज सरकार

विनंती विशेष. इंग्रज सरकार या देशांत आहेत याविषयीं लोक उघड नाहीं, परंतु मनांतले मनांत कुरकुर पुष्कळ करतात. व मुख्यत्वेंकरून भट, पंडित, शास्त्री हे तर फार हैराण आहेत. परंतु माझें मत असें आहे कीं, या देशास हेंच सरकार ठीक आहे. प्रथम असें पाहा कीं, मागले सरकार किती वाईट व मूर्ख होतें. जिकडे तिकडे जुल्म होत होता. हे हल्लीं जे इंग्रज सरकारचे पदरीं मराठे अंमलदार आहेत, त्यांची वर्तणूक कशी आहे हें पाहिलें म्हणजे ध्यानांत येतें. याच प्रकारचे मागें सर्व लोक होते. त्यांणीं देशाची सुधारणा व विद्यावृद्धी कांहींच केली नाहीं. फक्त भट, वैदिक व मूर्ख लोकांचें पोषण करून रक्षिलें. तसेच पेंढारी, रामुशी, काटक, डाकवटे, ठक, चोर इत्यादिकांस

राखिलें. आणि देशांत लूट सांड पुष्कळ करीत. होळकर स्वतां श्रीमंताचा चाकर असतां त्याणें पुणें लुटिलें व लोकांचे हाल केले. अशा सरकारास कोण चांगलें म्हणेल? जो बळकट असेल तो मात्र पोटभर खाई. पाहिजे त्याणें शेतभात, गांव, घर लुटावें. दाद फिर्याद कोठें लागत नव्हती. हल्लीं हैदराबाद, ग्वाल्हेर येथें वर्तमान काय घडत आहे तें पाहा, म्हणजे मागील राजाचें सर्व लक्षांत येईल. तेव्हां मागील राज्य अगदीं वाईट होतें हें सिद्ध आहे. याशिवाय हल्लीं आमचे लोकांस राज्य मिळालें तर तीच अवस्था करतील तेव्हां हेंही उपयोगी नाहीं. बरें, दुसरे देशचे लोक मोगल, फराशीस वगैरे आले तरी तेही वाईट लोक आहेत. यास्तव इंग्रज हेच सुधारलेले चांगले लोक आहेत. यांचें राज्य या देशांत आहे हेंच चांगलें. व ईश्वरानें हे आम्हांस चांगले राजे दिले आहेत, हें खचीत दिसतें. याहून चांगले राजे आम्हांस कदापी मिळणार नाहींत. याशिवाय हे सरकार लोकांची सुधारणा करण्याकरितां अत्यंत मेहनत करीत आहे. त्यांस विद्या शिकविते. तीही कशा रितीने शिकविते कीं, लोकांस तर जुलूम वाटूं नये. त्यांचीं देवस्थानें वगैरे सर्व कायम पहिल्याप्रमाणें ठेवून त्यांची मर्जी राखून त्यांस वाईट न वाटतां शिकविण्याची तजवीज चालविली आहे. इतक्या युक्तीप्रयुक्तीनें कदापी कोणी राजा या लोकांस शहाणा करणारा होणार नाहीं. इंग्रज लोक अत्यंत सुधारलेले म्हणून या रितीनें त्यांणीं विद्यावृद्धीचें व लोकसुधारणेचें व त्यांच्या जुन्या मूर्ख समजुती जाण्याचें काम चालविलें आहे. इतकी तजवीज कोण करील? आतां येऊन जाऊन इतकेंच म्हणतात कीं, अद्यापी ते लोकांस मोठ्या चाकऱ्या देत नाहींत. परंतु मोठी चाकरी देण्यास लायक अद्यापि लोक झाले नाहींत. ज्या लोकांस लांच खावा हें पाप वाटत नाहीं, ज्यांस ब्राम्हणापेक्षां कुळंब्याचा जय कमी व्हावा असें वाटतें, त्यांस विद्यावृद्धी व्हावी असें वाटत नाहीं, लोकांस कायदे कोणचे असावे, पहिलें शास्त्र कोणत्या योग्यतेचें व पुढें कायदे कोणत्या योग्यतेचे असावे हें समजत नाहीं; व कायदा राज्यास असावा हें अवश्य आहे किंवा नाहीं हें राजास कळत नाहीं; व आपले जातीचा अभिमान धरावा हें वाटतें, व पक्षपात करावा हें वाटतें, व फौजेस कवाईत पाहिजे हें वाटत नाहीं; सुधारणा काय पाहिजेत हें माहीत नाहीं; व्यापारवृद्धी होण्याची रीती ठाऊक नाहीं; अशा लोकांस चाकरी कशी देतील! ज्या काळीं हे लोक सुधारतील, त्यावेळीं खचित त्यांस मोठ्या चाकऱ्या देतील. या लोकांस सरकार म्हणजे लोकांचा कारभार करणारे आहेत, त्यांत अन्याय केले तर सर्व लोकांचा घात होईल हें त्यांस वाटत नाहीं; सरकारास लुटावें, सरकारचा पैसा खावा. सरकारचें काम जाहलें तर जाहलें, न झालें तर न झालें, असे त्यांस वाटतें. अशा लोकांस मोठी चाकरी काय उपयोगी? यास्तव हे लोक सुधारल्यावर सरकार त्यांस अधिकार देण्यास कधीं कमी करणार नाहींत हें लोकांनीं पक्कें समजावें. याजकरितां सरकारचे कृपेस पात्र होण्याची इच्छा मात्र धरावी. परंतु सांप्रत काळीं लोक अगदीं उलटें करीत आहेत. लांच खातात, लबाड्या करितात; विद्यावृद्धीस मदत

करीत नाहींत, सर्व सरकारानें करावें असें इच्छितात. व जर सरकार चांगलें करीत असेल, तर वाईट समजतात. व सरकारास लोकसुधारण्याचे कामांत अगदीं मदत करीत नाहींत; सरकारानें आज तर असें म्हटलें कीं, अमुक आनुष्ठानाचा व अमुक देवस्थानाचा खर्च व्यर्थ होत आहे तो मोड्डू[न] अमुक विद्यावृद्धीचें काम करितों, तर लोकांस पसंत होणार नाहीं. दक्षणा पहिली मूर्खरीतीनें देत होते, तिचा उपयोग कांहींच होत नव्हता. तेच रुपये जर नीट खर्च केले तर बहुत उपयोग होऊन लोक शहाणे होतील; परंतु असें जर केलें तर लोक खुषी नाहींत. लोकांस असें वाटतें कीं, पहिला मूर्खपणा कायम ठेवावा. आळशीपणाचे स्वभाव कायम ठेवावे, म्हणजे तें सरकार चांगलें. परंतु लोकांनीं या दुर्बुद्धी सोडून देऊन सरकारास हरयेक कामांत मदत करावी हें योग्य; म्हणजे सरकारास आनंद होतो आणि त्यांचे हातून सुधारणा पुरतेपणीं होते. हल्लीं फार तर काय, परंतु जेथें सरकारी शाळा आहेत, तेथें लोकांच्या कमिट्या आहेत, परंतु त्या पंचांस पुसलें तर कधीं त्यांणीं शाळा पाहिली नाहीं; असें सांगतील. व शाळा आहे किंवा नाहीं याविषयीं संशयात्मक बोलतील. जे सुपरइन्टेंडेन्ट येतात त्यांस पंचांस शोधावें लागतें. व बळेंच परीक्षेचे दिवशीं उभें करितात. ते मनापासून मेहनत करीत नाहींत. कोणी जर सरकारी कामदार असला तर त्यास सरकारी काम विशेष नसलें तरी तेंच ओझें वाटतें व दुसरें काम करावयास कंटाळा येतो. जर कामदार तरुण असला तर लग्नाडीचे कामांत, नाचतमाशांत रात्रंदिवस काळ घालवितो. त्याच्यानें सरकारी काम देखील चित्त घालून करवत नाहीं. मग शिवाय काम होणार कोठून ! व जर तो म्हातारा, जुना कपि असला, तर त्यास सरकारी काम आटपून घरीं जाऊन स्नानसंध्येंत संध्याकाळीं व प्रहरभर सकाळीं गोष्टी सांगत देवतार्जन पुढें मांडून बसावें लागतें. त्यास सरकारी कामाखेरीज दुसरें काम पाहाणें व शाळा पाहाणें हें तर असें वाटतें कीं, व्यर्थ काळ गेला. यांत धर्म नाहीं, पुण्य नाहीं, देवपूजाही नाहीं, तेव्हां कशास करा ? देवपूजा प्रहरभर केली म्हणजे चार भिक्षुक वगैरे मूर्ख येतात ते म्हणतात कीं, वाहवा ! दादा-साहेब मोठे भक्तिमान व मोठे पुण्यशीळ. दोन प्रहर स्नानसंध्येंत घालवितात व सरकारी काम संभाळून नित्यनेमानें हें चालवितात अशी स्तुती करतात. ती गोड लागून त्याला शाळा पाहाण्याचें मोठें संकट पडतें. याप्रमाणें लोकांचे उदासीन स्वभाव आहेत. विद्यावृद्धीविषयीं व शिवाय कितीएक दुसरे प्रकर्णांत असेंच आहे. सरकारास मदत मिळत नाहीं. यास्तव सरकारचा उपाय नाहीं. तर हे स्वभाव लोकांनीं सोडले पाहिजेत हे विनंती.

लो० हिं०

पत्र नंबर ९५

अभिमान

विनंती विशेष. मागले पत्रांत सरकारास मदत मिळत नाहीं. म्हणून लोकांच्या वेडेपणाचा स्वभाव वर्णन केला, परंतु आणखीही लिहितों कीं, आमचे लोक सरकारास मदत कोठून देणार? आमच्यापैकीं एक शहाणा होऊन पुढारी झाला तर त्याणें जें कांहीं सांगितलें, तेंदेखील ऐकावयाचे नाहींत. व त्यास शहाणा असें मानणार नाहींत. दुसऱ्यास शहाणा म्हणणें हें मोठें अपमानाचें कारण आहे, असें लोक समजतात. ब्राम्हण तर मुख्यत्वेंकरून असें समजतातच. जर येक पंडित दुसऱ्यापेक्षां शहाणा असेल, तर त्याशीं शत्रुत्व करून व त्याजवर कुतर्क करून त्यास सभेत निरुत्तर करावें. म्हणजे त्याचा आपमान करण्यांत आपला मान वृद्धिंगत झाला असें समजतात. दुसऱ्यास प्राण गेला तर[रि] शहाणा म्हणत नाहींत. सांप्रत कोणत्याही ब्राम्हणास पुसा कीं, इंग्रज लोक शहाणे आहेत कीं काय? तर म्हणतील, "छिः छिः शहाणे कशाचे? त्यांस काय येत आहे? त्यांची विद्या व शास्त्रें व ज्ञानें सर्व आमच्याहून कमी आहेत, परंतु ते श्रीमान आहेत म्हणून त्यांचे शहाणपणाचें प्रकटीकरण होतें आणि आमचे शहाणपणाचें प्रकटीकरण होत नाहीं." साधारण वैद्यास पुसा कीं, इंग्रजांचें वैद्यक व शारीर तुमच्यापेक्षां अधिक आहे कीं काय! तर मूर्ख वैद्यही म्हणेल कीं, छिः कशाचें वैद्यक व कशाचें शारीर; आमच्यामध्यें सर्व आहे. किंबहुना जास्ती आहे, परंतु हें सर्व सांगण्यास त्याणें इंग्रजी वैद्यक पाहावयास नको. तें पाहिल्याशिवाय व अनुभव घेतल्याशिवायच तो म्हणेल कीं, छिः त्यांत कांहीं नाहीं. हा त्याचा स्वभावच. ब्राम्हणास आपलेहून वरिष्ठ कोणी वाटत नाहीं. व कोणचाही ग्रंथ त्यांचे हातांत द्याल तर ते म्हणतील कीं, दगड आहे यांत; नांवदेखील वाचून पाहावयाचे नाहींत. आणी म्हणतील कीं, यांत गोष्टी आहेत. जळल्या त्या गोष्टी, हीं बुकें आपलीं उगाच छापतात. त्यांत कांहीं नाहीं. प्राण गेला तरी त्या बुकांत काय आहे हें पाहाणार नाहींत. व त्याचें एक पानही उलटून पाहाणार नाहींत. भट, वैदिक हे सगळी संहिता पाठ करतील, पण वर्तमानपत्राची येक ओळ वाचणार नाहींत. तसेंच शास्त्री, पंडित यांस तर सर्व तुछ वाटतें. आपले ठिकाणीं गर्व करून ते बसतात. आणि आपल्यास व्याकर्णी म्हणवितात, परंतु त्यांस साधारण गोष्टींचेंदेखील ज्ञान नसतें. पुणें शहर येथील मोठे कामदार व मोठे पंडित यांस आणून पुसा कीं, येथें लष्कर किती आहे? व साहेब व मुख्य कोण आहे? तर त्यांस समजणार नाहीं. आणि पाहिलें तर साठ हजार कौमुदी पाठ करितात व साधारण नित्यांतील ज्या जरूरीच्या गोष्टी त्यांविषयीं मूर्ख असतात. जर कोणी शहाणे मनुष्यानें त्यांचें बोलणें ऐकलें तर त्यास असें वाटेल कीं, हा काय वेडा आहे? किंवा मूर्ख आहे? किंवा भ्रांतीवट आहे? असे मूर्ख असोन आणखी प्रतिष्ठा लोकांत मिरवितात. आणि लोकांस तर कोणाची

प्रतिष्ठा करावी, हें समजत नाहीं. असें असोन मोठ्या शालजोड्या अंगावर घेऊन आचार्यबुवा, भटजीबुवा म्हणवितात. पण हीं सर्व ढोंगें आहेत. हें लोक जाणत नाहींत. आणि त्यांचे नादीं लागून त्यांस पैसा देतात. परंतु स्वतः विचार पाहात नाहींत. बरेंवाईट दुसऱ्यानें दाखविलें तरी पाहात नाहींत. त्यास मूर्ख म्हणून त्याची फजिती करितात. आलीकडे नवे ग्रंथ बहुत झाले आहेत. रसायणशास्त्र, यंत्रज्ञान, शिल्प इत्यादीक; परंतु त्यांतील गोष्ट कोणीएक पाहात नाहीं. व लोकांचे स्वभाव असे विलक्षण आहेत कीं, पुढारी होईल त्यांस पाडाव करितात. त्यांचें रक्षण कोणी करीत नाहीं. त्यांचा येकत्रपणा मुळींच नाहीं. जर त्यांस लग्नास, मुंजीस वगैरे बोलाविलें तर पांच हजार लोक येऊन चार घटिका उगेच बसतात. परंतु अमुक विचार करावयाचा आहे तेथें या म्हणून त्यांस बोलाविलें तर येणार नाहींत. व आले तरी त्यांस बोलतां येणार नाहीं. त्यांच्यानें विचार करवत नाहीं. त्यांचीं चित्तें विचाराकडे नाहींत मागील चाल पडली आहे. म्हणून लग्नास वगैरे तरी जमतात. परंतु चालीविरुद्ध अमुक येक तळें नीट करावयाचें आहे त्यास पट्टी करण्यास बोलाविलें तर कदापी येत नाहींत. बरें, हें पैसा देण्याचें काम आहे म्हणून असो, परंतु लोक दारू पितात त्यांचा बंदोबस्त कोणच्या रितीनें करावा, याजकरितां फुकट बलाविलें तरीही बहुतकरून जमणार नाहींत. व शास्त्रीपंडित त्यांत असले तर येकही गोष्ट सिद्धीस जावयाची नाहीं. कोणी कुतर्क करील, दुसरा पंडित बोलला म्हणजे त्यास लगेच उत्तर करावें म्हणजे श्रेष्ठत्व झालें, भलतेंच बोलतात. या प्रकारची यांची व्यवस्था आहे. मग मोठाले विचार करणार कोठून ? यांस माहितगारी नाहीं. बरें जें दुसरें सांगतात तें तरी ऐकावें. तेंही करीत नाहींत. ग्रहण चंद्राचे छायेनें पडतें हें कदापी खरें मानीत नाहींत, व त्याचा पुरावा पाहात नाहींत. पुराणांतील वेड मनांत भरलेलें असतें तें जातच नाहीं. या प्रकारचे लोक मूर्ख आहेत. आणि सरकारास अगदीं मदत करीत नाहींत. आज सरकारास मदत करणारे लोक पारशी मात्र आहेत. त्यांमध्यें मात्र कांहीं सुधारणा झाल्या आहेत. ग्रंथाचे तर्जुमे स्वभाषेंत करावे. त्यास पैसा द्यावा. गरिबाकरितां धर्मशाळा कराव्या व गरीबाकरितां औषधपाणी देण्याकरितां वैद्यखाने, दवाखाने करावे हीं धर्मकृत्यें आहेत, असें ते जाणतात व सरकारानें कांहींयेक कामांत पैसा दिला तर आपण बाकीचा देऊन सरकारचा मनोरथ पुरता करितात. व लग्नकार्यास पैसा उडवित नाहींत. ज्याचे घरीं लग्न होईल तो पन्नास रुपये धर्म करावयाचा तो कारखान्यास देतो. जर ब्राम्हणांमध्यें ही गोष्ट कोणी पुढें काढील आणि लग्नप्रयोजनांतील दक्षणा बंद करील, तर ब्राम्हणांचें मोठें शत्रुत्व होईल. त्यांस असाच पैसा उडवावा, गरीब, आंधळे यांणीं औषधाशिवाय, घराशिवाय मरावें हेंच बरें वाटतें व उद्धट, दांडगे, आगांतुक यांस पैसा मिळाला म्हणजे मोठें कार्य झालें असें वाटतें. यास्तव जसें पारशी लोक, आपले जातींत व्यापारवृद्धीचें व विद्यावृद्धीचें उदाहरण दाखवीत आहेत तसें ब्राम्हणांनीं करून सरकारास

मदत करावी. म्हणजे सरकार सर्व वेत सिद्धीस नेईल. तें न करून रडत बसतात आणि सरकारास नांव ठेवितात. हे मूर्ख आहेत कीं नाहीं. याचा हें पत्र वाचणारे यांणीं विचार करावा हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर ९६

ब्राम्हणाचे पुढारीपणापासून अनहित व वेदांत

विनंती विशेष. आमचे लोकांत ब्राम्हण पुढारी झाले. याजमुळें फार घात झाला. जर कुळंबी, क्षत्री इत्यादिक पुढारी असते तर बरें होतें. कारण ब्राम्हणांच्या हातापायांत बिड्या आहेत. त्यांस जर सांगितलें कीं, पृथ्वीवर बहुत देश हिमालयाचे पलीकडे आहेत तर तें खोटें म्हणतात. व उत्तरसमुद्राचा अंत नाहीं असें म्हणतात. बरें या गोष्टींचा शोध करण्याकरितां आपण फिरावयास जाऊन स्वनेत्रानें सर्व देश पाहून येत नाहींत. आमचे लोक इंग्रज लोकांच्या सर्व गोष्टी व भुगोलविद्या मिथ्या म्हणतात. तर स्वतां पाहून येण्याकरितां पैसा खर्च करून फ्रान्स, पोर्तुगाल, चीन, विलायत, उत्तर समुद्र व लापलंड इत्यादीक देशांत फिरावयास ब्राम्हण पाठऊन त्यांचे हातून लिहून बखरी आणून प्रसिद्ध कराव्या म्हणजे लोकांची भ्रांती जाईल आणि लोकांवर उपकार होतील, परंतु ब्राम्हणांस परदेशांत जाण्याचा प्रतिबंध आहे. याजकरितां हें न करून लगेच बसल्या जाग्यावर लंका विभीषणाचें राज्य, दुधाचा समुद्र, सोन्याचीं जांबळें इत्यादि पुराणांतील मत खरें असेंच म्हणत असतात. याजमुळें इतर जातींचे लोक अधिक भ्रांतींत पडतात. जर हे दुसरे जातीचे लोक पुढारी असते, तर परदेशांत जाते व ब्राम्हण लोकांचे डोळे उघडते. परंतु ते आतां घडत नाहीं. ब्राम्हण लोक प्रतिबंधांत पडले व त्यांच्यामुळें इतर जातीचे लोक सर्व प्रतिबंधांत पडून आंधळ्यासारखे घरच्या उमऱ्यापर्यंत चांचपीत बसले आहेत, हें मोठें वाईट झालें. आतां ब्राम्हणांचे प्रतिबंध मोडून त्यांस बाहेर काढावयास व त्यांच्या जुन्या समजुती सर्व मोडावयास बहूत काळ लागेल, परंतु यास कांहीं उपाय नाहीं. जे मराठे राजे वगैरे आहेत ते ब्राम्हणाधीन आहेत, याजमुळें ते कांहीं उद्योग करीत नाहींत. व स्वतां त्यांस लिहितां–वाचतां येत नाहीं. त्यांस कांहींच खबर नाहीं. जवळचे ब्राम्हण असतात त्यांस तर या सर्व गोष्टींचा कंटाळा आहे. याजकरितां ते आपल्या बरोबर नावेंत सर्व लोकांस बसऊन बुडत आहेत. व त्यांस बाहेर काढावयास इंग्रज लोक यत्न करताहेत. परंतु तूर्त आमचे लोकांची संख्या जास्ती आहे. याजमुळें इंग्रज लोकांचा उपाय चालत नाहीं. हे वेडे लोक पाहून मला तर फारच दुःख वाटतें. व जे

दयाळू आहेत व जे लोकांचे हित इच्छिणारे आहेत त्यांस असेंच दुःख वाटेल. जे भिकारी आहेत ते कांहीं बरे आहेत. दरिद्राचे योगानें ते कांहीं तरी गोष्टी ऐकतात, परंतु श्रीमंत लोक व ब्राम्हण जातीचे मनुष्य हे तर फार अंदाधुंद आहेत. ब्राम्हणांस घरीं राहण्यापुरती सोय झाली म्हणजे पुरे. तो आपल्या ठिकाणीं मस्त होऊन पुराणांतील गोष्टी वाचीत बसतो. किंवा वेदांत काढतो. म्हणजे हें सर्व जग मिथ्या; या लोकांस सुख होऊन तरी उपयोग काय; व यांचे कल्याणास झटावें कशास ? असें त्यास वाटतें. हें सर्व मिथ्या म्हणतो. कोणी "बालोन्मत्त पिशाचवत्" असें भागवतांत आहे, ती वृत्ती धारण करून वेड्यासारखे फिरतात आणि माझा जीव ईश्वरास मिळाला व मी जीवन्मुक्त आहें, असें समजून शेवटीं संन्यास घेतात, म्हणजे देहाचें सार्थक झालें, असें त्यांस वाटतें. आणि दगडासारखे पडतात. सर्व आशा, रुचि बळेंच सोडितात, आणि निरुपयोगी होतात, ही वेदांत्याची स्थिति. कर्मठ आहेत ते अग्निहोत्र घेऊन बसतात, म्हणजे यज्ञयागांत सरासरी जन्म व्यर्थ जावा अशी तजवीज करितात. लोक आंधळे आहेत त्यांस डोळे द्यावे, ज्ञान शिकवावें व सुखी होण्याचे मार्ग दाखवावे, हें मनांत देखील आणित नाहींत. असे मूर्ख असतात. भट, वैदिक, शास्त्री यांच्या बुद्धीचा प्रकाश तर सर्वांस दिसतच आहे. याप्रमाणें बहुतकरून ब्राम्हण लोक आळशी किंवा मूर्ख असतात. त्यांचीं चित्तें लोकांकडे नाहींत. वेदांती आहेत. त्यांस असें समजत नाहीं कीं, आम्हीं लोकांस मिथ्या मानलें तरी लोक मिथ्या झाले कीं काय ? आवर्षणांत लोकांस धनधान्यसमृद्धी मानिली तरी झाली कीं काय ? मानल्यानें मिथ्या होतात कसे ? तुम्हीं आपल्या मनांत कांहींतरी समजूत केली आणि लोक व जग हें सर्व खोटें आहे असें म्हटलें तरी इतके प्राणी सुखदुःखांत, अज्ञानांत व मूर्खदशेंत आहेत ते सुटलें कीं काय ! मग मानल्याचा उपयोग काय ? रोगी बहुत आहेत. त्यांस वैद्यानें निरोगी मानिलें म्हणजे त्यांचा रोग जातो कीं काय ? तद्वत हे मूर्ख वेदांती आहेत. त्यांस मी म्हणतों कीं, तुम्ही आपणास कांहीं नको असें म्हणा व सर्व आशा सोडून ईश्वरावर भार ठेवा हें चांगलें, परंतु व्यर्थ आयुष्य घालऊं नका व ज्ञान, विद्या, सुख इत्यादिकांचे वृद्धीस झटा. तुम्हीं सर्व जग जरी मिथ्या मानलें तरी आम्ही सर्वांनीं असें मानलें नाहीं. याजकरितां आमच्याकरितां तुम्ही झटून आमचें कल्याण करा, म्हणजे तुमचा वेदांत खरा आहे. असा विलक्षण व आळशी वेदांत उपयोगी काय ! तुम्ही निराश झालेत तर तुम्हीं आपल्याकरितां कांहीं करूं नका. तुम्ही निराश व आम्हीच ईश्वर असें मानणारे नाहीं याजकरितां आमच्यावर दया करा. आमच्याकरितां जें तुम्हांस कर्तव्य तें करा. दगडासारखी वृत्ती करून तेंच सार्थक असें म्हणूं नका.

लो० हि०

पत्र नंबर ९७

सुशिक्षा व पंतोजी आणि संस्कृत व इंग्रजी भाषा

[विनंती] विशेष. आमचे लोकांस सांप्रतकाळीं ही मोठी कुदशा प्राप्त झाली आहे. त्यांचे मनांत सुधारणा येत नाहीं. त्यांस पूर्वीच्या चाली ज्या आहेत त्या तशा राहाव्या, हें फार चांगलें वाटतें. व बाजीरावासारखा धनी भटांची समृद्धी करण्याकरितां यावा असें वाटतें. परंतु त्यांस अजून असा बोध झाला नाहीं कीं, यामागील चालींपैकीं बहुतेक चाली वाईट आहेत. येणेंकरून लोक बुडाले. त्यांस कांहीं कळत नाहीं. साधारण गोष्टीविषयीं देखील त्यांचें अज्ञान जात नाहीं. त्यांस मुळीं शिक्षा नाहीं. व सुसंगत नाहीं. ज्या संगतींत माणूस असतें तसें तयार होतें. परंतु आमचे लोकांस खरी गोष्ट सांगणारे देखील जवळ नसतात. घरांत भट असतो तो पोरांस अगदीं मूर्ख करितो. मूर्खपणाच्या गोष्टी लहानपणीं मनांत आल्या म्हणजे त्या जात नाहींत. याजकरितां लोकांनीं प्रथम सुशिक्षा लागावी याजकरितां चांगला वेत केला पाहिजे. सरकारी शाळा आहेत त्या देखील अजून चांगल्या झाल्या नाहींत. कारण पंतोजी जुनेच आहेत. ते भटांहून शहाणे नाहींत. याजकरितां मुख्य पंतोजी चांगले सुधारलेले व ज्ञानी पाहिजेत. तेव्हां सरकारच्या शाळा दुरस्त चालतील. हल्लीं जुने पंतोजी आहेत ते केवळ अज्ञानाच्या राशी आहेत. त्यांपासून कदापी लाभ होणार नाहीं. याजकरितां मुख्य पंतोजी व ग्रंथ हे तयार झाले पाहिजेत. ज्यांकडे विद्यावृद्धीचें काम आहे, त्यांणीं म्हणजे बोर्ड आफ एज्युकेशन यांणीं मराठी पंतोजी तयार होण्याची येक शाळा केली पाहिजे. व चांगले ग्रंथ तयार करण्याकरितां तर्जुमे करणाऱ्यांची एक मंडळी बसविली पाहिजे. आतां पहा कीं, केवळ पगाराकरितां पंतोजी बुकें उघडितात, परंतु त्यांस पुसलें कीं, पृथ्वीची छाया पडून ग्रहण होतें कीं काय, तर म्हणतात, "छिः हें आपलें उगेंच इंग्रजांचें मत आहे. हें आम्ही पोटाकरितां शिकवतों. दुसरा कांहीं रोजगार नाहीं, मग करावें काय?" ही अवस्था पंतोजींची आहे. मग मुलें [तर]वेज कशीं होतील? या जुन्या पंतोजींचे हातीं रसायनविद्या दिली तर काय उपयोग? त्यांस त्यांतील येक अक्षरदेखील समजत नाहीं. म्हणून पोरांकडून परीक्षेस हजरी देण्याकरितां उत्तरें पाठ करून मात्र ठेवितात; परंतु स्वतां समजून देण्याचें ज्ञान नाहीं, नवीन निबंध करण्याचें ज्ञान नाहीं, व बुकांतील गोष्टी समजून देण्यास कळत नाहीं. नवें बूक छापून आलें म्हणजे म्हणतात कीं, आली ही पीडा, यांत काय आहे? असा कंटाळा करून पोरांस शिकवणारे जे लोक त्यांच्या हातून ज्ञान कसें मिळेल? व्यर्थ पोरांना मात्र मेहेनत पडत्ये. यास्तव जशीं बुकें तयार होतात तसे पंतोजी तयार झाले पाहिजेत. हें प्रथम काम आहे. ज्यांचें मत मूळापासून संस्कृत भाषेंतील ग्रंथ वाचून विपरीत ज्ञानानें भरलें आहे, ते लोक तर अगदींच उपयोगी नाहींत. त्यांचे हातून फारच

अनर्थ होईल. येकदा या विपरीत ज्ञानाची प्रथम समजूत झाली म्हणजे मन बिघडून जातें. तें मग ताळ्यावर येणें कठीण पडतें. यास्तव त्यापेक्षां अडाणी मनुष्य बरा. यास्तव प्रथम इंग्रजी शिकलेला असा जो विद्यार्थी असेल तोच पंतोजीचे उपयोगी पडेल. असे तयार होण्याकरितां येक नवीन शाळा व त्याजवर यथायोग्य शिकविणारे पाहिजेत. तेव्हां असे लोक तयार होतील. जे संस्कृताचा अभिमान धरितात; ते आगदीं अज्ञानांत आहेत. ते सुधारणेस हरकत मात्र करतील. दुसरी गोष्ट त्यांच्यानें व्हावयाची नाहीं. यास्तव असे पंतोजी तयार करून जुने असतील त्यांस पेनशिनें देउन मुक्त करावें हें बरें. संस्कृत आजच्या काळीं कांहीं उपयोगी नाहीं. व त्यांतील ग्रंथही उपयोगी नाहींत. तेणेंकरून लोक अधीक मूर्ख होतील. संस्कृताची योग्यता इतकीच आहे कीं, ती भाषा सुधारलेली आहे. याजकरितां पंतोजीस ती यावी हें चांगलें, परंतु भाषा येऊन अज्ञान-वृद्धी झाली तर उपयोग काय? याजकरितां हें न होईल तितकें बरें. भाषा चांगली न आली आणि मन साफ असून समजूत चांगली असली तर ती पतकरेल. व त्याचा उपयोग अधीक पडेल. चांगल्या समजुतीनें भाषादेखील सुधारेल. परंतु मुळीं एकदां संस्कृताच्या झऱ्याचें पाणी जो प्याला त्याची भ्रांती जावयास नवद वर्षें शिकविलें तरी उपयोग नाहीं हें निश्चित आहे. याविषयीं कोणी भ्रांतीच धरूं नये. सुधारलेल्या संस्कृत भाषेचा मात्र उपयोग पडावा. इतकें करावें. अधीक नको. त्यांतील ज्ञान अगदीं उपयोगी नाहीं. जी भाषा प्रथम मुलास शिकवावी त्या भाषेंतील ग्रंथाप्रमाणें त्याचें मन होतें. याजकरितां फार सुधारलेली इंग्रजी भाषा किंवा तींतील ग्रंथ शिकलेला माणूस ठेऊन त्याचे हातून इंग्रजी ग्रंथांतील ज्ञान मुलास शिकऊन तसे पंतोजी तयार करावे म्हणजे फार उपयोग होईल. संस्कृतानें आधीं अनर्थ केला आहे व यानें आणखी अधीक अनर्थ होईल हें पक्कें मनांत वागवावें. आणि खोटा अभिमान धरूं नये. संस्कृत भाषेंतील ग्रंथ व इंग्रजी भाषेंतील ग्रंथ यांची तुलना करून पहावी, म्हणजे संस्कृताचा अभिमान जाईल.

लो० हि०

पत्र नंबर ९८

डौल व नेटिव राजे

आमचे लोकांची बुद्धी अद्यापी सुधारली नाहीं. याजमुळें त्यांस अद्यापी असें वाटत नाहीं कीं, आम्ही मूर्ख आहों. इंग्रज वगैरे युरोपियन आपणास केवळ मूर्ख म्हणतात व आम्हांस दुसऱ्यापासून बुद्धी शिकोन घेतली पाहिजे. येखादा सरदार याचा डौल पाहिला

म्हणजे त्यांस असें वाटतें कीं, वाहवा, हा मोठा सरदार, याचा डौल फार, हा थोर; परंतु त्याची योग्यता व गूण पाहात नाहींत. फक्त त्याचें सोनें-रुपें पाहून त्यास चांगला म्हणतात. गाईकवाड याचा डौल पाहून सर्व लोक म्हणतात कीं, पाहा याची गजांत लक्ष्मी, आणखी इंग्रज हे भिकारी यांस स्वारी नको, चोपदार, हत्ती, उंट कांहीं नको असें म्हणतात; परंतु कोणी असें मनांत आणीत नाहीं कीं, या डौलाचा कांहीं उपयोग नाहीं. इंग्रज लोक डौलाची गरज ठेवीत नाहींत; फक्त कामाची गरज ठेवितात. बरें निरुपयोगी डौल लोकांस दाखवावयास बाळगीत नाहींत; दाहाच माणसें बाळगतात. परंतु चांगलीं सर्व उपयोगीं पडावीं अशा रीतीचीं बाळगितात. परंतु आमचे राजे डौली, त्यांस आम्ही थोर हें स्वारी मोठी करून दाखवावयाचें असतें; परंतु पराक्रमहीन, गुणहीन, त्यांस कोणी पुसत नाहीं. गोंधळी व ते बराबर. याजमुळें ते दाहाशांचे खर्चांत पन्नास माणसें बाळगतात. परंतु ते कांहीं उपयोगीं पडावयाचे नाहींत. असें असतांही देशांतील आळशी लोक त्यांस चांगले म्हणतात हें केवढें आश्चर्य आहे! कोणास हा विचार कळत नाहीं कीं, हे गोंधळी, वन्हाडी, दिसतात चांगले. सोनें, रुपें, हिरे यांचे दागिने अंगावर घालून नटतात व सजतात, परंतु त्यांच्या तोंडांत कोणी मारली तर त्यांचा हातदेखील वर होत नाहीं. इतके अज्ञानी व अशक्त असतात. मग त्यांचा उपयोग काय? याजकरितां हा डौल कांहीं उपयोगी नाहीं. राजानें जितका लोकांच्या रक्षणार्थ खर्च लागेल तितकाच करावा. अधीक केला तर तो दोषी व चोर होतो; परंतु ही गोष्ट राजे मनांत आणीत नाहींत. आणि राज्य हातीं लागतांच लोकांची गरज सोडून देतात आणि मनास येईल तसें द्रव्य उडवितात. त्यांस त्यांची लाज वाटत नाहीं. याजकरितां डौलाची प्रीती अगदीं करूं नये तर बरें. फौज पाहिजे व उपयोगाच्या सर्व गोष्टी पाहिजेत. तसेंच आमचे लोक धर्म करणें तोही उपयोग मनांत आणून करीत नाहींत. याजमुळें बहुत पैसा व्यर्थ जातो. परंतु लोक असें मूर्ख आहेत कीं, जो मनुष्य अशी पैशाची उडव करितो, त्यांस चांगले म्हणतात. व आळशी लोकांचें पोषण व निरुपयोगी व्यय पाहिला म्हणजे त्यांस चांगलें म्हणतात. अशा गोष्टीस चांगल्या म्हणणारांत प्रमुख कसबिणी आणि भट आहेत. हे लोक बहुत लोकांस वेडे करतात. पैशाची उधळपट्टी जितकी होईल, तितकी त्यांस हितावह आहे म्हणून उत्तेजन देऊन उधळपट्टी करितात. मग त्यांत जरी मोठाले अनर्थ झाले तरी चिंता नाहीं, परंतु आपलें पोट भरलें म्हणजे झालें. कदाचित म्हणतात, त्याणें इतका अन्याय केला, परंतु ब्राम्हणभक्त व ब्राम्हणांचे घरांत सर्व पैका घातला. तस्मात तो पुण्यवान प्राणी आहे. याजमुळें जो आतां लोकांमध्यें संभावीतपणें वागतो त्यास मुख्य गोष्ट ही करावी लागते कीं, भटाची मर्जी राखली पाहिजे. भटांस देणें हें मोठे लौकिकाचें धोरण आहे. जरी कोणास असें वाटेल कीं, भटांस देणें निरुपयोगी आहे तरी त्याचा उपाय नाहीं. ही लौकिकाची गोष्ट आहे. जर भटास दिलें तर लौकिक होतो. धर्मात्मा धर्मात्मा म्हणून भट उठवितात. नाहीं तर निंदा करितात. गाईकवाडास म्हणतात कीं, तेरा हजार रुपये इंग्रजी शाळेस

दिले ते भटास देते तर बरें होतें. धर्म करावयाचा टाकून शाळेस पैसा कशास दिला, असें म्हणतात. तात्पर्य, शाळा घालणें, विद्या वाढविणें हें त्यांस धर्मकृत्य वाटत नाहीं. टोणपे भटांस लौकिकाकरितां देतात, त्यास धर्म म्हणतात. याजमुळें असें सिद्ध होतें कीं, ब्राम्हण आपलें पोट भरावयाचे मात्र उद्योगांत असतात. कांहीं उपयोगी काम न करितां व विद्या न करितां फक्त शास्त्रीबुवा मोठे थोर असें म्हणून बसल्या जाग्यावर जो देईल तो धर्म असें समजतात. शाळा घालणें हा धर्म त्यांस वाटतच नाहीं. हा केवढा चमत्कार आहे? प्रथम त्यांस असें वाटतें कीं, आम्हांस शिकावयाचे कांहीं राहिलेंच नाहीं. संहिता पाठ म्हणतों. आतां विद्या शिकावयाची राहिली काय? असें वाटून त्याशिवाय विद्या शिकवण्यास कोणी पैसा देईल तर त्यांस दुःख वाटतें. आणि व्यर्थ पैसा टाकला असें वाटतें, परंतु या मूर्खांस असें कळत नाहीं कीं, पाठ म्हणणें व अक्षरें तीन तीन वेळां उलट सुलट म्हणणें ही विद्या नव्हे. हा मूर्खपणा आहे. यास्तव असा मूर्खपणा वाढविणारे त्यांस द्रव्य देऊन पाठ म्हणणारे मात्र पढवले असें होईल. नवीन विद्या काय शिकविली, नवीन इतिहास त्यांस काय कळला; व लोकांतील दुर्गुण त्यांणीं कोणता कमी केला, नवीन शोध त्यांणीं काय लाविले, हें पाहावें. फक्त जेथें राहतील तेथें पुष्कळ श्राद्धें करवितील. क्षीर व दक्षणा मिळवितील. एवढा मात्र या विद्वानांचा उपयोग आहे. हे विद्वान कसे हें कोणी करून विचार पाहात नाहीं. जे फक्त पाठ म्हणणारे अक्षरशत्रु अर्थ कांहीं कळत नाहीं. घड व्यवहाराप्रकर्णीं बोलतां येत नाहीं त्यापासून राज्याचे विचार व लोकांस चांगल्या रीतीभाती व शहाणपण लावणें कसें होईल? मूर्ख कुळंबी शेतभात करणारे व बिगारी यांहूनही निरुपयोगी भट आहेत. त्यांस विद्वान म्हणतात आणि असली विद्या वाढावी म्हणून इच्छितात ही चूक आहे. आजपर्यंत ही विद्या वाढून लोकांचीं घरें बुडालीं. इंग्रज लोक इकडे येऊन आम्हांस शिकऊं लागले. आम्हांस शहाणपण नाहींसें झालें. आम्हांस कांहीं ठाऊक नाहीं. हे सर्व भटांचे विद्येचे परिणाम झाले. जर हे लोक खरी विद्या म्हणजे ज्ञानाचा शोध करावयाचा तो करिते, तर इंग्रज इकडे येण्याचे पूर्वी आम्हीच त्यांचे देशांत कां गेलों नसतों? परंतु त्यांचे देशाची वार्तादेखील इकडे ठाऊक नाहीं. मग जाणार कोठून? वास्तवीक विद्या कायती त्यांस कळत नाहीं. व पुढें पाऊलही टाकित नाहींत. अपसांत रडत बसतात; परंतु विचार कोणीच करीत नाहीं. लग्नाचें आमंत्रण केलें तर पांचशें लोक येऊन चार घटका येऊन बसतील, परंतु विचाराचे सभेस जमावयाचे असले तर येकही येणार नाहीं. व येकाच्यानेंही भाषण व विचार सयुक्त होणार नाहीं. असे हे लोक निर्बळ व वेडे झाले. मग त्यांच्या तोंडांत प्रथम मुसलमानांनी मारली. नंतर इंग्रजांनीं मारली. याचें आश्चर्य काय आहे? त्यांच्यानें आपलें रक्षण होईना, उगेच बसवेना, अपसांत भांडुं लागले, चोऱ्या दरोडे घालूं लागले, राजे स्वतां दरोडे घालूं लागले, तेव्हां त्यांचें पारिपत्य करण्याकरितां इंग्रज यांची योजना ईश्वराकडून या देशांत झाली, हें सर्वोत्कृष्ट आहे. लोकांनीं असें जाणावें कीं

हे लोक आम्हांस उत्तम गूण व चांगल्या नीती व विचार व विद्या देऊन जातील यांत संशय नाहीं.

लो० हि०

पत्र नंबर ९९

पुनर्विवाह

विनंती विशेष. जो दिवस उजेडतो त्या त्या प्रत्येक दिवशीं असें अनुभवास येतें कीं, ब्राम्हण जातींत स्त्रियांचा पुनर्विवाह त्वरित चालू करणें जरूर आहे. ही जात हतभाग्य आहे. याजमुळें आपली सुधारणा हे समजत नाहीं. व त्यांचे प्रारब्धीं आजून पुढें कितीएक दिवस महान दुर्घट भोक्तृत्व आहे. यास्तव त्यांचे बुद्धीस हें कर्तव्य अजून स्पष्ट दिसलें नाहीं. जशी बहुत काळाची ग्रंथी असत्ये. ती लवकर सुटत नाहीं, तद्वत त्यांची बहुकालीक ही समजूत पडली आहे ती त्यांचे बुद्धीचा त्याग लवकर करीत नाहीं. दृढपणानें चिकटून बसली आहे. ती इतकी कीं, जरी मोठाले षडशास्त्री पंडित ज्या ज्या बुद्धी व विचार चपळ झाले आहेत, व युक्तीप्रयुक्ती त्यांस सांगता येतात; परंतु पुनर्विवाहापासून नफा काय आहे, येविषयीं त्यांची बुद्धी केवळ शून्य असोन अंतःकर्ण निर्दय व क्रूरकर्मीं प्रवृत्त झालें आहे. ब्राम्हण लोकांमध्यें लग्नाची घाई बहुत करितात. याजमुळें कितीएक मुलगे व मुली आठ वर्षांच्या देखील विवाहित होतात. आणि पुढें दोनचार वर्षांचे आंत विपरीत गोष्ट घडून भर्ता निधन पावतो. त्याकाळीं वास्तवीक पाहिलें तर त्या स्त्रीस आपली जाती किंवा नातें कळत नाहीं. केवळ बाल अज्ञान आणि परस्वाधीन अशी व्यवस्था तिची असत्ये. परंतु पुनरपी तिचा विवाह करीत नाहींत. आणि मायबाप आपलें मन क्रूर व निर्दय, दृढ पाषाणवत करून स्वकन्येची विपत्ती पाहातात. ती विपत्ती एक पर्यायाची नाहीं, परंतु अनेक पर्याय त्यांत असतात. ते ब्राम्हणांस विदित आहेतच. आणि जामात मेल्याचें दुःख सर्वांहून ब्राम्हणांस अधिक आहे. कारण कीं कन्येस प्रारब्धयोगानें पती नाहींसा झाला हें येक, खर्चवेच झाला तो व्यर्थ गेला, हें दुसरें. हीं दोन दुःखें आहेत. जरी पुनर्विवाहप्रवृत्ती चालू झाली, तथापि हीं चुकणार नाहींत. याशिवाय ब्राम्हणांचे दुःखाचा महजर फार लांब आहे. तो असा कीं, पुनश्च पती जरी प्रिय, सुशील, विद्वान, सधन, असा साध्य असेल तरी अप्राप्त. यास्तव जन्मपर्यंत तिचा निर्वाह कसा चालेल? अन्न कोण घालील, याची काळजी. वंशाचा छेद झाला यद्यपी सासऱ्याचे घरीं खावयापुरती सोय असली तरी, तेथें सर्व माणसें विधवा स्त्रीस काम जास्त सांगतात आणि हाल करितात. आणि तिला

कोणी मालक नाहीं म्हणून निराश्रित होत्साती सर्वांचे दुष्ट शब्द तिला सहन करावे लागतात. दागिन्यावर वांछा जातां कामास नये. चोळी घालितां कामास नये. काळें लुगडें नेसतां कामास नये. कुंकु व वाहाण करतां कामास नये. फार तर काय, दुसऱ्यानें जेवायास बसली तर लोक हासतात व उपहास करतात. याजकरितां एकपोटी, एकवाढी जेवण करावें लागतें. कार्यप्रयोजनांत जातां नये, मंगलकार्यास अपशकून होतो. तोंड पाहिलें तर वाईट शकून झाला म्हणतात. म्हणून लज्जेनें दूर राहावें लागतें. असा दुःखांत जन्म काढावा लागतो. या गोष्टी जेव्हां आईबापांचे मनांत येतात, तेव्हां म्हणतात कीं, मेला जावाई दुष्ट इचा कोणी पूर्वजन्मीचा वैरी दावेदारी होता. तो इचा छळ करण्याकरितां जन्मास येऊन इच्याशीं लग्न करून मेला. असे श्राप देत असतात. दरएक दिवस आईबापांस परम दुःख होतें. जों जों मुलगी वाढत जात्ये, तों तों त्यांचे रक्तमांस जाऊन कृश होतात आणि कन्या जीवंत असतां मेली अशी समजूत करून दुःखाचें सहन मोठ्या धैर्यानें करतात. परंतु या सर्व दुःखाचें मूळ पाहिलें तर कोठें आहे ? ज्याच्या त्याच्या समजुतींत आहे. आपणच होऊन गैरसमजुतीनें आपला गळा कापावयास प्रवर्तक झाला असतो. त्यांस असें वाटतें कीं, हें दुःख मी सर्व सहन करीन, आणि असें करण्यांत माझी धन्य आहे. असें जे कोणी प्राचीन काळचे मूर्ख समजुतीचे लोक आहेत ते म्हणतात. व कितीएक म्हणतात कीं, काय करावें, दुष्ट जात ही ब्राम्हणाची पडली. जर पुनर्विवाह करावा तर लोक हासतील. ही गोष्ट मनांतील काढतां देखील येत नाहीं. आणि माझें मनांतील दुःख कोण जाणतो ? तस्मात सर्व देशचे, जातीचे, शेजारी, नातलग, इत्यादिक सोडावे त्यापेक्षां ही मुलगी मेली म्हणावें हें बरें, असें समजून कितीएक उगेच आहेत. परंतु इतक्यावरून इतकें सिद्ध होतें कीं, ब्राह्मणांमध्यें समजूत व विचार आगदीं नाहीं. परदुःख जाणतच नाहींत. आपले देशचे लोकांचें दुःख किंवा आपले जातीचें दुःख किंवा आपला शेजारी याचें दुःख किंवा आपला मित्र याचें दुःख मनांत आणीत नाहींत. व त्यांचा कळवळा करीत नाहींत. दुसऱ्याची मुलगी विधवा झाली तर त्यांत आपलें काय गेलें ! असें म्हणून अशा दुसऱ्याचे महान संकटाविषयीं विनोद व उपहास करितात. अरे ! अरे ! काय हे दुष्ट चांडाळ ब्राह्मण आहेत. आणि कोण यांचे पुढारी पंडित शास्त्री आहेत. या जातीचे पुढारी दुसरे कोण होतील. बरें, त्यांचे संगतीनें सर्व ब्राह्मण लोक दुर्भाग्य होऊन दीनवाणे झाले आहेत. गरीब, तरुण, दुर्भाग्य, स्त्रिया यांचे हाल पाहून या चांडाळांस दया येत नाहीं. पुनर्विवाहाची गोष्ट कोणी बोलला तर त्यांस असें वाटतें कीं, हा कोणी राक्षस धर्म बुडविणारा आहे. याचें ऐकूं नये. असे हे विचारास पराङ्मुख झाले आहेत. परंतु मला असें वाटतें कीं, सर्व ब्राम्हण जातीनें निश्चय करून पुनर्विवाह चालू करण्याचा शिरस्ता घालावा व पंडितांचें ऐकूं नये. दोनचारशें लोकांनीं असा एक कटाव केला म्हणजे पंडित उगीच राहतील. किंवा सामील होतील. परंतु त्यांच्यानें द्वेष होणार नाहीं व कांहीं उपद्रव होणार नाहीं.

पंडितांस सामर्थ्यहीन करण्यास एक कटाव मात्र पाहिजे. मला वाटतें कीं, असें होण्यास बहुत दिवस नकोत. हे पंडित शास्त्री मूढशिरोमणी आहेत आणि त्या गृहस्थादिकांस शास्त्र सांगणारे म्हणवितात, त्यांस कनिष्ठ जातीचे ठरवावे आणि चांगले शहाणे लोक जे धर्माचें संरक्षण व सर्वांचें कल्याण, सुखोत्पत्ती करतील, त्यांस पुढारी करावे. त्यांस असें समजत नाहीं कीं, पूर्वी ब्राम्हण कंदमूळ खाणारे व रानांत राहणारे व थोडके होते. याजमुळें त्यांच्या स्त्रियांशीं लग्नें झालीं न झालीं तरी चिंता नव्हती. व त्या काळचे व त्या स्थितीस लागू असें केलेलें शास्त्र आहे. ज्या शास्त्रांत पुनर्विवाह करूं नये म्हणोन लिहिलें आहे त्यांत आणखी कितीएक गोष्टी आतां अगदीं उपयोगी नाहींत, अशा आहेत. पाहा कीं, बारा वर्षें ब्रम्हचर्य, वेदाभ्यास, गृहस्थाश्रम याप्रमाणें सर्वकाळ तपश्चर्या करीत भिक्षा मागून असावें. याप्रमाणें कोणी आज करीत आहे, किंवा कोणी करील कीं काय? सती जावें असें त्यांत आहे, परंतु ही मूर्ख रीती नाहींशी झाली किंवा नाहीं? ज्याणें पुनर्विवाह करूं नये म्हणून ठरविलें त्याच्यावर चढ, ज्याणें सती जावें म्हणून ठरविलें त्याणें केला. असे कायदे करणारे यांची स्त्रियांविषयीं किती गैरसमजूत होती तें उघड दिसतें. कारण कीं, त्यांस स्त्रिया म्हणजे जनावरें वाटत असतील. एका खाटकानें एक बकरूं देवीस द्यावें म्हणोन सांगितलें. त्याजवर दुसरा शहाणा निघाला तो पांच द्यावीं म्हणून सांगतो. याप्रमाणें किती गरीब जनावरांचा प्राण जातो? आपल्यास लाभ होतो त्यापेक्षां गेलें काय? "देवो दुर्बलघातकः" याप्रमाणें हे शास्त्रार्थ जाणावे. देशकालवर्तमान पाहून यांस मागें ठेवावें. जसे इतर बहुत रद्द आहेत, तसे हेही समजावे. आणि हल्लींचे ब्राम्हणांचे रोजगार धंदे आहेत, त्याप्रमाणें शास्त्रही पाहिजे. तात्पर्य सारासार विचार करावा. चांगली गोष्ट विचारानें दिसेल ती अंगीकारावी. हेंच आश्चर्य आहे. हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर १००

शतपत्रांचा इत्यर्थ

विनंती विशेष. मी आपले श्रम या पत्रांत संपूर्ण करणार. यास्तव या लिखित पत्रशतकाविषयीं कांहीं सुचवितों. आज दोन वर्षें मी लोकांस त्यांची स्थिती रिती कशी आहे ती अगदीं भीड न धरितां उघड करून सुचविली. त्यांत एखादें अक्षर अधिकउणें, शुद्ध अशुद्ध, कोणास वाटलें तर, त्यांणीं क्षमा करावी. माझे जिवाची पकी खात्री आहे कीं, जो कोणी या पत्रांचें अवलोकन करील आणि विचार करून पाहील, त्यास प्रत्येक शब्द खरा आहे असें वाटेल. लोकहितवादीनें कोणाची मजुरी पत्करली नाहीं. कशाची अपेक्षा,

आशा किंवा इछा धरली नाहीं. कोणाचे सांगण्यावरून व शिकविल्यावरून कृत्रिम वर्णन केलें नाहीं. लाभावर किंवा द्रव्यावर नजर देऊन कीर्ती व्हावी या हेतूनें लिहिलें नाहीं. इतके श्रम जे केले ते फक्त लोकांस त्यांची वास्तवीक स्थिती कशी आहे ती कळावी, त्यांणीं सुधारावें, त्यांस इहलोकीं सुखवृद्धी व्हावी, परलोकाचें साधन घडावें, व आपले बहुत काळापासून दृढ ग्रह झाले आहेत, त्यांपैकीं कांहीं अविचारानें व कांहीं मूर्खपणानें जडलेले आहेत, ते कमी व्हावे किंवा नाहींसे व्हावे इतक्याच हेतूनें मी यथामतीनें व स्वइच्छेनें वेतनावांचून श्रम केले आहेत, व जितकें लिहिलें आहे, तें अक्षरशाहा खरें खरें निवडून. विचार करून काळजीनें लिहिलें आहे. हें सर्व लोकांस नजर आहे. हें लिखितशतक कोणी बाळबोध अथवा मोडी छापून मुलांस लिखतांसारखें वाचण्यास दिलें तर बहुत नफा होईल. यास्तव या ग्रंथावर लोकहितवादी आपली सत्ता ठेवीत नाहीं. पाहिजे त्यांणीं हीं पत्रें छापून प्रगट करावीं. कितीएक प्राचीन काळचे लोकांस कितीएक लोकहितवादीचीं मतें विपरीत व हिंदुधर्मास विरुद्ध भासतील, परंतु हा त्यांचा मिथ्याभास आहे; कारण कीं, त्यांत हिंदु धर्मांस कांहीं विपरीत नाहीं. फक्त मूर्खपणास मात्र विपरीत आहे. याविषयीं विचार केला तर खात्री होईल. यापुढें कांहीं दिवसांनीं लोकहितवादी दुसऱ्या शतकास आरंभ करील; परंतु ही गोष्ट ईश्वराचे स्वाधीन आहे. मला वारंवार इतकेंच लोकांस सुचवावयाचें कीं, मीं कांहीं व्यर्थ, मिथ्या किंवा असत्य लिहिलें नाहीं. जें लिहिलें तें यथार्थ आहे असें मला तर खचीत वाटतें. जे सारासार विचार करणारे, व ज्यांचीं मनें पंडितासारखीं कुश्चित नसून विस्तीर्ण झालीं आहेत त्यांस हें समजेल. माझी सर्व जनांस एवढीच विनंती आहे कीं, तुम्ही सर्वजण विचार करण्यास लागा, वाचावयास लागा, नवीन ग्रंथ व वर्तमानपत्रें वाचा, व तुमचे शेजारीं काय होत आहे, याचा विचार करा. इंग्रजांमध्यें कितीएक चांगले गुण आहेत व ते तुम्हांस प्राप्त व्हावे म्हणून ईश्वरानें त्यांची तुमची संगत घालली आहे हें लक्षांत आणा. सारासार पाहा, परंपरा आंधळ्याची माळ लागली म्हणून तीच चालवूं नका. धर्मशील, ईश्वरतत्पर व्हा. या गुणावाचून सर्व व्यर्थ आहे; सत्य बोला; दुष्ट वासना सोडा; धर्मसुधारणा करा म्हणजे टाकूं नका, परंतु त्याचा अर्थ घ्यावयाचा तसा काळ पाहून घ्या; व ईश्वरसंबंधीं व जगासंबंधीं ज्ञान सर्व लोकांत वृद्धिंगत करा; आळस सोडा; तुमच्यामध्यें वास्तवीक बुद्धीमान असेल त्यास पुढारी करा; त्याचे अनुमतानें चाला; सर्व लोकांची जूट असूं द्या; आपसांत फूट नसावी हें ध्यानांत वागवा. विद्या अधीक होऊन तुमचें पाऊल पुढें पडूं द्या. सर्व देशाची काळजी प्रत्येकजणांनीं करावी. राज्य कसें चाललें आहे व राजा कोण, त्याची वर्तणूक कशी, हें पाहात जा; माहितगार व्हा; तुमच्या प्राचीन काळच्या विद्या, ग्रंथ, तर्क व कल्पना यांचे शंभरपट व हजारपट आतां चांगल्या विद्या व अधीक कल्पना निघालेल्या आहेत. त्या सर्व पाहा; तुमचे संपत्तीवर तुम्ही लक्ष देऊन अळसांत राहूं नका, भट व पंडित हे केवळ मूर्ख हें पकें समजा. खरी नीती कोणती तें पहा; पैसा खाऊं नका; रांडबाजी करूं नका; प्रपंच,

संसार भलाईनें करा; आपले शत्रूस देखील वाईट इच्छूं नका; शरीरानें व मनानें देखील पाप करूं नका; प्राणिमात्रावर दया करा; अपराध क्षमा होतील तितके करा; परंतु क्षमा न करण्याचा प्रसंग येईल तेथें क्षमा करूं नका; एकमेकांवर प्रीति करा; नित्य उठून ईश्वराचें भजन व प्रातःकाळीं चिंतन करीत जा; त्याजवळ क्षमा मागा; आपले हातून पापें व अपराध बहुत घडतात, त्यांची क्षमा भगवंताशिवाय करणार समर्थ कोणी नाहीं; ढोंग, सोंग करूं नका. लबाडी सर्वदा ईश्वरास दिसती, यास्तव कदापि करूं नका. कोणचेंही पाप करूं नये. तें फार वाईट. इहलोकीं क्षणभर सुख वाटेल, परंतु त्याचा झाडा द्यावा लागेल. मरावयाचें आहे, हें नित्य मनांत आणा. तुम्ही आपले मुलांची काळजी करून त्यांस शहाणीं करा, व सर्व लोकांची काळजी करा. नित्य कांहींतरी सर्व देशाचें कल्याण केल्याशिवाय एक दिवस जाऊं देउं नका. मुख्य ईश्वरभजन करण्याचा मार्गच आहे कीं, कोणास दुःख देउं नये, व सर्व लोकांचें हित करावें, स्वदेशाचें हित इछावें आणि परदेशाची हानि इछावी असें नाहीं; परंतु सांप्रत आपले लोक फार वाईट अवस्थेंत आहेत. सबब फार खबरदारी ठेवावी कीं, या लोकांचें कल्याण होईल, तुम्ही आपल्यास योग्य करा, अब्रू वाढवा. पैका मिळाला तर अब्रू वाढते, असें नाहीं. अब्रू खरेपणा, व निर्मळपणा यांपासून उत्पन्न होते; विद्या केली तर त्याप्रमाणें वागणूक पाहिजे, नाहींतर विद्या व्यर्थ आहे. विद्येचें सार्थक रोजगार नव्हे. ज्यास विद्येचा अर्थ ठाऊक नाहीं ते असें म्हणतात. परंतु फक्त पोटच भरणारी ती विद्या नव्हे. ती मजुरी आहे. विद्या म्हणजे ज्ञान, जेणेंकरून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो. उनाड जे लोक आहेत ते विद्येचें तात्पर्य द्रव्य मिळविण्याचें असें समजतात; परंतु विद्येपासून द्रव्यलाभही होतो, व दुसरे अनेक लाभ होतात. याप्रमाणें तात्पर्य मी निरूपण केलें. याप्रमाणें सर्वांनीं चालावें, आणि असें होण्यास माझे श्रम कांहीं उपयोगी पडले असें दृष्टोत्पत्तींत आल्यास माझे श्रम परिहार होतील. माझें मागणें सर्व लोकांस आहे कीं, मीं जें लिहिलें आहे त्याचा विचार करून पाहा. तुमच्या चांगल्यावांचून त्या लिहिण्याचा हेतु नाहीं. तुमचें कल्याण व्हावें म्हणून मीं झटतों व तुमच्या चुक्या वगैरे मीं उघड करून दाखविण्यांत तुम्हांस रागरोष येईल, हें मीं मनांत आणलें नाहीं. कारण कीं, माझी उत्कंठा तुमच्या सुधारण्याकडे फार आहे. माझें अंतःकर्ण सर्व तिकडे आहे. यास्तव मीं जें लिहिलें आहे, त्याचा तुम्ही विचार करावा. कारण कीं, ज्याप्रमाणें तुमची सेवा एकनिष्ठेनें व निष्कपटपणानें केली त्याजवर तुमची इतराजी नसावी, किंबहुना तो काय बोलतो हें तरी मनन करावें. अस्तु. तुमची आमची गांठ आज दोन वर्षें सतत होती याचा मला मोठा आनंद सर्वकाळ वाटेल. सर्वांनीं कृपालोभ असों द्यावा, हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर १०१

संस्कृत विद्या

विनंती विशेष. पुण्यांतील कल्याणोन्नायक मंडळींत कोण लोक आहेत व त्यांचें ज्ञान कसें आहे, हें मला आजपर्यंत ऐकून ठाऊक होतें. व मला फार अ[ा]शा होती कीं, हे लोक आपली योग्यता जाणून आपलें उत्कृष्ट ज्ञान बाहेर काढणार नाहींत; परंतु आपली फजिती करून घेण्यास तेच प्रथम प्रवर्तले यास्तव त्यांस उत्तर दिलें पाहिजे. नाहीं तर ते असें समजतील कीं, पृथ्वी निक्षत्री झाली, आणि जरी त्यांचें लिहिणें उघड वेडेपणाचें आहे, तत्रापी सुज्ञ जनांनीं त्याचा धिःकार करूं नये.

२. कल्याणोन्नायक मंडळींतील सभासद संस्कृत विद्येचा पक्ष घेतात, परंतु हा पक्ष व्यर्थ आहे. कारण कीं संस्कृतांत फार विद्या आहे असें सांगून लोकांस पंडित प्राचीन काळीं फसवीत होते; परंतु आजचा काळ असा आहे कीं, संस्कृताची उघडीक होऊन पंडितांचें ज्ञान सर्व बाहेर पडलें आहे. असें असतां हे सभासद बापडे सर्व पाठशालेंतील पंडीत आहेत; परंतु यांस वास्तवीक ज्ञान कांहीं नाहीं. संस्कृत भाषेंतील खुळें यांचे मनांत भरलीं आहेत, तीं झांकून ठेवतील तर फार बरें होईल.

३. संस्कृताचा इतकाच उपयोग आहे कीं, लोकांमध्यें भ्रांती उत्पन्न व्हावी व जों जों मनुष्य त्यांत प्रवीण होतो तों तों अज्ञानसमुद्रांत खोल खोल जात असतो; असें असून कोणी म्हणेल कीं, पाठशाळा सरकारानें कशास चालविली आहे. तर शाळेपासून जें फळ आतां दृष्टीस पडूं लागलें आहे, तेंच येईल असें पूर्वी वाटलें नवतें. तेव्हां असें वाटत होतें कीं, कोणीकडून तरी विद्येची गोडी या लोकांस लागेल. नंतर लोकांस जी विद्या म्हणून वाटते त्यांतच अनुपान करून चांगली विद्या शिकवावी. अशा बुद्धीनें हें बीज घातलें; त्यास दक्षिणादिकेंकरून जलसिंचन केलें; परंतु या वृक्षास इछिलें फळ आलें नाहीं. उलटें आणखी अज्ञान वाढलें. अस्तु. साधारण संस्कृताविषयीं बोलण्याचा प्रसंग आहे. यांत इतर गोष्ट नको.

४. संस्कृतांत चांगली विद्या नाहीं व उपयुक्त ज्ञान नाहीं, हें सर्व विद्वानांनीं ठरविलें आहे; परंतु सभासदांची खातरजमा करण्याकरितां लिहिणें जरूर आहे. प्रथम संस्कृतांत इतिहास नाहीं. मागाहून राज्यें कशीं झालीं ? व तीं बुडालीं कोणत्या कारणानें ? राज्यें किती होतीं ? मुसलमान आले कधीं ? त्यांचे पूर्वी राज्यें कोणी केलीं ? येविषयीं पंडितांचें ज्ञान व नांगरहक्याचें ज्ञान सारखं आहे. कलियुगास पांच हजार वर्षें सरासरी होत आलीं. त्याचा इतिहास आहे कोठें ? याचें उत्तर पंडित काय देतील ? दुसरें, संस्कृतांत भुगोल नाहीं. पंडितास पुसा कीं, रूम कोठें आहे, व आरबस्थान कोठें आहे ? व हिंदुस्थानची हद्द कशी व लोक किती ? व लांबीरुंदी किती ? तर तो हातच जोडील. आणि ठाऊक नाहीं

म्हणेल. पंडितांचें ज्ञान इतकेंच कीं, मेरू भूमीच्या मध्यें आहे. लक्षयोजनें उंच आहे. सिद्धपूर आहे. स्वर्गाची वाट हिमालयावर आहे. गंगा ही देवता जीवंत आहे. तशीच यमुना आहे. हें त्यांचें भुगोलसंबंधीं ज्ञान आहे. तिसरें, संस्कृतांत यंत्रज्ञान नाहीं. आजपर्यंत कालिदासासारखे पंडित झाले, मग या कल्याणोन्नायक गरिबांची कथा काय? परंतु कोणी पंडितानें यंत्र कधीं कांहीं केलें आहे? यंत्राची सुधारणा केली आहे? जें जातें व्यासाचे वेळेस होतें तेंच आतां आहे. जो नांगर पांडवांचे राज्यांत होता, तोच आतां आहे. पंडितांनीं कोणता ग्रंथ यत्रावर विचार करून लिहिला आहे? पंडितांनीं कधीं ग्रंथ छापले आहेत? कागद करितात त्यापेक्षां चांगले करण्याची युक्ती लोकांस दाखविली आहे? कर्नाटकांत ताडपत्रावर रामराजापासून लिहीत आले. तसेंच आजपर्यंत लिहितात. कोणत्या दशग्रंथी ब्राम्हणानें व कोणत्या षडशास्त्री पंडितानें यंत्राविषयीं विचार केला आहे? फार झालें तर शिल्पाविषयीं एक जुनें पुस्तक काढतील, आणि म्हणतील कीं, हें पाहा आमचें यंत्रज्ञान. आंत पाहिलें तर दुसरें कांहीं नसतें; परंतु मंगळवारीं घर बांधूं नये, बुधवारीं मोरी उकरूं नये, त्रिकोण आला तर जागा टाकावी, जेथें समभाग येईल तेथें घर बांधावें, रोहिणी नक्षत्रावर लांकडें तोडावीं, हेंच ज्ञान त्यांत सांपडेल. त्या ज्ञानाप्रमाणें त्यांणीं लोकांस वेड लाउन दिलें आहे. व जो तो मुहूर्त पाहतां पाहतां दमतो. मुलास बायको कशी कां असेना, परंतु मुहूर्त चांगला पाहिजे. हें अज्ञान लोकांत पंडितांनीं पसरून दिलें आहे. चवथें, राज्यप्रकर्णी ज्ञान पाहिलें तर, मनास येईल तसें राज्य करावें. या नियमावांचून कोणता नियम त्यांस ठाऊक आहे? लोकांमध्यें बंदोबस्त व उद्योग कसा होतो व त्याची वृद्धी, उत्पत्ती व नाश कोणत्या कारणानें होतात; व फौजेचे नियम कसे असावेत? येविषयीं ज्ञान कोणत्या पंडितास आहे? हें ज्ञान नाहीं म्हणून पंडित उद्योग करावयास प्रतिकूळ आहेत. व विचार करावयासही प्रतिकूळ आहेत व देशाचें हित व देशांत द्रव्य कसें येईल, याविषयीं तर यास धुळाक्षर शिकविलें पाहिजे. कोणत्या पंडितानें राज्याविषयीं ग्रंथ लिहिला आहे? व राज्य करण्याची युक्ती अमुक चांगली असें दाखविलें आहे? फक्त पंडितांनीं इतकेंच केलें आहे कीं, जे जे राजे झाले, त्यांची खुशामत करून त्यांस आकाशांत नेलें आहे. या गोष्टीची प्रचीत पाहावयास दूर नको. बाजीराव याणें पुण्यांत शास्त्र्यांचा एक मोठा कळप बाळगिला होता, परंतु त्याणें कोणतें कल्याण केलें? द्वादशीचें ब्राम्हणभोजन वाढविलें. कोणतेंही पाप केलें तर पैका घेऊन निर्मळ म्हणून सांगत होते. "सर्वत्र विजयी भव" म्हणून आशीर्वाद देत होते. त्यांणीं कांटाळें बसलें. रोज पांच चार स्नानें घालीत होते. एवढीच गोष्ट त्यांणीं केली. धर्म सांगितला नाहीं. राज्यव्यवहार सांगितला नाहीं. विद्या सांगितली नाहीं. लोकांस लुटून त्यांस शालजोड्या द्याव्या म्हणजे खंडीभर आशीर्वाद व दोन लाख कोट्या करून वाद करीत होते. पांचवी गोष्ट, परदेशांत प्रवास करून तेथील खबर लोकांत प्रसिद्ध केली पाहिजे. तर लोकांचें ज्ञान वाढतें. याविषयीं लक्षावधी ग्रंथ इंग्रजींत आहेत. त्यापैकीं येखादा तरी त्यासारखा संस्कृतांत आहे कीं काय? पंडितांस फार झालें तर शेपन्नास

कोसांतील प्रवास घडला असतो. बाकी त्यांच्या डोळ्यांपुढें अंधःकार असतो, व पृथ्वी-विषयीं व समुद्राविषयीं हे पंडित बोलत असले म्हणजे जसें इस्पितळांतील लोक बडबडतात, त्याप्रमाणें त्यांचें ज्ञान नजरेस येतें. सहावें, पदार्थज्ञानही बराबर संस्कृतांत नाहीं. भलत्याचा गुण भलताच व भलतीच उत्पत्ती सांगितली आहे. सोनें जंबुनद आहे म्हणून सांगितलें, तें कोठें आहे ? पंडितांनीं त्याची आंगठी कधीं केली आहे काय ? तसेंच सिंह, शार्दूळ, शरभ या जनावरांचीं वर्णनें मनास येईल तशीं केलीं आहेत; परंतु तीं पंडितांस खरीं वाटून खरा शोध काढण्यास देखील ते प्रतिकूळ आहेत. याप्रमाणें ज्योतीष, वैद्यक, रसायन या सर्व ज्ञानाची व्यवस्था आहे. फक्त संस्कृतांत शब्दशास्त्र मात्र आहे. म्हणजे व्याकर्ण, अलंकार, न्याय इत्यादि. परंतु जें इंग्रजी भाषेंत ज्ञान व विद्या आहे त्यांतला यांत एक गुंजदेखील अंश नाहीं. आणि या शब्दज्ञानाचा उपयोग कोणता कीं, पंडित सभेंत जमून बडबड करतात. त्यापासून लोकांस उपयोग नाहीं. धर्म नाहीं. अर्थ नाहीं. हा वितंडवाद. पण पंडितांस हीच मोठी विद्या वाटते व तिजवर ते मिरवतात, परंतु त्यांस असें वाटत नाहीं कीं, आमचें ज्ञान निरुपयुक्त व पोकळ आहे. व याजवर लोकांस आतां फसवूं नये. लोकांस आपले कल्याणाकरितां उपयुक्त ज्ञान मिळऊं द्यावें, असें वाटत नाहीं. बुडत्या-बरोबर कांठावरच्यानें आंत पडावें, असा त्यांचा बेत आहे; परंतु हा वेडेपणा सोडून द्यावा व पुनर्विवाहादि विषयांवर मूर्खासारखें बरळूं नये.

पंडितांनीं या हिंदु लोकांचें आजपर्यंत इतकें खाऊन त्यांचें कल्याण काय केलें ? राहू चंद्रास खातो, ब्राम्हणांस दिलें म्हणजे पुण्य, ब्राम्हण हेच देव, हेंच त्यांस सांगून आपल्यासारखें मूर्ख केलें, हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर १०२

पुनर्विवाह

विनंती विशेष. हल्लीं कल्याणोन्नायक मंडळी पुण्यांतील पंडितांनीं उभी केली आहे. या मंडळीचे दोनतीन उद्गार तुमचे पत्रद्वारें आले, त्याजवरून या मंडळीचे ज्ञानाची व विचारांची प्रशंसा अत्यंत झाली व एणेंकरून पाठशाळेंत विद्या कोणते प्रकारची शिकतात, याची प्रसिद्धी दिगंतरापर्यंत होईल. या प्रकारची विद्या प्राप्त होऊन हे लोक देशाचें कल्याण करण्यास समर्थ कसे होतील, हें आश्चर्य आहे. या विद्येचा उपयोग इतकाच दिसतो कीं, जे लोक अज्ञानांत आहेत त्यांस मात्र आपली विद्या मोठी आहे अशी भ्रांती दाखवून पैका उपटावा, म्हणून लोकांस सावध करणें अवश्य आहे. मागील एक

पत्रीं या मंडळींतील एकानें पुनर्विवाहाविषयीं पत्र लिहिलें तें वाचून बहुतेक समजदार लोक यांणीं काय म्हटलें असेल बरें? हें हल्लीं शके १७७२ वे शालिवाहनाचें वर्ष चाललें आहे. यावर्षीं अशी मूर्खपणाची गोष्ट पत्रद्वारें प्रसिद्ध करितात. ही कशी मान्य होईल! जेव्हां हिंदु लोक भोळसर व पंडित सांगतील तसें ऐकणारे होते, तेव्हां त्यांणीं, सती जावें म्हणून सांगितलें तेंच लोकांनीं कबूल करून आपल्या सुना, मुली, बहिणी जीवंत जाळिल्या. विधवा स्त्रियांचीं लेणीं वगैरे घेऊन, त्यांची हजामत करूं लागले, आणि फार तर काय, परंतु त्यांचा अशुभ प्रश्न दर्शनेंकरून होतो, त्यांस एकदा जेवण द्यावें व हाल करावे म्हणून जे प्रतिपादन करितात, ते.कलियुगांतील राक्षस, माणसें खाणारेच समजावे. यांच्या पुनर्विवाहाविषयीं ज्या समजुती आहेत, त्यांतून एकही योग्य नाहीं. त्यांस असें वाटतें कीं, कांहींतरी लिहिलें म्हणजे झालें. दरएक शब्दास नवीन कोटी म्हणतात; परंतु त्यांत अर्थ काय व ज्ञान काय आहे याचा विचार करीत नाहींत. आजचे काळीं मूर्खांचेही मनांत असें नाहीं कीं, पुनर्विवाह न व्हावा. हे पंडित सांप्रतकाळचे विद्येशीं व ज्ञानाशीं आपलें जीर्ण ज्ञान (परंतु वास्तविक पाहिलें तर तो मूर्खपणाच होय.) त्यास युद्धास उभें करतात. मग हे जय पावतील कसे? ही गोष्ट खरी आहे कीं, जो काळपर्यंत जुने वेडसर लोक आहेत, तोंपर्यंत हे पंडित कांहींतरी आपलें ज्ञान मिरवतील; परंतु त्याचा परिणाम नाहीं. पंडितांचा धर्म म्हणजे जितका लोकांनीं केलेला मूर्खपणा आहे, तितका त्यांचा धर्म. वास्तवीक विचार व ईश्वरभक्ती व लोकहित हें त्यांणीं टाकून दिलें आहे. पंडितांनीं हिंदुधर्मास काळिमा लाविला आहे. त्यांस विद्वान म्हणावें कोणी? हे पंडित व हे भट जर खरे विद्वान असते, तर या देशाची माती कां होती? ज्या देशांत शंभरांत येखादा विद्वान आहे, त्या देशाकडे पाहा किती सुधारणा झाली आहे? त्या लोकांचे झेंडे पृथ्वीवर या टोकापासून त्या टोकापर्यंत लागले आहेत. आमचे देशांतील हे पाहा विद्वान, कीं त्यांची संख्या म्हटली तर पुण्यांतच विद्वान म्हणविणारे भट व पंडित हजार आहेत, व दरएक गृहस्थाचे घरीं दोनचार विद्वान आहेत, इतकी विद्वानांची स्वस्थ[स्त]ता आहे; परंतु विद्या पाहिली तर शून्य. हे फुकट खातात व जेवण्याच्या गोष्टी व ग्रामण्यें व प्रायश्चितें सोधीत बसतात. याणीं लोकांचें हित कधीं मनांत आणलें आहे? व आपलेहून पलीकडे कधीं पाहिलें आहे? हे जातिअभिमानाने मरतात. जरी यांणीं हित केलें तरी म्हणतील कीं, "गोब्राह्मणहिताय च." हे सर्व लोकांचें हित कदापि करणार नाहींत. हे विचारतात कीं, सुधारणा म्हणजे काय? तर याचें उत्तर असें आहे कीं, आपली विद्या अपूर्ण व यत्किंचित असतां ती पूर्ण म्हणून गर्व करितां. सार्वजनीक हिताचा मार्ग तुम्हांस दिसत नाहीं, तो दिसावा याचें नांव सुधारणा हें समजा, हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर १०३

पंडितांची योग्यता

विनंती विशेष. ज्यास समजत नाहीं, त्याणें उगेंच बसावें हें बरें; बोलूं नये, म्हणजे शहाणपणाचा ठाव लागत नाहीं, असें आहे. परंतु तो मार्ग सोडून कल्याणोन्नायक मंडळीनें आपलें ज्ञान प्रसिद्ध करावयास इच्छा केली हें पाहून मला फार आश्चर्य वाटतें. यांचें ज्ञान कोणाचे उपयोगी नाहीं. लोकांचें कल्याण हे कसलें करितात ? यांस प्रथमच प्रश्न उलगडत नाहीं. हे पुसतात कीं, सुधारणा म्हणजे काय ? यांस आपली सुधारणा झाली पाहिजे हेंच कळत नाहीं. आम्ही सर्वज्ञ व भूदेव व आमच्या पोथ्यांत सर्व ज्ञान आहे व आम्हांस काय आणखी कर्तव्य आहे, असें वाटतें. हे अजून पहिल्याच धड्यांत आहेत. ज्या गोष्टींचे सिद्धांत सर्वतोमुखीं झाले आहेत त्यांचें निवारण हे करतात. हे शास्त्री, पंडित व भट मूर्ख असतां विद्वान म्हणून हिंदुस्थानांत मोडतात. याजमुळें देशाची फार बुडणूक झाली. इतर लोक यांणीं अज्ञानांत बळेंच ठेविले आहेत. दक्षणा दोन पैसे मिळावयाची असली म्हणजे हे कावळ्यासारखे जमतात व पैशाकरितां सर्व दिवस घालवितात; परंतु उद्योग करावयाचे नाहींत. पुण्यांत दक्षणा ग्रंथकर्ते यांस द्यावी म्हणून कोणी इंग्रजी शाळेंतील लोकांनीं सरकारास लिहिलें. त्याजबद्दल पाठशाळेंतील पंडितांस अत्यंत क्रोध येऊन त्यांनीं एकत्र जमून सभा केली. परंतु एणेंकरून कांहीं फळ झालें नाहीं. सरकारानें उत्तम बेत मान्यच केला. या पंडितांनीं गवगवा करून कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांची अप्रतिष्ठा होऊन गेली. व सरकारानें जें करावयाचें तें केलें. या पंडितांनीं आपला मूर्खपणा मात्र जगांत प्रसिद्ध केला. हे सुधारणेचे महावैरी आहेत. असे हे गुण यांचे प्रसिद्ध झाल्यामुळें सरकारांतून पाठशाळा हें दुर्गुणाचें माहेरघर व मूर्खपणाचें बीज मोडून टाकावें असा बेत झाला आहे. तेव्हां पंडितांची योग्यता किती आहे हें यावरून पाहा. हे बायांस मात्र फशिवतात. व्रतें, उपवास, प्रायश्चित्तें, वगैरे पोट भरावयाचे मार्ग तेवढे ठेवण्याचा प्रयत्न यांचा आहे. दुसरें यांस कांहीं नको. हे विद्येचे भुकेले नाहींत. ग्रंथ वाढविण्यास उत्सुक नाहींत. देशकंटक आहेत. लोकांचे सुधारणेविषयीं व हिताविषयीं प्रयत्न करावयास अनुकूल नाहींत. राज्य कसें चाललें आहे ? व लोक बरे अवस्थेंत कशानें येतील ? नवीन कायदे काय पाहिजेत ? याचा विचार करीत नाहींत. सोरटपणाची गोष्ट, खराब चाल, स्वहित, सौदेगिरी, सुधारणुकीची बंदी व आपसांत कलह लाऊन ग्रामण्यें करून चार पैसे मिळवावयाचे, अशीं कुत्सित कर्में करण्यास हे पंडित कसे जुडतात कीं, जशा मोहळाच्या माशाच मधावर बसतात. यांणीं लोकहिताचा प्रयत्न केला, असें कोणास आजपर्यंत स्मरण नाहीं. यांणीं आपले पोटावर व शालजोड्यांवर नजर देऊन सर्व देश खराब केला ! जोंपर्यंत कांहीं

मूर्ख लोक देशांत आहेत, व ते मानतात तोंपर्यंत यांचीं ग्रामण्यें चालतील व कांहीं दिवसांनीं हे जुने लोक गेले म्हणजे पंडित उताणे पडतील. परंतु या गोष्टीस दाहावीस वर्षें आणखी पाहिजेत. म्हणजे आम्हींच या पंडितांचा तमाशा पाहूं. तथापि प्रथम पाठशाळेचा विध्वंस झाला पाहिजे. म्हणजे एक पुरंदरचें बंड मोडलें. हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर १०४

पुनर्विवाह

विनंती विशेष. आलीकडे दोन पत्रीं कल्याणोन्नायक मंडळांतील प्रमुख यांणीं आपले मतें मोठें गूढ ज्ञान प्रगट केलें आहे. तें कोणतें म्हणाल तर पुनर्विवाह करूं नये हें. यांस असें वाटतें कीं, ब्राम्हणज्ञातींत पुनर्विवाह करणें वाईट आणि त्यास शास्त्र व युक्ती अनुकूल नाहीं व त्यांत कांहीं लभ्यही नाहीं. याजकरितां मोठे डौलानें दोन तीन वेळ पत्रें त्यांणीं लिहिलीं आणि उत्तर मागितलें. त्यास असा विचार करणाऱ्या पुरुषांशीं वाद कर्णें म्हणजे आंधळ्यापुढें मशाल धरणें किंवा प्रेताच्या तोंडाशीं औषधाची वाटी लावणें, याप्रमाणें आहे. हे पहिल्या काळचे वेडे. यांस कांहींच युक्तायुक्त समजत नाहीं. मी तरुण लोकांच्या सुधारणेकरितां लिहितों, आणि पुनर्विवाहाचें प्रतिपादन करतों, तें ऐका.

शास्त्रीपंडितांच्या कोट्या करणें म्हणजे अशा आहेत कीं, शब्द प्रमाण आहेत कीं नाहीं, असें पुसतात; म्हणजे तुमचा आजा होता हें तुम्हांस ऐकून ठाऊक आहे हें खरें मानतां कीं नाहीं? उत्तर खरें आहे, तेव्हां शब्द प्रमाण जाहला. यास्तव ग्रहणांत स्नान दान करावें म्हणून विधी सांगितला आहे. तो खरा कीं नाहीं? याप्रमाणें कोटी करतात. परंतु तो शब्द प्रमाण मानला म्हणून हा शब्द प्रमाण नाहीं. तुम्ही म्हणाल कीं, "तुम्ही प्रेत आहां." तर शब्द प्रमाण घेऊन खरें मानावें कीं काय? शब्द प्रमाण कोटें कोटें मानूं. जेथें विचार व युक्ती वसत नाहीं, तेथें मानणार नाहीं. याप्रमाणें शास्त्रीपंडितांचे वाद आहेत. भलतेंच आकाशाचें टोंक पाताळास मिळवितात आणि म्हणतात कीं, आम्ही मोठी कोटी केली; परंतु विचार केला तर केवळ मूर्खपणा होय. अशा कोट्या करून पंडितांनीं या देशांत अज्ञान वाढविलें आहे. कोटें झरा असला म्हणजे त्यास गंगा म्हणतात, आणि महात्म लिहितात. अद्यापपर्यंत त्यांस विचार करणें म्हणजे काय, याचें भान नाहीं. हिंदुस्थानांत एक झरा आहे. त्याचें मूळ एका महात्म्यांत लिहिलें आहे कीं, एका राजाचे बायकोनें स्वयंपाक करीत असतां राग

येऊन पाणी ओतून टाकिलें. तो झरा झाला. दुसरें गाईचें तोंड खरबरीत आहे. त्यास ते म्हणतात कीं, कृष्णानें उष्टया शिताचे हातानें तिला मारल्यापासून तें तसें झालें. तुळशीला म्हणतात कीं, ही एक स्त्री होती. तिनें विष्णूचें आराधन केलें, ती तुळस झाली. उंबराचीं फुलें सोन्याचीं आहेत. तीं देव नेतात. घोड्यास पंख होते. याप्रमाणें जें जें स्वाभावीक होतें तें उलटें लोकांस समजून दिलें आहे. याप्रमाणें हे लोक मूर्खे असतात. यांजपासून विचार खरा कसा निघेल ?

पुनर्विवाहास शास्त्राधार नाहीं, असें कोणी म्हणतात. व कोणाचे मतें अनुकूलता आहे. त्यास आम्ही पुनर्विवाह करणाऱ्याचे पक्षीं आहों. ते असे कीं, शास्त्र असो अथवा नसो, परंतु हित जाणून शास्त्र एकीकडे ठेऊन ही रुढी घालावी. कितीएक रुढीनें शास्त्र रद्द होतें. व काळमानेंकरून शास्त्र बंद करावें लागतें. जसें मुंज केल्यावर बारा वर्षें कोण राहातो ? तद्वत जें घातक तें टाकलें पाहिजे. शास्त्र म्हणजे लोकांस सुख होण्याकरितां रीती घातलेली आहे. ह्यांतून जर विपरीत कांहीं असेल तर एकीकडे ठेवल्यास चिंता काय ? जसें इंग्रजांनीं सती बंद केल्या त्यास तुम्ही वाईट म्हणाल कीं काय ? तसेंच पुनर्विवाह चालू करण्यांत बहुत फायदे आहेत. एक मुख्य असा कीं, स्त्रियांचा अधिकार पुरुषाप्रमाणें चालू झाला. विचारास हेंच येतें कीं, जो अधिकार संसारसंबंधीं व सुखाविषयीं पुरुषास आहे, तोच स्त्रियांस असावा. जर पुरुषास पुनर्विवाह करण्यास चिंता नाहीं, तर स्त्रियांस देखील नाहीं. कारण कीं आचार व धर्म ईश्वरी नेमानुसार असावे. जसें चोरी न करणें, व्यभिचार न करणें, इत्यादि नीती स्वस्थता होण्याकरितां ठरविली; परंतु ग्रहणांत स्नान करावें, हा नीतीचा नेम नाहीं. नीती म्हणजे जे नेम सर्व देशांत, सर्व धर्मांत सारखे चालतात आणि आचार म्हणजे कल्पीत नेम एक राष्ट्रांत मानले जातात, दुसरे राष्ट्रांत मानीत नाहींत. तेव्हां दुसऱ्यास दुःख देऊं नये हा नीतीचा नेम आहे. आपल्यास दुःख वाईट लागतें तसें तें दुसऱ्यासही वाईट आहे; आपलें कोणी चोरलें तर ठीक नाहीं, तसेंच आपण दुसऱ्याचें चोरूं नये. ईश्वरी संकेतास अनुसरून जो शास्त्रार्थ असेल तो आम्हास मान्य आहे, त्यास विपरीत असेल तो मान्य नाहीं. हेंच शास्त्राचें रूप आहे. खरें बोलावें, नम्रता धरावी, दुसऱ्यास साह्य करावें, इत्यादि धर्म जे आहेत ते विचारानें सिद्ध होतात व अंतर्यामि याविषयीं साक्षी देते कीं, हे खरे धर्म आहेत. बाकीच्या ज्या खटपटी आहेत त्या हे मुख्य धर्म राखण्याकरितां योजिल्या असतील, हें स्पष्ट आहे. परंतु त्यांची गरज जेव्हां नाहींशी होईल तेव्हां सुधारणा पाहिजे. आणि ते मुख्य धर्म राहण्याकरितां ज्या खटपटी पाहिजे असतील त्या कराव्या. जसा आंगरखा करितात, हा आंगास वारा लागूं नये, इजा कांहीं होऊं नये व हवेपासून रक्षण व्हावें म्हणून करितात. मग पुढें चार वर्षांचें मूल होतें तेव्हां जो आंगरखा केला तोच तिसावे वर्षीं उपयोगी पडेल कीं काय ? तो बदलला पाहिजे. कारण जर तुम्ही मुख्य हेतूची स्मृती कराल तर हेंच योग्य आहे कीं, तो

लहान आंगरखा टाकून नवा करावा. जर तुम्ही मुख्य हेतूस विसरलेत, तर तोच ठेवाल: तद्वत् हल्लींचे हिंदु लोक इतके मूर्ख झाले कीं, तुळशी वाहणारास चांगला म्हणतात, परंतु खरें बोलणारास म्हणत नाहींत. याप्रमाणें जुन्या काळच्या खटपटी त्यांस बऱ्या वाटतात व मुख्य हेतू समजत नाहींत. पोरपणचा आंगरखा बापानें दिला तो कसा टाकावा, म्हणून तोच तिसावे वर्षीं घालावयाचा यत्न करून अनर्थ करितात. तद्वत् या काळीं स्त्रियांस पुनः विवाह करण्याची परवानगी देणें हें प्रशस्त आहे. ईश्वरानें जितके पुरुष तितक्या स्त्रिया उत्पन्न केल्या आहेत. व त्या परस्वाधीन. तेव्हां त्यांचा विसावे वर्षीं नवरा मेला तर जन्मपर्यंत कोण सांभाळ करील बरें? त्यांस कोण सुख देईल? त्यांणीं आपला जीव कोठें ठेवावा? मनांतील सुखदुःख कोणास सांगावें? अन्नवस्त्राकरितां कोणाकडे पाहावें? लहान मूलबाळ असेल तर त्याचा परामर्ष कोणी घ्यावा? ब्राम्हण लोकांमध्यें कितीएक घरें असतील कीं, जेथें एका एका गृहस्थाचीं चार-पांच तरुण मुलें ज्वानींत मरून गेलीं आणि त्यांच्या तरुण स्त्रिया पाठीमागें राहिल्या आहेत, जवळ कांहीं नाहीं, त्या बोडक्यांकडे पाहून आईबाप झुरतात. त्यांस खावयास घालावयास नाहीं, म्हणून श्रमी, आणि त्या लज्जेनें जशा समुद्रांत टाकाव्या, त्याहूनही अवघड प्रसंगीं दुःखाचे सागरीं बसतात. अन्नाची सोय नाहीं, जरी तारुण्य आणि लावण्य असेल तरी बळेंच वेडेंबिद्रें स्वरूप करून बसतात. आणि शास्त्रीपंडीत म्हणतात कीं, त्या बाईनें पूर्वजन्मीं वाईट तपश्चर्या केली म्हणून हें फळ असें प्राप्त झालें. ईश्वरानें उन्हांत उभी केली हें पूर्वजन्मीचें दुष्कृताचें फळ म्हणून. आतां तरी व्रतें करा. आणि आमचें पोट जाळा. म्हणजे सुकृत होऊन सात जन्म वैधव्य प्राप्त होणार नाहीं, असें सांगून गरीब व भोळे जिवांस फसवितात. मला तर असें वाटतें कीं, स्त्रियांचें दुःख इतकें भारी आहे कीं, त्याची स्मृती झाली तर रोमांच उभे राहातात. आणि आईबापांस दुःखाचे पर्वत पडतात. आणि दुष्काळांत पाऊस पडत असतां राहातात. अरेरे! हा अनुभव घरोघर आहे. इतकें असून जुन्या काळाची ही समजूत दृढ बसली आहे कीं, आपलीं पोरें आपण मारतात. हे ब्राम्हण लोक आपल्या मुली मारल्यापेक्षां अधिक दुःखांत ठेवितात, त्या दुःखास पारावार नाहीं. अद्यापि या सुधारणेविषयीं उलटे बोलणारे आहेत. परंतु जसा व्याघ्र रानांत माजला तर सर्वजण जाऊन मारतात, तसें या उलटें बोलणारांचा लोक धिःकार कां करीत नाहींत? व याविषयीं एकमत कां होत नाहींत? बारा, पंधरा, वीस, तीस, वर्षांच्या पोरींचे गळे कापतात, हें पाहून अंतःकरण खवळून न जावें काय? ही मूर्ख समजूत पडून गेली आहे. स्त्रियांनीं पुनर्विवाह केला म्हणून त्यांत काय तुमचा नामोश झाला. तुमच्या पोरी, बहिणी सुखेंकरून नांदतील. हल्लीं जो कल्लोळ दृष्टीस पडतो तो पडणार नाहीं. पोरें आणि बाळें घेऊन पतीशिवाय काय काय उपासतापास, दुःखें या विधवा भोगितात! परंतु भले हिंदु हो, धन्य तुमची! तुम्हीच आपल्या मुलींचे खाटीक स्वस्थपणानें होतां. तुमच्यासारिखें राष्ट्र आणि तुमच्यांतील विद्वानासारिखे विद्वान यांस तुळणा पृथ्वीवर

कोठेंही मिळणार नाहीं, हेंच खरें. पुनर्विवाह झाल्यानें व्यभिचार कमी होईल, व्यवस्था चांगली राहील, पतित स्त्रियांस पती होतील, आणि सुखी राहतील. आणि त्यांणीं असें राहावें, हा ईश्वराचा संकेत आहे. स्त्रीपुरुषांचें विधिरूप लग्न होऊन त्यांणीं नांदावें असा क्रम त्यास विघ्न करणारे शास्त्रांतील नेम व्यर्थ आहेत. फक्त पुरुषांनीं स्त्रियांस जनावराप्रमाणें पशू मानून त्यांजवर पाहिजे तसा जुल्मू चालविला आहे. यांत नीती नाहीं, धर्म नाहीं, विचार नाहीं, स कर्म नाहीं व युक्ती नाहीं; मागें करीत आले व लिहून ठेविलें म्हणून पुढें करतात; परंतु त्याची कांहीं मर्यादा पाहा. लक्षावधी स्त्रिया उपाशी मरतात. घर नाहीं, दार नाहीं, वस्त्र नाहीं, अन्न नाहीं, आणि हे दुष्ट पंडित अशा प्रकरणांत दैत्यासारखे निष्ठुर होऊन बोलतात त्यांस काय म्हणावें ? कळावें.

लो० हि०

पत्र नंबर १०५

पुनर्विवाह

विनंती विशेष. पुनर्विवाहाची चाल ब्राम्हण जातींत पडली असतां मोठी सुधारणा होईल. पुनर्विवाह न करूं देणें हा महान अविचार आहे. आणि हे लोक भोळसर म्हणूनच यांणीं हा कहर सोसला. आतां कितीएक विचार करून पाहूं लागले कीं, आमच्या जातींत बायकांस इतका अधिकार नाहींसा करून त्यांस जनावराप्रमाणें मानितात व त्यांस दुःखसागरीं लोटून देतात. पुरुषावर स्त्रीची प्रीती अधिक असावी व तिणें देवच मानावा. आणि तिणें याचा नाश कदापी इच्छूं नये, या हेतूनें असा धर्म स्थापन केला असेल; परंतु हें कारण अयोग्य आहे. या पृथ्वीवर ब्राम्हण जातींत स्त्रियांस विनाकारण दीनत्व प्राप्त होतें. आजपर्यंत दोनचार हजार वर्षें तरी हा कायदा चालू असेल; परंतु याविषयीं कोणाचें तोंड उघडलें नाहीं. सर्व लोकांचे डोळ्यांवर झोंप होती, युरोपियन लोक इकडे आले, त्यांच्या सहवासानें हिंदु लोकांस विचार आला त्यामुळें यांचे नेत्र उघडले. त्यांणीं सती बंद केली. हें मोठेंच यश घेतलें. आतां पुनर्विवाहा [संबंधीं] वादही चालूं लागले. पूर्वीची रीत अशी होती कीं, चालीप्रमाणें मुकाट्यानें चालावें. कोणी विचारूं नये. बायकोस जीवंत जाळूं लागले, आणखी यांचें वर्चष्म चालतें तर पुराणांत एखादा आणखी श्लोक घालते कीं, आईबरोबर लेकीनें व भावाबरोबर बहिणी[नें] जळावें, असाही कारखाना चालता; परंतु मुसलमान या देशांत आल्यापासून ब्राम्हणांचें महात्म्य संपलें. इंग्रजांनीं तर त्यांस जर्जर केलें. आमच्या देशापलीकडे काय आहे, याचा विचार ब्राम्हणांनीं व पंडितांनीं केला नाहीं. परंतु त्यांची झोप जाऊन त्यांणीं जागृत व्हावें म्हणून त्यांची व

परदेशीय यांची गांठ दैवानें घातली. जसें पांडवांचें आक्षोहिणी सैन्य मेलें आणि रामाचे युद्धांत पद्माचीं पद्में मेलीं, त्याप्रमाणें आज इतकीं वर्षें हजारो बायका जीवंत जाळल्या. व बळेंच मादरून दुःखाचे विहिरींत टाकल्या. याप्रमाणें ब्राम्हणांनीं युद्ध केलें; परंतु निर्दय पुरुषांनीं कांहीं विचार केला नाहीं. ते भटांचें व पंडितांचेंच मानीत होते. पुढें ग्रामस्थ, म्हणजे शूद्र वृत्ती करून पोट भरूं लागले. ब्राम्हणांत ती एक आडजात निघाली व तेही पंडितांसच मानूं लागले. परंतु कोणाचा धीर असा झाला नाहीं कीं, अरे, हा असा शास्त्रार्थ आहे म्हणतात खरा; परंतु कितीएक शास्त्रार्थ लौकिकाकरितां एकीकडे ठेवितां व विचारानें सारासार पाहातां तसेंच हें घातकी वचन म्हणून टाकावें आणी जो विधी विचारास विरुद्ध असेल त्या विधीचा निषेध करावा, हेंच योग्य आहे. आणि हा अनर्थ तर उघड आहे. कितीएक स्त्रिया या दुःखसागरांत लज्जेनें दीन होऊन व्यभिचारी होऊन मेल्या. कल्याणोन्नायक मंडळीचा सभासद लिहितो कीं, अशा स्त्रियांनीं एक वेळ जेवावें, चागलें अन्न खाऊं नये, उपासतापास करावे, यात्रा कराव्या. परंतु बळेंच त्यांस अडचणींत घालून हें सांगावें काय? नवरा मरणें ही प्रारब्धाची गोष्ट आहे. व तःसंबंधीं जुलुम फक्त हिंदु लोकांच्या गरीब व अज्ञानी बायकांनींच सोसला आहे. जेव्हां या स्त्रिया विद्वान होतील, तेव्हां या पंडितांस चरणसंपुष्टांनीं पूजा अर्पण करतील, यांत संशय नाहीं. परंतु याच कारणास्तव ब्राम्हणलोक स्त्रियांस शहाण्या करण्यास असे प्रतिकूल आहेत. जुलमाचें शास्त्र जेथें चालू आहे तेथें जरुरच आहे कीं, बायका जनावराप्रमाणें नीच अवस्थेंत राखल्या पाहिजेत. स्त्रिया सुसिक्षित होतील तेव्हां आपला अधिकार स्थापतील. आणि संसारसुखास हानी करणारे पंडितांपासून असा तहनामाच करून घेतील. परंतु सांप्रत बायका अगदीं जनावरें पडलीं म्हणून पंडितांस संधी सांपडली आहे. हिंदु लोक सुधारत तोंपर्यंत मोठ्या पदवीवर येण्यास योग्य नाहींत. पाहा, जर एखादा पंडित न्यायाधीश केला, आणि त्यापुढें ब्राम्हणी स्त्रिया विधवा गर्भपात करून आल्या तर तो त्यांजला बळेंच महान अपराधी असें जाणून मोठी शिक्षा देईल; परंतु त्यास असें वाटणार नाहीं कीं, आमचे शास्त्रानें एवढी अडचण घातली आहे कीं, ती तोडण्यालायक आहे. याजमुळें ही स्त्री अपराधी कमी आहे, असें त्यास किमपी वाटणार नाहीं. हे विनंती.

लो० हि०

पत्र नंबर १०६

पुनर्विवाह

पुनर्विवाहाची चाल पाडणें हें शास्त्रविरुध्ध म्हणतात; परंतु लोकांचे हिताकरितां करावें हेंच माझें म्हणणें आहे. जसा दुष्काळ पडला असतां श्राध्ध करावयाचें असल्यास ठेवावें. कारण कीं, पोटास मिळून आपला जीव जगत नाहीं, तर खर्च कशास करावा ! तद्वत चांगली व्यवस्था होईल तो नियम करावा. आणि जें पूर्वी शास्त्र लिहिलें, तेंच सर्वकाळ चाललें पाहिजे, असें म्हणणें हा मूर्खपणा आहे. जसें पूर्वीचें वैद्यक आहे. परंतु त्यांत आतां जी सुधारणा झाली असेल ती घेतली पाहिजे. तसेंच ज्योतिष, तसेंच धर्मशास्त्र यांत फेरफार केले पाहिजेत, व त्यांतील नियम सुधारले पाहिजेत. कितीएक रद्द करण्याजोगे जे होते ते लोकांनीं कोणास न पुसतां रद्द केले आहेत. कारण कीं, तसें करणें जरूर पडत गेलें. ब्राम्हणांनीं राज्य करूं नये, परंतु पेशवे यांणीं केलें. मुंजीनंतर बारा वर्षें गेल्यावर लग्न करावें तें सोडून पूर्वीच करितात. अशा शास्त्रविरुध्ध चाली लोकांनीं स्वमतानें हजारो काढल्या आहेत. त्यांस शास्त्री म्हणतील कीं, या बहुत दिवसांच्या आहेत. तेव्हां मला इतकेंच पुसावयाचें कीं, बहुत दिवस गेले म्हणजे बहुत दिवसांच्या होतात. परंतु या माणसांनीं केल्या किंवा ईश्वरानें केल्या हें पाहा. तसेंच एकदा संमत देऊन पुनर्विवाहाची चाल घातली म्हणजे या लोकांचा स्त्रियांवर हा जुल्म नसावा. जें सरकार लोकांवर जुलूम करतें त्यांजवर लोक बंड करितात, जें शास्त्र लोकसुखास विरुध्ध आहे त्यास लोक सोडतात हा निश्चय. याजकरितां जें सुखास आडवें येईल तें दूर करावें. लग्नाचा नियम हा धर्म नव्हे. ही रीत आहे. लोकांमध्यें व्यवस्था होण्याकरितां केली. ती जर वाईट असें स्पष्ट दिसेल तर दुसरे नियम करण्यास चिंता नाहीं. तुम्ही म्हणाल की, लोकांस व्यभिचार करण्यास सांगावें म्हणजे सुख आहे. परंतु येथें तुम्ही चूक करितां. व्यभिचारानें लोकांत व्यवस्था राहाणार नाहीं. जरी एकास सुख झालें तरी दुसऱ्यास तें दुःख आहे. याजकरितां परस्परांनीं आपले सुखरक्षणाकरितां व्यभिचार सोडावा. साधारण नियम असा आहे कीं, एकाचें सुख दुसऱ्यानें हरण करूं नये. सर्वांनीं व्यभिचार केला असतां लोकांची दुर्दशा होईल. म्हणून तो अधर्म व नीतीचे विरुध्ध. व त्याचेंच नांव पाप. ज्याचे साधारण परिणाम चांगले व जें सर्व मुलखांत चालू झाल्यानें लोकांचें कांहीं वाईट होत नाहीं, आणि चांगलें होतें तेंच पुण्य. व तोच धर्म असें माझें मत आहे. ज्या काळीं ऋषींनीं शास्त्र लिहिलें, त्या काळीं त्यांचे सर्व नियम लोकांचे सुखवृद्धीकरितां व व्यवस्थेकरितां लिहिले. त्यांणीं लोकांचे घात व्हावे, असें जाणून लिहिलें नाहीं. बरें त्यास लोक बहुत काळपर्यंत मानीत आले ते फिरविण्यास आपण चांगला विचार करावा. उगेच दांडगाईनें मोडूं नये

खरे; परंतु पुनर्विवाहाच्या निषेधीं दुष्ट परिणाम सर्वांस समजला आहे. परंतु अंध-परंपरेस भितात इतकेंच; यास्तव जितकी त्वरा होईल, तितकी अशा समईं करावी. कारण कीं, एक घटका उशीर झाला तर हजार स्त्रियांस समुद्रांत लोटून दिल्याचें पातक डोकीवर बसतें. यास्तव लोकांस मी उपदेश करितों कीं, अगदीं भिऊं नका. रस्ता सुखाचा व सोईचा आहे. तुमची सुधारणा करावी, हें पंडितांचे उपजीविकेस विरुद्ध आहे. तुम्हांस शाहाणे करण्यास विद्या पाहिजे. नवीन ग्रंथ हजारो पाहिजेत. शाळा पाहिचेत. हें खरें आहे. आतां एके गृहस्थाजवळ लाख रुपये आहेत असें म्हणा, आणि तो धर्म करावयास इच्छितो. आणि त्याणें जर शाळा व ग्रंथकर्ते व पुस्तकगृहें इत्यादि-कांस धर्म केला तर पंडितांचे व भटांचे हातीं एक पैसा तरी जाईल? तेव्हां या धर्मास ते अनुकूल होऊन आपला रोजगार कसा बुडवितील? यास्तव ते असें सांगतात कीं, भटभिक्षुकांस बोलाव, आणि दोन रुपये दरएकास दे. आणि शंभर गोप्रदानें कर; शंभर प्रायश्चित्तें कर, आणि दाहा दाहा रुपयांचा विषय एका एका ब्राह्मणास पोंचीव, आणि एक सहस्रभोजन घाल, एक इच्छाभोजन घाल, एक कोट तुळशी घाल, ब्राम्हणद्वारा महारुद्र कर, पांच शालजोड्या विद्वान भटास दे, मोठाले पंडित गांवांत आहेत, त्यांची संभावना कर, दरएक स्त्रीस नथ दे, भटास धोतरजोडा दे, म्हणजे महान धर्म होऊन मोक्षास जाशील. या गोष्टीचे उलटें ते कधींतरी सांगतील? तस्मात् या सुधारणेस ते सर्वथैव विरुद्ध आहेत. म्हणून त्यांची आशा धरतील ते मूर्ख आहेत.

लो० हि०

पत्र नंबर १०७

खरा धर्म करण्याची आवश्यकता

विनंती विशेष. कल्याणोन्नायक मंडळीनें आपलें शहाणपण दाखविण्याकरतां दोन विषय पुढें काढले. एक संस्कृत भाषेंतील ग्रंथ सर्वोत्तम व त्यांत सर्व उपयोगी ज्ञान आहे, दुसरा, पुनर्विवाह करूं नये. व विधवा बायकांनीं मीठ सोडून वगैरे जेवीत जावें. व उपासतापास करून राहावें. पुनर्विवाहापासून उपयोग नाहीं. दोन विषयांचीं उत्तरें समर्पक झालीं असतां त्यांजकडून कांहीं उत्तर आलें नाहीं. तेव्हां मी या पंडितांची प्रार्थना करून त्यांस सांगतों कीं, लोकांचें हित तुमच्यानें होणार नाहीं. व तुम्हांकडून सुधारणा करविण्यास जे झटतात, ते भ्रांतींत आहेत. कारण लोकांचें हित इच्छिणें हें तुमचें वतनवृत्तीस विरुद्ध आहे. लोक जितके मूर्खपणांत असतील व बायका जितक्या वेड्या असतील तितकें तुमचें पीक अधीक असें असतां तुम्हांकडून हित होईल कसें?

अग्नी घर विझवावयास जाईल काय व मांजर उंदिरास सोडून देईल काय? या गोष्टी घडणार नाहींत. तुम्ही पुराणीक, भट व पंडित या सर्वांचें हित लोकांचे मूर्खपणांत आहे. लोक खरा धर्म करूं लागले तर तुमची उपजीविका कशी चालेल? बायकांचीं व्रतें, सहस्र-भोजनें, दंपत्यपूजनें, चतुर्मासाचे नेम, दक्षणा, शांति, भूयसी संपूर्णें हीं जाहालीं तर तर तुमचें पोट भरणार. शाळांत, पुस्तकांत यांत तुम्हांस काय भाग आहे बरें? लोक शहाणे झाल्याअंतीं असें होईल कीं, शाळा ग्रंथ व विद्या वाढतील. गरीब, अंधळे, लंगडे यांस खावयाची सोय होईल. व रोगी यांस औषध देण्याची सोय होईल. असें करण्यास तुम्ही धर्म म्हणाल काय? चांगल्या रीतीनें कोणी धर्म करावयास इच्छील तर (आम्ही त्यांस सांगाल कीं,) "अरे बाबा, हा धर्म नव्हे–जेणेंकरून गरीब, अंधळे, पांगळे अन्नास मिळतील व धष्टपुष्ट आहेत ते उद्योगास लागतील, आणि लोक विद्वान होतील, असा धर्म करा," असें तुमच्यानें लोकांस सांगवेल काय? ही गोष्ट कदापि घडणार नाही. तुम्ही असेंच सांगाल कीं, "अरे शाळा कशास? यांस पैसा देऊं नये. देऊन काय पुण्य आहे? ब्राम्हणाचे मुखीं घातलें तरच पुण्य आहे. पुस्तकें कशास, यांतील ज्ञान काय उपयोगी आहे. ब्राह्मण बोलावून त्यांस दानें करावीं. गुप्तदान केलें म्हणजे पुढले जन्मीं मिळतें. केळीचें दान सुवर्णसहित केलें म्हणजे पुत्र होतो. एक गोप्रदान केलें तर अनंत कोटी पापें जातात. देवास अलंकार करून द्यावे. ब्राम्ह-णास सुवर्णाचे दागिने करून वांटावे यांत पुण्य आहे. ब्राम्हणांस भोजन दिलें म्हणजे राज्य चिरकाल चालतें. जरीमरी उठत नाहीं. शत्रूंचा नाश होतो. रोगपरिहार होतात." असें तुम्ही सांगाल तर तुमचें पोट भरेल. तुम्हांस एखाद्या वेड्या बाईनें पुसलें कीं, "मी जेवतांना बोलत नवतें हा माझा नेम होता. त्याचें संपूर्ण काय करावें," तर तुम्ही काय सांगाल? "अगे बाई, वामनव्रत काय उपयोगी आहे? त्या काळीं ही युक्ति कांहींतरी ब्राम्हणांस धर्म व्हावा म्हणून सांगितली. परंतु आतां इतकीच कीं, चार मुलांस २५ रुपयांचे ग्रंथ घेऊन वाचावयास द्या म्हणजे त्यांत मोठा धर्म झाला," असें तुमच्या तोंडानें कधींतरी येईल? दगडास घाम येईल, सूर्य पश्चमेस उगवेल, परंतु तुम्ही हें कधीं सांगणार नाहीं. तुमच्यादेखत एखादा लबाड उठून "मी सांबबाबा," म्हणून साधूचा वेष धरून मुंबई, बडोदें, असे ठिकाणीं लोकांस फसवून पैसा आणतो आणि तुमचे देखत रांडा बाळगून असतो, त्याचे हजारो लोक पायां पडतात आणि धर्म करितात. व अशा लबाडास पोशितात. परंतु "यास कशास पैसा देतां. हा लबाड धर्मास योग्य नाहीं." असें तुमच्यानें म्हणवेल? कदापि म्हणवत नाहीं. तुम्ही असें म्हणाल कीं, ब्राम्हणजातीचा आहे. तस्मात् त्यास धर्म सर्वांनीं करावा. पुण्यच लागेल-व तो देवाचें नांव घेतो याजमुळें त्याचीं सर्व पापें जळून गेलीं. त्याचे पायांवर डोकी ठेवा. वयास चिंता नाहीं. असें सर्व तुम्ही म्हणाल. तुम्हांस ठाऊक आहे कीं, जर यास असें नांव ठेवावें आणि लोकांस जागृत करावें तर आम्ही या सांभबुवाहून अधीक चांगले

नाहीं. जे त्याचे गुण तेच आमचे. असा तुमचा कट आहे. याजवर कोण हल्ला करील तो करो. अज्ञानबुध्धीस आपले हिताकरितां झटतां आणि जितकें जितकें ज्ञान वाढेल त्यास नास्तीकपणा असें नांव देतां. मूर्खास आस्तिक, भाविक, धर्मिष्ट असें म्हणणें तुम्हांस जरूर आहे. जर तुम्ही कल्याणोन्नायक असाल तर खरा धर्म कोणता तो आपलें स्वहित सोडून सांगावा. पुराणिकानें पुराण कसें सांगावें, हरदासानें कथा कशी करावी, ती त्यास सांगा. एक म्हणतो, विष्णूस तुळशी वाहिल्या म्हणजे हजार जन्माचें पाप जातें. त्याजमुळें जो लबाड श्रोता आहे तो म्हणतो कीं, पुराणीकबावांनीं हें चांगलें सांगितलें. मी पाप करीत जाईन आणखी तुळशी वाहात जाईन. त्यास वास्तविक नीती आणि धर्म सांगून ही रिकामी खटपट त्याजकडून टाकवा, परंतु हें तुमचें काम नव्हे, असें आम्हांस वाटतें.

लो० हि०

पत्र नंबर १०८

पुनर्विवाहवगैरे सुधारणा

वि० वि० कल्याणोन्नायक मंडळीनें आपली विद्वत्ता बाहेर दाखविण्याकरितां दोन प्रश्न प्रथम काढिले. एक संस्कृत विद्या सर्वांहून वरिष्ठ व दुसरा पुनर्विवाह करूं नये. या दोहोंचीं समर्पक उत्तरें झालीं. आणखी माझें त्यांस उत्तर आहे कीं, तुम्ही असें मनांत आणा. मी जर एक कायदा केला कीं, पुरुषाची स्त्री मेली तर त्यास श्मश्रु करून लागलाच संन्यास द्यावा; व घराबाहेर काढून द्यावा. व त्या दिवसापासून त्याचा रोजगार व्यापार सर्व बंद. त्याणें गंधदेखील लाऊं नये आणि हा कायदा चालू करण्याचें मला सामर्थ्य असतें तर पुरुषांनीं काय म्हटलें असतें? आतां पंडित म्हणतात कीं, बायकांस परवानगी दिली तर त्या नवरे मारतील; परंतु माझें उत्तर हें आहे कीं, इतर देशांत व जातींत परवानगी आहे म्हणून पुरुषांनीं आपल्या बायका मारून दुसऱ्या केल्या आहेत कीं काय! पुरुषांस परवानगी असावी, आणि बायकांस नसावी काय? जीं कारणें तुम्ही दाखवितां तीं पुरुषांसही लागू आहेत. मग आम्ही असें म्हणूं कीं, पुरुषाची बायको मेली म्हणजे त्याचें सौभाग्य गेलें. मग त्याणें मीठ खाऊं नये; तीर्थयात्रा कराव्या. विधवेसारखें होऊन असावें. तर मग पंडितांस केवढा चमत्कार वाटेल बरें! अहो, हा प्रत्यक्ष अनर्थ. यास विचार कशास पाहिजे! अनेक गोष्टींची सुधारणा आमचे लोकांत केली पाहिजे. विद्वान कोणास म्हणावें हें समजलें पाहिजे. विद्या म्हणजे काय? हें समजलें पाहिजे. कर्ममार्ग वृथा आहे. नीती हाच मार्ग खरा; हजार तुळशी वाहिल्यांत कांहीं नाहीं. मन शुध्ध पाहिजे; चांगले ग्रंथ नवीन तयार होऊन ते प्रसिध्ध व्हावे असें केलें पाहिजे; पुनर्विवाहादिक

चाली घातल्या पाहिजेत. लोक विचार करूं लागतील, अशी युक्ती पाहिजे. लोक विद्वान होतील अशी युक्ती पाहिजे. अधिकारावर असल्यास कोणते प्रकारची वर्तणूक असावी, खरेपणा इत्यादि सद्गुण असावे. या सर्व सुधारणुकेच्या गोष्टी लोकांस कळाव्या म्हणून कल्याणोन्नायक मंडळीनें मेहेनत करावी व सांप्रतचा मूर्खपणा सोडून द्यावा. तुम्ही म्हणाल कीं, विधवेचें लग्न करावें असें अनुमत दिल्यास आम्हांस सर्व जन हसतील. तर बाबांनो हें, खरें आहे ! लोक हसतील खरें, परंतु पांचचार वर्षांनीं चांगले म्हणतील. तुम्हांस योग्य वाटेल तसें करा. लोकांस भिऊं नका. तुम्हांस लोकांचें कल्याण कर्तव्य असेल तर चांगला मार्ग दाखवा. लोक मूर्ख होऊन राहिले आहेत. म्हणून त्या मूर्खपणास तुम्ही सहाय होऊन वाढवूं नका. तुम्ही शाहणे अहां हें दाखवा. जर तुम्ही लोकांसारखे मूर्ख आहों असें दाखवाल व लोकांस प्रिय तें बोलाल तर तुमचे नांवास बट्टा आहे. याजकरितां तुम्ही मोठाले मान्य पंडीत आहां. तेव्हां हा प्रसंग फुकट घालऊं नका. त्याचे सुधारणेस तुम्ही लागा. सरकार जबरीनें किंवा ईश्वरसत्तेनें किंवा आम्हांसारखे जे पुढें होतील ते आपलीं मतें चालू करतील. परंतु तुम्ही आपली विटंबना होऊं देऊं नका. हें झाल्याखेरीज राहाणार नाहीं. तुम्हांस कळत नाहीं म्हणून तुम्ही संशयांत आहां. तु ही जरी ५० हजार ग्रंथ पाठ केले असले तरी तुम्ही घोकें आहां. तुमचें ज्ञान निरुपयोगी जाणून तुम्ही लौकर शुध्धीवर या हें माझें मागणें तुम्हांजवळ आहे. तुम्ही मंडळी स्थापन केली याचा मला संतोष आहे. हें करणें तुमचें चांगलें आहे. परंतु भलतेंच बोलतां म्हणून वारंवार तुम्हास सुचवितों. तुम्ही चांगले रीतीनें विचार करावा व पहिला वेडेपणा सर्व सोडून द्या. विचारानें चाला म्हणजे सर्व आहे. तुम्ही लोकांचें कल्याण करा, ही माझी तुम्हांस शेवटची विनंती आहे.

लो० हि०

बडोदा ... ग्रंथालय
क्रमांक ४४०६२ ... निबंध
दिनांक ... १५२८ ... १३।२७।६७

भाग दुसरा

[नंबर १०९]

शिंदे-सरकारचा वंश

इसवी सन १७०० च्या आरंभीं महाराष्ट्र देशांत मोठी गडबड चालली होती. अवरंगजेब बादशाह याची स्वारी मोठी फौज बरोबर घेऊन दक्षिणेंत फिरत होती. मराठे लोक मोठा शूरपणा दाखवून आपलें स्वतंत्र राज्य उभारण्याच्या वेतांत गुंतले होते अशा समयीं शिपाई लोकांची फार गरज. याकरितां गांवोगांवचे हुशार मराठे व पाटील यांतून प्रत्येक आपल्याजवळ दोन-चार हत्यारें व घोडीं बाळगून होता. जेव्हां जेव्हां प्रसंग येई, तेव्हां तेव्हां ते शिपायाच्या नात्यानें आपल्या अधिकाऱ्याच्या बरोबर जाऊन चाकरी करीत. आणि काम संपलें म्हणजे आपले गांवीं परत येऊन राहत. या समई अर्धे शिपाई व अर्धे शेतकरी असे दोन भाग होऊन शिपायास शिलेदार असें म्हणत.

साताऱ्यापासून पूर्वेस ६ कोसांवर कोरेगांव तालुक्यांत कण्हेरखेड म्हणून एक गांव आहे. त्या गांवचे पाटील राणूजी शिंदे हे शिलेदाराच्या बाण्यानें राहत होते. ते शाहू महाराज यांचे कारकिर्दीत थोरले बाजीराव पेशवे यांचेबरोबर उत्तर हिंदुस्थान व माळवा यांत स्वाऱ्या करण्यास जात असत. कोणी म्हणतात कीं, हे त्यांचेबरोबर कांहीं दिवस खिसमतगारीचे कामावर होते. पुढें सन १७३० चे सुमारास राणोजी शिंदे हे मोठे फौजबंद सरदार झाले. आणि बाजीरावसाहेब यांचे फौजेंत मल्हारराव होळकर, पिलाजी जाधव वगैरे जे नामांकित सरदार होते, त्यांमध्यें यांची गणना झाली. तेव्हां निजाम उल्मुल्ख हा दिल्लीच्या बादशाहाच्या पक्षानें मोठ्या फौजेनिशीं बाजीरावसाहेबाशीं भांडत असे, त्याचा पराभव करून मराठे सरदारांनीं माळवा प्रांत आपले हस्तगत करून घेतला, त्या मसलतींत हे शिंदे मुख्य होते. यानंतर सन १७४३ सालीं निजामुल्मुल्ख आणि बाजीराव पेशवे यांचा तह झाला. त्यांत कराबद्दल पेशवे याजकडून तीन जामीन घेतले. त्यांतील शिंदे हे एक होते. या गोष्टीवरून यांचा प्रामाणिकपणा व वजन चांगलें होतें, असें दिसतें. हे सन १७५० सालीं मरण पावले.

या सरदारास जयाजी, जनकोजी आणि दशाजी असे तीन औरस पुत्र व महादजी आणि तुकोजी असे दोन दासीपुत्र होते. यांपैकीं तुकोजी हे अपघातानें मरण पावले.

जयाजी हे वडील पुत्र, सबब त्यांजकडे हिंदुस्थानांतील सरंजाम व कारभार चालावा, असें पेशव्यांनीं ठरविलें. सन १७५५ सालीं राघोबादादा पेशवे यांनीं मुसलमानांपासून

अमदाबाद घेतली. या प्रसंगीं जयाजी हे आपले फौजेसुद्धां त्यांबराबर होते. पुढें जोतपूरचा राणा विजीशिंग याजबराबर लढाई चालली असतां त्यानें आपले डेऱ्यांत जयाजी असतां मारेकऱ्यांकडून त्यास ठार मारविलें. ह्याचा सूड उगविण्याकरितां महादजी शिंदे यांनीं त्याचें पारिपत्य करून त्याचा अजमीर वगैरे मुलूख घेतला.

जयाजीचा मुलगा जनकोजी व त्याचे चुलते जनकोजी व दशाजी व महादजी हे सर्व पानपतचे स्वारींत होते. पैकीं दोघे चुलते ठार झाले व जनकोजी हा अबदुल्लीचे हातीं सांपडल्यावरून तोही प्राणास मुकला. महादजी यांचा तोफेच्या गोळ्यानें पाय उडाला; आणि लंगडे होऊन ते मात्र दक्षिणेंत परत आले.

जे तिघे कैलासवासी झाले त्यांच्या वायकांकडे चोळीलुगड्याबद्दल पेशव्यांनीं चौदा लक्षांचा मुलूख चालविला. याशिवाय पन्नास लक्षांचा सरंजामही त्यांकडे ठेविला. परंतु गादी चालविण्यास कोणी पाहिजे याकरितां औरस वंशापैकीं मानाजी फाकडे यांस बाईस दत्तक देऊन त्याचे नांवानें दौलत चालावी असा वेत चालला होता. इतक्यांत पुण्यास नारायणराव पेशवे मारले गेले. त्याप्रसंगीं नाना फडणवीस यांचे मसलतीस महादजी शिंदे अनुकूल झाले. सबब मागील सर्व वेत राहून त्यांसच गादीचे मालक केलें.

हा पुरुष मोठा शहाणा, मसलती व बुद्धिमान होता. पुढें इंग्रजांशीं व याच्याशीं वैर पडून वडगांवावर लढाई झाली तींत कवायती शिकिवलेल्या पलटणीचे मोठें शौर्य दिसून आलें, त्यावरून त्यांनीं फ्रेंच लोकांस चाकरीस ठेऊन त्यांजकडून कवायती पलटणें व तोफखाना तयार करविला आणि इंग्लिशांचा मोड करून, त्यांनीं भडोच, अंतर्वेद वगैरे मुलूख घेतला होता, तो त्यांपासून परत घेतला. त्या कवायती फौजेच्या योगानें महादजी शिंदे यांचा चोहीकडे डंका गाजून ते अजिंक्य होऊन गेले. त्यांनीं दिल्ली, आग्रा व रजपूत येथील राज्यें काबीज केलीं व बादशहाकडून दिवाणगिरी घेतली. पुण्याचे कारभारात हे मुख्य झाले व हैदरअल्ली देखील यास भिऊं लागला. सन १७८१ या सालीं सालप्याचा तहनामा झाला. त्यांत महादजी शिंदे, इंग्रज व पेशवे या उभयतांकडून तहाप्रमाणें वर्तणूक होण्याविषयीं जामीन झाले म्हणून लिहिलें आहे. याजवरून यांची वजनदारी किती होती हें सर्वांचे लक्षांत येईल.

महादजी शिंदे यांनीं पूर्वीपेक्षां हिंदुस्थानांत चांगला अंमल बसविला. आणि जेव्हां हे सन १७९४ या सालीं पुण्यास आले, तेव्हां यांचे बरोबर ५०० तोफा, कवायत शिकलेलीं ७५ पलटणें, व ५०००० हजार स्वार एवढी फौज होती. तेच वेळीं हे वानवडी येथें मरण पावले. या प्रसिद्ध पुरुषाचें सर्व आयुष्य लढाईंत व फौज तयार करण्याचे कामांत गेलें. याची मसलत मोठी खोल असे.

याचे मरणानंतर याचे पुतणे दौलतराव हे बारा वर्षांचे असतां, यांस दत्तक देऊन गादीवर बसविलें. आणि सखाराम घाडगे सर्जेराव यांची मुलगी बायजाबाई ही फार लावण्य[वती] म्हणून दौलतराव यांस दिली. त्या योगानें जांवई लहान म्हणून हे शिंद्याचे

दिवाण झाले. यांचा स्वभाव फार क्रूर व निर्दय असे. यामुळें अर्थातच यांच्या कारकिर्दीत जे अन्याय व क्रूर कर्में घडून आलीं तीं उघडकीस आणणें यापेक्षां विसरून जावें हें फार बरें. पुढें शिंदे व होळकर यांच्याशीं आपसांत कलह लागून पुण्यावर मोठी लढाई झाली. तींत शिंदे यांचा पराभव होऊन पुणें होळकरांनीं घेतलें. तेव्हां बाजीरावसाहेब पळून गेले. मग सन १८०३ या सालीं इंग्रजांनीं त्यांस फौज देऊन पुण्यास परत आणिलें. अशा प्रसंगीं शिंदे यांस दक्षिणेंतून काढून देणें जरूर पडलें. सबब वस्लीसाहेब यांनीं त्यांचीं नगर वगैरे ठाणीं घेत घेत त्यांस अजंटा घाटांत गांठिलें. तेव्हां दौलतराव यांजबरोबर कवाईत शिकलेलीं ५० पलटणें, ५०००० (हजार) स्वार व ५०० तोफाशिवाय भोसले यांची फौज एवढा सरमजाम होता. वस्लीसाहेब यांची १०००० (हजार) फौज, बापु गोखले यांजबरोबर पेशवे यांची फौज, आणि निजामसरकारची फौज, इतक्यानिशीं वस्लीसाहेब यांणीं शिंदे यांचा मोड केला. याच वेळीं इंग्लिशांची व शिंद्यांची हिंदुस्थानांत लढाई चाललीच होती.

पुढें अंजनगांवीं जो तह झाला त्यांत इंग्रजांनीं निंमे मुलूख घेतला. त्यांत रजपूत येथील राजांच्या खंडण्या, भडोच व यमुना आणि गंगा या नद्यांमधील काश्मीरपर्यंत मुलूख, खानदेश व दक्षिणेंतील गांवें हें सर्व शिंद्यांकडून गेलें. त्यांपैकीं कांहीं पेशव्यांस व कांहीं निजामास देऊन बाकी सर्व इंग्रजांनीं घेतलें. तहांत असें ठरलें होतें कीं, कारण पडेल तेव्हां शिंद्यांनीं १०००० फौज इंग्रजांस द्यावी व इंग्रजांनीं ६ पलटणें द्यावीं. परंतु सर्जेराव यांनीं त्याप्रमाणें वर्तणूक न करिता रसिडंटसाहेबांच्या बंगल्यावर हल्ला केला. यास्तव सन १८०५ त अंजनगांवचे तहनाम्याचे पुरवणींत ठरल्याप्रमाणें जोतपूर व अंतरबंद वगैरे पूर्वी घेतलेला मुलूख कायम करून चमेल नदीची हद्द ठरविली. तिजपलीकडे इंग्रजांचा अंमल, त्यांत शिंदे-सरकारास जाण्याचें कारण नाहीं. फक्त महादजी यांची कन्या बाळाबाई व बायजाबाई यांची मुलगी चिमाबाई यांजकडे मिळून तीन लाखांचा मुलूख ठेविला. याप्रमाणें बंदोबस्त झाला, तेव्हां वसूल कमी होऊन एक कोट चाळीस लक्षांचा मुलूख राहिला. परंतु दोन कोट रुपयांचा खर्च होता. तो कमी केला नाहीं. फौजेस महाल तोडून दिले आणि मक्त्यानें मामलती देत गेल्यामुळें मुलखांत जुलूम होऊन रयत लुटली गेली; व कित्येक गांव ओसाड पडले; दौलतीस कर्ज झालें. याप्रमाणें दौलतरावांच्या कारकिर्दीत अवस्था झाली. हें सन १८२७ तारीख २१ मार्च रोजीं मरण पावले. तेव्हां दत्तक घेण्याकरितां पांच मुलगे आणिले होते. त्यांपैकीं बायजाबाईनीं मुकुटराय म्हणून एक १२ वर्षांचा मुलगा होता, त्यास जनकोजी या नांवानें दत्तक घेतलें. त्याचे दाभाड्यांचे मुलीबरोबर लग्न झालें.

मुलगा लहान होता तोंपर्यंत बाईकडेसच कारभार होता. पुढें तो मोठा झाल्यावर बाईचें व त्याचें वैमनस्य पडून इंग्रज सरकारांत फिर्याद गेली. तेव्हां बाईस ६ लक्षांची नेमणूक होऊन ती स्वतंत्र वागूं लागली. नंतर जनकोजी कारभार पाहूं लागले. यावेळीं

शिंद्यांची फौजस्वार १००००, पायदळ १५०००, तोफा २५० इतकी होती. जनकोजी हे सन १८४२ चे सालीं वारले. नतर त्यांचे स्त्रीनें हाल्लींचे जयाजीराव यांस दत्तक घेतलें. सन १८४३ सालीं लार्ड अलीम्बरो ग्वाल्हेरीस येत असतां त्यांचे लष्करावर बिघडलेले फौजेनें हल्ला केला तेव्हां महाराजपूर येथें लढाई होऊन नवा तहनामा झाला. त्याजवरून जिनसी कारखाना व फरासिसांची कवायती फौज दूर केली आणि इंग्रज सरकारची ६ पलटणें कायम केलीं. शिवाय मानकरी मिळून १०००० फौज राखिली. कांहीं मुलूख इंग्रज सरकारास दिला.

पुढें सन १८५७ सालीं इंग्रजी फौजेंत दंगा झाला. त्याप्रसंगीं ग्वाल्हेर गेली होती; पण सर ह्यू रोज यांनीं जयाजीराव यांची पुनः गादीवर स्थापना केली, वगैरे मजकूर प्रसिद्धच आहे. औरस पुत्र नसला तरी दत्तक देऊन राज्य निरंतर चालावें असा ठराव लार्ड क्यानिंग यांनीं केला. याजकरिता राज्यांत सुधारणा होऊन रयतेचें कल्याण व्हावें असें हल्लींचे अधिकारी करतील असें आम्ही इच्छितों. सर्व देशाची पैमाषी करून धारे ठरवावे, वारंवार कमजास्त वसूल घेण्याचा अक्त्यार मामलेदारांस देऊं नये, इन्साफाचा बंदोबस्त चांगला ठेवावा; राज्यांत अधिकाराची व्यवस्था चांगली करावी, विद्या वाढविण्याकरितां गांवोंगांवीं मोठमोठ्या शाळा घालाव्या; राज्यकारभार बरोबर चालवण्याकरितां कौंसल नेमून कायदे ठरवावे, चांगल्या विद्वान व हुषार मनुष्यांचा संग्रह करावा म्हणजे वर सांगितलेले सर्व प्रकार साहजिक घडून येतील. आपले राज्यांत हजारों मनुष्यें आहेत, त्यांत त्यांचे कल्याणाकडे दृष्टी असावी. हा राजाचा मुख्य धर्म होय; आम्ही लिहिलेल्या गोष्टीकडे आमचे राजेलोक व जाहगिरदार लक्ष देतील, असें आम्ही इच्छितों.

ता० १ सप्तेंबर १८६१

[नंबर ११०]

होळकर यांचे वंशाविषईं

पुणेंप्रांतांत निरानदीचे कांठीं मौजे होळ म्हणून गांव आहे. त्या गांवचा धनगर मल्हारराव म्हणून होता. त्याच गांवाकरून हल्लींचे होळकर यांचें होळकर असें नांव पडलें आहे. मल्हारराव यांचा बाप मेंढ्या राखून घोंगड्या विणीत असे. हें काम यास न आवडून ते खानदेशांत कंठाजी कदम बांडे म्हणून नंदुरबारास एक सरदार होते, त्यांपाशीं शिपाईगिरीचें कामावर राहिले. पुढें सेनापती दाभाडे व कदम हे सैन्यानिशीं गुजराथेंत शिरले, तेव्हां मल्हारराव त्याबराबर पंचवीस घोड्यांचें पद[थ ?]क घेऊन होता. एके वेळीं हे तापी नदीचे तिरीं असतां, थोरले बाजीराव यांची फौज माळव्यांत जात

होती. त्या फौजेचा कंठाजी कदम यांचे लोकांशीं कज्जा लागला. त्या समईं मल्हारराव शूर व शाहाणे असें बाजीराव यांचे लक्षांत आल्यावरून त्यांनीं त्यास आपलेजवळ ठेऊन घेतलें. परंतु आपले धन्याची बांडें म्हणजे काळे व पांढरे पट्ट्याचें निशाण व आबदागीर ही मूळची खूण म्हणून ते ती तशीच आपले बराबर बाळगीत असत, ती अद्याप तशीच चालत आहे.

याप्रमाणें सन १७२४ इसवी सालीं शंभर स्वारांचे पताकासुद्धां मल्हारराव हे पेशवे, यांजपासीं राहिले. पुढें बरेच वाढत वाढत ते मोठे सरदार झाले. नंतर बाजीराव यांनीं मोंगलाशीं लढाई करून सन १८३२त माळवा प्रांत आपले हस्तगत करून घेतला. त्या लढाईंत मल्हारराव फार उपयोगीं पडले. सबब त्यांस इंदुर वगैरे माळव्यापैकीं बराच भाग सरंजामाकरितां म्हणून दिल्हा व नर्मदेच्या पलीकडे पेशव्यांच्या मुलखाचा कारभार त्यांजकडे देऊन पेशवे दक्षिणेंत परत आले. पुढें स० १७३८ सालीं निजाम उलमुल्कख याजबराबर लढाई झाली तींत मल्हारराव विजयी होऊन चमेलपर्यंत मोंगलांचा अंमल दूर झाला. पुढें १७३९ सालीं चिमाजी बल्लाळ पेशवे, बाजीराव यांचे धाकटे बंधु, यांणीं पोर्तुगाल लोकांकडून वसईचा किल्ला घेतला. तेथें मल्हारराव होळकर त्या हल्ल्यात होते. पुढें नादरशाहा दिल्लीवर आला तेव्हां ते परत हिंदुस्थानांत गेले व तो मराठ्यांशीं तंटा न करितां परत गेला. नंतर १७५१ सालीं रोहिले व बादशाहाचे वजीर यांचा कलह लागला. त्यांत वजिराचे तर्फेस मल्हारराव होते. पुढें ते चाळीस हजार फौजेनिशीं दादासाहेब यांजबरोबर दिल्लीस गेले. नंतर सन १७६१ सालीं सदाशीव चिमणाजी, बाजीराव साहेबांचे पुतण्ये, यांणीं अहमदशाहा अबदल्ली काबूलचा राजा हा दिल्लीवर आला, तेव्हां त्याजबरोबर पानपतीची लढाई केली. तींत मल्हारराव होळकर होते. परंतु त्यांची मसलत सदाशीवभाऊंनीं ऐकली नाहीं. याजमुळें तेथें मराठ्यांचा मोठाच नाश झाला. कांहीं सरदार बचावून परत आले त्यांत विंचुरकर, राजेबाहादर, व होळकर हे होते. पुढें सन १७६५ सालीं मल्हारराव वारले. त्यापूर्वी त्यांणीं लष्करचें काम सतत चाळीस वर्षें केलें. त्याकाळीं ज्या लढाया झाल्या त्यांत हे हजीर होते. व त्यावेळेस कोट रुपयांचा मुलूख त्यांचे ताब्यांत होता. खेरीज त्यांपाशीं कोट रुपये शिल्लक होती. त्यांचे चिरंजीव खंडेराव हे अगोदरच वारले होते. त्यांची स्त्री अहिल्याबाई व मुलगा माळराव होता. माळरावाचे नांवानें पेशव्यांनीं वस्त्रें दिलीं. परंतु तो लवकरच मेला. तेव्हां त्याची आई अहिल्याबाई इजकडेच राज्य-कारभार आला. या बाईस एक मुलगी होती ती जुन्नरकर रेवजी बापू पाडसे गांवढे धनगर, यांस दिली होती. तिचा नवरा मेल्यामुळें ती सती गेली.

अहिल्याबाई ही केवळ न्याय आणि करुणा यांची प्रत्यक्ष मूर्तीच होती. ही बाई चाळीस वर्षें कारभार करून सन १७८५ सालीं मरण पावली. तिचे सद्गुणांचें स्मरण, जोंपर्यंत सद्गुणांचा स्तव लोकांमध्यें आहे तोंपर्यन्त जाणार नाहीं. सर्व लोकांचा

प्रतिपाळ तिणें आईप्रमाणें केला. व धर्मखात्याकडे बहुत पैसा खर्च केला. त्याची कीर्ति वर्णन करावयास नको. सर्व आबालवृद्धांत प्रसिद्ध आहे.

दौलतीचें काम बाई स्वतां दरबारांत बसून नियमानें करीत असे. व लष्करचें काम तिचा सरदार तुकोजी म्हणून होता, त्याजकडे दिलें होतें. तो तिचा पुत्र असें लोक समजत व तिच्या आणि त्याच्यामध्यें तसाच सुहृद्भाव होता. हाही मोठा पराक्रमी पुरुष होता. सन १७८० सालीं इंग्रजांशीं व मराठ्यांशीं युद्ध चाललें होतें तेव्हां गुजराथेंत व टिपूबरोबर सन १७८६ त तुकोजी होळकर लढत होते. यांनीं फराशिसांची कवाईत शिकवून कांहीं कवायती फौज तयार केली. परंतु ही कवाइती फौज मराठ्यांनीं उभी केल्यापासून त्यांचा पूर्वीचा सांप्रदाय पळत लढण्याचा होता तो सुटून सुस्तपणा झाला. आणि यांचीं राज्यें अशक्त झालीं असेंही कोणी म्हणतात. हे तुकोजी सन १७९७ सालीं मरण पावले. तेव्हां यांचे औरस पुत्र काशीराव व मल्हारराव व दासी पुत्र यशवंतराव, मल्हारराव व विठोजीराव; पैकीं काशीराव वडील, परंतु ते वेडसर व स्वभावानें दुष्ट असे होते, तरी त्यांचा पक्ष दौलतराव शिंदे यांनीं पुणें मुक्कामीं धरला आणि दंगा करून रात्रीं मल्हारराव यांजवर हल्ला केला. त्यांत ते मरण पावले. त्यांचा लहान मुलगा खंडेराव म्हणून होता; त्यास शिंद्यांनीं धरून कैदेंत ठेविलें. विठोजी व यशवंतराव पळून गेले होते, पैकीं विठोजी दंग्यांत सामील होता असा त्याजवर आरोप येऊन शिंदे व बाळोजी कुंजर व सर्जेराव घाटगे यांनीं मिळून बाजीराव पेशवे यांचे सम्मतानें त्यास हत्तीच्या पायीं बांधून पुणें शहरांत बुधवार पेठेंत रस्त्यावर मारिलें. बाकी यशवंतराव राहिले. त्यांणीं आपलें बुडालेलें घर ऊर्जित दशेस आणावें म्हणून बहुत प्रयत्न केले. त्यामुळें सर्व जुनी फौज काशीरावास सोडून त्यास मिळाली. खंडेराव शिंद्याचे कैदेंत होते. म्हणून यशवंतराव हे मुकत्यारीनें राज्यकारभार करूं लागले. आणि त्यांणीं पुष्कळ फौज ठेऊन मुलूख लुटण्याचा सपाटा चालविला. शिंद्यांच्या मुलखांची फार खराबी झाली. म्हणून त्यांणीं होळकराशीं युद्ध करण्याकरितां मोठी फौज पाठविली. या दोघांची इंदुरानजीक मोठी लढाई झाली. त्या लढाईंत यशवंतराव याचा पराजय झाला यामुळें सर्जेराव यांणीं इंदुर लुटून तेथील पुष्कळ माणसें ठार मारिलीं. इकडे यशवंतराव हे अजमीर वगैरे प्रांत लुटून खानदेशांत उतरले, व तेथून पुण्यास आले. तेथें सन १८०२ सालीं यांची व शिंद्यांची लढाई झाली. त्या लढाईंत यशवंतराव यांनीं मोठे पराक्रमानें जय संपादन केला. या समयीं बाजीराव साहेब हे पुणें सोडून वसईस पळून गेले. होळकरांनीं विनायक अमृत यांस पेशवाईचे गादीवर बसविलें व पुढें शिंदे होळकर यांचा परस्पर तह होऊन खंडेराव यांस शिंद्यांनीं होळकरांचे हवालीं केलें. नंतर होळकर व इंग्रज या दोघांत वैरभाव उत्पन्न झाल्यामुळें कर्नल मानसन हा फौज घेऊन माळव्यांत होळकरांच्या पाठीवर गेला, परंतु तेथें त्याचा पराभव झाला. होळकर वीस हजार फौज घेऊन कंपनीसरकारचे मुलखांत शिरला. लार्ड लेक याचें सैन्य त्यांच्या

पाठीवर होतें. त्याणें त्यास पिटून सीक राज्यांत घालविलें. परंतु पुढें त्या दोघांचा रामघाटांत तह झाला. त्यांत परस्परांनीं परस्परांचे मुलूख परत देण्याचें ठरविलें; सन १८०६ त यशवंतराव यांनीं औरस पुत्र काशीराव व त्यांची गरोदर स्त्री या दोघांस मारेकरी पाठऊन ठार मारविलें व त्याप्रमाणेंच आपला पुतण्या खंडेराव हा अकरा वर्षांचा असतां त्यास वीष घालून मारविलें. नंतर यशवंतराव इंग्रजांचा मोड करण्याकरितां कवायती फौंज तयार करीत होते. परंतु कामांत मेहनतीनें त्यास वेड लागलें. त्यांचे कारभारी लोक यांनीं त्यांस कैदेंत ठेऊन त्यांची तुळसाबाई म्हणून दासी होती तिचें नांवानें ते कारभार करूं लागले. या बाईनें मल्हारराव नांवाचा एक मुलगा होता त्यास दत्तक घेतलें; परंतु सरदार आणि कारभारी यांची आपसांत फाटाफूट होऊन दंगा सुरू झाला आणि पाहिजे त्यानें पाहिजे तो मुलूख बळकाविला; पेंढारी माजले; चोहोंकडे बंडें उद्भवलीं; आणि अहिल्याबाईचे वेळचे सर्व सुखांवर पाणी पडलें. शेवटीं पठाणांनीं तुळसाबाईस क्षिप्रा नदीवर नेऊन ठार मारिलें. पुढें पेशव्यांची लढाई सुरू झाली, त्या वेळेस गणपतराव रांजेकर वगैरे होळकरांचे सरदार होते, त्यांची आणि मालकमसाहेब यांचें लष्कराची महद येथें लढाई झाली. तींत होळकरांचा अगदीं मोड झाला. तेव्हां अमीरखान व गफुरखान यांस कांहीं जाहागीर ठेऊन व पंधरावीस लक्षांचा मुलूख मल्हारराव यांजकडे ठेऊन बाकी सर्व मुलूख इंग्रजांनीं घेतला. मग तेथील सर्व लष्करी दंगा मोडून जिकडे तिकडे स्वस्थता झाली. याप्रमाणें अहिल्याबाई मेल्यापासून सन १८१८ पर्यंत एकसारखा दंगा चालला होता. पुढें मल्हारराव सन १८३० सालीं मरण पावले. तेव्हां हरजीराव यांस दत्तक दिलें आणि राज्यकारभार चालला. ते सन १८४२ सांत मेल्यावर हल्लींचे तुकोजीराव होळकर यांस दत्तक देऊन राज्यकारभारास आरंभ झाला. हे सुज्ञ व शाहाणे आहेत व यांनीं प्रवास करून अनेक देश पाहिले आहेत. त्यामुळें यांचे अंगीं विशेष हुशारी येऊन यांनीं राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालविला आहे, असें ऐकतों. याप्रमाणें या खानदानीची स्थिति आहे. आम्हीं असें इच्छितों कीं, प्रस्तुतचे तुकोजी महाराज इंग्रजांच्या राज्यरीतीकडे विशेष लक्ष देऊन त्याप्रमाणें आपल्या राज्यांत होण्यासारखे असतील असे सुधारणुकीचे उपाय योजितील, आणि आपल्या कीर्तीचा सुवास चोहोंकडे पसरेल, अशी तजवीज करितील.

ता. २१ जुलै सन १८६२

[नंबर १११]

गाइकवाडांचे वंशाविषयीं

मराठ्यांनीं चौथाईची सनद घेतल्यावर ते आपला अंमल वाढविण्याविषयीं यत्न करूं लागले. मोगलाई अंमल चोहींकडे कायम असून बडोदें, सुरत व अमदाबाद या ठिकाणीं नबाब होते. त्यांच्याजवळ मोठी फौज होती, तत्रापि मराठ्यांनीं स्वारी करण्याची उमेद धरून सेनापति खंडेराव दाभाडे हे मोठ्या फौजेनिशीं सन १७१० चे सुमारास गुजराथेंत उतरले. यांजबरोबर दमाजी गाईकवाड होते, ते पुढें १७२० या वर्षीं मरण पावले. त्यांचे पुतणे पिलाजी गाईकवाड हे कंठाजी कदम बांडे यांचे दिमतीस होते. कंठाजी कदम हे सेनापतीचे सरदार होते. त्यांनीं मराठ्यांकरितां चौथाई व सर्व गुजराथप्रांत कावीज केला. बुजायतखान व रोपनअल्ली यांजबराबर लढून खंबायत, भडोच वगैरे महाल घेतले. दाभाडे व पेशवे यांचें वांकडें पडून त्यांची उबईवर १७३१ सालीं लढाई झाली. तींत त्रिंबकराव दाभाडे मारले गेले आणि पेशव्यांचा जय झाला. पुढें त्रिंबकरावांचा पुत्र यशवंतराव व त्याची मातोश्री उमाबाई यांजकडे कांहीं मुलूख राहिला. त्याचा कारभार पिलाजी गाईकवाड व कोंडाजी यांजकडे होता. पुढें दिल्ली सरकाराकडून जोतपूरचा राजा अभीशिंग यांजकडे गुजराथचा सुभा आला. त्यानें मारेकरी घालून पिलाजीस १७३२ सालीं ठार मारलें. तेव्हां त्याचा मुलगा दामाजी गायकवाड यास सरदारी मिळाली. नंतर दाभाडे यांनीं कंठाजीस दूर केल्यामुळें गाईकवाड हे गुजराथेंत मुख्य झाले. पुढें त्यांनीं मोंगलाचे सरदार मोमिनखान व शेरखान बाबी यांपासून मोठ्या पराक्रमानें बडोदें घेतलें. आणि १७३३ त तीच राजधानी केली.

पुढें रावोबादादा व दमाजी यांनीं मिळून जयमर्दखान बाबी याजपासून मोठ्या निकराच्या लढाईनें १७५५ सालीं अमदाबाद घेतली. तेव्हांपासून गुजराथेंतील मोंगलाई अंमल अगदीं बुडाला व हे गाईकवाड पाणपतचे लढाईंत होते, तेथून मोठ्या युक्तीनें सन १७६१ सालीं परत आले.

दमाजी हे शाहूराजाचे भेटीस गेले, तेव्हां त्यांचेबराबर मोठी फौज होती. ती दूर करावी म्हणून राजानें सांगितलें, तेव्हां त्यांनीं राजाचें वचन घेऊन फौज दूर केली. नंतर राजानें त्यांस कैद करण्याविषयीं हुकूम केला. तेव्हां तो म्हणाला कीं, वचन मोडल्यामुळें ज्या हातावर वचन घेतलें त्या हातानें सलाम करणार नाहीं. तेव्हांपासून गाईकवाडाचे वंशांत डाव्या हातानें रामराम करण्याची चाल पडली.

दमाजी हे १७६८ सालीं मरण पावले. त्यांस संताजी, फत्तेसिंग व गोविंदराव

असे तीन मुलगे होते. त्यांपैकीं संताजी हे भ्रमिष्ट होते; फत्तेसिंग यांनीं इंग्रजांची मदत घेतली. व गोविंदराव हे राघोबादादाचे पक्षास मिळाले. राघोबादादाचे मदतीस सैन्य गेलें, तेव्हां भडोच व नर्मदेच्या दक्षिणेकडचा मुलूख इंग्रजांस मिळाला. परंतु सन १७८२ सालीं सालप्याचा तहनामा झाला. तेव्हां त्यांतून कांहीं परत दिला. पुढें १७६२ सालीं गोविंदराव हे गादीवर आले. ते १८०० या सालीं मरण पावले. त्यांस आनंदराव, फत्तेसिंग आणि सयाजी असे तीन पुत्र होते व कांहीं दासीपुत्रही होते. आनंदराव भ्रमिष्ट असल्यामुळें फत्तेसिंग हे मुख्य कारभारी होते. त्यांचा व दासीपुत्र कान्होजी यांचा कलह लागल्यामुळें इंग्रजांचीं तीन पलटणें चाकरीस ठेवणें भाग पडलें. खेरीज अरब लोकांचा दंगा मोडण्यास इंग्रज सरकारचें कर्ज काढावें लागलें. व सावकरांचेही कर्जास इंग्रज सरकार जामीन झालें. आणि ह्याबद्दल व पलटणीचे खर्चाबद्दल निराळे महाल तोडून घेतले. सारांश, सर्व कारभार इंग्लिशांचे वतीनें होऊं लागला. पुढें गंगाधरशास्त्री यांस बाजीराव यांनीं मारविलें. नंतर पेशवाई बुडून सुमारें दोन वर्षांनीं फत्तेसिंग व आनंदराव हे दोघेही मरण पावले. त्यांचे बंधु सयाजीराव हे सन १८१८ सालीं गादीवर आले. त्यावर १८२० त गवरनर साहेबांनीं बडोद्यास जाऊन कर्जाचा वगैरे निकाल करून घेतला.

सयाजीराव हे १८४९ सालीं मरण पावले. त्यांचे वडील पुत्र गणपतराव यांनीं सात वर्षें राज्य केलें. ते वारल्यावर त्यांचे बंधु खंडेराव आपासाहेब हे हल्लीं राज्य करीत आहेत. याप्रमाणें या वंशाची हकीकत आहे.

गाईकवाड सरकारचा मुलूख औरस, चौरस बारा हजार कोश असून सर्व वसूल ७,०००,००० रुपये होतो. त्यांचे राज्यांतील मनुष्यांची संख्या वीस लक्ष आहे. या सरकारानें आपल्या राज्याचे मामले केले आहेत आणि ते मक्त्यानें देतात. या कारणामुळें रयतेस फार उपद्रव होतो आणि व्हावें तितकें उत्पन्नही होत नाहीं. यांचे प्रांताचे नजीकचे आमदाबाद व खेडा इंग्रजी तालुके आहेत त्यांत लोक फार व पडीत जमीन नाहीं. याचें कारण, इंग्रज सरकार ज्याप्रमाणें वरचेवर पाहणी करून चौकशी ठेवितें, त्याप्रमाणें गाईकवाड सरकार ठेवीत नाहीं. यामुळें ओसाड जमीन राहून गेली आहे. इंग्रजी अंमलांतील गुरें गाईकवाडी अंमलांतील कुरणांत चारावयास घालतात. बडोदें हें शहर पूर्वी मुसलमानांकडे होतें. त्यांच्या कारकिर्दींत ज्या इमारती झाल्या, त्यांची तुलना करण्यासारखी, इतकीं वर्षें मराठी राज्य आहे तरी एकही इमारत नाहीं. पिंपळे, भावनगर, पोरबंदर वगैरे राज्यांतून या सरकारास खंडणीही मिळत असे.

अलीकडे रा० रा० गोविंदराव रोडे दिवाण यांनीं राज्याची रीत दुरस्त करण्याचा यत्न चालविला आहे असें ऐकतों. परंतु त्यांस आम्ही खात्रीनिशीं सुचवितों कीं, त्यांनीं पूर्वी चांगल्या विद्वान व हुशार मनुष्यांचा संग्रह करावा म्हणजे त्यांचे उद्योगास लवकरच यश येईल आणि ते तसें करून त्यांचा कित्ता इतर राजे व जाहगीरदार यांचे

कारभाऱ्यांनीं घ्यावा अशा प्रकारची त्यांस शिफारस करण्याविषयीं दिवाणसाहेब आम्हांस भाग पाडतील असें आम्ही इच्छितों. असो. विषय फार लांबला म्हणून पुरे करितों. परंतु पुढें लवकरच या गोष्टीकडे वळूं.

ता. २२ सप्टें. १८६२

[नंबर ११२]

निजामाचे वंशाविषयीं

हल्लीं वराडप्रांतांत हैदराबाद येथील गादीवर जो वंश चालत आहे, त्याचे मूळ-पुरुष मीर कमरूद्दीन उर्फ चिनकिलिचखान हे होते, हे अलंगीर बादशाहाचे लष्करांत वाढत वाढत सरदार झाले. पुढें सन १७७७ या सालीं अलंगीर मरण पावल्यावर जो दंगा झाला त्यांत यांस सन १७१३ सालीं दक्षिण सुभा ही पदवी मिळाली. व निजामुल-मुलुख असफजाहा हा किताबही प्राप्त झाला. मुसलमानी राज्यांत, हल्लींच्या गवरनराप्रमाणें सुभा ही पदवी होती. दरएक सुभेदाराकडे मोठा प्रांत असे व त्याचे ताब्यांत पुष्कळ नबाब असत. गुजराथेचा सुभा, बंगाल्याचा सुभा, कर्नाटकाचा सुभा, पंजाबाचा सुभा, असे त्याकाळीं विभाग होते.

निजामुलमुलुख यास दक्षिणेचा सुभेदार नेमल्यावर तो दक्षिण प्रांत आपले ताब्यांत घेण्यास फौजेसुद्धां फिरूं लागला. नादरशाहाचे गर्दींत हा दिल्लीस गेला होता. पुढें कांहीं दिवस त्यास वजिराची पदवी दिली होती. नंतर याजकडे माळव्याच्या सुभ्याचेंही काम आलें. परंतु थोरले बाजीराव पेशवे, मल्हारराव होळकर वगैरे सरदारांनीं दिल्लीचे सुभे जागोजाग गारद केले, त्याचप्रमाणें याजकडूनही माळवा प्रांत सोडविला. मग हा हैदराबादेस ठाणें देऊन राहिला. तेथून अहमदनगरपर्यंत याचा अमल होता. तेवेळीं मराठ्यानीं चोहोंकडून धांदल चालविली होती; याकरितां पेशव्यास याच्याशीं बहुत लढाया कराव्या लागल्या. नंतर शाहूराजाचे मरणापूर्वी एक वर्ष सन १७४८ सालीं हा मरण पावला. तेव्हां यास ६ कन्या व साहा पुत्र होते, त्या पुत्रांचीं नांवें—

१ गाजी उद्दीन
२ नासरजंग नाशिरुद्दौला
३ सलाबत जंग
४ निजाम अल्ली
५ महमद सरीफ
६ मीर मोगलखान.

यांपैकीं वडील गाजीउद्दीन यास आमिरुल उनखवची पदवी दिल्ली येथें होती. तो फौज जमा करून सन १७५२ सालीं, सलाबत जंग यानें हैदराबादेचें राज्य घेतलें होतें तें घेण्याकरितां येत होता. तेव्हां औरंगाबादेस आल्यावर नासरजंग याचे आईनें

त्यास जेवावयास बोलावून विष घातलें. तेणेंकरून तो मरण पावला. नासरजंगही थोडे दिवसांत मेले. महमद सरीफ व मीर मोगल हे विशेष प्रसिद्धीस आले नाहींत. सलाबत जंग याजकडे विजापूर प्रांत होता. तो सदाशीव चिमणाजी पेशवे यांनीं सन १७५६ सालीं उदगीरची लढाई झाली, तेव्हां घेतला. आणि रायचूर, अदोनी व गंदूर हे तीन माहाल त्यांकडे जाहागिरीदाखल राहिले. इतक्यांत इंग्लिशांनीं, दिल्लीचे बादशाहापासून गंदूर वगैरे पूर्व समुद्रतिरीचे चार महालांची सनद घेतली. मग त्यांनीं ते आपले ताब्यांत घेण्याकरितां सलाबत जंगास तगादा लाविला. शेवटीं खंडणी देण्याचें कबूल करून ते महाल घेतले. टिपू सुलतान हा अदोनी वगैरे प्रांतांवर स्वाऱ्या करी, यामुळें सलाबत जंग याचा व त्याचा नेहमीं लढण्याचा प्रसंग पडे. शेवटीं १७८२ या सालीं तो मरण पावला. पुढें त्याच्या मुलानें कांहीं दिवस दंगा चालविला; परंतु इंग्रजांचे मदतीनें निजामअल्ली यांनीं त्याचा मोड केला. याप्रमाणें ५ पुत्रांची वाट झाली.

आतां निजामुलमुल्ख याचे पुत्रांपैकीं ४था मुलगा निजामअल्ली यांनीं सन १७६२ पासून हैदराबादेचा कारभार चालविला. सलाबत जंग मेल्यावर त्यास निर्वैर होऊन गेलें. पुढें सन १७६६ सालीं त्यांनीं कंपनी सरकाराशीं तह करून इंग्रजी फौज चाकरीस ठेविली. मग बंदीगान अल्ली असा किताब चालू झाला. पूर्वसमुद्राकडील गंटूर वगैरे महाल सात लाख रुपये इजारा ठरवून इंग्लिशांस दिले. सन १७६२ सालीं माधवराव पेशवे यांनीं राक्षस-भुवनावर यांचा पराजय केला. आणि नगर वगैरे बहुतेक मुलखांत आपला अंमल बसविला. पुढें मद्रास सरकारानें सलाबत जंग याजबरोबर तहनामा केल्यामुळें निजामअल्लीस राग आला. आणि त्यांनीं १७७९ या सालीं हैदरनाईक व मराठे यांस मिळून इंग्रजांशीं बेबनाव केला. तेव्हां कंपनी सरकारानें सलाबत जंगाबरोबर केलेला तहनामा रद्द केला.

सन १७९२ वांत निजामअल्ली, सवाई माधवराव पेशवे व इंग्लिश या त्रिवर्गांनीं एकत्र होऊन टिपूस जिंकण्याची मसलत केली. पुढें १७९६ त हैदराबादेस फराशीस लोकांचा जमाव झाला होता. तो इंग्लिशांनीं मोडून काढिला.

सन १७९५ सालीं निजामाची व मराठ्यांची खर्डा येथें लढाई होऊन निजामाचा मोड झाला. पुढें १७९९ सालीं टिपूस मोडून श्रीरंगपट्टण घेतलें. त्या मुलखाबद्दल वीस लक्षांची वांटणी निजामास आली; परंतु त्यांणीं तोच मुलुख, सन १८०० त इंग्लिश फौज चाकरीस ठेविली ह्याबद्दल लाऊन दिला. इंग्रजांकडील आठ हजार पायदळ, एक हजार स्वार व तोफा इतकें निजामाचें तैनातेस आहे. पुढें निजामअल्ली १८०३ मध्यें १०० वर्षांचे होऊन मरण पावले. त्यास ८ मुलगे होते. पैकीं शिकंदरजाह हे गादीवर बसले.

सन १८१७ सालीं पेशव्याचें राज्य इंग्रजांनीं मोडलें. तेव्हां शिकंदरजाह यांनीं मदत केली. याकरितां त्यास ६ लक्षांचा नवीन मुलुख मिळाला. नंतर सन १८२० सालीं यांचें राज्य एक कोट नव्वद हजारांचें होतें. खेरीज इंग्रजांची दाहा हजार फौज यांचे तैनातीस आहे व त्यांत मोठाले अंमलदार साहेबलोक पंधराशें आहेत. त्याजबद्दल दरसाल

निजामास चाळीस लक्ष रुपये द्यावे लागतात. सन १८२१ सालीं याचा व इंग्लिश सरकारचा तह होऊन सीनानदीची हद्द ठरली. सन १८२८ सालीं शिकंदरजाह मरण पावले. नंतर त्यांचे पुत्र नाशिरुदौला हे गादीवर आले. त्यांचा किताब असा:— "मुजफरुल्मु मालिक निजामुल्मुलुख मीरफर खंदेअल्ली खानबहादर फते जंग." हीं नांवें फार लांब याकरितां हैद्राबादचे गादीवर जे बसतात त्यांस निजाम असें म्हणण्याची चाल आहे. निजामअल्लीचा दिवाण पूर्वी मशीरुलमुलुख होता. त्यास खर्ड्याचे स्वारींत पेशव्यांनीं व नाना फडणिसांनीं कैद करून ओलीस ठेविलें होतें. यानंतर राजे चंदुलाल कायस्थ ब्राम्हण हे कारभारी होते. हा पुरुष मोठा धर्मात्मा असे.

सन १८५५ सालीं निजामाकडून रायचूर, वन्हाड वगैरे पन्नास लक्षांचे माहाल कर्जाबद्दल घेतले. पुढें बंडांत उपयोगी पडल्यामुळें, रायचूर, नवदुर्ग, धारूर वगैरे माहाल सोडून दिले. आतां फक्त वन्हाड मात्र अभानतीस आहे. परंतु तेथील वहिवाटीचा खर्चवर्च भागून विशेष शिल्क राहत नाहीं. नाशिरुद्दौला हे सन १८५७ सालीं मरण पावले. त्यानंतर आफजलुद्दौला हे इंग्लिशांचे संमतीनें गादीवर बसले. ते हल्लीं कायम असून सालार जंग हे त्यांचे दिवाण आहेत. निजामानें इंग्लिशांचा आश्रय केल्यामुळें त्याचा परिणाम लागला; नाहीं तर मराठे व हैदरअल्ली यांनीं त्यास कधींच नाहींसा केला असता. थोरले निजामुल्मुलुख मेल्यावर भावाभावांत बहुत तंटे लागले. शिवाय टिपू व मराठे त्यांस ग्रासण्यास पाहातच होते. आपसांतील तंट्यांमुळें कधीं फ्रेंच व कधीं इंग्लिश यांची फौज ठेऊन त्यांच्या आश्रयानें आपलें संरक्षण करीत. दिल्लीचा बादशहा तर अगदीं अशक्त होऊन पराधीन झाला होता. त्याचा अंमल कोणी मानिनासें होऊन, सुभेदार आपणांस स्वतंत्र राजे म्हणऊं लागले. अशा प्रसंगीं निजामानें इंग्लिशांशीं सलोखी राखून आपला निभाव करून घेतला. हल्लीं निजामाकडे खालीं लिहिल्याप्रमाणें प्रांत आहेत:—

१ प्रांत हैदराबाद अथवा भागानगर—तेलंगण.
२ प्रांत वेदर. भाषा मराठी.
३ प्रांत नांदेर. भाषा मराठी.
४ प्रांत औरंगाबाद. पैकीं कांहीं भागांत भाषा मराठी.
५ प्रांत विजापूर. पैकीं कांहींत भाषा कानडी.
६ प्रांत वराड. कांहींत भाषा मराठी.

निजामाचे राज्याचे उत्तरेस तापी आणि वर्धा ह्या नद्या, दक्षिणेस कृष्णा आणि तुंगभद्रा नद्या, मध्यें गोदा आणि भीमा नद्या अशा आहेत. या मुलखांत भुइकोट आणि पहाडी असे पुष्कळ किल्ले आहेत. हैदराबाद, गोवळकोंडें, नादर, दौलताबाद, वेदर, इलिचपूर, सगर, कलबुर्ग इत्यादि मोठमोठीं शहरें आहेत. हल्लीं निजामास "नाइट आफ स्टार [ऑफ] इंडिया" ही पदवी महाराणीसरकारांतून दिली आहे

हैदराबाद हें मोठें शहर असून तेथें बहुतेक मुसलमान लोकांची वस्ति आहे. राज्याची व्यवस्था चांगली नाहीं, याचें मुख्य कारण मुलुख मक्त्यानें देण्याची चाल सुरू आहे. दिवाणी व फौजदारी कामें बराबर चालत नाहींत. उनाड लोक बंडवाल्यांप्रमाणें नेहेमीं दंगे करीत असतात. या राज्यांत हिंदूस मोठी जागा देऊं नये, असा नियम नाहीं. चंदुलाल हे दिवाणगिरीचे कामावर होतेच; खेरीज सरदार व मोठमोठे कामदार हिंदु लोक पुष्कळ आहेत. मुसलमान लोकांचा श्रेष्ठपणा आहे, ही गोष्ट आश्चर्य करण्यासारखी नाहीं. शहरांत मोठमोठे सावकार व श्रीमान लोक अनेक आहेत. मुलूक सुपीक व सर्व पैसा तेथेंच मुरत असल्यामुळें लोक सधन आहेत. राज्याची व्यवस्था चांगली राहत असेल तर याहीपेक्षां लोक सुखी होतील.

इंदुप्रकाश : ता. २१ डिसेंबर १८६२

[नंबर ११३]

सातारचे छत्रपति यांचे प्रतिनिधी

शिवाजी भोसले छत्रपति यांनीं मराठे लोकांचें राज्य स्थापन केलें. आणि आपलें राजकीय काम उत्तम प्रकारें चालावें, या हेतूनें अष्टप्रधान नेमिले. त्यांत रा० निराजीपंत यांस न्यायाधीश केलें होतें. त्यांचे चिरंजीव प्रल्हाद निराजी हे गोवळकोंडें येथील मुसलमानी दरबारांत छत्रपति यांचे मार्फत वकील होते. पुढें इकडे शिवाजी हे मरण पावले. त्यांचा मुलगा संभाजी हा स्वभावानें दुष्ट होता. त्यास आवरंगजेब यानें सन १६७९ त पुण्याजवळ तुळ[ा]पूर येथें ठार मारिलें. आणि त्याचा पुत्र शाहू व स्त्री येसूबाई या उभयतांस बंदींत टाकिलें. तेव्हां शंभू छत्रपति यांचा भाऊ राजाराम म्हणून होता तो, दक्षिणेंत मुसलमानांपुढें टिकाव लागेना म्हणून कर्नाटकांत शिवाजीचे महाल होते तिकडे इ. १६९० त पळून गेला. तो छपूनच राहिला होता. पुढें जिकडे तिकडे यथास्थित झाल्यावर प्रल्हाद निराजी यांनीं फारच मदत केल्यामुळें त्यास अष्टप्रधानाहून मोठी पदवी प्रतिनिधि अशी कल्पून ती त्यांस दिली. या पहिले प्रतिनिधीचा अष्टपैलू शिक्का खालीं लिहिल्याप्रमाणें आहेः—

श्रीलक्ष्मीनृहरेः प्रीतेः ॥ मुद्रा नीराजिजन्मनः ॥
राजारामप्रतिनिधेः ॥ प्रल्हादस्य विराजते ॥ १ ॥

पुढें सन १६९७ णवांत प्रल्हाद निराजी हे चंदीवर मुसलमानांनीं हल्ला केला त्यांत ठार मारले गेले. त्याचे जागीं त्याच सालीं तिमाजी रघुनाथ यांस प्रतिनिधीचीं वस्त्रें

मिळालीं. ती पदवी त्यांनीं सन १७०० पर्यंत चालविली. हे पराक्रमी नाहींत असें दिसून आलें होतें. यांची मुद्रा:—

राजारामप्रतिनिधेः ॥ लक्ष्मीकांतप्रसादतः ॥
तिमाजीरघुनाथस्य ॥ मुद्रांकोऽयं विराजते ॥ २ ॥

पुढें राजाराम छत्रपति सन १७०० म्हणजे शके १६२२ फाल्गुन वद्य ९स पुण्याजवळ सिंव्हगडावर मरण पावले. त्यांची स्त्री शाहजी मोहिते यांची कन्या ताराबाईसाहेब ही कारभार पाहूं लागली. राजश्री रामचंद्रपंत बावडेकर आमात्यहुकुमत, यांचे कारकून रा० परशराम त्र्यंबक किन्हयी येथील कुळकरणी, यांणीं पन्हाळा, सातारा, वसंतगड व परळी हे किल्ले मुसलमानांच्या गर्दींत संरक्षण केले व पराक्रमानें मोठे प्रसिध्धीसही आले तेव्हां त्यांची योजना ताराबाईसाहेब यांनीं प्रतिनिधीचे जाग्यावर केली. त्यांची मुद्रा प्राचीन कागदावरील अशी आहे :—

श्री आई आदिपुरुष प्रसन्न राजारामस्वामी
कृपानिधि तस्य परशुराम त्रिंवक प्रतिनिधि ॥

यांचे कागदाचे शेवटीं "निदेशसमक्ष" अशीं अक्षरें असून श्रीकाराजवळ 'आई आदिपुरुष' अशीं अक्षरें आहेत.

यांनीं ही पदवी सन १७०८ पर्यंत चालविली. नंतर याच सालीं माघमहिन्यांत शंभूछत्रपति यांचा पुत्र शाहू, खरें नांव शिवाजी, हे मोंगलांचे कैदेंतून सुटून साताऱ्यास आले. तेव्हां ताराबाई व प्रतिनिधि यांनीं हा तोतया आहे असें ठरविलें. सातारचे गादीवर त्यांस बसूं देईनात. तेव्हां शाहू छत्रपति यानें, किल्लेदार शेखमिरा यास फितूर करून किल्ला घेतला. नंतर शाहूराजानें माजी प्रतिनिधि प्रल्हाद निराजी यांचे पुत्र गदाधर व नारायण असे होते. पैकीं गदाधर यांस प्रतिनिधी नेमिलें. त्यांनीं ही पदवी २ वर्षें चालविली. त्यांची मुद्रा येणेंप्रमाणें :—

श्रीशंकर शाहू छत्रपति कृपानिधि ॥
प्रल्हादसुत गदाधर प्रतिनिधि ॥ ३ ॥

पुढें परशुराम पंडित प्रतिनिधि हे शाहू छत्रपतीस शेखमिऱ्याचे मार्फत शरण आल्यावरून त्यांस पुन्हा ती पदवी दिली. ती सन १७१० पर्यंत त्यांजकडे होती. इतक्यांत त्यांचा वडील पुत्र कृष्णराव यांस ताराबाईनीं कोल्हापुरास संस्थान करून तेथें ठेविलें होतें. त्यानें कांहीं बंडावा केला यास्तव परशराम पंडित यांस काढून गदाधर यांचे बंधू नारायण प्रल्हाद यांस प्रतिनिधिची जागा दिली. त्यांणीं ती पदवी १ वर्ष चालविली. त्यांची मुद्रा:—

श्रीमत्र्यंबकभक्तस्य शाहुप्रतिनिधेर्मम ॥
नारायणस्य मुद्रेयं प्रल्हादतनुजन्मनः ॥

यासमईं राजेश्री कृष्णराव राजा खटावकर या नांवाचा मुगलांचा सरदार होता, त्याणें खानदेशांत बंड केलें म्हणून शाहू राजानें परशुराम पंडित यांचा तिसरा पुत्र श्रीनिवासराव यांस हें बंड मोडण्याकरितां पाठविलें. त्या उभयतांची अउंदाजवळ लढाई होऊन श्रीनिवासराव यांणीं खटावकर यांस कैद करून आणिलें. तेव्हां राजा प्रसन्न होऊन त्याचे बापास कैदेंतून मुक्त करून त्यास प्रतिनिधीची पदवी दिली. ती सन १७१२ पासून १६ पर्यंत त्यांणीं चालविली. त्यांची मुद्रा येणेंप्रमाणें–

श्री आई आदिपुरुष श्रीराजा
शाहु छत्रपति स्वामी कृपानिधि
तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी ॥

राजानें पत्र लिहिणें तर त्यांस रा० परशुराम पंडीत असें वर लिहून शेवटीं "बहुत काय लिहिणें सुज्ञ असा," अशा प्रकारची चाल होती. यावेळेस शाहू राजाचे मुख्य-प्रधान पेशवे बहिरु मोरेश्वर पिंगळे हे होते.

परशुरामपंत मेल्यावर त्यांचा तिसरा पुत्र श्रीनिवास परशुराम हा पराक्रमी असल्या-मुळें त्यास ती पदवी मिळाली. यांस श्रीपतराव अथवा रावप्रतिनिधी असेंही म्हणत. यांणीं सन १७१७ पासून ४७ पर्यंत ही पदवी चालविली. प्रतिनिधीचे वंशांत हे पुरुष मोठे विख्यात व धार्मिक असे होऊन गेले. यांनीं १० लक्ष रुपयांच्या जमीनी व गांव मिळून लोकांस इनाम दिलें व शाहू राजाजवळ मुख्य कारभारी हेच होते. यमाजी शिवदेव हे यांचे मुतालिक होते. यांणीं कर्नाटकांत निजामाशीं लढाया दिल्या. कोकणांतील कांहीं किल्ले घेतले. कोल्हापुरच्या राजाशीं लढाई देऊन जय मिळविला. अशाप्रकारें पराक्रम व धर्म या दोन स्तुत्यगुणांनीं यांणीं आपली कीर्ति चिरकाल करून ठेविली. शाहूराजाचे कारकीर्दीत या पुरुषाचें नांव सर्वांस प्रिय होतें. पुढें जे अधिकारी झाले त्यांणीं यांनीं केलेला धर्म बुडविला. तत्रापि अद्याप बहुत चालू आहे. यांचा शिक्का बापाच्या मुद्रेप्रमाणेंच, नांव मात्र बदलून तयार केला होता. त्यांची पत्नी राधाबाई, बहीण यश्वदाबाई ही राजे श्री अपाजीराव कुळेकर देशपांडे यांस दिली होती. मुलगी राजसबाई हिला कडेगांवकर देशपांडे रा० नागोजीराव यांस दिली होती. यांचे मुख्यत्वेंकरून राहाणें कराडास होतें. परशुरामपंत यांचा बंधू माधवराव यास दत्तक दिला होता, परंतु त्यास परत घेऊन त्याचें श्रीनिवास परशुराम हेंच नांव चालविलें. बाजीराव बल्लाळ पेशवे यांचा उत्कर्ष यांचे कारकीर्दीत झाला. यांचा सन १७४७ त काळ झाला. तेव्हां त्यांचा कनिष्ठ बंधु जगजीवन परशराम यास ती पदवी दिली. जगजीवन यांस दादोबा असेंही म्हणत.

पुढें शाहू छत्रपति, सन १७४९ सालीं मार्गशीर्ष वद्य ३ स कैलासवासी झाले.

त्यांजबराबर त्यांची पत्नी सगुणाबाई ही सती गेली. आणि बाळाजी बाजीराव पेशवे यांनीं राजमंडळ तोडून टाकिलें. या कामांत दादोबा हे हरकत करूं लागले. व त्यांनीं व त्यांच्या मुतालिकांनीं सांगोष्टें घेतलें. तेव्हां भाऊसाहेबांनीं त्या उभयतांस कन्हईच्या किल्यांत टाकिलें. पुढें दोन वर्षांनीं सर्व बंदोबस्त झाल्यावर सोडिलें. ते पुढें १७५१ सालीं मरण पावले. त्यांच्या स्त्रिया मैनाबाई व सुंदराबाई यांस विटें हें अन्नवस्त्राकरितां देऊन तेथें ठेविल्या होत्या.

जगजीवन पंडीत मेल्यावर कृष्णाजी परशुराम यांचा नातु श्रीनिवास गंगाधर हा वडील घराण्यांतील, सबब त्यास सन १७५१ सालीं वस्त्रें दिलीं. त्यांनीं सन १७६२ पर्यंत ती पदवी चालविली. यांस भवानराव असेंही म्हणत. पुढें पानपतचे लढाईंत सदाशीव भाऊ पडले. व बाळाजीपंत नाना पेशवे हेही क्षयरोगानें पर्वतीस वारले. माधवराव बल्लाळ लहान, यामुळें सर्व कारभार राघोबादादा यांजकडे आला. तेव्हां त्यांचे कुपेंतील नारो शंकर राजेबाहादर यांस त्यांनीं प्रतिनिधीचीं वस्त्रें दिलीं, आणि भवानराव यांस काढून टाकिलें. ही पदवी यांनीं १ वर्षभर भोगिली.

नारोशंकर यांनीं रा. गोपाळराव मिरजकर यांशीं लढून मिरज घेतली. तेव्हां भवानराव गोपाळराव हे बंड करीत करीत हैदराबादेस गेले. यांचे बराबर रामाजी यमाजी मुतालीक होते; हे निजामाचे दिवाण रा० विठ्ठल सुंदर यांचे व्याही, यामुळें त्यांनीं यांचा पक्ष धरून फौजेसह पेशव्याबराबर ते लढण्यास आले. राक्षसभुवनावर लढाई होऊन पेशव्यांनीं त्यांचा पराभव केला. परंतु मिरजकर व भवानराव यांची समजूत करून त्यांस परत आणिलें; त्यांची त्यास पदवी दिली. पुढें पेशवेसरकारचा आग्रह पडला कीं, प्रतिनिधींनीं पुण्यांत राहावें. ती गोष्ट भवानराव यांनीं मान्य केली नाहीं. म्हणून कृष्णरावाचा दुसरा नातु भगवंतराव त्रिंबक यांस प्रतिनिधीचीं वस्त्रें देऊन पुण्यांत ठेविलें. पुढें भवानराव राजी झाल्यावरून १७६८ त पुनः त्यांस वस्त्रें दिलीं. आणि भगवंतराव यांजकडे खानापूर वगैरे जहागीर ठेविली. भगवंतराव व भवानराव यांच्या नेहेमीं खानापुर प्रांतीं लढाया व कलह होत, यामुळें पेशव्यांनीं त्यास कांहीं जहागीर देऊन निराळाच ठेविला. भगवंतराव सन १७७५ सालीं मरण पावले. त्यांच्या स्त्रिया राजसबाई व सकुवरबाई यांस दाहा हजार रुपये नेमणूक करून विस्त्यास ठेविलें.

सदरहुप्रमाणें भवानराव यांनीं सन १७६८ पासून पदवीचा निर्वेधपणीं उपभोग केला. पुढें नारायणराव पेशवे यांस राघोबादादांनीं ठार मारलें. तेव्हां हे नाना फडणवीस यांस मिळाले. या कारणामुळें यांचें चांगलें बस्तान बसलें. पुढें हे ता० ३१ आगष्ट १७७७ या सालीं मरण पावले. तेव्हां त्यांच्या स्त्रिया यमुनाबाई व काशीबाई अशा दोन होत्या. त्यांपैकीं काशीबाई ही भ्रतार मेला त्याच दिवशीं प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. नंतर नाना फडणवीस यांनीं राजश्री कृष्णराव तात्या जोशी सातारकर यांस कारभारी नेमून बंदोबस्त ठेवला. त्या पुत्राचें नांव परशराम. हा खर्ड्याचे स्वारींत होता. पुढें नानाची

कारकीर्द सरली व कारभारी उठले आणि खासे मुकत्यार झाले. इकडे पुण्यांत बाजीराव गादीवर आले. अशा कारणांनीं मुलगा फार दुर्वृत्त निघाला. आईशीं व बायकांशीं याचें फार वैर पडलें. रमा तेलीन इला जवळ ठेऊन रामोशी चाकरीस ठेविले. मुलुखांत दंगेदरवडे घालण्यास आरंभ केला. आईनें व तिचे कारभारी बळवंतराव फडणीस यांणीं बहुत उपाय केले, परंतु त्याचें तें व्यसन जाईना. भांग फार प्यावी, मुलुख लुटून पैसा काढावा, वाटा माराव्या. माणसांच्या नाकांत व कानांत दारू घालून माणसें मारावीं, इत्यादि कर्में चालविलीं. हलकीं माणसें जवळ असून गवई तमासगीर यांत सर्वकाळ बसावें. स्त्रिया लक्ष्मीबाई व रमाबाई ह्या पळून जाऊन विशाळगडावर राहिल्या. शेवटीं बाजीरावसाहेब यांजकडे आईनें बोभाट नेल्यावर बापुजी गोखले यांस बंदोबस्ताकरितां नेमिलें. त्यांनीं फौजेसुध्धां जाऊन मसुरेवर लढाई दिली. तींत परशरामपंत यांचा हात तुटून ते कैद झाले. त्यांस पुण्यास आणून ठेविल्यावर त्याची नाटकशाळा रमा तेलीन हिणें दंगा करून वासोटा किल्ला लढविला. शेवटीं तिलाही आणून पुण्यांत टाकिलें. सर्व मुलुख जप्त झाला. पैकीं म्हसवड वगैरे गोखल्यास दिले. कांहीं सरकारांत घेतले. याप्रमाणें सन १८०७ तांत झालें.

प्रतिनिधीकडे ३००० स्वारांचें पद(थ?)क होतें. त्याकडे पुष्कळ किल्ले होते. सर्व मिळून १८ लक्षांचा मुलुक होता. हल्लींचा सर्व सातारा जिल्हा हा त्याजकडेस होता. दर माहालांत शेकडा निम्मे रुपये प्रतिनिधी घेत. असे कितीएक माहाल होते. या प्रतिनिधीचे हिशास "जिल्हेबाब" असें नांव आहे. बाकी राहील त्यास हुजूर मामला हीं नांवें अद्याप चालत आहेत.

प्रतिनिधीकडील मुख्य किल्ल्यांचीं नांवें

१ व्याघ्रगड	१३ केजळा उर्फ मनमोहोनगड
२ सुंदरगड	१४ जंगली जयगड
३ प्रतापगड	१५ भूषणगड
४ नांदगिरी उर्फ कल्याणगड	१६ महिमानगड
५ वरर्धनगड	१७ महिमदनगड
६ महिपतगड	१८ मोरगिरी उर्फ गुणवंतगड
७ वारुगड	१९ मचिंद्रगड
८ वहिरवगड	२० अवचितगड
९ वसंतगड	२१ सुषेणगड
१० सज्जनगड	२२ गंभीरगड
११ मंगलगड	२३ गहनगड
१२ मकरंदगड	२४ सकोषगड.

प्रतिनिधीकडे महाल होते ते

१ कर्यातविटें
२ कसबे कासेगांव
३ सुभा सातारा
४ सुभा जावली
५ सुभा कन्हाड
६ सुभा वांयी
७ कसबे आउध
८ प्रांत खटाव
९ तालुके कोळे
१० तालुके किन्हई
११ कसबे भालवणी
१२ कळीबुंदेलखंडांत
१३ कसबे निमसोड
१४ तर्फ वारूण
१५ हवेली विजापूर
१६ कर्यात अठपडी
१७ कसबेनाझरें
१८ कसबे वेळापूर
१९ नृसिंव्हगड
२० खानापूर
२१ बागेवाडी.

याखेरीज उत्तर हिंदुस्थानांत कांहीं किरकोळ गांव होते. पुढें सन १८१२ त बाजीरावानें असें ठरविलें कीं, प्रतिनिधीनें परत कन्हाडास जावें आणि त्यांस दोन लक्षांचा मुलुख मात्र द्यावा. मग वाईटसाईट गांव देऊन दोन लक्षांची भरती केली ती—

कन्हाडापैकीं १४ गांव व अंमल.
कर्यात अउंदपैकीं १४ गांव व आउंद.
१ बाबती विजापूरपैकीं
इतक्यांचा वसूल हल्लीं ६०।७० हजार रुपये येत आहे.

याप्रमाणें सरंजाम मिळाल्यावर प्रतिनिधी परत कन्हाडास गेले. परंतु त्यांचे वृत्तीची सुधारणा न होतां तसाच घोळ चालला होता. पुढें १८१८ सालीं पेशव्यांचें राज्य बुडालें. तेव्हां प्रतिनिधी यांस सातारचे छत्रपती यांचे निसबतीस दिलें. तेव्हांपासून त्या पुरुषाची गडबड राहिली. ते इंग्रज सरकारचे धाकानें गरिबीनें राहात असत, तथापि मरेपावेतों स्त्रियांची भेट नाहीं. त्या उभयतां मोठ्या साध्वी होत्या.

तारीख १० मे सन १८४८ वैशाख शुध्ध ८ शके १७७० या सालीं परशराम पंडित वारले, तेव्हां त्यांचे भाऊबंदांपैकीं एक मुलगा दत्तक दिला. तो छत्रपती व इंग्रज सरकार यांनीं मान्य केला. हल्लीं ते गादीचे अधिकारी आहेत. यांचें नांव प्रतिनिधी श्रीनिवास पंडीत. यांचे कारकीर्दींत कांहीं दुअमली गांव होते ते सरकारांत घेतले. आणि दुसरे दिले. याखेरीज कांहीं लिहिण्याजोगें झालें नाहीं. यांस २ स्त्रिया आहेत. पैकीं एक रा० अंताजी नारायण मुतालीक यांची कन्या. हीं त्रिवर्ग गोडीनें आहेत.

प्रतिनिधी श्रीनिवास पंडीत यांणीं गरिबी पाहिली आहे. व हल्लीं ते श्रीमंतीही भोगीत आहेत. तर यांणीं हल्लींच्या काळावर नजर देऊन आपला लौकीक वाढवावा.

तलवार गाजवून लौकीक मिळविण्याचे दिवस निघून गेले. तर विद्यावृध्धी करून ज्ञान संपादन करणें हीच ह्या काळांत तलवार आहे. याकरितां आपल्या प्रांतांत शाळा स्थापन करून प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष द्यावें. हल्लीं इंग्लिश लोकांच्या संबंधानें नानातऱ्हेच्या विद्या व कलाकौशल्यें दृष्टोत्पत्तीस येत आहेत, तर आपल्या लोकांस त्यांत गम्य नाहीं. यास्तव त्यांचा यांत प्रवेश करून देणें हें किती अगत्याचें आहे याचा विचार करावा. आपल्या प्रांतांत नवीन रस्ते बांधणें, पडीत जमिनी असल्यास त्या कौलानें देणें, पाण्याची सोय करणें वगैरे उपायांनीं देशांतील उत्पन्न वाढविण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. या उपायांनीं प्रजा सुखी होऊन आपलेंही उत्पन्न वाढतें. लौकीक होतो. फार काय सांगावें सर्वप्रकारें चांगलें होतें. तर अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करणें सर्वथा अनुचित् होय. या वरील गोष्टीकडे विंचुरकर आणि जमखंडीकर यांणीं चांगलें लक्ष पोचविलें आहे तर त्यांस इंग्लिश सरकारही किती चाहातें हें सर्वांनीं लक्षांत आणावें. सातारचे राजमंडळांतील अष्टप्रधानांपैकीं मुख्य जे एक प्रतिनिधी त्यांणीं आम्हीं वर लिहिल्याप्रमाणें क्रम सुरू केला म्हणजे त्यांचा कित्ता दुसरेही घेतील यांत संशय नाहीं. हे तरुण आहेत. त्यापेक्षां यांणीं वरचेवर मोठा सरंजाम बराबर न घेतां मुंबईस येत जावें. व एकवार विलायतेचीही यात्रा करावी. हल्लींच्या काळांतल्या यात्रेपासून जितकें पुण्य आहे तितकें दुसऱ्या यात्रेपासून नाहीं. तरी त्यांणीं आमच्या लिहिण्याकडे दुर्लक्ष न करावें हीच त्यांस आमची प्रार्थना आहे.

ता० २८ मार्च १८६४

[नंबर ११४]

सातारचे छत्रपतींचा वंश

अवरंगाबादेजवळ वेरूळ गांव आहे तेथें बाबाजी भोसले म्हणून त्या गांवच पाटील होता.

सदरहु बाबाजी यांस दोन पुत्र, मालूजी व त्रिंबकजी.

मालुजीचा पुत्र शाहाजी याणें नगरचे मुसलमान राजे यांची चाकरी धरली. पुढें ती सोडून विजय(जा)पूरचे राजे, ज्यास इद्दलशाई असें म्हणतात, त्याजवळ चाकरीस राहिला. तेथें त्याची प्रतिष्ठा चांगली वाढली आणि फौजेचे खर्चाबद्दल पुणें प्रांतीं जुन्नर वगैरे महाल व कर्नाटकांत चंदी चंदावर वगैरे माहाल सरंजाम मिळाले. त्यांस २ स्त्रिया होत्या. एक लुगजी जाधव याची कन्या जिजाऊ. तिचा पुत्र शिवाजी शिवनेरीचे किल्यावर जन्मला म्हणून त्या किल्ल्यांत शिवाई देवी आहे तिचें नांव त्यास दिलें

दुसरी मोहित्यांची मुलगी तुकाई. तिचा पुत्र व्यंकोजी त्यांस कर्नाटक प्रांतीं महाल होते त्याचे वहिवाटीवर ठेविला होता. शाहाजी इसवी सन १६६४ सालीं मेला. त्याची समाधी माणदेशांत शंभूमाहादेवाचे डोंगरावर आहे.

मालुजीचा भाऊ त्रिंबकजी याचा वंश मौजे खानवटे तर्फ पाटस व मौजे वावी प्रांत संगमनेर येथील पाटीलकीवर आहे.

शिवाजीचा भाऊ व्यंकोजी याचें येणें दक्षिणेंत पुन्हा झालें नाहीं. विजापूर मोडल्यावर त्याचा वंश सरंजामसहीत महाली राज्य करून होता. त्याचा निर्वंश झाल्या-कारणानें तें राज्यसरकारांत डालहौसी याचे कारकीर्दींत खालसा झालें.

शिवाजी याचा जन्म वैशाख शुध्ध ३ शके १५४९ इसवी १६२७ सालीं झाला. त्या वेळेस हिंदुस्थानांत चारी दिशांस मुसलमानांचा निवळ अंमल बसला होता आणि हिंदुलोकांकडे फौजेच्या सरदाऱ्या व मोठालीं कामें मुसलमान देत होते. तथापि हिंदु लोकांकडे लहाणपणा आला होता. व धर्माशीं मुसलमानांचा उघड द्वेष होता ही व्यवस्था समजून त्यांचे मनांत लहानपणापासून अशी प्रेरणा झाली कीं, स्वराज्य स्थापन करून हिंदुलोकांची ग्लानी घालवावी. या बुध्धीचें मराटे लोकांस अजून इतकें अश्चर्य वाटतें कीं हा पुरुष अवतारी होता, असें ते म्हणतात. यानें पुण्याचे पश्चिमेस जी मावळें आहेत, तेथील जंगली मावळे कुळंबी यांस सहाय करून घेऊन फौज उभी केली आणि त्यांचे हातून किल्ले घेतले. असें म्हणतात कीं, याणें शंभर किल्ले नवे बांधिले. व कित्येक दुरस्त केले. असा हा मोठा प्रतापी होता. याप्रमाणें बंड उभें करून तीस वर्षांनंतर त्याणें माहाडाजवळ रायगड किल्ला आहे तेथें आपल्यास हिंदु शास्त्राप्रमाणें राज्य अभिषेक करून घेतला. त्याची मिती जेष्ट शुध्ध १३ शनिवार आनंदनाम संवत्सरे शके १५९६ इसवी १६७३. यानें आपल्यास क्षत्रिय कुलावतंस छत्रपति अशी पदवी घेतली. शिवराई पैसा पाडला. अष्टप्रधान वगैरे नेमिले. संस्कृत सनदा पत्रें लिहिण्याच्या पध्धती केल्या. देवस्थानें वगैरे यांचें ऊर्जित केलें. याचें राहाणें पुण्यापासून राजगड म्हणून किल्ला आहे त्याजवर असे. व त्याचे शेजारीं तोरणागड आहे तेथें खजीना होता. सिंव्हासन रायगडावर होतें. याणें आपले राज्यांत राज्याभिषेक व शक चालू केला. त्याचा मृत्यु चैत्र शुध्ध १५ रविवारीं शके १६०२ म्हणजे ता. ५ एप्रेल १६८० इसवींत झाला. याचा शिक्का पुढें लिहिल्याप्रमाणें होता.

प्रतिपच्चंद्रलेखेव ॥
वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥
शाहुसूनोः शिवस्यैषा ॥
मुद्रा भद्राय राजते ॥ १ ॥

पत्राचे डोक्यावर सदरहुप्रमाणें अष्टपैलू शिक्का असतो. व शेवटीं लहान शिक्का—

मर्यादेयं विराजते, या अक्षराचा असतो. पहिले जुने राजे असत त्यांजमध्यें गजपती हयपती अश्वपती असे किताब असत. हस्तनापूरचे क्षत्रिय राजे गजपती म्हणवीत. नर्मदातीरीं मालवणांतील राजे अश्वपती, कर्नाटकचे आनागोंदीचे म्हणजे विजयनगर येथील राजे नरपति म्हणवीत. या धोरणावरून शिवाजी याणें छत्रपति हें कल्पिलें.

शिवाजी राजाचा पराक्रम अद्भुत होता व जे मागें अवतारी पुरुष प्रसिध्ध झाले त्यांणीं याहून अधिक कांहीं केलें नसेल असें म्हणतात. सह्याद्री पर्वत, ज्यास घाट म्हणतात त्याचें स्वरूप शतपदीसारखें आहे. वरच्या भागास मुरे असें नांव आहे. मधल्यास खोरें असें म्हणतात. त्यांतून आंत अडचणीच्या जागा आहेत. त्यांस दरे म्हणतात. त्यांस नांवें पृथपृथक् आहेत. मांढरदेवाचा मुरा, बारा मुरा, इत्यादि; कळक दरा, वाघजाईचा दरा, इत्यादि; जांबळ खोरें, मुरें खोरें इत्यादि; हें सर्व मिळून मोठा तुकडा यांस मावळ म्हणतात. जसें गुजण मावळ, नाणें मावळ हे जे प्रांत आहेत, त्यांत कित्येक खोरीं व दरीं मुरीं असतात. असा हा अवघड प्रांत असतां त्यांतही हा वाघाप्रमाणें जिकडे तिकडे फिरत असे. याचा वस्तीचा किल्ला राजगड पुण्याजवळ आहे. त्याजवर जाऊन पाहिलें असतां त्याचे पराक्रमाचें अनुमान करतां येईल. त्या किल्ल्यावरती शिवाजीचा वाडा म्हणजे एका खारव्याच्या झोपडीयेवढी झोपडी आहे; परंतु त्यास तक्ताची जागा समजून पूजितात. याच वाड्यांत शिवाजी शिंहगड कसा घेतात हें पाहाण्यास बसला होता. तेथून पश्चिमेस घाटाखालीं रायगड आहे त्याचे डोकें दिसतें व तोरणागड शेजारी आहे. ज्या डोंगराचे दांडानें शिवाजीचे मावळ्यांनीं सिंव्हगडावर हल्ला केला ती वाटही दिसते. आतां त्या वाटेनें दिवसा जाणेंदेखील कठीण आहे. मग अंधेरांत कसे चढले असतील हें समजत नाहीं. भाऊदाजीसारखे जे शोधक देशाटणें करितात त्यांनीं या डोंगरी एकदोन किल्ल्यांवर चढून पाहिलें असतां त्यांस आश्चर्य वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

शिवाजी राजास दोन स्त्रिया, सईबाई निंबाळकर यांची कन्या, व दुसरी सोयराबाई शिरके यांची मुलगी. पैकीं सईबाईचा पुत्र संभाजी व सोयराबाईचा पुत्र राजाराम. शिवाजीची समाधी मालवण किल्ल्यांत आहे.

संभाजीचा जन्म रायगडास ज्येष्ठ शुध्ध १० शके १५७९ इसवी १६२७ सालीं झाला. तो लहानपणापासून व्रात्य व निर्दय व दुराचरणी होता. सबब त्याजवर शिवाजीची प्रीती नव्हती, व त्याचा गुरु रामदास त्याचीही नवती, परंतु शिवाजी मृत्यु पावतांच तो पन्हाळ्या किल्ल्यावर होता. तेथून जाऊन रायगडास पोंचला. व शिवाजीनें मरतेसमईं दुसऱ्या राज्यावर बसवावा असें सांगितलें आहे. अशा निमित्तानें सावत्रआईनें बंदोबस्त केला होता. तिला ठार मारली व तिचे मंडळीस उग्र शिक्षा दिल्या, आणि आपण शके १६०२ मध्यें राज्यावर बसला. पुढें रामदासस्वामी १६०३ शकांत वारले. याणें १६१० पर्यंत राज्य केलें. शेवटीं आवरंगजेबानें त्यास संगमेश्वराहून त्याचा दिवाण कवाजी यासुध्धां धरून आणून फाल्गुन वद्य ३ शके १६१० त पुण्याजवळ तुळापूर आहे तेथें

ठार मारला. विजापुरचें राज्य बुडाल्यावर एक वर्षानें ही गोष्ट झाली, त्याचा शिक्का खालीं लिहिल्याप्रमाणें होता म्हणून सांगतात, परंतु कोठें पाहाण्यांत आला नाहीं :

प्रतिपच्चंद्ररेखेव ॥
वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥
शिवसूनोरियं मुद्रा ॥
मुद्रा भद्राय राजते ॥ १ ॥

संभाजी मुसलमानांनीं मारला तेव्हां नूतन मराठी राज्यावर मोठाच प्रसंग पडला. ते वेळीं तें राज्य नाहींसें झालें असें सर्वांस वाटलें. आणि संभाजीची स्त्री येसूबाई शिरके यांची मुलगी व तिचा पुत्र शाहू आठ वर्षांचा मुलगा यांस रायगडाहून आणून सूर्याजी पिसाळे देशमुख प्रांत वांई यांनीं फितूर होऊन मुसलमानांचे हातीं दिलें. ते कैदेंत राहिले तेव्हां मराठे सरदारांस बहुत करून आशा राहिली नाहीं.

त्या काळीं संभाजीचा भाऊ राजाराम हा अवशेष राहिला होता. त्याचा जन्म इसवी १६७० रांत झाला व त्याचा मृत्यु फाल्गुन वद्य ९ शके १६२२ इसवी १७०० त झाला. त्याची समाधी सिंव्हगडावर आहे. त्याचे खर्चास इनाम गांव सातारकर राजांनीं दिला आहे त्यामुळें वार्षिक उच्छाह होत असतो. मुसलमानांनीं चहुंकडून हल्ला केला असें पाहून हा कर्नाटकांत चिंदीस पळून गेला. व त्या वेळेस चिटणीसाचा मूळ पुरुष बाळाजी आवाजी, प्रल्हाद निराजी, अशीं निवडक माणसें बरोबर होतीं. दोनतीन वर्षें तिकडे घालवून पुन्हा दक्षिणेंत आला. तो सिंव्हगडावर मेला. त्याचा शिक्का येणेंप्रमाणें—

धर्मप्रद्योदिताशेष-वर्णा दाशरथेरिव ॥
राजारामस्य मुद्रेयं विश्ववंद्या विराजते ॥ १ ॥

राजाराम मेल्यावर त्याची स्त्री ताराऊ आईसाहेब व तिचा मुलगा एक वेडगळ होता. त्याचे नांवानें तिनें राज्य चालविलें. ही आईसाहेब हसाजी मोहिते यांची मुलगी.

सन १७०७ सालीं आवरंगजेब नगरास मरण पावला. आणि पुन्हा घोटाळा झाला. त्यांत हे दबलेले मराठे पुन्हा उभे राहिले. शाहू राजा कैदेंतून सुटला. त्यास स्वराज्य म्हणजे शिवाजीचे प्रांत व दुसरे ठिकाणची चौथाई द्यावयास आज्ञा होती; व १२००० स्वारांनिशीं निजाम उल्मुलुख याचे हाताखालीं वागावें असें ठरलें होतें. तेव्हां फौज घेऊन साताऱ्याकडे आला. तेव्हां आईसाहेबांचे मनांत राज्य सोडूं नये असें होतें, सबब हा तोतया शाहू आहे, खरा नव्हे अशी बातमी उठवून त्यास सातारा किल्ला दिला नाहीं. मग त्याणें लढून घेतला. ताराऊ व तिचा पुत्र शिवाजी यांस वारणा नदीकडील मुलूक देऊन आलीकडील आपण घेतला त्या शिवाजीचा वंश करवीरकर राजे आहेत. याप्रमाणें बंदोबस्त होऊन पुढें श्रीवर्धनकर भट बाळाजी विश्वनाथ यांस मुख्य प्रधान

केल्यापासून त्याची भरभर चालली. व मराठे सरदार सर्व जोर पावून निजामास मोजीनातसे झाले. सर्व हिंदुस्थानभर त्यांणी झेंडा लाविला या राज्याची कारकीर्द ही मराठ्यांची मोठे पराक्रमाची वेळ होती. याचें राज्य चैत्र शुध्ध १ शके १६२९ पासून शके १६७१ मार्गशीर्ष वद्य ३ शुक्रवार पावेतों, म्हणजे इसवी सन १७४९ पर्यंत ४१ वर्षें मोठी भरभर होऊन चाललें. याची वडील बहिण भवानीबाई म्हणून होती ती सक्राजीराजे माहाडीक तारळेकर यांस दिली होती. ती सती गेली. तिला अंदण तारळें महाल दिला आहे. तो तिच्या वंशाकडे अद्याप चालत आहे. याचा जन्म १६०४ शके वैशाख वद्य ७ मितीस झाला. यास १६१४ शकांत कैद केला. १६२९ शकांत परत साताऱ्यास आला. याचा मृत्यु २६ दिसेंबर १७४९ रोजीं झाला. यास ४ स्त्रिया होत्या. एक जाधव यांची व दुसरी घाडगे यांची. त्या अगोदरच मैयत झाल्या. पुढें मोहिते यांची मुलगी सगुणाबाई ती मयत झाली. पुढें थोडे दिवसांनीं शाहू मेला. तेव्हां सकवारबाई शिरके याची मुलगी होती, ती सती गेली. याचे मरणानंतर मुख्य प्रधान बाळाजी बाजीराव यांणीं सातारचें राज्यमंडळ आटोपून राज्यकारभार पुण्यास आणिला. व राज्यास एक दत्तक रामराजा म्हणून एक मुलगा ठरवून त्यास किल्ल्यावर साताऱ्यास ठेऊन लाख रुपयांचें उत्पन्न ठरवून दिलें. शाहूराजाचा शिक्का येणेंप्रमाणें—

वर्धिष्णुर्विक्रमो विष्णुः सा मूर्तिरिव वामनी ॥
शंभुसूनोरसौ मुद्रा शिवराजस्य राजते ॥ १ ॥

१ रामराजे यांस इसवी १७५० सांत बसविलें. त्यांचा काळ मिती मार्गशीर्ष शुध्ध ११ शके १६९९ इसवी १७७७ सालीं झाला याचा शिक्का :—

गौरीशंभुवरप्राप्तप्राज्यसाम्राज्यसंपदः ॥
शिवसूनोरियं मुद्रा रामराजस्य राजते ॥ १ ॥

त्याची स्त्री सगुणाबाई तिजला सकूबाई मुलगी होती. ती महाडीक दुर्गोजीराजे तारळेकर यांस दिली. पुत्र नाहीं सबब चतरासिंग भोसले वाईकर यांचा भाऊ विठूजी यास शाहू असें नांव देऊन शके १७०१ इसवी १७७९ सालीं गादीवर नाना फडणवीस यांणीं बसविला. तो इसवी १८०८ शके १७३० सांत मरण पावला. याचे कारकीर्दींत चतरसिंग याणें बंड केलें. व पेशव्यास काढून राजास स्थापावें असें मनांत आणिलें. परंतु तें सिध्धीस गेलें नाहीं. परशरामपंत पटवर्धन याणें त्याचा पराभव करून तो पळाला तो हिंदुस्थानांत गेला. त्याजबराबर बापू कान्हे फडणवीस गेले होते. पुढें ते सांपडले. त्यांस बाजीरावानें कांगोरीचे किल्ल्यांत ठेविलें होतें. याचा शिक्का येणेंप्रमाणें. शाहूस आबासाहेब असें म्हणत होते.

श्रीशंभोः पादकमल-सेवाऽभीष्टदशावहा ॥
मुद्रैषा शाहुराजस्य रामसूनोर्विराजते ॥ १ ॥

यांची स्त्री आनंदीबाई भाईसाहेब शिरके डेरवणकर यांची मुलगी व खंडेराव मामा शिरके सेनापती यांची बहीण. हिला तीन पुत्र होते : प्रतापसिंव्ह, शाहादजी व रामराजा. पैकीं ३ रा १८२४ सालीं मेला. प्रतापसिंव्हास इंग्रजांनीं गादीवर बसवून लहानसें राज्य त्यास दिलें. परंतु त्यास ता० ५ शपटंबर सन १८२९ सालीं पदच्युत करून काशीस पाठविला. त्याचा शिक्का होता तो :—

गौरीनाथवरप्राप्ता शाहुराजात्मजन्मनः ॥
मुद्रा प्रतापसिंहस्य भद्रा सर्वत्र राजते ॥ १ ॥

नंतर शाहाजीराजा यांस साहेब रसिडेंट यांणीं गादीवर स्थापिलें. त्याचा मृत्यु ता० ५ एप्रील १८४८ सालीं म्हणजे चैत्र शुध्द २ शके १७७० रांत झाला. त्याचा शिक्का :—

स्वस्ति श्रीशिवसंप्राप्तश्रियः श्रीशाहुजन्मनः ॥
श्रीमच्छाहाजिराजस्य श्रीमुद्रेयं विराजते ॥ १ ॥

या राजानें व प्रतापसिंव्हानें दोघांनीं दत्तक घेतले आहेत. परंतु त्यास सरकारानें वारसा नाहीं असें ठरविलें. शिवाय बंडाचे सालीं त्याजवर आरोप येऊन त्यांस दूरदेशीं कैदेंत ठेविलें आहे. सांप्रत तीन राण्यांपैकीं एक राणी सगुणाबाई आईसाहेब ही सातान्याच्या राजवाड्यांत असते.—या राणीचे संग्रहास खासगत अष्टप्रधानाचे शिक्के सोन्याचे, रुप्याचे बहुत होते, ते सर्व घेऊन विलायतेस संरक्षण होण्याकरितां पाठविले. या राणीस अडीच हजार रुपये दरमाहा पेनसन मिळतें. व कसबे बावधन, लिंब, व अर्फळ व कांहीं बागा व कुरणें मिळून २५००० रुपयांचे वसूली इनाम चालत आहेत. याचा परिणाम समजेल तेव्हां पाहूं.

राजाचे पत्रावर वर्ती राजाचा शिक्का [व] खालीं प्रधानाचा व प्रतिनिधीचा असे दोन असतात. आरंभीं "स्वस्तिश्री" हीं अक्षरें असतात. शेवटीं लेखनालंकार, अशीं अक्षरें असोन शेवटीं शिक्का असतो. त्यांत "मर्यादेयं विराजते" अशीं अक्षरें असतात. त्यानंतर राहिले ७ प्रधानाच्या संमती असतात. म्हणजे संमत सचीव, संमत मंत्री अशी संमतें लिहितात. जे जे प्रधान संमत लिहितात ते त्या पत्राची प्रत करून घेऊन त्याजवर बार असें चिन्ह करितात. याप्रमाणें राजपत्र झालें म्हणजे पूर्ण झालें असें समजावयाचें.

ता० २२ सप्टं० १८६२

[नंबर ११५]

पूर्वींची माहिती

१ मलिकंबर निसबत निजामशा नगरकर यांणीं जमीनीची पैमाष करून धारेबंदी केली. ते शके १५४८ सालीं मेले.

२ शिवनेरी ऊर्फ जुन्नर या किल्ल्यांत शाहाजीचे पुत्र शिवाजी शके १५४९ सालीं जन्मले. तेथें शिवाईदेवी आहे म्हणून तेंच नांव पुत्रास दिलें.

३ शिवाजीचे गुरु दादो कोंडदेव शके १५६७ सालीं मेले.

४ शके १५६९ सालीं शिवाजीनें पुण्याजवळ सिंव्हगड आहे तो घेतला.

५ शिवाजीस संभाजी नामक पुत्र पुरंदरावर मिती ज्येष्ठ शुध्ध १२ शके १५७९ सालीं झाला.

६ शके १६०२ त शिवाजी मेले.

७ माघ वद्य ९ शके २६०२ रोजीं शिवाजीचे गुरु रामदासस्वामी किल्ला परळी येथें समाधिस्थ झाले.

८ शके १६१० त संभाजी व त्याचा दिवाण कबजी यांस औरंगजेब यांणीं मारलें.

९ माघ वद्य ९ शके १६२१ रोजीं शिवाजीचा दुसरा पुत्र राजाराम सिंव्हगडावर मेला.

१० शके १६२९ सालीं संभाजीचा पुत्र शाहू छत्रपती हा औरंगजेबाचे कैदेंतून सुटून साताऱ्यास आला.

११ मिती मार्गशीर्ष वद्य ३ शके १६७१ रोजीं शाहूराजा मरण पावला.

१२ शके १६८२ त पानपतची लढाई झाली.

१३ वैशाख वद्य १२ रोजीं थोरले बाजीराव मेले.

१४ बाळाजी बाजीराव पेशवे शके १६८३ ज्येष्ठ वद्य ६ रोजीं परवतीवर मेले.

१५ माधवराव बल्लाळ पेशवे थेउरास शके १६९४ सालीं मेले. त्यावेळीं त्यांची स्त्री रमाबाई सोलापुरकर यांची कन्या इणें सहगमन केलें.

१६ नारायणराव पेशवे यांस भाद्रपद शुध्ध १३ सोमवार शके १६९५ रोजीं त्यांचे चुलते राघोबादादा यांणीं मारेकऱ्यांकडून मारविलें. त्यावेळीं चापाजी टिळेकर व नारोजी नाईक जासूद हेही मेले. पैकीं टिळेकर यांस जेजूरीजवळ येखतपूर म्हणून आहे तें इनाम दिलें. मारेकरी सुमेरसिंग गाडदी, महंमद इसफ, खरकसिंग व दुसरे पवार या सर्वांचें पारिपत्य केलें.

१७ नारायणराव यांची स्त्री गंगाबाई, कृष्णाजी हरी साठे यांची मुलगी, ही तेव्हां गरोदर होती. हिला मग पुरंदर येथें ठेविलें. इचे पोटीं वैशाख शुध्ध ७ शके १६९६ रोजीं सवाई माधवराव जन्मले.

१८ सवाई माधवराव यांस स्त्रिया २, रमाबाई थते यांची मुलगी व यशवदाबाई यांची मुलगी. हे आश्विन शुध्ध १५ मंगळवार शके १७१७ त मरण पावले.

१९ नारायणरावाचे बंधू विश्वासराव याची स्त्री लक्षुमीबाई पटवर्धन दिक्षित यांची कन्या. ही पानपतांत श्रीमंत पडलेल्या गर्दींत नाहींशी झाली.

२० रघुनाथ बाजीराव मार्गषीर्ष वद्य ३ शके १७०५ सालीं मेले.

२१ राघोबादादा मेले तेव्हां त्यांची स्त्री आनंदीबाई गरोदर होती. तीस कोपरगांव येथें चिमाजी अपा नामें मुलगा झाला.

२२ नाना फडणवीस शके १७२१ फाल्गुन वद्य २ रोजीं पुण्यांत मेले.

२३ शिंद्यांनीं छापा घालून मल्हारराव होळकर यांस शके १७२४ सांत मारलें.

२४ बाजीराव रघुनाथ यांस ९ स्त्रिया झाल्या. पहिली भागीर्थीबाई, भागवत यांची कन्या. दुसरी सत्यभामाबाई, मंडलीक यांची कन्या. तिसरी राधाबाई, फडके यांची कन्या. चवथी वाराणशीबाई, रास्ते वाईकर यांची कन्या. ५ वी कुसाबाई, हरीभाऊ देवधर यांची कन्या. ६ वी सरस्वतीबाई, पेंडसे यांची कन्या. ७ सत्यभामाबाई, अभ्यंकर यांची कन्या. ८ लक्षुमीबाई, मराठे यांची कन्या. ९ आठवले यांची कन्या.

२५ बाजीरावांची व इंग्रज सरकारची लढाई शके १७३९ सालीं आश्वीन वद्य ११ पासून कार्तिक शुद्ध ८ पर्यंत पुण्यावर झाली. नंतर बाजीराव पळाले.

२६ त्याच सालीं माघ शुद्ध १५ मेस बापू गोखले पडले.

२७ शके १७४९ फाल्गुन शुध्ध ६ स शनवारवाडा जळाला.

प्रधान

१ पेशवे
२ सचीव किंवा सुरणीस
३ डबीर किंवा सुमंत
४ आमात्य किंवा मुजुमदार
५ मंत्री किंवा वाकनीस
६ सेनापती
७ पंडित
८ न्यायाधीष
९ प्रतिनिधि
१० राजाज्ञा.

दरकदार

११ फडणवीस
१२ पोतनीस
१३ चिटणीस
१४ बक्षी.

राव सरदार

१ आढळराव
२ प्रचंडराव
३ आभंगराव
४ सरजेराव
५ श्रींगारराव
६ रविराव
७ परमाळराव
८ झुंजारराव
९ भालेराव
१० गंभीरराव
११ अंकुशराव
१२ विश्वासराव.

१ सेनाकर्ते
२ सरलष्कर
३ सरखेल
४ आलीजाबाहादुर
५ राजेबाहादुर
६ सेनासाहेबसुभा
७ समशेरबाहादुर
८ उमेदतुल मुलुखबाहादुर
९ सेनाखासखेल
१० सुभेदार
११ सरसुभेदार.

ता० २८ सप्त० १८६४

[नंबर ११६]

पुणें-दप्तर

आमच्या पत्रांत पुणें दप्तराविषयीं दोन-तीन वेळां मजकुर आला. तेणेंकरून पुणें-दप्तर म्हणजे काय आहे, याजविषयीं इतका गवागवा का चालला आहे अशी वाचणारास सहजच इच्छा उत्पन्न होईल. याजकरितां व मेहेरबान हार्ट साहेब रिविन्यु कमिशनर यांच्या पत्रावरून डायरेक्टर यांणीं उपयोगाचे कागद शोधण्यास कांहीं मनुष्य लाविले आहेत. त्यांसही या दप्तराचें कांहीं स्वरूप समजावें म्हणून येथें थोडासा त्याचा इतिहास लिहितों.

पेशवे यांणीं पुण्याची राजधानी स्थापिल्यानंतर कोकणांत, देशांत, कर्नाटकांत, गुजराथेंत व इतर ठिकाणीं मुलुख मिळविला. त्याचे हिशेब जाबसालीं पत्रें सुभेसरदार व पागे यांजकडून आलेलीं पत्रें, कराराच्या यादी, झडत्या, रोजकीर्दी, हुजुरांत तयार झालेल्या फडणीशी व चिटणीशी दप्तरच्या यादी, सरंजामाचे हिशेब, तोफखाने व हषम

व आठरा कारखाने, यांचे कागद व किल्ल्यांच्या झडत्या, मामलती व फुटकामाविषयींचें ठराव बंद, तहनामे, स्वाऱ्यांचे हिशेब इत्यादि कागद वर्षांत जे लिहिण्यांत येत, ते नाना फडणविस यांच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत नीट व्यवस्थेनें राहिले होते. पुढें बाजीराईत सर्व राज्यांतील व्यवस्थेची विसकटाविसकट झाली. पागा व सरदार मोडले. सरंजाम वगैरे जप्त झाले. शिंदे, होळकर विभक्त झाले. तेव्हां अर्थातच लिहिणें कमी झालें. फक्त बाजीरावाचा स्वदस्तूर लिहिलेला खासगी जमाखर्च मात्र सोनेरी व रुपेरी कागदांवर लिहित असत. व मक्तेमामलतीचे ठरावाचे कागद ठेवीत असत. बाकी सर्व मोडलें. तर्जुमे व घडण्या व कीर्दी व मसलती व स्वाऱ्या यासंबंधीं सर्व लिहिणें बंद झालें. याप्रमाणें हें दप्तर पेशवाईअखेर सरकारास सांपडलें त्याची व्यवस्था यलफिनस्टनसाहेब यांणीं जुनें लोक रा० रावजी पेंडसे इत्यादिक ठेवून करविली. त्यावेळेस मुख्य कागद ग्रांटसाहेब व ब्रिकसाहेब यांणीं निवडून इतिहासाचे उपयोगास घेतले. त्यांपैकीं कित्येकांचे तर्जुमे करून एसियाटिक जर्नलमध्यें ब्रिकसाहेबांनीं परोपकारबुध्दीनें छापिले आहेत. त्यांपैकीं कांहीं लिहितों : थोरले माधवराव व राघोबादादा यांची ठरावयाद; थेऊरास माधवराव यांचे मरणसमईं व्यवस्थापत्र झालें तें; हरिपंत फडके व त्रिंबकराव मामा यांची करनाटकस्वारींतील पत्रें; रमाबाई सती गेली त्यावेळचे कागद; नाना फडणबिसांनीं आपले हातानें सबंद लिहिलेली [–], इत्यादि. याप्रमाणें छापून त्याचे खालीं इतका शेरा ब्रिकसाहेबांचा आहे कीं, या कागदांवरून मराटे लोक केवळ जंगली जनावरांप्रमाणें नाहींत असें युरोपियन लोकांस वाटल्यावाचून राहाणार नाहीं. कारण कीं, माधवराव यांणीं मरतेसमईं नाना व सखारामपंत यांजकडून व्यवस्थेची कलमबंदी याद व आपले बायकोविषयीं जो लेख लिव्हवला आहे, त्याजवरून युरोपांतील चांगले लोकांपेक्षां त्याची बुध्धी कांहीं कमी नाहीं असें साफ दिसतें. असो. याप्रमाणें पूर्वी सरदारांची सवड झाली त्यानंतर कांहीं दिवस हें दप्तर पंचांचे हवालीं केलें होतें. पुढें गोल्डस्मिथसाहेब यांणीं आपलेकडे घेऊन त्याचा उपयोग फार आहे असें ठरविलें. नंतर कोपरसाहेब यांजकडे आलें. त्यांणीं लोकांचीं दप्तरें घेऊन त्यांत टाकिलीं. त्यामुळें दप्तर फार वाढलें.

याचा उपयोग – यांत हिशेबावरून कोणाचा प्रांत कधीं आला व त्याचें उत्पन्न काय होतें हें समजेल. रोजकीर्दीवरून नवें सरंजाम, इनाम कोणास दिलें तें समजेल. किल्ल्याचे हिशेबावरून किल्ल्याचे बंदोबस्त कसे होते हें समजेल. अनेक प्रकारची माहिती जाबसाली कागदावरून समजेल. पेशव्यांचे गादीवर जो असे त्याजकडे बाहेर स्वारीवर गेलेले सरदार यांचीं पत्रें व बाहेरचे राज्यांत वकील होते त्यांजकडून आखबारी येत त्याचे जाब व साताऱ्यास राजाकडे पत्रें जात त्यांत झालेली हकीकत पेशवे लिहून पाठवीत – जसें वसयी घेतली तेव्हां चिमाजी बाजीरावाचीं पत्रें पुण्यास व दुसरे सरदारांस गेलीं तशींच पानपताचे स्वारीचीं, श्रीरंगपट्टणचे स्वारीचीं, गुजराथचे स्वारीचीं

आलेलीं व गेलेलीं, यांत सर्व हकीकत सांपडेल. तसेच माधवराव मेल्याचे वेळचीं व नारायणराव मेल्यावेळचीं पत्रें उपयोगी आहेत. सातारचे राजाचें जुनें दप्तर शाहूचे वेळचें वगैरे तपासलें असतां अनेक प्रकारची माहिती मिळेल. परंतु यांस वेळ, माहिती व श्रम पाहिजेत. मे. हवार्डसाहेबांवर हें काम सोपलें आहे. त्याअर्थीं त्यांणीं जाबसाली पत्रांची व्यवस्था काय झाली ती शनवारवाड्यांत जळालीं किंवा जुनरास भिजलीं किंवा शिलक आहेत, याची नीट चौकशी केल्यास बरें पडेल. माहितगार म्हणतात कीं, जाबसाली पत्रें बहुत होतीं आणि तीं इनामाचे चौकशीच्या उपयोगी नाहींत म्हणून भिजविलीं असावींत. जर असें झालें असलें तर निमे इतिहास गेला असें समजावें.



ता. २५ आगस्ट १८६२

[नंबर ११७]

युरोपखंडांत प्रवास

जो चार देशाचें पाणी प्याला तो कोठेंही ठकला जाणार नाहीं, ही म्हण आमचे लोकांत प्रसिध्ध आहे. त्याप्रमाणें पहातां, जे खेड्यांत राहाणारे शेतकरी लोक आणि त्यांचेच बंधू जे भाडे वगैरे कामाच्या कारणानें देशोदेशीं फिरतात, ह्या परस्परांमधील भेद पाहातां देश फिरणारा हुशार असतो हें बहुधांचे लक्षांत आलें असेल, यांत संशय नाहीं. आतां खेड्यांतील लोकांपेक्षां शहरांतील लोक हुशार असतात, व शहरांतील लोकांपेक्षां राजधानींतील लोक हुशार असतात असें दिसण्यांत येतें. यावरून असें दिसतें कीं, जेथें अनेक विद्वान, अनेक वर्तमानपत्रें, निरनिराळ्या देशाशीं व्यापाराची घडामोड, निरनिराळ्या विषयांवर होणाऱ्या अनेक सभा, राजकीय कारभार इत्यादि गोष्टी भरभराटीनें चालू आहेत अशा ठिकाणीं रहाणाऱ्या साधारण लोकांस सहाजीक ज्ञान प्राप्त होऊन सदसद्विचारी होतात. मग जे विद्वान आहेत ते सर्व प्रकारें चांगले होतील यांत संशय नाहीं.


इंग्लिश लोकांचें आपले देशांत राज्य होण्याचे पूर्वीं येथील कायदे, विद्या, कलाकौशल्य, रीतिभाती, देशाभिमान, राजा म्हणजे काय, पृथ्वी कशी व केवढी आहे, पुस्तकें सर्व लोकांस थोड्या किमतींत मिळण्याचा प्रकार, मनुष्याचें कर्तृत्वकर्म, राजकीय कामांत दक्षता, समुद्रांतून परदेशांत जाणें इत्यादि गोष्टींविषयींचें ज्ञान कसें होतें व हल्लीं त्यांत किती अंतर पडलें आहे, हें मुंबईसारख्या मोठ्या शहरांत जे लोक येऊन जातात त्यांचे पूर्णपणें ध्यानांत येतें. आतां मुंबई, कलकत्ता, मद्रास इत्यादि शहरांत युरोपियन लोकांच्या सहवासामुळें जे अमूल्य कारखाने, यंत्रें, कलाकौशल्य, वगैरे दृष्टीस पडतें तें

त्यांच्या देशाशीं ताडून पाहिलें असतां कांहींच नाहीं असें आपल्यासही अनुमान होतें. व तिकडून जे लोक जाऊन आले तेही सांगतात.

जे लोक मुंबईस येऊन टंकसाळ, गिरण्या, गोदी, सुताचे कारखाने, बंदरावरील माल, मोठमोठाल्या इमारती, इत्यादी अनुपम कृत्यें पहातात, ते आश्चर्यभरीत होऊन ही विश्वकर्म्याचीच नगरी आहे कीं काय असें म्हणूं लागतात; तर यापेक्षां शतपट आनंद होण्यासारखीं जीं युरोपदेशांतील शहरें, तीं पाहणें किती सुखकारक व हितावह आहे हें साहजिक मनांत येईल. निरनिराळे देश पाहाणें हें एक ज्ञानी होण्याचें मुख्य साधनच आहे. तर्कज्ञानी झाले असतां अनेक लोक ज्ञानी होतील. अशा लोकांनीं ही गोष्ट मनावर घेतली पाहिजे. असे लोक कोण म्हणाल तर आमचे देशांतील राजे, संस्थानी [क], जाहागीरदार व श्रीमान, ह्या लोकांनीं मनावर घेतल्याखेरीज युरोपखंडांतील प्रवासाचा प्रघात पडून आपल्या देशाचें कल्याण व्हावयाचें नाहीं. कारण या गोष्टीस हजारों रुपये खर्च होईल, तो करण्यास त्यांच्याशिवाय दुसरे समर्थ नाहींत. हल्लीं आमचे लोकांत असा प्रकार आहे कीं, ज्यांस स्वदेशाच्या फायद्याच्या गोष्टी दिसतात ते दरिद्री आहेत. व जे श्रीमान आहेत त्यांस त्या गोष्टीचा वासही नाहीं. युरोपखंडांतील लोकांकडे पाहिलें असतां असें दिसतें कीं, जे संपतिमान असतात ते मोठे विद्वान व शाहाणे होतात. त्याचप्रमाणें राजाही पूर्वी शाळेंतील विद्याभ्यास संपऊन निरनिराळे सुधारलेल्या देशांत फिरतो. तेणेंकरून त्यास आपला देश म्हणजे काय, प्रजेचा आपला संबंध कशा प्रकारचा आहे, आपलें कर्तव्यकर्म काय वगैरे गोष्टी साहजीक कळून येतात. राणीचा वडील पुत्र ज्यास प्रीन्स आफ वेल्स असें म्हणतात, तो आमेरिका वगैरे देश फिरून नुकताच विलायतेस गेला हें आम्हीं आपल्या पत्रीं लिहिलेंच होतें.

तर देशांतर करणें हें ज्ञानवृध्धी होण्यास हेतुभूत असून त्याजपासून जिवास विलक्षण समाधान व आनंदही होतो. तर आमचे राजे, जाहागीरदार वगैरे लोक, ही गोष्ट मनावर घेतील तर त्यांचें हीत होऊन प्रजेचें कल्याण होईल. मनुष्य घरीं बसेल तर त्यास निरनिराळ्या सुखदायक व कल्याणकारक वस्तु जगांत आहेत, हें समजावयाचें नाहीं. मग त्या आपणास असाव्या अशी इच्छा तरी कोठून होणार? सर्वांस अनुभव आहेच कीं, आपण बाहेर गेलों आणि चांगली वस्तु दृष्टीस पडली तर ती आपणांस असावी असें वाटतें. अगर कोणी घरीं आणली तरीही तसें वाटतें. याचप्रमाणें युरोपासारिख्या सुधारलेल्या खंडांत गेलें असतां तिकडील विद्या, कलाकौशल्य, मोठमोठालीं तारवें व बंदरें, सर्व पृथ्वीवरील देशांशीं व्यापार, निरनिराळे अवाढव्य व आणि चित्तवेधक कारखाने, कधीं जन्मांत पाहिले नाहीं असे विलक्षण पदार्थ, ह्या सर्व गोष्टी पाहून आमच्या राजांच्या मनांत त्या सर्व गोष्टींची माहिती करून घेण्याची इच्छा उत्पन्न होईल. मग अर्थातच ते त्या गोष्टी आपल्या देशांत चालू होण्याविषयीं यत्न करतील, यांत संशय नाहीं. हल्लीं ते जो आनंद म्हणून मानितात तो या आनंदापेक्षां फारच

कमी आहे, असें त्यांचे चित्तास वाटूं लागेल. आतांच जर ते मुंबईसारख्या शहरांत आले आणि येथील मोठमोठाल्या व्यापाऱ्यांचे वाडे, त्यांतील सामान व सभोंवतील बाग वगैरे पाहातील तर आपला राजवाडा ह्या गरीब व्यापाऱ्यांपुढें तुच्छ आहे असें त्यास वाटेल. याचें कारण काय हें पाहिलें, तर त्यांच्या राजवाड्यांस ह्या व्यापाऱ्यांचे वाड्यांपेक्षां दसपट अधिक खर्च झाला असेल. परंतु बांधण्याचें व रचनेचें सौंदर्य नसून पदार्थही तसे नसतात. तर आमच्या राजादिकांनीं मुंबईसारखीं शहरें पाहून विलायतेस जाण्याचा प्रचार घालावा. तेथें आपल्या लोकांकरितां एक मोठा वाडा बांधून ठेवावा. असें केल्यानें तेथील सरकाराशीं अधीक सलगी पडून आपलें कल्याण होण्यास मोठा मार्ग होईल. या गोष्टीनें त्यांचें स्वतःचें कल्याण होऊन हल्लींपेक्षां शतपट अधीक सुख होईल. मग अर्थातच प्रजेचें कल्याण केल्यासारखें होऊन ती त्यांचे गुण गावूं लागेल. विषय लांबला म्हणून पुरें करितों. परंतु पुढें लौकरच या गोष्टीकडे आम्ही आणखी वळूं.



ता. २५ आगस्ट १८६२

[नंबर ११८]

कंपनीसरकारचे कारकिर्दीची अखेर

या कंपनीच्या कारकिर्दीत बहुत अन्याय झाले. त्यांचीं उदाहरणें पाहूं जातां थोडीं सांपडतील असें नाहीं. मुंबईचे लगत आंग्र्यांचें संस्थान आहे. त्या संस्थानाचा मूळपुरुष राघोजी होता. त्यास दोन पुत्रः वडील मानाजी व धाकटा जयसिंग. मानाजीचा पुत्र राघोजी व राघोजीचा कान्होजी. हा सन १८४० सालीं मरण पावला. तेव्हां धाकटे वंशांतील जयसिंगाचा लेंक येसाजी व त्याचा पुत्र जयसिंग, म्हणजे कानोजीचा सखा चुलतभाऊ, याणें दावा केला कीं, हें संस्थान आमच्याकडे चालावें. परंतु त्याचें न ऐकतां वडील पुत्र याचा वंश नाहीं सबब संस्थान खालसा करावें असा ठराव झाला. याचा हेतू सरकारांत संस्थान यावें इतकाच दिसतो. याखेरीज दुसरा कांहीं दिसत नाहीं. या संस्थानांत राज्यव्यवस्था नीट चालत नाहीं, असाही त्यांजवर एक दोन वेळां आरोप आणिला. परंतु तोही खरा होता असें नाहीं. हें संस्थान खालसा केलें त्या वेळीं त्या बिचाऱ्याचें खासगी इनाम, वतन, देशमुखी, पाटिलकी वगैरे सर्व घेतलें. वास्तविक म्हटलें म्हणजे खाजगी मिळकत बेवारशी होऊन सरकारचे घरांत येण्यास त्या कुळांत कोणीएक वारस नाहीं असें झालें पाहिजे. परंतु येथें तशी गोष्ट नव्हती. तथापि दौलतीबरोबर खाजगी मिळकतीचा सुध्धां चुराडा झाला. आलीकडे ठाण्याच्या अदालतींतून जयसिंग यांस वारसपणाचें सरटिफिकिटही मिळालें आहे. परंतु त्यास पुसतो कोण? असो; असें उदाहरण

पेशवे यांचे कारकीर्दीतील शेवटचे बाजीराव पेशवे यांची जी अगदीं वाईट कारकीर्द, तींतही आढळणार नाहीं. अशा तऱ्हेचें एक उदाहरण त्या वेळीं घडलें, तें हें कीं नाना-फडणीस यांचें इनाम, जमीन, घर, वगैरे सर्व बाजीरावानें जप्त केलें. परंतु असें करण्यास नानाफडणवीस व बाजीराव यांजमध्यें राज्यकारणावरून मोठा द्वेष पडला होता. त्यामुळें अशी गोष्ट झाली. त्याप्रमाणेंच आंग्रे यांचें झालें असें म्हणतां येत नाहीं. कारण आंग्र्यांचे दिवाण बाबाजी बिवलकर व खुद्द आंग्रे हे आपले सरकारचे मोठे दोस्त होते. जर सरकारचें कुत्रें ह्यांचे घरीं गेलें तर त्याचाही यथायोग्य मान राहत होता. मग गवरनर साहेबांसारखे जे वेळेस जात, ते वेळेस तर काय विचारावयाचें आहे? हजारों रुपये खर्च करून व सर्व उद्योग एकीकडे ठेऊन त्यांचे आतिथ्याविषयीं झटत असत. असे आर्जवानें होते, तरी त्याचा परिणाम असा झाला. तेव्हां त्यास नीति किंवा अनीति म्हणावी?

याप्रमाणेंच सातारचे राजे सरकारचे मित्र असून नेहेमीं सरकारचा शब्द पाळीत असतात. शाहाजी राजे सन १८४८ सांत मेले, त्याचे पूर्वी सर जार्ज क्लार्क गवरनर-साहेब यांची स्वारी तेथें गेली होती. तेव्हां त्यांचें आदरातिथ्यास वीस हजार रुपये खर्च झाले. स्वतां महाराज व त्यांचे मुत्सद्दीही जसजसें सरकार सांगत गेलें तसतशी वर्तणूक करीत गेले. तरी महाराज मरतांच राज्याची जप्ती करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. यावरून लोकांस असें वाटलें कीं, कोणत्याही रीतीनें सरकाराशीं वागलें तरी आमचीं राज्यें खालसा करण्यावर दृष्ट, लोकांच्या बऱ्याकडे नाहीं. त्यावेळीं सरकारानें राज्य खालसा न करितां दत्तक मंजूर करून आपण सर्व कारभार चालविला असता तरी लोकांस इतकें वाईट वाटलें नसतें. मुसलमानी किंवा मराठी राज्यांत जे लक्षपूर्वक व नीतीनें सरकाराशीं वागत त्यांचें असें निर्मूळ कधीं होत नसे. परंतु कंपनी सरकारच्या आमलाच्या अखेरीस अगदीं ताळ सुटला. कांहींतरी निमित्तानें संस्थान खालसा करावें व त्याजबरोबर खासगी मिळकत घशांत उतरावी, असा क्रम चालला होता. नरगुंदकरा-सारख्याचें राज्यकारणानें संस्थान खालसा केलें, त्याचें लोकांस दुःख वाटत नाहीं; कारण त्यांणीं राज्यरीति सोडून भलतेच आचरण केलें व त्याचें त्यास फळही प्राप्त झालें. परंतु विनाकारण जीं संस्थानें जप्त झालीं त्याविषयीं लोकांस फार वाईट वाटत आहे. याप्रमाणेंच इनामकमिटीच्या सपाट्यांत कितीएक इनामदार चुरडून गेले आहेत. मूळ पुरुषाच्या हयातीपर्यंत इनाम चालावें असे जेव्हां फैसले झाले त्याच्या पूर्वीच ते पुरुष मेले होते. सबब त्यांचे पुत्रापासून एकाएकीं तीं इनामें हिसकावून घेतलीं. ते वेळीं त्यांची अकस्मात आकाश कोसळावें अशी अवस्था होऊन गेली. ज्या उत्पन्नावर शंभर वर्षें निर्वाह चालला होता व ज्याच्या जोरानें कितीएकानें कर्जे काढून लग्नें केलीं होतीं, घरें बांधिलीं होतीं, तें सर्व एकदम नाहींसें झालें. तेव्हां त्यांची अवस्था काय विचारावयाची आहे? आमच्या पाहाण्यांत अशा तऱ्हेचें एक उदाहरण आलें आहे तें हें कीं, चिकोडी तालुक्यांत बेडकहिळा म्हणून एक पांच-सात

हजारांचा गांव आहे. त्याचा इनाम कमिशनर यांणीं फैसला केला कीं, त्यांचे हयातीपर्यंत तो गांव चालवावयाचा. असा निकाल करून त्यांचे मुलापासून तो गांव हिसकून घेतला. हा गांव पेशवाईंत पाऊणशें वर्षें त्याजकडे चालत होता. पुढें इंग्रजी झाली तेव्हां जनरल सर टाम्स मनरो साहेब यांणीं त्याजकडे तसा चालविला. पुढें निसबिटसाहेब यांणीं सरकारास लिहून सरकारच्या मंजुरीचा हुकूम आणून दिला. असें असतांही इनाम कमिशनर म्हणतात कीं, सरकारास गैरशिस्त समजावून गांव चालू करून घेतला, तेव्हां तो खालसा करणें योग्य आहे. यावरून पाहातां मनरोसाहेब, निसबिटसाहेब व त्यावेळचे गवरनर कौंसल हे लहान अर्भकासारिखे अज्ञानी होते, व त्यांस पाहिजे त्यांनीं फसवावें असा इनाम कमिशनर यांचा अभिप्राय दिसतो. काय असेल तें असो, परंतु ही नीति नव्हे, हें उघड आहे. ज्यांनीं पूर्वी हें राज्य संपादन केलें, त्यांची कृति व कंपनी सरकारच्या अमलदाराची कृति यांत फारच अंतर पडलें. तेणेंकरून सरकारावरचा भरंवसा उडाला. असो. तें जाऊन महाराणी सरकारचें राज्य झालें आहे, व यांत संस्थानी लोक व राजे यांचा कांहीं ऊर्जित काळ आला आहे, असें दिसतें. एक तर या दत्तकाचा हुकूम मिळाला व दुसरें, हल्लीं जो इनामाबद्दल कायदा होणार आहे त्यांत आम्हांस वाटतें कीं, अशीं कांहीं कलमें येतील कीं जेणेंकरून कंपनी सरकारचें अमलांत जे कांहीं मोठमोठाले अन्याय झाले आहेत त्यांचें निवारण होईल. असें अनुमान करण्यास असें एक मूळ दिसतें कीं, हिंदुस्थानाच्या कल्याणाविषयीं झटणारे व दयाळू जे लार्ड क्यानिंगसाहेब होऊन गेले, त्यांचे प्रिय मित्र व तशा स्वभावाचे आपले प्रस्तुतचे गवरनरसाहेब आहेत. तेव्हां यांजकडून अशा कृत्यांत मदत होण्यास हरकत होणार नाहीं. त्या मयत लार्डांची कीर्ति सर्व हिंदुस्थान गात आहे. त्याप्रमाणेंच हे गवरनरसाहेब नेटीव कौंसलदार यांचीही गातील यांत संशय नाहीं. सफाई बुडालेले इनामदार यांचें सरसकट निम्में उत्पन्न जरी सोडिलें तरी त्यांस पुष्कळ आधार होऊन अनेक कुटुंबें पोसलीं जातील व त्याचा आकार दोन लक्षांहून अधिक होईल असें नाहीं. म्हणजे कितीएक लाख रुपये इनामाबद्दल सरकारांत आले आहेत त्यांतून दोन लक्ष परत जातील. परंतु तेव्हढ्यानें सरकारची सदोदित कीर्ति चालून तिचा परिमळ इतर देशांतही जाऊन पोचेल. इनामदारांप्रमाणें जाहागीरदार व सरंजामी लोक यांचे कामांतही पुष्कळ अन्याय झाला आहे. उदाहरण, कृष्णराव नीळकंठ मुजूमदार यांचे वाळकी वगैरे गांव इंग्रजींत ४२० वर्षेंपर्यंत बिनहरकत चालत असून अकस्मात जप्त केले व त्यास असें कारण लाविलें कीं, तुमचे आजे व बाप यांणीं गैरशिस्त सरकारास समजाविल्यामुळें ते तुमच्याकडे चालले होते. हें बराबर नाहीं. परंतु वास्तविक पाहिलें तर इनाम कमिशनरांनींच सरकारास गैरवाका समजाविला असें दिसतें. शंभर वर्षांहून अधिक वर्षें वारसपणा चालला असून वहिवाटदारही जिवंत आहे. व दुसरे कांहीं कारण दिसत नाहीं; असें असतां जबरी होऊन गांव खालसा होतात. तेव्हां सरकारच्या मनांत आपल्याला पाहिजे तसें आणून दिल्याशिवाय

असें घडेल काय? कितीएक लोकांस तुमचे गांव वंशपरंपरेनें चालण्यास हरकत नाहीं अशीं सरकारचीं पत्रें आलीं असतांही पाठीमागून गैरवाका समजाविल्यामुळें तुमचें गांव जप्त केलें आहे, असें इनाम कमिशनरच्या सांगणीवरून पुन्हा पत्रें आलीं. तेव्हां यास म्हणावें तरी काय? भरंवसा ठेवावा तरी कशावर? गवरनर कौंसलचे हुकुमावर? किंवा विलायत सरकारचे हुकुमावर? किंवा कशावरच न ठेवून ज्या काळीं जें घडणें असेल तें घडेल असा दैवावर हवाला ठेऊन स्वस्थ बसावें?

कोंडी रामसिंग, हैबतसिंग, व कृष्णसिंग हे तिघे पेशवेसरकारचे खानेजाद. पैकीं एकाकडे वंशपरंपरेनें सरंजाम अद्यापि चालत आहे. व दोघांचे वंश भीक मागत फिरत आहेत. याचें कारण इतकेंच कीं, दोन कंपनी सरकारचे अमलांत मेले व एक राणी सरकारचे अमलांत मेला. जो राणी सरकारचे अमलांत मेला तो बचावला. या अमलांत सातारकर महाराज व आंग्रे हे मरतेवेळीं त्यांचेंही राज्य दत्तक देऊन चालविण्यास हरकत झाली नसती. त्यांचा दोष इतकाच कीं ते पूर्वी मेले. असो. या ज्या आम्ही उदाहरणार्थ कांहीं गोष्टी लिहिल्या यांजकडे लक्ष देऊन विचार करणें हें सरकारास योग्य आहे. मुलाची कोणी खोडी काढली म्हणजे तें जसें आईकडे फिर्याद [घेऊन] जातें, तसें रयतेस फिर्याद [घेऊन] जाण्यास सरकाराशिवाय मायबाप कोण आहे? इनाम कमिटीच्या जबड्यांत सांपडून चिरडलेल्या गरिबांची जर आमचें कृपाळू सरकार दाद न घेईल तर दुसरा कोण घेण्यास समर्थ आहे?

♣ ♣

ता. २८ जुलाई १८६२

[नंबर ११९]

हिंदुस्थानचें राज्य

हिंदुस्थानचें राज्य इंग्लिश लोक करितात, हें हिंदुस्थानाचे हिताकरितां किंवा इंग्लंड देशाचे हिताकरितां, याचा विचार मोठाले सूज्ञ लोकांनीं करून असें ठरविलें आहे कीं, विशेषेंकरून हिंदुस्थानचे हिताकरितां हे लोक झटत आहेत. तर याचा विचार करण्यापूर्वी राजा असण्याची आवश्यकता कां लागते, याचा विचार करूं. या पृथ्वीवर अनेक देश आहेत व त्यांत मनुष्यांची वस्ती आहे व मनुष्यांच्या निर्वाहाचे पदार्थ परमेश्वरानें उत्पन्न केले आहेत. जर मनुष्यें दुष्ट बुध्धी सोडून आपआपल्या श्रमान उत्पन्न करून खातील व ईश्वराच्या नियमास अनुसरून चालतील तर राजाची गरज नाहीं. परंतु तसें न होतां मनुष्यें आळशी झालीं. दुसऱ्याच्या उद्योगाचें फळ आपण खावें अशी त्यांस दुष्ट बुध्धी उत्पन्न झाली. तेव्हां कितीएक मेहनत करण्याचें सोडून चोऱ्या

व खून करूं लागले. लोभी, मत्सरी, हे गरिबांस छळूं लागले, आणि ज्याचा त्यास मेहनतीचा वांटा पोचेनासा झाला. तेव्हां हें बंद करून पारिपत्य करणारा असा एक नेमण्याची आवश्यकता पडली, तेव्हां ज्या पुरुषाची या कामाकरितां नेमणूक केली तोच राजा.

आतां असा राजा नेमून आपणांसच प्रतिबंध करून घेणें हेंही बरें नव्हे; परंतु तसें केल्याशिवाय परिणाम नाहीं. जसें मेजवानी वगैरे असली आणि माशा फार झाल्या म्हणजे त्यांच्या निषेधार्थ धूर करावा लागतो. त्या वेळीं त्या धुरापासूनही उपद्रव होतो; परंतु माशांपेक्षां तो बरा, त्याप्रमाणें अव्यवस्थेपेक्षां राजाचा उपद्रव बरा, असें मानून लोकांनीं त्याच्या निर्वाहार्थ आपआपल्या वांट्यापैकीं त्यास देण्याचें कबूल केलें. मग राजा कराच्या रूपानें लोकांपासून पैसा घेऊन त्यांची चाकरी बजाऊं लागला. यावरून पाहातां राजानें नेहेमीं प्रजेच्या रक्षणार्थ दक्ष राहावें, त्यांस कोणापासून उपद्रव होऊं लागला तर त्याचें निवारण करावें, आणि ह्याबद्दल त्यांचेपासून आपल्या निर्वाहार्थ कर घ्यावा. जर राजानें असें न करितां पैसा उधळला, तर ती चोरीच होय. याप्रमाणें आलीकडचे स्वदेशीय राजे यांणीं क्रम चालविला. लोकांपासून पाहिजे तसा कर घेऊन जळमंदिरें, बागबगीचे व जनानखाने शोभायमान करूं लागले. पेंढारी व रामोशी यांस सामील होऊन रयतेस लुटूं लागले. बलात्कारानें कुलस्त्रियांच्या पातिव्रत्याचा भंग करूं लागले. अशीं अनेक पापें झालीं तेव्हां परमेश्वरानें त्यांचीं राज्यें हरण केलीं, आणि त्यांच्या जातीगोताचे नव्हेत असे अगदीं परकीय लोक त्यांचे शिरावर आणून बसविले. तेव्हां ते शाहाणे पडले, म्हणून त्यांणीं युक्तीनें सर्व बंडें मोडून टाकिलीं व आपसांतील कज्जे नाहींसे केले. हें नीटच झालें. परंतु हे परदेशांतील पडले, तेव्हां यांस आपल्या देशाचा ओढा फार, यामुळें हरएक उपायांनीं येथील द्रव्य नेऊन आपलें घर भरीत नसतील ना ? अशी शंका कितीएकांस आल्यावरून आपल्या राज्यकर्त्यांचा धर्म कोणता असावा याविषयीं ते विचार करूं लागले. तो असा कीं, आपलें घर भरण्याकरितां किंवा आपल्या लोकांस मोठाल्या जागा मिळण्यारितां कांहींएक करूं नये. लोकांचे संरक्षणार्थ अवस्य जेवढा पैसा लागेल तेवढा मात्र घ्यावा. या देशांतील लोकांची योग्यता जेवढी वाढण्याजोगी असेल तेवढी वाढवावी. राज्यकारभारांत त्यांचा प्रवेश व्हावा याविषयीं झटावें, त्यांस विद्या शिकवून शहाणें करावें, या देशांतील जीं संस्थानें आहेत त्यांचें रक्षण करावें, कराचें ओझें जितकें कमी होईल तितकें करावें, व या देशाचा पैसा याच देशाच्या सुधारणुकीकडे लावावा, इत्यादि. असें न केलें तर राजधर्माप्रमाणें अन्याय केला असें सर्व ठरलें खरें, परंतु त्याप्रमाणें अद्यापि लोकांच्या प्रचीतीस येत नाहीं. मोगल व मुसलमान हे जुलमी लोक होते खरे, परंतु त्यांच्या राज्यांतही ब्राम्हण वगैरे लोकांस मोठाल्या हुद्द्याच्या जागा होत्या, त्यामुळें लोकांची प्रीति राजावर असे व हा आम्हांस लुटण्याकरितां आला आहे असें वाटत नसे. या राज्यांत तशी गोष्ट नाहीं.

किती जरी हिंदु शाहाणा असला तरी त्याला प्रधानाची किंवा अशा तऱ्हेची जागा मिळत नाहीं. व ज्याप्रमाणें पहिले राजे हिंदूंत मिसळत त्याप्रमाणें हे मिसळत नाहींत. त्यामुळें हिंदूंस असें वाटतें कीं, हे कोणी परकी द्रव्यहरण करण्यास आले आहेत. तर ही जरी लोकांची वेडी समजूत आहे तरी ती काढून टाकण्याकरितां जितका प्रयत्न होईल तितका आमच्या दयाळू सरकारास करणें योग्य आहे. प्रस्तुत या सरकारच्याच मेहरबानीनें कलकत्त्यांत व येथें बरेच लोक विद्वान झाले आहेत. त्यांस युरोपिअन लोकांच्या जागा दिल्या असतां चांगल्या रीतीनें चालवितील असे आहेत. कलकत्त्यास बडे कोडताची सनद आली तींत १३ असामी जड्ज नेमिले आहेत, त्यांपैकीं चारपांच तरी विद्वान बाबू लोक नेमले जातील अशी आशा होती; परंतु आशा व्यर्थ गेली. आतां येथील बडे कोडतांत काय होईल तें पाहावें!

मागील सर्व राज्यांपेक्षां या राज्यांत जिकडेतिकडे स्वस्थता, रस्ते उत्तम, व्यापाराची सोय चांगली, दंगाधोपा नाहीं, वगैरे जे मार्ग आहेत तें फार स्तुत्य आहेत यांत संशय नाहीं; परंतु हिंदु लोक बहिष्कृतासारिखे ठेवले जातात येणेंकरून मात्र त्यांस अपमान केल्यासारखें वाटतें. तर आमचे नवीन गवरनरसाहेब यांस हिंदूंची पूर्ण माहिती आहे. याकरितां या गोष्टीचा ते विचार करतील असें आम्ही इच्छितों.

पेशवे यांच्या पदाचा इतिहास

१ शिवाजीचा मुळीं मुख्य प्रधान शामराजपंत म्हणून होता. त्याचा शिक्का खालीं लिहिल्याप्रमाणें सनदपत्रावर आहे :

श्रीशिवनरपती हर्षनिधान शामराजमत्तिमत्प्रधान.

२ शामराजपंत मेल्यावर मोरोपंत पिंगळे मुख्य प्रधान नेमले त्यांचा शिक्का—

श्रीशिवनरपति हर्षनिधान मोरो त्रिमल मुख्यप्रधान.

३ मोरोपंत मेल्यावर त्याचा मुलगा बहिरोपंत यांजकडे पदवी दिली. त्याचा शिक्का—

श्रीशिवनरपती हर्षनिधान मोरेश्वर बहिरव मुख्यप्रधान.

४ बहिरोपंत मेल्यावर त्याचा भाऊ निळोपंत यास पदवी दिली. त्याचा शिक्का.

श्रीशंभूनरपति हर्षनिधान मोरेश्वरसुत निळकंठ मुख्यप्रधान

५ निळोपंतावर आईसाहेबांची इतराजी झाल्यावर प्रतिनिधीकडे कांहीं दिवस प्रधानकी होती. त्याचा शिक्का—

श्रीआई आदिपुरुष श्रीशिवनरपति हर्षनिधान
परशुराम त्र्यंबक मुख्यप्रधान.

६ शाहूमहाराज आल्यावर श्रीवर्धनाहून भट या उपनांवाचे बाळाजीपंत म्हणून, जाधव यांचे पदरचे कारकून, मसलतींत व शौर्यांत चांगले निवडक, यास्तव मुख्यप्रधानाची

पदवी त्यांस देऊन दिल्लीस पाठविलें. त्याजबरोबर नाना फडणीस याचा बाप जनार्दन-राम भानु हा गेला होता. बाळाजीचा शिक्का—

श्रीशाहूनरपति हर्षनिधान बाळाजी विश्वनाथ प्रधान.

७ बाळाजी १७२० सांत मयत झाला, तेव्हां त्याचे दोन पुत्र बाजीराव व चिमणाजी आपा. बाजीराव हा मोठा पराक्रमी पुरुष. शिवाजीच्या पाठीमागें हाच म्हटला तरी चालेल. याणें सर्व हिंदुस्थान जिंकलें. शिंदे, होळकर, हे याचे पदरीं वृद्धिंगत झाले. चिमणाजी याणें कोकणांत किरस्तवांशीं लढून सर्व ठाणीं वगैरे घेतलीं. बाजीरावाचा शिक्का—

श्रीशाहूनरपति हर्षनिधान बाळाजीराव बल्लाळ मुख्यप्रधान.

८ सन १७४० सांत हा मेला तेव्हां याचे दोन पुत्र बाळाजी व रघुनाथ व चिमणाजीचा पुत्र सदाशिवपंत भाऊ असे होते. पैकीं बाळाजीपंत नाना याकडे प्रधानकी दिली. याचे कारकिर्दींत शाहूराजा मेला. तेव्हां राजमंडळ मोडून पुण्यास कारभार हा करूं लागला. याचा मुलगा विश्वासराव व सदाशिवपंत हे दोघे पानपतावर पडले. त्या दुःखानें हा पर्वतीस मरण पावला. तेव्हां त्याचे पुत्र तीन, पैकीं विश्वासराव मेला होता. बाकी माधवराव व नारायणराव हे राहिले. त्यांतील नाधवराव थोरले यांस १७६२ सालीं पदवीवर सातारचे राजे यांनीं मुकरर केलें. यांचा शिक्का—

श्रीराजारामनृपती हर्षनिधान माधवराव बल्लाळ मुख्यप्रधान.

९ सन १७७३ सालीं हा मरण पावला व त्याची स्त्री सती गेली. तेव्हां त्याचा भाऊ नारायणराव यास पदवी मिळाली. तो आठ महिने पदवीवर होता. इतक्यांत त्याचा चुलता रघुनाथरावदादा याणें त्यास ठार मारिलें. नंतर त्याची स्त्री गरोदर होती. व महादजी शिंदे व नाना फडणीस वगैरे सरदार मंडळींनीं कट करून या गर्भांतील मुलाचे नांवें राज्य स्थापिलें. रघुनाथराव इंग्रजांस शरण जाऊन मुंबईस राहिला. पुढें सवाई माधवराव याचा जन्म पुरंदरावर झाला. तेव्हां त्यास साताऱ्यास नेऊन राजाकडून प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. पुढें इंग्रजांनीं रघुनाथरावाविषयीं आपले हातून कांहीं होणें नाहीं असें समजून तळेगांवीं पराभव झाल्यानंतर राघोबास नाना फडणिसाचे हवालीं केला. त्याणें त्यास कोपरगांवीं कैदेंत ठेविलें. सवाई माधवराव माडीवरून पडून सन १७९६ सालीं मेले.

१० नंतर दौलतराव शिंदे, बाळोजी कुंजर, सरजेराव घाटगे, यांनीं कोपरगांवाहून बाजीरावास पुण्यास आणून स्थापिलें. त्याचा शिक्का—

श्रीशाहुनरपती हर्षनिधान बाजीराव रघुनाथ मुख्यप्रधान.

बाजीरावाचे बापानें अमृतराव म्हणून एक मुलगा दत्तक घेतला होता, व पुढें बाजीराव जन्मास आले; त्यानंतर चिमणाजी आपाही जन्मास आले. त्याप्रमाणें तीन मुलगे राघोबाचे होते. पैकीं दत्तकास चित्रकोटास हिंदुस्थानांत ठेविलें. त्यास आठ लाख

रुपये सालास इंग्रज देत होते. चिमणाजी, बाजीराव पळाले त्याबरोबर ते पळून गेले. याप्रमाणें प्रधानाची पदवी सन १८१७ सालीं भ्रष्ट होऊन संपली.

११ पेशवे यांचे पत्राचे शेवटीं फडणीस लिहीत. व मजूमदार "आज्ञाप्रमाण" अशीं अक्षरें लिहीत असत. शेवटीं लहानसा शिक्का, त्यांत "मर्यादेयं राजते," अशीं अक्षरें असत.

१२ बाजीराव हा मूर्ख पुरुष होता. त्याचे कारकिर्दींत मराठी लोकांस जे दुर्गुण लागले त्यांचा परिहार, आज पन्नास वर्षें त्या गोष्टीला झालीं तरी होत नाहीं. त्याच कित्त्यावर चालणारे राजे अद्याप आहेत. परंतु दिवसेंदिवस विद्यावृध्धी होत आहे व विचार वाढत आहे. यामुळें अशी आशा आहे कीं, त्यांचे दुर्गुणांचा सर्वथैव परिहार होईल.

[नंबर १२०]

मराठी राज्यांतील शिक्के

१ मराठी राज्यांत प्रत्येक सरदाराजवळ व प्रधानाजवळ शिक्के असत. या प्रकारचे अनेक शिक्के पाहाण्यांत आले. त्यांतून खालीं लिहिलेले उतरून घेतले आहेत, ते कित्येकांस त्यांचे जुनेपणावरून वगैरे चमत्कारिक वाटतील. कोणी बाटोळे, कोणी अष्टपैलू, कोणी लंबवर्तुळाकार, कोणी चतुष्कोनी असे असे केले.

२ शंकराजी नारायण सचीव, हल्लीं आहेत यांचे पूर्वज. हे सातारचे राजाचे अष्टप्रधानांत आहेत; त्यांचा शिक्का—

श्रीरामभजनासक्तनारायणजनेरियं ॥
शंकरस्य शुभा मुद्रा पूर्णेंदुरिव राजते ॥ १ ॥

३ वाईकर देशपांडे भवानीशंकर मोरेश्वर यांस पंत राजाज्ञा अशी पदवी होती. आतां त्यांचे वंशास पंत असें म्हणतात. त्यांचा शिक्का येणेंप्रमाणें—

॥ श्रीभवानीशंकरप्रसन्न ॥
॥ श्रीराजाशाहुछत्रपतीस्वामीचरणीं तत्पर ॥
॥ भवानीशंकर मोरेश्वर निरंतर ॥

४ भवानीशंकर पंत यांचा मुलगा हैबतराव याचा शिक्का—

॥ श्रीभवानीशंकरप्रसन्न ॥
॥ श्रीराजा शाहुचरणीं दृढभाव ॥
॥ भवानीशंकरसुत हैबतराव ॥

५ धनाजी जाधवराव याचा शिक्का—

॥ राजारामचरणीं दृढभाव ॥
॥ सेनापती धनाजी जाधवराव ॥

६ रतनसिंग जाधव मालेगांवकर यांचा शिक्का—

श्रीशंभोरमरसिंहस्य सुवर्णपद्पंकजं ॥
यादवस्य कुलोत्तंसो रत्नसिंहो विराजते ॥

७ फतेशिंग भोसले अक्कलकोटकर यांचा शिक्का—

॥ श्रीशिवशभूस्वामि नि शाहूभूपेंच पार्थिवोत्तंसें ॥
॥ परिणतचेतोवृत्तेः फत्तेसिंगस्य मुद्रेयं ॥

८ दुसरे फत्तेशिंग यांचा शिक्का—

॥ राजाशाहुछत्रपतिचरणीं तत्पर ॥
॥ फतेशिंग भोसले राजकुवर ॥

९ रावोजी आंग्रे यांचा शिक्का—

॥ श्रीराजारामनृपचरणीं सादर ॥
॥ मानसिंहसुत राघो वजारतमाब सरखेल निरंतर ॥

१० तुळाजी आंग्रे यांचा शिक्का—

श्रीशाहुनृपहर्षेण सरखेलसमुन्नतेः ॥
तुलसिंहस्य मुद्रेयं सर्वोत्कर्षेण राजते ॥

११ उदाजी चव्हाण, ज्याणें विजापूर महाल राजाकरितां घेतला, त्याचा शिक्का—

॥ श्रीराजाशाहुछत्रपतीस्वामीचरणीं तत्पर ॥
॥ उदाजी चव्हाण हिंमतबाहादर ॥
॥ ममलकतमदार निरंतर ॥

१२ त्र्यंबक कृष्ण, राजाचे देशमुखीचे वहिवाटदार, यांचा शिक्का—

॥ श्रीराजाराममहिपाळक सेवक कृष्णसुत त्र्यंबक ॥

१३ रघोजी भोसले नागपुरकर यांजकडे पांडवगड किल्ला व कसबे देऊर वगैरे गांव साताऱ्याजवळचे सरंजाम्यास होते; पुढें पांडवगड त्यांजकडून काढून रास्त्यांकडे पेशव्यांनीं दिला. त्या राघोजीचा शिक्का—

॥ श्रीशाहुराजपदांभोजभ्रमरायितचेतसः ॥
॥ बिंबात्मजस्य मुद्रेयं राघवस्य विराजते ॥

१४ सदरहु रघोजीस चार पुत्र, जानोजी, साबाजी, मुधोजी व बिंबाजी; पैकीं तिघांस वंश नाहीं. मुधोजी यास ३ पुत्र–रघोजी, भिमाजी व व्यंकाजी; पैकीं व्यंकाजीचा मुलगा मुधोजी अपासाहेब यास सन १८१८ मध्यें सिताबळदीचे लढाईंत राज्यभ्रष्टता प्राप्त होऊन तो पळून गेला. आणि नंतर रघोजीचा मुलगा परसोजी हा गादीवर बसला,

तो ता. ११ डिसेंबर सन १८५३ इसवी रोजीं मेला. त्याचें राज्य सरकारानें घेतलें. त्याच्या राण्या, अन्नपूर्णाबाई, आनंदीबाई, दर्याबाई व कमळजाबाई ह्या आहेत. त्यांचा दत्तक मुलगा रघोजी हा सरासरी निर्वाह करून आहे. याप्रमाणें नागपूरचे वंशाची हकीकत आहे. बंडाचे साली यार्णे सरकारास मदत केली म्हणून मौजे देऊरगांव जप्त केलें होतें तें परत या मुलास दिलें.

१५ प्रतिनिधीनें आपल्यास एक मुतालिक नेमला होता; त्याचा मुलगा गमाजी बावा. हा मोठा पराक्रमी होता. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर याचा हा व्याही. आणि पेशव्याशीं हा बिघडून विठ्ठल सुंदर याजकडे जाऊन तेथील फौज घेऊन प्रतिनिधी-सहित पुण्यावर येत होता. त्याचा राक्षसभुवनच्या लढाईंत माधवराव पेशवे यांणीं सन १७६२ सालीं पराभव केला. त्या लढाईंत हे उभयतां व्याही मेले. त्या गमाजीचा शिक्का येणेंप्रमाणें. त्याचें नांव सदाशीव होतें—

॥ श्रीशाहुनृपतिस्तस्य यमाजीतनुजन्मनः ॥
॥ सदाशिवस्य मुद्रेयं तनुते सर्वमंगलं ॥

१६ हल्लीं सदाशिव याचे भावाच्या वंशांतील अंताजी नारायण मुतालीक कऱ्हाडास आहेत, त्यांचे तीर्थरूप नारायणराव अनंत यांचा शिक्का—

श्रीभवानीप्रसन्न
श्रीराजाप्रतापसिंव्हछत्रपती महिपाळक ॥
तस्य नारायणराव अनंत आज्ञाधारक ॥

१७ यशवंतराव होळकर यांचा शिक्का—

॥ इंद्रप्रस्थस्थितो राजा चक्रवर्ती भुमंडले ॥
॥ तत्प्रसादात्कृता मुद्रा लोकेस्मिन्वै विराजते ॥
॥ लक्ष्मीकांतपदांभोजभ्रमरायितचेतसः ॥
॥ यशवंतस्य विख्याता मुद्रैषा पृथिवीतले ॥

१८ सातारकर राजे यांचा सरदेशमुखीचा शिक्का—

॥ स्वस्ति श्रीसुखदामुद्राप्रतापोत्कर्षवर्द्धिनी ॥
॥ सरदेशमुखस्यैषा शाहुराज्ञः सुराजते ॥

१९ शामराव आवाजी कोरेगांवचे मामलेदार, यांचा शिक्का—

॥ मार्तंडचरणीं तत्पर ॥
॥ शामराव आवाजी निरंतर ॥

ता. ७ जुलाई सन १८६३

[नंबर १२१]

प्राचीन कालाविषयीं

दक्षिणेंतील ज्यानें विजापूर पाहिलें नाहीं त्याणें कांहीं पाहिलें नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. हल्लीं विजापूर हा साताऱ्याचे कलेक्टराचा एक तालुका आहे. म्हणजे तेथें मामलेदाराचें एक ठाणें आहे. परंतु प्राचीन काळीं हें शहर विजयनगर म्हणून एका हिंदुराजाची राजधानी होतें. जेव्हां मुसलमान लोक दक्षिणेंत दौलताबाद हस्तगत करून शिरले, तेव्हां त्यांणीं हें शहर इसवी १५०० चे सुमारास घेतलें. आणि आदिलशाही नांवाचा वंश तेथें राज्य करूं लागला. ह्या वंशानें दोनशें वर्षें राज्य केलें. शेवटीं अलमगीर बादशहा दिल्लीहून येऊन त्यानें त्या वंशाचा नाश केला; व शहर घेऊन दक्षिणेचा सुभेदार निजाम याजकडे दिलें. तें पन्नास वर्षें तसेंच होतें. नंतर सदाशिरावपंत भाऊ पेशवे यांणीं तें १७६० म्हणजे पानपतचे लढाईपूर्वी येक वर्ष घेतलें.

या राजधानींत हल्लीं वस्ती थोडी असून खिंडारें व ओसाड घरें जिकडे तिकडे पडलीं आहेत. परंतु पूर्वी मुंबई एवढी वस्ती असावी असें दिसतें. मोठाले श्रीमंत यांचे वाडे, आराम, मशीदी, गोट, विहिरी, बुरूज इत्यादि बहुत प्रकार पाहाण्यासारखे आहेत. मोठाल्या तोफा व राजवाडे, कितीएक हिंदूंचीं जुनीं देवळें (ज्यांच्या मशीदी केलेल्या) व बादशहाच्या कबरी अशा फार चमत्कारीक जागा आहेत. आतां तें शहर पडलेल्या घरांच्या ढिगांनीं भरलें आहे. तथापि कांहीं ठिकाणें अद्याप बरींच आहेत. त्या वरच्या इमारती उभ्या आहेत. त्यांतील मुख्य :—

सुलतान महमुदचा घुमट	तोफा
इब्राम बादशहाचा रोजा	उपळ्या बुरुज
जुमा मशीद	कोट
अल्ली आदलशहाचा घुमट	अर्कंकिल्ला
भंगीमहाल.	

विजापुरच्या राजांनीं आनेगोंदीचा कृष्णराजा नरपती यास मारून त्याचें फार द्रव्य आणिलें. त्या द्रव्यानें या इमारती बांधल्या असें म्हणतात. त्या काळींच्या राजास, कोणास गजपती, कोणास हयपती, कोणास नरपती, कोणास छत्रपती असें म्हणण्याची चाल होती. त्यांतील हा राजा नरपती होता. ज्यास दक्षिणेंतील प्राचीन माहितगारी पाहिजे त्याणें हें मोडलेलें शहर अवश्य पाहावें. या राजाचे पदरीं शिवाजीचा बाप शाहाजी हा होता व शिवाजीचाही उत्कर्ष निजामपुरचे अमलांत झाला.

[नंबर १२२]

हिंदुस्थानांतील प्राचीन विद्या

हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून ग्रंथ होण्याची चाल चालत आली आहे. आरंभीं जेव्हां ब्राम्हणांनीं ग्रंथ रचिले तेव्हां लेखनविद्या ही प्रचारांत आली नव्हती, तरी ते ग्रंथ त्यांनीं घोकून घोकून पाठ करून कायम राखिले, बुड्डे दिले नाहींत. पुढें लेखन-पध्धति, ग्रंथ मनस्वी झाल्यामुळें आपोआप प्रचारांत आली. परंतु सांप्रत काळीं ब्राम्हण लोकांचे चमत्कारिक समजुतीमुळें ते अनेक शृंखळांनीं बद्ध झाले आहेत. व ग्रंथांचेही ढिगाचे ढीग पडले आहेत. यामुळें त्या ग्रंथांचा विचार होण्यास ते असमर्थ अशी स्थिती पाहून ईश्वरानें युरोपियन लोकांची या देशांत प्रेरणा केली. यांनीं हे ग्रंथ मुळापासून कसे उत्पन्न झाले, यांत काय आहे, याचा मोठा विचार चालवून त्यांपैकीं कित्येक छापूनही काढिले आहेत. यांच्या शोधापासून इंग्लंड, जर्मनी इत्यादि देशांतील विद्वान लोकांच्या द्वारें नवीन सिद्धांत उत्पन्न झाले; आणि श्रुति, स्मृति, पुराण, शास्त्र इत्यादि अमोलिक ग्रंथांचा त्या देशांत मोठा विचार चालला आहे व त्या विद्वानांच्या बुध्धीच्या प्रौढीनें हें काम कवटाळण्याजोगें आहे. त्यांनीं या ग्रंथाचा अभ्यास करून त्यांतील वास्तविक वर्में शोधून काढलीं आहेत. तीं हिंदु लोकांस माहीत व्हावीं, या हेतूनें तिकडे या ग्रंथाविषयीं काय निर्णय ठरले आहेत ते खालीं लिहून कळवितों.

पृथ्वीवर जे हल्लीं लोक आहेत त्यांपैकीं कित्येकांच्या भाषांचे नियम सारखे आढळतात. यावरून असा सिद्धांत ठरला आहे कीं, जितक्या लोकांच्या भाषा सारख्या ते, सर्व लोक कोणत्या तरी काळीं एकत्र असून पुढें भिन्न भिन्न ठिकाणीं पसरून भिन्न भिन्न राष्ट्रें झालीं असावीं. याप्रमाणें पूर्वी आर्य लोक हिंदुस्थानचे पलीकडे उत्तरेस होते. त्यांचें राष्ट्र मोठें होतें, त्यांची भाषा आर्य असून आर्य धर्म म्हणून एक वेगळाच होता. त्या लोकांपैकीं कितीएक काश्मिराकडून हिंदुस्थानांत उतरले, कांहीं युरोपखंडांत गेले. याप्रमाणें त्यांचे फाटे चहूंकडे पसरले. यवन, युरोपियन, रोमन व हिंदु हे सर्व आर्य-कुळांतील असावे, असें यांच्या भाषांच्या साम्यावरून सिद्ध होतें. आर्य लोक चोहोंकडे पसरले त्यामुळें त्यांच्या भाषेंत, रीतींत वगैरे फेर पडून त्या अगदीं निराळ्या बनून गेल्या आहेत. परंतु भाषेंतील मूळ नियम तसेच राहिले आहेत. जे आर्य हिंदुस्थानांत आले त्यांची भाषा संस्कृत झाली. मूळची त्यांची भाषा व स्थिती कशी होती याचा ठिकाण त्यावेळचा इतिहास नसल्यामुळें लागत नाहीं; परंतु ज्यांनीं निरनिराळ्या देशीं वस्ती केली असे मूळच्या लोकांचे फुटलेले समुदायांपैकीं कोणी वाणी झाले व कोणी अज्ञानी राहिले. कांहीं काळानें पुनः अज्ञानाचे ज्ञानी झाले. हे काळगतीनें झालेले फेरफार त्यांच्या ग्रंथांवरून त्या काळाच्या जवळच्या काळाची माहिती दाखवितात. या

सर्वांवरून पाहातां, हिंदु लोकांचे ग्रंथ पृथ्वीवरील सर्व ग्रंथांत जुने आहेत असें दिसतें. त्याकाळीं ग्रंथ होण्यास साधनें फार थोडीं. साधारण लोक अज्ञानी असून गुरें राखून शेतांभातांवर चरितार्थ वगैरे करणारे आणि सोपे मार्गानें ईश्वरभजन करणारे, अशी स्थिति होती असें दिसतें.

जो हिंदुस्थानाचे आंगास आर्य लोकांच्या थवा उतरला त्याबरोबर पूर्वीच्या कांहीं दंतकथा मात्र आल्या असाव्या. पुढें पंजाबांत आणि भागीरथीचे कांठीं या लोकांची वस्ती झाली आणि तेथील सुबत्तेमुळें खाण्यापिण्याचे पदार्थ भरपूर प्राप्त होऊन दरिद्र दूर झालें. मग त्यांमध्यें कोणी तपस्वी, कोणी ईश्वरभजक अशा प्रकारें ऋषि, मुनि, आचार्य इत्यादि उद्भवले. व मनुष्याचा साधारण असा नियम आहे कीं, त्यास खाण्यापिण्याचें संकट आहे तोंपर्यंत त्याचें मन काल्पनिक राज्य उभारण्याकडे पाहिजे तसें जात नाहीं. याप्रमाणें या आर्य लोकांचें मन खाण्यापिण्याची स्वस्थता होतांच प्रापंचिक गोष्टीपासून सुटून दुसऱ्याकडे लागलें. आणि त्यांतील ऋषि, मुनि इत्यादिकांचे निरनिराळे गण बनले. त्यांस पार्षद असें म्हणतात. या लोकांस लिहितां वाचतां येत नव्हतें. परंतु ईश्वराचे ऐश्वर्याचे या सृष्टींतील जे दिवस, रात्र, पर्जन्य, वायु, उदक, अग्नि, इत्यादि दाखले त्यांसच परमेश्वर कल्पून त्यावर त्यांनीं अनेक छंदांत गीतें व स्तोत्रें रचिलीं. लेखनविद्या नसते तेव्हां आठवण राहण्यास छंद फार उपयोगी पडतात. ही चाल खेड्यापाड्यांत अद्यापि चालू आहे. ती अशी कीं, तेथील लोक अज्ञानी असल्यामुळें कोणतीही एखादी गोष्ट स्मरण ठेवण्याजोगी झाली म्हणजे तिजवर पवाडा रचून तो तोंडपाठ करितात; आणि मग एकापासून दुसरा, दुसऱ्यापासून तिसरा शिकतो, आणि तो चहूंकडे प्रसिध्ध होतो, हें माहितच आहे. याचप्रमाणें प्राचीन काळीं ऋषींनीं छंदरूपानें प्रार्थिलेले देवांतून कांहीं ध्यानांत येण्याकरितां खालीं लिहिले आहेत.

मित्र	म्हणजे	सूर्य
वरुण	,,	उदक
उषा	,,	पाहाट
नक्त	,,	रात्र
इंद्र	,,	आकाश
सोम	,,	वनस्पति
अग्नि	,,	विस्तव.

यांत कितीएक ठिकाणीं दोघांचें एकत्र वर्णन केलें आहे, तें असें—

इंद्राग्नि	मैत्रावरूण
द्यावापृथ्वी	अग्नीषोम.

कांहीं काळापर्यंत ही छंदरचना चालून हे छंद म्हणून होम करीत. हाच त्या लोकांचा भजनाचा मार्ग होता. ते लोक धान्य व मांस खात असत व दोहोंचाही

होम करीत. महातत्त्वें आणि नक्षत्रें, चंद्रसूर्य इत्यादि पदार्थांस थोर मानून त्यांच्या नांवानें हवन करीत. या देवांजवळ त्यांचें मागणेंही क्षुल्लक असे. कोणी धान्य, कोणी गाई, कोणी पर्जन्य, कोणी पुत्र, कोणी धन, कोणी राज्य, इत्यादि ऐहिक पदार्थ मागत. यावरून ते साधेभोळे लोक होते असें दिसतें. जें कांहीं ते खातपीत तेंच विस्तवांत टाकीत, आणि तें देवास अर्पण झालें असें समजत. पृथ्वीवर जितकीं धर्मपुस्तकें आहेत, त्यांत अघटित गोष्टी, विलक्षण वर्णन, सृष्टिनियमाविरुध्ध कृत्यें लिहिलीं आहेत. परंतु सर्वांहून प्राचीन जो वेद त्यांत असे कांहीं प्रकार नाहींत. जशी मनुष्यरीति असावी तशी आहे. वेदांत पुष्कळ ठिकाणीं शंभर वर्षें आयुष्य मागितलें आहे. लक्ष वर्षें जगणें, चवदा चवकड्यांचें राज्य करणें, या अघटित गोष्टी ते वेळचे वैदिक लोक जाणत नव्हते.

ऋग्वेदसंहितेंत दोन भाग आढळतात. कांहीं छंद फार जुन्या भाषेंत व कांहीं सुधारलेल्या भाषेंत लिहिलेले आढळतात. याजवरून ते जुन्या भाषेंतील कदाचित आर्य देशांतून बराबर इकडे आणिले असतील, व दुसरे इकडे झाले असतील, असें दिसतें. कारण जुने छंदांची भाषा आर्य भाषेच्या जवळजवळ आहे. उत्तरोत्तर या छंदोमय भाषणांचा अधिक संग्रह होत चालला आणि जसजसा अधिक काळ गेला तसतसा त्यावर अधिक भाव बसला. पुढें नातू व पणतू हे वडिलांच्या तोंडचीं सूक्तें पाठ करून तीं भक्तिपूर्वक म्हणूं लागले. कोणाचे कुळांत पांच, कोणाचे कुळांत दहा, अशी सूक्तें जमलीं. आणि त्यांचें पठण करून सोपे रीतीनें अनुष्ठान चालू झालें. म्हणजे त्याकाळीं लेखनविद्या नसल्यामुळें या भाषणांचेंच महत्त्व वाढत चाललें. या सूक्तांत आणखी एक असाच चमत्कार आहे कीं, ज्या देवाचें सूक्त त्या देवास त्या सूक्तामध्यें परमेश्वर व सृष्टिकर्ता आणि इच्छित देणारा असें मानिलें आहे. याजवरून छंद करणाराचें मत असें दिसतें कीं, परमेश्वराचें नांव व स्थल ठाऊक नाहीं, तर एखादा सृष्टींतील ठळक पदार्थ लक्षून होम करावा म्हणजे त्यास पोंचतो. म्हणून पर्जन्याचें सूक्त पाहिलें तर त्यांत पर्जन्यासच सर्व थोरपणा दिला आहे; वरुणाचे सूक्तांत वरुणास, इत्यादि. यावरून परमेश्वर एक, पण त्याचे अंश अनेक या जगांत आहेत अशी त्यांची समजूत होती. त्यावेळीं देश विस्तीर्ण असून वस्ति नूतन, यामुळें जमीनीचे अगर भाऊबंदकीचे तंटे नवते. ऋषि सुंदर मोठाल्या अरण्यांत गुरांढोरांसुध्धां राहून स्वस्थ स्वामित्व भोगीत असत, आणि प्रजा अधिक होईल तर चांगलें या फिकिरींत असत. या वसाहतींच्या आरंभीं राजाची गरज नव्हती. जो कुटुंबास वडील तोच त्या कुळाचा राजा; त्याचे आज्ञेंत त्या गोत्रानें वागावें. त्या गोत्रांतील होम करण्याचीं जीं पूर्वापार म्हणत असलेलीं सूक्तें तीं व कांहीं नवीन करीत तीं, मिळून काय ती त्या वेळची विद्या होती. अशा प्रकारें मुळारंभीं छंदांची उत्पत्ति झाली. हे छंद अनेक कुळांत अनेक उत्पन्न झाले, व ह्या अशा भजनाचा मार्गही बहुतकाळपर्यंत चालला. मग जों जों लोक वाढत चालले तों तों होमहवनेंही वाढत चाललीं. आणि तीं करण्याकरतां ब्राम्हणवर्ण स्थापिला. या वर्णानें तीं सूक्तें पाठ करून, कोणाचे घरीं

होमहवन केलें असलें म्हणजे त्याची सिध्धता त्यानें करावी असा पाठ पडला. अशा प्रकारें ब्राम्हणांचे स्वाधीन वेद होत गेले. पुढें याप्रमाणें बराच काळ गेला.

ब्राम्हणांनीं हीं सूक्तें जमा करून त्यांची संहिता (जमाव) केली. त्या वेळेस जितकीं सूक्तें आढळलीं तितक्यांचा संग्रह केला. त्यांत प्राचीन व नवीन सर्वच आलीं. त्यांत पर्जन्यसूक्तापेक्षां पुरुषसूक्त नवीन आहे. हें संस्कृत भाषेचा ज्यास परिचय आहे तो सहज ओळखील. म्हणजे, स्मृतींतील श्लोकांत व पुराणांतील श्लोकांत जसें भाषेचें अंतर आहे तसें यांतही दिसून येतें. प्रत्येक सूक्तास व त्याच्या ऋचेस मंत्र असें थोर नांव पडलें. हे छंद चालू होऊन बहुत काळ झाला, व देशांतरही झालें. त्यामुळें त्यांच्या मूळ कर्त्याचा ठिकाण नाहीं. परंतु ज्या ब्राम्हणांच्या कुळांत जीं सूक्तें चालू होतीं त्या कुळांनीं आपला कुळधर्म असें समजून तीं जपून राखिलीं त्या त्या कुळांच्या मुख्य पुरुषाचें नांव त्यांच्या सूक्तांस दाखल आहे. हें शौनकानें अनुक्रम ग्रंथ केला आहे. त्यांत दर सूक्ताचा, ऋषि, छंद, देवता व ऋचांची गणती हीं दाखविलीं आहेत, त्यावरून समजतें. हे ऋषी, त्या सूक्तांचे कर्ते नव्हत, तर मंत्रद्रष्टे आहेत असें लोक मानितात. ह्या ऋषींपैकीं कित्येकांचीं नांवें :-

मधुच्छंद	कण्व
हिरण्य स्तूप	गृत्समद
दीर्घतम	वशिष्ठ
एलूश	विश्वामित्र
असित	वामदेव.

यांत ब्राम्हण, क्षत्रिय, कोळी इत्यादि आहेत. यावरून शूद्रादिकांसही वेदाध्ययनास त्या काळीं निषेध नवता हें सिद्ध आहे.

सर्व ग्रंथांत जुना ग्रंथ आणि वेदांत पहिला वेद असा ऋग्वेद, त्याची संहिता एक अक्षरही न बदलतां जशीच्या तशीच कायम आहे. तिची संख्या :--

अष्टक.....	८
अध्याय.....	६४
वर्ग (कडवीं).....	२००६
ऋचा (ओवी).....	१०४१७
पदें (शब्द).....	१५३८२६
अक्षरें.....	४३२०००

संव्हितेचा दुसरा भाग कल्पिला आहे त्याची संख्या :—

मंडल (दर्शक)	१०
सूक्त (प्रबंध)	१०१७
अनुवाक (कडवीं)	२००६.

सूक्तें अनेक छंदांनीं रचिलीं आहेत. एका सूक्तांतही कधीं दोन तीन छंद असतात; निरनिराळे छंद असतात. निरनिराळे छंद झाले आहेत त्यांतून कितीएकांचीं नांवें :—

गायत्री	त्रिष्टुप्
उष्णिक्	बृहती
जगती	अनुष्टुप्
पंक्ति	अष्टी
एकपद	द्विपद.

ही संहिता पुस्तकाशिवाय तोंडानेंच म्हणण्याचा पाठ चालू असल्यामुळें कितीएकांच्या श्रवणांत निराळे पाठ होते. त्या पाठभेदास शाखा हें नांव पडलें; एक शाखेचें पठण करणारास चरण हें [नांव] पडलें. एकएक चरणानें एकएक पाठ (शाखा) ग्रहण केला. असे जे शाखास्थापक वाष्कल, शाकल, सांख्यायन इत्यादि ऋषि, त्यांस शाखाप्रवर्तक म्हणतात. चरणव्यूहांत ऋग्वेदाच्या शाखा ८ असें लिहिलें आहे. वेदाचें अक्षर बदलूं नये असें मत चालू होतें. त्याकरितां सर्वांनीं एकमतें एकच पाठ कायम करावा तसें न करितां, आग्रहानें आपाआपले पाठ चालू ठेविले. हे पाठ कायम राखण्याकरितां सूक्तें पाठ करीत व त्यांचीं पदें (वेगवेगळे शब्द) म्हणत. त्या पदांवरून क्रम, जटा इत्यादि प्रकारें म्हणण्याची चाल पडली. ऋग्वेद सर्वांत आद्य हें प्रसिध्धच आहे. व हें त्याच्या रचनेवरून सिध्ध होतें.

ता. १ फेब्रुवारी १८६४

[नंबर १२३]

हिंदु लोकांच्या मोठ्या अडचणी

जे सुज्ञ आहेत त्यांनीं जर विचार करून पाहिलें तर या देशाचें ऊर्जित होण्यास ज्या अडचणी आहेत त्यांतील लोकांच्या हातून निघण्याजोग्या ज्या आहेत, त्यांतही मुख्य पाहिल्यानंतर तीन दिसतात. एक–जात, दोन–स्त्रियांची स्थिति, आणि तीन–लहानपणीं लग्न.

आतां जातीविषयीं आपण विचार केला तर असें दिसतें कीं, लोक जेथें उत्पन्न होतात तेथें त्यांची प्रत लागल्याखेरीज राहणार नाहीं. सृष्टीमध्यें सर्व पदार्थ उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे निघतात. तदनुसार मनुष्यामध्येंही आहेत आणि हा भेद सर्व देशांतही आहे; केवळ हिंदु लोकांमध्येंच आहे असें नाहीं. परंतु हिंदुंमध्यें अंतर इतकेंच कीं, प्रथम कुलपरंपरेनें जातिधर्माचा भेद स्थापित होऊन त्यावर चांगल्यावाईटाची दुसरी

प्रत लागली आहे. आतां मूर्ख ब्राम्हण शाहाण्या कुळंब्यापेक्षां अधिक मान पावतो असें तर होत नाहीं; परंतु धर्मसंबंधीं जितके हक्क आहेत तेवढे त्यास मिळतात. व ते हक्क दुसऱ्यांनीं लोभ करण्यासारखे नाहींत; असें असतांना जात नाहींशी व्हावी असा हेतु धरण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु जातीवरून ज्या अदावती आहेत त्या मात्र नाहींशा व्हाव्या हें ठीक आहे. म्हणजे अदावतींमुळें लोकांस विभक्तपणा विनाकारण येऊन अधिक निर्बळता येते. आणखी, अदावतींमुळें एक जात अधिकारी झाली तर दुसऱ्या जातीचे लोकांचे मनांत दुष्टपणा येतो. ब्राम्हण वाढले तर इतरांस वाईट वाटतें. आणि त्यांचें वाईट करण्याविषयीं ते कट करितात. आणि त्यांचें वाईट होईल तेव्हां तेव्हां आनंद पावतात. शेवटीं त्यांचा नाश होऊन हे चांगले स्थितींत येतात तों दुसरे जातीचे लोक त्यांशीं तसाच द्वेष करितात. असें होतां होतां सर्व काळ द्वेषांतच जातो; कोणाचेंच कल्याण होत नाहीं. मनांतील वांकडीं जातच नाहींत. एकमेकांचें उणें काढीत काढीत आपसांत आपले आपणच शत्रु होतात. सर्व जातीचे लोक आपले स्वदेशीच एकच आहेत. त्यांत कोणाचेंही कल्याण झालें तरी तें चांगलेंच आहे, अशी बुध्धी जर सर्व जातीचे लोकांस होईल तर जात असल्यापासून कांहीं अनर्थ आहे असें दिसत नाहीं. आतां मुळीं जात ही कर्मावरून व्यवहारार्थ झाली. परंतु मोठेपणाचा लोभ सर्वांस आहेच. त्यांत वतनदारी असावी असेंही सर्वांस वाटतें. हिंदुस्थानांत भंगी देखील वंशपरंपरेचा असतो. व न्हावी म्हणतो कीं, माझे वंशानें माझे गांवांत हजामती कराव्या, व कुंभार म्हणतो मीच मडकीं घडावीं. तर ब्राम्हणांनीं आम्ही वंशपरंपरेचे ब्राम्हण असें कां म्हणूं नये? याचें कारण नाहीं. परंतु आतां वंशपरंपरेचा जो ठराव मानला गेला त्यापासून गुणांची अगदीं हानि झाली असें नाहीं. विद्वान ब्राम्हण, पाणक्या ब्राम्हण, खरा ब्राम्हण, लबाड ब्राम्हण, यांचा भेद होऊन ज्याची योग्यता जशी त्याप्रमाणें त्याला लोक मानितात. तुकाराम शूद्र असून त्यास ब्राम्हणदेखील त्याचे गुणावरून मानितात यांत संशय नाहीं. आतां जातीमुळें अन्नोदक-व्यवहाराची अडचण आहे. ती सर्व लोकांस कबूल आहे, व तिचा कोणी अपमान समजत नाहीं. ब्राम्हण आपणांस पंक्तीस कां घेत नाहींत असा दावा शिंदे-होळकरदेखील सांगत नाहींत. व तें कलम अगदीं आंगवळ्यास पडून गेलें आहे. आतां परदेशास जाण्यास ब्राम्हणांस मनाई होते अशी कोणी तकरार करील, तर ब्राम्हणांची जात परदेशांत गेल्यानें बुडते असेंही घडत नाहीं. कारण आपध्धर्म सांगितले आहेत त्याप्रमाणें, प्रवासांत, नौकेंत, बाजारांत, व काळदुष्काळसमयीं अनाचार झाला तरी चिंता नाहीं असें शास्त्र आहे. त्यापेक्षां ही हरकत ही लागू पडत नाहीं. दादासाहेब पेशवे यांनीं आपले वकील आबा काळे यांस पेशवाईंत विलायतेस पाठविलें होतें. त्यांस कोणी जातीबाहेर ठेविलें? व हल्लीं एडन आर्बस्थानांत आहे तेथें व इराणांत व कराचीस, सिंधूनदीचे पलीकडे किती ब्राम्हण जातात व येतात; तेव्हां ही हरकत आतां मोडल्यासारखीच आहे. व पूर्वीही होती असें दिसत नाहीं. अश्वमेधांत अश्वामागें उत्तरसमुद्रापर्यंत ताम्रध्वज,

मयूरध्वज यांचे राज्याचे पलीकडे म्हणजे हल्लींचे रशियन लोकांचे देशांत धर्मराजाचा भाऊ अर्जुन गेला होता व तेथून बकदालभ्य ऋषी, जो ब्रम्हनिष्ठांत गणिला आहे त्यास समुद्राचे एका वेटांतून आणिला म्हणून भारतांत व जैमिनीअश्वमेधांत कथा आहे. तसेंच भास्कराचार्य आदिकरून यवनदेशांत जाऊन 'ताजक', 'रमल', हे त्यांजवळ शिकून आले, व त्यांनीं मग त्यावर संस्कृत ग्रंथ केले. त्यांत अद्यापि कितीएक आरबी शब्द राहिले आहेत तेच आहेत. याप्रमाणें पूर्वीचे ब्राम्हण उद्योग करीत होते, हें सिद्ध असतां जर हल्लींचे ब्राम्हण गैरमाहितीनें हरकत करतील तर त्यांचे मनांतील अज्ञानपणा कसा जाईल ? धर्मशास्त्राचें मुख्य तात्पर्य असें आहे कीं, मोठे कामांत जो मनुष्य आहे त्यास लहान कामानें बाध येत नाहीं. यास उदाहरण, ब्रम्हचर्य ज्या ब्राम्हणास आहे त्यास सुतक येत नाहीं. त्याचें कारण, त्याचे अभ्यासास हरकत पडेल. दुसरें, वैद्यास विटाळ नाहीं. याचें कारण, तो बाळंतिणीस शिवणार नाहीं. तसेंच युद्धास जे गेले त्यांत मुलाचा बाप मेला तरी त्यास सुतक येत नाहीं. युद्धाचा शेवट त्या दिवशीं त्याच्या सुतकाचा पहिला दिवस. तसें लग्नांत व यज्ञांत नवऱ्यास व दीक्षितास अवरोध येत नाहीं. तसेंच लग्नादि महत्कार्य पुढें आलें तर दहा दिवसांचें सुतक तीन दिवसांवर येतें. अशा तोडजोडी धर्मस्थापन करणाऱ्यांनीं सांगितल्या आहेत. त्यांत सांप्रतकाळीं ब्राम्हणांनीं आपला धर्म सोडून अन्य धर्मांत पोट भरण्याकरितां चाकरी, शेतकी, व्यापार हे कनिष्ठवर्णांचे धर्म पतकरले आहेत. तत्रापि ते आपलें ब्राम्हणपणाचें स्वरूप अगदीं सोडण्यास इच्छित नाहींत. याचें कारण, प्राप्त झालेले लाभ कोणी सोडीत नसतो. म्हणून हा त्यांचा अपराध नव्हे. परंतु त्यांस इतका विवेक असावा कीं, जें कर्म आपण अंगिकारिलें तोच वर्ण, आणि ब्राम्हणवर्णाचे जे आदीचे नेम आहेत ते चालविण्याविषयीं दुराग्रह नसावा. कारण कीं मूळ तोडून टाकिलें तर शाखांस फुलें कशीं येतील? असाच विचार करून रामशास्त्री यानें माधवराव पेशव्यास सांगितलें कीं, तुम्हीं क्षत्रियधर्म स्वीकारून राज्याच्या सुखाची इच्छा करितां, तर नाक धरून जप करूं नका. रयतेचें कल्याण करण्यांत वेळ घालवा, म्हणजे तीच तुमची स्नानसंध्या. नाहींतर तप करण्यास माझ्याबरोबर चला. तेव्हां ते श्रीमंत स्नानसंध्या सोडून देऊन राज्यकारभार दक्षतेनें करूं लागले. ही गोष्ट मराठ्यांचे बखरींत आहे. असा निष्पक्षपाती सांगणारा असता तर शिंद्यास ब्राम्हण-भोजन घालण्यापेक्षां आगबोटी बांधावयास किंवा हजार-पांचशें माणसांची वस्ती करण्यास सांगता. कारण हा काळ कसा आहे याजवर लक्ष देऊन धर्म केला पाहिजे. विलायतेंतून कोट्यवधि रुपायांचा माल कागद, बिलोर, लोखंडी सामान, कापड इत्यादि इकडे येतें, तें आपणास कां करतां येत नाहीं ? व विलायतेहून इंग्रेज लोक हजारों येथें येऊन बसून व्यापाररोजगार करितात तर आपण त्यांचे देशांत कां जाऊन बसूं नये व नानाप्रकारचे धंदे कां करूं नये ? असें केल्यापासून आपलें किती हित आहे. हजार दोन हजार मुलें विलायतेस जाऊन तिकडून विद्या शिकून येतील असें कां करूं

नये? असा विचार जर कोणी शिंद्यास शिकविला असता तर ते ब्राम्हणभोजनांत पैसा टाकितेच ना. परंतु योग्य मंत्री नाहींत, यामुळें भलतेंच होतें. आतां शिंद्याचा जो मंत्री असेल तो कोणीतरी भटभिक्षुक असेल असें अनुमान होतें. कारण कीं, ही बुद्धी मुत्सद्दी याची नव्हे, व सरदाराचीही नव्हे. परंतु त्यांत इतका गुण घेतला पाहिजे कीं, ज्या ब्राम्हणानें आपलें उपदेशानें कोट रुपये खर्च करविले, तो मोहनीरूपच असेल व त्यानें आपले कसबाची पराकाष्ठा केली असें मानण्यास हरकत नाहीं. आतां त्याची जर राज्यकारणी बुद्धी असती तर मोठा उपयोग होता. परंतु देशास अथवा माणसास अवदशा प्राप्त झाली म्हणजे ती चोहोंकडून येते. मग पुढें पाय पडत नाहीं. बाजीरावाचे राज्यांत तरी पुष्कळ ब्राम्हण राज्यकारभारांत पडून त्यांनीं न्यायाधिशी, पागा, सरंजाम, दफतर, हषम, किल्ले, फडनिशी, फौज, विद्या या सर्वांचें पाणी करून त्यांनीं ब्रम्हसंतर्पणाचें उदक सोडिलें, त्याच्या स्वादानें क्षणमात्र तृप्ती होऊन पुढें सर्व जळमय झालें. आतां शिंद्यासारख्यांनीं केलेल्या धर्माविषयीं इंग्लिश लोकांस दोन तऱ्हेनें वाईट वाटतें. एक असें कीं, बहुत द्रव्य व्यर्थ गेलें. दुसरें असें कीं, इंग्रजींत ब्राम्हणांस असें जेवण मिळत नाहीं, व शिंद्याचें स्वराज्य म्हणून मिळालें, असे उद्गार जे निघतात ते इंग्रज सरकारास लोकांनीं नाखुष होण्याचें कारण हेंही शिंद्यांनीं घडविलें. असे अनेक प्रकार आहेत.

वृत्तवैभव, ता. ४ आक्टो. १८६३

[नंबर १२४]

हिंदु लोकांची प्राचीन विद्या

सांप्रत काळीं हिंदु लोकांमध्यें विद्येनें श्रेष्ठ जे ब्राम्हण त्यांचे ज्ञानास विशेष लीनता व ग्लानी प्राप्त झाली आहे. याचें कारण पूर्वी विद्या करणें हाच आपला जातिधर्म असें समजून विद्याव्यसनांत ते सर्वकाल निमग्न असत. आलीकडे तो मार्ग सुटून दुसऱ्या अनेक व्यसनांस अनुसरून त्यांनीं प्राचीन मर्यादा उल्लंघन केली. यामुळें सांप्रतकालचे ब्राम्हणांवर कुलपरंपरानिमित्त ब्राम्हणत्वाची छाया मात्र आहे. त्याखेरीज दुसरें लक्षण नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. कारण प्राचीनकालचे ब्राम्हणांनीं ग्रंथांचे जे ढीग करून ठेविले आहेत त्यांजवरून त्याकालची व्यवस्था पाहातां, ती आणि सांप्रतकालीं त्या ढिगास वाढविण्याचें एकीकडे राहून उलटा क्षय होत आहे. हें पाहातां तसें अनुमान स्पष्ट होत आहे. यास्तव प्राचीन विद्येविषयीं लोकांस माहितगारी करून देण्याविषयीं यत्न करावा हें वर्तमानपत्रकर्त्यांचें मुख्य कामच आहे, असें समजून या कामास आम्ही आरंभ करितों.

ब्राम्हणांची मूल विद्या म्हणजे जे वेद, याविषयीं विचार करून पाहातां असें दिसतें कीं, फार प्राचीनकालीं ब्राम्हण लोकांनीं वेदाचीं सूक्तें लहानलहान रचून तीं गायन करण्याचा पाठ पाडिला. यास प्रमाण भगवद्गीता अध्याय १३ वा, श्लोक ४ था.

ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक् ॥

श्रुतिप्रमाण

–अग्निः पूर्वेभिर्ऋषीभिरीड्यो नूतनैरुत ॥

हीं सूक्तें मुळीं कोणी रचलीं याचा शोध नाहीं. हीं बहुतकरून सृष्टींतील सर्व मुख्य तत्त्वास लक्षून रचिलीं आहेत. म्हणजे कांहीं जलरूपी वरुणावर, कांहीं तेजोमय सूर्यावर, कांहीं आकाशावर, कांहीं अग्नीवर, कांहीं चंद्रावर, कांहीं पर्जन्यावर, अशीं आहेत. कांहींकालपर्यंत हीं एकेका ब्राम्हणाच्या कुलांत होतीं व त्याकाळीं ब्राम्हणांचें भजन व अध्यायन या सूक्तांच्या द्वारानें चालत असे. व जों जों तीं जुनीं होत गेलीं, तों तों पुढच्या पिढीचे लोक त्यांजवर मंत्र अशी भावना करून त्या सूक्तांचें विशेष संरक्षण करूं लागले. अशा प्रकारें ज्या कालीं लिहिणें-वाचणें वगैरे विद्या नव्हत्या, त्याकालीं मुखपठित वेदराशी उद्भवून ब्राम्हणकुलामध्यें स्थापित झाली. पुढें वेदव्यासांनीं त्याचे ४ भाग कल्पून ४ वेद केले. व ज्या-ज्या गायनाच्या कुलांत हीं सूक्तें होतीं तीं सर्व जमवून त्यांच्या संहिता म्हणजे संग्रहण केलें. जे उपयोगीं मंत्र ते सामसंहितेंत घातले. जे स्तोत्ररूप मंत्र पढविण्याच्या उपयोगीं ते ऋक्संहितेंत घातले. असे उपयोगावर लक्ष देऊन हे विभाग केले आहेत. व या मंत्रांच्या उपयोगाविषयीं जे या ग्रंथांत म्हणजे छंदरहित ग्रंथ आढळले त्यांचा ब्राम्हण या नांवानें संग्रह केला. याप्रमाणें मंत्र आणि ब्राम्हण या दोन जातींचे ग्रंथ जमले.

या ग्रंथांवरून असें दिसतें कीं, त्या कालीं या वेदरूप दोन्ही ग्रंथांचा उपयोग विशेषेंकरून यज्ञाकडे होत होता. हल्लीं उत्साह, जत्रा, ठिकठिकाणीं लोकांमध्यें होतात आणि त्यांचे आठआठ पंधरापंधरा दिवस समारंभ चालतात. व अनेक लोक येतात. ह्याप्रमाणें त्या कालीं ऋषि राजाश्रयानें यज्ञ व सत्रें करून मोठमोठाले समारंभ सुशोभित करीत. त्यांत राजे वगैरे अनेक लोक येऊन समारंभ सुशोभित करीत. सामाचीं गायनें, यज्ञ, पशूचीं मांसान्नें, धनाचीं दानें, मोठमोठाले ऋषी, आचार्य यांचीं आगमनें, येणेंकरून हे समारंभ वाढत असत. व सृष्टींतील पंचमहाभूतें संतुष्ट होऊन पशु, धन, धान्य यांची समृद्धि करीत अशा कथा आहेत. हाच त्या कालचा वैदिक धर्म असे.

हल्लीं या देशांत मोठमोठाले यज्ञ झाल्याचीं स्थलें बहुत दाखवितात. त्यांतील कित्येक भडोच, गराडे, महाबळेश्वर इत्यादि इकडील प्रांतांत प्रसिध्ध आहेत. तसेंच कित्येक मद्यांचीही उत्पत्ती यज्ञसंबंधानेंच झाली, अशाही दंतकथा आहेत. ब्रम्हकमंडलु हें करानदीचें नांव याच कारणानें पडलें आहे. याजवरून ह्या यज्ञसमारंभांचें महत्त्व लक्षांत

येईल. अस्तु. पुढें मंत्रांविषयीं अशी भावना झाली कीं, यांतील अक्षरांची उलटापालट होऊं नये वत्यांची पूर्वोक्त पठणाची जी पध्धती आहे, ती संरक्षण व्हावी. म्हणजे "अग्नि" या शब्दाच्या स्थलीं वन्ही असा शब्द योजिला जाऊं नये. म्हणून या मंत्रांची वेगळालीं पदें केलीं म्हणजे शब्द वेगळाले केले. आणि जे वैदीक होते, त्यांची त्यांजवर विकृती म्हणजे क्रमपाठ, जटापाठ इत्यादि उत्पन्न केले.

यानंतर पाठीमागून कितीएक सूक्तांचा ठिकाण लागला असावा, किंवा तीं कोणी नवीं केलीं असावीं. त्यांस परिशिष्ट अथवा खिल असें म्हणण्याचा पाठ पडला. मूळचीं ब्राम्हणें पुष्कळ होतीं. परंतु सांप्रत उपलब्ध थोडीं आहेत. या ब्राम्हणांपैकींच कांहीं भाग ज्यामध्यें विचाराच्या वगैरे गोष्टी येतात, त्या भागास उपनिषदें किंवा ज्ञानकांड असें म्हणतात. व बाकी राहिलीं त्यांस यज्ञकांड किंवा कर्मोपनिषदें असें म्हणतात.

या वेदांचीं ६ अंगें कल्पिलेलीं आहेत. त्यांचीं नांवें:—१ शिक्षा, २ कल्प किंवा सूत्र, ३ छंद, ४ व्याकरण, ५ ज्योतिष, ६ निरुक्त. हीं ६ अंगें व संहिता, ब्राम्हण, पदें, व क्रम हे १० ग्रंथ जो म्हणतो त्यास दशग्रंथी वैदीक असें म्हणतात.

त्यापैकीं पदें जीं आहेत, सुप्तिंङ्त असतात. त्यांस प्रकृती म्हणतात. व त्यांचें ऋचारूप म्हणजे जी त्यांची जोडणी होते त्यास छंद म्हणतात व क्रम, जटा, घन वगैरेस विकृती म्हणतात.

१ आतां अंगें जीं आहेत त्यांत विषय जे आहेत त्यांचें वर्णन असें आहे कीं, वेदाचा पाठ कोणत्या रीतीनें करावा, याविषयीं नियम बांधण्याकरितां पर्षद् (कमेट्या) नेमल्या होत्या. त्यांणीं प्रातःशाखेय म्हणून ग्रंथ केले आहेत. त्यांत स्वर, वर्ण, उच्चार याविषयीं विचार बहुत केले आहेत. ते मुख्य अंग व त्यापैकीं शिक्षा हा लहानसा ग्रंथ घेतात.

२ कल्प किंवा सूत्र म्हणजे कर्मकांडाचा संक्षेप ब्राम्हणांवरून काढलेला आहे. ब्राम्हणांचा विस्तार फार याकरितां हे संक्षेपरूप ग्रंथ करून अंगांत दाखल केले आहेत. व या संक्षेपरूप ग्रंथांवरून जेव्हां कर्माचा निर्वाह होऊं लागला, तेव्हां विस्तीर्ण ब्राम्हणें जीं होतीं त्यांचा लय झाला म्हणजे त्यांस कोणी पटेनासें झालें. तथापि या सूत्रांवर टीकेदाखल वृत्ति व भाष्यें झालीं. त्यांस श्रौताचे ग्रंथ म्हणतात.

३ पदांवरून ऋचा ज्या होतात त्या अनेक प्रकारच्या होतात. त्यांचे प्रकार किती व त्यांचीं लक्षणें काय, हें दाखविणारे जे ग्रंथ त्यांस छंद म्हणतात. यांचे ग्रंथ पुष्कळ व मोठमोठाले आहेत. परंतु त्यांचा एक लहानसा सारांश काढून या दशग्रंथांत दाखल केला आहे.

४ व्याकरण जें आहे तें वेदाचें मुख आहे असें कल्पिलें आहे. ह्यांत शब्दांच्या प्रकृती, प्रत्यय, शुध्ध, अशुध्ध, इत्यादि विचार सांगितले आहेत. या विषयावरही ग्रंथ बहुत आहेत; परंतु त्यांपैकीं अष्टाध्यायांचें जें पाणिनीचें सूत्र आहे, तेंच बहुतकरून

घोकतात. या सुत्रावरही कारिका, वृत्ति, भाष्यें, महाभाष्यें बहुत झालेलीं आहेत. तीं वैय्याकरणी शास्त्री असें म्हणविणारे जे आहेत ते मात्र पढतात.

५ ज्योतिष म्हणजे कालमान, नक्षत्रें इत्यादिकांचा विचार या विषयावरही ग्रंथ बहुत आहेत. परंतु त्यांपैकीं थोडा सारांश यज्ञादिकांचा कालनिर्णय वगैरे समजण्याकरितां हा ग्रंथ यांत सामील केला आहे. यास वेदाचे चक्षु असें म्हणतात.

६ निरुक्त म्हणजे वेदांतील अवघड शब्दांची व्याख्या. यांजवरही ग्रंथ पुष्कळ आहेत. परंतु दशग्रंथांतील निरुक्त दोन षट्कांचें यास्कऋषीनें केलेलें आहे.

वेदव्यासऋषींनीं जेव्हां वेदराशीचे ४ भाग केले, तेव्हां ते ४ भाग ४ शिष्यांस पढविले. पैकीं ऋग्वेद पैलऋषीस, साम जैमिनीस, यजु वैशंपायनास व अथर्व सुमंतूस असे शिकविले. व ह्या ४ शिष्यांनीं आपल्या पृथक्पृथक् ४ शाळा घालून आपआपले शिष्यांस ४ वेदांच्या ४ संहिता पढविल्या. म्हणून त्या चौघांस आचार्य असें नांव आहे.

पुढें त्या आचार्यांच्या शिष्यांमध्यें तक्रारी पडून त्यांनीं वेगळाले पाठ व मंत्रांचे उच्चार ग्रहण केले. याजमुळें शाखाभेद झाला. एकशाखेच्या लोकांस चरण असें म्हणतात. ह्या चरणांची हकीकत एका लहानशा ग्रंथांत सांगितली आहे. त्यास चरणव्यूह असें म्हणतात. हें परिशिष्ट आहे व मागाहून आलेलें दिसतें. याचप्रमाणें वेदांवर एक सर्वानुक्रम म्हणून ग्रंथ आहे. तोही परिशिष्टांत धरलेला आहे. यांत प्रत्येक सूक्ताचे देव, ऋषि, छंद व ऋचेची संख्या इतकें सांगितलें आहे. यांत प्रत्येक सूक्ताचे जे ऋषी लिहिले आहेत, त्यांस प्रत्येक सूक्ताचे कर्ते किंवा द्रष्टे असें म्हणतात.

ऋग्वेदसंहितेचे विभाग

अष्टक	८	ऋचा	१०४१७
अध्याय	६४	पदें	१५३८२६
वर्ग	२००६	अक्षरें	४३२०००.

दुसरा विभाग

मंडलें १०	सूक्तें १०१७.

ऋग्वेदाच्या शाखा ८

यजुर्वेदसंहितेच्या शाखा १०१

१ वाजसनीय १५	२ तैत्तीर्य ८६ भेद.


या दोन चरणांचे लोक आपआपल्यास शुक्ल असें म्हणवीत असतात. व त्यांत शुक्ल आणि कृष्ण असा वाद फार प्राचीन कालापासून चालत आलेला आहे. यजुर्वेदाच्या शाखा आपस्तंब इ० ८६, मध्यंदिन, कण्व, इ० १५ आहेत.

ऋग्वेदांतही शाकल, बाष्कल, सांख्यायन, कौशीतकी, इत्यादि शाखाभेद ८ आहेत.

पाठभेदानें ज्या रीतीनें शाखा झाल्या त्याचप्रकारें क्रमभेदानें सूत्रें झालीं. सर्वांचा जर एकच क्रम असता तर एकच सूत्र पुरें होतें. परंतु तसें नसतां ब्राम्हणें झालीं. त्या काळापासून ही तकरार चालत आलेली दिसते. यास्तव अनेक ऋषींनीं आपआपले मताप्रमाणें अनेक सूत्रें केलीं. दोनतीन शाखा मिळून एकच सूत्र असतें. नाहींतर प्रत्येक शाखेस वेगवेगळेंही सूत्र असतें. ऋग्वेदाच्या, बहुतकरून शाखेस आश्वलायन सूत्र असतें. तसेंच वाजसनीयास कात्यायन सूत्र.

प्रत्येक ब्राम्हणास गोत्र आणि प्रवर हीं जन्मसंबंधानें असतात. आणि शाळासंबंधानें वेद, शाखा आणि सूत्र हीं तीन असतात. आणि व्यवहारसंबंधानें नांव व आडनांव हीं असतात. जन्मनक्षत्रांवरून जें नांव होतें तें कर्माच्या वगैरे उपयोगास येतें.

वेदग्रंथांचे विभाग अनेक नांवानें चालतात. जसें अष्टक, पंचिका, प्रपाठक, वर्ग, अध्याय, अनुवाक, मंडल इत्यादि. एकंदर श्रौतग्रंथास निगम असें नांव आहे. यानंतर आगम, दर्शन, पुराण इत्यादि ग्रंथ होऊन विद्यावृक्ष पुष्कळच विस्तीर्ण झाला. याविषयीं माहितगारी ल्याहावी तर विस्तार फार होतो. यास्तव पुरें करितों. आणि ब्राह्मण लोकांनीं याजवरून आपलें पूर्व समजून ग्रंथावलोकनद्वारा आळसाचा पराजय करून उद्योग स्थापन करावा.



वृत्तवैभव, ता० आक्टो० १८६३

[नंबर १२५]

हिंदु लोकांची प्राचीन स्थिती

१ ज्या कालीं वैदिक मंत्र आर्य लोकांमध्यें फुटकळ चालत होते, म्हणजे त्यांच्या संहिता जमविल्या नव्हत्या, त्या कालीं लोकांची स्थिति पाहिली तर फार वेगळ्या प्रकारची असावी असें दिसतें. व त्या कालीं जातही एकच असेल असें वाटतें. काश्मिराचे सुमाराम हे लोक राहात असत. व शेत, भात, धान्य, पशु हीच त्या कालीं यांची दौलत होती. आणि त्यांच्या संमृद्धिविषयीं व दीर्घायुष्याविषयीं व बहुपुत्रलाभाविषयीं श्रुतींतील प्रार्थना आहेत—चतुर्विधमुक्ति, चतुर्दशभुवनें व समपातालें या कल्पना त्याकालीं मुळींच नव्हत्या. व श्रौत धर्मामध्यें हिंसा फार. याजमुळें त्यांस मांसादि खाण्याचेही प्रतिबंध नव्हते. दक्षिण, मारवाड, गुजराथ हे देश त्याकालीं मोठमोठालीं अरण्यें असून त्यांत राहाणारे लोकांस राक्षस व भुतें असें आर्य लोक म्हणत. पुढें माहिती झाल्यावर तीं मनुष्यें आहेत असें समजूं लागले. युरोपियन लोकांनीं अमेरिकेंत वस्ती केली, तेव्हां पूर्वील राहाणारे लोकांची अशीच स्थिति होऊन सर्व नाश पावले. ज्यांस

हल्लीं महार, गोंड, भिल्ल, कोळी, वनजारी असें म्हणतात, ते व शूद्रवर्ण मागावून ठरला. त्या लोकांची पूर्वी वस्ती होती, परंतु हे आर्य नव्हते. आर्य, ब्राम्हण, क्षेत्री, वैश्य हे त्रिवर्णांचे लोक पुढें आर्यसमुदायांतील लोक उत्तरोत्तर आपली वसाहत वाढवीत गेले. आपल्या राष्ट्रांतील जे लोक नव्हते, त्यांस "दस्यु" असें नांव वेदांत प्रसिध्ध आहे. व दस्यूंचे नाशाविषयीं वेदांत बहुत प्रार्थना आहेत. कित्येक ठिकाणची या लोकांची वसाहत आर्योनीं मोडून त्यांस मारून टाकिलें, असें दिसतें. व कांहीं राहिले ते कालेंकरून यांशीं मिश्र झाले. पहिले क्षत्रीय राजांची अशी व्यवस्था होती कीं, बहुत लोकांस मारिल्यानंतर आपल्या राष्ट्रांत येऊन मोठाले यज्ञ करावे, व आपले पुरोहित वगैरेस दानें करावींत. म्हणजे आपले पापाचा क्षय होतो. याप्रमाणें पांडवांनीं व रामचंद्रानें आपलें हिंसाजनित पाप जाण्याकरितां अश्वमेध केले अशा कथा आहेत. त्याकालीं ब्राम्हण हे क्षत्रियांचे उपाध्ये म्हणून होते. आतां मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंव्ह, वामन हे पहिले ५ अवतार ग्रंथांचे आधार पाहतां झाले असावेत, असें वाटत नाहीं. एवढें मात्र दिसतें कीं, त्याकालीं पृथ्वीवर कांहीं अरिष्टें झालीं. त्याबद्दलच्या दंतकथा राहिल्या होत्या, त्या घेऊन पुराणिकांनीं साकसुरत काव्यरीतीनें रचिल्या असाव्यात. त्यांपैकीं मत्स्याची दंतकथा जी आहे तिचा अभिप्राय असा दिसतो कीं, पृथ्वीवर मनुष्यांची वसाहत झाल्यावर कांहीं कालानें जलप्रलय झाला, त्या वेळेस कांहीं मनुष्यें पाण्यांत बुडालीं व कांहीं नौका, पर्वत इत्यादिकांच्या आश्रयानें जगलीं. व त्यांनीं पुनः वैदीक धर्माची संस्थापना केली. त्याजबद्दल ही दंतकथा असावी. पुढें कूर्म अवतारीं समुद्रमंथन म्हणतात, तें कोणी जहाजांत बसून द्रव्यार्थ प्रथम समुद्रांत पर्यटन करण्याकरितां गेले असतील. व तें इतर लोकांस नवल वाटून तेंच समुद्रमंथन झालें अशी दंतकथा चालू झाली असावी. त्यानंतरही पृथ्वीवर जलप्रलय होण्याचीं चिन्हें झालीं. परंतु तो कांहीं कारणानें प्रसंग टळला म्हणून परमेश्वरानें कृपा करून मनुष्यवस्तीचा भाग पाण्याहून उंच उचलून धरिला अशी कल्पना केली. त्या दंतकथेस पुढें सूतादि पुराणकर्ते यांनीं रूपकालंकारें करून वराह-अवताराची कथा योजिली.

२ वेदोक्तधर्म चालत असतां कांहीं कालानंतर हिमालयांत शिवाचे १८ अवतार झाले. एकाचा सेनापती स्वामी कार्तिक होता. त्या अवतारांनीं फौज ठेऊन चीन देशापर्यंत शिवाचा धर्म स्थापन केला. हें पशुपत मत पुढें वाढल्यानंतर बहुत लोक त्या मतांत गेले. रुंडमाला धारण कराव्या, त्रिशूळ आणि नरकपालें हातांत घ्यावीं, भस्म लावावें, रुद्राक्ष घालावे असे शैवांचे आचार होते. रुद्र, अघोर, पशुपती इत्यादि या अवतारांचीं म्हणजे पराक्रमी पुरुषांचीं नांवें आहेत. याजवरून शैवमत प्राचीन आहे, असें दिसतें. देशांत जुनीं देवळें वगैरे शिवाचीं जितकीं आढळतात, तितकीं अन्य देवांचीं नाहींत. व ज्यास काशीक्षेत्र म्हणतात, तेंही या शिवांतीलच एका पराक्रमी पुरुषानें स्थापिलें आहे. लिंगाइत हे पूर्वोक्त शैवांतील पसरतपसरत दक्षिणेंत राहिले असावे. त्यांचें म्हणणें

असें आहे कीं, ईश्वरानें आम्हांस निर्माण करून त्यानंतर ४ वर्ण केले. ते आपल्यास पांचवा वर्ण म्हणवितात. हें त्यांचें म्हणणें खोटें नसेल.

३ पुढें हिमालयाच्या दक्षिणभागीं वैष्णवमत उत्पन्न झालें. विष्णु हा त्या काळीं एक राजा झाला असावा. प्रथम पृथ्वीवर विष्णूनें राज्य केलें अशी पुराणांतही दंतकथा लिहिली आहे. यास्तव त्याचे स्थानीं बसणार जे राजे त्या सर्वांस विष्णूचे अंश म्हणतात. विष्णुमताचे लोक शैवांस दैत्य असें म्हणूं लागले. आणि या कालीं शैवांच्या निंदेच्या हेतूनें ४ थे अवताराची म्हणजे नृसिंह अवताराची गोष्ट रचलेली असावी व त्याच धोरणानें वामन अवताराची गोष्ट रचलेली दिसते. या दोन्ही गोष्टींत विष्णूचें महत्त्व व शिवाची निर्भर्त्सना वर्णिली आहे.

४ यानंतर आर्य लोकांची वस्ती नर्मदेचे दक्षिणभागचे देशापर्यंत होत आली. या सुमारास वर्णांचे भेद पडले असें वाटतें. प्रथम ३ च वर्ण केले. नंतर दक्षिणेंतील पूर्वींचे शेतकरी लोक यांस शूद्रवर्णांत धरून सामिल केले असावे. कारण प्राचीन ग्रंथांत ठिकठिकाणीं ३ वर्णांचें वर्णन केलें आहे. ३ वर्णांचे आचार, कर्में व अधिकार सारखे-सारखे होते. यास्तव जिंकणारे लोकांचे ३ वर्ण व ज्या लोकांस जिंकिलें त्या लोकांचा ४ था वर्ण झाला असावा. हे वर्ण झाल्यावर कांहीं दिवसांनीं ब्राम्हण व क्षत्रीय यांचा कांहीं कारणानें फार द्वेष वाढला. दक्षिणेमध्यें परशुराम अवतार झाला. तो ब्राम्हण असून त्याणें क्षत्रियांशी युध्ध करून बहुत क्षत्रीय मारिले व क्षत्रियांच्या गर्भवती स्त्रियाही मारिल्या, अशा कथा आहेत. यावरून असें दिसतें कीं, त्या कालच्या क्षत्रियांवरही नानासाहेबीच गुदरली. किंवा ब्राम्हणांनीं स्वज्ञातीचे गौरवास्तव (परंतु यास गौरव कोण म्हणेल?) कांहीं मिथ्यावर्णनही केलें असेल. नंतर परशुराम कोकणांत ओसाड मुलखांत जाऊन तेथें त्याणें ब्राम्हणांची नवी वस्ती केली. व आपणही तेथेंच राहिला. यानंतर ब्राम्हण व क्षत्रिय यांणीं असा विचार केला कीं, युध्धाचें काम क्षत्रियांनीं करावें. व ब्राम्हणांनीं कायदे वगैरे करण्याचें काम करावें. असें दिसण्यास कारण, पुढील सर्व धर्मपुस्तकें बहुतकरून ब्राम्हणांनीं रचिलीं आहेत. व त्यांजवरून ब्राम्हणांस राज्य करण्याचा अधिकार नाहीं, राजास मसलत देण्याचा मात्र आहे असें दिसतें. परशुरामानें क्षत्रिय मारिले ते दक्षिणेंत मारिले असावेत. हल्लीं क्षत्रिय नाहींत असें दक्षणीब्राम्हणांचें मत आहे; परंतु उत्तर हिंदुस्थानांत क्षत्रिय आहेत असें ब्राम्हण कबूल करितात. व तिकडे त्यांचीं अद्यापि मोठालीं कुलें आहेत.

५ पुढें शेंदोनशें वर्षांनीं राम अवतार झाला. त्या समई हिंदुस्थानाची मोठी भरभराट असावी, असें दिसतें. रामानें दक्षिणेंत येऊन दक्षिणी मनुष्यें म्हणजे वानर गोळा करून दक्षिण महाराष्ट्राचा राजा रावण याशीं युध्ध केलें. ही गोष्ट कवींनीं वर्णिली आहे. तितकी तपशीलवार जरी खरी नसेल तरी अंशतः कांहीं खरी असावी.

६ आतां राम आणि कृष्ण यांच्यामध्यें व दुसरे गोष्टींमध्यें कालाची अवधी

फारच कल्पितात. परंतु ही कवीची योजना आहे. कारण रामाचा पुरोहित जो वशिष्ठ त्याचा पणतु कृष्णद्वैपायन हा कृष्णअवतारीं होता. तेव्हां ३ पिढ्या मिळून शंभर-दीडशें वर्षें मध्यें गेलीं असावीं. गुजराथ प्रांत पूर्वीं ओसाड होता. पुढें कृष्णअवतारानें आपले यादवकुलासहित काठेवाडांत येऊन वस्ती केली. आणि द्वारकानगरी वसविली. हें काठेवाड पूर्वीं वेट असून तेथील समुद्र हल्लीं हटून गेला आहे, असें तेथें रणें झालीं आहेत त्याजवरून समजतें. समुद्रांत द्वारका म्हणण्याचें कारण इतकेंच आहे. हल्लींचे इंग्रज लोकांप्रमाणें त्या कालचे क्षत्रिय लोकही मोठे पराक्रमी होते. इंग्रज लोक जसे दर्यांत फिरतात, नव्या वस्त्या करितात, स्त्रियांस बहुमान देतात; तसेच त्या कालचे क्षत्रीय होते. त्यामध्यें मुली लग्नास योग्य झाल्या म्हणजे नाना प्रकारचे पण घालीत. व जे पराक्रमी ठरतील त्यांशीं त्या मुली स्वयंवर करीत, असें सीता–स्वयंवर, रुक्मिणी–स्वयंवर, द्रौपदी–स्वयंवर, दमयंती–स्वयंवर, यांवरून दिसतें. व राजाबरोबर त्यांच्या स्त्रियाही कारभाराचे वेळीं नेहमीं सिंहासनारूढ होत असत. व स्त्रियांचा मान व पुरुषांचें सत्य, शौर्य आणि ज्ञान यांचें बहुतकरून संक्रमण सारखें आहे. यास्तव उभयपक्षीं हे गुण त्या कालीं फार असत. ब्राम्हणही मोठाले तपोधन व बुद्धिमान होते. ते आपले मुलांस लहानपणापासून ब्रह्मचर्यआश्रम देऊन गुरुगृहीं पाठवीत. त्याचप्रमाणें क्षत्रियांचीही चाल होती. मुलांचा त्या कालचा संपूर्ण विद्याभ्यास झाल्यावर ते घरीं येत, किंवा पराक्रमानें पृथक् राहात. नंतर त्यांचीं लग्नें होत. आतांचे कालाप्रमाणें ५ वे वर्षीं लग्नें तेव्हां नवतीं. म्हणून प्रजाही दुर्बळ व क्षीणायु नव्हत्या. हल्लीं ही शिक्षा इंग्रेज लोकांत आढळते. तदनुसार त्यांचा पराक्रमही आहे.

७ असा हा भरभरीचा काल कांहीं दिवस गेल्यानंतर दौलत पावून तिचे दुष्ट परिणाम सर्वत्र होतात, तसे या देशांतही झाले. लोकांची बुध्धी क्षीण होऊन परस्पर पराक्रम करावयाचें सोडून जेवण्याखाण्याचे तंटे उत्पन्न झाले. पूर्वीं महान् थोर ऋषि क्षत्रियांचे घरीं व क्षत्रिय विदुरादिकांचे घरीं जेवीत असत तें बंद झालें. नाना प्रकारचीं नवीं मतें निघालीं. त्यांत मुख्य अर्चिरपथ, धूममार्ग, वाममार्ग, दक्षिणमार्ग, निवृत्तिमार्ग, प्रवृत्तिमार्ग इत्यादि प्रतिपादन झाले. व त्यांतही कित्येक लोकांनीं एकमेकांवर निंदा व स्तुतीचे ग्रंथ केले. याजमुळें अनेक देवतांचीं भक्तिप्रदर्शक पुराणें उत्पन्न झालीं. त्यांतील सर्व देव कांहीं काल्पनिक व कांहीं ज्या नवीन देशांत वस्ती झालेली तेथील लोकांमध्यें पूर्वापार चालत होते ते, तुळजापुर, मोरेश्वर, खंडोबा इत्यादि ग्रहण केले. नवीं क्षेत्रें, पवित्र नद्या ठरल्या. पुराणांत मुख्य पद्मपुराण, स्कंदपुराण व शिवपुराण हीं आहेत. कांहीं पुराणें शिवसंबंधीं व कांहीं विष्णुसंबंधीं आहेत. त्यांत नानाप्रकारचीं भारुडें, सृष्टि-उत्पत्त्या, वंश इत्यादि लिहिलीं आहेत. एकंदर पुराणें १८, उपपुराणें १८ व शिवाय १०–१५ मिळून ५० ची भरती आहे. तशीच वाममार्गाकडील आगम ग्रंथ, तामतर (?) तंत्र, कालिका तंत्र, भैरव तंत्र, योगिनी तंत्र इत्यादि सत्तरांची भरती आहे. त्या

दर एकांचीं वेगळेवेगळे देवांचीं व देवतेचीं भ्रष्ट विधानें व कष्टसाध्य अनुष्ठानें, दीक्षा व पूजनें प्रतिपादन केलीं आहेत व भ्रामक फळें लिहिलीं आहेत. याजमुळें प्राचीन वैदिक मार्ग सुटून नवीन पंथ चालू झाले. प्रत्येक देवाचीं कवचें, रक्षा, स्तोत्रें, जप, अनेक स्थलांचीं महात्म्यें, रहस्यें, अनेक तिर्थांचीं व्रतें, उद्यापनें असे नवीन मार्ग उत्पन्न झाले. या सर्व ग्रंथांचा हेतु मुख्यत्वेंकरून कर्म वाढवून ब्राम्हणांचें महत्त्व आणि लाभ साधण्याचा होता, हें स्पष्ट आहे. पुढें पध्धतिकार पटलकर्ते जाले. त्यांणीं श्राध्धपध्धति, पूजापध्धति, इत्यादि कर्मांवर मोठमोठाले ग्रंथ लिहून कर्मांचें बाहुल्य केलें. प्राचीन श्रौतमार्ग अगदीं दडपून गेला. अग्निहोत्र, यज्ञ हीं वैदीक कर्में कलियुगांत मुळींच करूं नयेत असें टरवून तीं निषेधांत काढून एकाएकीं प्राचीन धर्म मोडण्यास अवघड पडेल यास्तव ही कलियुगाची कल्पना काढिली. तथापि अद्यापि कितीएक वैदिक गोष्टी प्रचारांत आहेत व कलिनिषेधांतील कर्में कितीएक चालतात. आणि कितीएक बंद आहेत. तसेंच श्रौताचे अभिमानीही अद्यापि आहेत. ते यज्ञांत एकादशी आली तरी मांस भक्षण करितात. व कितीएक पुराणमताचे आहेत ते एकादशीं बापास पिंडही देत नाहींत.

८ याप्रमाणें धर्म, भक्ति व कर्म यांची सर्व धांदल उडाली. कित्येक लोक विचारास लागून त्यांनीं मानसिक विचारांचीं शास्त्रें वाढविलीं त्यांत प्रमुख ६:–गौतमकृत न्याय, जैमिनीकृत मीमांस[ा], कपिलकृत सांख्य, पतंजलिकृत पातंजल, कणादकृत वैशेषिक व व्यासकृत वेदांत हीं ६ दर्शनें झालीं. यांत मुख्यत्वेंकरून सृष्टीचें मूल, ईश्वराचा शोध, व उत्पत्तीविषयीं कल्पना आहेत. या प्रत्येक दर्शनावर अनेक ग्रंथ झाले आहेत. आणि अद्यापि त्यांतील परिष्कार काढून पंडित बुदबळासारखे खेळत बसतात. परंतु ज्या गोष्टींचा शोध लावण्याचें त्यांनीं मनांत आणिलें, त्यांचा पक्का शोध लागावयाचा नाहीं. हें काम कधीं सरावयाचें नाहीं. व्यवहारास त्याचा कांहीं उपयोग नाहीं, हें त्यास ठाऊक नाहीं. तसेंच शब्दांसंबंधी शास्त्र म्हणजे व्याकरण, अलंकार व छंद हीं उत्पन्न झालीं. त्यांतील कांहींचें मूल प्राचीनकालीं उगवलें. म्हणजे पाणिनीनें व्याकरणाचा अभ्यास हिमालयांत शिवाजवळ करून माहेश्वरसूत्रें मिळविलीं, अशी दंतकथा आहे. कित्येक लोकांनीं ज्योतिष, वैद्यक, गायन यांजकडे लक्ष देऊन त्याजवर अनुशासनें रचिलीं. कित्येकांनीं व्यवहार, आचार व प्रायश्चित्त यांसंबंधीं स्मृती म्हणून ग्रंथ रचिले. यांजवर टीका व भाष्यें यांचा तर बहुतच विस्तार आहे. तो थोडक्यांत सांगतां येणार नाहीं.

९ याप्रमाणें हा काल सांगत असतां, बौध्ध पंडित म्हणून एक झाला. त्याणें नवीन दयाधर्म काढिला. म्हणजे वेदशास्त्रांचा निषेध करून श्रौतधर्मानें किंवा आगममतानें हिंसा करूं नये असें ठरविलें. दया, शांती यांचा अंगिकार केला असतां जीव मुक्त होतो, असा त्याचा सिध्धांत आहे. या मताचे पोटीं निरीश्वर जैन मत निघालें. बौध्ध हा अवतार गणलेला आहे. परंतु भ्रष्टाचाराकरितां झाला, असें ब्राम्हणांनीं त्यास दूषण दिलें आहे. याणें आपले पुष्कळ शिष्य केले व त्यांस सर्व हिंदुस्थान, ब्रम्हदेश, चीन व लंका

इत्यादि देशांत प्रेरक पाठऊन आपला धर्म सांगितला. तेव्हां मागील शैवादि मतें हीं बहुतकरून या धर्माच्चे जोरानें मोडलीं व हें मत चारपांचशें वर्षें चाललें. त्याबद्दल ग्रंथही बहुत रचिले आहेत. जितके ब्राम्हणांचे ग्रंथ आहेत तितके यांणीं नवे केले आहेत. नवीं पुराणें, नवी शास्त्रें रचिलीं. नंतर कितीएक वैदिक मार्गप्रवर्तक ब्राम्हण हिंसा मोडून श्रावक धर्मास अनुसरून राहिले व मोठाले राजेही या धर्मांत गेले. पुढें कांहीं कालानंतर ब्राम्हणांनीं आपसांतील द्वेष एकीकडे ठेऊन क्षत्रिय राजे अनकूल करून बौध्धमत मोडण्याचा मोठा प्रयत्न केला. आणि वैदिक मार्गाची स्थापना केली.

१० यानंतर पुनः नवीन मतें उभारलीं, तीं शंकराचार्य यांणीं मोडून निवृत्ति-मार्गाचें प्रतिपादन केलें. हें मत नवीन व अपूर्वच आहे. परंतु जसें सर्व मतांचे लोक आपल्या तर्फेस वेद, शास्त्रें, पुराणें आहेत म्हणतात, तसें यांणींही श्रुति, सूत्रें, पुराणें यांचे आपल्यास अनुकूल, असे अर्थ काढिले आहेत.

११ ब्राम्हणांस मुळापासून पिशाच व राक्षस यांचें भय फार असे व त्याची निवृत्तिही ते थोडक्यांत करीत. यज्ञांत, श्रौतांत, पूजेंत व संध्येंत देखील पिशाचें पळविण्याची तजवीज करून मग कर्म चालत असतें.

१२ सदरहु कालाचे सुमारास ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य यांची जी संस्कृत भाषा होती ती बुडाली. मग ज्या ज्या देशांत आर्यलोक गेले त्या त्या देशांतील रानटी भाषा मिश्र करून ते बोलूं लागले. तेणेंकरून गुजराथेंत ब्राम्हण गेले ते गुजराथी, महाराष्ट्रांत गेले ते मराठी, बंगाल्यांत गेले ते बंगाली, असे आर्य लोकांत भेद पडले. देश विस्तीर्ण फार, याजमुळें ब्राम्हणांची ओळख बुडून व्यवहारही बंद पडत चालले. ४ वर्णांच्या हजारों जाति झाल्या. कर्नाटकांत व तैलंगणदेशांत आर्य लोक फार मागून गेले असावे. कारण कीं, कर्नाटकांतील लोक मराठी लोकांस व भाषेस "आरे" असें म्हणतात.

१३ पूर्वी वरचा मजला पडला व संस्कृत बंद झाल्यापासून खालचाही पडला. त्यायोगें बहुत अनर्थ उत्पन्न झाले. म्हणजे मुख्य आपले प्राचीन विद्येस लोक विसरले. सर्व प्राचीन विद्येचे ग्रंथ संस्कृतांत राहिले. त्याजमुळें त्या भाषेचें ज्ञान होण्यास १०।५ वर्षांची खटपट लागूं लागली व तदनंतर शास्त्राभ्यास, तेव्हां कांहीं शोध होणार. अशी मोठी अडचण पडली. येणेंकरूनच लोकांचें अज्ञान वाढलें व मागील सर्व ग्रंथकर्ते वशिष्ठ, शातातप, बौधायन इत्यादि ऋषी होते याजकरितां त्यांचे लेखांत फेरफार करणें योग्य नाहीं, अशी जुन्या संस्कृत ग्रंथांवर भक्ति उत्पन्न झाली. या कालाचे पूर्वी मोकळीक होती, तेव्हां अनेक ऋषींनीं अनेक स्मृति लिहिल्या, अनेक सूत्रें व अनेक पुराणें लिहिलीं. तीं ज्यांचे त्यांचे बुध्धीप्रमाणें लिहिलीं गेलीं, हें उघडच आहे. नाहीं तर एकच पुरे होतें. परंतु यापुढच्या कालांत असें ठरलें कीं, जें पूर्वी लिहिलें त्यांत काय तें शोधावें, बाहेर जाऊं नये, अशी शृंखला पायांत बळें घालून घेतली. त्यामुळें त्या कालापुढील जे ग्रंथकार झाले ते अशा तऱ्हेचे आहेत कीं, मागील

ग्रंथसंबंधीं विरुध्ध बोलणें सोडून देऊन सर्व मतें ग्राह्य समजून त्यांची तोडजोड व मेळवणी करणारे, कोणासच निंदावयाचें नाहीं. सर्व ऋषी-परमेश्वराचे अंश, तेव्हां सर्वांचीं मतें मान्य, असें मत धरून चालूं लागले व सर्वांची एकवाक्यता होण्या-करितां यांणीं फार पांडित्य केलें आहे, व जेथें जेथें विरुध्ध आलें, तेथें युगांतराची कल्पना करून विरुध्ध वचन मागील युगांत टाकिलें. तपोधन जे ब्राम्हण ते संपत्तीस लाचाऊन त्यांणीं सद्विद्येची रुचि सोडिली. धर्मापासून दूर राखण्याजोगा जो श्रृंगार-रस तोच भजनांत घातला आणि बोपदेवकृत भागवत, गीतगोविंद व बीभत्स, श्रृंगाररस-युक्त पुस्तकें पुढें सरसावलीं. असा लोकांचे रुचीप्रमाणें माल तयार होऊं लागला. वैराग्यप्रधान शैव हे लिंगार्चनविधींत राहिले, शूद्रांत संन्यासी झाले व पुन्हा गोसाव्याचे घरबारी झाले. आगमांत जारण मारण वगैरे सांगितलें आहे. त्या लालचीनें मद्यपान करून शाक्तधर्मास ब्राम्हणही अनुसरले. रामायणाचे निर्मळपणास आणि भागवताचे श्रृंगारिकरणास लावून पाहिलें असतां रसज्ञ हा भेद सहज समजतील. आणखी या कालीं स्त्रियांची योग्यता फार कमती झाली. पहिले राजे जिवावर उदार होऊन युध्ध करून एक स्त्रीरत्न मिळऊन आणीत. मग तिला जिताप्रमाणें जतन करीत. बहुश्रमांनीं मिळविलेल्या वस्तूस मिळविणारा फार जपतो. परंतु पुढें आठ वर्षांचे आंत लग्न करावें, हा नियम ठरविला. तेणेंकरून एकेकाच्या घरीं दाहा दाहा मुली बापांनीं घेऊन याव्या असें झालें. या स्वस्ताईमुळें स्त्रियांस किंमत व बहुमान नाहींसा झाला. विधवेचें वपन ठरविलें. मनूनें स्त्रीस व कन्येस भाग ठरविले ते नियम बुडऊन टाकिले. याप्रमाणें बहुत गोष्टी बिघडत बिघडत आल्या. या बिघडण्यावर पुराणांत अध्यायाचे अध्याय लिहिले आहेत कीं, कलियुगांत ब्राम्हण भ्रष्ट झाले व नीती सुटली. त्या लिहिणारांस जी अवस्था दिसूं लागली ती त्यांणीं लिहिली आणि त्या लिहिण्यास अज्ञानी लोक हल्लीं भविष्य समजतात. किंवा ईश्वरी संकेतच तसा असें समजतात. श्रुतीचा उपयोग यज्ञादि कर्मांत होत असे. परंतु त्यामध्यें कांहीं विशेष सामर्थ्य आहे असें ब्राम्हण, सूत्र यांणीं सांगितलें नाहीं. तथापि त्यावर नवीन ग्रंथ झाले, त्यांत मंत्राचें महात्म वर्णन केलें आहे. असा ग्रंथ ऋग्विधान हा आहे. याजवरून कर्माचे नवीन नवीन बूट निघाले. अरिष्टें जावीं व लाभ व्हावे म्हणून लक्ष किंवा कोटी स्वाहाकार, जप लोक करूं लागले. मंत्रशास्त्र उत्पन्न झालें. त्या आशेनें लोक त्यांचे नादास लागले. आणि जों जों ब्राम्हणांचे विषयभोग आणि इच्छा बलवत्तर झाली, तों तों त्यांणीं आपणास ग्रहणें वगैरे सांगतां येतात, थोडी वैद्यकी समजते, मंत्राचीं अनुष्ठानें करतां येतात याच आधारानें आपली प्रतिष्ठा राखिली व इतर वर्णांनीं अध्ययन करूं नये अशाविषयीं दृढतर प्रतिबंध करीत चालले. नानाप्रकारचीं दानें, भोजनें ब्राम्हणास दिलीं तर सर्व इष्ट प्राप्त होतें, असें ठरवून लोकांस गुंतविलें. तथापि क्षत्रिय लोकांमध्यें जें शौर्य पूर्वीपासून होतें तें कमी झालें असें म्हणवत नाहीं. परंतु त्यांचे गुरु आणि मंत्री ब्राम्हण यांची

अक्कल जशी क्षीण होत गेली, तसतसा यांच्या शौर्याचा उपयोग पडेनासा झाला. म्हणूनच शालिवाहन शके १० वे शकांत इराणचे मोंगल यांस जें क्षत्रिय राष्ट्र अज्ञानानें लान व पोकळ गर्वानें उन्मत्त त्यास जिंकण्यास फारसें अवघड पडलें नाहीं.

१४ सदरीं लिहिल्याखेरीजही कांहीं किरकोळ मतें स्थापन झालीं आहेत तीं शंकराचें अद्वैत, त्यानंतर मध्वाचें द्वैत या मतवाल्यांचे अनेक वादग्रंथ होऊन बहुत पंडित यांत खर्ची पडले आहेत. तसेंच रामानुजाचें विशिष्टाद्वैतमत, वल्लभाचार्यांचें वैष्णवमत, रामानंदाचें वैरागीमत, शिकांचें नानकमत, मानभावी मत, वारकरीमत, इत्यादि पुष्कळ मतें चालत आहेत आणि यांचे भरतीस इंग्रजी विद्येचे आधारानें आलेलें सुधारलेलें तेंही एक निघालें आहे. यावरून सांप्रतकाळचा धर्म पाहिला तर श्रध्देंत किंवा बुध्दींत नाहीं; परंतु खाण्यापिण्यांत आहे, असें आढळेल. या हल्लींच्या श्रुति, स्मृति, पुराणें, तंत्रें, आधुनिक भक्तिमार्ग हीं सर्व एकत्र करून सर्वांचे आधारानें हा धर्म चालत आहे. ब्राम्हणांची संध्या जरी पाहिली तरी त्यांत कांहीं श्रुति, कांहीं तंत्रें, कांहीं पुराणें, इत्यादि मिसळून सांप्रतची पध्धती घडविलेली आहे व भोळे हिंदू ताबुदहि करण्यास लज्जा धरीत नाहींत. तेव्हां आतां या सर्वांचा परिणाम या देशाचे स्थितीवर कसा होणार आहे, हा एक विचार करण्यास मोठा व चमत्कारीक विषय नव्हे काय?

वृत्तवैभव, ता० १२ जून १८६४

[नंबर १२६]

मनुष्याची मूळपीठिका

सांप्रत वेगवेगळे देश, धर्म, जाती, कूळ, इत्यादि संबंधानें मनुष्यांचे अनेक विभाग झाले आहेत, परंतु हे कल्पित विभाग आहेत. हे मनुष्यांनीं आपण होऊन सोईकरितां केले. परंतु मनुष्याचे चेहेऱ्यावरून चार जाती वेगळ्या दिसतात. त्यांचा तपशील असा—

१ आर्यजाती—यांत सर्व युरोपियन व हिंदुस्थानांतील ब्राम्हण, क्षत्रिय इत्यादि उंच जातीचे लोक येतात.

२ मोंगल जाती—यांत चिनाई, तार्तरी वगैरे.

३ अमेरिकन जाती—यांत अमेरिकाखंडांत जे जुने लोक आहेत ते.

४ शिद्दी जाती—यांत आफ्रिकाखंडांतील शिद्दी, काफरी वगैरे लोक येतात.

आतां या जाती वेगळ्या धरण्याचें कारण असें आहे कीं, या लोकांचे चेहरे वेगळे आहेत. कोणाचे ओंठ मोठे, कोणाचें नाक पसरट, कोणाचें कपाळ मोठें, असे स्वाभाविक भेद आहेत.

मनुष्यांची संख्या पृथ्वीवर आहे. तिचे धर्माप्रमाणें विभाग—

बौध्धधर्मी	४० कोट,	मुसलमान	२० कोट
खिस्तियनधर्मी	२६ ”	किरकोळ, यहूदी पारशी वगैरे	१४ कोट
हिंदुधर्मी	३० ”		

एकंदर अनेक धर्मांचे लोक १०० कोट. मनुष्यांमध्यें अनेक भाषा चालत आहेत; परंतु त्यांची व्याकरणपध्धती पाहून ज्या भाषेचें व्याकरण सारखेंसारखें जुळतें त्यांचा एक कट, असें केलें असतां मूळच्या तीन भाषा असाव्या, असे व्याकरणाचे तीन ओघ दिसतात. १ आर्यभाषा–हीपासून संस्कृत, जेन्द, ग्रीक, लाटीन, सेलूटिक (जुनी इंग्रजी), आर्यन, इत्यादि निघाल्या. कारण या सर्वसाधारण नियमांनीं चालतात व परस्परांत एकसारखे शब्द आहेत. २ सूर्यानी (?) भाषा–हीपासून आरबी, हिब्रू इत्यादि उत्पन्न झाल्या आहेत. ३ तुर्यानी भाषा–हीपासून चिनई, मलई, ब्रम्ही, सायनी, कानडी, द्राविडी, तैलंगी वगैरे.

१ हिंदुस्थानांत फार जुने काळीं जे लोक होते, त्यांपैकीं जागोजाग अद्यापि राहिले आहेत. परंतु ते अगदि नीच स्थितींत आहेत. कितीएक ठिकाणीं त्यांचीं नांवें प्रांतास पडलीं आहेत. जसे कोळीवरून कोळवण, गोंड लोकांचे देशास गोंडवण, महाराचे देशास महाराष्ट्र, मर लोकांमुळें मारवाड, बंगीस लोकांमुळें बंगाला, शिवाय रामोशी, खोंड, भिल्ल, डोंब, संथाल, आभीर, परवारी इत्यादिक हे या देशांतील मूळचे लोक.

२ सदर्हू लोकांस जिंकण्याकरितां तुर्यानी लोकांनीं या देशांत स्वाऱ्या केल्या. या लोकांची भाषा संस्कृत होती ती भ्रष्ट होऊन त्यापासून पुढें प्राकृत झाल्या. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य हे तीन वर्ण मात्र आर्यांत धरले आहेत. या त्रिवर्णांनीं शूद्रांस हटऊन आपला श्रेष्ठपणा स्थापित केला. हे आर्यलोक मुळीं उत्तर कुरूकडून म्हणजे हिमालयाचे उत्तरेकडून आले आहेत. तुर्यानी लोकांचा धर्म कसा होता, याविषयीं पत्ता नाहीं. परंतु आर्यलोकांचे धर्माचा पत्ता आहे. कारण कीं वेदशास्त्र हीं त्यांचीं पुस्तकें आहेत. परंतु हे आर्यलोक जसजसे जुने लोकांत मिसळत चालले, तसतसे त्यांनीं देशांतील प्राचीन धर्मांतील देव वगैरे आपले धर्मांत घेऊन स्वीकारले; म्हणजे वेताळ, म्हसोबा, बिरोबा, खंडोबा, लिंगपूजा, भवानी इत्यादि जुने लोकांपासून ब्राम्हणांनीं घेतलीं असावीं. कारण कीं, हीं दैवतें वेदप्रतिपाद्य ब्राम्हणधर्मांत नाहींत. त्याचप्रमाणें कितीएक जुने लोकांचे सण दिपवाळी, होळी हीं त्यांनीं आपले धर्मांत सामील केलीं. वेदांतील सूक्तें सर्व पाहिलीं तर इंद्र, अग्नि, अश्विन, मरुत, वरुण, सूर्य, वायु, रुद्र, विष्णु इतकींच लक्षून आहेत.

३ पुढें बौध्धांनीं ब्राम्हणांचे धर्माचें खंडन करून सर्व देशभर बौध्धधर्म स्थापन केला. पुढें त्यामध्यें मोठाले पंडित होऊन त्यांनीं ग्रंथ केले. हल्लीं संस्कृत ग्रंथ चालतात त्यामध्यें बौध्धांनीं केलेले ग्रंथ पुष्कळ आहेत. ज्यांचे आरंभीं ॐ नमः सिद्धं

असतें तो बौध्धांचा ग्रंथ व श्रीगणेशाय नमः असतो तो ब्राम्हणांचा ग्रंथ. वाकूभट, अमरसिंह इत्यादि बौध्ध होते. पुढें अशोक राजा झाला. त्यानें कुमारील भट्टाचार्याच्या मदतीनें बौध्धांचा धर्म मोडून पुनरपी ब्राम्हण धर्म स्थापन केला. ही गोष्ट शंकराचार्यांचे पूर्वी झाली. परंतु लोकांस माहिती नसल्यामुळें बौध्धधर्म मोडण्याचें यश शंकरस्वामीस लावतात. पुढें जैनमत म्हणून एक बौध्धधर्माचे पोटचा धर्म उत्पन्न झाला. त्या मतवाल्यांनीं बहुत ग्रंथ केले. त्यांनीं आपलीं वेगळीं अष्टादश पुराणें केलीं आहेत; या देशांत प्राचीन किल्ले, गाईलगड, पुरंदर, असीरगड, वगैरे जागोजाग आहेत; ते याकाळीं क्षत्रिय व शूद्र राजांनीं बांधले आहेत.

४ यानंतर यवन इत्यादिकांनीं थोडासा हा देश जिंकून अंमल चालविला, परंतु सर्व देशभर त्यांचा प्रसार झाला नाहीं.

५ यानंतर मुसलमान धर्माचे लोक या देशांत आले; ते देशभर पसरले आणि येथेंच राहिले.

६ त्यानंतर खिस्तीयन लोक पोर्तुगीज, इंग्लिश, फ्रेंच इत्यादि आले आहेत. त्यांचा अंमल सांप्रत आहेच.

या देशांत ज्या इमारती आहेत, त्यांत तुरयानी इमारती कांहीं आहेत. ब्राम्हणांनीं बांधलेल्या इमारती आहेत. बौध्धांनीं विहारें व लेणीं केलेलीं आहेत; जैनांनीं केलेलीं भुयारें वगैरे पालिठाणा, अबू, जुनागड इत्यादि ठिकाणें आहेत व त्यांचे देव आदिनाथ, ऋषभदेव, केशरीनाथ, नेमीनाथ, पार्श्वनाथ, महावीर, इत्यादिकांच्या मूर्ति त्यांत ठेऊन ते भजत आहेत. त्या आलीकडे मुसलमानांच्या इमारती, मोठाल्या मोंगलाई मशीदी, मनोरे, मुकरवे हे जागोजाग आहेत. त्यापुढें इंग्रज लोकांच्या इमारती थोडथोड्या वेगवेगळे प्रकारच्या आहेत. एकूण ६ प्रतींचीं शिल्पें या देशांत दृष्टीस पडतात. त्यांत तुर्यांनी लोकांचें शिल्पकौशल्य दक्षिण हिंदुस्थानांत फार आहे. आर्यशिल्पही जागोजाग आहे. बौध्धशिल्प वेरुळ, कारलें, घारापुरी, कान्हेरी इत्यादि स्थळीं प्रसिध्ध आहे. संस्कृत भाषा बुडून प्राकृत भाषा चालू झाल्या तरी जुने लोकांच्या द्राविड, तैलंगण, कर्नाटक एथील जुन्या भाषा होत्या त्या तशाच राहिल्या. त्या प्राकृत भाषांनीं बुडविल्या नाहींत. मुसलमान आल्यामुळें आरबी भाषाही चालू लागली. सारांश, सर्वच भाषा या देशांत चालत आहेत असें म्हटलें तरी चालेल. मुसलमानांच्या राजधान्या दिल्ली, आग्रा, औरंगाबाद, विजापूर इत्यादि ठिकाणीं त्यांच्या इमारती आहेत. दक्षिण हिंदुस्थानांत जुनीं दगडाचीं देवळें व गोपुरें बहुत आहेत. तीं वेगळेच जातीचीं आहेत. म्हणून तुर्यांनी लोकांचीं अशीं गणलीं आहेत. अनागोंदी, हंपि, कडापा, विजयनगर इत्यादि ठिकाणींही बहुत आहेत. आतां या देशांत किल्ले तर असंख्यात आहेत. लक्षावधी रुपये एकेक किल्ल्यास लागले असतील. तेव्हां या इमारतीस काय खर्च झाला असेल, त्याची गणति होत नाहीं. ज्याप्रमाणें सांप्रत आगगाडीचा खर्च होत आहे, त्याचप्रमाणें त्या

काळीं झाला असावा. सह्याद्री, विंध्याद्री, इत्यादी डोंगरांलगत हजारो किल्ले आहेत. ते बहुतकरून मुसलमानांचे पूर्वीचे आहेत; व कांहीं भुईकोट किल्ले आहेत, ते मुसलमानांनीं बांधले आहेत. परंतु डोंगरी किल्ले सर्व जुने काळचे आहेत. कितीएक किल्ल्यांवर देव आहेत. त्यांस नेमणुका आहेत. त्यांत देवी, वेताळ, सप्तऋषी, जानाई वगैरे आहेत. त्यांमध्यें मांगीण, कोल्हाटीण, महारीण अशाही देवता आहेत व त्यांचीं ठिकाणें कोणी दरवाजांत, कोणी किल्ल्याचे तटांत, कोणी तळ्याचे कांठीं व कोणाचें देऊळही असतें. याची चौकशी केली तर असें समजतें कीं, जेव्हां किल्ले बांधिले तेव्हां पायांत जिवंत बाळंतीण बायका महार जातीच्या वगैरे पुरल्या आहेत. त्यांसच देवता मानितात व त्यांस सालाबाद बकरीं, लुगडीं, वगैरे देतात. यावरून मनुष्यबळी देण्याचा सांप्रदाय त्याकाळीं होता व किल्ला बांधणें म्हणजे मोठें काम, त्यास मनुष्यबळी दिल्यावांचून तें शेवटास जाणार नाहीं, असे समजत होतेसें दिसतें. बोरघाटाचे काम चालत असतां कोणी खेडेगांवांतून अशी कंडी पिकविली होती कीं, रेलवे कंपनी कांहीं मुलें जिवंत पुरणार आहे, पण तसें या काळीं झालें नाहीं. कितीएक किल्ल्यांत मुंजे, म्हसोबा आहेत, असें सातारा, चाकण, केळंजा, राजगड, सिंव्हगड, पुरंदर इत्यादि किल्ले पाहून व तेथील लोकांत भाषण केल्यानें व त्या किल्ल्याचे हिशेब व झडत्या पाहिल्यानें समजन येतें. ज्यांचीं माणसें बळीं दिलीं त्या महारास किल्ल्यावरची, दरवाजावरची वतनदारी दिली असते. हा एक चमत्कार आहे.

याप्रमाणें या देशांत अनेक राष्ट्रांचे लोक येऊन अनेक वेळ देश जिंकिला आणि प्रत्येक जिंकणारे आपली त्यांत खूण ठेऊन गेले. आतां पुढें या देशाची स्थिती होणार आहे, हा एक प्रश्न विद्वज्जनांस मोठाच आहे.

❧ ❧

ता. १८ आक्टोबर १८६३

[नंबर १२७]

हिंदुस्थानांतील देश

या देशाचें प्राचीन संस्कृत नांव आर्यावर्त किंवा भरतखंड असें आहे. परंतु तार्तर देशांतून जे मोंगल मुसलमान लोक जिंकण्याकरितां हिंदुस्थानांत शिरले होते, त्यांस हे लोक काळे असें भासलें म्हणून त्यांणीं तद्वाचक हिंदु असें नांव त्यास दिलें व त्यामुळें हिंदुस्थान हेंही नांव या देशाचें त्यांनींच ठेविलें. त्याचाच भावार्थ पुढें काळे लोक काळी पलटण असा झाला.

युरोपखंडांत कितीएक राज्यें व संस्थानें आहेत; आणि हा एकटा हिंदुस्थान

देशच अर्ध्या युरोपखंडाएवढा आहे. म्हणून या देशास एक देश आहे म्हणणें वास्तविक पाहिलें तर योग्य नाहीं. कारण कीं, हें खरेंच एक मोठें खंड आहे व त्यांत अनेक देश आहेत. एकंदर प्रजा यांत २० कोटी आहे व विलायतेंत सारी दोन कोटी प्रजा आहे. तेणेंकरून विलायतेचे दसपट हा देश मोठा आहे. आतां विलायतेची वसाहत जरी फार दाट आहे, तरी हिंदुस्थानची लांबीरुंदी १५।१६ पट त्यापेक्षां अधिक येईल. या देशांत जिकडे तिकडे ब्राम्हणांचा अधिकार, संस्कृत भाषा व धर्म एकसारखा आहे, इतकेंच काय तें ऐक्यतेचें चिन्ह आहे. परंतु तसा युरोपखंडांतही सर्वत्र एकच धर्म चालतो. तथापि देश व राज्यें पृथक मानिलीं जातात व युरोपांतील लोक मोठे पराक्रमी आहेत. अस्तु.

हिंदुस्थानचे दक्षिण भागास चार भाषा आहेत. कानडी, मलबारी, तैलंगी आणि द्राविडी. यांपैकीं द्राविडीस 'तामळ' किंवा 'आरवी' असेंही म्हणतात. या चारी भाषा एका पद्धतीच्या आहेत. यांमध्यें व मध्य हिंदुस्थानचे भाषेंत एक मोठा भेद असा आहे कीं, मनुष्यजातीखेरीज सर्व पदार्थ नपुंसक लिंगांत जातात. घोडा, घोडी; बैल, गाय यांचा भेद नाहीं. मनुष्याव्यतिरिक्त बाकी जिवांस त्या भाषांत एकच नपुंसक लिंग समजतात. या चार भाषा सोडून मध्य हिंदुस्थानांत किंवा दक्षिणेकडे आलें म्हणजे तेथें सहा भाषा एकाच तऱ्हेच्या आढळतात. १ मराठी, २ गुजराथी, ३ मेवाडी, ४ मारवाडी, ५ कच्छी, व ६ सिंदी. नंतर पूर्वेस फिरलें म्हणजे १ माळवी, २ रांगडी, ३ ब्रिज, ४ मुलतानी, ५ काश्मिरी व ६ पंजाबी; आणि याचेही पूर्वेस वळल्यावर १ हिंदी, २ बंगाली, ३ उडियी, आणि ४ नेपाळी अशा ४ आहेत. या सर्व पूर्वेच्या भाषा एकसारख्या पध्धतीच्या व एकमेकींस जवळजवळ आहेत. एकूण २० भाषा झाल्या. आतां या सर्व भाषा बोलणारे लोक पाहिले तर वेगळ्या स्वभावाचे व वेगळ्या पोषाकाचे आणि वेगवेगळे रीतिभातीचे आहेत. या वीसही जातींचे लोकांत चांगले लोक ब्रिज भाषा बोलणारे हे आहेत. हे स्वरूपानें, स्वाभाविक गुणानें व शौर्यानेंही फार चांगले आहेत व इंग्रजी पलटणींत जे बहुतकरून लोक असतात, ते याच प्रदेशांतील. यांचे मनामध्यें कपट नसून मित्रभाव चांगला असतो व प्रसंगीं हे आपले जिवाकडेही पाहावयाचे नाहींत, असे हे खरे क्षत्रिय लोक आहेत. अजमेरपासून काशीपर्यंत हेच लोक आहेत. आतां गुजराथ, कच्छ व मारवाड या भागांकडे पाहिलें तर हे लोक शौर्यानें अगदीं कमी व राज्यकारभारास अयोग्य असे दिसतात. यांनीं पृथ्वीवर जन्म घेतल्यापासून कधीं राज्यकारभार केलाच नाहीं. त्यांतही इकडे श्रावक मताचें बल फार, यामुळें ते लोक हातांत शस्त्र धरणें हाच अधर्म समजतात; परंतु व्यवहारांत यांचें चित्त फार आहे. मारवाडी देशोदेशीं जाऊन द्रव्यसंपादन व व्यापार करितात. युरोपामध्यें जसें इंग्लंड त्यासारखे हे देश कांहींसे आहेत. इंग्लंडांतील लोक मुख्यत्वेंकरून व्यापारी असून शिवाय शूर व विद्वानही आहेत. त्यांस सर्व गुण परमेश्वराचे दयेनें मिळाले

आहेत. परंतु गुजराथ भागाचे लोक व्यवहारनिष्ठ फार आहेत. व्यापारामध्यें बंदोबस्त व शाहाणपण यांस आहे तसें इतरांस नाहीं; परंतु बाकी यांस कांहींएक येत नाहीं. तथापि व्यापारांतील यांची दक्षता पाहा कीं, मराठी देशांत मारवाडी येतात व लाखों रुपये कमावितात. आणि तैलंगही येतात, परंतु ते उघडेबोडके येतात व तसेच राहून भीक मागून कालक्रमण करून पुनः उघडेबोडकेच परत जातात. भीक मागण्यावांचून त्यांची मति दुसरे कामांत चालतच नाहीं असें दिसतें. यांचे खालीं मराठी देशांतील लोक. हे तरी पहिल्यापासून रानटीच होते; परंतु शिवाजीपासून त्यांस वैभव व राज्य येऊन हे प्रसिद्धीस आले आहेत. तथापि विशेष गुण यांजमध्यें व्यापाराचा किंवा शौर्याचा आहे असें नाहीं. दक्षिण देश भिकारी आहे. यामुळें लुटारू लोकांसारखी वृत्ती स्वीकारून हे कांहीं दिवस नाचले; परंतु मोठा गुण त्यांनीं कांहीं दाखविला नाहीं. शिंदे, होळकर व गायकवाड हे अद्याप मराठी कुळांतील शिल्लक आहेत. आतां पूर्वेकडील बंगालचे वगैरे लोक पाहिले तर ते अगदीं निर्बळ, त्यांजमध्यें कांहीं विशेष गुण नाहीं. आंगास पुष्कळ तेल लावितात व घाणेरे आहेत व निरुद्योगी आहेत. याचें कारण हा देश सुपीक फार आहे. जो देश भिकारी तेथील लोक हुशार असतात. हें कोकणस्थ व देशस्थ यांवरूनही पाहावें. इंग्लंडचे लोक दूरदूर पसरले व पराक्रमी निघाले, याचें कारण मुळचे भिकारी. जर त्यांचा देश श्रीमंत असता तर कधींही ते उद्योगास लागले नसते. दक्षिणेकडे पाहिलें म्हणजे तैलंग, द्रविड हे लोकही पराक्रमी दिसत नाहींत. त्यांजमध्यें तर दक्षिणी लोकांइतकेंही ज्ञान नाहीं. हे उघडेबोडके फिरत असतात. देश मात्र चांगला पिकतो. याजमुळें खाण्यास कमी नाहीं. परंतु त्यांजपासून मोठा उद्योग होणें नाहीं व पूर्वीही कधीं झाला नाहीं. जेव्हां मुसलमानांनीं शेवटीं हा भाग जिंकला, तेव्हां इकडे कांहीं राजे होते; परंतु त्यांजमध्यें कांहीं शाहाणपण नसल्यामुळें ते सहज जिंकले गेले; मोंगलांनीं हिंदु राजांच्या मुली करण्याचा पाठ घातला. तेव्हां सर्व राजांनीं दिल्लीपतीस आपल्या मुली दिल्या; परंतु उदेपुरच्या राजानें आपली मुलगी दिली नाहीं. यास्तव तो राजा अद्याप आपणांस मोठा म्हणवितो. या राजाचे वाड्यास सुवर्णाचे कळस आहेस व यास अवतार म्हणूनच लोक गणतात. याचे राज्यांत अर्धा वसूल देवस्थानांकडे दिला आहे. उदेपुराजवळ एकलिंग म्हणून महादेवाचें देवालय आहे, त्याकडे दरमहा २ लक्षांचा खर्च आहे. या राजास या देवाचा अवतार समजून भाटे वगैरे प्रत्यक्ष एकलिंग म्हणतात. हीं संस्थानें मोंगलांस देखील जिंकलीं गेलीं नाहींत. अद्यापपर्यंत हा देश बहुतकरून क्षत्रियांचे स्वाधिन आहे. हा देशही डोंगरी रानामुळें फार कठीण आहे.

या देशांत मुसलमानांचें राज्य फार दिवस चाललें व सर्व ठिकाणीं त्यांचा अंमल होता, म्हणून त्यांनीं हिंदुस्थानी भाषा सर्वत्र चालू केली व ज्यास हिंदुस्थानी येते त्यास हिंदुस्थानांत कोठेंही फिरण्यास अडचण पडत नाहीं. तैलंगण, द्रविड या देशांतही

ही भाषा बाजारांत समजली जाते. ही एक व या देशांत संस्कृत भाषा ही विद्वान् लोक धर्मांत सर्वत्र चालवितात ती दुसरी. अशा या दोन भाषा सर्वत्र चालतात. परंतु याशिवायही देशोदेशींच्या भाषा पृथक् पृथक् आहेतच. यामुळें विद्यावृध्दीस फार अडचण पडते. मराठी देशांतील वर्तमानपत्र गुजराथेंत उपयोगी नाहीं व गुजराथेंतील उदेपुरास उपयोगी नाहीं. व कानडी मुलकांतील बंगाल्यांत उपयोगी नाहीं. तेव्हां इतक्या वीस भाषांत नवे ग्रंथ होऊन विद्या वाढते कशी हा एक मोठाच प्रश्न आहे. अस्तु.

या देशांत कोणत्याही राजाकडून इतके वीस प्रकारच्या लोकांत राज्य चालविलें जाणें कठीण होतें व पूर्वी कधीं विक्रमादिकांनीं चालविलेंही नाहीं. परंतु हल्लीं इंग्रज चालवितात, ही मोठी गोष्ट समजली पाहिजे. यांहीं असें केलें आहे कीं, या देशांतील सर्व व्यंगोमी मनांत आणून त्या भरण्याचा यत्न फार केला आहे. जितक्या भाषा चालतात तितक्या आहेतच, पण त्यांखेरीज आरबी, पारशी यादेखील ते शिकतात. व वेगळ्या वेगळ्या प्रांतीं राज्यकारभार नीट करतां यावा अशीं माणसें तयार करितात आणि त्यांस कारभारांत नेमतात. या तजविजीमुळें त्यांचें राज्य पुष्कळ अडचणी असतांही सारखें चालतें. गाइकवाड गुजराथेंत १०० वर्षें राज्य करितात. तरी त्यांचे पदरीं गुजराथी व्याकरण लिहिणारा कोणी पुढें झाला नाहीं. परंतु इंग्रजांचे राज्यांत त्यांच्या व्याकरणावर ग्रंथ झाले आहेत. तेव्हां त्यांच्या महदुद्योगामुळेंच त्यांचीं कामें सुरळीत चालतात व कोठें न्यूनता दिसत नाहीं. या देशांत पदार्थ काय पिकतात, ते समजण्याकरितां एक घर बांधून तेथें पदार्थ ठेविले आहेत. तसेच ग्रंथांचे समुदाय ठेविले आहेत. दरएक कामदाराचे मागें एक पंडित ठेऊन दिला असतां भाषा येते कीं नाहीं, याची वारंवार परीक्षा चालली असते. मराठी राज्यांत असें नाहीं. पहा! ग्वाल्हेरीस शिंद्यांचें इतके दिवस राज्य आहे; परंतु आपल्या राज्यांत काय चालतें, भाषा सुधारावी कशी, व तींत ग्रंथ करावे कसे, याचा विचार त्यांनीं कधीं केला आहे काय? नाहीं. फक्त पैका निघेल तितका काढावा व जेवणावळी घालाव्या यावर लक्ष; परंतु नुसतें हें केल्यानें शहाणपण व व्यापार कसा वाढेल? इंग्रजी राज्यांत सर्व मार्ग शाहाणपण वाढविण्याचे आहेत. हिंदूंचीं धर्मशास्त्रें व वेदादिक पुस्तकें यांचें शोधन इंग्रजांनीं केलें व आमची मराठी भाषा सुधारणारे तेच होत. जसा त्यांचा उद्योग चालतो तशीं त्यांचीं कामें दुरुस्त चालतात. मराठ्यांच्या सर्व कुळकथेची बखर इंग्रजांनीं लिहून काढिली. पण इंग्रजांची आपले स्वदेशीय राजांनीं कधींतरी बखर लिहिली आहे काय? व त्यांच्या विद्या काय हें शोधून काढिलें आहे काय? नाहीं. ज्यास स्वतांची शुध्ध नाहीं त्यास दुसऱ्याचा कारभार कसा सुचेल? इंग्रजांचे कोडतांतील फैसल्यांचीं बुकें आहेत. शिंदे, होळकर, गायकवाड यांचे कोडतांतील आहेत काय? अस्तु.

या सर्व गोष्टींवरून पहातां हा देश सुधारण्यास फारच अडचणी आहेत. याजकरितां कितीएकांचें मत असें आहे कीं, हिंदुस्थानी भाषा सर्वच शाळांतून चालू

करावी व कोणी म्हणतात कीं, संस्कृत चालू करावी आणि दुसरे कोणी म्हणतात कीं, ज्या देशांतील जी भाषा तीच त्या देशांत चालवावी.

असो. आतां दक्षिण, बंगाला, पंजाब, द्रविड इत्यादि देश दूरदूर असल्यामुळें त्यांची एकमेकांची वळख नवती. ती आगगाडीच्या सहायानें पडण्याचा प्रसंग आला आहे. आतां हीं राज्यें जेव्हां एकत्र मिळतील व इकडचे लोक तिकडे जातील आणि तिकडचे इकडे येतील, तेव्हां लोकांस एक भाषेची अर्थांतच गरज लागेल, कारण तसें न होईल तर एक मनुष्यानें २० भाषा शिकणें कठिण आहे.



ता. २२ जानुआरी १८६५

[नंबर १२८]

हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास कां नाहीं ?

हिंदुस्थान हा मोठा विस्तीर्ण देश आहे, परंतु याचा प्राचीन इतिहास कोणी कधींच लिहिला नाहीं. ही एक मोठी चमत्कारिक गोष्ट आहे व याचीं कारणें सांगण्यास मोठीं अवघड आहेत. मूळ वेदांपासून प्राकृत कवितेपर्यंत हजारों ग्रंथ आहेत. परंतु इतिहासाचा ग्रंथ त्यांत नाहीं. तसेंच खरी काळगणना, खरा भुगोल, खरा इतिहास यांची व हिंदु लोकांची मुळींच ओळख नाहीं. लोक अविद्वान् असल्यामुळें ही गोष्ट फार थोडे लोकांचे लक्षांत वागते. परंतु ही खरी आहे यांत संशय नाहीं. वेदाचीं पुस्तकें पाहिलीं तर त्यांत यज्ञयागाच्या व कांहीं राजांच्या गोष्टी आहेत व त्याच ग्रंथाचें "उपब्रुव्हण" (पुनरावृत्ती) पुराणें आहेत. म्हणजे वेदांतील कथा अधिक तपशीलवार पुराणांत लिहिल्या आहेत व पुराणेंही बहुतकरून मतवादी लोकांनीं आपलीं आपलीं दैवतें प्रसिध्ध करण्याकरितां लिहिलीं आहेत. म्हणजे कांहीं स्मार्तांनीं, कांहीं वैष्णवांनीं, कांहीं शाक्तांनीं, असीं लिहिलीं. व पुराणें म्हणजे जुन्या कथा, परंतु त्याविषयीं विचार पाहूं गेलें तर त्या सर्व ग्रंथांचे दोन हेतु दिसतात. एक ब्राम्हणांचें महात्म वाढविणें व दुसरें लोकांस गम्मत करणें. या धोरणानें सर्व पुराणें लिहिलीं असें त्यांचे प्रतिपृष्ठांत प्रमाण आहे व असंभाव्य किती लिहावें याचा तर लिहिणारांनीं अंतपारच ठेविला नाहीं. त्यांनीं तापी नदीस सूर्याची कन्या आणि यमाची बहीण म्हटलें. सातपुड्या डोंगरास अगस्तीऋषीचा शिष्य केला. हिमालयापासून समुद्रापर्यंत जी विस्तीर्ण गंगा ती एका ब्राम्हणाचे मांडींत दडपिली. त्याचप्रमाणें सर्व सागर एकाचे आचमनास दिला. रामाची सर्व फौज वानरांची कल्पिली. तेव्हां अज्ञानी लोक जरी हें सर्व खरें मानतील, तरी विचारी लोक यास केवळ इतिहास असें म्हणणार नाहींत. शिवाय

कोणती गोष्ट कधीं व कोठें झाली, याचा ठिकाण नाहीं व शंभर गोष्टी खोट्या तर त्यांत एकादी खरी व तिजबद्दलही निश्चय होणें कठीण, तेव्हां त्या ग्रंथांचा इतिहासरूपानें उपयोग होऊं शकत नाहीं. आतां रामायण जें आहे तें काव्यांत धरलें आहे व भारतास आणि हरिवंशास मात्र इतिहास समजतात. तरी त्यांतदेखील अशक्य गोष्टी बहुत आल्या आहेत; याजमुळें तेही ग्रंथ केवळ इतिहास म्हणतां येत नाहींत. अस्त्रांच्या लढाया, मंत्रविद्या, स्वर्गास जाऊन क्षणांत ऐरावत आणणें, आणि स्वर्गापर्यंत बाणांचा जिना करणें यास खरा इतिहास कोणी म्हणणार नाहीं. जे लोक अगदीं वेडावले आणि ज्यास खरें काय म्हणावें, खोटें काय म्हणावें याची स्फूर्ती राहिली नाहीं व ज्यांचे विचाराचें बीज अगदीं जळून गेलें ते मात्र अशा गोष्टी खऱ्या म्हणत असतील तर म्हणोत. आतां न्याय, वेदांत वगैरे शास्त्रांचें ग्रंथ पाहिले तर त्यांत ईश्वर आहे किंवा नाहीं, सृष्टी कोणी निर्माण केली व या सर्वांचीं मूळतत्त्वें किती, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें देण्यासाठीं बहुत यत्न केले आहेत व कल्पनेचे वृक्ष फार मोठे वाढविले आहेत. त्यांत कांहीं इतिहास नाहींच. आतां काव्य, नाटकें, प्रबंध, सूत्रें, आन्हिकें, इत्यादि ग्रंथांत पाहिलें तरी इतिहास नाहींच. याजमुळें मुसलमान लोक येण्यापूर्वी या देशांत व यांतील अनेक प्रांतांत म्हणजे दक्षिणेंत, गुजराथेंत, कर्नाटकांत, बंगाल्यांत वगैरे प्रांतीं काय होतें, राजे कोण होते, त्यांणीं केलें काय? याचा ठिकाण नाहीं. आतां त्यांनीं डोंगर कोरले, किल्ले बांधिले, देवळें बांधलीं व शास्त्रें लिहिलीं, त्यांचे ताम्रपट शिक्के सांपडतात व त्यांच्या राजधान्यांचीं शहरें आहेत, याजवरून मोठाले राजवंश झाले होते असें दिसतें. परंतु त्यांचा इतिहास कांहींच राहिला नाहीं. याजमुळें मुसलमानांचे पाठीमागें या देशांत व्यवस्था कशी होती, तिचा ठिकाण लागत नाहीं. मुसलमान जेव्हां इकडे आले तेव्हां त्यांणीं मात्र आपण काय केलें व कोणतीं राज्यें घेतलीं, हें लिहून ठेविलें. याप्रमाणें फेरिष्टा, अबू फजल इत्यादि इतिहास लिहिणारे झाले, त्यांणीं मोंगलांची सर्व कारकीर्द वर्णन केली आहे. पुढें इंग्लिश लोकांचें येणें झालें, त्यांणींही हिंदुस्थानचे इतिहास बहुत लिहिले. परंतु हे सर्व इतिहास आलीकडचे म्हणजे एक हजार वर्षांचे आहेत. या एक हजार वर्षांपूर्वी या देशांत हिंदवी राज्यें कशीं होतीं, त्याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. राम, कृष्ण, बौध्ध, यांच्या थोड्या थोड्या गोष्टी आहेत; परंतु इतर राजांचा ठिकाण नाहीं. तेव्हां असें इतिहासाचें शून्य असण्याचें कारण काय? हा प्रश्न साहजिक उद्भवतो. अस्तु. आमचे समजुतीप्रमाणें आम्हांस कांहीं कारणें दिसतात तीं अशीं– प्रथम तर असें दिसतें कीं, इतिहासापासून उपयोग आहे व खरा इतिहास लिहावा ही गोष्ट हिंदु लोकांस कळलीच नाहीं व हिंदुलोकांचें शाहाणपण इतक्या स्थितीवर आलें नाहीं आणि मुसलमान इतिहासकर्ते यांच्याविषयीं असेंच लिहितात कीं, हे लोक अगदीं अज्ञानी होते. यांस जिंकण्यास आम्हांस उशीर लागला नाहीं. उत्तर भागांत कांहीं शाहाणपण होतें, परंतु

दक्षिणेंत उत्तरोत्तर अगदीं रानवट अवस्थेंत हिंदु लोक होते. दुसरें कारण असें कीं, या देशांत अनेक भाषा चालत, याजमुळें लोकांची फारशी मिसळ होत नवती. कोकणांतील लोक कोकणांत व बंगाल्यांतील बंगाल्यांत, असे हजारों वर्षेंपर्यंत वेगळेपणानें लोक राहिले. तेव्हां एकमेकांचा इतिहास लिहिण्याची त्यांस गरज पडली नाहीं. तिसरें कारण असें आहे कीं, हिंदु लोक निवृत्तीमार्गांत लक्ष ठेवणारे फार आहेत. त्यांस कांहीं ग्रंथ लिहिणें झालें तर त्यांत परमार्थ दिसला पाहिजे. त्यांनीं या जगाची स्थिती वर्णन करण्यांत तादृश लाभ नाहीं असें मानून धर्मसंबंधीं कर्मकांडांचे ग्रंथ मात्र लिहिले. परंतु ऐहिक स्थितीवर लक्ष दिलें नाहीं. पुढें आलीकडे प्राकृत कवी तुकाराम, मोरोपंत, अच्युतराव मोडक, वगैरे जे झाले, त्यांनीं तरी धर्मसंबंधीं, ईश्वराचे स्तुतिप्रकरणीं व ज्या कथा पवित्र मानल्या होत्या त्या प्रकरणीं मात्र ग्रंथ लिहून काढण्यांत जन्म घालविला. तसेंच रंगनाथ, रामदास, जयराम वगैरे बहुत ग्रंथकर्ते शिवाजीच्े वेळेस होते. परंतु त्यांनींही मराठी राज्याचा इतिहास लिहिला नाहीं. पेशव्यांचें राज्य कमकसर शंभर वर्षें चाललें, परंतु पेशव्यांची किंवा त्यांचे पदरचे सरदार शिंदे, होळकर, पटवर्धन, विंचूरकर राजेबाहादर यांची बखर कोणी लिहिली नाहीं. पुरुषप्राधान्य ग्रंथ लिहिणें हें हलकें काम असें लोकांस वाटत होतें. यास्तव जो तो कांहींतरी देवाचे ग्रंथ करी. याजमुळें मनुष्यांचे इतिहास लिहिले गेले नाहींत. मोरोपंतांनीं १०८ रामायणें केलीं, परंतु पेशव्यांचे राज्यावर कांहीं कविता केली नाहीं. याचें कारण ती मेहेनत व्यर्थ जाते, असें त्यांस वाटत होतें. चौथें कारण असें कीं, मुसलमानी राज्य सातशें वर्षें चाललें, त्यांत बहुत ग्रंथांचा नाश झाला. हिंदुलोकांची मती अगदीं फिरली. त्यांच्या सर्व चाली बदलल्या व ग्रंथ करण्याचें काम अगदीं बुडालें. पांचवें कारण असें कीं, जी काय विद्या ती ब्राम्हणांचे हातीं होती. लिहिणें, वाचणें, कविता करणें हें सर्व ब्राम्हणांकडे आणि ते तर भिक्षुक, राजाश्रयानें पोट भरणारे. यांजकरितां त्यांनीं खरा इतिहास निर्भयपणानें व भीड न धरितां लिहिला नाहीं. जें लिहिलें तें कोणी राजाची तारीफ व्हावी व त्यास बरें वाटावें या हेतूनें भलतेंभलतें लिहिलें. शालिवाहन पैठणचा राजा, याचे सर्व हत्ती घोडे मातीचे होते व ते अमृतानें जीवंत केले, इत्यादि अपूर्व व अशक्य गोष्टी लिहून स्तुती करून ठेविली आहे व त्यांत आपला थोरपणा जितका दडपेल तितका दडपला आहे. साहावें कारण, या देशांत नेहमीं वाद, तंटे व दंगे होत राहिले. कधीं स्वस्थता नसे, याजमुळें खरे ग्रंथाची वृद्धी झाली नाहीं. सातवें कारण असें कीं, मुसलमान येण्याचे पूर्वी ग्रंथ लिहिण्याजोगें कांहीं झालेंच नाहीं. साधारण गोष्टी तर इतिहासांत लिहिण्याचे उपयोगी नाहींत. राजे जेवीत होते व निजत होते. या लिहिण्यांत कांहीं शिक्षा नाहीं व उपयोग नाहीं. तेव्हां मोठें कांहीं झालेंच नाहीं; मग लिहावें तरी काय? या कारणानें इतिहासाचे ग्रंथ झाले नाहींत. आठवें कारण असें आहे कीं, जुन्या लोकांस अघटित वर्णन केलें तरच

मौज वाटे व खरें वर्णन केलें तर त्यांत मौज नाहीं, अशी त्यांची समजूत होती. याचा दाखला इतर देशांतही आहे. जितके पृथ्वीवर देश आहेत, त्या सर्व देशांचे प्राचीन इतिहास आहेत ते कितीएक पुराणांसारखेच आहेत. खरा इतिहास लिहिण्याची गोडी लोकांस आलीकडे लागली. प्राचीन काळीं ही समजूत नवती, असें दिसतें. इराण देश मोठा विख्यात आहे; परंतु त्याचा इतिहास शाहानामा म्हणून साठ हजार श्लोकांचा फिरदुसी कवीनें लिहिला आहे. त्यांतही आघटित गोष्टी पुष्कळ लिहिल्या आहेत. कोणा देशाचा इतिहास हजार वर्षांचा आहे व कोणा देशाचा पंधराशें वर्षांचा आहे. त्याचे पाठीमागें कांहींएक नाहीं. नववें कारण असें आहे कीं, संस्कृत भाषा बुडाली. नंतर ग्रंथ करण्याचें काम थकलें आणि जुने ग्रंथ होते त्याजवरून नकला व भाषांतरें करण्याचें काम चालू राहिलें. नवीन ग्रंथ करावा असें कोणास सामर्थ्यही राहिलें नाहीं व पूर्वी आपले वडील भारतासारखे ग्रंथकर्ते झाले, त्यांचे वंशांतील सामर्थ्यहीन आपण, ग्रंथ कशाचे करावे? असें त्यांस वाटून त्यांनीं ग्रंथ करण्याचें काम बंद पाडिलें. कालिदास वगैरे यांणीं मौजेचे ग्रंथ म्हणजे काव्यें, नाटकें वगैरे रचिलीं तींपण जुन्या ग्रंथांचेच धोरणानें केलीं आहेत. नवीन ग्रंथ कोणी केला नाहीं. कमळाकर वगैरे यांणीं ग्रंथ केले ते तरी धर्मशास्त्राचे जुने ग्रंथ पाहून त्यांजवरून जुळवाजुळव केलेले आहेत. त्यांत नवीन कांहीं नाहीं. प्राकृत ग्रंथ झाले ते तरी सर्व याच प्रकारचे. त्यांत नवीन कांहीं नाहीं. संस्कृत भाषा बुडाली. नंतर लागलीच जैनधर्म उत्पन्न झाला. तो तर कितीएक दिवस चालला. त्या धर्माचे सर्व ग्रंथ बोबडें संस्कृत म्हणजे मागधी भाषेंत आहेत. पुढें ग्रंथ करण्याचें कामच थकलें. हेंही कारण इतिहास न होण्याचें आहे. याप्रमाणें आम्ही हीं नऊ कारणें जरी सांगितलीं तरी हिंदुस्थानाचा प्राचीन इतिहास कां नाहीं, या पृच्छेचें पूर्ण समाधान होईल असें नाहीं. परंतु तात्पर्य इतकेंच कीं, खरा इतिहास लिहिण्याचे योग्यतेस हिंदुलोक आलेच नव्हते. याजकरिता शिकंदर या देशांत आला. यवनाचें राज्य पूर्वी या देशांत होतें. पुढें मुसलमान आले. त्यांणीं राज्य केलें; इत्यादि गोष्टी परराष्ट्राचे इतिहासावरून घ्याव्या लागतात. स्वदेशीय लोकांनीं कोणाच्याविषयीं कांहीं लिहिलें नाहीं. तसेंच कांहीं चिन्हें दृष्टीस पडतात. त्यांजवरून अनुमानें करावीं लागतात व कितीएक शोधक लोक भाटांचे ग्रंथ, प्रबंध वगैरे आहेत, त्याजवरून यत्न करितात. परंतु त्यांजवरून तुटका इतिहास समजतो; संपूर्ण समजण्यास कांहीं आधार नाहीं व मुसलमानांचा अमल बसेपर्यंत खरा इतिहास कांहीं नाहीं, असेंच म्हणणें योग्य आहे. वास्तविक म्हटलें तर या देशांत चोहोंकडे शेंकडो राजे असतील. त्यांच्या नगऱ्या असतील. त्याचे देश, शिक्के, करभार घेण्याचे दस्तूर, वगैरे परोपरीचे असतील, यांत संशय नाहीं. परंतु त्या सर्वांवर अगदीं पडदा पडला आहे. त्या वेळचीं जुनीं शहरें उज्जनी, पैठण, महेश्वर, इत्यादि व त्यांणीं डोंगर कोरून ठेविले आहेत व किल्ले बांधले आहेत ते पाहून मात्र लोक आश्चर्य पावतात कीं, हें कोणी केलें असावें.

परंतु तें करणाराचें नांव गांव व त्यावरील लिपीचें देखील स्मरण आतां राहिलें नाहीं. कोठें कोठें झालेले लेख ताम्रपट वगैरे आहेत. त्यांजवरून राजांचीं फक्त नांवें मात्र कळतात; परंतु येवढें कळून उपयोग काय? तेव्हां हें राष्ट्र कसें वृध्धी पावलें, त्या राजांनीं कशी वर्तणूक केली, कोणास जिंकलें, व रयतेचें पाळग्रहण कसें केलें, हें समजण्यास कांहीं आधार नाहीं. जागोजाग ऋषींचे आश्रम व देवांचीं स्थानें आहेत, अशा दंतकथा राहिल्या आहेत व ब्राम्हण आपलीं गोत्रें, सूत्रें शाखा सांगतात, परंतु त्यांविषयीं कोणास कांहीं खरें ठाऊक नाहीं आणि जें ठाऊक आहे तें इतिहासाचे वर्गांत येत नाहीं. म्हणून त्यास बडबडकथा इतकें मात्र म्हणतां येतें. तेव्हां आतां खरें इतिहासाचे ग्रंथांस आणि या देशाचे ऊर्जितास एकदाच आरंभ झाला आहे हें खरें आहे. आतां पुढील इतिहासांत ईश्वर या देशाचें भूषण करो असें आम्ही ईश्वराजवळ मागतों.

♣ ♣

ता. २२ नोवेंबर १८६४

[नंबर १२९]

हिंदुस्थानची मनोदेवता

तिची जागृती, सुषुप्ती, स्वप्न आणि पुनरुत्थान

या हिंदुस्थानचे लोकांचा एकंदर विचार केला तर २००० वर्षांपूर्वी यांची मनोदेवता जागृत असून व्यावृत्ति करीत होती. मनु, याज्ञवल्क्य, पाराशर, गौभिल, बौधायन, यांणीं स्मृति म्हणजे काय यांचीं पुस्तकें केलीं, त्यावेळेस त्यांणीं किती विचार केला असेल बरें! मुलीचें लग्न आठवे वर्षीं करावें किंवा दाहावे वर्षीं करावें, अशा कलमांचे उलगडे लिहिण्यास विचार केल्याशिवाय हे ठराव होतील काय? आतां एकंदर ३०।४० स्मृति आहेत. याजवरून देशोदेशीं किंवा वेगवेगळ्या काळीं हे कायदे ठरले आहेत व कितीएक अन्यांनीं करून त्यांजवर मोठ्यांचीं नांवें घातलीं असतील. परंतु त्याकाळीं विचार होता हें सिध्ध आहे. आतां जशा सोसैट्या व सभा करितात, तशीं पूर्वी पार्षद म्हणून ऋषींमध्यें विचारस्थलें होतीं. पुढें या मनोदेवतेस झोंप लागून तिणें अनेक स्वप्नें पाहिलीं. नवीन उद्योग किंवा नवीन कायदे करण्याचें सोडून दिलें. नवीन नियम करण्याचें सोडून दिलें. नवीन नियम करण्याचें एकीकडे राहिलें पण त्याविषयीं विचार करण्याचें देखील काम बंद पडलें. परंतु आतां ही मनोदेवता पुन्हा जागृत झाली आहे. याजमुळें नवीन विचार सुचूं लागले आणि युक्तिहीन ज्या गोष्टी आहेत, त्या अयोग्य असें दिसूं लागलें. बरें, अशा कामास मागील विचारी लोकांचें संमत नाहीं काय? पाहा!

युक्तिहीने विचारे तु धर्महानिः प्रजायते—मयूखे.

अर्थ—युक्तिहीन जो विचार तो धर्महानिकारक होय.

यास्तव आतां पुनर्विवाह, बालविवाह, ऋतुप्राप्त्युत्तर विवाह इत्यादि गोष्टींकडे नजर जाऊं लागली आहे. हें जागृतीचें चिन्ह आहे कीं नाहीं ?

ता० २ आक्टोबर १८६४

[नंबर १३०]

संस्कृत विद्या

विद्या शब्दाचा अर्थ ज्ञान म्हणजे तेणेंकरून मनुष्य अधिक शाहाणा व्हावा व अधिक व्यवहारज्ञ व्हावा, असें साधारण विचार पाहातां दिसतें. परंतु या आमचे संस्कृत विद्येस हें कलम लागू होत नाहीं. संस्कृतांत विद्वान म्हणविणारे व्यवहार, दरबार, राज्यकारण, युध्ध इत्यादि कामांत कधीं प्रसिध्ध झाले नाहींत व आपले हिंदु लोकांची स्थिती अशी दिसते कीं, जे विद्वान नाहींत त्यांचा श्रेष्ठपणा विद्वानांवर असतो व पूर्वी नाना फडणीस, सखाराम बापू, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव इत्यादि जे नामांकित पुरुष झाले ते तर कोणीं संस्कृत पढले नवते. दुसरें असें कीं, विद्येचा उपयोग विशेष व्हावा तें एकीकडे राहून उलटें जे विद्वान त्यांची मूर्खांत गणती होते. हा त्यांचा विद्वत्तेचाच चमत्कार आहे. त्यांस समयोचित भाषण किंवा व्यवहारीक ज्ञान हें कांहींच येत नाहीं व आतां दिवसेंदिवस विद्येचें प्राधान्य होत चाल्लें, तों तों या संस्कृत विद्येची योग्यता फारच उघडी पडूं लागली आहे. संस्कृतांत विद्वान असलेल्या कोणी पुरुषानें मोठा पराक्रम केला, किंवा राज्यकारभार केला, असें कधींच झालें नाहीं. जे शास्त्री म्हणवितात ते पाहिलेले ग्रंथांतील पंडीत होत. त्यांस एकादा परिष्कार विचारला तर त्याचें उत्तर ते देतील. पण तेंही ग्रंथांत लिहिलेलें असेल तरच. याज्ञीक जे पढतात ते दर्भ, समिधा, तूप, तांदूळ यांचे खटपटींत मोठे प्रविण म्हणवितात. आणि अगोदर तूप लावावें किंवा अगोदर पाणी शिंपडावें याजबद्दल त्यांचें पांडित्य चालतें. कोणी म्हणतो अमुक सूत्रांत अगोदर तूप घालावें असें लिहिलें आहे व कोणी म्हणतो अगोदर पाणी घालावें, असें अमुक स्मृतिकार म्हणतो. तात्पर्य या विषयापलीकडे त्यांचें ज्ञान नसतें. साधारण व्यवहारांतील कामाविषयीं एकादा अडाणी वाणी जी मसलत सांगेल, तीपण यांच्यानें सांगवणार नाहीं. वैदिक म्हणविणारे जे आहेत ते तर घोकून घोकून राघूसारखे अर्थावाचून शब्द पाठ करितात. आणि त्या गोष्टींचा मोठा अभिमान धरून आम्ही विद्वान असें म्हणतात. परंतु त्यांची बुध्धी तर नादान कुळंब्याप्रमाणें देखील नसते.

पुराणीकपाहावे तों अद्भुत कथा आणि पोरकट काहाण्या यांनीं त्यांचें मन भरलेलें असतें. म्हणून त्यांचा कांहीं उपयोग नाहीं व कोणी जोशी वगैरे आहेत ते भलतेच प्रश्न व ग्रह सांगून भविष्यकाळचे ज्ञानाचे भुलथापीवर भोळे लोकांपासून दोन पैसे उपटतात. तेव्हां असली विद्या पढली असतां जन्मपर्यंत भीक मागावी लागते हें फळ होतें व तें गैरवाजवी आहे असें दिसत नाहीं. तेव्हां असें दिसतें कीं, संस्कृत विद्या जी आहे, ती व्यवहारांत मुळींच उपयोगी पडूं नये अशा तऱ्हेची आहे, हेंच खरें. आजपर्यंत इतके इतिहास झाले, राज्यें झालीं व मसलती झाल्या, पण त्यांत संस्कृत विद्येचा उपयोग कधीं झाला आहे असें आढळून आलें नाहीं. गृहस्थांनीं पैका मिळविला म्हणजे त्याजवर हे संस्कृत विद्वान गोचिडासारखे बसून त्यांचे संपादित धनाचा अंश पीत असतात. पण त्या गृहस्थांचा तरी हे उपयोग काय करितात, तें आम्हांस ठाऊक नाहीं. आम्ही आमक्याचे पदरीं असतों व आम्ही अमक्याचे आश्रित आहों असें हे विद्वान सांगतात. पण त्यांच्या उपयोगाविषयीं पाहिलें तर शून्य. ज्यांचे घरीं हे राहातात त्यांचीं मुलें हे शाहाणीं करीत नाहींत. त्यांचा जमाखर्च लिहीत नाहींत. त्यांस बुध्धिवाद सांगण्याचे उपयोगी पडत नाहींत व त्यांचें दुकान वगैरे असलें तर तर तें चालविण्याचेही उपयोगी नाहींत. त्यांचा उपयोग इतकाच दिसतो कीं, यजमानाचे घरचे देव धुवावे व भाकड किंवा विधवा जुनी म्हातारी कोणी घरीं असली तर तिला अद्भुतकथा सांगून वर्षांत शें-दोनशें पानें वाचावीं. म्हणजे हें वाचणें हल्लींचें एकादें मूलही एका दिवसांत करील. पण हे पुराणीक त्याचा थाट वर्षभर करून समाप्ती करितात. आणि अमुक कथा झाली, अमुक पुढें आहे, अमुक पुराण झालें, अमुक व्हावयाचें आहे, असें नादीं लाऊन त्या अडाणी म्हातारीस किंवा वृध्ध अक्षरशत्रु गृहस्थास दोनशें पानें वाचण्याचें मोठें कौतुक वाटवितात. बरें, ह्या दोनशें पानांत अक्कल काय पैदा झाली हें पाहिलें तर दिल्लीचे हत्ती भिमानें लंकेस टाकले व स्वर्गास अर्जुनानें जिना बांधून त्याजवरून ऐरावत उतरविला, असल्या पोरकट व असंभाव्य कथेचें ज्ञान झालें. सारांश विद्येमध्यें कांहीं व्यावहारीक शहाणपण किंवा कथा असली तरच मनुष्य विचारशील होईल आणि संस्कृत विद्येंतील सर्व गोष्टी पाहाव्या तों अशा आहेत कीं, जों जों मनुष्य ती अधिक शिकेल तों तों त्यास इस्पितळांतील वेडा होण्याचें साधन अधिक होणार. मग असले विद्येस वाढविण्यास लोक कशास इच्छितात? व पढणारे कशास पढतात? आतां कोणी म्हणतील कीं, श्राध्धपक्षाचें बस्तान बसलें आहे, तोंपर्यंत पोटास मिळेल. परंतु आम्हीं म्हणतों कीं, विद्येचें सार्थक हेंच काय? आणि ज्या संस्कृतापासून व्यवहाराची सुधारणा होऊं नये असें आहे तर त्या संस्कृतास विद्या तरी म्हणावें काय?

ता. २१ नोवेंबर १८६४

[नंबर १३१]

ब्राम्हणांची मूळपीठिका

डाक्टर हौसाहेब, पुणें पाठशाळेंतील संस्कृताचे गुरु, यांणीं ब्राम्हणांची मूळपीठिका म्हणून लहानसा इंग्रजींत एक ग्रंथ छापला आहे. त्यांतील वैदिक ग्रंथद्वारें केलेले कित्येक शोध सुज्ञांस ठाऊक असावे म्हणून आम्ही येथें त्यांचें हशील घेतों.

ब्राम्हणांचे मूळपीठिकेचा शोध करण्यास हिंदुस्थानांत कांहीं साधन नाहीं. ब्राम्हणज्ञाती कधीं उत्पन्न झाली व धर्मसंबंधीं श्रेष्ठत्व त्यांस कधीं आलें याचा इतिहास, लेख वगैरे कांहीं नाहीं. खुद्द ब्राम्हणांस जर याविषयीं विचारलें तर ते म्हणतात कीं, दुसरे ज्ञातीचे लोकांचा उद्धार करण्याकरितां आम्हीं ब्रम्हदेवाचे मुखांतून निघालों आणि या गोष्टीचा पुरावा काय असें विचारलें तर असें म्हणतात कीं, वेद अनादि आणि ईश्वराची वाणी आहे, त्यांत पाहा. आतां वेदांत याविषयीं शोध केला तर ऋग्वेद, यजु व अथर्वण या ३ वेदांत पुरुषसूक्त म्हणून ३ वर्ग आहेत. त्यांतील आशय पाहिला तर त्यांत इतकेंच आहे कीं, प्रथम एक पुरुषयज्ञ देवांनीं केला आणि त्या यज्ञापासून सर्व सृष्टि, वर्ण आणि वेद उत्पन्न झाले याविषयीं लाक्षणिक वर्णन त्यांत केलें आहे.

आतां पुरुष या शब्दाचा अर्थ पाहिला तर मनुष्याचें शरीर, जीव आणि ईश्वर असे ३ अर्थ आहेत. परंतु मूळचा याचा अर्थ मनुष्य इतकाच होता. पुढें देवाचा अंश मनुष्य आहे, असें मत झालें. तेव्हां त्या शब्दाचा अर्थ ईश्वरवाचकही झाला.

जुन्या काळीं जीं राष्ट्रें होतीं त्यांचें मत असेंच होतें कीं, यज्ञापासून सृष्टि झाली. पारशी यांचाही धर्म बहुत दिवसांचा जुना आहे. त्यांचे मतांतही सृष्टि यज्ञापासून झाली, असेंच स्कांडिनेविनय लोकांचेंही मत होतें.

पुरुषसूक्ताची ११ वी ऋचा
यत्पुरुषं व्यदधुः

हीच हिच्यापुढची दुसरी ऋचा यांत प्रश्नोत्तरें अशीं.आहेत कीं,

प्रश्न–देवांनीं पुरुषापासून सृष्टि केली तेव्हां त्याचे विभाग कसे केले? व त्याचे तोंडाचें, हातांचे, मांड्यांचें आणि पायांचें काय झालें ?

उत्तर–त्याचें तोंड ब्राम्हण झालें, त्याचे बाहु क्षत्रिय झाले, मांड्या वैश्य, आणि पाय शूद्र झाले.

आतां विचार करून पाहतां वरील दोन्ही ऋचांचा अर्थ लाक्षणिक दिसतो. पढण्याचा व शिकवण्याचा व्यवहार ज्यांचा ते मुख असें लिहिलें व हात बळाचे वाचक म्हणून ते

क्षत्रिय केले. तसेंच धान्याची उत्पत्ति करणें हें वैश्यांचें काम म्हणून त्यांची योजना मांड्यांत केली व शूद्रांचा सेवाधर्म म्हणून त्यांची योजना पायांकडे केली आहे.

दुसरे कितीएकांचें असें मत आहे कीं, हें पुरुषसूक्त मागाहून बनऊन वेदांत सामील केलें. परंतु हें मत खरें नाहीं. याप्रमाणें वेदांत आणखी लाक्षणिक लेख बहुत आहेत व फार प्राचीन काळीं पुरुषमेधाची वहिवाट होती याचा संशय नाहीं. कारण कीं, यजुर्वेदांत त्याचें सर्व विधानच लिहिलें आहे. पुढें ब्राम्हणांनीं हें उग्र कर्म सोडून दिलें आणि यूपास पुरुष बांधून जनावरें मारून त्यास मुक्त करूं लागले.

ज्ञातिविभाग फार प्राचीन काळीं झाला. याची साक्षी फारशी लोकांचा ग्रंथ जेंद अवस्था यांत मिळते. त्या लोकांमध्येंही ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य असे ३ विभाग होते. तरी प्रस्तुत जातीसंबंधींच्या आडचणी आहेत तितक्या पूर्वी नवत्या, हें उघड आहे. परंतु जातीची उत्पत्ति वेदांचेही पूर्वीची दिसते.

ब्राम्हण शब्दाचा अर्थ पाहिला तर हा शब्द ब्रम्ह या शब्दापासून निघाला. ब्रम्ह हें नपुंसक नाम आहे व त्याचा अर्थ सृष्टीचें मूळ कारण, वेद, दर्भ, ज्ञान, असाही होतो. दुसरा याचा अर्थ वाढणें म्हणजे वृध्धी पावणें असाही होतो. तिसरा, यज्ञामध्यें ऋत्विज असतात, त्यांत ब्रम्ह म्हणून एक सर्व कर्मांची देखरेख करणारा असून त्याचा अधिकार सर्वांपेक्षां विशेष असतो व त्यास ३ वेदांचें ज्ञान पाहिजे लागतें. यांचे खालचा ऋत्विज होता. हा ऋग्वेदांतील मंत्र म्हणून अवदान देणारा असतो. आणखी अध्वर्यु हा सर्व तयारी करणारा व यजुर्वेद जाणणारा व चवथा साम म्हणणारा, या पुढल्या तिघांकडून चुकी पडेल ती ब्राम्हणानें पाहावी व त्याचें पायश्चित्त द्यावें, असा नियम आहे. याजवरून ब्रम्हयाचे वंशांत जे झाले ते ब्राम्हण असावेत असें दिसतें.

पारशी यांचे होम व ब्राम्हण यांचे होम सारखे सारखे आहेत व त्यांत ऋत्विजांची योजनाही सारखीसारखीच आहे. आतां ज्या कालीं हे योग सुलभ रीतीनें व थोडे खटपटीनें होत असतील, त्या कालीं इतके ऋत्विजांचें पलटण नको असेल, हें उघडच आहे. नंतर यज्ञाचें विधान मनस्वी वाढलें व पुढें यज्ञ इतके लांब झाले कीं, वर्षांचीं वर्षें हेंच काम चाललें. व तें सर्व बिनचूक करावयाचें यास्तव कौशल्याची जरूर पड्रं लागली. तेव्हां ब्राम्हण स्वतंत्रपणानें स्थापित झाले. त्यांणीं ही यज्ञविद्या फार वाढविली. त्यांचे समारंभ सरस्वती, गंगा, यमुना यांच्या तिरीं होत असत अशी प्रख्याती वेदांतच आहे व या कालास निदान २ हजार वर्षें तरी झालीं असावीं. तेव्हां ब्राम्हण आपल्या अंगीं यज्ञविद्या आहे, तिच्या जोरानें पाहिजे तें करूं, असा बाणा बाळगीत. आणि राजे त्यांजवर पूर्ण विश्वास ठेवीत. मंत्रप्रयोगाकरितां व यज्ञ करण्याकरितां ब्राम्हण राजांपासून लक्षावधि रुपये उपटीत त्याचें नांव दक्षणा. राजास शत्रूवर जाणें झालें तर ब्राम्हण सांगत कीं, अश्वमेध करावा, म्हणजे शत्रूचा नाश होईल. राजाचा जय झाला म्हणजे आणखी त्यास सांगत कीं, आतां विश्वजित् याग करावा

म्हणजे कोठेंच शत्रु राहावयाचा नाहीं, असें सांगून त्या राजाजवळून द्रव्य काढीत. राजास वाटलें कीं, आपणास स्वर्ग पाहिजे, तर ब्राम्हण त्यास तो देण्यास तयार होते. राजास इंद्रपद पाहिजे तरीही ब्राम्हणांकडून यज्ञसामर्थ्यानें तयारी. याप्रमाणें सर्व सिद्धि मंत्रांत आहे असें ब्राम्हणांनीं रुढविलें होतें. तसेंच सोम म्हणून एक झाड आहे त्याचा रस प्यालें असतां मनुष्य स्वर्गांस जातो, असेंही घटविलें होतें व त्याकरितां त्या रसास समंत्रक करून पीतं होते. आणखी कितीएक ब्राम्हण स्वर्गस्थ देवतांशीं भाषण व वरप्रदान करणें व शाप देणें याचाही बाणा दाखवीत व यज्ञांतून घोडीं, रथ, अस्त्रें इत्यादि काढण्याचा बाणा सांगत व मंत्रानें स्वर्गीचे इंद्र व वैकुंठीचे विष्णु देखील ब्राम्हणास भीत असें म्हणत. सर्व देवता मंत्रांचे स्वाधीन आणि त्या मंत्रांचे वंशपरंपरेचे मालक ब्राम्हण, त्यांचे मंत्रानें व मंत्रप्रतिष्ठित यज्ञानें अनेक अद्भुत सामर्थ्यें प्राप्त होतात, अशी त्या वेळेस क्षत्रियांची समजूत होती. म्हणून ब्राम्हणद्वारा मोठालीं होमहवनें करीत. ही भुलथाप पूर्वीइतकी हल्लीं जरी नाहीं तरी अद्यापि थोडीथोडी आहेच.

बहुतकरून दर एक राजाजवळ घरचे याग करण्यास पुरोहित असत. त्याचा मान मोठाच होता. त्यांचे पाय राजानें धुवावे. सर्व कल्याण त्यांपासून मिळवावयाचें असें राजा मानीत असे. पुरोहित म्हणजे यांचा देवच तो होता. याप्रमाणें राजे, रयत वगैरे सर्वांस आपले कबजांत ठेवण्यात ब्राम्हणांनीं मोठाले यज्ञ केले. तथापि पूर्वी त्यांजवर कुफराणेंही उभीं होत होतीं. नहुषानें ऋषींस आपले पालखीस भोई केले होते अशी भारतांत कथा आहे, परंतु असे ब्राम्हणांशीं भांडणारे किंवा अपमान करणारे कोणी निघत त्यांची दुर्दशा झाली व त्यांच्या शापानेंच ते मेले अशा कथा लिहून ब्राम्हण चहूंकडे प्रसिध्द करून देत. दुसरे जातीचे लोकांस आपल्या समाजांत घेण्यास ब्राम्हण पूर्वीपासून नाखुष आहेत. विश्वामित्रानें ब्राम्हणांत शिरण्यास मोठा यत्न केला. याजमुळें त्याचा व वशिष्ठादिकांचा मोठा कलह झाला, तो रामायणांत लिहिला आहे; परंतु शेवटीं त्या क्षत्रियास आपले ज्ञातींत घेणें ब्राम्हणांस भाग झालें. त्या विश्वामित्राचे वंशांतील लोकांस आतां कौशिक गोत्री ब्राम्हण म्हणतात आणि वशिष्ठाचे वंशास वासिष्ठ म्हणतात.

ज्यांणीं वेदश्रुति प्रसिध्द केल्या, त्यांचें नांव ऋषि. हे कांहीं राजर्षि व कांहीं ब्रम्हर्षिही होते. ज्यांस यज्ञाचें प्रकरण चांगलें ठाऊक असे व ईश्वराविशीं माहिती असे, यांस मोठे ऋषि मानीत. त्यांत कांहीं शूद्र देखील होते. त्यांत या सर्व ऋषींचे मूळ पुरुष सात आणि हल्लीं दरएक ब्राम्हणास कोणते ऋषीपासून आपण झालों याचें स्मरण आहे व त्या स्मृतीकरितां मोठालीं वंशावळीचीं भेंडोळीं लिहून ठेविलीं आहेत. त्याचा आधार ब्राम्हणांचे महत्त्वास अद्यापि फार आहे. याप्रमाणें ही ब्राम्हणांची मूळपीठिका आहे.

तारीख ३ जुलाई १८६४

[नंबर १३२]

हिंदुस्थानाचें स्थित्यंतर

आमचे हिंदुस्थान देशची पूर्वीपासून स्थिति मनांत आणिली व तिचे फेरफाराकडे लक्ष दिलें तर मोठा चमत्कार वाटून ईश्वराची लीला अतर्क्य आहे असा सिध्धांत होतो.

पाहा, आपला देश कसा आहे! विस्तीर्ण असून हवापाणी उत्तम; फलपुष्पादि पदार्थ उत्तम प्रकारचे; नाना प्रकारचीं धान्यें, वनस्पती, मसाल्याचे पदार्थ, तेल काढण्याची युक्ती, कस्तुरीसारखीं परिमल द्रव्यें, शालजोड्या, पीतांबर यांसारखीं वस्त्रें, हिरे, पाच, मौक्तिक यांसारखे अलंकार ज्या देशामध्यें भरलेले आहेत व ज्याचें उत्पन्न आणखी किती वाढेल याचा सुमार नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, इत्यादि देश ज्याचे एक एक प्रांत शोभणार व ज्याच्या ऐश्वर्यास अनुलक्षून महाभारत-ग्रंथकारानें "सुवर्णपुष्पितां पृथ्वी" असें म्हटलें; याच याच्या कीर्तीस लालचून अन्य देशचे लोकांनीं यावर डोळा ठेविला व तेणेंकरून कित्येक प्रकारचीं स्थित्यंतरें झालीं तीं अशीं—

प्रथमतः आर्य लोक हिंदुस्थानांत आले व इकडील सर्व प्रकारचीं सुखें अनुभवून ते परम संतोष पावले. सर्व गोष्टींचा या देशांत सुकाळ पाहून त्यांस मग असें वाटूं लागलें कीं, आतां आपणांस दुसरें कर्तव्य कांहीं राहिलें नाहीं. ऐषआराम भोगावा एवढेंच आपलें काम, अशी जेव्हां त्यांची समजूत झाली, तेव्हां आळसानें त्यांवर स्वारी ठेवून त्यांस आपलेंसें केलें. मग रिकामपणाचे उद्योग अग्नीवर तुपाची धारा धरून हजारों मण तूप जाळावें, पल्ल्यांचे पल्ले तीळ तांदुळ नासावे व यासाठीं त्यांनीं नाना प्रकारचीं अनुष्ठानें व विधी रचिले. अशी यांची स्थिति पाहून उत्तरेकडील मोंगल लोकांनीं येऊन यांवर हल्ला केला; तेव्हां कोणी पांडवांचे वंश, कोणी शालिवाहानाचे वंश, कोणी राम-लक्ष्मणाचे वंश, असे जे वडिलार्जित श्रेष्ठतेचा केवळ अभिमान मात्र बाळगणारे व सुस्त राजे होते, त्यांस जंगली पठाणांनीं व क्रूर मोंगलांनीं तुडऊन जमीनदोस्त केलें. त्यांच्या स्त्रिया आपल्या जनानखान्यांत घेतल्या. मुलांलेकरांस गुलाम म्हणून विकलें. उत्तमोत्तम मंदिरांचा विध्वंस केला. काशीविश्वेश्वर, स्थानेश्वर, सोरटी सोमनाथ, इत्यादि देवस्थानें भ्रष्ट केलीं व शिपायांकडून लुटविलीं. अहाहा! तो गहजब काय सांगावा! ज्या पाषाणमूर्तीवर तिळातांदळांच्या शेंकडों वर्षं लाखोल्या पडत आल्या, त्यांचे त्या शिखानष्टांनीं केवळ पाटेवरवंटे केले. याप्रमाणें या हिंदुस्थानांत मुसलमान लोक येऊन त्यांनीं आपणांस मुळची कांहीं पदवी किंवा वंशाची थोरवी नसतां केवळ तरवार चालऊन राज्य मिळविलें.

अकस्मात मोठी वावटळ सुटून पृथ्वीवरचे रजःकण आकाशांत व आकाशचे

पृथ्वीवर येऊन एकच गर्दी उसळून जाते, तसा यावेळीं आमचे हिंदुस्थानचा न्याय झाला. परकी मुसलमान राजे आम्हांवर आले व आमचे स्वदेशीय राजे दिगंतरास गेले व कोणी राहिले ते त्यांच्या पायदळीं उभे राहिले. त्यावर चौऱ्या धरूं लागले व त्यांचे जोडे पुजूं लागले. असा बराच काळ गेल्यावर मुसलमान लोकही शांत झाले व त्यांस संपत्तीचा मद चढला. तेव्हां "गर्वाचें घर खालीं" ही म्हण खरी व्हावयाचीच. त्या घोरणानें ते आपसांत एकमेकांचे शत्रू होऊन स्वतांच आपले नाशास कारण झाले.

याच समयांत पुन्हा आमच्यापैकींच कित्येक अविचारी मराठे व युरोपखंडांतील सावध इंग्रेज लोक हे येऊन संधी पाहून पुढें सरसावले, म्हणजे कोकणांतील चित्पावन ब्राम्हण ज्यांस अंगभर नेसावयास पंचा मिळत नवता, किंवा महिन्याचा श्मश्रु करावयास अर्धा आणा मिळत नवता, ते भराभर घाटावर येऊन कोणी पेशवे, कोणी फडणीस, कोणी फडके, कोणी गोखले, कोणी रास्ते, कोणी पटवर्धन असे प्रसिध्धीस आले. तसेच खेड्यांचे पाटील, डोंगरांतील धनगर व कागद पोंचविणारे जासूद हे राजे, सेनापती, सरलष्कर, संस्थानीक असे झाले व वाटेंत मूल सांपडलें तें अक्कलकोटचें धनी झालें. तसेंच विलायतेहून इंग्रज राइटर किंवा सोलजर आले व त्यांसही काळ अनुकूल झाला. तेव्हां "रजाचा गज" होण्यास काय अशक्य? त्यांणीं छोटेखानी राजांस अलाद उडविलें, बंगालचे नबाब व काशीचे राजे यांस पोरासारखें खेळविलें व दिल्लीचे बादशाहाचाही पराभव करून त्यास अन्नार्थी म्हणून ठेविलें. आमचे मराठ्यांनीं सदरील धांदलींत जें कांहीं कमाविलें होतें तें थोडे दिवस उपभोगून शेवटीं राखण्याचें शाहाणपण नसल्यामुळें गमाविलें व इंग्लिश लोक मोठे मेहनती व सावध म्हणून त्यांनीं आपलें राज्य वाढऊन पराक्रमानें एकछत्री अंमल स्थापन केला. आणि जसें मांजरास शुक म्हटलें कीं, तें भिऊन पळतें तसें यांचे शब्दास मोठाले बहुत राजे भिऊं लागले व त्यांस असें वाटूं लागलें कीं, आमचेजवळ जें आहे तें इंग्रजांकरितांच आहे. आमचे वाडे, आमचे दागिने व आमची दौलत सर्व इंग्रजांचे घरीं गेली आहे व एकाची गेली हें पाहून दुसऱ्यास तसें होईल असें वाटूं लागलें आहे. याप्रमाणें नागपूरकर, सातारकर, शीक, मोंगल, इत्यादि सर्व हतवीर्य झाले व शिंदे, होळकर, गायकवाड वगैरे किंचित शेष राहिले आणि कंपनी सरकारचा अंमल बळावला.

शेवटीं आलीकडे सुमारें ५ वर्षांत महाराणी सरकारांनीं कंपनीकडील अमल काढून खुद्द आपलेकडे घेतला व सर्व राजांस आणि लोकांस अभय देऊन परकीपणा मोडिला व देशांत एकंदर स्वस्थता केली. आतां गडबडीचा काळ राहिला नाहीं. विद्या, धन व व्यापार वाढून आबादी होऊं लागली आहे. नेटिवांचा अधिकार व मान जाऊन त्यांस हीनता आली होती ती आतां जात चालली आहे व उत्तरोत्तर तिचा ऱ्हास होईल. हें पाहून या देशाचे हितेच्छु आहेत, त्यांस आनंद वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

येणेंप्रमाणें बऱ्याच उलटापालटी होऊन आतांची ही नवीन स्थिति हिंदुस्थानास प्राप्त झाली आहे. ही शाहाण्या लोकांच्या शेजारधर्मानें आली व त्यांच्या सहवासानें देशास शाहाणा करीत चालली आहे. तेव्हां बहुत काळपर्यंत अढळ राहील व चढती कळा पावेल, असें कल्पिण्यास कांहीं बाध नाहीं. पूर्वी सुखाचा काळ आला होता, पण त्याबरोबर शाहाणपण नवतें, म्हणून तो लयास गेला. त्यामागून दुःखाचा काळ आला तोही गेला व आतां सुखाचा आणि शाहणपणाचा काळ आला आहे. आणि यास परदेशच्या प्रतापी राजाचा दुजोरा आहे. तेव्हां आतां प्रजेस निर्भयपणा राहाण्यास चिंता नाहीं. एवढें मात्र झालें पाहिजे कीं, आम्हांमध्यें पिढीजाद वाढणारा आळसरूप शत्रू याचा समूळ उच्छेद होण्यास लोकांच्या विद्यारूप शक्तीचें साहाय मिळविलें पाहिजे. म्हणजे कृतार्थता झाली.

❧ ❧

ता० ३ जुलाई सन १८६४

[नंबर १३३]

स्वदेशाची माहिती असणें फार अवश्य आहे

आम्हांस बाटतें कीं, प्रत्येक नेटीव गृहस्थास स्वदेशाची माहिती असणें फार अवश्य आहे. कितीएकांस मोंगलाई पलीकडे काय होतें याचा शोध नाहीं व आपले संस्कृत भाषेंत ग्रंथ कोणते, कोणते विषयावर आहेत, याचा पत्ता तर फार थोडे लोकांस असेल. हल्लीं इंग्रजी शिकलेले लोक इंग्रजी ग्रंथांतच तृप्त आहेत व त्यांतून कोणी संस्कृत शिकण्याचा बाणा बाळगतात. ते काव्याचेच सर्ग पढतात म्हणजे झालें. एवढ्यानेंच त्यांस असें वाटतें कीं, आम्ही व्युत्पन्न झालों. किंवा कोणी वेदांतांत शिरतात. म्हणजे त्यांस भाषण करण्यास विषय पुष्कळ सांपडून वादविवाद करतां येतो. दुसरे कितीएक स्नान-संध्येचाच बाणा बाळगून आपणांस सांप्रत काळचे ऋषी म्हणवितात. परंतु एकंदर संस्कृत विद्या किती आहे व आपल्या आर्यलोकांचा इतिहास मुळापासून कसा आहे, आणि त्यांच्या दंतकथा कशा आहेत, हें बहुतेकांस ठाऊक नाहीं. आतां वास्तविक पाहिलें तर विशेषेंकरून स्वदेशाची माहिती आधीं करून घेऊन नंतर परदेशीय माहितगारी शिकावी, हा शिकण्याचा उत्तम क्रम आहे. परंतु आपले देशास व शास्त्रास लोक विसरल्यामुळें शिकण्याचा विक्रम झाला आहे. कितीएकांस पोटाकरितां इंग्रजी व मोडी लिपी वगैरे विद्या प्रथम शिकाव्या लागतात. परंतु या शिकल्यानंतर तरी त्यांणीं स्वदेशीय ज्ञानाकडे लक्ष द्यावें. कारण परकीय राष्ट्राचा इतिहास कितीही शिकला आणि स्वदेशीय ज्ञान नसलें तर त्याचें शिकणें समाप्त झालें असें कोणी म्हणणार नाहीं. कितीएकांस आपले

देशांत कांहीं शिकण्याजागें नाहीं व आपले पुस्तकांत सर्व मूर्खपणाच आहे, असा ग्रह असल्यामुळें ते तिकडे लक्षच देत नाहींत. पण ही त्यांची चूक आहे. हें डॉक्टर भाऊ दाजी इत्यादि विद्वान लोक स्वदेशी जुना इतिहास शोधण्याकरितां अतिश्रय झटत आहेत, या उदाहरणावरून स्पष्ट दिसेल.

ता० १७ जुलाई १८६४

[नंबर १३४]

मुसलमानांविषयीं माहिती

या देशांत पारशी लोक जसे आपणा हिंदुंमध्यें मिसळून गेले आहेत, तसेच मुसलमान जातीचे लोक आहेत. आतां हें खरें कीं, ते पारशी लोकांइतके अघाडीस आले नाहींत. त्याचीं कित्येक कारणें आहेत. आतां मुसलमान लोकांविषयीं, हिंदुस्थानांत त्यांचें येणें झालें त्याविषयीं व त्यांचे प्रस्तुतचे स्थितीविषयीं कांहीं माहिती लिहितों.

आरबस्थानांत मक्काशहरामध्यें हजरत महंमद या नांवाचा एक पुरुष होऊन गेला. त्यानें नवीन धर्माचा लोकांस उपदेश करून कुराण या नांवाचा एक ग्रंथ प्रसिध्ध केला. तेव्हां कितीएक लोक त्यास हा तोतया आहे असें म्हणूं लागले. म्हणून त्या वेळीं म्हणजे इसवी सन ६२२ सांत तो मक्का शहरांतून पळून गेला. त्याच कालापासून मुसलमान लोक पुढें हिजरी शक गणूं लागले. आरबी भाषेंत "हिजरी" म्हणजे पळून जाणें असा अर्थ आहे. महंमद पळून बाहेरप्रांतीं गेल्यावर त्याणें बरेच शिष्य जमविले व फौज ठेविली आणि मग जे लोक त्यास तोतया म्हणत होते व त्याचे विरुध्ध बोलत होते, त्यांचें पारिपत्य केलें व सर्व आरबस्थानांत आपला धर्म प्रसृत केला. नंतर तो आपल्यास बादशाहा व पैगंबर म्हणऊं लागला. पुढें तो मरण पावल्यावर त्याचा सासरा हजरत अबू बकर व त्यानंतर हजरत उमर, हजरत उसमान हजरत अल्ली असे चार इमाम झाले. इमाम म्हणजे त्याकाळीं जे लोक मुसलमानी धर्मांत आले त्यांवरील सरदार. या इमामांनीं मोठाल्या फौजा जमा केल्या व रूमशाम म्हणजे तुर्कस्थांन व सिरिया, तसेंच इराण, काबूल, तार्तार येथपर्यंत आपला मुसलमानी धर्म चालू केला व त्या देशांतून आपल्या धर्माचे राजे स्थापिले, आणि त्यांस असें सांगितलें कीं, तुम्हीही इमामच आहां, याकरितां धर्मवृध्धीचें काम तुमच्यानें आणखी पुढें चालवेल तितकें चालवा. पुढें मुसलमानांनीं पश्चिमेस युरोपांतही जाऊन कितीएक प्रदेश जिंकले व आफ्रिकाखंडांतही मुसलमानी धर्म चालू केला. असें म्हणतात कीं, ख्रिस्ती धर्म वाढण्यास सुमारें १००० वर्षें लागलीं; परंतु मुसलमानांनीं साऱ्या दीडशें वर्षांत आपला धर्म

२० कोटी प्रजेस दिला. आतां हें खरें कीं, त्यांची धर्मप्रसृती करण्याची रीति कांहीं सामोपचाराची व कांहीं जबरदस्तीची होती. त्यांचें जें लष्कर होतें, त्यांत एकच जातीचे लोक होते असें नाहीं. तुर्क, मोगल, अरब, इराणी, शिद्दी, पठाण, सय्यद, इत्यादि बहुत जातींचे मुसलमान लोक होते व त्या सर्वांत एकदिल होऊन मुसलमानी धर्म त्या काळीं मोठ्या भरभराटीस आला.

मुसलमानी धर्मांत जातीचा व देशाचा भेद नाहीं. सर्व एकजात मुसलमान व त्यांत राजा असेल तो इमाम, त्याणें धर्माची वृध्धी करावी. धर्माकरितां लढाईंत मरण पावण्याएवढें दुसरें मोठें पुण्य नाहीं. मूर्तीपूजा करूं नये व हरएक प्रकारच्या मूर्तीचें दर्शन घेऊं नये. नित्य पांच वेळ ईश्वराचा स्तव करावा. ईश्वराखेरीज दुसऱ्याचे पायां पडूं नये. कुराण हें पुस्तक ईश्वरोक्त मानावें व तें रसुल अल्ला, हजरत महंमद याजकडून ईश्वरानें जगांत प्रसिध्ध केलें, याकरितां त्यास पैगंबर व ईश्वराचा भक्त मानावें. गरिबास धर्म करावा; जो कोणी आपले धर्मांत येईल त्यास घ्यावा व तो आपले बरोबरीचा समजावा. मद्य प्राशन करूं नये. नियत म्हणजे ईश्वराचें नांव घेऊन जनावराची हिंसा केली तर पाप नाहीं. डुकरांचें मांस, मेल्या जनावरांचें मांस व ईश्वराचें नांव न घेतां मारलेले जनावरांचें मांस हीं हराम म्हणजे निषिध्ध आहेत. व बाकी सर्व हलाल म्हणजे विधियुक्त आहेत, असें समजावें. अनकूल असल्यास मक्केची यात्रा करावी. इच्छा असल्यास सुंता करावी व दाढी ठेवावी. देव एकच मानावा व तो सर्व सृष्टीचा कर्ता आणि धनी आहे. त्यास दुसरा कोणी घरिक किंवा हस्तक नाहीं. त्याचें भजन अंतःकरणानें करावें. धूप, दीप वगैरे उपचार कांहीं करूं नयेत. सोवळें, ओवळें, विटाळ मानूं नये. फक्त स्वच्छतेकरितां हात पाय धुवावे किंवा स्नान करावें. कुराणांतील वाक्याचा मरतेसमयीं वगैरे प्रसंगोपात उच्चार करावा. याप्रमाणें मुसलमानी धर्मांत मुख्य मुख्य गोष्टी आहेत.

आतां आरबस्थान देशाचा इतिहास पाहिला तर मुसलमानी धर्माचे उद्भवापूर्वी हा देश प्रसिध्ध नवता व यांतील लोक मूर्तिपूजक होते. पण पुढें सर्व मुसलमान झाले आणि मागच्या मूर्ती वगैरे होत्या त्यांचा उच्छेद झाला. आरबस्थानांत मोठमोठाले राजे झाले व त्यांणीं विद्वानांकडून अनेक विद्या, शास्त्रें व काव्यालंकार यांवर ग्रंथ करविले. त्यामुळें आरबी भाषेंत विद्या बरीच वाढली आहे. तरी युरोपखंडांतील सुधारलेल्या देशांप्रमाणें नाहीं. धर्माचा ग्रंथ जो कुराण तो आरबी भाषेंत आहे. यास्तव जेथें मुसलमानी धर्म चालतो, तेथें या भाषेस मोठें महत्त्व आहे. ही भाषा आपले संस्कृत भाषेप्रमाणें फार सुधारलेली आहे.

आतां हिंदुस्थानांत मुसलमान लोकांचा संचार केव्हां व कशा प्रकारें झाला, त्याविषयीं लिहूं. काबूल कंदाहारांत मुसलमानी राज्य स्थापन झाल्यावर तेथील राजानें असें मनांत आणिलें कीं, हिंदुस्थानांत स्वारी करून तेथें आपला अंमल बसवावा व

मुसलमानी धर्म चालू करावा. म्हणून त्यानें सन १००० इसवींत हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. याकाळीं हिंदुस्थानांत सर्व देशभर क्षत्रिय राजे होते व त्यांचे राज्यांत ब्राम्हण, वैश्य, शूद्र, इत्यादि हिंदू जाती होत्या. त्या राजांपैकीं ब्रम्हवंश, मनुवंश, सूर्यवंश, सोमवंश, पुरुवंश, यदुवंश, पांडुवंश, नंदवंश, मौर्यवंश इत्यादि पुराणांतरीं प्रसिध्द आहेत. याखेरीज पुराणाचे पुढचे काळांतील विक्रमवंश व चव्हाण-वंश इत्यादि बहुत होते व मथुरा, कनोज, उज्जनी, पट्टणनगर, विजयनगर इत्यादि राजधान्यांतून ते राज्य करीत होते. मुसलमान काबुलांत येण्यापूर्वी पंजाब व काबूल हे देश हिंदु राजाकडेसच होते. असो. सदरीं सांगितल्याप्रमाणें मुसलमानांची हिंदुस्थानांत पहिली स्वारी झाल्यापुढें सुलतान महमुद गिजनी यानें हिंदुस्थानावर बहुत स्वाऱ्या केल्या व मार्गांत जीं देवस्थानें वगैरे आढळलीं त्यांचा विध्वंस केला. एक वेळ त्यानें मथुरा लुटली, दुसरे वेळीं गुजराथेंत येऊन सोरटी सोमनाथ स्थान लुटलें व मूर्ती फोडली. त्यापुढें महंमद गोरी नामें पुरुष येऊन यानें सन ११९१ त दिल्लीचें राज्य घेतलें, त्या वेळेस तेथें पृथ्वीराज नामें हिंदु राजा राज्य करीत होता व त्याचे तिघे भाऊ जयदेव, भीमदेव व जयपाळ हे कनोज, गुजराथ, पंजाब येथील राजे होते. या चौघां क्षत्रियबंधूंनीं एकत्र होऊन लक्षावधी फौज जमविली आणि यमुना व सरस्वती या नद्यांचे मधील प्रदेशांत मुसलमानांशीं बऱ्याच लढाया मारिल्या; परंतु त्या काळचे मुसलमान शरीरानें सुदृढ व शूर आणि धर्माच्या आवडीनें जिवावर उदार झालेले होते. म्हणून त्यांपुढें या राजांच्या लष्करांचें कांहीं चाललें नाहीं व ते पराभव पावले. नंतर महमद गोरी यानें सन १२०५ त आपला सरदार कुतुबदीन यास दिल्लीचे राज्यपदीं स्थापिलें. नंतर जे मुसलमान राजे झाले त्यांनीं बंगाला, पंजाब व माळवा यांत आपला अम्मल वाढविला व जिकडे तिकडे आपले सरदार नेमिले. त्यापुढें महमद तघलख बादशाहा झाला. त्याणें नर्मदा नदी उतरून येऊन दौलताबादेस जाधव राजे होते त्यांचा पराभव करून तें शहर घेतलें. नंतर सन १३२५ इसवींत कलबुर्गे येथें ब्राम्हणी बादशाही स्थापन झाली व सर्व दक्षिण प्रांताचा कारभार तेथें चालू लागला व त्याच वेळेस तैमुर यानें हिंदुस्थानांत स्वारी केली. पुढें दिल्लीस लोदी वंश राज्यावर बसला व त्यांनीं आग्रा हें राजधानीचें शहर केलें. नंतर सन १५२६ त तैमुराचा नातू बेबर यानें हिंदुस्थानांत स्वारी केली व दिल्लीच्या राजास पदच्युत करून आपण तें राज्य घेतलें. सन १५५६ त बेबरा-नंतर ह्युमायु[न] गादीवर बसला. त्याचे कारकीर्दीत दंगे, धोपे मोडून राज्य सुयंत्र चाललें होतें. नंतर अकबर बादशाहा झाला. त्याचे कारकीर्दीत तोडरमल व मलिकंबर यांणीं जमाबंदीचा कानून प्रसिद्ध केला व याकाळीं काश्मीर व काबूल धरून थेट उत्तर हिंदु-स्थानापासून दक्षण हिंदुस्थानचे समुद्रतिरापर्यंत एकछत्री मोंगलाई अम्मल झाला. पुढें जहांगिर व शहाजहान झाल्यावर औरंगजेब बादशहा झाला व तो सन १७०७ सालीं नगरास मृत्यु पावला. त्यानंतर त्याचा मुलगा बाहादूरशाहा व त्यानंतर महंमदशाहा हे

राजे झाले व त्याचे कारकीर्दीत इराणाहून नादरशाहानें येऊन दिल्ली लुटली. त्यापुढें काबुलचा अहमदशाहा अब्दाली दिल्लीवर आला. तेव्हां त्याची व मराठ्यांची सोनपत-पानपत येथें मोठी लढाई झाली. नंतर दिल्लीचें राज्य बुडत चाललें. तें शेवटीं इतक्या थरावर आलें कीं, सन १७९४ सालीं माहादजी शिंदे यांनीं शाहा-अलम बादशाहास नेमणूक ठराऊन देऊन त्याचें रक्षण केलें व तेव्हांपासून कितीएक वर्षें दिल्लीशहर माहादजी शिंद्यांचे ताब्यांत होतें. पुढें दौलतराव शिंदे याची व इंग्रज सरकारची दक्षिणेंत अजिंठ्याचे घाटांत लढाई झाली; तेव्हां इंग्रजांनीं चोहोंकडे फौजा पाठऊन शिंद्याचा मुलुक जप्त केला. त्याच वेळीं म्हणजे सन १८०४त लार्ड लेकसाहेब यांनीं दिल्ली व अंतरवेद वगैरे मुलूक घेतला. तेव्हांपासून दिल्ली इंग्रज सरकारचे ताब्यांत आली आहे व बादशहास नेमणूक देऊन हे त्याचें संगोपन करूं लागले आहेत.

कलबुर्ग्यास ब्राम्हणी बादशाही, आडनांव ब्राम्हणी व जात मुसलमान, स्थापन झाली म्हणून मागें सांगितलें. तिच्या वंशाकडे सुमारें २०० वर्षें राज्य चाललें. पुढें त्यांचे सरदार फुटून गोवळकोंडें, विजापूर, अहमदनगर वगैरे वेगवेगळालीं राज्यें झालीं व द्रविड देशापर्यंत दक्षिण हिंदुस्थान मुसलमानांकडून जिंकलें गेलें. दक्षिण व कर्नाटक हे प्रांत विजापुरचे बादशाहानें काबीज केले व पुढें सन १६२७ त औरंग-जेबानें विजापुरचें सर्व राज्य घेतलें. या कारकीर्दीत सन १६२७त शिवाजी जुन्नरचे किल्ल्यावर जन्मास आला व त्यानें स्वराज्याची स्थापना करून मराठ्यांचा उद्धार केला. पुढें याचे मुख्य प्रधानांनीं मोंगलाई बुडविली व कोकण प्रांतांतील फिरंग्यांचा अंमल उडविला.

याप्रमाणें ७०० वर्षेंपर्यंत मुसलमानांचें राज्य चाललें. वेळोवेळ मुसलमान लोक हिंदुस्थानावर स्वाऱ्या करीत. तेव्हां तार्तर, इराण, आरबस्थान, काबूल इत्यादि बहुत ठिकाणाचे हजारो मुसलमान लोक लष्कराबरोबर येत. त्यांपैकीं कितीएक हिंदुस्थानांतच राहिले व मुसलमान राजांनीं त्यांतून कितीएकांस सरकारी कामें, सरदाऱ्या, इनामें, वतनें व धर्मादाय नेमणुका वगैरे देऊन त्यांची सोय केली. यामुळें गांवोगांव मुसलमा-नांची वस्ती झाली व जितकी मुसलमानांची वस्ती अधिक तितकी आपले राज्यास बळकटी अधिक, अशी मुसलमान राजांची समजूत होती. सांप्रत पाहावें तर जेथें हिंदु आहेत, तेथें मुसलमान आहेतच. पंजाबांत, बंगाल्यांत, सिंधेंत, माळव्यांत, गुजराथेंत, दक्षिणेंत, द्रविडांत, कर्नाटकांत, तैलंगणांत, कोकणांत वगैरे सर्वत्र त्यांची वस्ती आहे. आतां ते जेथें राहिले तेथील लोकांची भाषा बोलतात व हिंदु लोकांचा सहवास झाल्या-मुळें त्यांस जातीभेदही प्राप्त झाले आहेत. उंच जातीचे मुसलमान विधवांचा पुनर्विवाह करीत नाहींत व हलके जातीच्यांशीं लग्न करीत नाहींत. हलके जातीचे मुसलमान खंडोबा भवानी, पीर वगैरे पूजितात. ताबुद करितात. यांचे सहवासानें आमचे हिंदुस्थानांत पीर पुजणें, ताबुद करणें वगैरे पतकरलीं आहेत. याशिवाय परदेशी ब्राम्हण आदिकरून

बहुत हिंदु जातीचे लोक मुसलमान भिस्त्याकडचें पाणी पितात व मुसलमानांनीं भाजून तयार केलेलें अन्न खातात व राजे वगैरे थोर लोक मुसलमानांनीं समोरासमोर पानें टाकून जेवतात. व उदेपुरचा राजा खेरीजकरून बाकीच्या क्षत्रिय राजांनीं तर दिल्लीचे बादशहास आपल्या मुली लग्नविधीनें करून दिल्या होत्या. इत्यादि प्रकारावरून पाहातां असें दिसतें कीं, हिंदु व मुसलमान या जातींची मिसळ होऊन त्याच्यांतील विषमभाव अगदीं नाहींसा झाला आहे.

मुसलमानांनीं फार दिवस शिपाईगिरीवर निर्वाह केला; याजमुळें जिकडे तिकडे मुसलमान लोक हल्लीं फार गरीबीचेच अवस्थेंत आहेत. पूर्वीं त्यांचीं जीं वैभवाचीं ठिकाणें होतीं, त्या ठिकाणींही त्यांस प्रस्तुत अतिशय दरिद्र आलें आहे. तरी आलीकडे त्यांणीं शेतकी, व्यापार यांकडे लक्ष लावलें आहे व आमचे नगरांतील कितीएक मुसलमान लिहिणारे असून कारकुनी वगैरे करितात. तसें हिंदुस्थानांत पारशी लिपीचें तेथें कांहीं रोजगार आहेत. गुजराथेंत मुसलमानांस शिपाई किंवा तरकडे म्हणतात. शिपाईगिरी-शिवाय दुसरा धंदा तिकडे ते बहुधा करीत नाहींत. त्यांस धर्माची वगैरे अडचण नाहीं. व देशांतरास जाण्यास अटकाव नाहीं. असें असतांही हल्लीं मुसलमान लोक फार मागें पडले आहेत. कोणी विद्या शिकत नाहींत. ज्या शाळेंत धर्मग्रंथ कुराण शिकवित नाहींत त्या शाळेंत शिकूं नये, असा ख्रिस्ती लोकांप्रमाणें यांचा आग्रह आहे. परंतु युरोपांतील ख्रिस्तियन लोक माहितगार अधिक आहेत व मुसलमान लोक अज्ञान फार. त्यांतून हिंदुस्थानांतील मुसलमान तर अगदीं कुणब्याप्रमाणें अज्ञानी, याजमुळें त्यांस आडाणी जात असें म्हणतात. कोणी क्वचित् विद्याभ्यास करतात, पण तो निरुपयोगी म्हणजे ते बळेच आर्बी व पारशी शिकतात व ती त्यांची मेहेनत व्यर्थ जाते. कारण प्रस्तुत त्याचा कांहीं उपयोग नाहीं. मुसलमान लोकांमध्यें एकंदरींत पाहातां विद्या शिकण्याचा पाठ नसल्यामुळें ते गप्पा फार मारतात व नाना प्रकारच्या भलत्याच गोष्टी खऱ्या म्हणतात. मोठी खिन्नता वाटते कीं, हिंदु लोकांपेक्षां पुढें होण्याचीं साधनें त्यांस अधिक असून केवळ अळशीपणानें हे मागें पडले आहेत. ब्राम्हण व पारशी या लोकांमध्यें जसे विद्वान झाले आहेत व शाळेंत पुढें पुढें आढळतात, तसे मुसलमान कोणत्याही शाळेंत आढळत नाहींत. साराश ही जात खर्चीक, डौली, आळशी व अविद्वान दिसते.

हिंदुस्थानांत पारशी, शीक, जैन, यहुदी, फिरंगी, खोंड इत्यादि बहुत जातींचे लोक आहेत. परंतु त्यांस त्यांचें स्वतःचें धर्मशास्त्र नाहीं. कोणी हिंदूंचें धर्मशास्त्र घेऊन चालतात व कोणी मामूल चालीवरून चालतात, परंतु मुसलमान तसे नाहींत. हिंदु लोकांमध्यें जितकीं शास्त्रें आहेत तितकीं मुसलमानांमध्यें आहेत. मुसलमानांस आणखी असें वाटतें कीं, आपण किताची आहों व हिंदू बेकिताबी आहेत. किताबाविषयीं मुसलमानाचें मत असें आहे कीं, ईश्वरानें प्रथम अदाम व हावा नामें स्त्रीपुरुष उत्पन्न

केलीं व त्यांची संतती वाढवून पृथ्वीवर वस्ती केली. नंतर ईश्वरानें आपल्या कृपादृष्टीनें कित्येक पुरुषांस वारंवार उपदेश केला, असे पुरुष बहुत झाले. पण त्यांत पांच मुख्य गणले आहेत. त्यांस पैगंबर म्हणतात. त्यांचीं नांवें व काल :—

१ इब्राम—खलिलुल्ला. ३९६४ वर्षांपूर्वीं. याची किताब सहिफा.
२ मूसा—कलीमुल्ला. ३५१९ वर्षांपूर्वीं. याची किताब अबुर.
३ दाउद—नबीउल्ला. ३००० वर्षांपूर्वीं. याची किताब तौरेत.
४ इसा मसीहा—रुहुल्ला. १८६४ वर्षांपूर्वीं. याची किताब एन्जील.
५ महमद—रसुलल्ला. १२५४ वर्षांपूर्वीं. याची किताब कुराण.

मुसलमान असें म्हणतात कीं, या चार पुरुषांस ईश्वरानें किताब दिले व ते त्यांनीं त्या त्या वेळीं प्रसिध्ध केले. म्हणजे लोकांनीं प्रथम एक किताब बिघडिला व ते उलटे चालूं लागले. तेव्हां देवानें दुसरा किताब दिला. असाच पुढें तिसरा व शेवटीं महमदास कुराण दिलें. आणि त्या वेळेस ईश्वरानें असें कळविलें कीं, हा शेवटचा पैगंबर व हा शेवटचा किताब. यास माझा असा आशिर्वाद आहे कीं, दुनया आहे तोंपर्यंत हा बिघडायचा नाहीं. क्रिस्तियन लोकांचें जें बायबल आहे तो किताब खरा परंतु बिघडल्यामुळें ईश्वरानें तो रद्द करून हल्लीं कुराण दिलें आहे. तेव्हां असा ईश्वरोक्त ग्रंथ ज्यांजवळ आहे, ते मात्र किताबी व बाकीचे बेकिताबी अशी यांची समजूत आहे.

आरबस्थानास आरब लोक "जजीर तुल्अर्ब" म्हणतात. या देशांत महमद जन्मास आला तेव्हां जुने धर्माचे मूर्तिपूजक होते ते लात, मनात, भामा, या देवींचें व सांब वादउजा या देवांचें व नवग्रहादिकांचें भजन करीत व त्यांचीं मोठालीं देवळें आणि मूर्ती होत्या, त्यांची ते पूजा करीत. शिवाय या देशांत त्या कालीं यहुदी व क्रिस्तियन धर्माचा प्रवेश बराच झाला होता व त्या मताचे लोक कित्येक होते व आरब लोक आपसांत फार दंगेखोर होते. मुसलमानी धर्म चालू झाल्यापासून हीं देवळें व दुसरे सर्व धर्म जाऊन एकधर्म झाला व फतवा म्हणजे धर्माधिकारी याचा लेख, घेतल्या-वांचून कोणी कोणास शिक्षा करूं नये असें ठरलें. महमदाचा मुख्य हेतू असा होता कीं, सर्व धर्म बुडऊन एक धर्म करावा व आपले स्वदेशीय लोकांस एक नीती व एक कायदा घालून द्यावा, हें काम त्याणें पूर्णपणें सिद्धीस नेलें. व हा धर्म चालू झाल्यानें सर्व पृथ्वीची उलटापालट झाली. नवीं राज्यें, नवे कारखाने चालू झाले व एकधर्म आणि एकमत चालू झालें. परंतु मनुष्यांचा असा स्वभाव आहे कीं, कोणी कसाही बंदोबस्त केला तरी ते तो बिघडल्यावांचून राहणार नाहींत. याप्रमाणें कालेंकरून या धर्मांतही अनेक मतें व अनेक वाद उत्पन्न झाले ही गोष्ट पृथक, परंतु महमदाचा हेतू सर्वत्र ऐक्य करावें व एक ईश्वराचें भजन स्थापन करावें आणि अनेक ढोंगें आहेत तीं मोडावीं असाच होता, हें स्पष्ट आहे.

महमद हा संभावित कुलांत सन ५६९ इसवींत जन्मला. याच्या आजाचें नांव

अबदुल मुतालेब व बापाचें नांव अब्दल्ला व चुलत्याचें नांव अबुतालेब होतें. यांची जात खुरेशी आरब होती. महमद हा प्रथम खादिजा म्हणून एक व्यापारीण होती, तिच्याजवळ राहून उंटावर माल भरून अरबस्थानांतून शिरिया प्रांतांत दमषक् शहर आहे, तेथें खेपा करीत असे व हिंदुस्थानचा माल आरबस्थानांत आणी व आर्ब-स्थानांतील तिकडे नेई. पुढें याची हुशारी चांगली पाहून खादिजाबिबीनें याशीं लग्न लाविलें. महमद हा मक्केजवळ हिरा म्हणून पाहाड आहे, तेथें नित्य जाऊन बसत असे. तेथें त्यास एके दिवशीं दृष्टांत झाला कीं, तूं धर्म प्रसिध्ध कर. हें वर्तमान त्यानें आपले स्त्रीस सांगितलें व तिनें तें तात्काळ कबूल केलें. नंतर तिचे घरीं जिंद म्हणून एक गुलाम होता, त्यासही तिनें सांगितलें. नंतर महमदाचा बापास, चुलत्यास व पुतण्या अल्ली यांस कळलें. तेव्हां त्यांनींही तें खरें मानिलें. या वेळेस महंमदाचें वय सुमारें चाळीस वर्षांचें होतें व येथून पुढें तेवीस वर्षेंपर्यंत त्यानें मुसलमानी धर्म वाढविण्याचें काम चालविलें. आणि शेवटीं ता. ८ जून सन ६३२ सालीं ६३ वर्षांचे उमरींत तो मरण पावला. त्याची कबर मदीना येथें आहे.

महमदाची मुलगी फतिमा बिबी ही [त्याचा] पुतण्या अल्ली यास दिली होती. तिचे पुत्र हसन, हुसेन यांस पैगंबराचे नवासे म्हणजे दौहित्र असें म्हणतात. महमदास स्त्रिया ५:—खादिजा, हाफसा, जैनाब, खैबार व आयषा ह्या होत्या. महमदाचे घोड्याचें नांव बुराक. महंमदाचे हातचा कागद किंवा त्याचे डोकीचा केस किंवा दुसरे हरपदार्थ अद्यापि मुसलमान लोक फार भक्तीनें बाळगतात. विजापुरास आसार मुबारक म्हणून एक मोठी इमारत आहे, तींत महंमद पैगंबराचा एक केस आहे, अशी आख्या आहे. तसेंच अल्लीचे घोड्याचा नाल व अंगावरचें चिलखत आणि त्याणें लिहिलेला वर्ख असे पदार्थ फार भक्तीनें बाळगतात. असे कित्येक पदार्थ कित्येक ठिकाणीं अद्यापि आहेत.

महमद हा पुरुष सर्वगुणसंपन्न होता व रूपानें, स्वभावानें, शाहाणपणानें, धैर्यानें व भाषणाचे सौरस्यानें यास मोठा श्रेष्ठ गणिलेला आहे. याचा स्वभाव फार दयाळू व निगर्वी होता. अगदीं लहान किंवा गरीब मनुष्य जरी आला तरी त्याजवर त्यानें दया करावी व त्यास मदत करावी. महमदाचें प्रपंचावर फारसें लक्ष नसून केवळ ईश्वरानें आपणांस धर्म स्थापन करण्यास जन्म दिला आहे व सर्व पृथ्वीवर एक धर्म केला पाहिजे, अशा समजुतीची त्याची वागणूक होती.

यानें प्रथम आपल्यास ईश्वरी दृष्टांत झाला व ईश्वराचा दूत येऊन त्यानें धर्म प्रसिध्ध करण्यास हुकूम दिला, असें आपले मंडळीस कळविलें. तेव्हां याची बहुतेक मंडळी त्यास अनुकूल झाली. नंतर इतर लोकांसही हा धर्म सांगूं लागला. त्या काळीं आर्बस्थानांत मूर्तिपूजेचा व इस्त्रायल लोकांचा आणि खिस्तियन असे ३ धर्म चालत होते व त्यांतून हा धर्म वेगळा आहे, असें प्रसिध्ध झालें. तेव्हां मक्का षरीफ या शहरचे लोकांनीं याजवर हल्ला केला व त्यामुळें हा आपली जन्मभूमि सोडून मदिना

शहरांत गेला व तेथेंही यानें तोच उद्योग चालविला. पुढें यास बहुत लोक मिळाले. तेव्हां त्यांस हा ईश्वराकडून आलेले ग्रंथांतील वचनें वारंवार सांगून अमुक करण्याविषयीं ईश्वराचा हुकूम आला आहे, तर त्याप्रमाणें आपण वर्तलें पाहिजे, असें सांगे. गरीबीनें चालावें, ईश्वरी इच्छेप्रमाणें चालावें, असे उपदेश यानें केले. याचे धर्माचें नांव इसलाम म्हणजे ईश्वरावर हवाला देऊन वागण्याचा धर्म. यास दीन व इमान अशींही दुसरीं नांवें आहेत. अस्तु. पुढें महमदाजवळ लोक बहुत जमले, तेव्हां त्यानें काफिर लोकांशीं लढाई करावयाची आज्ञा झाली म्हणून एक अध्याय प्रसिध्ध केला. त्यांत असें लिहिलें होतें कीं, "एक देव आहे व त्यानेंच महमदास खरा धर्म सांगण्यास नेमलें आहे तर ही गोष्ट जे कबूल करतील त्यांस आपल्यांत घ्यावें आणि जे नाकबूल करितील त्यांस ठार मारावें." असा अध्याय प्रसिध्ध केल्यावर महमद त्या सेनेसहित मक्केवर आला व त्यानें तें शहर घेतलें आणि हजारों लोक मुसलमान केले व देवळें आणि मूर्ती होत्या त्या फोडून टाकिल्या. महमदानें मोठेमोठे राजे होते, त्यांस पत्रें पाठविलीं कीं, ईश्वरी धर्म प्रसिध्ध होत आहे तो तुम्हीं मान्य करावा. व जुना, खोटा धर्म सोडून द्यावा. इराणचा राजा खुसरू यास महमदानें एक पत्र पाठविलें. त्यांत "महमद बिन अबदल्ला ईश्वराचा पयगंबर याजकडून इराणचा खुसरू पातशहा यास," असें वरती लिहिलें होतें. तें पत्र बादशहापाशीं एका मुसलमानानें आणून दिलें. तें पाहातांच पातषाहाचे अगोदर आपलें नांव लिहिणारा हा कोण व यानें आपली बेअदबी केली, असें म्हणून त्यानें भरदरबारांत तें पत्र फाडून टाकिलें. हें वर्तमान महमदास कळलें. तेव्हां तो इतकेंच म्हणाला कीं, "माझें पत्र फाटलें त्याप्रमाणें त्याचें राज्य फाटेल." पुढें ३० वर्षांनीं हें भविष्य खरें झालें. महमदाचे वेळेस सर्व आर्बस्थानांत अंमल बसून लोक मुसलमान झाले होते व मुसलमानी फौज मोठी जमली होती.

पुढें महमद मेल्यावर त्याची आयेषा स्त्री इनें असें प्रसिध्ध केलें कीं, माझा बाप अबुबकर यानें महमदाचा अधिकार पुढें चालवावा असें पयगंबरानें मरतेवेळेस सांगितलें आहे, त्याजवरून त्याचा दौहित्र [? जांवई] अल्ली हा मागें पडून अबुबकर हाच खलिफा झाला. त्यास "अमिरुल मोमीनीन" व "इमामुल मुसलमान" असा किताब आहे. या सरदारानें मुसलमानी धर्म बहुत वाढविला व याजकडे राज्य होतें आणि लक्षावधी फौज होती तरी हा अगदीं फकिराप्रमाणें वागत असे. मरतेवेळेस एक उंट मात्र त्याजवळ होता. तोही त्याणें दान दिला. दौलत म्हणून त्याजवळ कांहीं नसे. मिळविले दौलतीपैकीं त्याणें स्वतांस अन्न आछादनाखेरीज कांहीं घेतलें नाहीं व तो गरिबांस धर्म फार करीत असे व न्यायनिष्ठूर आणि उदार असे. याणें तुर्कस्थानचे व इराणाचे सरहद्दीपर्यंत धर्म वाढविला व मरतवेळेस उमर यास मुक्त्यार नेमिलें.

उमर हा मक्केस जन्मला होता व हा पूर्वी मूर्ती-पूजक असून मुसलमान झाला

होता. नंतर महंमदाचे लष्करांत मोठे सरदारीवर चढला. याची मुलगी हाफसा ही महमदास दिली होती. मुसलमानी धर्माविषयीं हा फार आग्रही व स्वभावानें अगदीं साधा होता. आपले लष्करांतील शिपायास जें सुख तेंच आपल्यास असावें, असें याचें म्हणणें होतें. सबब हा शिपायाप्रमाणेंच सर्व कामें करी व गरिबाप्रमाणें भुईवर बसे. मोठेमोठे राजांचे वकील व कारभारी याजकडे येत. तेही याची वृत्ती पाहून आश्चर्य पावत होते. यानें इराणचें राज्य बुडविलें. मिश्र देशांत मुसलमानी राज्य केलें व कोट्यावधी लोकांस मुसलमान केलें. जे मुसलमानी धर्म कबूल करीत नसत, त्यांस हा तात्काल मृत्यूची शिक्षा करी. याचे कारकीर्दीत मुसलमानी धर्म फार वाढला व लष्कर फार जोरावर झालें. याणें कोणा सरदारास सुख, अलंकार किंवा डौल भोगूं दिला नाहीं. डौलाचा यास मोठा द्वेष होता. जरुशलेम शहर याणें घेतलें. मोठमोठाले राजवाडे व दागिने यास मिळाले होते. परंतु त्यांस याणें कधीं स्पर्श केला नाहीं. छपर किंवा तंबू देऊन त्यांत हा राही व पैका गरिबांस धर्म करी. तो म्हणे कीं, "ईश्वरास खुष केलें म्हणजे झालें. डौल करून माणसास काय दाखवावें." कनिष्ठ प्रकारची भाकरी, व पाणी, व मीठ यांशिवाय यानें दुसरें कधीं कांहीं खालें नाहीं. व लक्षावधी रुपये खर्च करून पुष्कळ मशीदी बांधिल्या. व देवळें फोडिलीं. यानें राज्यकारभाराकडेही फार लक्ष दिलें व न्याय मनसुबीचे आणि लष्करचे चांगले चांगले कायदे ठरविले. असें म्हणतात कीं, यानें ३६००० शहरें घेतलीं. चार हजार देवळें पाडिलीं व १४०० मशिदी बांधिल्या व इराणचे बादशहाचा सोन्याचा व कलाबूतचा एक गालीचा इतका उंच होता कीं, त्याची बरोबरी करणारें दुसरें कापड सर्व जगांत नसेल. तो गालीचा याचे सरदारानें पत्राबरोबर यास नजर पाठविला. आणि लिहिलें कीं, हा आपण आपले स्वतांकरितां ठेवणें योग्य आहे. पण तो पाहून यांचें मन किंचितही त्याकडे वळलें नाहीं. त्याणें त्याचे लहान लहान तुकडे करून सर्व फौजेंत वाटले. यानें शिकंदरीया शहरची रूमचे बादशाहाची मोठी लायब्ररी व इराणची लायब्ररी अशा दोन्ही जाळून टाकिल्या आणि असें म्हणाला कीं, कुराणांत सर्व ज्ञान आहे. मग आणखी दुसरे ग्रंथ कशास पाहिजेत? हें त्याणें फार वाईट केलें असें म्हणतात. याणें हिजरी शक चालू केला. कुराणाचीं वाक्यें इकडे तिकडे चालत होतीं, तीं सर्व जमवून एक ग्रंथ केला. तसेंच महमदाच्या तोंडचीं भाषणें आठवणीनें लिहून काढिलीं. याच्या रीतीवरून व स्वभावावरून हा मोठा चमत्कारीक पुरुष होता, असें दिसत होतें. यास पुढें एकानें अपघातानें ठार मारिलें. तेव्हां मरतेवेळेस त्याणें उसमान यास सरदारी दिली. या वेळेसही अल्ली मागें पडला. वास्तविक पाहिलें तर उमर याचीं कृत्यें मोठीं आहेत. परंतु शिया मजहबाचे लोक याची निंदा करतात, व याचा मरणदिवस आनंदाचा सण मानितात. यापुढें उसमान खलीफा झाला. हा गरीब होता. याणें प्रथमतः दौलतीचा उपभोग घेण्यास प्रारंभ केला. हें पाहून इतर सरदारही डौल करूं लागले. तत्रापि यानें कितीएक मुलखांत मुसलमानी धर्म

स्थापिला व इराणाचे पलीकडे हिंदुस्थानापर्यंत याच्या फौजा आल्या. पुढें याचेच फौजेंत दंगा होऊन त्यांतील सरदार अबू बकर याचा मुलगा महमद यानें यास ठार मारिलें. मरतेसमयीं याणें अल्लीस सरदारी दिली व ती त्याणें कांहीं दिवस चालविली. नंतर त्याच्या सरदारांनीं पुन्हा बंड करून मोआविया यास सरदार नेमिलें. पुढें अल्लीस सन ६६१ सालीं एका मारेकऱ्यानें ठार मारिलें व येथून पुढें खलीफत बुडाली व महमदानें माझे पाठीमागें तीस वर्षें खलीफा होतील, असें भविष्य सांगितलें होतें तसें झालें.

शिया मजहबाचे लोक बारा इमाम गणितात, व असें म्हणतात कीं, अबू बकर, उमर व उसमान हे आसहाब नव्हते. यांणीं जबरीनें राज्य केलें. सबब अल्ली हाच पहिला इमाम व त्याचे पुढील दुसरे अक्रा मिळून १२ इमामांचीं नांवें—

१ अल्ली, २ हासन, ३ हुसेन, ४ दुसरा अल्ली, ५ महंमद, ६ जाफर, ७ मुसा, ८ तिसरा अल्ली, ९ महमद, १० चवथा अल्ली, ११ हसन, १२ महंमद.

हा शेवटचा महमद सन ८७९ सालीं बारा वर्षांचा असतां मरण पावला आणि अल्लीचा वंश समाप्त झाला. परंतु शिया मुसलमान म्हणतात कीं, हा मेला नाहीं. आकाशांत गेला आहे व हा पुन्हा खालीं येऊन राज्य करील. व महमदानें असें भविष्य सांगितलें आहे कीं, माझा वंश आणखी एक वेळ राज्य करील. नंतर दुनया बुडेल. याजकरितां कितीएक राजे या इमामाकरितां घोड्यावर खोगीर घालून घोडे तयार ठेवीत असतात.

महंमदास पैगंबर म्हणतात. आणि त्याचें नांव कोणीही मुसलमान नुस्तें घेत नाहींत. त्याबरोबर दरुद म्हणजे आशिरवाद पढतात तो असा :

॥ महमद मुस्तफासलेल्ला ॥
॥ अलेहवआलहीवसंलम् ॥

आणखी त्यास पैगंबर आखरजमान म्हणजे शेवटला पैगंबर असें म्हणतात व त्याचे मागून चार खलीफा झाले, त्यांस "आसहाब" असें म्हणतात. म्हणजे पैगंबराचे मित्र व या पांचांस पंजतन म्हणजे पांचजण असें म्हणतात. हें मुसलमानाचें पंचायतनच आहे. जे लोक मुसलमान नाहींत, त्यांस त्यांचा एक साधारण शब्द काफर असा आहे. म्हणजे जितके कुराण व पैगंबर मानीत नाहीत तितके सर्व काफर आहेत व त्यांचे मतास कुफ्र असें म्हणतात. काफराचे पोटीं बुतपरस्त (मूर्तीपूजक) आतषपरस्त (अग्नीपूजक), नसारे (क्रिस्तियनधर्मी), यहूदी (इस्रायल), इत्यादी भेद आहेत. कुराणांत असें वाक्य आहे कीं,

कुल्लमवल् दुनयदुलो ॥
आलेकतरन् अलइसलाम ॥

म्हणजे सर्व मनुष्यें प्रथम मुसलमान जन्मास येतात. परंतु त्यांचे आईबाप त्यांस बिघडऊन पुढें खोटे धर्मास लावतात.

ज्यास मुसलमान व्हावयाचें असेल त्यानें खालीं लिहिलेला कलमा विश्वासानें पढावा लागतो.

लाइला इल्लिला महमद रसूलल्ला.

म्हणजे एक देव आहे. अनेक देव नाहींत. व जो एक आहे त्यानें महंमदास खरा धर्म प्रसिध्ध करण्याकरितां योजिला.

अकबराचे कारकीर्दीस मोहर पाडली. त्या मोहोरेवर एके बाजूस हा कलमा लिहिला आहे. या कारणास्तव लोकांमध्यें कांहीं विलक्षण समजूत पडली आहे. सराफ, सावकार ही मोहोर बाटव्यांत बाळगतात व तेणेंवरून बरकत आहे, असें मानितात व या मोहोरेस पांच चार रुपये जास्त दर आहे. या कलम्यामध्यें विलक्षण गुण आहेत, असें मुसलमानही मानितात व हीवतापाचे वगैरे दुखण्यांत हा चिठीवर लिहून गळ्यांत बांधतात. शिवाय कुराणांतील कित्येक वचनें मंत्र आहेत असें मानितात व कित्येक लोक त्यांचे जप करतात व माळा घालतात. माळेस "तसबी" म्हणतात.

मुसलमान कोणतेंही काम करणें तरी पुढें लिहिलेले शब्द उच्चारून करितात.

विसमिल्ला रहिमान्ही रहीम् ॥

म्हणजे हे परम दयाळू परमेश्वरास अर्पण होवो. सर्व किताबांत व रिसाल्यांत म्हणजे मोठे पुस्तकांत व लहान पुस्तकांत हे शब्द वरती लिहितात. सनदपत्र वगैरे लिहिणें तरी वरती ईश्वरांचें नांव व त्याचे खालीं राजाचें लिहितात. मध्यें लिहिण्याचा प्रसंग आला तरी तेथें जागा कोरी टाकून वरती तें लिहितात. अशी आदब आहे. ईश्वरास मुसलमान "अल्ला हुताला" म्हणतात. शिवाय मौला, खुदा, करीम, बाहेद, हक्क इत्यादि त्यांचें सहस्रनाम आहे. कुराणाचें नुस्तें नांव घेत नाहींत. त्यास किताब मजीद किंवा कलामुल्ला असें म्हणतात. नुस्तें नांव घेणें किंवा हा ग्रंथ भूईवर ठेवणें ही बेअदबी समजतात व त्यासाठीं कोठेंतरी उंच ठिकाणीं ठेवितात.

मुसलमानाचें धर्मशास्त्र म्हणजे शरा याची रचना झाली आहे ती अशी—

सर्व मुसलमानी शास्त्राचें मूळ कुराण. हा ग्रंथ महमद पैगंबरानें कधीं एक अध्याय, कधीं अर्धा अध्याय, लोकांस दिला. असा एकंदर तेवीस वर्षांत हा ग्रंथ सर्व प्रसिध्ध झाला व पुढें पैगंबर मेल्यावर हे अध्याय लोकांचे तोंडीं होते ते अबू बकरानें सर्वांस विचारून अनुक्रमानें लिहून काढिले व पुढें उसमान यानें पुन्हा ते दुरुस्त करून व बहुत शोध लाऊन पयगंबरानें प्रसिध्ध केले याप्रमाणें, सर्व अक्षरें शुध्ध केलीं व सन ३० हिजरींत त्याच्या बहुत नकला करून वाटल्या व मागील नकला सर्व परत घेऊन त्यांचा नाश केला.

दुसरे दर्जाचें प्रमाण असें आहे कीं, पयगंबर व त्याचे आसहाब लोक यांनीं

स्वतां ज्या गोष्टी सांगितल्या, त्यांस हदीस किंवा सुन्ना असें म्हणतात. त्यांत दोन भेद आहेत. "कुदसी" व "नब्बी." म्हणजे ईश्वरानें प्रेरिल्यावरून जीं वचनें पैगंबराचे तोंडांतून निघालीं, तीं "कुदसी" आणि त्याच्या स्वतांच्या बुद्धीचीं तीं "नब्बी." हा ग्रंथ मोठा आहे. व त्या काळचे लोकांनीं हीं वचनें जमवून लिहून काढिलीं. म्हणून यास कुराणाचे खालीं परंतु इतर सर्व ग्रंथांहून वरिष्ठ मानतात.

इजमा म्हणजे पैगंबराचे ताबिन लोक म्हणजे कृपेंतील शिष्य व त्यांचे जवळचे लोक यांनीं ठराव केले ते कांहीं कालपर्यंत स्मरणांत होते व पुढें लिहून काढिले.

चौथे दरजाचें प्रमाण "कियास" पंडितांनीं जे ग्रंथ लिहिले आणि जेथें कुराण व हदीस व इजमा या तिहींचेंही प्रमाण लागत नाहीं, तर कसें करावें याविषयीं कुराणास अविरोधयुक्ति दाखविली आहे असे जे ग्रंथ त्यांस कियास म्हणतात.

पांचवे दरजाचें प्रमाण फतावे म्हणजे मुसलमान बादशहांनीं जे फैसल केले ते.

धर्माचे दोन भेद आहेत. एक वाजीब आणि दुसरा सुन्नत. त्यांत लाजीम आहेत तीं कर्में येणेंप्रमाणें:—

इमान	याचा अर्थ	धर्मावर श्रद्धा.
नमाज	,, ,,	पांच वेळ दररोज ईश्वराची स्तुती करणें.
रोजा	,, ,,	रमजान महिन्यांत नक्तें करणें.
जकात	,, ,,	शेकडा २॥ रुपये धर्म करणें.
हज्ज	,, ,,	क्षौरबलि प्रदक्षिणापूर्वक महंमदानें मक्केची यात्रा केली, त्याप्रमाणें करून काबा म्हणून इब्रामचा वेळचा एक दगड आहे, त्याजवळ निमाज पढणें व पैगंबराची कबर पाहाणें.

हे धर्म कुराणांत ईश्वरानें फर्माविले म्हणून फार जरूर आहेत. व याखेरीज जे ते सुंता, दाढी, दागिने पुरुषांनीं न घालणें इत्यादि सुन्नत आहेत. पाहिजे तर करावे नाहीं तर नाहीं. पैगंबरास हिरवे कपडे आवडत होते. म्हणून तो रंग मुसलमान मानतात.

मुसलमान निमाजाचे वेळेस जिकडे काबा तिकडे म्हणजे पश्चमेस तोंड करितात. सीजदा म्हणजे जमिनीस डोकें लावतात. व फातेहात म्हणजे कुराणाचा पहिला अध्याय किंवा दुसऱ्या अध्यायांतील वचनें म्हणतात. जिकडे तिकडे धर्म प्रसिध्द करावा. मशीदी बांधाव्या हें एक त्यांच्या धर्मांतील कलम आहे. मशीदीवर मुतवल्ली कारभारी मुजावर म्हणजे स्वच्छ ठेवणारा, बांगी असे कामदार असतात. त्यांत बांगीनें निमाजाची वेळ झाली म्हणजे दरवाजावर उभें राहून,

अल्लाह अकबर

हे शब्द उच्चारून निमाज पढण्यास बोलावणारास मौज्जन असेंही म्हणतात.

या आमंत्रणाचें नांव बांग किंवा अजां असें आहे. मग गुसल व वजू म्हणजे हातपाय धुणें व तोंड साफ करणें याप्रमाणें निर्मळ होऊन निमाज पढावी. प्रत्येक शुक्रवारीं जास्त निमाज आहे ती म्हणून मुसलमान राजे असतील त्यांस आशिरवाद द्यावा. व धर्माची वृध्धी चिंतावी व ईश्वराजवळ मागावी. परधर्मांचे बादशहास दुवा दिला असतां काफरपणा होईल, बादशाहा दीन व गाजी म्हणजे धर्माचें रक्षण करणारा असेल तोच आशिरवादास पात्र; कारण कीं तो सर्व मुसलमानांचा अमीर उल मोमिनीन व इमाम आहे. सणाचे दिवशीं विशेष निमाज आहे. ती सांगणाऱ्यास खतीब म्हणतात. लढाईत, मरणकाळीं, वेगळाल्या पध्धती आहेत. न्यायाधिशास काजी किंवा काजी उल्कजात म्हणतात. मुसलमानांमध्यें धर्माचा आणि व्यवहाराचा फारसा भेद नाहीं. राजानें मुख्यत्वेंकरून धर्माचेंच काम करावें. धर्माचे पोटीं न्याय, याजकरितां काजीकडे न्याय आणि धर्मावद्दलचे वाद निका, तलाक, तोबा, निमाज ही सर्व कामें त्याजकडेस असतात असा मुसलमानी रिवाज आहे.

मुसलमानांमध्यें चार मरतबे मोठे आहेत. एक नबूवत, दुसरा दिलायत, तिसरा बादशाहादत, चवथा शाहादत. यांचे अर्थ ईश्वरी प्रसाद, दुसरा विरक्तता, तिसरा राज्य व चवथा युध्धांत मरण. पैकीं तीन महमदास मिळाले व चवथा ईश्वरानें त्याचे दौहित्रास दिला, असें म्हणतात. धर्मार्थ युध्धांत जे उपास व हाल होऊन मरतात त्यांस शहीद म्हणतात. हें घडलें असतां जन्माचें सार्थक आहे व असें न घडलें तर प्रेताजवळ शाहादत हा शब्द तरी उच्चारावा.

कुराणांत चांगल्यास स्वर्ग व वाईटास नर्क. व याखेरीज कियामत म्हणजे जितके लोक मरतात, त्यांचीं शरीरें ईश्वर पुन्हा उठऊन इनसाफ करील, तोंपर्यंत त्या सर्वांचे जीव अमानत राहातील. परंतु जे नेक आहेत, ते चांगले स्थितींत आणि वाईट आहेत ते दुःखांत राहातील. आणि सर्व अखेर फैसल एक दिवशीं होईल. यांचे धर्मांत जन्मांतर नाहीं. सुतक वगैरे आचार नाहीं. जाती नाहीं व सर्व मुसलमान बरोबर आहेत. धर्म सांगत असतां जो न मानील तो "बाजबुलकत्तल' वधास योग्य आहे. किंवा 'जजिया' म्हणून कर आहे तो घेऊन त्यास सोडावा. कुराणांत कोठेंकोठें फार क्रूर वचनें आहेत. म्हणजे काफराच्या स्त्रिया व मिळकत या मुसलमानास मुबा आहेत. व त्यांची कत्तल करणें सवाब म्हणजे पुण्य आहे. व याप्रमाणें मुसलमानी धर्माचे अन्नलीस बहुत झालें. धर्माचे स्थापनेकरितां किंवा वृध्धीकरितां जी लढाई करणें तीस जहाद म्हणतात. असें करणें हा धर्मच आहे. कुराणाचे अध्याय ११४ यांस सुरे म्हणतात. प्रकरणें ३० यांस सिपारा म्हणतात. श्लोक ६००० त्यांस आयत म्हणतात. व हरफ ३२३०१५ गणले आहेत. यांतील धर्माचे दोन भाग आहेत. एक इमान म्हणजे विश्वास ठेवणें. यांत जें कांहीं कुराणांत आहे तें खरें समजावें. दुसरा दीन किंवा भक्ती म्हणजे आचार किंवा जें कांहीं करावें लागतें तें. म्हणजे निमाज इत्यादि कर्में. कुराण हें पुस्तक फार सुरस व उत्तम शब्दांनीं

लिहिलें आहे, आर्बी भाषा मुळीं फार सुंदर आहे. व त्यांत हें उत्तम आहे, असें सर्व लोक म्हणतात. याविषयीं अशी गोष्ट आहे कीं, महमदाचे वेळेस एक मक्केस कवि होता. त्याचें नांव लाबी इबन राबिया. याणें महमदास सांगितलें कीं, माझे काव्यापेक्षां कुराण चांगलें नसेल. तेव्हां यास एक अध्याय महमदानें दाखविला. तो पाहातांच त्या कवीस असें वाटलें कीं, अशी कविता ईश्वराशिवाय कोणाच्यानें होणार नाहीं. असें म्हणून तो लागलाच मुसलमान झाला. कुराण नित्य आहे. व ईश्वराजवळ एका मेजावर तें लिहिलेलें आहे. व त्याची प्रत भूमीवर मात्र ईश्वरानें कृपा करून पाठविली; परंतु तें नवीन झालें असें नाहीं. असें मुसलमान पंडितांचें मत आहे. या पुस्तकांत फिरष्ते म्हणजे ईश्वराचे दूत आहेत, म्हणून सांगितलें आहे. गेब्रिल, आजराईल, मिचाईल, इत्यादि बहुतांचीं नांवें येतात. आजराइल हा हिंदु लोकांत यम जें काम करितो तेंच करितो. आणखी दुष्ट जीव आहेत असें लिहिलें आहे. ते लोकांकडून पाप करवितात. त्यांचीं नांवें सैतान, इब्लिस इत्यादि आहेत. याशिवाय कितीएक भविष्यें आहेत तीं अशीं कीं, पुढें इनसाफाचा दिवस येईल त्याचे पूर्वी पृथ्वीवर अनेक अरिष्टें होतील. सूर्य पश्चिमेस उगवेल. याजूज व माजूज हे दंगा करतील. दुज्जाल या नांवाचा गाढवावर बसलेला इसाचा वैरी निर्माण होईल; नंतर इसा खुद्द येऊन त्यास मारील व स्वतां मुसलमान होईल. व वरती जाईल. नंतर बारावा इमाम जो नाहींसा झाला आहे तो इमाम मेहेदी या नांवानें पुन्हा प्रकट होईल व तो राज्य करील. नंतर कियामत होईल. तें इनसाफाचें काम हजार वर्षें चालेल. ईश्वरी दूत येऊन एकदा करणा वाजवील. व त्या आवाजाबरोबर सर्व मेलेलीं माणसें उठतील. आणि मग ईश्वर स्वतां महमद व इसा यांस बरोबर घेऊन न्यायास बसेल. तेव्हां महमदाची रदबदली चालेल. ज्याच्या त्याच्या पुण्यपापाच्या चोपड्या ईश्वर काढील त्याजवरून स्वर्ग किंवा नरक होईल. याप्रमाणें या जगाचा शेवट होईल.

मुसलमानी धर्मशास्त्राचे पोटीं बहुत ग्रंथ झाल्यामुळें त्यांचीं वेगळीं शास्त्रें झालीं आहेत. तीं येणेंप्रमाणें:—

१ इल्मकुराण म्हणजे कुराणावरील टीका पाहून त्याचा अर्थ बरोबर समजणें.

२ इल्महदीस.

३ इल्मफिका.

४ इल्मफरेज.

५ इल्मफतावे.

कुराण तोंडानें पाठ करतात, त्यास हाफिज म्हणजे संरक्षण करणारे असें म्हणतात. मौलवी आहेत ते मशीदींत "वाज" म्हणजे धर्मोपदेश करतात. राजास जे शास्त्रार्थ सांगतात ते मुफ्ती. व एक शास्त्र ज्यास येतें त्यास आलीम म्हणतात. कुराणावर टीका व भाष्यें म्हणजे तफसीर पांच. यांचे इतके ग्रंथ आहेत कीं, त्यांचा अंतपार नाहीं.

मुसलमानांमध्यें मजहब म्हणजे पंथ दोन आहेत. एकाचें नांव शिया व दुसऱ्याचें नांव सुनी. यांचें पोटीं वेगवेगळे भेद १०० आहेत. शिया मुसलमान इराणांत फार आहेत. व हिंदुस्थानांत थोडे आहेत.

विजापुरचे बादशाह शिया होते. यांचीं भाष्यें व टीका वेगळीच आहे. यांचें म्हणणें असें आहे कीं, ईश्वराचे मनांत अल्लीस पैगंबर करावें असें होतें. परंतु ईश्वराचा दूत चुकला. आणि त्यानें महमदाचें हातीं कुराण दिलें. महमदाचे पाठीमागें दुसरे तीन खलीफा झाले. ते अन्यायानें झाले. त्यांनीं अल्लीस बळेंच मागें टाकिलें. तात्पर्य हे अल्ली मानतात. याच कारणास्तव तीन खलीफा यांचे हदीस हे मानीत नाहींत. व त्यांची वचनें गाळून यांचीं पुस्तकें लिहिलेलीं आहेत. सुनी मुसल्मान सर्वांस मानतात.

सुफी मजहब म्हणून एक मत आहे. तें अवलिया व फकीर मानतात. हें हिंदुंचे वेदांतासारखें आहे. म्हणजे सर्व ईश्वर आहे. व आपण ईश्वरच आहों असें ते समजतात. यास्तव धर्मशास्त्राशीं हें मत विरुध्ध आहे. कुराणांतील शब्द मात्र ईश्वराचे व इतर शब्द लोकांचे असा भेद ते मानीत नाहींत. सर्व लेख ईश्वराचे मग कुराणांतच विशेष काय असें ते म्हणतात. याप्रमाणें सुफी साधू मुसल्मानांमध्यें बहुत आहेत व ते करामती करितात, असें लोक समजतात. परंतु षरा जाणणारे हें अशुध्ध आहे असें म्हणतात.

धर्मशास्त्रांत चार पंथ आहेत, त्यांचीं नांवें :—

१ हनफीशास्त्र, २ हंबली, ३ मालकी, ४ षाफी. हनफीशास्त्र तुर्कस्थान, तार्तरी, आबिसिनीया व हिंदुस्थान या देशांतील मुसलमानांमध्यें चालतें. हें मत आर्बस्थानांत कुफा शहरांतील अबु हनीफ या नांवाचा महान पंडित हिजरी सन १५०त झाला, त्यानें हें स्थापन केलें. यानें कियास प्रमुख धरून ग्रंथ लिहिले. खलीफ तुलमनसुर यास काजी उल्कजाआत म्हणजे मुख्य न्यायाधिशी देत असतां आपले हातून अन्याय होईल, याचा जाब कोठें द्यावा? या समजुतीनें यानें तो लाभ सोडला. आणि ग्रंथ करीत बसावयाचें पत्करिलें. असें उदाहरण युरोपांत देखील सांपडणें दुर्लभ.

हंबली हें मत आर्बस्थानांत चालतें. याचा स्थापक अहमदशाहा बिन हंबल हा बुगदाद शहरांत सन १६४ हिजरींत जन्मला. याचे ग्रंथ बहुत आहेत. व ज्या दिवशीं हा मेला, त्या दिवशीं दोन लाख यहुदी व क्रिस्तीयन लोक मुसलमान झाले, व यास पुरण्यास आठ लाख लोक जमले होते. अशी याची कीर्ती होती.

मालकी हा मजहब आलजियर्स, तुनीस, त्रिपोली व सिनीगाल या देशांतील मुसलमान लोकांमध्यें चालतो. यांचा स्थापक मालीक बिन अन्नास हा मदीना शहरांत हिजरी सन १५ सालीं झाला. यास इमान दारुल हिजरी असें म्हणतात. यानें हदीस म्हणजे पैगंबराचीं व आसहाब यांचीं वचनें जमा केलीं व त्यांची व्यवस्था करून ग्रंथ रचले.

षाफी हा मजहब. महंमद षाफी या नांवाचा पंडीत हिजरी सन १५० त केरो येथें जन्मला. याचा मजहब अर्बस्थानांत, खुरासान, मिश्र, मलाया या देशांतील मुसलमानांमध्यें चालतो व हिंदुस्थानांत कोकणप्रांतीं मुसलमान आहेत, त्यांमध्यें चालतो.

सदर्हु चार मतांखेरीज दुसरें एक मत अबु अबदल्ला सुफीयान सौरी यानें स्थापन केलें. हा हिजरी सन ९५ सालीं कुफा येथें जन्मला. व पुढें बसोरा येथें मरण पावला. यास काजीउल्कजाअतीचें काम बादशहा देत असतां हा, ईश्वरभयास्तव व अन्यायाचे दोषास्तव, घेईना. सबब बादशहा इतराज होऊन त्यानें त्यास कैदेंत टाकिलें. तेथेंच हा मेला. परंतु यानें अधिकार घेतला नाहीं.

साहावें एक मत अबु दाऊद सुलेमान आजजाहिरी यानें उत्पन्न केलें आहे. हा हिजरी सन २०२ मध्यें जन्मला. हा कुफी होता. म्हणजे कुफा येथें जन्मला. आणि बगदाद शहरांत मेला.

कुराणावर अनेक भाषेंत म्हणजे आर्बीत, तुर्कीत, फारशींत, उडदु, मिसरी व सिंदी भाषेंत वगैरे हजारो टीका झाल्या आहेत. त्यांस तफसीर म्हणतात. त्यांपैकीं प्रसिध्ध प्रसिध्ध त्या लिहितों—

१ अबु जाफर तबरी.
२ अन्वर तंजील काषफी.
३ दुर तुलमनसूर.
४ जलालूदीन महंमद याची तफसीर.
५ फतेऊल अजीज (पारशी भाषेंत).
६ तफसिरात अलहंमदियांत.

हादीस या ग्रंथावरही टीका, व्याख्या व वृत्ती बहुत झाल्या आहेत. या ग्रंथाचे आरंभीं आसनाद म्हणून एक वेदांच्या सर्वानुक्रमासारखें असतें त्यांत कोणत्या मनुष्याच्या स्मरणावरून वचनांचा संग्रह केला, त्याच्या सनदा म्हणजे परंपराचे दाखले ते लिहितात. त्याजवरून तीं वचनें खरीं असें समजावयाचें. यांचे ग्रंथ कुतबसिता अलहदीस, सहीउल बुखारी इत्यादि आहेत.

तिसऱ्या प्रतीचे, फिकाचे, म्हणजे धर्मशास्त्राचे ग्रंथ, पंडित लोकांनीं केले ते बहुत आहेत, व त्यांतील प्रसिद्ध आहेत तेः—

हिदाया—शेख बुराणुदिन अल्ली यानें लिहिला. हा ग्रंथ हनफी मार्गाचा असून फार मोठा व आवघड आहे. यांत हरएक प्रकारचे विचार आहेत

कर्ज	म्हणजे	ऋणादान
हीबा	,,	बक्षीस

वसियत	म्हणजे	मृत्युपत्र
यूफीया	,,	अग्राधिकार
आरीयत	,,	मोबादला
हवालत	,,	जामिनकी
विर्सा	,,	वारसा
तफरिक	,,	वाटणी
हकालत	,,	विकरी फिरविणें
अैवत	,,	निषिद्ध फायदा घेणें
इहीतिकार	,,	निधीनिक्षेप

इत्यादि चारपांचशें विषय त्यांत आहेत व प्रथम धर्म, आचार, व्यवहार, शिक्षा इत्यादि लिहून पुढें दिवाणी फौजदारी वगैरे सर्व त्यांत लिहिलें आहे.

हिदायावर टीका बहुत आहेत. त्यांतील मुख्य—

इनाया	हिचा कर्ता शेख	कमालूदीन
निबाया	,,	हसनुदिन
किफाया	,,	इमामुदिन
फतेउलकदर	,,	कमालुदिन.

दुसरा ग्रंथ–कंजदकीक याजवर टीका उबेदल्ला यानें केली. तिचें नांव घरेतुलविकाया.

तिसरा ग्रंथ–फीकाऊल अकबर.

चौथा–जामीउलकबीर म्हणून अबुअबदल्ला महमद याचा आहे.

पांचवा–जामीउलसगीर.

सहावा–जाहिर रवायत याजवर टीका बहुत आहेत.

सातवा–नकाया.

आठवा–घीराजीया व वरीफीया हे ग्रंथ इलम फरेज म्हणजे वाटणीबद्दल आहेत.

नववा–दुरातुल इमाम.

दहावा–मुल्तकुल अभार. हा ग्रंथ इस्तंबुलास झाला.

असे ग्रंथ, मोठाले पंडीत झाले, त्यांनीं बुखारा, समरकंद, बुगदाद, घिराज, तुस, कुफा, हलब, मदीना, मक्का, केरो इत्यादि राजधानींत राहून केले आहेत.

हे सर्व सुनी तर्फेचे आहेत. याचप्रमाणें इराणांत वगैरे सिया मजहब चालतो. त्या तर्फेचे ग्रंथ वेगळेच आहेत. त्यांचीं नांवें:–किताब हसनिया–हकुलयकीन–खुलास तुलअकवाल इत्यादि बहुत आहेत.

फिकाचे किताबानंतर फतावे म्हणून अनेक राजांचे फैसल्यांच्या किताबा आहेत. त्यांतील मुख्य मुख्य लिहितों—

१ फतावे काजीखान हा ग्रंथ इमाम फकिरूदिन हसन उर्फ काजीखान यानें सन ५९२ हिजरींत लिहिला.
२ फतावे अनकीरावी हा ग्रंथ शेख इसलाम यानें लिहिला. सन १०९८ हिजरींत.
३ फतावे सिराजिया.
४ फतावे हिमादिया.
५ फतावे अदुल रहिमान एफेन्दी, हा ग्रंथ तुर्कस्थानांत झाला.
६ खुलासतुलफतावे. हा ग्रंथ इमाम इफतीखारूदीन बुखारी यानें केला.
७ जाहिरुलदुरानीया हा ग्रंथ बुरानुदिन बुखारी यानें केला.
८ फतावे अहल समरखंद हा ग्रंथ अबुल फता समरखंदाचा राहाणार यानें केला.
९ फतावे इमादिया.
१० फतावे जाहिरीया जाहिरूदिन बुखारी यानें केला.
११ फतावे अलमगिरी हा ग्रंथ अलमगिर बादशहानें पंडीत जमा करून हिंदुस्थानांत लिहिला. या ग्रंथाचा तरजुमा या बादशहाची मुलगी जेबुनिसा इनें फारशींत तयार करविला. सन १०६७.
१२ फतावे महमदी हा ग्रंथ टिपू सुलतान यानें करविला.

याप्रमाणें निवाड्याचे हजारो ग्रंथ आहेत. व हे सर्व आरबी भाषेंत आहेत. ज्यास मुसलमानी धर्मशास्त्र किंवा दुसरा इल्म पढणें असेल त्यास आरबी आल्यावांचून आरंभच करतां येणार नाहीं. पारशींत कांहीं थोडे तरजुमे आहेत. परंतु जे पूर्वी पंडीत झाले, त्यांनीं आरबींत फार ग्रंथ केले व दुसऱ्या भाषेंत लिहूं नये हा त्यांचा अभिमान आहे. व कुराण, हदीस, फिका हीं मूळ आरबींत आहेत. तेव्हां तीं अस्सल पाहिल्याखेरीज त्यांचें मर्म समजत नाहीं. हा धर्मशास्त्राचा तपशील झाला. असे इल्म मंतिक (न्याय), सर्फ नहो (व्याकरण), इल्मनजूम (ज्योतिष), इल्महिकमत (वैद्यक), इल्महिसाब (गणित), इल्म अर्ज (भुगोल), इल्म तारीख (इतिहास), इल्मरमल (प्रश्नविद्या), इल्मनजं (छंदःशास्त्र), इल्म किमया (रसायन) इत्यादि ४० शास्त्रांवर पृथक् पृथक् ग्रंथ आहेत. व इतकीं ज्यास येतात त्यास मौलवी म्हणावें.

सांप्रत मुसलमानी विद्येचा ऱ्हास झाला आहे व त्या विद्येंत परधर्माचा द्वेष फार आहे. याजकरितां परधर्माचें सरकारास या विद्येस उत्तेजन देणें योग्य नाहीं. यास उदाहरण, मुसलमानाखेरीज कोणीएक साक्षीचे लायक नाहीं. इतर धर्माचा मनुष्य मुसलमानावर साक्ष देईल तर ती चालूं नये. शिंदळकीस मृत्यूची शिक्षा. नवऱ्यानें बायको पाहिजे तेव्हां सोडावी. इत्यादि बहुत जुलमी कायदे आहेत. याजकरितां असलें ज्ञान वाढऊन उपयोग नाहीं. हल्लीं जगांत मोकळिकेची नीति चालत आहे. म्हणजे

धर्मावरून कोणाचें नुकसान नसावें. इत्यादि जे दस्तुर हल्लीं चालतात, त्यांपासून लोकांचें बहुत हित आहे, असें सर्व शहाणे समजतात. व त्या नीतीस मुसलमानी शास्त्र फारच विरुध्ध आहे. यास्तव या विद्येस मुसलमानाशिवाय कोणी मदत देईल, असें नाहीं. त्यास सुज्ञ मुसलमानही देणार नाहीं. एकादा धर्मखुळा असल्यास देईल. अस्तु. मुसलमान लोकांतीलही दुराग्रह हल्लीं कमी होत चालले आहेत. त्यांचे गरीबीमुळें म्हणा, अथवा फार दिवसांचे या देशांत ते रहिवासी असल्यामुळें म्हणा, मुसलमानही सुधरत चालले आहेत. त्यांचे धर्माप्रमाणें हिंदूंचे देवास त्यांणीं मदत करूं नये, परंतु शेंकडों देवळांत हल्लीं मुसलमान लोक चौघडे, वाजंत्रें वाजवितात. कितीएक साधू होऊन कथा करितात. कितीएक कबीरपंथी आहेत. कितीएक अवलिया, फकीर, पीर असोन सर्व धर्मास सारखे मानतात. कोणी वतनदार, पाटील, देशमूख असे आहेत. याजमुळें लोकांच्या चालीप्रमाणें ते चालतात. व दसऱ्यास आपट्याची पूजा, नवरात्राचा घट, होळीची पोळी इत्यादि मान घेतात. याप्रमाणें त्यांची क्रूरता कमी झाली हें ठीकच आहे. अकबर बादशाहानें देखील ही क्रूरता टाकून हिंदूंचें पालग्रहण चांगलें केलें, अशी कथा आहे. हिंदुस्थानांत शिपाईगिरीचे नात्यानें क्षत्रिय लोक मुसलमानांस तरवारीचे भाऊ म्हणतात. कारण कीं, या उभयतांस शूरत्वाची आढ्यता आहे ती सारखीच आहे. आतां या देशांतील मुसलमानांचें महत्त्व गेल्यास थोडे दिवस झाले. यामुळें हे इतर लोकांप्रमाणें संतोषवृत्तीनें नाहींत, हेंही खरें आहे. तत्रापि इंग्रज सरकारची नीति व धर्मसंबंधानें जुल्मम करूं नये, हा कायदा चांगला आहे असें जे मुसलमान सुज्ञ आहेत त्यांस वाटतें, यांत संशय नाहीं. आणि हाच सुज्ञपणा वाढावा अशी आमची आशा आहे. गीजा व जहात करण्याचे व षहीद होण्याचे दिवस गेले, हेंच खचित आहे. तथापि धर्मसंबंधी भाग सोडून बाकी इतिहास, कविता वगैरे ग्रंथ उपयोगी आहेत. व फारसी व आरबी भाषा फार गोड आहेत. अद्यापि मुसलमान व पारशी लोक आपले पूर्वजांच्या या भाषा असें समजून कांहीं कांहीं शिकतात. व मराठी भाषेंत त्यांचा संबंध फार आहे. याजकरितां या भाषांची माहिती सर्वांस असावी, हें योग्य आहे.

हिंदुस्थानांत मुसलमान लोक आले, तेव्हां नर्मदेचे उत्तरभागीं रांगडी भाषा चालत होती. तीस हिंदवी ब्रिजभाषा असें म्हणतात. ही भाषा अद्याप चालत आहे. व तींत सत्सया, तुळशीदास वगैरे कवींच्या कविताही पुष्कळ आहेत. जेव्हां संस्कृत बुडोन प्राकृत भाषा झाल्या, तेव्हां ही एक प्राकृतभाषा संस्कृताच्या अपभ्रंशानें झाली. हींत संस्कृत शब्द पुष्कळ आहेत. पुढें मुसलमानांचीं लष्करें हिंदुस्थानांत उतरलीं, तेव्हां त्या लष्करांत अनेक जातींचे व अनेक देशचे लोक होते. म्हणजे कोणी तुर्की, कोणी कंधारी, कोणी इराणी, कोणी शिद्दी, कोणी मोंगल, कोणी अर्बी, कोणी मिसरी, कोणी बुखारी, कोणी फिरंगी असे होते. तेव्हां या सर्व लोकांमध्यें उडदु भाषा उत्पन्न झाली. हींत सर्वांचे शब्द आहेत. उडदु म्हणजे बाजार आणि हिंदुस्थानच्या मुसलमानांनीं हीच आपली भाषा

ठरविली व जिकडे जिकडे त्यांणीं वस्ती केली, तिकडे तिकडे ही भाषा चालते. पुढें दिल्लीस खुसरु-अबूफजल इत्यादी या भाषेंत ग्रंथकार झाले. त्यांणीं रेखते, गजल वगैरे कवनें केलीं. नंतर पूर्वी रांगडी भाषा देवनगरी म्हणजे बाळबोधासारिखे लिपीनें लिहीत होते. तें सोडून मुसलमान लोकही नवी भाषा फारशी हरपानें लिहूं लागले. यामुळें उडदु भाषा फारशी हरपानें लिहिण्याची रीति पडली. ती अद्याप चालत आहे. सांप्रत ही भाषा ज्यास येते त्यास हिंदुस्थानचे कोणतेही भागीं संचार करण्यास अडचण नाहीं. बंगाल्यांत, कर्नाटकांत, गुजराथेंत, तैलंगणांत सर्वत्र ही उडदु भाषा चालते. याचें कारण मुसलमानांची वस्ती सर्वत्र आहेच. उडदु भाषेंतही दोन प्रकार आहेत. एक दक्षिणी किंवा विजापुरी आणि दुसरी हिंदुस्थानी किंवा देहलवी. ब्राम्हणांनीं पूर्वी संस्कृत भाषा सर्व देशभर स्थापिली. त्यानंतर मुसलमानांनीं उडदु चालू केली व हल्लीं इंग्रजी सर्वत्र चालू आहे. विजापुरी उडदु भाषा आहे तींत तैलंगी, द्राविडी, कर्नाटकी शब्द येतात. व दिल्लीची उडदु आहे तींत फारसी, आरबी व संस्कृत शब्द फार येतात. आतां जुनी रांगडी भाषा आहे ती गांवखेड्यांतून चालत आहे. व रजपूत, परदेशी, गौड ब्राम्हण हीच बोलतात. परंतु तिला मुसलमान गव्हार म्हणतात. मुसलमानी दरबारांत व शहरांत उडदू भाषा चालते. यास्तव या भाषेस कोणी मुसलमानी भाषाही म्हणतात. अजमीर, उदेपूर, जयपूर वगैरे ठिकाणीं रांगडी भाषा चालते. व कोठें कोठें देवनगरी लिपीही चालू आहे.

वृत्तवैभव, ता. १० जुलै १८६४

[नंबर १३५]

पारशी लोक, त्यांच्या चालारिती, धर्म व पुरातन ग्रंथ यांविषयीं माहिती

आमचे देशांत पारशी म्हणून एक जातीचे लोक आहेत, हें सर्वांस ठाऊक आहे. हे लोक हजार वर्षांपूर्वी या देशांत आले व तेव्हांपासून गुजराथेंत नवसारी, गणदेवी वगैरे प्रांतीं वस्ती करून राहिले आहेत. हे आल्यानंतर गुजराथेंत मुसलमान व मराठे पुष्कळ राजे होऊन गेले. परंतु यांस वैभव प्राप्त झालें नाहीं. कारण शिपाईगिरी, सावकारी, किंवा मुच्छदगिरी या प्रकरणांत हे फारसे शिरले नाहींत. आलीकडे इंग्रजी राज्य गुजराथेंत व दक्षिणेंत स्थापन झाल्यापासून मात्र या जातीचें ऊर्जित झालें आहे. म्हणजे यांमध्यें मोठमोठाले सावकार, विद्वान व धर्मशील असे बहुत लोक विख्यात झाले

आहेत. व अजून हे किती वाढतील याचा नेम नाहीं. यांणीं चीन, विलायत इत्यादि ठिकाणीं नुकतीच आपली वसाहत केली आहे व हे आपणांविषयीं बहुत शोध करितात. प्राचीनकाळीं आपण कोण होतों, याचा त्यांस विसर पडला होता. याचें कारण दरिद्रदशा. दरिद्री अवस्था असली म्हणजे सर्वच व्यंग पडतें. परंतु तें दरिद्र कायम न राहातां ईश्वरकृपेनें या पारशी लोकांस वैभव आलें. आणि त्या वैभवाचा हे उत्तम प्रकारें व्यय करितात, हें पाहून संतोष वाटतो. वाढते काळाचीं जीं जीं चिन्हें असावीं, तीं सर्व यांमध्यें आहेत. हे आपले लोकांमध्यें अनेक प्रकारचा बंदोबस्त करून विद्या व व्यापार वाढवीत आहेत. आणि बहुत चांगले कामांत पुढारी होऊन मोठे हिमायतीनें सुधारणा करीत चालले आहेत. सांप्रतकाळीं या देशांत जितक्या जाती व धर्म व खूम आहेत, तितक्या सर्वांत ही जात पुढारी आहे. व या जातीचे लोक थोडे आहेत, तरी हे कोणतेही व्यापाराचे ठिकाणीं नाहींत, असें नाहीं. यांच्यामध्यें बहुत लोक व्यापारी, वकील, जडज, वैद्य, इंजनियर, मुच्छद्दी, वगैरे सर्व धंदे करणारे आहेत. व आलीकडे औदार्यानें यांची फार कीर्ती झाली आहे. याजमुळें विलायतेचे राजांनींही यांस किताब देऊन या देशांतील जुने राजेरजवाड्यांच्या बरोबरीच्या मरातबीस आणिलें. या लोकांस आमचे लोकांसारखी भीक मागत फिरण्याची हौस नाहीं. उदीम करण्याची व देशांतर करण्याची हौस आहे. आपले मुलीस व मुलास विद्या शिकवावी असें यांस मनापासून वाटतें. व आपणच सर्वांहून थोर व आपणांस सर्व ठाऊक आहे, असा यांस पोकळ आग्रह नाहीं. एकादे शोधाचें काम आपले हातून न झालें तर इंग्लिश व जर्मन इत्यादि पंडितांची हे मदत घेतात. विद्वानांचा कंटाळा करीत नाहींत. व काय करावें, या राज्यांत आमचा हात चालत नाहीं, असें म्हणून हे कपाळास हात लावून गाऱ्हाणें सांगत बसत नाहींत. जे जे मार्ग खुले आहेत, त्यांत त्यांत हे प्रवेश करून चांगले स्थितीवर येण्याचा उपाय करीत आहेत. याप्रमाणें यांची सांप्रतची स्थिती आहे.

आतां हे पूर्वी कोण होते व कोणते स्थितींत होते, हें बहुतांस ठाऊक नसेल, म्हणून याविषयीं थोडें वर्णन करूं. पूर्वी जेव्हां हिंदु लोक हिमाल्याचे पलीकडे देवक्षेत्रांत होते, तेव्हां हिंदु व पारसी यांचें एकच राष्ट्र होतें. पुढें कांहीं कारणानें हें राष्ट्र देशोदेशीं फुटलें, तेव्हां पारशी इराणांत गेले. आणि [हिंदु] हिंदुस्थानांत गंगाप्रदेशीं आले व मग हिंदूंची भाषा संस्कृत आणि पारशी लोकांची भाषा जेन्द, या निर्माण झाल्या· मूळच्या दुसऱ्या एका भाषेच्या या दोन्ही अपभ्रंशित भाषा आहेत असें समजतें. पण या दोहोंची आई कोण होती तिचा पत्ता नाहीं. असो. इराणांत पारशी लोक आल्यानंतर तेथें त्यांचें एक मोठें राज्य स्थापन झालें. व त्यांच्यामध्यें जरदष्ट या नांवाचा एक पुरुष झाला. त्याणें एक धर्म स्थापन केला. त्या धर्मांतील आचार बहुतकरून ब्राम्हणधर्माशीं मिळतो; म्हणजे त्यांमध्यें यज्ञ, सोमपान, इष्टी, यज्ञोपवीतधारण, गोमूत्रशुध्धी, मंत्र, अग्निसेवा इत्यादि प्रकार आहेत. हा धर्मप्रवर्तक पुरुष जरदष्टी कोणते काळीं झाला, हें

अद्यापि बरोबर समजत नाहीं. कोणी म्हणतात कीं, तीन हजार वर्षांपूर्वीं झाला. व दुसरे कोणी म्हणतात कीं, त्यास सात हजार वर्षें झालीं. असा याविषयीं मतभेद आहे. जरदष्टीचे लेख जेन्द भाषेंत लिहिलेले अद्यापि आहेत. व तेच लेख पारशी धर्माचीं मूळ पुस्तकें आहेत. आणि त्यांस एकंदर अवस्था हें नांव आहे.

वंदिदाद, इजष्टा, इसपर्व, खुर्दा अवस्थाजी, इत्यादि पुस्तकें आहेत, तीं याचे पोटविभागांत आहेत. वंदिदाद ग्रंथांत पापास शिक्षा कशा असाव्या, हें सांगितलें आहे. हे सर्व ग्रंथ श्लोकबद्ध रचलेले आहेत. व हुर्मजद म्हणजे ईश्वर प्रत्यक्ष होऊन जरदष्टाशीं बोलला, असें त्याचें अनुसंधान आहे. हिंदु लोकांस त्या काळीं हे लोक देव मानीत होते. व भ्रष्ट मानीत होते. अद्याही त्यांचे ग्रंथांत कथा आहेत. यावरून आमच्या वेदांत देवांदैत्यांच्या दंतकथा आहेत त्याच काळाच्या सुमारास हीं पुस्तकें झालेलीं असावीं, असें इतिहासाच्या मेळावरून वाटतें. अस्तु.

या पुस्तकाचे आधारानें पारशी लोकांकडून इराण देशांत व त्याचे आसमंतात मागीं अग्नीसेवेचा धर्म स्थापन झाला. व त्या धर्माचे मोठाले पराक्रमी राजे आरदेसर, गुस्ताप, हुरमुंज, दारा, खुसरू, जमशीद, फरीदून, शापूर, बेहेराम, फिरोज, नशिरवान, यजदजर्द इत्यादि उदयास आले. व यांतील कितीएकांनीं देवांशीं युध्धें करून त्यांचा पराभव केला. म्हणून यांत देववेद असा किताब आहे. पुढें यवन लोकांचा सिकंदर बादशाहा येऊन त्यानें दारा बादशाहाचा आरबिला येथें पराभव करून त्याचें राज्य घेतलें. त्या काळचे इराणचे बादशाहाच्या दौलतीचें व फौजेचें मोठेंच वर्णन केलेलें आहे. परंतु अतिशय श्रीमंती आली म्हणजे अशक्तता येते, तशी या राज्याची स्थिति झाली होती. म्हणून यवनांचा जोर चालला. व हें राज्य हस्तगत झाल्यामुळें शिकंदराचाही फार लौकिक वाढला, ही गोष्ट इसवी सनाचे पूर्वीं ३३० वर्षांमागें घडली. या प्रकारें यवनांचे हातीं देश गेला तरी पारशी लोकांचा धर्म बुडाला नाहीं. कारण यवनांनीं त्यांचे धर्मावर जुलूम केला नाहीं. व देशांत वस्ती केली नाहीं. फक्त येऊन-जाऊन असत. याप्रमाणें यवनांचा अंमल शंभर वर्षें चालल्यावर रूमचे बादशाहानें त्यांचें राज्य घेतलें. त्यावर इराणांत पुन्हा अग्नीसेवनरूप धर्माचे लोकांचा अम्मल होऊन आरदेसर राजा राज्य करूं लागला व त्यापुढें कितीएक राजे होऊन पारशी लोकांचा धर्म पूर्ववत चालत असतां आर्बस्थान देशांत इसवी सन ६०० यांत मुसलमानी धर्म प्रवृत्त झाला. व त्या धर्मांत हजारो लोक जाऊन त्यांच्या फौजा जमल्या व तरवारीनें तो धर्म स्थापन होऊं लागला. पुढें महमदाचे पुढील चौथा इमाम किंवा खलीपा हजरत उमर यानें मोठी फौज जमा करून तुर्कस्थान वगैरे देश काबीज करून इराण देशांत प्रवेश केला. तेव्हां त्याशी यजदजर्द नामें पातशाहा लढावयास आला. मग सन ६२६ त या देशाचे कादेसा गांवाजवळ मोठें युध्ध झालें. ह्यांत इराणचा बादशाहा यजदजर्द पराभव पावला. व मुसलमानांनीं राज्य घेतलें. त्यावर पुन्हा एक वेळ इराणी

लोकांनीं नाहाबंद येथें मुसलमानांशीं लढाई केली. परंतु तेथेंही ते हरले. याप्रमाणें मुसल्मान प्रबल झाल्यावर पारशी लोकांचे धर्मावर मोठा जुलूम झाला. मग कितीएक नवे धर्मांत गेले. व कितीएक गुप्त राहिले. अग्नीच्या देवालयांचा विध्वंस झाला व हजारो मुसलमान लोक दरसाल इराण देशांत येऊन वस्ती करूं लागले व त्यांचें राजाकडून संरक्षण होऊं लागलें. आणि जुने धर्माचे लोकांस मुसलमान गिवार किंवा अतष परस्त असें म्हणूं लागले. व त्यांजवर अनेक प्रकारचे कर बसवून त्यांस बहुत उपद्रव देऊं लागले. तेव्हां तेथील लोक पळून इकडे तिकडे गेले. व त्याच घांदलींत कितीएक बुशायराहून गुजराथ प्रांतीं सुरतेस आले. हाच त्यांचा हिंदुस्थानांत येण्याचा आरंभ होय.

याप्रमाणें पारशी लोक सुरतेस आले. तेव्हां तेथें हिंदुधर्माचा राजा होता, त्याजवळ त्यांणीं आपली दुःखभरित हकिकत निवेदन केली. तेव्हां त्यास फार दया आली आणि त्याणें त्यांस निर्वेधपणें राहाण्याकरितां नवसारी प्रांतांत जागा दिली. व इतका मात्र करार करून घेतला कीं, तुम्ही तरवारीचा धंदा करून बखेडा करूं नये. व्यापार करून स्वधर्मानें राहावें. त्यास मान्य होऊन हे लोक नवसारी प्रांतांत जाऊन राहिले. यांनीं आपले-बरोबर अग्नी व धर्मपुस्तकें आणिलीं होतीं. व कितीएक भटही यांत होते. व पुढें हे लोक गुजराथेंतील इतर लोकांसीं मिसळून व्यापारधंदा करूं लागले. व हिंदुलोकांच्या चाली यांनीं पुष्कळ घेतल्या. म्हणजे बायका कुंकू लाऊं लागल्या; लग्नें वगैरे संस्कृत भाषेनें करूं लागले. व पूर्वी ब्राम्हणांपासून त्यांनीं पूजेचे पाठ व संकल्प शिकून घेतले आहेत. पण आपला धर्म मात्र सोडला नाहीं. आणि आपलीं पुस्तकें सांभाळून ठेविलीं. हल्लीं इराणांतही जुने धर्माचे कितीएक लोक राहिले आहेत. पण त्यांस धर्म चालवि-ण्यास फार चोरी आहे. व त्यांस उपद्रव फार होतो. कारण जिकडे तिकडे मुसलमान लोकच फार व ते जबरदस्त आहेत. आणि राजाही त्यांचाच धर्माचा आहे. इराण देश मुसल्मानी झाला, त्यापूर्वीच तेथील जेन्दभाषा बहुतकरून बुडाली होती. व पारशी भाषा चालत होती. आणि तींत पुढें आरबी वगैरे शब्द मिसळून इराणांत तीच भाषा झाली. व मुसलमान लोक तीच बोलूं लागले. पुढें हिंदुस्थानांत जे पारशी आले, त्यांची पारशी भाषा जाऊन गुजराथी भाषा झाली. तथापि जुने ग्रंथ मात्र त्यांनीं संरक्षण करून ठेविले होते. यांच्यापैकीं भटास पारशी व जेन्द भाषेंतील पुस्तकें वाचावयास येतात. परंतु अर्थ समजत नाहीं. तसेंच कितीएकांस पारशी चांगलें समजतें. व जेन्द नुस्तें वाचतां येतें. याप्रमाणें आपल्यांत जसे भट वेद पाठ म्हणतात, तशी यांची स्थिती झाली. मुसलमानांचे अमलांत एका राजानें एक मोठें काम केलें; तें असें कीं, फरदुसी म्हणून त्याजवळ एक उत्तम कवी होता. त्याजकडून त्यानें इराण देशाचा मुसलमानांचे कारकीर्दीतील इतिहास लिहविला. त्या ग्रंथाचें नांव शाहानामा, त्याचे ६० हजार बवता म्हणजे श्लोक आहेत. इराणदेशाच्या मागील इतिहासाची माहिती समजण्यास मुख्य आधार हाच ग्रंथ आहे. हा शुध्ध पारशी भाषेंत आहे.

पुढें हिंदुस्थानांत आंटिकिल पेरु म्हणून जो फरासीस फिरावयास आला होता, त्यास सुरतेस जेंद भाषेचीं जुनीं पुस्तकें आढळल्यावरून तीं सर्व त्याणें विलायतेंत नेऊन प्रसिध्ध केलीं. व तेव्हांपासून या जुन्या भाषेचा शोध जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, इत्यादि देशांतील मोठाले पंडीत करूं लागले. परंतु जेंदभाषेचें व्याकरण किंवा कोश नाहीं. या अडचणीमुळें आज १०० वर्षें चाललेल्या यत्नास पूर्ण म्हणण्यासारिखी सिध्धी झाली नाहीं. तथापि कोणी म्हणत होते कीं, ही भाषाच नाहीं. पण तो त्यांचा वाद तुटून ही भाषा खरी आहे व हींत पुस्तकें आहेत तीं खरीं असें सैजील, बरनाफ, बाय, हौ, इत्यादि विद्वानांनीं ठरविलें आहे. व त्यांचा अद्याप शोध चालला आहे. डाक्टर हाउसाहेब या नांवाचे एक जर्मन शास्त्री पुण्याचे पाठशाळेंत आहेत. त्यांस सरकारानें या भाषेच्या पुस्तकांचा आणखी शोध करण्यास नवसारी वगैरे गांवीं जावयास सांगितलें होतें. व ते त्याप्रमाणें गुजराथेंत फिरून त्यांनीं बहुत पुस्तकें जमऊन आणिलीं आहेत. पारशी लोकांनीं त्यांस फार चांगली मदत केली. एक दोन जुने समजुतीचे लोकांनीं मात्र हरकत केली. ब्राम्हणांचींही मिळण्यास बहुत हरकत झाली. तथापि कितीएक अथर्ववेद प्रकरणीं नविन पुस्तकें जीं युरोपांत प्रसिध्ध नाहींत तीं हस्तगत झालीं आहेत.

आलीकडे मंचरजी हुरमसजी कामा या नामें पारशी गृहस्थांनीं आपले धर्म-पुस्तकांचा इंग्रजी तर्जुमा एक लाख रुपये खर्च करून विलायतेहून क्लिकसाहेबाकडून करऊन आणून आपले लोकांत वाटून दिला आहे. या तरजुम्यांत कांहीं चुका आहेत, असें डाक्टर हौ यांचें म्हणणें आहे. ते म्हणतात कीं, जेन्द भाषेंत जितके ग्रंथ आहेत तितके जरदष्टाचे नव्हत. त्यांत गाथा आहेत, तितक्या मात्र त्याच्या, वाकिजंद, व पाजंद म्हणजे मूळ वाक्यांवर टीका आहे. व ती वेगळ्या कवीची आहे. तिचा भेद तरजुम्यांत नाहीं. पारशी यांचे धर्मपुस्तकांत नीती, शुचिर्भूतपणा व ईश्वराचें भय, बैबलाचे जुने करारापेक्षां जास्त आहे. पण हें कितीएक मिशनरी लोकांस आवडलें नाहीं. याचें कारण पारशी लोकांचा धर्म वाईट, वाईट असें आजपर्यंत म्हणावयाचा सांप्रदाय मिशनरी लोकांनीं घालून बहुत ग्रंथ लिहिले आहेत. व पारशी लोकांचे धर्मपुस्तकांत काय आहे हें अद्याप पुरतेपणीं प्रगट झालें नवतें. आणि त्यांचा जुनेपणाही प्रसिध्ध झाला नवता. आतां यापुढें मात्र या गोष्टीचा जों जों अधीक खुलासा होईल, तों तों खरी हकीकत प्रसिध्ध होईल.

पारशी धर्माचीं पुस्तकें फार जुनीं आहेत. व बैबलाचा प्रथमचा भाग ज्या मूसानें लिहिला त्याचे पाठीमागें बहुत दिवस तीं झालीं असावीं हें सिध्ध आहे. त्यांत नीती आणि ज्ञान मूळच्या ग्रंथापेक्षां चांगलें आहे. व हें कबूल केलें म्हणजे मूसानेंच प्रथम धर्म जगांत प्रसिद्ध केला व तो धर्म पूर्वी कोणास माहीत नव्हता, हा अभिमान व हा ग्रह क्रिस्तीयन लोकांचा आहे तो नाहींसा होणार आहे. हेंही एक हौसाहेबास

फारशी ग्रंथाबद्दें वाद उत्पन्न करण्याचें कारण आहे, परंतु खऱ्यास कोठें मरण नाहीं अशी म्हण आहे. त्याप्रमाणें याचा परिणाम होईल.

ता. १ आक्टोबर १८६४

[नंबर १३६]

शीकलोकांविषयीं माहिती

हिंदुस्थानांत बेबर बादशाहा राज्य करीत होता तेव्हां, म्हणजे सन १५२५ इसवींत, एक क्षत्रिय जातीचा दाणेकऱ्याचा मुलगा नानक या नावाचा होता. त्याणें पंजाबप्रांतीं चहोटिकाणीं फिरून आपण मोठे साधू व धर्मशील आहों, अशी प्रसिध्धी केली. पुढें सैयद हसन दर्वेष म्हणून एक फकीर होता, त्याचा उपदेश घेऊन तो मक्केस व मदीनेस जाऊन परत आला. नंतर हिंदु व मुसलमान यांमध्यें जो विपरीत भाव आहे तो सर्व मिथ्या आहे. ईश्वर एक आहे. जातीधर्म नाहीं. मूर्ती वगैरे करूं नये असें याणें लोकांस शिकऊन त्या मताचा पंजाबी भाषेंत एक ग्रंथ रचला. त्यास 'आदी ग्रंथ' म्हणतात. पुढें या मतांत शेंकडों मुसलमान व हिंदु आले. परंतु त्या काळीं या नानकाचे शिष्यमंडळीची राज्य संपादन करण्याची इच्छा नवती. भजनाचा हा एक बरा मार्ग आहे, असें म्हणून कितीएकांनीं तो स्वीकारिला. हिंदूंपैकीं सीक झाले आहेत ते आपल्या जाती कायम ठेऊन वागतात. व ब्राह्मणाचे हातून कर्में करवितात आणि जे मुसलमान सीक झाले ते मुसलमानाप्रमाणें वागतात आणि नानकास गुरु असें मात्र समजतात. याप्रमाणें हें मत प्रथम चालू झालें.

नानकाचे पाठीमागें आगडशाहा याणें धर्मप्रसिध्धी केली. त्यानंतर अमरदास, रामदास व त्याचा पुत्र अर्जुनमल हे झाले. पैकीं अर्जुनमल याणें नानकाचा ग्रंथ सुधारून मोठा केला. पुढें हरगोविंद झाला. तेव्हां त्याणें आपली शिष्यशाखा बरीच वाढविली आहे. असें पाहून त्यावेळीं सर्व पंजाब प्रांत मुसलमानांचे अमलांत होता. व त्याची वहिवाट करण्याकरितां दिल्लीहून सुभा येत असे. आणि तो लाहुरास राहून अंमल करीत असे. त्याशीं कलह लाविला, व आपले शिष्यांस हत्यारें धरण्यास सांगितलें. पुढें त्याचे मुलगे हरीराय व हरकिसन झाले. व त्यानंतर तेगीबाहादर झाला. व तो आलमगीर बाहशाहाचे हुकमानें ठार मारला गेला. पुढें त्याचा मुलगा गुरुगोविंद झाला. त्याणें 'आदी ग्रंथ' आणखी सुधारला. व मुसलमानांसीं लढाया केल्या. त्याचा शिष्य बंदागुरु या नांवाचा झाला. त्याणें तर मुसलमानांशीं फारच वैर केलें. व त्यांचा फार संव्हार केला. स्त्री किंवा अज्ञान यास देखील वगळिलें नाहीं. याजमुळें तेव्हांपासून मुसलमानांचें व

शिकांचें अतिशय वैर पडलें आणि दिवसेंदिवस मुसलमानांचें राज्य निर्बळ होत चाललें. ही शीक लोकांस चांगली संधी सापडली. त्यांणीं लागलीच आपल्यांतील कांहीं सरदार निवडून त्यांचे हाताखालीं पृथकपृथक टोळ्या देऊन एकदम गर्दी केली. व मुसलमानांचा अंमल उठऊन दिला. पुढें त्या सरदारांत चातशिंग व माहादशिंग म्हणून दोन पुरुष होते, त्यांणीं आणखीही कितीएक मुलुख हस्तगत केले. नंतर सन १७९२ इसवींत माहादशिंग मरण पावला. याचा मुलगा रणजितशिंग हा सरदार झाला. व त्याणें सर्व राज्यास आळा घातला. यास पंजाबचा सिंव्ह असें म्हणतात. याणें सर्व सरदारांमध्यें श्रेष्ठता मिळऊन कबूलवाले, नेपाळवाले व मराठे इत्यादि लोकांसीं तहनामें करून आपलें काम सुयंत्र चालविलें. व पहिल्यापेक्षां राज्यही फार वाढविलें. याजवळ एक लक्ष दाहा हजार फौज होती. तींत ७० हजार कवाइतिची व ४० हजार किरकोळी असे. शिवाय ३७० तोफा व ३७० गरनाळा असत. सन १८०५ सालीं यशवंतराव होळकराचे पाठीमागें लाटलीकसाहेब लागले. तेव्हां तो अमृतसर येथें पळून जाऊन रणजितशिंगाची मदत मागत होता. परंतु इंग्रज सरकार जबरदस्त आहे. त्याचे कामांत आपण पडूं नये हें बरें, असें रणजितशिंगानें मनांत आणून होळकराशीं तहनामा करविला. तीच इंग्रजसरकारची व शिकांची पहिली गांठ होय. पुढें बोनापार्ट फौज घेऊन हिंदुस्थानावर येणार अशी मसलत होऊं लागली. तेव्हां इंग्रज सरकारानें कलकत्त्याहून मेटकाफसाहेब रणजितशिंगाकडे वकिलीस पाठऊन त्यास असें सांगितलें कीं, समयास आम्हांकडे लक्ष ठेऊन असावें. परंतु त्याचे रुकाराची वानवा दृष्टीस पडली म्हणून करनेल अचटर लोनीसाहेब फौज घेऊन अमृतसरावर गेले. व त्यांचें थोडें युध्ध झालें. त्यांत रणजितशिंगाची खात्री झाली कीं, इंग्रजी कवायतीपुढें आपले फौजेचा उपाय चालणार नाहीं. तेव्हां त्याणें ता० २५ एप्रील १८०९ इसवी रोजीं तह करून तंटा चुकविला. त्यानंतर सन १८३५ सालीं दुसरा तहनामा झाला. व पुढें काबुलकंदारचे मसलतीचे पूर्वी सन १८३८ सांत आणखी एक तहनामा झाला. व लार्ड आकलंड गवरनर जनरल हे रणजितशिंगाचे भेटीस गेले. मोठे समारंभानें दरबार होऊन त्यांच्या त्याच्या भेटी झाल्या. व कवायती झाल्या. रणजितशिंग याणें सन १८२२ सालीं बोनापार्टाची फौज फुटली तेव्हां तींतील कितीएक फरासीस सरदार बोलाउन त्यांजकडून आपली फौज कवायतींत तयार करविली. तेव्हां जनरल काट, जनरल वेंचुरा, करणेल फोर्ड इत्यादि युरोपियन सरदार त्याचे पदरीं बहुत होते. व त्यांस यानें जाहागिरी व इलाखे मोडून दिले होते. युरोपियन लोकांचा पराक्रम, युक्ती व कसब हीं यास फार आवडत असत. व त्यांचा संग्रह तो फार करीत असे. युरोपियन डाक्टर व कारागीर याजवळ बरेच होते. पुढें सन १८४० सालीं हा मरण पावला. तेव्हां याजबरोबर याच्या ४ राण्या व ७ कलवांतिणी अशा ११ स्त्रिया सती गेल्या. नंतर याचा प्रधान ध्यानशिंग म्हणून होता त्याणें खरकशिंग यास गादीवर बसविलें. रणजितशिंगाचे मरणकाळीं त्याचे खजिन्यांत ८ कोटी रुपये शिल्लक होते.

इतकें द्रव्य विपुल व फौज मोठी आणि त्यांची व्यवस्था लावण्याचें कोणास सामर्थ्य नाहीं, व ज्या राण्या राहिल्या होत्या त्यांस आपला मुलगा गादीवर बसावा, अशी इच्छा झाली. त्यामुळें त्यांणीं राज्य बुडविण्यास आरंभ केला.

हिंदुस्थानांत जे जे राजे पराक्रमी झाले त्यांणीं मोठेमोठे पराक्रमानें राज्यें मिळविलीं. परंतु त्यांस कायदा, ठराव किंवा लोकांत शाहाणपण नसल्यामुळें त्यांचे मागें अशीच दुर्दशा होऊन तीं राज्यें बुडालीं. यास उदाहरणें पुष्कळ मिळतील. यशवंतराव होळकर मेल्यावर माळव्यांत अशीच स्थिती झाली. एकामेकांस मारून सर्व मरून गेले. माहादजी शिंदे मेल्यावर त्यांचे दौलतीची अशीच स्थिती झाली. सवाई माधवराव मेल्यावर असेंच झालें. हैदरनाईक मेल्यावर त्याचे राज्याची हीच अवस्था झाली. याप्रमाणें एकंदर हिंदु व मुसलमान राज्यांचा हा इतिहास एकसारखाच आहे. म्हणजे आपसांतील कलह होऊन एकमेकांचे गळे कापून सर्वांनीं मरून दौलतीचा नाश करावा हीच रिती आहे. असो.

खरकसिंग यास चेतसिंग यार्णे मारिलें व त्याचा मुलगा नवन्याहलसिंग राज्यावर बसविला. त्यानंतर शेरसिंग राजा झाला. त्याणें ध्यानसिंगास मारिलें. नंतर अजितसिंगानें शेरसिंग राजास १८४४ सालीं मारिलें. व राजकुळांतील पोरेंबाळें मारून टाकिलीं. नंतर त्या अजितसिंगास हिरासिंग याणें मारिलें व त्यास सुचितसिंग याणें हाकून लाविलें. ह्या गडबडींत सर्व फौज बिथरून गेली. शिपाई व सरदार कोणी कोणाचें ऐकेना. एकानें एकास गादीवर बसविलें तर दुसऱ्यानें त्यास हकून द्यावें. याप्रमाणें जुने फराशीस सरदारांशीं द्वेष करून त्यांस हाकून दिलें. नंतर चंदाराणीनें आपला मुलगा दिलीपसिंग ८ वर्षांचा होता, त्यास गादीवर बसविलें. आणि आपले मर्जीतील सरदार लालसिंग व तेजासिंग यांस कारभार सांगितला. तेव्हां त्यांजवर पेशोरासिंग व काशमीरसिंग हे उठले. शेवटीं असें झालें कीं, कोणासही चैन नाहीं. व कोण जिवंत राहील याचा नेम नाहीं. तेव्हां राणी व तेजासिंग सेनापती यांणीं मिळून अशी मसलत केली कीं, इंग्रज सरकाराशीं कलह काढावा, म्हणजे ते सर्व कारभार घेतील. आणि आपण या फौजेचे हातून सुटूं. याप्रमाणें गुप्त ठराव करून सर्व फौजेस सांगितलें कीं, इंग्रजांनीं आपले मुलखांतील कितीएक भाग जबरदस्तीनें घेतला आहे. सबब त्यांशीं लढाई करावयाची. तेव्हां ते सर्व सरदार एकवट होऊन इंग्रजांचे हद्दींत लढाईस आले. पण त्या सुमारास इंग्रजसरकारची तयारी पक्की नवती. सबब एकदोन लढायांत इंग्रजी फौजेचा पराभव झाला. तरी शेवटीं इंग्रजांची सरसी झाली. व शीक सरदार फौज सोडून पळून गेले. मुडकी, फिरोजपूर, आली, वालर, सोब्रान या ४ ठिकाणीं लढाया झाल्या. शेवटील लढाई ता. १० फेब्रुवारी सन १८४६ रोजीं झाली. नंतर सर्व मुलुख इंग्रज सरकारचे ताब्यांत आला. तेव्हां त्यांणीं शिकांची सर्व फौज बरतर्फ करावी असा ठराव केला. व सर हेनरी लारेन्स यांस रसिडेंट नेमिलें. आणि यांचे मदतीस लालसिंग वजीर नेमिलें. पुढें चंदाराणीनें

कांहीं फितुराची मसलत केली सबब तिला कैद केलें. व तिचे मसलती गंगाराम व जनराल खानशिंग यांस फांशी दिलें. आणि लालशिंग यांसही कैद केलें. पुढें सर हेनरी विलायतेस गेल्यावर फ्रेडरीक लारीसाहेब कारभारी झाले. त्यांणीं कपतान आन्यु ब अंडरसन यांस मुलतानास हिशेब घेण्याकरितां पाठविलें होतें. त्यांस मुलराज याणें ठार मारिलें. व त्या कामांत राणीचें अंग होतें, म्हणून तिला तेथून काढून इंग्रजी अमलांत पोचविली. पण ती तेथून नेपाळांत गेली. पुढें मूळराजानें लढाईची सिध्धता केली. तेव्हां चार मोठ्या लढाया रामनगर, चिलियनवाला, मुलतान, गुजराथ या ठिकाणीं झाल्या, व शेवटची लढाई तारीख १ मे १८४९ रोजीं होऊन मूळराज कैद झाला. व दिलिपशिंगास कैद करून कलकत्त्यास पाठविलें. आणि सर्व राज्य जप्त करून लॉर्ड डलहौशी गवरनर जनराल यांणीं कमिशनरी केली. आणि रणजितशिंगाची फौज खालसा व फराशीस मिळून होती तिला निरोप दिला. याप्रमाणें शिकांचें राज्य संपलें व पुढें सर जान लारेन्स व त्यांचे बंधू यांचें राज्य झालें.

रणजितशिंगाचा मुलगा दिलीपशिंग हा हल्लीं पेनशनदार आहे. व त्याणें क्रिस्ती-यन धर्म स्वीकारून विलायतेस वस्ती केली आहे.

शिक लोकांचा व मुसलमानांचा द्वेष मोठा होता. तो स्मरून बंडाचे वेळीं इंग्रज-सरकारास शिक सरदारांनीं व त्यांचें लोकांनीं बहुत मदत केली. म्हणजे बंगाल्याची सर्व फौज बदलली, तेव्हा इंग्रजसरकारानें शिकांची सत्तर पलटणें नवीं भरून आणिलीं. व त्यांणीं दिल्ली, लखनौ वगैरे ठिकाणें बंडवाल्यापासून सर केलीं.

रणजितशिंगाचा चुलतभाऊ गुलाबशिंग यास रणजितशिंगाचे राज्यापैकीं काश्मीर प्रांत इंग्रज सरकारानें दिला. व आणखी कांहीं फुटकळ राजे होते, त्यांपैकीं सरकारचे लक्षांत वागले. त्यांजकडे मूळ संस्थानें जीं होतीं तीं तशींच कायम ठेविलीं. आणि बाकी सर्व मुलुख खालसात केला आहे. अद्याप तिकडे कायदा सुरू नाहीं. व सरहद्दीचा मुलुख सबब तेथें हम्मेष कमिशनरी राहील, असें वाटतें.

शिकांत अकाली शिक म्हणूस एक जात आहे, तींतील लोक मोठे खराब आहेत. त्यांचे शरिरावर नखशिखांत हत्यारें असतात. व शिवाय पागोट्यांत चक्रें असतात. त्या चक्रांचा मार मोठा चमत्कारिक आहे. हें चक्र अंगठीसारखें असून त्यास धार असतें. व शेवटावर गरगर फिरऊन मारतात.

वागुर हें शिकाचें नमन आहे. हे लोक मद्य फार पितात. व अफूही फार खातात. यांची वाटणी भाईबंदीवर किंवा चुडाबंदीवर होते. भाईबंदी म्हणजे जितके भाऊ तितक्यांस सारखी वाटणी. व चुडाबंदी म्हणजे आईवर वाटणी. मग तिला कितीही मुलगे असोत. शीक लोक मोठे शूर आहेत. व हल्लीं चिनांत वगैरे त्यांचीं पलटणें इंग्रज-सरकारनें पाठविलीं आहेत. जसे लखनौचे पुरभय्ये शिपाई तसेच शीक लोक बळकट व शूर आहेत. गोहत्येचें ते मोठें पातक समजतात. दाढी व डोकी दोन्ही ठेवितात.

[illegible] स्वर्गीचं सुख देईन," असा करार केल्याची गोष्ट त्यांत

हिंदु व मुसलमान कोणीही आपले जातींत आला तर त्यास घेतात. मूळ धर्म स्थापन करणाऱ्याचा हेतू असा होता कीं, धर्मसंबंधीं वाकडीं मोडावीं, परंतु तीं कायम आहेत, इतकेंच नाहीं, तर पहिल्यापेक्षां अधीक वाढत गेलीं आहेत. अस्तु. याप्रमाणें शीक लोकांविषयीं माहिती आहे. व त्यांचा पंजाबप्रांत इंग्रज सरकारचे अंमलांत आल्यापासून बंदोबस्त फार चांगला आहे. व प्रजेस आराम आहे.

ता० २ आक्टोबर १८६५

[नंबर १३७]

इस्त्रायल लोकांविषयीं माहिती

आजपर्यंत कोणाची माहिती कोणी मनास आणूं नये, असा आमचे हिंदु लोकांचा सांप्रदाय चालत आला आहे. व त्यापासून आपले लोकांचें फार नुकसान झालें आहे. आमचे लोकांप्रमाणें गैरमाहित लोक पृथ्वीवर थोडेच असतील. पाहा, हजार पांचशें वर्षेंपर्यंत वेगळेवेगळे प्रकारचे लोक आम्हांत मिसळून एकत्र राहिले आहेत. परंतु आमच्यामधील मोठ्या मोठ्या चतुःशास्त्री पंडितासदेखील त्यांच्या राष्ट्राबद्दल एक लहानशीही गोष्ट विचारिली तर तो कानांवर हात ठेवील. त्याच्यानें कांहीं सांगवणार नाहीं. परंतु आलीकडे हें अज्ञान दूर होऊन हरभास माहिती प्रसृत करण्याचें काम वर्तमानपत्रकर्त्यांनीं आरंभलें आहे. व तेणेंकरून जुनाट अज्ञान बरेंच दूर होत चाललें आहे. अस्तु. नुकतीच आम्ही पारशी व मुसलमान लोकांविषयीं माहिती लिहिली. आतां आज इस्त्रायल लोकांविषयीं लिहितों.

या लोकांस ज्यूस, हिब्रू, आर्मीनियन, इस्त्रायल व यहुदी अशीं नांवें आहेत. या लोकांची आपले हिंदुस्थानांत जागोजाग वस्ती आहे. व अद्यापि परमुलकांतून व्यापार वगैरे करण्याकरितां या देशांत हे लोक नवेनवेही येतात. हे बहुत दिवसांपासून कोंकण-प्रांतीं पुष्कळ आहेत. व तेथें हे तेल्याचा धंदा करितात. म्हणून यांस तेलीच म्हणतात. जंजिराप्रांतीं हे लोक पुष्कळ आहेत. तसेंच तळें, घोंसाळें, दंडा राजपुरी वगैरे प्रांतीं यांची वस्ती बरीच आहे. आतां हे लोक कोण व यांचा धर्म काय? याविषयीं विचार करूं. आलीकडे या जातीचे लोक पलटणींत व इस्पितळांत पुष्कळ नोकर आहेत. व कित्येक मोठे नामांकित सावकारही आहेत. मुंबईंचे हजरत दाउद सासून हे याच जातीचे आहेत. परंतु अर्बस्थानांतून येऊन मुंबईंत यांनीं वस्ती केली. हे जुन्यापैकीं नव्हेत.

यांनीं पुण्यांत इस्पितळ व धर्मशाळा बांधण्याकरितां दोन लक्ष रुपये दिले. व मुसलमान अन[illegible] आपले धर्माचें मोठें देऊळ [illegible] आहे. व यांनीं पोरकीं ईश्वराजवळ बसला. व खिस्तियन लोक म्हणतात कीं, सुंब्बो [illegible]

मुलें शाहाणीं करण्याकरितां एक मोठी धर्मशाळा स्थापिली आहे. हल्लींचें उत्तर भागचे रिविन्यू कमिशनर हे याच इस्रायल जातीचे आहेत. विलायतेंत जी इस्रायल लोकांची वस्ती आहे, तीपैकीं हे इकडे आलेले आहेत.

प्राचीन काळीं अर्वस्थानचे उत्तरेस इस्रायल लोकांचें एक मोठें राज्य होतें व त्या राष्ट्रास पालस्टीन, जुडिया, शिरिया, आर्मीनिया, पास अशीं नांवें आहेत. सांप्रतकाळीं हा प्रांत तुर्कस्थानचे मुसलमान राजाचे अमलांत आहे.

इस्रायल लोकांचा इतिहास फार जुना आहे. व यांचा तो इतिहास आणि धर्म बहुतकरून क्रिस्तियन लोकांस व मुसलमान लोकांस मान्य आहे. व खिस्तियन आणि मुसलमानी धर्माचें मूळ इस्रायल लोकांचें धर्मपुस्तक आहे. यांचा इतिहास असा कीं, सहा हजार वर्षांपूर्वीं जग निर्माण झाल्यावर ईश्वरानें एक मोठें तुफान उत्पन्न करून सर्व मनुष्यें मरण पाविलीं व त्या वेळेस नोहा पयगंबराचें मात्र एके नौकेंत ईश्वरानें रक्षण केलें, व त्यानंतर नोहा पैगंबराच्या वंश वाढून पुन्हा वस्ती झाली. हें तुफान झाल्यास ४२०० वर्षें झालीं, असें या लोकांचें मत आहे.

पुढें या लोकांमध्यें इब्राम खलीलुल्ला म्हणून ३८०० वर्षांपूर्वीं एक सिध्ध पुरुष झाला, त्यास ईश्वरी प्रसाद होता व या लोकांचा मूळ पुरुष तो असें म्हणतात. याचा पुत्र याकूब म्हणून होता, त्यास १२ पुत्र होते. त्यांचीं १२ गोत्रें होऊन पुष्कळ विस्तार झाला. त्यांपैकीं एक जणाचें नांव युसफ म्हणून होतें. त्यास मिस्रदेशाचे राजाजबळ मोठी पदवी प्राप्त झाली. परंतु युसफाचे वंशास मिस्र देशाचे राजाकडून उपद्रव झाला. पुढें या लोकांमध्यें मुसा पयगंबर म्हणून एक ईश्वरप्रसादी पुरुष झाला. त्यास ३२०० वर्षें झालीं. त्याणें कितीएक करामती केल्या व आपले जातीचे सर्व लोकांस मिश्रदेशांतून काढून कनानप्रांतीं नेऊन स्थापिलें. तेव्हां मार्गांत, रानांत आणि समुद्रांत मुसानें बहुत करामतीनें यांचें रक्षण केलें. अशा कथा आहेत.

हे लोक त्याकाळीं आपल्यास फार पवित्र मानीत होते. व ईश्वरास आपण फार प्रिय आहों आणि ईश्वर वारंवार आपले संरक्षणाकरितां अवतार घेतो, असें समजत होते. सभोवतालचे दुसरे राष्ट्रांतील लोकांस "हिदन" म्हणजे खोटे धर्माचे लोक असें यांणीं नांव दिलें होतें. व खोटे धर्माचे लोकांबरोबर युध्धें करून त्यांचें द्रव्य वगैरे हे हरण करीत असत.

पुढें या लोकांमध्यें साल या नांवाचा एक मोठा राजा झाला. व त्याचे पुढें दाउद राजा झाला. त्याणें या प्रांतीं जरुशालेम या नांवाचें एक शहर वसविलें. ती या देशची मुख्य राजधानी झाली. मुसा व दाउद यांचे कायदे व, धर्मोपदेशाचे ग्रंथ अद्याप आहेत. त्यांस खिस्तियन लोक जुना करार असें म्हणतात. करार म्हणण्याचें कारण असें आहे कीं, ईश्वरानें इस्रायल लोकांस "मी तुमचें कल्याण करीन, धर्माचा मोठा विस्तार करीन. तुम्हांस [illegible] जमुळ काणाचा कोणास जुलूम नाहीं. म्हणून इस्रायल

आहे. म्हणून या सर्व पुस्तकास करार असें म्हणतात. व याच ग्रंथास मुसलमान तौरेतवजवुर असें म्हणतात. परंतु मुसलमानांचें मत आहे कीं, कुराण ईश्वरानें लिहिलें तेव्हां हीं सर्व रद्द केलीं. अस्तु. दाउद राजाचा मुलगा सिलेमान झाला. त्याचे कारकीर्दीत या लोकांचे महत्त्व फार झालें. या गोष्टीस २८९० वर्षें झालीं.

श्रीमंतीचा परिणाम सर्व ठिकाणीं वाईट होतो, तसा या लोकांमध्येंही झाला. म्हणजे हे लोक पुढें धर्माविषयीं वगैरे अपसांत तक्रारी काढून भांडूं लागले. तेव्हां शेजारीं बाबिलन म्हणून एक मोठें पराक्रमी राज्य होतें. त्यानें या लोकांस आपले ताब्यांत घेतलें व पुढें बाबिलनचें राज्य इराणचे बादशाहानें घेतलें. तेव्हां इस्त्रायल लोक पुन्हा स्वतंत्र झाले. व त्यापुढें इराणचें राज्य यवन लोकांचा शिकंदर बादशाहा (आलेक्सांडर) याणें पालथें घातलें. तेव्हां इस्त्रायल लोक यवनांचे ताब्यांत गेले. व पुढें यवनांचें राज्य रूमचे बादशाहानें घेतलें तेव्हां हे लोक रूमचे ताब्यांत गेले. त्यास २००० वर्षें झालीं.

या लोकांत जे पयगंबर झाले, त्यांणीं असें लिहून ठेविलें होतें कीं, इस्त्रायल लोकांमध्यें मसीहा या नांवानें एक वेळ ईश्वर आवतार धारण करून या लोकांचें कल्याण करील आणि त्यांतील तंटेबखेडे सर्व मोडून स्वस्थता करील. या लोकांस जेव्हां वाईट काळ आला, तेव्हां त्या भविष्यावर उमेद धरून यांनीं दिवस घालविले.

रूमचा बादशहा आगस्टस सीझर हा राज्यावर असतां बेथलेम या गांवांत इस्त्रायल लोकांमध्यें मेरीचा मुलगा इसा (येशू खिस्त) हा जन्मास आला. त्याचे जन्मापासून इसवी हा शक चालतो. व हा पैगंबर होता, असें मुसलमान म्हणतात व खिस्ती लोक म्हणतात कीं, हा देवाचा मुलगाच आहे. हें कसेंही असो. परंतु हा लहानपणापासूनच 'मीच मसीहा' असें म्हणून लोकांस नवीन धर्म सांगूं लागला. परंतु हा फार गरीब असून फकिरासारखे वृत्तीने गाढवावर बसून वगैरे फिरत असे. त्यास इस्त्रायल लोक म्हणूं लागले कीं, तूं आम्हांस करामत दाखीव व आमचें कल्याण कसें करणार तें सांग; तेव्हां आम्हीं तुझें म्हणणें कबूल करूं. त्याचें उत्तर तो असें देत असें कीं, "मी, मेल्यानंतरचें तुमचें कल्याण करणार. भूमीवरचा थोरपणा नाशिवंत आहे. यास्तव याची उमेद तुम्ही धरूं नये." याचे धर्मांतील सारांश इतकाच आहे कीं, ईश्वरास अंतःकर्णानें भजावें. मूर्ती, धूपदीप वगैरे पूजासामोग्री कांहीं करूं नये, होम करूं नये. सुंता करूं नये. याप्रमाणें मागें चालत आलेलीं कितीएक कलमें याणें फिरविलीं. तेव्हां इस्त्राएल लोकांनीं तट करून असें ठरविलें कीं, हा मसिहा नव्हे. ढोंगी तोतया आहे. व याचा हेतू इतकाच कीं, प्राचीन धर्म मात्र भ्रष्ट करावा. तेव्हां रूमचे बादशाहाचे तर्फेनें या गांवीं गवरनर होता, त्याजकडे इस्त्रायल लोक फिर्याद घेऊन गेले. व त्याजवरून त्या गवरनरानें इसवी सन ३३ सांत इसास सुळावर दिलें. याविषयीं यांना पुढें [illegible] सुळीं देण्याचा हुकूम होतांच तो आकाशांत जाऊन मुसलमान असें [illegible] दिला. परंतु लोकांची ईश्वराजवळ बसला. व खिस्तियन लोक म्हणतात कीं, सुळा[illegible]

खात्री करण्याकरितां तो पुन्हा जिवंत होऊन नंतर आकाशांत गेला. आणि इस्रायल म्हणतात कीं, तो ढोंगी होता. सबब यथार्थ फाशीं गेला. मसीहा अजून पुढें होणार आहे. असा त्यांचा अद्याप विश्वास आहे.

इस्रायल लोकांचें राष्ट्र होतें. त्यावेळची भाषा हिब्रू होती व ती अद्याप खिस्तियन धर्मांतील पंडित पढतात.

इसवी सन ७२ वे वर्षीं या लोकांनीं रूमचे बादशाहावर दंगा केला, तेव्हां बादशहानें मोठें सैन्य पाठऊन या लोकांस मुलकाबाहेर घालऊन दिलें. तेव्हांपासून हे लोक स्वदेशभ्रष्ट झाले. व कोणी कोणत्या मुलखांत असे जाऊन राहिले. आतां हे विलायतेंत, अमेरिकेंत, आफ्रिकेंत, आर्बस्थानांत व हिंदुस्थानांत वगैरे बहुत ठिकाणीं येऊन राहिले आहेत. ज्या देशांत ते राहातात, तेथील लोकांप्रमाणेंच त्यांचा वेश व भाषा असते. एक धर्म मात्र त्यांणीं अद्याप संरक्षिला आहे. अर्बस्थानांतील इस्रायल आरबी बोलतात. व पोशाक आर्बाप्रमाणें करितात. विलायतेंतील इस्रायल इंग्रजी बोलतात व इंग्रजांप्रमाणें पोषाक करतात. आणि हिंदुस्थानांतील इस्रायल कुळंब्याप्रमाणें वागतात.

मुसलमानी धर्म झाला तेव्हां कितीएक इस्रायल मुसलमान झाले व हे लोक खरें पयगंबराचें कुराण असतां मानीत नाहींत, म्हणून मुसलमान लोक यांस नीच मानितात. व इसा पयगंबर खरा असतां त्यास त्यांणीं मानिलें नाहीं व त्याचा छळ केला, म्हणून खिस्तियन लोकही त्यांस नीच मानितात. व याच कारणानें यांस देशभ्रष्टता आली असें म्हणतात. इस्रायल लोकांचा शनिवार हा विश्रांतीचा दिवस आहे.

इसवी सन ७०० सालीं मुसलमानांनीं रूमचें राज्य घेतलें; तेव्हां इस्रायल लोकांचा मुलुख जरुशालेम शहरसुध्धां हजरत उमर याणें घेतला. तेव्हांपासून मुसलमानांचे ताब्यांत हा देश आहे व तेथें बहुतकरून मुसलमानांची वस्ती आहे. व अद्याप कांहीं इस्रायल तेथें आहेत.

इस्रायल लोकांचे देशांत येशूची कबर आहे. तीस मुसलमान "बैतुल मुकदस" म्हणतात. शिवाय तेथें जारडन नदी, मुसा पैगंबराचीं स्थानें इत्यादि आहेत. म्हणून खिस्तियन धर्माचे लोक तेथें यात्रेस वगैरे जात असतात. व हीं ठिकाणें आपले ताब्यांत यावीं, म्हणून युरोपखंडांतील राजांनीं बहुत युध्धें केलीं आहेत. त्यांस "क्रुसेड" असें म्हणतात. परंतु त्या काळीं मुसलमान फार जबरदस्त होते. म्हणून त्यांनीं लक्षावधी खिस्तियन फौजेचा पराभव करून आपला कबजा सोडला नाहीं.

तुर्कस्थानचा राजास मुसलमान लोक रूमषामचा बादशहा म्हणतात. त्याचें कारण जुनें रूमचे राजाचें ठिकाण इस्तंबूल तेंही त्याजकडे आहे व शाम मुलुखही त्याजकडे आहे.

वेळोवेळीं इस्रायल लोक हिंदुस्थानांत येऊन राहिले व हल्लीं इंग्रजी राज्यांत धर्माची मोकळीक सर्वांस आहे. याजमुळें कोणाचा कोणास जुल्म नाहीं. म्हणून इस्रायल

लोकही हल्लीं सुखरूप आहेत. व दिवसेंदिवस यांचें ऊर्जित होत चाललें आहे. या लोकांचें महत्त्व गेल्यास युगें लोटलीं, याजमुळें यांस राज्यकारणीं अभिमान मुळींच राहिला नाहीं व हे लोक गरीब साळसूद असोन धंद्यांत, उद्योगांत निमग्न असतात. असा यांचा इतिहास आहे.

ता० ४ डिसेंबर १८६४

[नंबर १३८]

महाराष्ट्र भाषा

महाराष्ट्र देश हा उत्तर आणि दक्षिण हिंदुस्थान यांचेमध्यें आहे. यांत गोंडवण, वराड, खानदेश, पुणें, देश, वाई देश, मिरज प्रांत, कोकण, बालेघाट वगैरे प्रांत आहेत. या देशास लागलेल्या भाषा कानडी, तैलंगी, हिंदवी, गुजराथी ह्या आहेत. यामध्यें बहुतकरून मराठी भाषा सारखीच बोलतात. परंतु प्रांतभेदानें कांहीं शब्दांच्या व मनुष्यांच्या सज-ढबीचा वेगळेपणा आहे. म्हणजे सातारचा मनुष्य किंवा कोकणचा मनुष्य नगरास ओळखला जाईल, व नगरचा कोकणांत ओळखला जाईल. आपले वडिलांस जे पदार्थ दिसले आणि ज्या कल्पना झाल्या त्यांस, त्यांणीं जीं नांवें दिलीं त्या नांवांचा जो समुदाय, ती भाषा होय. पाहा, आपण ज्यास वेडा म्हणतों, त्यास कानडे लोक हूंचा म्हणतात. व गुजराथी गांज म्हणतात. आणि हिंदुस्थानांत दिवाणा म्हणतात. तेव्हां एकच पदार्थास जीं हीं अनेक नांवें दिलीं यांस आधार इतकाच दिसतो कीं, त्यांचे त्यांचे पूर्वज तसें म्हणत आले व आतां हे पूर्वजांचे संकेत त्यांचे त्यांचे वंशांत चालले, तेच वंश वृद्धिंगत होऊन देश झाले आहेत. व राष्ट्रें झालीं आहेत. म्हणून तेच ते संकेत अधार करून लोक त्या त्या राष्ट्रांत ती ती भाषा बोलतात. व पुढें जों जों लोकांचे व्यवहार वाढत जातात, व इतर राष्ट्रांचें मिश्रीकरण होतें, तों तों एकमेकांचे शब्द उसने घेतले जाऊन भाषेची वृध्धी होते. अज्ञानी स्थितींत जे लोक असतात, त्यांची भाषाही फार थोडीच असते. कारण त्यांचा व्यवहारच थोडा डांगणांतील कोळी किंवा भिल्ल यांची सारी भाषा हजार पांचशें शब्दांत होते. कारण एक भाकर म्हटली म्हणजे त्यांच्या जेवणाचा सर्व जिल्हा आटपला. फार झालें तर दुसरें कोरड्यास म्हणजे पराकाष्ठा झाली. त्यांस घीवर, मोतीचूर, अनारसे हे मुळींच ठाऊक नाहींत; म्हणून त्यांस त्या प्रकरणांतील शब्दही ठाऊक नाहींत. त्याचप्रमाणें पटकूर म्हणजे बिछाना व पांघुरण, बिछाईत मग त्यांत सर्व वस्त्रवर्ग आला. पीतांबर, शालू, मच्छरदानी, चंद्रकळा त्यांस ठाऊक नसतात. याचप्रमाणें सर्व शब्दांचा संक्षेप होतो.

सारांश इतकाच कीं, जों जों अधिक पदार्थ उपभोगूं लागतात व अधिक कल्पना करूं लागतात, तों तों अधिक शब्दांची योजना होते.

परराष्ट्रांतील लोक येऊन मिसळ झाली, म्हणजे त्यांचे शब्द मिसळतात. मराठी भाषेची व्यवस्था मुळापासून पाहिली तर असें दिसतें कीं, महार लोकांचें मूळचें हें राष्ट्र होतें, व त्यासाठीं त्यास महारराष्ट्र असें नांव आहे. व हल्लींचे उच्चारांत मधील रचा लोप होत असतो. दंतकथा आहे कीं, हा घडशांचा मुलुक आहे. तें काय असेल तें असो. परंतु इतकें खरें कीं, महार लोक या देशांतील प्राचीन व मूळचे वतनदार आहेत. हरएक गावांत पाहिलें तर, महारांचें वतन मुख्य व पहिल्या ओळीचें असें मानलेलें आहे. व वतनावांचून बहुतेक कोठें महार सांपडणार नाहीं. त्यांस अतिशूद्र असेंही म्हणतात. 'अति' शब्दाचा अर्थ पलीकडले असाही होतो. तेव्हां या देशांत शूद्र स्थापन होण्यापूर्वीचे हे लोक आहेत, असें दिसतें. या महार लोकांस प्रथम शूद्रांनीं जिंकून आपले गांव वसविले, आणि महारांस गांवाबाहेर ठेविलें. तथापि त्यांचा संबंध गांवासीं राहिलाच. आतां हे शूद्र दक्षिणेकडून आले किंवा उत्तरेकडून आले, याचा ठिकाण नाहीं. तत्रापि उत्तरेकडून आले असावे असें अनुमान होतें. यांणीं पूर्णपणें महारांस जिंकिल्यावर त्यांचे पाठीमागून आर्य लोक या देशांत शिरले. आर्य म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, या त्रिवर्णाचे लोक. हे तीन वर्ण एका राष्ट्राचे होते, असें प्राचीन ग्रंथांवरून सिध्द होतें. म्हणजे भट, शिपाई आणि शेतकरी हा पुट्टा एक आणि या त्रिवर्णाचे अधिकारही एकसारखे. व प्राचीन काळीं त्यांच्या परस्पर सोयरिकाही होत होत्या, असें दिसतें. या आर्यांची भाषा संस्कृत होती, व हे पहिल्या महारांपेक्षां व दुसरे शूद्रांपेक्षां फार शहाणे होते. दर गांवीं पाहिलें तर पाटील व देशमूख शूद्र असतो; व त्याचे जोडीस कुळकरणी व देशपांड्या ब्राम्हण असतो. म्हणजे भागून जे आले ते पहिल्याचे हाताखालीं राहिले. तसेंच कोणी ग्रामउपाध्ये होऊन राहिले. परंतु त्यांस ग्रामाचें व प्रांताचें अधिपत्य मिळालें नाहीं. तें शूद्रांकडे राहिलें व शूद्रांचे हे उपयोगीं पडूं लागले. आणि लिहिणारे विद्वान म्हणून यांस त्यांनीं आपली प्रधानकी दिली. आतां या देशांत मुळीं गांव कधीं वसलें हें पुरातन ग्रंथांवरून पाहिलें तर मनुवंशांतील जो ध्रुव त्याचा पणतू पृथुराजा याचे कारकीर्दीत ग्राम झाले, असे लेख आहेत.

प्राक्पृथोरिह नैवेषां पुरग्रामादि कल्पना ॥
यथासुख वसंति स्म तत्र तत्राकुतोभयाः ॥ १ ॥
भूमंडलमिदं वैन्यः प्रायश्चक्रे समं विभुः ।
ग्रामान् पुरः पतनानि दुर्गाणि विविधानि च ॥
घोषान् व्रजान् सशिबिरान् आकरान्खेटसर्वटान् ॥

—भागवत, स्कं. ४, अ. १८.

अशा दंतकथा आहेत कीं, पृथुराजाच्या कारकीर्दींत गांव, वाडया, महाल, किल्ले वगैरे झाले. तेव्हां ही बहुत दिवसांची गोष्ट असावी. त्याचे पाठीमागील शूद्र त्यांचा इतिहास कांहीं राहिला नाहीं व त्यांचेही पलीकडील महार. तेव्हां त्यांचा तर मुळींच कांहीं नाहीं. हल्लीं गांवाबाहेर ते राहातात इतकें मात्र दिसतें. याप्रमाणें आर्यांची स्थापना झाल्यावर त्यांनीं शूद्रास चौथा वर्ण ठरवून आपलें राष्ट्रांत सामील करून घेतलें; इतकेंच नाहीं, पण त्यांची दैवतें वगैरे जीं या मुलखांत लोकांमध्यें मानलीं जात होतीं; तींपण आपले धर्मांत सामील करून घेतलीं. भवानी, खंडोबा, यलंमा, बहिरी, म्हसोबा वेताळ हीं सर्व शूद्र दैवतें आर्यांनीं आपल्यास ओढून घेऊन, त्यांचीं महात्में व कथा रचल्या. त्यांस श्रुती, स्मृती, सूत्रें यांत मुळींच स्थल नाहीं. पहिले शूद्र भूतपिशाच्य वगैरे देवाचे भजणारे होते, असें दिसतें. कारण त्यांचा मूळचा धर्म आर्यांनीं सुधारला आहे. तरी त्यांचे रेडे, जत्रा व गांवचे वेगवेगळे देव हे अद्याप कायम आहेत. व गांवचे शूद्र लोक तें आपलें भजन चालवितात. ब्राम्हणांचे कोणते पुस्तकांत जत्रा नाहींत; तरी शूद्र लोक केल्यावांचून राहात नाहींत. ब्राम्हणांचें पुस्तकांत जानाई, बहिरी, विरोबा हीं नाहींत. तरी गांवांत ते रयतेला देव आहेतच. त्याचप्रमाणें शूद्राच्या कितीएक क्रिया वेगळ्या आहेत. त्याचप्रमाणें महारांच्याही आहेत. बारीक शोध करणाऱ्यांचे लक्षांत या गोष्टी सहज येण्यासारख्या आहेत. महार लोक जे होते ते फक्त रानचे जनावरांचें व आपले वडिलांचें भजन करणारे होते. म्हणजे वाघोबा हाच त्यांचा देव. आपले वडिलाची मूर्ती करून किंवा पुरल्या ठिकाणीं दगड मांडून त्यास ते भजतात. अतिशय अज्ञानी लोकांस याहून दुसरें भजन काय असावें? तसेंच मेले मनुष्याची क्रिया म्हणजे त्यांची इतकी समजूत आहे कीं, जो मेला त्यास खावयास कोण देणार नाहीं. याजकरितां मेल्यास पुरल्याठिकाणीं ते जोंधळे नेऊन ठेवतात, पानसुपारी ठेवतात, पाणी ठेवितात, कांहीं सुपें टोपली असा संसार नेवून ठेवितात, पदरीं पैसे बांधितात आणि तितक्यानें त्यांची सामोग्री झाली असें समजतात. आतां आर्यांचें पंचतत्त्वांचें भजन, पिंडोदक क्रिया, संस्कार इत्यादि प्रकारचा धर्म, शूद्रांच्या धर्मापेक्षां बरा होता; म्हणून तो कित्येकांशीं शूद्रांनीं घेतला. या प्रमाणें मिसळ झाली. तेव्हां अर्थातच मूळची महारी भाषा जी होती, तिजवर मुलामे होऊन संस्कृताची जिल्हई झाली. आतां मराठी कोश कोणी पाहिला तर शब्दांवर खुणा केल्या आहेत. त्यांत मूळचे मराठी शब्द किती व त्यांत संस्कृत मिसळ किती झाली आहे, हे सहज लक्षांत येईल. अस्तु. त्यानंतर कितीएक कालपर्यंत आर्य व शूद्र यांचा एकवटपणा होऊन राहिला. तेव्हां वेदांचें कर्म कृषी तें त्यांनीं शूद्राचे टाईं स्थापून फक्त व्यापार मात्र आपणाकडे ठेविला. मूळची रीती अशी नाहीं. कारण गीतेंत,

"**कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्मस्वभावजं.**" [१८-४४]

असें सांगितलें आहे. पुढें शूद्रांनीं माहारांस जसें दास केलें तसें आर्यांनीं शूद्रांस

दास केलें. व त्यानंतर मुसलमान आणि फिरंगी हे या देशांत शिरले. त्यामुळें त्यांचेंही कितीएक शब्द या भाषेंत आले. या प्रमाणें हें राष्ट्र अनेक राष्ट्रांस मिसळले जाऊन ही भाषा त्यांचे त्यांचे शब्दांचें मिश्रण होऊन चालू झालेली आहे.

हजार वर्षांचें पूर्वी ही भाषा वेगळे प्रकारची होती. तेव्हां हीस मागधी असें म्हणत. या भाषेंत जैनांचीं पुस्तकें आहेत. व माहाराष्ट्र देशांत प्राचीन जैन बहुत आहेत व जैनांची देवळेंही पुष्कळ आहेत. या नंतर हेमाडपंतांचे कारकीर्दीस पिशाच्यलिपी चालू झाली; म्हणजे बाळबोध बंद होऊन मोडी निघाली. पुढें ज्ञानेश्वर, मुकुंदराज यांचें कवितेंत जी भाषा सांपडते त्या प्रकारची चालू झाली. व त्याआलीकडे मोरोपंतां-पर्यंत संस्कृताचे आधारानें ही भाषा सुधारली. व दरबारी भाषा फारशी आणि आरबीचे जोरानें सुधारली.

या भाषेस व्याकरण नवतें तें आलीकडे झालें व इंग्रजी अमलांत या भाषेची सुधारणा बरीच झाली व हींतही नवीन ग्रंथ होत आहेत. आजपर्यंत जे ग्रंथ झाले ते संस्कृताचे आधारानें झाले. जे जे कवी झाले त्यांणीं भारताचा, रामायणाचा आधार धरून ग्रंथ केले व आतां इंग्रजी ग्रंथांचा आधार धरून नवीन पध्धतीचे ग्रंथ झाले व होत आहेत. आणि आतां सर्व उद्योगांनीं या भाषेची भरतीच होत चालली आहे. व हींत वर्तमानपत्रें व मासीक पुस्तकें वगैरे चालू झालीं आहेत. याजमुळें अनेक विषय इजमध्यें वादांत येतात. तेव्हां हें एक भाषा सुधारण्यास मोठेंच कारण आहे. परंतु मराठी ग्रंथ अद्याप फार आहेत, असें नाहीं. हरएक राष्ट्राची ज्ञानाची गणती त्या राष्ट्रांतील ग्रंथांचे सामोग्रीवरून करतां येते. जसें इंग्रजी भाषेंत अनंत ग्रंथ आहेत, त्या प्रमाणें इंग्रजांचें शाहाणपणही आहे. संस्कृत भाषेंत ग्रंथ आहेत, त्याप्रमाणें हिंदुलोकांचें शाहाणपण आहे. फारशी भाषेंत ग्रंथ आहेत, त्याप्रमाणें इराणचे लोक शाहाणे आहेत. व त्याचप्रमाणें मराठी भाषेंत जितके ग्रंथ आहेत, तितकेच मराठे शाहाणे आहेत. तेव्हां ग्रंथसमुदाय वाढविणें, हें लोकांचें शाहाणपण वाढविणें असें आहे. आणि भाषेंत ज्ञानवृध्धीकर ग्रंथ असावे हेंच भाषेस व राष्ट्रास भूषण आहे. ज्या लोकांत ग्रंथ नाहींत, त्यांस आपण आडाणी म्हणतों. महार वगैरे जुने लोक यांस ग्रंथ नाहींत; याजमुळें ते अज्ञानांत गणिले आहेत. ब्राम्हणांजवळ ग्रंथ आहेत; म्हणून त्यांस आर्य म्हणजे श्रेष्ठ म्हटलें आहे. तेव्हां आपले भाषेंत याहून अधीक चांगले ग्रंथ जों जों होतील तों तों आपणा महाराष्ट्र जनांस अधिक श्रेष्ठपणा येईल. हें आजचे भाषणांतील रहस्य लक्षांत ठेऊन भाषा सुधारण्याचे कामीं जी साह्यता होईल ती आपण करावी हें एक आपलें कर्तव्यकर्म आहे.

तारीख २६ जून १८६४

[नंबर १३९]

ग्रंथ

विद्वान आणि ज्ञानी पुरुषांच्या बुध्धीची जीं प्रतिबिंबें ते ग्रंथ होत. ग्रंथांपासून पुढील लोकांस फार उपयोग होतो. कारण मनुष्याचें ज्ञान परंपरेनें वाढतें. आणि इतर पशूंचें वाढत नाहीं; तथापि मनुष्यानें पशूहून श्रेष्ठ होण्यास बहुत उद्योग केला पाहिजे. हा उद्योग म्हटलें असतां संस्कृत भाषेंत पुष्कळ झाला आहे. तींत काव्यें, अलंकार, व्याकरण, कथा, इत्यादिकांवर चांगले ग्रंथ रचलेले आहेत; व भाषाही पुष्कळ सुधारली आहे. आणि जुने ब्राम्हण म्हणजे ऋषी यांनीं ज्ञानसंपादनाच्या आवडीनें ज्योतिष व वैद्यक यांतही बराच शोध केला आहे. व हा शोध ज्यांनीं केला, त्यांस बक्षिसें किंवा इनामें कोणीं दिलीं होतीं, असें दिसत नाहीं. साधारणतः मनुष्यास ज्ञानाची आवड आहे; या स्वभावाचे प्रवृत्तीनें तो विद्या करितो व अधिकअधिक शोध करून ज्ञानसंग्रह करितो. परंतु सांप्रतकाळचे हिंदु लोकांस ही आवड अगदीं दिसत नाहीं. प्राचीन काळचे ग्रंथ पाहिले तर ते सर्वच मोठे पांडित्याचे आहेत, असें नाहीं. पाहा, चरणव्यूह म्हणून चार पानांचा एक ग्रंथ आहे. त्यास परिशिष्ट म्हणतात. त्यांत शाखांचीं नांवें मात्र सांगितलीं आहेत. परंतु त्यास हजार पांचशें वर्षें गेलीं म्हणून त्याची प्रतिष्ठा एवढी झाली आहे कीं, आतां शाखा-उच्छेद झाला. याजमुळें दाखल्यास तो ग्रंथ सर्व घेतात. इतकेंच केवळ नाहीं, तर त्यास वेदाचें परिशिष्ट असें मानितात. अशी लहानलहान पुस्तकें संस्कृतांत पुष्कळ आहेत व त्यांची योग्यता तीं ज्या काळीं लिहिलीं तेव्हां फार असेल असें दिसत नाहीं. पण उद्योगी लोकांनीं तीं रचलीं व प्रसिध्ध केलीं. याजमुळें आज तीं दाखल्याचे फार उपयोगीं पडतात. याचप्रमाणें सर्वानुक्रम, गोत्रकारिका इत्यादि पुष्कळ ग्रंथ आहेत. त्यांस छंद किंवा रीति कांहींच नाहीं; तीं फक्त टिपणें आहेत. आतां आपण असें पाहावें कीं, अकबर बादशाहाचे कारकीर्दीस या मुलखाची स्थिती कशी होती याविषयीं गांवचे नांवांचीं किंवा कुळांचीं टिपणें जर सांपडलीं तर लोक त्यांचा मोठा उपयोग करतील. यास्तव हल्लींचे लोकांनीं अशींच टिपणें जरी केलीं तरी तीं पुढें फार उपयोगी होतील. तर डिपुटी, मामलेदार, दप्तरदार, मुनसफ यांस आपले प्रांताचा इतिहास लिहिण्याची सवय झाली, म्हणजे आपलेकडे गांव किती आहेत, त्यांत परगणे किती आहेत, जमीदारास काय पावतें, काजीस काय पावतें, पीक कोणतें होतें, पिकाची वृध्धी करण्यास काय केलें पाहिजे, रयतेची स्थिती कशी आहे, शाळा किती आहेत, लिहिणारे किती आहेत, विद्वान् व पंडित म्हणविणारे किती, क्षेत्रें किती, देवस्थानें कोणतीं, पाऊस केव्हां पडतो, रबीचे गांव कोणते, खरीपाचे कोणते, गांवांत

मोठमोठे सावकार कोण, कोणते आडनांवाचे पाटील वगैरे जमीदार आहेत, इत्यादि माहितीचे झाडे जर त्यांनीं लिहून प्रसिध्ध केले तर ज्या देशाचा झाडा त्या देशांतील लोकांस तो विशेष उपयोगीं न पडला तरी नगरचा साताऱ्यास व बडोद्याचा बेळगांवास याप्रमाणें ते दुसरे ठिकाणीं फार उपयोगीं पडतील; परंतु हें करतो कोण.? बहुत दिवस झाले. लोकांची मति बंद पडून त्यांस स्तब्धता आली आहे. त्याचें मुख्य कारण हें एक आहे कीं, मराठी भाषा बहुतकरून कोणास लिहितां येत नाहीं, यास्तव भाषेची सुधारणा होऊन तींत लोक लिहिण्यास लागावे ही एक मोठी गोष्ट झाली पाहिजे. ही स्थिती संस्कृत भाषेस मात्र आली आहे. मराठीस अद्याप नाही. व दुसरेही कोणते प्राकृत भाषेस नाहीं. कोणी म्हणतील कीं, फायद्यावांचून कोणतीही प्रवृत्ती चालू होत नाहीं, तर ही गोष्ट खोटी आहे. ज्ञानाचे आवडीकरितां बहुत विद्वान् खपतात. आणि कल्पना काढतात; युरोपियन लोकांमध्यें ज्या विद्या व कला वाढल्या, त्या विद्येच्या आवडीने वाढल्या, त्याचप्रमाणें या देशांतही जेव्हां लोक विद्वान होते, तेव्हां त्यांस आवड होती. व ते असें समजत होतें कीं, ज्ञान वाढवावें हेंच मेहनतीचें फळ आहे. याहून दुसरें कांहीं ते इच्छित नवते. म्हणून असे शोकी जेव्हां जन्मास येतात तेव्हांच विद्या वाढते. पेशव्यांचें एवढें राज्य झालें व त्यांत लक्षावधी ब्राम्हण पोसले गेले, परंतु पेशव्यांची बखर त्यांतून कोणीएका पुरुषानें तरी लिहिली काय ! नाहीं. तें काम ग्रांटसाहेबांनीं चार वर्षें साताऱ्यास रसिडेन्ट असतां केलें. असा आपले लोकांचा प्रकार आहे. आपले देशाचे माहितीचे ग्रंथ नाहींत; याजमुळें आपले देशांतील स्थितीविषयीं व मोठे कुळांविषयीं बहुत अज्ञान आहे. मराठी भाषा व्याकरणाचें रीतीनें शुध्ध होऊन तींत शब्दभरणा झाल्यावर व दुसरे लोकांस थोडी ज्ञानवृध्धी झाल्यावर ही गोष्ट घडेल. प्रस्तुत काळीं इंग्रजी ग्रंथांचे आधारानें कितीएक भाषांतर करणारे झाले आहेत. परंतु मूळ ग्रंथ या स्वभाषेंत करणारे अजून फारसे झाले नाहींत. दादोबा पांडुरंग ज्यांनीं व्याकरणाचा निबंध स्वतां शोध करून पाणिनीप्रमाणें आपले अकलेनें बांधला असे मूळ ग्रंथ करणारे थोडे निघतील. पूर्वीदेखील जे कवी झाले ते बहुतकरून संस्कृतांतील ग्रंथांचे भाषांतर लिहिणारे झाले. त्यांमध्येंही मूळ ग्रंथ करणारा फारसा नाहीं. आतां वर्तमानपत्रें वगैरे वाढत चाललीं आहेत. त्याजमुळें लोकांस लेख ल्याहावे कसे हें समजूं लागलें आहे. तेव्हां यापासून लाभ होईल यात संशय नाहीं. परंतु देशांत वस्ती होऊन व्यवस्था होण्यास जसे बहुत दिवस लागतात, व चांगली स्थिति येण्यापूर्वी हजारो वर्षें जातात, तसेंच हें आहे. भाषेची सुधारणा व ग्रंथ होण्यास बहुत काळ लागतो. परंतु सुधारलेल्या सरकारचें संबंधानें हा काळ आतां जवळ आला आहे.

ता. १८ सप्टंबर १८६४

[नंबर १४०]

इंग्रज सरकार

बडोद्याचे रसिडेंट कर्नेल बाकरसाहेब यांणीं नुकताच गाईकवाड सरकारचा इतिहास लिहिला तो छापून प्रसिध्ध झाला. त्याचीं पानें ७०२ आहेत. त्यांत मोंगलाईचें अखेर गुजराथेंत मराठ्यांचा प्रवेश झाला. व त्यानंतर दाभाडे मोड्डन गायकवाड वाढले. आणि त्यापुढें त्यांचा व इंग्रज सरकारचा संबंध पडला, इत्यादि वर्णन केलें आहे. रसिडंटसाहेब यांस बहुत उद्योगानें हा ग्रंथ तयार करावा लागला असेल. व याचप्रमाणें पाहिलें तर बहुत ग्रंथ आजपर्यंत झालेले आहेत. सातारचें रसिडंट ग्रांटसाहेब यांणीं मराठ्यांची बखर लिहिली ती मराठी भाषांतरामुळें प्रसिध्धच आहे. शिवाय कच्छभूज, सिंध, कोलापूर, सावंतवाडी, पालनपूर, काठेवाड, महीकाठ गुजराथ, माळवा, कर्नाटक इत्यादि ज्या ज्या ठिकाणीं सरकारचे पोलिटिकल एजंट आहेत. त्यांनीं त्यांनीं आपले ताब्यांतील मुलखांत राजे आहेत त्यांचे देशाचें व लोकांचें वर्णन करून ग्रंथ छापले आहेत. मालकमसाहेबांनीं पवार, शिंदे, होळकर व माळवा देश यांचें वर्णन केलें आहे. एलफिन्स्टनसाहेबांनीं हिंदुस्थानची मोठी बखर लिहिली आहे. कर्नल ताडसाहेबांनीं अजमीरची बखर लिहिली आहे. याप्रमाणें करून सर्व ग्रंथकर्त्यांनीं हिंदु लोकांवर मोठा उपकार केला आहे, यांत संशय नाहीं. आतां सांप्रत काळीं या ग्रंथाचा उपयोग व्हावा असे लोक नाहींत. तरी पुढें हे ग्रंथ पाहाणारे हिंदु लोकांत होतील अशी आशा आहे. व त्या वेळेस त्यांचा उपयोग होईल. दुसरें, याजवरून इंग्रज लोक किती उद्योगी व किती शाहाणे आहेत हेंही लक्षांत येतें. आमचे लोकांत सदुद्योग नसोन उलटा वेगळ्याच प्रकारचा उद्योग आहे. कोणी मोठा मनुष्य चांगला उद्योग करीत आहे, असें आढळत नाहीं. व करण्यालायक आहेत असेही फारच थोडे निघतील. व त्यांतून आमचा उद्योग जो कांहीं असतो, तो अक्कल कमी होण्याचा व दिवसेंदिवस मति मंद व्हावी या धोरणाचा असतो. तो असा—गोकुळअष्टमीचा सप्ताह उभारिला म्हणजे बायका, पोरें, म्हातारे, वेडे, खुळे, सर्वजण त्यांत गुंततात. पुढें दहीकाला होऊन त्यांतून सुटतात, तों प्रोष्ठपदीचा सप्ताह व गणेशचतुर्थीचा उत्साह यांस आरंभ होतो. यांतून सुटतात तों पितृपक्ष, मग इकडून तिकडे आणि तिकडून इकडे जेवणें व भटांच्या गोष्टी चालतात. त्यांतून सुटतात तों नवरात्र पुढें आलें. याप्रमाणें बारा महिने घालऊन व्यर्थ आयुष्याचा क्षय करावा व पोरेंबाळें वेडीं करावीं, अशी आमचे लोकांची पध्धत आहे. त्यांस उद्योग करावा, पुढील लोकांस शाहणपणाचा ढीग करून ठेवावा, व दरएक गोष्टीची चौकशी किंवा शोध करावा हें ध्यान नाहीं. याप्रमाणें

बहुत लोकांचा व्यर्थ काळ जाऊन कांहीं उपयोग नाहीं. आणखी असें आहे कीं, ज्याजवळ दोन पैसे आहेत, तो मोठ्या डौलानें भटाभिक्षुकांच्या प्रीतीस्तव पार्णी, ब्राम्हणभोजनें, उच्छाह, अभिषेक, वेलाच्या लाखोल्या, नक्तें इत्यादि करून त्यांतच लौकिक मिळवावयास पाहातो. सारांश आमचे लोकांची अक्कल फार कमी आहे, असें आम्हांस इंग्रज लोकांशीं तुळणा केल्यावरून दिसतें. आमचे लोक इतके वेडे आहेत कीं, त्यांनीं आपला सर्व वेळ व्यर्थ घालवावयाचीं बहुत साधनें करून ठेविलीं आहेत व उद्यापनें, पूजा, अर्च्या, पुण्यतिथी, महोच्छाव इत्यादि व त्यांच्या मधून मधून यात्रा येतात; इत्यादिकेंवरून वेळ आणि द्रव्य या दोहोंचा नाश होऊन दिवसेंदिवस आंत पाऊल पडत चाललें आहे, तरी आमचे डोळे उघडत नाहींत. यांणीं उद्योगनिष्ठ असावें, ज्ञानवृध्धी करावी, खुळें माजऊं नयेत, लोकांस चांगला पंथ घालून द्यावा, ही रीत हे जाणत नाहींत. अस्तु. लोक असे तर असे. परंतु राजे लोकांकडे पाहावें तों तेही तसेच. सिंद्यांनीं काय केलें? तर ब्राम्हणभोजन आणि कथा!! गायकवाडांनीं काय केलें, तर खबुतरें, गोंधळी आणि पहिलवान यांचा सुकाळ!! तस्मात् सर्वोपरी या देशाचें दुर्भाग्यच ओढवलें आहे, असें म्हटलें पाहिजे. इंग्रजसरकारचा कित्ता जवळ आहे. ते पूल बांधितात, रस्ते करतात, व्यापार वाढवितात. त्यांचे मागें हजारो राजे झाले, परंतु त्या सर्वांनीं वेड्या समजुतीप्रमाणें द्रव्याचा सर्वथैव नाश केला. हल्लींप्रमाणें घाट, पूल, आगगाड्या कोणी केल्या नवत्या. यास्तव इंग्रज सरकारचे उपकार मानणें अवश्य आहे. याचप्रमाणें आम्ही निद्रिस्त आहों. तरी ते आमचे इतिहासाचे ग्रंथ लिहून काढीत आहेत. पण त्यांत काय लिहिलें आहे तें आम्हांस ठाऊक देखील नाहीं. अस्तु. आम्हामध्यें पुढें कोणी तरी निघतील, आणि ते त्यांचा उपयोग करतील. आमचे लोकांस देशाची व लोकांची खबर लिहिणें व माहितगारीचा ग्रंथ करणें, हें मुळींच ठाऊक नाहीं. व याचें कारण एक असें दिसतें कीं, पोटापलीकडे त्यांची नजरच जात नाहीं. प्रत्येक जिवाचें पोट भरलें पाहिजे, याजकरितां तो तगादा मिटेपर्यंत मात्र तो मेहेनत करितो. परंतु आपले लोकांवर उपकार करण्याचा हेतु व आपले देशाचें कल्याण करण्याची बुध्धी व ज्ञानवृध्धी करण्याची उमेद, या गोष्टींची त्यांमध्यें पेरणीच अद्याप झाली नाहीं. मग त्यांचीं कणसें आम्ही इच्छितों तीं कोठें सांपडतील बरें?

[नंबर १४१]

वारकरी पंथ

आपल्या या माहाराष्ट्र देशांत ज्ञानेश्वर तुकाराम इत्यादि साधू झाले. त्यांनीं कविता करून ठेविल्या आहेत. त्या कवितांतील मतें लोकांचे मनावर ठसून त्या आधारानें हा वारकरी पंथ उभा झाला आहे. या पंथाचीं मतें पाहिलीं तर अठरा धान्याचें कडबोळें दिसतें. कसें म्हणाल तर ऐका.

पंढरपुरास वर्षांतून एकदा तरी जावें या खेपेचें नांव वारी, व तीवरून या पंथांतील लोकांचें नांव 'वारकरी' पडलें आहे. वारकरी यांचे हातांत टाळ, खांद्यावर पताक आणि गळ्यांत तुळशीची माळ हीं चिन्हें अवश्य असावीं, असें आहे. वारीचं महत्त्व एका अभंगांत सांगितलें आहे तें असें,

काशीयात्रा पांच, द्वारकेच्या तीन,
पंढरीची जाण, एक यात्रा ॥
प्रयागीं मुंडणें, काशीस हो जाणें,
पंढरीस होणें, एकरूप ॥
अठराही वर्ण, सकळंही वैष्णव,
नाहीं दुजा भाव, पंढरीशी ॥
तुका म्हणे येथें, आहे साक्षात्कारू,
जीवन्मुक्त मेरू तीर्थक्षेत्र ॥ १ ॥

याजवरून ज्यांच्या गळ्यांत माळ व हातांत पताका तो कोणतेही जातीचा असला, तरी त्याची एक जात वैष्णव समजतात. आणि ते ब्राम्हण, शूद्र, इत्यादि सर्व एकमेकांचे पायीं पडतात. यास पुराणांतही प्रमाण आहे कीं,

न शूद्रा भगवद्भक्ता विप्रा भागवताः स्मृताः ।
सर्ववर्णेषु ते शूद्रा अभक्ता ये जनार्दने ॥ १ ॥

पुराणांत ठाईं ठाईं नाममहात्म्य लिहिलें आहे. व तें विशेषेंकरून कलियुगांत प्रमुख धरलें आहे. यामुळें तेंच मत या वारकरी लोकांनीं घेतलें आहे, असें दिसतें. व त्याजवरून हे देवांचीं नांवें उंचस्वरानें ओरडून घेतात. व त्या नामघोषास भजन म्हणतात. जसें ब्राम्हणांचें मूळचें हवन जाऊन त्यापासून लक्षहोम, अयुत होम, नवकुंडी, शतचंडी इत्यादि महाखटपटी निघाल्या, तसे या वारकऱ्यांनींही सप्ताह वगैरे

काढले आहेत. कोणी दाहा वर्षें, कोणी पांच वर्षें, विणा खालीं ठेविलाच नाहीं. नेहेमी पाहारे ठेऊन भजन करितात. इत्यादि प्रकारें हें भजनाचें प्रकरण वाढलें आहे. च यास अभंगाचीं प्रमाणेंही नेसविलीं आहेत तीं अशीं—

अभंग

नाम राहे जया पाशीं, जेथें राहे तेथें काशी ।
नामें पापि थोर थोर, उद्धरिले नाहीं पार ॥
नामें तारिले जड मूढ, उदकावरी ते कागद ।
नाम जाणे तुकावाणी, दिलें संसाराशीं पाणी ॥ १ ॥
नाम घेतां वाटचाली, यज्ञ पाउलापाउलीं ।
नाम घेतां ग्रासोग्राशीं, परि तो जेविला उपवाशी ॥
नाम घेतां भोगी त्यागी, दोष न लिंपें त्यालागीं ।
सदा रामनाम गाय, तुका वंदी त्याचे पाय ॥ २ ॥

असे अनेक अभंग तुकोबाचे, नामदेवाचे, ज्ञानेश्वराचे व रामदासाचे वगैरे आहेत. आणि त्या आधारानें या वारकऱ्यांचे मेळेचे मेळे पताका घेऊन देवाचें नांव म्हणत म्हणत किंवा अभंग गात गात पंढरपुरास, देहूस, आळंदीस वगैरे जातात.

वारकरी मांस खात नाहींत. हें मत जैन मतांतून त्यांनीं घेतलें आहे. कुळंबी वारकरी झाला म्हणजे जीव खाण्याचें सोडून देतो. ही त्याची मुख्य प्रतिज्ञा आहे.

वारकरी सत्य बोलण्याविषयीं प्रतिज्ञा करितात. हा एक नीतीचा भाग त्यामध्यें आहे.

वारकरी यांचा वेदांती बाणा आहे. बायकोचा त्याग करून गोसावी होतात व कोणी शेतें, घर टाकून वारीस लागतात. हल्लीं प्रसिध्ध वारकरी गंगूकाका, गोधाजी बावा, गोविंद बावा, वगैरे आहेत. व त्यांचे हजारो शिष्य व नेहमीं भजनें आणि वाऱ्या असतात.

वैदिक व स्मार्त कर्म याचा आणि वारकरी यांचा द्वेष आहे. कारण वैदीक व स्मृती मार्गांत अनेक देव येतात. व वारकरी यांचें मत एक पांडुरंगाखेरीज अन्य दैवत मानावयाचें नाहीं, असें आहे. तेव्हां दुसरे देव भजल्यानें व्यभिचार होतो. हरताळिका, गणेशपूजा वगैरे ते सर्व सोडून देतात. कित्येकांनीं खंडोबा, भवानी, यांचें भजनही सोडून दिलें आहे. तुकोबाचे अभंग हीच यांची श्रुती व शास्त्रें; व त्या अभंगांचीं पुस्तकें लिहून तीं पंढरीस देवाच्या पायांवर घालून कित्येक आपआपले गांवीं घरीं नेतात. तेव्हां बरोबर पांचशें, चारशें वारकरी असतात. व या कामीं दोन दोन हजार रुपये खर्च झालेला आम्हीं पाहिला आहे.

ब्राम्हणांचे लाजेकरितां हे श्राद्ध, पक्ष, लग्न, मुंज, क्रिया, इत्यादि करितात. परंतु वेद किंवा वैदिक व शास्त्री यांजवर त्यांची भक्ति नाहीं. कित्येक वारकरी अभंग म्हणत म्हणत प्रेतास नेऊन जाळतात. व असें केल्यानें त्यांची सर्व क्रिया झाली, असें समजतात. वारकरी यांचे घरीं माळवाले वारकरी यांस अन्न मिळतें, परंतु वैदिकास कांहीं मिळावयाचें नाहीं.

वारकरी यांचा बाणा वैष्णवी आहे. ते एकादशी करितात आणि भागवत व तुळशी मानितात.

याप्रमाणें वारकरी लोकांचीं मतें आहेत. व आलीकडे हा पंथ बराच उभारला आहे. जागोजाग व गांवोगांवीं विठोबाचीं मंदिरें व वारकरी वाढत आहेत. व यांचे मेळे अधिकाधिक होत आहेत. साताऱ्याजवळ चिंचणेर म्हणून गांव आहे. तेथील कुळकरणी जोतीपंत भागवत यांनीं भिक्षा मागून विठोबाचीं एक हजार देवालयें बांधलीं आहेत, अशी त्यांची आख्या आहे. ही गोष्ट नाना फडणिसाचे वेळची होय. जोतीपंतांचें देऊळ येथून काशीपर्यंत कोणतेही शहरांत नाहीं असें नाहीं. असे उद्योगी लोक या पंथांत झाले. याजमुळें दिवसेंदिवस हा पंथ मोठा होत आहे. परंतु या लोकांत अद्याप कोणी असा पुरुष झाला नाहीं कीं, त्यानें आपले मताचा ग्रंथ करून त्याप्रमाणें सर्वांनीं चालावें, असें ठरविलें. हें कधीं घडेल तेव्हां घडो. अद्यापि हे वारकरी अर्धे ब्राम्हणधर्मांत, अर्धे वेदांत व अर्धे अभंगांत असे लटपटीत आहेत. ब्राम्हणांचा संबंध मनेंकडून यांनीं तोडिला आहे, परंतु जनांत बाह्यात्कारीं हे अद्याप ब्राम्हणांस धरून धरून चालतात. याजकरितां यांस वेगळा कायदा करून देणारा कोणी पाहिजे! परंतु या पंथांतील लोक बहुतकरून अडाणी आहेत. याजमुळें तशा थरावर अद्याप आलें नाहीं. तथापि येण्याचा संभव आहे, असें दिसतें.

ता० १० माहे जून सन १८६४

[नंबर १४२]

विद्वान कोणास म्हणावें?

या देशांत विद्वान हें नांव चालविणारे बहुत लोक आहेत. वैदिक ब्राम्हण हे आपल्यास विद्वान म्हणवितात. कारण कीं, वेद जे हिंदुस्थानांतील आर्यधर्माचें मूळ पुस्तक, तें घोकून मुखपाठ करितात. आणि तें राखण्याकरितां जन्मपर्यंत त्यांस घोकणी करावी लागते; यास्तव ते असें म्हणतात कीं, या वेदराशीचें संरक्षण करणारे आम्हीं, यास्तव आम्हांस विद्वानच समजावें. दुसरे पुराणीक; ते म्हणतात कीं, आम्हीं भारत,

भागवत, संस्कृत भाषेंत असतां त्यांचा अर्थ लोकांस सांगतों, तेव्हां आम्हीही विद्वानच आहों. यानंतर व्याकरणशास्त्री, न्यायशास्त्री, वेदांतशास्त्री, धर्मशास्त्री हेही म्हणतात कीं, पूर्वी ऋषी व मोठाले विद्वान झाले, त्यांणीं वादशास्त्रें उभीं केलीं. यास्तव त्यांचे वेत्ते आम्हींही विद्वानच आहों. श्रोत्री, याज्ञीक व पुरोहित म्हणतात कीं, आम्हीं मंत्रांचे विनियोग कर्माचे ठाईं कसे करावे, तें जाणतों. आम्हांवांचून वैदिकांचा उपयोग नाहीं व पंडितांचाही नाहीं. मुंज, लग्न, याग, होम आम्ही करितों. त्यापेक्षां आम्हीही विद्वानच आहों. कायदे शिकणारे म्हणतात, आम्हांस किती बुकें पढावीं लागतात; जुने कायदे व आक्ट व समजूतपत्रें व सरकुलरें इत्यादि ध्यानांत ठेवून दरबारांत काम करावें लागतें. तेव्हां आम्हीही विद्वानच आहों. याचप्रमाणें वैद्य, ज्योतिषी हेही आपल्यास विद्वानच समजतात. वैद्य म्हणतात, आम्ही रसायनें व वनस्पत्यांचे गूण जाणतों. जोशी म्हणतात, आम्ही ग्रहणें, अस्त व उदय सांगतों; तेव्हां हें काम कुणबी, माळी, वाणी, यांच्यानें होईल कीं काय ? तस्मात आम्हीही विद्वानच. यानंतर इंग्रजी शिकलेले म्हणतात कीं, आम्ही दहा दहा वर्षें अभ्यास करून सरकारानें ठरविलेल्या पदव्या जिंकण्याकरितां परिक्षा दिल्या. अनेक ग्रंथ पाहिले तेव्हां आम्ही विद्वानच आहों. परंतु इतकेही वर्ग लक्षांत आणिले तरी विद्वान कोणास म्हणावें हें समजणें कठीण आहे.

मनुष्यांचें मन हा पदार्थ अव्यक्त आहे. तें उत्पन्न कसें झालें, हें समजण्यास मनुष्यास सामर्थ्य नाहीं, तत्रापि मनाचा स्वभाव व मनाचे गूण याचें निदान करितां येतें. मनुष्यांचें मन हा असा चमत्कारिक पदार्थ आहे कीं, त्यांत जर कल्पना सांठवीत गेलें, तर त्यांचा विस्तार होतो. व सांठविल्या तरी, हें लहानाचें लहान राहातें. लहान मुलाचे ठाईं मन असतें. पण तें वृद्धी पावलेलें नसतें, याजमुळें त्यांत शेंपन्नास कल्पनांचा मात्र सांठा असतो. खेडेगांवचा शेतकरी किंवा धनगर याचें मन लहान मुलासारखेंच थोडे कल्पनांनीं भरलेलें असतें. याजमुळें तो शरिरानें भव्य असतो; पण मनानें लहान दिसतो. लहानपणापासून मनुष्य अभ्यास करावयास लागतो. म्हणजे कल्पना सांठविण्यास लागतो. इतकाच त्याचा अर्थ. नवीन कल्पनांनीं आपलें मन भरित असतो. व्याकरण, भूगोल, गणित व इतिहास हीं पुस्तकें त्यांस नव्या नव्या कल्पना देतात. आणि शिकणारा त्या आपल्या मनाच्या ठायीं सांठवीत जातो. कायद्याचें बूक पढतो; त्याचा तरी अर्थ इतकाच कीं, त्यांतील कल्पना मनांत सांठवितो. इंग्रजी शिकतो; त्याचा तरी भाव असाच कीं, त्या भाषेंत विद्वानांनीं जो कल्पनेचा संग्रह केला आहे तो आपले मनांत सांठविणें. जो संस्कृत शिकतो तो त्यांतील कल्पना घेतो. प्रत्येक ग्रंथ जो आहे तो कल्पनेचा व प्रमाणांचा व नियमांचा ढीगच आहे. असे ढीग मागून लोकांनीं घालून ठेविले आहेत. ते उपसित उपसित जातां जातां कल्पनेचा सांठा शिकणारांचे मनांत फार मोठा होतो. सर्व ज्ञान जें आहे, तें कल्पनामय आहे. आतां मनाचा विस्तार विस्तार किती आहे, हें प्रमाण कोणासही कळत नाहीं. कारण कीं, जन्मपर्यंत कल्पनेचा सांठा करीत गेलें

तरी, मनांत त्या सर्व सांठऊन पुन्हा मन रिकामेंच दिसेल. पोट भरेल, परंतु मन भरावयाचें नाहीं. त्यांत कितीही कल्पना व प्रमाणगोष्टी व नियम सांठविले तरी तें रिकामेंच असतें. लहान मूल जन्मास येतें, तेव्हां त्याजबरोबर कांहीं कल्पना असतात किंवा नाहीं, याचा शोध लागणें अशक्य आहे. परंतु पुढील क्रमावरून असें दिसतें कीं, उपजल्यापासून कल्पना सांठविण्याचा प्रयत्न चालू होतो. प्रथम त्यास कांहीं बोलतां येत नाहीं. मग कांहीं नांवें घेऊं लागतें. मग पदार्थांची ओळख पडते. नंतर जसजसा अभ्यास वाढेल तसतसा सांठा वाढतो. या जगांत कित्येक विलक्षण मनुष्यें झालीं आहेत; त्यांचें मन इतकें वाढलें आहे कीं, त्यांची बरोबरी बहुत लोकांस होऊं शकत नाहीं. व अशा विद्वानांचे ग्रंथ अद्याप लोक वाचून त्यांचे कल्पनांचा संग्रह करीत आहेत. वंशपरंपरेनें कल्पनेचा संग्रह करण्याचा अधिकार माणसाखेरीज दुसरे जिवास नाहीं. याजकरितां मनुष्यांमध्यें ग्रंथाचा संग्रह वाढून ते ग्रंथ मनाचे वृध्धीस उपयोगी पडतात. व हे ग्रंथ ज्या ज्या देशामध्यें अधिक किंवा कमी असतात, त्याप्रमाणें त्यांची स्थिती आहे, असें ओळखतां येतें.

ब्राम्हण लोक मुळापासून विद्येचे शोकी यांत संशय नाहीं. जेव्हां छापखाने नवते, पुस्तकांची फार वृध्धी होण्यास साधन नवतें, त्या काळच्या अडचणी एकीकडे ठेऊन ते संहिता, ब्राम्हण, पुराणें, इत्यादिक मोठे ग्रंथ तोंडानें पाठ करून ठेऊं लागले. हे ग्रंथ एवढाले मोठे आहेत कीं, ते आजचे उठवणीचे काळांत वाचण्यास देखील सामर्थ्य नाहीं. परंतु तसले ग्रंथ पाठ करून, घोकून, ताडपत्रावर किंवा कापडावर लिहून संरक्षण केलें. पुस्तकें लिहिणारी एक कायस्थ जात वेगळीच झाली. धोकणारी एक जात वेगळीच झाली. अशी मेहेनत करून त्यांणीं तट्टाचे ओझ्याइतकें एकएक पुस्तक जें घरांत बाळगण्यास देखील अडचण अशीं भारतें, रामायणें, तयार केलीं; त्यांच्या नकला केल्या, असे यत्न करून ग्रंथांची बरीच राशी उत्पन्न झाली, हें संस्कृत भाषेस भूषण आहे.

कल्पनामय ज्ञान आहे; याविषयीं विचार करतां करतां वेदांती यांस असें वाटलें कीं, हें सर्व जग कल्पनामय आहे. वास्तविक पदार्थ कांहींच नाहीं. मनाचे आणि मायेचे तरंग आहेत, असें समजून त्यांणीं असल्या जगास नाहींच असें म्हटलें.

आतां संस्कृताची भरभर ज्या काळीं झाली, त्या काळीं अन्य देशांत कोठें कांहींच नवतें. याजमुळें देशावरची गोष्ट संस्कृतांत आली नाहीं. भरतखंडाहून पलीकडे ऋषींस पत्ता होता, असें क्वचित् दिसतें. आणि पत्ता लावण्याजोगें पलीकडे कांहीं नवतें, हेंही खरें. परंतु आलीकडे अनेक राष्ट्रें हिंदुलोकांचे नजरेपुढें मोंगल, इंग्लिश, फ्रेंच, पोर्टुगाल, इत्यादि रूपानें आलीं. तेव्हां हिंदुलोक आपले जुने पोथींत पाहूं लागले, तों कशास कांहीं मिळेना. त्यांत येऊनजाऊन म्लेंछ आणि यवन हे दोन शब्द. यांची ओळख कोठेंच राहिली नाहीं. तेव्हां जन्मांधास जसें डोळे आले म्हणजे जग विचित्र दिसूं लागतें,

आणि पुन्हा जन्मलों कीं काय असें वाटतें, तसें सांप्रतचे हिंदुस्थानांतील लोकांस विचित्र भावना झाली आहे.

आतां जे व्यवहार चालू झाले आहेत, त्यांतील कांहीं भाग पुराणाचे पोथींत नाहींत. याजकरितां मोठे पंडितास एक वर्तमानपत्र वाचण्यास दिलें तर तो जागोजाग आठकुळतो. आणि नवीं नावें, नवे लोक, नवे देश पाहातों. तेव्हां तीं त्याच्या तोंडानें देखील येण्यास मुष्कील. आतांची अमेरिका, इंग्लंड, रुसिया, लेफ्टेनेंट, गवरनर, लेजीस्लेटीव, कौन्सल हे पदार्थ सर्व नवे. भीम, अर्जुन, दशरथ, यांचे कारभारांत जो वाकब, त्यास हल्लींचे कारभार पाहून नवी सृष्टी दिसते. याजकरितां वैदिक, पुराणीक, शास्त्री व श्रौत्री हल्लींचे वर्तमानपत्रांकडे पाहात देखील नाहींत. जर पाहावें तर अज्ञानपणा व मूर्खपणा दिसून येईल. कारण कीं, त्यांतील एक ओळ देखील समजावयाची नाहीं. भटभिक्षुक तर वाचण्यास पराङ्मुख, मग अर्थाकडे कोठून पाहाणार ?

जुने विद्वानांची सदर्हुप्रमाणें अवस्था आहे. व हल्लींचें एक वर्तमानपत्र हातीं घेऊन शेवटपर्यंत वाचलें असतां अर्थ समजतील असे जीव थोडेच निघतील. तरी मराठी वर्तमानपत्रें हीं इंग्रजी वर्तमानपत्रांचा शंभरावा हिस्सा आहे, असें समजलें पाहिजे. वर्तमानपत्रें बहुधा विद्वान असतात तेच लिहितात. याजकरितां त्यांत अनेक विषय येतात. ते समजण्यास जगांतील बहुत कारभार ठाऊक पाहिजेत. प्रथम जगांत राष्ट्रें किती आहेत हें ठाऊक पाहिजे. हल्लीं पृथ्वीवर काय चाललें आहे याची बरीच माहिती ज्यास असेल तोच वर्तमानपत्र समजेल, बाकी कोणी १० ओळी, कोणी पांच ओळी वाचून खालीं ठेवितील अशींच माणसें बहुत.

आतां आमचा प्रकृत विषय असा आहे कीं, विद्वान कोणास म्हणावें ? तर आम्हांस असें वाटतें कीं ज्यांचीं मनें फार विस्तीर्ण झालीं आहेत, ज्यांचे मनांत अनेक कल्पनांचा संग्रह झाला आहे, ज्यांचे मनास संस्कार होऊन सर्व विषयांची थोडीफार माहिती झाली आहे, त्यांसच विद्वान म्हणावें. हा नियम सर्वांस सारखा लागेल. तो असा कीं, केवळ इंग्रजी शाळेंत जाऊन नक्कल करण्यास शिकला तर तो विद्वान नव्हे, तर इंग्लिश भाषेंत ग्रंथ काय आहेत, त्यांतील मुख्य मुख्य ग्रंथांची ज्यास ओळख झाली, त्यांतील कल्पना ज्यास ठाऊक ते इंग्रजींतील विद्वान म्हणावे. तसेंच संस्कृत ग्रंथ किती, त्यांचा मुळापासून ओघ कसा आला आहे, त्यांत विद्वान लोक कोण कोण झाले, ग्रंथकार ऋषी कोण कोण झाले व त्या ग्रंथांत आहे काय याचा सारांश, इतके ज्यांस ठाऊक असेल ते संस्कृतांतील विद्वान म्हणावे. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे घोकणारे भट व लिहिणारे कारकून यांस कोठें स्थळ राहात नाहीं. सामान्यतः फक्त लिहिणें-वाचणें ही विद्या मुळींच नव्हे, हें केवळ कसब आहे. याची गणना कलेंत आहे. विद्येंत हें मुळींच येत नाहीं. विद्या म्हणजे जेणेंकरून मन मोठें होतें, वाईट गुण जातात; शांती, निर्लोभ साधुता, इत्यादि गुण प्राप्त होतात; चारीकसारीक द्वेष, दुर्बुध्दी, लोभ व क्रोध

हे जातात; जगाचा विस्तीर्ण व्यवहार व कारभार ज्यांस समजतो, तेच विद्वानांत गणले पाहिजेत. यांखेरीज बाकी सर्व लहान मुलें किंवा अडाणी धनगर याचप्रमाणें समजावयाचे. मग ते राजे असोत अथवा सरदार असोत अथवा सावकार असोत; तरी ते मनानें लहान मुलांसारिखेच समजावे. त्यांची वर्तणूकही बहुतकरून मुलांसारखीच असते. परंतु त्यांत इतका फरक असतो कीं, मुलें अज्ञान, त्यांस कल्पना थोड्या व सामर्थ्यंही थोडें, याजमुळें फारशीं उपद्रवास कारण होत नाहींत; परंतु मोठीं माणसें अज्ञान असलीं तरी ती उपद्रवीक होतात. कारण कीं तीं जरी अज्ञान असलीं तरी त्यांचे मनास अन्य कारणानें म्हणजे अधिकार, वंश व द्रव्य इत्यादि योगानें अभिमान होऊन आपण मूर्ख आहों असें न वाटतां आम्हीं शाहाणे हा गर्व त्यांस असतो. याजमुळें त्यांपासून इतरांस उपद्रव होतो. याजकरितां देशांत जितके अधिक विद्वान होतील, तितके पाहिजे आहेत. त्यांचे गंभीर व थोरपणाचें उदाहरण दुसरे लोकांस लागतें. आणि परस्परांचे सहवासानें विद्यावृध्धी होते. विद्या म्हणजे अनेक विषयांची माहिती असणें, व्यवहारांतील बहुतेक गोष्टी ठाऊक असणें, भाषणाचें व लेखनाचें चातुर्य असणें हे गुण फार उपयोगी आहेत. आणि ज्याचें मन मोठें होईल त्याचे ठिकाणीं हे गुण सहज येतील. मन ही पोकळ पिशवी आहे, तींत जितकें जितकें भरावें तितकी तितकी ती अधिक होत जाते. आणि जन्मपर्यंत भरीत गेलें, तरी ती पूर्ण होत नाहीं. हा एक ईश्वरी चमत्कार आहे. याजकरितां साधारण इंग्रजी शिकलेले किंवा साधारण संस्कृत शिकलेले या उभयतांसही आम्ही विद्वान म्हणत नाहीं. ज्यांचें मन फार कल्पनांनीं भरलें असेल, त्यांस मात्र विद्वान म्हणूं. जसें शरीर मेहेनतीनें वाढऊन बलाढ्य होतें आणि रोडक्याचा पैलवान होतो; तसेंच मनास कमाऊन मोठें करितां येतें. देशावरावर फिरणें, राज्यदरबारांत जाणें, विद्वानांचे संगतीस बसणें; अनेक ग्रंथांचे अवलोकन करणें हे मनाचे तालीमखाने आहेत. शरिरास जसें अन्न पोसतें, तसें मनास ज्ञान पोसतें, आणि जरी आपल्याला फुरसत थोडी असली तरी ज्याला नवीन कल्पना मिळविण्याचा छंद आहे तो अधिक संग्रह केल्यावांचून राहणार नाहीं. आणि असे मनुष्यास विद्वान म्हणणें योग्य आहे. आतां हल्लीं जे थोडे ज्ञानांत आपणांस विद्वान म्हणविणारे आहेत, त्यांणीं असें मनांत आणावें कीं, आपल्याला ठाऊक नाहींत अशीं पुस्तकें अद्यापि किती आहेत; आपणांस मिळाल्या नाहींत अशा कल्पना अद्याप किती आहेत; आपल्यास ठाऊक नाहींत, असे व्यवहार जगांत किती आहेत ? यापेक्षां आपण जें जाणतों हें अगदीं अल्प आहे, ही गोष्ट ते स्मरतील तर त्यांचा लहानपणा त्यांसच दिसून येईल. आम्हांस असें वाटतें कीं, सांप्रत काळीं वर्तमानपत्राइतकें ज्ञान होण्याचें दुसरें मोठें साधन नाहीं. तें वाचून त्यांतील विषय कितीकांस समजतात, हें ज्याचे त्यांणीं पाहिलें तर विद्वान कोण, अविद्वान कोण, हें समजेल. वाचणें हें समजणें नव्हे. समजणें म्हणजे असें आहे कीं, अमेरिकेचें नांव आलें तर अमेरिका कोठें आहे ? त्यांत लोक कोण ? धर्म काय ?

राज्य काय ? इतकी माहिती असेल तर त्या खंडांतील गोष्ट समजूं शकेल. तसेंच यूरप म्हणजे काय ? तेथें देश किती आहेत ? लोक कोणे प्रकारचे आहेत ? तर युरोपांतील वर्तमान ध्यानांत येईल. जगाची माहिती असल्यावांचून वर्तमानपत्र वाचण्याची योग्यता येत नाहीं. कितीएक तर सरकारी नेमणुका पाहातात, आणि खालीं ठेवितात. बाकीचे विषय त्यांस व्यक्त नसतात व त्याविषयीं त्यांस माहिती नसते. म्हणून रुचीही नसते. तर असे लोकांस कोण विद्वान म्हणेल ?



ता. २१ जानुआरी १८६५

[नंबर १४३]

सरकारानें काय करावें ?

जर सर्व लोक सुखेंकरून व नीतीकरून एकमेकांशीं वागणारे असते तर सरकारची मुळींच जरूर लागती ना. परंतु लोकांचा स्वभाव परस्परांच्या खोड्या करून धनहरण करण्याचा आहे. तो केवळ एक देशच्या लोकांचा हा स्वभाव आहे असें नाहीं. बहुतकरून सर्व मनुष्यांचा आहे. व त्याची प्रवृत्ती ज्या काळीं बहुत मनुष्यें एकत्र मिळतात, तेव्हां फार दिसून येते. मनुष्याव्यतिरिक्त पशुपक्षादि प्राणी आपसांत भांडतात व लढाया करितात. त्याचप्रमाणें मनुष्यें जरी सूज्ञ व बुद्धिवान् आहेत, तरी तीं आपसांत भांडतात. म्हटलें असतां बुध्धीचा चांगले कामाकडे उपयोग व्हावा. परंतु तिचा वाईट कामाकरितां असा उपयोग होतो. यास्तव लोकांस कोणी नियामक असलें पाहिजे. जसा वायु झाला म्हणजे डाग द्यावा लागतो, किंवा रोग झाला म्हणजे कडू औषध द्यावें लागतें, तसें लोकांनीं हें राजाचें ओझें आपले शिरावर घ्यावें लागतें. कारण लोक नीटपणानें नांदत नाहींत. यास्तव त्यांची व्यवस्था पाहाणारे एक किंवा अनेक असले पाहिजेत. जेथें जेथें लोकांचा समुदाय जमतो, तेथें तेथें व्यवस्थापक असावा लागतो. उदाहरणार्थ, एक पागा किंवा लहानसें पतक अथवा पलटण घेऊन पाहा. त्यांत सरदार, बिनीवाले, फडणीस, चिटणीस, कपतान, सुभेदार वगैरे असतात. व तेणेंकरून त्या मनुष्यांची नीट व्यवस्था होते व वागणूक होते. त्याचप्रमाणें देशांत किंवा प्रांतांत एक सरकार स्थापन करणें अवश्य आहे. आतां या सरकाराबद्दल लोकांस कर भरावे लागतात. व सरकारचा फार आग्रह आणि बलात्कार सोसावा लागतो, हें खरें आहे. परंतु इलाज नाहीं. व सरकार नसल्यापासून जीं महान दुःखें होतील, त्यापेक्षां हीं कमी आहेत. म्हणून लोकांस मोठे सुखाकरितां थोकटें दुःख कबूल करावें लागतें. नाहींपेक्षां लोक सुदामत चालतील व एकामेकांचे हक्क संरक्षितील, ही

मराठा ग्रंथ संग्रहालय ला. . इंपीरियल.
क्रमांक ..... विः .....
कॉल नं. ..... कॉपी विठे .....

गोष्ट लटकी आहे. यास्तव त्यांस शिकविणारा व शास्ता पाहिजे हेंच खरें. व असा जो शास्ता त्याचेंच नांव सरकार.

आतां या जगामध्यें अनेक देश आहेत, त्यांमधून पाहिलें तर कोठें वंशपरंपरेचे राजे आहेत. कोठें लोकसत्तात्मक राजे आहेत. कोठें मनस्वी राजे आहेत व कोठें प्रतिबंधित राजे आहेत, असें दिसून येतें. पाहा! इराण, चीन, रूस, इत्यादि ठिकाणचे राजे मनस्वी आहेत. ते आपले प्रजेवर पाहिजे तो हुकूम करतात. व पाहिजे तो कायदा ठरवितात. इंग्लंडांतील राणीसरकारचें राज्य वंशपरंपरेचें आहे. तथापि त्यास कायद्यानें व लोकसत्तेनें प्रतिबंध आहे. पार्लमेंट सभेच्या आज्ञेशिवाय राणीसरकार कायदा करूं शकत नाहीं. कर घेऊं शकत नाहीं. ग्रीस वगैरे देशांत नेमलेले राजे राज्य करितात. व अमेरिकेंत पाहिलें तर लोकसत्तात्मकच राज्य आहे. याप्रमाणें सर्व मासले हल्लीं पृथ्वीवर आहेत. याविषयीं विचार केला तर असें दिसतें कीं, ज्या ज्या देशांत जसजशी लोकांची स्थिती आहे तसेंतसें तेथील राज्य आहे. इराणांतील व चिनांतील लोक राज्यकारभारांत अगदीं अनभ्रुत य अविद्वान आहेत. याजमुळें तेथें लोकसत्तात्मक राज्य करण्याकरितां अमेरिकेकडून मोठमोठाले शाहाणे प्रेसिडेन्ट जरी आणिले तरी तेथें लोकसत्तात्मक राज्य होणार नाहीं. कारण राजाची सुधारणा होण्यापूर्वी लोकांची सुधारणा झाली पाहिजे. जरी राजा किंवा कारभारी शाहाणा असला तरी सुयंत्र राज्य करण्याचीं अन्य साधनें त्यास सर्व पाहिजेत. आसमंतात भागींचे लोक जर त्याचे बरोबरीचे नसले तर त्यास पुढें काय करावें हें समजणार नाहीं. अस्तु. रानटी व जंगली लोक आहेत, त्यांस झोडपण्यास दंडधारी व दांडगे असेच राजे पाहिजेत. आतां विलायतेसारखे सुधारलेले देशांत जर इराणचे राजास नेलें तर त्याच्यानें एक घटकाभर देखील तेथील राज्य करवणार नाहीं, आणि फजीती होऊन जाईल. यास्तव देशांतील लोकांची जशी स्थिती आहे तशीच तेथें वहिवाट चालते. आणि त्या धोरणांनें जुलमी कायदे किंवा मोकळिका मिळतात. घरांत जो वडील असतो तो आपले कुटुंबांतील लोक जसे शाहाणे असतील तदनुसार त्यांस स्वतंत्रता उपभोगूं देतो. आणि लहान बालकें असतील त्यांस दटाऊन ठेवितो. कारण त्यांस मोकळीक दिली असतां तीं भलतेंच करतील. त्यांचे अंगीं मोकळीक वागविण्याचें सामर्थ्य आलें म्हणजे त्यांचे कलावर त्या वडील माणसांची वागणूक होते. व तसें न होईल तर तें कुटुंब लागलेंच विभक्त होऊन त्या वडिलांच्या सत्तेचा त्याग करितें. तद्वत सरकार निर्बल किंवा रयत अधिक शाहाणी झाली म्हणजे त्यांचा परस्पर मेळ राहात नाहीं.

जे लोक अज्ञान आहेत, ते सर्वोपरी सरकारावर भरंवसा ठेवितात. जशींकाय लहान मुलें आईचे कासेस लागून फिरतात. व त्यांस आईस विचारल्यावांचून कांहींच करतां येत नाहीं. व असें आहे म्हणून अज्ञान लोकांस वागविण्याची राजास मेहनत

फार असते. कारण त्यांस सर्व गोष्टींचे कित्ते त्याणेंच घालून दिले पाहिजेत. लोक स्वतां कांहींच करीत नाहींत. ज्या त्या कामांत सरकारचा आश्रय असला म्हणजे लोकांस मोठी हौस वाटते. आणि ज्या कामांत सरकारचा हात नाहीं, तें काम चांगलें असतां-नाही पडून राहातें. पुढें जों जों लोक शाहाणे होतात तों तों ते सत्ता आपलेकडे ओढतात. आणि सरकारवर फक्त परचक्र व कज्जाकफावत पाहाण्याचें काम असतें. परंतु लोकांस स्वतंत्रता वाग[वि]ण्यास सामर्थ्य व शाहाणपण मात्र आलें पाहिजे. तें नसलें तर राजाश्रयावर सर्वांचीं चांगलीं कामें अवलंबून राहातात. जेथें लोक शाहाणे होऊन सरकारनें कोठपर्यंत कारभार करावा हें जाणतात, तेथें ते सरकारास मोठ्या खंबीर मर्यादा करून देतात. व त्याबाहेर सरकारच्यानेंही मग जाववत नाहीं. आणि जेथें लोक अज्ञान आहेत, तेथें सरकार करील ती पूर्वदिशा. तेथें सरकारचें महात्म फार असतें, सरकारचा थोरपणा फार असतो, सरकारचें भय फार असतें, व सरकारचे आश्रितांचा गरिबांवर जुलूमही फार चालतो, आणि तेथें सरकारही चोर असतें. परंतु जेथें प्रजा शाहाणी असते, तेथें सरकारच्यानेंही जीं कामें रेटावयाचीं नाहींत तीं रयत स्वतां करूं शकते. सरकार कर्जभरू असतें. परंतु सावकार सधन असतात. व सरकारचे वाजवी कामांत कोणी भय धरीत नाहीं. सरकार आपले मर्यादेनें चालतें. आणि प्रजा आपले मर्यादेनें चालते.

सरकारचे वागणुकीचे कांहीं अवश्य धर्म आहेत. त्याप्रमाणें सरकार चाललें म्हणजे प्रजा अर्थातच सुखी होते. प्रजेस सुखी असावें अशी स्वाभाविक इच्छा आहे. परंतु त्यास प्रतिबध्धक ज्या गोष्टी आहेत त्या नाहींशा झाल्या म्हणजे बाकी सर्व तजवीज प्रजा आपण होऊन करितात. रोगाचें मुख्य कारण दूर झालें म्हणजे रोग जातो. नारू उपडून काढिला म्हणजे पाय बरा होतो. कांटा उपटला म्हणजे जखम बरी होते. त्याप्रमाणें हरकती दूर झाल्या म्हणजे प्रजा सुखी व उद्योगी होते. मग प्रजेस सरकारांनीं पैसा दिला पाहिजे असें नाहीं. व सुखी होण्याकरितां खजिना लुटविला पाहिजे असें नाहीं. तेव्हां सरकारानें अवश्य कोणते धर्मानें चालावें, त्याचीं कलमें आम्हांस दिसतात तीं अशीं—

१ शरीर व मालमिळकत यांचें संरक्षण असलें पाहिजे. व या दोन गोष्टी प्राप्त होण्याकरितां सरकारास पलटणें व पोलीस ठेवले पाहिजे. दारू, गोळा, हत्यारें वगैरे सामान सिध्ध ठेविलें पाहिजे. कारण कोणी लोकांच्या स्वस्थतेचा भंग करील किंवा दुसऱ्यास उपद्रव करील तर त्याचें पारिपत्य झालें पाहिजे. तसेंच देशावर परचक्रें येतात व सभोवतालचे दुष्ट राजे व दुष्ट लोक हे जमून सधन देश असेल त्यास लुटण्याची इच्छा करितात. यास्तव त्यांचे बंदोबस्ताकरितांही सैन्य पाहिजे व तें सैन्य राखण्याकरितां जो खर्च लागेल तो लोकांनीं वर्गणीनें भरला पाहिजे. आणि सरकारांनीं त्या पैशाचा यथायोग्य विनियोग केला पाहिजे. त्या विनियोगाचा हेतू असा असाव

कीं, देशांतील लोकांचा स्वस्थपणा मोडूं नये. बंडवाले, पेंढारी, चोरटे यांच्या टोळ्या फिरूं नयेत. सभोवतालचे सरकारचे हेतू समजून त्याविषयीं सावध असावें. स्वस्थपणा कायम राहिला म्हणजे बहुत कामें चालतात.

२ न्याय सरकारानें चांगला पाहावा. न्याय म्हणजे गरिबावर थोरांचा जुलूम चालूं नये, व परस्परांचा अपराध कोणी केला तर त्याचा बदला मिळावा. यास्तव लोकांस सोय पडेल अशीं जागोजाग कोडतें व मनसुब्याच्या कचेऱ्या व पोलिसाचीं नाकीं व ठाणीं ठेवावीं. सर्वांचा इनसाफ सारखा व्हावा. कोणाची तर्फदारी व पक्षपात होऊं नये. जातीवरून व धर्मावरून व हरएक कारणानें इनसाफांत कोणास अधिक व उणा मानूं नये. न्याय शिरजोर असावा. भीड, हिमायत व लांच हीं नाहींशीं व्हावीं. व न्यायास फार उशीर, खर्च व अडचणी पडूं नयेत. अशा प्रकारचा न्याय सरकारानें केला पाहिजे.

३ प्रजेवर खर्चाकरितां कर बसविणें तो सारखा व थोडा असावा. गैरवाजवी खर्चास कर बसवून वेवाजवी खर्चास मात्र करभार घ्यावा व कर बसविण्यांत श्रीमंतांस अगदि माफी व गरिबास फारच ओझें असें असूं नये. कराचें कोणास ओझें वाटूं नये, असा कर असावा.

४ विद्यावृध्धीविषयीं सरकारानें फार झटावें. विद्या करणें हें प्रजेचें काम आहे. परंतु सरकारानें त्याचा मार्ग घालून लोकांस गोडी लागेल, असें करावें. समयीं विद्येकरितां करही घेऊन विद्या वाढवावी. व याजकरितां सरकारी शाळा वगैरे कारखाने असावे.

५ व्यापाराचीं कामें सरकारानें करावीं म्हणजे जेणेंकडून व्यापार वाढेल; अशीं यंत्रें, रस्ते, पूल, घाट वगैरे सरकारानें करावे. हीं सर्व कामें रयतेवर सोप[वि]ला तर शेवटास जात नाहींत. म्हणून यांस सरकारचा आश्रय पाहिजे.

६ लोकांची नीति सरकारानें रक्षण केली पाहिजे. व यासाठीं सरकारची नीति आगोदर चांगली पाहिजे. अमर्यादा, आप्रामाणीकपणा व दुर्व्यसनें वाढतील अशा गोष्टी सरकारानें बंद कराव्या. म्हणजे दारू, आफू, भांग, इत्यादि पदार्थांचा निग्रह; तसाच हलकट कामाचा फैलाव सरकारानें मोडला पाहिजे.

७ लोकांस सरकारानें मोकळीक दिली पाहिजे. म्हणजे सरकारास हरएक गोष्ट सुचविण्याविषयीं व सरकारास अर्ज करून हरएक सुधारणा करण्याविषयीं प्रेरणा करण्यास मोकळीक असावी. म्हणजे प्रजेस मर्यादेनें बोलण्याची व छापण्याची मोकळीक पाहिजे.

याप्रमाणें ७ धर्म सरकारानें सांभाळले म्हणजे प्रजा अर्थातच सुखी होईल. कारण कीं, रस्ते चांगले व निर्भय झाले म्हणजे जाण्यायेण्यास व व्यापार वाढण्यास हरकत राहिली नाहीं. स्वस्थता असली म्हणजे आपण मेहेनत करून मिळकं तें आपले पदरीं पडेल अशी खातरजमा असते. तसेंच धारेबंदी व कर व सारा यांचा कानून मजबूद असला म्हणजे मक्ते मामलेदार अधिकार मागणार नाहींत, अशी खात्री असते. सबब लागवड अधिक होते व रयतेवर जुलूम होत नाहीं. जितका रयतेस सरकारचा बेभरवसा

तितका जुल्म होतो; याजकरितां सरकाराने जितका देववेल तितका दिलभरवसा रयतेस दिला पाहिजे, व कायदे करून ते कोणी तोडणार नाहींत, असा बदोबस्त ठेविला पाहिजे. उगीच डामडौलाकरितां किंवा दुष्ट कामाकरितां सरकार कर वसऊं लागेल तर अन्याय आहे. शत्रूनाशाविषयीं सरकारनें शूर असावें पण क्रूर असूं नये. आपली सत्ता वाढविण्याकरितां व लोभाकरितां नाना प्रकारच्या गैरमसलती काढून त्या खर्चाकरितां प्रजेवर कर वसविला तरी तो जुल्मच आहे. लोकांस अज्ञानांत ठेविलें तरी तोही जुल्म आहे आणि सरकार जो कर घेतें, तो केवळ कर्ज आहे. त्याची झाडाझडती बरोबर व यथान्याय द्यावी, असें सरकारांनीं मनांत वागविलें पाहिजे. नाहींतर "राज्याअंतीं नर्क" हेंच खरें आहे व याच वाक्यास अनुसरणारे चोर राजे बहुत आहेत. त्यांत मनस्वी राजे तर धुमश्चक्रीच करितात. कारण त्यांस कांहीं जबाबदारी व विचारपूस नसते व लोक जुलुमानें दीन झालेले असतात. येकंदर पाहिलें तर या हिंदुस्थानचें मोंठें भाग्य आहे कीं येथें इंग्रज सरकार जें स्थापन झालें आहे, तें मनस्वी नाहीं; पण जबाबदार आहे. पायरीनें पायरी पार्लमेंटापर्यंत या सरकारास विचारणारे आहेत. याकरितां वाईट गोष्ट कांहीं छपली जात नाहीं; सर्व उघडकीस येतें, हा या सरकारचा कित्ता बहुतांनीं घेण्यासारखा आहे.

सरकार चालविण्यामध्यें मुख्य मर्म असें आहे कीं, सरकार जितकें घटत जाईल तितकें बरें आहे. व लोकांची सत्ता जितकी वाढत जाईल तितकी चांगली आहे. अगदीं सरकारची गरज नाहीं अशी स्थिती असावी, असें मनांत येतें, पण अशी स्थिती लोकांस प्रत्यक्ष कधीं येईल असें तर दिसत नाहीं. पण जितकी सरकारची गरज कमी होऊन लोकांचे हातीं कारभार येईल तितकें चांगलें आहे. न्यायमनसुबी, कायदे करणें व शहरें आणि गांव यांतील पोलीसचा बंदोबस्त, हें सर्व लोकांचे हातीं असावें हा उत्तम पक्ष आहे. त्यास लोक स्वतंत्रता भोगण्यास योग्य होतील. अशी शक्ती लोकांस विद्याद्वारें यावी, ही तजवीज ठेविली पाहिजे. व जशी जशी त्यांस शक्ती येईल, तशी तशी त्यांस सत्ता मिळावी व लोकही मग ती संपादन करितात.

केवळ अडाणी देशांत सरकार मायबाप असतें. किंवा सरकार चोर असतें. मध्यम सुधारलेले देशांत सरकार मित्र असतें. व फार सुधारलेले देशांत सरकार चाकर आहे असें मानून सरकाराशीं लोक वागतात. सरकारचे गैरवाजवी सत्तेची वृध्धी होऊं देत नाहींत व सरकारच्या चुक्या सरकारास सांगतात. व त्यांचे दोष छापून प्रसिध्ध करितात. वाईट सरकारांत अशी कारभाराची प्रसिध्धी नाहीं. तेथें सर्व गुप्तपणा असतो. व सर्व ठाणीं किल्ल्यांतून व डोंगरांतून असतात. व त्रासलेले लोक राजास मारतील, या भयानें त्यास दहशत राहाते. परंतु चांगले सरकारांत सर्व कारभार उघडा असतो. पाहिजे त्याणें पाहावा. ज्ञानावर सरकारचा प्रतिबंध नसतो. परंपरेचे राज्याचें सरकार असो किंवा कारभारी यांचें सरकार असो, किंवा सत्तात्मक सरकार असो, त्यांत कांहीं चोरी

नसते. सरकार आपले कारभाराचे प्रसिध्धीस अनुकूल होऊन लोकांस माहिती सांगतें. आणि हेंच चांगलें राजाचें लक्षण आहे. राज्य कोणाचेंही अजरामर नाहीं. परंतु अशा पायावर बांधलेली इमारत फार दिवस टिकते व पेंढारीपणाचें चोरटें राज्य व त्या राज्यांतील प्रजा निर्बळ होऊन त्वरित नाशाप्रत पावते.

ता० १९ फेब्रुवारी १८६५

[नंबर १४४]

संपत्ति म्हणजे काय ?

आपलें उपजीवन होण्यास जे पदार्थ इष्ट आहेत, ते सर्व संपत्ती होत. मनुष्य जन्माला आल्यापासून संपत्ती मिळविण्याचे उद्योगांत असतो. घरें, वस्त्रें, धान्य, भांडीं वगैरे जे जे पदार्थ त्यास आवश्यक असतात, ते ते तो मिळवितो. आणि आपल्या वासना तृप्त करितो. गाई, म्हशी, मेंढरें व घोडीं वगैरे सजीव पदार्थ हीही संपत्तीच आहे. तसेंच आंब्याचीं झाडें, नारळीचीं झाडें इत्यादि हीही संपत्ती आहे व दगडाच्या खाणी, अनेक तऱ्हेचे पाषाण, धातू वगैरे हीही सर्व संपत्तीच आहे. आतां या सृष्टींत कांहीं पदार्थ मुफत मिळणारेही आहेत; जसें सूर्याचा प्रकाश, वायु, पाणी इत्यादि हीं विपुळ आहेत. म्हणून तीं जीवन होण्यास फार अवश्यक आहेत. तरीं त्यांस सामान्यतः मौल्य नाहीं. तत्रापि मुंबईसारखे शहरांत हवाशीर बंगल्यास अधिक भाडें पडतें व विहिर असेल त्या घरांत सोय फार होते. म्हणून ज्या ठिकाणीं माणसांची दाटी फार होते त्या ठिकाणीं विहिरीचे घरासही किंमत फार येते.

संपत्तींत दोन भेद आहेत. कांहीं कृत्रिम संपदा आहे व कांहीं स्वाभाविक संपदा आहे. ज्या पदार्थांस मुळची किंमत नाहीं, त्याजवर कलाकौशल्याचे योगानें उपयोगीं पडण्याचा धर्म प्राप्त होतो. म्हणून तीही संपदा होते. जसें मृत्तिकेचे घट झाले म्हणजे त्यांस किंमत येते, तसेंच, चार पैसे भार पितळेंचे घड्याळ केलें म्हणजे त्यास मोठें मौल्य येतें. एक पैशाचे लोखंडाचा चाकू केला तर त्याचा उपयोग फार पडतो. म्हणून यासही बरीच किंमत देऊन लोक घेतात. यांत संपदेचे आणखी दोन भेद आहेत; म्हणजे कांहीं पदार्थ उत्पादक आहेत व कांहीं केवळ नाश पावतात. परंतु दोन्हींचाही विनियोग करणें जरूर असतें. जसें धान्य खाण्यास लागतें त्यापासून कांहीं वृध्धी होत नाहीं, परंतु जें बीं पेरावें तें शतपट होतें. तशाच गायन, नाटक वगैरे मौजा आहेत. त्यांस जो खर्च येतो त्यापासून संपदेची वृध्धी होत नाहीं, पण मनाची तृप्ती होते. इतकाच त्यापासून उपयोग आहे. बाकी त्याजबद्दल जो खर्च झाला तो बुडित आहे.

त्याची वृध्धी नाहीं. दुसरे कितीएक पदार्थ केवळ निरुपयोगी व निर्वाहास जरुरीचे नाहींत. परंतु शोभेस्तव व दुर्मिळपणास्तव ते लोकांस पाहिजे असतात, असे पदार्थ कोणते म्हणाल तर सोनें, रुपें, हिरे वगैरे यांचा संग्रह लोक शोभेकरितांच करितात. वास्तविक पाहिलें असतां त्यांचा खाण्यापिण्यास व निर्वाहास कांहीं उपयोग नाहीं. परंतु लोकांस ज्या पदार्थांची गरज लागते त्यांचा ते संग्रह करितात व संग्रहाची बुध्धी उत्पन्न झाली त्या धोरणानें व ते पदार्थ उत्पन्न करण्यास श्रम लागतात त्या मानानें त्यांची किंमत होते. हरएक पदार्थाचा भाव खपावर आहे. ज्याचा खप वाढतो किंवा ज्याची अमदानी फार होते, त्याप्रमाणें त्याचे भावाचें तारतम्य होतें. आतां मुळापासून लोकांची स्थिती मनांत आणिली तर जेव्हां लोक अज्ञानी असतील, तेव्हां त्यांची संपदाही फार थोडी असेल असें दिसतें. कारण अद्यापि पृथ्वीवर बहुत ठिकाणीं लोक आहेत, त्यांतून कोणाची संपदा पाहिली तर एक तिरकमटा, एक जातें व एक गवताचें घर. परंतु लोक जसेजसे सुधारत चालले तसतशा त्यांच्या वासना वाढत चालल्या. मग त्यांस शेतकीचीं आउतें लागूं लागलीं, मग त्यांस वस्त्रें हावीं लागलीं, मग सोईकरितां भांडीं लागूं लागलीं, आणि तीं सर्व एकट्यास पुरविण्यास अशक्य म्हणून सुतार, कोष्टी, तांबट हे धंदे उत्पन्न झाले. याप्रमाणें व्यवसायाचे वेगळाले वर्ग झाले. व हें जेव्हां झालें तेव्हां क्रयविक्रय सुलभपणानें होण्यास नाण्याची गरज पडली असावी. पूर्वी सर्व दाण्यावरच चालत होतें, असें दिसतें. कारण ऐनजिनशीं जमाबंदी अद्याप बहुत ठिकाणीं आहे. व हजामतीबद्दल दाणे द्यावे, जोड्याबद्दल दाणे द्यावे, याप्रमाणें लहानलहान गांवांतून वहिवाट आहे. परंतु शहरांत फार अडचण पडूं लागली व व्यवहार वाढला. यास्तव सोनें, रुपें यांचे तुकडे करून ते प्रथम हुंड्याप्रमाणें चालूं लागले. व ते घेऊन क्रयविक्रय करूं लागले. सोन्यारुप्यास मुळींच किंमत आहे. सबब दुसऱ्याचे पतीच्या आधाराची त्यांस गरज लागली नाहीं. मग पुढें त्यांजवर शिक्के करून त्याजविषयीं नियम झाले. पूर्वी शाई पैसे व फलम वगैरे नाणीं होतीं, तीं फक्त तुकडेच होते. परंतु त्यांतील कपट जाण्याकरितां व राज्यास उत्पन्न होण्याकरितां त्यांजवर शिक्के करूं लागले. आतां जुनीं नाणीं पाहिलीं तर त्यांजवर एकावर एक अक्षर तर दुसऱ्यावर दुसरें, याप्रमाणें वांकडेतिकडे शिक्के असतात. व हल्लींचा कंपनी शिक्का पाहिला तर त्याजवर समग्र शिक्का उठला असतो. तात्पर्य सुधारणा होत होत होते. याप्रमाणें खरेदीविक्रीचें काम सुलभ होण्याकरितां सोन्यारुप्याचें नाणें चालूं झालें. आतां वास्तविक पाहिलें तर उपजीविकेची संपदा ती नव्हे. जर सोनें, रुपें याच्या लगडी देऊन मनुष्यास रानांत सोडलें तर त्यांत निर्वाह नाहीं. असो. पुढें लोकांमध्यें पत उत्पन्न झाली. तेव्हां हीं नाणीं मागें पडून हुंड्या व नोटी वगैरे कागदांचें नाणें चालू झालें. हे कागद जे चालवितात त्यांची पत लोकांमध्यें इतकी आहे कीं, त्या कागदाचे मोबदला हवे तेव्हां रुपये मिळतील असे लोकांस पक्कें ठाऊक आहे, म्हणून त्यांचे कागद चालतात. जेव्हां लोकांत कोणाची पत कमी होते किंवा कोणाचें दिवाळें

निघतें, तेव्हां लागलीच त्या सावकाराच्या हुंड्या फिरतात. व त्यांस कोणी स[स्वी]कारीत नाहीं. आतां सोन्याचे नाण्यांत व कागदाचे नाण्यांत इतकेंच अंतर आहे कीं, सोन्याची पत त्याचे अंगींच आहे. म्हणजे एक तोळा सोनें उत्पन्न करण्यास खर्चच १४।१५ रुपये लागतो, म्हणून त्याची किंमतही त्या वेतानें असते आणि लोकांस त्याची गरज आहे म्हणून त्याचा खप आहे. याजकरितां सोनें स्वतांच मौल्यवान आहे. त्यास दुसऱ्याचे पतीचा आधार नको. आणि कागदास आधार पाहिजे. तो आधार बुडेल त्या दिवशीं ते कागदच राहातील, त्यांची कांहीं किंमत होणार नाहीं. याप्रमाणें जों जों लोक अधिक शाहाणे होतात, तों तों त्यांची संपदा वाढते व तिचा बहुतेक अंश ते वृध्धीस लावतात. जरूरीचा खर्च होऊन जो अंश शिल्लक राहील तो वृध्धीस लाविला, तर फायदा आहे. हें ज्यांस चांगलें कळतें ते अंश इतर वावगे कामांत खर्च न करितां त्याची वृध्धी व्हावी अशी तजवीज करितात. व्यक्तीमात्राचे आणि सर्व राष्ट्राचे संपत्तीचा विचार असाच आहे. जें राष्ट्र आपली संपदा सर्वदा उपयोगी कामास लावितें आणि ज्या राष्ट्रामध्यें संपत्तिमान लोक फार आहेत, तें राष्ट्र अधिक संपत्तिवान् असें समजावें. आतां याप्रमाणें पाहिलें असतां हिंदुस्थानाची संपदा फार कमी आहे, असें दिसेल. येथील लोकांस आपलें धन वृद्धिंगत करण्याचें फारसें ठाऊक नाहीं. त्यांच्यामध्यें सोनें, रुपें यांचा संग्रह करण्याची चाल फार आहे. म्हणून यांचा व्यवसाय वाढत नाहीं. विलायतेंतील लोकांकडे पाहिलें तर, त्यांची संपदा फार मोठी दिसते. व त्यांचें द्रव्य वृध्धीकडे फार लागलें आहे. यांचीं हजारों जाहाजें व आगबोटी समुद्रावर फिरत आहेत. ही सर्व संपदा आहे. कोट्यावधी रुपयांचें भांडवल खर्च करून आगगाड्या बांधलेल्या आहेत. व तिकडील लोक उद्योगी फार. याजमुळें शंभर लाख बंदुका लागल्या तरी एके दिवसांत मिळतील. याप्रमाणें अनेक पदार्थ जे मनुष्यांच्या उपयोगी पडतात त्यांचा संग्रह त्या देशांत फार मोठा आहे. आपले देशांत धान्य वगैरेची उत्पत्ती मात्र फार आहे. लोखंड, कोळसे नसल्यामुळें इकडे कितीएक उद्योग कधींच चालू व्हावयाचे नाहींत असे आहेत. या देशांत जमीन चांगली व देश मोठा विस्तीर्ण. याजकरितां धान्याचें पीक इकडे पुष्कळ होतें. आणि तें या देशांतील मनुष्यांस पुरून फार फाजील राहातें. त्याची विक्री इतर देशांतील मनुष्यांस करून येथील लोक जे दुसरे पदार्थ इकडे होत नाहींत, ते विकत घेतात. हिंदुस्थानांत सोन्यारुप्यांच्या खाणी नाहींत. कांच, बिलोर, तांबें, कथील हीं इकडे नाहींत. परंतु या देशांत हे जिन्नस आले आहेत, ते ते इकडील धान्य वगैरे जिन्नस देऊनच खरेदी झाले आहेत. पूर्वी हें सर्व फाजील येथेंच राहात होते व व्यापार वाढला नवता व इतर देशांपेक्षां खरेदी इकडे फार नव्हती; याजमुळें हें फाजील येथेंच राहून त्याचें काय करावें हें लोकांस समजत नवतें. याजमुळें त्यांनीं डोंगर कोरून लेणीं केलीं. मोठाल्या समाराधना घालून जेवणावळी केल्या.

लग्नें, श्राध्धें, लाखो रुपये लाऊन केलीं. आणि हा संचय उडविला. परंतु आतां या

देशांशीं जो व्यापार वाढला आहे, त्याजमुळें आतां येथें कितीही फाजील पडले तरी राहावयाचें नाहीं. तें सर्व खपून जाईल. याजमुळें इकडील कापूस, अफू, ताग, तेल, जवस हे सर्व पदार्थ विकले जाऊन त्यांचें सोनें, रुपें वगैरे हरएक पदार्थ या देशांत येतील व येताहेत. आतां हें फाजील द्रव्य जें जमेल त्याचा चांगला उपयोग करणें हें लोकांचे शाहाणपणावर आहे. हा चांगला उपयोग म्हणजे दुसऱ्या देशांतील पदार्थ आपणास लागतात, त्यांपैकीं या देशांत जितके होतील तितके येथें करणें. आणि येथील लोकांस धंदा पैदा करून देणें. याचें नांव चांगला उपयोग. पूर्वी जसें निर्फळ कामांत खर्च करीत होते तसें आतां करतील तर देशाची स्थिति आहे तसीच राहील. याहून चांगली होणार नाहीं. जरुरीचे पदार्थ आपणांस जितके लागतात ते सर्व संपदा आहेत. आणि ते पदार्थ मिळविण्याकरितां दुसरे देशावर आपणांस टेकावें लागतें. याजमुळें परस्वाधीनपणा होतो. हा परस्वाधीनपणा जेणेंकडून मोडेल तितकें करावें तें चांगलें. शेवटीं ज्यास उपाय नाहीं तितकी मात्र गरज परदेशाची राहावी. कारण ईश्वरानें सृष्टींत सर्व देश सारखे निर्माण केले नाहींत. हिंदुस्थानांत अफू, कापूस वगैरे पिकतात व विलायतेंत हे जिन्नस पिकत नाहींत. परंतु येथें [विलायतेंत] लोखंड आणि कोळसे खाणींत इतके सांपडतात कीं, तेथील लोकांचें तेंच धन झालेलें आहे. तेव्हां हा ईश्वरी संकेताचा फरक कायम राहील. परंतु हें अंतर जितकें कमी होईल तितकें करावें. म्हणजे आपले देशांत बहुतांस उद्योग मिळेल व इकडील लक्ष्मी परदेशांत फारशी जाणार नाहीं. आतां बिलोरी सामान, कापड वगैरे या देशांत होण्यासारखें आहे. परंतु त्या कळा व कौशल्यें वाढविलीं पाहिजेत. सांप्रत जे द्रव्यवान लोक आहेत, त्यांचें लक्ष आपला देश सुखी करण्याकडे फारसें आहे, असें म्हणवत नाहीं. कोणी लाखो रुपये देऊन पांच हजारांच्या किंमतीच्या जमिनी घेतात. कोणी शेरांची जुगार करून त्यांत हजारो रुपये बुडवितात. कोणी कांहीं, कोणी कांहीं असे बेफायद्याचे धंदे करून आपले संपदेची हानि करितात, असें आढळतें. आलीकडे अमेरिकेंतील लढाई उत्पन्न झाल्यामुळें कापूस वगैरेस फार भाव आला म्हणून इकडे संपदा फार लोटली आहे. परंतु लोकांचें ज्ञान जसें असेल, तसा तिचा उपयोग होईल. कलाकौशल्यता ही स्वतां संपदा नाहीं. म्हणजे त्याजवर उदरनिर्वाह होत नाहीं. तरी संपदा मिळविण्याचा तो एक उत्तम उपाय आहे. चांगला सुतार अधिक वेतन घेतो व चांगला गाणार अधिक बिदागी घेतो, याजकरितां जेणेंकरून निर्वाह होतो, तें कसबही मोठी संपदाच आहे. आपले देशांत या प्रकारचीं उपयोगी कौशल्यें असावीं, ही संपदाच आहे. येथें चांगले बारिस्टर वकील असते तर इंग्रजी बारीस्टरास शंभर रुपये रोज कां द्यावे लागते ? आणि तसाच डाक्टर, इंजनीयर, तारवें बांधणारे, वगैरे लोकांविषयीं विचार आहे. आतां सरकार इंग्रजी म्हणून त्याच्या जातीचें महात्म आहे असें म्हणतील तर तो अंश फार थोडा आहे. मुख्य इंग्रजी लोकांचे ज्ञानानेंच त्यांचें महात्म आहे. त्यांचें कसब ज्यास्ती

आहे, त्यांची विद्या, उद्योग ज्यास्ती आहेत, यांविषयीं अंधळा कोणी असेल असें वाटत नाहीं. तेव्हां या सर्व विद्या आपले देशांत याव्या, म्हणजे मोठा फायदा आहे. राज्यकारणामुळें आपण मागें पडूं तर ती गोष्ट वेगळी, पण प्रथम विद्येनें तर त्यांची बरोबरी करावी; परंतु ही बरोबरी मिळण्यास बहुत काळ पाहिजे. व या देशांत जी संपदा आहे तिचा सर्व ओघ या कामाकडे वळेल तेव्हांच हें सिध्ध होईल. तात्पर्य, संपदेचे विचाराचे पोटीं बहुत विचार उत्पन्न होतात. व संपदा काय हें पुर्तेपणीं समजण्यास या सर्व विचारांची जरूर आहे. याहून अधीक ज्यांस पाहाण्याची ईछा असेल, त्याणीं अर्थशास्त्राचे ग्रंथ पाहावे. संपदा म्हणजे काय इतकेंच समजून विशेष उपयोग नाहीं; परंतु तिची वृध्धी, तिचा उपयोग हेंही कळलें पाहिजे. कोणतीही संपदा बहुधा उद्योगावांचून उत्पन्न होत नाहीं. परंतु जगांतील घोटाळ्यामुळें उत्पन्न करणारे एकीकडे राहून भलतेच तिचा उपभोग करितात. याजकरितां जे उत्पन्न करितात त्यांस ती मिळावी, तिचा व्यभिचार होऊं नये, हें एक प्रजेचे सुखास मुख्य कारण आहे. जितका उद्योग वाढेल तितकी ती वाढेल व जितकी ती वाढेल तितकें लोकांस सौख्य होईल हे साधारण नियम आहेत.

ता० १८ डिसेंबर १८६४

[नंबर १४५]

चार युगें

आपल्या हिंदु लोकांच्या पुराणांत ४ युगांच्या बहुत गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांविषयीं लोकांच्या कल्पना अनेक आहेत. कोणी म्हणतात कीं, हीं युगें मुळींच खोटीं आहेत; म्हणजे कवींनीं मनास येईल तशी बडबड केली आहे. कोणी म्हणतात वास्तविक इतिहास या युगांवरून कांहीं कळत नाहीं; व लक्षावधी वर्षें या युगांत धरलीं आहेत. इतकें जुनें हें जग नाहीं. कोणी म्हणतात, अमुक युग अमुक दिवशीं निघालें व त्या वेळेस अमुक ग्रह अमके ठिकाणीं होते, असें मानिलें आहे. यास्तव ज्योतिषी. लोकांनीं मागील काळचें गणित करून हीं युगें मानिलीं, म्हणजे हीं ज्योतिषांतील ग्रह-मानार्चीं युगें आहेत. कोणी म्हणतात, युगसंख्येवरील पूज्यें टाकून बाकीचे अंक घ्यावे. कोणी म्हणतात, हीं युगें दंतकथेनें आलीं, त्याजवरून वाईट काळ कसकसा होत आला ते ध्यानांत येण्याकरितां ही युक्ती योजिली आहे. भोळेभोळे लोक आहेत ते असें म्हणतात कीं, हीं सर्व युगें खरीं आहेत; पृथ्वी फार जुनी आहे, व जशी पुराणांत वर्णन केली आहे तशीच पृथ्वी आहे. याप्रकारें करून लोक अनेक तर्क काढतात, परंतु

आम्हांस वाटतें कीं, आर्यलोकांमध्यें चार युगांची दंतकथा जी चालत आली आहे ती आर्यांची स्थितीदर्शक आहे. प्रथम आर्य लोक म्हणजे ज्यांस इंग्लिश लोक 'एरियन' म्हणतात ते लोक, हिंदुस्थानांत आले. ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांस द्विज अशी संज्ञा आहे. हे आर्यच आहेत, व आर्य लोक इतर देशींही आहेत. इंग्रज हेही आर्यच आहेत, असें आलीकडे सिध्द झालें आहे. हिंदुस्थानांत आर्य लोक येण्यापूर्वी हिमालयाचे पलीकडे त्यांचें मोठें राष्ट्र होतें, असें अनुमान आहे व तें राष्ट्र फुटून चोहोकडे हे वसाहतीकरितां गेले, व त्यांतील जो भाग हिंदुस्थानांत आला त्याच्या दंतकथा बहुतकरून वेदांत व पुराणांत सांपडतात. व बहुतकरून पुराणांत ज्या ज्या गोष्टी सांपडतात त्यांचीं मूळें वेदांत आहेत. भागवतादिक पुराणें आहेत, त्यांत असें लिहिलें आहे कीं, कृतयुगामध्यें देव-दानव यांचीं युध्धें झालीं, व ते आपसांत भाऊच होते; परंतु त्यांचा मार्ग वेगळा व यांचा मार्ग वेगळा होता. ते उग्र व शूर होते; आणि देव लीन व कपटी होते, भित्रे होते. व त्याकाळीं सर्व देवांनीं इंद्रास महाभिषेक करून आपला राजा केला. पुढें हा [काळ] दैत्यांच्या वंशावळीचे कारकीर्दीस समाप्त झाला. व त्या काळीं एकच वर्ण होता. आणि ध्यान धर्म होता. अशा गोष्टी वेदांतही सांपडतात. यांचा अर्थ इतकाच दिसतो कीं आरंभीं जातिविभाग नवता. कर्मकांडाचा विचार झाला नवता. आर्यलोक अपसांत लढाया करीत होते. वेद एकच होता. शाखासूत्रभेद उत्पन्न झाला नवता. व हिमालयावर कैलास इत्यादिक स्थानीं आर्यलोकांची वस्ती होती. या काळाचे नांव कृतायुग.

पुढें वर्णभेद उत्पन्न झाला. परंतु क्षत्रियांचा व ब्राम्हणांचा द्वेष पडून पुन्हा परशुरामाचे कारकीर्दीस लढाया झाल्या. व त्यांत क्षत्री मारले गेले. कर्मकांडाचा विस्तार झाला. शाखासूत्रभेद झाला. वेदाचे विभाग होऊन ब्राम्हणांचे वेगळाले थवे झाले. मागील ध्यानधारणा जाऊन यज्ञप्रकरण ब्राम्हणांनीं वाढविलें. म्हणून

कृते तु ध्यायते विष्णुर्द्वापारे यजतो मखैः

असें भागवतांत वर्णनही आहे. या युगांत आर्यलोक हिंदुस्थानांत गंगातिरीं होते. भगिरथराजानें गंगानदीचा शोध करून तीस आपलें नांव दिलें. तसेंच या लोकांस सगर फार दूर म्हणजे हिमालयांत राहाणारे लोकांस चारी बाजूंनीं समुद्र लांब तेव्हां सागरासारखे पराक्रमी झाले. त्यांणीं सागरापर्यंत गमन केलें; आणि समुद्रास आपलें नांव दिलें; म्हणून तो सागर. याप्रमाणें पुण्यभूमी किंवा ब्रम्हवर्त येथें वसाहत झाली. सूर्यवंशाचे राजांनीं राज्य केलें, त्या सूर्यराजाचे नांवाचे साम्यतेमुळें प्रत्यक्ष सूर्याचाच वंश, असें कवींनीं लाघव केलें. व भगिरथानेंच गंगा आणिली असें ठरविलें. व पुढील भोळे लोकांनीं तें खरें मानलें परंतु भगिरथाचे मागें पावसाचें पाणी कोणत्या ओघानें जात असेल, याचा विचार लोक करीत नाहींत. बरें नदी नव्हती असें म्हणावें तर

वर्षाऋतूचा अभाव मानला पाहिजे. आणि असें असेल तर भगिरथ कसा वांचेल असे प्रश्न उत्पन्न होतात. त्यांचें समाधान होणार नाहीं. असो. लोक विचारशील होतील तेव्हां या शंकेचें समाधान सहज होईल. व मग यमुनानदी यमाची बहीण, व तापीनदी सूर्याची कन्या आणि सूर्य विश्वकर्म्याचा जावाई, या गोष्टी बरोबर आहेत, असें म्हणणार नाहींत. पूर्वी अमेरिकेंत अडाणी लोक होते व घोड्यावर बसलेले स्वार त्यांचे दृष्टीस पडले तेव्हां चार पायांचा व दोन तोंडांचा जीव उडत उडत जातो हा कोण, असें ते आपापसांत विचारूं लागले. तात्पर्य, माणूस घोड्यावर बसलेलें आहे याचा बोध त्यांस नव्हता. तसेंच हिंदु लोकांस कितीएक साधारण गोष्टींचा अद्याप बोध नाहीं. सूर्य रथांत फिरतो का? असें म्हटलें तर ते होय म्हणतात व चंद्र हरणावर बसला, असें कवींनीं सांगितलेलें खरें म्हणतात. असे दाखले पुष्कळ आहेत. असो. या युगांत बृहस्पती, शुक्र वगैरे पंडित होते, व पुढें कवींनीं त्यांची योजना आकाशांतील ताऱ्यांवर केली. परंतु त्या उभयतांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याजमुळें ते मनुष्य होते हें स्पष्ट आहे. बृहस्पती-स्मृती, उशना-स्मृती या जर त्यांणीं लिहिल्या तर ते आकाशांतील नक्षत्रें नसतील. तेव्हां त्या नक्षत्रांस त्यांचें नांव आहे, त्यांच्या गती त्यांणीं ठरविल्या असतील. सबब त्यांस, यांचीं नांवें दिलीं असतील. मागील युगांत ते एक दैत्याकडे व एक देवाकडे असे असतील. लेखन, वाचन, व्याकरण यांचे पाठीमागील तो काळ होय. याजमुळें त्या वेळच्या दंतकथा मात्र राहिल्या आहेत. दुसरा इतिहास नाहीं. म्हणून त्या दंतकथेचा सयुक्तिक इतिहासाच्या नजरेनें अर्थ केला पाहिजे.

तिसरें द्वापारयुग म्हणजे या युगांत आर्यलोकांमध्यें मूर्तीपूजा झाली. मागील विधी फिरले. ज्ञान [ध्यान?] धारणा व यज्ञ दोन्ही गेले, आणि अवतार व मूर्ती यांचे भजनास आरंभ झाला. या काळाचे नांव द्वापारयुग.

चौथें कलियुग म्हणजे आर्य व शूद्र, या युगांत मिसळले. यास्तव कलीस शूद्राचें रूप दिलें आहे. म्हणजे पूर्वीचे वसलेले लोक जे शूद्र अतिशूद्र इत्यादिक यांस चौथा वर्ण ठरवून आर्यलोक व हे लोक एक झाले. शूद्रांमध्यें जीं दैवतें होतीं तीं आर्यांनीं घेतलीं व त्यांचे उध्धारास्तव कांहीं ग्रंथ लिहिले, त्यांत कांहीं अधिकार व कर्में शुद्रांस दिलीं व शूद्रकमलाकरादिक ग्रंथ झाले. आतां हीं चारी युगें फार लांब काळाचीं नसतील हें स्पष्टच आहे. कारण वशिष्ठऋषी त्रेतायुगीं होता, त्याचा पणतू व्यास द्वापारांत अखेरपर्यंत होता, तेव्हां याजवरून व राजांचे वंश लिहिले आहेत. त्यांजवरून लक्षावधी वर्षांची गणती होत नाहीं. परंतु इतकें खरें कीं, बहुत वर्षांची ही गोष्ट आहे व यज्ञधर्माच्या तिरस्कारापासून बौध्धमत निघालें. तेव्हांपासून हा अहिंसाधर्म चालू झाला. सांप्रतचा हिंदु धर्म म्हणजे केवळ वैदिकही नव्हे, केवळ बौध्धधर्मही नव्हे. परंतु अनेक युगांपासून त्याच्या सुधारणा व त्यांत नवींनवीं मतें शिरलीं त्या सर्वांचा संग्रहस्वरूप धर्म आहे. म्हणजे त्यांत कांहीं वैदीक मार्ग आहे, कांहीं बौध्धधर्म आहे, कांहीं उपासना, कांहीं

कर्मकांड, कांहीं शूद्र दैवतांची मिसळ, कांहीं पीर, ताबूत त्यांतच, असें हें अठरा धान्याचें कोडबोळें झालें आहे. यांत प्राचीन सांप्रदायांतील अग्नि, शैव इत्यादिक पंचमहातत्त्वाचें भजन आहे. विरोबा वगैरे जैनधर्मांतीलही आहेत. अवतारांचें भजन, तुकाराम, ज्ञानेश्वर साधू यांचें भजन, शूद्राकडील भवानी, खंडोबा, तंत्रांतील गोंधळ व मुसलमानांतील हसन, हुसेन, वल्ली, पीर या सर्वांचें मिश्रित फळ तो हल्लींचा हिंदुधर्म आहे असें दिसतें. प्राचीन शूद्रांमध्यें म्हणजे लिंगपूजन हा बीभत्स व तंत्रोक्त मार्ग होता. तोही त्यांत आहे. सारांश इतका दिसतो कीं, आर्य लोकांमध्यें चार युगांची दंतकथा चालत आहे, ती त्यांची स्थितिदर्शक आहे. म्हणजे या लोकांस चार प्रकारच्या स्थिती प्राप्त झाल्या. तीच त्यांचीं युगें असा अर्थ दिसतो.



ता. ११ डिसेंबर सन १८६४

[नंबर १४६]

लग्नाची पूर्वपीठिका

हिंदु लोकांमध्यें दंतकथा व प्राचीन भारुडाचे ग्रंथ म्हणजे पुराणें पुष्कळ आहेत. त्यांचा विचार केला असतां कांहीं थोडा इतिहास समजतो. परंतु त्यांत सत्य मिथ्या गोष्टींची मिसळ फार; याजमुळें खरें काय व खोटें काय याची निवड करण्यास पराकष्ठेचे श्रम पडतात. अडचणी फार येतात, व त्रास येतो. तरी हें खरें आहे कीं, त्रास आला तरी त्यांचा विचारपूर्वक शोध केला पाहिजे. असो. आज आपण पुरातनपासून चालत आलेल्या लग्नविधीचा विचार करूं.

प्राचीन ग्रंथांचे आधारानें असें दिसतें कीं, स्त्रीपुरुषांच्या संबंधाच्या आजपर्यंत सात स्थिती झाल्या आहेत त्या अशा–

१ स्वैरस्थिती.	२ कुलयोजना.	३ बंधुयोजना.
४ नियोग.	५ पातिव्रत्य.	६ वैधव्य.
	७ सती जाणें.	

१ प्रथमता आर्यलोकांत लग्नविधी नवता व स्त्रिया पुरुषांसारख्या आपले मुकत्यारीनें वागत होत्या. म्हणजे त्या पुरुषांच्या ताब्यांत व लग्नाच्या प्रतिबंधांत नवत्या. व त्यांची मुंज होत होती. व यज्ञोपवीत धारण वगैरे स्वतंत्रपणानें त्यांस होतें. (निर्णयसिंधूंत स्त्रियांची मुंज कलिवर्ज्यप्रकरणीं लिहिली आहे), भागवतांतील उद्दालक ऋषीची गोष्ट लिहिली आहे कीं, त्याची स्त्री कितीएक दिवस त्याजवळ होती व पुढें ती दुसऱ्या पुरुषाबरोबर गेली. हें तिचे मुलानें पाहिलें, तेव्हां तें त्यास आवडलें

नाहीं. व मग त्यानें लग्न करावें, अशी रिती घातली. याजवरून स्त्रीपुरुषांमध्यें करार करण्याची पध्धत कितीएक काळ गेल्यावर पडली, असें सिद्ध होतें. ही पहिली स्थिती झाली.

२ दुसरी रीति अशी होती कीं, एका घरांत एक स्त्री असली म्हणजे ती सर्वांशीं बायकोच समजावी. व तिला चुलत्यापासून पुत्र झाले तर चुलत्याचे, व पुतण्यापासून झाले तर पुतण्याचे, याप्रमाणें रीत पडली. याचीं उदाहरणें ब्रम्हवंश, मनुवंश यांमध्यें सांपडतात. भाऊबहिणी व बापलेकी यांपासूनदेखील आपत्यें उत्पन्न झालीं आहेत.

३ सदरहु गोष्टीचा पुढें आणखी संक्षेप झाला. व असें ठरविलें कीं, जी बायको कुळांत आली त्या बायकोस एका पुरुषानें व त्यास जितके बंधू असतील त्यांणीं आपली असें म्हणावें. इतरांनीं म्हणूं नये. म्हणजे सुनेचें नातें उत्पन्न झालें. यास उदाहरणें पांडव, द्रौपदी, दाक्षी[?] इत्यादि.

४ सदरहुचा आणखी पुढें संक्षेप झाला कीं, एके भावानें स्त्री वश केली तर ती त्याची मात्र बायको; परंतु तिला त्यापासून पुत्र वगैरे वंशवृध्यर्थ कांहीं आपत्य न झालें तर मात्र तिणें दीर नवरा करावा. यासंबंधाचें नांव धर्मशास्त्रांत नियोग असें आहे. व दत्तक घेतांना हें नातें अद्याप पाहातात. धृतराष्ट्राची, पंडूराजाची उत्पत्ती याचप्रमाणें आहे.

५ सदरहुचा संक्षेप पुढें असा झाला कीं, स्त्रीनें ज्यास वरलें, त्यापासून वंश न झाला तरी दुसरा नवरा तो जिवंत आहे तोंपर्यंत तिणें करूं नये; मेल्यावर मात्र करावा. धर्मशास्त्रांत द्वादशपुत्र व त्रयोदशराव(?) द्वामुष्यायण लिहिले आहेत, त्यांचेवरून पाहातां असें दिसतें कीं, लग्नविधी ठरला तरी प्राचीन चाली चालू होत्या. व सांप्रत महार, मांग, भिल्ल वगैरे लोकांमध्यें ही अशी चाल आहे कीं, बायको पहिला नवरा टाकून दुसऱ्याचे घरीं गेली आणि तेथें तिला मूलबाळ झालें असलें तर तें तेथें ठेऊन तिनें आपले पहिले नवऱ्याजवळ पुन्हा येण्यास चिंता नाहीं. त्याचप्रमाणें आर्य लोकांमध्यें चाल होती. ब्रहस्पतीची स्त्री तारा ही चंद्राजवळ गेली आणि तिला बुध मुलगा झाला. त्याची पुढें पंचाईत पडली. तेव्हां सर्व देवांनीं म्हणजे त्या वेळच्या माणसांनीं तिला नवऱ्याचे घरीं घातलें. आणि बुधास चंद्राचे पदरीं बांधिलें. पुढें लग्नविधी चालू झाल्यावर असें ठरलें कीं, स्त्रीनें नवऱ्याचे घरीं राहावें. तरी तिला क्षेत्रज पुत्र, ओढज पुत्र वगैरे झाले तरी चिंता नव्हती. असें कितीएक कालपर्यंत चालत होतें. गोळकाच्या जाती वगैरे त्या वेळेस झाल्या व कितीएक गांवीं गोळक जोशी, धर्माधिकारी आहेत, यावरून त्यांस कांहीं बट्टा नवता, असें दिसतें.

६ सदरहुचा आणखी पुढें असा संक्षेप झाला कीं, स्त्रीनें नवरा मेला तरी नवऱ्याचे नांवावर बसून राहावें. दुसरा नवरा करूं नये. त्याजवर मग आणखी

तिखट मीठ असें लागलें कीं, तिणें सौभाग्य टाकावें; वपन करावें; वंश नसला तरी एकदा जेऊन ब्रम्हचर्यविधीनें तिनें कालक्षेप करावा.

७ सदरहुचा आणखी शेवटला संक्षेप असा झाला कीं, जिचा नवरा मरेल तिणें सती जावें. हा सर्वांचा कळस. यापुढें कांहींच राहिलें नाहीं.

याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या संबंधाच्या सात स्थितींनीं जास्तीजास्ती प्रतिबंध होत गेला, असें दिसतें. दर प्रतिबंधाचें धोरण इतकेंच दिसतें कीं, स्त्रियांनीं पुरुषांच्या अधिकाधिक स्वाधीन व्हावें. पुरुषांनीं अभिमानानें व स्वच्छंदानें वागावें. शेवटीं येथपर्यंत मजल आली कीं, माझी स्त्री मी मेल्यावर तरी दुसऱ्याकडे पाहील, तर त्यापेक्षां माझेबरोबर जळून जाईल तें बरें. यांतच नांवलौकीक आहे, असें त्यांचे मनांत येऊं लागलें, व त्या अभिमानावर प्रेत आणि सजीव या दोघांस जाळण्याची लज्जा एकीकडे राहिली. व चांगले सुंदर केशांचें बळेंच वपन करवून आठवे वर्षांपासून मुलींच्या गळ्यांत ब्रम्हचर्य बांधण्यास त्यांस कांहीं संकोच वाटला नाहीं. अशीं दुष्ट अभिमानाचीं फळें आहेत. कोणी कलिवर्जाचे आड झाले. कोणी पातिव्रत्यधर्माचे आड झाले. व कोणी पैसा मिळतो या नांवावर आर्जवास लागून लोकांस आवडेल तसें शास्त्र लिहित गेले. लग्नाच्या सात स्थिती झाल्या त्या केवळ शास्त्राचे हुकमानें झाल्या असें नाहीं. लोकांचे मनाचे स्थितीवरून झाल्या व लोकांच्या आवडीप्रमाणें वचनें झालीं. यास प्रमाण—

मनुस्मृती, अध्याय ९ [श्लोक ६४-६६]

नान्यस्मिन् विधवा नारी ॥ नियोक्तव्या द्विजातिभिः ॥
अन्यस्मिन्हि नियुंजाना ॥ धर्मं हन्युः सनातनम् ॥ ६४ ॥
नोद्वाहिकेषु मंत्रेषु नियोगः कीर्त्यते क्वचित् ॥
न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः ॥ ६५ ॥
अयं द्विजैर्हि विद्वद्भिः पशुधर्मो विगर्हितः ॥
मनुष्याणामपि प्रोक्तो वेने राज्यं प्रशासति ॥ ६६ ॥

म्हणजे यांत मनु असें लिहितों कीं, वेणराजानें नियोग करण्याची चाल घातली. परंतु ही जनावराप्रमाणें चाल आहे. ब्राम्हणांनीं तसें करूं नये. म्हणजे विधवेस दुसरा पती असूं नये. व पुढें तोच असें लिहितो कीं, वंश नसेल तर मात्र नियोग करावा. याजवरून ही चरफड कशाकरितां केली असावी बरें? त्याकाळीं नियोग बंद होत आला असेल व लोकांस तो पाहिजे असेल. या धोरणावरून हें वचन लिहिलें असावें. जसें ब्राम्हण लोक हल्लीं शूद्राचे पाटाचे चालीस हसतात आणि कोणी मूर्ख शूद्र आहेत, ते आपण उंच होऊं म्हणून आपल्या कन्या विधवा करितात. असेंच दर दर काळीं होत आलें असावें. धर्मशास्त्र राजाचे मार्फत कधीं झालें नाहीं. हल्लीं कायदे होतात आणि राजे आमलांत आणितात. तसें धर्मशास्त्र मुळींच झालेलें नाहीं. जों जों

लोकांचा परिचार पडला तों तों धर्मशास्त्रांनीं लिहिला गेला. कारण त्यांचे लिहिणारे भिक्षुक भट होते. ते लोकांच्या स्वाधीन, याजमुळें लोकांमध्यें अभिमान जसाजसा वाढत गेला तसातसा शास्त्रार्थ उत्पन्न झाला. आणि या सात स्थिती विचारानें पाहिल्या तर योग्य दिसतात. व या ७ स्थितींत राहाणारे लोक हिंदुस्थानांत आहेत. मनुष्यें उत्पन्न झालीं त्याबरोबर सर्व धर्म येतात असें नाहीं. जों जों लोक जुने होतात, तों तों त्यांची कल्पना वाढते. कोलांट्याच्या स्त्रिया पहिल्या स्थितींत असतात. कुळंब्यांतील पाट त्याचे जवळजवळ आहे. निळगिरीकडील दुसरे स्थितींत आहेत. अस्तु, याप्रमाणें ७ वे स्थितीवर हा स्त्रियांवरचा जुलूम गेला, तेव्हां ईश्वरी प्रेरणेनें युरोपियन लोकांचें राज्य होऊन त्या जुलमाचा ओघ त्यांच्या सत्तेनें फिरला. आतां स्त्रियांचे अधिकार पुरुषांबरोबर होतील व स्त्रीपुरुषांचा संबंध अधिक चांगल्या रितीनें स्थापन होईल असी आशा आहे.

आतां अधिक चांगले रितीचा संबंध कोणता याविषयीं विचार केला तर, आम्हांस असें वाटतें कीं, पांचवे स्थितीप्रमाणें स्त्रीनें पती जिवंत आहे तोंपर्यंत पातिव्रत्य रक्षावें व पती मेल्यावर तिला पुनरपि पती करण्याची आज्ञा असावी. कुळंब्यांमध्यें जिवंतपणीं पाट होतात. तसे होऊं नयेत. पुरुषांनीं दोन बायका कधींच करूं नयेत व स्त्रीधन देण्याची चाल चालू व्हावी. उभयतांचे संमतानें मात्र परस्परांचा त्याग व्हावा. सामान्य कारणावरून होऊं नये. व दुष्टपणानें कोणी त्याग करील तर त्याजवर उपजीविका देण्याची जबाबदारी असावी. सांप्रतकाळीं ब्राम्हणांमध्यें जो संबंध चालतो, ती देखील बहुत अशुध्ध आहे व त्याची बहुत सुधारणा झाली पाहिजे. लहान मुलींचीं लग्नें करण्याची चाल मोडली पाहिजे. जन्मपर्यंत वैधव्याची चाल मोडली पाहिजे. तसेंच उभयतांचे मोठेपणीं खुशीनें लग्नें व्हावींत, अशी रीति पडली पाहिजे. याप्रमाणें आजपर्यंत होत आलें तें व पुढें व्हावें तें, हीं दोन वाचकांपुढें ठेविलीं आहेत. त्यांचा विचार करून सुयुक्त असेल तें पुढें चालविणें हें त्यांचें काम आहे.

ता. २५ डिसेंबर १८६४

[नंबर १४७]

धर्माचे निमित्तानें फायदा करून घेणें

या सृष्टीमध्यें मनुष्य निर्माण झाल्यावर बहुत धर्म उत्पन्न झाले व कितीएक नाहींसे झाले, व कितीएक आहेत. व कितीएकांचें स्वरूप बदलून ते सुधारले आहेत. मनुष्यें धर्मावर निष्ठा ठेवितात याचें कारण असें कीं, आपल्यास इहलोकीं व परलोकीं

कांहीं सुख व्हावें. परंतु लोकांची निष्ठा दृढ झाली हें पाहून, कपटी लोकांनीं आत्म-हितार्थ त्या निष्ठेचा उपयोग फार केला. व भोळे लोकांस एकमेकांचा नाश करण्याकडे व राज्यकारण करण्याकडे प्रवृत्त केलें. राज्यकारणी लोक धर्माची मदत नेहेमी घेतात. म्हणजे तेणेंकरून बहूत लोक त्यांस मिळतात. जगाचा इतिहास जर पाहिला तर सालोसाल या गोष्टीचीं उदाहरणें दिसतात. कोणत्याही धर्मांत पाहिलें तर हाच प्रकार दिसतो. सर्व लोक सारखे ज्ञानी व समजदार नसतात. याजमुळें मुख्यत्वेंकरून हें घडतें. ख्रिस्तियन धर्म बहुत ज्ञानी लोकांनीं सुधारला आहे. तत्रापि मुसा पैगंबर जो बत्तिसशें वर्षांपूर्वी झाला, त्याचीं कृत्यें पाहिलीं तर त्याणें लोकांस देवाचें नांव सांगून व देवाचे कौल देऊन लोकांकडून लढाया करविल्या. पोरेंबाळें व स्त्रियांसहित गांवचे गांव मारविले. असें करून राज्य स्थापन केलें. त्यापुढें ख्रिस्तियन धर्माचाही उपयोग युरोपखंडांत राज्यकारणास्तव पुष्कळ झाला. महंमदानें आरब लोकांकडून लढाया करवून काफर लोकांस मारविलें. ही गर्दी कितीएक दिवस धर्माचे नांवानेंच झाली. व लोकांनीं आपल्यासारखीं जीं माणसें त्यांजवर दया करावयाची ती सोडून सत्धर्मानें चालत नाहींत, म्हणून तीं मारलीं. व त्यांत पुण्य आहे, अशी समजूत घेतली आणि त्यांचीं बायकामुलें धरून आणून लिलाव करून विकलीं. मुसलमान जेव्हां हिंदु-स्थानांत आले, तेव्हां मथुरा, कनोज, मुलतान, दिल्ली, सोमनाथ या हजारों वर्षांच्या नगऱ्यांची त्यांनीं फार दुर्दशा केली. हजारो वर्षांचे ग्रंथ जाळून टाकिले. देउळें पाया-पर्यंत खणिलीं आणि हेंच श्रेयस्कर असें मानिलें. सन १८५७ सालीं बंड झालें. तें पण धर्माच्याच संबंधानें झालें. लबाड लोकांनीं आपला धर्म बुडतो, असें पलटणींतील शिपायांच्या मनांत भरवून इमानी पलटणें फितुरास प्रवृत्त केलीं. आतां हिंदू धर्माकडे पाहिलें तर, स्मार्त व वैष्णव यांचीं युध्धें बहुत झालीं. व जैन आणि ब्राम्हण यांचीं बहुत झालीं. व एकमेकांस त्यांनीं मारून टाकिलें. किरकोळ कामांतही ब्राम्हणांनीं आपलें महत्त्व वाढवून देवाचें मुख आम्ही असें ठरविलें. व त्यामुळें ब्राम्हणांचे मुखांत जें पडलें तें देवास पोचलेलें, अशा समजुतीनें बहुत लोक ब्राम्हणांस दानें देतात. आणि पुण्याचे जमाखर्चाचे वहीस तीं जमा झालीं, असें समजतात. देव जो आहे तो, 'ब्रह्मज्ञो ब्राह्मणप्रियः'–भारत, ब्राम्हणावर फार आवड करितो. आणि जसे व्यंकोबाची कानगी जमा करण्यास दासरी येतात, तसेच हे देवाचे नांवचा पैसा घेऊन पावती देण्यास पृथ्वीवर पाठविले आहेत, अशी ब्राम्हणांनीं लोकांची समजूत करून दिली आहे. हा स्वहितार्थ धर्माचा प्रयोग नव्हे काय? याखेरीज धर्माबद्दल आपले अंगावर भांडण घेऊन भांडावें, हा एक स्वभाव तरी या स्वार्थी लोकांनींच उत्पन्न केला आहे. कोणी ब्राम्हणानें स्नान न केलें, तर दुसरे ब्राम्हणांस त्याचा राग येऊन ते निंदेश प्रवृत्त होतात व असें समजतात कीं, आपल्यास कैलासाहून याचें चौकशीची सनद मिळाली आहे. तेव्हां हा दुरभिमान तरी स्वार्थाकरितांच आहे. वास्तवीक

म्हटलें तर जो मनुष्य नीतीन्याय सोडून वागत असेल, किंवा ज्याची वर्तणूक लोकांस उपद्रवकारक असेल, तो मात्र लोकांनीं निंदण्यास योग्य होय. लोकांचें नुकसान ज्या गोष्टीवरून होतें, तितक्याबद्दल त्यांस विचार करण्यास अधिकार असावा. बाकी ईश्वरसंबंधीं पाहिजे त्या मार्गानें कोणी वागला तर त्याची दरकार नसावी, असें न्यायानें दिसतें. सारांश लोकांनीं अभिमान टाकिला पाहिजे. सांप्रतकाळीं ही गोष्ट बहुतांस कळूं लागली आहे. व सन १८५० सालीं २१ वा आक्ट झाला, त्याजवरून ही गोष्ट या देशांत स्थापिली गेली, व पिनल कोडचें कलम २१५ यावरून सर्वांचे धर्म कायम झाले. परंतु जुन्या समजुतीचे लोक आहेत त्यांस हें अद्याप पुरतें समजलें नाहीं. या जगावर हिंदु किती आहेत, मुसलमान किती आहेत, यहुदी किती आहेत, खिस्तियन किती आहेत व बौध्ध मताचे किती लोक आहेत, हें पाहिलें तर दरएक पंथाचे कोट्यवधी लोक आहेत. व जगावर फिरण्यास पहिल्या अडचणी होत्या, त्या मोडल्यामुळें हीं हजारों वर्षें जीं राष्ट्रें कोणास माहीत नवतीं, त्या राष्ट्रांचे लोक एकमेकांचे देशांत येऊन अलीकडे राहूं लागले आहेत. इराणचे पारशी, अर्बस्थानचे यहुदी व विलायतचे इंग्रज इकडे येतात. तसेंच आम्हींही तिकडे जातों. अशी सुधारणा होऊन एकमेकांच्या भेटी हल्लीं होत चालल्या आहेत. व रेलवे पुष्कळ झाल्यानें आणखी भेटी होऊन भाऊबिजेपर्यंत मित्रत्व पडेल, अशी संधी दिसते. तेव्हां आतां धर्मसंबंधीं दुरभिमान बाळगणें हें केवळ अज्ञानाचें काम आहे. पराभव पावलेलें कुत्रें जसें आपल्याशीं ओरडत बसतें, आणि आपल्या जिवाशीं कौतुक करतें, तशीं कुरकुर करणारीं मनुष्यें कपाळीं आठ्या घालून आपलें सर्व बुडालें असें समजून पाहिजे तर सांदीस सोवळ्यांत बसोत, परंतु ही गोष्ट व्यर्थ आहे यांत शंका नाहीं, असें आम्हीं म्हणतों. सर्व लोकांनीं मित्रत्वानें नांदावें, यांतच सौख्य आहे. कोणाचें मत कसें आहे व कोणाचा ईश्वराबर कसा भाव आहे, हें मनुष्यानें पाहण्याचें मुळींच कारण नाहीं हें बीज मनुष्यांचे मनांत जेव्हां स्थापन होईल, तेव्हांच दया व शांती यांची वृध्धी होईल. सुधारलेले देशांत मुख्य कायद्याचें धोरण हेंच ठरविलें आहे कीं, धर्मावरून कोणी कोणाची अदावत करूं नये. व हिंदुलोकांचें मोठें भाग्य हें आहे कीं, असे मर्म समजणारे इंग्रज यांचें राज्य येथें हल्लीं वर्तत आहे; म्हणून आपणांस धर्मसंबंधीं बहुत मोकळिका आहेत. नाहीं तर आमचाच धर्म खरा, असें म्हणणारे आग्रही हे इंग्रज असते तर लोकांस मोठी पीडा झाली असती. परंतु याकाळीं ही प्राचीन दुष्टपणाचीं मतें विद्वान सोडीत चालले आहेत. जेव्हां लोक कोंडून आपलाले देशांत आपले ठाईं नानाप्रकारचे तर्क करून आपले महत्त्वासारखें महत्त्व पृथ्वीवर नाहीं व बाकी सर्व नीच आहेत, असें समजून होते तेव्हां तें अज्ञान ठीकच होतें. परंतु हें अज्ञान जाण्यास आतां बहुत द्वारांनीं उजेड आला आहे. तेव्हां अद्यापि जर लोक अज्ञानांत राहतील तर त्यांचें प्रारब्ध, असें म्हणावें. लहानसाहान आचारसंबंधीं नेम सुटले म्हणजे पातक होतें. आणि एकाद्या

ब्राम्हणास शिधा दिला म्हणजे तें जातें. तर आतां असें समजलें पाहिजे कीं, नीती व न्याय यांविरुध्ध ज्या गोष्टी आहेत, त्या मात्र पातकाच्या; बाकी आचार जसा ज्यांस आवडेल तसा तो करील. लोकांशीं व्यवहार होण्यास आचाराची गरज नाहीं. नीतीची गरज आहे ज्याची नीती कायम आहे, त्यास व्यवहारार्थ समजण्यास हरकत नाहीं. परंतु असें असतें तर महिपतराम रूपराम विलायतेस जाऊन आले त्यांस लोक जातीबाहेर टाकते काय ? व करसनदास मुळजी विलायतेहून आले, त्यांसही टाकते काय ? वास्तविक पाहिलें तर त्या दोघांनीं लोकांचें काय केलें, विलायतेस गेले याबद्दल तर त्यांचें लोकांनीं उपकार मानावे. तें एकीकडे ठेऊन त्यांशीं लोक वाद घालतात. तेव्हां मानावें काय ? व न मानावें काय ? याचा विवेक ज्या लोकांमध्यें नसतो, ते योग्यास अयोग्य ठरवितात, व अयोग्यास योग्य ठरवितात, व ही त्यांची बुध्धी पालटेपर्यंत देशाची चांगली स्थिति होणार नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे.

ता. १३ मार्च सन १८६४

[नंबर १४८]

राजकीय विचार

युरोप आणि एशिया

सांप्रतकाळीं युरोपखंडामध्यें ज्या गडबडी चालल्या आहेत, त्यांजवरून असें दिसतें कीं, तेथील लोक विद्यावृध्धीनें निपुण झाले आहेत व राज्यें कशीं असावीं, लोकांस अधिकार कसे असावे, एक राष्ट्रास दुसरे राष्ट्रानें उगीच अधिकारहीन कां करावें, या गोष्टींचा विचार मनांत येऊन, त्यांस समजूं लागलें आहे कीं, लोकांची सत्ता कायम राहावी व राजांनीं विनाकारण लोकांवर जुल्म करूं नये. व या मताचे कितीएक पुढारी लोक तर आपला जीव गेला तरी चिंता नाहीं; पण लोकांची सत्ता स्थापन करूं असें ते मोठे हर्षानें म्हणतात. व याच कारणावरून तिकडे सर्व राज्यकारणें उत्पन्न झालीं आहेत. हंगेरी प्रांतांत लोकांस उत्तेजन देणारा जो कोसम्थ म्हणून सरदार आहे, तो लोकांस असें सांगतो कीं, आपले अधिकार व सत्ता जाऊं देऊं नका. राजे लोक आपले स्थितीस विसरून लोकांवर अनेक तऱ्हेचे जुल्म करूं इच्छितात, हें अयोग्य आहे. वास्तविक म्हटलें तर राजे लोकाधीन होत. ते लोकांस सुख देतील व त्यांचे अधिकार राखतील तरच ते त्यांचे राजे. आणि जे राजे लोकांस निरर्थक दुःख देतील, ते कांहीं कामाचे नाहींत व त्यांचें पारिपत्य करण्यास लोकच अधिकारी आहेत. असा या सरदारानें लोकांस बोध केला आहे व हा हंगेरीचा तंटा चालविला आहे. पोलंडचे लोकांचा

तंटाही याच कारणानें आहे. ते म्हणतात कीं, आम्ही स्वतंत्र राज्य करूं. आमचे अधिकार रशियाचा राजा ठेवित नाहीं, तर त्याचे सत्तेंत आम्हीही राहात नाहीं. व संतोषानें तो आमचा देश न सोडील तर आम्हीं त्यास जबरदस्तीनें ह[ा]कून देऊं व याचसाठीं पोलंडचे लोक अनेक दुःखें सोसून रूसचे बादशाहाशीं लढत आहेत. याजवरून युरोपाची स्थिती अशी दिसते कीं, शिथील लोक आपले अधिकाराविषयीं जागृत झाले आहेत. आतां ही स्थिती एशियाखंडाशीं लाऊन पाहिली तर असें दिसतें कीं, आमचे एशियाखंडांतील लोक अगदीं अज्ञान व सुस्त आहेत. यांचा पुनर्जन्म झाला पाहिजे. यांस वृध्धदशा आली आहे; तुर्कस्थान, इराण व चीन इत्यादि इकडील राज्यें फार अशक्त आहेत. यांस कसलें सामर्थ्य नाहीं, व या राज्यांखालीं नांदणारे लोकही जुलूम सोसणारे आहेत. यावरून असें वाटतें कीं, बहुतकरून हें सर्व एशियाखंड युरोपियन लोक जिंकितील आणि मग त्यांजपासून या खंडांतील लोकांस ज्ञान प्राप्त होईल. व युरोपांतील लोकांसारखी स्थिती येईल. आतां आपलें हिंदुस्थान हें या सर्व एशियाखंडामध्यें भाग्यवान आहे, असें समजलें पाहिजे. कारण येथें लोकांमध्यें अज्ञान व मूर्खपणा जो वाढला होता, त्याचा शेवट या देशांत युरोपांतील ज्ञान आल्याखेरीज कधींच झाला नसता. करट फार सुजलें तर फुटल्यावांचून व कापल्यावांचून त्यास गती नसते. तसें या देशांत जे अज्ञानाचे डोंगर झाले त्याजमुळें लोकांची स्वस्थता मोडली व आपसांत लूट, मारामारी होऊं लागली; अधिकारी बहुतकरून चोरांची वागणूक करूं लागले; पेंढारी, भील, रामोसी, गिरासी यांचीं बंडें होऊं लागलीं. गांव तर काय, पण प्रांताचे प्रांत ओसाड पडूं लागले. घरें किल्ल्यासारखीं केलीं तरी जिवाचें संरक्षण होईनासें झालें; कुळंवी, माळी यांचा माल फुकट लुटीवारी जाऊं लागला. वाटोवाट दरवडे पडूं लागले; चोरांच्या झुंडी मोठमोठाल्या फिरूं लागल्या. व देश दरिद्री होऊन लोक एकमेकांस उपद्रव करूं लागले. अशी या देशाची स्थिती होती हें प्रसिध्ध आहे. काळ व बंडें जिकडेतिकडे माजलीं होतीं. त्यामुळें बहुत लोक जे गांव सोडून गेले ते अद्याप परत आलेच नाहींत. तसेंच जे गांव जाळिले ते अद्याप ओसाडच आहेत; जीं कुटुंबें नागवलीं तीं अद्याप भिकारीच आहेत. याचें कारण त्याकाळचे राजे होते ते दुर्बळ, त्यांपासून प्रजेचें रक्षण होईना, व प्रजाही अशी लोचट झाली कीं, ती आपला अधिकार काय? चांगला राजा कोण? वाईट कोण? आपण आपसांत एकमेकांचा नाश करतों हें काय? याचा विचार सुटला; तेव्हां अशा प्रसंगीं परमेश्वरानें दया करून इंग्लिश सरकारचा अंमल या देशांत आणिला हें फार चांगलें झालें. याजमुळें लोकांस आतां सर्व गोष्टी समजूं लागल्या. ज्ञान व विद्या वाढली, स्वस्थता झाली, व्यापार वाढला, निर्दयपणाच्या व अनर्थकारक अशा ज्या सती जाणें, कन्याहत्या इत्यादि चाली यांचा बंदोबस्त झाला. इंग्लिश राजावांचून या सुधारणा करण्यास या भरतखंडांत कोणी समर्थ नवते. मागें जे राजे झाले ते पशूसारखे रयतेचें हरण करणारे व गरिबांस पिडा करणारे होते. व ते स्वच्छंदांत निमग्न

असत. याजमुळें त्यांची शक्ती जाऊन त्यांस अगदीं नालायकी झाली. व इंग्रज सरकारानें बहुत श्रम करून या देशाची सुधारणा केली. इकडील जमिनीस एक धारा व पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत त्याची माहिती यांणीं करून दिली. याजमुळें लोक सुखी होऊन ज्ञान, कला, कौशल्य व व्यापारधंदा वाढऊं लागले. व यावरून असें दिसतें कीं, एशियाखंड सुधारण्यास बहुतकाळ लागेल. तरी सुधारणेच्या कामीं या खंडांत या देशाचा पहिला नंबर होईल, यांत संशय नाहीं. एशिया खंडांतील लोक पूर्वी फार प्रसिध्ध होते. व जगांत थोरपणास पाहिल्यानें हेंच खंड पावलें. परंतु ईश्वरी इच्छेनें तारुण्य व वृध्धापकाळ सर्व देशांस आहेच, याजमुळें या खंडांतील देश आतां अगदीं खराब स्थितींत ईश्वरानें घातले आहेत. आणि युरोपच्या लोकांस अधिक पराक्रमी, अधिक शाहाणे व अधिक नीतिमान असे करून त्यांच्या हातून आतां एशिया खंडाची पुन्हा सुधारणा करण्याची ईश्वरी योजना आहे, असें दिसतें. आतां या खंडांतील जर्जर झालेले देश लौकरच युरोपाच्या स्वाधीन होतील. अस्तु. हें कसेंही असो. हिंदुस्थानांतील लोक अगोदर श्रेष्ठपणा पावतील, यांत संशय दिसत नाहीं. कारण इंग्लंडचे लोकांचा सहवास यांस सर्वांचे अगोदर झाला आहे. आतां कोणचेही परकी राज्याची स्थिती पाहिली तर असें दिसतें कीं, इंग्रजीसारखें विचारशील परकी राज्य दुसरें होणार नाहीं. परकी राज्यांत जे दुर्गुण असतात ते यांत फार कमी आहेत. पहा, जेव्हां राणीसाहेबांनीं आपलेकडे राज्य घेतलें, तेव्हां जाहिरनामा लावला त्यांत असें लिहिलें आहे कीं,

> **"आमच्या इतर सर्व रयतेविषयीं जे राजधर्म आम्ही अवश्य मानितों, तेच राजधर्म हिंदुस्थानांतील आमच्या मुलखांतील रयतेविषयीं आम्हांस पाळिले पाहिजेत असें आम्ही समजतों. आणि ईश्वराचे कृपेनें ते सर्व वास्तविक रितीनें व मनःपूर्वक आम्ही पाळूं."**

असें दुसरा कोणी परकी राजा वचन देणार नाहीं. राणीसाहेबांनीं हें शपथपूर्वक सांगितलें. ही तर या देशांतील लोकांची मोठी सनद आहे. आतां यांत कितीएक हलके प्रतीचे युरोपियन लोक जरी विपर्यास आणितात तरी कागदावर लिहिल्याप्रमाणें खरा आहे, यांत दिक्कत नाहीं. लोकांस या राज्यांत जी मोठी अवघड गोष्ट वाटते ती इतकीच कीं, या देशांतील लोकांस मोठें काम मिळत नाहीं. निजामचे राज्यांत हिंदुलोकांस जे अधिकार मिळतात ते इंग्रजी राज्यांत मिळत नाहींत परंतु सदरहु सनदेंत याविषयीं असें लिहिलें आहे कीं,

> **"आमचे रयतलोकांपैकीं जे लायक असतील त्यांस तीं तीं कामें विनदिक्कत निष्पक्षपातानें ज्ञात किंवा धर्म मनांत न आणितां आम्ही देऊं."**

आतां यांत लिहिल्याप्रमाणें होण्यांत बहुत युरोपियन लोकांचें पोटिस्त बुडतें. याजमुळें हरकती आहेत; व ते दरवाजा धरून हमेश उभे राहतील यांत संशय नाहीं. तथापि आतां हा देश व इंग्लंड हे एकमेकांजवळ येत चालले आहेत. तेव्हां या देशांतील लोक तिकडे जाऊन माहितगार होतील तसतसे ते प्रतिष्ठेस योग्य होतील, यांत संशय नाहीं. व या देशांतील एकंदर स्थिति मनांत आणिली तर लायकी पावलेले लोक थोडेच आहेत व अद्याप इंग्लंडांत जाऊंयेऊं लागले असे लोक थोडेच आहेत. त्यांस आतां नुकतीशी माहिती होऊं लागली आहे. व आपला देश कसा, इंग्लंड कसें, हें समजूं लागलें आहे. या देशांतील मोठा षड्शास्त्री पंडित असला तर तो लायक होत नाहीं. कारण तो बहुधा व्यवहाराविषयीं अज्ञान व युरोप म्हणजे काय हें त्यास सहा शास्त्रांचे पुस्तकांत कोंठेंही सांपडावयाचें नाहीं. पोथींतील परिष्कार मात्र तो म्हणेल, परंतु लोकांचे कारभार कसे करावे हें त्यास ठाऊक असणार नाहीं. यास्तव इंग्रजी विद्येंत जे निपुण व जे व्यवहारिक विद्या यथास्थित पढून सुशिक्षित झाले आहेत त्यास मात्र लायकी आहे, असें म्हणतां येईल. परंतु असे किती थोडे आहेत? तीस हजार ४० हजार रुपये येके मुलास विद्या शिकण्यास लागतात. हें प्रकरण या लोकांस ठाऊक नाहीं. येथें शिंदे, होळकर यांस देखील ४०० रुपये विद्या शिकावावयास लागत नाहींत. मोठे जाहागीरदार, श्रीमंत, सरदार यांस लग्नमुंजीस मात्र ४०।५० हजार रुपये खर्च करण्याचें पूर्वापार ठाऊक; परंतु विद्या कशी मिळावी व तीस खर्च काय लागतो, देशांतर केल्यानें लायकी किती येते, हें अद्याप मोठाले लोकांस ठाऊक नाहीं. जसा तयार व लायक मनुष्य पाहिजे तशांचा प्रस्तुत फार तोटा आहे. एकएक इलाख्यांत पाहूं जातां दहावीस मात्र सांपडतील. तरी यांत युरोपापर्यंत पाहून आलेले व जगाचें ऐश्वर्य कसें आहे, हें माहित असेल असे पांच-चार देखील सांपडणें कठीण. येथें मोठाले श्रीमंत, सरदार व उत्पन्नदार जे आहेत, त्यांस लायकी कोठें आहे? त्यांस विद्या कोणती येते? त्यांचे शिकण्याकडे खर्च किती झाला आहे? आक्सफोर्डसारख्या शाळा व विद्येचीं पीठें, जेथें दरसाल तीस लाख रुपये खर्च होतो, त्यांविषयीं त्यांणीं कांहीं ऐकिलें तरी आहे काय? घरांत बसून श्रीमंती भोगिल्यानें लायकी येईल असें जुने लोक म्हणतील तर म्हणोत; परंतु आमच्यानें म्हणवत नाहीं. विद्येनें, देशाटणानें, अनेक ग्रंथावलोकनानें व व्यवहारीक चातुर्यानें ज्याचें मन मोठें झालें नाहीं, त्यास नालायकच समजावें. मोठे पदवीचा ग्रहस्थ आहे अगर त्यास मोठी जहागीर आहे, किंवा त्यास बहुत द्रव्य मिळालें आहे म्हणून कांहीं त्यास लायक म्हणतां येत नाहीं. श्रीमंत लोकांस असें वाटतें कीं, आम्ही लायक आहों, परंतु तसें असतें तर या प्रकारचे अधिकारी हल्लीं जीं स्वदेशीय राज्यें आहेत, त्यांत पुष्कळ आहेत. मग त्या राजांची अगदीं फजीती जगप्रसिध्ध आहे, याचें कारण काय? आम्ही असें म्हणतों कीं, याचें कारण लायक मनुष्य जसे असावेत तसे तेथें नाहींत. पंचवीस हजार रुपये तरी निदान ज्याचे

विद्येवर खर्च झाले नाहींत, तो मनुष्य मोठा लायक आहे, असें होत नाहीं. रुस्तुमजी जमशेटजी शेट यांणीं हल्लीं दीड लाख रुपये विद्या वाढऊं इच्छिणाऱ्यास द्यावयास काढले आहेत, पण त्यांत सारीं पांच मुलें शिकऊन तयार होणार; याजवरून विद्येचा खर्च काय आहे तो पाहावा. दोन आणे फी देऊन शिकलेला मनुष्य किंवा पत्रावळी लावणाऱ्या पंतोजीजवळ अभ्यास केलेला मनुष्य फार झालें तर पांच-दाहा रुपयांची कारकुनी करील, परंतु तोच गवरनर होण्यास इच्छील तर क्षणांत मुंबईची शिंदेशाई होईल. आतां या देशांतील लोकांस विद्येचा विसर बहुतकाळापासून पडला आहे. व राजाधिकारी यांजमध्यें कोणते गुण असावेत याची विस्मृती झाली आहे. याजमुळें मूर्खांस देखील पदवी मिळावी, असें इच्छिणारे बहुत आहेत. व वेडे राजे असले म्हणजे कारभाऱ्यांचें पिकतें; आणि भोळा राजा बरा असें कितीएक समजतात. पण तो अभिप्राय अगदीं वाईट आहे. लायकी पाहिजे हेंच खरें. व ही लायकी या एशियाखंडांतून गेली आहे. म्हणून हें आतां जिंकिलें जाणार आहे. व यांचें पुन्हा युरोपियनांचे हातून उपनयन होऊन हें शाहाणें होणार आहे हें आमचें भविष्य खचित आहे. परंतु आम्हीं इतकेंच सुख मानितों कीं, जी लायकी पाहिजे ती येण्यास प्रारंभ झाला आहे. आणि एशियाखंडांत हिंदुस्थान ज्ञानाच्या रस्त्यावर आलें आहे. आतां हा देश अति विस्तीर्ण आहे. यामुळें याची सुधारणा होण्यास काळही फार पाहिजे. कारण यांतील अद्याप कितीएक गांव [प्रांत] पुरते कळले नाहींत व तिकडे कोणी गेलें नाहींत. तरी युरोपियन लोक मोठे उद्योगी आहेत. व त्यांणीं मोठालीं साधनें या देशांत आणिलीं आहेत. व त्याजमुळें या देशाची ऐक्यता होण्याची आतां संधी आली आहे. गोंडवण, बिकानीर, जसलमीर, मलबार, उडिया, हे प्रांत या देशांतील लोकांस अद्यापदेखील ठाऊक नाहींत, व असे कितीएक भाग अद्याप कळल्यावांचून आहेत. व तेथें शाळा नाहींत. पंतोजी नाहींत व ग्रंथ नाहींत. शुध्ध रानटी स्थितींत लोक आहेत. याजकरितां या देशांतील लोकांनीं असें समजावें कीं, आपण इंग्लंडाच्या जवळ जाऊं तितकें चांगलें आहे. व आपल्यास माहिती होईल तितकी बरी. येथें आगगाड्या वगैरे जास्त होतील तितका फायदा आहे. रस्ते निघतील तितके चांगलें आहे. ग्रंथ वाढतील तितका लाभ आहे. पंतोजी वाढतील तितका उपयोग आहे. सांप्रत भिक्षुक व जुन्या पोथ्या वाचणारे पंडित यांचा उपयोग आतां कांहीं नाहीं. आतां हा देश पुढें धांव घेत आहे. व यास याचे कामांत विघ्न करणारे जे लोक आहेत त्यांची समाप्ती होत चालली आहे. याजकरितां सुज्ञांनीं हें सर्व जाणून या देशांतील लोकांस जितकें ज्ञानाकडे व लायकीकडे पुढें लोटवेल तितकें लोटावें. याच गोष्टींत हित आहे. व सरकारही असेंच करित आहे. आणि परमेश्वराची इच्छाही अशीच आहे, असें स्पष्ट दिसतें.

लोकहितवादी कृत

ता० २० मार्च सन १८६४

[नंबर १४९]

राजाविषयीं निबंध

जगांत हल्लीं जे सुधारलेले देश आहेत, त्यांमध्यें एके राजानें आपले स्वइच्छेनें राज्य करणें हें वाईट आहे असें सिध्ध झालें आहे. तुर्कस्थान, चीन व इराण हे देश अद्यापि सुधारले नाहींत, व तेथील लोकांस ज्ञान कमी, याजमुळें असे विचार करण्यास ते लायक झाले नाहींत. सबब स्वइच्छ राजे तेथें राज्य करीत आहेत. परंतु इंग्लंड आदीकरून जे देश आहेत, जेथें प्रजा ज्ञानी आहे व प्रजेंतील प्रमुख लोक विचारशील आहेत; त्यांच्या मतें ही गोष्ट वाईट आहे. म्हणून तेथील राजानें स्वइच्छ कारभार करितों म्हटलें तर, चालावयाचें नाहीं. व प्रजाही तें मान्य करणार नाहीं. यास्तव त्यांणीं आपले देशांतील राज्यास कायद्याचा निबंध बांधून दिला आहे. त्या निबंधामध्यें त्यांणीं असावें. इंग्लंडांतील पार्लमेंट जें आहे तें प्रजासत्तेचें द्वार आहे. आणि प्रजेचा कारभार प्रजेचे कारभारी यांणीं पाहावा, हें योग्य आहे. यापासून रयतेस सुख आणि एकटा स्वइच्छ राजा असल्यापासून तो स्वभावानें चांगला असला तर बरें आहे. नाहींपेक्षां दुःख. आणि वंशांत सर्वदा चांगले पुरुष होत नाहींत. यास्तव त्याचा निबंध असावा हेंच उत्तम. याजकरितां राज्यकारभारांत प्रजेचें सुख असावें हें प्रजेचे सुखास कारण आहे. आणि या देशांत जे जमीदार म्हणून होते ते असण्याचा हेतू हाच होता. राजानें प्रजेवर मोठे कर बसविले आहेत. किंवा दुसरा कांहीं उपद्रव दिला तर जमीदार यांणीं रदबदली करून प्रजेस उपद्रवांतून सोडवावें, असें होतें. परंतु हें काम वंशपरंपरेनें चालूं लागलें. तेव्हां याचा हेतू नष्ट होऊन जमीदारच प्रजेस लुटणारे झाले. परंतु देशमूख या शब्दाचे अर्थावरून हे प्रजेचे तर्फेनें खंडणी ठरविण्यांत वगैरे उपयोगीं पडावें असें होतें. व मागील कागदांवर कितीएक ठिकाणीं याचा दाखला लागतो. तो असा कीं, माहालावर सरकारांतून एक लक्ष रुपये खंडणी ठरविली, असे माहालचे कौल, अभयपत्रें, इजमायली, खंडणी, करार इत्यादि कागदांत लिहिलें असे, व त्याचे खालीं शेरा असे कीं, जमीदाराचे रदबदलीवरून यापैकीं वीस हजार कमी केले. याजवरून जमीदार, सरकार आणि रयत यांचे दरम्यान होते, हें स्पष्ट आहे. पुढें राजांनीं व जमीदारांनीं दोघांनीं आपले धर्म सोडिले, तथापि कितीएक गांवें लुटण्याचे प्रसंगीं जमीदारांनीं आपलें सर्वस्व देऊन गांव वाचविले; अशीं उदाहरणें बहुत सांपडतील. परंतु दंगे, बंडें, लुटी दरसाल होऊं लागल्या. व राजे निर्बळ झाले. तेव्हां पहिले बंद [बंध] सुटून गेले. नाहींपेक्षां इकडेही पूर्वीं बंद होते हें खरें आहे. आतां इंग्लंडासारखे सुधारलेले देशांत हल्लीं जसे निबंध आहेत तसे मजबूद हे नसोत. पण इंग्लंडांत पांचशें वर्षांपाठींमागें जसे होते तसे हे होते असें वाटतें.

आतां प्रजासत्ता स्थापन व्हावी, असा काल आला आहे. कारण इंग्लंडचे लोकांस तें मान्यच आहे व त्यांची अशा कामीं आवड आहे. यास्तव त्यांणीं आपले देशांतील कितीएक चाली इकडे सुरू केल्या आहेत. एक कायद्याचें कौंसल, दुसरें शहरसुधारणुकीच्या पंचाइती, तिसरें असेसरमार्फत इनसाफ होणें, इत्यादि.

आतां सदरहुवरून जरी प्रारंभ दिसतो, तरी विलायतेप्रमाणें येथें प्रजेस सत्ता आहे असें नाहीं; आणि इकडील प्रजाही अज्ञान फार, यास्तव तीस सत्ता देण्यासही विचार आहे. गांवचे सुधारणुकीच्या कमीट्या नेमिल्या त्या कारभार करीत आहेत. परंतु त्यांस त्याचें फारसें महत्त्व वाटत नाहीं, व सरकारी कारभार चांगले रीतीनें करावा यांत प्रजेचें कल्याण आहे, व आपल्यास वेतन नसलें तरी या कामास जपावें, असें त्यांस वाटत नाहीं. तसेंच अदालतींतील पंच यांस तर असें वाटतें कीं, आम्हांवर हा जुलूम आहे. आम्हास कांहीं वेतन नाहीं. मग आम्ही कशाकरितां जावें ? व कितीएक उत्पन्नदार संभावीत या कामाचा त्रास करून मागें हटतात, व कांहीं निमित्तें करून आपलीं नांवें काढितात. व दुसरें असें आहे कीं, बहुत लोकांस न्यायाची पंचाईत करून अभिप्राय सांगण्याजोगें ज्ञानही नसतें. तिसरें कायद्याचें कौंसल आहे तें कांहीं स्वतंत्र नाहीं. गवरनरसाहेबांस मसलत देणारे लोक या नांवानें त्यांचा कारभार चालतो, व त्यांत नेटीव लोकही थोडेच आहेत.

या देशांतील लोकांस एक मोठी जबरदस्त खोड आहे ती अशी कीं, सर्व काळ आपल्यास कांहीं फायदा असेल तें काम करावें, असें त्यांस वाटतें. थोरपणा, गौरव, सार्वजनिक काम यांजविषयीं त्यांस समजुतच नाहीं. तसेंच रयतेचें हित म्हणजे काय, हें त्यांस दिसत नाहीं. ब्राम्हण म्हणतात कीं, शिंपी, वाणी, गवंडी यांजबराबर आम्ही कां बसावें ? कोणी म्हणतात न्हावी, परीट यांच्या पंचाइती कोणी कराव्या ? त्यांची दृष्टी फायद्यावर फार. याजमुळें स्वार्थापलीकडे त्यांस कांहीं दिसत नाहीं. कदाचित स्वार्थापलीकडे गेले तर जातीच्या कुंपणापर्यंत जातात. त्याचे पलीकडे जावें म्हणजे त्यांस मोठा हलकेपणा वाटतो. व हें काम आपलें नव्हे असें वाटतें.

याजकरितां आपला एकंदर सर्व देश, यांतील प्रजा हरएक जातीची असो, ती व आपण उंच किंवा नीच वर्णाचे असलों तरी सर्व सारखे, त्यांचें हित तेंच आपलें; त्यांचें कामांत श्रम करणें हें आपले कामास श्रम करण्यासारखें आहे, असें ज्ञान त्यांस अद्याप झालें नाहीं. सर्व लोकांत बहुतकरून पाहावें. तों सर्व लोक स्वार्थपरायण दिसतात. त्यांची उपकारबुद्धी स्वदेह, स्वकुटुंब, स्वग्राम व स्वजाती येथपर्यंत गेली, म्हणजे ते मोठे धार्मिक व शाहणे म्हणावयाचे. स्वदेशावर दृष्टी गेलेली असे लोक फार क्वचित जन्मास आले असतील. जुन्या काळच्या पैकीं तर कोणी नाहींच. या स्वार्थदृष्टीनें त्यांस सर्व रयतेचीं कामें परकीं दिसतात व स्वार्थाकरितां रयतेचें अनहित होत असलें तरी ते करतील, असे लोक बहुत आहेत. ते स्वल्प अधिकारानें आपली स्थिति विसरतात.

फार काय सांगावें, एकादा साहेब आठदहा रुपये दरमाहा देऊन एक बुटलर ठेवितो, व ती चाकरीदेखील मुकरार नाहीं. तत्रापि त्या बुटलरास असें वाटतें कीं, बादषाहाचा शालक मीच आहें. माझ्याएवढी पदवी कोणास नाहीं. असें मानणारे मनुष्य इकडे फार आहेत. आतां हे हलके लोक म्हणून असें करीत असतील म्हणावें, तर तसेंही नाहीं. ब्राम्हणांतदेखील असे आढळतात. तेव्हां तात्पर्य इतकेंच कीं, यांचें अज्ञान जाऊन एकंदर रयतेपैकीं मी एक आहें, असें यांणीं आपल्यास अद्याप ओळखलें नाहीं व असें जोंपर्यंत आहे तोंपर्यंत यांस अधिक सत्ता मिळणेंही अयोग्य आहे.

यावर कदाचित् कोणी देशाभिमानी शंका काढील कीं, असेसर वगैरे यांचा मान बरोबर राहत नाहीं, यामुळें ते कंटाळतात. तर तेंही खरें नाहीं. यद्यपि गैरमाहित इंग्लिश लोकांकडून नेटीव लोकांचा सर्वदा मान राहतो, असें म्हणवत नाहीं, तत्रापि रयतेचें काम असें समजून मानाची कांक्षा न करितां त्यास झटावें, हाच धर्म होय.

आतां सदरील असें म्हणणारे आहेत त्यांणीं नेटीव राज्यें आहेत त्यांजकडे नजर केली तर, त्यांस असें दिसेल कीं, तेथील लोकांस तर इंग्रजी राज्यांतील लोकांइतकें देखील ज्ञान नाहीं. व ते केवळ द्रव्याचे आशेनें भ्रष्ट असून अधिकार मिळतांच दुसरें कांहीं मनास न आणितां फक्त आपलें घर त्वरित भरावयास लागतात. दहा-पांच राज्यें अद्याप राहिलीं आहेत. हीं नमुन्यास बहुत दिवस पडोसा देतील. स्वतां नेटीव लोकांस कांहीं अधिकार दिला आणि त्यांवरच तें काम सोपविलें तर ते कसें करतात हें ज्यास पाहाणें असेल त्याणें नेटीव राज्यांत प्रवासास जावें म्हणजे सर्व ध्यानांत येईल. तेव्हां हा स्वभाव या देशचे माणसांस लागला आहे, तो फार भयंकर आहे, व यामुळें एकमेकांचें मित्र नसतां शत्रु मात्र आहेत. कोणाचा कोणास भरंवसा नाहीं. यामुळें यांमध्यें ऐक्य नाहीं. जिल्ह्यांत दहा असेसर चांगले मिळत नाहींत. मग मोठा कारभार पार्लमेंटासारखा यांचे गळ्यांत घातला तर चालवावा कोणी, हें समजत नाहीं. सर्व लोकांचे हितावर नजर देऊन चालणारा एकही मनुष्य सांपडणें कठीण आहे. आतां इंग्रजी विद्येनें तयार झालेले दहापांच सांपडतील, पण त्यांची संख्या फार थोडी, व ते सुखवस्तुपणाचे व श्रीमंतीचे पदास अद्याप पावले नाहींत. इंग्रजी राज्यांत मनुष्यें तयार करण्याचा जो क्रम चालला आहे त्यांत मात्र अशीं मनुष्यें तयार होत आहेत. पण जुन्या शाळेंत याप्रमाणें एक तरी मनुष्य आहे काय ? तेव्हां असे मनुष्यांनीं भरलेला देश असतां, त्यांत जास्त अधिकार प्राप्त होणें फार मुष्किल आहे.

स्वदेशाचा कारभार करण्यास तरी मनुष्यास बहुत योग्यता आली पाहिजे. चांगली शाळा पाहिजे. व मुळापासून विद्येच्या संस्कारानें व सुधारलेले देशांतील वहिवाटीचे ज्ञानानें त्यास थोरपणा आला पाहिजे, व बुद्धीचें मालिन्य जाऊन विचार वाढला पाहिजे. जातिधर्माचे व ग्रामाभिमानाचे कलंक झडले पाहिजेत व रयत त्यास आपले भावा-

प्रमाणें दिसली पाहिजे. तेव्हांच तो मनुष्य एकंदर रयतेचा कारभार करण्यास लायक होईल. असा धर्म सांप्रतकाळीं या लोकांचे मनांत वागत नाहीं. यास्तव एकमेकांचा लोक विश्वास धरीत नाहींत. ब्राम्हण आहेत ते तर अगदीं सोवळे; त्यांस साधारण व्यवहाराचा विटाळ वाटतो. आणि ज्यांत स्वार्थ असेल तो व्यवहार मात्र वडिलांचे श्राद्धासारखा अवश्य वाटतो. आणि इतर व्यवहार त्यांस तुच्छ वाटतात. सावकार, सराफ, मारवाडी, गुजराथी हे तर आपल्यास फारच दूर ठेवितात. ते समजतात कीं, राज्यव्यवहार पाहाणें हें आपलें काम नव्हे. आपल्यास व्यवहार व्याज, नफा, बट्टा, इतक्यापुरताच पाहावयाचा. बायका आहेत तो तर जगाचा भाग माणसांत न धरला तरी चालेल. कारण त्यांस लिहितांवाचतां येत नसून त्या व्यवहारशून्य असतात. भट म्हणतात कीं, आम्ही घोकणार, आम्हांस वाचतांदेखील येत नाहीं, व कारभार, कायदे आमचे सात पुरुषांत कोणी पाहिले नाहींत. मग आम्हांस ते येणार कोठून ? शास्त्री, पंडित म्हणतात कीं, आपली बुद्धी न्याय, व्याकरणांतील विषयांची भवति नभवति करण्यापूर्ती आहे. आपल्यास दरबार पाहिलें म्हणजे भय वाटतें. कुणबी म्हणतात, आपली लंगोटी व घोंगडी सुटत नाहीं. मेहेनत करतांना थकलों. कारभार चावडीवर होतो, तो देखील आपल्यास ठाऊक नाहीं. मग अदालत कशाची, कौंसल कशाचें ? जमीदार म्हणतात, आमचा शिरपाव, कसरपट्टी वगैरे बाबदी बुडाल्या. त्या परत येण्याचा कांहीं उपाय असला तर मात्र आम्हीं पाहूं. बाकी आपल्यास कांहीं नको. याप्रमाणें या देशांतील लोकांची स्थिति आहे, यांस नवीन शाळा पाहिजे. पुनः यांचे संस्कार होतील तेव्हांच हे शाहणे होतील. व सरकारचे शाळेकडून आतां यांस पुनः संस्कार होण्यास आरंभ झाला आहे. आता यांस भूगोलाचें वगैरे ज्ञान होत चाललें आहे. व नुकती ओळख पडत चालली आहे. आणि हिमालयावरच्या स्वर्गापलीकडे चीन आहे असें माहित होत चाललें आहे, यांचे मनांत जग काय तें एवढें हिंदुस्थानच आहे. चतुःशास्त्री पंडित आला तरी त्याची संमती अशीच पडेल. प्राचीनकाळीं हिंदु लोकांनीं असा बेत केला होता कीं, आपला धर्म कोणास सांगूं नये. व आपला देश सोडून बाहेरगांवीं जाऊं नये. या निश्चयानें एके ठिकाणीं हे लोक मधमाशीसारखे चिकटून राहिले. बहुत लोकांनीं देशांतर केलें; परंतु हिंदु लोकांनीं आपलें जन्मस्थान कधीं सोडिलें नाहीं. आणि आपण कोणाचा लोभ धरीत नाहीं, त्यापेक्षां आपलाही कोणी धरणार नाहीं, असे समजुतीनें हे स्तब्ध राहिले, ते बरेच काळपर्यंत राहिले. परंतु पुढें बाहेरचे देशचे लोक आपले उद्योगानें यांचे भेटीस आले. आणि त्यांणीं यांस विचारलें कीं, तुम्ही असा निश्चय केला त्यापेक्षां आम्हीच तुमचे भेटीस आलों. तर आतां तुमचा धर्म वगैरे सर्व आम्हांस सांगून द्या. तत्रापि हे आपलें ध्यान सोडीनात. याजकरितां परकी लोकांस यांस जागृत करण्यास बरीच मेहेनत पडली. तो इतिहास सांगतां विस्तार होईल. अस्तु. आतां ज्या ज्या गुप्त गोष्टी स्वदेशांतील न्हावी, परीट यांस सांगण्यास हे लोक भीत होते, त्या गोष्टी द्वीपांतरास गेल्या. याप्रमाणें यांस

ऐश्वर्यानें व लक्ष्मीनें आणि विद्येनें स्वतांच सोडिलें. कारण यांचा पराकाष्ठेचा आळशीपणा पाहून त्यांस कंटाळा आला. आतां जागे झाल्यावर हे काय करतात तें पाहूं.



[नंबर १५०]

हिंदुस्थानची जमीन

या हिंदुस्थानांत जिकडे पाहावें तिकडे गांव वसले आहेत. प्राचीनकाळीं प्रत्येक गांव हें स्वतंत्र राज्य होतें. गांवची जमीन, नद्या, डोंगर या सर्वांस नांवें आहेत. तसेंच गांवांत जी जमीन असते, त्या जमिनीचे तुकड्या तुकड्यासही नांवें असतात. जसें थळ, दळें, शेत, इत्यादि. याशिवाय आणखी दर दळ्यास म्हसोबाचें, पिंपरीचें, वडाचें, तोरणीचें, चिंचेचें, मोराचें, लांडग्याचें, अशीं अशीं विचित्र नांवें असतात. हीं प्राचीन नांवें अद्याप चालत आहेत. या जमिनीच्या पूर्वापार मोजण्या झाल्या आहेत. परंतु त्या शंकुसाखळीनें नाहींत. नजर पाहाणीनें अजमास बांधले होते. व उत्पन्नावरून किंवा सरकारी देण्यावरून मापें ठरलेलीं, म्हणजे अनेक प्रांतांत अनेक मापें आहेत; जसें खंडी, रुका, पाईन, इत्यादि. ज्यांत खंडीभर दाणे पिकतील, असा सुमार त्या क्षेत्रास खंडी म्हणतात. कितीएक ठिकाणीं बी पेरण्यावरून माप असतें. पायलीभर बीज ज्या क्षेत्रांत पेरतात, त्यास पायली म्हणतात. तसेंच एक रुपया देणें ज्या जमिनीवर आहे तीस बिघा म्हणतात. पूर्वी प्रथमतः नगरकर मलिकंबर याणें कमाल रकम व रकबा ठरविला, त्याचे पलीकडील मोजणीचा दाखला आतां कांहीं राहिलेला नाहीं. तरी थळीं मलिकंबराचे पलीकडील आहेत. पैमाषी झाली तेव्हां या शेतांस नंबर असें नांव पडलें आहे. तत्रापि मागलीं नांवें चालत आहेत. असो. असे बहुत नंबर अगर थळीं एकत्र झालीं म्हणजे त्यांस गांव म्हणतात. गांवचे जमीनीची लावणी करून गांवचे लोक उपजीविका करतात व त्यांचे सोईकरितां कसबी लोकांस गांवांत ठेवितात. त्यांस बलूतें म्हणतात. या बलूत्यांच्या चार ओळी आहेत. म्हणजे चार पदव्यांचे बलूतदार आहेत. यांत माहाराची पहिली पदवी आहे. गांवांत सर्वांवर मुख्यत्व पाटील-कुळकर्णी यांचें असतें. व त्यामुळें त्यांस कांहीं मानपान आहेत. म्हणजे माहारानें त्यांच्या घरीं फुकट राबावें, न्हाव्यानें फुकट हजामती कराव्या, कुंभारानें फुकट मडकीं द्यावीं, इत्यादि किरकोळ बाबती असतात. याशिवाय कांहीं हक्क असते, म्हणजे दर गांवांत जमिनीची लावणी करणारांनीं दर बिघ्यास पायली २ पायली दाणे व कांहीं वैरण द्यावी, आणि सणावारास शिरपाव, विडे, नजर द्यावे. गांवच्या सर्व जमिनीस बहुत-करून पाटलाची मिरास म्हणतात. यास्तव त्याचे वंशांतील पुरुषास अगर त्यांणीं आपला धनीपणा ज्यास विकला असेल, त्यास मिरासदार म्हणतात. दुसरे मिरासदारांपासून

लावणीस जे जमीन घेतात त्यांस उपरी म्हणतात व मिरासीस वतनदारी म्हणतात. हे दोन्ही आरबी शब्द आहेत. सबब मोंगलाईत इकडे आले असतील. पूर्वीचे मिराशीचें नांव वृत्ती व मिरासदार यांस वृत्तिवंत म्हणत. गांवच्या जमिनी गांवांतील पडीची लावणी करण्यास नवीं कुळें आणण्यास देण्यास, बलुतेदार ठेवण्यास व अलुते ठेवण्यास पाटील मुखत्यार असे. आपले गांवचे सिवेचें रक्षण पाटील करी. त्या कामावरचा त्याचा मुनीम माहार, एका गांवानें दुसरे शेजारचे गांवची जमीन घेतली तर त्याजवरून उभयता गांव लढाया करीत व त्यांत लोक मरतील त्यांस गांवांत इनाम जमीन देत. सरकारापासून प्रत्येक गांव आपले खर्चास व जमेस स्वतंत्रपणानें वागे, याजकरितां अशी म्हण पडली कीं, गांव करी तें राव न करी. सरकार म्हणून एक राजा असे, परंतु तो गांवकर खंडणी मात्र घेणारा आणि खंडणीचा गांवानें जामीन दिला किंवा रसद भरणा केला म्हणजे गांवची जबाबदारी सुटली. नंतर रयत व गांवचा पाटील यांणीं सूट, पाहाणी, लावणी, यांचा सर्व बंदोबस्त करावा. गांवचें राज्य हें लोकसत्तात्मक होतें. पाटलानें चावडीवर बसून आपले गांवांतील बलुते वगैरे घेऊन पंचाइती वगैरे कामें करावीं. याप्रमाणें गांवचा बंदोबस्त होता. कितीएक गांव मिळून एक तर्फा, व कितीएक तर्फा मिळून एक परगणा होतो. त्या परगण्यावरचे राजे देशमुख. गांवास जें पाटलाचें नातें तेंच देशमुखाचें परगण्याशीं नातें होतें. परगण्यास कोठें कोठें प्रांत व देश असेंही म्हणतात. मिरज प्रांत, वाई देश, पुणें देश, खटाव देश, इत्यादि. तर्फेस संमत असेंही म्हणतात. पाटलास जसा कुळकरणी तसाच देशमुखास देशलेखक म्हणजे देशपांड्या आहे. सरकारानें जास्ती खंडणी माहालावर घातली तर देशमुखानें त्या प्रांताविषयीं बोलणें करून वाजबी खंडणी ठरवून घ्यावी. आपले परगण्याचें लिहिणें, सूट, लावणीही त्यांणीं मुखत्यारीनें करावी. "बुडाली पाटिलकी देशमुखाची व बुडालें कुळकरण देशपांड्याचें" अशी म्हण आहे. राजांनीं खर्चास खंडणी किती पाहिजे, याचा विचार करून त्या अन्वयें कर घ्यावा. याखेरीज मुलखाशीं त्यांचा कांहीं संबंध नव्हता. राजाचे तर्फे मामलेदार, दरकदार, किल्लेदार, जमाबंदीस येत त्यांस अशाश्वत अधिकारी म्हणत व पाटील आणि देशमुख यांस शाश्वत अधिकारी म्हणत. या कामाबद्दल जसे पाटील यांस हक बाबती वगैरे उत्पन्न आहे, त्याप्रमाणें देशमुख देशपांडे यांसही आहे. देशमुखांस बुडाल्या पाटिलक्या असतात. शिवाय रुसूम तहरीर बाबती, हक्कें, इत्यादि नक्त व शिवाय इनाम जमिनी व इजाफतीचे गांव असतात. कोठें शेंकड्यावर आहे, कोठें मखते वेरजा आहेत. याप्रमाणें सर्व प्रांतीं याचा एकधारा नाहीं. प्रांताचें सर्व लिहिणें देशपांडे यांचे घरीं असतें. राजास दाखला पाहिजे तर त्याचे दफतरीं मिळतो. आतां कितीएक देशांत काळावंडामुळें गांवची शिस्त बिघडली आहे व कोठें कोठें पूर्ववत् कायम आहे. जमीदारीप्रमाणें पूर्वीचे काळीं दुसरा मान नवता, व जे जमीदार असत, ते आपली आडनांवें टाकून वेतनाचे नांवानें प्रसिद्धींत येत. पाटील, देशमूख हे

बडे लोकांप्रमाणे आहेत. देशांत वरिष्ठ पदवीनें स्थापन झालेले लोक ते हेच. व त्यांचे खालचे ते किरकोळ लोक समजावयाचे. इंग्लंडांत ज्यांस जंटलमन म्हणतात तेच या देशांतील जमीनदार व वतनदार समजावे. शिंदे, होळकर यांस मोठालीं राज्यें मिळालीं तरी त्यांत स्वदेशांत पाटिलक्या, देशमुख्या मिळवाव्या असें वाटत असून, त्या त्यांनीं मोठे प्रयत्नानें मिळविल्या–धारचे पवार, इंदूरचे होळकर, ग्वाल्हेरचे शिंदे, नागपूरचे भोसले, बडोद्याचे गाईकवाड, यांणीं हौसेनें आपल्यास पाटील, गांवढे, देशमुख म्हणावें. वरच्यापेक्षां त्यांस हा मान थोर वाटत असे. याचें कारण राज्य अशाश्वत, पण जमीदारी शाश्वत, असें त्या वेळेस गणलें होतें. सदर्हु राजांच्या देशमुख्या व पाटीलक्या अद्याप गांवोगांव बहुत आहेत चांदवडमाहालचे देशमुख होळकर, कन्हेरखेडचे पाटील शिंदे, असे शेकडो गांव व खोरीं कोकणांत, मुऱ्यांत, मावळांत व देशांत बहुत ठिकाणीं आहेत.

शाहूराजास सन १७०७ चे सालीं दिल्लीचे बादशाहांनीं सोडलें व स्वराज्यावर जावें म्हणून सांगितलें. तेव्हां त्याणें असें मागितलें कीं, बादशाहांनीं कृपावंत होऊन मला कांहीं वतन द्यावें आणि तें असें द्यावें कीं, सर्व देशांत मोठें असावें. तेव्हां बादशाहानें त्यास दर शेंकडा दहा रुपये उत्पन्नाचें सरदेशमुखीचें वेतन दिलें. तत्रापि इंदापुरचे देशमुख सातारकर राजे होते. व शिवाय त्यांणीं पाटिलक्या वगैरे पुष्कळ मिळविलेल्या आहेत. ब्राम्हणांस शालजोडी पांघरून भिक्षा मागण्यास जशी थोरवी वाटते, तसें मराठी राजांस वतनें मिळविण्यास प्रतिष्ठा वाटत होती. हिंदुस्थानचा प्रतिनिधी जरी झाला तरी पार्लिमेंटांत लोकांची मुखत्यारी करून बसण्यास इंग्लिश लोकांस जसा मान वाटतो, त्याचप्रमाणें आपली वास्तवीक सत्ता व स्वतंत्रपणा हीं रक्षण करण्याचें काम वतनदारी आहे, असें हे समजत होते. वतनदाराचा सेवक राजा व त्याचे पोटास देणारे गांव. यास्तव गांवचा कारभार ही त्यांस मोठी प्रतिष्ठा वाटत होती. या मुलखांत पीक फार व जमीनीवरच उपजीविका फार, दुसरें कसब थोडें. याजमुळें जमाबंदीचें काम हें मोठें गणलें होतें, व पाटीला देशमुख यांस सरकारांनीं शिरपाव, पट्टे द्यावे. सुटीचा वगैरे बंदोबस्त करावा, गांवचीं, प्रांतांचीं गाऱ्हाणीं गिल्ले ऐकून पाण्याच्या सोई, बंधारे, तळीं, विहिरी, देवळें, घांट, रस्ते करणें असतील तर त्यांस तगाया, सुटी, मदत द्यावी, असा पहिला शिरस्ता असे. मोगलाईतदेखील याप्रमाणें चाललें. त्याकाळीं फारसे हिशेब लिहित नवते. थोड्यांत हिशेब लिहित व किरकोळ कामीं सरकारची दखलगिरी नसे. कोणाकडून गांवास कांहीं उपद्रव झाल्यास तो सरकारानें दूर करावा. लावणी वसाहतीस मदत द्यावी. कुळभरणा करावा. अभयपत्रें द्यावीं, अशी वहिवाट होती. हिंदुस्थानांतील मनुष्यास आपला गांव हेंच राज्य वाटतें. म्हणून श्रीमंती आली तर आपले गांवीं कीर्त करण्याची त्यांची वहिवाट आहे. ज्ञातिधर्मामुळें देशाभिमान

विभागला, आणि त्यांत गांवचे स्वतंत्रपणामुळें आणखी विभाग होऊन आपले गांवापंलीकडे देशाची काळजी करण्याचें सुटलें, हा एक परिणाम झाला. असो. सांप्रतकाळीं पाटील, देशमुख यांजकडे पहिल्यासारखी मुखत्यारी नाहीं. रयतवारी रीतीनें सरकारांतून कारभार चालतो. याचें कारण पाटील व देशमुख हे पूर्वी रयत-संरक्षणाकडे फार लक्ष ठेवीत. तसें आलीकडे न ठेवितां उलटे इजा देऊं लागले. याचें कारण फार दिवस एक अधिकार वंशपरंपरेनें चालला आणि सुशिक्षितपणा लोकांस नाहींसा झाला. मग त्यांस असें वाटूं लागलें कीं, आपलें वतन ही आपली खासगत मिळकत. त्यांतून जितकें उत्पन्न निघेल तितकें काढावें. अशा कारणांनीं आतां त्यांचे हक्क वगैरे बंद होऊन परभारें पूर्वीप्रमाणें कांहीं पावत नसून सरकार जमाबंदींतून देतात. पूर्वी परभारें म्हणजे सरकारची खंडणी देऊन त्याशिवाय जमीदाराबद्दल एक पट्टी करून रयतेनें त्यांस हक्क द्यावें अशी वहिवाट होती. त्यास परभारें म्हणत, जमाबंदींत जें खर्च पडत नाहीं त्याचें नांव परभारें. हल्लीं कांहींएक परभारें नाहीं, असा बंदोबस्त झाला आहे. याजमुळें लोकांस त्रास नाहीं. व हजार देणेदार होते ते नाहींसे झाले व एकच सावकार झाला. परंतु जरी सरकारानें इतर लोकांचीं हक्कें बंद केलीं. तरी वसुलाशिवाय नवीं देणीं आलीकडे कांहीं उत्पन्न झालीं आहेत. तीं रयतेस बरींच त्रास देतात. दिवाणी कोडताचे स्टांप, भत्ते, दस्तुरी, शाळापट्टी, मीठ, टपाल यांचें देणें, साऱ्याशिवाय बरेंच पडतें. तत्रापि रयत म्हणजे गरीब नांगरणारे व मजुरी करणारे लोक यांची स्थिती बरीच सुधारत चालली आहे.

[नंबर १५१]

धर्मसंबंधीं माहिती (नंबर १)

जन्माचें सार्थक

बहुत लोकांत हा मोठा प्रश्न आहे कीं, आपलें सार्थक कशानें होईल? याकरितां संसार सोडून कोणी संन्यासी झाले, कोणी घरदार टाकून काशीस गेले, कोणी विभूति माळा चढऊन दोन दोन प्रहर एकनिष्ठ संध्या करीत बसले. कोणीं सहस्रभोजनें, लक्षभोजनें घातलीं, कोणीं व्रतें, उद्यापनें, उपोषणें केलीं; असे हजारो उपाय आपआपल्या ज्ञानाप्रमाणें किंवा परंपरेप्रमाणें मनुष्यें योजीत आहेत. त्यापेक्षां त्यांमध्यें आम्ही आपलाही अभिप्राय दाखल केला तर चिंता नाहीं, असें जाणून आम्हांस याबद्दल जें वाटतें तें लिहितों.

भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं अर्जुनास "स्वधर्मे निधनं श्रेयः" म्हणजे ज्याचा

जो धर्म तोच त्यास श्रेयस्कर व दुसऱ्याचा भयावह होय; हें सांगून त्यांकडून क्षत्रियाचा बाणा सिद्धीस नेवविला. यावरून स्वधर्म आचरावा हेंच श्रेयस्कर होय, असें आम्हांसही वाटतें. आतां स्वधर्म म्हणजे काय? हा दुसरा प्रश्न याचे पोटीं निघाला. तर याचें उत्तर—

शांतितुल्यं तपो नास्ति न संतोषात्परं सुखम्।
न च तृष्णासमो व्याधिर्न च धर्मो दयापरः॥

अर्थ–शांतिसारखें दुसरें तप नाहीं; संतोषासारखें सुख नाहीं; आशेसारखी व्याधि नाहीं; व दयेसारखा अन्य धर्म नाहीं. याजवरून दया हा धर्म मुख्य होतो. आतां दयेमध्यें मात्र सारासार विचार केला पाहिजे. वाघास दया करून गांवांत सोडलें तर तो निर्दयपणा होय. मुख्य दयेचे प्रकरणांत स्वतांची उपयुक्तता आद्य आहे. कोणास असें वाटेल कीं, आपलेजवळ लाखो रुपये नाहींत तर लोकांस आपण द्यावें काय? द्रव्याशिवाय दया होत नाहीं. परंतु हें म्हणणें मिथ्या आहे. प्रत्येक जीवानें आपला उपयोग होण्याजोगा असेल तितका केला म्हणजे त्याचें सार्थक झालें असें आम्हांस वाटतें. कोणी निरुपयोगी असूं नये. कांहींतरी करून लोकांस उपयोगीं पडावें. व्यर्थ आयुष्य घालवूं नये. हरएक मनुष्यानें असें समजलें पाहिजे कीं, आपण जन्मास आलों आहों त्यापक्षीं एकंदर लोकांचे सुखास अधिक साधन करून द्यावें. व सुखाची बेरीज अधिक वाढवावी, आणि असा ज्याचा उपयोग नाहीं, व प्रजेचे सुखास जे वाढवीत नाहींत, तेच पापी व व्यर्थ जन्मले असें समजावें. आतां हा पुरुषार्थ सिध्धीस नेण्यास जें आपण काम करित आहो, तें चांगले रीतीनें व्हावें अशा उपयोग व प्रमाणिकपणा अवश्य आहे. कोणास फसवूं नये व कोणाचें कांहीं गैरवाजवी रितीनें घेऊं नये, हें मुख्य लक्षांत ठेविलें पाहिजे. शेतकरी आहे त्याणें आपले धान्याची व्यावयाची ती वाजवी किंमत घेतली म्हणून त्यांत पाप नाहीं. त्याणें आपले दाण्याची रास लुटवून देऊन आपण भीक मागत जावें, असें जे त्यास म्हणतील ते कपटानें फसविणारे होत; खरा बोध करणारे नव्हत. आमच्या मतें शेतकऱ्याचें कर्तव्य इतकेंच कीं, त्याणें लोकांस उपयोगीं पडून आपलाही निर्वाह करावा. आणि न्यायानें व खरेपणानें वागावें म्हणजे झालें, हेंच त्याच्या जन्माचें सार्थक होय. व साधारण धर्म इतकाच आहे. आतां या धर्म शब्दाचे पोटीं वर्णांचे आणि आश्रमांचे प्रकार आहेत. व त्यामुळें सांप्रतकाळीं ब्राम्हणांमध्यें मोठी गडबड होऊन गेली आहे. ती अशी कीं, त्यांस परंपरेवरून आपण ब्राम्हण असें वाटतें. आणि पोटाकरितां कोणास पोलिशीचे, रेलवेचे, पट्टेवाल्याचे, इत्यादि धंदे करावे लागतात. व ते साधून धर्माध्यक्ष जे ब्राम्हण त्यांचे पूर्वीचे तापस धर्म तेही चालवावे, असें त्यांस वाटतें. परंतु वास्तविक म्हटलें तर ही चूक आहे. आतां या देशांत

बहुतकरून ब्राम्हण नाहींतच, व असल्यास फार क्वचित असतील. हल्लीं जे आपणांस ब्राम्हण म्हणवितात ते कोणी क्षत्रिय, कोणी वैश्य, कोणी शूद्र असे आहेत. व ते मोठी तारंबळ करून आपला प्राचीन बाणा बाळगतात. म्हणून त्या सर्वांस आमचें असें सांगणें आहे कीं, आपआपलीं कामें नीट करावीं म्हणजे झालें, प्राचीन बाण्यावर दुर्लक्ष केलें तरी चिंता नाहीं. प्रस्तुत जो धंदा पत्करला आहे, तो नीट चालवावा हाच धर्म. व याबद्दल रामशास्त्री बावांनीं माधवराव पेशवे यांस काय सांगितलें तें ध्यानांत आणावें. आणि अधिक उद्योगी व अधिक उपयोगी व्हावें. आतां यावर कोणास शंका येईल कीं, उद्योगीपणा आणि उपयोगीपणा हीं तुमच्या सांगण्याप्रमाणें आम्हीं पत्करिलीं, पण यांत आत्म्याविषयींचा निर्णय काय? तर यास उत्तर इतकेंच कीं, स्वधर्माचरण केल्यानंतर आत्म्याची जी वाट करणें असेल, ती परमेश्वर करील. यज्ञादि करूनही साक्षात्कार होतो असें नाहींच. आपलें कर्तव्य तें केलें इतकें सांगून सर्व ग्रंथ स्तब्ध होतात. त्याचप्रमाणें आम्ही म्हणतों कीं, ज्यांणीं आपल्या[स] प्राप्त झालेले धर्म यथास्थितपणें आचरिले त्यांनीं ईश्वरावर हवाला ठेवून स्वस्थ बसावें. याप्रमाणें या जन्मांत कर्तव्य काय याचें हें आम्ही वर्णन केलें. व पुढली जबाबदारी कोणीच पतकरीत नाहीं. त्यापेक्षां आमच्यानेंही ती पतकरवत नाहीं. तथापि पुष्कळ विचार करून पाहिलें असतां लोकांचे हिताकडे आणि सौख्यवृद्धीकडे आयुष्याचा व्यय व्हावा, हाच आचार उत्तम दिसतो. आणि हेंच जन्माचें सार्थक आहे.

❧ ❧

[नंबर १५२]

धर्मसंबंधी माहिती (नंबर २)

ऋषी

बहुतांस ठाऊक असेल कीं, ऋषी हा शब्द या देशांत प्रसिद्ध आहे. आतां प्राचीन ग्रंथांवरून पाहिलें तर याचे अर्थ पांच दिसतात. व्याकरणरीतीनें याचा धातूवरून अर्थ लोकांचें सुख वाढविणारा ऋषी. व पुराणावरून या शब्दाचा अर्थ असा दिसतो कीं, ऋषी म्हणजे मंत्रद्रष्टा. वेदाचे मंत्र ज्यास प्राप्त झाले त्यांस ऋषी म्हणतात. हें दुसरें लक्षण (तरी सर्व ऋषी मंत्रद्रष्टे नाहींत. त्याखेरीजही बहुत आहेत.) तिसरें लक्षण असें असतें कीं, ऋषी म्हणजे ग्रंथकार. जसा पाणिनी व्याकरणकार तो ऋषी होय. चवथें लक्षण तप करणारे ते ऋषी. व पांचवें लक्षण असें कीं, गोत्रप्रवर्तक ते ऋषी. म्हणजे हल्लींचे प्रजेचे मूळ पुरुष. आतां आलीकडे हें ऋषी-मंडळ नाहीं असें लोक मानूं लागले आहेत. विश्वामित्र, वशिष्ठ इत्यादिकांचे वंशाचे लोक प्रस्तुत जरी आहेत

तरी ते आपल्यास ऋषी म्हणवीत नाहींत. ऋषी हीं प्राचीन काळचीं मनुष्यें असून तीं शाहाणीं, उद्योगी, आणि भ्रमिष्ट होतीं, व त्यांचे बरोबरीचे त्यापुढें शंकराचार्य, विद्यारण्य, इत्यादि वेदाचा अर्थ करणारे असे जरी पुरुष झाले, तरी त्यांस ऋषी म्हणत नाहींत, असें दिसतें. व यांचें कारण काय तें कळत नाहीं. आतां कितीएक लोक अशी शंका घेतील कीं, पूर्वीचे ऋषींचें सामर्थ्य वेगळ्या तऱ्हेचें होतें तर तें ठीकच. कारण बहुतकरून आलीकडील ग्रंथांत ऋषींचें महत्त्व वर्णन केल्यावांचून एक अध्यायही सोडलेला नाहीं व पुराणें लिहिलीं त्यांचे रचनेस तर राक्षस, दैत्य, व त्यांचे मधूनमधून ऋषी हे आधारभूतच आहेत. त्यांतील एकास काढलें तर सर्व गोष्ट खालीं बसेल. रामायण पाहावें त्यांत ब्राम्हणाच्या शापानें दशरथ मेला. व भगीरथाचे पूर्वज त्याच्याच शापानें मेले, अशा कथा निघतात. भारत काढिलें तर त्यांत पंडूस शाप ब्राम्हणाचाच होता, असें आहे. भागवत काढिलें तर परिक्षिती ब्राम्हणाच्याच शापानें मेला. व यादवकुळाचा विध्वंस गरीब ब्राम्हणाचेच शापानें झाला, असें वर्णन आहे. याप्रमाणें प्रत्येक ग्रंथांत ऋषीचें महत्त्व नाहीं असें नाहींच. परंतु ह्या सर्व पोकळ गोष्टी ग्रंथ लिहिणारांनीं केवळ स्वजातीचें महत्त्व वाढविण्याकरितांच लिहिल्या व याचा पुरावा त्याच ग्रंथांत आहे. परंतु तें खरें स्वरूप सदरील शंका घेणारांचे लक्षांत येत नाहीं. असो. ऋषींचे आशीर्वादानें पूर्वीं लोकांस उत्तम फळें मिळत होतीं. व त्याप्रमाणें हल्लींही ब्राम्हणांचे आशिरवादानें मिळतात, अशी लोकांची समजूत आहे. व याच कारणाकरितां त्यांस तृप्त करण्यास लोक पैसा खर्च करितात; व हें असें जरी आहे तरी ब्राम्हण आपल्यास हल्लीं ऋषी म्हणवित नाहींत. आतां स्तोत्रें पाहिलीं तर प्रत्येक स्तोत्रास व मंत्रास ऋषी लावला असतो, तो त्याचा कर्ता होय हें प्रसिद्ध आहे. जसा रामरक्षेचा कर्ता बुधकौशिक, शिवकवचाचा ऋषभ, व गीतेचा व्यास. यावरून ऋषी म्हणजे ग्रंथकर्ते असें ठरतें. तेव्हां या न्यायानें आलीकडील ग्रंथकारांसही ऋषी म्हणावयास बाध काय? असा आमचा प्रश्न आहे. म्हणजे मराठी भाषेचें व्याकरण करणारे दादोबा पांडुरंग यांस पाणिनीप्रमाणें ऋषी कां म्हणूं नये? व रामप्रसादासारखे कायद्याचे ग्रंथावर व्याख्या करणारे यांस ऋषित्व कां नसावें? याचें धोरण आम्हांस इतकेंच दिसतें कीं, ग्रंथकर्त्यांची ज्योती जेव्हांपासून मालवली तेव्हांपासून लोक मागील ग्रंथकारांस ऋषी म्हणूं लागले. व पुढें ग्रंथ करीनातसे होऊन ब्राम्हण आळसाचे फेऱ्यांत पडले. व त्यामुळें ऋषित्व म्हणजे कांहीं विलक्षण आहे, असें त्यांणीं मानिलें. पुढें निर्णयसिंधू इत्यादि जुन्या ग्रंथांवरून कांहीं ग्रंथ झाले. परंतु त्यांत नवीन कांहींच नाहीं. म्हणजे धर्मशास्त्रावर आलीकडे जे ग्रंथकार झाले, त्यांणीं कांहीं नवीन केलें नाहीं. त्यांची मेहनत हल्लींचे गणेश बाबाजी माठे व नारायण मोरेश्वर केळकर यांच्या कायद्यासंबंधी व्युत्पत्तीप्रमाणें होय. म्हणून तशाकाळीं लोकांनीं मागील नवीन ग्रंथ व नवीन कायदे करणारे जे ऋषी त्यांची बरोबरी पुढील ग्रंथकर्त्यांस दिली नाहीं,

असें दिसतें; व तसें करणें सयुक्तिकही आहे, असें आम्हास वाटतें. परंतु आतांचे कालांत जे कितीएक नवीनच ग्रंथकर्ते उद्भवले आहेत व ज्यांणीं व्याकरण, गणित इत्यादिकांवर ग्रंथ रचले आहेत त्यांस ऋषित्व नसावें, असें आम्हांस वाटत नाहीं. आतां कोणी म्हणतील कीं, मागील ऋषींनीं नवीन विषय काढिले तसें या ग्रंथांस नूतनत्व नाहीं, तर यावर आमचें म्हणणें असें आहे कीं, पाणिनीचे पूर्वी व्याकरणें पुष्कळ होतीं व त्यांचे आधारानेंच त्याणें सूत्र केलें, तरी त्यास ऋषी म्हणतात. तेव्हां याचें कारण काय? तसेंच स्मृतीच्या पाठीमागूनही स्मृती झाल्या आहेत. मग त्यांस नविनासारखें मानून त्यांचे कर्ते ऋषी ते कां धरिले; तेव्हां या एकंदरीवरून आम्हांस असें वाटतें कीं, आलीकडील ग्रंथकारांसही ऋषी म्हणण्यास कांहीं बाध नसावा. आंतां या आमच्या मतावर पंडित जन काय म्हणतात तें पाहूं.

[नंबर १५३]

धर्मसंबंधीं माहिती (नंबर ३)


क्षेत्रें व तेथील ब्राम्हण

हिंदुस्थानांत बहुत गांवांस क्षेत्रें अशी संज्ञा आहे. क्षेत्रशहराचा मुख्यार्थ पाहिला तर असा दिसतो कीं, ब्राम्हणसमुदाय ज्या ठिकाणीं असतो त्यास क्षेत्र म्हणतात. व दुसरें एक लक्षण म्हणजे त्या ठिकाणीं पवित्र मानिलेलें देवालय किंवा नदी असते त्यासही क्षेत्र म्हणतात. आतां या क्षेत्रांचा उपयोग काय आहे, हें पाहिलें तर यांतील भिक्षुक ब्राम्हण मोठे विद्वान असतात असें नाहीं. व तीं क्षेत्रेंही विद्येचीं ठिकाणें आहेत, असें नाहीं. तसेंच तेथें विशेष कांहीं धंदा किंवा कारखाना चालतो असें नाहीं. व तेथें मोठालीं विद्यालयें आहेत असेंही नाहीं. तेव्हां या क्षेत्रापासून मुलखाची मात्र नागवण होते, असें दिसतें. ती अशी कीं, भाविक लोक तेथें पैसा खर्च करितात. व दुसरें तेथील ब्राम्हण बहुतकरून वादीदिढीचा उदीम करित असतात. व त्यांचा मारवाड्याप्रमाणें रयतेस उपद्रव असतो. व याहून मोठा धंदा पाहाणें किंवा देशावर करणें अथवा माल दूर पाठविणें अगर हुंडीपत्र लिहिणें वगैरे कामापुरतें या ब्राम्हणांस ज्ञानही नसतें. व त्यांस तें समजत नाहीं. हें काम गुजराथी लोक मात्र समजतात. ब्राम्हणांचा धंदा इतकाच कीं, १० रुपये द्यावे व त्यांचे वीस घ्यावे. याप्रमाणें खतचिठीचा रोकडी व्यापार किंवा धान्याचा व्यापार ते करितात. व तोही आलीकडे बहुतकरून थकत आला. याकरितां आतां या क्षेत्रस्थ लोकांनीं कांहींतरी नवीन केलें पाहिजे. त्यावांचून त्यांची धडगत नाहीं असें आम्हास

वाटतें. क्षेत्रांतील ब्राम्हण बहुतकरून बुद्धिवान व कुशल असतात, यांत संशय नाहीं. सामान्यतः पाहिलें तर इतर लोकांपेक्षां बुद्धीनें ब्राम्हण वरिष्ठ आहेत. तसें त्यांत माध्यंदिन हे बहुतकरून अज्ञानानें व अमंगळपणानें बहुधा कुणब्याचे जवळजवळ आहेत. त्यांपेक्षां देशस्थ कांहीं बरे, व सर्वांहून बुद्धिमान कोकणस्थ आहेत असें या महाराष्ट्र देशांत प्रसिद्ध आहे व हल्लीं शाळेकडे काम करितात त्यांस ठाऊक आहे कीं, इतर लोकांशीं किती जरी कपाळकूट केली तरी त्यांचें "व्याकर्न" हें बदलून "व्याकरण" हा उच्चार शिकविण्यास मोठें संकट पडतें. यास्तव माहार, मांग इत्यादी लोकांस शिकविण्याची ज्यांणीं उमेद धरली होती, त्यांतून बहुत लोक थकले आहेत, कारण ब्राम्हणांप्रमाणें जिव्हेस संस्कार होण्यास कांहीं पिढ्या गेल्या पाहिजेत. व कितीही यत्न केला तरी माहार ब्राम्हणाबरोबर येऊं सकत नाहीं, असें त्यांस वाटतें. या एकंदर हिंदुस्थानांत ब्राम्हण वरिष्ठ असोन, प्राचीन विद्या व ज्ञान जें कांहीं या देशांत आहे, तें त्यांजपासींच आहे हें सर्व कबूल करतील. असतु. आतां त्यांची बरोबरी पारशी लोकांनीं केली आहे. किंबहुना ते पुढेंही गेले आहेत असें म्हटलें तरी चालेल. याचें कारण असें आहे कीं, त्यास अडचणी कमी आहेत व ब्राम्हण फार अडचणींत आहेत. त्यांस पुढें सरण्यास बुद्धि आहे तरी धर्माचा प्रतिबंध मागें हटवितो. त्यांचे खालीं क्षत्री म्हणजे राजपूत, त्यांचे खालीं वाणी व त्यांचे खालीं कुणबी. याप्रमाणें बहुत वर्णांचे अनुक्रमानें बुद्धीचें मान आहे. आम्हांस असें वाटतें कीं, या क्षेत्रस्थ ब्राम्हणांनीं विद्या वाढविण्याचा प्रयत्न व्यासाचे कारकीर्दीपासून आलीकडे कांहीं केला नसावा. व लोक जो धर्मादाय वगैरे करतात तो विद्यावृद्धीकरितां किंवा ग्रंथालयाकरितां करतात असें नाहीं. केवळ श्राद्धादिक करून देवब्राम्हणांची वांछा तृप्त करण्याकरितां करितात. आणि क्षेत्रस्थ ब्राम्हण ही प्रवृत्ती फिरविण्यास बिलकुल इच्छीत नाहींत. उलटें त्यास अधिकाधिक उत्तेजन देतात. असतु. आतां दुसरे देशांकडे पाहिलें तर विलायतेंत वगैरे मोठालीं गांवें आहेत, पण त्यांतून कोणाची प्रसिध्धी यांत्रीक कारखान्यानें आहे. कोणाची प्रसिध्धी विद्यालयानें आहे. एक केंब्रिज म्हणून गांव आहे त्यांत अठरा कालेजें आहेत व आमचे सर्व मुंबई इलाख्यांत सारीं दोन कालेजें आहेत. आतां याविषयीं विचार पाहातां असें दिसतें कीं, आमचे देशांत विद्यावृध्धीकरितां जो पैसा लागावा, तो या क्षेत्रस्थ ब्राम्हणांनीं भोजनभाऊपणांत खाऊन टाकला. आम्ही त्यांस खाऊं नका असें म्हणत नाहीं. कारण खाण्यास सर्वांस पाहिजे. परंतु त्याचा योग्य मोबदला त्यांणीं दिला पाहिजे. बरें तो मोबदला श्राध्धसंकल्प सांगणें व वर्षफळ सांगणें हाच कीं काय? मोठालीं विद्यालयें आतां उत्पन्न झालीं आहेत व त्यांत नाना तऱ्हेच्या विद्या शिकवितात व त्या फार उपयोगी आहेत. हें सर्वतोमुखी श्रवणीं पडतें. तर असा लौकिक त्या क्षेत्रस्थांनीं मिळऊं नये, आणि नेहमी कोपऱ्यांत बसून राहवें, कोणी येईल त्यापासून मात्र निघेल तेवढें काढावें, हें त्यांस विहित आहे कीं काय? पूर्वीचे क्षेत्रस्थ

ब्राम्हण जे होते त्यांणीं आमचें म्हणजे लोकांचें यासारखें कांहीं फुकट खाल्लें नाहीं. त्यांणीं वैद्यकावर, ज्योतिषावर, गणितावर, मोठमोठाले सिध्धांत रचून ठेवून लोकांवर उपकार केले आहेत आणि आतांचे क्षेत्रस्थ ब्राम्हणांचे पुंज मात्र दिवाभीताप्रमाणें विद्येपासून व ज्ञानापासून पराङ्मुख होत्साते दूरदूर पळतात. वास्तवीक म्हटलें तर, लोक यांस द्रव्य देतात, व नेहमीं भोजनानें तृप्त करतात. तर त्याचा मोबदला व्हावयास विद्यावृध्धीचें काम ब्राम्हणांनीं उचलावें. इंग्रजांनीं नवे शोध आणिले आहेत ते काय आहेत, याचा विचार करावा. व घेण्याजोगें असेल तें त्वरित घ्यावें आणि प्राचीन गोष्ट जी अशुध्ध असेल ती टाकावी. आतांच ज्योतिष, वैद्यक, भूगोल, गणित हीं कशीं आहेत व मागील कशीं आहेत, हें तपासावें. मागाहून ज्यांणीं हे सिध्धांत ठरविले, त्यांणीं शोध लावल्यावांचून हे ठरविले असतील काय? तसेंच ग्रहांचें बहुत दिवस अवलोकन केल्यावांचून ग्रहण समजतां येईल काय? त्याचप्रमाणें औषधीचे गुण शोधाशिवाय सांपडतील काय? तिकडे लक्ष लाविल्याशिवाय यापैकीं कांहीं व्हावयाचें नाहीं. असें असोन आतांच्या ब्राम्हणांची व्यवस्था पाहावी तर ती फारच चमत्कारीक आहे. तस्मात् हे ज्ञानवृध्धीस अगदीं प्रतिकूल होऊन गेले आहेत. तेव्हां यांचें महत्त्व ईश्वरानें जें हरण केलें, त्यांस कारण यांचे हेच. किंवा दुसरें कोणी आहेत काय? नाहीं.

आत्मैव ह्यात्मनो बंधुः
आत्मैव रिपुरात्मनः।



[नंबर १५४]

धर्मसंबंधी माहिती (नंबर ४)

सुतक

आपले पूर्वजांचे वेळच्या चालीरिती त्यांचें नांव आचार. होमहवनापूर्वी स्थालीपाक म्हणून एक अग्निकार्य आहे. त्यांत साळी घेऊन अग्नीजवळ कुटून कृष्णाजिनावर म्हणजे हरणाचे कातड्यावर पाखडून तांदूळ करावे आणि ते शिजवून त्या भाताचा होम करावा, असा विधी आहे. आतां याचें मूळ पाहिलें तर, ऋषी वगैरे जे रानांत राहून तांदळाचीं शेतें करून नित्य तांदूळ कुटून खाणारे व ज्यांच्या बायकांस तांदूळ करण्याची नित्य संवय, त्यांस हें सहजच असेल व अरण्यामध्यें हरिणांचीं कातडींही विपुल, तेव्हां सुपाऐवजीं त्यांवरही काम चालत असेल. परंतु आमचे हिंदुलोक जुन्या चालीचा संग्रह करणारे जबरदस्त पडले, यामुळें पटवर्धनांसारखे ब्राम्हण सरदारांस जेव्हां स्थालीपाक करावा असें वाटतें, तेव्हां त्यांच्या कुटुंबास तर मुसळास हात

लावण्याची संवय नसते. म्हणून या गोष्टीचें संकट पडतें. तेव्हां मग असें करितात कीं, तांदूळ आणून कृष्णाजिनावर ठेवितात. आणि एक नांवाचें उखळ केलेलें असतें, त्यांत बाईसाहेबांचेबद्दल गरीब उपाध्या त्या उखळांत तांदूळ घालून कांडितो आणि संस्कार झाला म्हणून सांगतो. ही चाल सुज्ञ लोकांस ठाऊक असेलच. अस्तु. ही गोष्ट सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, जुन्या चालींत काळानें जरी कांहीं अर्थ नाहींसा झाला आहे, तरी आचारांत त्या राहिल्या आहेत. याविषयीं आणखीही पुष्कळ उदाहरणें देतां येतील. परंतु त्यांचे भरीस न पडतां आपण आपले योजलेले विषयावर येऊं. सुतक म्हणून काय आहे याविषयीं विचार केला असतां इतकेंच दिसतें कीं, गोत्रांतील पुरुषांचे मरणामुळें गोत्रांत विपत्ती व विशेष कर्म प्राप्त होतें. त्याचा शेवट करण्याकरितां कर्मास सुटी देणें यांचें नांव सुतक. पूर्वी ब्राम्हण वगैरे ज्ञातींचीं गोत्रें बहुतकरून एक ठिकाणीं असत व अद्याप एका पुरुषाचे शंभर दोनशें पुरुषपर्यंत विस्तार जागोजाग आढळतात. तसेंच ज्या देशांत परचक्रें येऊन गर्दी झाली नसते, व स्वाभाविक वसाहत होते, तेथें असाच क्रम होतो. तेव्हां त्यांत दरएक ज्ञातीस कर्में नेमलेलीं असतात. व व तीं सकाळीं उजाडल्यापासून सुरू होतात. तेव्हां तीं, व मृताप्रकर्णी जीं विशेष कर्में तीं, यांचा परस्पर गोंधळ होईल म्हणून नित्यकर्माचा लोप करण्याकरितां हें सुतक म्हणजे अशौच योजिलें आहे व याचा उद्देश इतकाच दिसतो कीं, विशेष कर्म शेवटास नेऊन नंतर आपले नित्याचे स्वकर्मावर नियुक्त व्हावें. आणि असा मतलब जर नसेल तर हा नियम करणारे वेडे होते. व त्यांनीं ही उगीच अडचण उत्पन्न केली असें म्हणावें लागेल. परंतु कारणावांचून मंदजनही कोणाच्या कामास प्रवृत्त होत नाहीं, असा साधारण व्यवहारांत देखील नियम आहे. तेव्हां अशौच ठरविणारांस कांहीं हेतु नसावा असें म्हटलें, तर ते मंदापेक्षांही कनिष्ठ होतील. याजकरितां सयुक्तिक व्याख्या करावी हेंच बरें असें आम्हांस वाटतें.


सुतकास अपवाद लिहिले आहेत. त्यांत सुतकी मनुष्य मरणोन्मुख झाला तर त्यास दान वगैरे कर्म करण्याची परवानगी आहे. तसेंच श्रौत, दीक्षा, लग्न, ब्रम्हचर्य, युध्द यांस सुतक मुळींच अटकाव करीत नाहीं. युध्दांत पुत्र किंवा बंधु मृत्यु पावला असें समजलें तरी युध्दाचा समारोप झाल्याखेरीज सुतक सुरू होत नाहीं. त्याचप्रमाणें श्राध्द झालें म्हणजे लग्नाची सुरवात झाली. त्यानंतर सुतक त्या कर्मास अटकाव करित नाहीं. तसाच उत्साह, तसाच यज्ञ व तसेच ब्रम्हचारी आणि सती जाणारी यांस सुतक नाहीं. इत्यादि अपवादांवरून असें वाटतें कीं, अल्पकर्म महत्कर्मास बाध आणित नाहीं, असा त्याचा नियम आहे.

कितीएकांचा तर्क असा आहे कीं, सुतक हें आदरार्थ आहे. परंतु यास धर्मशास्त्रांत मूळ सांपडत नाहीं असें वाटतें. आम्हांस याचा हेतु इतकाच दिसतो कीं, मुळीं हें नित्यकर्मास अवकाश करण्याकरितां ठरलें आणि नंतर हा विधी होऊन गेला व त्यापुढें

गोत्राचा समुदाय फुटून लोक चोहोंकडे जाऊं लागले, तेव्हां हा घोटाळा मोडण्याकरितां विशेष वचनें पुराणांतून वगैरे लिहिलीं गेलीं. तरी यांचाही मतलब इतकाच दिसतो कीं, कांहीं अडचण कमी करावी. म्हणजे, मध्यें महानद्या असून त्यांचे पलीकडून सुतक आलें तर तें क्षीण होतें. तसेंच फार दिवसांनीं आलें तर क्षीण होतें. त्याचप्रमाणें प्रीतीचेही कारणानें त्याची वृध्धी व संक्षेप होतो. तसेंच पुढें मोठें कार्य आहे तर त्याचा संक्षेप करतां येतो. म्हणजे पक्षिणीचे स्नानावर व १० दिवसांचें ३ दिवसांवर आणतां येतें. अशाविषयीं पुराणांतून वगैरे वचनें आहेत.

ब्राम्हणांमध्येंही दोन मतें आहेत. कोणी म्हणतात कीं, वैध कर्मास मात्र अशौच आहे. सामान्य व्यवहारांत अशौच नाहीं. याविषयीं शास्त्रार्थ पाहिला तर स्पष्ट नाहीं. यास्तव हा वाद असाच कायम राहणार.

इंग्लिश लोकांत पाहिलें तर ते सुतकाचें चिन्ह मात्र धारण करितात व बहुतकरून या लोकांत त्याची आदरार्थच प्रवृत्ती आहे. मुसलमान, जंगम, लिंगाईत, जैन इत्यादि सुतक मुळींच मानित नाहींत. तात्पर्य कर्मविधी ज्यांणीं सोडला त्यांस अर्थातच त्याचे प्रतिवंधक विधीही सुटले. याच न्यायानें संन्यासी मरण पावल्यास त्याचें सुतक त्याचे वंशजास येत नाहीं.



[नंबर १५५]

धर्मसंबंधी माहिती (नंबर ५)

हिंदुधर्म

हिंदु धर्म म्हणजे काय व त्याचे आधारास शास्त्रें कोणतीं व त्यांचे कर्ते कोण याविषयीं व्याख्यान करणारे थोडेच हिंदु लोक असतील. किंबहुना विद्वान म्हणविणारे ब्राम्हणांतही फार थोडे लोक सदर्हु प्रश्नाचा जाब देतील. याजकरितां आम्ही याविषयीं थोडी थोडी माहितगारी लिहिण्याचें इच्छित आहों. आतां हा विषय गहन आहे. म्हणून यांत कांहीं दुरुस्त करण्यायोग्य आढळल्यास आणि तें कोणीं कळविल्यास त्याचाही आम्ही विचार करूं.

हिंदु धर्मांत मुख्य विषय इतकाच आहे कीं, हें जग नश्वर आणि देह अशाश्वत आहे. याचा भरवसा मुळींच नाहीं. कितीही संपदा व अधिकार मिळविले तरी ते ठिकाणचे ठिकाणीं राहतात. यास्तव अशा अभरवशाचे ठिकाणीं वस्ती असतां कांहीं शाश्वत सुखाचा लाभ होईल किंवा नाहीं? व जर होईल तर कोणता उपाय केला असतां होईल? आणि मृत्यलोकीं असतां येथें जो विलक्षण आभास निर्माण झा

आहे, त्यांत लोभ, आशा, तृष्णा इत्यादि वृत्तींच्या योगानें मनुष्य श्रमला आहे. आणि नानाप्रकारचे व्यवहार अंगीकरून उपजीविका करित आहे. हाहि व्यवहार चांगल्या रीतीनें कसा चालेल? याविषयीं जो विचार व निमय त्याचें नांव धर्म.

हिंदु धर्मास मुख्य आधार श्रुती, सूत्रें, स्मृती, पुराणें इत्यादिक ग्रंथ आहेत व त्यांचे कर्ते अनेक ऋषी आहेत. या ग्रंथांचा समुदाय इतका मोठा आहे कीं, साधारण मनुष्यास त्याचा शोध लागेल असें नाहीं. यक्षानें युधिष्ठिरास प्रश्न केला कीं, बाबा धर्म कोणता? तेव्हां तोदेखील घाबरला. आणि उत्तर दिलें कीं,

श्रुतिर्विभिन्ना स्मृतिरेव भिन्ना
नानाऋषीणां मतयोपि भिन्नाः ।
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां
महाजनो येन गतः स पंथाः ॥

याचा अर्थ इतकाच कीं, अनेक प्रकारचीं मतें आहेत. त्यांत धर्म कोणता याचा निश्चय करणें दुरापास्त आहे. याजकरितां वडील चालत आले त्याप्रमाणें चालावें. याजवरून आह्मांस असें वाटतें कीं, युधिष्ठिरासारख्याचा ज्या कामांत असा जबाब झाला, त्यांत आतां अधिक चतुराई करण्याची योग्यता कोणास असेल ती असो.

कित्येकांस असें वाटत असेल कीं, ईश्वर कसा आहे याविषयीं शोध करावा याचें नांव धर्म. परंतु हा मुख्य विषय धर्माचा नव्हे. कारण ईश्वराविषयीं पत्ता मुळींच लागणें नाहीं. भारतांत म्हटलें आहे कीं,

यस्यांतं न विदुः

याचा कोणास ठिकाण लागावयाचा नाहीं. यास्तव आपलें कर्तव्यकर्म कोणतें हाच मुख्य विषय आहे.

आतां ईश्वराविषयीं प्रतिपादनाचे ग्रंथ हिंदु लोकांमध्यें आहेत. न्याय, सांख्य, वेदांत हीं शास्त्रें करणारांनीं केलीं आहेत. परंतु ते विषय धर्माचे नसोन तर्काचे आहेत व ती खटपटही ज्यास धर्मतत्त्व जाणावयाची इच्छा असेल त्यास व्यर्थ आहे. कारण ईश्वर नाहीं असा निश्चय करणारा पंडित कोणी क्वचित असेल; परंतु बहुत लोक तसे नाहींत. यास्तव ईश्वर आहे हेंच मत घेऊन आम्ही विचार करितों.

हिंदु धर्मांत तीन कांडें आहेत. एक भक्ती, दुसरें कर्म व तिसरें ज्ञान. यांपैकीं भक्त आणि कर्मनिष्ठ हे सगुण उपासक आहेत. आणि ज्ञानी हे निर्गुण परब्रम्ह जाणतात.

कलियुगांत भक्ती विशेष प्रशस्त कल्पिली आहे व आलीकडील ग्रंथांत याविषयीं वचनें फार सांपडतात आणि महाराष्ट्र देशांत तुकाराम इत्यादि जे साधु झाले त्यांनीं हेंच प्रतिपादन केलें आहे.

कर्मास आधार श्रुतीचा असोन ब्राम्हणांनीं कर्माचा अधिकार मुख्यत्वेंकरून आपल्याकडे घेतला आहे. इतरांस कर्म आहे तें यत्किंचित आणि ब्राम्हणद्वारा आहे.

ज्ञान म्हणजे, जितकें मिथ्या आहे तितक्यावरील मन काढून जें खरें आहे त्याजवर लक्ष ठेवणें याचें नांव ज्ञान, हिंदुधर्मामध्यें या मार्गास मोठी योग्यता आहे व यावांचून मोक्ष नाहीं, असें सर्वांचें मत आहे. हें मत स्थापण्याचे कामीं आलीकडे शंकरस्वामींनीं फार मेहनत घेतली व त्यांचे पुढें विद्यारण्य इत्यादि झाले. त्यांणींही तेंच प्रतिपादन केलें.

भक्तीचें बाह्य लक्षण कीर्तन, कर्माचें बाह्य लक्षण शौच आणि ज्ञानाचें बाह्य लक्षण त्याग आहे.

कोणाचे मतें दोनच मार्ग आहेत. एक प्रवृत्ती आणि दुसरा निवृत्ती. ते प्रवृत्तींत भक्ती आणि कर्म यांचा समावेश करितात आणि निवृत्तींत ज्ञानमार्ग. असें करण्याचें कारण ते असें सांगतात कीं भक्ती आणि कर्म या दोहोंचा, ईश्वर सगुण कल्पून त्याचा गौरव करावयाचा हेतु एकच आहे. म्हणून त्याचें नांव प्रवृत्ती. जसें कोणी भक्तानें एक मूर्ती करून तिचें ध्यान करून अर्चन केलें. आणि दुसरे कोणी ब्राम्हणानें अग्नी दीप्त करून त्यांत तूपभाताचा होम केला, तर हे दोघेही ईश्वरास सगुण मानणारे आहेत. त्यांचे रितींत मात्र फरक असें ते समजतात. तसेंच एकजण अभंग गात बसतो व दुसरा सूत्राचे पाठ करितो; परंतु दोघांचा मतलब एकच आहे. कितीएक असें म्हणतात कीं, कर्माचा अधिकार ब्राम्हणांनीं आपलेकडे घेतला आहे. यास्तव त्यांस भक्ती उचित नाहीं. त्यांणीं कर्म करावें. कर्माचे अवघड नियम आहेत. ते सांभाळून पूर्वयुगांत ऋषींचे कारकीर्दींत जें चालत आलें तें त्यांणीं चालवावें आणि इतर ज्ञाती ज्यांस कर्माचा अधिकार नाहीं, त्यांणीं मात्र भक्ती करावी. तींत कांहीं विधी-पूर्वक कर्म नाहीं. म्हणून हलके जातीस ती प्रशस्त आहे. याजकरितां शास्त्री, पंडित यांचें मनानें भक्ती मार्ग अडाणी जातीकरितां आहे असें ठरलेलें आहे व ते त्यास विशेष मानीत नाहींत. आतां ज्ञानी जे आहेत ते या उभयतांसही अडाणी समजतात. त्यांचे मतें हीं सर्व कर्में मिथ्या आहेत. यांचा उपयोग केवळ चित्तशुद्धीपुरताच आहे. यापासून कांहीं मोठें फळ नाहीं. संन्यासी हे ज्ञानमार्गीतील लोक आहेत. हे कर्मास मानीत नसून इतर ब्राम्हणांस जे नियम आहेत ते त्यांस लागत नाहींत.

खरा आणि सत्य मार्ग असा ज्ञानाचाच आहे. दुसरे दोन्ही मार्ग अल्पमती आणि मंदमती यांचे आहेत यांत संशय नाहीं आणि या दोन्ही मार्गांत जे लोक असतात त्यांत बहुतकरून भोळे, खुळे व अविचारी हेच फार. वृध्ध, स्त्रिया, शेतकरी व त्याच मासल्याचे दुसरे लोक यांस हे मार्ग आवडतात. असें वल्लभपंथांतील व वारकरीपंथांतील वगैरे लोकांकडे नजर केली असतां सहज ध्यानांत येईल.

[नंबर १५६]

धर्मसंबंधी माहिती (नंबर ६)

कर्म आणि नामस्मरण

मागील पत्रीं आम्ही हिंदु धर्माचीं तीन कांडें वर्णन केलीं आहेत. त्यांत ज्ञानास श्रेष्ठता आहे, तेंही सांगितलें आहे. तथापि ज्ञान प्राप्त होण्यास बुध्धीस संस्कार पाहिजे. अल्पमतीचे लोकांस ज्ञान होणें अवघड आहे. याजकरितां ज्ञानप्राप्तीस दोन साधनें गणलीं आहेत. एक कर्म आणि दुसरें कीर्तन. आतां यांतील प्रमुख व सुलभ कोणतें याचा विचार करण्यापूर्वी एक गोष्टीचा विचार करणें अवश्य आहे तो असा.

कोणताही धर्म पृथ्वीवर प्रगट होतो तो प्रथमतः लोकांस ईश्वरतत्पर करण्याकरितां व दया आणि प्रीती यांविषयीं बुध्धी देण्याकरितां होतो व पुढें कांहीं काळानें लोकांचे प्रमादानें त्यांत बखेडा होऊन भांडणें होतात, दुराचारप्रवृत्ती पडते, अभिमान प्रबळ होतो, असें बहुतेक धर्मांत झालें आहे यावरून दिसून येतें. आतां हिंदुधर्मांत हें कितपत झालें आहे, याचा विचार केला तर असें दिसतें कीं, सांप्रत युगांत सर्वांचे मतें नामस्मरण हें प्रमुख आहे. भागवतांत म्हटलें आहे कीं,

कृते यत् ध्यायते विष्णुः, त्रेतायां यजतो मखैः ।
द्वापारे परिचर्यायां, कलौ तद्धरिकीर्तनात् ॥ १ ॥

अर्थ–कृतयुगाचे ठायीं ध्यानानें, त्रेतायुगीं यज्ञयागानें, द्वापारीं सेवाधर्मानें व कलियुगांत हरिकीर्तनानें मुक्ती प्राप्त होते. तसेंच भारतांत—

सर्ववेदेषु यत्पुण्यं, सर्वतीर्थेषु यत्फलं ।
तत्फलं समवाप्नोति, स्तुत्वा देवं जनार्दनं ॥ २ ॥

म्हणजे–सर्व वेदांच्या ठाईं जें पुण्य आहे व सर्व तीर्थांच्या ठाईं जें फल आहे, तें सर्व परमेश्वराची स्तुती केल्यानें प्राप्त होतें. विष्णुपुराणांत–

हरेर्नामैव नामैव, नामैव मम जीवनं ।
कलौ नास्त्येव नास्त्येव, नास्त्येव गतिरन्यथा ॥ ३ ॥

अर्थ–हरीचें नामस्मरण हेंच मुख्य जीवन आहे व कलियुगामध्यें त्यावांचून अन्य गती नाहीं.

शंकराचार्यांची उक्ती अशीच आहे कीं, "नामस्मरणं धन्योपायं भवतरणं"- संसारसमुद्रापासून तारावयास नामस्मरण हाच धन्य उपाय आहे. गीतेंत श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे कीं, "नाहं वेदैर्न तपसा." याचप्रमाणें ज्ञानेश्वर म्हणतात कीं,

वसाहत अंक क्र. [illegible], ठा. [illegible]
मनुक्रम ४४०६२ ने: निबंध...
smita १७२८ [illegible] ५।४।३३।६७

योगयागविधी, येणें नोहे सिध्धी ।
वायाची उपाधी, दंभ धर्म ॥

इत्यादि प्रत्यंतरांवरून पाहतां कर्मकांड पूर्वीचे युगांत प्रसिध्ध होतें. परंतु सांप्रत काळीं तें सांग होत नाहीं व देशकालवर्तमान पाहातां यथास्थित कर्म घडत नाहीं. याजकरितां सर्व ऋषींचा असा सिध्धांत आहे कीं, सांप्रतकाळीं परमेश्वराचे स्मरणापेक्षां दुसरा धर्म किंवा आचार नाहीं. गीतेंत म्हटलें आहे–

"लोकसंग्रहमेवापि" [अ. ३, श्लो. २०]

म्हणजे लौकिकार्थ कर्म करावें. त्यापासून मोक्षसिद्धी नाहीं व विशेषेंकरून कलियुगांत तर नाहींच.

मनुष्याचे धर्म पाहतां त्याचे तीन विभाग आहेत. एक ईश्वराविषयीं, दुसरा परकी लोकांविषयीं, आणि तिसरा स्वदेहाविषयीं. याजवर भारतांत असें वर्णन केलें आहे कीं, मनुष्याचे मागें तीन ऋणें आहेत. एक देवांचें, एक मनुष्यांचें व एक स्वतांचें. या तिहींची फेड अनुक्रमें प्रकारानें म्हणजे स्मरणानें, दयेनें, आणि सावधपणानें होते. परमेश्वरसंबंधीं जे काय धर्म आहेत, ते हरिस्मरणानें पूर्ण होतात. लोकांसंबंधीं जे धर्म ते दयाळुपणानें पूर्ण होतात. आणि स्वतांविषयीं जे धर्म ते सावधपणानें पूर्ण होतात. आतां याजवर कोणी म्हणतील कीं, नामस्मरण केलें तर मग दुसरें कांहीं कर्म करण्यास नको कीं काय ? तर याचें उत्तर इतकेंच कीं, नको हेंच खरें; मग लोकसंग्रहार्थ ज्यास जसें ढोंग करणें असेल, तसें तो करो. परंतु मुख्यार्थ स्मरण आहे व सर्व कर्म पाहातां, त्यांत तरी हरिस्मरणावांचून मुख्य भाग कांहीं दिसत नाहीं. आतां ब्राम्हण जे पूर्वापार कर्म करीत आले व कर्मावर त्यांची सर्व प्रतिष्ठा आहे, तर त्यांमध्येंही याजबद्दल वाद आहे. कोणी कर्मफळ टाकावें असें म्हणतात. परंतु त्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. किंबहुना कर्मानें चित्तशुध्धी होते, असें म्हणावें तर नामाप्रमाणें चित्तशुध्धी करण्याचें सामर्थ्य कोणत्याही कर्मांत नाहीं, असें सिध्धांत सर्वांस मान्य आहेत व त्याच सिध्धांतांचा विस्तार महाराष्ट्रदेशांत जे साधु झाले त्यांणीं केला, आणि असें ठरविलें कीं, उत्तरकर्मापासून कांहीं फल नाहीं, पण उलटें बंधन आहे, यास्तव नाम हेंच प्रमुख. याप्रमाणें पूर्वापार सुलभ धर्म व्यासादिकांनींच ठरविला. ही त्यांणीं जगावर मोठी कृपा केली आहे. आतां ब्राम्हणांखेरीज इतर लोकांस हाच धर्म प्रमुख होय, याविषयीं वाद नाहींच. फक्त ब्राम्हण मात्र आम्ही कर्मखटपटीचे अधिकारी, सबब पूर्वीप्रमाणें कर्म करूं असें म्हणतात, परंतु करित नाहींत, आणि होतही नाहीं, उगीच म्हणतात मात्र. अस्तु. नामस्मरणाचा हा सुलभ धर्म जरी स्थापला तरी त्यांत पुढें बंड झालें. तें कोणतें म्हणाल, तर वारकरी इत्यादिकांचें. यांणीं या सुलभ धर्मास पुनः अवघडपणाचें स्वरूप दिलें. अज्ञान लोक बळेंच खटपट उभी करितात व ती

दूर झाली तरी पुनः आमंत्रण करून आणतात. त्याप्रमाणें सांप्रतचे वारकरी यांणीं पंढरपूर, आळंदी येथील जत्रा, उपास, माळा, भगवे झेंडे इत्यादिक चालू केले. आणि त्यांत मुलें, वृध्ध, तरुण सर्वंच नाचतात व टाळ वाजवितात. आणि कोणी म्हणतो, मी सात दिवस उभा राहीन, विणा खालीं ठेवणार नाहीं. कोणी म्हणतो कीं, मी रात्रभर भजन करीन. याप्रमाणें तापस धर्म त्यांत मिसळून यांणीं एक नवीन कर्मच उभें केलें आहे. त्याचें नांव सप्ताह. पूर्वीचे ऋषींमध्यें जसा यज्ञ आणि सत्रें चालत, तसेच वारकऱ्यांमध्यें हे सप्ताह आणि वाऱ्या हल्लीं बळकट होत चालल्या आहेत. परंतु हा सर्व मूर्खपणा आहे, यांत संशय नाहीं. धर्माचें तत्त्व पाहातां इतकेंच दिसतें कीं, कर्माची खटपट दूर करून ईश्वराचें नांव घ्यावें. म्हणजे तितक्यांत सर्व परमार्थ होतो. असा सुलभ मार्ग काढला आहे, हें योग्यच आहे. पण नाम हें पवित्र आणि गंभीरपणानें सावध होऊन स्वस्थ अंतःकरणानें यथाकालीं घ्यावें तें सोडून हे वारकरी डोले, शिमगा, याप्रमाणें त्याचा तमाशा करूं लागले आहेत. काय सांगावें ? आडाणी शिंपी, माळी, न्हावी, परीट इत्यादि जमून अभंगाचीं कडवीं म्हणून खेळ करितात, परंतु हा मार्ग उचित नव्हे. भगवंतीं प्रेम धरावें, त्याचा गौरव करावा व आदरेंकरून त्याचें सेवन करावें. तें सोडून देऊन नाचेपोऱ्यांसारखे रात्रंदिवस भजन करणें किंवा लहान पोरें ज्यास विद्येचा गुण शिकवावयाचा त्यांस नाचावयास लावणें हें केवळ निंद्यकर्म होय; परंतु असें असतांही लोकांनीं त्या वेडेपणाचा स्वीकार केला आहे. याप्रमाणें खरें कर्म सुटून बंड उभें राहतें. याजकरितां कसाही कोणी धर्म सांगितला तरी लोकांची जशी रुची असेल त्याप्रमाणें ते त्याची व्यवस्था करितात. याजवरून असें दिसतें कीं, लोकांची रुची आणि समज हीं दुरुस्त झाल्यावांचून लोकांचा धर्म सुधारणार नाहीं. हिंदुधर्मासारिखा सुलभ धर्म आम्हांस कोणताच दिसत नाहीं. तो इतकेंच म्हणतो कीं, देवाचें नांव मात्र घ्या याहून दुसरें साधन नको. भक्तीनें ईश्वर कृपा करून ज्ञान देतो. संसारिक जिवास नामस्मरण मुख्य साधन आहे. ज्ञान हें मुख्य खरें, परंतु त्याचें साधक कर्म किंवा कीर्तन. तेव्हां त्याचा विचार पाहातां सांप्रतकाळीं कीर्तनच प्रमुख असें व्यासादिकांनीं ठरविलें. कीर्तनापासून सुबुध्धी प्राप्त होते व ज्ञानही प्राप्त होतें.

गीता—

"ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते" [अ. १०, श्लो. १०]

तसेंच नाम घेण्यास पुण्याहवाचन व गृहमखादिक अनुष्ठान यांचें साधनसूत्र कांहीं लागत नाहीं. तेव्हां आणखी याहून सुलभ काय असावें ? आतां जर या सुलभ मार्गानें लोक जाणार नाहींत, तर उपदेशकांनीं काय करावें ? याहून कोणता धर्म सुलभ आहे ? परंतु लोक त्याजवर बंड उभें करितात. शेतांतील गवत दरसाल उपटीत गेलें, तरी पुनः उगवत असतें. त्याचप्रमाणें लोकांचें मन आहे. तेणेंकरून धर्माची ग्लानी होते व

तेव्हां तेव्हां त्यास बुध्धिवान् उपदेश करण्यास तयार होऊन वाटेवर आणतात. तें गेलें कीं पुनः बंडाचें बंड कायम आहे. याप्रमाणें जोंपर्यंत अज्ञान आहे, तोंपर्यंत असें चालेल. युरोपखंडांत जसजशी ज्ञानाची वृध्धी झाली, तसातसा धर्म सुधारत गेला तरी अद्याप शूळ, प्रभुभोजन, जलसंस्कार, विश्रांतिदिवस, जामिनकी, इत्यादि खुळें आहेतच. मुसलमानांत पाहिलें तर तिकडेही मक्का, रमजान, निमाज, पयगंबर हे आहेत. आणि हिंदुधर्माचें तत्त्व पाहातां कोणतेंच खूळ त्यांत नाहीं. नामस्मरण मात्र सांप्रत काळचा धर्म आहे आणि तें रितीप्रमाणें केलें तर त्यास कोण खूळ म्हणेल?

[नंबर १५७]

धर्मसंबंधी माहिती (नंबर ७)

धर्मतत्त्व

धर्म या शब्दाचा अर्थ हिंदु लोकांनीं यथार्थ काढिला आहे. एकंदर मनुष्यांचीं क्रियाकर्में याचें नांव धर्म. त्यांत मग वेदोक्त धर्म, कुलधर्म, सध्धर्म, निंद्य धर्म, असे त्या क्रियेचे लक्षणांवरून पृथक् पृथक् वर्ग केले आहेत. परंतु एकंदर धर्माचा हेतु सुख. याहून दुसरें धर्मापासून कांहीं मिळवावयाचें नाहीं, असें दिसतें. यास प्रमाण—

श्रुतिस्मृतिसदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
सम्यक् संकल्पजः कामः धर्ममूलमिदं स्मृतं ॥ १ ॥ —याज्ञव०
अनेन प्रसविष्यध्वमेष वोस्त्विष्टकामधुक् ॥ —गीता० [३·१०]

प्रत्येक जिवाला अशी काळजी असते कीं, मला सुख कसें मिळेल. प्रत्येक प्राणी जन्मापासून सुख धुंडित असतो. उन्हाळ्यांत गाई रानांत हिंडत हिंडत एखादें आंब्याचें झाड पाहातात, आणि त्याचे शीतळ छायेखालीं येऊन बसतात. याचा हेतु पाहिला तर सुखच आहे. कितीएक उमेदवार उन्हांतून धांवत असतात. हे कां श्रम करितात असें मनांत आणिलें तर सुखाचें मागें धांवतात, असें दिसतें. राजे लढतात, शिपाई प्राण देतात, हे तरी सुखाच्या हेतूनें. एक मनुष्य खून करितो आणि न्यायाधीश त्यास सुळीं देतो. हे दोघेही सुखाचेच शोधक, पंढरपूरच्या, काशीच्या वाटेवर उन्हातान्हांतून, चिखलांतून लोक धांवतात, हे तरी सुखाकरितांच घर गाहाण ठेऊन पिंडक्रिया करितात; यांत तरी मतलब इतकाच कीं, सुख व्हावें. म्हातारी बाई जीव तोडून व्रतें, उद्यापनें करित्ये, आणि वृद्ध अग्निहोत्री मुलुखावर भीक मागून यज्ञाची तयारी करतो,

ही तरी धर्मार्थ म्हणजे सुखार्थच सर्व खटपट होय. गांवांत जरीमरी आली म्हणजे ब्राम्हण होमहवन करितात. आणि कुंळबी जत्रा करितात. या तरी सुखार्थच होत.

पदार्थांचें जडत्व जाऊन त्यास चैतन्य प्राप्त झालें कीं, स्वभावतः त्याची प्रेरणा सुखाकडे होती. हा ईश्वरनियमित पिंडस्वभाव आहे. मूल उपजलें कीं, त्याणें क्षुधेचा टाहो काढिलाच. वासरूं उपजलें कीं, प्यावयास हुंबारूं लागतें. यावरून असें दिसतें कीं, सर्व लोक अर्थी तत्पर आहेत.

अर्थ दोन प्रकारचे; एक इहलोकींचा व दुसरा परलोकींचा. त्यांत इहलोकींचे अर्थाचे मार्ग तीन : १ शेतकी, २ व्यवहार, आणि ३ चाकरी. परलोकींच्या अर्थ-प्राप्तीचींही तीन साधनें कल्पिलीं आहेत : निग्रह, २ प्रतीक व ३ भक्ती.

आतां इहलोकींचे मार्ग लोकांस ठाऊकच आहेत. सबब ते सोडून देऊन परलोकींचे मार्गांविषयीं वर्णन करूं.

निग्रह म्हणजे आपले जिवास व देहास दंड करून घेऊन त्याजवरून ईश्वरी दंडांतून सुटलों असें मानणें. या प्रकाराची क्रिया, उपवास, संस्कार, तप इत्यादि.

प्रतीक म्हणजे आपलें अरिष्ट दुसऱ्या जिवावर घालून ती गोष्ट ईश्वरानें मान्य केली असें मानणें. या प्रकारच्या क्रिया, यज्ञ, बळी, जत्रा इत्यादि.

भक्ती म्हणजे आर्जव करून ईश्वराची प्रसन्नता झाली, असें मानणें. या प्रकारच्या क्रिया, पूजा, जप, नवस, दान ईत्यादि.

मनुष्यांनीं ईश्वरास आपले वृत्तीवर नजर देऊन त्याप्रमाणें तो आहे, असें मानिलें आहे व त्या अभिप्रायावर सर्व क्रिया चालल्या आहेत. वास्तविक पाहिलें तर, तो कसा आहे याचें ज्ञान मनुष्यास अद्यापि झालें नाहीं व पुढेंही कधीं होणार नाहीं. कारण—

यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥

असें म्हणून, वेद, शास्त्रें, पुराणें, कवी, पंडित सर्व थकले आहेत. परंतु मनुष्यांचे बुध्धीस स्थल सांपडेना, तेव्हां त्यांनीं आपले स्वभावावर व वासनेवर दृष्टी देऊन त्या आधारानें ईश्वरास लक्षिलें आणि देवाची कृपा होण्याकरितां नांवावर हट्ट धरून बसणें, उपास करणें, धरणें, पारणें, पंचाग्नीसाधन, ऊर्ध्वबाहू, शरशय्या इत्यादि साधनें मानलीं म्हणजे माणसास जशी दया किंवा कंटाळा येतो, तसा ईश्वरासही उपजेल आणि तो कृपा करील, असा मनांतील हेतु. परंतु दृष्टांतांत कधीं असेंही घडतें कीं, ईश्वर कृपा करीत नाहीं. आणि वरचे वर हात वाळून जातो. किंवा तप करितांकरितांच प्राणी मरतो, तरी कांहीं होत नाहीं. तथापि आशाबध्ध जीव उपास करितात आणि सुखप्राप्ती होईल, अशी इच्छा धरितात.

तसेंच मोबदला देणारे लोकही असें समजतात कीं, देव भुकेला आहे व तो मला

मारावयास इच्छितो आहे. तर त्याला आतां एक लहानसें बकरें दिलें म्हणजे तेवढ्यावर त्याची तृप्ती होऊन तो आपणांस सोडील, या हेतूनें पर्जन्यासाठीं, जरीमरीसाठीं गांवो-गांव टोणगे मारून जत्रा करितात व कितीएक देवाजवळ बकरीं मारतात. तसेंच कोणी रोग्याबरून कोंबडी ओवाळून टाकितात. ब्राम्हणही श्रौतविधीनें पशु मारून त्याच्या वपा आणि हृदयकमळें देवांचीं नांवें घेऊन अग्नींत टाकितात व तेणेंकरून देवाची तृप्ती होऊन तो पाऊस पाडतो, धान्यसमृध्धी करितो, असें मानितात. क्रिस्तियन लोकही देवास बळी पाहिजे असें मानितात, व सर्व गाबद्दल त्याणें आपला पुत्र येशु ख्रिस्त बळी घेऊन जन्मा[गा]च्या उध्धाराचा रस्ता खुला केला असें मानितात.

तसेंच भक्तिमार्गांतील लोक देव संतुष्ट होण्याकरितां दान, धर्म करितात, त्याचें नांव घेऊन स्तोत्रें करितात, भजनपूजन करितात, आणि देव स्तुतिप्रिय आहे असें समजून आपले स्तुतीनें तो खुष होतो असें मानितात.

ज्या ठिकाणीं द्रव्याची देवघेव होते, त्या ठिकाणीं दलाल, हमीदार, हिमायती हे लोक उत्पन्न होतात व लाभाचे आशेनें आपल्यास कांहीं मिळून निर्वाह चालेल अशा हेतूनें शिफारसी घेऊन मध्यस्थी करण्यास येतात. तसेंच धर्मांत लोक बराच खर्च करितात, असें पाहून तेथेंही भट आणि पुरोहित इत्यादि दलाल व हमीदार होऊन पुढें उभे राहिले व लोकांस सांगूं लागले कीं, आम्हांस जेवावयास घातलें म्हणजे त्याचे हजारपट तुम्हांस मिळेल. आम्हांस उदकुंभ दिला म्हणजे तुमच्या मृत पुरुषास उत्तम पाणी पिण्यास मिळेल. आम्हांस शय्या दिली म्हणजे तुमच्या पितरांस स्वर्गीं उत्तम बिछाना तयार होतो, असें सांगून केवळ दीन गरीब यांचे वांट्याचा जो धर्म त्यांतून भटांनीं व पुरोहितांनीं चोरी करून त्या चोरीवर आपला निर्वाह करण्याचा धंदा ठरविला. ही गोष्ट नुसत्या हिंदुस्थानासच लागू आहे असें नाहीं, साधारण पृथ्वीवरील एकंदर लोकांस लागू आहे. युरोपामध्येंही असे पैसा घेऊन विमान दाखविणारे आहेत व त्या धंद्यास त्यांणीं अनेक साधनें केलीं आहेत. पुस्तकें, दृष्टांतिक कथा, हरएक क्रियेची पध्धत, असे दस्तुर घालून त्या आधारानें साळे-भोळे लोकांस थापा देऊन काय निघेल तें काढतात. भोळे पुरुष व अज्ञानी बायका यांस असें वाटतें कीं, येथें मृत्युलोकीं आपल्यास किती दिवस राहण्याचें आहे. तेव्हां पुढील तयारी करण्यास लागावें व त्याच घोरणानें त्यांचा जमाखर्च ठेवणारा भट वरचेवर त्यांस सुचवून देण्यास तयार असतोच. तेव्हां बायाबापड्यांस व भोळ्यांस असें वाटतें कीं, यांचे चोपडींत जितकी जमा होईल, तितकी आपली ठेव आपल्यास पुढें उपयोगी पडेल. अशा बुध्धीनें तीं धर्म करितात. त्यांतही जितके लोक अज्ञान तितक्यांस ते भय जारत घालतात. यांतून कोणी विधवा असली म्हणजे भटांचें तें मोठें कूळ; कारण तिचे मनांत हा वारंवार ठसवीत असतो कीं, पूर्वजन्मीं ब्राम्हणास कांहीं दिलें नाहीं. याजमुळें वैधव्य प्राप्त झालें. तर आतां या जन्मीं असें करा कीं, सात जन्म चांगल्या संपत्तीवान

भ्रताराबरोबर नांदावें. असें होण्यास अमुक व्रत, अमुक उद्यापन, सोन्याची प्रतिमा, रुप्याची दुर्वा, मग त्यांत "अधिकस्य अधिकं फलं' असें अधिकाधिक सांगून हमी पटवितात. कितीएक ठिकाणीं भटांनीं तरी अशा बारीक संधी शोधून काढिल्या आहेत कीं, त्या वेळेस पाषाणासही द्रव यावा. श्राध्धाचे दिवशीं बाईनें जर भटास जेवावयास न घातलें व यथाशक्ती दक्षणा न दिली तर मयत नवरा वाट पाहून पाहून उपाशी माघारा जातो, असें भटांनीं तिच्या डोक्यांत भरविलेलें असतें. तेव्हां बाईस असें वाटतें कीं, कसेंही असो, माझ्या प्रियपतीचे तोंडीं एवढा सुग्रास पडो. असें झालें कीं, पुरोहिताचें काम जमलेंच. मग बाईचा नवरा मरून पन्नास वर्षें झालीं असलीं तरी चिंता नाहीं, त्याच्या तृप्तीचे सरटिफिकीट शिक्केमोर्तबानिशीं भटाकडे तयार होतें.

असो. सर्व व्यवहारांत मनुष्य आपली तजवीत करितो. तशी धर्माचे बाबदींतही तो न करील असें नाहीं. जेथें लाभ दिसेल तेथें बगळ्यासारखीं माणसें टपतात व मग फसवून, भुलथाप देऊन वगैरे कसेतरी प्रकारें स्वकार्य साधितात. परंतु आतां दिवसें-दिवस जगाचे डोळे उघडत चालले आहेत, तों तों या प्रकारचा धंदा कमी पडेल. कारण तेल सरलें म्हणजे दिवा मालवतो, तद्वत अज्ञानावर उभी राहिलेली इमारत अज्ञानाचा नाश होत होत चालला म्हणजे ढासळणारच. आतां लोकांस समजूं लागलें आहे कीं, दाहा हजार रुपये खर्चून रस्ता बांधावा व त्याच्या उत्सर्गाची कांहीं जरूर नाहीं व कोणी म्हणतो कीं गरीब लोकांस धर्मशाळा बांधावी यामध्यें भटाची गरज काय? भटास बोलाविलें तर निदान कुंडमंडप तरी असावा व उत्सर्ग असावा. म्हणून दाहा हजारांतील निदान पांचचारशें तरी ते आपलेकडे ओढितील; परंतु लोकांस आतां समजूं लागत चाललें आहे कीं, भटांस पांचशें रुपये न दिले म्हणजे दाहा हजारांचा रस्ता व्यर्थ जातो, म्हणजे त्याजवर चालतां येत नाहीं, किंवा चिखल होतो असें नाहीं. आणि भटांवांचून ईश्वराजवळ तो धर्म रुजु होत नाहीं, अशी जी त्यांनीं लोकांस पूर्वीपासून समज घालून दिली आहे, ती दिवसेंदिवस आतां जात चालली आहे.

आतां तीन उपाय जे लोकांनीं योजिले आहेत, त्यांपैकीं खरा भाग म्हटला म्हणजे नीतीनें वागणें इतकाच नियम खरा. आपले वर्तणुकीनें दुसऱ्यास उपद्रव न व्हावा व आपलें यथान्याय सुख आहे, त्याची हानी होऊं नये, इतका निग्रह इहलोकीं अवश्य आहे. आणि तितका परमार्थासही पुरेल असें म्हणण्यास चिंता नाहीं. दुसरें, प्रतिक जें आहे, तें भ्रामक आहे यांत संशय नाहीं. गरीबावर आपले दुःखाचा भार घालणें हें सन्मार्गास सर्वथा विरुध्ध दिसतें. आणि तिसरें, जें भक्तिसाधन, त्यांत इतकें खरें दिसतें कीं, दयेस पात्र जे प्राणी त्यांवर दया करणें व ईश्वराच्या दयेचें स्मरण कृतज्ञता-पूर्वक नेहमीं मनांत राखणें. हेंच भक्तीचें मूळ कारण, आणि हें जाणेल तो चित्ताचा नेम उल्लंघन करणार नाहीं व न्यायनीतीमध्यें तो स्वहित पाहील, इतका भाग खरा आहे. बाकी आळंदीपासून पंढरपुरापर्यंत ओरडत जाणें याचें नांव काय असेल तें

आम्हांस समजत नाहीं. कदाचित भोळे लोक भक्तीनें, निश्चयानें, किंवा लोकांचें पाहून हेंही करीत असतील. परंतु ही अज्ञान भक्ती असोन लोकांस उपद्रवकारक आहे. तस्मात्--

परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्।

हें वाक्य व देशकाळव्यवस्था मनांत आणून जें करणें तें सुयुक्त आणि सार असें म्हटलें जातें व बाकी सर्व उपहास्पद होतें. हाच याचा निर्णय होय, असें आम्हांस वाटतें.

[नंबर १५८]

धर्मसंबंधी माहिती (नंबर ८)

हिंदुधर्मांतील कर्मकांड

हिंदुधर्मांतील कर्मकांड सांप्रतचें युगांत रद्द झालें आहे, असें धर्मशास्त्राचीं पुस्तकें जे अवलोकन करतील त्यांचे सहज लक्षांत येईल. याचें कारण सांप्रतकाळीं कोणतेंही कर्म सांग होत नाहीं ही गोष्ट व्यक्त आहे. आतां कितीएक ब्राम्हणांचा पोट भरण्याचा धंदा कर्मावर आहे याजकरितां त्यांचा आग्रह आहे, परंतु या आग्रहास शास्त्राची अनुकूलता नाहीं. अग्निसाध्य कर्में म्हणजे सप्तसंस्था, सत्रें, इत्यादिक यांचा कलियुगांत स्पष्टपणें निषेध केला आहे. आतां हीं जर श्रौतकर्में निषेधांत गेलीं, तर राहिलीं कोणतीं, याचा विचार केला तर बाकी कांहीं राहत नाहीं. बरें, आतां जे कर्ममार्गाचें प्रतिपादन करणारे आहेत, त्यांस असें जर कोणी विचारलें कीं, तुम्ही प्रतिपादन करितां, पण तुम्ही कोणतें कर्म सांग करतां? तर एक संध्यादेखील ते यथाकाळीं किंवा योग्य जलाशयीं करीत नाहींत; अग्नी-उपासना मुळींच करीत नाहींत; आणि दरएक कामांत शेवटीं त्यांस असें कबूल करावें लागतें कीं,

न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतं ॥ —स्कांदे.
स्मरणादेव तद्विष्णोः संपूर्णं स्यादिति श्रुतिः ॥ —वायुपुराणे.

वैदिक कर्मांचा कलींत निषेध केला. याचें कारण देशकालवर्तमान सर्व फिरलें. यवन म्लेंच्छांचे संचार होऊन अबाधित कर्म होईल असें स्थल राहिलें नाहीं. दुसरें, श्रौतमार्ग हिंसाप्रमुख आहे. मद्यमांसाखेरीज यज्ञयाग होत नाहींत. इतकेंच नाहीं, याहून विलक्षण वाईट कर्में त्यांत येतात. दक्षिणमार्ग बहुतकरून वाममार्गाचे जवळजवळच आहे. पशु मारून त्याच्या एकादशण्या कराव्या, अनेक जिवांचा देवाचे नांवावर संहार

करावा. हा ऐंद्राग्न पशु, हा अग्नीषोम पशु, अशी हिंसा करून त्या हिंसेचें फल स्वर्ग इच्छिणें, हें फार दुर्घट कर्म आहे. सौत्रामणी करून मद्यप्राशन करावें. अशीं हीं कर्में फार दुर्घट म्हणून व्यासादिकांनीं वर्ज केलीं. आणि कलीमध्यें फार सुलभ धर्म म्हणजे देवाचें स्मरण मात्र करावें, हा जगास सांगितला. आणखी कर्माची फार खटपट इतकीही करून कर्में सांग होत नाहींत. मग—

सांगतासिद्ध्यर्थं ब्राह्मणभोजनं करिष्ये ॥

अशा तोडजोडी काढाव्या लागतात. तेव्हां अशीं विसंगत कर्में करून जिवानें अधिक अधिक बंधन पावावें त्यापेक्षां अतिसुलभ जें साधन, ज्यांत कांहीं अडचण नाहीं;—

एष निष्कंटकः पंथाः ॥ —भारते.

[त्या] नामस्मरणाची सांगता करावयास नको. त्याचें पूर्वांग उत्तरांग नको.

नो देशकालनियमो नाशौचाशौचनिर्णयः ॥ —वन्हिसंहितायां.

या साधनास मुहूर्त नको. यज्ञयागास अमुक महिना, अमुक नक्षत्र, तसें यास कांहीं नाहीं. हें सर्वदा मंगलरूपच आहे. जेव्हां ध्यावें तेव्हां मुहूर्तच आहे.

न वासुदेवभक्तानामशुभं विद्यते क्वचित् ॥ —भारते.
लाभस्तेषां जयस्तेषां । —गणेशपुराणे.
मंगलं मंगलानां च । —भारते.
तदेव लग्नं सुदिनं तदेव । —गणेशपुराणे.
सर्वदा सर्वकालेषु नास्ति तेषाममंगलं । —भारते.

हें साधन विशेषेंकरून कलियुगांत प्रमुख आहे, असें नव्हे. पण कलियुगांत एवढेंच साधन आहे. त्याखेरीज दुसरें नाहींच.

हरिनामपरा ये च घोरे कलियुगे नराः ॥
त एव कृतकृत्याः स्युर्न कलिर्बाध्यते हि तान् ॥
—ब्रह्मनारदीय कलिधर्मप्रसंगे ॥
नामसंकीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनं ॥ —भागवते.
यस्य स्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात् ।
विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे ॥ —भारते.
गोविंदनामस्मरणेन तुल्यं ॥ —सनत्कुमारसंहितायां.
अंतकाले च मामेव । —गीतायां. [८.५]
भक्तिमुक्तिप्रदं नाम । —वामनपुराणे.

या धर्मास अमुक जातीचा मनुष्य पाहिजे असें नाहीं.

अपि चेत्सुदुराचारो। —गीतायां [९·३०]

सर्व इतर साधनांवर नामस्मरण साधन मुख्य आहे. कारण कीं,

कलौ गोविंदकीर्तनं। —स्कांदे.
किं तस्य बहुभिर्मंत्रैः किं तस्य बहुभिर्व्रतैः।
नमो नारायणायेति मंत्रः सर्वार्थसाधकः॥ —भारते.

नामाचें सामर्थ्यही मोठें आहे. इतर कर्में जीं आहेत, तीं फार क्षुल्लक आहेत, त्यांचें सामर्थ्य कमी.

सर्वधर्मबहिर्भूतः सर्वपापरतस्तथा।
मुच्यते नात्र संदेहो विष्णोर्नामानुकीर्तनात्॥ —वैशंपायनसंहितायां.
तीर्थकोटिसहस्राणि व्रतकोटिशतानि च।
तत्सर्वाणि समाप्नोति विष्णोर्नामानुकीर्तनात्॥ —वामनपुराणे.
सकृदुच्चारितं येन हरिरित्यक्षरद्वयं।
बद्धः परिकरस्तेन मोक्षाय गमनं प्रति॥ —भारते.
वासुदेवस्य संकीर्त्य सुरापो व्याधितोपि वा॥ —विष्णुपुराणे.
सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज॥ —गीतायां (१८·६६)

आतां कोणी असें म्हणतील कीं, आन्हिकें, प्रायश्चित्तें, प्रयोग, श्रौत्र, हे सर्व ग्रंथ कशाकरितां लिहिले, तर याचें उत्तर इतकेंच आहे कीं, हे सर्व पूर्वयुगांतील ग्रंथ, सांप्रतकाळचे नव्हेत. आतां किळस वाटणारीं कर्में मनुष्यास तारक नाहींत व असांग कर्में केल्यानें उपयोग आहे असेंही नाहीं. तर सांप्रत नामाशिवाय दुसरें कांहीं कर्म उरलें नाहीं. आतां लौकिकाकरितां व पोट भरण्याचे उद्देशानें लोक पाहिजे तें कर्म करोत आणि कोणताही डौल, ढोंग करोत; परंतु या युगांत सर्व कर्में रद्द झालीं आहेत, असा शास्त्रावरून आम्हांस निश्चय वाटतो. जे कर्माचें प्रतिपादन करितात ते तोंडानें मात्र करितात. बाकी कर्म सांग कोणतेंही होत नाहीं, हें त्यांसदेखील ठाऊक आहे. जर कोणी मनुष्य मरणास आसन्न झाला आणि तो तरणोपाय पाहातो, तर त्यास यज्ञाचीं कुंडें व आधान सिध्ध करण्यास सांगावें किंवा नामसंकीर्तन सांगावें? मोठेमोठे पापी नामानें तरले, त्यांस सुबुध्धी झाली, त्याणीं द्वेष सोडले, त्यांस दया उत्पन्न झाली, हें सर्व नामानें झालें. पण यज्ञयाग करून कोणी तरले नाहींत, उलटे बंधनांत पडले.

क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति॥ —गीतायां [९·२१]

याजकरितां ज्यांणीं ज्यांणीं सांप्रतकालाचा विचार करून सारासार काय याचा निर्णय केला, त्यांणीं असें ठरविलें कीं, भगवंताचें नांव मात्र तारक आहे. बाकी सर्व कर्में लौकिकी व ढोंगाचीं आहेत. हाच मार्ग प्रतिपादन करण्यास योग्य असें आम्हांस वाटतें.

वर्णाश्रमधर्म हे सर्व आतां सुटलेच आहेत. कोणी आचरण करीत नाहींत. फक्त तोंडानें मात्र बोलतात कीं, कर्में करावीं; तेणेंकरून चित्तशुध्धी होते. परंतु असांग व अपुर्तीं कर्में करून तीं काय उपयोगी पडावयाचीं आहेत! याजकरिता ढोंग न करितां व यात्रेचें बंड न माजवितां नामस्मरण करावें म्हणजे भगवान चांगली बुध्धी देतो. प्रल्हाद, ध्रुव, वा वाल्मीक, अजामिळ, इत्यादि याच मार्गानें तरले. तेव्हां बळें कंटकमय मार्गांत शिरण्याचें प्रयोजन काय? आतां याजवरून असें दिसतें कीं, हा सुधारलेला पंथ व्यासादिकांनींच चालू केला; परंतु अद्यापी चांगला चालू मात्र झाला नाहीं. तथापि होईल अशी आशा आहे.

[नंबर १५९]

धर्मसंबंधी माहिती (नंबर ९)

कर्मकांड

आम्हीं हिंदुधर्मांतील कर्मकांडाविषयीं गेल्या अंकांत लिहून त्याचें प्रसिध्धपणें खंडण केलें. तें आम्ही आपलें बुध्धीनें नवीन मत काढून केलें आहे असें नाहीं. कलियुगांत कर्मकांड वर्ज आहे असें ऋषी इत्यादिकांनीं पूर्वींच ठरविलें आहे. आणि तें कर्मकांड अगदीं अग्राह्य आहे, असें स्थापन करण्याकरितां आम्ही आणखी एक उदाहरण दाखवितों. पाराशरस्मृतींत लिहिलें आहे कीं,

यज्ञाधानं गवालंभं संन्यासं पलपैतृकं ।
देवराच्च सुतोत्पत्तिः कलौ पंच विवर्जयेत् ॥

अर्थ–यज्ञ, गवालंभ, संन्यास, श्राध्धास मांस व दिरापासून संतती हीं कलींत ५ निषेधिलीं आहेत. आतां गवालंभ म्हणजे काय हें बहुतांस ठाऊक नसेल म्हणून त्याचें थोडें व्याख्यान करूं. कात्यायनसूत्रांत असें सांगितलें आहे कीं,

षडर्घ्या भवन्ति आचार्य ऋत्विग्विवाह्यो राजा प्रियः स्नातक इति ॥

म्हणजे ६ पुरुष अर्घ्य देण्यास योग्य आहेत. याजवर गदाधरानें वृत्ती लिहिली आहे तींत याचा असा विस्तार केला आहे कीं,

उपनयनपूर्वकं कृत्स्नवेदाध्यायिता आचार्यः । दक्षिणापरिक्रीतः कर्माणि करोति ऋत्विक् । विवाह्यो जामाता । राजा दंडपूर्वक-परिपालनकर्ता । प्रियः इष्टः उत्कृष्टजातिः समानजातिर्वा। स्नातको ब्रह्मचर्यात्समावृत्तः । षट् पुरुषा अर्घ्यार्हा भवंति ।

याचा अर्थ १ गुरु, २ यज्ञास बोलाविलेले ब्राम्हण, ३ जांवई, ४ राजा, ५ मित्र, ६ ब्रम्हचारी. या सहांस मधुपर्कपूजा करावी. याच अर्थाचें मनूचें वचन–

राजा च श्रौत्रियश्चैव यज्ञकर्मण्युपस्थितौ ।
मधुपर्केण संपूज्यौ न त्वयज्ञ इति स्थितिः ॥ [मनु. ३·१२०]

कात्यायनानें असें लिहिलें आहे कीं—

प्रतिसंवत्सरानर्हयेयुरिति ।

म्हणजे दरसाल यांस मधुपर्कपूजा द्यावी. आतां मधुपर्क म्हणजे काय? तें समजण्याची वाचकांस उत्सुकता राहील, याकरितां त्याचें विधान संस्कारकौस्तुभावरून संक्षेपानें सांगतों :

आश्वलायनोक्तमधुपर्कः ।

गृहागतं स्नातकं वरं मधुपर्केणार्हयिष्ये इति संकल्पयेत् । पाद्यं दत्त्वा दधिमधुसर्पिषाश्नीयात् शेषं ब्राह्मणाय दद्यात् ॥ गौ गौं गौः ॥ गोप्रतिनिधित्वेन छाग आलभ्यते ॥ उत्सर्जनपक्षे छाग एव निवेदनीयः ॥ यद्वा छागस्य प्रतिनिधित्वात् निष्क्रयो देयः ॥ ततः गंधमाल्यैः अभ्यर्चयेद्वरं ॥

ज्याची पूजा करावयाची तो घरीं येतांच त्यास पाय धुण्यास पाणी द्यावें आणि दही, मध व तूप एकत्र करून त्यास खाण्यास द्यावें व त्याचें शेष राहील तें ब्राम्हणास द्यावें. नंतर गाईचा वध करावा अथवा गाईच्या बदला बकऱ्याचा करावा व उत्सर्जनपक्ष करणें असेल तर त्याची किंमत द्यावी. म्हणजे मधुपर्काचे दोन प्रकार आहेत. एक आलंभनपक्ष म्हणजे जनावरास ठार मारणें आणि दुसरा उत्सर्जनपक्ष म्हणजे सोडून देणें किंवा त्याची किंमत देणें. परंतु मूळ कात्यायनसूत्रांत आलंभनपक्षच लिहिला आहे. तसेंच आश्वलायनसूत्रांतही त्याचेंच ग्रहण केलें आहे.

आचांतोदकाय शासमादाय गौरिति त्रिः प्राह ॥ — कात्यायनसूत्रे ।

याजवर गदाधराचें भाष्य—

असिखंडमादाय गामानीय गौरित्यर्घ्ययिता त्रिः प्राह आलभ्यतां ॥

म्हणजे तरवार आणून गाईस उभी करून तीन वेळ गाय, गाय, गाय, असें म्हणून तिला ठार मारावें आणि,

मम चामुष्य च पाप्मानं हनोमीति यद्यालभेत् ।

म्हणजे माझें पाप या गाईस मारल्यानें जावो असें म्हणावें. याचा कात्यायनाच्या भाष्यकारानें टीकेंत उत्सर्जनपक्ष दाखविला आहे तो असा—

अतश्च गवालंभस्य कलौ निषिध्धत्वात् तत्स्थाने अजालंभः ।

म्हणजे कलियुगामध्यें पाराशरानें गाईस मारणें निषेधिलें आहे, यास्तव बकरें

मारावें. व याजवरून लग्नांतील विहिणीचा भेट बकरा व जमीदाराचा भेट बकरा ही चाल पडली आहे, असें दिसतें. प्राचीनकाळीं अतिथीचे पुढें जनावर मारलें म्हणजे त्याचा मोठा मान झाला, अशी समजूत होती व हा मान राजे, जावई यांसच मिळत होता. तेव्हां त्याचा हा अंश राहिला आहे असें सिध्ध होतें; त्या कौस्तुभकारानें म्हटलें आहे कीं—

मांसेन भोजनं दानं इति मांसप्रतिनिधित्वेन मापविकारो भोजने देयः विनायकशांत्यादौ मांसप्रतिनिधित्वेन ।

म्हणजे ज्याची पूजा करावी त्यास मांसाचें भोजन द्यावें. परंतु त्याचा प्रतिनिधी म्हणजे मोबदला उडिदाचे अन्न केलें असतांही होतो, असें धरिलें आहे. विनायकशांतीमध्यें मांस लिहिलें आहे तेथेंही असाच प्रतिनिधी करितात.

कुळंबी वगैरे नवऱ्यापुढें प्रत्यक्ष बकरें मारतात. हें सर्वांस विदित आहेच, परभु वगैरेही असेंच करतात. आणि पूर्वी ब्राम्हण गायच मारित होते. यांजविषयीं मनूचें वचन असें आहे कीं,

यज्ञार्थं पशवः सृष्टाः स्वयमेव स्वयंभुवा ।
मधुपर्के च यज्ञे च पितृदैवतकर्मणि ॥
अत्रैव पशवो हिंस्या नान्यत्रेत्यब्रवीन्मनुः ॥ —अ० ५, श्लोक ३९।४१

याचा अर्थ असा कीं, जनावरें देवानें यज्ञाकरितां निर्माण केलीं आहेत. यास्तव मधुपर्कांत, यज्ञांत व श्राध्धांत त्यांस मारल्याचा दोष नाहीं. उगीच मात्र मारूं नयेत.

याप्रमाणें पूर्वी हा दुर्वट विधी सूत्रोक्त सांगितला होता व आलीकडे कलियुगांत मान्य जे पाराशरऋषी त्यांणीं आरंभीं लिहिलेल्या वाक्यानें त्यांचा निषेध केला आहे. याचप्रमाणें हेमाद्रीनिर्णयसिंधूमध्यें स्कंदपुराणांतील एक वचन आहे कीं—

गोत्रान्मातृसपिंडाश्च विवाहो गोवधस्तथा ।
नराश्वमेधौ मद्यं च कलौ वर्ज्यं द्विजातिभिः ॥

म्हणजे कलीमध्यें गाईचा वध, मामासीं सोयरगत, नरमेध, अश्वमेध व मद्यपान हीं ब्राम्हणांनीं करूं नयेत.

यावरून असें दिसतें कीं, राजा व जांवई यांचा घरांत प्रवेश होतांना गाय किंवा बकरें मारण्याचा जो विधी आहे तो फार प्राचीन आहे व हा इराणांत अद्याप चालतो. मामलेदार व सुभेदार इराणचे मुलखांत फिरत असतां गांवकरी त्यांस मधुपर्क करितात, असें इराणच्या रहिवाशी लोकांनीं लिहिलें आहे. त्याजवरून ब्राम्हणांनीं ही चाल तिकडून आणिली असावी व पुढें फार वाईट दिसूं लागली म्हणून बंद केली असावी, असें दिसतें.

आतां असें पाहा कीं, ज्या कृपाळू पाराशराचें वचन लोकांस मान्य होऊन हा घरोघरचा अप्रयोजक गोवध बंद झाला आहे. त्याच पाराशरानें पुनर्विवाह करणें उक्त

आहे असें स्पष्ट लिहिलें असतांही लोक तें वाक्य मानीत नाहींत, हें आश्चर्य नव्हे काय? गाई सुटल्या पण बिचाऱ्या स्त्रिया अद्याप जुन्याकाळचे विघ्नकारक चालीचे पाशांत आहेत. वास्तविक म्हटलें तर—

कलौ पाराशरः स्मृतः।

म्हणजे कलियुगामध्यें पाराशरस्मृती उक्त. मागील मनू वगैरेंच्या स्मृती जुन्या व पूर्वयुगांतील, सबब रद्द होऊन त्यांतील कर्मकांडही गेलें, हें उघडच आहे. पाराशर म्हणतो कीं,

पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ —अध्याय ३.

म्हणजे स्त्रियांनीं पांच प्रकारच्या विपत्ती पडल्या असतां पुनर्विवाह करावा. मग लोक उगीच आग्रह कां धरतात? अस्तु. इत्यादि वरील उदाहरणांवरून पाहातां कर्मकांड किती ओंगळ आहे हें लोकांस सहज समजेल व हें कर्मकांड ज्यांनीं रद्द करून हरिनाम प्यावें, हाच धर्म कलियुगांत ठरविला. त्यांणीं जगाची मोठीच सुधारणा केली, असें समजलें पाहिजे. नाहींतर कर्मकांडाचें जें मोठें बंड माजलें होतें, तें दुसऱ्या कसल्या उपायांनीं कमी झालें नसतें. आतां जैमिनीसारखे मीमांसाशास्त्रकर्ते यांणीं कर्मास प्रधान मानिलें; परंतु "द्वापारे यजते मखैः" या भागवतवचनाप्रमाणें तें शास्त्र पूर्वीचे युगांतील असें समजावें. हल्लीं मुळींच यज्ञाचा निषेध झाला. तेव्हां श्रुतिप्रतिपादक अग्निसाध्य हिंसामय कर्में सर्वच गेलीं असें समजावें. आणि निर्मळ व सुलभ हरिस्मरण एवढें मात्र करावें. म्हणजे सर्व कार्यसिध्धी होते. बहुतकरून सुधारणेस आडवें येणारें जें कर्म तें गेलें, म्हणजे बहुतेक अडचणी दूर झाल्या व धर्माची मोठी सुधारणा हीच आहे आणि तीही पूर्वी ऋषींनींच केली आहे, असें दिसतें. तेव्हां हें सुधारल्या लोकांचें नवीन मत असें म्हणून जुन्या चालीच्या, अजाणत्या व ग्रंथ न पाहणाऱ्या लोकांनीं उगीच अवगणना न करितां जें सुयुक्त आहे, तें सत्वर घ्यावें, अशी आम्ही त्यांस शिफारस करितों.

[नंबर १६०]

धर्मसंबंधी माहिती (नंबर १०)

विवाहाविषयीं

धर्मशास्त्रांत आठ प्रकारचे विवाह आहेत:—

ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथासुरः।
गांधर्वो राक्षसश्चैव पैशाचश्च तथैव च ॥ १ ॥

—संस्कारकौस्तुभ.

त्यांचीं नांवें—१ ब्रह्मविवाह, २ दैवविवाह, ३ आर्षविवाह, ४ प्रजापतिविवाह, ५ असुरविवाह, ६ गंधर्वविवाह, ७ राक्षसविवाह आणि आठवा पिशाचविवाह. यांपैकीं शेवटले दोन म्हणजे राक्षस आणि पिशाचविवाह कलींत वर्ज, व बाकी ६ योग्य आहेत. साहावा गंधर्वविवाह जो आहे तो संस्काराशिवाय म्हणजे, स्त्रीपुरुषांच्या नुसते अनुमतीनें होतो. लोकांत सांप्रतकाळीं बहुधा विवाह करितात, त्यास ब्रम्हविवाह म्हणतात.

कन्येच्या जन्मकाळीं नक्षत्र किंवा ग्रह वाईट पडले आणि त्यावरून तिचा नवरा जगणार नाहीं असें ज्योतिषमतानें ठरलें तर तिचा पहिल्यानें कुंभविवाह करावा, असें शास्त्र व वहिवाटही आहे. त्याचा प्रकार संस्कार-कौस्तुभग्रंथीं लिहिला आहे तो असा—

विवाहोक्ते यथा लग्ने कन्या कुंभेन चोद्वहेत् ।
सुत्रेण वेष्टयेत्पश्चात् दशतंतुविधानतः ।
ततः कुंभं च निःसार्य प्रभज्य सलिलाशये ॥ २॥

म्हणजे विवाहाचे पूर्वदिवशीं कन्येचें कुंभाशीं म्हणजे मातीच्या घागरीशीं लग्न करावें आणि उभयतांस सुतानें बांधावें. नंतर तो कुंभ डोहांत फोडून टाकावा. म्हणजे तिचा पहिला नवरा मरून गेला व आतां दुसरा होणारा तो जगेल, असा भाव. या कुंभविवाहांत गणपतिपूजन, नांदीश्राध्ध वगैरे होऊन कन्यादान करावयाचे वेळेस असें म्हणतात कीं—

वैधव्यहरकुंभविवाहं करिष्ये ।
विष्णुरूपिणे कुंभाय इमां श्रीरूपिणीं कन्यां समर्पयामि ।
चंदनपुष्पाद्यलंकृतं कुंभं कन्यादेहं च वेष्टयेत् ।
ततः कुंभं सलिलाशये प्रभंजेत् ॥ कन्यां अभिषिच्य 'समुद्र-ज्येष्ठा' इति मंत्रेण ब्राह्मणान् भोजयेत् ॥

म्हणजे लग्न लाऊन कुंभ फोडिल्यानंतर समुद्रज्येष्ठा या मंत्रानें मुलीस अभिषेक करून ब्राम्हणभोजन घालावें. म्हणजे हा कुंभविवाह समाप्त झाला.

वैधव्यहरण करणारा दुसरा उपाय कर्मविपाकीं विष्णुप्रतिमादान म्हणजे श्री विष्णूची प्रतिमा करून ती दान करावी, असाही लिहिला आहे. हा प्रकार बायकोचा नवरा जगणार नाहीं अशा धोरणावर झाला. याचप्रमाणें नवऱ्याची बायको जगणार नाहीं, असा जन्मतः दोष असल्यास त्यास उपाय—

वरस्य जन्मकालीनग्रहसूचितमृतभार्यत्वपरिहारोपायः ।

असें सदर घालून पुढें अयुतहोम सांगितला आहे.

आतां नवऱ्याचें तिसरें लग्न असलें तर त्याचा दोष जाण्याचा उपाय असा सांगितला आहे कीं, रुईच्या झाडाशीं त्याचें लग्न लावावें व नंतर स्त्रीशीं विवाह

कराव्या. म्हणजे तो चवथा, असें अर्थात् झालें. रुईच्या झाडाशीं लग्न ला[वा]वयाचें त्याचा संकल्प—

आदित्यप्रपौत्रीं सवितुः पौत्रीं अर्कस्य पुत्रीं काश्यपगोत्रां इमां अर्ककन्यां यथाशक्तिविभूषितां नारायणशर्मणे तुभ्यं दत्ता ।

म्हणजे ही काश्यपगोत्री सूर्याची कन्या हिजवर यथाशक्ति अलंकार घालून हिला शोभायमान करून तुम्हांला दिली आहे. यानंतर प्रार्थना करावयाची ती—

प्रार्थना

तृतीयोद्वाहजं दोषं निवारय सुखं कुरु ।

म्हणजे आतां या तृतीय लग्नाचा दोष निवारण करावा व सुख द्यावें.

हे विशेष कारणप्रसंगींचे संस्कार झाले. आतां साधारण लग्नामध्यें विधी काय काय असतात ते सांगूं. कारण आपले लोकांत लग्नें बहुधा लहानपणीं होतात व त्यांतील संस्कारासंबंधीं सर्व लेख संस्कृत भाषेंत आहेत. म्हणून बहुतांस त्यांत काय आहे तें ठाऊक नाहीं. याकरितां विस्तार झाला तरी त्याविषयीं कांहीं मनांत न आणितां आज लग्नविधी सांगावयाचें योजिलें आहे. विवाहांतील कर्में—

१ वाग्दान (मागणी).
२ घाणा म्हणून एक वृध्दाचार आहे. यांत इतकेंच आहे कीं, दाणें कांडण्याचीं मुसळें व दळावयाचीं जाती हीं एकीकडे ठेवितात.
३ उष्टी हळद, रुखवत, तेलफळ, हेही वृध्दाचार.
४ सीमांतपूजन.
५ मधुपर्क.
६ गणेशपूजन.
७ स्वस्तिवाचन किंवा पुण्याहवाचन.
८ मातृकापूजन.
९ नांदीश्राध्ध.
१० नंदिन्यादि मंडपदेवताप्रतिष्ठा (देवदेवक).
११ कन्यादान.
१२ मंगळसूत्रबंधन.
१३ नवऱ्यास दानें.
१४ पाणिग्रहण.
१५ लाजाहोम (विवाहहोम).

१६ सप्तपदी.
१७ उपासना.
१८ ऐरणीदान.
१९ गृहप्रवेश (मुलीला पहिल्यानें सासऱ्यास नेणें.)

वागूदान–हें दक्षिणेंत पूर्वी कोणी करित नाहींत. लग्नाचे दिवशींच करितात व कोठें मुळींच करीत नाहींत. वास्तवीक पाहिलें तर, हें पूर्वी कितीएक वर्षें व्हावें, कारण हा लग्नाचा तोंडचा ठराव व नंतर अनुकूल पडेल तेव्हां लग्न. सीमांतपूजा–नवरा गांवचे सिमेवर आला असतां त्याची पूजा करतात ती.

मधुपर्क–हा विशेष विधी आहे व याचें सविस्तर वर्णन गाय मारण्याचे वगैरे आम्हीं आपल्या ९ वे निबंधांत ता. १३ माहे मार्च सन मजकूरचे अंकांत केलें आहे. म्हणून त्याची द्विरुक्ति आतां करित नाहीं.

गणेशपूजन–हा पुराणोक्त विधी आहे. अरिष्टनाशक ही देवता आहे. म्हणून कर्मांचे आरंभीं एक सुपारी तांदुळावर मांडितात आणि तीस गणपति समजून व्याहृती म्हणजे––

भूः भुवः स्वः ।

या मंत्रानें तिची पुराणोक्त पूजा करितात.

पुण्याहवाचन–म्हणजे कोणतेंही मंगलकार्य ब्राम्हणांचा आशीर्वाद घेतल्यावांचून व त्यांणीं वरें म्हटल्यावांचून आरंभूं नये, असें स्मृतींत आहे.

संपूज्य गंधमाल्याद्यैर्ब्राह्मणान्स्वस्ति वाचयेत् ।
धर्मकर्मणि मांगल्ये संग्रामेऽद्भुतदर्शने ॥ —व्यास
वैदिके तांत्रिके चादौ, ततः पुण्याह इष्यते ॥ —शौनक.

म्हणजे कांहीं धर्मकर्म आरंभिलें असतां, मंगलकार्य असतां, युध्धास जावयाचें असतां अगर कांहीं अद्भुत दर्शन झालें असतां ब्राम्हणांची गंधपुष्पादिकांनीं पूजा करावी आणि त्यांकडून चांगलें म्हणवून घ्यावें. याप्रमाणें बहुत कर्मांत चार ब्राम्हणांस बोलावून आणून त्यांची प्रार्थना करून त्यांच्या तोंडानें 'पुण्याहं' असें म्हणवितात. याशिवाय पंधरा वाक्यें योजिलीं आहेत तींही म्हणतात. त्यांत तुम्हांस पैका मिळो, तुम्हांस आयुष्य असो, तुम्हांस ऋध्धी-सिध्धी असो, असे अनेक इष्ट पदार्थांचीं नांवें घेऊन आशीर्वाद देतात. या कर्माचें नांव पुण्याहवाचन, किंवा स्वस्तिवाचन–म्हणजे बरें म्हणणें.

मातृकापूजन–मातृका म्हणून कांहीं देवांचीं नांवें आहेत. त्यांची पूजा.

नांदीश्राध्ध–हें मंगलकार्यांत प्रथम श्राध्ध करावें, असें आहे. तें दूर्वांचें पवित्रक घालून करितात. यांत नांदीमुख देव हे मुख्य आहेत. इतर श्राध्धांत धूरिलोचन देव आहेत. यांत नांदीमुखाः विश्वेदेवाः म्हणजे चांगलें तोंडाचे तुम्ही देव आहां, असा संकल्प आहे. आणि पितरांस द्राक्षें व आवळे द्यावे, असा याचा विधी आहे.

देवदेवक–यांत कितीएक देवांचे नांवें समिधा व आंब्याचीं पानें मांडून त्या देवता त्या कार्यांत मदत करतील म्हणून पूजा करून घरांत ठेवितात व लग्न झाल्यावर त्यास टाकून देतात. यानंतर कन्यादान म्हणजे मुलगी नवऱ्यास द्यावयाची.

मुलीचें वर्णन

अरोगिणीं भ्रातृमतीं असमानार्षगोत्रजां ।
अनन्यपूर्विकां कांतां असपिंडां यवीयसीं ॥

म्हणजे प्रकृतीनें चांगली, जिला भाऊ आहेत; नवऱ्याचे प्रवरांतील व गोत्रांतील नव्हे; कुमारी, सुंदर व लहान अशी ही मुलगी आहे. मग

नवऱ्याचें वर्णन

अव्यंगेऽपतितेऽक्लीबे दशदोषविवर्जिते ।
इमां कन्यां प्रदास्यामि देवाग्निद्विजसंनिधौ ॥

म्हणजे हातापायांनीं धड, भ्रष्ट झालेला नव्हे, नपुंसक नाहीं व दाहा दोष ज्यास नाहींत अशा ह्या पुरुषास देव, अग्नि, ब्राम्हण, यांच्या साक्षीनें ही कन्या देतों. वर "दशदोष विवर्जिते" असें म्हटलें. पण ग्रंथकारांचा आणखी असा विचार झाला कीं, पुढें त्यांपैकीं, कदाचित् कांहीं दोष उमगेल तर—

दत्तामपि हरेत्कन्यां स्वगोत्रोढां तथैव च ।
देवराय प्रदातव्या यदि कन्यानुमन्यते ॥ १ ॥

म्हणजे दिलेली कन्या परत घेऊन तिचे अनुमतानें दुसरे वराशीं तिचें लग्न करावें असें वसिष्ठवचन आहे. परंतु संस्कारकौस्तुभकर्ता अनंत भट याणें या वसिष्ठस्मृतीस मागील युगांतील गोष्ट म्हणून लिहून ठेविली आहे. या त्याच्या युक्तीचा चमत्कार वाटतो. असतु. आतां कन्यादानाचा संकल्प—

मम समस्तपितृणां निरतिशयसानंदब्रह्मलोकावाप्त्यादि-कन्यादानकल्पोक्तफलावाप्तये अनेन वरेण अस्यां कन्यायां उत्पादयिष्यमाणसंतत्या द्वादश वरान् द्वादश परान् पुरुषान् पवित्रीकर्तुं आत्मनश्च श्रीलक्ष्मीनारायणप्रीतये ब्राह्मविवाहविधिना कन्यादानमहं करिष्ये ।

याचा अर्थ–माझे सर्व पितरांस निरवधी आनंद व ब्रह्मलोक प्राप्त व्हावा, यासाठीं कन्यादानसंकल्पाचें जें उक्त फल तें प्राप्त होण्यासाठीं या कन्येच्या ठायीं या वरापासून जी संतती होईल, तीहींकरून माझे पितृपक्षाकडील १२ व मातृपक्षाकडील १२ पुरुष पवित्र व्हावे, यासाठीं व श्रीलक्ष्मीनारायणच्या प्रीतीसाठीं मी ब्रह्मविवाहविधीनें आपले कन्येचें दान करितों.

दान

अद्य वासिष्ठगोत्रस्य त्रिप्रवरान्वितरामचंद्रशर्मणः प्रपौत्राय नारायण-शर्मणः पौत्राय गणेशशर्मणः पुत्राय गोविंदशर्मणे श्रीधररूपिणे कन्यार्थिने स्नातकाय वराय ।

भारद्वाजगोत्रस्य एकप्रवरान्वितभास्करशर्मणः प्रपौत्रीं वासुदेवशर्मणः पौत्रीं जगन्नाथशर्मणः पुत्रीं गंगाभिधां श्रीरूपां वरार्थिनीं इमां कन्यां सालंकृतां प्रजापतिदेवत्यां धर्मप्रजा सृजस्तुभ्यमहं संप्रददे ।

याचा अर्थ–वसिष्ठगोत्रांतील त्रि-प्रवरी रामचंद्रपंताचा पणतु, नारायणरावाचा नातू, गणेशपंताचा पुत्र, गोविंदराव, श्रीधर (देव) स्वरूपी कन्यार्थी, स्नातक ह्मणजे उपनयन झालेला यास भारद्वाजगोत्रांतील एकप्रवरी भास्करपंताची प्रपौत्री, वासुदेवरावाची नात, जगोबाची मुलगी, गंगा लक्ष्मीस्वरूप, अलंकार घातलेली, जिचें प्रजापति दैवत, धर्म आणि प्रजा यांतें वाढवील अशी ज्योतिष्यांनीं सांगितलेल्या सुमुहूर्तीं दान करितों.

यावर वराचें उत्तर

कन्यां प्रतिगृह्णामि

ह्मणजे तुमचे कन्येप्रत ग्रहण करितों. नंतर—

सासऱ्याचें वचन

विश्वंभरः सर्वभूताः साक्षिण्यः सर्वदेवताः,
इमां कन्यां प्रदास्यामि पितॄणां तारणाय च ।
तुभ्यं विप्र मया दत्तां पुत्रपौत्रप्रवार्धिनीं,
धर्मे च अर्थे च कामे च नातिचरितव्या त्वयेयं ।

याचा अर्थ–सासरा जांवयास म्हणतो, हे ब्राह्मणा, विश्वंभर परमेश्वर, तशीच पंचमहाभूतें व सर्व देवता यांच्या साक्षीनें पुत्रपौत्रांतें वाढविणारी अशी मी आपली ही कन्या पितरांच्या तारणाप्रीत्यर्थ तुला दिली. आतां तूं इला धर्माविषयीं, अर्थाविषयीं, कामाविषयीं अंतर देऊं नको.

यांचें उत्तर

नातिचरामि (अंतर देणार नाहीं)
ॐ स्वस्ति –(शुभ असो)

याप्रमाणें दान झाल्यावर मुलीचे गळ्यांत मंगळसूत्र बांधितात व नवऱ्यास दानें देऊन त्याचा बहुमान करितात. नंतर पाणिग्रहण म्हणजे मुलीचा हात मुलाचे हातीं देतात व शेवटीं लाह्या व तूप यांचा थोडासा होम करितात. त्यांत मुख्य देवता—

अग्निं पवमानं, अग्निं प्रजापतिं,
वरुणाग्निं, पुरुषाग्निं, अर्थमाग्निं

या आहेत. नंतर नवरीस तांदळाच्या राशी ठेऊन त्यांजवरून सात पावलें चालवितात. हीं ७ पावलें आयुष्यमर्यादेपर्यंत नवऱ्याबरोबर राहावयाच्या सूचनेविषयीं दर्शक आहेत. येथें विवाहसंस्कार समाप्त होतो. नंतर स्मार्ताग्नि सिद्ध करावा. ती सायंप्रातरउपासना-नंतर दुसरे दिवशीं ऐरणीदान, गौरीहराची पूजा वगैरे सामान्य व्रतें आहेत. याप्रमाणें हल्लीं लग्न होत असतें.

आतां यावर विचार

वरील सर्व प्रकार मनन करून पाहिलें असतां, आम्हांस वाटतें कीं, विधवेचा पुनर्विवाह होण्यास कांहींच अडचण नाहीं. कोणी म्हणतात कीं, पूर्वी वाग्दान करून गर्भाधानाचे दिवशीं विवाह करावा. दुसरे कोणी असें म्हणतात कीं, सप्तपदीचें कर्म समाप्त करूं नये आणि विवाह अपुर्ता ठेवावा; पण हे दोन्ही मार्ग आह्मांस प्रशस्त दिसत नाहींत. त्यापेक्षां पुनर्विवाह करावा हेंच उत्तम. आणि विधवा, नवऱ्याचे गोत्रांत आहे असें समजून उच्चार करावा म्हणजे झालें. बाकी कर्माचा कोठें निषेध किंवा अडचण येतच नाहीं. जसा कुंभविवाह होऊन पुनः लग्न होण्यास अडचण नाहीं, तसेंच नवरा मेला त्या दिवशीं विवाहार्हता आली असें समजून विवाह होण्यास कांहीं बाध दिसत नाहीं. विधान नाहीं असें जे म्हणतात ते पुरा विचार करित नाहींत. गणपती-पूजा, नांदीश्राध्ध इत्यादि कर्में पुनः होण्यास हरकत काय? संस्काराचें ग्रंथांत संकल्प फिरविण्याची पध्धत लिहिली आहे. त्याप्रमाणें जो कर्ता असेल त्याअन्वयें संकल्प लावून लग्न करावें व नंतर ती स्त्री तिसरे गोत्रांत गेली असें समजावें आणि त्यापुढें आक्टाप्रमाणें मागील वारसा सुटून तिला पुढील घरचें स्वामित्व आलें असें जाणावें जसें बापाचें घर सुटून नवऱ्याचे घरीं आली तशीच दुसऱ्याचे घरीं गेली.

पुरुष दुसरींतिसरीं लग्नें करितात आणि बायकांनीं न करावीं हा जुल्मू होय. हें साधारण न्याय जाणणारासदेखील कळावयाजोगें आहे. परंतु प्राचीनकाळचे ग्रंथांचें ओझें डोकीवर घेऊन लोक चालत आहेत व विचार सुटला. याजमुळें ही शृंखळा

निघत नाहीं, इतकेंच हशील आहे. पतिमरणाचे भयानें कुंभाशीं लग्न होतें, मग पति प्रत्यक्षच मेला तर होण्यास काय चिंता आहे ?

आमचे हिंदु लोकांमध्यें परस्परांची दया कमी. यांच्या डोळ्यांपुढें खून झाला तरी हे जाग्यावरून उठावयाचे नाहींत. त्यांतून कोणी स्नानसंध्याशील साधू असला म्हणजे मग तो तर दगडाप्रमाणेंच समजावयाचा. त्याणें एकंदर हें जग नाशवंत असें ठरवून त्यास सोडून दिलें असतें व या जगास आपला कांहीं उपयोग पडूं नये हा त्याचा धर्म असतो. शास्त्री, पंडित, साधुबाबा इत्यादि जे लोक हिंदुस्थानांत आहेत, त्यांचा धर्मशीलपणा माळामुद्रांनीं काय दिसेल तेवढाच. कोणी संध्याकाळपर्यंत जप करितात, कोणी महिन्यांतून १५ दिवस उपास करितात, या प्रकारचे बहुत साधू आहेत. पण जन्मास येऊन जगांतील दुःख कमी व्हावें, गैरसमजुतीनें लोक आपले गळे कापून घेतात ते रक्षावे, अशा कामांत कोणी साधू अजून झटत नाहींत; कारण सांप्रतकाळीं साधू म्हणजे आळशी, निरुद्योगी, अज्ञानी व पशुसारखे मूर्ख, सत्रब निरुपद्रवी मात्र असतात. त्यांत कोणी नित्य एकदोन पुस्तकें जन्मपर्यंत वाचणारे किंवा गोणीभर दगड पुढें मांडून नित्य पूजा करण्यांत अर्धा दिवस घालणारे फार व कोणी दयाळु निपजले तर ब्राह्मणांस जेऊं घालगारे म्हणजे त्यांच्या दयेची परमावधि झाली. ब्राम्हणाखेरीज अन्य जातीचे कोणी लोक जिवंत आहेत असें त्यांस वाटतच नाहीं. असे-प्रकारचे लोक आमचे हिंदूमध्यें पुष्कळ आहेत. याजकरितां मग ते आपसांत प्रशंसा करितात कीं, अमके बुवा बहुत थोर साधू आहेत. तेव्हां कोणी विचक्षणिक पुसतो कीं, ते बुवा एवढे थोर आहेत म्हणतां तर ते करतात काय ? मग त्याचें उत्तर अहाहा ! काय सांगूं त्यांची वृत्ती ! किती थोर, कोठें जावयाचें नाहीं. यावयाचें नाहीं. नेहमीं तोंडानें जप चाललाच आहे. दुपारपर्यंत स्नानसंध्या, मग भागवत इत्यादि पाहातात. कोणाशीं बोलत नाहींत. कांहीं नाहीं. वाचकहो, हेच जर खरे साधू तर यांचा आपणास उपयोग काय ? जे जगास नाहीं असें मानून त्याविषयीं कांहीं काळजी न करितां आपले सद्गतीचा मात्र यत्न करणारे ते आपल्या काय कामाचे ? आह्मांस असे साधू पाहिजेत कीं, सर्व ज्ञातींत व सर्व देशांत जे जे अनर्थ घात करणारे आहेत ते काढणारे, जगास सद्गती देणारे, नीतीचा व सदुद्योगाचा ठसा दाखविणारे. इतर ढोंगी बुवा पोट भरणारे आणि लोकांस फसविणारे, यांची आम्हांस जरूर नाहीं. म्हणून ज्या दिवशीं असे साधू हिंदुस्थानांत होतील आणि लोक जुन्या चालीचे, आळशी, निरुद्योगी, अज्ञानी अशा साधूंची भक्ति सोडून हितकर्ते साधूंस भजूं लागतील, तेव्हांच हे सर्व अनर्थ दूर होतील आणि जशी युरोपांत लोक दुष्ट पुरुषाची एफिजी जाळतात, तशी इकडील प्राणघातक शस्त्रार्थाचीं पुस्तकें जाळून लोक मोठें एक सत्र करतील, आणि म्हणतील कीं, या श्लोकांनीं आम्हांस बुडविलें. ते विस्तवांत टाका, जळूं द्या, असेंही भविष्य या देशांत घडेल. कारण लोकांस व्यवहाराचें ज्ञान आलें म्हणजे देव कसे असावेत, साधू कसे असावेत, राजे कसे असावेत, ब्राह्मण

कसे असावेत, ग्रंथ कसे असावेत, हें समजूं लागतें. हल्लीं लोकांस कांहींच विवेक नाहीं, म्हणून उखळाचा, उमऱ्याचा, ताकमेढीचा देखील देव होतो. तसाच साधू व तसाच अधिकारी आणि तसाच ग्रंथ, वेडावांकडा पाहिजे तसा असला तरी खपतो. आपल्या मुलींचीं नाकें कापा असें जरी ग्रंथांत लिहिलें असलें, तरी तोच ग्रंथ मान्य म्हणून लोक डोकीवर घेऊन फिरतात व त्याची पूजा करितात. आणि यांतच त्यांस मोठें महत्त्व वाटतें. पाहा! ज्यांत विधवेचें वपन करावें म्हणून लिहिलें आहे तो ग्रंथ याच योग्यतेचा नव्हे काय? व तो लोकांस मान्य असावा काय? आणि त्या एका भटाच्या बोलण्यावरून लोकांनीं आपल्या पोटच्या लेकी, बहिणी, सुना, भाच्या, नाती यांस भादरावें काय? काय हें वेड्याचें इस्पितळ? किंवा शाहाण्याचा दरबार? हा कसा देश आहे याचा विचार सुज्ञ करतील!!

या हिंदुस्थानांत दोन दोन वर्षांचीं मुलें टाकून व लोकांच्या स्वाधीन करून स्त्रियांनीं आपले जीव जाळून घेतले आणि याच कर्मास लोक धन्य मानीत गेले. या गोष्टीचें आश्चर्य हल्लींच इंग्रज वगैरे परकी लोकांस वाटलें आहे असें नाहीं. सिकंदरा-बरोबर दोन हजार वर्षांपूर्वी जे यवन आले होते, त्यांणीं जे लेख लिहून ठेविले ते पाहातां त्यांसही हें मोठें आश्चर्य वाटलें, असें दिसून येतें. तेव्हां ब्राम्हणांनीं जे निर्दय लेख व विधानें लिहून ठेविलीं आहेत, त्यांस अनुसरून लोक वागूं लागल्यानें आपले लोकांस किती नीचपणा आला आहे, याचें गणित होणें मुषकिल आहे. आतां या इतक्या दुष्टाव्यांत ब्राम्हणांचा एक गुण दिसून येतो कीं, पंचाक्षरी जसा आपले ढोंगानें नारळ, शेंदूर, कापूर, दिवे इत्यादि मांडून अज्ञानास मंत्राचा भ्रम घालतो, त्याप्रमाणें अज्ञानी लोकांस या ब्राम्हणांनीं इतका भ्रम घातला कीं, त्यांचीं डौलदार विधानें व सुयंत्र रचलेलीं तंत्रें आणि साहित्याचे भार सप्तमृत्तिका, अष्टपल्लव, अर्घ्य, मंत्रतंत्र, इत्यादि दांभिक डौलानें लोकांचीं मनें पूर्णत्वें जिंकलीं जाऊन त्यांणीं आपले जीव त्यांजवर ओवाळून टाकले. मोठेमोठे देशाभिमानी व धर्माभिमानी यांचे हातून हीं जीं देश व धर्म रक्षणार्थ कृत्यें व्हावयास अवघड तीं कृत्यें भटांब्राम्हणांनीं केलीं. पाहा; जिवंत मनुष्यानें प्रेताच्या चितेवर बसणें, आपले हातानें अग्नि लाऊन घेणें आणि हाय न म्हणतां जळून जाणें, हें सामान्य नव्हे व कोणाच्या प्रयत्नानें होण्याजोगें नव्हे. परंतु ब्राम्हणांनीं मनाची येथपर्यंत तयारी केली, हें पाहून मोठें आश्चर्य वाटतें. पण लागलेंच पुनः दुःख वाटतें कीं, काय हें! येणेंकरून किती जीव व्यर्थ गेले! व अजूनही जात आहेत. आणि वेदांती हिंदु त्याविषयीं कांहींएक मनांत न आणितां पर्वतासारखे स्थीरपणानें व निश्चळ अंतःकरणानें या सर्व जगास व्यर्थ मानून, उद्योग सोडून स्वस्थ बसले आहेत. उद्योग करावयाचा झाला तर, काशीयात्रेस जावयाच्या अगोदर करितात. घरदार विकून म्हातार-पणांत चालवत नसले तरी डोली करून मरत मरत काशीस जातात. या प्रकारचे उद्योग जन्मादारभ्य करितात. पण दुसऱ्याचे हिताचा कळवळा धरून कोणी कदापि उद्योग

करीत नाहींत व त्यांस वास्तविक व्यवहार कसा चालावा, व कोणते प्रकारचें शास्त्र असावें व विनाकारण दुःखदायक नियमाचें ओझें बाळगणें नीट नाहीं इत्यादि विचार करण्याची अजून लोकांस स्थिती आली नाहीं. आणि अन्यदेशीय लोक आपला मान ठेवीत नाहींत असें म्हणून मनांत कुरकुरतात. पण जे प्राणी आपले स्त्रियांशीं प्रतारणा ठेऊन दुष्टपणा करणारे ते मानास योग्य आहेत काय ? नाहींत. सर्वथैव नाहींत. अस्तु. विस्तार झाला त्यापक्षीं आतां आवरलें पाहिजे. शेवटीं सांगावयाचें इतकेंच कीं, अशा धर्मसंबंधीं अनेक तऱ्हेच्या वेड्यावेड्या अडचणीनें प्रत्येक जीव स्पष्टतः जरी तुरुंगांत नाहीं, तरी तो तुरुंगापेक्षां मोठाल्या शृंखलांनीं बांधलेला दिसतो. इकडेतिकडे फिरतो, पण त्यास मोकळेपणा कोठें आहे याचा विचार करावा. प्रत्येक हिंदु हजार-दोन हजार बिड्या घातलेलाच आहे असा आम्हांस दिसतो. बिचारा पोटाकरितां फिरतो मात्र, परंतु तो डोक्यावर जबरदस्त ओझें असून खरडत खरडत चालला आहे असाच सर्वांस दिसेल. तर ईश्वरकृपेनें ही दुर्वृत्ती मावळून सद्वृतीचा उदय होईल तो दिवस सुदिन.

[नंबर १६१]

धर्मसंबंधी माहिती (नंबर ११)

कर्म म्हणजे काय ?

सांप्रतकाळीं अज्ञानी गृहस्थ व अज्ञानी भिक्षुक ब्राम्हण यांस असें वाटतें कीं, स्नानसंध्या व पूजा केली म्हणजे सर्व कर्म झालें. पण कर्माची लांबीरुंदी किती आहे हें त्यांस ठाऊक नसतें आणि हल्लींचे लोक हजाराच्या हिशानें तरी कर्म करितात, असें म्हणवत नाहीं आणि कर्मिष्ठपणाचा तर मोठा बाणा बाळगतात. तसेंच हलक्या जातीचे लोक म्हणजे सोनार, परभु, गुरव, खत्री, इत्यादि जे आहेत त्यांस अशी हौस येते कीं, अधिकाधिक कर्म करून ब्राम्हणांसारखें व्हावें. परंतु आम्ही म्हणतों, हे दोघेही मार्ग चुकतात. कारण कर्माची पूर्णता कोणाच्यानें होत नाहीं. आणि उगीच ढोंग मात्र वाढतें. आतां कर्म म्हणजे काय याविषयीं थोडी माहितगारी येथें लिहिली असतां बरें पडेल. आणि हा विषय सर्वांचे लक्षांत येईल. कर्माचे मुख्य भेद दोन आहेत; एक नित्यकर्म म्हणजे स्नान, संध्या, शौच (स्वछ राहणें), षट्कर्में इत्यादि आन्हिकांतील विषय आणि दुसरें नैमित्तिक कर्म यांत श्राध्धें, शांती, व्रतें, प्रायश्चित्तें, उपवास, दानें, तपें, संस्कार, यज्ञ, अभिषेक, इत्यादि येतात. आणखी कर्माचे पोटीं दुसरे विभाग शांतिक व पौष्टिक आणि मंगलकार्यें, मृतकार्यें असे आहेत. कर्माचा आणखी तिसरा विभाग ज्या ग्रंथाचे आधारानें कर्म स्थापन झालें त्यांजवरून होतो. म्हणजे श्रौत, स्मार्त, सूत्रोक्त,

पुराणोक्त, तंत्रोक्त, इत्यादि. यज्ञ हा श्रौतविधी आहे. मुंज, लग्न, हे स्मार्तविधी आहेत. यज्ञोपवीत धारण सूत्रोक्त आहे. पूजा व्रतें, आराधना या पुराणोक्त आहेत, व जारणें-मारणें इत्यादि मंत्रशास्त्राचीं कर्में तंत्रोक्त आहेत. हें कर्माचें जाल येवढें भोठें आहे कीं, सर्व दिवसभर आणि जन्मभर खपलों तरी पूर्ण होणार नाहीं. ब्राम्हणास जन्मापासून कर्मांनीं बांधून काढिला आहे. जातीवरून, आश्रमावरून वेगळाले धर्म प्राप्त होतात, ते असे : ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ, संन्यास हे चार आश्रम व यामध्यें संस्कार म्हणून दुसरीं कर्में आहेत तीं येणेंप्रमाणें—

१ गर्भाधान.
२ पुंसवन.
३ सीमंतोन्नयन.
४ जातकर्म (जन्मतांच).
५ नामकरण (बारावे दिवशीं).
६ कर्णवेध.
७ विष्णुबळी.
८ निष्क्रमण.
९ अन्नप्राशन (सहा महिन्यांनीं).
१० चौल (तिसरे वर्षी).
११ उपनयन (८ वे वर्षीं).
१२ मेधाजनन.
१३ महानाम्नी.
१४ महाव्रत.
१५ समावर्तन.
१६ विवाह (२० वे वर्षीं).
१७ अंत्येष्टी.

स्मार्त अग्निकार्यें

१ श्रवणाकर्म.
२ अश्वयुजी.
३ प्रहावरोहण.
४ आग्रायण.
५ पिंडपितृयज्ञ.
६ सर्पबली.
७ पार्वणश्राध्घ.
८ अन्वष्टका.

ब्राह्मणांनीं अग्नीची सेवा नीत्य केली पाहिजे. आधान सिध्घ करून उपासना करणारास अग्निहोत्री म्हणतात. हा श्रौताग्नी तीन ठिकाणीं असतो. गार्हपत्य, दक्षिणाग्नी आणि आहवनीय या त्रयीवर संस्था होतात त्या—

१ चातुर्मास्य, यांत अनेक प्रकार आहेत. एकास ऐष्टिक म्हणतात. दुसऱ्यास सौमिक म्हणतात व तिसऱ्यास पैशुक म्हणतात. त्यांतही आणखी पक्ष आहेत. म्हणजे संवत्सर पक्ष, द्वादशाह पक्ष, पंचाह पक्ष, यांत चारीं पर्वें याच दिवसांत समाप्त करितात.

२ पशुबंध.
३ सौत्रामणी.
४ आग्रायण.
५ दर्शपौर्णमास.
६ ज्योतिष्टोम.

याखेरीज हविर्यज्ञ संस्था म्हणजे—

१ अग्निष्टोम.
२ अत्यग्नीष्टोम.
३ उक्थ.
४ अप्तुर्याम.
४ सोळसी.
५ वाजपेय.
६ अतिरात्र.

याशिवाय

१ पुत्रेष्टी.
२ नक्षत्रेष्टी.
३ राजसूय.
४ विश्वजित.
५ सर्वतोमुख.
६ पौंडरीक.
७ सत्रें हीं एक संवत्सराचीं आहेत व साठ संवत्सराचें एक अशीं आहेत.

या सर्व एका सोमाच्या अनेक विकृती आहेत. जशी वेदाची प्रकृती पदें आहेत, आणि छंद ही त्यांची पहिली विकृती. नंतर क्रम, जटा, वर्णक्रम, शिखा, रेखा, घन इत्यादि विकृती आहेत. तशाच सोमाच्या विकृती होऊन यज्ञविस्तार झाला. आतां सोमामध्यें होता, अध्वर्यु, ब्रम्हा, उद्गाता, हे मुख्य ऋत्विज असतात, व दर एकास तीन तीन हस्तक असतात, शिवाय सदस्य व शामित्र, आणि त्यांत मुख्य अनुष्ठानें—

१ प्रथम दिवशीं ऋत्विजवर्ण, दीक्षणीय इष्टी आणि दीक्षा.
२ दुसरे दिवशीं प्रायणीय इष्टी. सोमविक्रय आतिथ्यइष्टी.

प्रवर्ग्य उपसद.

३ तिसरे दिवशीं पुन्हा प्रवर्ग्य उपसद.
४ चवथे दिवशीं अग्निप्रणयन अग्निषोम, प्रणयनपशु होम.
५ पांचवे दिवशीं सोमपान. उदयनीय इष्टी, अवभृथ स्नान. आतां १२ दिवसांचेंही सत्र करितां येतें व याप्रमाणें केलें तर अनुष्ठान लांब होतें इत्यादि प्रकरणें आहेत. यास चार पशु लागतात. एक विच्छिन्न सोम, दुसरा दौर्ब्राम्हण्य दोषपरिहारार्थ, तिसरा ऐंद्राग्न, चवथा अश्विन पशु, आतां सोम ही प्रकृती, त्याच्या विकृती अनेक झाल्या आहेत. तसेंच एक संस्कार ज्याला येतो त्यास दुसरे सहज येतात. कारण त्यांतील अनुष्ठानें सारखींच आहेत. स्वस्तिवाचन, नांदीश्राध्ध, गृहमख, गणपतिपूजन, मातृका-पूजन, होम, हीं बहुतकरून सारखींच आहेत. कांहीं देवतांचीं नांवें मात्र फिरतात. याच-प्रमाणें श्राध्धें अकरा प्रकारचीं आहेत. पार्वण, दधी, नांदी, यात्रा, तीर्थश्राध्ध, वगैरे, परंतु या तरी एकाच्याच विकृती झाल्या आहेत, याच मासल्याचीं व्रतें, शांती, पूजा, यांचे भेद झाले आहेत. आतां षट् कर्म म्हणजे अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान आणि प्रतिग्रह, एकूण साहां. पैकीं तीन जीं आहेत, हीं ब्राम्हणाच्या निर्वाहाकरितां,

आणि तीन निर्वाह करण्याचें सामर्थ्य येण्याकरितां म्हणजे शिकविणें, होम करविणें, आणि दान घेणें. हीं तीन दुसऱ्या तिहींवांचून व्हावयाचीं नाहींत. म्हणजे स्वतां पढेल तर शिकवील. स्वतां दान घेऊन पैका मिळवील तर दान करील. मनुष्यास चार पुरुषार्थ गणले आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. यांपैकीं दोन मुख्य आणि त्या दोहोंनीं दुसरे दोन होतात. म्हणजे अर्थानें कामना तृप्त होतात व धर्मानें मोक्ष होतो. अशी दोहोंचीं दोन साधनें आहेत. तसेंच, आत्मगुण जे मनुष्यांनीं अवश्य धरावे ते—

१ दया.
२ शांती.
३ अनसूया.
४ शौच.
५ क्षांती.
६ अस्पृहा.
७ अकार्पण्य.

याखेरीज कितीएक कर्में शिष्टाचारप्राप्त, कुलाचारप्राप्त, ग्रामाचारप्राप्त, वृद्धाचार-प्राप्त, इत्यादि येतात. आतां यांतील अधिक माहिती करून घेण्याची ज्यास इच्छा असेल, त्यांणीं या धोरणानें अधिक चौकशी केली असतां मिळेल. हा एकंदर गोषवारा मात्र आहे. परंतु यांतील कर्में कोण करतात व कोण करीत नाहींत याचा विचार ज्यांचा त्यांणीं करावा. आणि एकंदर कर्मांच्या अंतपार तरी कोणास लागेल किंवा हीं सांग तरी होतील असें आहे किंवा नाहीं, तें पाहावें व आम्हांस तर असें वाटतें कीं, या युगांत हीं सर्व कर्में रद्द झालीं, म्हणजे तीं करण्याची जरूरी राहिली नाहीं. आतां या इतक्या कर्मांची योग्यता पाहिली तर तेणेंकरून मोक्ष होतो असें कोणी म्हणतच नाहीं. व याविषयीं जैमिनीदेखील प्रतिज्ञा करीत नाहीं. चित्तशुध्धी होते, असें मात्र म्हणतात. परंतु,

सर्वकर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥—गीता. [४·३३]
नामावांचुन तरलों जे म्हणति ते आधी बुडती, भवडोहीं ॥—नामदेव.
जपतपकर्म क्रिया नेम धर्म । वायाची हा श्रम व्यर्थ जाय ॥—ज्ञानदेव.

[नंबर १६२]

धर्मसंबंधी माहिती (नंबर १२)

परमार्थ

या पृथ्वीवर शतकोटि लोक आहेत. इतक्यांसही धर्म आहेत. त्यांत हिंदु, मुसलमान, खिस्ती, बौध्ध हे मुख्य धर्म, त्यांचे पोटीं अनेक फरडुकीं आहेत. या

हिंदुस्थानांतच पाहिलें तर शंभर मतें आहेत. प्रत्येक मनुष्य आपले धर्मानें स्वर्ग प्राप्त होईल असा अभिमान धरतो. त्यांत विचारी आहेत, त्यांस कांहींतरी मर्यादा असते. आणि अविचारी आहेत ते तर भांडावयास उठतात. कोणी म्हणतो, शिवाचें लिंग गळ्यांत बांधा. कोणी म्हणतो, शालग्रामपूजा करा. कोणी म्हणतो, तप्त मुद्रा घ्या. कोणी म्हणतो, भस्म लावा. कोणी म्हणतो, अग्निहोत्र घेऊन यज्ञ करा. कोणी म्हणतो, निवृत्तिमार्गास लागून संन्यास घ्या. कोणी म्हणतो, दया, शांती धरा. कोणी म्हणतो, नामस्मरण करा. कोणी म्हणतो, वाममार्गांत जा. कोणी म्हणतो, काशीस जाऊन गंगास्नान करा. याप्रमाणें हजारो मार्ग प्रवृत्त झाले आहेत. आतां यांत खरें काय, आणि खोटें काय, याचा विचार करावयास लागेल तर सर्व भ्रमसागर दिसतो. याचा निर्णय होणें फार कठीण व पूर्वी कोणांस झाला नाहीं आणि पुढें व्हावयाचा नाहीं. जग अ[ति]विचित्र त्याचा अंत समजत नाहीं. आणि अशीं अनंत जगतें आकाशांत भ्रमत आहेत, असें अनंत नक्षत्रानें भरलेलें आकाश याजवरून सिध्द होतें. या येवढ्या घोटाळ्यांत प्रत्येक मनुष्य म्हटलें तर उंबराचे वृक्षावरील केंबराप्रमाणें अति लहान दिसतो. सर्व जग जडानें आणि जीवांनीं भरलेलें आहे. आणि जडाचें सजीव आणि सजीवाचें जड अशी स्थिती पुनः एकाच पदार्थास प्राप्त होते. लहरी नित्य चालल्या आहेत. शाश्वत कांहींच दिसत नाहीं. मोठाले तिसमारखान झाले, तेही धुळीस मिळाले. त्यांचें नांवदेखील राहिलें नाहीं. तसेंच हल्लीं आहेत. त्यांची शेपन्नास वर्षांनीं तीच अवस्था होणार. ज्याचा तो गेला म्हणजे सर्व लयास गेलें. येथें कोण कोणाचा शत्रू आणि कोण कोणाचा सखा म्हणावा. जे तर्कबाज झाले त्यांणीं अनंत कल्पना काढल्या. कोणी जग नित्य आणि अनादि आहे, असें आपले ठिकाणीं ठरविलें. कोणी म्हणतात, निर्माण केलें आहे व लयासही जाईल. कोणी म्हणतात, स्वभावानें उत्पन्न झालें. कोणी म्हणतात, अमुक पदार्थापासून झालें. कोणी म्हणतात, परिमाणुपासून झालें. कोणी ईश्वरास सगुण ठरवितात, कोणी निर्गुण ठरवितात. कोणी चतुर्भुज, कोणी सहस्रभुज म्हणतात. कोणी म्हणतात, त्यास स्तुती आवडतें. कोणी म्हणतात, त्यास तप आवडतें. कोणी म्हणतात, त्यास मोठा नैवेद्य व अभिषेक पाहिजे. कोणी म्हणतात, त्याला कांहीं नको. कोणी म्हणतात कीं, तो एकटाच कारभार करितो. कोणी म्हणतात, त्याणें अनेक लहान लहान कारभारी, यम, इंद्र, वरुण, इत्यादि नेमले आहेत. असे वाद करतांकरतां सर्व थकले. पण ईश्वराचा अंत कोणास लागला नाहीं. कोणी म्हणतात, दाढी ठेवा; कोणी म्हणतात, शेंडी ठेवा; कोणी म्हणतात, सर्व डोकें वाढवा; कोणी म्हणतात, सर्व क्षौर करा; अशा या घोटाळ्यांत प्राणी असणें म्हणजे समुद्रांत जसा एक मनुष्यास टाकावा आणि त्यास दिशादेखील दिसत नाहीं, कोठें चाललों आहे व कोठून आलों यांचें भान सुटतें; तद्वत् या पृथ्वीवरचे प्राणी सर्व भवसागरांत पडले

आहेत. याचेंच नांव भवसागर. यांत अंधळे म्हणजे अज्ञानी आहेत. त्यांची स्थिति कांहीं बरी, कारण कीं, त्यांस कांहीं ठाऊकच नाहीं. समुद्रही दिसत नाहीं व दिशाही दिसत नाहींत. तरणोपायही दिसत नाहीं. सर्वच अंधःकार. असे अज्ञानी जे आहेत ते या भवसांगराची विस्तीर्णता पाहून आश्चर्याचे महापुरांत निमग्न होतात. आतां जसी या जगांतील स्वार्थावर प्राणी ममता ठेवितो व त्या सुखाकरितां चोहोंकडे धावत असतो, तसाच मनास परमार्थसुखाचा पण ओढा असतो. जिवास सर्व व्यावृत्ती करून येथील सुखाची तृप्ती झाली म्हणजे वृध्धापकाळीं, वैधव्यकाळीं, दुखण्यांत असें वाटतें कीं, आतां मरणानंतरची सुखसामोग्री कशी मिळेल? या काळजीनें आपले जे पुरोहित धर्माध्यक्ष असतील, त्यांस बोलावून या गोष्टीचा छडा पाडतो. मग लौकिकावर दृष्टी देऊन जसेजसे उपाय सुलभ दिसतील, ते करण्यास आरंभ करितो. भाड्याचीं घोडीं करून काशीस जातो. पेटींतील रुपये काढून तुळा करितो, प्रायश्चित्त करतो, ब्राम्हणभोजनें करितो. जसा आरोग्य इच्छिणारा हेमगर्भ, वसंत, रससिंदूर, इत्यादि रसायणें घेतो, तसा हा परमार्थ इच्छिणारा प्राणी आपले विचारानुसार परमार्थसुख शोधितो, आणि त्यास सल्लामसलत मिळेल त्याप्रमाणें वागतो. याप्रमाणें जनाची राहाटी आहे. आतां या जगांत दुसरे जगांतील प्राणी आला तर त्यास हा मोठा चमत्कार दिसेल कीं, हे जीव किती मार्गानें प्रवृत्त झाले आहेत. आणि प्रत्येकजण दुसऱ्यास नांव ठेवितो. तर आतां हीं अनेक पुरुषांनीं अनेक शास्त्रें आपले आपले रुचीप्रमाणें लिहिलीं तीं सर्व येकीकडे ठेऊन युक्तीस मदतीस घेऊन या स° प्रकरणांचा विचार केला तर काय निघतें तें पाहूं. जगांत जितकीं शास्त्रें चालत आहेत, तीं एकामेकाशीं विरुध्ध, याजकरितां खरीं म्हणवत नाहींत व त्यांतील पोरकट गोष्टी व स्वार्थी लोकांनीं तीं लिहिलीं हा दोष सर्व ग्रंथांवर सारखा येतो. तेव्हां मसलतदार लोकांनीं तीं कारणाकरितां लिहिलीं, हें सिद्ध. आतां मरणानंतर काय आहे हें कोणास ठाऊक नाहीं व कोणी साक्षी देण्यास आला नाहीं. तेव्हां याविषयीं कांहीं कळत नाहीं. दुसरें ईश्वर आहे असें युक्तीनें सिध्ध होतें, पण तो कसा आहे व त्यास काय प्रिय व काय अप्रिय हें कांहीं कळत नाहीं; परंतु ईश्वराचें मोठें सामर्थ्य आहे असें दिसतें. तिसरें आपण जगांत जन्मलों तेव्हां अनेक माणसें जीं पृथ्वीवर आहेत त्यांतील आपण एक आहों. तेव्हां या सर्वांमध्यें जोंपर्यंत आपणांस राहणें आहे, तोंपर्यंत सुखानें राहावें हें उत्तम व सिध्ध आहे. यास्तव या सर्वांचा निष्कर्ष काढला तर खालीं लिहिलेलीं कलमें उपजतात.

१ ईश्वर थोर आहे. त्यास अनन्यभावानें शरण असावें. त्यांत तो काय करील तें करील. मनुष्य सर्वथैव अशक्त, याचे हातून कांहींच होत नाहीं. यास्तव त्याणें असा भरवसा ठेवावा हें योग्य.

२ व्यवहारांत पाप करूं नये. खरेपणानें वागावें. दुसऱ्याचे यथान्याय सुखाची

हानी करूं नये. सर्व लोकांचें बरें इच्छावें व करावें, हें मुख्य तत्त्व आहे.

३ मागून ज्या मार्गानें लोक गेले त्या मार्गानें जावें. त्यांत विचारानें योग्यअयोग्य पाहावें.

सदरहू वरखालीं लिहिलेलीं वाक्यें पाहा—

श्लोक

ऐशी केवळ भक्ति मात्र करितां कैवल्यही पावती।
भक्तीवांचुनि अन्यथा न चुकती तेव्हां तरी दुर्गती॥
मद्याचा कलशासि शुध्द करितां व्यर्थैंचि तीर्थें जशीं।
श्रीगोविंदपदारविंदविमुखा कर्में समस्तें तशीं॥ १॥

कृष्णार्पणें करिति जे निज सर्व कर्में॥ सिध्धी अनेक घडती हरिदास्यकर्में॥
पापें समस्त जळती उठती विरक्ति॥ वाढे जशी जशि मुकुंदपदाब्ज भक्ति॥१॥

—वामन, नामसुधा.

आतां कोणा शरण जावें। सत्य कोणाचें मानावें॥ १॥
नाना पंथ नाना मतें। भूमंडळीं असंख्यातें॥२॥
माझे कुळींचीं दैवतें। पाहों जातां असंख्यातें॥ ३॥
रामकृष्ण महादेव बनशंकरी खंडेराव॥ ४॥
रामदासीं देव एक। येर सर्वही मायीक॥ ५॥

—रामदास, वैराग्यपंचक.

भागीरथी गोदावरी। केली कृष्णाही कावेरी॥ १॥
मातापूर तुळजापूर। सप्तशृंगी कोल्हापूर॥ २॥
सिध्धमैराळ मारुती। देवें केले नेणों किती॥ ३॥
तरी संशय तुटेना। पूर्वगुण पालटेना॥ ४॥
रामदास सांगे खूण। भक्तिवीण सर्व शीण॥ ५॥

—रामदास, वैराग्यपंचक.

त्रयी सांख्ययोगः पशुपतिमतं वैष्णवमिति.....
रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां॥—महिम्नस्तोत्र.
देवान् देवयजो यांति मद्भक्ता यांति मामपि॥—गीतायां [७·२३]

[नंबर १६३]

धर्मसंबंधी माहिती (नंबर १३)

पुत्र

पूर्वी हिंदु लोकांमध्यें द्वादशापुत्र बापाचे वारस होत होते, हें प्रसिध्ध आहे. सांप्रत ती चाल चालत नाहीं. परंतु पूर्वीच्या काळीं हे द्वादश पुत्र कोणते प्रकारचे होते व त्याजवरून स्त्रीपुरुषांची लग्नाची स्थिति कशी होती, हें लक्षांत येण्याकरितां मनुस्मृतीच्या नववे अध्यायांतून १५९ पासून श्लोक खालीं लिहिले आहेत :—

औरसः क्षेत्रजश्चैव दत्तः कृत्रिम एव च ॥
गूढोत्पन्नोऽपविद्धश्च दायादा बांधवाश्च षट् ॥ १५९ ॥
कानीनश्च सहोढश्च क्रीतः पौनर्भवस्तथा ॥
स्वयंदत्तश्च शौद्रश्च षडदायादबांधवाः ॥ १६० ॥

अर्थ

१ लग्न झालेले स्त्रियांपासून जन्मला तो औरस पुत्र.
२ स्त्रीनें नवरा सोडून परकी पुरुषांशीं व्यभिचार करून किंवा नियोगापासून उत्पन्न केला तो क्षेत्रज पुत्र.
३ आईबापांनीं आपला पुत्र दुसऱ्यास दिला तो दत्तक.
४ दुसऱ्याचा मुलगा आपलेजवळ ठेऊन त्याजवर लोभ करून आपला म्हणविला तो कृत्रिम पुत्र.
५ ज्याचे बापाचा ठिकाणा नाहीं, तो गूढज.
६ टाकलेलें मूल पाळलें तो अपविध्ध पुत्र.
७ मुलीचे लग्नापूर्वी बापाचे घरीं झाला तर तो कानीन.
८ लग्न होतांना स्त्री गरोदर होती, तर नवऱ्याचे घरीं मात्र—जन्मला सहोढज पुत्र.
९ मोल देऊन खरीदी घेतला तर तो क्रीत पुत्र.
१० नवरा मेल्यावर दुसरा नवरा केला आणि जे पुत्र झाले, ते पौनर्भवपुत्र.
११ कोणी मुलगा आपलेच मतानें दत्तक झाला तो स्वयंदत्त पुत्र.
१२ शूद्रजातीची स्त्री असोन तिला पुत्र झाला तो शौद्र पुत्र.

पुढें पुराणांत अशीं वचनें आहेत कीं, यांपैकीं पहिला व तिसरा मात्र कलियुगांत मान्य आहे, बाकी गैरमान्य आहेत; परंतु असें दिसतें कीं, पुराणें हीं कांहीं कायदे नव्हेत. तेव्हां पुराणांवरून दाहा प्रकारचे पुत्र बंद झाले असें नाहीं. तर लोक

अधिक अधिक शाहाणे व अभिमानी झाले, तसतसे त्यांणीं त्या चाली सोडल्या व दोनच चालींचा प्रघात चालू लागला. तेव्हा पुराणांतही त्या धोरणाचा श्लोक घातला. आलीकडे असें समजतात कीं, स्मृती पुराणांनीं रद्द केली, परंतु तसें झालें नसावें, हें स्पष्ट आहे. कारण कीं, पुराणें स्मृतीप्रमाणें कायदे नव्हेत व ऋषींनीं पुराणें लिहिलीं तीं सर्व ठिकाणीं एकदम प्रसिध्ध झालीं नाहींत व अद्याप जीं उत्तर हिंदुस्थानांत आहेत, तीं दक्षणेस नाहींत. तेव्हां पुराणांचें वचन धरून लोकांनीं चाली सोडल्या असें नाहीं. परंतु चाल चालू झाल्यावर पुराणांत ती लिहिली गेली, इतकेंच आहे. ही द्वादशपुत्रांची चाल लोकांस वाईट दिसूं लागली, तेव्हांपासून गोळक वगैरे ज्ञाति, उत्पन्न झाल्या असाव्या व पुराणांतील लेखांनीं त्या बळकट झाल्या नाहींत. मनुवचनाप्रमाणें क्षेत्रज पुत्र, पौनर्भव, गूढज यांत सर्व गोळकांचा समावेश होईल. आणि ते दायाद [नाहींत, पण] बांधव मानले जातात. मागील काळाची स्तुति करणारे आहेत, त्यांणीं विचार केला असतां हल्लींचा काळ बरा किंवा जुना बरा हें समजेल. मग वेगळी जात कशी होऊं शकेल? पूर्वकाळीं कसातरी पुत्र असावा, इतकाच हेतु दिसतो. कारण कीं—

अपुत्रेण सुतः कार्यो यादृक् तादृक् प्रयत्नतः ॥
पिंडोदकक्रियाहेतोः नामसंकीर्तनाय च ॥ १ ॥
अपुत्रेणैव कर्तव्यः पुत्रप्रतिनिधिः सदा ॥ –मयूख.
नापुत्रस्य लोकोस्तीति तत्सर्वे पशवो विदुः ॥–ऐतरेय ब्राह्मण ७.

पंचिकाखंड १३, हरिश्चंद्रकथायां ॥

[नंबर १६४]

धर्मसंबंधी माहिती (नंबर १४)

हिंदु लोकांमध्यें काळगणना मोठी चमत्कारिक आहे व तिचा अंतपार नाहीं. काळाचा ठिकाण नाहीं, असें समजून त्यांनीं त्याचे जितके होतील तितके विभाग केले आहेत व शेवटीं त्यांचें चक्र करून त्यांत पाहिजे ती गोष्ट मावेल असें केलें आहे. आरंभीं लहान भाग कसे केले आहेत, ते पाहा–

डोळ्याची पापणी लवण्यास जितका वेळ लागतो तो – निमिष—

१५	निमिष,	म्हणजे	१ काष्ठा.
३०	काष्ठा,	,,	१ कला.
३०	कला,	,,	१ मुहूर्त.

मुहूर्त सरासरी दोन घटिकांचा आहे. हे दिवसां १५ व रात्रीं १५ आहेत. एका दिवसांत ५ काळ:–प्रातः, संगव, माध्याह्न, अपराह्न आणि सायं. प्रत्येक काळांत तीन मुहूर्त—

३० मुहूर्त, म्हणजे १ अहोरात्र.
१५ अहोरात्र, ,, १ पक्ष.
२ पक्ष, ,, १ मास.

मासाचे प्रकार ४ आहेत; सौम्य तिथीवरून होतो, सौर संक्रांतीवरून होतो, सवन ३० दिवसांनीं होतो, [तो] नक्षत्रमास. आतां प्रत्येक मास ज्या नक्षत्रावर आरंभतो तेंच त्याचें नांव.

१ आश्विन.....अश्विनी नक्षत्रापासून, पौर्णिमेपासून पौर्णिमेपर्यंत.
२ कार्तिक ..... कृत्तिकांवर.
३ मार्गशीर्ष.....मृगावर.
४ पौष..... पुष्यावर.
५ माघ..... मघावर.
६ फाल्गुन..... पूर्वाफल्गुनीवर.
७ चैत्र ..... चित्रावर.
८ वैशाख ..... विशाखावर.
९ ज्येष्ठ..... ज्येष्ठावर.
१० आषाढ..... उत्तराषाढावर.
११ श्रावण. ..... श्रवणावर.
१२ भाद्रपद ..... उत्तरा भाद्रपदावर.

मासांचीं दुसरीं नांवें—

१ चैत्र.....मधुमास.
२ वैशाख.....वसंतमास.
३ ज्येष्ठ.....शुक्र.
४ आषाढ.....शुची.
५ श्रावण.....नभस्.
६ भाद्रपद.....नभस्या.
७ आश्विन.....इषा.
८ कार्तिक.....ऊर्जा.
९ मार्गशीर्ष...सहस् व आग्रहायण.
१० पौष.....सहस्या.
११ माघ.....तपस.
१२ फाल्गुन.....तपस्या.

२ मास, म्हणजे १ ऋतु.

ऋतु ६ गणिले आहेत, त्यांची नांवें:–वसंत, ग्रीष्म, वर्ष, शरत्, हेमंत आणि शिशिर. जेव्हां हिंदु हिमालयाकडे होते, तेव्हां ही गणति झाली आहे, व त्या देशांत

हे स्पष्ट दिसतात. परंतु दक्षिणेंत २ च ऋतु गणिले आहेत. त्यांचीं नांवें :—उन्हाळा, पावसाळा, आणि हिंवाळा.

३ ऋतु म्हणजे १ अयन.
२ अयनें ,, १ वर्ष.

वर्ष म्हणजे पावसाळा, हा मुख्य काळ, म्हणून तेंच नांव वर्षांस दिलें.

ज्या काळीं शककर्ते नवते व मोठाले लांब काळ गणावयाची जरूर नवती, किंवा तितकें ज्ञान वाढलें नवतें; तेव्हां ५ वर्षांचा एक काळ, १२ वर्षांचा एक काळ, २० वर्षांचा एक काळ, साठ वर्षांचा एक काळ, अशीं चक्रें असून त्यांस अनुक्रमें नांवें :— परिवत्सर, अनुवत्सर, इदवत्सर, अद्रवत्सर, संवत्सर, अशीं आहेत.

जशीं मासांस नांवें ठेविलीं, तशीं संवत्सरचक्रांत ६० नांवें ६० वर्षांस कल्पिलीं आहेत. हे विभाग यज्ञयागादि करावयाचे धोरणानें केले आहेत. कारण प्रत्येक विभागीं कांहींतरी वैदिककर्म दर्श, पौर्णमास, सायंप्रातर्विधी, चातुर्मास्य इत्यादि आहे. यावर ज्योतिष्यांनीं कल्पना चालवून अमुक संवत्सराचें अमुक फल इत्यादि बस्तान बसविलें आहे.

आतां १४ लाख वर्षांचें कृतयुग, १० लाख वर्षांचें त्रेत, ८ लाख वर्षांचें द्वापार, ४ लाख वर्षांचें कलियुग, ४ युगांची ३६ लाख वर्षें म्हणजे १ चौकडी, अशा सहस्र होतील तेव्हां ब्रम्हदेवाचा १ दिवस, असें कल्पिलें आहे. त्या दिवसास कल्प म्हणतात. या एका कल्पांत १४ मनु होतात. त्यांचीं नांवें—

१ स्वायंभुव.	८ सावर्णी.
२ स्वारोचिष.	९ दक्षसावर्णी.
३ उत्तम.	१० ब्रम्हसावर्णी.
४ तामस.	११ धर्मसावर्णी.
५ रैवत.	१२ रुद्रसावर्णी.
६ चाक्षुष.	१३ रोच्य.
७ वैवस्वत.	१४ भात्य.

दर मन्वंतरास ७१ चौकड्या जातात व एक संधी-काळ जातो. नंतर दुसरा मनु होतो. युगांतीं अल्प प्रळय, मन्वंतराचें अंतीं लघुप्रळय, कल्पांतीं महाप्रळय होतो. दुसरा कल्प उजाडला म्हणजे ब्रह्मदेव सृष्टी, सर्ग, विसर्गादिक उत्पन्न करितो. याप्रमाणें ब्रम्हदेवाचीं १०० वर्षें भरतील तेव्हां विष्णूचा १ दिवस; विष्णूचीं १०० वर्षें भरतील तेव्हां शिवाचा १ दिवस; शिवाचीं १०० वर्षें भरतील तेव्हां शक्तीचें १ निमिष होतें. प्रधान पुरुष परब्रम्ह त्यास कालभेद नाहीं. ब्रम्हदेवाचे एका आयुष्यांत ३६००० दिवस,

तितके कल्पच आहेत. त्यांत पुराणिकांनीं कल्प धरून कथा लिहिल्या व कल्पांचीं नांवें ठेविलीं तीं—

कृष्णवाराहकल्प.	ऋतुकल्प.
पीतवासा.	सावित्र.
वन्ही.	वैराजः.
ज्ञान.	श्वेतवाराह.
श्वेतरोहित.	

अशीं शेंपन्नास नांवें सांपडतात, परंतु पुराण लिहिणारांस ही सामोग्री मोठी झाली. एक कल्प मनांत आणावा व त्यांतील रानें, नद्या, यांचें पाहिजे तसें वर्णन लिहावें. प्रत्येक कर्मांत संकल्प करितात. म्हणजे कालदेशनिदर्शन करून अमुक कर्म करितों, अमुक कारणास्तव, अशी प्रतिज्ञा करितात, त्यांत ब्राम्हण लोकांचें वर्णन कसें करितात तें पाहा—

> **"प्रवर्तमानस्य कालस्य अद्य ब्रह्मणोद्वितीयेपरार्धे श्रीश्वेत-वाराहकल्पे वैवस्वतमन्वंतरे अष्टाविंशतितमे कलियुगे शालि-वाहन शके रक्ताक्षीनामसंवत्सरे वैशाखमासे कृष्णपक्षे,** इत्यादि."

ब्रम्हदेवाचा श्रीश्वेतवाराह नांवाचा दिवस त्याचा दुसरा प्रहर, त्यांतील वैवस्वत सातवा मनु, त्याचें राज्य त्यांतील २८ वे चौकडीचे शेवटलें कलियुग, त्यांतील शालिवाहनशकांतील अमुक संवत्सर.

याजवरून पूर्वी साडेतेरा हजार कल्प गेले, असें झालें. हें कालविधान आहे. त्याच मासल्याचें देशविधान आहे—"जंबुद्वीपे भरतखंडे दंडकारण्ये" इत्यादि.

हे पाठ पुराणावरून घेतले आहेत. या कालाचे विभागामुळें जागोजाग उत्पत्ति व जागोजाग लय कल्पायासही सोय पडली. प्रलय उपसंहार-प्राकृत, महाप्रलय, नैमित्तिक महाप्रलय, आत्यंतिक, नित्य, इत्यादि. प्रत्येक पुराणिक आपली कथा सर्गापासून आरंभितो व लयापर्यंत नेतो. त्यांतील राजे, देव, ऋषी, पृथ्वी, (मुनु,) मनु, खंडें, नद्या इत्यादि वर्णन करितो. यावरून हिंदुलोकांस असें वाटतें कीं, कोणतेही काळची आपलेजवळ माहिती नाहीं असें नाहीं. मागील कल्पाचे कल्प लिहिलेले आहेत, तेव्हां इराणची आणि इंग्लंडची बखर, किंवा चीनचा इतिहास यांत आहे काय? पुराणिकांनीं किती जुन्या गोष्टी लिहून ठेविल्या आहेत? त्यांत मोक्षमार्ग किती दाखविले आहेत? कितीएक राजांस अमुक व्रत केलें म्हणून अमुक फळ झालें. कोणास पुत्र झाला, कोणास राज्य मिळालें, कोणास डोळे आले, कोणास वांछित फल प्राप्त झालें; एवढाल्या गोष्टी आपलेजवळ असतां इतिहास शिकणें म्हणजे काय? ज्याचे दाराशीं

हत्ती असतो त्यास घूस आणून नजर केली, तर तुच्छता दिसते, त्याप्रमाणें हिंदु लोकांस अर्वाचीन इतिहासाचें ज्ञान तुच्छ दिसतें. परंतु ही सर्व कल्पित निरुपयोगी सृष्टी-कथा लिहिणारांनीं आपले बुध्धीचे योगानें बडबड उभी केली. त्यांत कांहीं खऱ्या दंतकथा मिसळल्या आहेत. परंतु खोट्या गोष्टी फार; याजमुळें उपयोगीं पडण्याजोगा तो इतिहास नव्हे, अशी समज लोक घेतील. तेव्हां खरा इतिहासच उपयोगी आहे, असें समजून पौराणिक इतिहासावरील लक्ष सोडून खरे इतिहासाकडे वळतील.

[नंबर १६५]

धर्मसंबंधी माहिती (नंबर १५)

हिंदु-शास्त्राप्रमाणें स्त्रियांची स्थिति

बालया वा युवत्या वा वृद्धया वाऽपि योषिता ।
न स्वातंत्र्येण कर्तव्यं किंचित्कार्यं गृहेष्वपि ॥—मनु. [५-१४७]

अर्थ—स्त्री लहान किंवा तरुण किंवा वृध्ध असली तरी तिणें घरांतदेखील कांहीं आपले मनानें करूं नये.

रक्षेत्कन्यां पिता विन्नां पतिः पुत्रास्तु वार्धके ।
पक्षद्वयावसाने तु राजा भर्ता प्रभुः स्त्रियः ॥—नारद.

लहानपणीं बापानें व वृध्धापकाळीं भ्रतार व पुत्र यांणीं स्त्रीचें रक्षण करावें. आणि उभय पक्षाकडील कोणी स्त्रीस नसेल तर राजानें तिचें रक्षण करावें.

पाणिग्राहस्य साध्वी स्त्री जीवतो वा मृतस्य वा ।
पतिलोकमभीप्संती नाचरेत्किंचिदप्रियं ॥—मनु. [५·१५६]

आपला नवरा जिवंत असो, अगर मृत असो, त्याच्या विरुद्ध चांगल्या स्त्रीनें वागूं नये.

उपचर्यः स्त्रियाः साध्व्या सततं देववत् पतिः ।
पतिशुश्रूषयैवेह स्वर्गमेव महीयते ॥—मनु. [५·१५४–५]

चांगल्या स्त्रीनें पतीची देवाप्रमाणें चाकरी करावी. तेणेंकरून तिला स्वर्ग होतो.

सदा प्रहृष्टया भाव्यं गृहकार्येषु दक्षया ।
सुसंस्कृतोपस्करया व्यये चामुक्तहस्तया ॥—मनु. [५·१५०]

घरचें काम स्त्रीनें संतोषानें करावें, आणि काटकसरीनें खर्च करावा.

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक

यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥—मनु. [३·५६]

स्त्रियांचा ज्या घरांत संतोष ठेविला जातो त्या घरांत सर्व देवता प्रसन्न असतात. सर्व कामें स्त्रियांसहवर्तमान करावी. त्यांस टाकून केलीं तर तीं व्यर्थ होतील.

नकश्चिवद्योषितः शक्तः प्रसह्य परिरक्षितुं ॥—मनु. [९·१०]

स्त्रियांस आग्रहानें कोणी पुरुष आपले कबजांत ठेवूं शकत नाहीं. यास्तव त्यांस कामधंदा उद्योग सांगावा.

पत्नी भर्तुर्धनहारी या स्यादव्यभिचारिणी ।—मयूख.

व्यभिचार करणारी स्त्री नसल्यास नवऱ्याची वारस होईल.

मृते भर्तर्यपुत्रा याः पतिपक्षः प्रभुः स्त्रियः ।
विनियोगात्मरक्षासु भरणेषु च ईश्वरः ॥—नारद, वीरमित्रोदये.

जीस नवरा व मुलगा नाहीं तिचें रक्षण सासऱ्याकडील लोकांनीं करावें.

न स्त्रीभ्यो दासबालेभ्यः प्रदद्यात्किंचिदुद्धृतं ।
दाता न लभते तत्तु तेभ्यो दत्तं तु यद्वसु ॥—विवादचिंतामणी.

लहान पोर, स्त्री किंवा दास यांस कोणी कांहीं देऊं नये; दिलें असतां तें त्यांस परत मिळण्यास हक्क होणार नाहीं.

आदाने वा विसर्गे वा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।—याज्ञवल्क्य.

देणें घेणें करण्यास स्त्रीस स्वातंत्र्य नाहीं.

बाल्ये पितुर्वशे तिष्ठेत्पाणिग्राहस्य यौवने ।
पुत्रास्तु स्थाविरे भावे न स्वातंत्र्यं क्वचित्स्त्रियः ॥—मनु. [५.१४८]

लहानपणीं बापानें, तरणेपणीं भ्रतारानें, वृध्धपणीं मुलानें, स्त्रीचें संरक्षण करावें. स्त्रीस स्वतंत्रपणा कधींच नाहीं.

प्रतिपन्नं स्त्रियादेयं पत्या वा सह यत्कृतं ।
स्वयंकृतं वा यद्दणं नान्यत् स्त्री दातुमर्हति ॥—मयूख.

नवरा आणि आपण असें खत लिहून देऊन कर्ज घेतलें असेल किंवा नवऱ्याचे सांगितल्यावरून आपलेवर जिम्मा घेतला असेल तर किंवा स्वतांच आपण केलें तर, हीं तीन ऋणें स्त्रीवर पडतात. दुसरें कांहीं तिला देणें पडत नाहीं. परंतु–

गोपशौंडिकशैलूपरजकव्याधयोषितां ।
ऋणं दद्युः पतिस्तासां यस्मात्वृत्तिस्तदाश्रया ॥—मिताक्षरा.

गौळी, कलाल, परीट, पारधी, तमासगीर यांच्या स्त्रियांनीं कर्ज केलें तरी नवऱ्यांनीं

भरावें. कारण कीं, त्यांचे उद्योगाचे आश्रयाने पतीचें जीवन आहे.

नारी खल्वननुज्ञाता पित्रा भ्रात्रा सुतेन वा ।
विफलं तद्भवेत्तस्या यत्करोत्यौर्ध्वदेहिकं ॥ — कात्यायन.

स्त्रीनें धर्मसंबंधीं कांहीं कर्म आपले बापाची, भ्रताराची किंवा पुत्राची आज्ञा घेतल्यावांचून केल्यास विफल आहे.

गुरोः शिष्ये पितुः पुत्रे दंपत्योः स्वामिभृत्ययोः ॥ — मिताक्षरा.

विद्यार्थी, पंतोजी, [पिता पुत्र], नवराबायको, धनी चाकर, यांचा वाद सामान्यतः राजानें ऐकूं नये.

सौदायिके सदा स्त्रीणां स्वातंत्र्यं परिकीर्तितम् ॥ — कात्यायन.

बापानें व नवऱ्यानें वगैरे स्त्रीस खासगी म्हणून किंवा अलंकारादिक दिले असेल, त्याविषयीं देण्याघेण्यास स्त्री मुक्त्यार आहे.

पत्नी दुहितरश्चैव पितरौभ्रातरस्तथा ।
तत्सुता गोत्रजाबंधून् शिष्यसब्रह्मचारिणः ॥ — याज्ञवल्क्य.

जो मनुष्य विभक्त व अपुत्र त्याची वारस बायको होते. स्त्री नसेल तर कन्या, ती नसेल तर बाप, तो नसेल तर भाऊ, तोही नसेल तर पुतण्या, तोही नसेल तर गोत्रज पुरुष, तोही नसेल तर भाऊ किंवा शिष्य, किंवा शाळासोबती हे वारस अनुक्रमानें होतात.

अनंतरः सपिंडाद्यः तस्य तस्य धनं भवेत् ॥ — मनु. [९-१८७]

सपिंड, गोत्रज, वारस ठरविणें तर जवळचा असेल तो ठरवावा. जवळचा टाकून दूरचा घेऊं नये.

षड्विधं स्त्रीधनं स्मृतं ॥ — मनु. [९-१९४]

स्त्रीधन सहा प्रकारचें आहे—

रिक्थग्राहै ऋणं दाप्यं । — याज्ञवल्क्य.

मिळकत जो घेईल तो ऋण देईल—

न योषित्पतिपुत्राभ्यां न पुत्रेण कृतं पिता ।
दद्याद्ऋते कुटुंबार्थान् न पतिः स्त्रीकृतं तथा ॥ — याज्ञवल्क्य.

स्त्रीचे नवऱ्यानें व पुत्रानें केलेलें कर्ज ती देणार नाहीं व मुलानें केलेलें कर्ज बाप देऊं शकत नाहीं. स्त्रीनें केलेलें कर्ज तिचा नवरा देणार नाहीं. पण कुटुंबाचे हिताकरितां केलें असेल तर दिलें पाहिजे.

स्वर्याते स्वामिनि स्त्री तु ग्रासाच्छादनभागिनी । — कात्यायन.

अविभक्त कुटुंबांत पुरुष मुक्त्यार होतात. जो पुरुष मरेल त्याची स्त्री अन्नवस्त्र मात्र घेईल.

स्वकुटुंबाविरोधेन देयं दारसुतात्ऋते ॥ — मयूख.

बायको व मुलगे यांस अडचण न पडेल अशा रीतीनें दानधर्म करावा.

अप्रजः स्त्रीधनं भर्तुः । — याज्ञवल्क्य.

स्त्रीस प्रजा नसेल तर तिचा नवरा तिची मिळकत घेईल.

मातुर्दुहितरःशेष ऋणादाभ्यऋतेन्वयात् ॥ — याज्ञवल्क्य.

स्त्रीस पुत्र नसला तर तिची मुलगी वारस होते. कर्ज वारून जें धन राहील त्यास मात्र—

पत्यौ जीवति या नारी उपवासव्रतं चरेत् ।
आयुष्यं हरते भर्तुः सा नारी नरकं व्रजेत् ॥ — लघुपाराशर.

स्त्रीचा नवरा जिवंत असतां जी उपवासव्रतादिक करील, तिच्या नवऱ्याचें आयुष्य कमी होऊन ती स्वतां नरकास जाईल.

नास्ति स्त्रियः पृथक्यज्ञो न व्रतं नाप्युपोषणं ।
भर्तुशुश्रूषणेनैव लोकानिष्टान् व्रजंति ताः ॥ – व्रतार्क.

स्त्रीस व्रत-पूजा-उपोषण कांहीं नाहीं. भर्त्याची सेवा करावी, हेंच तिचें व्रत.

स्त्रीधनानि तु ये मोहादुपजीवंति बांधवाः ।
नारी यानानि वस्त्रं वा ते नरा यांत्यधोगतीं ॥ — मनु. [३-५२]

स्त्रीचें द्रव्य भाऊबंदांनीं हरण करूं नये, करतील ते दुर्गतीला जातील.

न कन्यायाः पिता विद्वान् गृह्णीयाच्छुल्कमण्यपि ।
गृह्णञ्छुल्के हि लोभेन स्यान्नरोऽपत्यविक्रयी ॥ – मनु. [३.५१]

बापानें मुलीबद्दल कांहीं द्रव्य घेऊं नये. जर घेईल तर अपत्यविक्रय होईल.

अदुष्टां पतितां भार्यां यौवने यः परित्यजेत् ।
स मृतो लभते स्त्रीत्वं वैधव्यं च पुनः पुनः ॥ – पाराशर.

तरणी बायको, जातिभ्रष्ट किंवा उपद्रव देणारी नसतां जो पुरुष टाकितो, त्यास स्त्रीचा जन्म वारंवार होऊन वैधव्य प्राप्त होतें.

दरिद्रं व्याधितं मूर्खं भर्तारं याऽवमन्यते ।
सा मृता जायते शूनी सूकरी वा पुनः पुनः ॥ – पाराशर.

दरिद्री, रोगी किंवा मूर्ख भ्रतार म्हणून त्यास स्त्री मानणार नाहीं, तर तिला कुत्र्याचा व डुकराचा जन्म वारंवार प्राप्त होतो.

या न पृच्छति भर्तारं उपोष्य व्रतचारिणी ।
सर्वं तद्राक्षसं गच्छेत्सा नारी नरकं व्रजेत् ॥ – पाराशर.

नवऱ्यास पुसल्यावांचून व्रत किंवा उपवास करील, तर तें सर्व पुण्य राक्षसास मिळून, करणारे स्त्रीस नरक प्राप्त होतो.

मृते भर्तरि या नारी उपोष्य व्रतचारिणी ॥
नरकादुत्धरेद्भर्तुः सा नारी स्वर्गगामिनी ॥—पाराशर.

नवरा मेल्यानंतर उपासव्रत वगैरे स्त्रीनें करावें. तेणेंकरून नवऱ्यास व स्त्रीस स्वर्गवास होतो.

कामं तु क्षपयेद्देहं पुष्यमूलफलैः शुभैः ।
न तु नामापि गृह्णीयात्पत्यौ प्रेते परस्य तु ॥—मनु. [५.१५७]

विधवेनें ब्रह्मचर्यव्रतानें राहावें, परपुरुषाचें नांव देखील घेऊं नये.

मृते भर्तरि साध्वी स्त्री ब्रह्मचर्यव्रते स्थिता ।
स्वर्गं गच्छत्यपुत्राऽपि यथा ते ब्रह्मचारिणः ॥—मनु. [५.१६०]

विधवा ब्रह्मचर्य करील तर अपुत्र असतांही स्वर्गास जाईल. हा विधवाधर्मांतील एक पक्ष आहे.

नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ।
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥—पाराशर.

विधवादिकांनीं पुनर्विवाह करावा, हा दुसरा पक्ष आहे.

तावत्कालं वसेत्स्वर्गे भर्तारं यानुगच्छति ॥—पाराशर.

पूर्वी सती जाण्याचा पाठ होता तो तिसरा पक्ष.

[नंबर १६६]

दीर्घायुष्य

दुराचारो हि पुरुषो लोके भवति निंदितः ।
दुःखभागी च सततं व्याधितोल्पायुरेव च ॥
सर्वलक्षणहीनोऽपि यः सदाचारवान्नरः ।
श्रद्दधानोऽनसूयश्च शतं वर्षाणि जीवति ॥—मनु. ४—१५७।५८

धर्मशास्त्रांत स्नानादिक आचार जो सांगितला आहे, त्याचा हेतु आयुष्यवृध्धी, हें वरील मनुस्मरणानें स्पष्टच आहे. आतां मनुष्याचा संसार यथास्थित होण्यास मुख्य साधन दीर्घायुष्य आहे. म्हणून राजा व प्रजा या सर्वांनीं या कामीं काळजी बाळगली पाहिजे. हल्लीं सरकारानें प्रकृती सुधारण्याविषयीं तजवीज करण्याकरितां वैद्यांची कमेटी

नेमली आहे, ही गोष्ट चांगली आहे. अल्पवयामध्यें मनुष्य मेला तर त्याचे हातून कांहींच सार्थक घडत नाहीं, आणि त्यास जन्माचें दुःख मात्र फुकट होऊन त्याचे श्रम व्यर्थ होतात. यास्तव प्रजेस विद्वान करण्याविषयीं जशी खटपट करावी, त्याचप्रमाणें ती दीर्घायुषी होण्याविषयीं प्रयत्न केला पाहिजे. तसेंच प्रजेची संपत्ती वाढावी, तीस धन-धान्य पुष्कळ मिळावें, या तजविजी राजांनीं केल्या पाहिजेत. बापाचा पुत्राशीं जसा धर्म आहे, त्याचसारखा राजाचा प्रजेशीं आहे. बाप तरी आपले पुत्रास खाण्यास पौष्टिक अन्न देतो, दुर्व्यसनापासून दूर ठेवितो, तेणेंकरून त्याची आयुष्यवृध्धी होते. विद्या शिकवितो, तेणेंकरून त्याचें ज्ञान वाढतें. तसेंच त्यास घर बांधून देतो, शेत घेऊन देतो, विहिरी खणून देतो, म्हणजे त्याजवर त्यांणीं निर्वाह करावा. याचप्रमाणें राजांनीं आपले प्रजेस केलें पाहिजे. त्यांस शाळा, रस्ते करून द्यावे, त्यांस रोग होण्याचीं कारणें असतील तीं निर्मूळ करावीं. म्हणजे अर्थातच त्यांचीं आयुष्यें वाढतात, खाण्यापिण्यास मिळतें, आणि ज्ञानी होतात. लैकरगस या नांवाचा पूर्वी स्पार्टाचे राज्यांत यवनांचा कायदे करणारा पुरुष झाला, त्याणें असें ठरविलें होतें कीं, मुलें उपजतांच जीं रोगी असतील त्यांस टाकून द्यावीं. तो असें म्हणत होता कीं, रोगी व निर्बळ मनुष्य देशांत असून कांहीं फायदा नाहीं. हिंदुशास्त्रांतील आर्त व रोगी यांस जळसमाधी देण्याविषयीं जो ठराव आहे, त्याचा मतलब असाच आहे कीं, उपयोगीपणा मनुष्याचा सरला म्हणजे कसेंतरी करून त्यास खपवावा. परंतु हे ठराव निर्दयपणाचे होते. तथापि प्रजा सबल व निरोगी असावी, हें स्पष्ट आहे. आतां सरकारांतून मोठा खर्च ठेऊन देवी काढतात. जरीमरीचीं औषधें दरएक चौकीवर ठेवितात. हास्पिटलें बांधतात हें सर्व प्रजा दीर्घायुषी करण्याकरितां परोपकारबुध्धीनें करितात. स्वदेशीय राजे मतिहीन झाले आहेत. त्यांस आपलें वैद्यक, आपलें ज्योतिष वाढवावें इत्यादि युक्ती समजत नाहींत. जर मनुष्य लौकर मेला तर त्याचे हातून कांहींच घडत नाहीं. त्याचीं पोरेंबाळें उघडीं पडतात. कारण कीं, बहुतकरून मनुष्यास २५ वर्षांचे सुमारापासून चाळीस पंचेचाळीस वर्षेंपर्यंत मुलें होतात. आतां या मुलांत जे वडील असतात, त्यांस बापाप्रमाणें संसार करण्याची शक्ती येण्यास तीस वर्षें लागतात; तेव्हां बापाचीं वर्षें ५५ किंवा ६० होतात. म्हणून निदान साठ वर्षें-पर्यंत तरी मनुष्य जगला पाहिजे म्हणजे संपदा मिळविण्यास फुरसद सापडते. मुलेंबाळें स्वशक्तीनें संसार करण्याजोगीं होतात. आणि त्यांस कांहीं भांडवल देतां येतें. नाहीं तर त्यांचे सर्व संसाराचा विट होतो. त्यांचीं मुलेंबाळें वाईट, अविद्वान निघतात. इतकेंच नाहीं, पण त्याणें भांबेनारळी इत्यादि लावल्या तरी त्यादेखील व्यर्थ जातात. कारण कीं, १०/२० वर्षेंपर्यंत झाडास वाढविल्याखेरीज तेंदेखील चांगलें होत नाहीं. यास्तव आयुष्य वाढविणें हें संसारांतील मुख्य कलम आहे आणि ईश्वरानें जी बुध्धी आपल्यास दिली आहे, तिचा उपयोग करून तें वाढवितां येतें हें सिध्ध आहे. जरी कधीकधी विचित्र प्रारब्धाची गति आहे, असें दिसतें, तत्रापि तो नेहेमींचा पाठ नव्हे.

ती गोष्ट कदाचित् होणार आहे, आतां उद्योगाचा आणि प्रारब्धाचा संबंध कसा आहे, हें स्पष्ट कळत नाहीं, तत्रापि उद्योगानें कितीएक सिध्धी व्हाव्या असा संकेत ईश्वराचा आहे असें दिसतें. याजकरितां मनुष्यानें आपले आयुष्यवृध्धीस अनुकूळ व प्रतिकूळ कोणत्या गोष्टी आहेत हें हम्मेष चिंतीत जावें. वैद्यविद्येचें ज्ञान वृध्धिगत होऊन त्यांतील कर्में बहुतांस कळावीं असें करावें. कारण आयुष्याची हानी झाली तर फार नाश होईल. आपल्यापेक्षां आपले मागें राहातील त्यांचा फारच नाश आहे. यास्तव अधिक दिवस जगावें कसें याचा विचार सर्वांनीं करावा.

वृध्ध जे आहेत ते सर्वदा आदरणीय आहेत. कारण कीं, आडाणी किंवा अविद्वान् असले तरी त्यांस जगाचा अनुभव पुष्कळ मिळतो. व त्यांस बहुत गोष्टी पाहाण्यास सांपडतात. याजकरितां वृध्ध जे आहेत, ते सर्वदा मान्य आहेत. दुसरें, वृध्ध जे आहेत ते अशक्त असतात. याजकरितां तरुणांनीं त्यांस मानावें. परंतु ज्याणें तरणेपणीं चांगली मेहनत केली, अब्रू मिळविली, द्रव्य संपादिलें असेल, त्यांणींच वृध्धापकाळ इच्छावा. नाहींतर तो दुःखकारक होतो, हेंही तरुणांनीं लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

[नंबर १६७]

ईश्वरप्रार्थनेची पध्धत

जे जे लोक ईश्वरास भजतात व ज्यांस ज्यांस धर्मपुस्तक आहे, त्यांच्या त्यांच्या मध्यें बहुतकरून ईश्वराचे भजनाची जागा व स्तोत्राची पध्धत व भजनाचा दिवस वगैरे नेमलेला असतो. आतां कोणाच्या कशा पध्धती आहेत, त्यांविषयीं थोडा विचार करूं.

मुसलमानांची रीत पाहिली तर, त्यांच्या भजनाच्या नेमलेल्या जागा आहेत. त्यांस मशीदी म्हणतात. प्रत्येक जुम्मा म्हणजे शुक्रवार. या दिवशीं सर्व मुसलमानांनीं जमून निमाज करावी, असा शिरस्ता पैगंबर धर्मस्थापक याणें ठरविला आहे. कुराणाचे पुस्तकांतील कोणताही भाग निमाजेस म्हणतात. परंतु मुख्यत्वेंकरून कुराणाचा पहिल अध्याय व एकशेंचाराावा अध्याय हे फार प्रमुख धरले आहेत. ते अध्याय ते लोक म्हणतात व कितीएक मुसलमान माळ घेऊन त्यांचा हजारो वेळ जप करितात. त्या अध्यायांतील मजकूर असा—

सुरे फातिहा—किंवा सुरअलमहमद असें पहिले अध्यायास नांव आहे. त्याचा अक्षरशाहा अर्थ असा आहे कीं, "जय परमेश्वर, सर्व जिवांचा प्रभू, परम दयाळु, सर्वांस मती देणार, तुला आम्ही भजतों. आणि तुझें सहाय इच्छितों. आम्हांस

सन्मार्गास लाव आणि जे तुझे प्रसाद पावले त्यांची वाट आम्हांस दाखीव. आज तुझे शापानें वाईट मार्गांत जातात, त्यांची वाट आम्हांस लागू नये असें कर."

आतां सुरे एखलास म्हणजे ११२ वा अध्याय. याचा अर्थ–"देव एकच आहे. त्यास अंतपार नाहीं. त्यास कोणी वडील-धाकटा नाहीं व त्यासारखा दुसरा कोणी नाहीं."

आतां खिस्तीयन लोकांकडे पाहिलें तर त्यांच्यामध्येंही लार्डज् प्रेयर म्हणून माथ्यूस याचे ग्रंथांत इसापैगंबरानें प्रार्थनेची एक पध्धत सांगितली आहे, ती कितीएक खिस्तीयन माळा घेऊन वारंवार जपतात व निमाजेस म्हणतात. तिचा अर्थ असा–

"स्वर्गस्थ बापा, तुझे नांवाचा जयजयकार असो. तुझें राज्य होवो. तुझे इच्छेप्रमाणें स्वर्गी वहिवाट होते, तशी पृथ्वीवरही होवो. आम्हांस पोटास देत जा आणि आम्हीं ऋण सोडतों तसें आम्हांसही तूं सोड. आणि अडचणींत न घालतां सर्व वाईटापासून आमचें रक्षण·कर. सर्व राज्य, पराक्रम ब गौरव हीं सर्वकाळ तुझींच आहेत."

कोणतेही पंथांतील मुसलमान असला तरी प्रार्थनेदिवशीं त्याची एकवाक्यता आहे व कोणतेही ग्रंथांतील खिस्तियन असला तरी त्याची प्रार्थना वगैरे पध्धत एकसारखी आहे. पण आपणां हिंदू लोकांकडे पाहिलें तर असें दिसतें कीं, आपणांमध्यें देशबंधुत्व नाहीं. कोणा मनुष्यास विचारलें तर तो म्हणतो कीं, मी अमक्याचा कैवार कशास घेऊं ? तो काय माझ्या जातीगोतांचा आहे? म्हणजे तात्पर्य एके जातीचे लोकांनीं आपले एकमेकांचें रक्षण करावें, एवढें ते समजतात. परंतु आपला एक देश म्हणून सर्वांचें बरें पाहावें हा धर्म कोणाचे मनांत पूर्वापार नाहीं व वास्तविक पाहिलें तर हिंदुस्थान हा अनेक देशांचा एक देश झालेला आहे. भाषा, रितीभाती दरएक भागांत भिन्नभिन्न, तेव्हां हा धर्म उत्पन्न होणें तरी कठिणच आहे. परंतु एक देशांत म्हणजे कर्नाटकांत, महाराष्ट्रांत, गुजराथेंत तरी एकवाक्यता आहे असें म्हणावें, तर तेंही नाहीं. कारण जातिभेद त्यांमध्यें आहेच. तेव्हां जातीमुळें सर्वांचें भजन एक होऊं शकत नाहीं व मुळापासून धर्म ब्राम्हणांकडे सोपला गेला. यास्तव इतरांस धर्माची गरज आहे असें नाहीं. हिंदूधर्माची रीत अशी आहे कीं, मुखत्यारमार्फत धर्म करितां येतो. सर्व गांवचें नवरात्र, होळी, जत्रा, वगैरे एके ठिकाणीं होतात; तसेंच आम्हांकरितां होम, यज्ञ, जप भटाकडून करविले तरी चालतात. एकादशी वगैरे उपवासही एकानें दुसऱ्याबद्दल केले तरी चालतात. तसेंच एकानें श्रावणी केली तर सर्वांची होते. एका पुत्रानें श्राध्ध केलें तर सर्वांनीं केलें असें होतें. प्रत्येकानें धर्मक्रिया करण्याची जरूर नाहीं असें मानिलें होतें. पाऊस पडत नाहीं. अगर रोगोत्पत्ती झाली तर चार ब्राम्हण बोलावून त्यांस अनुष्ठान करण्यास सांगतात. म्हणजे तें अनुष्ठान सर्व गांवानें केलें असें

होतें. आतां लढाईचें काम क्षत्रियाकडे सोपलें, तसेंच धर्माचें काम ब्राम्हणाकडे दिलें. त्यांत आणखी असें बीज ठेविलें आहे कीं, ते मंत्र ब्राम्हणाचे मुखानें फलद्रूप होतात. करितां इतरांनीं त्यांचा उच्चार किंवा अनुष्ठान करण्यास नको. धर्म हा व्यापारच आहे व त्यापासून कांहीं फळ आहे. मग तें मुक्त्याराचे हातून करविलें तरीं चालतें, आणि त्यास वेतन दिलें म्हणजे ईश्वराचे घरीं मूळ मालकानें केल्याप्रमाणें त्याचे खातीं जमा होऊन रूजू पडतें. अशी हिंदू धर्माची रीति आहे. याजवरून लोकांमध्यें म्हण आहे कीं, जगांत कांहीं साधू आहेत म्हणून पाऊस पडतो. जगांत कांहीं पुण्यवान आहेत म्हणून भूमी पिकते. म्हणजे जगांत कोणीतरी धर्म करणारे असले म्हणजे झालें असा अर्थ. ब्राम्हणांस द्रव्य देऊन त्यांचे कर्मांस त्यांस ठेवावें, इतकेंच इतर जातीचे लोकांचें काम आहे. त्यांणीं स्वतः आपलीं नेमलीं कामें करावीं. धर्माप्रकरणीं इतरांस कांहीं करावयास नको. धर्माची पेटी काय ती ब्राम्हण. तेथें सर्व जमाखर्च करावा. ही एक प्रकारची समजूत आहे व देशाची व्यवस्था ज्यांणीं केली, त्यांणीं ही घातली आहे. ख्रिस्तियन लोकांकडे पाहिलें तर, त्याची अशी समजूत आहे कीं, प्रत्येक जिवानें प्रार्थना करावी; परतु कर्मांचा संक्षेपही करावा लागला आहे. म्हणजे ८ दिवसांनीं क्षणभर प्रार्थना केली तरी चालते. दरएकास सर्व दिवस भजन कर म्हणावें तर व्यवहार बंद होतील. ब्राम्हणांनीं भजनाकरितां एक वेगळी जात करून ठेविली आहे. ते असें समजत होते कीं, धर्म म्हणजे जशी सुतारकी, लोहारकी, तसेंच हें एक काम, अशी लोकांची समजूत आहे व या कामावर भट नेमले आहेत. तेव्हां जें काय धर्मसंबंधीं करणें तें त्यांणीं करावें. इतरांस कांहीं करणें नको. यास्तव दर-एक गांवीं जोशी व भट एक बलूत्यांत असतो. तो सर्व गांवचा धर्म सांभाळितो. मुक्त्यार मार्फत इतर कामें चालतात. तसेंच हें भटमार्फत काम चालतें. यास्तव इतर जातीचे लोक धर्मांत मुळींच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. आतां ब्राम्हणांकडे धर्माचा अधिकार आहे असें ठरतें. तर त्याची प्रार्थना कशी आहे तें पाहा. त्यांच्या प्रार्थनेचा शब्दशहा अर्थ असा.

"तो तेजस्वी सूर्य देव जो मला प्रत्यहीं जागृतिद्वारा उद्योगास लाविंतो, त्याचें मीं चिंतन करितों."

या मंत्राचा जप, पुरश्चरणें इत्यादिक ब्राम्हण करितात व हा मंत्र फार गुप्त ठेवितात. इतर जातीस सांगत नाहींत. या मंत्रावरून तात्पर्य पाहातां सूर्याची भक्ती दिसते. त्यांत ईश्वराचें नांव नाहीं, अस्तु. असा जरी धर्मसंबंधीं गुप्तपणा ब्राम्हणांनीं ठेविला तरी इतर लोकांस आम्ही स्वतः ईश्वराचें भजन करूं, असा अभिमान आहेच, नाहीं असें नाहीं. सर्व भजन ब्राम्हणद्वारा करावें, असा ब्राम्हणांचा अभिप्राय, परंतु इतर ज्ञातींनीं तें ऐकिलें नाहीं. त्यांणीं आपल्या नव्या नव्या प्रार्थना काढल्या आहेत. त्यांच्या पध्धती अशा—

नमो भगवते वासुदेवाय.
सीताकांतस्मरण जयजय राम.
पुंडलीक वरदे हरि विठ्ठल.
मंगळमूर्ती मोरया चिंतामणि.
हरहर महादेव.
पार्वतीपतये नमः.
उदयोस्तु भवानी आनंदी.
येळकोट मे खंडेरावाचा.
बहिरोबाचा चांग भला.
जयबलभीम.

याखेरीज गांव खेड्यांत म्हसोबा, विरोबा, रवळनाथ, रेवणसिध्ध, केदारलिंग, जानाई, सोनजाई इत्यादि वेगळेवेगळे नांवाचीं दैवतें रानांत, डोंगरावर, झुडपांत अशीं स्थापलेलीं असतात. त्यांचे गुरव पुजारी असतात. ते कितीएकांस कौल लावितात आणि गांवांतील दुःखनिवारण करण्याविषयीं प्रार्थना करितात. त्यांच्या प्रार्थना चमत्कारिक असतात. त्याचप्रमाणें कोणास साप चावला तर त्यास देवाचे देवळांत टाकतात आणि देवास कौल लावितात. कौलाची पध्धत अशी—

"जयदेवा महाराजा, हा गांव तुझा आहे. सर्व बाळगोपाळ आज मिळाले आहेत. तर त्यांची गाऱ्हाणीं तूं ऐक. गुरांस फार उपद्रव झाला आहे. तूं येथें असतांना तुझे भक्तास व चाकरास असा उपद्रव होऊं नये. तर लवकर तूं आपलें वाहन सिध्ध करून गुरें, माणसें, मुलेंबाळें, सुखी राख, आणि आम्हांस समजण्याकरितां व या गोष्टीचे साक्षीकरितां उजवी सोड."

"जयदेवा महाराजा, पांढरी तुझे भरवशावर बसली आहे. तुझा लौकिक परगण्यांत आहे. आज तूं निजलास कसा? गांवांत काय पिडा झाली आहे. तुला रुप्याचा मुखवटा गांव देणार आहे. तर तूं आपले भक्तांचें रक्षण कर आणि गुरंढोरं, पोरंबाळं, शेतभात यांजवर कृपा कर व याचे ग्वाहीस उजवी दे." अशा अनेक तऱ्हेच्या पध्धती आहेत. परंतु यांजवरून असें दिसतें कीं, एक देव आहे असें कोणी मानीत नाहीं व एक प्रार्थना आहे असेंही नाहीं. ज्याचे मनास जें येतें त्याप्रमाणें तो अनेक देव कल्पून भजन करितो. ब्राम्हणांचें भजन ब्राम्हणांचे गौमुखींत राहिलें. आतां सर्व ज्ञातीस सारखे भजनाचा क्रम असावा, हें बरें आहे व या धोरणावरूनच कथाकीर्तन करण्याची रीत पडली आहे. परंतु ब्राम्हणास ती विशेष मान्य आहे असें नाहीं व मान्य असण्याजोगें त्यांत कांहीं अद्याप नाहीं हेंहि खरें. कथेंत तरी अनेकत्व आहेच. पाहिजे त्या देवाची कथा होते. एक मार्ग सर्वांस असावा, असा कांहीं त्यांत उद्देश नाहीं. धर्माचे सार

प्रार्थना आहे. ती एकसारखी सर्वांस असावी हें फार जरूर आहे. आतां लोकांमध्यें प्रार्थना नाहींत असें नाहीं. स्तोत्रें, आरत्या, भुपाळ्या, होम, हवनें, जप इत्यादिक या प्रार्थनाच आहेत. पण त्या तरी एक देव लक्षून आहेत असें नाहीं, व त्यांची पध्धतही एक नाहीं. तर सर्वांस सारखी प्रार्थनापध्धति नाहीं, ही एक या देशांत मोठी न्यूनता आहे, असें आम्हीं समजतों.

[नंबर १६८]

धर्म करणें

धर्म करण्याची बुद्धि म्हणजे दया. हिची योग्यता मोठी असून मनुष्यांस ती मोठी भूषणावह आहे. ज्याचे अंगीं दया आहे, त्याजवर ईश्वराची दया आहे असें समजावें. म्हटलें आहे कीं,

शांतितुल्यं तपो नास्ति न संतोषात्परं सुखं ।
न च तृष्णासमा व्याधिर्न च धर्मो दयाऽपरः ॥ १ ॥

अभंग

संत तोची जाणा जगीं । क्षमा दया ज्याचें आंगीं ॥

या जगांत सर्व सारखे सुखी असते तर दयेचें कारण नव्हतें; परंतु जगांत उंचसखल फार, यास्तव जे उंच ठिकाणीं आहेत, त्यांनीं नीच ठिकाणचे लोकांवर दया केली पाहिजे. दया करण्यांत मुख्य असें आहे कीं, ती शहाणपणासीं आश्रित पाहिजे. केवळ दयाच असली तरी भलतेच ठिकाणीं ती प्राप्त होईल. आणि तिजपासून उलटा अनर्थ होईल. दया हा गुण ईश्वरानें मनुष्याच्या ठिकाणीं स्वाभाविक दिला आहे. आणि छट व लबाड लोक तो आपलेकडे वळवून घेतात. आणि त्याचे वास्तविक हकदार तसेच राहातात. त्यांची दाद लागत नाहीं. धर्माची मुख्य सदरें आहेत तीं अशीं—

१ उद्योगवृध्धीकरितां म्हणजे रस्ते, पूल वगैरे कामीं.
२ आरोग्यवृध्धीकरितां म्हणजे दवाखाने, इस्पितळें वगैरे.
३ ज्ञानवृध्धीकरितां म्हणजे शाळा वगैरेकडे खर्च.
४ अंध, पंगू, रोगी, वृध्ध यांचे पोषणाकरितां, म्हणजे आश्रयस्थानें, अन्नछत्रें घालणें वगैरे.
५ संकटपरिहारार्थ, म्हणजे काळ पडला, घर जळालें, किंवा माहागई झाली, तर त्यांतून रक्षण करण्याकरितां हें नैमित्तिक प्रकर्ण.

पूर्वी सांगितलें कीं, सर्व लोक जगांत सारखे सुखी नाहींत. पण त्याचें मुख्य कारण असें आहे कीं, लोकांमध्यें, आळस, अज्ञान, रोग, वगैरे उपाधि शिरून त्यांस उंच स्थितीवर जाऊं देत नाहींत. तेव्हां हीं कारणें सरवावयास झटलें पाहिजे. म्हणजे बहुतेक दुःखांचा परिहार होतो. तसेंच अकस्मात कांहीं संकटें येतात. आणि स्वाभाविक किंवा उपाधीनें आंधळेपांगळे उत्पन्न होतात. तेव्हां त्यांचें रक्षण करणें हा धर्म सर्वांकडे येतो. सर्व धर्म करण्याचें तात्पर्य असें आहे कीं, जगांतील दुःख नाहींसें करावें. आणि या कामांत जरी पूर्णपणें यश कोणाच्यानें घेववत नाहीं, तरी यत्किंचित जरी यश घेतलें तरी ज्याणें असें केलें त्याणें आपले जन्माचें सार्थक झालें असें समजावें. जगांत जन्म घेऊन मुख्य कर्तव्यकर्म असें आहे कीं, आपले हातून जगांत जें दुःख आहे, त्यांतील कांहीं अंश कमी व्हावा, आणि ही गोष्ट सिध्धीस कशी जाईल याचा विचार ज्याचे त्याचे शहाणपणाप्रमाणें होतो. आतां धर्म करण्याची बुध्धी जी मनुष्यांचे ठायीं आहे, तिला दोन महान शत्रु आहेत. एक लौकिकेच्छा आणि दुसरें ढोंग. कितीएक लोक वास्तविक धर्माचा रस्ता सोडून लोकांचे स्तुतीकरितां अथवा आपलें नांव प्रसिध्ध व्हावें म्हणून उलट्या रस्त्यास जातात. आणि आर्जवी लोकांस द्रव्य देतात. खाऊनपिऊन जें काय आपले जवळ आपण सांचवितों तें आर्जवी लोक स्तुती करून हिराऊन घेतात. या प्रकारचे लोकांनीं राजांची दरबारें व धनवंतांचीं घरें भरलीं असतात. कारण जेथें कांहीं आशा आहे, तेथें हे लोक मुंगळ्याप्रमाणें शिरतात. आणि थोरांस भुलऊन त्यांचे हातून, सद्वय ज्या द्रव्याचा व्हावा तें द्रव्य आपलेकडे ओढून घेतात. लग्न मुहूर्त डौलानें लोक करितात. आणि हजारो रुपये बुडवितात. परंतु ते धर्माकडे गेले असें होत नाहीं. उलटें तितक्या द्रव्याची हानि होऊन तें द्रव्य उपजलेंच नाहीं, असें होतें. आतां दुसरा शत्रु ढोंग म्हणजे परमार्थाचें मिष दाखऊन द्रव्यहरण करणारे लोक असतात. हे याच देशांत आहेत असें नाहीं. सर्व देशांत आहेत. त्यांचा उद्योग असा असतो कीं, भोळे भाविक लोकांस फसवून जें द्रव्य गरीबांचे वाटणीस जावयाचें तें आपलेकडे आणतात. या प्रकारचे लोक कोण म्हणाल तर भट, भिक्षुक, गोसावी, बैरागी इत्यादि होत. आतां जे विद्यावृध्धीकरितां व नीतीचे आणि धर्माचे उपदेशाकरितां झटतील, त्यांस द्रव्य मिळालें तर तो धर्मच आहे, कारण वरती लिहिल्या तिसऱ्या सदरांत ते येतात; परंतु याखेरीज मोठा जमाव फुकट खाणाऱ्यांचा आहे, त्यांस मात्र ढोंग म्हटलें पाहिजे. आणि त्या ढोंगाची पुष्टी होण्याकरितां बहुत बाडें लिहून काढलीं आहेत व हे लोक आपलें ठायीं सर्वांचा भाग असावा म्हणून मागील गोष्टी आपले उपयोगी लिहून प्रसिध्ध करितात. बहुतकरून ब्राम्हणांचे धर्मपुस्तकांत पाहिले असतां, ब्राम्हणांस द्यावें याची प्रशंसा फार आहे. प्रत्येक ग्रंथाचें बहुतकरून तीन-चतुर्थांश भाग जेवणाचे वर्णनानें भरलेला असतो. मागील राजांनीं लाखो ब्राम्हण जेवावयास घातले. कोट्यावधी रुपये दिले. संपूर्ण पृथ्वी जिंकून

त्यांचे हवालीं केली, ब्राम्हणांनीं घरदार मागितलें तरी ते ब्राम्हणांस विन्मुख लावीत नव्हते. ब्राम्हणांकरितां सर्व द्रव्य गेलें तरी पुण्य आहे. अशा गोष्टी लोकांस वाचून दाखवून हे लोक त्यास भुरळ घालतात. एक तऱ्हेनें त्यांनीं आपलेकडे धर्म ओढिला आहे असें नाहीं, तर ब्राम्हणांस थंडीचे दिवसांत बिछाने द्यावे. उष्णकाळांत गारपाणी, उदकुंभ, जोडे, उऱ्या, चंदन, ही द्यावीं. मार्गावर अन्नछत्रें ब्राम्हणांकरितां घालावीं. मुख्य धर्म काय तो जेवणावळ, असें ठरवून त्यांनीं आपलेकडे धर्म ओढून घेतला. दुसरे जातीचे लोकांत दीन, अंध, रोगी, असले तरी त्यांची व्यवस्था कांहीं केली नाहीं. याप्रमाणें स्वहितबुध्धींनें लोकांचे अज्ञानाचा लाभ करून घेतला. हें सर्व ढोंग आहे असें लोक ओळखत नाहींत. मग मऊ सांपडलें म्हणजे कोपरानें खणतात अशी म्हण आहे, त्याप्रमाणें मग बुधवारीं म्हैस व्याली तर ब्राम्हणाची धन. कोणी मेला, उपजला, अगर कोणी बायको केली तरी त्याजवर, ब्राम्हणाचा कर नाहीं असें नाहींच. प्रत्येक ग्रहण, व्यतिपात, कपिलाषष्ठी असे नियमित काळीं घडणारे यौग, तसें मनुष्य जन्मल्यापासून त्यास येणारे प्रसंग हे सर्व पाहून जितकें आढळलें तितकें ब्राम्हणांनीं आपलेकडे धर्म घेण्यास प्रयोजन केलें, पण हें सर्व ब्राम्हणांचें ढोंग आहे. यापासून त्यांचा तरी विशेष नफा झाला असें नाहीं. शिंदेसरकारासारखे, बाजिरावासारखे, समयोचित दानधर्म करणारे भेटतात; परंतु त्यापासून जेवायास मात्र मिळते. दरिद्र विच्छिन्न होतें असें नाहीं. दुसरें, धर्माचा ओघ याप्रमाणें फिरविल्यामुळें ब्राम्हण अज्ञानी फार झाले. त्यांची काळजी सरली. जितके हल्लीं ब्राम्हण आहेत तितके जर पंतोजी म्हणजे विद्यागुरू असते तर संपूर्ण प्रजा लिहिणारी वाचणारी झाली असती व त्यांस वेतनें देण्यास कोणी नाक मुरडिता ना. असा धर्माचा बिघाड केला. यामुळें अज्ञानानें व अन्यायानें धर्माचे भलतेच अधिकारी होतात. कोणी हजार फकीर जेवायास घालतो. कोणी हजार ब्राम्हणच घालतो. परंतु जे लोक काम करण्यासारखे व उद्योग करण्यासारखे धष्टपुष्ट आहेत त्यांनीं फुकट कां खावें याचा विचार कोणी करीत नाहीं. डौली लौकिकावर जातात आणि भोळे ढोंगास भुलतात. यामुळें तर हा वास्तविक धर्म म्हणतां येत नाहीं. सांप्रतकाळीं कोणी ब्राम्हण असा आढळत नाहीं कीं, तो फुकट शिकवून मुलें तयार करितो आणि पोटास धर्म मागतो. अशा मागणाराचें दुःख वाटणार नाहीं. परंतु अलीकडील चाल अशी आहे कीं, मीं कोटिलिंगें केलीं, त्याचे समाप्तीकरितां ब्राम्हण जेवावयास घालावयाचे आहेत, म्हणून कांहीं द्या; तसेंच काशीस जात आहें त्याजकरितां तट्टू द्या; मुलाचें लग्न करावयाचें आहे, द्या; द्वादशीचे ब्राम्हण घालावयाचे आहेत, द्या; यज्ञहोम करावयाचा आहे; गोकुळअष्टमीचा उत्साह करावयाचा आहे; पुराण वाचीत असतों त्याची समाप्ती आहे; पारायग केलें; पुण्यतिथी करावयाची आहे; तीर्थवास करीत फिरतों, अशा सबबा सांगून धर्म मागणारे फार. तर हे सर्व ढोंगी आहेत. कारण कोटिलिंगें करण्यात पांच-चार वर्षें घालविलीं, तीं घालविलीं आणि शेवटीं आणखी भोजन करण्यास लोकांवर

कर बसवणार काय? त्यापेक्षां एक मळा कां पिकवित नाहीं? तसेंच घरदार सोडून सावकारास रडत बसवून काशीस जाण्यास कोणी सांगितलें? मिळाला पैसा तर जावें, न मिळाला तर जाऊं नये; लोकांस उपद्रव कशाकरितां द्यावा? तसेंच मुलाचें लग्न, सामर्थ्य असेल तर करावें, नसल्यास न करावें, इत्यादि उत्तरें सुचतात, आणि तीं समर्थक आहेत. परंतु लोक भयानें दबलेले अशीं उत्तरें देत नाहींत. उपयोगी काम व पोट भरण्याचा धंदा टाकून भलत्याच कामास आरंभ करून लोकांवर कर बसवावा. साहित्यें मागावीं, सिधे मागावे, द्रव्य मागावें, हें उचित नाहीं; असा धर्माचा मोठा भाग आडवळणीं गेल्यामुळें खरा धर्म बुडाला. अंध, पंगू, वृध्ध रडतच आहेत. अज्ञानी अज्ञानांतच आहेत. आळशास मार्ग दिसत नाहीं व राजे, बडे लोक व श्रीमान यांस या ढोंगी खर्चांमुळें सामर्थ्य नाहीं. जें त्यांचें सामर्थ्य असतें तें याखालीं जातें. मग खऱ्या धर्मास ठिकाण नाहींसा होतो. या ढोंगापासून हें राष्ट्र मुक्त व्हावें असें नव्हतें. परंतु ईश्वरानें इंग्रज सरकार आणलें आहे हें या देशांतील द्रव्य विलायतेस नेत आहे. आणि त्या द्रव्याच्या शाळा, आगगाड्या वगैरे येथें परतून येत आहेत. हेंच द्रव्य येथें असतें तर हें कांहीं होतें ना? येथें दागिन्यांत व जेवणावळींत मुरतें. मग उद्योगाचीं कामें कोठून होतात? सांप्रतचे हिंदु राजांची स्थिति पाहा. तस्मात् धर्म कसा करावा याचा कित्ता इंग्रज सरकारापासून घेतला असतां फार चांगला मिळेल असें वाटतें.

[नंबर १६९]

जातक

आमचे हिंदु लोकांनीं आपल्यास कित्येक अडचणी केवळ निरर्थक उत्पन्न करून घेतल्या आहेत. त्यांतिलच ही एक जातक पाहाण्याची चाल आहे. लग्नांत कुळ व जात व गोत्र पाहातात. त्यामुळें बऱ्याच अडचणी येऊन मुलींस चांगलीं स्थळें मिळत नाहींत. याशिवाय नवरानवरीचें जातक पाहाण्याचें म्हणजे गण, मैत्री, नाडी व ग्रहांची अनुकूलता इत्यादि पाहून त्यांजवरून त्यांचे सुखाची कल्पना करावयाची. आतां कितीएक धूर्त आहेत ते आपल्या मुलींचीं टिपणें बहुतकरून चांगलींच करतात, परंतु भोळे आहेत ते वेडेपणानें तिचें मूळ नक्षत्र वगैरे प्रसिध्ध करून फजीत होतात. कारण इतर लोक कबुल करीत नाहींत. आतां हें सर्व पाहिलें तर मिथ्या आहे हें उघड आहे. कारण कोणताही बाप आपले मुलाचे व मुलीचे जन्मसमयीं जोशी बसवून गणित करित नाहीं.

आणि पंचांगांतील गणित तपासलें असतां प्रहर दोन प्रहरांचा अवकाश वाढतो अथवा कमी होतो. अश्विनीची भरणी होते किंवा रेवती होते. यांत अडिच घटिकांनीं

किंवा चार घटिकांनीं फिरणाऱ्या राशी यांचा तर मुळींच ठिकाण लागत नाहीं. जन्म झाल्यावर महिना दोन महिन्यांनीं जोशाकडे पत्रिकेची फरमास येते व त्याजबराबर निरोप येतो कीं, तिसरे प्रहरीं किंवा मध्यरात्रीं प्रसुत झाली. त्या अजमासावरून टिपण करतात. मग अशा टिपणावरून मेळ पाहाणें हा मूर्खपणा नव्हे काय ? आतां एकंदर मुहूर्तज्योतिष जें आहे तें किमयाप्रमाणें पोट भरणारे लोकांनीं नक्षत्रें, स्वर, कालविभाग इत्यादिकांचा आधार करून रचलें आहे. तें मुळींच मिथ्या आहे यांत संशय नाहीं. आणि त्यांतही या मिथ्या शास्त्राच्या आज्ञेप्रमाणें हीं जीं टिपणें झालीं नाहींत त्यांजवरून मेळ पाहातात, हा फारच अचंबा आहे. याजकरितां लग्नांतून ज्योतिष-शास्त्र वर्ज करावें, हें उत्तम आहे. ज्योतिषापैकीं गणितभाग मात्र खरा. मुहूर्तज्योतिष हें त्याचे पोटीं ढोंग लोकांस फसविण्याकरितां उत्पन्न झालें आहे; यांत कांहीं अर्थ नाहीं असें आम्हांस वाटतें.

[नंबर १७०]

गाई व बैल

गंगेचें पाणी फार निरोगी व स्वच्छ आहे. याजकरितां त्या नदीचें भजन उत्पन्न झालें असावें व गाईची भक्ती उत्पन्न झाली तिचें कारण तरी हेंच असावें कीं, गाईचे दुधावर हिंदुस्थानांतील लोकांचा निर्वाह फार आहे. बाळ, तरुण वृध्ध, दांडगे, नेमधर्मी, रोगी, पहिलवान, इत्यादि सर्वांसच दुधाचा उपयोग आहे. दुधाचे पदार्थ फार होतात. त्याचें ताक, दही, लोणी, तूप, पेढे, बर्फी, खीर वगैरे जेवणांतील पदार्थ फार होतात व शेतभात करणारे लोकांचा मुख्य आधार काय तो बैल व लमाण वगैरे लोकांस ओझीं नेण्यासही साधन बैलच आहेत. त्यांचें शेण सारविण्याचे उपयोगी पडतें, व वाळवून त्याचें जळण चांगलें होतें. गाई-बैल जर या देशांत नसतील तर लोकांची जगणूकच मुळीं होणार नाहीं व दुसरें कोणतेंही जनावर गाईसारखें उपयोगी पडणारें या देशांत नाहीं. हा सर्वांशीं उपयोग पाहून शास्त्रकर्ते यांणीं गाईचे वधाची मनाई केली आहे. पूर्वी गोवधाचीं कर्में म्हणजे मधुपर्क, गोमेध, वगैरे चालू होतीं, तीं बंद केलीं व मग कांहीं काळानें मागील आठवण जाऊन तोच धर्म असें ठरलें. सारांश मुळावांचून कोणती गोष्ट वाढत नाहीं. गोहत्या व गोमांसभक्षण हें मोठें पाप असें ठरविल्यावांचून गाईचे व बैलांचे वृध्धीस दुसरा मार्ग नवता आणि गाई-बैल कमी झाल्यानें किती अडचणी उत्पन्न होतील, त्यांचें गणित करवत नवतें. आतां या अडचणी थोड्या दिसूं लागल्या आहेत आणि गोवधाची वृध्धी होऊन युरोपियन लोकांनीं जनावरें

बहुतेक नाहींशीं केलीं. तेणेंकरून हल्लीं जनावरें माहाग होऊन गाय व बैल यांची किंमत फार वाढली व तीं दुर्मिळ झालीं. अशा बहुत वेळ प्राचीन हिंदु राजांचे कारकीर्दींत पूर्वी अडचणी पडून त्या अनुभवावरून शास्त्रांत गोसंरक्षणाविषयीं विधि ठरविला, त्याविषयीं 'पुणें अबझरवर'—कर्ता म्हणतो कीं, या देशांत जें कांहीं धन आहे तें सर्व गाई-बैलांच्या जिवावर आहे. यास्तव हिंदुस्थानावर असा प्रसंग न यावा म्हणून गोवधाची बंदी सरकारानें करावी हें योग्य आहे.

आम्हांस वाटतें कीं, जुन्या काळीं हिंदु लोक ब्राम्हणसुध्धां गाई-बैल यांचा मांसार्थ उपयोग करीत होते व प्रत्येक लग्नांत, यज्ञांत, श्राध्धांत, व पाहुणे घरीं आले असतां मधुपर्कविधीनें गोमांस खात होतें, असें जुने पुस्तकांवरून स्पष्ट दिसतें. पुढें जनावरें कमती होऊन ही अडचण उत्पन्न झाली असावी व इतक्यांत ब्राम्हणांचा हिंसामय धर्म रद्द करणारा बौध्ध स्वामी उत्पन्न होऊन त्याणें "अहिंसा परमो धर्मः" असें ठरवून बहुतेक हिंसा बंद केल्या. तेव्हांपासून जनावरांची वृध्धी झाली. आम्ही म्हणतों याजबद्दल कोणास प्रमाण पाहाणें असेल तर त्यानें आश्वलायन गृह्यसूत्रीं प्रथमाध्यायीं मधुपर्कविधि वाचून पाहावा. या एकाच ऋषीचें मत आहे असें नाहीं. परंतु कात्यायनसूत्र, आपस्तंभसूत्र, बौधायनसूत्र, सांख्यायनसूत्र, इत्यादि ग्रंथीं हें प्रमाण सारखेंच मिळेल.

❧ ❧

[नंबर १७१]

ब्राम्हणलोक व भिक्षा

ब्राम्हणलोक सर्व हिंदुस्थानांत पूर्वी विद्यादिकें करून प्रमुख असतां हल्लीं ते पुढें न सरसावतां मागें कां पडले आहेत, याविषयीं विचार करितां असें दिसतें कीं, यांस प्रतिबंध करणारे बहुत आहेत व त्यांतील मुख्य हें एक आहे कीं, यांस लोक भिक्षा देतात. याजमुळें त्या भिक्षेवर निर्वाह करून बहुत लोक आळशी राहातात. ब्राम्हणांचा मोठा भाग भिक्षा मागून निर्वाह करणारा आहे, हें प्रसिध्ध आहे. कोणत्याही स्थलीं पाहिलें तर ब्राम्हण भिकारी नाहींत, असें नाहीं. मुंबई, पुणें, काशी, लाहूर इत्यादि सर्वत्र पाहिलें तर हे भिकार चहोंकडे आहेच, आणि त्यांस निर्वाहापुरतें लोक देतातच. कोणी द्रव्य मागतात, कोणी माधुकरी मागतात, कोणी क्षेत्रस्थ म्हणून, कोणी अग्निहोत्री म्हणून इत्यादि ढोंगांनीं हे लोक भिक्षा मागतात. याजकरितां जोपर्यंत या लोकांस अशी भीक मिळते, तोंपर्यंत त्याला दुसरा उद्योग सुचेल असें दिसत नाहीं व व्यवहारांतही साधारण असा नियमच आहे कीं, जरुर पडल्यावांचून मोठा

सायास कोणी करीत नाहीं व गुणसंपादनही होत नाहीं. दुसरे जातीचे लोक कुणवी वगैरे मोलमजुरी करून पोट भरतात. त्यांस भिक्षा कोणी घालित नाहींत. यास्तव ते भिक्षुकही नाहींत. सर्व उद्योगीच आहेत. त्याचप्रमाणें ब्राम्हणांची भिक्षावृत्ती जी आहे ती बंद झाल्यावांचून ते दुसरें कांहीं करतील, असें कोणासही वाटणार नाहीं. इंग्लंडांत लोक मुलांस प्रथम कांहींतरी धंदा शिकवितात. आणि तो १०।१२ वर्षांचा झाला म्हणजे सामर्थ्यवान् आहेत ते खर्च सोसून त्यास मोठी विद्या शिकवितात व गरीब आहेत ते पोटावारी चाकरीस ठेवितात. ती चाकरी अशी कीं, कांहीं धंदा यावा व पोटही भरावें. त्याचप्रमाणें या देशांतही सर्व मनुष्यांनीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आपली संतती उपयोगी होईल आणि प्रत्येक जिवास आपलें पोट भरतां येईल, असें कसब शिकवावें व तें ज्याचे त्याचे योग्यतेप्रमाणें असावें. ब्राम्हणांमध्यें पाहिलें तर संभावित आहेत, त्यांचीं मुलें घरांत राहून वेडीं होतात. त्यांस त्यांचे आईबाप मुळींच विद्या शिकवित नाहींत. याप्रमाणें जहागीरदार, इनामदार, जमिदार, यांची संतती बहुतकरून निरुपयोगी होते. गरीब लोक आहेत ते मुलांस कारकून करितात. म्हणजे फक्त लिहितां व वाचतां येणें. कितिएक भीक मागण्याचीच विद्या शिकवितात. म्हणजे प्रथम त्यांस दाहा-वीसपासून हजार-पांचशें रुपयेपर्यंत खर्च करून भीक मागण्याची विद्या मुंजींत बाप शिकवितो. हा त्याचा भिकेचा "श्रीगणेशाय नमः" होतो. नंतर भिक्षुकी कसब म्हणजे चार मंत्रतंत्र व संकल्प शिकवितात. आणि अमावास्या, व्यतिपात हे पंचांगांत पाहून भीक मागावी इत्यादि प्रकार आहे. परंतु सांप्रतकाळचा झोंक पाहातां कारकुनी व भिक्षुकी हीं दोन्हीं कसबें आतां नकोत, महागाईमुळें हीं दोन्हीं व्यर्थ गेलीं व त्यांचा समावेशही नाहीं. याजमुळें प्रस्तुत असें झालें आहे कीं, पाणी आणणार ब्राम्हण, स्वयंपाक करणार ब्राम्हण, याचें वेतन कारकुनापेक्षां जास्त असूनही ते वेळेस मिळत नाहींत व भिक्षुक आणि कारकून हे घरोघर जोडे फाडितात तरी त्यांस पोटास मिळत नाहीं. तर यांस भिक्षा देणारे जे असतील त्यांणीं विचार करावा कीं, यांपासून आपली सर्व जाती हलकेपणा पावली आहे. आपण भिक्षा देतों तोंपर्यंत हे लोक दुसरे कांहीं करावयाचे नाहींत. याजकरितां प्रत्येक धर्मात्म्यानें असें पाहावें कीं, आपली स्वजाति चांगल्या स्थितीस येईल असे प्रकारचा धर्म करावा. अधिक कारकून व अधिक भिक्षुक तयार करण्याकरितां जे धर्म करितात, ते स्वजातीस हलकेपणा आणितात, असें आम्ही म्हणतों. ब्राम्हणभोजनें, दक्षणा, दानें इत्यादि प्रकारचे धर्म कामास न पडतां उलटे लोकांस उपद्रवकारक होतात. तर जो मुलगा धंदा शिकेल व उपयुक्त ज्ञान मिळवील त्याचें संरक्षण करणें हा धर्म आहे. परंतु सांप्रतकाळीं तसें होत नसून थोडे आशेवर लोक गुंतून जन्मपर्यंत दुःखांत राहातात. याजकरितां म्युनसिपाल कमेटी आहे तशी दर गांवीं एकेक कमीटी करून सर्व धर्मांचा पैसा त्या कमेटीजवळ द्यावा आणि त्यांनीं व्यवस्था पाहून उत्तेजन द्यावें, म्हणजे बरें

होईल. सांप्रतकाळीं जे लोक धर्म करितात, त्यांणीं त्याचे दुप्पट करावा, परंतु व्यवस्थेनें करावा. जे कांहीं उपयोगी विद्या शिकणार नाहींत व जे भांग-गांजा ओढून रिकामा वेळ घालवितात, कोणत्याच उपयोगास लागत नाहींत, त्यांस लोकांनीं पोसावें हें योग्य नाहीं. पंगूस पोसावें व जे उपयोगी पडण्याची उमेद धरितात, त्यांस पोसावें व याप्रमाणें पाहाल तर कारकून व भिक्षुक हे कोणत्या उपयोगी पडावयाचे आहेत ? व यांची वृध्धी होऊन उपयोग काय ? उलटी मानहानि, हलकेपणा आणि अमर्यादा होते. इतर लोक मेहनत करतात, त्याप्रमाणें शेतकी, व्यापार, शिल्प इत्यादि कामें ब्राम्हणांनीं करून अब्रूनें कां असूं नये ? आगंतुक ब्राम्हण, माधुकरि ब्राम्हण, कोंडींत ब्राम्हण, कचेरीत उमेदवार ब्राम्हण, असे दीनवाणे हे लोक फिरतात. यांची लज्जा स्वजातीस असूं नये काय ? व भिक्षा घालणें यापासून जन्मपर्यंत कोणाची बेगमी होईल काय ! धर्मांचे कमेटीनें परवानगी दिल्यावांचून कोणी भिक्षा मागूं नये असें ठरवावें. आणि विनाकारण भिक्षा मिळेनासी झाली म्हणजे हे लोक सहजीं उद्योगास लागतील. सांप्रतकाळीं धर्म करणारे यांस औदार्य आहे, पण शहाणपण कमी असें म्हटलें पाहिजे. कारण वाणी, गुजर, मारवाडी, कुणबी, पारसी हे भीक मागत नाहींत, धंदा करितात. प्रसंगानुरूप भिक्षा ही गोष्ट ठीक आहे. पण भिक्षेचा धंदा फार वाईट आहे, आणि ब्राम्हणांनीं भिक्षेवर निर्वाह करावा असें शास्त्र खरें, परंतु काळ बदलला आहे, हें अवश्य लक्षांत ठेविलें पाहिजे. त्यांत आतां या देशांत धंदा फार वाढला आहे व त्यापासून सर्व लोक नफा घेतात. परंतु ब्राम्हण त्याचे भागीदार नाहींत. यास कारण हे भिक्षा देणारेच आहेत. व हे जोंपर्यंत पोकळपणानें भिक्षा देऊन मधाचें बोट दाखवितील तोंपर्यंत ब्राम्हणांची स्थिति चांगली होणार नाहीं व भिक्षावृत्ती सुटून दुसरी प्रतिष्ठित वृत्ती त्यांस प्राप्त होणें कठीण. भिक्षुकांचे ढिगाचे ढीग जे पडले आहेत, त्यांस आपला निर्वाह या नीच वृत्तींत होणार नाहीं व उद्योग करूं तरच आपणांस लोक पोसतील, असें वाटल्यावांचून त्यांणीं तरी ती वृत्ती कां टाकावी ! असें कोणीच करणार नाहीं. अस्तु, आम्हांस वाटतें कीं, आमचा विचार सुज्ञांस मान्य होईल.

[नंबर १७२]

काशीयात्रा

हिंदु लोकांस जे आळशी म्हणत असतील, त्यांना हल्लीं या नगरच्या सरजापूर दरवाजाच्या बाहेर धर्मशाळा आहे तेथें दोनचार दिवस मुक्काम केला असतां, बहुतकरून भ्रांति जाईल. नगर हा गांव काशीचे वाटेवर आहे. यास्तव बहुतकरून सातारा,

कोंकण, पुणें, या प्रांतांतून जी यात्रा येते, ती येथें येऊन नंतर पुढें पैठणास चालू होते. या सालीं पौष वद्य ३० स महोदय पर्व आलें. हें पर्व पंधरा-वीस वर्षांनीं कपिला-षष्ठीप्रमाणें येत असतें. पर्व म्हणजे अमावास्या, रविवार, व्यतिपात, श्रवण नक्षत्र इत्यादि ५।६ योग एका दिवशीं आले म्हणजे त्यास पर्व म्हणजे विशेष दिवस असें ठरविलें आहे. तर यात्रेकरी लोकांस या दिवशीं प्रयागास गंगा, यमुना व सरस्वती या त्रिवेणीसंगमीं स्नान करावें अशी आस्था आहे. याजमुळें मोठे नेटानें लोक चालले आहेत. दररोज १००।२०० गाडी संध्याकाळीं धर्मशाळेंत उतरते. बायका, मुलें, म्हातारे, रोगी, विधवा, सुवासिनी, गृहस्थ, भट, चाकर इत्यादि लोकांचे थवेचे थवे लोटत आहेत. जिकडे तिकडे यात्रेचे खूळ माजलें आहे. गया, प्रयाग या ठिकाणचे उपाध्ये आपले गुमास्ते देशोदेशीं पाठवितात. त्यांणीं लोकांस सांगून जे निघतील त्यांस खर्च फार लागणार नाहीं, आम्ही बरोबर येतों, सर्व बंदोबस्त करितों, असा दिलासा द्यावा म्हणून हे लोक इकडे येतात व दर थव्यांत हे एकदोन असतात. ही यात्रा म्हणजे केवळ श्रमानें होत नाहीं. हीस द्रव्यही बरेंच लागतें व प्रवासाचें दुःख इतकें आहे कीं, तें सद्गती इच्छिणारे श्रध्दालु लोकच सोसूं जाणत. हें दुःख तर काय, परंतु प्रयागसंगमीं पहिलें कर्वतानें कापून घेऊन प्राणत्याग करणारे लोकही अश्रुपात केल्या-वांचून कर्वत घेत अशी आख्या आहे. अस्तु. घरदार विकून किंवा आपले स्वकीयांस भीड घालून पांचशें, चारशें रुपयांची सामोग्री बरोबर घेऊन बायकामुलांसुद्धां उपास तापास करीत हे लोक जात आहेत, हा केवढा उद्योग म्हणावा बरें? या खर्चाची व श्रमाची बेरीज पाहिली तर होणें कठीण. या प्रकारें बहुत ठिकाणांहून लोक जातात, तेव्हां दाहापांच लक्ष माणूस जमेल व हा मेळा मोठाच होईल. आतां इतके श्रम, शिवाय यात्रेचा वगैरे खर्च व श्राध्दादिकांच्या मेहेनती हें तापत्रय भोगणारे लोकांस आळशी कोण म्हणेल? या यात्रेकऱ्यांस थंडीचे हाल व रस्त्याचे श्रम फार. त्यांत कोणी दोन महिन्यांच्या बाळंतिणी, कोणी चार मुलें खांकेस घेऊन, कोणी वृध्द, कोणी रोगी हे सर्व कृतनिश्चय करून चालले आहेत. या यात्रेस प्रवृत्ती करणाऱ्या म्हटल्या म्हणजे बायका फार असतात व नवरे त्यांच्या आग्रहास्तव या श्रमसागरांत आगबोट चालवितात. तशांत कोणाच्या आया, बहिणी, लेकी, विधवा असतात, व त्यांमुळें त्यांचा जगांतील सर्व सौख्याचा ऱ्हास होऊन जिवावर उदार होत्साता त्या वीराप्रमाणें प्रवासास निघतात व कोणी पेनशन् घेतलेले सरकारी चाकर व कोणी निरुपयोगी ज्यास कांहीं कामधंदा नाहीं, आणि दोन पैसे जवळ आहेत परंतु धंदा करण्यास ज्ञान नाहीं, असे प्रकारचे निरुपयोगी लोक यांचाही भरणा यात्रेंत फार असतो.

इंग्रजींत रस्ते सुलभ, चारी ठिकाणीं स्वस्थता व उद्योग कमी. त्यांत ब्राम्हण तर रिकामे फार. यामुळें हें यात्रेचें प्रकर्ण फारच वाढत चाललें आहे. पूर्वी रस्त्याच्या व दुसऱ्या कित्येक अडचणी व प्रतिबंध होते. नाना फडणिसाचे कारकीर्दीस पंढरपूरची

जत्रा कोणी ऐकली होती काय ? थोरले बाजिराव साहेब व नानासाहेब पेशवे हे महा-यात्रेस किंवा पंढरपुरास कधीं गेले होते काय ? नाहीं. परंतु यांच्या स्वाऱ्या दिल्लीकडे व प्रयागाकडे तर दरसाल फिरत होत्या. तेव्हां त्यांतील कारण काय बरें असावें ? आतां जो उठला तो टाळ कुटीत पताका घेऊन आळंदीस, देहूस व पंढरपुरास वर्षांतून दोनचार हेलपटे घेतो. पूर्वी जिनावर स्वार कसें व्हावें, निशाण कसें लावावें, घोड्यावर कसें बसावें, ह्या शिलेदारीच्या कामांत सर्व मराठे मंडळ होतें. आतां उद्योग नाहीं व दुसरें विद्येची किंवा आपला उपयोग लोकांस कसा व्हावा याची विवंचना राहिली नाहीं. याजमुळें बहुत प्रजा या यात्रेचे कामास लागली असावी असें वाटतें.

कितीएक लोक लौकिकार्थ एकमेकांचे पाहून चढाओढीनें यात्रेस जातात व कोणी जन्माचें सार्थक म्हणून जातात, पण जन्माचें सार्थक म्हणावें तर ज्या श्लोकांत काशीस मरणाचें फळ सांगितलें त्याचेच पुढचा चरण पाहावा—

श्लोकार्ध

काश्यां तु मरणान्मुक्तिः स्मरणादरुणाचले ॥ —भारत.

तेव्हां दुसऱ्या चरणांतील साधन पाहातां तें फार सुलभ असोन सर्वांस होण्या-सारखें आहे. परंतु एकामेकांची ओढ हें एक कारण. त्यांत दुसरा, स्त्रियांचा आग्रह व त्यांत तिसरा आणखी, निरुद्योगीपणा वाढला. मिळून यात्रेचीं हींच मुख्य कारणें बनलीं गेलीं असें वाटतें.

सदर्हुप्रमाणें लोकांची प्रवृत्ती पाहातां हिंदु लोकांस कोणी आळशी म्हणूं नये असें आम्हांस वाटतें. इतकेंच कीं, त्यांचे उद्योग एकप्रकारचे असून त्यांपासून देशाचें कांहीं कल्याण होत नाहीं व संपदा वाढत नाहीं. आणखी दुसरें एक याजवरून असें सिध्द होतें कीं, पृथ्वीतील सर्व भागांत हिंदु लोकांसारखे परलोकसाधनार्थ मेहनत व उपद्याप करणारे दुसरे कोटेंच नसतील.

[नंबर १७२]

"वेदांत्यापेक्षां धादांती बरा"

अशी एक म्हण लोकांत प्रसिध्द आहे. परंतु तींतील रहस्य बहुतांस विदित नसेल, यांजकरितां त्याविषयीं त्या स्थलीं थोडेंसें निरूपण करण्याचा उद्देश आहे. प्रथम लोकांस वेदांती म्हणजे काय हें समजलें पाहिजे असेल तर, वेदांती म्हणजे असें आहे कीं, हें जग सर्व मिथ्या असून मायेनें याचा भास झाला आहे. परंतु हें खरें नाहीं.

याचा व्यापक व चालक परमात्मा मात्र खरा आहे असें मानून दुनयेचा त्याग करावा व सर्व उद्योग सोडावा, असे मतवादी जे आहेत ते वेदांती होत. आतां यांचे मताचें नांव वेदांत कां पडलें असें कोणी विचारलें, तर त्याचें उत्तर असें कीं, वेद हे जगास खरें मानितात; व त्यांत कर्में सांगितलीं आहेत व त्यांत यज्ञयागाचा विस्तार आहे. परंतु वेदाच्या शेवटीं शेवटीं हें मत निघालें व त्या मतास आधार उपनिषदें म्हणून ग्रंथ आहेत, ते वेदांच्या अंतीं आहेत. म्हणून त्या ग्रंथांचे आधारानें जें मत निघालें त्यास वेदांत म्हणतात. त्याजवर पुढें ब्रम्हसूत्र झालें व त्याजवर बहुत ग्रंथ होऊन त्या मताचा विस्तार झाला. संन्यासी, बैरागी, गोसावी, हे सर्व या मताचा बाणा बाळगतात व कितीएक गृहस्थही त्यांत शिरून आपणांस वेदांती म्हणवितात. आतां धादांती कोण म्हणून विचाराल तर धादांती म्हणजे जें दिसतें तें सर्व खरें आहे असें समजन चालणारे व वरती लिहिलेले लोकांखेरीज जे राहिले ते सर्व धादांतीच आहेत. आतां वरच्या म्हणींत धादांत्यास बरें म्हटलें याचें कारण काय ? याचा विचार पाहूं. लोकांमध्यें ज्या म्हणी असतात, त्या बहुत विचारानें व अनुभवानें ठरविल्या असतात. याजकरितां त्यांतील अन्वयाची हेळणा करण्याजोग्या त्या नाहींत, हें साधारण सांगतों. आणि विशेषें-करून वरच्या म्हणींतील अन्वय आम्हांस मान्य दिसतो. याचें कारण असें कीं, निवृत्तिमार्गापेक्षां प्रवृत्तिमार्ग चांगला. मनुष्यमध्यें तरी दोन जाति असतात. एक आळशी आणि दुसरे उद्योगी. हे स्वभावानेंच असतात. तेव्हां जे आळशी व अविद्वान, ज्यांस कांहीं करण्याचें पुरवत नाहीं ते निवृत्तिमार्गांत शिरतात. म्हणजे बुवा समजून कोणी कांहीं देईल आणि पोट भरेल. मग जिवास खटपट नको व मेहनत करावयास नको. या स्थितींत असल्यावर कोणी दुःख सांगावयास येत नाहीं व कोणी सांगितलें तरी त्याचें निवारण करण्याची फिकीर नाहीं. ते सहज त्याचें समाधान करितात कीं, दुःख हें तरी मिथ्याच आंहे. आलें भोगास तें भोगावें. आणि असें सांगून स्वस्थ राहातात. ते स्वतां असें मानतात कीं, सर्व कर्म सोडून दिलें, म्हणजे त्यांत आपला पुरुषार्थ आहे व तेणेंकरून आपण मोक्षास जाऊं; परंतु प्रस्तुत पाहिलें तर हे लोक स्वतां आपले जिवाचे स्वस्थतेविषयीं काय उपयोगी पडत असतील ते असोत. ती गोष्ट ते मेल्यावर त्यांस मात्र कळावयाची; परंतु लोकांचे उपयोगी हे लोक अगदींच नाहींत. ज्यांजकडून लोकांचें बरें होत नाहीं व ज्यांजकडून दुःखितांचें शांतवन होत नाहीं, ते पाषाणासारखेच या लोकांमध्यें गणावयाचे. अस्तु. आतां धादांती जे आहेत ते या जगाशीं नेहेमीं लढत असतात. ते रोग्यास औषधें देतात, अज्ञानास शिकवितात, दुःखितांचे दुःख निवारणाविषयीं होईल तितका यत्न करितात. परोपकारास झटतात व व्यवहारांत वागतात. याजमुळें लोकांस त्यांचा उपयोग फार पडतो, तेव्हां लोकांनीं आपल्या वाणींत त्यांस बरें म्हटलें हें ठीकच आहे. मूळचा वेदांती असोन त्यास कांहीं स्वास्थ्य किंवा पेनशन मिळालें असलें तर मग त्यासारखा कोणीच आळशी नाहीं.

स्वास्थ्य नसलें तर त्यास वेदांत झांकून ठेऊन लोकांपुढें धांवावें लागतें व त्यास त्याचा उपाय नाहीं. क्षुधा, तृषा, उष्ण, शीत हीं त्यास धादांताकडे ओढतात. परंतु त्यास स्वास्थ्य मिळालें म्हणजे तर तो पुरा वेदांत प्रगट करितो. म्हणजे संसार टाकून गोसावी होऊन जातो असें तर नाहींच, परंतु लोकांचे उपयोगीं न पडण्याची पराकाष्ठा करितो. सकाळपासून स्नानसंध्येंत व वाचनपठणांत वेळ घालून आयुष्याचे दिवस काढतो. आणि जर कोणी धादांती असला व त्यास स्वास्थ्य मिळालें असलें तरी लोकांचे उपयोगीं पडण्यास तो चुकत नाहीं. तो शाळा घालून मुलांस पढवितो. दुकान घालून धंदा करितो. वैद्यकी, मुत्सद्गिरी वगैरे हरप्रकारचे काम चालवितो व लोभी असला तर द्रव्यार्थ खटपट करितो आणि साधू असला तर लोकांचे हिताकरितां खटपट करितो. ग्रंथ लिहितो, कविता करितो, लोकांस बुध्धिवाद सांगतो. सारांश, धादांती लोभी किंवा साधू कसाही रिकामा राहत नाहीं. तेव्हां तो लोकांस फार पसंत वाटतो. यास दृष्टांतादाखल पूर्वीच्या कथाही आहेत. भगवंतांनीं अर्जुनास उपदेश करून धादांती केलें. रामदास-स्वामींनीं राज्यकारणांत मोठी खटपट केली. तुकाराम वगैरे जगाचे हिताकरितां फार झटले आणि त्यांस सामर्थ्य होतें, त्याप्रमाणें त्यांणीं आपले बुध्धीचा उपयोग केला. याप्रमाणें ते न करते तर त्यांचें नांव आज कोणीच न घेते व त्यांस लोक विसरलेही असते.

आतां मनुष्यानें वेदांती असावें किंवा धादांती असावें याविषयीं विचार केला तर असें दिसतें कीं, ईश्वरानें मनुष्यास बुद्धी व इंद्रियें उद्योगाकरितां दिलीं आहेत. तर तेवढी देणगी फुकट घालवावी हें योग्य नाहीं व जगांत स्त्रिया वगैरे उत्पन्न झाल्या आहेत, त्या प्रत्येक पुरुषानें गोसावी व्हावें म्हणून झाल्या नसतील. तसेंच मनुष्यास अनेक प्रकारच्या गरजा व अडचणी आहेत, त्या सर्वांविषयीं जर तो डोळेझाक करितो आणि कोणाचे उपयोगीं पडत नाहीं. तर तो स्वहिताचा मोठा लोभीच म्हटला पाहिजे. कारण सर्वांचा अनादर करून व सर्वांची काळजी सोडून केवळ आपले जिवाची मात्र तो तजवीज करितो. तेव्हां तो सामान्य लोभी नव्हे, मोठा लोभी समजला पाहिजे. तस्मात् लोकांमध्यें त्याचा जन्म झाला आणि न झाला हें सारखें नव्हे काय ? आम्हांस वाटतें कीं अज्ञानी, आळशी यास आपला स्वभाव झांकून नेण्यास आणि फुकट प्रतिष्ठा भोगण्यास वेदांतमार्ग फार उपयोगी पडतो. आणि बहुधा सामर्थ्यहीन, वृध्ध व अविद्वान ज्यांस शहाणपण नाहीं व कर्तेपणा नाहीं, तेच या मार्गाचें अवलंबन करितात आणि वेदांती म्हणून त्यांस कांहीं करावयास लागत नाहीं. आरामांत असतात. लोकांचीं घरें जळूं लागलीं तरी हे वेदांती सर्व मिथ्या म्हणणारे, मग घर जळालें काय व राहिलें काय ? मुळींच मनास आणावयाचे नाहींत. याप्रमाणें या देशांत हा मार्ग निघाल्या-पासून बहुत तोटे झाले व बहुत लोक आळशी झाले. कांहीं करणें हेंच पाप असें त्यांस वाटूं लागलें व त्याजमुळें ग्रंथ करणें वगैरे सर्व बंद पडलें. सारांश, धादांत्यापासून

जगास फायदे फार आणि वेदांत्यापासून कांहीं नाहीं. तस्मात् म्हण जी आहे ती खरी आहे.

[नंबर १७४]

चांगला कोण?

आमचे हिंदु लोकांमध्यें चांगला कोणास म्हणतात याविषयीं विचार केला तर असें दिसतें कीं, हिंदु लोकांमध्यें अद्याप आपला देश हाच आपला आहे व त्यांतील लोकांचा अभिमान आपण धरावा किंवा देशाचे हिताकरितां आपण झटावें ही समजूत किंवा हे गूण आले नाहींत. याजमुळें लोकांमध्यें जो कोणी साधारण द्रव्यवान आहे, ज्यास आपले बायकोचे अंगावर सोनेंरुपें घालण्याचें सामर्थ्य आहे, ज्यास आपले घरचें लग्नकार्य डौलानें करण्यास साधन आहे, आणि ज्यास भटांभिक्षुकांस श्राध्धपक्षीं सुग्रास घालतां येतो, त्यालाच ते मोठा भाग्यवान म्हणतात, त्याला चांगला म्हणतात, त्याला पराक्रमी म्हणतात व त्यासच शाहाणा म्हणतात. आणि असें हरयेक गांवांत दाहापांच गृहस्थ असतात. परंतु अशा लोकांस कशासाठीं मोठे म्हणावें, तें आम्हांस ठाऊक नाहीं. त्यांनीं काय केलें? कोणी मोठी मसलत केली काय? किंवा लोकांचें कांहीं हित केलें? ज्या देशांत जन्म घेतला त्याचें हित त्यांपासून काय झालें? हें पाहूं जातां कांहींच सांपडत नाहीं. तेव्हां या हिंदु लोकांस मोठी उमेद, मोठी इच्छा व मोठी परोपकारबुध्धी आहे, असें दिसत नाहीं. आमचे हिंदु लोकांस खाण्यापिण्यास असून निर्वाह चालला म्हणजे पुढें कांहीं कर्तव्य आहे असें वाटत नाहीं. भाजीभाकरीवर तृप्त राहून ते इतके सुस्त असतात कीं, कोणी नवी कल्पना किंवा श्रमसाध्य गोष्ट अंगिकारिली तर त्यास ते उलटे आळशीपणानें हसतात. सांप्रतकाळीं हिंदुस्थानांत जितका स्वस्थपणा आहे तितका पूर्वी हजारपांचशें वर्षांत नसेल यांत संशय नाहीं. मोंगलाईपासून दंगे, लुटी, फौजा गलबली, काळ, बंडें, हींच दरसाल होत गेलीं. नेहेमीं अस्मानीसुलतानी व रस्ते पडलेले असत. या प्रांताची त्या प्रांतास खबर नाहीं व ती मिळण्यास नद्या, डोंगर, रानें, यांचे अडथळे मोठाले होते. पूल, रस्ते, घाट नव्हते. अशा अडचणीमुळें शेपन्नास कोसांत मात्र लोकांची नजर पोंचत होती. त्यापलीकडे काय आहे हें ठाऊक नवतें. त्यांत खोट्या गोष्टी ब्राम्हण लोक फारच प्रसिध्ध करीत. म्हणजे मेरूमांदार, लोकालोक पर्वत, दक्षणेस यमलोक, उत्तरेस घोडमुखी माणसें इत्यादि त्यांच्या असंभाव्य गोष्टी ऐकोन लोकांस खूळ लागलें व आपला देश केवढा आहे, त्याची लांबीरुंदी किती आहे, त्यांत भाषा कोणत्या आहेत, लोक कोणते आहेत, हें जाणावयाचें ते विसरले.

दरएकास घरांत राहण्याची इच्छा व मग बाहेर पडावें तर नाना प्रकारच्या हरकती त्यांस वाटूं लागल्या, त्या अशा—बाहेर गेलें तर पिंडदान कोठें करावें, गाईचें शेण कोठें मिळेल, अग्निहोत्राचें भस्म कसें मिळेल, जेवण सोवळ्यांत कसें होईल, भांडीं सोवळीं व धोत्रें सोवळीं कशीं राहतील, इत्यादि अशा अनंत पोवळ अडचणींमुळें त्यांचें बाहेर जाणें राहिलें, जो तो घरांत कोंडून घेऊं लागला. व्यवहारप्रकर्णी विचार करणें व देशाची माहितगारी करणें हें तर पापाचें कर्म किंवा निदान व्यर्थ काळ घालविण्याचा प्रकार आहे, असें त्यांस वाटूं लागलें व मुख्य काळ घालविण्याची उत्तम रीति अशी ठरली कीं, एकच गायत्रीमंत्र हजार दोन हजार वेळ म्हणावा. एकच रुद्र पन्नास वेळा म्हणावा. एकादषणी आणि पुरश्चरणें करावीं, इत्यादि कार्यांत वयाचीं चाळीस-पन्नास वर्षें गेलीं म्हणजे मग लोकांनीं त्यांची स्तुती करावी कीं, पाहा, आज साठ वर्षें गोविंदभटजींनीं स्नानसंध्या उत्तम प्रकारची केली. चार पुरश्चरणें केलीं. अतिरुद्र केले. होमहवनें केलीं. असा प्रकार चालला व पुढें त्यांत किती-एक असेही वेडगळ निघाले कीं, त्यांनीं हजार दोन हजार रुपये देऊन तीं त्यांचीं पुण्यें विकत घ्यावीं. असें झाल्यामुळें लोकांस पराक्रमहीनता येऊन ते पशूसारखे मूर्ख झाले. त्यांस थोरपणा कोणता व जन्माचें सार्थकाचें मुख्य काम कोणतें, हें कांहीं दिसेना. व्यवहारांत अगदीं शून्यता झाली व राज्यकारभाराची दुर्दशा झाली. ब्राम्हणांस असें वाटूं लागलें कीं, आमचें पोषण झालें म्हणजे सर्व झालें, मग राज्यांत बाजिराई कां होईना! आम्हांस पंचपक्वान्नें मिळतात तर मग खानदेश ओसाड पडला किंवा कोकण लुटलें गेलें तर चिंता काय? तो धर्मच झाला. लुटून तरी ब्राम्हणांचेच घरीं आलें. तेव्हा अधर्म कशाचा? सर्व जगांतील धन, धान्य ब्राम्हणांकरितां आहे व ब्राम्हणांचेच प्रसादानें सर्वांस प्राप्त होतें. म्हणजे—

"विप्रप्रसादाद्धरणीधरोऽहं विप्रप्रसादात्कमलावरोऽहं।"

अशीं मतलबी वाक्यें प्रसिध्ध झालीं. खरा स्वहिताचा मार्ग सर्व विसरले. आतां भटांत गोष्टी निघतात कीं, नारायण दीक्षित कसला ब्राम्हण होता, त्याणें चार सोम केले. तिन्ही त्रिकाळ सोवळ्यांत बसत होते. घराबाहेर काय आहे, हें ठाऊकच नाहीं आणि श्रीमंतांनींही त्यांचें तसेंच चालविलें. अविछिन्न दोन हजार रुपये, पांच खंडी भात पांच हजार वैरण व बागेंतील आंबे देखील सरकारांकडून त्यांजला यावयाचे. प्रपंचाची काळजी तिळमात्र नाहीं. असा निर्वाह त्याकाळीं होता म्हणून ब्राम्हण कर्मावर निष्ठ ठेऊन धर्म चालवित होते. आतां प्राप्ती नाहीं. अनुष्ठानें करावीं कश्याचीं? याप्रमाणें बहुत ब्राम्हणांचें तोंडीं आहे. परंतु आम्हीं म्हणतों कीं, ब्राम्हणांनीं कांहीं विद्या, पराक्रम व शहाणपणा मिळऊं नये काय? जर त्यांची विद्या काडिमात्र उपयोगीं पडत नाहीं व उलटी लोकांस मर्ख करून ठेविते, तर ती पाहिजे कशास? व यावरून आम्ह

असें दिसतें कीं, थोर कोणास म्हणावें व शाहाणा कोणास म्हणावें, हें आमचे लोकांस कळत नाहीं. ते भलत्यास थोर म्हणतात व भलत्यास विद्वान म्हणतात. पिंड डावे हातास ठेवावे किंवा उजवे हातास ठेवावे व त्यांजवर तीळ टाकावे किंवा तांदुळ टाकावे, याजबद्दल त्यांनीं मोठी मारामार आणि वादविवाद केले, तरी त्या प्रकर्णास उपयोगी शाहाणपण असें कोणी म्हणणार नाहीं. ज्यास अधिक माहिती आहे, ज्यास अधिक बोलतां येतें, ज्याचे विचार फार मोठे झाले आहेत, त्यास शाहाणा म्हणावें. दाहा हजार लोकांचा कारभार हातीं आला तरी त्यांस सुख कसें होईल व त्यांची व्यवस्था कशी राहील याचे विचार ज्यांस ठाऊक नाहींत, तीं मनुष्यें कोणत्या उपयोगाचीं आहेत बरें? सांप्रत काळची भटभिक्षुक वगैरे सर्व ब्राम्हण ज्ञाती पाहिली तर त्यांमध्यें शहाणपणांत ब व्यवहारांत एक देखील हुशार निघणार नाहीं. ते म्हणतील कीं, युध्धाचें काम तें क्षत्रियांनीं करावें. आम्हांस तें वर्ज आहे. आम्ही गाईप्रमाणें गरीब. एका गालावर मारली तर दुसरा गाल पुढें करणारे. आम्ही गोब्राम्हण म्हणजे रक्षणास पात्र. सर्वांनीं आमचें रक्षण करावें. बरें, त्यांस विचारलें कीं, तुम्ही व्यापार कराल काय? तर ते म्हणतील कीं, हें तर वैश्याचें काम. तेल, मीठ इत्यादि ब्राम्हण विकिल तर जातिबाहेर जाईल. बरें शेतकी तरी करितील म्हणावें, तर त्याविषयींही ते असें म्हणतात कीं, हें शूद्रांचें कर्म. ब्राम्हणांचे हातून कधीं शेतकी झाली आहे काय? कातड्याच्या मोटा ओढाव्या आणि नांगर धरावे हें ब्राम्हणांस व्हावयाचें नाहीं व त्यांचे वाडवडिलांनीं कधीं असलें नीच काम केलें नाहीं. याप्रमाणें सर्व वासलात लागली, तर ब्राम्हणांस शेषकर्म राहिलें काय? असें पुसाल तर सारा दिवस बुडबुड करावी आणि भीक मागून सर्व मुलुखभर हात पसरीत फिरावें, एवढेंच राहिलें व तेच श्रम त्यांस बरे वाटतात. आतां कोणास असें वाटेल कीं, धर्मकर्म करण्यास ब्राम्हण नकोत काय? तर याविषयीं आम्हांस असें वाटतें कीं, हजार लोकांचे वस्तीस पांच भिक्षुक असले तर पुरे आहेत. लोकांस त्रास देण्यास व लोकांवर भार घालण्यास जास्ती कशास पाहिजेत? सांप्रत हजार माणसांचे वस्तींत हजाराचे ठिकाणीं सवा हजार भिकारी ब्राह्मण झाले आहेत. तेव्हां इतक्यांस खाण्यास कोणीं द्यावें? आतां याजवर कोणी म्हणतील कीं, शिद्यांनीं धर्म केला, या प्रकारचे धर्म करणारे दानशूर लोक आहेत तोंपर्यंत काय चिंता आहे? पण आम्हांस वाटतें कीं, अजून असा धर्म करणें म्हणजे रामेश्वराच्या देवळांतील समई चोरावी आणि अमृतेश्वराचे देवळांत नेऊन दीप लावावा, याप्रमाणें हें आहे. म्हणजे बुंदेलखंडचे रयतेपासून पैसा घ्यावा आणि पैठणचे लोकांस तूपसाखर घालावी. तेव्हां असा धर्म करणारे दानशूर आतां थोडेच असले तरी पुरेत. प्रस्तुत जिकडे तिकडे इंग्रजी राज्य झालें आहे व इंग्रज सरकार असें कांहीं करीत नाहीं. रयतेचा पैसा रयतेचे कामास लावतात व त्याचे पोटीं विलायतेची भर होते ती गोष्ट वेगळी; परंतु बहुतकरून त्यांचे राज्याची नीती अशी आहे कीं, सर्व वसुलाचा पैसा राज्यकारभारास लावावा. अधिक कर बसऊं नये. शिल्लक

राहिल्यास रस्ते वगैरे रयतेचे उपयोगी कामें करावीं. आतां या कामांतील बहुतेक कामें नेटीव लोकांचे हातीं नाहींत, म्हणून त्यांस कांहीं अंशीं भिकारपण आलें आहे. पण नेटीव लोकांनीं विलायतेस जाऊन सिविल खात्याच्या, इंजनेरच्या, डाकतरच्या परिक्षा कां न द्याव्या ? आतां कोणी म्हणतील कीं, कितिएकांनीं दिल्या त्यांस जागा देत नाहीं म्हणून हुकूम झाला. तेव्हां त्यांची वाट काय ? बरें पण एकदा असा हुकूम झाला म्हणून आपण थांबावें कीं काय ? थांबूं नये व योग्य दाद मागावी. काळेंकरून जागा मिळतील. जे विलायतेस जाऊन शिकून आले त्यांस येथें घरीं राहणारे मूर्ख लोक असें म्हणतात कीं, हे बाटले. यांस जातींत घेऊं नका. वास्तविक पाहिलें तर ज्यांणीं इतका यत्न केला त्यांस लोकांनीं फार थोर मानावें हें उचित आहे. असें असतां त्यांस उलटा दोष लावितात. आणि जे मूर्ख लोक आहेत ज्यांच्यानें कांहींएक व्हावयाचें नाहीं, ज्यांस कांहीं येत नाहीं, ज्यांचा कांहीं उपयोग नाहीं, व ज्यांस चांगलें कशास म्हणावें आणि वाईट कशास म्हणावें हें समजत नाहीं, अशा प्रकारचे लोकांस थोर किंवा विद्वान म्हणतात. तेव्हां यांस काय म्हणावें ? अस्तु; जोंपर्यंत लोक ही समजूत टाकणार नाहींत, तोंपर्यंत यांस दृष्टिहीनता राहील. आतां कोणी म्हणतील कीं, ब्राम्हणांमध्यें दोन टोळ्या झाल्या आहेत. एक गृहस्थ व एक भिक्षुक. त्यांपैकीं गृहस्थ सर्व कामें करितातच; हें खरें आहे. परंतु आम्हांस असें वाटतें कीं, गृहस्थ आहेत ते देखील बहुतेक विचारशून्य आहेत. त्यांस तरी मोठे हुद्द्यांत पडावें; मोठी अब्रु मिळवावी, विद्या करावी, हें कांहीं समजत नाहीं. नातोरच्या राजानें पलटणींत सरदारी मागितली हें ऐकून आम्हांस आश्चर्य वाटलें, कारण या राजास ही बुध्धी झाली कशी ! पलटणींत सरदार झाल्यावर त्यास चिनांत, इराणांत, आस्त्रेलियांत जावें लागेल व मग त्याच्या धर्माचें काय होईल ? असो. तिकडे जाण्याची उमेद धरावी, हें आमचें म्हणणेंच आहे, परंतु बहुधा आमचे लोकांत असी उमेद नाहीं. अर्धी भाकर खाऊन घरांत बसणारे लोक फार व त्यांमध्यें असें चिन्ह दृष्टीस पडलें तर फारच चांगलें आहे व आणखीही आमचे पटवर्धन, रास्ते, निंबाळकर, सचीव इत्यादिकांनीं अशी उमेद धरावी हें चांगलें आहे. परंतु त्यांचा अंकुर आम्हांस अद्याप कांहीं दृष्टिगोचर झाला नाहीं.

[नंबर १७५]

१ गांव

या आपले हिंदुस्थान देशांत गांव जे आहेत. ते फार प्राचीन काळापासून वसले आहेत व ते कधीं वसले याची मिती पाहूं म्हटलें तर सांपडावयाची नाहीं.

तथापि या गांवच्या संबंधानें कितिएक गोष्टी फार अगत्याच्या व शोध करण्यासारख्या आहेत. म्हणून त्यांचें संक्षेपानें यथामती वर्णन केलें असतां तें शोधक लोकांचे उपयोगी पडेल, अशी आम्हांस खात्री वाटते, म्हणून या निबंधांत त्याविषयीं कांहीं लिहितों.

गांवांचीं नांवें बहुतकरून त्या ठिकाणीं झाडें होतीं त्यांजवरून कांहीं पडलीं आहेत. जसें अंबेगांव, वडगांव, निमगांव, शेवगांव, पिंपळगांव, करंदी, सायगांव, वगैरे. दुसरीं कितिएक गांवें संख्येवर आहेत. जसें चाळिसगांव, आठेगांव, सोळसी, तीसगांव, वगैरे. तिसरी कितिएक देवावर आहेत. जसें मंगळापुर, महाबलेश्वर, गणेशपुर, वगैरे. तथापि याशिवायही हजारो नांवें आहेत, आणि त्यांचा अर्थ कांहींच होत नाहीं. प्राचीनकाळचे ऋषींचीं जशीं नांवें तशींच गांवांचींही बहुत अर्थशून्य आहेत. असतु. अलीकडे मुसलमान लोकांनीं कांहीं गांवें वसविलीं, त्यांचीं नांवें आबाद, पुर, नगर या शब्दांशीं मिश्रित असतात. जसें जैनाबाद, बऱ्हाणपुर, अहमदनगर इत्यादि.

पूर्वीं या देशांत रानटी लोक राहात होते. त्याकाळीं गांव नवते, असें दिसतें. पुढें शुद्रलोक यांणीं त्या रानटी लोकांस जिंकून गांव वसविले आहेत. यास्तव शूद्र या देशांत येण्याचे पूर्वी जे लोक इकडे होते, त्यांचें नांव अतिशूद्र पडलें. म्हणजे शूद्राचे पूर्वीचे लोक. अति या शब्दाचा अर्थ अतिक्रांत इत्यादि प्रयोगांत पलीकडे असा होतो. यास्तव शूद्राचे पूर्वीचे जे लोक ते अतिशूद्र. या अतिशूद्रांस जेव्हां शूद्रांनीं जिंकिलें तेव्हां त्यांनीं गांवचें स्वामित्व आपणाकडे घेतलें म्हणून दर गांवीं शूद्र पाटील आहेत. शूद्र गांवचे अधिकारी नाहींत असा गांव बहुतकरून नाहीं. शूद्राचे कबजांत गांव गेल्यानंतर उत्तरेकडून द्विज म्हणजे आर्य नामक त्रिवर्णाचे लोक इकडे आले.

ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः त्रयो वर्णा द्विजातयः ॥ – शंखस्मृ०

व त्यांणीं स्वतां होऊन जे गांव वसविले त्यांस क्षेत्रें अशी संज्ञा दिली व कितिएक शूद्रांचे अधिपत्यांत म्हणजे जुने गांवांत येऊन राहिले. म्हणजे कोणी जोशी म्हणून, कोणी कुळकर्णी म्हणून, असे राहिले. जरी शूद्रांचा धंदा ब्राम्हणांची सेवा करण्याचा आहे असें द्विजांनीं आपले घरीं लिहून ठेविलें व त्यांस दास अशी संज्ञा योजिली, तरी सर्व देश त्या कालीं शूद्रांनी भरला होता. सबब ते दास झाले नाहींत; व उलटे ब्राम्हणच त्यांचे दास झाले होते.

पूर्वीं गांवांत दाहाजण मुख्य असत, याजकरितां जुने कागदांत "समस्त दाहीजण मौजे अमुक गांव" या पध्धतीनें गांवचें नांव लिहिण्याची वहिवाट पडली होती. त्यानंतर द्विजलोकांनीं जोशी हा नवीन वलुता केला व मुसलमानांनीं नवीन मुल्ला हा एक केला. याजमुळें पुढें दाहाचे बारा बलुते झाले. परंतु शूद्राचे कारकीर्दींत दाहाच होते. बहुत करून हे दहाजण गांवचे रयतेचे उपयोगींच आहेत. म्हणजे सुतार, लोहार, न्हावी, परीट, कुंभार, वगैरे प्रजेचे कामास जरूर जे लोक तेच गांवचे बलुते व त्यांस

पोटाकरितां जमिनीचे उत्पन्नावर नेमणूक दिलेली आहे व कोठें कोठें जमीन इनाम असते. याजवरून असा एक सिध्धांत होतो कीं, गांव बसले त्या समयीं नाणें व लिहिणें हीं दोन्हीं नवतीं. गांवचीं देणीं-घेणीं सर्व ऐन जिन्नस कडबा, पेंढी, मोळी, दाणे, यांजवर आहेत. तसेंच गांवांत कुळकरण्यावांचून लिहिणारेही नसतात. यास्तव लिहिणें हें द्विजांनीं या देशांत आणिलें असावें. पूर्वी शूद्रांस व अतिशूद्रांस ही कला ठाऊक नवती, असें स्पष्ट होतें. मुसलमान या देशांत येण्यापूर्वी गांव स्वतंत्र होते. त्यांचा कारभार लहानसे राज्यासारखा चालत होता. ते आपल्या पंचाइती दाहाजण बसून तोडीत व मोठा कजा असल्यास क्वचित शेजारचे दाहाजणांस बोलाऊन आणून त्यांची मदत घेत. गांवास तेथील प्रजेचे निर्वाहाकरितां कांहीं जमीन योजिलेली असते. व तीवर स्वामित्व त्या गांवचे पाटलाचें असतें व कितिएक गांवांत एकच गोत असतें. म्हणजे जो पुरुष प्रथम तेथें गांव वसविण्यास आला त्याचा वंशज सर्व गांवभर असतो. आणि त्या वंशाकडे मूळ पुरुषाचे जमीनीचे हिस्से होऊन चालतात त्यांस वृत्ती असें म्हणतात. या वृत्तीचें नांव मिरास व वतन असें मुसलमानी अमलांत पडलें. वेगवेगळे गांवीं जमीनीचे वेगवेगळे प्रकार आहेत, म्हणजे प्रथम गांवचें जमीनींत थळें असतात. त्या थळांचीं नांवें गांवचे नांवाप्रमाणेंच विलक्षण असतात. कोठें म्हसोबाचें थळ, पळसाचें थळ, वगैरे थळें असून त्यांत मनुष्याचे विभाग असतात. आतां पैमापीमुळें एक थळाचे दोन, चार, पांच नंबर झाले आहेत. तत्रापि मूळचे थळांचीं नांवें अद्यापि आहेत. त्याप्रमाणें जमीनीचीं मापें त्या जमीनीचे उत्पन्नाचे धोरणानें आहेत. म्हणजे ज्या जमीनींत खंडीभर दाणे पिकतात तीस खंडीभर जमीन म्हणतात. तिचे पोटीं मण आहेत. याप्रमाणें रुके, सापिके, इत्यादि मापें जुन्या काळीं चालत आलीं. याजकरितां एक खंडीभर जमीन चांगली असली तर दहा बिघ्याची खंडी होते व वाईट असली तर २० विघ्यांची खंडी होते. तात्पर्य, क्षेत्रफळ मोजून तें माप बांधलें नाहीं, उत्पन्नावर बांधलें. पुढें कितिएक ठिकाणीं मोंगलाईत व मराठींत व इंग्रजींत पाहाण्या व धारे बंद्या झाल्यामुळें नवीं मापें, पांड, बिघे, एकर, गुंठे, हीं लागू झालीं.

गांवचे सर्व जमीनीस रकबा म्हणतात व वेगवेगळे काळीं धारा ठरला त्यास रकम म्हणतात. रकमेंत कमाल, तनखा, जमाबंदी असें प्रकार आहेत. ते हिशेबी अद्याप दाखवितात. त्यांत जी जमीन लावणीस असते ती जरीब म्हणतात व बाकीस पड म्हणतात. गांव वसविणारे प्राचीन लोक यांस मिरासदार म्हणतात. व मागून संपादणारे लोकांस उपरी म्हणतात. उत्पन्नापैकीं जो भाग सरकारास द्यावयाचा त्यास ऐन वसूल किंवा खंडणी म्हणतात व त्याशिवाय पट्टया वगैरे गांवकरी देतात, त्यांस व जमीदारास हक वगैरे शिवाय भरतात त्यांस परभारें म्हणतात. परंतु हल्लीं परभारें सर्व बंद झालें आहे. त्याप्रमाणें गांव निसवत म्हणजे गांवचे अधिकाऱ्यानें कोणास वर्षासन, धर्मादाय वगैरे नेमणूक दिली तर तीस म्हणतात, परंतु हल्लीं गांव निसबत ही

सर्व बंद होऊन या प्रकारचे खर्च माहालहून आदा होतात. गांवचे अधिकाऱ्यांत मुख्य पाटील, त्याचा शिपाई चौगुला, त्याचा कारकून कुळकरणी व शिवाय बलुते म्हणजे कारागीर लोक. कोठकोठें अलुतेही असतात. म्हणजे मोठे गांवीं शिंपी, तांबोळी, वाजंत्री, घडशी वगैरे. समस्त शेतकरी शूद्र लोकांस काळी असें म्हणतात, व द्विज लोकांचा भाग म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांस पांढर असें म्हणतात. याचें कारण पहिले लोक काळे व मागून आले ते पांढरे, या कारणानें असा भेद पडला असावा. परंतु आता दोघांत ऐक्य आल्यामुळें पांढर म्हणजे सर्व लोक असाही अपभ्रंश झाला आहे.

पुराणांवरून पाहिलें तर पृथुराजाचे कारकीर्दीस गांव वसले असें म्हणतात; परंतु एकाचे कारकीर्दीत सर्व गांव वसलें हें म्हणणें शोभत नाहीं; तथापि इतकें खरें कीं, आर्य लोक इकडे येण्याचे पूर्वी म्हणजे सूर्यवंश व सोमवंश झाल्यापूर्वी जे प्राचीन मनुवंश, ध्रुववंश, उत्तानपाद, वेण, पृथु इत्यादि राजे दुसरे वंशींचे झाले, त्यांचे वेळेस गांव वसाहत झाले असावे, व त्या काळीं आपापले गांवीं रयत स्वतंत्र असावी. कितिएक गांव मिळून देश किंवा प्रांत किंवा महाल होतो. जसे वाईदेश, पुणेदेश, मिरज प्रांत, वगैरे. त्यास हल्लीं प्रगणा म्हणतात. याचे पोटीं तर्फा, संमती वगैरे लहान भाग असतात. एक तर्फेंत १०।२० गांव असतात. व पांच-सात तर्फा मिळून १ प्रांत होतो. त्या प्रांतावर गांवांत जसा पाटील व कुळकरणी त्याचप्रमाणें देशमुख, कुणबी व देशपांड्या ब्राम्हण असतो. जर पाटलाचा निर्वंश झाला तर देशमुखानें पाटील नेमावा. कुळकरणी यांचा निर्वंश झाला तर देशपांड्यानें नेमावा. त्याचप्रमाणें प्रांताचा जो मुख्य गांव तेथील बलुते आहेत, त्यांस मेहेत्रे म्हणतात. याचे उदाहरणार्थ एक प्रांत घेऊं. संगमनेर हा परगणा आहे. त्यांत ६ तर्फा कोन्हाळे, निमोण वगैरे आहेत. आतां या प्रांतांत दोनशें गांव आहेत. तेथें जे न्हावी आहेत ते संगमनेरचे मेहेत्रे न्हावी यांचे ताब्यांत असावयाचे व सर्व गांवचे माहार संगमनेरचे मेहेत्रे माहार यांचे ताब्यांत असावयाचे. कांहीं वतनसंबंधीं वाद पडल्यास मेहेत्रे यांजकडे जाऊन त्यांचे अभिप्रायानें लोक चालतात. कितिएक ठिकाणीं मेहेत्रे यांचे हक्क असतात. म्हणजे त्यांस इतर गांवचे न्हावी वगैरेपासून दरसाल कांहीं पावत असे. पुढें राज्यक्रांतीमुळें ही पहिली व्यवस्था कायम राहिली नाहीं. आतां एक परगण्यावर जमीदार आहेत, परंतु त्यांजवर एक मामलेदार नाहीं. एक मामलेदाराकडे १० परगण्याचे गांव असतात. असें घालमेली-मुळें झालें आहे. पूर्वीचे विभाग कायम राहिले नाहींत.

आतां गांवचे मागील धारे पाहिले तर फार चांगले होते. कोणी गांवांत आला तर त्याची सरबरा ठेवीत. त्यास बिगारी देऊन त्याचें ओझें पुढले गांवीं पेंडानें पोंचवीत. त्यास रस्ता दाखविण्यास महार मिळे. याजमुळें पूर्वी फौजेस कमिसरीची गरज नवती व क्वार्टरमास्तरांची गरज नवती. हीं कामें गांवचे लोक करीत होते व आपले हद्दीपर्यंत हें काम केल्यानें त्यांसही फार श्रम पडत नवते.

पूर्वी जेव्हां गांव वसले तेव्हां राजा नवता, व प्रत्येक गांव स्वतंत्र राज्य होतें, असें वर सांगितलेंच आहे. पुढें मुख्यत्वेंकरून जमीनीबद्दल तंटे बहुत उत्पन्न होऊं लागले. त्यांस शिवतक्रारी म्हणत. एक गांवास दुसरे गांवचे शिवेंतील जमीन घेण्याची इच्छा होऊन जे ते आपली मर्यादा उल्लंघन करूं लागले. कोणतीही गोष्ट आरंभीं नीट राहते व पुढें अविचार होऊन त्यांचे तेच आपले नाशास कारण होतात. त्याप्रमाणें गावचे लोक एकमेकांशीं भांडूं लागले व त्यांचा कैवार प्रांताचे लोक घेऊं लागले. जोंपर्यंत गांवचे लोक गरीब होते तोंपर्यंत नीट चाललें; परंतु त्यांजवळ धनाचा संग्रह जों जों वाढत चालला तों तों त्यांस अधिक जमीनी असाव्या असें वाटूं लागलें व तितक्यांची लावणी करण्याचें त्यांस सामर्थ्यही आलें. आणि जमीनी तर नेमल्या होत्या. मग शेजाऱ्याच्या जमीनी घेण्याचा क्रम चालविला. तेव्हां मर्यादेचें रक्षण करण्याचें कारण पडून शस्त्रधारी लोक ठेवावे लागले. तीच फौज होय व त्या फौजेचा अधिकारी तोच राजा होय. असें झालें तेव्हां त्या राजास आपले हिताकरितां गांवकरी खंडणी देऊं लागले; परंतु गांवचे व महालचे जमीदार यांचे संमतीनें खंडणीचा ठराव होत असे, त्याचेंच नांव जमाबंदी; परंतु कितिएक कालपर्यंत खंडणीशिवाय दुसरा कारभार राजाकडे नवता व गांवानें खंडणी द्यावी तितकी राजानें द्यावी आणि ग्राममर्यादेचें रक्षण करावें. गांवचें किंवा प्रांताचें भांडण होऊं देऊं नये. बहुतेक ठिकाणीं गुजराथ, माळवा वगैरे प्रांतीं क्षत्रिय, रजपूत जातीचे शिपाई ठेविले आहेत, त्यांस गिराशी म्हणतात. हा शब्द ग्रास याजवरून झाला आहे व त्यांस ग्रास म्हणजे उत्पन्नापैकीं भाग देतात. याचप्रमाणें कर्नाटकांत शेतसनदी शिपाई आहेत. पुढें राजाचा अंमल वाढत वाढत गांवचा कारभार त्याणें आपले हातीं घेतला. गांवच्या जमीनी मोजून त्याणें धारे ठरविले व सरकारांत काय द्यावयाचें तें तेच आपले वेतास येईल तसें मागूं लागले व गांवचे अधिकार कमी झाले.

याप्रमाणें पूर्वीचे हिंदु राज्यांत व्यवस्था झाली. त्यापुढें मुसलमान लोकांनीं हा मुलूख जिंकला, तेव्हां तर गांवचे व माहालचे अधिकार अगदीं बुडाले. गांवचे पाटील व प्रांताचे देशमूख यांस सरकारचे नोकर असें मानूं लागले. त्यांणीं सर्व प्रकारची सरकारची चाकरी करावी, असें ठरलें व जबरीनें वाटाडे व वेगारी काढूं लागले. गांवच्या पंचाइती बुडाल्या व सर्व गोष्टी सरकार करूं लागलें. खंडणी इतकी चढली कीं, गांवचे रयतेस फार भिकारपण आलें. अनेक अधिकाऱ्यांनीं अंमल बसविले. साहोत्रा, पंचोत्रा, सरदेशमुखी, मोकासा, जाहागीर, अंमल ठरले. शिवाय फौजा मुलखांत फिरत व त्या गांव लुटीत; तेणेकरून गांव ओसाड पडत. जमीदारास कैदेंत टाकीत, हवा तितका पैसा घेत. मग गांवानें वर्षासन व इनाम देणें बंद झालें. गांवकरी सावकारापासून कर्ज काढून सरकारची भरती करूं लागले. कारण उत्पन्नानें पूर्तता होईना. पुढें इंग्रजी अंमल झाला, तेव्हां ही मोकद्दमीचीं कर्जे रद्द केलीं. त्यापूर्वी दर गांवावर कर्जाचा मोठा

ढीग होता. गांवचे उत्पन्नाची वहिवाट सावकार करीत. सरकारास निशेदार होऊन गांवाकडून वसूल घेऊन त्यांत आपलें व्याज घेऊन बाकी सरकारात देत. पुढें मक्तेदाराच्या अमलांत गांव फार खराबीस आले. गांवाकडून किती रुपये घ्यावे याचा कांहीं नेम राहिला नाहीं. गांवास जितके रुपये देण्याचें सामर्थ्य असेल तितके रुपये घेत व कमती आले तर गांवांतील वाणी, सावकार यांस लुटून घेत, अशी व्यवस्था झाली. मुसलमानांचे राज्याचे अखेरीस व पुढें मराठेशाईंत असेंच चाललें. गांवास भूमीचे धनी असें ते कोणी समजत नवते. त्यांस सरकारचे भाडोत्री, सरकारचीं कुळें, सरकारचे आज्ञेनें ती जमीन करितात व सारा देतात. जमीनीचे मालक सरकार, आणि गांवकरी भाडेकरी, याप्रमाणें समजूं लागले. वास्तविक पाहिलें तर, सरकारचे पूर्वी गांवानें भूमीचा धनीपणा संपादला, याजकरितां त्याचे अनुमतीवांचून सरकारास खंडणी मिळूं नये व हरएक प्रकारें त्याजवर जुलूम होऊं नये. तसेंच सरकारचा शिपाई गांवास गेला तर रयतही माझी पगार देणारी आहे, असें समजून त्यानें त्यांशीं वागावें. परंतु त्याचा विसर होऊन सरकारचा शिपाई किंवा अधिकारी आतां गांवांत जातो तो आपल्यास धनी म्हणून समजतो व सर्व ग्रामास गुलामचाकर असें मानितो. तर हा केवढा जुलूम आहे.

आतां रयतेस कांहीं स्वतंत्रपणा येत चालला आहे, परंतु सरकारसारा म्हणजे करभार रयतेचे अनुमतीनें सरकारनें घ्यावा व किरकोळ वादविवाद गांवचे गांवांत तुटावे असें झाल्याखेरीज गांवचे रयतेस स्वतंत्रपणा आला, असें होणार नाहीं. परंतु हा स्वतंत्रपणा भोगण्यास पूर्वीच्यासारखा अज्ञानकाळ हल्लीं नाहीं, यास्तव गांवची रयत ही शाहाणी झाली पाहिजे. विद्या वाढली पाहिजे व सरकारी कारभार त्यांस समजूं लागला पाहिजे. हल्लीं तर सरकार फार सुज्ञ व रयत फार अडाणी अशी आहे. याजमुळें त्यांस कितीएक अधिकार मिळत नाहींत. असो.

गांव हा शब्द मूळचा मराठी असोन तो ग्राम या स्वरूपानें संस्कृतांत घेतला आहे. पूर्वीचे संस्कृत व्याकरणी यांणीं प्राकृतांतील बहुत शब्द संस्कृत मानून कोशांत संग्रहित केले आहेत. असो. अनेक गांव मिळून एक प्रांत होतो व अनेक प्रांत मिळून एक राष्ट्र होतें. पूर्वीची शूद्र प्रजा होती, तीस चौथा वर्ण म्हणून ब्राम्हणांनीं ठरविलें व जेव्हां द्विज हिंदुस्थानांत व दक्षणेंत आले, तेव्हां त्यांमध्यें मोठाले ऋषी व याज्ञिकी होते व शूद्रांपेक्षां त्याची अक्कल जास्त होती, यामुळें प्रांतांत धर्माधिकार ब्राम्हणांचा झाला व आर्यधर्म शूद्रासही मिळाला; तथापि द्विजांत त्यांची गणति झाली नाहीं व ब्राम्हण ज्योतिषी ग्रहणें सांगतात, मुहूर्त सांगतात व यज्ञ-अनुष्ठानें करून मोठी कार्यसिध्धी करितात व त्यांचे आशीर्वादांत व शापांत सामर्थ्य आहे, असें त्याकाळीं लोकांत प्रसिध्ध होतें. याजमुळें गांवकरी यांणीं दरगांवीं जोशांचा संग्रह केला व ब्राम्हणांची मर्जी संपादन करण्यास जपूं लागले.

नाग्न्यर्कसोमानिलवित्तपाख्यात् ।
शंके भृशं ब्रह्मकुलावमानात् ॥—भागवत.

आतां कितिएक ठिकाणीं गोळक धर्माधिकारी, जोशी व पाध्ये आहेत. परंतु याचें कांहीं आश्चर्य नाहीं. पूर्वी ब्राम्हण शूद्रांच्या मुलीदेखील करीत असत व विधवेचें लग्न करीत. यामुळें त्या वंशांत औरसाप्रमाणें अधिकार होता. पुढें ब्राम्हणांचा प्रतिबंध झाल्यावर गोळक नीच ठरले व ब्रम्हदेवाची पूजा बंद झाली. ही गोष्ट पुराणांत आहे, तिचा अर्थ इतकाच कीं, ब्रम्हदेव म्हणजे वैदिक विधी, तो शैवांनीं व वैष्णवांनीं बंद पाडला. याजवर हें रूपक आहे. याप्रमाणें भक्तिमार्ग वेगळे निघाले. शूद्रदैवतें ब्राम्हणांनीं घेतलीं. प्राचीन धर्म बुडून गेला. चौथा वर्ण झाला. जिकडे तिकडे राजाचा हुकूम, लेखन, नाणीं हीं चालू झालीं. व्यवहार वाढले व अजूनही कितीएक वाढतील. याप्रमाणें गांवाविषयीं विचार आहे.

[नंबर १७६]

गांव

या विषयावर मागें जी माहिती लिहिली, तिचा उर्वरित भाग आतां लिहितों.

सांप्रतकाळीं कोणत्याही गांवीं जाऊन पाहावें तर गांव उजाड दिसतात. या नगराचे सभोवताले वाळकी, अकोळनेर, वांबोरी इत्यादि गांव आहेत. परंतु त्यांकडे पाहिलें असतां त्यांची वसाहत पूर्वी मोठी असावी, असें दिसतें. कारण त्यांतून शेंकडों घरांचे दगडांचे ढीग, खिंडारें व ओसाड्या पडल्या आहेत व मधूनमधून मात्र कांहीं नांदतीं घरें आहेत, असें बहुत गांवीं आढळतें. त्यांत खानदेशाकडे गेलें तर ही उजाडी फार आहे असें दिसतें. एक एक गांवांत मूळची जेथें हजारहजार घरांची वस्ती होती व दोनतीनशें विहिरी होत्या, तेथें आतां चार घरें नाहींत. तशींच गांवासभोवतालीं शंभरदोनशें मात्र बिघे लावणीस जमीन, बाकी उत्तम काळी जमीन उजाड पडली आहे. विहिरीचीं खाष्टीं भरलीं आहेत. कांहीं शिकस्त होऊन पडलीं आहेत. गांवकुसू, बुरूज, पडून त्यांजवर निवडुंगें वाढलीं आहेत. पाटील लोकांचे मोठाले वाडे, दरवाजे, बुरूज उभे आहेत; परंतु आंत मनुष्य नाहीं. या प्रांतीं कोणत्याही गांवीं गेलें तरी याचप्रमाणें दिसतें. भरलेला गांव एकही नाहीं व हल्लीं पुष्कळ द्रव्य वाढलें असें म्हणणारे जे आहेत त्यांणीं पाहावें कीं, हल्लीं जे गांव आहेत, त्यांतील हल्लींचे रयतेस पूर्वीप्रमाणें वाडे व घरें बांधण्याचें सामर्थ्य यावयाचें तर लांबच आहे, पण दागदुजी करण्याचेंही सामर्थ्य नाहीं. आतां या सर्व उजाडीचें कारण विचारितां लोकांचे सांगण्यांत असें येतें

कीं, बाजिरावाचे कारकीर्दीत दंगे झाले व मोठा काळ पडला त्यांत गांवोगांवचीं बहुत माणसें मेलीं, अन्नावांचून कुटुंबें, पोरेंबाळेंसुध्धां लोक आपले घरचे घरीं मेले व कोणी उट्टून गेले, ते वाटेनें मेले. याप्रमाणें संव्हार होऊन देश उजाड झाला. तो पुनः पूर्ववत होण्यास सुमार पांचसातशें वर्षें तरी लागतील. आलीकडे काळ गेल्यास साठ वर्षें झालीं. तेवढ्यांत थोडी वस्ती झाली आहे; परंतु पूर्वीचा पांचवा हिस्सा झाली आहे. कितिएक घरणें फुटून गेलीं आहेत, कितिएक बांध पडले आहेत. कितिएक विहिरी माणसांनीं भरल्या आहेत. कितीएक सुंदर जमिनी जंगलांनीं आच्छादिल्या आहेत. बरें यांची वसाहत लौकर व्हावी असें कोणी म्हणेल, तर प्रांतांत रयतच नाहीं. तेव्हां मनुष्यच जर नाहींत तर त्या जमीनी कराव्या कोणी ? हा विचार पडतो. असो. हा देश पूर्वीप्रमाणें कधीं आबादान होईल तो होवो, तथापि पहिली साळी वगैरे कापड करणाऱ्यांची वस्ती फार होती, ती तर पुनः भरेल असें वाटत नाहीं; कारण विलायती कापडानें रोजमार कमीच झाला. आणखी पूर्वीप्रमाणें आलीकडे पाऊस पडत नाहीं व जरीमरी फार. ही वसाहत न होण्यास कारणें आहेत. हल्लीं पाऊस फार कमी व पीक, पाणी, गवत वगैरे उत्पत्ती कमी होते व मनुष्यें फार मरतात. दरसाल जरीमरीची फेरी आहेच.

दूर गांवीं घालमेलीमुळें आतां पूर्वीप्रमाणें रचना कायम राहिली नाहीं. तथापि माहितीकरितां कांहीं पूर्वपीठिका सांगतों. बाराबलुते म्हणतात त्यांच्या ओळी ३ आहेत. व प्रत्येक ओळींत ४ जण आहेत. ते येणेप्रमाणें :

पहिली ओळ

सुतार. लोहार. चांभार. माहार.

दुसरी ओळ

मांग. कुंभार. न्हावी. परीट.

तिसरी ओळ

गुरव. जोशी. भाट. मुल्लाणा.

पहिल्या ओळीस बलुते जास्त, दुसरीस कमी व तिसरीस त्याहून कमी असा दस्तुर आहे.

आतां बारा अलुते म्हणतात ते—

१ सोनार पोतदार. २ जंगम. ३ येसकर. ४ शिंपी. ५ माळी. ६ घडशी. ७ कोळी. ८ उवरी. ९ तेली. १० रामोशी. ११ तांबोळी. १२ गोंधळी.

हे अलुते मोठे कसब्याचे गांवास असतात. कसबा म्हणजे ज्या गांवास पेठ व बाजार आहे आणि ज्याची शिव बारा गांवास लागली आहे तो गांव. जसें १२ कोस स्वतंत्र चालला तो ओढा १०० कोस स्वतंत्र जाते ती नदी व शंभरावर किंवा समुद्रास मिळते ती महानदी.

गांवची जमीन विस्तीर्ण असली तर गांवचे शेतकरी यांस दूर जाण्यास अडचण पडते. म्हणून गांवचे पोटीं जमीनीचे लगत ते लोक जाऊन राहातात, त्या स्थलास वाडी अथवा मजरें म्हणतात. मोठे कसब्यास म्हणजे खेडासारखे गांवास बारापर्यंत वाड्या असतात व बहुधा दोनचार ज्यास असतात, त्याचा हिशेब मौजांत होत असतो.

याप्रमाणें भिल्लांच्या हय्या वेगळ्याच असतात व त्यावर त्यांचे नाईक असतात.

माहारांची व मांगांचीं घरें गांवाचें आंत नसतात व बाकी सर्व खुम गांवांत असतात.

मावळ व डांग प्रदेशांत धनगर लोक जागोजाग वस्ती करून राहातात व त्यांचे धनगरवाड्यांत जो मुख्य असतो त्यास गावडे म्हणतात व त्याप्रकारचे महालही जुन्नर व भिमाशंकराकडे आहेत. आणि त्यांजवरील मुख्यास सरगावडा म्हणतात.

कोणतेही गांवची वस्ती होण्यास तेथें बारा मास टिकेल असें पाणी पाहिजे. पाणी नाहीं नाहीं तर मुळींच वस्ती होणार नाहीं. यास्तव गांव व वाड्या हे छाया म्हणजे घरें, वृक्ष वगैरे आणि पाणी म्हणजे नद्या, ओढे, झरे, तळीं अशी सोय पाहून त्यांचे लगत राहातात. अन्न जमीनींत होतें आणि वस्त्र उद्योगानें मिळवितां येते. परंतु मनुष्याचे जीवनास छाया, अन्न, पाणी आणि आच्छादन हीं चार अवश्य पाहिजेत. यास्तव वृक्षारोपण, धर्मशाळा, कूप, तटाक, वगैरे करणें हें मोठें पुण्य आहे, असें मानिलें आहे तें खरें आहे. परंतु या देशांत या सर्व गोष्टींची फार कमताई आहे.

जेथें कसबा व बाजार असतो, तेथें चौधरी, महाजन, शेटे, आवटी, डांगे, पथकी हे वतनदार असतात. तेथें जंगम, मठपती, गणाचारी वगैरे असतात.

सदरहू खेरीज गांवकरी यांणीं दुसरे अनेक लोकांचा संग्रह केला असतो, असें गांवोगांव आढळतें. ते लोक—

१ आंबेकरी.	२ कोरबू.	३ ठाकर.
४ मखदुम.	५ रखवालदार.	६ सनदी.
७ प्यादे.	८ पटणशेटी.	९ फुलारी.
१० पुजारी.	११ मुजावर.	१२ टाल्या.
१३ सिकलगर.	१४ वाजंत्री.	१५ गोसावी.
१६ आतार.	१७ कळवांतीण.	१८ बेलदार.
१९ झाडू.	२० बुरुड.	२१ तांबट.
२२ पखाली.	२३ पिंजारी.	२४ भोई.
२५ कुरण्या.	२६ दासरी.	२७ मेंढेगार.
२८ धारेकरी.	२९ घडेकरी.	३० हिजडा.

गांवांत कोणी मोठा देव असला म्हणजे त्यास पुजेस फुलें देणार, पालखीस भोई आणि पुढें नाचास कळवांतिण व वाजविण्यास डौरी इत्यादि वतन देऊन ठेविले असतात. परंतु हे नेमाबाहेरचे लोक आहेत. सबब क्वचित आढळतात.

गांवचे वतनदारांत दोन वर्ग आहेत. एक सरकार-निसबत, म्हणजे सरकारची चाकरी ज्यांस करावी लागते ते व रयत–निसबत, म्हणजे रयतेची चाकरी ज्यास करावी लागते ते. आतां सरकार-निसबत आहेत ते येणेप्रमाणें—

१ पाटील.	२ कुळकरणी.	३ माहार.	४ रामोसी.
५ नायकवाडी.	६ मजरेचा खोत.	७ वाटकर.	८ चौघुला.

याचप्रमाणे चाकर

१ देशमूख.	२ देशपांडे.	३ नाउगौंड.	४ देशचौगुले.
५ सरदेशमुख.	६ काजी.	७ हेजीब.	८ यार्दी.
९ वकील.	१० खतीब.	११ सरपाटील.	१२ सरगोंडा.
	१३ चिटणीस.	१४ मुश्रीफ.	

यांपैकीं पहिलीं २ नांवांचीं वतनें फार प्राचीनचीं आहेत व बाकीचीं मोंगलाईंत व मराठी राज्यांत उत्पन्न झालीं आहेत. शाहूराजानें आपल्यास मोठें वतन असावें म्हणून सरदेशमुखी नवीन वतन कल्पून शेकडा १० रुपये घेण्याची दिल्लीहून सनद आणऊन घेतली. असीच दाभाडे यांणीं सरपाटिलकीची सनद घेतली. मुसलमानांनीं स्वधर्माची रयत गांवोगांव राहिली तिच्या धर्माचें रक्षण होण्याकरितां प्रांतोप्रांत काजी नेमिले व मशीदी, पीर बांधून खतीब, पीरजादे व मुजावर नेमिले. याप्रमाणें प्रत्येकाचा इतिहास आहे. सारांश, यांत देशमूख–देशपांडे मात्र प्राचीन खरे.

प्रांतास परगणे म्हणतात व कोठें कोठें मासलाकीना देश आणि सुभा असें म्हणण्याचीही वहिवाट आहे. प्रांताचे पोटीं धाकटे विभाग असतात. त्यांस तर्फ, संमत, टपा किंवा कर्यात असें म्हणतात. उदाहरण—

१ प्रांत, पुणें पोटीं तर्फा ५–हवेली, पाटस, निरथडी, करेपठार, सासवड.

२ सुभा राजापूर, पोटी टपे १४–मीठगव्हाण, संगमेश्वर, फुणगुस वगैरे.

३ परगणे संगमनेर, तर्फा ६ कोन्हाळें वगैरे.

४ प्रांत वांई, पोटीं संमत्ती ५–संमत वाघोली, संमत हवेली, इत्यादि.

५ प्रांत मिरज, पोटीं कर्याती २८–कर्यात बिटें, कर्यात निमसोड मायणी, कर्यात माळवणी वगैरे.

कांहीं काळानें दरप्रांतीं नवे राजे, नवे सरदार मोंगल व मराठे यांची गर्दी उडाली. त्या गर्दींत नानाप्रकारचे अंमल व हिस्से झाले. त्यांचीं नांवें—

१ सुभा.	२ खालसा.	३ जाहागीर.	४ स्वराज्य.
५ चौथाई.	६ जिल्हे.	७ बाबती.	८ साहोत्रा.
९ पंचमहिसा.	१० दाहिजा.	११ मोकासा.	१२ हुजूरमामला.
१३ फौजदारी.	१४ खारीपट्टी.	१५ नजर.	१६ गवतकटाई.
१७ राबता.	१८ मोंगलाई.	१९ तोटा.	२० हुचलकी.

वगैरे प्रांतोप्रांतीं बहुत आहेत. कितिएक अंमल दुमाले आहेत. कोणी मोकासी आहेत. कोणी जाहागीरदार आहेत. कोणी साहोत्रेदार. यास्तव हिशेबी त्यांचा तसतसा दाखला ठेवावा लागतो. याचा इतिहास असा आहे कीं, पहिल्यानें मोगलांनीं शाहूराजास जमाबंदीपैकीं चौथाई घेण्यास सांगितलें व बाकी तीन हिस्से मोंगलाचे अंमलदार घेत असत. याप्रमाणें प्रथम दोन अंमल झाले. पुढें शाहुराजानें आपला मोकासा चौथाईपैकीं ६ रुपये सचिवास दिले, म्हणून त्यास साहोत्रा म्हणूं लागले व बाकी १९ रुपयांस स्वराज्य असें नांव पडलें. पुढें कितीएक ठिकाणीं मोंगलाचे अंमलदार होते ते उठऊन लावले, तेव्हां जाहागीर ७५ रुपये तेही जमा करूं लागले, परंतु दोन सदरांनीं जमेस होत गेले. पुढें कोणास स्वराज्य अंमल इनाम दिला. तेव्हा सरकारांत फक्त जाहागीर राहिली. कोठें सरदेशमुखी कोणास दिली, तेव्हडीच दुमाला झाली. यास्तव इनाम व जाहागीर गांवचे प्रकार २ आहेत. निवळ दुमाला व शराकती. आतां गांवचे जे दुमालदार आहेत ते इनाम म्हणून, सरंजाम म्हणून, आग्रहार म्हणून किंवा इसाफत म्हणून, अनेक देण्याचे प्रकार आहेत त्या परोपरींचे नांवांचा वसूल घेतात.

आतां जमीदारांच्या वाटण्या होऊन भावाबंदांकडे गांव, जमीनी, इसाफती, रुसूम, तहरीर वगैरे हक्क वांटले गेले आहेत. एका भावाकडे भिंगार आहे, दुसऱ्याकडे कापुरवाडी, तिसऱ्याकडे नेती याप्रमाणें परगण्याच्या वाटण्या झाल्यामुळें कोणी म्हणतो कीं, मी कापुरवाडीचा देशमुख, कोणी म्हणतो कीं, मी चारगांवचा देशमुख, असें ते आपलें मूळ विसरले. त्यांतही त्यांचीं दप्तरें वगैरे गेलीं, याजमुळें फार घांदल झाली. आतां खरी हकीकत समजणें असेल तर एकादा म्हातारा देशमुख अगर देशपांड्या यास महिनाभर विचारावें, तेव्हां कदाचित् कांहीं झाडा लागेल. मामलेदार वगैरे यांस तर या बाबतींत विशेष माहिती नसते. याविषयीं दाखलाही कोठें राहिला नाहीं. सन १८२७ चा कायदा १६, कलम १९ यांत एका बुकांत जमीदाराचे इतिहास व दाखले लिहून ठेवावे असें लिहिलें मात्र आहे; परंतु हे कोणीही कलेक्टरानें अद्याप लिहिले नाहींत व आतां जमीदाराचा संबंध काळीपासून तुटला आहे. सबब त्याचा कांहीं उपयोग नाहीं. अस्तु.

कोणी दुमालदार आपले रयतेकरितां शाळा, दवाखाने, घाट, चावड्या, धर्मशाळा इत्यादि करून रयतेस मान्य झाला आहे, असा तर कोठें आढळत नाहीं बहुतकरून अधिक पैसा कसा मिळेल, आणि आपणास तो खर्चास कसा सांपडेल, या धोरणानें दुमालदाराची वर्तणूक असते, याजमुळें बहुत दुमालदारास धारेबंदी व प्रतबंदी सरकार करूं लागलें तर आवडत नाहीं.

दुसरे कितिएकांची त्यांचे गांवाशीं ओळखही नसते. याजमुळें रयतेचा त्यांचा बेबनाव असतो व सरकारही यांस दुष्ट असें समजतें. सांप्रत काळीं शिंदे, होळकर,

गायकवाड यांची हीच वृत्ती आहे. याजकरितांच रयतेस इंग्रजी सरकार अधिक आवडतें. रयतेचे सुखावर नजर अगदीं नाहीं. काय तें आपण इतकेंच त्यांस दिसतें. रयतेस शाहाणें करावें, सुखी करावें, अधिक विहिरी वगैरे कराव्या व रयत आबादी करावी, हा धर्म त्यांचे मनांत वागत नाहीं. याजमुळें सरकारी अंमल बरा, हे रयतेच्या मुखीं असतें. अस्तु.

गांवची रयत पाहिली तर तींत मूळचे वतनदार माहार इत्यादिक अतिशूद्र आहेत व त्यांचे पाठीमागून दक्षणेकडून आलेले शूद्र आहेत व त्यांचे पाठीमागून उत्तरेकडून आलेले द्विज आहेत आणि त्यांचे पाठीमागून आलेले मुसलमान आहेत. या चौघांचा धर्म वेगळा व रितीभाती वेगळ्या आहेत. म्हसोबा वगैरे अनेक शुद्र दैवतें हीं अति-शूद्रांचीं आहेत. बगाडे, जत्रा, देवीचें भजन, तुळजापुर, माहूर इत्यादि संस्थानें हीं शूद्रांचीं आहेत. तसेंच जागोजाग डोंगरावरचे केदार, खंडोबा, महादेव, मारुती, इत्यादि शूद्रांनीं स्थापिले आहेत, असें दिसतें. ब्राम्हणांचा वैदिक धर्म त्यांत केवळ अग्निकार्यें, अग्निहोत्रें, यज्ञयाग हेच आहेत व त्यांचीं दैवतें वेगळींच आहेत. म्हणजे अग्नी, सोम, वरुण, सूर्य, यांचें भजन आहे. पुढें ब्राम्हणांचा अस्सल धर्म व शूद्र-स्थापित दैवतें यांचा संकर झाला व त्यांचा मेळ पुराणांनीं घातला आहे. त्यानंतर मुसलमान आले, त्यांणींही पिराच्या पुजा, ताबूद वगैरे हिंदु लोकांस दिले, परंतु ते धर्मांत ग्रंथाधारानें पूर्णत्वें मिळाले नाहींत, तत्रापि कोठेंकोठें त्यासही आरंभ झाला आहे. अथर्वणवेदाचे ब्राम्हण अल्लोपनिषद म्हणून जें म्हणतात, त्यांत अल्लाचे स्तुतीचा प्रकार आहे. यवनचंद्रिका वगैरे ग्रंथांत मुसलमान वगैरे यांणीं कोणकोणतीं कर्में करावीं, हें लिहिलें आहे. तसेंच व्रतार्काचे आरंभींच सर्व व्रतें म्लेंछानीं करावीं असा कालिका. पुराणांतील आधार लिहिला आंहे. याप्रमाणें भटांनीं तजवीज केली आहे. परंतु त्या गोष्टी अद्याप फार मजबूद झाल्या नाहींत.

एक लोक येऊन त्यांनीं दुसरे लोकांस जिंकलें म्हणजे त्यांची हरतऱ्हेनें दुर्दशा होते, हें सहज लक्षांत येतें. जेव्हां शूद्रांचें अधिपत्य स्थापन झालें, तेव्हां अतिशूद्रांस ठिकाण नाहींसें झालें. त्यांस गांवांत जागा व पाणवठ्याचें पाणी देखील मिळेना. त्यांणीं वाईटसाईट मिळेल तसलें पाणी प्यावें आणि चाकरीस सर्वांपुढें हजर राहावें. पाटलाचा हुकूम शिरसावंद्य करावा, त्याचीं घोडीं संभाळावीं, त्यांचीं उष्टीं पानें चाटावीं व त्याचे प्रेतावरचीं पांघरुणें पांघरावीं, स्मशान ही महाराची वतनदारी, असे अनेक प्रकारचे जुलूम त्यांजवर झाले. बरें पुढें द्विज म्हणजे आर्यलोक आले त्यांणीं शूद्रांस दास ठरविलें व त्यांस चौथा वर्ण मानिलें. पुढें शूद्रकमलाकर वगैरे यांणीं त्यांस आपल्यापैकीं कांहीं कर्में दिलीं व द्विजांच्या बेगारी वाहाव्या इत्यादिक रीतीनें तेही खालीं झाले. नंतर द्विजांवर मुसलमान आले. तेव्हां ते त्यांचे डोकीवर बिगारी देऊं लागले. दरबारांत त्यांचें अधिपत्य, तेव्हां उंच वर्णांचे

म्हणविणारे ब्राम्हण विजारी घालून चाकरी करूं लागले. सारांश, जो वरचढ होतो तो गरिबास हवें तसें वागवितो, त्यास उपाय नाहीं. हल्लीं इंग्रजसरकार सर्वांवर जबरदस्त आहे, परंतु त्यांची अद्याप लोकांत मिसळ झाली नाहीं. अस्तु.

या आमच्या अपूर्व कल्पना आहेत, असें कोणास वाटेल; कारण सांप्रत लोकांपैकीं, बहुत विचारशून्य व अल्पज्ञानानें मोठा अभिमान बाळगणारे असल्यामुळें बहुतेक गोष्टी त्यांस व्यक्त नाहींत, तथापि आमचें ध्यानास आलें तें सर्व दर्शविलें आहे, त्यांत कांहीं न्यूनाधिक ज्यास वाटेल त्याणें लिहून कळवावें.

या देशांत द्विजांचें येणें आणि मुसलमानांचें येणें यांमध्यें एक मोठी गोष्ट झाली ती ही कीं, बौध्धमताची प्रसिध्धी. त्यानें अवल ब्राम्हणधर्मास अगदीं उलटवून दिलें, व दयाधर्म स्थापन केला व त्याचा उच्छेद कुमारिलभट्टानें केला; परंतु त्यांचे ग्रंथ अद्याप पुष्कळ आहेत. ब्राम्हणांचें मंगळ ओं, शूद्रांचें मंगळ श्रीगणेश, तसें बौध्धमताचें मंगळ ओं नमः सिध्धं. आता हें मंगळ बौध्धांनीं जे जे ग्रंथ केले त्यांत आहे. शिवाय लोक मुलांस नवीन लेखनविद्या शिकवूं लागले म्हणजे हेंच मंगळ सांगतात. त्याप्रमाणें मोगलाईंत बिसमिल्ला हें मुसलमानांचें मंगळही सांगतात. याप्रमाणें धर्माचा संकर बहुत झाला आहे, पण काळानें हें सर्व घडतें यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

[नंबर १७७]

फड व पेशवाईंतील माहिती

मराठी राज्यांत फड म्हणून एक मोठी कचेरी होती. ती पुण्यांत पेशव्यांचे शनवारचे वाड्यांत बसत होती. त्या कचेरीचे मुख्य अधिकार बहुत वर्षेंपर्यंत बाळाजी जनार्दन भानू ऊर्फ नाना हे होते. म्हणून त्यांस नाना फडनवीस असें नांव पडलें. या पुरुषास ज्याप्रमाणें काम करण्याची शक्ति होती, त्याप्रमाणें मराठी राज्यांत दुसरे कोणासही नवती. सकाळपासून मध्यरात्रींपर्यंत एक क्षण व्यर्थ न जाऊं देतां सर्वकाल ते सरकारी काम करीत. त्यांत हिशेब किती लिहीत, जाबसालीं पत्रें व बातमीचीं पत्रें किती लिहीत, खलबतें आणि मसलती किती करीत, त्याचा सुमार नवता व इतकें काम होण्याकरितां त्यांची वेळेची व्यवस्था फार चांगली असे. बडबड किंवा वायफळ अगर पोकळ गोष्ट ते कधीं बोलले नाहींत व त्यांनीं कधीं ऐकिली नाहीं, व त्यांचे घरांत फार मंडळी नसे व स्वारीचा डौल नसे. एकांताची त्यास फार प्रीति होती. कामावांचून त्यांचे घरीं कोणी जात नवते, व कामावांचून कोणाची भेट होत नवती. त्यांचे हाताखालीं फडावर ७०० कारकून होते व तेथें जाबसाली, राचकीय, हिशेबी व चिटणीशी

लिहिणें पुष्कळ असे. मराठी राज्याची रचना अशी होती कीं, सरकारची आत-मंडळी व पदरची मंडळी ही सरकारांत खासगत वाड्यांत राहात असे. शिवाय सरकारसंबंधाचीं माणसें दोन प्रकारचीं, मुत्सद्दी व सरदार. प्रत्येक सरदाराजवळ मुत्सद्दी होते. त्यांचीं नांवें, फडणीस, पोतनीस, मजुमदार, दिवाण, हषमनीस, दप्तरदार वगैरे. याप्रमाणें लोक प्रत्येक सुभ्याचे निसबतीस असत व त्यांस दरकदार असें म्हणत. सातारचे हुजूरचे दरकदार यांनीं पुण्याचे दरकदार नेमावे व पुण्याचे दरकदार यांनीं प्रांतांत व महालांत दरकदार नेमावे, असा दस्तुर होता. सरदारांत पटवर्धन, रास्ते, पवार, धुळप, आंगरे, विंचुरकर वगैरे सरंजामी सरदार असत. शिवाय पागे, पथकी किल्लेदार, शिलेदार वगैरे सरदार होते. प्रत्येकास गांव व कुरणें तोडून दिलेलीं होतीं. हरएक सरदाराकडे दरकदार असत. त्यांनीं जमाखर्ची व जाबसाली लिहिणें लिहावें, आणि अधिकउणें हुजुरास कळवावें. पुण्यापासून ५० कोशांचे आंत मोठाले गवताचे व पाण्याचे गांव पाहून त्या ठिकाणीं पागा असत. भिवरथडी, इंद्रायणींतीर, गंगथडी इत्यादि ठिकाणीं घोडीं व स्वार राहिल्यानें खर्च थोडा पुरे व स्वारांस आणि जनावरांस आराम असे. काम लागेल तेव्हां बोलावून घेत. तसेंच जेथें किल्ले आहेत तेथें त्यांजवर गडकरी लोक शेतसनदी शिपाई ठेवीत. शिवाय सबनीस, हवालदार, सरनोबत, किल्लेदार वगैरे अंमलदार असत. त्याचप्रमाणें पागांत व पथकांत, डंके, निशाणें, बिनी व ढाल याप्रमाणें नेमणूक असे. मोठे सरदार नौबती, चौघडे, असत व आणखी बक्षी, हजीरनीस, तबीब, जिनसीवाले यांची नेमणूक असे. होळकर हे माळव्याचे सुभेदार. त्याचप्रमाणें गुजराथचे सरसुभे, वसई व साष्टी हे कोकणचे सरसुभे, कर्नाटकचे सरसुभे, असे विभाग होते. दर सुभ्या-खालीं कितिएक मामलती व कमाविशी व किल्ले असत. सुभा हा लष्करी अंमलदार, तो स्वार, तोफा वगैरें बाळगून महालांत स्वस्थता राखी. त्याचे दरकदार व जमीदार मिळून मुलकी काम करीत. दरकदाराची बहाली बरतर्फी सुभ्याकडून होत नवती, हुजुराहून होत होती. पेशवे हे सातारचे मुख्य प्रधान म्हणून राज्यकारभार करीत. यास्तव दरपिढीस साताऱ्यास जाऊन वस्त्रें घेत, व पुण्यास फडणीस, मुजुमदार होते ते साताऱ्याहून नेमलेले असत, व पुण्याचे दरकदारांनीं हरएक सुभ्याजवळ व सरदाराजवळ दरकदार नेमावे. या जागा बहुतकरून वंशपरंपरा होत्या, व त्यांस उत्पन्ना-करितां महालचे जमाबंदीवर शेकडे बांधून दिले होते, तेंच वेतन. याप्रमाणें असल्यामुळें या जागा मोठ्या प्राप्तीच्या असत व याजमुळें नाना फडणिसाकडे फडणिशीच्या जागा भरण्याचें काम असे. जितके फडणीस तितके सर्व नानाकडून नेमले जात. मोठे घराण्यांत एक सरदार असे. त्याचा भाऊ विंचुरकराकडील फडणीस असे. तिसरा गुजराथेंत दरकदार असे. चौथा किल्ल्याचा सबनीस असे. याप्रमाणें एक एकाच्या घरांत दाहा दाहा रोजगार असत. रास्ते, पटवर्धन वगैरे जीं मोठालीं घराणीं, त्यांत तर कोणीच रिकामा

नसे. नानाचें वेतन दाहा हजार रुपये दरसाल होतें, परंतु कारकुनी, दरक मिळून दाहा लाख रुपये मिळत. या नेमणुका सरकार-महशूर होत्या. सबब लांच नवत. शिंद्या-सारखे सरदार आपले मुलुखाचे हिशेब पेशव्यास देत व फडणिसाची मखलासी त्याजवर होण्याचें अगत्य असे, तेव्हां त्यांचे जमाबंदीवर हुजुरचे दरकदाराची प्राती पन्नास हजार, सत्तर हजार येई. त्यांतील कांहीं फडणीस घेत. कांहीं मजुमदार घेत. याप्रमाणें वांटणी होत असे. पेशव्यांच्या स्वाऱ्या, मोहिमा व मुलुखगिऱ्या दरसाल होत. त्यांतून कांहीं खुद्द व कांहीं सरदारमार्फत होत; तेव्हां त्यावेळेस जे शिपाई प्रसिध्धीस येत, त्यांस सरदाऱ्या मिळत. पानशे, पटवर्धन वगैरे नामांकित सरदार यांचे घरचे दाहादाहा वीसवीस पुरुष सरकारकामावर मेले होते, याजमुळें त्यांवर सरकारची फार कृपा असे. याखेरीज विदेशी लोक चाकरीस असत. त्यांजवरील आरबांचे सरदार, शिद्दी सरदार, पठाणांचे सरदार, गार्दी सरदार, गोमांतकी फिरंगी सरदार वगैरे हे निराळेच असत. नाना फडणिसाचे कारकीर्दीस हे सरदार, पागा, किल्ले, अठरा कारखाने, इत्यादि फार तयारींत असत. एक वेळ बाजिरावानें असें मनांत आणिलें कीं, पानशे यांचा सरंजाम जप्त करावा; तेव्हां गणपतरावभाऊंनीं श्रीमंतांस मेजवानी केली, आणि आंचवावयास जाण्याचे वाटेवर १८ विधवांचीं पानें मांडलीं. पुढें जेव्हां श्रीमंत आंचवावयास जाऊं लागले, तेव्हां गणपतरावभाऊंनीं विनंती केली कीं, या स्त्रिया पाहाव्या; या इतक्यांचे भ्रतार सरकारची दौलत राखण्याकरितां मेले आहेत! असें असतां सरकारांतून जप्तीचा विचार झाला हें काय? तेव्हां बाजिरावास आश्चर्य वाटून त्यानें अभय दिलें.

तसेंच पूर्वी दादासाहेब राक्षसभुवनचे लढाईस गेले होते; तेव्हां तळेगांवीं जाऊन ढमढेरे यांजकडून कोण लढाईस येणार म्हणून त्यांनीं विचारलें. तेव्हां ढमढेरे यांचे कुळांत एक बाई व एक १५ वर्षांचा मुलगा मात्र राहिला होता. तेव्हां त्या बाईनें दादासाहेबांस सांगितलें कीं, आमचा कोणी पुरुष तुमचेबरोबर नसल्यास आमचे कुळाचें नांव जाईल; याजकरितां एवढा मुलगा आहे हा बरोबर अगत्य न्यावा. जर त्यास वडिलांची शरम असेल, तर तो कांहीं सरकारांत काम करून भूषणास येईल. तेव्हां तो मुलगाही हौसेनें लष्कराबरोबर गेला, आणि राक्षसभुवनावर दादासाहेबांच्या समक्ष ठार झाला. पुढें स्वारी परत आली तेव्हां दादासाहेब त्या बाईकडे भेटीस गेले आणि त्यांनीं तिला सांगितलें कीं, मुलगा तर मेलाच, परंतु आतां मी तुमचा मुलगा आहे असें समजून समाधान माना. आणखी एक वेळ असें झालें कीं, झुंझारराव घोरपडे व बाजी घोरपडे यांचा मलवडी व बुध या परगण्याचे देशमुखीविषयीं वाद लागला; आणि थोरले माधवरावसाहेब यांजकडे उभयतां आले; त्या प्रसंगीं रामशास्त्री यांणीं दोन-चार वेळ गोष्ट काढिली. परंतु श्रीमंतांनीं कांहीं उत्तर दिलें नाहीं, म्हणून तो वाद तसाच राहिला. पुढें धारवाड घेण्याकरितां स्वारी निघाली, तेव्हां वादी–प्रतिवादी यांस

भाऊबंदसुध्धां बोलाविलें आणि लढाईंत किल्ल्यावर शिड्या लाऊन हल्ला करावयाचें ठरलें. तेव्हां उभयतां पक्षकारांस श्रीमंतांनीं सांगितलें कीं, आतां बुरजावर जो निशाण चढवील तो देशमूख खरा; असें ऐकतांच उभय पक्षांनींही मोठ्या निकरानें युद्ध केलें. त्यांत बाजीचे पन्नास पुरुष ठार मेले व झुंझारराव यांणीं किल्ला सर केला; तेव्हां निर्विवाद होऊन देशमुखीच्या सनदा झाल्या. याचप्रमाणें मोतीतलावाचें लढाईंत पटवर्धनांचे १७ पुरुष एकदम मेले. त्याचें कारण असें झालें कीं, त्रिंबकरावमामा पेठे हैदरनायकावर गेले. इतक्यांत गोविंद हरी वारले. तेव्हां मामांनीं पुण्यास पत्र लिहिलें कीं, गोविंदपंत वारले, मागें पोरेंबाळें उरलीं आहेत, तेव्हां त्यांच्या हातून काम कसें होईल? हें वर्तमान गोविंद हरीचे चौघां मुलांस व पांच भावांस कळलें, तेव्हां त्यांणीं मामांस सांगितलें कीं, उद्यांची लढाई आम्हांकडे द्यावी, आणि आपण उगीच पाहात असावें आणि त्याप्रमाणें त्या दिवशीं सर्व पटवर्धनमंडळीनें विडे उचलले कीं, आज नांव जातें याजकरितां मामांची खात्री केली पाहिजे. मग संध्याकाळचे सुमारास हैदरनायकाचा पराभव होऊन पटवर्धनमंडळी बहुत पडली आणि राहिली ती विजयी होऊन मामांकडे आली आणि त्यांस नमस्कार केले. तेव्हां त्यांणीं हा वृत्तांत पाहून लागलीच पुण्यास लिहून सरंजामाच्या सनदा आणून दिल्या. पण चमत्कार असा झाला कीं, मामांचें पहिले दिवसाचें पत्र व हें अशीं २ श्रीमंतांचे हातीं एकदम आलीं, तेव्हां तीं वांचून श्रीमंतांचे डोळ्यांतून अश्रु पडले. अशी सरदारांची तपासणी लढाईवर होत होती आणि मुत्सद्दी यांची तपासणी फडावर होत होती. कोणी शिलेदार उमेदवार असला म्हणजे तो आरंभीं फडावर राही. तेथें त्याची हुशारी, शहाणपण, विश्वास व सरकारचे ठायीं एकनिष्ठपणा यांची पारख झाली म्हणजे तो अर्थातच नानापर्यंत महशूर होई. नंतर त्यास दरकदारी मिळे. त्यास रवाना करतेवेळेस माहितगारीचा अजमास म्हणून एक कागद असे. तो व तैनात जाबता व मशाल, अबदागीर, पालखी यांतून जशी ज्याची योग्यता असेल, तसें सामान त्यास देऊन त्याचे स्वाधीन चिटणीशीकडील पत्रें श्रीमंतांचे शिक्क्यासुध्धां देऊन रवाना करीत. प्रत्येक सरदार व सुभा याजकडील वकील हुजूर पुण्यास नेहमीं राहात व ते सरकारशीं कामकाज पडेल तें करीत. याप्रमाणें शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन या सर्वांचे वकील पुण्यांत असत. सरकारची आज्ञा जी होणें ती वकिलाचे मार्फत होई आणि वकील आपले धन्यास लिहीत. शिवाय वकिलाजवळ जासूद, सांडणीस्वार, हरकारे वगैरे कागद पोंचविण्यास असत. खेरीज बातमीचीं पत्रें येतजात व सावकारी डाकाही शिवाय होत्या. तसेंच परदरबारीं श्रीमंतांचे वकील होते. दिल्लीस नाशिककर हिंगणे, हैदर नाईकाकडे सातारकर जोशी, निजामाकडे बारामतीकर काळे व पिंगळे व नागपुरास वाईकर वैद्य असे होते. हीं कामें मोठ्या पदवीचीं होतीं. शिवाय सरकारांत पारसनवीस, इंग्रजीनवीस मेहेंदळे होते. याप्रमाणें जे काय मराठी राज्यांत मोठे नामांकित मुत्सद्दी झाले, त्यांचा उगम फडावर

झाला आहे. मोठा नामांकित हुद्दा मिळणें तो फडावर मिळे. उमेदवारास आपली योग्यता दाखविण्यास स्थळ तेंच होतें. त्यांचे गुणाची परीक्षा तेथें चांगली होई. जाबसालीं पत्रें, हिशेबी कागद, तहनामे, झडत्या, तरजुमे, एकवेरजी, दुवेरजी लिहिण्याच्या तऱ्हा व उत्तम वळणाचीं अक्षरें, चिटणिशी वळण, जनोबाभटी, बिवलकरी हीं तेथेंच निर्माण झालीं. (भट व बिवलकर हे फडावरचे कारकून होते). रोजकीर्दी, दफाती, अठरा कारखान्यांचे हिशेब, शिवाय भारमार इत्यादींचा विचार फडावर होई. वांकनीस, खासगीवाले, हे खासगीकडील कारभारी, पण त्यांसही फडावर हिशेब द्यावा लागे. मोठमोठे सावकार यांजकडे महालाच्या निश्या, रसदा, भरणें वगैरे काम असे. याजमुळें त्यांची सरकारांत मोठी वजनदारी असे. दरकदारास किताब नव्हते. त्यांचे दरकाचीं नांवें फडणीस, मजुमदार, अशीं होतीं तींच चालत. सरदार लोकांस किताब बहुत होते. विश्वासराव हा किताब सुपेकर पवारास होता. झुंझारराव, सरजेराव, घोरपडे, नामजाद हा किताब खानवेलकर व माणकर यांनीं कोंकणप्रांत सर केला, त्यांस आहे. शिवाय रणनवरे, फांकडे, सरखेल, तरवारबहादुर इत्यादि शेंकडों किताब होते व त्या किताबांचे लवाजिमे होते. आतां सरदारांपैकीं बहुत प्रसिध्द आहेत. तसेंच मुत्सद्द्यांपैकीं, रामशास्त्री न्यायाधीश, नारोबाबाजी नगरचे सरसुभे, नारो आपाजी पुण्याचे सुभेदार, विसाजीपंत लेले वसईचे सुभेदार, रामाजी महादेव साष्टीचे सुभेदार, इत्यादिकांची कीर्ति अद्याप चालत आहे. अहिल्याबाईनें स्वतां ४० वर्षें राज्य केलें व तिच्या शब्दास श्रीमंत पेशवे, शिंदे, भोसले, सर्व मानीत व भिल, कोळीदेखील तिला आई समजत. याजरून त्याकाळीं लोक अगदीं वाईट होते, अशी कितिएकांची समजूत आहे ती अशुध्द आहे असें समजावें. पेशवाईचे अखेरीस मात्र बाजिरावाचा अंमल झाला, त्यांत वीस वर्षेंपर्यंत सतत दंगे, वंडें, काळ, अवर्षणें पडून मुलुख उजाड झाला व गांवचे गांव वेचिराख झाले. वीस वर्षेंपर्यंत सरकार नाहींसें झालें. दफ्तर, फड वगैरे सर्व कचेऱ्या बंद पडल्या, आणि भट व बायका यांचा गोंधळ माजला, ही गोष्ट खेरीज. परंतु या दुष्टत्वाचे पूर्वी मराठी राज्य फार आबादान होतें व दक्षणेंत द्रव्य फार होतें. अस्तु. देशांत प्रसिध्धपणा पावण्याचीं स्थलें असलीं पाहिजेत. विलायतेंत पार्लिमेंट आहे तें तसेंच स्थल आहे. सांप्रत या देशीं असें स्थल नाहीं. ही एक मोठी कमताई आहे. आतां कोणी म्हणतील कीं, फडाप्रमाणें हल्लींचीं कोडतें आहेत, त्यांत वकिली करून प्रसिध्ध व्हावें. वैद्यशाळा आहेत त्यांत विद्या करून डाक्टर व्हावें. इंजनियर शाळा आहेत त्यांत शिकून सरवेर व्हावें व व्यापार वाढला आहे त्यांत द्रव्य मिळवून प्रसिध्ध व्हावें. कायदेकौंसल आहे त्यांत भाषणें करून प्रसिध्ध व्हावें. तसेंच धारे कमी झाल्यामुळें व महागाईमुळें कुळास मिराशी जाहगिरीप्रमाणें झाल्या आहेत त्यांत त्यांनीं स्वस्थ असावें. त्यास हें सर्व खरें आहे. यास आम्ही वाईट म्हणत नाहीं, व हीं सर्व ठिकाणें फार योग्य आहेत; परंतु त्यांत समाश व प्रतिष्ठा फार होते असें आम्हांस वाटत

नाहीं. याकरितां मोठी प्रतिष्ठा वाढेल व बहुतांचा गुण दिसोन येईल असें साधन कांहीं-तरी अवश्य पाहिजे. त्याशिवाय उमेदवाराची तृती होत नाहीं. लक्षावधी लोक आहेत हे हल्लीं मुकाट्यानें उगीच चोरासारखे बसले आहेत. यांणीं कोठें व कोणत्या कामांत प्रसिध्ध व्हावें ?

[नंबर १७८]

मोलग्रान दागिने

मुळीं या देशांत सोन्यारुप्याचे दागिने घालण्याची जी रीति पडली तिचें कारण शोधितां असें दिसतें कीं, देश सुपीक असल्यामुळें खाऊनपिऊन माल लोकांचे शिलकेस पडूं लागला व तो माल विकून सोनें, रूपें मिळूं लागलें. तेव्हां त्याचें मुख्य कर्तव्य काय ? हें लोक न समजून व संग्रहाची इच्छा तृप्त व्हावी म्हणून त्याचीं अलंकार-भूषणें करूं लागले व तेणेंकरून शरीरास शोभा आहे असें मानूं लागले. पुढें त्यांतच प्रतिष्ठा, लौकिक अभिमान इत्यादि गैरसमजुती शिरल्या व दागिन्यांचें मान इतकें वृध्दिंगत झालें कीं, त्यास मर्यादा नाहींशीच झाली. आतां दाहा रुपयांचे दागिने होतात, व शंभराचे होतात, हजाराचे होतात, लक्षाचे होतात, व शंभर लक्षांचेही होतात. याप्रमाणें जो दागिने करण्यास इच्छितो, त्याची मिळविण्याची शक्ती दागिने करण्याच्या आकारास पुरत नाहीं. येथपर्यंत मजल येऊन बसली आहे व येणेंकरून द्रव्याची वृध्धी होते ही गोष्ट लोक विसरले आहेत. कोणी म्हणतात कीं, बायकांस तर अवश्य दागिने असावे. कोणाचें मत असें आहे कीं, परिमित द्रव्य दागिन्यांकडे खर्च करावें. कोणी म्हणतात कीं, अगदीं शोभा व भूषण टाकिलें तर मग मनुष्यास जन्मास येऊन उपभोग नाहींसा होतो. कोणी म्हणतात कीं, पुरुषांनीं मात्र दागिने घालूं नयेत. अशीं अनेक मतें आहेत, व त्याप्रमाणें वर्तणुकीही लोकांमध्यें आढळतात. कोणी थोडे दागिने करतो. कोणी बायकांस मात्र देतात, स्वतः घालीत नाहींत व कोणी सुंदर भूषणें मात्र धारण करितात; परंतु याविषयीं विचार केला तर असें दिसतें कीं, शरिरास झांकणारीं व आरोग्य करणारीं अशीं वस्त्रें व निर्वाहाचे पदार्थ, यांची मात्र गरज आहे. आतां एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, सुंदर पदार्थ, घरांतील शोभेचे पदार्थ किंवा उपयोगी पदार्थ यांस आम्ही दागिन्यांत धरीत नाहीं. म्हणजे उंचीं वस्त्रें, गजनी, किनखाप, शालजोड्या, मलमल व कलाबतू वगैरे पदार्थ यांविषयीं कांहीं बोलत नाहीं. मुख्यत्वेंकरून सोनें, रुपें, जवाहीर यांचे पुष्कळ दागिने करून जें बहुत द्रव्य निरुपयोगी व हानीस पात्र करून ठेवितात, त्याविषयीं मात्र हा आजचा विचार आहे. आतां

जुन्या काळीं ही चाल पडली तेव्हां द्रव्याचा उपयोग लोकांस ठाऊक नवता व द्रव्य संरक्षणास विश्वासू पेढ्या, दुकानें व कारखाने नवते. म्हणून ही द्रव्यसंग्रहाची एक चमत्कारिक रीति निघाली. ज्या दागिन्यांविषयीं निषेध करावयाचा त्या वर्गात सोन्याची कडीं, सरी, तोडे, गोठ, गोफ, चंद्रहार, लफा, तनमणी, शिरपेंच, तुरे, कलगी इत्यादिकांचा निर्देश होतो. अगदीं अडाणी व भिकारी जे लोक महार, भिल्ल, चारण, लमाण इत्यादि तेही आपल्यास द्रव्य मिळत नाहीं म्हणून कवड्या, गुंजा, राळेचीं खोटीं पोवळीं इत्यादिकांचे दागिने करतात. याजवरून मनुष्यास दागिने करण्याचा मनापासून उल्हास आहे, असें दिसतें. जंगली व रानवट लोक याप्रमाणें करितात. तेव्हां श्रीमंतांस सोनें व मोत्यें मिळूं लागलीं म्हणून तेही दागिने करूं लागले. त्यांत राजे-रजवाडे, हे मौल्यवान गाद्या, सिंव्हासनें व मुकुट घालूं लागले. याजवरून दागिन्यांच्या अनुक्रमानें मनुष्यांचे पदवीचा निर्देश होऊं लागला; परंतु या कामांत रानवट लोक व श्रीमंत लोक हे दोघेही सारखेच अज्ञानी आहेत. दागिन्यांची हौस ही केवळ मूर्खपणाची प्रवृत्ती आहे. द्रव्याचा उपयोग वृध्धी, आणि मनुष्याचा उपयोग ज्ञान-संपादन, याहून दुसरा कांहीं आहे असें दिसत नाहीं. मग द्रव्याची वृध्धी खुंटविणें आणि मनुष्यास धातूंनीं शोभा देणें हें केवळ क्षुद्रबुध्धीचें व अज्ञानाचें काम आहे. नरदेहास ज्ञानावांचून कांहीं शोभा नाहीं, आणि त्या ज्ञानाचा उपयोग लोकांचे हिताकडे करावा, याहून दुसरें कांहीं कर्तव्य नाहीं. तेव्हां या मनुष्यदेहास अलंकारांनीं शोभा येते हें म्हणणें निरर्थक दिसतें व मनुष्यास याविषयीं मोठी भ्रांती आहे. दागिने वापरल्यानें झिजून नुकसान होतें, व्याज बुडतें, पोराबाळांचे अंगावर घातल्यानें हलके लोक व चाकर यांस दुर्बुध्धी होऊन चोऱ्या, खून व अपघात होतात. ज्याजवळ दागिने राहातात, त्यास मोठी जबाबदारी व प्रतिबंध उत्पन्न होतो, त्यास प्रवास होत नाहीं. त्याच्यानें घर सोडून जाववत नाहीं व त्याचे कुटुंबांत उद्योग वाढत नाहीं. अशा नाना प्रकारच्या अडचणी येतात. शाहणपण व विद्या संपादावी; शेत, बाग, घरें, व्यापार, जमीनी, दुकानें वगैरे वाढावीं हींच मनुष्याचीं भूषणें आहेत. तसेंच राष्ट्राची खरी संपदा म्हणजे आपले दर्या-किनाऱ्याचीं बंदरें चांगलीं असावीं, तारवें असावीं, जमीनीची पुष्कळ लागवड व्हावी; झाडें, तळीं, पूल, वाटा, अधिक व्हाव्या; युध्धाची सामोग्री देशांत विपुल असावी; कोणी शत्रू उभा राहिला तर त्याचे पराभवार्थ सर्व साहित्य पुरविण्याचें सामर्थ्य असावें ही होय; आणि हीं संपदा सोडून ज्यांणीं द्रव्याचे संग्रह दागिन्यांचे द्वारानें केले त्यांचे ते खजिने चोर व जबरदस्त यांचे मात्र उपयोगीं पडले, असें इतिहासावरून दिसेल. महमुद गिजनवी आला त्याणें सोमनाथाची मूर्ती फोडून कोट्यावधी द्रव्य नेलें व नादरशाहा आला त्याणें दिल्ली लुटली. याप्रमाणें जो जबरदस्त झाला त्याचे हातीं या देशांतील सर्व मालमिळकत मागें गेली व पुढें जाणार आहे असें वाटतें. याचें कारण देशांत खरी संपदा नाहीं. एकंदर सर्व देशावर या दागिन्यांपासून जो परिणाम झाला आहे तो लक्षांत

आणिला तर फार भयंकर दिसतो, तितका एक व्यक्तीवर दिसत नाहीं. मोठाल्या व्यापाराच्या मंडळ्या व मोठे व्यापार व मोठीं कामें होण्याचें सामर्थ्य या देशांत राहिलें नाहीं, कारण बहुतेक संपदा सोन्यारुप्यांत गुंतून पडली. लक्ष्मी असून तिचा उपयोग नाहींसा झाला. विलायतेंतील लोकांचे भांडवलानें हजारो कोश आगगाड्या झाल्या, तारायंत्रें झालीं, शिवाय विलायत इतकी दूर आहे ती नगरभिंगाराप्रमाणें सुलभ झाली. अशीं कामें इकडील श्रीमान लोकांच्या दौलती भरीस घातल्या तरी होणार नाहींत. फार दूरचा दृष्टांत कशास? गायकवाड, शिंदे व होळकर हे जे एतद्देशीय मुख्य राजे यांजपासून त्यांचें सर्व द्रव्य घेतलें तरी त्या योगानें शंभर कोश देखील आगगाडी होणार नाहीं; किंवा १० आगबोटी होणार नाहींत. फार झालें तर या राजांजवळ पन्नास लक्षांचे किंवा कोट रुपयांचे दागिने असतील, परंतु कोट रुपयांनीं पुण्यापासून नगरापर्यंत देखील आगगाडी येईल न येईल, इतका सुमार आहे. जें काम युरोपांतील राजांच्यानें होणार नाहीं, तसेंच हिंदुस्थानचें आपलें इंग्रज सरकार कर्जभरू आहे, त्याच्यानेंही होणार नाहीं, तें काम हल्लीं विलायतेंतील रयत लोक करितात. म्हणजे कोणी ५००, कोणी हजार रुपये, याप्रमाणें लक्षावधी भाग विलायतेंतील साळीमाळी देखील घेऊन द्रव्याचा पुरवठा करितात. त्यामुळेंच हीं मोठालीं कामें होतात. जर हिंदुस्थानांतील प्रजेप्रमाणें दागिने घालणारी प्रजा इंग्लंडासारखे लहान देशांत असती तर त्या देशांतील जाहाजें व आगबोटी समुद्रावर चार्‍ही दिशेस न फिरत्या, व कंपनीसरकार हिंदुस्थान न जिंकतें. विलायतेंत दोन कोट बंदुका पाहिजे असल्या तर एक महिन्यांत मिळतील. शिवाय दारूगोळा वगैरे सामोग्री मिळेल व लढाईचें कारण पडल्यास सर्व प्रजा हत्यारबंद होऊन पांच लक्ष सैन्य उभें राहील, आणि मोठा पर्वत पुढें असला तर त्यास जमीनदोस्त करील, व हुकमाबरोबर १०० आगबोटी पाहिजे तेथें रवाना होतील. हें सामर्थ्य कशानें वाढलें आहे म्हणाल तर द्रव्याचे चांगले उपयोगानें वाढलें आहे. त्यांनीं आपल्याचसारखे सोन्यारुप्याचे ढीग करून ठेविले असते तर हें कोठून घडतें, व हजारो कोशांवरून इंग्लिश लोक येथें येऊन आपले सहस्रपट प्रजेवर अंमल कसा करते? भरगच्च गाशावर बसून घोड्यास सोन्यारुप्यानें शोभवणारा आणि हातांत कडीतोडे घालून तुरे लावणारा शिलेदार कुडतीदार शिपायाच्या मूठभर दारूनें क्षणांत गारद होतो. मग अलंकाराची शोभा बरी किंवा कुडतीचा उपयोग बरा, हें सहजच ध्यानांत येतें. आतां यांत कोणी सद्दी म्हणतात, परंतु असें म्हणणें मूर्खपणाचें आहे. त्यांत या देशांत जिकडे तिकडे रयत शाहाणी झाली नाहीं, दाहादाहा कोशांत शाळा नाहींत, चांगले पंतोजी नाहींत. औषधें देण्याचें कारखाने नाहींत, चांगले वैद्य नाहींत, वाटा नाहींत, हजारों नद्यांवर पूल नाहींत. लोक अज्ञानी आहेत, अशी स्थिती या देशाची असतां त्या कामास द्रव्य न लावतां सोन्यानाण्याचे ढीग करून ठेविले तर त्यास शाहाणपण कोण म्हणेल? वास्तविक म्हटलें तर राजांनीं मुगुट-सिंहासनें देखील

धारण करण्याचें कारण नाहीं. कोणत्याच डौलाचे कामांत द्रव्य बुडऊं नये. सर्व काळ द्रव्याची उपयोगी कामांत वृध्धी करावी म्हणजे प्रजा सुखी होते. सर्वांचें द्रव्य कामीं पडोन मोठे व्यापार व मोठ्या पेढ्या व मोठे कारखाने निघतील तर उद्योग वाढतील. कोणी रिकामे बसणार नाहीं. कोणास प्रपंचाची काळजी राहाणार नाहीं, व श्रीमंताची श्रीमंती राहून हेंही घडेल. या देशांत कोलंबस झाला नाहीं. आगगाडी किंवा सुताचीं यंत्रें करणारे किंवा द्वीपाचे शोधक किंवा विजेचे गुण जाणणारे झाले नाहींत असें लोक म्हणतात, पण याचें कारण जाणत नाहींत. पाहा कीं, गळ्यांत मोत्याची कंठी घालून किंवा शिरपेंच लाऊन कोलंबस होईल कां? जडावाचा हार घालून द्वीपाचा शोध लागेल काय? कडींतोडे घालून आगगाडीचें यंत्र व टंकसाळ रचतां येईल काय? फार झालें तर तशा साधनानें तो गोंधळी किंवा नाटक करण्याच्या उपयोगी मात्र पडेल. परंतु अशा लोकांची वृध्धी पुष्कळ झाली आहे, आणि अद्भुत पराक्रमी मात्र नाहींत. रांडेसारखे नटणारे यांच्यानें ग्रंथ, विद्या, पराक्रम, हीं कोठून होतील बरें? आणखी सुधारणेचा इतका प्रतिबंध होऊन ते दागिने तरी सर्वकाळ राहिले आहेत काय? नाहीं. एका पिढीनें करावे व दुसऱ्या पिढीनें ते विकावे अगर गाहाण टाकावे. कोणाचे दागिने कायम राहिले आहेत? मोठे मोठे पराक्रमी राजांचे वंश मूर्ख निघोन पदच्युत झाले. व त्यांचे दागिन्याच्या लुटी व लिलाव झाले. मग इतरांची कथा काय? पराक्रम, बुध्धी, कौशल्य यांची वृध्धी द्रव्यानें व्हावयाची ती झाली नाहीं. आमचे सुतार, लोहार, दर्यावर्दी अन्नास माहाग. यांणीं कोणाचे जिवावर कसब वाढवावें? श्रीमंतांनीं तर द्रव्याचे ढीग हातांत, पायांत, गळ्यांत घातले आहेत, आणि या देशांत अजून डोंगरांतून अवघड वाटा पुष्कळ आहेत. अद्यापि दर्याचे काठीं हजारो बंदरें दुरुस्त व्हावयाचीं पडलीं आहेत. अद्याप मुलुख ओसाड फार पडला आहे. अद्यापी भिकारी, अनुद्योगी लोक फार आहेत. अद्यापी हजारांत एक लिहिणार व वाचणार नाहीं. कापड, बिलोर, कागद वगैरे जिन्नस या देशांत विपुल होण्याची सामोग्री आहे, पण द्रव्य नाहीं. सर्व गुजराथभर कांच करण्याची वाळू व खार व दगड आहेत. व आमदाबाद वगैरे ठिकाणीं बिलोरी सामान पुष्कळ होतें, पण तें विलायतेप्रमाणें होत नाहीं. म्हणून हजारो रुपये देऊन विलायती सामान कापड, लोखंड, बिलोर हे विकत घेतात. याचें कारण श्रीमंतांचें चित्त दागिन्यांवर आहे. गुजराथेंत पुष्कळ राजेरजवाडे आहेत व ते जडावाच्या गुडगुड्या करितात, पण विलायती बिलोर कां घ्यावें याचा विचार करीत नाहींत. मग त्यांच्या दौलतीस काय करावयाचें आहे? लोक असें म्हणतात कीं, जळली तरी बरी. कारण असतांना आम्हांस तिचा उपयोग नवताच, मग नसली काय आणि असली काय? त्याचप्रमाणें सिविल सर्व्हिसच्या परिक्षा होतात, त्यांत श्रीमंत लोक शेपन्नास जाऊन परिक्षा देतात असेंही नाहीं. वकिली वगैरेच्या परिक्षा मुंबईंत होतात व त्यांत उमेदवार जातात पण ते कोण? जे अन्नास

महाग झाले, ज्यांस दरिद्र्यानें पीडिलें ते मात्र. श्रीमंत आपल्या दागिन्यांत चूर आहेत. मुंबईचे सावकार जरी आहेत, तरी कित्येक अंशीं ते अल्पदृष्टी आहेत. कोणी दूर दूर जाऊन देशाची वसाहत केली, किंवा जंगल तोडलें असें नाहीं. घराजवळ कांहीं व्यापार असला तर त्यांत मात्र ते पडतात. शंभर कोश लांब त्यांची दृष्ट जात नाहीं. याजमुळें खानदेश, वराड, गोंडवण अद्याप ओसाड आहे. मग ही सर्व वाईट स्थिती करविणारें जें द्रव्य त्याचे ढीग करून शरिरास शोभा येते, असें म्हणावयास तर श्रीमंतांस लाज वाटावी. आणि त्यांनीं आपलें द्रव्य उपयोगास लावावें, व हाच मुख्य धर्म समजून खोटीं भूषणें घालून मिरवूं नये. आपले देशबांधव सुखी होतील हेंच भूषण आहे. दाहा हजार रुपयांच्या हुंड्या घेतल्या आणि त्यांचें गांठोडें करून गळ्यांत बांधिलें तर कोणी शोभा म्हणेल काय? नाहीं. तसेंच सोन्याविषयीं आहे. सोनें वळिवतां येतें व घडतां येतें. म्हणून त्याच्या दोऱ्या करून गळ्यांत अडकविल्या तर त्यापासून शोभा कशी येईल? सोनें, रुपें हें फक्त मोबदल्याचे उपयोगी आहे, व ज्याप्रमाणें दगडमाती खणून काढतात त्याप्रमाणेंच खाणींतून या धातू काढितात. जशी हुंडी पतीवर चालते त्याचप्रमाणें हें स्वतांचे पतीवर चालतें. तर त्याचा व्यापारांत उपयोग होईल तो करावा. देशांत उद्योग व व्यापाराची वृध्धी करावी, हाच मुख्य द्रव्याचा उपयोग आहे. जसा धान्याचा उपयोग भक्षण तसाच द्रव्याचा उपयोग व्यवसाय; तो सोडून लोक भलतें करितात, हा चमत्कार होय. असें मनांत आणा कीं, शंभर खंडी तांदूळ पसरून त्यांजवर बिछाना टाकावा अशी चाल घरोघर असती, तर गरीबगुरीब दोनचार मण तरी आपले बिछान्याखालीं घालता, आणि असें झाल्यापासून किती धान्य व्यर्थ गेलें असतें? तसेंच दागिने करण्यानें कोट्यावधी रुपये घरोघर पडून राहिले. जो गळ्यांत घालतो त्यास मात्र काय थोरपणा किंवा भूषणाचा भ्रम होत असेल तो असो, किंवा कांहीं नाहीं. या हिंदुस्थानचे लोकांस त्यांत मुख्यत्वेंकरून श्रीमंत लोकांस मोठी अवदशा जी आहे, ती याच चालीची आहे. या चालीनें त्यांस डोळे असून नसल्याप्रमाणें केलें आहे. पाय असून पंगू केलें आहे; हात असून थोटें केलें आहे व अक्कल असून वेडें केलें आहे; कारण त्या द्रव्याचा उपयोग घडत नाहीं. एक द्रव्याचा आधार नाहींसा झाला म्हणून सर्व प्रकारानें ते अशक्त झाले, व केवळ वैधव्य अवस्थेंत आले व यांच्या विद्या, कला, व्यवसाय वाढावयाचे बंद पडले. ज्योतिष, वैद्यक वगैरे शास्त्रें ५००० वर्षांमागें जेथपर्यंत आलीं, तेथेंच तीं आहेत. पुढें तिकडे व्यय व्हावा तो जडावाचे दागिन्यांत राहिला आणि त्या जडावाचे दागिन्यांनीं सर्व राष्ट्रभर रांडांची स्थिती पुरुषांस आणिली. ते जातीचे मात्र पुरुष आहेत, पण पराक्रमानें या देशांत कोणी पुरुष आहेत असें दिसत नाहीं. ज्या दुष्ट व घातक चाली आहेत, त्यांजवर शत्रुत्वाचें कटाक्ष उचलण्यास देखील सामर्थ्यवान कोणी नाहीं. सर्व माना खालीं घालून दुष्ट चालींचीं ओझीं डोकीवर घेऊन चालले आहेत. तेव्हां

असल्या लोकांस पुरुष म्हणावें तर शब्दाचा व्यभिचार होतो; व्याकरणकर्ते यांनीं एकच लिंग कल्पिलें असतें तर बरें शोभतें, किंवा एकच पोशाख असता तरी सांप्रतचे स्थितीस मेळ चांगला पडता. अस्तु. या दुष्ट चालीपासून अनर्थ किती झाले आहेत ? किती उद्योग राहिले आहेत ? किती व्यापार बुडाले ? किती जमीनी ओसाड पडल्या ? किती ठिकाणीं पाणी नाहीं ? किती लोकांस पोट भरण्याचा मार्ग नाहीं ? किती रोगी औषधावांचून मरतात ? किती विद्येवांचून जन्मास येऊन फुकट मेले. अरेरे ! देशांत सर्व द्रव्य जर या कामास लावते, तर या सर्वांची कांहींतरी बरी गति होती. देशांतील लोकांस सामर्थ्य येतें. त्यांची शक्ती व पराक्रम व गौरव वाढता. पण तें कांहीं झालें नाहीं. तेव्हां हे दागिने किती मौल्यवान आहेत बरें ? आतां या देशांतील बरेंच द्रव्य जें विलायतेस जातें, त्याचे मोबदला पुनः आगगाडी, तारायंत्रें, तारवें वगैरे स्वरूपानें तें परत येतें. या देशांतील लोक हें न करीत, म्हणून इंग्रज सरकार ईश्वरानें हें करण्यास योजिलें आहे, असें म्हटलें तरी चिंता नाहीं. इकडील हिरे, जवाहीर, सोनें वगैरे जाऊन त्यांचे उपयोगी पदार्थ घडून इकडे येतात; तेव्हां आमचा दागिने करण्याचा स्वभाव मोडण्यास हे मोठे गुरूच देवानें निर्माण केले आहेत, म्हणून असें झालें. त्यांचे बुध्धीकौशल्यानें पेढ्या, दुकानें व कारखाने होत आहेत, नवीन उद्योग निघतात, व्यापार वाढतो, द्रव्याची वृध्धी होते, देशभर आबादानी पसरत चालली आहे. नवीन प्रांतांची वसाहत होत चालली आहे. नवीन देश माहीत होऊं लागले आहेत. नवे व्यापार निघाले व कंपन्या निघाल्या; परंतु हें सर्व अद्याप इंग्रज लोकांचे पुढारीपणानें होत आहे. आमचे देशांतील लोकांस तत्संबंधीं मर्म समजलें नाहीं व दागिन्यांची चाल सर्वथैव घातकी आहे, असा ठसा त्यांचे मनावर अजून उठला नाहीं. तथापि क्रमाक्रमानें हें सर्व होईल असें वाटतें. अस्तु. दागिने नाहींसे झाले म्हणजे देशाचें भाग्य गेलें, असें जुने लोक समजतात, परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं. ही केवळ दुष्टपणाची व अधर्माची चाल आहे यांत संशय नाहीं.

[नंबर १७९]

संगीतशास्त्र

ईश्वरनिर्मित जे स्वर आहेत त्यांची सयुक्तिक रचना करून कर्णेंद्रियास आणि अंतःकरणास प्रिय वाटावें, अशी केली. जी योजना तें संगीत व त्यासंबंधीं जें शास्त्र तें संगीतशास्त्र. मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, सुस्वर त्यास प्रिय आहेत. जसे गोड पदार्थ, नरम वस्त्रें, सुरेख रचना, इत्यादि इंद्रियांस प्रियकर आहेत, तसेंच कर्णेंद्रियांस

स्वरही प्रिय आहेत; आतां ते कां प्रिय आहेत, अशी कोणी पृच्छा करील तर त्याचें उत्तर इतकेंच कीं, कान आहेत म्हणून. कितिएक पुरुषांचे कर्ण स्वरज्ञ असतात व कितिएकांचे कर्णांमध्यें हा गुण कमी असतो. एक शिकणारा दोन महिन्यांत वीणा लावावयास लागतो आणि कोणी ५ वर्षें ऐकत असला तरी स्वरभेद समजत नसल्यामुळें वीणा लाऊं शकत नाहीं. असा हा स्वाभाविक गुण आहे. सर्व जग स्वरांनीं भरलें आहे, आणि मनुष्याच्या कंठामध्यें स्वर करण्याची शक्ती ईश्वरानें ठेविली आहे; परंतु जे पुरुष विद्वान झाले त्यांणीं स्वरांची अधिक प्रीति वाढावी अशा धोरणानें त्यांची योजना करण्याविषयीं नियम बांधले आहेत व त्याप्रमाणें स्वर काढले असतां ते अधिक चांगले वाटतात. पक्ष्यांमध्येंही कितिएक प्राणी स्वाभाविक मधुर स्वराचे असतात; आणि कितिएक गाढवासारखे वाईट स्वराचे असतात. मनुष्यांमध्यें स्त्रियांचे स्वर मधुर असतात व पुरुषांचे गळे जाणतेपणीं फुटतात, तो दोष स्त्रियांचे ठिकाणीं नाहीं; परंतु वृध्धापकाळीं मात्र त्यांचे गळे घोगरे होतात. मनुष्यास स्वाभाविक सुस्वराची भक्ती आहे. म्हणून सभेंत, देवळांत, यज्ञांत, लढाईंत, शेतांत, नांव चालविण्याचे समयीं ते यांचा प्रयोग करितात. आई लहान मुलांस निजविण्याकरितां देखील गायनास आरंभ करून ओव्या म्हणते. दळणाचे समयींही ओव्या म्हणतात. आतां याचा चांगलेपणा किंवा वाईटपणा हा ज्याचे त्याचे ज्ञानावर आहे. जुन्या काळीं नारादादि सत्पुरुष आणि सरस्वती, जांबुवतीसारख्या स्त्रिया गायनांत प्रविण होत्या व पद्मपुराणांत एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं,

यथा नयंति रागास्ते नरं गायनकोविदं ॥
तथा नयति कैलासं न गंगा न सरस्वती ॥ १ ॥

अर्थ—गायनजाणत्या पुरुषास राग जसे उत्तम लोकाप्रत नेतात तसे कैलास, गंगा, सरस्वती हीं नेत नाहींत. संगिताचे मुख्य भेद तीन दिसतात :—

१ धर्मसंबंधी, २ सभासंबंधी, ३ युद्धसंबंधी.

धर्मांत गायन घेण्याचे प्रयोजन असें आहे कीं, ईश्वराची कृतज्ञता प्रकट करणारीं त्याचीं स्तोत्रें व बोधवचनें आणि नीति व सुबुध्धी उत्पन्न करणारीं वाक्यें हीं मनावर ठसविण्यास व त्यांचा वारंवार दुःख न होतां उच्चार व्हावयास, गायन हें मोठें साधन आहे. आतां दुर्जन कवींनीं दुष्ट कविता करून तिचा प्रयोग गायनांत केला तर ही लोकांची चूक आहे. परंतु अशा संसर्गानें गायनशास्त्रास दोष येत नाहीं. युरोपांतील विद्वानांनीं स्वर लिहिण्याची युक्ती काढली आहे. तशी युक्ती योजून आपणांसही गायन लिहितां येईल, परंतु आपले देशीं अजून तसा प्रचार झाला नाहीं. सांप्रत गायन परंपरेच्या संबंधानें चाललें आहे. आणि या देशांत लेखापेक्षां घोकणीचा उपयोग करितात. आमचे वेदशास्त्र सर्वच घोकून परंपरेनें चालतें, म्हणून त्याचप्रमाणें गायनही चालत आहे

आमचे इतिहास दंतकथेंत आहेत, बखरींत नाहींत. त्या मानानें गायनही आहे. अस्तु. आतां पुरातन गायन बहुतकरून बुडालें व मुसलमानांचे राज्यांत उडदु भाषेंत कविता झाल्या त्यांजवरच बहुतकरून हल्लीं गायन चाललें आहे, आणि नारदादिकांस विसरून गायकलोक तानसेनास या विद्येचा गुरु मानितात, हा एक चमत्कार आहे.

स्वर उत्पन्न करण्याचीं साधनेंच चार आहेत व त्यांच्या योगें बहुत वाद्यें उत्पन्न झालीं आहेत. त्यांतून प्रस्तुत माहित आहेत, त्यांची नांवनिशी येणेंप्रमाणें—

तंतुवाद्यें

१ वीणा.
२ बीन.
३ रुद्रवीणा.
४ सारंगी.
५ सारमंडळ.
६ सतार.
७ एकतारी वीणा.
८ ताडस.
९ सराद.
१० रबब.
११ तंबुरी.
१२ मद-मंडळ
१३ तुंतुणें.

चर्मवाद्यें

१ मृदंग.
२ तबला.
३ डफ.
४ खंजिरी.
५ नौबत.
६ तासा.
७ मर्फा.
८ चौघडा.
९ डंका.
१० ढोलकी.

कंठवाद्यें

१ पावा.
२ अलगुजें.
३ कर्णा.
४ शिंग.
५ शंख.
६ सनई.
७ शीळ.
८ चंग.

हस्तवाद्यें

१ झांज.
२ टाळ.
३ जलतरंग.
४ चिपळ्या.
५ करताळ.
६ घुंगरू.
७ घागरी.
८ घंटा.
९ तास.

यांत सभेंत गायनाचा प्रकार वेगळा, युद्धांत वेगळा, असे अनेक प्रकार आहेत. युरोपांत अशी चाल आहे कीं, ज्यास व्याकरण, संगीतशास्त्र, काव्य, अलंकार, इतिहास, छंद या विषयांचें ज्ञान नाहीं, त्यास फार हलका मानितात. याजवरून जो सुशिक्षित म्हणविण्यास इच्छितो, त्यास या शास्त्राची माहिती असली पाहिजे हें उघड आहे. नृत्य ही एक गायनशास्त्राचे पोटांतील ताल धरण्याची विद्या आहे. कोणी हातानें किंवा

मृदंगवाद्यानें ताल साधितात. आणि कोणी नृत्यांत पायानें ताल साधितात. त्यांत गती कल्पिल्या आहेत. त्यांचे अनुरोधानें तें शिकावें लागतें व त्यास तांडव इत्यादि नांवें आहेत.

संगीतशास्त्रकारांनीं स्वरांचे सात भेद केले आहेत. म्हणजे कोणताही स्वर असला तरी या सातांपैकीं एका वर्गांत आणितां येतो. व्याकरण करणारांनीं शब्दांच्या जशा पांच जाति कल्पिल्या आहेत, म्हणजे कोणताही शब्द असला तरी त्या पांचापैकीं एकांत जातो, तसाच सप्तस्वरांपैकीं कोणत्या एकांत हरएक स्वराचा समावेश होतो. या वर्गांचीं नांवें—

मूळस्वर	अपभ्रंश	संक्षेप
१ षड्ज.	खरज.	सा.
२ ऋषभ.	रीखाव.	री.
३ गांधार.	गंधार.	ग.
४ मध्यम.	मधम.	म.
५ पंचम.	पंचम.	प.
६ धैवत.	धैंवत.	ध.
७ नीषाद.	नीस्वाद.	नी.

हे वर्ग बांधल्यानें स्वरांची योजना करण्यास सुलभ पडलें आहे. या वर्गमाळेस ग्राम असें म्हणतात. याचे पोटांत मूर्छना व श्रुती म्हणजे ताना आहेत आणि तीव्र कोमल हा भेद आहे. याजमुळें तीन ग्राम होतात व त्यांचे योजनेचे कामांत कांहीं स्वर वर्ज करितात. आणि त्या योजनेचें नांव राग असें होतें. हा स्वरसमुद्र फार मोठा आहे. त्यांत त्याच्या योजना अनेक करितां येतील. म्हणजे जितके स्वराभिज्ञ पुरुष होतील तितके नवीन राग उत्पन्न करतील, परंतु असे सर्व नसतात. म्हणून मागाहून ठरविलेले पद्धतीनें लोक गात असतात. त्यांपैकीं मुख्य साहा रागांचीं नांवें—

१ भैरव.	३ नाट.	५ गौडमालव.
२ पंचम.	४ मल्हार.	६ देशाख.

याचे पोटीं अनेक आहेत. त्यांचीं नांवें :—

१ अनंदबहिरवी.
२ आभावरी.
३ आहंग.
४ कल्याण (याचे १२ भेद)—
  १ दीपकल्याण.
  २ यमनकल्याण.
  ३ हमीर.
४ शुद्ध.
५ कमोद.
६ भूप.
७ मोहम.
८ पूर्व्या.
९ शोभ इ०

५ कानडा–
१ बागेसरी.
२ अडाणा.
३ दरबारी.
४ मियाचा इ०
६ काफी.
७ कांबोध.
८ कालंगडा.
९ केदार (८ भेद)–
१ संकरभरण.
२ खमाज इ०
१० खट.
११ गांधार.
१२ गारा.
१३ गुजराथी.
१४ गुणकारी.
१५ गौडी.
१६ जंगला.
१७ जयजयवंती.
१८ जोगी.
१९ झिंझुटी.
२० तोडी (१८ भेद)–
१ देशी तोडी.
२ मियाची तोडी.
३ जिवनपुरी तोडी.
४ बरारी.
५ बंगाली इ०
२१ देस.
२२ नाट (१२ भेद)–
१ छाया नाट.
२ हमीर नाट.
३ केदार नाट.
४ शुध्ध नाट इ०
२३ परज.
२४ पिलू.
२५ पूर्वी.
२६ बसंत.
२७ बहिरवी.
२८ बिअल.
२९ बिलावल (९ भेद)–
१ कोक बिलावल.
२ अलैया.
३ सरपर्दा इ०
३० ब्याहाग.
३१ भौपाली.
३२ मल्हार (९ भेद)–
१ सुद्.
२ गौड.
३ मद्य.
४ देशी इ०
३३ मालकौंस.
३४ माळवा.
३५ मुलतानी.
३६ यमन.
३७ रामकली.
३८ ललत.
३९ लिलारी.
४० वसंत.
४१ वराटी.
४२ विभास.
४३ शंकरा.
४४ श्री (१२ भेद)–
१ मालवश्री.
२ ललताश्री.
३ धनाश्री.
४ धवलश्री.
५ जयताश्री इ

४५ शंकराभरण.
४६ सारंग. (८ भेद)–
१ गौडसारंग [इ०].
४७ सिंदी.
४८ सुवा.
४९ सोरट.
५० सोहनी इ०

यांत राग, रागिण्या, जिल्हे, बाहार असे भेद आहेत. हे राग स्वरांचा निबंध सांगतात, परंतु ते कांहींतरी वाक्य घेऊन त्याचा आधार करून काढतां येतात. म्हणून टप्पे, ख्याल, धृपदें, प्रबंध, पदें, ठुमरी यांचें त्यांस साहित्य लागतें. निदान श्लोक तरी पाहिजे. सुराचें ज्ञान ज्यास चांगलें आहे तो अभंग देखील रागांत म्हणतो आणि तालही साधतो. गाणाऱ्यामध्ये दोन पक्ष आहेत. एक कवाली आणि दुसरे धृपदी. या शास्त्राचे जे नियम आहेत, त्यांस रक्षून गाणारा कसा गातो हें समजण्यास त्या शास्त्राची गती पाहिजे. म्हणजे गवई गात असेल किंवा वाद्य वाजविणारा वाजवीत असेल, तेव्हां त्यामध्यें संकटाचीं जीं स्थळें आहेत, त्यांतून तो कसा पार पडतो हें ज्यास ओळखतां येतें त्यास विशेष आनंद होतो व हें न समजणारास स्वरापासून काय वाटेल तितकाच आनंद. गायन समजणाऱ्यास तालही समजला पाहिजे. त्याचा अवसानकाळ आणि मध्य हे जाणले असतां त्याचेमध्यें ताना वगैरे घेऊन पुनरपि गवई मध्याचे ठिकाणीं येऊन मिळतो हें मोठें कसब आहे. [तें] बहुत अभ्यासानेंच येतें. आतां याविषयीं एक सांगण्याचें राहिलें तें असें कीं, राग जे आहेत ते मनुष्याचे अंतकरणांतील भाव उत्पन्न करण्याचे हेतु योजिले आहेत, म्हणजे कोणी दया प्रगट करितात; कोणी उदासीनता, कोणी लीनता, कोणी संतोष अशा वेगवेगळ्या मनोवृत्तीला वृद्धिंगत करितात, म्हणून त्यांचें नांव राग ठेविलें आहे. आणि त्यांस गाण्याचे कालाचाही निर्बंध केला आहे. आता गाणारे लोक जे आहेत, ते दुर्व्यसनी, कैफी, अमली, असे बहुधा असतात; परंतु हा विद्येचा दोष आहे [असें] म्हणवत नाहीं. हा सहवासाचा दोष आहे. बाकी विद्या केवळ निर्मळ असून हिंदूंनीं इला उपवेदांत धरली आहे व हिंदुस्थानांत ही विद्या बहुत वाढली आहे. ती इतकी कीं, तिची एक एक शाखा शिकण्यास सगळा जन्म पाहिजे. चांगला मृदंग वाजविणें म्हणजे वीस वर्षें अभ्यास केला पाहिजे. तशीच चांगली सतार वाजविणें, सर्व रागांवर मोहरे म्हणजे गती किंवा लहरे व त्यांचे बोल जे आहेत ते, विद्यावंतांनीं घडे करून ठेवले आहेत ते, अनेक ताल आहेत ते, यांची माहिती व मेळ हातास येण्यास एक जन्म त्यांस घालावा लागतो. दोन कर्में एकास येण्यास मुष्किल पडतें. तेव्हां हें पूर्णत्वें होतें कसें? अस्तु. याविषयीं आणखी पुष्कळ खुलासा आहे त्र तो वाचकांनीं माहितगार लोकांपासून समजून घेतल्यास कळेल. याचा गोषवारा मात्र म्हीं सांगितला आहे; पण अशा स्थलीं दुसरें याहून अधिक कांहीं होऊं शकत नाहीं.

[नंबर १८०]

हिंदूंचा जातिभेद आणि सिव्हिल खात्याचे उमेदवार

वृत्तवैभवकर्ते यांस.

विनंती विशेष. आपले मागील पत्रीं 'पूना आबझरवर' कर्त्यानें नेटिव शाळेंत ख्रिस्तियन लोकांस शिकणें योग्य नाहीं, याविषयीं केलेल्या पांडित्यावर आपण आपला अभिप्राय लिहिलाच आहे. त्याजहून माझा भिन्न नाहीं. परंतु असें वाटतें कीं, संपत्ति, वैभव, ज्ञान, इत्यादि ईश्वराचीं देणीं हीं व्यक्तिमात्राचे ठायीं किंवा देशाचे ठायीं वृद्धि पावलीं म्हणजे लीनतेस कारण व्हावीं; पण तीं तशीं न होतां उलटीं अभिमानास व इतरांचे ठायीं नीचत्व कल्पिण्यास कारण होतात, हें मोठें आश्चर्य आहे. आपले इतिहासावरूनही असेंच दिसतें. पहा. वेदांचे ऋषींत शूद्र, निषाद व क्षत्रिय ज्ञातीचे मनुष्य आहेत. परंतु जेव्हां ब्राम्हणांचें वैभव वाढलें, तेव्हां ते आपल्यास भूदेव असें मानूं लागले व आपले चरणांगुष्ठाचे तीर्थानें इतरांस पावन करूं लागले. आणि वेदांचीं सूक्तें ज्यांपासून प्राप्त झालीं त्यांचें वंशज शूद्र, निषाद इत्यादि यांची वेदाक्षरानें जिव्हा विटाळली तर तिचा छेद करावा, असें त्यांनीं ठरविलें. यावरून पाहातां ब्राह्मणांनीं आपणांस जें महत्त्व मानून घेतलें तें हल्लीं जरी उपहासास्पद आहे, तरी त्याच्या उद्भवकाळीं तें हल्लींचे इंग्लिश लोकांचे समजुतीप्रमाणेंच पुष्कळ बलवत्तर असेल, नाहीं बरें ? तस्मात् या जगांत जसें ज्याचें चालेल तसें तो चालवितो, हेंच तात्पर्य दिसतें.

ज्यांनीं कुळपरंपरेनें ज्ञाति स्थापिल्या त्यांचे मनांत इतकेंच असेल कीं, शिक्षेनें मनुष्य पाहिजे तसा तयार करितां येतो. मग परंपरेनेंच वर्ण कां न चालवावे ? आतां मनुष्यास कितीही तरवेज केला तरी उत्तमाचे कुळांत अधम व अधमाचे कुळांत उत्तम निपजतो, ही अलीकडील कल्पना जी आहे ती त्यांस त्या काळीं सुचली नवती असें दिसतें व म्हणूनच त्यांनीं शिक्षेस एवढें महत्त्व मानलें होतें कीं, जशी शिक्षा तसा मनुष्य होईल. शिक्षेनें मनुष्य जसा बनविला तसा होतो. तस्मात् ब्राम्हणांचे परंपरेंत शूद्र व्हावयाचा नाहीं व शूद्रांचे परंपरेंत ब्राम्हण होणार नाहीं हें त्यांचें मत असेल असें वाटतें व कित्येक लोक जरी हें अशुद्ध आहे असें समजतात, तरी सरकारचें सिविलखात्यांत अद्याप हें मत चालूच आहे. पहाः प्रथम विलायतेहून मुलें येतात, पण लागलीच दोन वर्षांनीं थर्ड असिस्टंट, पांच वर्षांनीं सेकंड, सात वर्षांनीं फर्स्ट, अकरा वर्षांनीं कलेक्टर व पंधरा वर्षांनीं जड्ज असा त्यांचा अनुक्रम लागला असतो. यांत मुख्य धोरण हेंच आहे कीं, शिक्षेनें मनुष्य हवा तसा तयार होतो. म्हणून मोठे कामास त्यांपैकीं कोणी अयोग्य असें उदाहरण कधीं निघालेंच नाहीं. बरें आतां अन्यत्र हें मत तपासून पाहिलें तर कसोटीस उतरेल काय ? नाहीं. उतरेल असें

वाटत नाहीं. पहा, जर प्रथम ५ रुपयांस भाडेकऱ्याचें तट्टू घेतलें आणि कसेंही तयार केलें तर तीन वर्षांनीं तें यादीं व्हावें. पांच वर्षांनीं त्याचा भिवरथडी घोडा व्हावा, आणि १५ वे वर्षीं आर्बी घोडा व्हावा, परंतु हें घडत नाहीं, आणि मनुष्यांच्या कृतींत मात्र अशा नेमास सत्यता मानितात. तेव्हां याजवरून इतकेंच सिद्ध होतें कीं, वर्णाचे आणि सिविलखात्याचे उमेदवारांचें मूळतत्त्व एकच आहे. कळावें, लोभ करावा, हे विनंती.

—वाचणारा

[नंबर १८१]

कायद्याची माहितगारी (नंबर १)

वकिलीचें, मुनसफीचें व दुसरें सरकारी काम करूं इच्छिणारे उमेदवारांस असें वाटतें कीं, कायदा म्हणजे सन १८२७ चें बूक. तें पाहिलें म्हणजे कायदा आला व मुनसफ वगैरे अमलदार आहेत त्यांस तर असें वाटतें कीं, कायदा व आक्टें व इंटर-प्रिटिशनें हीं अवगत झालीं म्हणजे सर्व ज्ञान प्राप्त झालें. पण वास्तवीक जे कायद्याचा अभ्यास करणारे युरोपखंडांतील बारिस्टर वगैरे आहेत, त्यांचे समजुतींत हें ज्ञान यत्किंचित, व त्याची योग्यता कांहींच नाहीं. कायदा जाणणें फार मोठें काम आहे. जसा श्राद्धसंकल्प व पुण्याहवाचन पाठ केलेला ब्राह्मण घडघड म्हणत असतो आणि साधारण गृहस्थलोकांमध्यें त्याच्या पुरोहितपणाचा डौल पडतो. परंतु कौमुदी, शेखरपर्यंत व्याकरण, भाषापर्यंत वेद, गदाधरीपर्यंत न्याय, प्रस्थानत्रयपर्यंत वेदांत व सोमापर्यंत श्रौत इतकें पढलेल्या ब्राह्मणाची व गांव-खेड्यांत पंचांग सांगणारा जोशी याची बरोबरी होईल काय ? होणार नाहीं. तद्वत् पोपटासारखे कायदे व आक्टें पाठ करणारे आणि वास्तविक कायद्याचें ज्ञान शिकणारे यांजमध्यें अंतर आहे. तेव्हां एकंदर शिकण्याचीं कलमें तरी किती आहेत हें सांगा, असा प्रश्न कोणीही ऐकून करील त्याचें उत्तर असें—

इंग्रजींत ज्यास *ला* असें म्हणतात, त्यास आल्किडे दरबारी लोकांनीं कायदा असें नांव ठेविलें आहे. पण त्याचा वास्तविक भावार्थ शास्त्र असा आहे. आतां हें शास्त्र कोणतें व यांत विषय कोणते आहेत तें सांगतों.

शास्त्र दोन प्रकारचें आहे. एक ईश्वरोक्त आणि दुसरें मनुष्योक्त. ईश्वरोक्त शास्त्र जें आहे, त्यांत ईश्वरभजनाचे मार्ग व नियम हे सांगितले असतात व त्यांजवर लोकांची अशी श्रद्धा आहे कीं, ईश्वरानें हे लोकांचे कल्याणार्थ सांगितले आहेत. मनुष्योक्त शास्त्र म्हणजे मनुष्यांमध्यें जे सुज्ञ त्यांनीं जो मार्ग घातला आहे तें.

मनुष्योक्त शास्त्रांमध्यें दोन प्रकार आहेत. एक लिहिलेलें शास्त्र व दुसरें देश रिवाज. हे लिहिलेले नसतात; परंतु पूर्वापार प्रसिद्ध आहेत.

पुनः त्याचा दुसरा विभाग असा आहे कीं, स्वराज्यसंबंधीं शास्त्र व परराज्य-संबंधीं शास्त्र.

स्वराज्यसंबंधीं शास्त्र जें आहे, त्यांत राज्यांतील लोकांनीं वागावें कसें, याविषयीं राज्यांतील अधिकारी यांनीं ठराव केलेले असतात. याखेरीज राज्याचा बंदोबस्त कसा असावा, राजाचे अधिकार काय व प्रजेचे अधिकार काय, हें ठरविलें असतें.

प्रजेचे मुख्य अधिकार गणिले आहेत ते तीन :— १ राज्यसत्ता, २ धर्मसत्ता, ३ व्यवहारसत्ता.

राज्यसत्ता म्हणजे राज्यकारभारांत रयतेचें अनुमोदन असणें यांचें नांव राज्यसत्ता. युरोपांतील कितीएक सुधारलेले देशांत राज्यकारभार रयतेचे सत्तेनें चालतो, अशी राज्यरचना केली आहे.

धर्मसत्ता म्हणजे रयतेस आपले इच्छेप्रमाणें धर्म चालविण्याची सत्ता. राज्यांत मुसलमान असले आणि राज्य ब्राम्हणाचें आहे तर मुसलमानांस धर्मसंबंधानें उपद्रव न व्हावा; किंवा खिस्तीयन सरकार आहे आणि रयत लिंगाईत आहे तर त्यास धर्म वेगळा इतक्याच अपराधावरून पीडा करणें होऊं नये. यास धर्मसत्ता म्हणतात.

व्यवहारसत्ता म्हणजे संपूर्ण व्यवहाराचें काम करण्यास मोकळीक असावी व अमुकास अमुक व्यवहार करण्यास प्रतिबंध नसावा. आतां शूद्रानें लिहूं नये हें म्हणणें व्यवहारसत्तेस हरण करणारे आहे. कारण ज्यांस जसें फावेल, तसें त्यानें उपजीवन करण्याकरितां आपले बुद्धीचा उपयोग करावा याचें नांव व्यवहारसत्ता.

या सत्ता प्रजेस पूर्णपणें मिळत असे कायदे करणें याचें नांव शहाणपण. प्रजेच्या या सत्ता ज्या राज्यांत हरण झाल्या आहेत व जेथें बुद्धीचे अंकुर तोडून टाकले आहेत, ती प्रजा वाढावयाची नाहीं व पराक्रमी व्हावयाची नाहीं. जेथें हे अधिकार प्रजेस नाहींत, तीं राज्यें वाईट जाणावीं, व जेथें आहेत तीं राज्यें चांगलीं असें समजावें.

परराज्यासंबंधीं शास्त्र म्हणजे परकी राजांनीं व तेथील प्रजेनें स्वराज्याशीं कसें वागावें, युद्ध करण्याचें प्रयोजन काय, वाजवी कारणांचें युद्ध कशास म्हणावें, गैरवाजवी युद्ध करण्यास प्रवृत्त होतील त्यांचा बंदोबस्त कसा करावा, इत्यादि विचार ज्यांत आहेत तें.

स्वराज्यसंबंधीं शास्त्र आहे, त्यांत राज्यरचनाशास्त्र व व्यापारसंबंधीं शास्त्र, दर्यांतील मोकदम्यासंबंधीं शास्त्र, लष्करी लोकांसंबधीं शास्त्र, दिवाणीप्रकरणीं शास्त्र, फौजदारी प्रकरणीं शास्त्र इत्यादि आहेत.

याखेरीज काम चालविण्याचे रीतीचें शास्त्र, पुरावा घेण्याचें शास्त्र, पक्षकारांनीं बोलण्याचे शास्त्र हीं, वेगवेगळीं आहेत.

आतां शेवटीं लिहिलेलीं तीन शास्त्रें, यांतील पहिलें शास्त्र काम चालविण्यांचें, त्यासंबंधीं हल्लीं दोन ग्रंथ सरकारचे मंजुरीनें चालतात. एक दिवाणी काम चालवावयाच्या रीतीचा कायदा व एक फौजदारी काम चालविण्याचे रीतीचा कायदा. परंतु याखेरीज बहुत ग्रंथ आणखी आहेत.

त्याचप्रमाणें, पुरावा घेण्याचे शास्त्रासंबंधीं इंग्रजींत हजारों ग्रंथ आहेत व त्यांचीं प्रमाणें, त्यांचे नियम, इत्यादि बहुत पंडितांनीं त्यांत आपली अक्कल घालून ठरविले आहेत. त्यांतील सारांशाचे ग्रंथ यत्किंचित् आतां मराठींत होऊं लागले आहेत.

पक्षकारांनीं बोलण्याचे शास्त्रसंबंधीं ग्रंथ बहुत आहेत, परंतु ते अद्यापि प्राकृत झाले नाहींत.

आतां या सदरील प्रकरणाखेरीज दुसरे ग्रंथ इंग्रजींत आहेत, त्यास *कंप्यारेटिव जुरिस्प्रुडन्स* असें म्हणतात. त्यांत अनेक देशच्या कायद्याशीं मेळ घालण्याचा यत्न करून गुणदोष दाखविले असतात. म्हणजे लग्नासंबंधीं विचार करणें तर रूमचे राज्यांत लग्नाबद्दल ठराव काय होते, हिंदु लोकांमध्यें काय आहेत, इंग्लंड देशांत काय आहेत, मुसलमानांमध्यें काय आहेत, व चिनांत काय आहेत आणि या प्रत्येकापासून नफा काय, नुकसान काय, अधिक फायद्याचा कोणता, उणें फायद्याचा कोणता, इत्यादि देशोदेशींचे कायद्याची तपासणी करतात. या विषयावरही ग्रंथ बहुत आहेत.

याखेरीज सर्व शास्त्रांत प्रमाणभूत फैसल झालेले मोकदमे यांचीं पुस्तकें तींही बहुत आहेत.

आतां या वरील सर्व मजकुरावरून जे सांप्रत आपणास कायदा येतो असें समजतात त्यांचे ध्यानांत येईल कीं, आपणास जें ज्ञान आहे तें एकंदर कायद्याचे ज्ञानापैकीं मोठ्या पिकाचे शेतांतील एक कणीस हातीं लागावें तशा योग्यतेचें आहे. यास्तव बाकीचे विषय समजण्याविषयीं त्यांनीं यत्न करावा.

विलायतेंत जी राज्यरीति आहे तीस *कन्स्टीच्यूशन* असें म्हणतात.त्याजवरही ग्रंथ बहुत आहेत, व हा विषय मोठा आहे. राणीसाहेब यांचा कारभारांत अंश काय आहे, प्रजेचा काय आहे, कायदे करणारे अधिकारी कोण, न्यायाधिशास स्वतंत्रता येण्याकरितां काय ठराव आहेत, अधिकाऱ्यांनीं मिरासदार होऊं नये व एका अधिकाऱ्यावर वाईट-बऱ्याचें यश अपयश न यावें याजकरितां त्यांच्या बदल्या होण्याचा क्रम कसा ठरविला आहे, इत्यादिकांचें निरूपण यांत आहे. या कायद्यापासून जीं पूर्वीं भयें होतीं म्हणजे नाना फडणवीस एकटा कात्रजच्या घाटानें जाईल, तर सुरक्षित खालीं पोंचण्याची भ्रांति, म्हणून १०० आरब तोडे पेटवून बरोबर असावे लागत होते तेव्हां ग्रामांतर, अशी गर्दी जी पहिली होती ती निवारण झाली. याचें कारण कायदाच आहे. जसें सृष्टीमध्यें ईश्वरानें नियम करून ठेविले आहेत कीं, ऋतूंनीं वेळच्या वेळेस बदलावें, सूर्यानें उजेड पाडावा, तीं तीं कार्यें आपल्या आपण घडतात. तद्वत् कायद्याची बंदिस्ती अशी करावी

कीं, जेणेंकरून रयतेस फार थोडी पीडा होऊन आपलेआपले व्यवहारांत तिनें स्वस्थ असावें. कारभाराचें ओझें जितकें कमी पडेल तितकें पडावें, विनाकारण प्रतिबंध असूं नये, व कोणाचे बुद्धीस कायद्याचे अडचणीमुळें फार नाहींसा होऊन ती व्यर्थ जाईं असें घडूं नये हीं मुख्य कायद्याचीं तत्त्वें आहेत. एका राज्यांत अनेक मनुष्यें जमतात तीं आपले निर्वाहाकरितां व सुखाकरितां होत. तर एकानें दुसऱ्याचे सुखाची हानि करूं नये अशा रीतीनें आपली सत्ता अनुभवावी. आणि लक्ष्मी व सत्ता जेणेंकरून अधिक होईल असा कायदा व नियम प्रजेस घालून द्यावा. असें ज्या ठिकाणीं होतें तेथील प्रजा सुखी, बळवान व पराक्रमी होते. कारण जसें शास्त्र तशी प्रजा, हें एक तत्त्वच आहे. जर रसायण खालें तर तें शरीरांत गुण अथवा दोष उत्पन्न केल्यावांचून राहाणार नाहीं. जें पोटांत गेलें त्यापासून कांहींतरी फल झालें पाहिजे. तसें ज्या प्रजेस जें शास्त्र प्राप्त होतें, त्या प्रजेचा त्या शास्त्राप्रमाणें परिणाम होतो, हें खचित आहे. असें जर नसतें तर एकंदर शास्त्र करणें व्यर्थ आहे, असें म्हणतां येईल, परंतु तसें नाहीं. शास्त्रानुसार प्रजेची स्थिती होत्ये हेंच खरें.

राजे, प्रधान यांस कायद्याचें ज्ञान फार अवश्य आहे. कारण कीं, त्यावरून ते आपले प्रजेचें सर्व बस्तान बसविणार. म्हणून मूलतत्त्वसहित कायद्याचें ज्ञान राज्यांतील जे प्रमुख असतील, त्यांस असलें पाहिजे. जर त्यांस हें ज्ञान पुरतेपणीं नसेल तर त्यांचे हातून अनर्थ घडून प्रजा दिवसेंदिवस क्षीण होत जाऊन निर्बल होईल. प्रजेस सुख कोणत्या नियमानें होईल, जे चालू नियम आहेत त्यांत चुक्या काय आहेत? व त्यांची निवृत्ति कशी होईल, हीं प्रकरणें इंग्लंडासारखे सुधारलेले देशांत फार विचरलीं गेलीं आहेत. जशीं हिंदुस्थानांत यज्ञाचीं अनुष्ठानें वगैरे याजवर हजारों ग्रंथ होऊन त्यांचा विचार झाला तसा व्यवहारसंबंधीं विचार तिकडे झाला. धर्मसंबंधीं विचारावर जसे हिंदुस्थानांत ग्रंथ आहेत, तसे विलायतेंत व्यवहारसंबंधीं आहेत. याजकरितां हें ज्ञान फार अवश्य आहे व हें झाल्यावांचून मोठ्या हुद्द्याच्या लायक मनुष्य होत नाहीं. याजकरितां हें सुलभ रीतीनें यावें म्हणून ग्रंथ व सभा ठरविल्या आहेत. त्यास इन् असें म्हणतात.

[नंबर १८२]

कायद्याची माहितगारी (नंबर २)

इंग्रज लोकांमध्यें सर्व शास्त्रें उत्कर्ष पावून वाढलीं आहेत पहा! त्यांचें शिल्प-शास्त्र वाढून आगगाडीपर्यंत आलें. ज्योतिषशास्त्र वाढून नवग्रहांचे ५३ ग्रह झाले.

तसेंच व्यवहारशास्त्रही फार वाढलें. याजमुळें आपणा हिंदूंमधील धर्मशास्त्र म्हणजे स्मृति व त्यांजवरील टीका हे सर्व भरीस घातलें तरी इंग्रजी व्यवहारशास्त्राचा हजारावा हिस्साही होणार नाहीं. त्यांच्या राज्यांत, व्यवहारांत व नीतींत जी सुधारणा झाली आहे त्याचा पाया हें व्यवहारशास्त्र म्हणजे कायदा आहे. त्याचे अनेक विभाग होऊन निरनिराळे ग्रंथ झाले आहेत, त्यांपैकीं कांहीं विभाग खालीं दर्शविले आहेत.

१ *ला आफ् फ्यामिली* – कुटुंबाचें शास्त्र.
२ *ला आफ् एव्हिडन्स* – साक्षीचें शास्त्र.
३ *ला आफ् प्रेझंपशन* – अनुमानशास्त्र.
४ *ला आफ् कंत्राक्टस* – कराराचें शास्त्र.
५ *ला आफ् इन्फंट्स* – लहान मुलांचें शास्त्र.
६ *ला आफ् बांन्करपट्स* – दिवाळदारांचें शास्त्र.
७ *ला आफ् न्युजन्स* – उपद्रवांचें शास्त्र.
८ *ला आफ् मर्चन्ट्स* – सावकारांचें शास्त्र.
९ *ला आफ् प्रापर्टी* – मिळकतीचे शास्त्र.
१० *ला आफ् पार्टनरशिप्स* – पातीचें शास्त्र.
११ *ला आफ् ट्रस्ट्स* – ठेवीचें शास्त्र.
१२ *ला आफ् बेरिअल्स* – मूठमातीबद्दल शास्त्र.
१३ *ला आफ् प्रोसीजर* – काम चालविण्याचे रीतीचें शास्त्र.
१४ *ला आफ् डॅव्हर्स* – स्त्रीचा त्याग करण्याचें शास्त्र.
१५ *ला आफ् गेम्स* – शिकारीचें शास्त्र.
१६ *मारीटैम् ला* – दर्यांतील शास्त्र.
१७ *सिव्हिल ला* – दिवाणी शास्त्र.
१८ *क्रिमिनल ला* – फौजदारी शास्त्र.
१९ *ला आफ् उइल्स* – वारसपत्राचें शास्त्र.
२० *ला आफ् शुअर्टी* – जामिनकीचें शास्त्र.
२१ *ला आफ् डयामेजेस* – नुकसानीचें शास्त्र.
२२ *ला आफ् प्लीडिंग्स्* – कोर्टांत बोलावयाचें शास्त्र.
२३ *स्टाटुट ला* – पार्लमेंटानें ठरविलेलें शास्त्र.
२४ *कामन ला* – देशचाल.

याहून आणखीही बहुत विषय आहेत व त्या दर एकावर भारतासारखे अनेक ग्रंथ व त्यासंबंधीं पूर्वीचे फैसल झाले, त्यांचीं पुस्तकें असा मोठा ग्रंथसंग्रह आहे व यांतील एकेक विषयांची अगदीं फोड करून त्यास दुसरे देशांतील दाखले मिळवून

विचार केला आहे. आणि ज्यास कायदे शिकणें आहे, त्यास हें सर्व अवश्य आहे; कारण अशा विस्तीर्ण ज्ञानाखेरीज ज्याचें ज्ञान तें कांहीं उपयोगी म्हणावयासारखें नव्हे.

असले विषय शिकण्याकरितां विलायतेस बहुत साधनें आहेत. ग्रंथ वाचून परिणाम लागत नाहीं, याजकरितां "इन" म्हणून गृहें आहेत, तेथें या विषयाचे वेत्ते आहेत ते पाठ देतात, आणि ऐकणाऱ्यांची समजूत डोळेफोड केल्याशिवाय करितात. अशा ठिकाणीं दोन वर्षें राहिलें म्हणजे बारिस्टराची सनद मिळत्ये. शिवाय कायद्याप्रकरणीं वर्तमानपत्रें व ग्रंथ वेगळेच आहेत व त्यांचें ज्ञान वाढविण्याकरितां मंडळ्या आहेत व शाळा आहेत, त्याप्रमाणें तजवीज या देशांत होईल तर किंवा इकडचे लोक तिकडे जातील तरच ते सर्व विषय समजतील.

आतां सदरीं लिहिल्यापैकीं पहिला विषय कुटुंबशास्त्राचा आहे. त्याविषयीं थोडा विचार करूं, म्हणजे त्याजवरून बाकीविषयीं नमुना ध्यानांत येईल.

या शास्त्राची इमारत लग्नावर आहे. कारण कीं, लग्नापासून कुटुंब उत्पन्न होतें. यांत प्रथम असा विचार पडतो कीं, लग्नाचा विधि काय असावा? ज्याचें लग्न करावयाचें त्याचें संमत पाहिजे कीं नको, त्याचेबद्दल दुसरें कोणी दिलें तर चालेल कीं काय? आतां याकामीं हिंदुशास्त्राकडे पाहातां असें दिसतें कीं, लग्न हा जरी व्यवहारिक करार आहे, तरी त्यास जडत्व येण्याकरितां धर्माचा संबंध लाविला आहे; म्हणून स्त्रीपुरुषांनीं अग्न्यादि देवतेचे समक्ष प्रतिज्ञा करावी लागत्ये व आई, बाप, भाऊ यांणीं लहान मुलाबद्दल समंत दिलें तरी चालतें. इंग्लंडांत असें आहे कीं, ज्यांचें लग्न त्यांणींच समंत दिलें पाहिजे. बहुतेक देशांत लग्नास धर्मविधी मानला आहे. कारण कीं, प्राचीनकाळीं व्यवहारशास्त्रास प्राबल्य आणण्याकरितां धर्माचें रूप दिलेलें आहे. त्याकाळचे कायदे करणारांस असें वाटलें कीं, धर्माचें रूप दिलें असतां लोकांची भक्ति विशेष बसून ते अधिक मानले जातील. या धोरणानें हिंदूनीं कितीएक व्यवहारिक गोष्टीविषयीं नियम स्मृतींत व पुराणांत सूर्यादि देवतांचे नांवावर घातले आहेत. तसे खिस्ती लोकांचे कितीएक नियम बैबलांत व मुसलमानांचे कुराणांत सांपडतात. यहुदी लोकांचा तर सर्व कायदा धर्मपुस्तकांत आहे. आतां लग्न करणाऱ्याचें वय काय असावें, हा एक प्रश्न आहे व या प्रश्नाचे उत्तरांत कांहीं अपवाद आहेत. ते असे कीं, उष्ण देशांत स्त्रिया व पुरुष लवकर योग्य होतात तसे थंड देशांत होत नाहींत, येणेंकरून तारतम्यभाव पाहिला पाहिजे. दुसरें कितीएक देशांत प्रजा उत्पन्न होऊन वसाहत व्हावी, अशी घाई असत्ये. कितीएकांत प्रजा अतिशय होऊन लग्नामध्यें अडचणी टाळण्याचा प्रसंग येतो हेंही पाहिलें पाहिजे. यानंतर आईबाप यांची आपले अपत्यावर सत्ता किती असावी, याविषयीं विचार करणें प्राप्त होतो. पूर्वी रोमन लोकांत असा ठराव होता कीं, मुलें ही आईबापांची मिळकत आहे. म्हणून ते विकण्यासदेखील समर्थ आहेत. हिंदुशास्त्रांत ते पालनास मात्र समर्थ

आहेत. दुसरा प्रश्न स्त्रीस सत्ता किती असावी, आणि तिला स्वतंत्र मिळकत असण्याची सत्ता आहे कीं नाहीं? तिणें पृथक् कर्ज केलें तर तें द्यावें किंवा नाहीं? नवऱ्याची हुकमत तिजवर कोठपर्यंत चालावी? नवऱ्याशीं तिचा बिघाड झाला तरी तिला उपजीविका दिली पाहिजे कीं काय? व तिचें लग्न रद्द होईल किंवा नाहीं? मोठ्या जातींत हिंदुस्थानांत लग्न रद्द होत नाहीं. परंतु स्त्री पतित म्हणजे धर्मभ्रष्ट झाल्यास घटस्फोट करावा, असें आहे. हलके जातींत नवऱ्याचे संमतानें फारकत झाली म्हणजे अथवा छेडा फाडणें किंवा काडी मोडणें यारीतीनें रद्द होऊन स्त्री व पुरुष दुसरें लग्न करूं शकतात. स्त्री-धनावर नवऱ्याची सत्ता आहे कीं नाहीं? उभयतांस जीं मुलें झालीं, त्यांचा मिळकतीवर अधिकार कसा, त्यांत स्थावरावर कसा, जंगमावर कसा व वृत्तीवर कसा, हें वारशाचें प्रकरण होय. स्त्रीनें व्यभिचार केल्यास तिचा कोणता अधिकार जातो? नवऱ्यास एक स्त्री असतां दुसरी करण्यास अधिकार आहे कीं नाहीं? असल्यास कोणते कारणांनीं? ही गोष्ट हिंदुशास्त्रास थोडीशी मान्य आहे, पण इंग्लिश *ला* म्हणजे विलायतेंतील शास्त्र यास अगदीं मान्य नाहीं. कितीएकांचें म्हणणें असें आहे कीं, अधिक स्त्रिया करण्याची चाल देशाचे उष्ण हवेमुळें पडली. कारण कीं, स्त्रियांस वार्धक्यदशा उष्ण देशांत लवकर येत्ये म्हणून अधिक स्त्रिया करितात. आणि एका पुरुषास अधिक स्त्रिया झाल्यानंतर त्या गैरविल्हेस न लागाव्या म्हणून कोंडून टाकल्यावांचून परिणाम नाहीं, असें त्यांस होतें. युरोपांत पुरुषास एक स्त्री असत्ये व लग्न जाणतेपणीं होतें; यामुळें स्त्री-पुरुषांची बरोबरी मुळापासूनच असत्ये. पोरपणीं झालेल्या लग्नांत अशी बरोबरी उत्पन्न होण्याचा संभवच नसतो व प्रीतीचाही विशेष संभव नसतो. म्हणून एके ठिकाणीं जें सांपडलें नाहीं तें अधिक ठिकाणीं शोधितां शोधितां फारच घाण होते व मनुष्य गचावतें. याच शास्त्रांत आणखीं असा विचार केला आहे कीं, औरसपणा ठरविण्यास नेम काय असावे? दत्तकपणा ठरविण्यास नेम काय असावे? हिंदुशास्त्रांत पूर्वी द्वादश पुत्र सांगितले, परंतु हल्लीं औरस आणि दत्तक हे दोन चालतात. हिंदुशास्त्रांत पुत्र होणें हा लग्नाचा मुख्य हेतु; आणि क्रिया करावी, आणि मिळकत घ्यावी याजकरितां पुत्राची अवश्यकता धरली आहे. दुसरा विचार याच प्रकरणांत असा लिहिला आहे कीं, स्त्रीचें कुल किती दुरचें असावें व कितीएक कुलापर्यंत विवाहसंबंध बंद करण्याचा हेतु काय? व त्यापासून लाभ काय आहे? इंग्लिश लोकांत पांच पिढ्यांतील एकाच वंशांतील स्त्री करीत नाहींत. मुसलमान सहोदर मात्र वर्ज करितात आणि हिंदु ज्या गोत्रांतील असतील तें सर्व गोत्रच वर्ज करितात. त्यास हजारों पिढ्या झाल्या असल्या तरी दंतकथेसारखें जें गोत्रप्रवर आहे त्यांत स्वगोत्रा स्त्री असूं नये, असा धर्मशास्त्राचा जो ठराव आहे तोच चालतो. आतां गोत्राचा विचार पाहिला तर कायद्याचे हुकमानें गोत्र फिरतें म्हणजे पराशर गोत्री पुरुष भारद्वाज कुलांत दत्तक घेतला तर त्याचें पहिलें जन्मगोत्र फिरून तो या नविन कल्पित गोत्रांत

दाखल होतो. तसेंच स्त्रीचें पाणिग्रहण झालें म्हणजे नवऱ्याचे गोत्रांत येत्ये. तेव्हां गोत्र जन्मानें सिद्ध होतें असें नाहीं. स्वगोत्रांतील कन्येशीं विवाहकर्तव्य असतां तिला परगोत्रीं दत्तक देऊन करितात. परंतु हे नियम ब्राम्हविवाहाचे मात्र आहेत. गांधर्वविवाहास जातिगोत्राचा प्रतिबंध नाहीं व सांप्रतकाळीं धर्माचाही नाहीं म्हटलें तरी चालेल. कारण कीं, मुसलमान स्त्री ब्राह्मणाची उपस्त्री होते. या सर्व प्रकरणाविषयीं जे नियम आहेत, त्यांस *"फ्यामिली ला"* म्हणतात, *ला* हा शब्द इंग्रजींत कायदा किंवा शास्त्र यांचा वाचक आहे. आतां या शास्त्राप्रमाणें कितीएक अनुमानें धरावीं अशीं आहेत व तीं पुराव्यानें रद्द झालीं तर होतात. नाहीं तर कायम राहातात. त्या अनुमानास इंग्रजींत *"प्रेजिमप्शन"* असें म्हणतात. म्हणजे एकत्रपणाचे कज्जांत पक्षकार एकत्र आहेत, असें अनुमान केलें पाहिजे व नंतर पृथक्पणाचा पुरावा पाहिला पाहिजे. कारण कीं, हिंदुशास्त्राप्रमाणें सर्व जन्मतः एकत्र आहेत. तसेंच दत्तकाचे कज्जांत दत्तक नव्हे हें अनुमान उत्पन्न होतें. तसेंच नवरा असतां जें मूल झालें तें औरस आहे हें अनुमान आहे. विरुद्ध पुरावा पडल्यास मात्र तें अनुमान रद्द होतें. असे अनेक विचार व मतें या प्रकरणीं आहेत. याजवरून हा विषय कायदे शिकणारांचे विद्येंत समावेश व्हावयाजोगा आहे किंवा नाहीं याचा विचार वाचकांनीं करावा.

[नंबर १८३]

कायद्याची माहितगारी (नंबर ३)
ला आफ् एव्हिडेन्स

ला आफ् एव्हिडेन्स म्हणजे साक्षीशास्त्र. हा विषय मनु, याज्ञवल्क्य प्रभृति हिंदुशास्त्रकर्ते यांस सुचला नाहीं असें नाहीं. त्यांणींही साक्षिदारांनीं खरें बोलावें, साक्षीस दिव्य द्यावें, राजानें त्यांस साक्षी कशी विचारावी इत्यादि नियम व्यवहाराध्यायीं लिहिले आहेत. तसेंच लेख्य या प्रकरणांत लेख कसे असावे, याचे विचारही जुन्याकाळीं केले आहेत. पण आलिकडे इंग्लंडांतील न्यायपथस्थापक विद्वानांनीं हे विचार बहुत वाढविले. याजमुळें हें एक पृथक् शास्त्रच झालें व यावर अनेक ग्रंथकारांनीं ग्रंथ केले आहेत. तेव्हां न्यायाधिशांनीं हें प्रकरण अवश्य पाहिलें पाहिजे म्हणून आम्ही यासंबंधी नियम संक्षेपतः प्रसिद्ध करण्याचें मनांत आणिलें आहे. हे नियम असे—

१ मनुष्यें स्वाभाविक खरें बोलतात. यास्तव साक्षी प्रमाण धरावयाची. आतां या नियमास अपवाद आहेत ते—

१ फायद्याकरितां कोणी खोटें बोलणें.
२ अदावत, मत्सर, राग येणेंकरून खोट्याची प्रवृत्ति होणें.
३ विस्मृतीनें खोट्याची प्रवृत्ति होणें.
४ दुर्लक्ष म्हणजे ज्या गोष्टीवर पुरें लक्ष नवतें त्याविशीं देणें पडलेली साक्ष खोट्यासारखी दिसून येणें.
५ घाबरल्यामुळें किंवा भयानें साक्ष बरोबर न होणें.

२ जसा साक्षिदाराचा स्वभाव खरें बोलण्याचा आहे, तसाच न्यायाधिशाचा स्वभाव साक्षीवर विश्वास ठेवावा असा आहे. याविषयीं आजपर्यंत कितीएक तक्रारी होत्या. त्यांत मुख्य ही कीं, वादी व प्रतिवादी यांचे वादांत हित असतें. सबब त्यांची साक्ष घेऊं नये व त्याप्रमाणें घेतही नव्हते. नाना शंकरशेट यांस चार रुपयांचे दाव्यांत प्रतिवादी केलें तरी न्यायाधीश असें समजतात कीं, हे खोटें बोलतील. परंतु आलिकडे हा नियम रद्द झाला. तसेंच हिंदुशास्त्रांत पतित, कुष्ठी इत्यादिकांच्या साक्षींविषयीं निषेध ठरविला आहे. कुराणांत स्त्रिया व परधर्मीचे लोक यांच्या साक्षी रद्द केल्या आहेत, आणि रूमच्या कायद्यांत दास साक्षीस अयोग्य ठरविले होते; पण हे मन मानेल तसे ठरविलेले नियम रद्द करून आतां वेडे व नेणतीं मुलें यांखेरीज कोणी अयोग्य नाहीं असें ठरविलें.

३ साक्षींत डोळ्यांनीं पाहून सांगणारे साक्षी मुख्य धरिले आहेत व त्यांचे साक्षीस प्रत्यक्ष प्रमाणाची साक्ष म्हणतात.

४ दुसऱ्यानें सांगितलेले मजकुराची साक्ष देणारे यांस ऐकीव साक्षी म्हणतात.

५ साक्षीचा मुख्य नियम असा आहे कीं, उत्तम प्रकारची साक्ष जी मिळावयाजोगी असेल ती पक्षकारानें दाखविली पाहिजे.

६ साक्ष प्रतिज्ञेवर किंवा शपथेवर झाली पाहिजे आणि ज्याचेविरुद्ध साक्ष होत्ये त्यास ती साक्ष खरीखोटी तपासतां यावी, म्हणून त्याचे समक्ष झाली पाहिजे.

७ साक्षीदारास खोटें बोलण्यास ४ भयें आहेत.
१ बुद्धीचें, म्हणजे खोटी साक्ष बनाविण्यास बुद्धीभ्रम पाडित्ये.
२ लौकिकाचें, म्हणजे खोटें बोलणारास लोक अप्रामाणिक समजतात.
३ धर्माचें, म्हणजे ईश्वर शिक्षा करील हें भय आहे.
४ राजाचें, म्हणजे कायद्यांत सांपडून शिक्षा होईल.

८ साक्षीस उलटसुलट पुसणें ही मोठे उपयोगाची गोष्ट आहे. येणेंकरून त्याचा खरेपणा अगर खोटेपणा दिसून येतो.

९ अपरोक्ष साक्षीस मुख्य धरीत नाहींत, याचें कारण मुख्य असें आहे कीं, ज्याणें मुळीं गोष्ट सांगितली त्यास शपथ नाहीं व त्यास उलटसुलट पुसण्याची संधी नाहीं. तेव्हां कोर्टापुढें जो आहे तो तिऱ्हाईत आहे.

१० साक्षिदाराची अब्रू ही एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. याजकरितां त्याणें वाईट वर्तणूक केली किंवा नाहीं हें पुसण्यास मोकळीक आहे.

११ राज्यकारणसंबंधीं मजकूर साक्षिदारास विचारतां येत नाहीं.

१२ नवऱ्याबद्दल बायकोची साक्ष दिवाणी प्रकरणांत होत्ये व फौजदारींत जरूरी-शिवाय होत नाहीं.

१३ लेख २ प्रकारचे आहेत. सरकारी व खासगी. सरकारी म्हणजे कायदे हुकुमनामे वगैरे व खाजगी म्हणजे वारसपत्रें, खरेदीपत्रें वगैरे. सरकारी कागद खरे मानले जातात. खासगीचा पुरावा करावा लागतो.

१४ अपरोक्ष पुरावा कितीएक कामांत मुख्य गणला जातो. म्हणजे अब्रूचे चौकशींत, निंदेचे चौकशींत, सर्व लोकांचे हिताचे प्रकरणांत, जुने वहिवाटींत, वंशा-वळीचे चौकशींत वगैरे अपरोक्ष पुरावा मुख्य होय. कारण हीं सर्व प्रकरणें ऐकीव साक्षीनेंच शाबूत व्हावयाचीं असतात.

१५ वंशावळीचे चौकशींत वंशाचीं झाडें, टिपणें, उपाध्याचे घरचे दाखले, पत्रिका, लग्नाचे, ताळेबंद, कबरीवरील लेख तसेंच वैद्य, चाकर, लेकवळे यांच्या साक्षी उपयोगी पडतात.

१६ अंतकाळचे वेळची जबानी सदरील ६ वे कलमांतील प्रमाणावांचूनही चालते व याविषयीं सन १८५५ चे २ रे आक्टाचें २९ वें कलम आहे. ह्या जबान्या फौजदारी कामांत खुनाचे किंवा प्राणघाताचे बाबदींत मात्र उपयोगी होत व त्याचे विरुद्धही कैदी पुरावा देऊं शकतो.

१७ जमाखर्चांतील रकम जी ज्याचे विरुद्ध ती साक्षींत धरितां येते. बाकीच्यांचा पुरावा पाहिजे.

१८ प्रतिवादीची कबुलायत कपटानें अगर गैरसमजुतीनें घेतलेली उपयोगी नाहीं. तसीच प्रतिवादीनें आपणावरील कांहीं उपद्रव दूर करण्याकरितां तोडजोड केलेली ती. ही साक्षींत धरली जात नाहीं.

१९ कैदीची कबुलायत जुलमानें किंवा भयानें जालेली उपयोगी नाहीं. आणखी सामान्यतः कबुलायतीवर भरंवसा ठेवण्यास फार विचार केला पाहिजे. याविशीं पिनलकोडचीं कलमें ९८, १४७, १४८, १५०, २०३, ३३० हीं आहेत तीं पाहावीं.

२० एका कैदीची कबुलायत दुसरे कैदीवर साक्षी उपयोगी नाहीं. कारण कीं, कलम ६ यांत लिहिलेले नियम कबुलायतीस लागत नाहींत.

२१ प्रतिवादीची किंवा कैदीची समग्र कबुलायत साक्षींत धरिली पाहिजे. तींत घरसोड करूं नये.

२२ प्रत्यक्ष व ऐकीव यांखेरीज दुसरा एक साक्षीचा प्रकार आहे. त्यास व्यवस्था साक्षिपुरावा म्हणतात. प्रत्यक्ष व ऐकीव साक्षी खरी किंवा खोटी हें पाहावयास या

साक्षीचा चांगला उपयोग पडतो. कारण कीं, साक्षीदार मिथ्या भासवितील; परंतु व्यवस्था बहुधा मिथ्या भासवीत नाहीं. खुनाचे कामांत रक्तानें भरलेलें वस्त्र, मुद्द्याची तरवार, प्रेताच्या अंगावरील खुणा हे पुरावे प्रत्यक्ष नव्हेत व ऐकीवही नव्हेत. याजकरितां व्यवस्था साक्षि असा याचा पृथक् वर्ण गणला आहे.

२३ साक्षी व दस्तऐवज पुराव्यास घेण्याची रीत दिवाणी व फौजदारी काम चालविण्याचे आक्टांत ठरविलेली आहे. ती आक्टें सन १८५९ चें ८ व १८६१ चें २५ हीं पाहावीं.

२४ सन १८५५ चा आक्ट १० कलम ९ प्रमाणें धनीपणाचे दस्तऐवज साक्षीदार दाखविणार नाहींत. तसेंच १८५५ चें आक्ट २ कलम २२ प्रमाणें दाव्यास लागू नाहीं तो कागद पक्षकार दाखवणार नाहीं. जड्ज, पंच, जुरीवाले, वकील यांची साक्ष ज्याकामीं त्यांचा संबंध आहे त्यांत होत नाहीं.

२५ साक्षिदारास समान असून तो कोडताकडे जात असतां रस्त्यावर कैद होत नाहीं.

२६ साक्षिदारास विचारण्याची पद्धति अशी आहे कीं, पहिल्यानें सरळ जबानी घ्यावी. नंतर उलटसुलट पुसावें. आणखी कांहीं चूक पडली असल्यास ती दुरुस्त करण्याकरितां पुनः जबानी घ्यावी. उलटसुलट पुरसीस विरुद्ध पक्षकार करतो. परंतु ज्याचा साक्षी फितूर झाला असे त्यास दिसल्यास उलट पुरसीस करण्यास त्यासही सन १८५५ चा आक्ट २ कलम ३० प्रमाणें अधिकार आहे.

२७ सूचक प्रश्न वगैरे मना करूं शकण्यास कोर्टास अधिकार आहे.

२८ साक्षीस अभिप्राय विचारावयाचा तो सामान्यतः विचारावयाचा नाहीं. परंतु कितीएक मोकद्म्यांत शास्त्रसंबंधें अथवा कांहीं विद्या किंवा कसब जे कोर्टास येत नाहीं तशा कामीं म्हणजे वैद्य, गवंडी इत्यादिकांच्या कामीं त्यांचा अभिप्रायच योग्य आहे.

२९ पर इलाख्यामुळें जो हुकूमनामा बजावत नाहीं तो साक्षींत गणतां येतो.

३० साक्षीपुरावा कोणी करावा याचा विचार मुख्य आहे. जर साक्षीपुरावा कोणींच देत नाहीं तर जो हरणार त्याजवर पुरावा करण्याची जबाबदारी आहे असा नियम आहे. दुसरा नियम असा आहे कीं, निषेधाचा पुरावा मागूं नये.

३१ साक्षीचे कायद्यांत म्हणजे १८५५ चे ३ रे आक्टांत कोर्टानें जितक्या गोष्टी मानाव्या म्हणून ठरविल्या आहेत, त्यांचा पुरावा नको आणि दाव्याबाहेरच्या हकीकतीचा पुरावा नको.

३२ साक्षिदाराचे अब्रू, गैर अब्रूचा पुरावा पक्षकार देऊं शकतो. कारण कीं, त्याजवर कोर्ट भरवसा ठेवणार नाहीं.

३३ दस्तऐवजासंबंधीं तोंडची साक्ष त्यांतील कपट वगैरे दाखविण्याचे उपयोगीं पडत्ये.

३४ दस्तऐवज वगैरे लेखांचा अर्थ ठरविणें हें एक मुख्य कामच आहे. याविशीं नियम इतकाच कीं, लिहिणाराच्या हेतूस अनुसरून युक्तीस प्रशस्त असा असेल तो अर्थ काढावा.

३५ साक्षीदाराचे साक्षीचें वजन करून पाहावें. यांत कोर्टानें फार अक्कल चालविली पाहिजे. साक्षिदांराचे संख्येवर बहुधा प्रमाण नाहीं. परंतु त्यांचे खरेपणावर धोरण ठेविलें पाहिजे.

३६ मुख्य न्यायाधिशाचें काम असें आहे कीं, त्याणें आपलें मन स्फटिकासारखें निर्मळ राखिलें पाहिजे. त्यापुढें जीं कामें आहेत, त्याबद्दल कोर्टाखेरीज त्याणें कोठें कोणाशीं बोलूं नये व इताखालील लोक यांच्या सूचना व अभिप्राय कधींही ऐकूं नयेत. साक्षीपुराव्याप्रमाणें त्याच्या मनांत जो ठसा उठेल, त्याप्रमाणें न्याय करावा. तो ठसा मलीन करण्याविषयीं त्याचे मित्र, चाकर किंवा पक्षकार उपाय करितील म्हणून न्यायाधिशानें त्याविशीं फार सावध राहिलें पाहिजे. कोणाची चिठी, पत्र, अर्जी कोर्टाखेरीज कोठें घेऊं नये. इनसाफ म्हणजे समानता. त्या ताजव्याचें पारडें एकीकडे झुकलें तर जुलूम होतो व दुसरीकडे झुकलें तर दया होत्ये. परंतु विचारवान् पुरुषांनीं असें ठरविलें आहे कीं, चुकी न पडतां समानता साधावी. परंतु ती नच साधेल तर दयेचे बाजूस चूक झाली ती बरी. परंतु जुलुमाचे बाजूस होऊं नये, असें साधारण ठरविलें असतां बहुधा अन्याय होणार नाहीं.

आतां सदरीं जो *ला आफ् एव्हिडेन्स* याचा गोषवारा दाखविला आहे, यांतील दरएक कलमास फैसल्यांचीं प्रमाणें व अभिप्रायांचीं प्रमाणें वगैरे दाखवून ग्रंथकारांनीं बहुत विस्तार केला आहे. परंतु त्यांतील विषय काय आहे हें यावरून आमचे वाचणाराचे साधारण लक्षांत येईल. नंतर आपले ज्ञानाची वृद्धि करणें हें ज्याचे त्याचे उद्योगावर आहे.

[नंबर १८४]

कायद्याची माहितगारी (नंबर ४)
ला आफ् प्रेजमशन्स् (अनुमानशास्त्र)

ला आफ् एव्हिडन्स याचाच भाग अनुमानशास्त्र आहे. कारण कीं अनुमानें तरी साक्षीचेच उपयोगी पडतात. याचे कितीएक वर्ग कल्पिले आहे. ते येणेंप्रमाणें—

१ *कंक्लुसिव प्रेजम्शन्स* – सिद्ध अनुमान.

२ *रिबेट्टेबल् प्रेजम्शन्स* – रद्द होण्यालायक अनुमान.

३ *प्रेजम्शन्स् आफ् ला* – कायद्याचे आधारानें काढलेलीं अनुमानें.
४ *प्रेजमशन्स् आफ् फ्याक्ट* – व्यवस्थेवरून काढलेलीं अनुमानें.
५ *न्याचरल् प्रेजम्शन्स्* – ईश्वरी कृतीवरून काढलेलें अनुमान.
६ *जनरल् प्रेजम्शन्स्* – साधारण अनुमान.
७ *स्पेशियल् प्रेजम्शन्स्* – विशेष अनुमान.

या प्रत्येकाचें एकेक उदाहरण असें :—

१ सात वर्षांचें आंतील लेकरूं गुन्हा करीत नाहीं हें सिद्ध अनुमान आहे. कारण कीं, गुन्हा म्हणजे काय हेंच त्यास समजत नाहीं.

२ कोणी मनुष्य दोन वर्षें मिळकतीची वहिवाट करितो, तर तो तिचा धनी आहे असें दिसतें. पण साक्षीपुराव्यानें हें अनुमान फिरणारें आहे, म्हणून हें रद्द होण्यालायक अनुमान समजावें.

३ फिर्याद न होतां ६ वर्षेंपर्यंत खत राहिलें तर त्याचा उलगडा झालाच आहे, हें कायद्याचें ठरविलेलें अनुमान होय.

४ एकादे प्रेतावर घोड्याचे पायाचे नाल लागून खुणा पडल्या आहेत, तर घोड्याचे लाथेनें तो मनुष्य मेला हें व्यवस्थेवरून अनुमान आहे.

५ एकादी बायको व पुरुष यांची मारामारी झाली तर बायकोनें पुरुषास मारलें नसावें, हें ईश्वरी कृतीवरून अनुमान होतें. कारण कीं स्त्रिया निर्बल आहेत.

६ ज्या जमिनींत झाडें आहेत, त्या जमीनीची ज्याची मालकी त्याचीं तीं झाडें होत, हें साधारण अनुमान आहे.

७ परंतु झाडांचीं फळें दुसरा धनी दरसाल घेत असतो व जमीनीचे धन्यास तीं मिळत नाहींत, असें असेल तर विशेष अनुमान होतें कीं, त्या झाडांचा धनी वेगळा आहे.

अनुमानांत न फिरणारीं व फिरणारीं, अशा दोन प्रती आहेत.

१. न फिरणारीं अनुमानें

१ सात वर्षांचें आंत ज्याचें वय त्याचे हातून गुन्हा घडत नाहीं. यास प्रमाण पिनल कोड क. ८३.

२ मुदतीच्या बाहेर ज्या फिर्यादी आल्या त्यांची वारासार पूर्वीच होऊन गेली आहे.

३ प्रत्येक मनुष्यास कायदा माहित आहे.

४ कायदा लोकांचे हिताकरितां केला आहे.

५ कायद्याप्रमाणें जी गोष्ट झाली त्याजवरून नुकसान झालें नाहीं, म्हणजे मनुष्यास नाजरानें वारंटाप्रमाणें फांशीं दिला, त्याजवरून वारसाचें नुकसान झालें काय, याचा पुरावा घेणें नको. कारण कीं हें सिद्ध अनुमान आहे.

२. पुराव्यानें फिरणारीं अनुमानें

१ *प्रत्येक मनुष्य निरपराधी आहे.*

२ अपराध ज्यानें केला त्यानें हेतुपुरस्सर केला असावा.

३ ज्या गोष्टीनें जो परिणाम होतो, ती गोष्ट तो परिणाम घडविण्याचे हेतूनें केली असावी, म्हणजे ज्यानें तरवार मारली त्यानें जीव घेण्याचा हेतु केला असावा.

४ हरएक मनुष्य आपले संसारास नीट जपतो.

५ जो पक्षकार पुरावा दाखवीत नाहीं, तो पुरावा त्याचे विरुद्ध असावा.

६ ज्यानें दुसऱ्यास पैसा दिला, तो त्याचा देणें असेल म्हणून दिला असावा.

७ रिणकोचे हातीं खत आलें तर त्याचा पैसा फिटला असावा.

८ जें ज्याचे ताब्यांत आहे त्याजवर त्याचा धनीपणा असावा.

९ ज्या मिळकतीवर ज्यानें सत्ता चालविली ती मिळकत त्याची असावी.

१० जो मनुष्य सरकारी काम चालवितो, त्या कामावर त्याची नेमणूक झाली असावी.

११ जें काम सरकारी माणसानें केलें, तें काम कायद्याप्रमाणें झालें असावें.

१२ हुकूमनाम्यांत जो ठराव आहे, तो वाजवी असावा.

१३ जें खत पुरें झालें, त्याचा पैसा पावला असावा.

१४ देवघेव झाली, तींत लघाडी झाली नसावी.

१५ कागदावर जी मिती घातली, ती खरी असावी.

१६ टपालांत पत्त्यावर जो कागद टाकला, तो पोंचला असावा.

१७ ज्याचें जें नांव तोच तो मनुष्य आहे.

१८ इंग्लिश कायद्याप्रमाणें सात वर्षांची यत्ता धरली आहे, परंतु हिंदुशास्त्राप्रमाणें बारा वर्षांत ज्याची खबर नाहीं तो मेला असावा व मुसलमानांचे शास्त्राप्रमाणें नव्वद वर्षांची उमर झाली म्हणजे तो मेला असें समजावें.

१९ ज्या गोष्टी घडल्या त्या सृष्टीच्या नेमाप्रमाणें घडल्या असाव्या.

२० जे एकत्र व्यापार करितात, त्यांची सर्कत ठरली असावी.

२१ जीं स्त्रीपुरुषें नवराबायकोप्रमाणें वागतात, त्यांचें लग्न झालें असावें.

२२ खुनाशिवाय इतर अपराधांत नवऱ्यास स्त्रीनें मदत केली असेल तर ती मदत नवऱ्याचे जबरदस्तीनें व तिची इच्छा नसतां झाली असावी.

२३ जी गोष्ट एकदा साक्षीपुराव्यावरून आहे असें सिद्ध झालें, ती सृष्टीनियमाप्रमाणें जितके दिवस राहावयाची तितके दिवस आहे म्हणून समजावें.

२४ तीस वर्षांवरचा जुना कागद मान्य होत आला आहे किंवा त्याप्रमाणें वहिवाट आहे व तो योग्य ठिकाणीं आहे तर त्याचा पुरावा नसतांही तो खरा आहे.

२५ सरकारी हुकमानें छापलें असें लिहून जी गोष्ट छापली, ती सरकारानें छापली असें समजावें.

२६ फैसल छापले आहेत ते खरे आहेत.

२७ बहुत दिवस ताबा आहे तर त्यास मूळचा कागद असावा.

२८ सर्व लोकांच्या उपयोगांत जी जमीन बहुत दिवस आहे, तिजला कोणी धनी नाहीं, असें समजावें.

२९ धन्यानें चाकरास जें सर्टिफिकेट दिलें त्यांत त्याचे दुर्गुण लिहिले असले, तर ते अदावतीनें लिहिले नाहींत असें समजावें.

३० माल खरेदी घेतला आहे तर त्याची वाजवी किंमत देण्याचें ठरलें होतें असें समजावें.

३१ साक्षीदारानें साक्ष दिली ती खरी आहे, असें समजावें.

३२ मरतेसमयीं जें सांगितलें तें धर्म स्मरून यथार्थ सांगितलें असें समजावें.

३३ विमा करून जाहाज भरून पाठविलें आणि तें मुदतींत किंवा जितका काळ लागावयाचा तितक्या काळांत पोंचलें नाहीं, तर बुडालें असें समजावें.

३४ आईबापांनीं मुलास किंवा मुलीस जें दिलें तें बक्षीस आहे, उसनें नव्हे.

३५ भाडेकऱ्याचा करार नाहीं तर महिना अखेरपर्यंत होता, असें देशचालीवरून अनुमान करावें.

३६ एक कुटुंबांतलीं माणसें जन्मतः एकत्र आहेत असें हिंदुशास्त्रावरून अनुमान आहे.

३७ दत्तकाचे वादांत दत्तक झाला नाहीं असें अनुमान आहे.

३८ हिंदुशास्त्राप्रमाणें वारस होण्यास द्वार लागतें. कुटुंबांतील मनुष्य जर अनुक्रमानें मेले तर द्वार दिसतें, परंतु बाप व मुलगा असे दोघेही तारवांत बुडाले आणि उभयतांच्याही मुली घरीं आहेत, तेव्हां वारसा कोणाचे मुलीस द्यावा ? व अगोदर कोण मेला ? अशी पृच्छा असते म्हणून अशा प्रसंगीं अधिक बळकट असेल तो मागाहून मेला असें अनुमान धरावें लागतें. तसेंच लढाईंत, दंग्यांत, महान अग्नींत, तुफानांत व धरणीकंपांत वगैरे जे मेले त्यांचा अनुक्रम लावणें आहे तर त्यांचे उमरीवर व बळावर लागतो हें अनुमान आहे.

३९ अपराधाचे पूर्वी किंवा पश्चात् कपटाची वर्तणूक केली असेल तर, त्याजवरून अपराध हेतुपुरःसर केला असावा, असें अनुमान आहे.

४० बापानें किंवा पंतोजीनें मुलास शिक्षा केली तर ती चांगल्याकरितां केली असावी.

४१ जो मनुष्य सूचना केली असतां बोलत नाहीं, तो ती गोष्ट मान्य करितो असें समजावें.

४२ गाहाणदार सोन्याचे दागिने खाऊन गेला तर त्याचें सोनें उत्कृष्ठ दराचें होतें असें अनुमान धरावें.

या अनुमानांचा उपयोग. बहुत कुशल बुद्धीनें केला पाहिजे. कारण कीं, कित्येक लोक मूर्खपणामुळें अशीं कारणें उत्पन्न करितात कीं, त्याजवरून अनुमान निघावें, पण त्यांत पुरता शोध केला असतां कांहींच अर्थ नसतो. म्हणून हा तारतम्य भाव पाहाणें न्यायाधीश व वकील यांजकडे आहे. न्यायाधीशास चांगले रीतीनें फैसल करतां यावा अशी मदत करण्याचें काम वकिलाचें आहे. याजकरितां न्यायांतील मर्में त्यानें चांगलीं जाणलीं पाहिजेत.

आतां या प्रत्येक नियमांचीं उदाहरणें, त्याचे अपवाद, त्याविषयीं पृथक् पृथक मतें व ठराव हीं लिहिलीं असतां विस्तार होतो यास्तव पुरे करूं.

[नंबर १८५]

कायद्यासंबंधीं माहिती (नंबर ५)

इंग्रजींत "*लीगल म्याक्झिम्स*" म्हणून एक पुरातन ग्रंथांतून निवडून काढल्या आहेत. त्या लहानलहान वाक्यांच्या असून कायद्यासंबंधीं त्यांत कांहीं मूलतत्त्वें आहेत. त्यांस आपण आतां व्यवहारशास्त्रांतील सूत्रें असें म्हणूं; अगर प्राकृत म्हणी असें म्हटलें तरी चालेल. या विषयावर ब्रूमसाहेबांचा ग्रंथ आहे. त्यांणीं एकएक सूत्र लिहून त्याची विस्तारपूर्वक टीका केली आहे. त्यांतील सूत्रें मूळचीं लाटिन भाषेंतील आहेत. तीं स्वभाषेंत आम्हीं आपले वाचकांकरितां लिहितों—

१ लोकांचे हितावर लक्ष ठेवणें हा मुख्य कायदा आहे.

२ अडचणींत मनुष्य सांपडला असतां त्यास विशेष अधिकार प्राप्त होतो.

३ धर्मास अनुसरून व्यवहार असावा.

४ नवीन कायदा मागील कायद्यास विरुद्ध असल्यास जुना कायदा अर्थात रद्द होतो.

५ कायद्याचा अंमल पुढें असावा मागें असूं नये.

६ नेहेमीं घडणाऱ्या गोष्टींविषयीं कायदा होतो.

७ राजास मृत्यु नाहीं.

८ राजाचे हातून अपराध घडत नाहीं.

९ राजा एकास उपद्रव करून दुसऱ्याचें घर भरूं शकत नाहीं.

१० राजाचे द्रव्यास मुदत नाहीं.

११ राजाचा आणि रयतेचा असे दोघांचे हक्क एकादे मिळकतीवर पोंचले तर प्रथमतः ती राजा घेईल.

१२ कायदे रयतेकरितां आहेत. त्यांत राजाचें नांव स्पष्ट असेल तर मात्र राजास लागू पडतील.

१३ रयत आपले देशाचा व राजाचा त्याग करूं शकत नाहीं.

१४ न्यायाधिशावर अप्रामाणिकपणा घालतां येत नाहीं. पण त्याचा निवाड कायद्यास किंवा इनसाफांस विरुद्ध आहे असें म्हणतां येतें.

१५ न्यायाधिशाचे हुकुमानें कोणी मनुष्यानें जी गोष्ट केली ती त्यानें लबाडीनें केली असें म्हणतां येत नाहीं.

१६ कायद्याचा विचार जडज्याकडे आणि गोष्ट घडली किंवा नाहीं याचा विचार जुरीकडे असतो.

१७ ज्या कामांत न्यायाधीश पक्षकार आहे तें काम त्याच्यानें पाहावत नाहीं.

१८ कोर्टाचे हुकुमावरून कोणाचें नुकसान होत नाहीं.

१९ कायद्यानें जी गोष्ट केली तिजवरूनही कोणाचें नुकसान होत नाहीं.

२० वादीची चूक प्रतिवादीचे कबुलायतीनें नाहींशी होते.

२१ हलके व विरळ घडणारे कामाविशीं कायदा प्रवृत्त होत नाहीं.

२२ चालू प्रवृत्तीस बिघडविणारा नवा कायदा झाला तर तो उपयोगापेक्षां नुकसान फार करितो.

२३ कारण हेंच कायद्याचा मुख्यार्थ आहे.

२४ कारण संपलें म्हणजे कायदा मना होतो.

२५ कायद्यानें जी गोष्ट कोर्टानें पाहूं नये असें ठरविलें आहे ती गोष्ट झाली नाहीं असें समजावें.

२६ ज्याचें बोलणें पहिल्या मागल्यास मिळत नाहीं तें प्रमाण नाहीं.

२७ मुळीं जें खोटें तें जुनें झाल्यानें खरें होत नाहीं.

२८ कोरून काढलेले तक्रारीनें उघड न्याय बुडत नाहीं.

२९ प्रत्येक नुकसानीस कायद्यांत उपाय आहे.

३० ईश्वरी इच्छेनें जें घडलें त्याजवरून घडलेलें नुकसान कायद्यावरून नुकसान असें समजूं नये.

३१ जी गोष्ट ज्याच्यानें व्हावचा जोगी नाहीं ती करण्याविषयीं कायदा हुकूम करीत नाहीं.

३२ एकाद्या गोष्टीचें अज्ञान मानलें जातें, पण कायद्याचें अज्ञान मानलें जात नाहीं.

३३ कबुलायतीनें जें घडलें तें नुकसान नव्हे.

३४ आपली चूक आपण दाव्याचें कारण करूं शकत नाहीं.

३५ कर्मावरून हेतु दिसतो.

३६ केवळ कर्मावरून दोषी होत नाहीं. पण हेतूवरून दोषी होतो.

३७ एका कामाची दुसऱ्यानें चौकशी करून त्यांतील मनुष्यास तसदी देववत नाहीं.

३८ आधीं ज्याचे हातीं वस्तु आली तो तिचा धनी.

३९ मनुष्यानें आपले धनीपणाचा असा उपभोग करावा कीं, त्याजवरून दुसऱ्याचे धनीपणास उपद्रव होऊं नये.

४० जो जमिनीचा मालक तो तिजवरील पदार्थांचाही मालक.

४१ दरएक मनुष्याचें घर त्याचा किल्ला आहे.

४२ कायद्याचें धोरण असें आहे कीं, मिळकत एके ठिकाणीं राहिल्यापेक्षां बहुत ठिकाणीं तिचा फैलाव व्हावा.

४३ जो बक्षीस देईल तो त्या बक्षीस पदार्थांचे वहिवाटीविशीं नियम सांगेल.

४४ ज्याचे हातीं मिळकत जात्ये, त्यास तिचे पूर्वीचे धन्याप्रमाणें अधिकार मिळतो.

४५ जेव्हां कोणी आपली मिळकत दुसऱ्यास देतो, तेव्हां त्या मिळकतीचे वहिवाटीस ज्या गोष्टी जरूर आहेत, त्याही तिजबरोबर त्यानें दिल्या आहेत, असें समजावें.

४६ मुख्य पदार्थ दिला म्हणजे त्याचे आजूबाजूचे पदार्थ जातात. पण आजूबाजूचे दिल्यानें मुख्य दिला असें होत नाहीं.

४७ नवरानवरीचे अनुमोदनावांचून झालेलें लग्न रद्द आहे.

४८ लग्नानंतर जन्मलेलीं मुलें औरस आहेत.

४९ वडील जिवंत असतां धाकटा वारस होत नाहीं.

५० वारसपणाचा अधिकार खालीं चालतो, वर चढत नाहीं.

५१ दस्तऐवज मोघम असल्यास लिहिणाराचा हेतु जाणून तो शेवटास जाईल असा अर्थ करावा.

५२ मागीलपुढील अन्वय पाहून कागदाचा अर्थ करावा.

५३ दस्तऐवजांत मिथ्या वर्णन लागलें म्हणून दस्तऐवज रद्द होत नाहीं.

५४ जेथें एकाचें स्पष्ट नांव लिहिलें होतें, तेथें इतरांस हेतुपूर्वक सोडिलें असें समजावें.

५५ दस्तऐवजाचा अर्थ करितांना तो दस्तऐवज होण्याचा काळप्रसंग मनांत आणावा.

५६ करारनाम्यावरून स्वतंत्रपणें कोणास मिळालेला लाभ तो मनुष्य सोडूं शकतो.

५७ करारनाम्यांतील जिकडे लाभ तिकडे नुकसान.

५८ दोघांची सारखी सत्ता असल्यास ज्याचे ताब्यांत मिळकत तो ती आधीं घेईल.

५९ कपटावर दावा उभा होत नाहीं.

अनुक्रम

६० पोकळ करारनाम्यावरून दावा चालत नाहीं.
६१ विकत घेणारानें सावधगिरी ठेवावी.
६२ देणाराचे इच्छेप्रमाणें रकम खर्ची लिहावी व परत देणाराचे इच्छेप्रमाणें जमा करावी.
६३ मुकत्यारानें जें केलें तें धन्यानें केलें.
६४ पुढच्या विशीं करारनामा झाला म्हणजे मागील दुरुस्त होतो.
६५ कायदा सावधाचा सहायकारी होय, गाफिलाचा नव्हे.
६६ स्वतांकरतां केलेले कायदे मरणानें रद्द होतात.
६७ वहिवाट प्राधान्य आहे.
६८ अनुमान नुकसान करणाराचे विरुद्ध होतें.
६९ दोघांचे व्यवहारांतून तिसऱ्याचें नुकसान होऊं नये.

—येणेंप्रमाणें सूत्रें आहेत.

आतां या सूत्रांवर भाष्यरूप जी ब्रूमसाहेबांनीं टीका केली तिचाही अन्वय अनुक्रमानें पुढें प्रसिद्ध करूं.

[नंबर १८६]

कायद्याची माहितगारी (नंबर ६)

ला ऑफ् कंट्रक्टस् (करारांविषयीं शास्त्र)

हें शास्त्र इंग्रजींत फार विस्तीर्ण आहे म्हणून याचें पूर्ण ज्ञान इंग्रजी भाषा आल्याखेरीज होईल असें नाहीं. तसेंच केवळ भाषा येऊन हीं शास्त्रें सहज समजतील असेंही नाहीं. हा नियम एकट्या इंग्रजी शास्त्रासच लागू आहे असें नाहीं. दुसरीकडेसही असेंच आहे. संस्कृतांत थोडी गति असल्यावांचून धर्मशास्त्रांत माहितगारी होत नाहीं, तथापि सुधारलेल्या देशांत अभ्यास सुलभ होण्याकरितां विद्वान लोक विद्यार्थ्यांस पाठ देत असतात. या युक्तीचें वर्चस्व अधिक होय. अस्तु. विद्वानांचे पाठ म्हणजे संभाषणें ऐकिलीं पाहिजेत व अनेक ग्रंथ अवलोकन केले पाहिजेत. तेव्हांच शास्त्रांत गति होत्ये. आणि सर्व ग्रंथ अवलोकन करण्यास डोळे तर समर्थ नसतात. याजकरितां विलायतेंत पाठ देण्याची चाल घातली आहे. येणेंकरून डोळ्यांस श्रम न होतां चार घटिका बसून संभाषण ऐकिलें म्हणजे विषयांची माहितगारी त्वरित होत्ये. त्याचप्रमाणें असे गूढ विषयावर पाठ ऐकण्याची चाल या देशांत पडल्यास फार चांगलें होईल. आम्हांस असें वाटतें कीं, दीड महिन्याचे सुटींत मुनसफ व मामलेदार वगैरे कामदार

एकादा कायद्यांतील खरा विद्वान गृहस्थ मिळवून एकत्र जमून पाठ ऐकतील तर त्यांस बहुत फायदा होईल. असो. आतां करारा विषयीं कांहीं संक्षेपरूपानें आम्ही माहिती लिहितों, त्याजवरून त्या विषयाचें तात्पर्य कायदे शिकणारांचे लक्षांत येईल.

१ ठराव म्हणजे करार किंवा बोली. ठराव करून एकजण दुसऱ्यास अधिकार देतो व तेणेंकरून त्यास नवीन हक्क मिळतो व त्या मिळालेल्या हक्काचे जोरानें फिर्याद करितां येत्ये.

२ सर्वच करार बलवत्तर आहेत, परंतु त्यांचे बलावरून तीन प्रकार गणले आहेत. पहिले प्रकारांत कोर्टांत झालेले निवाडे व सरकारांत घेतलेले मुचलके इत्यादि सरकार विद्यमानें झालेले ठराव हे येतात. हे मुख्य करार गणिले आहेत. दुसरे जे ठराव कांहीं संस्कारपूर्वक होतात म्हणजे साक्षी व सही किंवा निशाणीसहित लेख करणें आणि नंतर तो उचलून दुसऱ्याचे हवालीं करणें असे प्रकारचे विशेष करार दुसरे वर्गांत धरिले आहेत. तिसरा वर्ग साधारण करारनामे तोंडचे किंवा लेखाचे यांचा आहे. परंतु यांत विशेष विधान नाहीं. हातरोखे किंवा लिलावांत किंमत सांगणें अशा प्रकारचे हे होत. एकूण तीन प्रकार आहेत.

३ हुकूमनामे हेही वादीप्रतिवादीमध्यें करार झाल्याप्रमाणेंच मानावयाचे. कारण असें आहे कीं, कायद्याचे दृष्टीनें जे वादी, प्रतिवादी कोर्टांत येतात, ते जें काम कोर्टांत होतें त्यास मान्य आहेत, असें समजावयाचें. कोर्टानें जरी एकाचे विरूद्ध फैसल केला, तरी त्यास तो पक्षकार नाराजी असें समजूं नये. जें कोर्ट करितें तें सर्व त्यास कबूल आहे असें कायद्याचें धोरण आहे. म्हणून कोर्टाचे निवाडे हे करारनामेच होत.

४ सरकारचे विद्यमानचे जे करारनामे आहेत ते करारनाम्याचे प्रकारांत बलवत्तर आहेत. याचें कारण असें आहे कीं, ज्याबाबदींत फैसल होऊन ठराव झाला, त्या बाबतींत पुनः तकरार चालत नाहीं. वादाचे कारणाची समाप्ति होते. हा करारनामा असा मजबूत होतो कीं, याजबद्दल पुनः कोणीं संशय घेऊं नये व असा निवाड। होण्याचा हेतु काय आहे, असा विचार त्याजवर निघण्यास रस्ता नाहीं.

५ कराराचे दुसरे प्रकार असे आहेत कीं, एकपक्षीं करार म्हणजे खत वगैरे. यांत कराराचें ओझें एकावरच असतें. उभयपक्षीं करार म्हणजे घर बांधून द्यावें आणि पांचशें रुपये घ्यावे, यांत दोघांकडे त्याची पूर्णता असत्ये.

६ कांहीं करार भूतकाळचे असतात व कांहीं भावी काळचे असतात. भूतकाळचे कराराचें उदाहरण, "आम्ही आपली बाग तुम्हांस दिली आणि तुमची आम्हीं घेतली." म्हणजे या करारनाम्यांत पुढें व्हावयाचें कांहीं राहिलें नाहीं. भावी काळचे कराराचें उदाहरण, "आजपासून महिन्यानें घर खालीं करून देईन, आणि ५०० रुपये घेईन." यांत सांप्रतकाळीं कांहींच झालें नाहीं. फक्त पुढें करावयाचे गोष्टीचें बंधारण मात्र केलें. हे दोन्ही प्रकारचे करार फिर्यादीस कारण आहेत.

७ कराराचा चौथा वर्ग असा आहे कीं, स्पष्ट आणि मोघम. स्पष्ट करार म्हणजे "कारकून ठेवून त्यास पांच रुपये महिना वेतन ठरवून दिलें." हा स्पष्ट करार, आणि एक मनुष्यास आपले कामास मुखत्यारपत्र देऊन लावला, परंतु वेतनचा ठराव कांहीं केला नाहीं; किंवा वाण्याचे घरून गुळाची ढेंप वजन करून आणिली परंतु दर ठरविला नाहीं, तर यास मोघम करार म्हणावें. कारण वेतन आणि किंमत देण्याचा मनोदय होता हें तर स्पष्टच आहे. परंतु करार कांहीं ठरला नाहीं, म्हणून त्यांत वाजवी वेतन काय व वाजवी किंमत काय, याचा कायद्यानें विचार पाहून देण्याविशीं ठराव होतो. असा नियमच आहे कीं, जें पक्षकारांनीं अपुर्तें टाकिलें, तें कायदा पूर्ण करील. जर कोणी कोणापाशीं ठेव ठेविली, तर करार नसतांही व्यवस्था पाहून कोर्ट परत देण्यास सांगेल. सर्व काल असेंच घडतें कीं, अनुमानाचे जोरानें व पक्षकाराचा हेतु पाहून कायदा न्यूनता पूर्ण करितो.

८ सर्व करार ऋण उत्पन्न करितात व त्या सर्वांत तीन गोष्टी मुख्य मुद्द्याच्या आहेत. एक मागणें, दुसरा हेतु, आणि तिसरें वचन. यांपैकीं पहिलें मागणें म्हणजे, "माझ्याशीं करार कर", असें म्हणणें. परंतु जे करार करतात त्यांचे कृतीवरून हें त्यांणीं म्हटलेंच होतें असें अनुमान धरून मागणें झालें होतें, असें समजतात. दुसरा हेतु म्हणजे करार झाला कशासाठीं, व करार करणारानें हें आपल्यावर ऋण कां करून घेतलें हें पाहाणें मुख्य आहे. कारण हेतु स्पष्ट दिसल्यावांचून करार योग्य आहे, असें ठरत नाहीं. आणि तिसरें जें ऋण उत्पन्न केलें तें फेडण्याचें वचन कसें दिलें हें पाहिलें पाहिजे. असे ३ पर्याय आहेत.

९ हेतूचे पोटीं सर्वदा द्रव्यच असलें पाहिजे, अशी जरूर नाहीं. प्रीति, ममता, धर्म, मेहेनत, नुकसान, अडचण, लाभ इत्यादिही हेतूमध्यें धरले जातात. जसें बापानें लेकास १० हजार रुपये देईन म्हणून ठराव लिहून दिला, तर तेथें ममता हाच हेतु. स्त्रीस नवऱ्यानें वीस हजार रुपये देईन म्हणून लिहून दिलें, तर प्रीति हाच हेतु. ओझें पोचविण्यास मनुष्य आणला त्यास दोन रुपये देऊं केले, तर तेथें मेहेनत हाच हेतु, इत्यादि प्रकार समजावे.

१० सामान्यतः करार मानावे असा कायदा कोठेंच नाहीं. पण लिहिलेला कायदा याजविशीं असणें जरूर नाहीं. ज्या दिवसापासून मनुष्यांमध्यें व्यवहार चालू झाला, तेव्हांपासून करार मानावा हें मनुष्यांस ठाऊक झालें व जगांत इतके प्रकारचे करार होतात कीं, त्या सर्वांविशीं कायदा करण्यास कोणीही समर्थ नाहीं; परंतु प्राचीन कालापासून सर्व मनुष्यांची समजूत अशी आहे कीं, करार हें ऋण आहे व तें फेडलें पाहिजे. करारा-विषयीं जेथें जेथें विशेष प्रसंग पडतात, तेथें तेथें तितक्यापुरता मात्र कायदा होतो, व त्या कायद्यांत तरी करार तोडणाऱ्याकडून नुकसान कसें घ्यावें, किती दिवसांत घ्यावें, इत्यादि विषय मात्र येतात.

११ सर्व करारांस आधार अनुमती आहे. अनुमती नसेल तर सर्व करार रद्द

आहेत. या अनुमतीचे प्रकार तीन आहेत. ज्ञान, समजूत आणि राजीखुशी. पहिला प्रकार ज्ञान म्हणजे करार करणारा अज्ञान नसावा. जर मुलाशीं करार केला तर रद्द होतो, दुसरा प्रकार समजूत म्हणजे फसवून करार घेतलेला नसावा. जो व्यवहार लिहिला जातो, त्याची यथास्थित समजूत पक्षकारास पाहिजे. समजूत भलते प्रकारची करून करार घेतला तर रद्द होतो. तिसरा प्रकार मनुष्य जाणता आहे, आणि त्याची समजूतही आहे, परंतु जबरदस्तीनें करार घेतला असेल, तर तोहि रद्द होतो. यास्तव राजीखुशी पाहिजे.

१२ अनुमती असणें जरूर आहे. हें जनचालीवरूनही स्पष्ट आहे आणि अनुमती देण्यास योग्यता असण्यास मनुष्य जाणता असला पाहिजे, हेंही स्पष्टच आहे. परंतु किती वर्षांचा असला म्हणजे जाणता समजावा, हें कायद्यानें ठरविणें जरूर पडलें. यास्तव शास्त्रावरून सोळा वर्षांचा जाणता मनुष्य असें ठरविलें आहे. याविषयीं देशोदेशींचे कायदे भिन्न आहेत व हिंदुशास्त्रांतही कायदे करणारे ऋषि बहुत आहेत. कोणाचे मतें १८ व कोणाचे मतें २० वर्षें आहेत व भोळसर असेल तर त्याचे पालक आईबाप इत्यादि जे असतील, त्यांची अनुमति पाहिजे. तसाच स्त्रीचे उमरीविशींही विवाद आहे.

१३ साधारण जनचाल अशी आहे कीं, ज्याचे मनास जसा येईल तसा त्याणें करार करावा; परंतु हा साधारण अधिकार फिरविण्यास कायद्यास कितीएक स्थलीं योग्य दिसलें आहे. उदाहरण, मनुष्य विक्रीचा ठराव रद्द केला आहे. पेनशन दुसऱ्यास द्यावयाचाही करार चालत नाहीं. तसाच जुगारी करारही रद्द आहे असें लिहिलेले कायद्यानें ठरविलें आहे.

१४ करारावरून जें ऋण उत्पन्न झालें, तें फेडल्यावांचून निर्वाह नाहीं, त्याजवर तक्रार चालत नाहीं. स्वसंतोषानें हें ऋण कोणी न फेडील तर कायदा मध्यें पडून फेड करवील.

१५ करारनाम्याचे आणखी प्रकार असे आहेत कीं, स्वतंत्र, गुंतलेले आणि समान जातीचे. स्वतंत्र करारनामा म्हणजे दोघांनीं असा ठराव केला कीं, एकानें धर्मशाळा बांधावी व एकानें देऊळ बांधावें. अशा प्रकरणांत ज्याचा तो आपला करार पुरा करण्यास स्वतंत्र आहे. एकानें दुसऱ्याचा आक्षेप धरण्याचें कारण नाहीं. गुंतलेला करारनामा म्हणजे ज्यांत एकानें अमुक केलें तर दुसऱ्यानें अमुक करावें असा ठराव असतो तो. जसें, तुम्ही केळी लावल्या तर मी पाणी पुरवावें. यांत जर केळी लावल्याच नाहींत; तर पुढली जबाबदारी उत्पन्न होत नाहीं. तिसरा समान करारनामा म्हणजे, पांचशें रुपये घेऊन घर स्वाधीन करून देऊं. या करारांतील दोन्ही गोष्टी एकदांच व्हाव्या लागतात.

१६ दुसरी एक करारनाम्याची जात आहे ती अशी कीं, स्थावरासंबंधीं आणि किरकोळ स्थावरांसंबंधीं. म्हणजे कोणी एकानें आपली जमीन भाड्यानें दिली व

तींतील झाडें तोडण्याचीही परवानगी त्यास दिली, तर हा करार स्थावराबाबद समजावा. आणि दुसरा किरकोळ असा कीं, कोणी जमीन दुसऱ्यास दिली आणि त्या करारनाम्यांत असें लिहिलें कीं, त्या जमीनींत समाधि आहे तीपुढें नित्य दिवा लावित जावा. तर हा करार स्थावरासंबंधें नसून किरकोळ बाबीचा आहे.

१७ धाकटा करार थोरल्यांत जातो, हें एक कराराचें लक्षण आहे. सदरीं दुसरे कलमांत कराराच्या जाति तीन लिहिल्या आहेत. त्यांत सर्वांहून हलका करार होऊन त्यानंतर थोरला झाला तर पहिला रद्द होतो. त्यानंतर अवल प्रतीचा झाला तर दुसरे प्रतीचाही रद्द होतो. त्यास उदाहरण, एकानें एकावर हुंडी आणिली ती त्याणें भरण्याची कबूल केली, हा तिसरे प्रतीचा तोंडचा करार झाला. पुढें तो रुपये देईना म्हणून त्यापासून खत सहीसाक्षीचें करून घेतलें. हा करार दुसऱ्या दरजाचा झाला. तेव्हां हुंडीचे रुपये घेण्याबद्दलचा करार रद्द झाला. कारण पुढें दावा खतावरून व्हावयाचा; हुंडीवरून होणार नाहीं. नंतर खतावरून सरकारविद्यमानें निवाडा करून घेतला तर हा करार अवल दर्जाचा झाला. तेव्हां त्याचे मागील खतही रद्द झालें. पुढें तजवीज जी करावयाची ती निवाड्यावरून व्हावयाची.

१८ कांहीं करार वारसास मिळकत घेण्यास लागू पडतात व कांहीं पडत नाहींत. बहुतकरून तिसरे दरजाचे करार वारसास लागू पडत नाहींत. एक मनुष्यास चार रुपये दिले आणि झाडें तोडण्यास लाविला. तें काम पुरें होण्याचे पूर्वी तो मयत झाला तर वारस तें ऋण देणार नाहीं. विधानपूर्वक करार आणि सरकार विद्यमानचे करार हे वारसास लागू पडतात. परंतु त्यांतही पोटचे विचार आहेत.

१९ करारनामे करण्यास ज्याचीत्याची जरी खुशी आहे तरी दुष्टपणाचे करार, पापाचे करार, राज्यकारणाविरुद्ध करार, अन्यायाचे करार, कायद्याविरुद्ध करार, तसेच बहुत लोकांचे अनहिताचे, उपद्रवकारक, नीतिविरुद्ध, गैरसमजुतीचे, कपटाचे व व्यवहाराचे मोकळिकेस संकोच करणारे, या प्रकारचे करारनामे चालत नाहींत.

२० वारसास करार लागू होण्यास वारसाचें नांव करारनाम्यांत पाहिजे आणि वारसानें करार करणाराची मिळकत घेतली पाहिजे.

२१ व्यवहार करण्याची मोकळीक सर्वांस असली पाहिजे. म्हणून त्याचे विरुद्ध करारनामे व्यर्थ होतात. तरी कायद्यानें कितीएक ठिकाणीं कांहीं व्यवहारास योग्य कारणावरून हरकत केली आहे. म्हणजे अमुक दुकान अमुक ठिकाणीं असूं नये. अमुक धंदा अमुक ठिकाणीं आमक्यानेंच करावा. अमुक धंदा सरकारची परवानगी घेतल्यांवाचून करूं नये, असें कायद्यानें ठरविलें आहे. परंतु हे कायदे योग्य कारणें आहेत तोंपर्यंत चालावयाचे.

२२ तिसरे माणसास बुडविण्याकरितां दोघांनीं करार केला तर त्या दोघांचें जें त्याजवरून नुकसान व्हावयाचें तें होईल. तिसऱ्यास मात्र तें लागू पडणार नाहीं व

वादी म्हणेल कीं, मी या कपटांत होतों आणि मी करार केला आहे, याच कारणानें माझेवरची जबाबदारी काढावी, तर निघणार नाहीं. यास उदाहरण, जती येणार म्हणून प्रतिवादीनें दुसऱ्यास घर विकलें. नंतर वादीनें आपला हुकुमनामा दुसरे तऱ्हेनें पुरा केला. पुढें प्रतिवादी त्याकारणानें आपलें घर परत घेण्यास इच्छील तर मिळणार नाहीं.

२३ अमुक करारनाम्यांत अमुक कपट किंवा दगा आहे अशी जो तक्रार करील त्याणें त्याचा पुरावा करावा.

२४ विलायती कायद्याप्रमाणें दुसरे प्रकारचा करारावर सही वगैरे विधानपूर्वक होऊन तो धनकोस दिल्यावर त्याचा पैसा पोंचला नाहीं अशी तक्रार चालत नाहीं; परंतु हिंदुस्थानचे कोर्टास विलायतेच्या कोर्टासारखी फारशी अडचण नाहीं. आणि विलतेंत ज्यास *कोर्ट ऑफ् इक्विटी* म्हणतात; त्याप्रमाणें हीं कोर्टें आहेत. यास्तव देव घेवीचे कराराप्रमाणें पैसा पोंचला किंवा नाहीं हें पाहाण्यास हरकत नाहीं, असें सुज्ञाचेंही मत आहे.

२५ कांहीं करार स्वाभाविक असतात व ते दस्तऐवज नसतांही अमलांत येतात. लहान मुलांस व बायकोस अन्नवस्त्र देणें हा करार नात्यावरून सिद्ध होतो.

२६ लग्न न व्हावें अशा प्रकारचे करार चालवूं नयेत असें कायद्याचें धोरण आहे. परंतु अमुक बायकोनें पाट न केला असतां अमुक रुपये द्यावे आणि पाट केला असतां देवूं नयेत. असे प्रकारचे ठराव कितीएक कोर्टांत मान्य झाले आहेत.

२७ कपटानें केलेले सर्व करार रद्द होतात व कपटानें केलेले निवाडेही फिरतात. कपटाचे आधारावर कोणताच दावा सिद्ध होत नाहीं व करार कायम रहात नाहीं. याचप्रमाणें अनुमतीखेरीजचाही करार रद्द होतो.

२८ सावकारी कराराचे नियम बहुत आहेत ते येथें घातले नाहींत.

२९ हिंदुलोकांमध्यें अल्पवयांत स्त्रीपुरुषांचीं लग्नें होतात. आणि करारामध्यें लग्न हा मोठे महत्वाचा करार आहे व त्यास अनुमती लग्नें करणारांची नसून त्यांचे आईबापांची असत्ये. हा करार शास्त्रास सर्वथैव प्रतिकूल आहे. आईबापांनीं आपले मुलांचे संमतीवांचून त्यांचीं लग्नें करावीं असा अधिकार कोठें स्पष्ट लिहिलेला नाहीं. एके ठिकाणीं मुलाचे संस्कार बापानें करावे अशी एक निसटती परवानगी आहे; परंतु ती विद्यारंभ म्हणजे मुंज वगैरे संस्काराबद्दल आहे. विवाहाबद्दल असें नाहीं. कारण कीं, मनु लिहितो—

त्रिंशद्वर्षो वहेत्कन्यां।

तिसावे वर्षीं मुलानें लग्न करावें. तेव्हां इतके वर्षांचा मुलगा असल्यावर बापाची अर्थातच गरज नाहीं. तेव्हां बापानें पुत्राचा लहानपणीं विवाह करावा, हें सर्वथैव अयोग्य दिसतें. आणि ही वाईट चाल मोडण्याकरितां जसें पुत्रानें बापाचें ऋण न देण्याकरितां कायदा ठरत आहे व सट्ट्याचा व्यापार बंद करण्याकरितां घाटाघाट चालली आहे, त्याप्रमाणें लेजिस्लेटीव कौन्सलानें असा विवाह करणारांस दंड ठरविल्यास रयतेवर

मोठे उपकार होऊन वादप्रतिवादांत कागदाच्या गड्डया खर्च होताहेत तें एका आक्टानें काम होईल. कारण अशा दुष्ट चाली मोडाव्या हेंच कौन्सलाचें मुख्य काम आहे कीं नाहीं बरें ? सट्टयास अनुमती असत्ये. यास तर मुळींच अनुमती नाहीं व परिणामीं हा करार सट्टया इतका वाईट आहे.

३० इंग्रजी करारशास्त्रांतील शब्दपरिभाषा ठाऊक असणें हें उपयोगाचें आहे, म्हणून त्यांतील मुख्य शब्द खालीं लिहितों :—

कंट्राक्ट आफ् रेकार्ड – सरकारविद्यमानचा करार.

स्पेशल कंट्राक्ट – विशेष करार.

सिम्पल कंट्राक्ट – साधारण करार.

एक्झिक्युटेड् कंट्राक्ट – भूत करार.

एक्सप्रेस कंट्राक्ट – स्पष्ट करार.

एक्सिक्युटोरी कंट्राक्ट – भावी करार.

इम्प्लाइड् कंट्राक्ट – मोघम करार.

युनिलाट्रल कंट्राक्ट – एकपक्षीं करार.

इन्टरपार्टी कंट्राक्ट – उभयपक्षीं करार.

राइट – अधिकार.

आब्लिगेशन् – ऋण.

कन्सिडरेशन् – हेतु–ऐवज.

रिक्वेस्ट – मागणी.

प्रामिज् – वचन.

स्टाच्यूट – लिहिलेला कायदा.

कामन ला – जनचाल.

कन्सेंट – अनुमती.

कविनान्ट – पोटकरार.

इन्डिपेन्डन्ट – स्वतंत्र.

डिपेन्डेंट – गुंतलेला.

कन्करेन्ट – समान.

रील – स्थावराबाबद.

कोलाटरल् – किरकोळ.

फ्रॉड – कपट.

कोर्ट आफ् ला – कायदेशीर कोर्ट.

कोर्ट आफ् एक्विटी – न्यायाप्रमाणें फेसला करणारीं कोर्टें.

[नंबर १८७]

कायद्याप्रकरणा (नंबर ७)

कायद्याच मूलतत्त्व

जर सर्व पृथ्वीवर मनुष्य एकटाच प्राणी असेल, तर त्यास या शास्त्राची जरूर नाहीं. तो जेथें नांगरील तें त्याचें शेत, तो जेथें राहील तें त्याचें घर, जेथें पाणी पिईल तो त्याचा पाणवठा व त्याच्यानें फळें, काष्टें, तृण, जितकें घेववेल तितकें त्याचें व बाकी राहील तें पृथ्वीचें. अशा स्थितींत मनुष्य असलें म्हणजे त्यास कायद्याची गरजच नाहीं; परंतु ईश्वरानें मनुष्यास दोन कायदे लावून दिले आहेत. ते असे कीं, एक विवर्धन व दुसरा उपसंगम. म्हणजे मनुष्यें वृद्धि पावतात व एकमेकांच्या शेजारीं येतात; आणि तीं अशीं आलीं म्हणजे त्यांस शास्त्राची गरज उत्पन्न होते. मग त्यांत जे शाहाणे असतात त्यांस विचारानें असे नियम करण्याचें अगत्य पडतें कीं, हीं एकत्र जमलेलीं माणसें सुखानें राहावीं व एकमेकांची सत्ता व अधिकार हरण करतील तर त्यास उपाय असावा; सर्वांनीं संपत्ति उत्पन्न करण्याचे कामांत असावें; जे आळशी असतील त्यांनीं उद्योग्याची संपत्ति घेऊं नये; स्त्रिया विवाहप्रतिबंधानें पुरुषांचे दिमतीस लागाव्या, ज्याचे त्याचे मिळ[क]तीचें संरक्षण व्हावें व सर्वांचे सुखाकरितां केलेले नियम जो उल्लंघन करील त्यास शासन व्हावें. अर्थातच समुदायाकरितां अशा तजविजी करण्याचे प्रसंग प्राप्त होतात. जसें, एकच चाकर असला तर कोणी त्याची हजिरी व कामाची याद लिहीत नाहीं; पण दोनशें मजूरदार ठेविले तर हजिरी, देखरेख, रजा, दंड इत्यादि सर्व बंदोबस्त करावे लागतात. कारण कीं, बहुत लोक जमले म्हणजे त्यांत कोणी आळशी, कोणी लबाड, कोणी उशिरानें येणारे असतात. तेव्हां त्या सर्वांची व्यवस्था केली पाहिजे. तसेंच माणसें एकत्र जमलीं म्हणजे त्यांत कांहीं आळशी, कोणी मेहेनत न करितां सुख इच्छिणारीं, कोणी दुसऱ्याचें आयतें उचलणारीं, अशीं प्रकृतिभेदानें असतात. तेव्हां नियमांचें प्रयोजन येतें. दुसरें असें आहे कीं, लोकांत जसजसें शाहाणपण येत जातें तसतशी नवीन कायद्याची गरज पडते. बहुत प्राचीन काळीं गोत्राचे जे मूळ पुरुष तेच राजे होते आणि त्यांच्या आज्ञा त्यांच्या प्रजा वडीलपणाचे नात्यानें मानीत होत्या. वडील सांगेल तो सर्वांचा कायदा आणि असा वडील जो असतो तो आपले प्रजेचें हित लक्षांत आणून यथार्थ आज्ञा करीत असतो, यास *"पॅट्रिआर्कल गव्हर्नमेंट"*, म्हणजे वडिलाचें राज्य म्हणतात. जुन्या काळीं अशींच राज्यें होतीं. अल्पज्ञानाचे काळीं याप्रमाणें साधे पुरुषांचें राज्य नीट चालतें. पण पुढें जों जों लोकांस वृद्धत्व येतें, तों तों लोक अधिक शाहाणे होतात. कां कीं, काळानें अनुभव वाढतो आणि जितका अनुभव अधिक होईल तितकें लोकांस शाहाणपण अधिक येतें. हा ईश्वरी नियम आहे.

तरी वाईट कायद्याचे योगानें किंवा दुसरे कसले कारणानें कधीं कधीं लोकांस असा प्रतिबंध होतो कीं, कितीही काल गेला तरी शाहाणपणाची वेरीज आहे तीच आहे. किंवा मुद्दलांत कांहीं उणीच होती; परंतु असें घडणें हा अन्य कारणाचा परिणाम असें समजलें पाहिजे. साधारण नियम असा कीं, जो वृद्ध तो शाहाणा असावा. परंतु जर त्यानें जगांतील अनुभव घेतला तरच तो शाहाणा होणार; नाहींपेक्षां रानांत जाऊन पुरश्चरणें केलीं अगर एका ठिकाणींच बसून आयुष्य घालविलें, तर मग आयुष्याचा दोष नाहीं. त्याच्या त्या कृतीनें तो पंचविसावे वर्षीं जितका शाहाणा होता, तितकाच ९५ वे वर्षीही दिसेल. कारण कीं, मधलीं त्याचीं वर्षें झोंपेंत गेल्याप्रमाणें झालें. हाच प्रकार देशाविषयीं आहे. फार प्राचीनचे देश चीन, हिंदुस्थान इत्यादि आहेत व त्यांनीं ज्ञान मिळविण्याचे कामास आरंभही त्वरित केला, परंतु आज ते इंग्लंडाचे बरोबर नाहींत. याचें कारण त्यांचा कितीएक काल झोंपेंत गेल्याप्रमाणें गेला. आतां हें असें कां झालें, त्याचीं कारणें शोधन करण्याचे कामाचा विचार हा एक निराळाच विषय आहे. म्हणून तो सोडून देऊं. तेव्हां आपल्या प्रकृत विषयाचा विचार करतां असें दिसतें कीं, जेव्हां लोक अज्ञानी किंवा थोडे शाहाणपणाचे स्थितींत असतात, तेव्हां त्यांचे व्यवहारही थोडेच असतात, आणि त्यांस कायदेही थोडे पुरतात.

मनुष्याची एकंदर सत्ता पाहिली तर असें दिसतें कीं, मनुष्यास ईश्वरानें दिलेलें भांडवल म्हणजे पंच ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, बुद्धी इत्यादि. यांपासून जें काय त्यानें पैदा केलें तें सर्व त्याचे स्वाधीन असावें. कैदी म्हणजे काय? ज्याची सत्ता हरण झाली तो कैदी. त्यास हातपाय असतां इच्छिला उद्योग करितां येत नाहीं व पाहिजे तिकडे जातां येत नाहीं. बरें, उद्योग करून तुरुंगाचे बागेंत मिरच्या पिकविल्या, तरी त्या नाजर घेऊन जातो. तेव्हां सत्ताधारी मनुष्य व कैदी यांस इतकेंच काय तें अंतर आहे. कायदे करण्यांतही मुख्य काम हेंच आहे कीं, लोकांच्या सत्ता विनाकारण जाऊं नयेत व त्यांनीं कैदी होऊं नये. आतां मनुष्यांमध्यें व इतर जीवांमध्यें हें अंतर आहे कीं, त्यांचें ज्ञान वाढत नाहीं व मनुष्यांचें ज्ञान वाढतें. चिमणीचा घरटा व तिच्या पणजाचा घरटा एकसारखाच असतो. पण माणसांमध्यें तसें नाहीं. वेगळे प्रकार होतात. शाहाणपणाचा ढीग जसा जमत जातो, तसतशीं माणसें सुधारत जातात. पन्नास वर्षांपूर्वी आगबोटी, आगगाड्या नवत्या. तीनशें वर्षांपूर्वी तिरानें व तरवारीनेंच लढाया करीत. हातानें पुस्तकें लिहीत. तेव्हां, दारू, बंदूक, छापखाने हे माहीत नवते. तेव्हां ज्ञानसंग्रह हा एक ईश्वरी कायदाच आहे.

मनुष्यें एकत्र जमल्यामुळें सर्वांचे हिताकरितां कांहीं सत्ता सोडाव्या लागतात. म्हणजे जमीन ईश्वरानें निर्माण केली. तींत मनुष्यानें मेहनतीनें धान्य पिकविलें. तें सर्व त्यास मिळावें ही पूर्ण सत्ता; परंतु सर्वांचे रक्षणाकरितां रखवालदार म्हणजे राजा किंवा सैन्य ठेविलें तेव्हां त्यास बलुत्यादाखल त्यापैकीं अंश द्यावा लागतो. ही सत्तेंत न्यूनता

खरी; तरी ती सर्वांचे हिताकरितां व आपल्यास लोकांमध्यें राहाणें म्हणून कबूल केली पाहिजे. याचप्रमाणें कितीएक गोष्टी सर्वांचे हितार्थ टाकाव्या लागतात. तपकिरीचें दुकान भरवस्तींत घातलें व त्यापासून लोकांस त्रास झाला म्हणून माजिस्ट्रेटानें बंदी केली तर ती मानली पाहिजे. कारण कीं, लोकांमध्यें राहाणार जो आहे त्यास मुख्य कायदा असा मानिला पाहिजे कीं, जो व्यवहार करणें तो दुसऱ्याचे सुखाची हानि उत्पन्न करणारा असूं नये. याचा बंदोबस्त राजानें न केला तर बहुत लोक असें करण्यास प्रवृत्त होतील. याचें कारण असें, स्वहितास लोक इतके तत्पर आहेत कीं, त्यांस स्वहिताचे साधनांत दुसऱ्याचें हित दिसत नाहीं व ही मनुष्यांची स्वाभाविक खोडच आहे आणि मनुष्यास शक्ति फार. याजकरितां त्याचा मंडळींत राहण्याखेरीज निर्वाह नाहीं. मनुष्यास बुद्धीनें बळ आहे; परंतु संघानें त्याचें बळ शतगुण होतें. एकटा बुद्धिमान असतांही निर्बळ असतो. अल्पज्ञानाचे लोकांत बहुधा मनास येईल तसें राज्य करणारा एकच पुरुष असतो व तो मरतो तेव्हां मोठी घालमेल होते, आणि पुढें मूर्ख गादीवर बसला तरी लोक दुःख सोसतात; पण त्याचा बंदोबस्त त्यांस करतां येत नाहीं. अशा सरकारास "*डिस्प्याटिक गव्हर्नमेन्ट*" म्हणतात. दुसरें कितीएक ठिकाणीं दहा-पांच शाहाणे असतात, ते राज्य चालवितात त्यास "*आरिस्टाक्रेसी*" म्हणतात. तिसरें, कितीएक सुधारलेले देशांत लोकांचेतर्फे पंच नेमून ते कारभार करतात; त्यास "*रिपब्लिक*" म्हणतात. अमेरिकेंत याच प्रकारें राज्य आहे. आमचे इंग्लंडचे लोकांनीं तिहींचे अंश घेऊन मिश्र सरकार स्थापिलें आहे, त्यास "*मिक्सड गव्हर्नमेन्ट*" म्हणतात. त्याचा प्रकार असा आहे कीं, सर्वांहून वरिष्ठ कोर्ट "पार्लमेन्ट" म्हणून आहे त्यांत राणीसाहेब, बडे लोक व लोकांचे मुकत्यार असे तिघेही असून राज्य-कारभार चालतो, येणेंकरून तीनही प्रकारचे सरकारापासून जे फायदे व्हावयाचे ते होत असून तिन्ही प्रकारचे सरकारांत जे दोष आहेत ते टाकले गेले आहेत. राणीसाहेब वंशपरंपरा राज्याधिकारी, पण त्यांचे कारभारी नवे-जुने होतात. तशीच पार्लमेंट सभा जी आहे कीं, तेथें मोठाले बुद्धिवान् कोण हें निवडलें जातें. बोलणार, कायद्याचीं तत्त्वें जाणणार, पूर्वापार इतिहास समजणार, राज्यकारणाचीं मर्में जाणणार, या लोकांस आपली अक्कल प्रसिद्ध करण्यास हें मोठें ठिकाण आहे व तेथें जे नामांकित होतात, तेच प्रधान वगैरे मुख्य पदव्या पावतात. याजकरितां राणीसाहेबांस अक्कलवंत लोकांस शोधण्यास अवघड पडत नाहीं. सर्व राज्याचा कारभार कौन्सलावर आहे; परंतु सर्व कायदे करणें व मागील हिशेब पाहिणें व पुढें कर व धारे कसे बसवावे हें ठरविण्याचा अधिकार पार्लमेन्टास आहे. जो तीनशें रुपयांचे उत्पन्नाचा धनी आहे, त्यास पार्लमेंटांत आपला वकील पाठविण्यास हक्क आहे. कारण कीं, ज्यास मिळकत नाहीं त्यास राज्य कसेंही असलें तरी भयच नाहीं. याजकरितां जितके जितके अधिक द्रव्याचे मालक त्यांस सत्ता अधिक, सबब त्यांनीं वकील पाठवावे असा कायदा आहे. आणखी,

तिघांनीं पसंत केल्यावांचून पार्लमेंटांत ठराव होत नाहीं. तेव्हां सर्व लोकांस जो मान्य तोच कायदा होणार. या प्रकारचें इंग्लंडचें राज्य आहे. तेव्हां असले राज्याचा भाग म्हणविणारे हिंदुस्थानास हें मोठेंच भूषण आहे. याचा आणखी प्रतिप्रसव पुढें करूं.

[नंबर १८८]

कायद्याप्रकरणीं (नंबर ८)
कायदे करणारे

राज्यकर्ते व शास्त्रकर्ते म्हणजे कायदा करणारे जे मनुष्य असतात, त्यांस सर्व लोकांनीं मोठा मान देणें योग्य आहे. कारण कीं, त्यांच्याकडे जीं कामें आहेत, त्यांपेक्षां मोठीं कामें व्यवहारांत या भूमंडळावर दुसरीं नाहींत. त्यांच्याकडून यकिंचित् चूक घडली तर हजारों मनुष्यांचा नाश, दैन्य, राज्यक्रांति, इत्यादि घोर अनर्थ उत्पन्न होतील. म्हणून त्यांचीं कामें फार मोठालीं समजलीं पाहिजेत. पूर्वी मनूच्या नांवानें भृगूनें स्मृती लिहिली, तींत पुनर्विवाह न करण्याविषयीं एक नियम लिहिला आहे. त्याजवरून आजच्या भरतखंडांत केवढा अनर्थ उत्पन्न झाला आहे. पहा, लक्षावधि स्त्रिया आपआपल्या कुलांत हिरेमाणकाप्रमाणें शोभा देणाऱ्या त्यांची केवळ दैन्यप्रद दुर्दशा होऊन गेली आहे. असो. बापाला आपले मुलीचा कळवळा येत नाहीं असें नाहीं व भावास आपले बहिणीची दया येत नाहीं असेंही नाहीं; परंतु शास्त्र शास्त्र म्हणून हे गरीब बिचारे, जसें एकादे मनुष्यास पोटशूळ होतो, आणि चैन पडत नाहीं, मग धोतर किंवा काचा घेऊन घट्ट पोट बांधून दम सांवरावा आणि बोलावयास लागावें, तद्वत् एक गृहस्थ ही वैधव्यदुर्दशा पाहातात तेव्हां डोळ्यांतून अश्रु गाळितात व सद्गदित होतात. याखेरीज दुसरें कांहीं त्यांच्यानें होत नाहीं. ज्या कन्या जन्मापासून आपण वाढवून थोर केल्या त्यांनीं सुखानें रहावें, नवऱ्याबरोबर सुख भोगावें व त्यांस मुलेंबाळें व्हावीं, असें ते इच्छितात. परंतु त्यांत असलें दुष्ट विघ्न उपस्थित झालें म्हणजे त्यांचें काळीज अग्नीवर टाकल्याप्रमाणें भाजून जातें, यांत कांहीं संशय नाहीं; परंतु हीही महाशूळाप्रमाणें व्यथा तशीच बांधून ते दुःख पिऊन जातात, व लौकिकास भितात. बिचाऱ्यांस कांहीं उपाय सुचत नाहीं. आतां विचार करून पाहिला तर असें स्पष्ट दिसेल कीं, हे एवढे दुःखाचे पर्वत त्यांस कोणी उत्पन्न केले? शास्त्रांतील एक किंवा दोन श्लोकांनीं—ज्या बिचाऱ्या गरीब ब्राम्हणानें ते श्लोक लिहिले त्याला त्या वेळेस त्यांचें कोणतें मोठें प्रयोजन किंवा लोकांचा आग्रह दिसला असेल तो असो. पण या दोन श्लोकांनीं काय अनर्थ केला!

व किती स्त्रियांचे नाश झाले! असो. तसाच आदिपुराणांतील स्त्रियांच्या केशवपना-विषयीं एकच श्लोक कोणी ब्राम्हणानें लिहिला आहे व त्या आधारें लक्षावधि स्त्रियांचे केंश उकिरड्यावर किंवा चितेंत टाकले जाताहेत! ज्या केशांस सुगंधिक तेलें लागावयाचीं, ज्यावर रत्नजडित फुलें शोभावयाचीं, ज्यावर शेल्यांचे व शाल-जोड्यांचे कांठ फडकून, त्यांची मयूरासारखी छाया दिसावयाचीं, ज्यांत रेशमाचे व कलाबतूचे गोंडे व मोत्यांची दिंदी चमकावयाची व ज्यांनीं मुखचंद्रास सतेज आणि प्रफुल्लित शोभा द्यावयाची; ते केश प्रयागास देखील प्राप्त होणें अशक्य असे अश्रूंच्या जलानें व बाप, भाऊ, आई, बहीण यांच्या धाकानें परकीय नापिकानें आपल्या उग्र-शस्त्रानें चरचर काढावे, अशी दुर्दशा अपराधाविना बिचाऱ्या स्त्रियांस कशानें प्राप्त झाली म्हणाल तर त्या ब्राम्हणाच्या एका श्लोकानें. अरेरे! तशींच लहानपणीं मुलींचीं लग्नें करविण्यास तरी एकच श्लोक कारण. म्हणून त्यापासूनही मोठा अनर्थ झाला आहे. ज्या स्त्रियांचे गुण, रूप, लावण्य, विद्या, कौशल्य यांच्या द्वारें त्यांची योग्यता प्रकट होऊन पुरुषांनीं त्यांस शोधीत यावें तें उलटें झालें आहे. पहा, मोत्याकरितां जीवावर उदार होऊन लोकसमुद्रांत बुड्या मारतात, तसेंच दूरदूर देशीं सुवर्णाच्या खाणींचा तलास लावण्याकरितां पुरुष जातात आणि हीं स्त्रीरत्नें आंतबट्ट्यानें हुंडा देऊन किंवा फुकट तरी कोणी न्या म्हणून आईबापांनीं गाईसारखीं कोणाचे गळ्यांत बांधण्यास घेऊन फिरावें, असा प्रसंग कोणीं आणला म्हणाल तर आठ वर्षांत लग्न करावें या नियमानें. स्त्रियांचे वैभवाची या नियमानें सर्वस्वी हानि केली. पहा, हा नियम जर नसता तर बापास इतकी घाई झाली नसती. कित्येक पुरुषांनीं अमुक सद्गुणी मुलगी आपणांस मिळाली म्हणून धन्यता मानिली असती व दुसऱ्या तश्या मिळविण्याकरितां कितीएक पुरुष पराक्रमास प्रवृत्त झाले असते. तें सर्व आठ वर्षांच्या वयाच्या कायद्यानें मृत्तिकेंत गेलें. तेव्हां कायदे करणें ही मोठ्या महत्त्वाची गोष्ट आहे. याचा अनुभव सदरील दोन-तीन गोष्टींवरून वाचकांस चांगला ठसेल. अस्तु. जशी रोगाची, थंडीची वगैरे सांत[थ] येते, तशी अज्ञानाचीही सांत[थ] आहे. लोक एकदां विचार करण्याचें टाकूं लागले म्हणजे शेवटपर्यंत टाकीत जातात. त्यांत मग त्यांचा नाश होऊ अगर सर्वस्व जाऊ, ते शुद्धीवर येत नाहींत. आतां ही सांत नुकतीच विशी-एकुणिशी झाली आहे, म्हणून आपण विद्याभ्यास करूं लागलों आहों, विचार करूं लागलो आहों. अमुक नियम आपणास कां प्रतिबंध करतो? त्यास टाकावयास चिंता आहे कीं काय? दुसरा चांगला नियम कोणता? दुसरे देशांत काय नियम आहे, इत्यादि विचारास लोक लागले आहेत; परंतु हा देश मोठा व यांत लोक अनेक आहेत. म्हणून सर्वत्र जागृति होऊन ज्ञानसूर्याचा उदय होण्यास बहुत काळ पाहिजे. अस्तु. वाईट वैद्य शंभर रोगीच मारील; पण वाईट कायदे करणारा अर्धा मुलूख उद्ध्व[ध्व]स्त करील. म्हणून सर्व कायद्यांचें मुख्य मर्म लोकांचें हित हेंच असलें पाहिजे.

रोग्यास आरोग्य हें लौकर सांगतां येईल; परंतु हें हित कसें प्राप्त होईल, याचा विचार करणें फार अवघड आहे. कोणची विद्या वाढवावी, मुलास कसें तयार करावें, व्यापार कसा वाढवावा, शेतकरी यांस सुखावह नियम कोणते, इत्यादि एका मनुष्यास कळणें अवघड आहे. तथापि बहुत ज्ञाते एकत्र झाले तर कांहीं मार्ग काढतील. परंतु पूर्वोक्त नियमांनीं ज्याचें मन कारागृहांत पडलें आहे व ते नियम न टाकावे अशी ज्याची दृढ मति झाली आहे, तसले लोक तर या कामीं व्यर्थच समजावयाचे. याजकरितां केवळ शुद्धबुद्धीनें जे विचार करतील त्यांचा मात्र उपयोग होणें आहे.—पहिले शास्त्रकर्ते यांस कायद्याचीं कितीएक मर्में चांगलीं कळलीं होतीं व ते कितीएक प्रकरणीं फारच चुकले, असें त्यांचे ग्रंथांवरून दिसतें, परंतु यांत त्यांचा दोष नाहीं; कारण एका काळीं सर्व गोष्टी समजावयाच्या असें होत नाहीं. अधिकाधिक विचार करण्याचें काम पुढील लोकांचें आहे आणि तें जर त्यांनीं सोडून आपल्या रस्त्यावर आपणच कांटे घालून ठेविले, तर त्यांत मागील लोकांचा दोष काय? म्हणून सांप्रतचे हिंदु लोकांचे शास्त्रांची सुधारणा होणें राहिली याचें कारण हेंच आहे. प्राचीन काळचे कायदे करणारांचा झोंक पाहिला तर त्यांनीं कायद्यास धर्माचें रूप दिलेलें आहे, असें बहुत ठिकाणीं आढळतें. कायदे हे साधारण व्यवहारार्थ किंवा शुद्धीकरितां केलेले, परंतु त्यांस धर्माचें रूप दिल्यानें ते लोकांत अधिक मानले जावेत, असें एक त्यांचें धोरण दिसतें. पूर्वी बहुत देशांत असेंच झालेलें आहे. राज्य करणारे म्हटले म्हणजे ते राजे प्रबल, आणि कायदे करणारे भट किंवा फकीर ते दुर्बल, तेव्हां त्यांचे कायद्यांस जोर कसचा? म्हणून त्यांनीं बहुधा धर्माचे नांवाचा जोर घेतला आहे. हें कायद्याचेच प्रकरणांत त्यांनीं केलें आहे असें नाहीं. सर्व शास्त्रांस धर्माचेंच रूप दिलें आहे. ज्योतिष, वैद्यक, व्याकरण, कविता, इत्यादि सर्वच प्रकरणें त्यांनीं याप्रमाणें केलीं व त्यांवर मोठाल्या पदार्थांचीं नांवें घातलीं. म्हणजे कोणी आपल्या ग्रंथास सूर्यसिद्धांत म्हटलें, कोणी शेषसिद्धांत, कोणी सामुद्रिक इत्यादि नांवें दिलीं आहेत; म्हणून त्यांतील प्रत्येक शब्ददेखील तंतोतंत खरे आहेत असें न समजतां त्यांच्या कर्त्यांचा कुशलपणा मनांत आणून समजणारांनीं त्यांचा वास्तविक अर्थ असेल तो घ्यावा. ऋषी या शब्दाचा अर्थ ग्रंथकर्ते आणि आचार्य म्हणजे पंतोजी. जेव्हां ग्रंथ करणें बंद झालें, तेव्हांपासून ऋषीही नाहींत असें लोक मानूं लागले; परंतु सांप्रतकाळीं त्या दोघांचाही अवतार नवीन होऊं लागला आहे व येणेंकरून विद्येचें महत्त्व वाढणार आहे, असें खचित समजावें.

[नंबर १८९]

कायद्याप्रकरणीं (नंबर ९)

इंग्लंड व त्याचे उत्तरेस स्काटलंड म्हणून प्रांत आहे. या दोहोंभागांस ग्रेट्ब्रिटन असें म्हणतात. हें एक बेट व दुसरें शेजारीं ऐर्लंड म्हणून एक बेट आहे, हीं दोन बेटें मिळून राज्य एकच आहे. याची राजधानी शहर लंडन. हें राज्य लहान आहे म्हणजे हिंदुस्थानच्या सुमारें पंधराव्या हिश्याइतकें होईल; परंतु तेथील लोक महान पराक्रमी, उद्योगी, विद्वान व संपत्तिवान् आहेत; यामुळें त्यांनीं आपला अंमल बहुत ठिकाणीं बसविला आहे. आतां या राज्याखालीं हें हिंदुस्थान आहे सबब या राज्याची माहिती आपणांस असणें हा कायद्याचाच विषय आहे, म्हणून त्याविषयीं लिहूं.

२ सदरहू राज्याचा कायदा असा आहे कीं, राजकुळांतील वडील वंश गादीवर बसावा. मग तो वडील वंश स्त्री असली तरी चिंता नाहीं, गादीवर बसते.

३ केन्टचा डयूक एडवर्ड व त्याचा भाऊ चौथा विलियम हे उभयतां बंधू असतां विलियम वडील भाऊ म्हणून राज्यावर होता. त्याचा चेहरा पुरुषाचे मुखवट्याचे सुर्तीं रुपयावर आहे. हा तारीख २० जून सन १८३७ रोजीं मृत्यु पावला. तेव्हां धाकटे भावाची मुलगी आलेक्झांड्रिया ता. २४ माहे मे सन १८१९ सालीं जन्मली होती, तिला विक्टोरिया असें नांव देऊन सिंहासनावर बसविली व ता. २१ जून सन १८३७ रोजीं त्या बाबदचे जाहीरनामे लाविले. नंतर राज्यावर जो बसतो, त्याचे मस्तकीं मुकुट धारण करविण्याचा मोठा समारंभ होत असतो, त्यास "कारोनेशन" असें म्हणतात. तो समारंभ ता. २८ जून सन १८३८ सालीं झाला. नंतर तिचें प्रिन्स आल्ब्र्ट यांशीं ता. १० माहे फेब्रुवारी सन १८४० सालीं लग्न झालें.

४ राणीसाहेबांस संतती आहे ती :—

१ मुलगी विक्टोरिया आडेलेड तारीख २१ नवं० १८४० रोजीं जन्मली व हिनें प्रशियाच्या राजाशीं सन १८५७ सालीं लग्न केलें.

२ मुलगा आलबर्ट एडवर्ड. प्रिन्स आफ् वेल्स. डयूक आफ् कार्नवाल, अर्ल आफ् डब्लिन, ता० ९ नवंबर १८४१ सालीं जन्मला.

३ मुलगी प्रिन्सेस आलीस ता० २५ माहे एप्रिल १८४३ रोजीं जन्मली.

४ मुलगा प्रिन्स आलफ्रेड ६ आगस्त १८४४ रोजीं जन्मला.

५ मुलगी प्रिन्सेस वेलेना आगस्ट ता० २५ माहे मे १८४६ रोजीं जन्मली.

६ मुलगी प्रिन्सेस लुसा तारीख १८ मार्च सन १८४८ रोजीं जन्मली.

७ मुलगा प्रिन्स आर्थर तारीख १ माहे मे सन १८५० रोजीं जन्मला.

८ मुलगा प्रिन्स लिओपोल्ड ता० ७ माहे एप्रिल १८५३ रोजीं जन्मला.
९ मुलगी प्रिन्सेस बिट्रीस मेरी ता० १४ एप्रिल सन १८५७ रोजीं जन्मली.

५ या मुलांखेरीज राजकुळांत राणीसाहेबांची आई डचेस आफ् केन्ट व दोन चुलत्या विधवा आहेत.

६ दरबार (काबिनेट) म्हणजे प्रधानमंडळ यांमध्यें कामदार १६ आहेत त्यांचीं नांवें:—

१ वैकौन्ट पाल्मरस्टन–फर्स्ट लार्ड आफ् ट्रेझरी.
२ लार्ड हाइचान्सेलर–लार्ड क्यांबेल.
३ चान्सेलर आफ् एक्सचेकर–राइट आनराबल ग्लाडस्टोन.
४ लार्ड प्रेसिडंट आफ् कौन्सलर–लार्ड ग्रानविल.
५ लार्ड प्रिव्हिसील–ड्यूक आरजाईल.
६ सेक्रटरी आफ् स्टेट, होम डिपार्टमेन्ट–राइट आनराबल सर लुइस.
७ सेक्रटरी आफ् स्टेट फार फारेन आफेयर्स–लार्ड रसेल.
८ सेक्रटरी आफ् स्टेट फार कालनीज–ड्यूक न्युकासल.
९ सेक्रटरी आफ् स्टेट फार वार–राइट आनराबल हरबर्ट.
१० सेक्रटरी आफ् स्टेट फार इंडिया–सर चार्लस वूड.
११ फर्स्ट लार्ड आफ् आडमिरल्टी–ड्यूक आफ् समरसेट.
१२ प्रेसिडंट बोर्ड आफ् ट्रेड–राइट आनराबल गिब्सन.
१३ पोस्ट मास्तर जनरल.
१४ चान्सेलर डची आफ् ल्यांक्यास्टर.
१५ चीफ् सेक्रेटरी फार ऐर्लंड.
१६ प्रेसिडंट पुअर ला बोर्ड.

७ या प्रधानांचे सभेस राणीसाहेबांचें प्रिव्ही कौन्सल म्हणतात व प्रत्येकास मिनिस्टर आणि पहिल्यास प्रिमियर म्हणजे मुख्य प्रधान म्हणतात.

८ राणीचे खासगीकडील कामदार "हर माजिस्टीस हौसहोल्ड" म्हणतात ते येणेंप्रमाणें:—

१ लार्ड स्टेवर्ट.
२ ट्रेझरर.
३ कंट्रोलर.
४ मास्तर आफ् हौसहोल्ड.
५ सेक्रटरी ग्रीन बोर्ड.
६ लार्ड चेंबरलेन.

७ व्हाइस चेंबरलेन.
८ कीपर आफ् धी प्रिवि पर्स.
९ सेक्रटरी.
१० मिस्ट्रेस आफ् रोब्स.
११ मास्टर आफ् हार्स.
१२ कार्क्ल मार्शल.
१३ मास्तर आफ् बंक हौउज.

९ प्रिन्स कन्सर्टस हौसहोल्ड, म्हणजे राणीसाहेबांचे भ्ताराकडील खासगीचे कामदार. तसेंच वडील पुत्राचे खासगी कामदार खेरीज आहेत.

१० राणीसाहेबांचे कोडतांत काम चालविणारे वकील—
१ अटर्नी जनरल.
२ सालिसिटर जनरल.
३ क्वीन्स सर्जंट.

११ सरकारी आफिसें आहेत तीं येणेंप्रमाणें :—
१ ट्रेझरी—म्हणजे भांडार. याजवरील मुख्य कारभारी प्रधानांत आहे व त्याचे हाताखालीं सेक्रटरी, चिटणीस वगैरे कारखाना आहे.
२ एक्सचेकर—महसुलखातें याजवरील मुख्य तो प्रधान आहे व त्याचे हाताखालीं सेक्रटरी, असिस्टंट वगैरे आहेत.
३ प्रिव्ही कौन्सलचें आफिस—यांतील मुख्य प्रेसिडंट तो प्रधानांत आहे.
४ विद्या वाढविणारी कमिटी. हीस कौन्सल आफ् एज्युकेशन म्हणतात.
५ सायेन्स आंड आर्ट—विद्या व शोध यांचें खातें.
६ प्रिव्हीसील आफिस—शिक्के करणारे. यांतील मुख्य कारभारी प्रधानांत आहे.
७ होम आफिस—यांतील मुख्य कारभारी सेक्रेटरी आफ् स्टेट म्हणजे स्वराज्यांतील काम पाहाणारा. त्याचे हाताखालीं कारभारी पुष्कळ आहेत व मुख्य, प्रधानांत आहे.
८ फारेन आफिस—म्हणजे बाहेरचे राज्यांसंबंधीं कारभार पाहाण्याची कचेरी. हींतील मुख्य प्रधानांत आहे.
९ कालोनियल आफिस—म्हणजे राज्याबाहेर इंग्लिश लोकांनीं वस्त्या केल्या आहेत. त्यांच्या कारभाराची कचेरी.
१० इंडियन आफिस म्हणजे हिंदुस्थानचा कारभार पाहाण्याची कचेरी. हिजवरील मुख्य कारभारी प्रधानांत आहे व त्याचे हाताखालीं कामदार पुष्कळ आहेत.

११ वार आफिस–लढाईचें खातें. या खात्यांत पुष्कळ कामदार अनसू. त्यांतील मुख्य प्रधानांत आहे.
१२ कमांडर इन् चीफ यांचें आफिस.
१३ अजुटंट जनरलचें आफिस.
१४ क्वार्टर मास्तरचें आफिस.
१५ पे मास्तरचें आफिस.
१६ आड्मिरालटी म्हणजे आरमाराच्या फौजेचें खातें. यांत पुष्कळ कामदार आहेत व मुख्य कामदार प्रधानांत आहे.
१७ लार्ड ग्रेट चेंबरलेनचें आफिस.
१८ ऐरिश आफिस–एथें ऐर्लंडचा कारभार होतो.
१९ बोर्ड आफ् ट्रेड–व्यापाराचें खातें. याचे पोटीं रेलवे वगैरे काम आहे.
२० स्ट्याटिस्टिकल डिपार्टमेंट.
२१ मिटिरालोजिकल डिपार्टमेंट.
२२ उड व फारेस्ट म्हणजे जंगलखातें.
२३ बर्कयार्क खातें.
२४ डची आफ् कार्नवालची कचेरी.
२५ क्रौन आफिसर.
२६ रायल मरीन आफिस.
२७ पोष्ट आफिस.
२८ कस्टम हौस–जकात.
२९ रेविन्यु आफिस–मुलकी खातें.
३० आडिट आफिस–हिशेबी खातें.
३१ पुअर ला बोर्ड–भिकारखातें.
३२ सिव्हिल सर्वीस कमिशनखातें.
३३ कापीहोल्ड आफिस.
३४ चारिटी कमिशन–धर्मखातें.
३५ चर्च इस्टेट आफिस.
३६ एमिग्रेशन कमिशन आफिस.
३७ टंकसाळ आफिस.
३८ सरकारी कर्जाचें आफिस.
३९ ब्यांक आफिस.
४० रिकार्ड आफिस.
४१ रजिस्टर आफिस.

४२ हेराल्ड आफिस.

१२ सदर्हूशिवाय कोर्टें आहेत तीं—

१ चान्सरी कोर्ट.
२ कुइन्स बेंच कोर्ट.
३ कामन प्लीज कोर्ट.
४ एक्सचेकर कोर्ट.
५ अडमिरालटी कोर्ट.
६ कोर्ट आफ् म्यारिएज.
७ इन्सालवन्ट कोर्ट.

१३ या सर्वांत वरिष्ठ कोर्ट पार्लमेंट. त्यांत राणीसाहेब व बडे लोक बसतात. त्यांचा तपशील—

१ राजगृहांतील राणीसाहेबांचे पुत्र ३.
२ आर्चबिशप म्हणजे धर्माध्यक्ष २.
३ डयूक म्हणजे राज्यांतील पहिले पदवीचे लोक २०.
४ मार्क्विस (दुसरे पदवीचे लोक) २१.
५ अर्ल (तिसरे पदवीचे बडे लोक) १११.
६ वैकौन्ट (चौथे पदवीचे) २२.
७ बिशप (दुसरे प्रतीचे धर्माध्यक्ष) २४.
८ वारन (पांचवे पदवीचे लोक) २११.
९ स्काटलंडचे बडे लोक १६.
१० ऐर्लंडचे बडे लोक २८.
११ ऐर्लंडचे धर्माध्यक्ष ११, एकूण ४६२.

१४ या बडे लोकांचे मंडळीस हौस आफ् पियर्स म्हणतात. याखेरीज परगणे, शहरें, शाळा, किल्ले, बंदरें, कसबे यांस पार्लमेन्टास आपले तर्फे मुकत्यार पाठविण्याचा अधिकार आहे. त्याप्रमाणें ते पाठवितात. अशीं अधिकाराचीं ठिकाणें ६०० आहेत व तितके ठिकाणांहून मुकत्यार येतात.

१५ या सभेचे कारभार चालविण्यास मदत करण्याकरितां मदतनीस वगैरे पुष्कळ आहेत व या सभेंत लोक सर्व प्रकारचा अर्जा करितात व सर्व प्रकारचा विचार येथें प्रसिद्धपणें होतो. कायदे करण्याची सभा हीच. याहून राज्यांत वरिष्ठ अधिकारी दुसरा नाहीं. राणीसाहेबांनीं कारभार केला तरी या सभेस त्याचा हिशोब द्यावा लागतो व नवीन कर बसविण्यास तरी या सभेची परवानगी पाहिजे. राणीसाहेबांकडून वाजवी किंवा गैरवाजवी जें काय होईल किंवा परमुलकांत होईल त्याचा विचार येथें होत असतो. या सभेची सुरू महकुबी राणीसाहेबांकडून होती. एकदा सभा भरली म्हणजे ती एक वर्षापासून ६ वर्षांपर्यंत चालते. राजाकडून मनास येईल तशी वर्तणूक झाली तर येथें लागलीच तिची पंचाइत होते. प्रधान बदलावयाचें जरूर असल्यास येथें विचार होतो.

राणीसाहेबास एक्झिक्युटीव म्हणजे ठरलेले कायद्यांप्रमाणें काम चालविण्याचा अधिकार आहे; परंतु त्याची देखरेख व उघडीक वा सभेंत लोक करितात. याजकरितां या महान् सभेचा मोठा उपयोग आहे. वंशपरंपरेनें राजे राज्य करितात तेथें त्यांचा बंदोबस्त राहण्याकरितां अशी सभा पाहिजे, नाहींतर अनर्थ होईल. म्हणून लोकांना ही सभा कायद्यावरून स्थापन केली आहे. दुसरें या सभेत शाहाणा कोण व वेडा कोण हें त्याचे बोलण्यावरून सहजच प्रसिद्ध होतें.

१६ राणीसाहेबांचे दरबारांत बाहेरचे राज्यांतील वकील असतात. तसेंच परराज्यांत राणीसाहेबांचे वकील राहातात. त्यांचीं नांवें :—(वकिलास अंब्यासडर म्हणतात.) १ अमेरिका, २ आस्त्रिया, ३ बवेरिया, ४ बेलजियम, ५ ब्रेझील, ६ ब्यूनिसऐरिस, ७ डेन्मार्क, ८ फ्रान्स, ९ जर्मनी, १० ग्रीस, ११ हानोवर, १२ मेक्सिको, १३ नेदर्लंड, १४ प्रुशिया, १५ पोर्टुगाल, १६ परशिया, १७ रशिया, १८ सार्डिनिया, १९ साक्सनी, २० स्पेन, २१ स्वीडन, २२ स्विट्सर्लंड, २३ सिसिली, २४ टस्कनी, २५ ब्रेंटबर्ग, २६ टर्की.

१७ पदव्यांची कायद्यावरून व्यवस्था केली आहे ती अशी कीं, राज्यांत गादीवर असेल त्याची सर्वांहून श्रेष्ठ पदवी. त्याचे खालीं वडील पुत्र व त्याचे खालीं अनुक्रमानें राजगृहांतील मनुष्यें. त्याचे खालीं आर्च बिशप म्हणजे मोठेपदवीचे धर्माध्यक्ष, त्याचे खालीं लार्ड चान्सेलर, त्याचे खालीं अनुक्रमानें प्रधान,त्याचे खालीं खासगीकडील कामदार, त्यानंतर वंशपरंपरेचे बडे लोक व त्याचे पुत्र पदवीचे अनुक्रमानें. त्याचे खालीं नाइट, त्याचे खालीं जेंट्ल्मन (प्रतिष्ठित गृहस्थ). त्याचे खालीं भट व किरकोळ लोक. याप्रमाणें स्त्रियांचे पदवीचाही ठराव झालेला आहे. या राज्यांत वादग्रस्त असें कोणतेंही कलम नाहीं.

१८ राज्यावर कोणत्या अनुक्रमानें बसावें याविषयींही कायदा आहे. त्यामुळें तंटाभांडण वगैरे कांहींएक होत नाहीं. सर्व कारभार प्रधान मंडळी राणीसाहेबांचे नांवानें करितात. राणीसाहेब हजीर असणें जरूर नाहीं. नांव व शिक्का असला म्हणजे झालें. राणीसाहेब राहाण्याचे वाडे येणेंप्रमाणें आहेत :—

१ बकिंगहाम प्यालेस.
२ सेंट जेम्स प्यालेस—लंडनांत आहे.
३ उइंडसर क्यासल.
४ असबर्न—उत्तरेस अईल आफ् व्हाईट म्हणून लहानसें दयींत बेट आहे.
५ बालमोरल.

१९ राणीसाहेबांचा दहावा प्रधान सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया. यांजकडे हिंदुस्थानचा कारभार संपविला आहे. त्या प्रधानपदावर सर चार्ल्स वुडसाहेब आहेत व त्यांचे हाताखालीं मंडळी आहे त्यांचीं नांवें :—

१ अंडर सेक्रटरी-हुजूर.
२ असिस्टंट सेक्रटरी.
३ सेक्रटरी रेविन्यु.
४ सेक्रटरी जुडिशियल.
५ सेक्रटरी पोलिटिकल.
६ सेक्रटरी रेलवे.
७ सेक्रटरी पब्लिक वर्क्स.
८ सेक्रटरी जनरल.
९ सेक्रटरी मिलिटरी.
१० प्रायव्हेट सेक्रटरी.
११ मरीन डिपार्टमेन्ट.
१२ अकाउंटंट.
१३ आडिटर.
१४ कासियर.
१५ इन्स्पेक्टर आफ् स्टोअर्स.
१६ रिकार्ड-किपर.
१७ चीफ क्लार्क.

२० शिवाय सेक्रटरी आफ् स्टेट यांस सल्लामसलत देण्याकरितां १४ कौन्सलर आहेत. त्यांचीं नांवें :–

१ चार्लस मिल्स.
२ सर जेम्स हाग.
३ मेकनाटन.
४ मांगलस.
५ इस्टवीक.
६ किन्स्पेप.
७ जान पोलार्ड उलवी.
८ सर एर्स्किन पेरी.
९ मेजर जनरल सर बिवन.
१० सर मांटगमरी.
११ सर लारेन्स.
१२ कर्नल काटला.
१३ विलियम आर्बथनाट.
१४ कर्नल डुरंड.

२१ सदरहू कौन्सलदारांच्या तीन कमिट्या आहेत. एक नगदी, एक मुलखी, तिसरी राजकीय.

२२ सदर्हू इंडिया आफिसाचे ताब्यांत हिंदुस्थानचा गव्हरनर जनरल, ज्यास प्रतिनिधीपद आहे तो, आणि मद्रास, मुंबई, आग्रा व बंगाल हे चार गवरनर आहेत व यांचे मार्फत तिकडील त्यांचा सर्व कारभार चालत आहे. प्रत्येक गवरनरास कारभारी, मदतनीस, कौन्सलदार, सेक्रेटरी वगैरे कामदार नेमिलेले आहेत. हेंही सर्व कायद्यानेंच बांधलेलें आहे. कोणास संशय किंवा विपरीत इच्छा व्हावयासारखें पोकळ कांहीं राहिलें नाहीं. याप्रमाणें इंग्लंडचे राज्याची स्थिति आहे.

[नंबर १९०]

कायद्याप्रकरणीं (नंबर १०)

धर्मशास्त्र

ज्यांस कायद्याचें ज्ञान पुरतेपणीं व्हावें अशी इच्छा असेल, त्यांनीं धर्मशास्त्राचाही थोडाबहुत अभ्यास केला पाहिजे व हें आंग ज्यांस कमी आहे ते कायद्यांत निपुण झाले, असें कोणी समजूं नये. तसेंच केवळ धर्मशास्त्र शिकलेलाही मनुष्य फारसा उपयोगी नाहीं. कारण त्याच्याच नुसत्या अवलोकनानें तो गैरसमजुती, तामसी आणि जोगडा होऊन व्यवहाराच्या फारसा उपयोगीं पडणार नाहीं. यास्तव मुख्य इंग्लिश *ला*, त्यानंतर कायदे, *आक्टें*, वगैरे आणि त्यानंतर धर्मशास्त्रांतील विषय पाहिले पाहिजेत.

आतां धर्मशास्त्र म्हणजे काय व त्यांत काय आहे हें सांगण्याचा आमचा आजचा उद्देश आहे. प्राचीन ऋषींनीं धर्मशास्त्र लिहिलें ते ऋषी धर्माध्यक्ष तामसी लोक होते; यामुळें त्यांनीं व्यवहार व आचार बहुधा एकाच ग्रंथांत लिहिला आहे व आलीकडे कितीएक भट ग्रंथकार झालेले त्यांनींही असाच गोंधळ केला आहे. असो. तेव्हां धर्मशास्त्राचे पोटांत खालीं लिहिलेले ग्रंथ धरले पाहिजेत, असें आम्हांस वाटतें.

१ सूत्रें म्हणून प्राचीन ग्रंथ आहेत, त्यांत आचार बहुत असून लग्न वगैरे व्यवहारिक गोष्टींचे निर्णयही आहेत. यामुळें हे ग्रंथ धर्मशास्त्राचे असें मानिलें पाहिजे. सूत्रांचे ग्रंथ आहेत ते येणेंप्रमाणें :—

आश्वलायन–शांखायन, कात्यायन, बौधायन, आपस्तंब, हिरण्यकेशी, गोभिल, आंगिरस.

२ दुसरे प्रकारचे ग्रंथ स्मृति म्हणून आहेत, त्या येणेंप्रमाणें :—

मनु, पाराशर, अत्रि, विष्णु, वामन, हरित, याज्ञवल्क्य, उशन, यम, गौतम, शंख, देवल, व्यास, शातातप, वसिष्ठ, बृहस्पति, संवर्त, शौनक.

३ तिसरे प्रकारचे ग्रंथ पुराणें व उपपुराणें. तीं येणेंप्रमाणें आहेत :—

भविष्य, भागवत, मच्छ, मार्कंडेय, ब्रम्हांड, विष्णु, वराह, वामन, वायु, अग्नि, पद्म, लिंग, कूर्म, गरुड, स्कंद, ब्रम्हवैवर्त, गणेश, कालिका, मुद्गल.

४ चौथे प्रकारचे ग्रंथ उपस्मृति.

लोगाक्षी, जाबाली, काश्यप, कोकिल, नारायण.

५ पांचवे ग्रंथ स्मृतीवरील. भाष्यें, टीका, कारिका, व्याख्या, दीपिका, वृत्ती, इत्यादि एकेक स्मृतीवर बहुत ग्रंथ झाले आहेत, ते येणेंप्रमाणें :—

१ मनुसंहितेवर.
मेधातिथी – गोविंदार्णव.
नंदराज – कुल्लूकभट्टकृतमन्वर्थमुक्तावली.
२ पाराशरावर – माधवाची व्याख्या.
३ याज्ञवल्क्यावर – विज्ञानेश्वरानें केलेली मिताक्षरा नांवाची टीका.

याप्रमाणें दरएक स्मृतीवर टीकाकार झाले. त्यांनीं त्यावर तपशीलवार व्याख्यानें केलीं आहेत व दुसऱ्या स्मृतींशीं मेळ घालून आणि विचार करून दरएक नियमाचा खुलासा केला आहे. या ग्रंथकारांची मेहनत पाहिली असतां फार आश्चर्य वाटण्यासारिखें आहे. त्यांनीं जे जे शोध, पुरावे व विचार केले आहेत, ते इतके बारकाव्यानें आहेत कीं, जर त्यांतील विषय मोठ्या महत्त्वाचे असते तर त्यांपासून लोकांस अतिशय उपयोग झाला असता, पण तसें न होता निरुपयोगी विषयावर अक्कल फार खर्च झाली. यामुळें त्यांची मेहनत व्यर्थ गेली आहे. तत्रापि ज्याकाळीं हे ग्रंथ झाले, त्याकाळीं हे ग्रंथ उपयोगी विषय या देशांत नवते. म्हणून केवळ ग्रंथ करणाराकडेही तो दोष लावतां येत नाहीं. त्याकालीं जे विषय चालू होते, त्यांवर त्यांनीं पराकाष्ठा केली आहे व त्याचप्रमाणें हल्लीं जे नवीन विषय या देशांत आले आहेत, त्यांवर आपण मेहेनत करून नवीन ग्रंथ केले पाहिजेत.

६ साहावे प्रकारचे ग्रंथ दोन–तीनशें वर्षांत आलीकडील पंडितांनीं केले आहेत, त्यांस पौरुष ग्रंथ म्हणतात. आणि नवीन कल्पनेचे ग्रंथ करणारे ऋषी होते, त्यांचे ग्रंथांस आर्ष म्हणतात. पुढें लोकांनीं नवीन कल्पना चालविण्याचें सोडून दिलें. यामुळें ऋषी नाहींसे झाले. आणि त्यांचे जागीं पंडित झाले. त्यांनीं मागल्या आधारानें शास्त्र सुलभ करण्याचे हेतूनें ग्रंथ केले. ते येणेंप्रमाणें :—

गोपीनाथभट्टी, महेशभट्टी, बाळंभट्टी, नारायणभट्टी, शंकरभट्टी, वीरमित्रोदय.
नीलकंठकृत मयूख १२. त्या प्रत्येकांचीं नांवें :—
१ प्रायश्चित्त, २ श्राद्ध, ३ संस्कार, ४ शांति, ५ व्यवहार, ६ समय, ७ नीति, ८ प्रतिष्ठा, ९ उत्सर्ग, १० आचार, ११ दान, १२ शुद्धी.

तसेच कालमाधव वगैरे १२, हेमाद्री १२, द्योत १२. शेखर १२; कमलकराचे ग्रंथः–निर्णयसिंधु, शांतिकमलाकर, आन्हीक कमलाकर, पूर्तकमलाकर, शूद्रकमलाकर, इत्यादि. भट्टोजीचें आन्हीक, अनंतभटाचें कौस्तुभ, शिवाय दलपत, मीमांसा दत्तकप्रकरणीं. आणखी कल्प म्हणून कितिएक ग्रंथ आहेत. याखेरीज गदाधर, तर्कभाष्य, भोजनकौतुहल, दायतत्त्व, मदनपारिजात, तिथिनिर्णय, जातिविवेक, व्रतकौमुदी, पुरुषार्थचिंतामणी, जैसिंगप्रताप, प्रयोगदर्पण, व्रतार्क इत्यादि आलीकडे झालेलेही पुष्कळ ग्रंथ आहेत.

स्मृतीमध्येंही लघुस्मृति व बृहत्स्मृति, अशा कितिएक ऋषींच्या स्मृति आहेत.

तशाच वृद्ध म्हणूनही कितिएक आहेत. जसें लघुपाराशर, वृहत्पाराशर, वृद्ध शातातप इ०

७ सातवे प्रकारचे ग्रंथ भारत, रामायण, वगैरे. यांत कांहीं धर्मशास्त्राचे विषय आहेत तेही मान्य झाले आहेत. पुराणांत तरी धर्मशास्त्राचे विषय बहुत येतात व त्यांजवरून कितीएक स्मृति रद्द झाल्या आहेत. सबब त्यांचा धर्मशास्त्रांत संग्रह होतो.

जसें ज्योतिषामध्यें मुहूर्तज्योतिष व गणितज्योतिष हीं पृथक् आहेत, तसेंच धर्मशास्त्रांतील आचारभाग वेगळे निवडून कितिएक ब्राम्हण पढतात. कितीएक ब्राम्हण व्यवहारभाग पढतात. अदालतीकडील शास्त्री वगैरे हे मुख्यत्वेंकरून व्यवहारभाग शिकतात आणि गांवखेड्यांतील भट सुतक, लग्न, मुंज, श्राद्ध इत्यादि सांगायाचे हेतूनें आचार पढतात. आचारांत श्रौत भाग वेगळाच आहे. आणि धर्मशास्त्राची स्मार्त भाग वेगळाच आहे.

धर्मशास्त्रांतील व्यवहाराशीं तूर्त आपल्यास प्रयोजन आहे म्हणून व्यवहारांतील प्रमुख ग्रंथ मयूख नांवाचा आहे; यास्तव त्याचाच आपण विचार करूं. यांत विषय काय काय आहेत ते लक्षांत येण्याकरितां प्रथम त्यांतील प्रकरणांची याद सांगतों.

१ व्यवहारमातृका,	२ प्रमाण,	३ लेख्य,	४ मुक्ति,
५ दिव्य,	६ साक्षी,	७ दायविभाग,	८ स्वत्व,
९ दत्तक,	१० अविभाज्य,	११ सप्रतिबंधदाय,	१२ संसृष्टि,
१३ स्त्रीधन,	१४ अनंश,	१५ ऋणादान,	१६ आधी,
१७ प्रतिभू,	१८ निक्षेप,	१९ संभूयसमुत्थान,	२० दत्ताप्रदानिक,
२१ अभ्युपेत्यशुश्रूषा,	२२ वेतनादान,	२३ संविदव्यतिक्रम,	२४ क्रीतानुशय,
२५ विक्रियासंप्रदान,	२६ सीमाविवाद,	२७ वाक्पारुष्य,	२८ दंडपारुष्य,
२९ स्तेय,	३० साहस,	३१ स्त्रीसंग्रहण,	३२ प्रकीर्णक.

आतां या विषयांतील लेख्य व साक्षी यासंबंधीं *'ला ऑफ् एव्हिडन्स'* याचे नियम इंग्रजींत चांगले आहेत, सबब यांची गरज नाहीं. तसेंच दिव्य अयोग्य, सबब रद्द झालें. आणि दंडपारुष्य व स्तेय इत्यादि पिनलकोडवरून व्यर्थ गेले. बाकी उपयोगी विषय दाय म्हणजे वार्सा, विभाग म्हणजे वांटणी, दत्तक, ऋणादान, कर्ज व स्त्रीधन. इतकीं प्रकरणें अद्याप कोडतांत चालू आहेत. संभूयसमुत्थान म्हणजे पातीनें व्यवहार करणें त्याजबद्दल *ला आफ् कंट्राक्ट* आहे. सबब त्याची गरज नाहीं व स्त्रीसंग्रहण म्हणजे लग्नप्रकरण हें अद्याप चालू आहे. यास्तव जितकीं सांप्रत चालू आहेत, तितकीं माहित असणें योग्य आहे. आणि जो मनुष्य या देशांतील आहे, त्यास तर हें ज्ञान अवश्यच आहे. आणि एथपर्यंत संस्कृताची ज्यास माहिती नाहीं, त्यास सुज्ञ म्हणतां येणार नाहीं.

धर्मशास्त्रामध्यें पांच शाखा आहेतः—१ काशी, २ गौड, ३ मैथील, ४ महाराष्ट्र, आणि ५ द्राविड. इतक्या ठिकाणीं कांहीं विशेष चाली वगैरे आहेत. यास्तव त्यांचीं

वेगळालीं पुस्तकें त्या त्या देशीं मान्यता पावलीं आहेत. काशीस याज्ञवल्क्याची योग्यता विशेष. गौडांत जीमूतवाहन या ग्रंथास विशेष मानितात व महाराष्ट्रांत नीलकंठकृत मयूख चालतो.

सदरीं लिहिल्यावरून धर्मशास्त्राचा विस्तार फार आहे, असें लक्षांत येईलच. यास्तव आलीकडे जे पंडित ग्रंथकार झाले, त्यांनीं हें काम केलें आहे कीं, दरएक विषयास स्मृतींत, उपस्मृतींत, पुराणांत टीकाकार यांचीं मतें इत्यादि लेख कसे आहेत, ते दाखल केले, याजमुळें दुसऱ्या स्मृति व पुराणें पाहाण्याचें कारण राहिलें नाहीं. त्या सर्वांतील जें घेण्यासारखें तें त्यांनीं घेतलें आहे. याचप्रमाणें कमलाकर इत्यादिकांनीं निर्णयसिंधूंत वगैरे संग्रह केला आहे. मुळीं माधव आणि हेमाद्री हे दोन गृहस्थ या कामास लागले. त्यांस आठ-नऊशें वर्षें झालीं. हेमाद्री हा देवगिरी म्हणजे दौलताबादचे जाधवराजाचा दिवाण, व माधव हा विजयनगरच्या राजाचा दिवाण. विजयनगरचा राजाही विद्वान् होता. नंदराजकृत मनुव्याख्या ही या राजानें केली. याचा दिवाण माधवही तसाच होता. यानें संन्यास घेतल्यावर याचें नांव विद्यारण्य पडलें. परंतु यानें चतुर्थाश्रमांत ही आपली ग्रंथ करण्याची इच्छा सोडिली नाहीं. हजारों ग्रंथ यानें केले आहेत व यानें एक ग्रंथ केला म्हणजे त्याच्या जोडीचा हेमाद्री करी व हेमाद्रीचा झाला म्हणजे त्यावर ताण दुसरा हा करी. अशी यांची लेखणीची चढाई लागली होती. याप्रमाणें पूर्वीच्या ऋषींनीं नवीन ग्रंथ व स्मृति केल्या व त्यांचा ढीग बराच झाला. पुढें लोक असें समजूं लागले कीं, आम्ही ऋषी नव्हे व आपणांस नवीन कांहीं कर्तव्य नाहीं व त्याकाळीं मागील ढिगांची तपासणी करण्यासच पुष्कळ वेळ पाहिजे. एवढा ढीग झाला होता. म्हणून ही प्रवृत्ति चालू झाली कीं, मागील ग्रंथस्मृति व पुराणें इत्यादि यांचीं जीं अनेक विरुद्ध मतें आहेत, त्यांची मेळवणी करावी. ती मेळवणी त्यांनीं कशी केली आहे, तिचा मासला पहावा.

ब्राम्हणांनीं क्षत्रिय, वैश्य, शूद्र या तिन्ही जातीच्या मुलींशीं लग्न करावें, असा मनूचे धर्मशास्त्राचा नियम होता व पुराणाचे आधार त्याविरुद्ध मिळूं लागले, तेव्हां रद्द किंवा खोटें तर कोणास म्हणतां येईना. मग त्यांनीं अशी कल्पना केली कीं, ते कलियुगांत मात्र रद्द समजावे. तसेच द्वादश पुत्र मनूनें लिहिले आहेत, त्याप्रमाणें करण्यास लोकांस लज्जा वाटूं लागली. यामुळें पुराणांतील आधारानें बारांपैकीं दोन पुत्र म्हणजे दत्तक व औरस हे मात्र कायम ठेविले. त्याचप्रमाणें ब्राम्हण पूर्वी मांस खात होते व त्यांचीं श्राद्धें, लग्नें, यज्ञ व मेजवान्या मांसाशिवाय होत नवत्या. कोणत्या जनावराचें मांस खावें व कोणत्याचें न खावें याविषयीं मनूनें पंचमाध्यायीं तपशीलवार फेरिस्त लिहिलें आहे. परंतु पुढें जैनधर्माची प्रवृत्ति वाढली, तेव्हां दयाधर्म वाढून ही प्रवृत्ति बुडाली व फक्त शूद्रांमध्यें राहिली. तेव्हां पुराणांतील प्रमाणें घेऊन ही गोष्ट स्थापन केली व यज्ञ वगैरे कलींत निषिद्ध असें ठरविलें. अग्निहोत्रच मुळीं

निषिद्ध केलें; परंतु याविषयीं वाद आहे. गुजराथ वगैरे प्रांतीं अग्निहोत्र घेऊं नये म्हणतात. व दक्षिणी ब्राम्हण घ्यावें म्हणतात व त्याप्रमाणें घेतात आणि यज्ञांत मांसही खातात. मनूनें कन्येस व स्त्रीस विभाग लिहिला आहे; पण आलीकडे तो मोडून टाकला. अशी बरीच रद्दबहाली धर्मशास्त्रांत झाली आहे. व्यवहार व आचार या दोनही प्रकरणांत असें झालें आहे. आणखी या सर्व ग्रंथांत एक मोठा चमत्कार वाटतो कीं, लिहिणारांनीं हजारों ग्रंथ लिहिले व व्याख्या वगैरे केल्या; परंतु कोणीं नवीन कल्पना काढूंच नये आणि आहे त्यांत घोटाळावें, असा या सर्व ग्रंथकारांचा ठराव होता कीं काय कोण जाणे.

सदर्हू धर्मशास्त्रांत कितीएक गोष्टी मुळापासूनच वाईट आहेत व कितीएक हल्लींचे कालमानानें वैगुण्य दिसतात. याकरितां धर्मशास्त्र दुरुस्त होण्याची फार अवश्यकता आहे, परंतु मागाहून ओघ असा चालत आला आहे कीं, धर्मशास्त्र फिरवावयाचें नाहीं. या गोष्टीबद्दल लोकांची अजून समजूत पडली नाहीं, ती पडली पाहिजे. कायद्यामध्यें तर मुख्य गोष्ट अशी आहे कीं, कालांतरानें शास्त्र फिरविलें पाहिजे. सर्वकाल एक औषध घेईन म्हणून निश्चय केला तर आरोग्य व्हावयाचें नाहीं. तसेंच शास्त्र व व्यवहार सर्वदा फिरवावे लागतात. ही गोष्ट लोकांस कळली म्हणजे सुधारणा सर्वांस मान्य होईल.

जुने कायदे करणारे मनु, याज्ञवल्क्य इत्यादि यांनीं जसे त्यांचे मनास आले तसे ठराव केले आहेत. तथापि त्या कालाचें ज्ञान जितकें होतें त्याप्रमाणें प्रजेच्या कल्याणार्थ त्यांनीं शास्त्र केलें म्हणून त्यांचे उपकारच आपण मानिले पाहिजेत. आतां यांत दुरुस्ती करणें हा आपला धर्म होय व तो आपण न करितां केवळ मूळचे ग्रंथकारांस निंदावें हें योग्य नाहीं.

आतां आणखी दुसरा एक विचार असा आहे कीं, या धर्मशास्त्राचे ग्रंथांवर ज्यांचीं नांवें घातलीं आहेत, त्यांनीं हे ग्रंथ केले नसून दुसऱ्या ब्राम्हणांनीं त्यांचीं नांवें आदरार्थ घातलीं आहेत. मनूचा ग्रंथ व याज्ञवल्क्याचा ग्रंथ दुसरे लोकांनीं लिहून आदरार्थ मोठ्यांचीं नांवें घातलीं आहेत व असें करण्याची संस्कृत ग्रंथकारांची फार चाल आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सागर उवाच, भागिरथी उवाच, ज्वर उवाच, हिमालय उवाच, गरुड उवाच, अशीं वचनें नेहेमीं आढळतात. तर त्याठिकाणीं ते ते बोलले असें नाहीं. तें कवीचें लाघव आहे, इतकाच त्याचा अर्थ. दुसरें आणखी असें आहे कीं, हीं धर्मशास्त्राचीं पुस्तकें संपूर्ण लोकांनीं कधीं मान्य केलीं असतील असें नाहीं व हल्लींही उगीच मान्य मान्य म्हणतात. परंतु त्यांतील सर्व नेम कोणी मानीत नाहीं व ते सर्व मानावयासारखेही नाहींत. ते फक्त वाचण्यासारखे मात्र आहेत. हें पर्यवसान लक्षांत ठेविलें पाहिजे.

[नंबर १९१]

कायद्याप्रकरणीं (नंबर ११)

इनसाफ

इनसाफ शब्दाचा अर्थ समानता. म्हणजे एकाचे कोणी पांचशें रुपये घेतले आणि दिले नाहींत, तर ते त्यास देववावे, आणि समानता करावी. ही समानता स्थापण्याकरितां लोकांस पैक्याचा उपयोग फार पडतो. कारण मनुष्यांमध्यें अनेक तऱ्हेचे व्यापार होतात व ते कितिएक असमान जातींमध्यें होतात. समान जातींमध्यें व्यवहार झाला तर द्रव्यावांचूनही चालेल. जसें कुणब्यानें कुणब्याचे बैल उसने आणिले तर त्यास गरज लागेल त्यादिवशीं त्यानें आपले देऊन त्याचें ऋण फेडलें म्हणजे झालें. एथें पैक्याचे मध्यस्तीचें कारणच नाहीं. परंतु वैद्यानें आजारी कुणब्यास औषध देऊन बरा केला तर त्याचे फेडीस कुणब्याचे बैल किंवा नांगर घेण्याची वैद्यास गरज नाहीं. तेव्हां कुणब्यानें ह्यास त्याचे श्रमाचे समान द्रव्यच देऊन त्याचें ऋण फेडिलें पाहिजे. व्यवहारामध्यें द्रव्य हें समानता दाखविणारें आहे. एकानें दुसऱ्याचा तांब्या हारविला तर त्याची समानता इतकींच कीं, त्याबद्दल नियमित द्रव्य द्यावें, म्हणजे इनसाफ झाला. दुसरें नुकसान व अन्याय यांचा अर्थ असमानता, आणि समानतेपेक्षां अधिक जें मिळतें तो लाभ किंवा नफा होय. उदाहरण कोणीं शंभर रुपयांचें कापड घेतलें व पुढें तें विकून शंभर रुपये उत्पन्न झाले तर समान झालें, आणि त्यांत कमी झालें तर नुकसान होय व अधिक झालें तर नफा होय. दुसऱ्याचें कांहीं घेणें हें तरी त्यास असमानता म्हणजे नुकसान करणेंच आहे व तें परत देवविणें हा इनसाफ आहे. आणि हा विचार दिवाणी इनसाफास ठीकच आहे. परंतु फौजदारीस तसा लागत नाहीं. तत्रापि कितिएक जुने शास्त्रकारांनीं नीतीचें मर्म न पाहातां तींतही समानतेसारखेंच ठरविलें आहे कीं, जशास तसा बदला द्यावा. म्हणजे एकानें दुसऱ्याचा हात मोडला तर त्याचा तो हात मोडावा. तसेंच ज्यानें जीव घेतला त्याचा जीव घ्यावा इत्यादि. परंतु यांतही भेद ठेवला आहे कीं, कोणीं व्यभिचार केला तर त्याचा मोबदला नुकसानदाराकडून करवीत नाहींत. कारण तसें केलें असतां अपराधाची वृद्धि होईल. याजकरितां कित्येक ठिकाणीं उलट न करितां दंडाची योजना करावी लागते. शिक्षेचे हेतु दोन आहेत: एक भय व दुसरा सुधारणा. आतां शस्त्रानें दुसऱ्यास मारणाराचा हात तोडला तर लोकांस फार भय वाटेल व जिकडे जिकडे तो मनुष्य फिरेल तिकडे ही गोष्ट प्रसिद्ध होऊन लोकांस दहशत वाटेल, परंतु दुसरा हेतु मुळींच सिद्धीस जाणार नाहीं. कारण हात तोडला गेल्यावर मग त्यानें आपली खोड सोडिली कीं नाहीं, हें पाहाण्यास कांहीं आधार राहिला नाहीं. याच कारणास्तव फांशीं देण्याची शिक्षा अयोग्य आहे असें कितीएकांचें मत आहे.

मुसलमानांचे शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, खून करणारानें वारसाचें मनसंतोष होईल तितके रकमेपर्यंत अपराध्यास दंड करून तें द्रव्य मेलेले मनुष्याचे वारसास द्यावें. ते म्हणतात कीं, मनुष्य मरून गेला तो तर येत नाहीं, मग दुसरा खून सरकारनें करण्यांत तात्पर्य काय? मृताचे वारस राहिले त्यांस यथासंतोष द्रव्य दिलें म्हणजे त्यांचें नुकसान होत नाहीं. परंतु या कायद्याचा वाईट परिणाम असा झाला कीं, श्रीमंत गरिबांस मारूं लागले आणि दंड देऊं लागले. यामुळें गरिबांच्या जीवाचें रक्षण होईना. तेव्हां भयंकर शिक्षा ठरवून कोणी कोणाचा जीव घेऊं नये असें केलें.

गुन्हे बंद होण्यास अदालत भरवशाची असली पाहिजे. म्हणजे तींत जो निवाडा किंवा शिक्षा होईल ती विनाकारण फिरूं नये. इंग्रजी राज्यांत हा निश्चय पूर्ण आहे, यामुळें लोकांस भयही पक्कें राहातें व दंगे, बखेडे होत नाहींत. परंतु नेटीव राज्यांत अदालत म्हणजे केवळ हिमायती, भिडा, अभिमान, लांच इत्यादिकांचें रंगांगणच असतें. त्यांचे ठराव होण्याचे पूर्वी जनानखान्यांतून, आर्जवी लोकांकडून भिडा येत असतात व त्यामुळें न्यायाधीशास कांहीं सुचेनासें होतें. मग कदाचित् तो फार प्रामाणिक असला तर मोकदमा बाधून ठेवितो. इतकें तरी निदान झालेंच पाहिजे. नाहीं तर उपजीविकेस विघ्न उत्पन्न होईल. इत्यादि कारणामुळें लोकांस अदालतीचा भरवसा मुळींच नसतो. न्याय हा शब्द कोणी जाणतच नाहीं व भीड आणि हिमायत हेंच लोकांस ठाऊक असतें. असें असतांही स्वराज्यांत मोठे अनर्थ होत नाहींत, याचें कारण इतकेंच आहे कीं, इंग्रज सरकारचें भय फार. राजास, प्रधानास व रयतेस देखील इंग्रज सरकारचा दबदबा आहे. यामुळें मोठाले अनर्थ होत नाहींत. अशी जरब जर नसती तर स्वराज्याची काय भयंकर स्थिति होती ती समजली असती. फार काय सांगावें, इंग्रजांचा दरारा नसेल तर मराठी राज्यांतील सोन्याचीं ताटें व रुप्याच्या चौक्या कोणीकडे जातील त्याचा ठिकाणदेखील लागणार नाहीं. आसपासचे भिल्ल व कोळीच तीं घेऊन जातील; परंतु इंग्रज सरकारचे भयामुळें हे नेटिव राजे आपआपले ठिकाणीं स्थीर आहेत. हा त्यांनीं मोठा आभारच मानावा. अस्तु. न्यायाचे कामांत सर्वांस सारखे मानिलें पाहिजे. न्यायसभेंत जे सभासद असावे त्यांचे गुण याज्ञवल्क्यानें ज्या स्मृतींत वर्णिले आहेत ती स्मृति व्यवहारमयूखकारानें घेतली आहे, ती अशीः—

श्रुताध्ययनसंपन्ना धर्मज्ञाः सत्यवादिनः ॥
राज्ञा सभासदः कार्या रिपौ मित्रे च ये समाः ॥ १ ॥

अर्थ— विद्वान, धर्मज्ञ, सत्यवादी व शत्रुमित्रांच्या ठायीं ज्यांची समबुद्धि असे सभासद असावे.

व्यासानें अमात्याचे गुण लिहिले आहेत कीं,

"सर्वशास्त्रार्थवेत्तारं अलुब्धं न्यायभाषितं ॥
विप्र प्राज्ञं क्रमायातममात्यं स्थापयेत् द्विजं ॥ २ ॥"

अर्थ—धर्मशास्त्रवेत्ते, अलुब्ध, न्यायी व प्राज्ञ असे ब्राम्हण अमात्यपदीं नेमावे.

धर्मशास्त्रांत राजाची सभा म्हणजे कोडत यांत राजा म्हणजे जड्ज, सभासद म्हणजे जुरीदार, प्राड्विवाक म्हणजे शिरस्तेदार, लेखक म्हणजे कारकून, गणक म्हणजे नाजर, श्रेणीपूग म्हणजे मेहेतरी चौधरी, श्रोतार म्हणजे कोडतांतील न्याय पाहाण्यास जमलेलीं माणसें, साध्यपाल म्हणजे पट्टेवाले या सर्वांचें वर्णन केलें आहे व त्यांतून कारकून कसे असावे याविषयीं बृहस्पतीचें वचन मयूखकर्ता नीलकंठभट्ट जो भगवत् देवराजा याचे आश्रयास असून त्यानें मयूखाचे १२ भाग केले त्यांत लिहिलें आहे तें असें—

"शब्दाभिधानतत्त्वज्ञौ गणनाकुशला शुची ।
नानालिपिज्ञौ कर्तव्यौ राज्ञा गणकलेखकौ ॥ ३ ॥"

अर्थ—शब्दावर लक्ष ठेवून कर्म जाणणारे, हिशेबी, कुशल, निर्मल व अनेक भाषा आणि लिपि जाणते असे कारकून असावे.

नंतर कोडताची वेळ, सुट्या व अंमलदारानें बसण्याचीं स्थानें सांगून पुढें न्यायाचें मूळतत्त्व असें सांगितलें आहे कीं, केवळ शास्त्रच न मानितां न्याय आणि युक्ति यांवर न्यायाधीशानें लक्ष ठेविलें पाहिजे. याविषयीं बृहस्पतीचें वचन—

"केवलं शास्त्रमाश्रित्य न कर्तव्यो हि निर्णयः ।
युक्तिहीने विचारे तु धर्महानिः प्रजायते ॥ ४ ॥"

अर्थ—केवळ शास्त्र पाहूनच ठराव करूं नये. त्यांत युक्ति पाहिली पाहिजे. युक्तिविरहित जो विचार तो धर्महानिकारक होय.

नार्टनसाहेबांचें न्यायविषय नांवाचें पुस्तक आहे. त्यांत ६३ वे पृष्ठावर हें वचन घेऊन त्यावर इंग्लंडांतील मतें दाखल केलीं आहेत कीं, असेंच मत न्यायाधिशांचें असावें. यानंतर दुसरें एक न्यायाचें मूलतत्त्व मयूखकारानें लिहिलें आहे कीं, प्राचीन वहिवाटी न्यायाधिशांनीं लोकांचे संतोषार्थ रक्षण कराव्या. बृहस्पतीचें वचन :—

"देशजातिकुलानां च ये धर्माः प्राक् प्रवर्तिताः ।
तथैव ते पालनीयाः प्रजा प्रक्षुभ्यतेऽन्यथा ॥ ५ ॥"

अर्थ—देशाचे, जातीचें व कुलाचे पूर्वीपासून जे धर्म चालत आले त्यांचें राजानें संरक्षण करावें. तसें न केल्यास प्रजा क्षोभ पावेल.

यानंतर वाईट चाली कोठें आहेत, त्याही लिहिल्या आहेत. म्हणजे कोठें आईचे गोत्रांतील स्त्री करितात, कोठें गोमांस खातात, कोठें व्यभिचार फार आहे, कोठें मद्यपान, कोठें विटाळशीचा विटाळ मानीत आहेत, असे हिंदुस्थानांतील प्रदेश वर्णन केले आहेत.

तर यावरून दिसून येईल कीं, अडीच तीन हजार वर्षांचे पूर्वी ज्यांनीं या स्मृति लिहिल्या त्यांत धर्म कसे असावे व व्यवहार कसा असावा, याविषयीं मनु इत्यादिकांनीं

स्वशक्तीनें विचार केला आहे. परंतु पुढें लोकांमध्यें मूर्खपणा वाढून, पहिलीं धर्मशास्त्रें सुधारून नवीं लिहिण्याची रीति बंद झाली. पहा, पूर्वी ही रीत चालू होती म्हणून अनेक ऋषींनीं नवीनवी सुधारणा केली. एकंदर स्मृति चाळीसपन्नास आहेत म्हणजे दरएक वेगळ्या प्रकरणाचें वेगळ्या ऋषींचें कायदेबूक आहे व त्या परस्परांमध्यें बहुत तफावत असतां ते सर्व लिहिणार ईश्वरी पुरुष होते व आतां त्यांचें कांहीं फिरवावयाचें नाहीं, असें लोकांनीं मानिलें ही फारच मोठी चुक होय व तीपासून फार अनर्थ झाला. कायदा जो आहे तो काळाचे पाठीमागून जाणारा आहे. म्हणजे जसा काळ बदलेल तसें त्यास बदललें पाहिजे, हें कायदे करण्याचें मूलतत्त्व आहे. त्याचा लाभ हिंदुलोकांस नाहींसा झाला व जुने कायदे कितिएक स्थलीं पुढील कालाचे मानानें अयोग्य झाले आणि लोकांस दुसरे तर मिळेनात. तेव्हां त्यांचा परिणाम इतकाच झाला कीं, ते सर्व रद्द झाले म्हणजे त्यांस कोणी मानीनासा झाला व पुढें हजार पंधराशें वर्षेपर्यंत असा घोर काळ गेला कीं, त्यांत राज्यास कांहींच बंद नाहीं. सर्व वेबंद कारभार होऊन गेला. आतां असें उदाहरण पाहा कीं, ज्या घरास रिपेर करावयाची नाहीं, अशी धन्यानें प्रतिज्ञा केली तर तें घर पडेल यांत संशय नाहींच. दागदुजी करीत असतां जीर्णता येते. मग दागदुजी न करितां नाश होईल हें काय विचारावें? याप्रमाणें राज्यास कायदे जुने नाहींत व नवे नाहींत, असें अज्ञान माजलें. तेणेंकरून लोकांस क्षीणता आली. इतक्यांत पुढें मोंगलाई झाली त्यावेळेसही कायदे नाहींतच. नंतर मराठ्यांचा राज्याचा मूळ पुरुष शिवाजी राजा झाला. त्यानें कायदा घालावा अशी कल्पना चालवून अष्टप्रधान, किल्लेदार, नाईक, सेनापती, न्यायाधीश इत्यादि स्थापन केले. हें महाराष्ट्रदेशांत कायदा घालण्याचें दोन हजार वर्षांचे काळानंतरचें पहिलें कृत्य झालें. परंतु शिवाजीसारखा बुद्धिमान् पुरुष पुढें कोणी झाला नाहीं, यामुळें तो क्रम बिघडला. पुढें राज्यकारभार करणारे नाना फडणवीस इत्यादि झाले व हल्लींही शिंदे, होळकर, गायकवाड, इत्यादि ठिकाणीं कारभारी आहेत. पण यांत असा बुद्धिमान पुरुष कोणी झाला नाहीं कीं, ज्यानें राज्यास कायदा करून चिरकालिक स्वरूप दिलें; पद्ध्या स्थापन केल्या; दिवाणी, फौजदारी, लष्करी, कामाची कायदेशीर दुरुस्ती केली. असें करणारा कोणी जन्मास आलाच नाहीं व कोणतेही राज्यास कायदेशीर स्थिती लागली नाहीं. राज्य म्हणजे घोटाळा, मनास येईल तसें करावें, इतकाच अर्थ हल्लीं आहे. अशा प्रसंगीं इंग्रेजसरकारचे अमलांत जे देश आहेत तेथें, कायदा कसा असावा, त्याचे कर्ते कोण असावे, त्यांची प्रसिद्धी कशी असावी व त्यांस कसें मानावें हें लोकांस ठाऊक झालें आहे.

या हिंदुस्थानांत स्मृतिकारांचे काळापासून कायद्याची बिस्मृती झाली होती, त्याचें स्मरण इंग्रज सरकारानें केलें. हें राज्य बरोबर कायद्याप्रमाणें चालत आहे. हरएक खात्यास कायदा आहे व तो चालविण्याकरितां अंमलदार आहेत. हें राज्य मराठ्यांचें,

मुसलमानाचें व इतर संस्थानिकांचें आसपास जरी आहे, तरी त्यांपैकीं बहुतांस तें वळण अजून लागत नाहीं ही एक मोठे आश्चर्याची गोष्ट आहे.

इंग्लिश सरकारांत जें करणें तें प्रसिद्धपणें होतें हें एक मोठें सुधारणेस साधन आहे. राज्याचे जमाखर्च, तहनामे, कायदे वगैरे जें काय कारभारी करितात तें सर्वांस जाहीर करितात व वर्तमानपत्रद्वारें त्याचा विचार सर्वदा होतच असतो; यामुळें नवीन कल्पना, नवीन युक्ति व नवीन विचार पहिल्या भांडवलांत भरतीस पडत जातात. हें एक लक्षांत ठेवण्यासारखें कृत्य आहे.

[नंबर १९२]

कायद्याप्रकरणीं (नंबर १२)

कामन ला

व्यवहारशास्त्रामध्यें मुख्य दोन भाग आहेत. एक "*स्टाटुट ला*" म्हणजे लिहिलेले कायदे; त्यांस लाटीन भाषेंत "*लेक्स स्क्रिप्टा*" म्हणतात. दुसरा *कामन ला* म्हणजे प्रवृत्त झालेल्या चाली. आतां कोणतेही देशांत पाहिलें तरी सर्व गोष्टी लिहून कायदे करण्यास कोणी समर्थ नसतो, यास्तव कितिही ग्रंथ झाले तरी कितीएक चाली लिहिल्याखेरीज राहातात. जेव्हां धर्मशास्त्रांवाचून दुसरा कायदा हिंदुस्थानांत नव्हता. अशा काळीं म्हणजे मोंगलाईच्चे पलीकडे क्षत्रिय राजांचीं राज्यें होतीं, त्या काळीं, धर्मशास्त्र, स्मृति इत्यादि हींच *स्टाटुट ला* होतीं. आतां हल्लींचे सरकारानें कायदे व आक्ट केले यामुळें त्यास "*स्टाटुट ला*" असें म्हणतात. धर्मशास्त्रास "*रिलिजस ला*" म्हणतात. याखेरीज लेखांत आल्याखेरीज लोकग्रहित ज्या चाली आहेत, त्यांस "*कामन ला*" असें म्हणावें. हिंदुस्थानांत *कामन ला* आहे हें दाखविण्याकरितां हा मजकूर आम्ही लिहितों.

*स्टाटुट ला*पेक्षां *कामन ला* वरिष्ठ नाहीं. परंतु *रिलिजस ला*पेक्षां तो वरिष्ठ आहे, असें कायद्यानें हल्लीं ठरविलें आहे. सन १८२७ चे चौथे कायद्याचे २६ वे कलमांत विलायतचे सरकारानें हिंदुस्थानसंबंधीं कायदे केले आहेत ते व हिंदुस्थानचे इंग्रज सरकारानें कायदे व आक्ट इत्यादि केले आहेत, त्या सर्वांचा समावेश *स्टाटुटांत* होतो; त्या स्टाटुटास प्रथम स्थल दिलें आहे. त्यानंतर देशचाली व रिवाज म्हणजे *कामन ला* यांस दुसरें स्थळ, व त्यानंतर धर्मशास्त्र तिसरे ठिकाणीं घातलें आहे. यावरून धर्मशास्त्रापेक्षां देशरिवाजाची मातबरी अधिक आहे हें स्पष्ट होतें.

आतां "*कामन ला*" चीं कांहीं उदाहरणें लिहितों, त्याजवरून स्पष्टार्थ होईल.

शूद्राच्या स्त्रिया नवऱ्यापासून फारखत घेऊन दुसरें लग्न करितात त्यास पाट किंवा नांतरें असें म्हणतात. हा पती-मरणोत्तर पुनर्विवाह नव्हे. परंतु सजीव नवऱ्याची सौभाग्यवती स्त्री दुसरा नवरा करिते. असें करण्यास धर्मशास्त्रांची अनुकूलता नाहीं, आणि याविषयीं कांहीं कायदा ठरला आहे असें नाहीं. परंतु प्रवृत्तीचा विस्तार फार आहे. म्हणून असा काडी मोडून देऊन किंवा पदर फाडून देऊन पाट केला असतां व्यभिचार होत नाहीं, असा रिवाज आहे. पति-मरणोत्तर विवाह करावा किंवा नाहीं आणि पौनर्भव पुत्रास औरस मानावा किंवा नाहीं, याविषयीं संशयछेदक सन १८५६ सालीं १५ वा आक्ट झाला आहे. तथापि याविषयीं लोकांमध्यें अद्याप एकवाक्यता नाहीं. तथापि सौभाग्यवतीनें पुनर्विवाह करण्याविषयीं चाल आहे ती मानिली पाहिजे.

कलावंतिणीचे जातींत मुलगे असतां कन्येस वार्सा मिळतो. त्यास धर्मशास्त्र अनुकूल नाहीं, तरी रिवाज आहे.

गोसावी यांस धर्मशास्त्राचे नजरेनें पाहिलें तर शेंडी नाहीं. तेव्हां गृहस्थ नव्हेत व संन्यासी म्हणावे तर शूद्रास संन्यासग्रहण कोठेंच लिहिलेलें नाहीं. त्यांत कित्येक गोसावी घरजारीही असतात. ते लग्नें करून प्रपंच करितात व कोणी निस्पृही किंवा खाकी म्हणवितात ते लग्न करित नाहींत. तत्रापि व्यापार करितात. तेव्हां त्यांस कोण म्हणून समजावें अशी अडचण पडते. याकरितां अशा गोष्टींत हा रिवाज समजून त्यांची चाल असेल तसा वारसा ठरविणें योग्य आहे; कारण धर्मशास्त्रांत याविषयीं कांहीं नसलें तरी हजारो लोक त्या मार्गांत आहेत, त्यापेक्षां स्थापित मार्ग लोकांचे हितास प्रतिकूळ नसेल तर तो रिवाज समजून मानला पाहिजे.

दक्षिणेंत विधवा स्त्रिया वपन करित नाहींत, असा रिवाज आहे व ही गोष्ट धर्मशास्त्रास अनुकूल नसली तरी पुरातन चाल समजली पाहिजे. कोणे स्त्रीस वपन न केल्यामुळें मी अन्नवस्त्र देणार नाहीं, म्हणून प्रतिवादी तक्रार करील तर ती चालणार नाहीं.

धर्मशास्त्र चार वर्णांकरितां लिहिलें आहे. परंतु हल्लीं अनेक जाती आढळतात. जसें कोंगाडी, कातकरी, कैकाडी या ज्ञाती धर्मशास्त्रांत नसून हल्लीं या देशांत आहेत, म्हणून त्याप्रमाणें चालावें.

जैन हे हिंदु धर्माचे बाहेर आहेत व त्यांस धर्मशास्त्र लागत नाहीं. याजकरितां त्यांचे रिवाज असतील ते मानले पाहिजेत.

लिंगाईत यांचें म्हणणें असें आहे कीं, आम्हीं पांचवा वर्ण, तेव्हां यांसही धर्मशास्त्र लागत नाहीं. सबब त्यांचे गुरु जंगम यांचे विद्यमानें त्यांचा रिवाज असेल तो मानला पाहिजे.

धर्मशास्त्रांत अपयात्रित यास वारसा मिळूं नये असें आहे. अपयात्रित म्हणजे तारवांत बसून जाणारा– आतां कराची, एडन, विलायत, इत्यादि ठिकाणीं लोक जातात

येतात म्हणून त्यांस पतित किंवा अपयात्रित म्हणतां येत नाहीं. कारण हा रिवाज स्थापन झाला आहे त्यापेक्षां त्यांस दूषण येत नाहीं. या रिवाजाचा प्रतिपादक सन १८५९ चा २१ वा आक्टही झाला आहे.

शंकराचार्यांचे व मध्वाचार्यांचे मठाधिकारी संन्यासी आहेत. ते दौलत अनुभवितात. आणि ती तर संन्यासधर्मास विरुद्ध, तेव्हां गोसाव्याप्रमाणेंच यांचा न्याय आहे.

रामदासी लोकांमध्येंही दोन पंथ आहेत. कोणी निस्पृही म्हणजे ब्रह्मचारी आहेत. नाशिकाजवळचा टाकळीचा मठ अद्याप निस्पृही आहे व चाफळचा मठ ग्रहस्थाश्रमी आहे. कन्हेरी, चिंचोली इत्यादि कित्येक ठिकाणचे मठ पूर्वीं निस्पृही असून आतां ग्रहस्थाश्रमी झाले आहेत व त्यांचा वारसा शिष्यास मिळावा किंवा पुत्रास मिळावा याविषयीं वाद आहे. तेव्हां अशा कामीं रिवाज असेल तसें चालावें.

जातीचे मेहेतर व पंच हे सभा करून यत्किंचित अपराध्यापासून दंड, जातजेवण इत्यादि घेतात, हा रिवाज आहे व जेथें जुलूम झाल्याची तक्रार नसेल तेथें अल्पस्वल्प कामांत हा रिवाज मानला पाहिजे.

डौरी, नाथपंथी, राऊळ, बहिरागी यांची व्यवस्था गोसाव्यांसारखी समजली पाहिजे.

मोठा दस्ताऐवज झाला तर त्याजवर, जमीदार, काजी यांची साक्ष असावी, असा पूर्वापार रिवाज आहे. हल्लीं असे दस्ताऐवज रजिस्टर करण्याविषयीं कायदा ठरला आहे, सबब मागील रिवाज पोकळ झाला.

व्यवहारांत जसे अनेक रिवाज आहेत, तसेच आचारांतही अनेक रिवाज आहेत. म्हणजे देशोदेशीं निरनिराळ्या चाली आहेत. सोनार, परभू या जातींत वैदिक कर्म करितात. गुजराथेंत ब्राम्हण स्त्रीधन देतात, लग्नाचे पूर्वी मागणी करितात, कारणपरत्वें फिरवितात, शूद्राचें उदक पितात व सुतकाचा विटाळ धरीत नाहींत. लिंगाईतही सुतक आणि विटाळसीचा विटाळ धरीत नाहींत. जैन कोणतेंच कर्म करीत नाहींत. ब्राम्हण अग्नी वर्ज करून सेवा करून पोट भरतात. हिंदुस्थानचे कान्यकुब्ज ब्राम्हण मच्छमांस खातात व शेणवी गौड ब्राम्हणही तसेंच करितात. बंगाली ब्राम्हण मद्यपान करितात. हिंदु मोहोरमांत फकीर होतात. कोणीएक शेंडी ठेवितात. कोणी दोन, कोणी पांच व कोणी नुस्ते काकपक्ष म्हणजे झुलपें ठेवितात. कितिएक ठिकाणीं जोडे घालून माधुकरी मागतात. कितिएक ठिकाणीं दहीभात कंठाळींत घेतात. कोणी मुसलमानांनीं भिजविलेले पोहे व चुरमुरे खातात. स्वामीनारायणाचे पंथांतील साधू धड संन्यासी नव्हेत, धड ग्रहस्थ नव्हेत असे आहेत. याप्रमाणें अनेक देशांत व अनेक जातींत नानाप्रकारचे दंडक आहेत. आणि इनसाफाचे कोडतांत हे सर्व मानले पाहिजेत. कायदा होऊन जो दंड फिरला तो मात्र रद्द झाला. बाकी सर्व कायम आहेत, असें समजलें पाहिजे व

जेथें असा रिवाज आहे किंवा नाहीं हें समजण्यास हरकत पडेल, तेथें त्याची चौकशी नीट केली पाहिजे. अस्तु. हे सर्व दंडक मानण्यांत सर्व शास्त्रांचा मुख्य सिध्धांत असा आहे कीं, सर्व लोकांस हितावह रिवाज आहेत किंवा नाहींत, हें पाहावें. आणि हितावह नसेल तो कायद्यानें फिरवावा लागतो व तो फिरेतोंपर्यंत न्यायाधिशास त्याचा विचार करणें प्राप्त असतें.

[नंबर १९३]

कायद्याप्रकरणीं माहिती (नंबर १३)

स्टाटुट ला

हिंदुस्थानसंबंधीं आक्ट हिंदुस्थानचे गवरनर-कौन्सलांत होतात. पण गवरनर-कौन्सलांस साधारणविषयीं मात्र आक्ट करण्याचा अधिकार आहे. मोठे प्रकरणाबद्दल आक्ट विलायतेस पार्लमेंट करितें. याप्रमाणें विलायतेस हिंदुस्थानसंबंधीं झालेले आक्टाचीं पुस्तकें वेगळींच आहेत. परंतु त्यांतील विषय बहुतकरून इंग्लीश लोकांसंबंधीं व राज्यांतील मोठाले कारभारासंबंधीं असतात. म्हणून हिंदुस्थानांतील वकील, मुनसफ यांस विलायतेचे आक्टाचें बहुतकरून स्वप्नदेखील नसतें. त्यांची व्युत्पत्ति प्रायशः हिंदुस्थानांतील कायदे करणारे कौन्सलानें जे आक्ट केले आहेत तेथपर्यंत असते. यास्तव सदरहु विलायती आक्टाचा मासला दाखविण्याकरितां सन १८६१ सालीं विलायतेस चार आक्ट झाले आहेत, ते या पत्रीं घेतों--

क्याप् २५, तारीख २८ माहे जून सन १८६१.

हिंदुस्थानांतील राज्याचे खर्चाकरितां विलायतेंतील लोकांपासून कर्ज काढणें अवश्य आहे, यास्तव महाराणीसाहेब यांणीं पार्लमेंटसभेमध्यें बसलेले बडे लोक, सरदार, धर्माध्यक्ष आणि लोकांचे मुखत्यार यांचे अनुमतानें ठराव केला आहे कीं,

१ हिंदुस्थानचा कारभार पहाणारे सेक्रटरी यांणीं कर्ज घेऊन आपले सहीचीं खतें देत जावीं.

२ खतावर सेक्रटरी यांचे कौन्सलांतील दोन असामींच्या सह्या असाव्या.

३ खतांत मुदत लिहिलेली असेल त्याप्रमाणें पैसा द्यावा.

४ सदरहु खताची धन्यांनीं पाहिजे असल्यास विक्री करावी. हीं खतें जंगम माल समजावा.

५ चार कोटी रुपयांहून अधिक कर्ज करूं नये. सर्व खताचें मुद्दल व व्याज हिंदुस्थानच्या उत्पन्नावर पडेल.

६ या आक्टावरून सेक्रटरी वहिवाट करतील तिचा त्यांणीं हिशेब तयार करून पार्लमेंटास समजवावा.

क्याप् ५४, ता० १ आगस्ट सन १८६१.

तिसरे जार्ज बादशाहाचे राज्याचे ३३ वे वर्षीं आक्ट झाला, त्यांत ईस्ट इंडिया कंपनीचे निसबती सिविल सर्व्हंट याकडे ज्या जागा नेमिल्या आहेत, त्यांपैकीं जागा रिकामी झाली तर ती सिविल सर्व्हन्टांपैकींच कोणास तरी द्यावी व कौन्सलदार खेरीज-करून सर्व हुद्देदार यांमध्यें ज्याची नेमणूक अगोदर झाली असेल त्यास वडील समजावा असें ठरविलें होतें. परंतु कितीएक प्रसंगीं सदरहूपैकीं कांहीं जागा रिकाम्या झाल्या, तेव्हां जरूरीचे वगैरे कारणामुळें त्या सिविल सर्व्हंट नव्हेत अशा बेसनदी लोकांस दिल्या आहेत व अशा नेमणुका कानूनप्रमाणें झाल्या आहेत असें ठरविणें अवश्य आहे. आणि हिंदुस्थानांत जीं सर्कारें आहेत त्यांस अशा नेमणुका करण्यास अधिकार असावा हें योग्य आहे; यास्तव, लार्ड, बडे लोक, सरदार, धर्माध्यक्ष व लोकांचे मुखत्यार यांचे सल्ल्यानें मल्किामा आजमा राणीसाहेब यांणीं ठराव केला आहे तो येणेंप्रमाणें :—

१ पूर्वी सिविल सर्व्हंटाचे हक्काचे जाग्यावर दुसरे लोक नेमिले आहेत, त्यांच्या नेमणुका कायदेशीर आहेत असें समजावें.

२ सिविल सर्व्हंटाचे हक्काच्या जाग्याची याद या आक्टास जोडली आहे त्या जागा हमेष सिविल म्हणजे सनदी चाकर यांस देत जाव्या.

३ परंतु हिंदुस्थानांतील एकादे सरकारास असें दिसेल कीं, विशेष कारणाकरितां सदरहू जाग्यांपैकीं एकादी जागा सिव्हिल सर्व्हन्ट नव्हे असे मनुष्यास द्यावी. तर त्यांणीं ती द्यावी, परंतु असा नेमलेला मनुष्य हिंदुस्थानांत सात वर्षें वस्ती केलेला असावा व तो ज्या जिल्ह्यांत दिवाणी किंवा मुल्की काम करण्यास नेमला असेल, त्या जिल्ह्याचे भाषेंत त्याची परीक्षा उतरली पाहिजे व दुसरे परिक्षेबद्दल सिविल सर्व्हन्ट यांस जे नियम लागतात ते नियम त्यास लागू पडतील.

४ गवरनर-कौन्सलानें अशी नेमणूक करणें ती मुकरर करूं नये आणि करतांच सेक्रटरी आफ् स्टेट यांचे हुजूर कळवावी. आणि त्यांणीं व त्यांचे कौन्सलानें ती मंजूर केल्यास बारा महिन्यांत जाब न आला तर ती नेमणूक रद्द झाली असें समजावें.

५ या आक्टांत जोडलेले यादींत लिहिलेल्या जागांखेरीज ज्या दुसऱ्या जागा आहेत व पुढें होतील त्या सिविल सर्व्हंट यांखेरीज पाहिजे त्यांस देण्यास गवरनर-कौन्सल मुखत्यार आहेत.

६ परंतु लेफटिनेंट गवरनर यांच्या वगैरे जाग्याबद्दल अलाहिदा आक्ट आहेत त्या जागा सदरहू कलमांत समजूं नयेत.

७ पूर्वींचे आक्टांत वडील सरव्हन्ट यांस मोठी जागा द्यावी असा ठराव होता तो या आक्टावरून रद्द झाला आहे.

यादी

१ सेक्रटरी.
२ जुनियर सेक्रटरी.
३ अंडर सेक्रटरी.
४ अकौन्टन्ट जनरल.
५ सिविल आडिटर.
६ सबट्रेझरर.

न्यायखातें

१ सिविल सेशन जड्ज्य कायद्यांत आलेले मुलखांत मात्र.
२ आडिशनल जड्ज व असिस्टंट जड़ज्य.
३ जिल्हा माजिस्ट्रेट.
४ जाइंट माजिस्ट्रेट.
५ असिस्टंट माजिस्ट्रेट.

रिविन्यूखातें

१ रिविन्यु बोर्डाचे मेंबर; मद्रासेंत व बंगाल्यांत.
२ रिविन्यु बोर्डाचे सेक्रटरी.
३ रिविन्यु कमिशनर डिव्हिजनचे.
४ जिल्हा कलेक्टर.
५ सबार्डिनेट कलेक्टर व जाइन्ट माजिस्ट्रेट; हीं दोन्ही कामें एकत्र असतील तीं मात्र.
६ असिस्टंट कलेक्टर.
७ साल्ट एजन्ट.
८ कंट्रोल साल्ट.
९ कमिशनर आफ् कस्टम्स.
१० अफिणीचे एजेंट.

क्याप् ६७, ता. १ आगस्त, सन १८६१

लेजिस्लेटीव कौन्सल दर इलाख्यांत स्थापन करण्याबद्दल व त्याजकडे कोणते प्रकारचे कायदे करण्याचे अधिकार आहेत त्याबद्दल. यांचीं कलमें ५४ आहेत.

क्याप् १०४, ता. ६ आगस्ट १८६१

हायकोर्ट प्रत्येक इलाख्यांत नेमण्याबद्दल यांचीं कलमें १९ आहेत.

नाइट आफ् धि मोस्ट एकझाल्टेड स्टार आफ् इंडिया ही पदवी स्थापन केल्याबद्दल महाराणी सरकारचा हुकूम तारीख २३ फेब्रुवारी सन १८६१ सालीं झाला आहे.

[नंबर १९४]

कायद्याप्रकरणीं माहिती (नंबर १४)

रोमन सिव्हिल ला

युरोपखंडांत हल्लीं जे कायदे आहेत, ते सर्व रूमचे राज्यांत पूर्वीं कायदे होते त्या आधारानें रचले आहेत. याकरितां युरोपखंडांत रूमचे राज्यांतील कायदे शिकवितात व जे कायदे जाणणारे आहेत व जे बारिस्टरचें म्हणजे वकिलाचें व जस्टिसचें म्हणजे न्यायाचें काम करितात त्यांस प्रथम रूमचे कायदे शिकावे लागतात व त्यानंतर इंग्लिश *ला* शिकावी लागते. याप्रमाणें विलायतेंत जे कायदे ठरले त्यांस आधार रूमचे कायदे व ते लाटिन भाषेंत लिहिलेले आहेत, म्हणजे ते शिकणारांस थोडेसें त्या भाषेचेंही ज्ञान लागतें. त्याशिवाय त्यांतील वाक्यें, वचनें व परिभाषा चांगली समजणार नाहीं. ती लाटिन भाषा इंग्रजीहून वेगळी आहे. तथापि अर्धी तिच्याशीं मिसळली आहे. असो, आतां हा रूमचा कायदा सांगण्यापूर्वी रूम हें काय होतें याचा थोडा इतिहास सांगितला पाहिजे. आमचे हिंदु लोक जग निर्माण झाल्यापासून बाहेर कधीं गेले नाहींत व त्यामुळें शेजारीं मोठालीं राज्यें चीन, इराण, रूम इत्यादि जीं होतीं व आहेत त्यांविषयीं यांस खबर नाहीं. आमच्या हिंदुस्थानदेशास तीन दिशेस समुद्र व उत्तरेस हिमालय पर्वत असा ईश्वरनिर्मित कोट आहे. काश्मिराचे अंगानें मात्र काबुल-कंदाहारांत जाण्यास थोडी वाट आहे. तीखेरीज परकी लोकांस इकडे येण्यास व त्या लोकांस तिकडे जाण्यास अडचणी फार. दुसरें, एक दरिद्रामुळें बाहेर जाण्याचा प्रसंग येणार, तर हिंदुस्थानांत खाण्यापिण्यास कमती नाहीं. या कारणानें हिंदु लोक बहुत काळपर्यंत दडून राहिले. बाहेर काय आहे हें त्यांनीं ठाऊक करून घेतलें नाहीं. स्वदेशांतच बसून त्यांणीं आपली संस्कृत भाषा चांगली सुधारली व पुराणें वगैरे कथा लिहिल्या, आणि आपले ठिकाणीं स्वस्थवृत्ति स्विकारली. पुढें प्रथमतः काश्मिराकडून तार्तारीचे मोंगल येऊन त्यांणीं यांस भेट दिली, परंतु ते लोक भिकारी पडले म्हणून येथेंच वस्ती करून या लोकांत मिसळून गेले. यामुळें परकी देशाचें वर्तमान मोंगलाई कारकीर्दींत हिंदु लोकांस समजलें व पुढें आज २०० वर्षें युरोपियन लोकांनीं अंमल केला तरी त्यांविषयींही यांस कांहीं ठाऊक नव्हतें, परंतु आतां नुकतेच बाहेर देश आहेत, अशी वार्ता यांस ठाऊक होत चालली आहे. युरोपांतील व अमेरिकेंतील वर्तमानें यांस समजूं लागलीं आहेत व तेथील कारणानें येथें महागाई वगैरे होते, असें अनुभवास येऊं लागलें आहे. तस्मात् ज्ञानसंबंधीं हिंदुलोकांचा हा ऊर्जितकाळच आहे, असें म्हटलें पाहिजे व प्रस्तुतचीं वर्तमानपत्रेंही जुनें अज्ञान घालविण्यास चांगली मदत करीत आहेत, हें पाहून संतोष वाटतो. अस्तु. आतां रूमचा इतिहास सांगूं:—

हल्लीं जो इटाली देश आहे त्याची राजधानी रूम शहर आहे. त्या रुमांत प्रथम शालिवाहनाचे पूर्वी ८०० वर्षें एक राज्य स्थापन झालें व पुढें दोनशें वर्षांनीं तें राज्य लोकसत्तात्मक होऊन 'सेनेट' सभा व दोन 'कौन्सल' नेमून तेथें राज्यकारभार चालू लागला व पुढें "कौन्सल" काढून "त्रिब्यून" नेमिलें. नंतर शालिवाहनाचे पूर्वी ३०० वर्षें दहा असामी विद्वान नेमून त्यांकडून या राज्यांतील नवीन कायद्याची प्रथम रचना करविली. त्या कायद्यांचें नांव "*लाज आफ् धी ट्वेल्व टेबल्स.*" यानंतर या राज्यांतील कारभार फार वाढला. त्यांत मोठे पराक्रमी पुरुष झाले, आणि त्यांणीं पृथ्वीवर जितका देश ठाऊक होता, तितका या राज्याखालीं आणिला. हल्लींचे इंग्लंड, फ्रान्स हे देश त्याकाळीं या राज्याचे ताब्यांत होते. पुढें या राज्यावर डिक्टेटर या नांवाचे अधिकारी झाले. त्यानंतर पादशाह झाले व त्यांचे राज्यांत लाटिन भाषेंत बहुत ग्रंथ झाले. मोठाल्या कविता, राज्यविचार, शास्त्रें, गणित, ज्योतिषें हीं वाढलीं व पुढें हें राज्य अतिविस्तीर्ण झालें. म्हणून शालिवाहन झाल्यानंतर चारशें वर्षांनीं या राज्याचे दोन विभाग झाले. पश्चिमेचें राज्य रूम या राजधानीखालीं चालूं लागलें, व पूर्वेचे राज्याची इस्तंबोल येथें राजधानी झाली. या शहराचीं नांवें दोन–तीन आहेत. पूर्वीचें याचें नांव विजाशम् होतें. त्यानंतर कुस्तुंतूनिया असें म्हणूं लागले व हल्लीं इस्तंबोल म्हणतात. पुढें कांहीं दिवसांनीं पश्चिमेकडील राज्यांत दंगे होऊन तें राज्य मोडलें आणि त्या दंग्यांत हल्लीं जे युरोपांत देश आहेत त्यांची संस्था झाली. पुढें पूर्वेकडील राज्यांत जस्टिनियन म्हणून एक मोठा बादशहा झाला. त्याणें आपले राज्यांत मोठाले पंडित बसवून व जुने कायदे आणि शिरस्ते एकत्र करून एक नवीन ग्रंथ रचला. त्याचें नांव "*इन्स्टिटयूट्स आफ् जास्टिनियन.*" हा ग्रंथ अद्याप मुख्य शिकण्यांत घरलेला आहे. हा लाटिन् भाषेंत असून याचा इंग्लिश तरजुमा झाला आहे. सिविल खात्यांत जे साहेब लोक परिक्षा देतात त्यांस हा शिकावा लागतो. असो. याप्रमाणें हें राज्य शालिवाहनाचे शके १३०० वर्षेंपर्यंत सरासरी चाललें, नंतर मुसलमान लोकांस बरोबर घेऊन महंमदानें या शहरावर हल्ला केला; आणि तेथील जुनीं पुस्तकें जाळून टाकिलीं, लोकांस विकलें, त्यांच्या मालमत्तेची लूट केली, आणि तेथें आपला अंमल बसविला. तेव्हांपासून हें शहर तुर्कस्थानांत गेलें व सर्व राज्य तुर्क लोकांचें झालें; त्याप्रमाणें हल्लीं आहे; परंतु मुसलमान लोक पूर्वीचा इतिहास न जाणून तुर्कस्थानासच रूमचा मुलुख म्हणतात व तुर्कस्थानचे बादशाहास रूमचा बादशहा म्हणतात, आणि त्याचे आलीकडे एक प्रांत आहे त्यास शाम म्हणतात व रूमचें राज्य आम्ही घेतलें असा त्यास अभिमान आहे, त्याजवरून ते रूमशामच्या गप्पा मारतात. आणि अधिक आगळ्या गोष्टी सांगतात. व शिकंदर ग्रीसचा बादशहा असून त्यास रूमी म्हणतात. असो. याप्रमाणें हें रूमचें राज्य २१०० वर्षें चाललें. यांतील लोक मोठे विद्वान होते. त्यांणीं कायदे तयार करण्यावर फार परिश्रम केले आहेत

व पुढील राज्यांनीं यांचे कित्ते घेतले आहेत. याकरितां या राज्यांतील कायदा ज्यास "*रोमन सिव्हिल ला*" म्हणतात, तो शिकणें अवश्य आहे. मनू, याज्ञवल्क्य इत्यादिकांनीं जशीं कायद्याचीं पुस्तकें हिंदुस्थानांत रचिलीं आहेत, त्याप्रमाणें मुसा यानें यहुदी लोकांचा कायदा लिहिला आणि मनूप्रमाणेंच ईश्वराचे नांवानें तो प्रसिद्ध केला व त्याचप्रमाणें सोलन, लैक, रगसन् व द्रेको हे ग्रीस देशांत कायदे लिहिणारे झाले; परंतु या सर्वांचे ग्रंथांपेक्षां रूमचे राज्यानें कायदा केला तो चांगला आहे व त्यांत नुस्ते नियमच केवळ नाहींत; त्यांचीं कारणें, तपशील व विभाग चांगले केले आहेत. तसें हिंदु लोकांचें धर्मशास्त्र मोठाले सरदार व राज्यकारभारी यांणीं रचलेलें नाहीं. तें बहुतकरून भटांनीं रचलें आहे. यामुळें त्याची तऱ्हा विशेषेंकरून भट्टी आहे व त्यांत आचार, प्रायश्चित्तें इत्यादिक फार लिहिलीं आहेत. याकरितां हल्लीं व्यवहारीक लोकांत तें पढण्यास योग्य नाहीं असें जें कितीएकांचें मत आहे तें खरेंही आहे. कारण त्यापासून कायद्याची व्युत्पत्ति फारशी व्हावयाची नाहीं; तथापि हें कोणाचें लक्षांत येईल? दुसरे देशचे कायद्याचे ग्रंथ जे शिकतील त्यांचे, केवळ संस्कृत पढलेले पंडितांस हें समजणार नाहीं, कारण त्यांस दुसरा पडोसा ठाऊक नाहीं.

आतां जस्टिनियन याचे बुकांतील ठेवण समजण्याकरितां कांहीं प्रकरणें लिहितों.

१ *ला* म्हणजे न्याय कोणता, अन्याय कोणता व मनुष्याचें कर्तव्यकर्म काय, याचा विचार.

२ *ला*चा सारांश तीन गोष्टींत येतो. खरेपणानें वागणें, कोणास उपद्रव न करणें आणि दुसऱ्याचें हरएक तऱ्हेचें ऋण फेडणें.

३ *ला*चीं लक्षणें दोन आहेत. म्हणजे कितीएक कर्मांची शिफारस केली आहे, परंतु तीं न केल्यास शासन नाहीं. आणि कितिएक कर्मांचा निषेध लिहून तीं कोणी करील तर त्यास शिक्षा ठरविली आहे. याप्रमाणें दंड्य आणि अदंड्य असे दोन कर्मांचे विभाग आहेत.

४ *ला*मध्यें आणखी दोन विभाग आहेत, एक पब्लिक आणि दुसरा प्रायव्हेट. पब्लिक म्हणजे रयतेचा राज्याशीं धर्म, आणि प्रायव्हेट म्हणजे रयतेचा आपसांतील धर्म.

५ प्रायव्हेट लामध्यें तीन विभाग आहेत.

१ *ला आफ् नेशन्स.*

२ *ला आफ् नेचर.*

३ *सिव्हिल ला:*

प्रत्येक मनुष्यास न्याय–अन्याय समजतो व वचन दिलें त्याप्रमाणें चालावें हेंही समजतें. यास्तव *ला आफ् कंट्राक्टस्* इत्यादि प्रकारचा राष्ट्रासंबंधीं कायदा आहे. दुसरा, कितिएक धर्म मनुष्यास ईश्वरानें लाऊन दिले आहेत; जसें मुलांवर ममता, आईबापांची

कृतज्ञता इत्यादि, हे सर्व धर्म *ला आफ् नेचर* यांत गणले आहेत. तिसरा *सिव्हिल ला* म्हणजे राज्याचे बंदोबस्ताकरितां जे ठराव केले असतात ते.

६ *सिव्हिल ला*मध्यें दोन विभाग आहेत; एक लिहिलेला ठराव आणि दुसरा वहिवाटींतील नियम. रूमचे *सिव्हिल ला*मध्यें जीं पुस्तकें येतात त्यांचीं नांवें.

कस्टिच्यूशन. – म्हणजे बादशाही फरमान.

इडिक्ट्स – हुकूम.

डिक्रीटा. – न्यायाधिशाचे ठराव.

सेनेटस् कन्सल्टा. – सेनेटसभेचा ठराव.

कोड्स. – वेळोवेळीं केलेले ग्रंथ.

पान्डेक्ट्स्. – कायदे.

इन्स्टिच्यूट्स – ग्रंथ.

नावेलस् – टीका.

इत्यादि बहुत आहेत.

७ *सिव्हिल ला*मध्यें तीन विषय आहेत. एक पुरुष, दुसरा पदार्थ आणि तिसरा फिर्यादी.

८ पुरुष म्हणजे कोणी मनुष्य अथवा मंडळी ज्यास हक्क, अधिकार किंवा धर्म असतो; म्हणजे कोणापासून कांहीं घेणें किंवा कोणास कांहीं देणें किंवा आपलेजवळ रक्षण करणें हे अधिकार ज्यास आहेत, तो पुरुष. यावरून गुलाम व बटिक यांस कांहीं अधिकार नसतो, म्हणून त्यांस पुरुषांत न गणितां पदार्थांत गणितात. जनावरें हीं पुरुष नव्हत; तसेंच हिंदुशास्त्राप्रमाणें सभर्तृक स्त्रिया पुरुष नव्हत; कारण त्यांस कांहींच अधिकार नाहीं. त्यांचा सर्व व्यवहार पतीचे मार्फत चालतो.

९ जे पुरुष आहेत त्यांस आवडेल तें कर्म करण्याची मोकळीक आहे. परंतु त्या मोकळिकेस अपवाद दोन आहेत. एक कायद्याची प्रतिकूळता व दुसरी शरीरशक्तीची प्रतिकूळता. बाकी त्यांणीं पाहिजे तें करावें.

१० गुलाम व बटकी यांस हल्लीं अधिकार देऊन पुरुष ठरविले आहेत. पूर्वी रूमचे कायद्यांत तीन प्रकारानें मनुष्याचें पुरुषत्व जाऊन त्यास गुलामपणा येत असे. एक लढाईत शत्रूच्या हातीं सांपडल्यानें, दुसरे गुन्ह्यामुळें गुलामपणाची शिक्षा झाल्यानें, व तिसरें नादार कर्जदारीचे गुलाम म्हणजे ज्यास धनीपणा नाहीं व ज्यास कांहीं पदवी नाहीं तो.

११ पदार्थ म्हणजे जितक्या जिनसांस अस्तित्व आहे ते. मग ते जड असोत किंवा काल्पनिक असोत. यांचे प्रकार खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविले आहेत—

१ खासगी म्हणजे एक मनुष्याचे जिन्नस.

२ सार्वजनिक म्हणजे समुद्र, नद्या, डोंगर, जमीन इत्यादि. यांवर

पहिल्यानें ज्यानें कब्जा ठेविला तोच त्याचा धनी; जसें अमुक गांवची अमुक नदी म्हणजे पहिल्यानें तेथें कोणी नव्हतें; तेव्हां नदीचे कांठीं जो गांव वसला त्या लोकांची ती नदी व ती जमीन होय.

३ सरकारी जिन्नस म्हणजे सार्वजनिकच ते पदार्थ असतात; परंतु सरकार-संबंधाचे बंदोबस्त त्यांवर असतात. म्हणजे बंदरें, जंगलें, किल्ले, वेशी, बाजार इत्यादि.

४ मंडळीचे पदार्थ म्हणजे एका जातीकरितां किंवा अनेक मनुष्यांचे वर्गाकरितां जी जिन्नस दिली किंवा त्यांणीं संपादन केली ती. जशीं देवालयें, स्मशानें, मशिदी वगैरे.

१२ पदार्थाचा धनी म्हणजे त्या पदार्थाचें उत्पन्न घेणें, तो पदार्थ विकणें आणि तो पदार्थ कोणी नेला तर परत घेणें हे अधिकार ज्यास आहेत त्यास धनी म्हणावें.

१३ धनीपणा कोणकोणतेप्रकारें मिळतो तें—

१ वहिवाटीनें, म्हणजे ज्या पदार्थावर ज्या काळीं कोणाचा दावा नव्हता तेव्हां ज्याणें तो घेतला ती वहिवाट.

२ वृद्धीनें, म्हणजे कितिएक पदार्थ वाढतात, जसें पैसा, गुरें, झाडें इत्यादि.

३ खरेदीनें.

४ कोडताचे हुकुमानें.

५ दानानें.

६ कायद्यानें.

१४ फिर्यादी म्हणजे दिवाणी किंवा फौजदारी. त्यांचा हेतु इतकाच कीं, आपलें नुकसान जें झालें तें भरून घेणें किंवा नुकसान करणारांस शिक्षा देववियें. सर्व लोकांनीं आपली व्यवस्था सुरक्षित चालावी म्हणून कायद्याचे आधारानें एक मोठें यंत्र उभें केलें असतें त्याचें नांव कोडत. त्या यंत्रास किल्ली दिली म्हणजे तें चालू होतें. फिर्याद करणें म्हणजे, किल्ली देणें आहे.

रूमचें राज्य बसलें, तेव्हां पहिल्यानें जे तेथें आले ते बडे लोक झाले. त्यांस *सिटिजन* म्हणत होते व मागून जे आले ते किरकोळ लोकांत गणले जात होते. याचप्रमाणें हिंदुस्थानांत गांवोगांव मिराशी व उपरी यांचा भेद आहे. *सिटिजन* जे होते त्यांस मोठा अधिकार होता. इतरांस त्याप्रमाणें नवता. हल्लीं अमेरिकेंतील राज्यांतील रयतेसही *सिटिजन* म्हणतात व त्या देशाचे मनुष्याजवळ तेथील सरकारचा दाखला असतो कीं, हा आमचा रयत आहे व त्या दाखल्यावरून इतर राज्यांत तो गेला तरी त्याचे अधिकार संरक्षण होतात. जर कोणी परकी राजा असें न करील तर त्याशीं ज्या राजानें दाखला दिला असेल, त्यास भांडण्याचा प्रसंग येईल. त्याचप्रमाणें इंग्लिश लोकांचाही बंदोबस्त आहे. जर परकी राज्यांत इंग्लिश मनुष्याचा खून वगैरे

होईल तर इंग्लिश सर्कार त्याचा पक्ष धरून होईल तितका बंदोबस्त करील व त्या परदेशांत इंग्लिश लोकांचें गमन आहे तेथील राजापासून त्यांणीं या प्रकरणीं कमलबंदी करून घेतली आहे व या कलमबंदीप्रमाणें वहिवाट होण्याकरितां इराण, तुर्कस्थान, चीन, जपान इत्यादि परकी देशांत वकील ठेवावे लागतात.

याप्रमाणें *सिव्हिल ला* म्हणजे रूमचे राज्याचे कायदे यांविषयीं हें दिक्प्रदर्शन केलें. विलायतेकडे यांचा अभ्यास मुख्य धरला आहे. यास्तव मोठाले विद्यालयांत या विषयावर पाठ देण्याची चाल आहे. आतां या ग्रंथाचें भाषांतर मराठी भाषेंत होईल, तेव्हां आमचे लोकांस तें काय आहे हें तपशीलवार समजूं लागेल. सांप्रतकाळीं तें समजण्याचा मार्ग नाहीं; परंतु चिकित्सक लोकांस ती दिशा समजावी म्हणून हा मजकूर लिहिला आहे. यावरून कायद्याचें ज्ञान बहुत विस्तीर्ण आहे व त्यास साधनें बहुत पाहिजेत. आणि त्या साधनांपैकीं अद्याप या देशांत कांहींच नाहीं. हेंही आमचे वाचकांस यावरून कळेल.

[नंबर १९५]

काळें पाणी

इंग्रजी राज्यांत अपराध्यांस काळे पाण्याची शिक्षा होते हें सर्वांस ठाऊक असेल. परंतु काळें पाणी म्हणून काय आहे हें विचारतां पुष्कळांस ठाऊक असल्याचें दिसत नाहीं, व पाहिजे तो पाहिजे तसें सांगतो. म्हणून त्याविशीं थोडिशी माहिती लिहिणें जरूर आहे काळें पाणी म्हणजे स्वदेशांतून मनुष्यास काढून परदेशांत नेऊन तेथें कैदेंत ठेवणें. पूर्वी इंग्लीश सरकारचा हा कैदखाना आस्त्रेलिया बेटांत बांटबे शहर आहे तेथें होता व कैदीस तेथें पाठवून लिकडील गवरनराचे स्वाधीन करीत. मग जन्मपर्यंत किंवा नेमलीं वर्षेपर्यंत तेथें त्यांस कैदेंत राहावें लागे. पुढें सन १८५७ सालीं आंडामान म्हणून हिंदुस्थानचे दक्षिणेस वेट आहे. तेथें पूर्वीचे लोकांची वसाहात आहे, पण ते लोक अगदीं रानटी व वानराप्रमाणें जंगलांत फिरणारे म्हणून त्या बेटांत तपास करण्यास एक कमेटी नेमली होती. नंतर तिनें ठरविले ठिकाणीं एक मोठा तुरुंग बांधला व त्याजवर कारभारी ठेविला आणि तेथें बंडांतील कैदी वगैरे पाठविण्याचा क्रम चालू केला. तेव्हांपासून येथें सुमारें २००० कैदी जमले आहेत. त्यांजकडून रान तोडवून जमीन साफ करवितात. प्रथमतः तेथें अजारानें कितिएक लोक मेले; परंतु आतां तितका आजार नाहीं. या बेटावर बंदर चांगलें आहे. त्याचें नांव पोर्टब्लेर असें ठेविलें आहे. कपतान ब्लेरसाहेब यांणीं हें बंदर शोधून काढिलें. यास्तव त्याचें नांव त्यास दिलें आहे. तेथील लोकांचे

बंदोबस्ताकरितां व कैदीचे बंदोबस्ताकरितां त्या ठिकाणीं थोडी फौजही ठेविली आहे. जंगली लोक अद्याप आहेत तसे आहेत व त्यांची भाषा वगैरे पृथकच आहे. ती अद्याप कोणास येत नाहीं. हे लोक जनावराप्रमाणें रोंकून राहातात. माणसांत मिसळत नाहींत व शेतभात करित नाहींत. पशूसारखे वृत्तीनें राहतात. व त्यांच्या स्त्रियाही नागव्याच असतात.

प्रत्येक युरोपियन राजाचा काळे पाण्याचा देश नेमलेला आहे. रशियाच्या राजानें आपला जंगली व वाईट मुलुख सिबेरिया म्हणून उत्तर समुद्राचे काठीं आहे तो काळें पाणी ठरविला आहे. तसेंच इंग्लिश सरकारचा अंमल ब्रह्मदेश व चीन, सुमात्रा व स्ट्रेट इत्यादि ठिकाणीं आहे. तेथील कोडतें ज्यांस काळे पाण्याची शिक्षा ठरवितात, त्यांस हिंदुस्थानांत पाठवितांत. यास्तव चिनी व मलाई कैदी हिंदुस्थानांतील तुरुंगांत असतात.

हिंदुस्थानचे कैदी जमले म्हणजे मुंबईंत कारभारी आहे तो एक भाड्यानें जाहाज घेतो, आणि पाहारा देऊन पोर्टब्लेरचे कारभाऱ्याकडे पोंचवून देतो. याप्रमाणें व्यवस्था आहे.

स मा प्त



शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	१८	°र्वाह्मणैः	°ब्राह्मणैः
८	३०	भडवे	भडवे
३९	२८	असते	असतो
४७	१८	जातींचें	जातींचे
५१	२९	असतात	जमतात
५२	८	आल	आला
५४	२५	आली कडील	आलीकडील
५५	८	श्रोती	भ्रांती
५७	१५	चिंत	चिंता
५८	२८	कायथे	कायदे
९०	२	हदू	हिंदू
९५	१	अध:कारांत	अंध:कारांत
९८	२५	°त्तथेव	त्तथैव
९९	३२	देशस्था	देशस्थ,
१०७	११	लोक हितेच्छु	लोकहितेच्छु
१२४	६	त्य	त्या
१२६	१३	रीं	घरीं
१२७	१४	जेंयें	जेथें
१३५	८	झाली	झालीं
१३५	२६	लोका	लोक
१४२	१४	युध्ध विद्या	युध्धविद्या
१६०	२३	व	बरें
१७८	१५	असे	तसेंच
१८४	२८	यांस	स्त्रियांस
२०२	३३	एकादीं	एकादी
२३३	१२	मागे	मागें
२५३	२८	सारख	सारखें
२६५	३१	ठेवा.	ठेवा-
२७३	३०	त्याचे	त्याचें
२८०	९	१७७७	१७०७
२८०	२७	उनखवची	उमरावची
२८९	२१	गांवच	गांवचा

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४०६२ वि: निर्ग्रंथ
आक २७२८ वी वि २५।१२।६७

५८८

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२९२	१	शिक्क	शिक्का
३०३	२७	४२०	२०
३०९	८	श्रीशिवशभू°	श्रीशिवशंभू°
३३३	१०	मनुष्यवळी	मनुष्य [बळी]
३३५	२५	अहिंस	अहेत
३४४	२४	हीच	ही व
३५४	१२	रोजगार	रोजगारी
३८९	२२	जात	चालत
३९०	१६	सकळंही	सकळही
३९१	८	संसाराशीं	संसाराशी
४३५	१४	प्रतिवत्थक	प्रतिवद्धक
४३५	२९	झा	झाला
४४३	७	गावद्दल	जगावद्दल
४५०	१५	ज्याची	ह्मणजे ज्याची
४५८	५	माषविकारो	माषाविकारो
४५४	१९	वाचयेत्	याचयेत्
४६१	८	वर्षीं	वर्षीं
४६५	१८	स°	सर्व
४७३	५	नकश्चिवद्योषितः	न कश्चिद्योषितः
४७६	१२	दुहितरश्चव	दुहितरश्चैव
४७	१३	शिष्यसग्रत्प्रचारिणः	शिष्यसब्रह्मचारिणः
४७८	२३	पहिल	पहिला
४८०	३	करितां	याजकरितां
४९२	१०	समजन	समजून
४९५	१९	तेंव्ह	तेंव्हां
४९५	२८	निष्ठ	निष्ठा
४९५	३२	मर्ख	मूर्ख
४९५	३२	आम्ह	आम्हांस
४९८	१४	पूर्वीं	पूर्वी
५०२	२८	त्याची	त्यांची
५२८	१०	आहेइ	आहेत
५५१	२	कायद्याप्रकरणा	कायद्याप्रकरणीं
५६०	१	अनसू	असून
५६२	२	वा	या
५७०	१५	घिन्न	विन्न

ठाणे ग्रंथ संग्रहालय

REFBK-001591 4